


# ।। न्यायपालिका • प्रशासन • संरक्षण ।।

इतिहास । साहित्य । विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण । न्यायपालिका · प्रशासन · संरक्षण । समाजकारण · धर्म · अध्यात्म । कृषी · सहकार ।
उद्योग · अर्थकारण । संगीत · दृश्यकला । पत्रकारिता · ललितेतर साहित्य । क्रीडा । नाट्य · चित्रपट । राजकारण · भविष्यवेध ।

# आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
## शिल्पकार चरित्रकोश

खंड ४

भाग १

# न्यायपालिका

संपादक

शरदच्चंद्र पानसे

खंड सहयोग

पुणे महानगरपालिका, पुणे

प्रमुख प्रायोजक

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

सहप्रायोजक

दि सारस्वत को-ऑप. बँक लि.

प्रकाशक

साप्ताहिक विवेक

(हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
शिल्पकार चरित्रकोश, खंड ४
भाग-१ : न्यायपालिका

© साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

# न्यायपालिका खंड

**पहिली आवृत्ती**
चैत्र शु. एकादशी, शके १९३३, १४ एप्रिल २०११

**प्रकाशक**
साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)
५/१२, कामत औद्योगिक वसाहत,
३९६, स्वा. सावरकर मार्ग, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी : (०२२) २४२२ ९४५१
फॅक्स : (०२२) २४३६ ३७५६
e-mail : charitrakosh@gmail.com
Website : www.maharashtranayak.com

**संगणकीय अक्षरजुळणी**
संकल्प ॲडव्हर्टाइझिंग अँड बुकवर्क,
९०२, सदाशिव पेठ, पुणे - ३०.
दूरध्वनी : ०२०-२४४९७९८८

**मुद्रक**
सिद्धी ऑफसेट प्रा. लि. प्रभादेवी, मुंबई - २५.

**मुद्रितशोधन**
वृषाली सरदेशपांडे

**मुखपृष्ठ**
आशुतोष सरपोतदार

**मूल्य : ९०० रुपये**

**संपादक**
शरच्चंद्र पानसे

**कार्यकारी संपादक**
दीपक हनुमंत जेवणे

**संपादन साहाय्य**
वर्षा जोशी - आठवले

**खंड समन्वयक**
संध्या लिमये

**खंड सहयोग**
पुणे महानगरपालिका, पुणे
पिनॅकल ग्रुप, पुणे

**विशेष आभार**
मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
इंडियन लॉ सोसायटीचे
कायदा महाविद्यालय, पुणे.
बार असो.ऑफ महाराष्ट्र अँड गोवा
बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट
रवी पंडित, कार्य. संचालक के.पी.आय.टी.

# भूमिका

'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण -शिल्पकार चरित्रकोश' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील चौथा खंड वाचकांच्या हाती देत असताना आम्हांला आनंद होत आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक जडणघडणीची ओळख करून देण्यापासून भविष्यकालीन महाराष्ट्राचा वेध घेण्यापर्यंत या प्रकल्पाची व्याप्ती आहे. महाराष्ट्राचा इतिहास, वर्तमान व भविष्य यांसंबंधी एक व्यापक जाणीव महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने वाचकांसमोर ठेवत आहोत.

आधुनिक नागरी समाजव्यवस्थेची न्यायपालिका, प्रशासन व संरक्षण ही महत्त्वपूर्ण अंगे आहेत. घटना ही आधुनिक समाजव्यवस्थेच्या अस्तित्वाचा दस्तऐवज असतो. राज्यसंस्था व नागरिक आणि नागरिकांमधील परस्परसंबंधांची निश्चिती घटनेद्वारे होत असते. राज्याचे प्रशासन या घटने अंतर्गत चालविणे ही प्रशासनावरील प्रमुख जबाबदारी व हे प्रशासन कायद्यानुसार कार्यरत आहे, हे पाहण्याची जबाबदारी न्यायपालिकेची असते. समाजवादी समाजरचनेत प्रशासन चालविण्याबरोबरच एक राजकीय सिद्धान्त अमलात आणण्याची जबाबदारी प्रशासन यंत्रणेवर पडली की त्यातून तिचे स्वरूप सर्वंकष बनते. त्यामुळे त्याच्यात अनेक त्रुटी आहेत. एकेकाळी आपल्या समोर येणाऱ्या खटल्यांच्या संदर्भात कायद्याचा अर्थ लावणे एवढीच आपली जबाबदारी आहे, असे न्यायालय मानते. परंतु आता कायद्याचे रक्षण करण्यासंदर्भात ती अधिक सक्रिय बनली आहे. संरक्षण व तिचे राजकीय स्वरूप हीदेखील आधुनिक संकल्पनाच आहे. या तीनही संकल्पना ब्रिटिश राजवटीपुरत्या आपल्या समाजात रुजल्या आणि आता त्या भारतीय समाजाच्या अंगभूत घटक झाल्या आहेत. गेल्या २०० वर्षांत या तीनही क्षेत्रात असलेला ब्रिटिश वारसा आपल्याकडे घेऊन त्यावर आपला विशिष्ट ठसा उमटविण्याची कामगिरी या क्षेत्रातील ज्या ज्या महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांनी केली त्यांची माहिती या खंडाद्वारे आम्ही वाचकांपुढे ठेवीत आहोत.

न्यायपालिका खंडाकरिता शरच्चंद्र पानसे यांना आम्ही संपादन करण्याची विनंती केली व या कार्यासाठी त्यांनी सहर्ष संमती दिली. तसेच या खंडासाठी निवृत्त न्या.नरेंद्र चपळगांवकर यांनी वेळोवेळी संदर्भासाठी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभारी आहोत. प्रशासन खंडासाठी डॉ. माधव चितळे, शरद काळे, सूर्यकांत जोग, अरविंद इनामदार, प्रभाकर करंदीकर, श्रीधर जोशी, लीना मेहेंदळे, प्रभाकर कुकडोलकर, बबन जोगदंड यांचेही अनमोल सहकार्य लाभले. याबरोबरच संरक्षण खंडासाठी निवृत्त लेफ्ट. जनरल शेकटकर, निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले, विनायक अभ्यंकर, अविनाश पंडित यांनी सहकार्य केले त्याबद्दल आभारी आहोत. सदर खंडाच्या तिनही भागांसाठी ज्या मान्यवर तज्ज्ञांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या त्याबद्दल त्यांचेही आभारी आहोत.

हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी स्वयंप्रेरणेने किंवा आमच्या विनंतीला मान देऊन विविध विषयांतील तज्ज्ञ, पुरस्कर्ते आणि ग्राहक यांचे सहकार्य लाभले आहे, लाभत आहे; त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. अशा प्रकारचा प्रकल्प भरीव अर्थसाहाय्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. या प्रकल्पासाठी प्रमुखतः निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज, दि सारस्वत को-ऑप. बँक तसेच या खंडासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष अर्थ सहाय्य करण्यात आले. त्यामुळे हा प्रकल्प थोडा अधिक काळ घेऊन का होईना पण निश्चितपणे पूर्ण होईल, असा विश्वास आम्हाला आहे.

**- दिलीप करंबेळकर**

## साप्ताहिक विवेक

**प्रबंध संपादक**
दिलीप करंबेळकर

**कार्यकारी संपादक**
किरण शेलार

**मुख्य उपसंपादक**
अश्विनी मयेकर

**व्यवस्थापक**
शहाजी जाधव

**प्रतिनिधी प्रमुख**
राहूल पाठारे

**संपादकीय विभाग**
दीपक जेवणे, रवींद्र गोळे
शीतल पालकर, सपना कदम

**कार्यालयीन साहाय्य**
आदिनाथ पाटील, अनंत मालप,
दयानंद शिवशिवकर, संजय पवार,
प्रशांत उपासनी

**व्यवसाय प्रतिनिधी**
सचिन जाधव, अजय कोतवडेकर,
राकेश सोनार, प्रदीप निकम, किरण
वाकचौरे, भाऊसाहेब मते

**हिंदी विवेक**
अमोल पेडणेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी)
अजय कोतवडेकर

# प्रकल्प समिती

## मार्गदर्शक समिती
एकनाथ ठाकूर (माजी खासदार)
सुरेश हावरे
डॉ. गिरीश वासुदेव
राधाकृष्ण विखे-पाटील

## सल्लागार मंडळ
श्रीराम दांडेकर
अनिल गचके
देवेंद्र देवस्थळे
संजय हेगडे
रवींद्र प्रभुदेसाई
राहुल सोलापूरकर
(संपर्क समन्वयक)

## संपादकीय समिती
डॉ. रा.श्री. मोरवंचीकर
डॉ. बाळ फोंडके
डॉ. सुभाष भेण्डे
डॉ. चंद्रकांत वर्तक
डॉ. अशोक रानडे
डॉ. भा. र. साबडे
डॉ. द. र. बापट
अरुण टिकेकर
वसंत रोकडे
सुहास बहुळकर
सुधीर नांदगावकर
जयराज साळगावकर
सूर्यकांत पाठक
विद्याधर ताठे
डॉ. अरुणा ढेरे
ले.ज.द.ब. शेकटकर

## सुकाणू समिती

**प्रबंध संपादक**
दिलीप करंबेळकर

**मुख्य कार्यकारी संचालक**
सी. ए. मिलिंद आगरकर

**प्रकल्प समन्वयक**
महेश पोहनेरकर

**प्रकल्प कार्यकारी संपादक**
दीपक हनुमंत जेवणे

**संपादकीय सहाय्य**
सुपर्णा कुलकर्णी,
राजेश प्रभु-साळगांवकर,
आशा बापट,
वर्षा जोशी-आठवले

**व्यवस्थापकीय समन्वयक**
शहाजी जाधव

**कार्यालयीन व विक्री समन्वयक**
सुशांत डोके

**संकेतस्थळ समन्वयक**
संध्या लिमये

# निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज

**"To be among the top 5 builder-developers in India, and among the top 25 in the world while being the leader in the affordable housing segment by creating better lifestyles and better environments through state of the art townships at affordable rates.'**

हे ब्रीदवाक्य घेऊन आज निर्माणची वाटचाल सुरू आहे. १९९५ साली अजित मराठे आणि राजेंद्र सावंत या दोन युवकांनी भागीदारीत सुरू केलेल्या ह्या फर्मचे रूपांतर आता निर्माण रिअल्टर्स अ‍ॅन्ड डेव्हलपर्स लि. अशा पब्लिक लिमिटेड कंपनीत झाले आहे. येत्या २ ते ३ वर्षांत या कंपनीचा पब्लिक इश्यू बाजारात येणार आहे आणि आज फक्त एक कंपनी न राहता अनेक कंपन्यांचा हा निर्माण ग्रुप तयार झाला आहे. सतीश गानू हे ग्रुपचे संचालक असून मुख्यत्वे ब्रँडिंग अँड मार्केटिंग स्ट्रॅटेजी या महत्त्वाच्या खात्यांची धुरा ते समर्थपणे सांभाळीत आहेत.

निर्माण रिअल्टर्स अ‍ॅन्ड डेव्हलपर्स लिमिटेड कंपनीच्या अंतर्गत मुख्यतः बिल्डर-डेव्हलपर म्हणून विविध ठिकाणी जागा विकत घेऊन तेथे विविध प्रकारचे प्रकल्प, मुख्यतः निवासी प्रकल्प उभे केले जातात. असे ४० प्रकल्प विविध स्तरांवर, विविध ठिकाणी सुरू आहेत. कांदिवली, मालाड, जोगेश्वरी, महालक्ष्मी, पार्ले, गोवंडी, नेरळ, रत्नागिरी, गणपतीपुळे, माणगाव (गोरेगाव), गोवेले या ठिकाणी प्रकल्पांचे काम सुरू आहे. झोपडपट्टी पुनर्विकास, जुन्या चाळींचे पुनर्वसन, बंगलो स्कीम, सेकंड होम प्रोजेक्टस अशा विविध प्रकारांत हे प्रकल्प येतात आणि यांतील ९० टक्के प्रकल्प हे अ‍ॅफोरडेबल हाउसिंग या प्रकारात मोडतात. यातील महालक्ष्मीचा प्रोजेक्ट मात्र क्लास हाउसिंग या प्रकारात गणला जातो. मुंबईच्या रेसकोर्ससमोर तसेच महालक्ष्मी स्टेशनजवळ २०३ भाडेकरूंच्या पुनर्वसनाचा हा प्रकल्प आहे.

खऱ्या अर्थाने निर्माण ग्रुपचे नाव झाले ते नेरळ येथील सेकंड होम प्रोजेक्टसमुळे. तेथल्या प्रकल्पाला २००८चे 'बेस्ट सेकंड होम्स प्रोजेक्ट' हे अ‍ॅकोमोडेशन टाइम्सचे अ‍ॅवॉर्ड मिळाले. आज सेकंड होम प्रोजेक्टमध्ये नेरळ येथे 'निर्माण नगरी' 'निसर्ग निर्माण', तसेच 'माथेरान व्हॅली' हे प्रकल्प उभे राहत आहेत. या सेकंड होम प्रोजेक्टचे नाव खऱ्या अर्थाने सर्वदूर पोचवले ते नेरळ स्टेशनपासून १ कि. मी येथे असलेल्या 'निर्माण नॅनो सिटी' या प्रोजेक्टमुळे. मंदीच्या काळात बांधकाम व्यावसायिक नवीन प्रकल्प सुरू करायला घाबरत असतानाही निर्माण ग्रुपने सर्वसामान्य लोकांना परवडतील अशा चार ते साडे चार लाख रुपये किमतीच्या घरांचा 'निर्माण नॅनो सिटी' हा प्रोजेक्ट जाहीर केला.

'बिल्डरच्या हाताखाली बिल्डर' ही संकल्पना निर्माणने अतिशय उत्तमरीत्या राबवून अधिकाधिक मराठी लोकांनी बांधकाम व्यवसायात यावे या दृष्टीने 'निर्माण ट्रेनिंग अ‍ॅकेडमी' प्रयत्न करते. प्रत्येक बुकिंगमागे रु.५०००/- हे 'निर्माण चॅरिटेबल ट्रस्ट'च्या खात्यात जमा होऊन त्यातून माणगावचे १०० विद्यार्थी व मुंबईतील काही अनाथाश्रमांतील विद्यार्थीदेखील या योजनेअंतर्गत दत्तक घेतले आहेत. पर्यटन, संगणक, इंग्रजी संभाषण, कृषीविषयक अभ्यासक्रम आदी अभ्यासक्रमांद्वारे कोकणातील उद्योगधंद्यांना पूरक असे मनुष्यबळ विकसित करण्याकरिता माणगाव जिल्हा रायगड येथील आय.आय.टी. केंद्रात शासनाच्या सहयोगाने नवीन अभ्यासक्रम 'निर्माण'ने चालू केले आहेत. पर्यटनक्षेत्र महाबळेश्वर येथून जवळच पोलादपूर येथे नवीन आय.टी.आय.ची स्थापना करून हॉटेल व्यवस्थापनाला पूरक आणि त्या संदर्भात उपयुक्त अभ्यासक्रमांची सुरुवात केली आहे, असे निर्माण ग्रुपचे संचालक सतीश गानू यांनी सांगितले आहे. हा सामाजिक दृष्टिकोन ठेवून 'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण ह्ल शिल्पकार चरित्रकोश' या प्रकल्पास निर्माण सहकार्य करीत आहे.

वरं जनहितं ध्येयम्



## पुणे महानगरपालिका

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या तसेच भारतातील आठव्या क्रमांकावर असलेल्या पुणे शहराच्या अस्तित्वाच्या खुणा मध्ययुगीन काळापासून सापडतात. पुन्नक किंवा पुनवडी किंवा पुण्यनगरी म्हणून प्रसिद्ध असलेले पुणे हे महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. मुळा, मुठा व पवना अशा तीन नद्यांनी वेढलेले हे शहर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून सुप्रसिद्ध आहे. तसेच अनेक शिक्षण संस्थांच्या जाळ्यामुळे 'पूर्वेकडील ऑक्सफर्ड' म्हणूनही मान्यता पावले आहे.

१५ फेब्रुवारी १९५० पुणे शहराच्या व्यवस्थापनासाठी पुणे महानगरपालिकेची स्थापना झाली. नागरी सेवा व आवश्यक त्या सुविधा पुरवठा हे या संस्थेचे मुख्य काम आहे. शासनातर्फे मुख्य अधिकारी म्हणून भारतीय प्रशासन सेवेतील (I.A.S.) अधिकारी महापालिका आयुक्त म्हणून नियुक्त केले जातात. पुणे महानगरपालिकेत सध्या एकूण १४९ नगरसेवक आहेत यातील १४४ थेट निवडणूक प्रक्रियेतून निवडून येतात. महानगरपालिकेतील १४४ वॉर्डातून विविध राजकीय व अपक्ष यांचे हे प्रतिनिधी म्हणून निवडून येतात. महानगरपालिकेत विविध विभागांचे प्रत्यक्ष कामकाज मा. महाआयुक्त यांच्यामार्फत होते.

महानगरपालिकेमध्ये महापौर, उप महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, महापालिकेतील गट नेता, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता आणि आयुक्त अशी सर्वसाधारणे महत्त्वाची पदे आहेत.

पुणे महानगराचे क्षेत्रफळ साधारणतः २४४ चौ.कि.मी. आहे व परिघावरील काही गावांचा नव्याने समावेश या पालिकेत करण्यात आला आहे. पुणे शहराची लोकसंख्या सुमारे ३५ लाख आहे. पुणे शहराच्या हद्दीत महापालिकेच्या एकूण २७५ प्राथमिक शाळा, २३९ पूर्वप्राथमिक शाळा असून यामध्ये एकूण विद्यार्थी संख्या ८४,१९१ आहे. महापालिकेची एकूण २ रुग्णालये आहेत. महापालिका क्षेत्रात झोपडपट्टींची संख्या ५६४ असून त्यातील ३५३ घोषित आहेत. पुणे महापालिका क्षेत्रात दर दिवसाला ६५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. तसेच ३८९ दशलक्ष लीटर पाणी जलनि:सारणासाठी पुरवले जाते. महापालिका क्षेत्रात एकूण ८३ उद्याने असून २७ मंडई आहेत. ह्या महापालिकेच्या सर्व यंत्रणा सुसज्ज ठेवण्याचे काम १८,००० कर्मचारी करतात. महापालिकेने नदी सुधारणा प्रकल्प हाती घेतला असून जे.एन.एन.यू.आर.एम. च्या योजना महापालिका क्षेत्रात राबविल्या जात आहेत.

नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा पुरविण्यासाठी पुणे महानगरपालिकेने इ-गव्हर्नन्सची योजना सुरू केली आहे. त्यामुळे ऑनलाईन कर भरणा, तक्रार नोंदविणे, (RTI) माहिती अधिकार हे सर्व सुलभ झाले आहेत.

पुणे महानगरपालिकेचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणावर होत आहे. झपाट्याने वाढणारे माहिती तंत्रज्ञान व इतर उद्योगांमुळे महापालिकेचे अंदाजपत्रक ही वाढत आहे. यंदाचे २०११-१२ चे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे ३२००० कोटी रुपयांचे आहे.

वर्तमान महापौर मा. मोहनसिंग राजपाल व मा. आयुक्त महेश झगडे यांच्या नेतृत्वाखाली पुढील काळात रस्ता, पाणीपुरवठा, वाहतूक यांच्या विकासाच्या योजना कार्यान्वित होणार आहेत.

अधिक माहितीसाठी : www.punecorporation.org

# संपादकीय

साप्ताहिक 'विवेक'ने हाती घेतलेल्या 'आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण-शिल्पकार चरित्रकोश' या प्रकल्पातील 'कायदा-न्यायपालिका, प्रशासन आणि संरक्षण' या खंडांच्या 'कायदा-न्यायपालिका' विभागाच्या संपादनाची जबाबदारी अगदी अनपेक्षितपणे माझ्याकडे आली. माझ्या दृष्टीने हे मोठेच आव्हान होते. अनेकांच्या सहकार्यामुळे मी ते पेलू शकलो आणि आता हा खंड प्रसिद्ध होत आहे.

प्रस्तुत कोश-प्रकल्पाचा संदर्भ-कालपट असलेल्या दोनशे वर्षांच्या कालखंडाच्या अगदी सुरुवातीला, म्हणजे १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट होऊन महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला. अर्थात आज असणारा महाराष्ट्र त्यावेळी औपचारिकदृष्ट्या राजकीय नकाशावर अस्तित्वात नव्हता. परंतु 'मराठी भाषा बोलणाऱ्यांचा भूप्रदेश तो महाराष्ट्र' या व्यापक अर्थाने 'महाराष्ट्र' ही संज्ञा पूर्वापार प्रचलित आहे आणि प्रस्तुत कोशातही या संज्ञेने तोच भूप्रदेश अभिप्रेत आहे.

महाराष्ट्र हा अर्थातच भारताचा अविभाज्य भाग असल्याने, भारताची जडणघडण आणि महाराष्ट्राची जडणघडण यांचा अन्योन्यसंबंध आहे हे उघडच आहे. तथापि प्रचंड लोकसंख्या, विस्तार आणि विविधता असलेल्या या खंडप्राय देशातील विविध भूप्रदेशांची - म्हणजे स्थूलमानाने आज अस्तित्वात असलेल्या विविध राज्यांची-काही विशिष्ट प्रादेशिक जडणघडणही या काळात झाली, हेही मान्य होण्यास प्रत्यवाय नाही. कदाचित अशी प्रदेश-किंवा-प्रांत-विशिष्ट स्वरूपाची जडणघडण ही अधिक ठळकपणे सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रांत झाली, तर राजकीय आणि कायदा-न्यायपालिका या क्षेत्रांमधील जडणघडण ही अखिल भारतीय स्वरूपाची होती, असे म्हणता येईल.

या पार्श्वभूमीवर कायदा-न्यायपालिका क्षेत्राचे अखिल भारतीय स्वरूप लगेच प्रत्ययास येते आणि ब्रिटिश राजवटीचे राजकीय पातळीवरील अखिल भारतीय स्वरूप हे त्याचे कारण होय, हेही स्पष्ट दिसते. वर म्हटल्याप्रमाणे एक देश म्हणून समान कार्य प्रणाली असलेल्या भारताचा उदय होण्याच्या प्रक्रियेस ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या न्यायव्यवस्थेचा मोठाच हातभार लागला. या ब्रिटिश-प्रणीत 'कायद्याच्या राज्या'ची सुरुवात मुंबई बेटात सतराव्या शतकातच झाली. १६६८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल मुंबईत सुरू झाल्यानंतर लगेचच, म्हणजे १६७० मध्येच, लिखित कायदे, त्यांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालये, न्यायालयात पक्षकारांपर्यंत युक्तिवाद करण्यासाठी वकीलमंडळी, वगैरे सर्व प्रपंच मुंबईत सुरू झाला. १८१८ नंतर त्याला साहजिकच अधिक व्यापक स्वरूप मिळाले.

मुंबई प्रांताचा गव्हर्नर माउंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन याने १८२७ मध्ये 'बॉम्बे कोड ऑफ रेग्युलेशन्स' किंवा 'एल्फिन्स्टन कोड' तयार करवून घेऊन आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी न्यायालये स्थापन करून मुख्यत: दिवाणी बाबतीत महाराष्ट्र आणि एकंदर पश्चिम भारतात कायदा व न्यायपालिकेचा पाया घातला. त्यानंतर 'इंडियन पीनल कोड' अमलात आले आणि महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात फौजदारी न्यायव्यवस्थेचा पाया घातला गेला.

१८६२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या स्थापनेमुळे मुंबईसह महाराष्ट्रातील कायदा-न्यायव्यस्थेला एक केंद्रबिंदू प्राप्त झाला. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा आणि तालुका पातळीवर कनिष्ठ न्यायालये स्थापन झाली, इंग्लंडमधून इंग्रज बॅरिस्टर उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी मुंबईला येऊ लागले आणि भारतीयही इंग्लंडमध्ये बॅरिस्टर होऊन परत येऊन उच्च न्यायालयात वकिली करू लागले; याशिवाय मुंबईतच 'लॉ कॉलेज' स्थापन झाल्याने, इंग्लंडला न जाता मुंबईतच कायद्याचे शिक्षण घेऊनही पुष्कळ लोक यशस्वी वकील होऊ लागले. हळूहळू भारतीयांनाही उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक मिळू लागली.

तिकडे नागपूर येथे अगोदर न्याय आयुक्त न्यायालय आणि नंतर उच्च न्यायालय स्थापन झाल्याने मध्य प्रांत-वऱ्हाडात, तर हैदराबाद संस्थानातही उच्च न्यायालय असल्याने हैदराबादमध्येही, कमी-अधिक प्रमाणात असेच चित्र होते. त्या दोन उच्च न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रांतील अनुक्रमे विदर्भ-वऱ्हाड आणि मराठवाडा हे भाग आज महाराष्ट्रात समाविष्ट आहेत.

अशा प्रकारे आजच्या महाराष्ट्रात गेल्या १५०-२०० वर्षांत होऊन गेलेल्या न्यायाधीश आणि वकीलमंडळींपैकी कोणाकोणाचा समावेश प्रस्तुत कोशात करावयाचा, याचा विचार जेव्हा सुरू झाला, तेव्हा हाताशी असलेला वेळ, खंडामध्ये उपलब्ध असलेली जागा, उपलब्ध माहिती आणि नोंदी लिहू शकणारे लेखक, या चारही गोष्टींच्या अभावामुळे फारच मर्यादा पडल्या. परिणामी, अत्यंत निवडक नावांचाच समावेश करता आला. वर उल्लेख केल्याप्रमाणे कायद्याच्या राज्याचा पाया अनुक्रमे महाराष्ट्र-पश्चिम भारतात आणि संपूर्ण भारतात घालणारे एल्फिन्स्टन आणि मेकॉले यांचे अपवाद सोडल्यास अन्य कोणाही ब्रिटिश व्यक्तीचा समावेश यात करण्यात आलेला नाही. आजचा महाराष्ट्र ही ज्यांची जन्मभूमी आणि/किंवा निदान कर्मभूमी आहे, अशा निवडक महनीय व्यक्तींचा समावेश यात केला आहे.

न्यायाधीश आणि वकील यांच्या व्यतिरिक्त, कायद्याचे प्राध्यापक आणि घटना-कायदा-न्यायविषयक 'ॲकॅडमिक' स्वरूपाचे मूलभूत लेखन करणारे न्यायविद किंवा 'ज्युरिस्ट' यांची कायदा आणि न्यायाच्या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका असते. अर्थात काही न्यायविद हे वकील किंवा न्यायाधीश असू किंवा होऊ शकतात, पण प्रत्येक वकील किंवा न्यायाधीश न्यायविद असेलच असे नाही.

अत्यंत अपुऱ्या वेळात आणि इतर अनेक अपरिहार्य मर्यादांमधून वाट काढीत हा प्रस्तुत खंडाचा कायदा-न्यायपालिका विभाग सिद्ध झाला आहे. यामध्ये समाविष्ट झालेल्या नावांची यादी परिपूर्ण नाही, याची आम्हा सर्वांना जाणीव आहे. अन्य त्रुटीही असतील. त्यांच्याबद्दल मन:पूर्वक दिलगिरी व्यक्त करतो आणि वाचक उदार मनाने क्षमा करतील, अशी आशा व्यक्त करतो.

नोंदी लिहून देणाऱ्या लेखकांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. 'विवेक' चे प्रबंध संपादक श्री. दिलीप करंबेळकर, प्रस्तुत प्रकल्पाचे कार्यकारी संपादक श्री. दीपक जेवणे आणि प्रकल्प समन्वयक श्री. महेश पोहनेरकर यांचे, हे काम माझ्याकडे सोपविल्याबद्दल आणि नंतर सर्व प्रकारचे सहकार्य केल्याबद्दल मन:पूर्वक आभार. 'विवेक' च्या पुणे कार्यालयातील कु. संध्या लिमये यांचे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे त्याचप्रमाणे श्री. राजेश प्रभू यांचे आणि मुद्रितशोधक सौ. वृषाली सरदेशपांडे यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

माझे ज्येष्ठ स्नेही निवृत्त न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी वडिलकीच्या नात्याने सतत केलेल्या बहुमोल मार्गदर्शनामुळेच हे अवघड काम माझ्या हातून होऊ शकले. त्यांनी स्वत: काही महत्त्वाच्या नोंदीही लिहिल्या. न्या.चपळगावकर यांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे.

– शरच्चंद्र पानसे

# कोशरचना

कोणत्याही कोशाचे वाचन कथा अथवा कादंबरीप्रमाणे सलग असे सामान्यपणे केले जात नाही. वाचकास हवा असलेला संदर्भ सुलभपणे आणि शीघ्रतेने उपलब्ध करून देणे, हे कोशाचे प्रमुख प्रयोजन समजले पाहिजे. वाचकांना या कोशाचा उपयोग करणे सोपे आणि सुलभ व्हावे या हेतूने या चरित्रकोशाच्या रचनेबाबत आणि स्वरूपाबाबत माहिती देत आहोत.

**कोशाचे स्वरूप**

कोशाचे दोन मुख्य प्रकार असतात. पहिला प्रकार म्हणजे विशिष्ट विषयाचा व दुसरा प्रकार म्हणजे सर्वविषयसंग्राहक. 'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण-शिल्पकार चरित्रकोश' हा पहिल्या प्रकारचा प्रकल्प म्हणजे विशिष्ट विषयाचा कोश आहे. या प्रकारच्या कोशरचनेचे काही स्वाभाविक फायदे आहेत. भारंभार माहितीतून आपणास हवी असलेली माहिती शोधून काढणे वाचकाला सुलभ आणि सोपे होणे हा सर्वांत मोठा फायदा आहे. प्रस्तुत कोश हा या प्रकल्पातील साहित्य खंड आहे. या प्रकल्पाचा आणखी एक विशेष म्हणजे हा व्यक्तिचरित्रकोश आहे. त्यामुळे यात व्यक्तींच्या चरित्रनोंदी दिल्या आहेत.

**संपादकीय भूमिका**

या खंडाच्या संपादक-मंडळाने त्या खंडाची एकंदर पृष्ठसंख्या लक्षात घेऊन चरित्रनायकांच्या नोंदींची विभागणी चरित्रनोंद, टिपण नोंद आणि नामोल्लेख नोंद अशी केलेली आहे. वास्तविक पाहता कोणत्याही चरित्रनायकाच्या एकंदर कार्याचा आवाका हा त्याच्या चरित्रकाराशिवाय अथवा चरित्रअभ्यासकाशिवाय अन्य थोरामोठ्या अभ्यासकांनाही सर्व बारकाव्यांनिशी पूर्णपणे लक्षात घेऊन त्याच्या नोंदींची शब्दसंख्या ठरवून अशी विभागणी करणे, हे जिकिरीचे कार्य होते. कारण अशा विषयाधारित चरित्रकोशात एखाद्या चरित्रनायकाचे सर्वक्षेत्रीय योगदानाचा व कार्यकर्तृत्वाचा सांगोपांग तपशीलवार उल्लेख करण्याचे सूत्र स्वीकारले, तर त्या कार्याला काही अंतच राहत नाही. तसेच प्रत्येक चरित्रनायकाचे सर्वक्षेत्रीय योगदान कथन करणे, हे विषयाधारित कोशाचे उपयोजन नाही व नसते, हे लक्षात घेतले पाहिजे. विषयाधारित कोश त्या व्यक्तीच्या अन्यक्षेत्रीय पैलूंबाबत काही ठरावीक मर्यादेपर्यंतच मार्गदर्शन करू शकतो. चरित्रनायकाचे विशिष्ट क्षेत्रातील कार्यकर्तृत्वाचे नेमके चित्रण करण्याचा एक प्रयत्न, म्हणजे विषयाधारित कोश असतो. तरी संपादक मंडळाने आपले सर्व कौशल्य वापरून या सूचीला अंतिम रूप दिलेले आहे.

**विषयाधारित वर्गीकरण**

चरित्रनायकांचे विषयाधारित वर्गीकरण करताना जाणवणारी अडचण अशी की, एका चरित्रनायकाचे योगदान त्या विशिष्ट कार्यक्षेत्रापुरतेच मर्यादित नसून अन्यही क्षेत्रांत त्याने लक्षणीय अथवा भरीव कामगिरी केलेली आहे असे दिसले. अशा परिस्थितीत एकाच चरित्रनायकाच्या नोंदीची पुनरावृत्ती वेगवेगळ्या खंडांत होऊ नये म्हणून अशा सरमिसळ होऊ शकणाऱ्या चरित्रनोंदींसाठी काही मर्यादा व निकष ठरविण्यात आले. त्यानुसार भिन्न खंडांच्या संपादक मंडळांना तशा सूचना देण्यात आल्या. मात्र अन्य खंडांत या चरित्रनायकांची त्या क्षेत्रातील कामगिरी अधोरेखित करणारी टिपणनोंद घेतली जाईल, याचीही दक्षता घेण्यांत आली व अशा

सर्व टिपणांच्या सुरुवातीलाच सदर चरित्रनायकाची मुख्य नोंद ज्या खंडात आहे, त्या खंडाचे नाव देण्याचीही दक्षता घेण्यात आलेली आहे. जेणेकरून वाचकांना ती संपूर्ण नोंद त्या-त्या टिपणासोबत वाचता येईल.

मुख्य चरित्रनोंद ही एकाच खंडात घेण्याचा निर्णय हा मुख्यत्वे सामायिक मुद्द्यांची उदाहरणार्थ जन्म, बालपण, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, मृत्यू यासारख्या माहितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठीच घेण्यात आलेला आहे. याचबरोबर मुख्य चरित्रनोंद व टिपणनोंद यांच्या ठिकाणी आणखी एक सुविधा देण्यात आलेली आहे, ती म्हणजे चरित्रनायकाचा एका ओळीत परिचय. हा परिचय वाचल्यानंतर त्या व्यक्तीचे बहुआयामी कार्य वाचकांच्या लक्षात येईल व त्या क्षेत्रांच्या अनुषंगाने त्या-त्या विषयांच्या खंडांत चरित्रनायकाच्या टिपणनोंदी त्यांना वाचता येतील.

या टिपणनोंदीत नेमकेपणाने चरित्रनायकाच्या त्या विशिष्ट क्षेत्रातील कार्याची माहिती येईल व व्यक्तीच्या मुख्य नोंदीत त्याचा चरित्रविषयक तपशील व सोबत त्याचे छायाचित्र देण्यात येईल, असा निर्णय खंडाच्या निर्मितीच्या वेळी घेण्यात आला होता. पण काही चरित्रनायकांच्या कार्याला, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीला विशिष्ट पार्श्वभूमी असते. त्या विशिष्ट परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर त्या व्यक्तीच्या कार्याचे महत्त्व समजून घेणे आवश्यक असते आणि त्याच्या कार्याचे मूल्यमापन त्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात करणे उचित असते. अन्यथा अर्धवट माहितीच्या आधारावर चुकीची प्रतिमा वाचकांच्या मनात निर्माण होण्याचा संभव असतो. यावर साधकबाधक विचार करून या खंडात दोन महत्त्वाचे बदल स्वीकारण्यात आले आहेत. पहिला बदल म्हणजे चरित्रनायकाच्या कार्याची पार्श्वभूमी विशद होण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात पुनरुक्तीचा दोष पत्करून पुरेश माहिती, टिपणनोंदीत समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच वाचकांच्या सुविधेसाठी या टिपणनोंदीसोबत संबंधित चरित्रनायकांची छायाचित्रेही देण्यात आली आहेत.

**चरित्रनोंदींचे स्थूल स्वरूप**

चरित्रकोशातील नोंदींचे स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. यातील नोंदी सर्वसाधारणपणे आडनावांनी दिल्या आहेत. पहिल्या ओळीत चरित्रनायकाचे नाव (आडनाव प्रथम) दिले आहे.

**उदाहरणार्थ :**

**तेलंग, काशिनाथ त्रिंबक; तुळजापूरकर, विद्यारण्य दत्तात्रेय**

या सर्वसाधारण धोरणास काही अपवाद करावे लागले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत:

१. ज्या व्यक्तींची उपनावे लोकमानसात रूढ झालेली आहेत, त्यांची नोंद त्या उपनावांनीच दिलेली आहे.

उदाहरणार्थ: **व्ही. पी. राजा; व्ही. सुब्रमनियन; व्ही. श्रीनिवासन**

२. काही चरित्रनायकांची पूर्ण नावे अनेक प्रयत्न करूनही मिळू शकली नाहीत. त्यामुळे उपलब्ध असलेली लघुरूप नावे खंडात नाइलाजाने घेण्यात आली आहेत.

उदाहरणार्थ : **गोखले, बी. एन.; दफ्तरी, सी. के.;**

खंडात ज्या नावाने नोंद देण्यात आलेली आहे, ते नाव मोठ्या जाड ठशात पहिल्या ओळीत दिलेले आहे. नंतरच्या दुसऱ्या ओळीत त्या व्यक्तीचे मूळ नाव-उपनाव-टोपणनाव तिरप्या जाड ठशात दिलेले आहे.

यानंतरच्या ओळीत त्या व्यक्तीचे एकंदर योगदान दर्शविणाऱ्या क्षेत्रांचा उल्लेख केलेला आहे. त्यापुढच्या ओळीत चरित्रनायकाच्या जन्म व (दिवंगत असल्यास)मृत्यू ह्या तारखा दिल्या आहेत. जेथे जन्म अथवा मृत्यूच्या तारखा उपलब्ध नाहीत तेथे केवळ साल व शक्य झाल्यास महिनासुद्धा दिलेला आहे. जन्म-मृत्यू तारखा उपलब्ध नसल्यास 'जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध' असे देण्यात आले आहे. यानंतर चरित्रनोंदीच्या

मजकुराची सुरुवात करून त्यात चरित्रनायकाची व्यक्तिगत माहिती, शिक्षण, कार्यक्षेत्राची ठिकाणे व पदे, त्यांचे आपल्या क्षेत्रातील कार्य, त्यांनी गाजवलेले कर्तृत्व, ज्या कार्यासाठी ते प्रसिद्ध आहेत त्याची माहिती, त्यांना मिळालेले मानसन्मान आणि पुरस्कार यांचा उल्लेख केला आहे. काही ठिकाणी चरित्रनायकांशी संबंधित संस्था वा आस्थापने यांची छायाचित्रे देण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे संरक्षण खंडात चरित्रनायकांशी संबंधित असलेल्या घटना वा प्रसंगांची छायाचित्रेही देण्यात आलेली आहेत.

**संदर्भसूची**

चरित्रनोंदीत समाविष्ट माहितीची विश्वसनीयता आणि अधिकृतपणा लक्षात यावा या हेतूने नोंदीच्या शेवटी सदर नोंद लिहिण्यासाठी ज्या संदर्भसाधनांचा वापर केला गेला आहे, त्यांची सूची दिलेली आहे. यामागची थोडी व्यापक भूमिका अशीही आहे की, ज्यांना सदर चरित्रनायकांबाबत अधिक अभ्यास अथवा संशोधक करायचे आहे त्यांना त्याचा उपयोग व्हावा. याच दृष्टीने बहुसंख्य चरित्रनोंदीच्या खाली संदर्भसूची देण्याचा प्रयत्न झालेला आहे. या संदर्भलेखनात पुढीलप्रमाणे शिस्त पाळण्यात आलेली आहे:

*लेखकाचे नाव, संपादक असल्यास तसा उल्लेख; 'साहित्यकृतीचे नाव', साहित्यकृतीचा प्रकार; प्रकाशक, प्रकाशनस्थळ; आवृत्ती, प्रकाशनवर्ष.*

जर नोंद लेखकाने मासिकातील आणि नियतकालिकातील लेखांचा आपल्या लेखनासाठी संदर्भ म्हणून उपयोग केला असेल तर संदर्भलेखनात पुढीलप्रमाणे शिस्त पाळण्यात आलेली आहे:

*'मासिकाचे अथवा नियतकालिकाचे नाव'; प्रकाशन महिना व वर्ष.*

हाती आलेल्या अपुऱ्या माहितीमुळे अपवादाने काही ठिकाणी सदरची शिस्त पाळता आलेली नाही, हे वाचकांनी ध्यानात घ्यावे.

ज्या ठिकाणी नामोल्लेख नोंद घेण्यात आलेली आहे. तेथे दोन प्रकार संभवतातः

१. जर त्या व्यक्तीची अन्य खंडात मुख्य चरित्रनोद दिलेली असेल तर तर्जनी चिन्हाचा उपयोग करून तेथे 'मुख्य चरित्रनोंद समाजकारण खंड, पत्रकारिता खंड' आदी नमूद करण्यात आलेले आहे.

२. जर त्या व्यक्तीची नोंद याच खंडात अन्यत्र वेगळ्या नावाने दिलेली असेल, तर तर्जनी चिन्हाचा उपयोग करून ज्या नावाने ती नोंद आढळेल ते नाव देण्यात आले आहे.

**चरित्रनायक वर्गीकरण**

हा विषयाधारित कोश असल्यामुळे यात चरित्रनायकांचा त्यांच्या क्षेत्रातील निकष ठरवून त्यांचा कोशात समावेश करण्यात आलेला आहे. या प्रक्रियेसंबंधीची माहिती प्रत्येक खंडाचे संपादक अथवा समन्वयक यांनी आपल्या संपादकीयात अथवा मनोगतात विस्ताराने दिलेली आहे. तसे पाहता काही व्यक्तींचे कर्तृत्व बहुआयामी असल्यामुळे त्यांची नोंद त्या त्या विशिष्ट खंडात येणे अपरिहार्य असते. उदाहरणार्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची टिपणनोंद न्यायपालिका खंडात समाविष्ट केलेली आहे. त्यांची मुख्य नोंद राजकारण खंडात येणार आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. त्यामुळे न्यायपालिका खंड सिद्ध करताना त्यांची दखल घेणे अत्यावश्यकच आहे. अन्य काही चरित्रनायकांचाही अशाच प्रकारे विचार करण्यात आला आहे.

**अकारविल्हे**

चरित्रकोशातील वर्णमाला, सर्व नावांचा अकारविल्हे स्वरानंतर व्यंजने असा पुढीलप्रमाणे असेल:

**अ ॲ आ ऑ इ ई उ ऊ ऋ**

ए ऐ ओ औ (ं) अनुस्वार (:) विसर्ग
क ख ग घ ङ
च छ ज झ
ट ठ ड ढ ण
त थ द ध न
प फ ब भ म
य र ल व श
ष स
ह ळ
क्ष ज्ञ

कोशात 'अ–ओ' असा स्वरांचा एक विभाग केलेला आहे व पुढे क, ख, ग... असे व्यंजनानुसार विभाग केलेले आहेत. ज्या अक्षराखाली एकही नोंद नाही, ते अक्षर वगळले आहे. वाचकांच्या सोयीसाठी कोशात अनुक्रमणिकेचाही अंतर्भाव केलेला आहे.

**अनुक्रमणिका**

तिन्ही खंडांची अनुक्रमणिकेची रचना ढोबळ मानाने पुढीलप्रमाणे आहे. यात चरित्रनोंदीला अनुक्रमांक न देता पहिल्या स्तंभात चरित्रनायकाचे नाव दिले आहे. या नावाच्या आधी मुख्य चरित्रनोंदीसाठी '●', नामोल्लेख नोंदीसाठी 'O', टिपणनोंदीसाठी '▲'अशा खुणा देण्यात आलेल्या आहेत.चरित्रनायकाच्या नावानंतरच्या स्तंभात या नोंदींचे पृष्ठक्रमांक दिलेले आहेत. या अनुक्रमणिकेतील शेवटचा स्तंभ 'मुख्य नोंद' असा आहे. पृष्ठक्रमांकावर जर नामोल्लेख नोंद असेल व त्या चरित्रनायकाची मुख्य नोंद याच खंडात जेथे असेल तो पृष्ठक्रमांक या स्तंभात दर्शविलेला आहे व त्या चरित्रनायकाची मुख्य नोंद अन्य खंडात असेल तर त्या विशिष्ट खंडाचे नाव या स्तंभात दर्शविले आहे.

वेगवेगळ्या खंडांच्या अनुक्रमणिकेत खंडातील चरित्रनायकांचा परिचय घडून देण्याच्या दृष्टीने त्याने भूषविलेले पद, त्याचे विशिष्ट कार्यक्षेत्र, त्याचे सेवाक्षेत्र याचा समावेश केलेला आहे. कोशाबरोबर अनुक्रमणिकेची ही रचनाही वाचकांना उपयोगी ठरेल, असा विश्वास आहे.

– दीपक हनुमंत जेवणे
प्रकल्प कार्यकारी संपादक

# अनुक्रमणिका


| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | चरित्रनायकाचे कार्यक्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वो.न्या. | उ.न्यायालय | संकीर्ण | |
| ● अंध्यारुजिना तहमतन रुस्तुमजी | २५ | - | - | ॲड.जन.(म.रा.), सॉली.जन. | - |
| ▲ आंबेडकर भीमराव रामजी | २५ | - | - | मसुदा स. अध्यक्ष-कार्या. | राज.खंड |
| ● उसगावकर मनोहर घनश्याम | २९ | - | - | ॲड.जन.गोवा,अति.सॉली.जन. | - |
| ● एकबोटे माणिक श्रीकृष्ण | २९ | | मु.न्या.आंध्र | - | - |
| ▲ एल्फिन्स्टन माउंटस्टुअर्ट | ३० | | - | गव्हे.मुंबई | शिक्षण खंड |
| ● कांगा जमशेदजी बेहरामजी | ३३ | | - | ॲड.जन.(मु.प्रा.) | - |
| ● कांटावाला रमणलाल माणेकलाल | ३४ | - | मु.न्या.मुंबई | - | - |
| ▲ काणे पांडुरंग वामन | ३५ | - | - | ज्येष्ठ न्यायविद | धर्म.खंड |
| ● कानिया मधुकर हिरालाल | ३८ | सर न्या. | - | - | - |
| ● कानिया हरिलाल जयकिसनदास | ३८ | सर न्या. | - | - | - |
| ● कापडिया सरोश होमी | ३९ | सर न्या. | मु.न्या.उत्त. | - | - |
| ● कुर्डुकर सुधाकर पंडितराव | ४० | न्या. | मु.न्या.पं.हरी | - | - |
| ● कोतवाल सोहराब पेशतन | ४० | - | मु.न्या.मुंबई | राज्यपाल (म.रा.) | - |
| ● कोरटकर केशवराव संतुकराव | ४१ | - | न्या. हैद्रा. | - | - |
| ● गजेंद्रगडकर प्रल्हाद बाळाचार्य | ४३ | सर न्या. | - | ज्येष्ठ न्यायविद | - |
| ● गुप्ते शंकर विनायक | ४६ | - | - | अति.सॉ.जन., ॲटर्नी जनरल | - |


**अनुक्रमणिकेतील संक्षेपांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे** - अति-अतिरिक्त, अला-अलाहाबाद, ॲड.जन.-ॲडव्होकेट जनरल, उत्त-उत्तरांचल, कुल-कुलगुरू, कें-केंद्रीय, कौ.ऑ.इ.-कौन्सिल ऑफ इंडिया, गुज- गुजरात, ज्ये-ज्येष्ठ, धर्म-धर्मकारण, मद्रा-मद्रास, म.रा.-महाराष्ट्र राज्य, मु.न्या.-मुख्य न्यायाधीश, मुं.-मुंबई, न्या.-न्यायाधीश, राज-राजकारण, सॉलि. जन-सॉलिसिटर जनरल, हैद्रा.-हैदराबाद, प.ल.सा. - पत्रकारिता आणि ललितेतर साहित्य खंड, ●-मुख्य नोंद, ▲-टिपण नोंद, O-नामोल्लेख नोंद

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | चरित्रनायकाचे कार्यक्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वो.न्या. | उ.न्यायालय | संकीर्ण | |
| ● गोखले बी.एन. | ४६ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● गोखले हेमंत लक्ष्मण | ४७ | न्या. | मु.न्या.अ.म. | – | – |
| ▲ घारपुरे जनार्दन रघुनाथ | ४९ | – | – | प्राचार्य, ज्ये.वकील | शिक्षण खंड |
| ● चंद्रचूड यशवंत विष्णू | ५१ | सर न्या. | – | – | – |
| ● चंदावरकर नारायण गणेश | ५२ | – | मु.न्या.मुंबई | – | – |
| ● चांदूरकर न्या.मधुकर नरहर | ५४ | – | मु.न्या.मुं.मद्रा. | | |
| ● चितळे माधव गोविंद | ५५ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● चितळे वामन वासुदेव | ५६ | | | संस्थापक-ऑल इंडिया.रिपो. | – |
| ● चैनानी हशमतराय खूबचंद | ५७ | – | मु.न्या.मुंबई | हंगामी राज्यपाल (म.रा.) | |
| ● छागला महम्मदअली करीमभाई | ५९ | – | मु.न्या.मुबई | ज्येष्ठ न्यायविद | – |
| ▲ जयकर मुकुंदराव रामराव | ६२ | – | – | ज्येष्ठ न्यायविद, कुलगुरू | राज. खंड |
| ● टोपे त्र्यंबक कृष्णाजी | ६५ | – | – | ज्येष्ठ न्यायविद, कुलगुरू | – |
| ● तय्यबजी बद्रुद्दीन | ६६ | – | – | पहिले बॅरिस्टर | – |
| ● तांबे यशवंत श्रीपाद | ६७ | – | मु.न्या.मुंबई | – | – |
| ● तारकुंडे विठ्ठल महादेव | ६८ | – | न्या. मुंबई | ज्येष्ठ न्यायविद | – |
| ● तुळजापूरकर विद्यारण्य दत्तात्रेय | ७१ | न्या. | – | – | – |
| ● तेंडुलकर शामराव रघुनाथ | ७२ | | न्या.मुंबई | – | – |
| ● तेलंग काशिनाथ त्रिंबक | ७२ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● दफ्तरी सी.के. | ७५ | – | – | अॅट.जन.सॉली.जन. | – |
| ● देशपांडे व्यंकटेश श्रीनिवास | ७५ | – | मु.न्या.मुंबई | – | – |
| ● देशमुख बाळकृष्ण नरहर | ७६ | – | मु.न्या.मुंबई | – | – |
| ● देसाई अशोक हरिभाई | ७७ | – | – | अॅटर्नी जनरल | – |
| ● देसाई कपिल कल्याणदास | ७८ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● देसाई कांतिलाल ठाकोरदास | ७९ | – | न्या.मुंबई | मु. न्या. गुज. | – |
| ● देसाई भुलाभाई जीवनजी | ८० | – | – | प्रसिद्ध वकील, कॉंग्रेस नेते | – |
| ● देसाई सुंदरलाल त्रिकमलाल | ८१ | – | न्या.मुंबई | मु. न्या. गुज. | – |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | चरित्रनायकाचे कार्यक्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वो.न्या. | उ.न्यायालय | संकीर्ण | |
| ● देसाई व्ही.एस. | ८२ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● धर्माधिकारी चंद्रशेखर शंकर | ८३ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● नरिमन फली सॅम | ८५ | – | – | ज्येष्ठ वकील, न्यायविद | – |
| ● नाईक वि.अ. | ८६ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● नियोगी भवानीशंकर | ८७ | – | न्या.ना.उ. | – | – |
| ● पंडित गणपती विष्णू | ८९ | – | – | ज्येष्ठ न्यायविद, प्राचार्य | – |
| ● पळणिटकर श्रीपतराव | ९० | – | मु.न्या.हैद्रा. | – | – |
| ● पाटसकर हरी विनायक | ९१ | – | – | कें.कायदा मंत्री, कुल.पुणे वि. | – |
| ● पालखीवाला नानी अर्देशिर | ९२ | – | – | ज्येष्ठ न्यायविद | – |
| ● पालेकर देवीदास गणपत | ९४ | न्या. | – | – | |
| ● पेंडसे माधव लक्ष्मण | ९५ | – | मु.न्या.मुं.कर्ना. | – | – |
| ● फैजी असफ असगर अली | ९७ | – | – | मुस्लिम का.ज्येष्ठ भाष्यकार | – |
| ● बावडेकर राजाराम श्रीपाद | ९८ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● बोस विवियन | ९८ | न्या. | – | – | – |
| ● भगवती नटवरलाल हरिलाल | १०० | न्या. | न्या.मुंबई | – | – |
| ● भरुचा सॅम पिरोज | १०० | सर न्या. | – | – | – |
| ● मंडलिक विश्वनाथ नारायण | १०१ | – | – | ज्येष्ठ न्यायविद, वकील | – |
| ● मनोहर सुजाता वसंत | १०३ | न्या. | मु.न्या.मुंबई | पहिल्या महिला न्या.मुंबई | – |
| ● मादन दिनशा पिरोशा | १०४ | न्या. | मु.न्या.मुंबई | – | – |
| ● मिर्जा अली अकबर खान | १०४ | न्या. | न्या.मुंबई | – | – |
| ● मुधोळकर जनार्दन रंगनाथ | १०५ | न्या. | – | – | – |
| ● मुल्ला सर दिनशॉ फरदूनजी | १०६ | – | – | ज्येष्ठ वकील, न्यायविद | – |
| ● मेकॉले टॉमस बॅबिंग्टन | १०७ | – | – | जनक 'इंडियन पिनल कोड' | – |
| ● रांगणेकर सजबा शंकर | १०९ | – | न्या.मुंबई | – | – |
| ▲ रानडे महादेव गोविंद | ११० | – | न्या.मुंबई | ज्येष्ठ न्यायविद | राज. खंड |
| ● लेंटिन बख्तावर | ११२ | – | न्या.मुंबई | – | – |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | चरित्रनायकाचे कार्यक्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्वो.न्या. | उ.न्यायालय | संकीर्ण | |
| ● वरियावा सॅम नरिमन | ११३ | न्या. | – | – | – |
| ● वाहनवटी गुलाम एसनजी | ११३ | – | – | ॲटर्नी जनरल, सॉली.जन. | – |
| ● शहा अजित प्रकाश | ११४ | – | मु.न्या.मद्रा. | दिल्ली | – |
| ● शाह जयंतीलाल छोटालाल | ११५ | सर न्या. | – | – | – |
| ● शाह लल्लूभाई आशाराम | ११६ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● शेलत जयशंकर मणिलाल | ११६ | न्या. | – | – | – |
| ● श्रीकृष्ण बेलूर नारायणस्वामी | ११८ | सर न्या. | मु.न्या.के.उ. | – | – |
| ● साठे सत्यरंजन पुरुषोत्तम | ११९ | – | – | ज्येष्ठ न्यायविद, प्राचार्य | – |
| ● सावंत अरविंद विनायकराव | १२१ | – | मु.न्या.केरळ | न्या. मुंबई, ॲड जन. म. रा. | |
| ● सावंत परशुराम बाबाजी | १२२ | न्या. | – | अध्यक्ष प्रेस काउ. ऑ. इं. | – |
| ● सिरपूरकर विकास श्रीधर | १२२ | न्या. | मु.न्या.उत्त. | – | – |
| ● सीरवाई होरमुसजी माणेकजी | १२३ | – | – | ज्येष्ठ वकील, ज्येष्ठ न्यायविद | – |
| ● सेटलवाड सर चिमणलाल | १२६ | – | – | नामवंत वकील, शिक्षणतज्ज्ञ | – |
| ● सेटलवाड मोतीलाल चिमणलाल | १२७ | – | – | पहिले ॲट.जन., कायदेतज्ज्ञ | – |
| ● सोराबजी सोली जहांगीर | १२९ | – | – | ॲटर्नी जनरल, ज्येष्ठ न्यायविद | – |
| ● हरिदास नानाभाई | १३१ | – | न्या.मुंबई | – | – |
| ● हिदायतुल्ला मोहम्मद | १३२ | सर न्या. | – | ज्येष्ठ न्यायविद, उपराष्ट्रपती | – |

# प्रस्तावना

आजच्या नागरी जीवनाचे न्यायपालिका हे महत्त्वपूर्ण अंग आहे. प्रशासन, राजकीय संस्था, प्रसारमाध्यमे यांच्या तुलनेत न्यायपालिकेने जनमानसात आपली विश्वासार्हता टिकविण्यात अजून तरी यश मिळविलेले आहे. त्यामुळे अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी लोक अखेरीस न्यायालयांकडे धाव घेत आहेत. या पार्श्वभूमीवर न्यायपालिकांची जी आजवरची विकासप्रक्रिया घडली, ती समजून घेण्यासाठी ऐतिहासिक काळातील विविध टप्प्यांत तिचे स्वरूप कोणते होते यावर धावती नजर टाकणे आवश्यक राहील. मात्र असा आढावा घेताना आजच्या संकल्पनांवर आधारित तिचे मूल्यमापन करून तिच्या दोषांची चिकित्सा करणे किंवा केवळ त्यांच्या समर्थनाची भूमिका घेणे या दोन्ही टोकांच्या भूमिकांपासून मुक्त राहून तिची माहिती घेतली पाहिजे. कारण प्रत्येक कालखंडातील न्यायप्रक्रियेवर त्या-त्या कालखंडातील सामाजिक मूल्यांचा व तत्त्वज्ञानांचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे त्या काळातील जे निर्णय असतात, त्यांचा सारासारबुद्धीनेच विचार करावा लागतो. उदा. सतीच्या प्रथेचे इतिहासकाळात कितीही उदात्तीकरण केलेले असले, तरी आज त्या संदर्भांना कोणताही अर्थ नाही, कारण कालानुसार संकल्पनाच बदललेल्या आहेत.

ब्रिटिश अमलाच्या आधी न्यायपालिका ही कायद्याच्या चौकटीनुसार व स्वतंत्रपणे कार्यपद्धती असलेली स्वतंत्र यंत्रणा नव्हती. ब्रिटिश राजाच न्यायाधीश म्हणून न्यायालयीन निर्णय देत असे किंवा संस्थानिकांची आपापल्या सोयीनुसार तयार केलेली न्यायदान यंत्रणा असावयाची. न्यायपालिकेच्या ऐतिहासिक विकासप्रक्रियेचा विचार करण्याच्या सोयीसाठी खालील कालखंडांचा विचार करणे आवश्यक आहे.

१. स्वातंत्र्यापूर्वीचा कालखंड

२. भारतीय राज्यघटनेनंतरचा वीस वर्षांचा कालखंड (१९५० ते १९७०)

३. सन १९७० पासूनचा वीस वर्षांचा कालखंड (१९७० ते १९९०)

४. सन १९९० ते आजपावेतो आधुनिक काळातील न्यायपालिकेचे उत्तरदायित्व व समाजाच्या अपेक्षांचे न्यायालयीन कामकाजातील प्रतिसाद.

ब्रिटिश येण्यापूर्वीच्या व नंतरच्या न्यायालयीन प्रक्रियेत झालेला एक मूलभूत व महत्त्वपूर्ण बदल असा की, ब्रिटिश येण्यापूर्वी देशभरातील न्यायप्रक्रियेच्या कामात समानता नव्हती. ती ब्रिटिशांनी आणली व देशभरात समान पद्धतीने न्यायदानाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. ही प्रक्रिया अँग्लो सॅक्सन परंपरेवर आधारित होती. या परंपरेने देशभरातील न्यायप्रक्रियेत सुसूत्रता आली. महाराष्ट्रात अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश राजवट स्थिरावली. अगदी सुरुवातीला ब्रिटिशांना आंदण मिळालेल्या मुंबई बेटात ८ ऑगस्ट १६७२ रोजी पहिले न्यायालय सुरू झाले. त्या वेळेस मुंबईचा गव्हर्नर व नवीन नेमणूक झालेले न्यायाधीश व इतर अधिकारी

घोड्यावर स्वार होऊन मिरवणुकीने न्यायालयाच्या इमारतीकडे गेले. त्या मिरवणुकीत वकील मंडळी व अनेक जण सामील झाले होते. त्यानंतर राज्यकारभार करणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीने आणखी काही न्यायालये मुंबई शहरात स्थापन केली. सन १८२४ मध्ये परदेशी राजसत्तेचे प्रदत्त न्यायालय मुंबईत अस्तित्वात आले. परदेशी कालखंडात कायद्यांची संख्या कमी होती. हिंदू, मुस्लीम, पारशी किंवा ख्रिश्चन यांना त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे न्याय देण्यात यावा असे तत्त्व ब्रिटिश न्यायव्यवस्थेने स्वीकारले होते. पुढे ईस्ट इंडिया कंपनीकडून राज्यकारभाराचे हस्तांतरण थेट ब्रिटिश सरकारकडे झाल्यावर भारतामध्ये तालुका पातळीवरील न्यायालये, एक जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालय अशी व्यवस्था करण्यात आली.

सन १८६१ साली भारतीय उच्च न्यायालय कायदा (इंडियन हायकोर्टस ॲक्ट) संमत झाला. त्या अनुषंगाने १८६२ पासून मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे उच्च न्यायालयांची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायव्यवस्थेची देखरेख व्यवस्था ही उच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेत आली. उच्च न्यायालयाचे नागपूर येथे खंडपीठ १८३२ मध्ये स्थापन करण्यात आले. पुढे १६ जून १९८४ रोजी औरंगाबाद खंडपीठ राष्ट्रपतींच्या अध्यादेशानुसार स्थापन करण्यात आले. मधल्या काळात १९६१ मध्ये गोवा मुक्त झाले. उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात गोवा राज्याचाही समावेश झाला. त्यामुळे स्वतंत्र राज्य निर्मितीनंतर तेथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ असण्याची आवश्यकता निर्माण झाली. ३० ऑक्टोबर १९८२ रोजी पणजी येथे असे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्यात आले. गोवा हे लहान राज्य असल्याने सुरुवातीला दोन न्यायमूर्ती खंडपीठाचे काम पाहत असत. पण आता ही संख्या पाचावर गेली आहे.

स्वातंत्र्यापूर्वीचा कालखंड विचारात घेतला तर असे लक्षात येईल, की ब्रिटिशांनी दिवाणी कामासाठी कार्यपद्धती (प्रोसिजर) ठरवून दिली होती. ती जवळपास आजही, किरकोळ स्वरूपाचा बदल सोडून, तशीच आहे. मात्र महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांसाठी वेगळी अशी कार्यपद्धती म्हणजे ज्यूरी-कार्यपद्धती अस्तित्वात होती. ती पद्धत नानावटी खटल्यानंतर संपुष्टात आली. महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांमध्ये ज्यूरी इसम नेमण्याची पद्धत होती. असे ज्यूरी म्हणून नेमण्यात येणारे इसम सर्वसाधारणपणे तालेवार नागरिक असत. त्यांच्यासमोर फौजदारी खटल्यातील पुराव्यांची नोंदणी होत असे. खटल्याच्या संदर्भातील कायद्याची मार्गदर्शक तत्त्वे समजावून सांगण्याचे काम न्यायाधीश करीत असे. मात्र आरोपी दोषी आहे किंवा निर्दोष आहे हे ज्यूरी मंडळी एकत्र चर्चा करून ठरवित असत. आरोपीच्या महत्त्वाचा फौजदारी खटल्याचा निर्णय समाजाचे प्रतिनिधित्व करणारे घटक म्हणजेच ज्यूरी मंडळी देत असत. अशा न्यायप्रक्रियेमध्ये सामाजिक घटकांचा फौजदारी खटल्यांच्या न्याय निर्णयांमध्ये प्रत्यक्ष स्वरूपाचा सहभाग असे. फक्त दिवाणी वादांचे न्यायनिर्णय देण्याचे काम न्यायाधीशच करीत असत. राजद्रोहासारख्या गंभीर गुन्ह्यातील खटला थेट उच्च न्यायालयाच्या मूळ अधिकारकक्षेत चालविण्यात येत असे.

लोकमान्य टिळकांवर चाललेला खटला असाच होता. आपल्या बचावाच्या भाषणात लोकमान्य टिळकांनी केलेल्या भाषणातील एक भाग कक्ष क्रमांक ४६ च्या बाहेर शिलालेखावर कोरून त्या घटनेचे स्मरण करण्यात आले आहे. त्यांनी आपल्या बचावाचे केलेले अभिभाषण ही कालातीत तत्त्वांची एकत्र मांडणीच आहे. ती शिल्प वाक्ये अशी :

"Inspite of the verdict of the Jury I maintain that I am innocent. There are higher powers that rule the destiny of men and nations and it may be the will of providence that the cause which I represent may prosper more by my suffering than by my remaining free."

"ज्यूरींनी जरी मला गुन्हेगार ठरवले आहे, तरी मी निर्दोष आहे अशी माझी मनोदेवता मला ग्वाही देत आहे. मानवी शक्तीहून अधिक उच्चतर प्रतीच्या शक्ती या जगाची सूत्रे चालवीत आहेत; आणि मी ज्या कार्याकरिता प्रयत्नशील आहे, त्या कार्याला माझ्या दु:खाने व संकटानेच अधिक सामर्थ्य यावे, असा ईश्वरी योगायोग दिसतो!"

महाराष्ट्राच्या न्यायपालिकेच्या घडणीच्या काळात महादेव गोविंद रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे सार्वजनिक सभेने हाती घेतलेला एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'लवाद न्यायालये'. दिवाणी स्वरूपाचे तंटे नेहमीच्या न्यायपद्धतीने सोडविण्यात खर्च होणारा वेळ, पैसा व शिल्लक राहणारी कटुता याचा विचार करून अशा प्रकारचे खटले खाजगी लवादामार्फत निकाली काढण्यात यावेत या हेतूने पुणे व पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत अशा न्यायालयांची स्थापना झाली होती. खाजगी लवाद म्हणून काम करण्यास पात्र व तयार असणाऱ्या प्रतिष्ठित इसमांची एक यादी लवाद न्यायालयाच्या कार्यालयात ठेवलेली असे. उभय पक्षकारांना अशा यादीतून लवाद निवडून मग लवादामार्फत ती प्रकरणे निकाली काढावयाची अशी पद्धत रूढ झाली होती.

न्यायाधीशपदी काम करत असतांनासुद्धा सामाजिक कार्य करण्याची प्रवृत्ती काही न्यायाधीश बाळगून होते. न्या. चंदावरकरांनी न्यायमूर्ती झाल्यानंतरही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या संस्थेचे कामकाज चालू ठेवले होते. न्या. रानडे बारामतीच्या अस्पृश्य समाजासाठी चालणाऱ्या शाळांना मदत करीत असत. अनेक शैक्षणिक न्या. रानडे यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी उपक्रमांत न्या. रानडे यांचे सक्रिय प्रोत्साहन होते. महाराष्ट्राच्या न्यायपालिकेच्या सुरुवातीच्या काळात न्या. मुकुंदराव जयकर यांनी १८३७ साली काम केले. सर दिनशॉ मुल्ला हे काही काळ मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते. हिंदू लॉ, मुस्लीम लॉ व अनेक कायद्यांच्या पुस्तकांचे लेखक म्हणून सर दिनशॉ मुल्ला यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. किंबहुना अशा पुस्तकांचे संदर्भ अनेक न्याय-निर्णयांत वापरण्यात आलेले आहेत.

भारतीय राजकीय जीवनात, सांस्कृतिक जीवनात व न्यायपालिकेच्या उभारणीच्या काळात ज्यांनी महत्त्वाची कामगिरी केली अशा अनेकांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली केलेली आहे किंवा न्यायमूर्तिपद भूषविले आहे. यात भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष व कायद्याचे चालते-बोलते ज्ञानपीठ असणारे डॉ. भीमराव रामजी ऊर्फ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, बॅ. जिना व अशा अनेक जणांचा समावेश होतो. यांतील महात्मा गांधी यांनी उच्च न्यायालयात वकिली केली नव्हती; परंतु मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टात काही काळ वकिली केली. बॅ. जिना यांनी उच्च न्यायालयात अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये प्रभावी युक्तिवाद केलेला आहे. त्यांच्या कायदा क्षेत्रातील ज्ञानाबद्दल कुणाचेही दुमत नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुधारणावादी व अन्यायाच्या विरुद्ध खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात असे. समाजसुधारक रघुनाथ कर्वे यांच्या संततीनियमनविषयक लिखाणावरून त्यांनी चालविलेल्या 'समाज स्वास्थ्य' या मासिकाविरुद्ध मुंबईच्या मेट्रोपोलिटन कोर्टामध्ये फौजदारी खटला भरण्यात आला होता. त्यात रघुनाथ कर्वे यांचे वकिलपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतले होते. खरे तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेले खटले व त्यांचे न्यायपालिकेसाठी दिलेले योगदान यांबाबत अधिक सखोल संशोधन होऊन त्याचे स्वतंत्र पुस्तक तयार करण्याची आवश्यकता आहे.

न्यायपालिकेच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडाकडे बघताना हे लक्षात घेणे आवश्यक आहे, की परदेशी राजवटीतील न्या. स्टोन, न्या. ब्युमंट, न्या. नानाभाई हरिदास, न्या. तेलंग, न्या. तय्यबजी व अनेक न्यायमूर्तींनी दिलेली निकालपत्रे व ठरवून दिलेली न्यायतत्त्वे यांचा उपयोग स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळातील

न्यायपालिकेच्या उभारणीमध्ये झाला. जरी १४ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्यदिनी मुंबई उच्च न्यायालयात भारताचा राष्ट्रीय ध्वज फडकविला गेला व नव्या राजवटीतील न्याययुगाला प्रारंभ झाला, तरीही परदेशी राजवटीतील कायदे व मुख्यत: त्यांनी केलेला गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अ‍ॅक्ट १९३५, भारतीय राज्यघटना अमलात येईपर्यंत तसेच चालू राहिले. दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अमलात आली. या राज्यघटनेनुसार नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी घटनेच्या २२६ व्या कलमान्वये उच्च न्यायालयावर ठेवण्यात आली. न्या. छागला हे मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले मुख्य न्यायमूर्ती म्हणून नेमले गेले. स्वातंत्र्यानंतर नेमण्यात आलेले न्यायमूर्ती समाजाच्या वरच्या थरातील व वकील व्यवसायाचा वारसा लाभलेले असणे स्वाभाविकच होते. त्यातूनही मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायिक विश्वात पारशी मंडळी, गुजराती मंडळी व उच्च शैक्षणिक वारसा लाभलेली उच्चवर्णीय मंडळी यांचा भरणा अधिक होता.

सामाजिक व शैक्षणिक स्थित्यंतर येऊ पाहत होते. जरी असे असले, तरी सदरच्या दुसऱ्या कालखंडातील अनेक न्यायमूर्तींनी हिंदू वारसा कायदा, हिंदू लग्नाबाबतचा कायदा, जमिनीच्या कुळांच्या अधिकाराचा कायदा, सावकारीबाबतचा कायदा व अन्य सामाजिक बदलांमुळे निर्माण झालेले कायदे या संदर्भात सखोल नि:पक्षपाती व योग्य निर्णय दिलेले दिसतात. त्यामुळे न्यायपालिकेची सुरुवातीची वाटचाल योग्य दिशेने झाली. न्यायपालिकेचे तारू भरकटले नाही. न्या. छागला मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती असताना भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असणारे 'कायद्या समोर समानता' (इक्वॅलिटी) हे तत्त्व प्रस्थापित झाले. त्यांच्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचा लौकिक वाढला. न्या. गजेंद्रगडकर यांचे अभ्यासपूर्ण व विश्लेषणात्मक निकाल न्यायपालिकेसाठी भक्कम पाया निर्माण करणारे आहेत. या काळातील चारित्र्यवान व नि:पक्षपाती न्यायमूर्तींनी निर्माण केलेले आदर्श व नीतिमूल्याच्या आचरणामुळे महाराष्ट्रातील न्यायपालिकेच्या कार्यास एक झळाळी प्राप्त झाली, तसेच न्यायपालिकेबद्दलचा आदर वाढीस लागला.

भारतीय राज्यघटना (कॉन्स्टिट्यूशन) देशाच्या सार्वभौम कायद्याचा दस्तऐवज म्हणून अमलात येण्याच्या वेळी परिस्थिती काय होती? देशात अभूतपूर्व असे सामाजिक मन्वंतर घडत होते. नवशिक्षित माणूस आत्मभान आल्यामुळे परिवर्तनासाठी अधीर आणि धीट झाला होता. इंग्रजी विद्येमुळे नवशिक्षित समाजाची जीवनदृष्टी व्यापक आणि बदल घडविण्यासाठी उत्सुक होती. राजकीय-सामाजिक चळवळी तर सुरू होत्याच; त्याचबरोबर एक व्यापक सामाजिक बदल घडत होता. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे तळागाळातला समाज ढवळून निघाला होता. त्यातूनच सामाजिक अन्यायाविरुद्ध सामूहिक मनोवृत्ती तयार होत होती. कूळ कायद्यांमुळे कसेल त्याची जमीन, कसत नसेल त्याला मालकी हक्क नाही, असे कायदे अमलात येण्याचा धडाका चालू होता. न्यायपालिकेचे या कालखंडातील निर्णय पाहता सामाजिक बदल, त्या अनुषंगाने होणारे कायद्यांतील बदल आणि त्याबाबतचे, न्यायतत्त्वे ठरवून देणारे निकाल कायद्याला अभिप्रेत असणारी तत्त्वे विचारात घेऊनच केलेले दिसतात. न्यायमूर्तींनी विवेकपूर्ण निकालांद्वारे सामाजिक बदलांसाठी योग्य वातावरण न्यायपालिकेत तयार केलेले दिसते. त्यामुळेच सर्वसाधारण माणसांचा न्यायपालिकेवरचा विश्वास टिकून राहिला.

त्यानंतरचा वीस वर्षांचा कालखंड म्हणजे १९७० ते १९९० हा काळ न्यायपालिकेच्या दृष्टीने अनेक घडामोडी आणि महत्त्वाच्या घटनांचा व न्यायपालिकेकडून घटनेचे संरक्षण होते किंवा नाही असा प्रश्न निर्माण करणारा ठरला. सर आयव्हरी जेफरसन या घटनातज्ज्ञाने फार पूर्वीचे असे विधान केले होते की, "राज्यघटनेमध्ये भूतकाळाचे ठसे व भविष्यकाळ यांचे दर्शन होत असते."

भारतातील लोकशाही पद्धती टिकेल का नाही अशी अभूतपूर्व परिस्थिती अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या इंदिरा गांधींच्या विरुद्ध दिलेल्या निकालामुळे निर्माण झाली. त्या वेळेच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर तात्पुरती बंदी घालणारा अध्यादेश काढून आणीबाणी जाहीर केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरविल्याने भारतीय राज्यघटना बदलण्याचे संकेत इंदिरा गांधींनी दिले. देशातील वातावरण अस्थिर झाले. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा संकोच करण्यात आला. या काळातील विविध प्रकरणांत महाराष्ट्रातील न्यायमूर्तींनी दिलेले निकाल मात्र न्यायपालिकांच्या वाटचालीसाठी महत्त्वाचे ठरतात. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयसुद्धा आणीबाणीत हतबलता प्रकट करणारे न्याय-निर्णय देत होते. संदर्भः ''अे.डी.एम. जबलपूर विरुद्ध शिवकांत शुक्ला''(ए.आय.आर. १९७६) त्या सुमारास महाराष्ट्रातील न्यायमूर्ती मात्र प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने आणीबाणीच्या विरोधात मत नोंदवीत असलेले दिसून येतात. प्रभाकर संझगिरी या पत्रकार व लेखकाच्या प्रकरणात मूलभूत स्वातंत्र्याची संकल्पना मुंबई उच्च न्यायालयाने विशद केली. त्याकाळात आणीबाणीमध्ये पकडण्यात आलेल्या व अटकांचे आदेश दिलेल्या काही प्रकरणांत न्या. ललित व इतर काही न्यायमूर्तींनी सरकारच्या विरुद्ध न्यायालयीन निर्णय दिले. तद्नंतर न्या. यु.आर. ललित यांनी न्यायमूर्तिपद सोडले. न्या. तुळजापूरकर यांनी नागपूर येथे जिल्हा न्यायालयाच्या इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी अतिशय परखड भाषण करून सरकारवर टीका केली. ज्या काळात आणीबाणीवर टीका करणे म्हणजे पायावर दगड मारून घेणे अशी समजूत होती, त्याकाळात महाराष्ट्रातील न्यायपालिका मात्र नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठी निर्भीडपणाची भूमिका घेत होती.

या कालखंडामध्ये बॅ. अ. र. अंतुले यांच्या 'इंदिरा प्रतिष्ठान' मार्फत गोळा करण्यात आलेल्या अवैध स्वरूपाच्या देणग्यांचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयासमोर आले. बॅ. अंतुले हे धडाडीचे काम करणारे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जात असत. त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली खाजगी रितीने खटला दाखल करता येऊ शकतो काय?, असा कायद्याचा मुद्दा निर्माण झाला होता. त्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने बॅ. अंतुले यांच्यावर ठपका ठेवल्याने त्यांना मुख्यमंत्री पद सोडावे लागले. यासारखेच पुढे त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव निलंगेकर यांना आपल्या मुलीच्या गुणांमध्ये फेरफार घडवून आणला असा ठपका डॉ. महेश गोसावी यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या संदर्भात न्या. पेंडसे यांनी न्यायालयीन निर्णयाद्वारे ठेवला. न्या. पेंडसे यांच्यासारखे निस्पृह व निर्भीड न्यायमूर्ती न्यायपालिकेची प्रतिमा उंचावत होते. याच कालखंडामध्ये न्या. लेंटिन यांनीपण जे.जे. रुग्णालयाच्या ग्लिसेरॉल खरेदी प्रकरणात सरकारवर टीका केली. या काळात न्यायपालिकाच मंत्रालयाच्या अवैध कारभारावर अंकुश ठेवून होती. या सोबत हेपण लक्षात घेतले पाहिजे, की न्यायपालिकेने ठपका ठेवल्यानंतर मंत्री किंवा मुख्यमंत्री पदावरून पायउतार होण्याइतपत संवेदनक्षमता टिकून होती.

आणीबाणीचा काळ निघून गेला. त्यानंतर न्यायपालिका पुन्हा स्वतंत्रपणे कार्यक्षम झाल्याचे दिसून येते. सत्तरच्या कालखंडात आणीबाणीच्या विपरित वातावरणातसुद्धा महाराष्ट्रातील न्यायपालिका नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची भूमिका पार पाडताना यशस्वी झाली असे दिसते. न्या. धर्माधिकारी, न्या. तुळजापूरकर, न्या. लेंटिन, न्या. पेंडसे व अनेक न्यायाधीशांनी न्यायपालिकेला प्रतिष्ठेचे वलय प्राप्त करून दिले. तसेच भारतीय राज्यघटनेचे चिकित्सापूर्ण व अभ्यासपूर्ण लेखन करून ज्येष्ठ न्यायविद न्या. एच.एम. सिरवई यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे नाव देशभरात प्रसिद्धीच्या शिखरावर नेऊन ठेवले. बॅ. नानी पालखीवाला यांनी दरवर्षी जाहीर होणाऱ्या अर्थसंकल्पाचे व्याख्यानाद्वारे विश्लेषण करण्याची प्रथा सुरू केली. बॅ. रजनी पटेल व बॅ. नाथ पै, बॅ. रामराव आदिक असे वकील वर्गातून आलेले अनेक राजकीय नेते तसेच बॅ. चितळे,

बॅ. व्ही. आर. मनोहर व अनेक नामवंत वकील महाराष्ट्रात न्यायपालिकेच्या कामकाजात योगदान देत असल्याने एकूणच न्यायपालिकेची निकोप वाटचाल झालेली दिसून येते.

शेवटचा कालखंड म्हणजे १९९० नंतरचा कालावधी विचारात घेत असताना सुरुवातीला हे लक्षात घ्यावे लागेल, की संगणकाच्या वापराला या युगात नुकतीच सुरूवात झाली होती. त्यामुळे न्यायपालिकेला कामकाजात गती देण्याच्या दृष्टीने संगणकाचा अधिकाधिक वापर करण्याची योजना या कालखंडात यशस्वीपणे राबविण्यात आली. या कालखंडात न्यायालयीन प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी लोकन्यायालये भरविणे, मोफत न्याय व विधि सेवा पुरविणे, लवादामार्फत तंटा मिटविणे, मध्यस्थांच्या नेमणुकीतून तंटा मिटविणे, समन्वय व समुपदेशन अशा विविध मार्गांचा उपयोग करून तंटे मिटविणे अशा प्रकारच्या पूरक न्यायप्रक्रियेला (ऑल्टरनेटिव्ह डिस्प्यूट रिझोल्यूशन सिस्टिम) राबविण्यासाठी विशेष प्रयत्न झालेले दिसतात. या काळात 'महालोकअदालत','विशेष लोकअदालत', 'ग्रामपंचायत न्यायालये', 'विधि साक्षरता' व 'न्याय तुमच्या दारी' अशा प्रकारच्या योजनाही न्यायपालिकेमार्फत राबविण्यात आल्या.

या शेवटच्या कालखंडाचा विचार केला तर हे नमूद करणे भाग आहे, की याच कालखंडाच्या पूर्वार्धात न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेला बाधा येतील अशी काही प्रकरणे घडली. उदाहरणार्थ, याच कालखंडात मुंबई उच्च न्यायालयातील चार न्यायमूर्तींच्या विरुद्ध काही आरोप करण्यात आले. न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार घालण्याचा अभूतपूर्व निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या वकील संघाने घेतला. त्यांतील एक न्यायमूर्ती एस.के. देसाई यांनी पदाचा राजीनामा दिला, तर इतर न्यायमूर्तींचे कामकाज काढून घेण्याचा प्रशासकीय निर्णय मुख्य न्यायमूर्तींना घेणे भाग पडले. कालांतराने असे न्यायमूर्ती (न्या. विजय कोतवाल वगैरे) न्यायमूर्तिपद सोडून गेले किंवा बदलून गेले. तसेच १९९४ च्या सुमारास मुख्य न्यायमूर्ती श्री. ए.एम. भट्टाचारजी यांच्यावरही गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले. परिणामत: त्यांनाही मुख्य न्यायमूर्तिपद सोडावे लागले. अशा प्रकारच्या घटनांमुळे मुंबई उच्च न्यायालयाची प्रतिमा झाकोळली गेली.

या कालखंडाच्या उत्तरार्धात मुंबई उच्च न्यायालय व अन्य न्यायालये संगणकाद्वारे एकमेकांशी जोडण्यात आली. संगणकीकरणाची सुरुवात व त्याचा परिणामकारक रीतीने कामकाजात वापर करण्यात येऊन न्यायप्रक्रिया गतिमान करण्यात आली. या कालखंडातील अनेक मुख्य न्यायमूर्ती व ज्येष्ठ न्यायमूर्तींनी महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय दिले. न्यायालयीन कामाला सामाजिक हिताच्या परिमाणांची जोड देऊन न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी दूरगामी परिणाम करणारे निकाल दिले. न्या. पेंडसे यांच्या कामकाजाचा आवाका व झपाटा प्रचंड होता. मुख्य न्यायमूर्ती कै. पी.डी. देसाई यांनी मुंबई उच्च न्यायालयात 'शिस्तपर्व' आणले, तर मुख्य न्यायमूर्ती श्री. एम.बी. शहा यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांत जिल्हास्तरावर असणारी अतिरिक्त जिल्हा न्यायालये सुरू करून तालुका न्यायालयांची संख्या बरीच वाढविण्यात आली. त्याशिवाय मुख्य न्यायमूर्ती श्री. एम.बी. शहा यांच्या कार्यकाळात संगणकीकरणाचे कामकाज वेगाने सुरू झाले. न्यायपालिकेच्या सदर कालखंडातील पहिल्या पाच वर्षांतरची वाटचाल चांगली व संस्थेची आब राखणारी झालेली आहे असे म्हणता येईल. महाराष्ट्राच्या न्यायपालिकेतील अनेक चांगले मुख्य न्यायमूर्ती देशातील अन्य उच्च न्यायालयांना दिले गेले. त्यांतही न्या. चांदूरकर, न्या. अग्रवाल, न्या. अशोक देसाई, न्या. अजित पी. शहा यांचा उल्लेख करावा लागेल. तसेच महाराष्ट्रातील न्यायपालिकेतून सर्वोच्च न्यायालयात गेलेल्या न्या. कानिया, न्या. कुर्डूकर, न्या. विकास शिरपूरकर, न्या. हेमंत गोखले यांचे योगदान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील न्यायपालिकेतून सर्वोच्च न्यायालयात गेलेले न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी प्रदीर्घ काळ भारताचे मुख्य न्यायमूर्ती

म्हणून कामकाज केले. न्या. भरूचा यांनी एक कडक शिस्तीचा मुख्य न्यायमूर्ती म्हणून लौकिक मिळविला. सध्या नि:स्पृह, निर्भीड व कार्यक्षम असा लौकिक असणारे मुख्य न्यायमूर्ती म्हणून न्या. एस.एच. कपाडिया यांच्या नेतृत्वावर देशाच्या न्यायपालिकेचा भार आहे.


'मुंबई उच्च न्यायालय' असा शब्दप्रयोग या प्रस्तावनेत सोयीसाठी केलेला आहे. वास्तविक पाहिले तर हे नाव ब्रिटिश राणीच्या आज्ञेने 'हायकोर्ट ऑफ ज्युडीकेचर ॲट बाँबे' ठरविण्यात आले होते. अगदी अलीकडील काळात ''सतीश दत्तात्रय नाडगौडा वि. महाराष्ट्र राज्य इतर'' (२००७(३) बाँबे केस रिपोर्टर पान ७६१) या प्रकरणात निकाल देताना द्विसदस्य न्यायपीठाने गोवा राज्याच्या निर्मितीनंतर उच्च न्यायालयाने जुने नाव चालू ठेवणे अयोग्य आहे असे मतप्रदर्शन केले. त्यानुसार आता फक्त 'हायकोर्ट ॲट बाँबे' असे नामकरण झालेले आहे.

सदर प्रस्तावना ही न्यायपालिकेचा इतिहास सांगण्यासाठी नाही. तसेच प्रत्येक न्यायमूर्तीच्या कार्याचा आढावा घेणेसुद्धा शक्य होणार नाही. परंतु न्यायपालिकेची वाटचाल महाराष्ट्रात कशा प्रकारे झाली याचा धांडोळा घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. या शिल्पकार कोशातील न्यायालयीन कालखंडाची साधारणपणे कल्पना यावी म्हणून हा लेखनप्रपंच.

- न्या. विकास रामचंद्र किनगावकर
(निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय
औरंगाबाद खंडपीठ)



सर्वोच्च न्यायालय, दिल्ली



मुंबई उच्च न्यायालय

# अ ते औ

## अन्ध्यारुजिना, तहमतन रुस्तमजी

**भारताचे सॉलिसिटर-जनरल, ज्येष्ठ न्यायविद**

**१७ नोव्हेंबर १९३१**



तहमतन रुस्तमजी अन्ध्यारुजिना यांचा जन्म मुंबईला झाला. पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९५७ मध्ये त्यांनी मुंबईतील शासकीय विधि महाविद्यालय येथून एलएल. बी. पदवी संपादन केली. त्यांना मुंबई विद्यापीठाची सर चार्ल्स सार्जंट शिष्यवृत्ती आणि विष्णू धुरंधर सुवर्णपदक मिळाले. १९५८ मध्ये त्यांची भारतीय विदेश सेवेत निवड झाली, परंतु त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात येणे पसंत केले आणि ज्येष्ठ घटनातज्ज्ञ, तेव्हाचे मुंबई राज्याचे ॲडव्होकेट-जनरल एच. एम. सीरवाई यांच्या हाताखाली काम करण्यास सुरुवात केली. सीरवाई यांच्याबरोबर अन्ध्यारुजिना यांनी मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात अगोदर मुंबई आणि नंतर महाराष्ट्र सरकारतर्फे अनेक खटल्यांत काम पाहिले.

लवकरच अन्ध्यारुजिना स्वत:ही प्रथितयश वकील म्हणून पुढे आले. सर्वोच्च न्यायालयातील अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये त्यांनी सीरवाई यांचे सहायक म्हणून किंवा नंतर स्वतंत्रपणे युक्तिवाद केला. यामध्ये केशवसिंह प्रकरण, केशवानंद भारती खटला, जे. एम. एम. खटला, बोम्मई खटला, विशाखा खटला, हे विशेष उल्लेखनीय खटले म्हणता येतील. १९९८ मध्ये सरकारने नेमलेल्या बँकिंग कायदा समितीचे ते अध्यक्ष होते. २००७ मध्ये केंद्र-राज्य संबंधांवर विचार करण्यासाठी सरकारने नेमलेल्या कार्य-गटाचे (टास्क फोर्स) ते सदस्य आहेत.

काही काळ अन्ध्यारुजिना मुंबई विद्यापीठात 'घटनात्मक कायदा' या विषयाचे अर्धवेळ प्राध्यापक होते. १९९० मध्ये ते बेलफास्टमधील क्विन्स विद्यापीठामध्ये अतिथी अधिव्याख्याते होते. याशिवाय ते बंगलोरच्या नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया विद्यापीठामध्ये, पुण्याच्या सिम्बॉयसिस विधि महाविद्यालयामध्ये आणि भारतातील अन्य विधि महाविद्यालयांत मानद प्राध्यापक आहेत.

१९९३ ते १९९५ या काळात अन्ध्यारुजिना महाराष्ट्राचे ॲडव्होकेट - जनरल होते आणि १९९६ - १९९८ या काळात भारताचे सॉलिसिटर-जनरल होते.

अन्ध्यारुजिना यांनी 'ज्युडिशिअल ॲक्टिविझम ॲन्ड कॉन्स्टिट्यूशनल डेमॉक्रसी इन इंडिया' आणि 'जजेस् ॲन्ड ज्युडिशिअल अकाऊंटेबिलीटी' अशी दोन पुस्तके लिहिली आहेत. वृत्तपत्रांत आणि कायदेविषयक नियतकालिकांत त्यांचे लेख नियमितपणे प्रसिद्ध होत असतात.

– शरच्चंद्र पानसे

## आंबेडकर, भीमराव रामजी

***डॉ. बाबासाहेब आंबेडकर***

**भारतरत्न, भारतीय घटनेचे शिल्पकार, न्यायविद**

**१४ एप्रिल १८९१ – ६ डिसेंबर १९५६**

☞ **मुख्य नोंद – राजकारण खंड**

डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मध्य प्रदेशात महू येथे झाला. त्यांचे



वडील रामजी ब्रिटिश सैन्यात सुभेदार-मेजर होते. त्यांच्या सारख्या बदल्या होत असत. बाबासाहेबांचा जन्म झाला तेव्हा रामजी सुभेदार महूला होते. बाबासाहेब हे सुभेदार रामजींचे चौदावे अपत्य. बाबासाहेबांचे शालेय शिक्षण सातारा आणि मुंबई येथे झाले. साताऱ्याच्या माध्यमिक शाळेतील पेंडसे आणि आंबेडकर या दोन शिक्षकांचे बाबासाहेबांवर अतिशय प्रेम होते. बाबासाहेबांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे या गावचे. त्यांचे मूळ आडनाव सकपाळ असे होते. साताऱ्याच्या शाळेत बाबासाहेबांचे आडनाव आंबवडेकर असे लावलेले होते. आंबेडकर गुरुजींनी ते बदलून त्याऐवजी स्वत:चे आंबेडकर हे आडनाव नोंदविले आणि तेव्हापासून बाबासाहेबांचे आडनाव आंबेडकर असे झाले.

१९०७ मध्ये बाबासाहेब मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या काळात मॅट्रिकची परीक्षा कठीण समजली जाई. बाबासाहेब हे दलित समाजातील मॅट्रिक झालेले पहिले विद्यार्थी होत. मॅट्रिकनंतर बाबासाहेबांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे इंटरनंतर त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांची शिष्यवृत्ती मिळाली. आजारपणामुळे त्यांचे एक वर्ष वाया गेले, परंतु १९१२ मध्ये बाबासाहेब बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

पदवी मिळविल्यानंतर बाबासाहेबांनी काही दिवस बडोदा संस्थानात नोकरी केली. अनेक अडचणी असल्या तरी परदेशी जाऊन उच्च शिक्षण घेण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. पुन्हा एकदा त्यांना सयाजीराव महाराजांनी शिष्यवृत्ती दिली आणि जुलै १९१३ मध्ये बाबासाहेब न्यूयॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठात दाखल झाले. तेथे अफाट अभ्यास करून त्यांनी १९१५ मध्ये एम. ए. आणि १९१६ मध्ये पीएच. डी. या पदव्या संपादन केल्या. नंतर लगेच इंग्लंडला जाऊन कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा आणखी अभ्यास करण्याची बाबासाहेबांची इच्छा होती, परंतु बडोदा सरकारच्या अनपेक्षित तगाद्यामुळे १९१७ मध्ये त्यांना भारतात परत यावे लागले. काही दिवस बडोद्याला नोकरी केल्यानंतर ते मुंबईला परत आले. त्यांना सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापकाची जागा मिळाली. तेथल्या पगारातून बचत करून, कोल्हापूरच्या महाराजांकडून काही साहाय्य घेऊन आणि इतर काही व्यवस्था करून जुलै १९२० मध्ये बाबासाहेब इंग्लंडला गेले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून जून १९२१ मध्ये एम.एस्सी. आणि १९२२-२३ मध्ये डी.एस्सी. पदव्या त्यांनी संपादन केल्या. १९२२ मध्ये ते 'ग्रेज् इन्'मधून बॅरिस्टर झाले.

अशा प्रकारे अध्ययन पूर्ण करून स्वदेशी परतल्यानंतर जुलै १९२३ मध्ये डॉ. आंबेडकर मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. वकिलीचा व्यवसाय हा उपजीविकेचे साधन म्हणून त्यांनी स्वीकारला होता. सुरुवातीच्या काळात त्यांना विशेष काम मिळाले नाही. त्यामुळे ते जिल्हा न्यायालयातील कामही स्वीकारीत असत. त्यांचे वकिलीचे कार्यालय सोशल सर्व्हिस लीगच्या इमारतीत एका लहानशा खोलीत होते.

१९२६ मध्ये पुण्यातील बागडे, जेधे आणि जवळकर या तीन ब्राह्मणेतर पुढाऱ्यांविरुद्ध पुण्यातील काही ब्राह्मणांनी मानहानीचा दावा दाखल केला. या पुढाऱ्यांनी 'देशाचे दुश्मन' या नावाचे पुस्तक लिहिले होते आणि त्यात 'ब्राह्मणांनी भारताचा नाश केला' असे प्रतिपादन केले होते. या तिघांनी आपले वकीलपत्र डॉ. आंबेडकरांना दिले. फिर्यादी पक्षाचे वकील ल. ब. भोपटकर होते. बाबासाहेबांनी हा खटला अतिशय कौशल्याने लढविला आणि जिंकला. तेव्हापासून एक कुशल आणि हुशार वकील म्हणून ते ओळखले जाऊ लागले.

मार्च १९२७ मध्ये बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. त्यानंतर डिसेंबर १९२७ मध्ये महाडमधील सनातन्यांनी अस्पृश्यांवर दिवाणी दावा लावून तळ्याचे पाणी घेण्यास अस्पृश्यांना मनाई करणारा हुकूम द्यावा, अशी मागणी न्यायालयात केली. अस्पृश्यांची बाजू मांडण्यास डॉ. आंबेडकर उभे राहिले; १९२७ पासून १९३६ पर्यंत सुमारे नऊ वर्षे महाडच्या न्यायालयापासून मुंबई उच्च न्यायालयापर्यंत बाबासाहेबांनी हा खटला लढविला आणि शेवटी विजय मिळवला. या दरम्यान ते मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सावंतवाडी इत्यादी ठिकठिकाणच्या न्यायालयात अन्य खटले लढविण्यासाठी जात असत. सप्टेंबर १९३० मध्ये चिरनेर जंगल सत्याग्रहातील सत्याग्रहींवरचा खटला ठाणे जिल्हा न्यायालयात उभा राहिला. त्यातील आरोपींपैकी चारजणांचे वकीलपत्र बाबासाहेबांनी घेतले होते. त्यांनी लागोपाठ दोन दिवस दहा तास युक्तिवाद केला. खटल्याचा निकाल जुलै १९३१ मध्ये लागला. त्यात एकोणतीस आरोपींना शिक्षा झाली आणि बाकीचे निर्दोष मुक्त झाले.

याव्यतिरिक्त उंदेरी खटल्यात आणि सावंतवाडी संस्थानातील पडवे माजगाव खटल्यात खोतांच्या कुळांच्या वतीने, मुंबईतील कामगार पुढाऱ्यांवर ट्रेड युनियन ॲक्टखाली झालेल्या खटल्यात त्यांच्या वतीने, अंबरनाथ येथील कामगारांच्या संप प्रकरणात कामगार नेते शामराव परुळेकर यांच्या वतीने, 'समाजस्वास्थ्य' मासिकाचे संपादक र. धों. कर्वे यांच्यावर अश्लीलतेच्या आरोपावरून झालेल्या खटल्यात त्यांच्या वतीने असे विविध खटले डॉ. आंबेडकरांनी विविध न्यायालयांत यशस्वीरीत्या लढविले.

१९२७ च्या प्रारंभी डॉ. आंबेडकर यांची मुंबई विधिमंडळाचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. पुढे अनेक वर्षे ते विधिमंडळाचे आणि त्यानंतर विधानसभेचे सदस्य होते. विधिमंडळात बाबासाहेबांनी स्पृहणीय कार्य केले. अनेक विधेयके त्यांनी स्वत: विधिमंडळात मांडली. महार वतन कायदा दुरुस्ती विधेयक, खोती पद्धती नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणि सावकारी नियंत्रण विधेयक, ही त्यांपैकी प्रमुख विधेयके होत. यातील महार वतनासंबंधीच्या विधेयकाचा बाबासाहेबांनी जाहीर सभा-संमेलनांतूनही हिरिरीने पाठपुरावा केला. परंतु अखेर ते विधेयक त्यांना मागे घ्यावे लागले. खोतीसंबंधीच्या विधेयकाचेही तेच झाले. सावकारी नियंत्रण विधेयकात बाबासाहेबांनी अनेक अभिनव, पुरोगामी तरतुदी सुचविल्या होत्या. त्याला अनुसरून एक अधिकृत विधेयक नंतर सरकारने मांडल्यामुळे ते संमत झाले. याशिवाय अर्थसंकल्पावर बाबासाहेबांची अभ्यासपूर्ण भाषणे होत. महाडच्या चवदार तळ्याचा प्रश्न त्यांनी विधिमंडळातही मांडला. कुटुंब-नियोजनाचा सरकारने जोमाने प्रचार करावा आणि कुटुंब-नियोजनाची साधने उपलब्ध करावीत, असाही एक ठराव बाबासाहेबांनी विधिमंडळात मांडला होता.

१९२८ मध्ये सायमन कमिशनचे भारतात आगमन झाले. कमिशनला साहाय्य करण्यासाठी एक केंद्रीय समिती आणि अनेक प्रांतिक समित्या नेमल्या गेल्या होत्या. त्यांतील मुंबई प्रांतिक समितीवर डॉ. आंबेडकरांची निवड झाली. ऑक्टोबर १९२८ मध्ये सायमन कमिशनसमोर त्यांची साक्ष झाली. मुंबई प्रांतिक समितीने कमिशनला सादर केलेल्या अहवालाला बाबासाहेबांनी विचारप्रवर्तक आणि निर्भीड भिन्नमतपत्रिका जोडली. त्यामुळे त्यांची सर्वत्र प्रशंसा झाली. दरम्यान १९२८ मध्ये त्यांना मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयात सुमारे वर्षभरासाठी बदली प्राध्यापकाची जागा मिळाली. नंतर जून १९३५ ते १९३८ या काळात ते महाविद्यालयाचे प्राचार्य होते. जानेवारी १९३६ च्या महाविद्यालयाच्या मासिकात त्यांनी एक विस्तृत लेख लिहिला; त्यात त्यांनी भारतातील कायदे शिक्षणात आमूलाग्र सुधारणा सुचविल्या. (पुढे त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन केली आणि या संस्थेने इतर महाविद्यालयांबरोबरच कायदा महाविद्यालयेही सुरू

केली.) विधि महाविद्यालयात डॉ. आंबेडकर अत्यंत विद्यार्थिप्रिय आणि व्यासंगी प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध होते. विधिमंडळाचे सदस्य आणि कायद्याचे प्राध्यापक या नात्यांनी बाबासाहेबांनी केलेल्या कार्यामुळे ते कुशल वकिलाप्रमाणेच एक चतुरस्र आणि विद्वान न्यायविद म्हणून मान्यता पावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायद्याएवढाच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, धर्म इत्यादी विषयांचाही दीर्घ व सखोल व्यासंग होता. १९३० ते १९३२ या काळात झालेल्या गोलमेज परिषदांनाही बाबासाहेब उपस्थित होते आणि त्या परिषदांत त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे झाली. १९३२ मध्ये त्यांनी तथाकथित दलितांच्या वतीने महात्मा गांधींबरोबर ‘पुणे करार’ केला.

१९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नेमणूक व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे मजूर सदस्य (लेबर मेंबर) म्हणून झाली. या पदावर ते १९४५ सालापर्यंत होते. या काळात त्यांनी कामगार कायद्यात महत्त्वाचे बदल घडवून आणले आणि आज सार्वत्रिक असलेल्या अनेक गोष्टींची (उदा., त्रिपक्षीय मंडळ, कामगार विमा योजना, कामाचे आठ तास, इ.) सुरुवात केली.

१९४५-४६ मध्ये घटनासभेसाठी झालेल्या निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधी पूर्व बंगालमधून निवडून आले. परंतु फाळणीनंतर तो भाग पाकिस्तानात गेल्यानंतर ते मुंबई राज्यातून काँग्रेसच्या पाठिंब्यावर घटनासभेवर पुन्हा निवडून आले. घटनासभेने नेमलेल्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली आणि त्याच वेळी स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री म्हणूनही त्यांचा समावेश झाला. मात्र हिंदू संहिता विधेयकाच्या - हिंदू कोड बिल- मुद्द्यावर मतभेद झाल्यामुळे २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्या विधेयकाचे नंतर चार भाग होऊन चार वेगळे कायदे झाले.

मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य चिरस्मरणीय आहे. समितीचे बहुतेक सदस्य विविध कारणांनी इतरत्र व्यग्र असल्याने घटनेचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी संपूर्णपणे डॉ. आंबेडकरांवर पडली. ती त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक पार पाडली. घटनासभेने घेतलेल्या निर्णयांना अनुसरून घटनेच्या कलमांमध्ये अचूक शब्दयोजना करून बाबासाहेबांनी आपल्या व्यासंगाचा कायमस्वरूपी ठसा घटनेवर उमटविला. मसुदा समितीने तयार केलेल्या घटनेच्या मसुद्यावरील चर्चेत भाग घेताना, सदस्यांच्या सूचना, हरकती व दुरुस्त्यांचा परामर्श घेताना डॉ. आंबेडकरांनी केलेली भाषणे त्यांच्या कायद्याच्या ज्ञानाची आणि सर्वंकष विद्वत्तेची साक्ष देतात. तशीच ती दूरदृष्टीच्या व तळमळीच्या देशभक्त मनाचे दर्शनही घडवितात.

डॉ. आंबेडकरांनी अन्यायाविरुद्ध जहाल भूमिका घेतली असली तरी ते मूलत: उदारमतवादी असल्याने घटनात्मक मार्गांचाच अवलंब करण्याचा त्यांचा नेहमी आग्रह असे. आपला हा दृष्टिकोन त्यांनी घटनासभेत वेळोवेळी अभ्यासपूर्ण रीतीने मांडला. विशेषत: २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केलेल्या समारोपाच्या भाषणात, घटना अमलात आल्यानंतर राज्याच्या सर्व घटकांनी घटनात्मक नीतिमत्ता पाळण्याबद्दल आणि एकमेकांचा आदर करण्याबद्दल डॉ. आंबेडकरांनी केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. घटना अमलात आल्यानंतर जनतेतील सर्व घटकांनीही आपले सर्व प्रश्न घटनात्मक चौकटीतच सोडविले पाहिजेत, हे त्यांनी स्पष्ट सांगितले आणि नुसत्या राजकीय लोकशाहीने भागणार नाही, सामाजिक व आर्थिक लोकशाही अस्तित्वात आली पाहिजे, हेही बजावून सांगितले. १९९० मध्ये भारत सरकारने डॉ. आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांना ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च नागरी सन्मान मरणोत्तर देऊन त्यांचा गौरव केला.

-डॉ. नितीश नवसागरे

**संदर्भ :**

*१. कीर, धनंजय; ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई; २००७.*

## उसगावकर, मनोहर घनश्याम
**न्यायविद**
**२३ सप्टेंबर १९३३**



गोव्यातील उसगाव गावात पोर्तुगीज राजवटीच्या काळात मनोहर घनश्याम उसगावकर यांचा जन्म झाला. लायसेम या नावाने ओळखला जाणारा माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांनी चार वर्षे मुदतीचा कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला. याच काळात लायसेम परीक्षेस बाहेरून बसणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी फ्रेंच भाषाही शिकविली. १६ मार्च १९५७ रोजी गोव्यात वकिली करण्यासाठी आवश्यक असलेली ‘एकझॉम द एस्तादो’ ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले आणि जून १९५७ पासून म्हापसा येथे त्यांनी वकिलीला प्रारंभ केला.

त्या काळचे गोव्याचे सर्वोच्च न्यायालय मानले जाणाऱ्या ‘ रेलकाव द गोवा’ या न्यायालयासहित सर्व न्यायालयांत त्यांनी काम केले. गोवामुक्तीनंतर या न्यायालयाच्या जागी न्याय आयुक्त न्यायालय (ज्युडिशिअल कमिशनर्स कोर्ट) अस्तित्वात आले. कालांतराने त्याच्या जागी मुंबई उच्च न्यायालयाचे गोवा खंडपीठ पणजी येथे स्थापन झाले.

पोर्तुगीज राजवटीत भारतातील कायद्यापेक्षा खूपच वेगळे कायदे आणि न्यायव्यवस्था गोव्यात अस्तित्वात होती. त्यातील काही कायदे अद्यापही अस्तित्वात आहेत. पोर्तुगीज काळातील कायदे स्वाभाविकपणेच पोर्तुगीज भाषेत होते. हे कायदे आणि त्या वेळची व्यवस्था यांचा दुवा गोवामुक्तीनंतर गोव्यात लागू झालेले भारतीय कायदे व न्यायव्यवस्था यांच्याशी जोडणे आवश्यक होते. मनोहर उसगावकर यांनी आपल्या व्यासंगाने या कामात महत्त्वाची भूमिका बजावली.

६ सप्टेंबर १९८८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना सीनियर ॲडव्होकेट म्हणून मान्यता दिली. १९ सप्टेंबर १९९६ ते ५ मे १९९८ या काळात ते भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर-जनरल होते. १९९९ साली काही महिने गोव्याचे ॲडव्होकेट-जनरल म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

पोर्तुगीज अमदानीत कुटुंबविषयक कायद्यात काही पुरोगामी तरतुदी होत्या. लग्न झाल्याबरोबर नवविवाहितेला नवऱ्याच्या मालमत्तेत काही अधिकार आपोआप मिळत असे. प्रत्येक गावात गरजूंच्या मदतीसाठी एकसामायिक मालकीची मालमत्ता असे व तिचे व्यवस्थापन त्या त्या गावातलीच विश्वस्त संस्था करीत असे. तसेच जमीन कसणाऱ्या मुंडकारांना महाराष्ट्रातील कुळापेक्षा वेगळे अधिकार असत. या सर्व कायद्यांची माहिती नव्या पिढीला व्हावी म्हणून उसगावकरांनी त्यांची इंग्रजीत भाषांतरे केली व अशा कायद्यांची ओळख करून देण्यासाठी पुस्तकेही लिहिली. न्यायसंस्थेशी संबंधित विषयावर अनेक परिषदा व चर्चासत्रे त्यांनी आयोजित केली. ‘*गोवा लॉ टाइम्स*’ नावाचे एक कायदेविषयक नियतकालिक त्यांनी १९८९ साली सुरू केले. ‘वैकुंठराव ढेंपे इंडो-पोर्तुगीज स्टडी सेंटर’ या अध्ययन केंद्राचे ते अनेक दिवस संचालक होते.

जुन्या कायद्यांमध्ये कालमानानुसार बदल सुचवण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या अनेक समित्यांचे ते सभासद होते. अनेक शैक्षणिक संस्थांशी त्यांचा संबंध आहे.

– न्या. नरेंद्र चपळगावकर

## एकबोटे, गोपाळ अनंत
**आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**
**जून १९१२ – ४ जून १९९४**

गोपाळ अनंत एकबोटे यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्याच्या कन्नड तालुक्यातील एका छोट्या गावात झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सरस्वती



भुवन विद्यालय औरंगाबाद व शासकीय कनिष्ठ महाविद्यालय औरंगाबाद येथे झाले. हैदराबाद राज्यात वकिली करण्यासाठी आवश्यक असणारी परीक्षा देण्यासाठी त्यांनी लॉ-क्लासमधील अभ्यासक्रम पूर्ण केला व परीक्षा उत्तीर्ण होऊन ते वकिली करू लागले. प्रारंभीच्या काळात एकबोटे यांनी पुढे हैदराबाद उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झालेल्या न्या. श्रीपतराव पळणिटकरांचे साहाय्यक (ज्यूनियर) म्हणून काम केले. नंतर वकिली करित असतानाच त्यांनी बी.ए. आणि एलएल. बी. या महाविद्यालयीन पदव्या संपादन केल्या.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात गोपाळराव एकबोट्यांनी राजकारणात सक्रिय भाग घ्यावयास सुरुवात केली. १९५२ साली ते सुलतान बाजार मतदारसंघातून हैदराबाद राज्याच्या विधानसभेवर काँग्रेस पक्षातर्फे निवडून आले. राज्यपुनर्रचनेत हैदराबाद संस्थानचे (राज्याचे) त्रिभाजन करून त्याचे तीन विभाग भाषिक आधारावर शेजारच्या तीन राज्यांत समाविष्ट करण्यास त्यांचा विरोध होता. परंतु त्रिभाजन झालेच. हैदराबाद राज्यातील तेलुगुभाषी तेलंगणाचा विभाग आंध्र प्रदेश राज्यात समाविष्ट करण्यात आला, तर मराठीभाषी मराठवाड्याचा विभाग तेव्हाच्या द्वैभाषिक मुंबई राज्यात आणि उरलेला कन्नडभाषी विभाग तेव्हाच्या म्हैसूर (आताच्या कर्नाटक) राज्यात समाविष्ट करण्यात आला. त्याअगोदर २६ जानेवारी १९५४ पासून २१ ऑक्टोबर १९५६ पर्यंत एकबोट्यांनी हैदराबाद राज्याचे शिक्षण, स्थानिक स्वराज्य आणि संसदीय कार्यमंत्री म्हणून काम पाहिले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी आंध्र अस्तित्वात आल्यानंतर एकबोटे पुन्हा विधानसभेवर निवडून आले. परंतु आता त्यांनी वकिलीवर लक्ष केंद्रित केले होते. त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्याची संधी होती, पण त्याचवेळी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून ७ जून १९६२ रोजी त्यांच नियुक्ती करण्यात आली. १ एप्रिल १९७२ रोजी ते आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले आणि ३१ मे १९७४ रोजी त्या पदावरून निवृत्त झाले.

हैदराबाद शहरातील मराठी सांस्कृतिक व वाङ्मयीन संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. ग्रंथालयांना उदारपणे शासकीय मदत देऊ करणारा ग्रंथालय कायदा प्रथम एकबोट्यांनी हैदराबाद राज्यात अस्तित्वात आणला. त्याचेच परिष्कृत रूप नंतर मुंबई राज्यात अमलात आले.

अत्यंत गरिबीत आपले शिक्षण पूर्ण करून न्यायकारण आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत एकबोट्यांनी आपल्या कार्याने लौकिक संपादन केला.

– न्या. नरेंद्र चपळगावकर

## एल्फिन्स्टन, माउंटस्टुअर्ट

**मुंबईचे गव्हर्नर**

**६ ऑक्टोबर १७७९ – २० नोव्हेंबर १८५९**

**☞ मुख्य नोंद – शिक्षण खंड**



मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयामुळे ज्यांचे नाव बहुतेकांना माहीत आहे ते माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन १८१९ ते १८२७ या काळात मुंबईचे गव्हर्नर होते. आजच्या महाराष्ट्रातील किंवा पश्चिम भारतातील कायदा व न्यायव्यवस्थेचा आणि शिक्षणव्यवस्थेचा पाया त्यांनी आपल्या कारकिर्दीत घातला.

एल्फिन्स्टनचा जन्म स्कॉटलंडमधील डम्बर्टन येथे झाला. स्कॉटलंडमधील उमरावांच्या प्रभावळीतील अकरावा बॅरन एल्फिन्स्टन याचा हा पुत्र होय. त्याचे

शिक्षण एडिम्बर्ग येथील रॉयल हायस्कूलमध्ये झाले. त्यांचा कोणी नातेवाईक ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळावर असल्याने माउंटस्टुअर्टला भारतातील कंपनी सरकारात नोकरी मिळाली. १७९६ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी ते कोलकात्याला आले. तेथे पाच वर्षे वेगवेगळ्या कनिष्ठ जागांवर काम केल्यावर त्यांची नेमणूक दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या दरबारातील ब्रिटिश रेसिडेंटचा सहायक म्हणून झाली. नंतर त्यांनी जनरल वेलस्लीचा सहायक म्हणून काम केले. वसईच्या लढाईत त्यांनी हिरिरीने भाग घेतला. १८०४ मध्ये त्यांची नेमणूक नागपूर येथे भोसले दरबारातील ब्रिटिश रेसिडेंट म्हणून झाली. नंतर १८०७ मध्ये ते काही काळ ग्वाल्हेर येथे होता. १८०८ मध्ये त्याला ब्रिटिश राजदूत म्हणून अफगाणिस्तानात पाठविले गेले. दोन वर्षांनी परत आल्यावर आणि एक वर्ष कोलकात्यात राहिल्यावर १८११ मध्ये त्यांची नेमणूक पुण्याला पेशवे दरबारात रेसिडेंट म्हणून झाली. १८१७ मध्ये खडकीच्या लढाईत एल्फिन्स्टन यांनी ब्रिटिश सैन्याचे नेतृत्व केले. पेशव्यांचा पराभव झाला आणि पेशवाई समाप्त झाली. १८१८ मध्ये एल्फिन्स्टन यांची नेमणूक दख्खनचा आयुक्त म्हणून झाली. वर्षभरानंतर, १८१९ मध्ये त्यांची नेमणूक मुंबईचा गव्हर्नर म्हणून झाली. त्या वेळी मुंबई इलाख्यात आज पाकिस्तानात असलेला सिंधचा भाग, आजचा गुजराथ, आजचा पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील काही जिल्हे, असा विस्तीर्ण प्रदेश समाविष्ट होता.

१८१९ ते १८२७ अशी आठ वर्षे एल्फिन्स्टन मुंबईचे गव्हर्नर होते. आपल्या कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्रातील आणि एकंदर पश्चिम भारतातील शिक्षणपद्धती आणि शिक्षणव्यवस्था त्याचप्रमाणे कायदा आणि न्यायव्यवस्थेचा पाया घातला.

जगातील ज्या ज्या प्रदेशांवर ब्रिटिशांनी राज्य केले, तेथे सर्वत्र त्यांनी कायद्याच्या राज्याची स्थापना केली, असे त्यांच्याबद्दल म्हटले जाते. भारतही त्याला अपवाद ठरला नाही. जसजशी भारतात ब्रिटिश सत्ता विस्तार पावून स्थिरावू लागली, तसतशी कायद्याचे राज्य स्थापन करण्याची निकड त्यांना जाणवू लागली. कायद्याच्या राज्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे लिखित स्वरूपातील, सर्वांना समजण्यायोग्य, कलमवार तरतुदी असलेले, म्हणजेच संहिताबद्ध (कोडिफाइड) कायदे अस्तित्वात असणे आणि अशा कायद्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवून, त्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी, त्याचप्रमाणे व्यक्तींना आपल्या तक्रारींची दाद मागून न्याय मिळविण्यासाठी एक सुव्यवस्थित न्यायालय व्यवस्था अस्तित्वात असणे. महाराष्ट्रासह पश्चिम भारतात या दोन्ही गोष्टींचा प्रारंभ एल्फिन्स्टन यांनी केला.

मुंबईचे गव्हर्नर झाल्यानंतर एल्फिन्स्टन यांनी वर सांगितलेल्या दोन्ही गोष्टी साध्य करण्याच्या उद्देशाने, त्या वेळी या प्रदेशात प्रचलित किंवा लोकमान्य असलेले नियम, रूढी, प्रथा, संकेत, परंपरा इत्यादी लक्षात घेऊन व काही नवे नियम तयार करून त्यांची विषयवार व कलमवार मांडणी करून घेतली, म्हणजेच त्यांना संहिताबद्ध केले. दुसरे म्हणजे, या सगळ्यांची अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालये स्थापन केली. या दोन्ही गोष्टी मुख्यत: दिवाणी स्वरूपाच्या होत्या. या न्यायालयांच्या स्थापनेची तरतूदही त्याने या संहितेतच केली. या सर्व संहितेला त्यांनी ‘बॉम्बे कोड ऑफ रेग्युलेशन्स्’ असे नाव दिले. याला ‘एल्फिन्स्टन कोड’ असेही म्हणण्याचा प्रघात आहे. यामध्ये एकूण सत्तावीस नियम होते.

ही अर्थातच सुरुवात होती. काळाच्या ओघात, साधारण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत, आणखी अनेकानेक कायदे झाले आणि त्यामुळे एल्फिन्स्टन यांच्या कोडमधील अनेक तरतुदी रद्द करण्यात आल्या. मात्र त्यातील काही तरतुदी अशा प्रकारे रद्द न झाल्यामुळे आजमितीसही अस्तित्वात असून, घटनेच्या कलम ३७२ नुसार त्या तरतुदी कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहेत.

दिवाणी क्षेत्रात जे कार्य पश्चिम भारतात एल्फिन्स्टन यांनी केले, तेच फौजदारी क्षेत्रात मेकॉलेने भारतीय दंडसंहिता (इंडियन पीनल कोड) तयार करून भारतीय पातळीवर केले. त्यामुळेच एल्फिन्स्टन आणि मेकॉले यांना आजच्या भारतीय कायदा व न्यायव्यवस्थेच्या जडणघडणीचे आद्य प्रणेते म्हणणे किंवा मानणे सयुक्तिक ठरते. या दोघांव्यतिरिक्त तिसरे नाव लॉर्ड कॉर्नवॉलिसचे घेता येईल, कारण त्याने 'एल्फिन्स्टन कोड'प्रमाणेच 'कॉर्नवॉलिस कोड' बंगाल आणि एकूण पूर्व भारतात अमलात आणले होते. कॉर्नवॉलिसनंतर एल्फिन्स्टन व नंतर मेकॉलेंचा कार्यकाळ होता. एका अर्थाने कॉर्नवॉलिस आणि एल्फिन्स्टन यांनी सुरू केलेले कार्य मेकॉलेंनी पूर्ण केले. मायदेशी परतल्यावर एल्फिन्स्टन यांनी भारताचा इतिहास दोन खंडांत लिहिला. भारताचा गव्हर्नर-जनरल होण्यासाठी त्यांना दोन वेळा विचारले गेले, पण त्यांनी नकार दिला.

– शरच्चंद्र पानसे

* * *

# क



## कांगा, जमशेदजी बेहरामजी

**ज्येष्ठ वकील**

**२७ फेब्रुवारी १८७५ – २३ मार्च १९६९**



जमशेदजी बेहरामजी कांगा यांचा जन्म पुणे येथे झाला. एकूण चौदा भावंडांमध्ये ते सर्वात धाकटे होते. त्यांचे शालेय शिक्षण मुंबई येथील एल्फिन्स्टन उच्च माध्यमिक शाळेमध्ये झाले आणि पुढे महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथील विल्सन महाविद्यालयामध्ये झाले. एम.ए. आणि एलएल.बी. या पदव्या मिळवल्यानंतर नोव्हेंबर १९०३ मध्ये कांगा यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली सुरू केली. तेव्हाचे मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट-जनरल सर बेसिल स्कॉट यांच्या चेंबरमध्ये त्यांनी सुरुवातीस काम केले. त्या काळात जेव्हा प्रत्यक्ष काम नसेल तेव्हा ते प्रिव्ही कौन्सिलचे आणि भारतातील विविध उच्च न्यायालयांचे निर्णय वाचीत असत व त्यांचा अभ्यास करीत. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. काही वर्षांतच त्यांचा वकिलीत जम बसला आणि न्यायालयांच्या निर्णयांचे (केस लॉ) अफाट ज्ञान असलेले व कसलेले वकील अशी त्यांची ख्याती झाली.

१९२१ मध्ये कांगा यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. परंतु सुमारे दीड वर्षांनंतर, म्हणजे १९२२ मध्ये ते न्यायासनावरून पायउतार झाले आणि त्यांची नियुक्ती मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट जनरल म्हणून झाली. मुंबई प्रांताचे ते पहिले भारतीय ॲडव्होकेट-जनरल होत. न्यायाधीशपद सोडून ॲडव्होकेट जनरलचे पद स्वीकारण्याचे हे पहिले आणि बहुधा एकमेव उदाहरण आहे. १९३५ मध्ये वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर कांगा ॲडव्होकेट-जनरलपदावरून निवृत्त झाले.

तथापि त्यानंतरही तीस वर्षांहून अधिक काळ ते वकिली करीत होते. सुमारे पासष्ट वर्षे सलग वकिली करीत असल्याने त्यांना मुंबईच्या वकीलवर्गाचे भीष्मपितामह (डॉयेन ऑफ द बॉम्बे बार) असे सार्थपणे संबोधण्यात येई. नंतर प्रसिद्धीस आलेल्या अनेक नामांकित वकिलांनी आणि न्यायाधीशांनी आपल्या वकिलीची सुरुवात कांगा यांच्या चेंबरमध्ये केली होती. एच.एम.सीरवाई, नानी पालखीवाला, फली नरिमन आणि सोली सोराबजी, त्याचप्रमाणे स्वतंत्र भारताचे पहिले सरन्यायाधीश न्या.हरिलाल कानिया ही त्यांपैकी सर्वश्रेष्ठ नावे म्हणता येतील.

कांगा यांचे पहिल्यापासून व्यापारविषयक व करविषयक कायद्यावर, विशेषत: आयकर कायद्यावर, विशेष प्रभुत्व होते. त्यांचे शिष्य नानी पालखीवाला यांनीही आपल्या गुरूंचे अनुसरण करीत या क्षेत्रात (व अर्थातच घटनात्मक कायद्याच्या क्षेत्रात) नेत्रदीपक कामगिरी केली. १९५० मध्ये पालखीवाला यांनी आयकर कायद्यावर एक पुस्तक लिहिले आणि त्यावर स्वत:च्या नावाच्या आधी कांगा यांचे नाव असावे, अशी विनंती कांगा यांना केली. कांगा यांनी ती मान्य केली. ही पालखीवालांनी कांगांना दिलेली एक आगळीवेगळी गुरुदक्षिणाच होती, असे म्हणता येईल. तेव्हापासून गेली साठ वर्षे ‘कांगा ॲण्ड पालखीवाला ऑन इन्कम टॅक्स’ हा भारतीय आयकर कायद्यावरील

प्रमाणभूत ग्रंथ म्हणून जगभरात मान्यता पावला आहे. त्याच्या नव्या सुधारित आवृत्त्या नियमितपणे निघतात.

१९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारताच्या संरक्षण खर्चाची भारत आणि ब्रिटन यांच्यात विभागणी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात आला होता. त्या आयोगासमोर भारताची बाजू कांगा यांनी मांडली होती. कांगा यांना इंग्रजी व फारसी (पर्शियन) साहित्याची आवड होती. फारसीवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांना चौऱ्याणव्या वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती उत्तम होती, बुद्धी तल्लख होती व स्मरणशक्तीही पहिल्याइतकीच तीव्र होती.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९६९.*

## कांटावाला, रमणलाल माणेकलाल
### मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश
### ६ ऑक्टोबर १९१६ – २ मे १९९२



रमणलाल माणेकलाल कांटावाला यांचा जन्म गुजरातमध्ये झाला. त्यांचे शालेय शिक्षण कँबे हायस्कूलमध्ये झाले आणि पुढे महाविद्यालयीन शिक्षण अहमदाबादचे गुजरात कॉलेज आणि मुंबईचे एल्फिन्स्टन कॉलेज येथे झाले. एल्फिन्स्टन कॉलेजमधून ते बी.ए.ची परीक्षा गणित विषय घेऊन विशेष गुणवत्तेसह प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आणि त्यांना दक्षिणा फेलोशिप मिळाली. त्यानंतर त्यांनी एम.ए.ची पदवी आणि शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. पदवीही विशेष गुणवत्तेसह प्रथम वर्गात संपादन केली. १९४१ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. १९४३ मध्ये मूळ शाखेच्या ॲडव्होकेट परीक्षेत ते सर्वप्रथम आले. त्या वर्षी त्यांच्याबरोबर ही परीक्षा देणाऱ्यांत आर. जे. जोशी, बी. जे. दिवाण, जी. ए. ठक्कर आणि आर. एल. दलाल वगैरे मंडळी होती, तर परीक्षकांमध्ये एस. व्ही. गुप्ते, एच. एम. सीरवाई आणि एस. टी. देसाई अशी मंडळी होती.

सप्टेंबर १९४३ मध्ये कांटावाला मूळ शाखेत वकील म्हणून रुजू झाले. अगोदर ते एन. एच. भगवती यांच्या चेंबरमध्ये काम करीत; भगवती उच्च न्यायालयावर गेल्यावर ते एम. पी. अमीन यांच्या चेंबरमध्ये काम करू लागले. मौजेची गोष्ट अशी की उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती होईपर्यंत कांटावाला अमीन यांच्या चेंबरमध्येच काम करीत होते. एम. पी. अमीन मध्यंतरी अनेक वर्षे मुंबई राज्याचे ॲडव्होकेट-जनरल असल्याने कांटावाला यांना राज्य सरकार, केंद्र सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम या सर्वांच्या विविध स्वरूपाच्या कामाचा अनुभव मिळाला. त्यांनी मुख्यत: मूळ शाखेत काम केले. ९ फेब्रुवारी १९६२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून कांटावाला यांची नियुक्ती झाली. ६ फेब्रुवारी १९६४ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. २७ ऑक्टोबर १९७२ रोजी त्यांची नियुक्ती उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. ५ ऑक्टोबर १९७८ रोजी ते सरन्यायाधीश पदावरून निवृत्त झाले.

न्या. कांटावाला मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश असतानाच जून १९७५ मध्ये आणीबाणी लागू झाली. आणीबाणी आहे, या कारणाखाली घटनेने हमी दिलेले नागरिकांचे मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले. मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा हक्क हाही एक मूलभूत हक्क आहे; तोही स्थगित केला गेला. सभा घेण्यावर बंदी घालण्यात आली होती व वृत्तपत्रांवर 'सेन्सॉरशिप' लादण्यात आली. या सर्व गोष्टींवर चर्चा करण्यासाठी अनेक वकिलांनी व निवृत्त न्यायाधीशांनी ऑक्टोबर १९७५ मध्ये एक खाजगी सभा आयोजित केली. या

सभेचे निमंत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. एन. पी. नाथवानी हे होते. मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी सभेवर बंदी घातली. न्या. नाथवानी यांनी या बंदीविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागितली. न्या. कांटावाला आणि न्या. तुळजापूरकर यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. आणीबाणी लागू असल्याने व राष्ट्रपतींनी सर्व मूलभूत हक्क स्थगित केलेले असल्याने, सभाही घेता येणार नाही व न्यायालयात दादही मागता येणार नाही, असा युक्तिवाद सरकारने केला. तो पूर्णत: अमान्य करून, आणीबाणी लागू असली आणि मूलभूत हक्क स्थगित असले, तरीही सभा घेता येईल व दादही मागता येईल, असा सुस्पष्ट निर्णय न्या. कांटावाला व न्या. तुळजापूरकर यांनी दोन स्वतंत्र निकालपत्रांद्वारे देऊन, पोलीस आयुक्तांनी सभेवर घातलेली बंदी रद्द केली.

याव्यतिरिक्तही न्या. कांटावाला यांच्यासमोर अनेक महत्त्वाचे खटले आले आणि त्यात त्यांनी अचूक निर्णय दिले. जॉर्ज फर्नांडिस यांच्या निवडणुकीविरुद्ध स. का. पाटील यांनी दाखल केलेला दावा हा असा एक खटला. लंडनमध्ये राहणाऱ्या एका भारतीयाने एका पोलिश (पोलंड देशातील) मुलीशी लग्न केले होते, त्याने घटस्फोटासाठी लावलेला दावा हा दुसरा असाच महत्त्वाचा खटला. प्रश्न किंवा वाद कोणताही असला, तरी न्या. कांटावाला त्याच्या मुळाशी जाऊन त्याची अलगद सोडवणूक करीत.

डिसेंबर १९७६ मध्ये राज्यपाल अलीयावर जंग यांचे निधन झाले. त्यावेळी काही महिने आणि नंतर एकदा काही काळ, असे दोन वेळा न्या. कांटावाला यांनी हंगामी राज्यपाल म्हणून काम पाहिले. न्या. कांटावाला यांना गणिताप्रमाणेच भारतीय तत्त्वज्ञानाची आवड होती. संपूर्ण भगवद्गीता त्यांना मुखोद्गत होती.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *http://bombayhighcourt.nic.in*

२. *बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९९२.*

## काणे, पांडुरंग वामन

***महामहोपाध्याय पां. वा. काणे***

**ज्येष्ठ न्यायविद, धर्मशास्त्राचे भाष्यकार**

**७ मे १८८० – १८ एप्रिल १९७२**

☞ **मुख्य नोंद – धर्मकारण खंड**



पांडुरंग वामन काणे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र परशुराम येथे एका मध्यमवर्गीय आणि वैदिक विद्वानांच्या घराण्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण दापोली येथे आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात झाले. महाविद्यालयात ते एक अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. पहिल्या वर्षी आणि इंटरच्या वर्षी त्यांना संस्कृत विषयातील शिष्यवृत्ती मिळाली. १९०१ मध्ये ते बी.ए.ची परीक्षा प्रथम वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि त्यांना भाऊ दाजी पारितोषिक मिळाले.

एका वर्षानंतर म्हणजे १९०२ मध्ये पांडुरंग वामन काणे एलएल. बी.च्या पहिल्या वर्षाची परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. नंतरच्या वर्षी म्हणजे १९०३ मध्ये ते संस्कृत आणि इंग्रजी हे विषय घेऊन एम.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना 'गोकुळजी झाला वेदान्त पारितोषिक' मिळाले. एम. ए. झाल्यावर काणे यांनी रत्नागिरीच्या सरकारी उच्च माध्यमिक शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी स्वेच्छेने स्वीकारली. तेथे ते सात विषय शिकवीत. ही नोकरी करीत असतानाच त्यांनी मुंबई विद्यापीठाचे वि. ना. मंडलिक सुवर्णपदक दोन वेळा मिळविले. यासाठी विद्यापीठाला संस्कृतमधील एखाद्या विषयावर निबंध सादर करावे लागत. काणे यांचा एक निबंध 'हिस्टरी ऑफ अलंकार लिटरेचर' या विषयावर होता, तर दुसऱ्या निबंधाचा विषय 'आर्यन मॅनर्स ॲन्ड मॉरल्स ॲज डिपिक्टेड इन दि एपिक्स' असा होता.

१९०७ मध्ये त्यांची रत्नागिरीहून मुंबईला बदली झाली. त्याच सुमारास पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयामधील संस्कृतच्या सहायक प्राध्यापकाची जागा रिकामी झाली. त्या जागेवर काणे यांची नियुक्ती होणे अपेक्षित होते. परंतु सरकारने कमी गुणवत्तेच्या दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती केली. अत्यंत स्वाभिमानी असलेल्या काण्यांनी या अन्यायाच्या निषेधार्थ सरकारी नोकरीचा राजीनामा दिला आणि वकिली करण्याचे ठरविले. १९०२ मध्ये त्यांचे एलएल.बी.चे पहिले वर्ष झाले होतेच; आता दुसरे वर्ष पूर्ण करून १९०८ मध्ये त्यांनी एलएल.बी. पदवी मिळवली आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिली सुरू केली. वकिलीत त्यांचा अल्पावधीतच जम बसला. संस्कृतचा व धर्मशास्त्राचा त्यांचा गाढा व्यासंग असल्याने हिंदू कायद्यावर त्यांचे पहिल्यापासूनच प्रभुत्व होते आणि त्यातील अनेक प्रकरणे त्यांच्याकडे येत.

काण्यांनी कित्येक वर्षे वकिली केली असली, तरी संस्कृत वाङ्मय, धर्मशास्त्र आणि एकंदरीत भारतीय विद्या (इंडॉलॉजी) या विषयांकडे त्यांचा विशेष कल पहिल्यापासूनच असल्यामुळे या क्षेत्रांत त्यांनी अखंडपणे गहन अध्ययन व चिंतन केले आणि त्याचे फलित आपल्या प्रचंड लेखनाच्या माध्यमातून प्रसिद्ध केले. मंडलिक सुवर्णपदकासाठी लिहिलेल्या अलंकारशास्त्रावरील निबंधाने या लेखनाची सुरुवात १९०५ च्या सुमारासच झाली होती. त्यानंतरच्या सुमारे सात दशकांच्या काळात अलंकारशास्त्र आणि साहित्यशास्त्र, अभिजात संस्कृत वाङ्मय, महाभारत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे धर्मशास्त्र आणि पूर्वमीमांसा या विषयांवर काण्यांनी अक्षरश: अफाट लेखन केले. यातील बहुतेक लेखन इंग्रजीत असले, तरी मराठी लेखनही लक्षणीय आहे. अभिजात संस्कृत वाङ्मयातील बाणभट्टाचे ‘हर्षचरित’ आणि ‘कादंबरी’, त्याचप्रमाणे भवभूतीचे ‘उत्तररामचरित’ यांच्या चिकित्सक सानुवाद व सटीप आवृत्त्या त्यांनी प्रसिद्ध केल्या. साहित्यशास्त्रातील विश्वनाथाच्या ‘साहित्यदर्पण’ या विख्यात ग्रंथाच्या पहिल्या, दुसऱ्या व दहाव्या या परिच्छेदांची अशीच आवृत्ती त्यांनी १९१० मध्ये प्रसिद्ध केली. (या ग्रंथाच्या नंतर चार सुधारित आवृत्त्याही प्रसिद्ध झाल्या.) या आवृत्तीस अलंकारशास्त्राचा ऐतिहासिक आढावा घेणारी चारशेपेक्षा जास्त पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना होती. ही प्रस्तावना नंतर ‘हिस्टरी ऑफ संस्कृत पोएटिक्स’ या स्वतंत्र पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध झाली.

काणे यांच्या धर्मशास्त्रावरील लेखनाची सुरुवात नीलकण्ठभट्टाच्या ‘व्यवहारमयुख’ या ग्रंथाची त्यांनी जी संपादित आवृत्ती काढली, तिच्यापासून झाली. ही आवृत्ती १९२६ मध्ये प्रसिद्ध झाली. (या आवृत्तीत मूळ संहिता आणि टीपांचा समावेश होता; संहितेचे इंग्रजी भाषांतर नंतर १९३० मध्ये प्रसिद्ध झाले.) त्यांनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे, या आवृत्तीसाठी सामग्री जुळवीत असताना त्यांना असे वाटले की, अलंकारशास्त्राच्या इतिहासाप्रमाणेच धर्मशास्त्राचाही इतिहास थोडक्यात लिहिला, तर धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल. परंतु या दृष्टीने अभ्यास सुरू केल्यावर दोन गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या. एक म्हणजे धर्मशास्त्र हा विषय एवढा विस्तृत आणि गहन आहे की त्याच्यावर ‘थोडक्यात’ काही लिहिणे केवळ अशक्य आहे; दुसरी म्हणजे, प्राचीन भारतीय धर्मशास्त्र म्हणजे आधुनिक काळात ज्याला न्यायशास्त्र (ज्युरिसप्रुडन्स) म्हणतात, तेच असल्याने तुलनात्मक न्यायशास्त्राच्या, सामाजिक संस्थांच्या आणि एकंदरीत विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासासाठी धर्मशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून मग त्यांनी स्वतंत्रपणे धर्मशास्त्राचा इतिहास लिहिण्याचे ठरविले. यातूनच यथावकाश ‘हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र’ हा पाच खंडांचा, सुमारे साडेसहा हजार पृष्ठांचा जगप्रसिद्ध बृहद्ग्रंथराज सिद्ध झाला.

वस्तुत: या ग्रंथाला धर्मशास्त्राचा ज्ञानकोश म्हणणे अधिक योग्य होईल. याचा पहिला खंड १९३० मध्ये प्रसिद्ध झाला, नंतर दुसरा खंड दोन भागांत

१९४१ मध्ये, तिसरा १९४६ मध्ये, चौथा १९५३ मध्ये आणि पाचव्या खंडाचा पहिला भाग १९५८ मध्ये तर दुसरा भाग १९६२ मध्ये प्रसिद्ध झाला. पहिल्या खंडाचेही नंतर दोन भाग पडले आणि त्यांपैकी पहिल्या भागाची दुसरी सुधारित आवृत्ती १९६८ मध्ये प्रसिद्ध झाली. म्हणजेच या ज्ञानकोशाचे लेखन म.म. काणे सुमारे चार दशके अविरतपणे करीत होते. हे त्यांच्या जीवनभराच्या अध्ययन आणि व्यासंगाचे संचित-फलित होते. साहजिकच काणे म्हणजे धर्मशास्त्र आणि धर्मशास्त्र म्हणजे काणे असे जणू समीकरणच रूढ झाले.

धर्मशास्त्रावरील हे अक्षर लेखन एवढा दीर्घकाळ सातत्याने करीत असतानाच म.म.काणे यांनी संस्कृत आणि भारतीय विद्यांमधील अन्य विषयांवरही विपुल लेखन केले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व लेखन काणे यांनी स्वत: कोणाच्याही साहाय्याशिवाय एकहाती केले. सर्व आधार आणि संदर्भ ते स्वत: शोधून काढीत असत. ''नामूलं लिख्यते किञ्चित्'' म्हणजे ''निराधार असे मी काही लिहीत नाही'' हे त्यांचे ब्रीद होते.

धर्मशास्त्राप्रमाणेच षड्दर्शनांपैकी पूर्वमीमांसेमधील अर्थनिर्णयनाच्या नियमांचे (रूल्स ऑफ इंटरप्रिटेशन) आजच्या काळातील महत्त्व त्यांनी स्पष्ट करून सांगितले. विशेषत: हिंदू कायद्यासंबंधीची जी प्रकरणे विविध उच्च न्यायालयांसमोर त्या काळात निवाड्यासाठी येत, त्यांचा निर्णय करताना या नियमांचा कमी-अधिक प्रमाणात उपयोग होई. धर्मशास्त्र आणि मीमांसा यांचा गाढा व्यासंग असल्याने, वर म्हटल्याप्रमाणे हिंदू कायद्याच्या बाबतीतली अनेक प्रकरणे काणे यांच्याकडे येत. ती न्यायालयात चालवताना, त्याचप्रमाणे आपल्या संपूर्ण लेखनात काणे यांचा दृष्टिकोन परंपरागत शास्त्री-पंडितांसारखा नसे, तर आधुनिक काळाला आणि आधुनिक न्यायशास्त्राला अनुरूप असा असे. म. म. काणे यांना अनेक सन्मान व पुरस्कार मिळाले. १९४२ मध्ये त्यांना 'महामहोपाध्याय' ही पदवी मिळाली. १९४६ मध्ये नागपूरला झालेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेचे, तसेच १९५३ मध्ये वॉल्टेरला झालेल्या भारतीय इतिहास परिषदेचे ते अध्यक्ष होते. १९४७ ते १९४९ या तीन वर्षांत ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. १९५२ मध्ये त्यांना लंडनच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल अॅन्ड आफ्रिकन स्टडीज्' या प्रतिष्ठित संस्थेची मानद फेलोशिप मिळाली. १९५३ पासून १९५९ पर्यंत ते राज्यसभेचे नियुक्त सदस्य होते. याच वर्षांदरम्यान 'हिंदू कोड बिला'ची चार विधेयके संसदेने संमत केली आणि त्यांचे कायद्यात रूपांतर झाले. यांपैकी वारसाहक्क विधेयकावर झालेल्या चर्चेत अनेक मुद्द्यांवर-विशेषत: स्त्रीच्या वारसाहक्कासंबंधी आणि स्त्रीच्या पश्चात तिच्या स्त्रीधनाचा वारसा कोणाकडे जावा, यासंबंधी महामहोपाध्याय काणे यांनी अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. त्या संसदेने स्वीकारल्या आणि १९५६ चा हिंदू वारसाहक्क कायदा संमत केला. १९५४ ते १९५८ पर्यंत ते साहित्य अकादमीच्या नियामक मंडळाचे सदस्य होते. १९५९ मध्ये त्यांची भारतीय विद्यांचे राष्ट्रीय संशोधक-प्राध्यापक (नॅशनल रिसर्च-प्रोफेसर ऑफ इंडॉलॉजी) म्हणून नियुक्ती झाली. भारतीय विद्यांसंबंधीच्या विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी वेळोवेळी भारताचे प्रतिनिधित्व केले. पुणे, मुंबई आणि अलाहाबाद विद्यापीठांनी सन्मान्य डॉक्टरेट देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने महामहोपाध्याय काणे यांना १९६३ मध्ये 'भारतरत्न' हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन या सर्वांवर कळस चढवला.

महामहोपाध्याय काणे यांचा अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध होता. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे ते अनेक वर्षे उपाध्यक्ष होते, तर सोसायटीच्या शोधपत्रिकेचे कित्येक वर्षे संपादक होते. पुणे येथील डेक्कन महाविद्यालय व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, वाईचे

प्राज्ञपाठशाळा मंडळ व धर्मनिर्णय मंडळ आणि मुंबईची ब्राह्मणसभा या संस्थांशीही त्यांचा दीर्घ आणि घनिष्ठ संबंध होता.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. गजेंद्रगडकर, एस. एन.; संपादक, 'महामहोपाध्याय डॉ. पी. व्ही. काणे कमोमरेशन मोनोग्राफ'; मुंबई विद्यापीठ, १९७४.*

## कानिया, मधुकर हिरालाल

**भारताचे सरन्यायाधीश**

**१८ नोव्हेंबर १९२७**



मधुकर हिरालाल कानिया यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शिक्षण मुंबईतच झाले. बी.ए.आणि एलएल.बी. या पदव्या संपादन केल्यानंतर सुरुवातीला १९४९-५० मध्ये ते शासकीय विधि महाविद्यालयामध्ये फेलो होते; नंतर १९५६ ते १९६२ या काळात अर्धवेळ प्राध्यापक होते. १९६४ पासून १९६७ पर्यंत ते मुंबई शहर दिवाणी न्यायालयात सहायक सरकारी वकील आणि १९६७ पासून १९६९ पर्यंत सरकारी वकील होते.

नोव्हेंबर १९६९ मध्ये कानिया यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली; १९७१ मध्ये ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. ऑक्टोबर १९८५ मध्ये ते उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश झाले आणि जून १९८६ मध्ये कायम सरन्यायाधीश. १ मे १९८७ रोजी त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. १३ डिसेंबर १९९१ रोजी ते भारताचे सरन्यायाधीश झाले. १७ नोव्हेंबर १९९२ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

मुंबई उच्च न्यायालयात अनेक वर्षे न्यायाधीश म्हणून काम केल्यानंतर तेथेच आधी कार्यवाहक सरन्यायाधीश आणि नंतर कायम सरन्यायाधीश झालेले आणि तेथून सर्वोच्च न्यायालयावर गेलेले न्या. कानिया हे दुसरे आणि शेवटचे न्यायाधीश होत. त्यानंतर नव्या धोरणानुसार आता सरन्यायाधीश नेहमी अन्य उच्च न्यायालयातून येतात आणि बहुतेक वेळा ते मुंबई उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयावर जातात. उलटपक्षी, ज्येष्ठतेनुसार मुंबई उच्च न्यायालयाच्या ज्या न्यायाधीशांचा क्रमांक उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदासाठी येत असेल, त्यांची अगोदर अन्य कुठल्यातरी (एका किंवा अनेक) उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून बदली होते आणि मग तेथून ते सर्वोच्च न्यायालयावर जातात किंवा त्या उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून निवृत्त होतात.

– शरच्चंद्र पानसे

## कानिया, हरिलाल जयकिसनदास

**स्वतंत्र भारताचे पहिले सरन्यायाधीश**

**३ नोव्हेंबर १८९० – ६ नोव्हेंबर १९५१**



हरिलाल जयकिसनदास कानिया यांचा जन्म सुरत येथे झाला. त्यांचे बी.ए. पर्यंतचे शिक्षण भावनगर येथे झाले. त्यांचे वडील तेथील सामळदास महाविद्यालयामध्ये संस्कृतचे प्राध्यापक होते आणि नंतर तेथेच प्राचार्य झाले. याच महाविद्यालयामधून बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर हरिलाल मुंबईला आले आणि शासकीय विधि महाविद्यालयामध्ये दाखल झाले.

तेथून १९१५ मध्ये एलएल.बी. पदवी मिळविल्यावर कानिया उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेची ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांनी उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. अल्पावधीतच मूळ शाखेतील यशस्वी आणि कुशल वकील म्हणून त्यांचे

नाव झाले. १९३०-३१ मध्ये कानिया यांची मुंबई उच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश म्हणून आणि नंतर १९३३ मध्ये कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. १९४६ पर्यंतच्या आपल्या तेरा वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी आपल्या ज्ञानाने, निष्पक्षपातीपणाने आणि साधेपणाने सर्वांची वाहवा मिळविली. विशेषत: व्यापारविषयक कायद्यातील गुंतागुंतीच्या प्रकरणांचा त्वरित निवाडा करण्याबद्दल त्यांची ख्याती होती. १९४३ मध्ये त्यांना 'सर' हा किताब मिळाला. १९४४-४५ मध्ये काही काळ त्यांनी उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. ते उच्च न्यायालयाचे कायम सरन्यायाधीश व्हावेत अशी अनेकांची इच्छा आणि अपेक्षा होती, परंतु तसे न होता १९४६ मध्ये त्यांची नियुक्ती तेव्हाच्या संघराज्य न्यायालयाचे (फेडरल कोर्टाचे) न्यायाधीश म्हणून झाली. हा एक चांगला योग ठरला, कारण १९४७ च्या सुरुवातीला ते याच न्यायालयाचे पहिले भारतीय सरन्यायाधीश झाले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचबरोबर देशाची फाळणी होऊन पाकिस्तान अस्तित्वात आले. लगेचच भारत आणि पाकिस्तान यांच्यात काही मतभेद निर्माण झाले; त्यांच्यावर विचार करून निवाडा देण्यासाठी दोन्ही देशांनी परस्परसंमतीने एक लवाद मंडळ (आर्बिट्रल ट्रायब्युनल) स्थापन केले. त्यावर भारताच्या वतीने न्या. कानिया यांची नियुक्ती झाली.

२६ जानेवारी १९५० रोजी आपली नवी घटना लागू झाली आणि संघराज्य न्यायालयाच्या जागी स्वतंत्र भारताचे सर्वोच्च न्यायालय अस्तित्वात आले आणि भारताचे पहिले सरन्यायाधीश म्हणून न्या. कानिया यांची नियुक्ती झाली.

पहिल्या दोन वर्षांतच सर्वोच्च न्यायालयासमोर ए. के. गोपालन, शंकरीप्रसाद, रोमेश थापर, यांसारखे महत्त्वाचे खटले आले. न्या. कानिया यांच्या नेतृत्वाखाली न्यायालयाने या सर्व खटल्यांत दूरगामी परिणाम करणारे निर्णय देऊन राष्ट्रीय जीवनात आपले अढळ स्थान प्रस्थापित केले. न्या. कानिया यांची मुदत २ नोव्हेंबर १९५५ पर्यंत होती. परंतु दुर्दैवाने त्याआधीच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे आकस्मिक निधन झाले.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. सेटलवाड, एम. सी.; 'माय लाईफ : लॉ अ‍ॅण्ड अदर थिंग्ज्'; आवृत्ती १९९९, पुनर्मुद्रण २००८.*

*२. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९५१.*

## कापडिया, सरोश होमी

**भारताचे सरन्यायाधीश**

**२९ सप्टेंबर १९४७**



सरोश होमी कापडिया यांचा जन्म मुंबईत एका सामान्य परिस्थितीतील पारशी कुटुंबात झाला. त्यांचे वडील संरक्षण खात्यात कारकून होते, तर आई गृहिणी होती. त्यांचे बहुतेक सर्व शिक्षण मुंबईमध्ये झाले. त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या बी.ए. (ऑनर्स) आणि एलएल.बी. या पदव्या अनुक्रमे १९६७ व १९६९ मध्ये मिळविल्या. सुरुवातीला त्यांनी काही किरकोळ नोकऱ्या केल्या. त्यानंतर मुंबईच्या वकिलांच्या कार्यालयात कारकून म्हणून काम केले.

त्यानंतर त्यांना गग्रट अँड कंपनी या प्रसिद्ध फर्ममध्ये नोकरी मिळाली. यातील अनुभवानंतर अ‍ॅड. फिरोझ दमनिया या ख्यातकीर्त व तडफदार कामगारविषयक सल्लागार वकिलांच्या हाताखाली कापडिया काम करू लागले. परंतु त्यांची स्वतंत्र वकिली करण्याची उमेद त्यांना स्वस्थ बसू देईना. अखेर १९७४ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. अल्पावधीतच त्यांनी एक

अभ्यासू वकील म्हणून नावलौकिक मिळविला. सुमारे सतरा वर्षे त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्हींमध्ये सर्व प्रकारांचे दावे लढवले. त्यामुळे त्यांच्या कायदेविषयक ज्ञानाचा आदर होऊ लागला.

आपल्या वकिलीच्या काळात ते आयकर विभाग, मुंबई महानगरपालिका, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपन्या, अशा वेगवेगळ्या अशिलांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयातही काम पाहत असत. ८ ऑक्टोबर १९९१ रोजी कापडिया यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. २३ मार्च १९९३ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १९९९ पर्यंत त्यांच्यासमोर विविध विषयांवरचे आणि विविध कायद्यांशी (विशेषत: बँकिंग, कामगार, औद्योगिक संबंध, कंपनी कायदा इत्यादींशी) संबंधित असलेले अनेक गुंतागुंतीचे खटले आले. ते त्यांनी यशस्वीपणे हाताळले. ऑक्टोबर १९९९ मध्ये त्यांची नियुक्ती १९९२-९३ मधील हर्षद मेहता प्रकरणातून उद्भवलेले खटले चालविण्यासाठी स्थापन झालेल्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. ते काम त्यांनी सुमारे चार वर्षे पाहिले.

५ ऑगस्ट २००३ रोजी त्यांची बदली उत्तरांचल (आता उत्तराखंड) उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १८ डिसेंबर २००३ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १२ मे २०१० रोजी भारताचे सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सरन्यायाधीशपदावरील त्यांचा कार्यकाळ २८ सप्टेंबर २०१२ पर्यंत आहे. कायद्याव्यतिरिक्त त्यांना अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, हिंदू व बौद्ध तत्त्वज्ञान, अशा विविध विषयांत रस आहे.

– डॉ. सु. र. देशपांडे

**संदर्भ :**


१. *http://bombayhighcourt.nic.in*


## कुर्डूकर, सुधाकर पंडितराव

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१६ जानेवारी १९३५**



सुधाकर पंडितराव कुर्डूकर यांचा जन्म मुंबईला झाला. ३१ ऑगस्ट १९६१ पासून ते मुंबई उच्च न्यायालयात वकिली करू लागले. ते मुख्यत: अपील शाखेत दिवाणी व फौजदारी खटले चालवीत असत. त्याचप्रमाणे रिट अर्जांचेही काम करीत असत. सुधाकर कुर्डूकर यांनी कायद्याचे अर्धवेळ प्राध्यापक म्हणूनही काम केले. नंतर त्यांची नियुक्ती सहायक सरकारी वकील म्हणून झाली.

२५ एप्रिल १९७८ रोजी त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून आणि ११ जानेवारी रोजी कायम न्यायाधीश म्हणून झाली. १६ जानेवारी १९९४ रोजी त्यांची पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी २९ मार्च १९९६ रोजी त्यांची नियुक्ती झाली. १५ जानेवारी २००० रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**


१. *http://bombayhighcourt.nic.in*


## कोतवाल, सोहराब पेशतन

**मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**

**२७ सप्टेंबर १९०६**

सोहराब पेशतन कोतवाल यांचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण अगोदर नागपूरचे सेंट जोसेफ कॉन्व्हेंट आणि नंतर पाचगणीचे बिलिमोरिया हायस्कूल येथे झाले. त्यानंतर त्यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी.ए. आणि नागपूर विद्यापीठाच्या



कायदा महाविद्यालयातून एलएल.बी. या पदव्या संपादन केल्या.

त्यानंतर त्यांनी अगोदर नागपूरच्या न्याय आयुक्त न्यायालयात ज्युडिशिअल कमिशनर्स कोर्ट आणि १९३६ मध्ये नागपूर उच्च न्यायालय स्थापन झाल्यावर त्या न्यायालयात, १९३२ ते १९५६ अशी चोवीस वर्षे वकिली केली. शिवाय ते फेडरल कोर्टात आणि १९५० मध्ये घटना अमलात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातही खटले लढवीत असत.

१९५५ मध्ये कोतवाल यांची नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्यपुनर्रचना झाली; त्यानंतर कोतवाल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. सुरुवातीस ते मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठावर होते. १९५८ मध्ये अहमदाबाद येथे झालेल्या पोलीस गोळीबाराची चौकशी करण्यासाठी एक-सदस्य आयोग म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या प्रकरणी त्यांनी सादर केलेला अहवाल महत्त्वाचा मानला जातो.

जुलै १९६६ मध्ये सरन्यायाधीश तांबे निवृत्त झाल्यावर न्या. कोतवाल यांची मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यांना सहा वर्षांची दीर्घ कारकीर्द मिळाली. २६ सप्टेंबर १९७२ रोजी ते निवृत्त झाले.

नोव्हेंबर १९६९ मध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. पी. व्ही. चेरियन यांचे निधन झाले; त्यावेळी काही महिने न्या. कोतवाल यांनी कार्यवाहक राज्यपाल म्हणून काम पाहिले.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *http://bombayhighcourt.nic.in*

## कोरटकर, केशव संतुकराव

**हैदराबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१८६७ – २१ मे १९३२**

केशव संतुकराव कोरटकर यांचा जन्म १८६७ साली परभणी जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातील पुरजळ या गावी झाला. १८९० मध्ये वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रारंभी पाच-सहा वर्षे गुलबर्गा येथे त्यांनी वकिली केली. १८९३ पासून ते हैदराबाद येथे उच्च न्यायालयात वकिली करू लागले. नंतरच्या काळात केशवराव आणि त्यांचे स्नेही वामन नाईक यांनी हैदराबाद संस्थानातील सार्वजनिक जीवनाचे नेतृत्व केले. संस्थानात राजकीय चळवळीला आणि राजकीय संस्था स्थापन करण्याला बंदी असल्यामुळे, शिक्षणसंस्था, ग्रंथालये, धार्मिक चळवळी आणि नियतकालिकांची आणि ग्रंथांची प्रकाशने हीच लोकजागृतीची साधने होती. या सर्व गोष्टींना प्रोत्साहन देणाऱ्यांत केशवराव कोरटकर प्रमुख होते.

नांदेड जिल्ह्यातल्या कुबेर गावात जलालशहा नावाच्या एका व्यक्तीच्या खुनाबद्दल त्र्यंबकराव आणि यशवंतराव देशमुख यांच्यावर झालेल्या खटल्यात कोरटकरांनी सर तेजबहादूर सप्रू यांच्याबरोबर बचावाचे एक वकील म्हणून काम केले. उच्च न्यायालयात अनेक महत्त्वाचे खटले त्यांनी चालविले. बहुतेक मुस्लिम न्यायाधीश असलेल्या या उच्च न्यायालयात एक हिंदू न्यायाधीश नेमण्याचा प्रघात पडला होता. राय बालमुकुंद यांच्या सेवानिवृत्तीनंतर उच्च न्यायालयात रिकाम्या झालेल्या त्या जागेवर केशवरावांची अतिरिक्त न्यायाधीश म्हणून १९२१ साली नियुक्ती झाली. ऑगस्ट १९२४ मध्ये गुलबर्ग्यात झालेल्या हिंदु-मुस्लिम दंग्याची चौकशी करणाऱ्या आयोगाचे ते अध्यक्ष होते. १९२६ मध्ये ते निवृत्त झाले.

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या काही अधिवेशनांना ते उपस्थित राहिले. हिंदू सेवक समाज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारत इतिहास संशोधक

मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद आदी संस्थानाबाहेरच्या महाराष्ट्रातील प्रमुख सांस्कृतिक संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेपासून केशवराव त्याच्याशी निगडित होते. हैदराबाद संस्थानात वेगळी साहित्य संस्था स्थापन करणे अवघड असल्यामुळे विदर्भ साहित्य संघाच्या कार्यक्षेत्रात हैदराबाद संस्थानातील मराठी भागाचा समावेश करण्यात आला होता. अमरावती येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९०७ साली विवेकवर्धिनी या हैदराबाद शहरातील प्रमुख शिक्षण संस्थेची स्थापना करणाऱ्यांत केशवराव कोरटकर एक होते.

‘हैदराबाद संस्थान सामाजिक परिषद’ या नावाने दरवर्षी अधिवेशन भरवून सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करण्याचा उपक्रम काही वर्षे चालला. त्यातील हदगाव जि. नांदेड येथे १९१९ साली भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद केशवरावांनी भूषविले होते, तर हैदराबादेत भरलेल्या चौथ्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. आपल्या प्रजेत धर्माच्या आधारावर भेदभाव करणे हे हैदराबादच्या निजामी राजवटीच्या धोरणाचे एक अंग होते. संस्थानात ‘आर्य समाज’ स्थापन झाल्यानंतर धार्मिक जुलमाविरुद्ध प्रतिकार होऊ लागला. या चळवळीने हिंदूंना निर्भय बनण्यास साहाय्य केले. आर्य समाजाशी केशवराव कोरटकरांचा विशेष संबंध होता. आर्य समाजाच्या अनेक उपक्रमांचे ते पाठीराखे होते. रँड व आयर्स्ट यांचा खून केल्याचा आरोप असलेल्या चापेकर बंधूंना त्यांनी आर्थिक साहाय्य केल्याची माहिती संशोधकांनी दिली आहे.

१८९७ साली हैदराबाद संस्थानात खूपच मर्यादित अधिकार असलेले एक कायदेमंडळ स्थापन झाले होते. सभासदांची नियुक्ती सरकारच करीत असे. या कायदेमंडळाचे सभासद म्हणूनही कोरटकरांनी काम केले. विधवाविवाहापासून झालेली संतती औरस समजली जावी यासाठी, त्याचप्रमाणे हैदराबादच्या कायद्यात बलात्काराच्या व्याख्येत संमतीवयाचा उल्लेख करण्यासाठीचे बिलही त्यांनी मांडले होते.

२१ मे १९३२ रोजी पुणे येथे मधुमेहाच्या आजारामुळे त्यांचे निधन झाले. केशव मेमोरियल हायस्कूल या नावाची एक शाळा हैदराबादेत त्यांच्या स्मृत्यर्थ उभी आहे.

– न्या. नरेंद्र चपळगावकर

* * *


# ग



## गजेंद्रगडकर, प्रल्हादाचार्य बाळाचार्य

**भारताचे सरन्यायाधीश, ज्येष्ठ न्यायविद**

**१६ मार्च १९०१ - १२ जून १९८१**



न्यायमूर्ती प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर यांचा जन्म सातारा येथे व्युत्पन्न संस्कृत पंडितांच्या प्रख्यात कुटुंबात झाला. त्यांचे माध्वसंप्रदायी वैष्णव घराणे मूळचे आजच्या कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातल्या गजेंद्रगडचे होते. प्रल्हादाचार्यांच्या वडिलांचे पणजोबा राघवेंद्राचार्य हे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस साताऱ्याच्या छत्रपती प्रतापसिंहांच्या निमंत्रणावरून सातारा दरबारचे राजपंडित म्हणून गजेंद्रगडहून साताऱ्यास आले. साताऱ्यातील त्यांचे घर ही जणू एक संस्कृत पाठशाळाच होती. तेथे संस्कृत विद्या शिकण्यास विविध ठिकाणांहून विद्यार्थी येत असत. त्यांच्या घराण्यातील संस्कृत विद्येची ही परंपरा प्रल्हादाचार्यांच्या पिढीपर्यंत चालू राहिली. प्रल्हादाचार्यांचे एक वडील बंधू अश्वत्थामाचार्य हे संस्कृतचे प्रसिद्ध प्राध्यापक होते आणि स्वत: प्रल्हादाचार्यही संस्कृत विद्वान होते.

प्रल्हादाचार्यांचे शालेय शिक्षण सातारा उच्च माध्यमिक शाळेमध्ये झाले. १९१८ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी दोन वर्षे धारवाडच्या कर्नाटक महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतले. तेथून इंटर झाल्यानंतर ते पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयामध्ये दाखल झाले आणि १९२२ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी.ए. (ऑनर्स) ची परीक्षा इंग्रजी व संस्कृत हे विषय घेऊन प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. त्यांना दक्षिणा फेलोशिप मिळाली. १९२४ मध्ये इंग्रजी व संस्कृत हेच विषय घेऊन ते एम.ए. प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. त्यांना 'गोकुळजी झाला वेदान्त पारितोषिक' आणि 'भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ती' मिळाली. १९२४ मध्येच प्रा. ज. र. घारपुरे यांनी पुण्यामध्ये पूना लॉ कॉलेज (आजचे आय.एल.एस. विधि महाविद्यालय) स्थापन केले. एम.ए. झाल्यानंतर प्रल्हादाचार्यांनी तेथे प्रवेश घेतला, आपण वकील व्हायचे, असे त्यांनी आधीच ठरविले होते.

ऑगस्ट १९२६ मध्ये प्रल्हादाचार्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिली सुरू केली. वकिलीत लवकरच त्यांचा जम बसला आणि एक यशस्वी व कुशल वकील म्हणून त्यांचे नाव झाले. सुमारे १९ वर्षांच्या आपल्या वकिलीच्या कारकिर्दीत त्यांनी विविध प्रकारचे दिवाणी दावे आणि फौजदारी खटले लढविले. मार्च १९४५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. अल्पावधीतच एक समतोल विचारांचे, कायद्याचे सखोल ज्ञान असणारे आणि दोन्ही बाजूंच्या वकिलांचे म्हणणे शांतपणे ऐकून अचूक न्याय देणारे न्यायाधीश म्हणून त्यांची ख्याती झाली. उच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. त्यातील अनेक हिंदू कायद्यासंबंधी होते; त्यातही एक आज ज्वलंत प्रश्न बनलेल्या सगोत्र विवाहाच्या मुद्द्याबाबत होता. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असतानाच ते मुंबई विद्यापीठाच्या सिंडिकेटचे सदस्य होते. त्याच काळात बँक

कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींबाबतचा एक-सदस्य आयोग म्हणूनही त्यांची नियुक्ती झाली.

जानेवारी १९५७ मध्ये न्या. गजेंद्रगडकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. फेब्रुवारी १९६४ मध्ये ते भारताचे सरन्यायाधीश झाले. १५ मार्च १९६६ रोजी ते सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाले.

न्यायाधीश आणि सरन्यायाधीश म्हणून न्या. गजेंद्रगडकर यांची सर्वोच्च न्यायालयातील एकूण नऊ वर्षांची कारकीर्द अनेक दृष्टींनी महत्त्वाची आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरली. मुंबई उच्च न्यायालयातील त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांचे नाव आधीच सर्वज्ञात होते. ते सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर त्यांच्या विद्वत्तेचा आणि विचारांचा प्रभाव सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजावर आणि निकालांवरही पडू लागला. त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अनेक चांगल्या प्रथा-परंपरा पाडल्या. उदाहरणार्थ, त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेनंतरच्या सुरुवातीच्या काही वर्षांत न्यायाधीशांची प्रवृत्ती अनेकदा स्वत:ची वेगळी सहमतीची निकालपत्रे (सेपरेट कंकरिंग जजमेंटस्) लिहिण्याची असे. सरन्यायाधीश न्या. एस. आर. दास यांच्या प्रयत्नांमुळे ही प्रवृत्ती बऱ्याच प्रमाणात कमी झाली आणि त्यामुळे निकालपत्रांची संख्या कमी झाली. न्या. गजेंद्रगडकर यांनी न्या. दास यांची परंपरा पुढे चालविली.

न्या. गजेंद्रगडकर यांची दोन विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी स्वत: सर्वाधिक निकालपत्रे लिहिली आणि भिन्नमत-निकालपत्रे (डिसेन्टिंग जजमेंट्स्) क्वचितच लिहिली. याचा अर्थ, न्यायालयाच्या ज्या कुठल्या पीठाचे न्या. गजेंद्रगडकर सदस्य असत, त्याचे निकालपत्र बहुधा तेच लिहीत आणि पीठावरील अन्य न्यायाधीश सहसा त्यांच्याशी सहमत असत आणि जरी एखादे न्यायाधीश असहमत असले आणि त्यामुळे त्यांनी भिन्नमत-निकालपत्र लिहिले, तरी बहुमताचे निकालपत्र एकच असे. उलटपक्षी, निकालपत्र न्या. गजेंद्रगडकरांनी लिहिलेले नसले, तरी ते आणि बाकीचे न्यायाधीश त्याच्याशी सहसा सहमत असत.

घटनात्मक प्रश्न, औद्योगिक कायदा व कामगार कायद्याचे प्रश्न, सरकारी नोकरांचे प्रश्न, हिंदू कायद्याचे प्रश्न, हिंदू किंवा अन्य धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांच्या व्यवस्थापनासंबंधीचे प्रश्न, इत्यादी विविध बाबतींत न्या. गजेंद्रगडकर यांनी अनेक महत्त्वाचे आणि चिरस्थायी निर्णय दिले. घटनात्मक प्रश्नांवरील जे महत्त्वाचे खटले न्या. गजेंद्रगडकरांच्या कारकिर्दीत सर्वोच्च न्यायालयासमोर आले, त्यांपैकी बेरुबारीचा प्रश्न, नानावटी खटल्यातील घटनात्मक प्रश्न, बालाजी, केशवसिंह, सज्जनसिंह, माखनसिंह आणि मिरजकर हे खटले विशेष उल्लेखनीय म्हणता येतील. यांमधील नानावटी खटला सोडल्यास बाकी सगळी (एकमताची किंवा बहुमताची) निकालपत्रे न्या. गजेंद्रगडकर यांनी लिहिलेली होती. उत्कृष्ट निकालपत्रांचा वस्तुपाठ म्हणून ती आजही नावाजली जातात. यापैकी सज्जनसिंह खटल्यातील संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकाराच्या मुद्द्यावरील निर्णय नंतरच्या गोलकनाथ खटल्यात न्यायालयाने फिरवला. त्यानंतरच्या केशवानंद भारती खटल्यात त्यावर आणखी खल होऊन मूलभूत संरचना सिद्धान्त (बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन) प्रस्थापित झाला. त्याहीनंतरच्या अनेक महत्त्वाच्या खटल्यांनंतर आता हा सिद्धान्त वज्रलेप झाला आहे. हा भाग सोडल्यास, वर उल्लेखिलेल्या खटल्यांपैकी बहुतेकांतील, विशेषत: आरक्षणाच्या मुद्द्यावरचा बालाजी खटला, विधिमंडळांच्या विशेषाधिकाराच्या मुद्द्यावरचे केशवसिंह प्रकरण आणि बेरुबारी प्रश्न, यांतील सर्वोच्च न्यायालयाचे न्या. गजेंद्रगडकरांनी लिहिलेले निर्णय आजही बंधनकारक आहेत. औद्योगिक कायदा आणि कामगार कायदा यांमधील विविध तरतुदींचा अर्थ पुरोगामी दृष्टिकोनातून आणि कामगारांच्या हितासाठी

लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासातील जानेवारी १९५७ ते मार्च १९६६ या कालखंडाला 'गजेंद्रगडकर युग' असे सार्थपणे म्हणता येईल.

सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यावर लगेचच न्या. गजेंद्रगडकर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्यावेळी ते पद पगारी नसून मानसेवी (ऑनररी) होते. ही धुरा त्यांनी साडेपाच वर्षे यशस्वीरीत्या सांभाळली. याच दरम्यान त्यांनी महागाई भत्ता आयोग, जम्मू-काश्मीर चौकशी आयोग, राष्ट्रीय कामगार आयोग आणि बनारस हिंदू विद्यापीठ चौकशी आयोग यांच्यावरही काम केले. यानंतर ते कुलगुरूपदावरून निवृत्त झाल्यावर सहाव्या आणि सातव्या विधि आयोगांचे (लॉ कमिशन) अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. याशिवाय ते रिझर्व बँकेच्या आणि प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाच्या संचालक मंडळांचे तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे सदस्य आणि दिल्लीच्या इंडिया इंटरनॅशनल सेंटरचे एक विश्वस्तही होते. दिल्लीच्या इंडियन लॉ इन्स्टिट्यूट, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, इंडियन सोसायटी ऑफ इंटरनॅशनल लॉ, इत्यादी संस्थांशीही त्यांचा घनिष्ठ संबंध होता. मदुराई येथील गांधीग्राम ग्रामीण विद्यापीठाचे ते पहिले कुलपती होते. मुंबई आणि पुण्यातील अनेक संस्थांशीही त्यांचा घनिष्ठ संबंध होता. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे आणि रामकृष्ण मिशनच्या मुंबई शाखेचे ते अध्यक्ष होते, तर पुण्याच्या शिक्षण प्रसारक मंडळीचे आणि इंडियन लॉ सोसायटीचे अध्यक्ष होते. मुंबईच्या राष्ट्रीय संगीत-नाट्य केंद्राच्या (नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्) नियामक मंडळाचेही ते काही काळ सदस्य होते.

न्या. गजेंद्रगडकर यांना सामाजिक सुधारणेच्या चळवळीत रस होता आणि सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभागही असे. न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या काळातील सामाजिक परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न महर्षी कर्वे, रँग्लर परांजपे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादी मंडळींनी केला. त्यात न्या. गजेंद्रगडकर यांचाही सहभाग होता. या प्रयत्नांचा भाग म्हणून १९५३ मध्ये पुण्याला आणि १९५४ मध्ये जळगावला महाराष्ट्र सामाजिक सुधारणा परिषद भरली. या दोन्ही परिषदांचे अध्यक्षस्थान न्या. गजेंद्रगडकर यांनी भूषविले होते.

न्या. गजेंद्रगडकर यांनी आपल्या वकिलीच्या काळातच नंदपंडित याच्या 'दत्तकमीमांसा' या ग्रंथाची सानुवाद चिकित्सक आवृत्ती प्रसिद्ध केली होती आणि तिची प्रशंसा झाली होती. त्यानंतर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयातील आपल्या दीर्घ कारकिर्दीच्या काळात न्या. गजेंद्रगडकर यांनी अनेक ठिकाणी विविध विषयांवर विद्वत्तापूर्ण व्याख्याने दिली. त्यांतील बहुतेक पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. त्यापैकी 'लॉ, लिबर्टी ॲन्ड सोशल जस्टिस' (१९६५), 'ट्रॅडिशन ॲन्ड सोशल चेंज' (१९६६), 'इम्परेटीवज् ऑफ इंडियन फेडरेशन' (१९६९), 'सेक्युलॅरिझम ॲन्ड द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडीया' (१९७१), 'इंडियन पार्लमेंट ॲन्ड फंडामेंटल राइट्स्' (१९७२) आणि 'लॉ, लॉयर्स ॲन्ड सोशल चेंज' (१९७६) या पुस्तकांचा विशेष उल्लेख करता येईल.

आपल्या जीवनाच्या संध्याकाळी न्या. गजेंद्रगडकर यांनी आणखी एक महत्त्वाचे कार्य हाती घेतले आणि ते जवळजवळ पूर्ण केले. ते म्हणजे भारतीय विद्याभवनाच्या दशोपनिषद प्रकल्पाच्या प्रमुख संपादकपदाचे. त्यांच्या नेतृत्वाखालील संपादक मंडळाने दहा प्रमुख उपनिषदांचे मूळ श्लोक, त्यांवरील शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य आणि वल्लभाचार्य या चार आचार्यांचे भाष्य आणि या सर्वांचे सटीप इंग्रजी भाषांतर असे ग्रंथ सिद्ध केले. यातील आठ उपनिषदांचे काम न्या. गजेंद्रगडकर असेपर्यंत पूर्ण झाले होते.

'टु द बेस्ट ऑफ माय मेमरी' हे न्या. गजेंद्रगडकरांचे वाचनीय आणि उद्बोधक आत्मचरित्र त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनी, म्हणजे

१९८३ मध्ये भारतीय विद्याभवनानेच प्रसिद्ध केले. मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय या दोन्हींच्या इतिहासातील एक श्रेष्ठ न्यायाधीश आणि सरन्यायाधीश म्हणून न्या. गजेंद्रगडकर यांचे स्थान अढळ आहेच, परंतु एकंदर आधुनिक महाराष्ट्राच्या आणि भारताच्या वैचारिक-बौद्धिक जडणघडणीत बहुमूल्य वाटा उचलणारे महान न्यायविद आणि तत्त्वज्ञ म्हणूनही त्यांचे स्मरण सदैव केले जाईल.

– शरच्चंद्र पानसे


**संदर्भ :**

*१. गजेंद्रगडकर प्र. बा.; 'टु द बेस्ट ऑफ माय मेमरी'; भारतीय विद्याभवन, १९८३.*

## गुप्ते, शंकर विनायक

**भारताचे ॲटर्नी-जनरल**

**१९०४ –**



शंकर विनायक गुप्ते यांचा जन्म सावंतवाडीला झाला. त्यांचे वडील सावंतवाडी संस्थानाचे दिवाण होते. शंकर यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूल आणि मुंबईचे रॉबर्ट मनी हायस्कूल येथे झाले. नंतर १९२७ मध्ये मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून बी.ए. आणि १९२९ मध्ये शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. या पदव्या संपादन केल्या. नंतर लगेच त्यांनी सॉलिसिटरची परीक्षाही दिली. मात्र सॉलिसिटर म्हणून त्यांनी काम केले नाही. त्यानंतर ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेची ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि मूळ शाखेत वकिली करू लागले. मूळ शाखेतील निर्भय आणि सचोटीचे वकील म्हणून त्यांचा लौकिक झाला.

अनेक कामगार संघटनांशी गुप्ते यांचा घनिष्ठ संबंध होता.मुंबईतील कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक ना.म.जोशी यांच्याबरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

१९६१ च्या ॲडव्होकेट कायद्यानुसार स्थापन झालेल्या महाराष्ट्र बार काउन्सिलचे गुप्ते पहिले अध्यक्ष झाले. १९५३ पासून १९६३ पर्यंत ते 'इंडियन लॉ रिपोर्ट – बॉम्बे सीरिज्'चे संपादक होते. १९५२ पासून १९६२ पर्यंत ते 'महाराष्ट्र ॲडव्होकेट असोसिएशन'चे आणि 'लीगल एड सोसायटी'चे अध्यक्ष होते.

१९६३ मध्ये त्यांची नियुक्ती भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर-जनरल म्हणून झाली, पण नंतर त्यांनी त्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर १९७७ पासून १९८० पर्यंत ते भारताचे ॲटर्नी-जनरल होते.

– शरच्चंद्र पानसे

## गोखले, बी. एन.

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१६ जुलै १९०१ –**

न्यायमूर्ती बी. एन. गोखले यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत झाले. १९१८ मध्ये ते एल्फिन्स्टन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर कॉलेजात ते अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. मुंबई विद्यापीठाची बी.ए.(ऑनर्स) पदवी त्यांनी प्रथम वर्गात संपादन केली. नंतर १९२५ मध्ये त्यांनी एलएल. बी. ची पदवी प्राप्त केली. १९२५-२६ मध्ये त्यांनी 'स्टेट ॲण्ड म्युनिसिपल एंटरप्राइझेस् इन इंडिया' या विषयावर प्रबंध लिहून तो मुंबई विद्यापीठास सादर केला. त्यामध्ये त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्था, महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, सहकारी तत्त्वावरील शेती आणि कापडगिरण्यांचे नियंत्रण महानगरपालिकेकडे देण्याचा पुरस्कार केला. १९२६ मध्ये ते इतिहास आणि अर्थशास्त्र हेच विषय घेऊन एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२६ मध्ये गोखले यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिलीस सुरुवात केली. त्याचवेळी ते राजकीय

आणि सामाजिक कार्यातही सक्रीय भाग घेऊ लागले. ‘इंडियन नॅशनल लिबरल फेडरेशन’चे ते बरीच वर्षे मानद सचिव होते, त्याचप्रमाणे ‘बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन’चे एक संयुक्त सचिवही होते. ‘गुजराती’ या पत्राच्या इंग्रजी विभागाचे ते काही काळ संपादक होते. १९३६ मध्ये ते मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांमधून विद्यापीठाचे फेलो म्हणून निवडून आले. त्यानंतर ते विद्यापीठाच्या कायदा विभागाच्या अभ्यासमंडळाचे आणि १९४४ मध्ये विद्यापीठाच्या सिंडिकेटचे सदस्य झाले. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचेही ते फेलो, सिंडिकेट–सदस्य आणि शैक्षणिक समितीचे सदस्य होते. याशिवाय ते मुंबई मराठी साहित्य संघ, बॉम्बे सोशल सर्व्हिस लीग आणि स्वस्तिक लीग यांचे उपाध्यक्ष, मुंबई राज्य सामाजिक सुधारणा संघटनेचे (बॉम्बे स्टेट सोशल रिफॉर्म असोसिएशन) अध्यक्ष आणि आकाशवाणी मुंबई केंद्राच्या सल्लागार मंडळाचे सदस्य होते. याव्यतिरिक्त ‘अ‍ॅडव्होकेटस् असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया’चेही ते सुमारे तीन वर्षे अध्यक्ष होते. या सर्व उपक्रमांबरोबरच त्यांचा वकिलीचा व्यवसायही यशस्वीरीत्या चालू होता. अठ्ठावीस वर्षांहून अधिक काळ ते अपील शाखेतील अग्रगण्य वकील होते.

२१ जानेवारी १९५५ रोजी गोखले यांची उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. १५ जुलै १९६१ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. उच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीत न्या. गोखले यांच्यासमोर अनेक महत्त्वाचे खटले आले आणि त्यांत त्यांनी महत्त्वाचे निर्णय झाले. इ. जी. बरसे खटला, शास्त्री यज्ञपुरुषदासजी खटला, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी विरुद्ध धर्मादाय आयुक्त हा खटला, इत्यादी खटले त्यांपैकी विशेष उल्लेखनीय म्हणता येतील.

तथापि, न्या. गोखले यांचा सहभाग असलेला सर्वात महत्त्वाचा खटला म्हणजे नानावटी प्रकरणातील मूळच्या फौजदारी खटल्यानंतर उद्‌भवलेला घटनात्मक प्रश्न होय. या प्रश्नाच्या निर्णयासाठी तो न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या विशेष पूर्णपीठासमोर आला, त्याचे न्या. गोखले एक सदस्य होते. या पीठाचा एकमताचा निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा निकाल मानला जातो.

एकोणिसाव्या शतकातील उच्च न्यायालयाचे थोर न्यायाधीश आणि आधुनिक महाराष्ट्राचे अध्वर्यू न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या उच्च न्यायालयातील कारकिर्दीचा आणि त्यांच्या निकालपत्रांचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारे एक भाषण न्या. गोखले यांनी न्या. रानडे यांच्या एका स्मृतिदिनीं केले होते.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९६१.*

## गोखले, हेमंत लक्ष्मण

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१० मार्च १९४९**



हेमंत लक्ष्मण गोखले यांचा जन्म बडोद्याला झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या बालमोहन विद्यामंदिरात आणि महाविद्यालयीन शिक्षण रामनारायण रुइया कॉलेजमध्ये झाले. रुइया कॉलेजमधून बी.ए.ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. आणि त्यानंतर मुंबई विद्यापीठातून एम.ए. आणि एलएल.एम. अशा पदव्या मिळविल्या. जानेवारी १९७३ मध्ये महाराष्ट्र बार कौन्सिलकडून वकिलीची सनद मिळाल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीस सुरुवात केली. घटनात्मक, दिवाणी, कामगार कायदाविषयक, सरकारी कर्मचाऱ्यांसंबंधी, असे सर्व प्रकारचे खटले त्यांनी यशस्वीरीत्या लढविले. १९७७ पासून १९८४ पर्यंत ते मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अर्धवेळ

प्राध्यापक होते. १९८४ ते १९८९ या काळात ते उच्च न्यायालयात सहायक सरकारी वकील होते. या काळात ते राज्य सरकारच्या वतीने उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही विभागांत काम पाहत असत.

२० जानेवारी १९९४ रोजी गोखले यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली, पण लगेच ४ फेब्रुवारी १९९४ रोजी त्यांची गुजरात उच्च न्यायालयात बदली करण्यात आली. २३ जानेवारी १९९५ रोजी त्यांची नियुक्ती गुजरात उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश म्हणून करण्यात आली. २५ जानेवारी १९९९ रोजी त्यांची पुन्हा मुंबई उच्च न्यायालयात बदली करण्यात आली. ७ जानेवारी २००७ रोजी त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून झाली. ७ मार्च २००७ रोजी त्यांची नियुक्ती अलाहाबाद उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपदी झाली. ९ मार्च २००९ रोजी तेथून मद्रास उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून त्यांची बदली झाली. ३० एप्रिल २०१० रोजी न्या. गोखले यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. सर्वोच्च न्यायालयातील त्यांचा कार्यकाळ ९ मार्च २०१४ पर्यंत आहे.

– शरच्चंद्र पानसे

* * *

# घ



## घारपुरे, जनार्दन रघुनाथ

**ज्येष्ठ वकील आणि संस्कृत विद्वान**

**२४ जून १८७२ – १८ जून १९६२**

☞ **मुख्य नोंद – शिक्षण खंड**



प्राचार्य जनार्दन रघुनाथ ऊर्फ नानासाहेब घारपुरे यांचा जन्म नागपूरला झाला. त्यांचे शालेय शिक्षण इंदौर येथे आणि महाविद्यालयीन शिक्षण पुणे, बडोदा व मुंबई येथे झाले. १८९५ मध्ये बी.ए. व १९०० मध्ये एलएल.बी. या पदव्या संपादन केल्यावर १९०१ पासून त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीस सुरुवात केली. दरम्यान काही काळ त्यांनी मुंबईच्या मराठा हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक (सुपरिंटेंडंट) म्हणून काम केले. १९०३ मध्ये त्यांनी मुंबईस 'न्यू लॉ क्लास' सुरू केला व तो काही वर्षे चालविला. याच सुमारास त्यांचा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाशी संबंध आला आणि तो दीर्घकाळ टिकला.

प्रा. घारपुरे संस्कृत विद्वान होते आणि धर्मशास्त्राचा त्यांचा गाढा अभ्यास व व्यासंग होता. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात समाजात धर्मशास्त्राचे जे स्थान होते, त्याची जागा आधुनिक काळात कायदा या संकल्पनेने आणि कायद्याच्या व्यवस्थेने घेतली आहे. इंग्रजी राज्यात भारतात कायद्याचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर त्यानुसार जी न्यायालये स्थापन झाली, त्यांच्यासमोर येणाऱ्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक तंट्यांचा निवाडा करण्यासाठी प्राचीन धर्मशास्त्राचे ज्ञान आवश्यक ठरू लागले. ही गरज लक्षात घेऊन प्रा. घारपुरे यांनी १९०९ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी धर्मशास्त्रग्रंथमाला किंवा 'कलेक्शन ऑफ हिंदू लॉ टेक्स्ट्' या ग्रंथमालेचे प्रकाशन सुरू केले, ते १९५२–५३ पर्यंत म्हणजे ४० वर्षांहून अधिक काळ सुरू होते. या मालेत एकूण चाळीसपेक्षा जास्त खंड प्रसिद्ध झाले. यात धर्मशास्त्रावरील बहुतेक सर्व महत्त्वाच्या प्राचीन ग्रंथांची मूळ संहिता आणि त्यांचे इंग्रजी भाषांतर यांचा समावेश होता. यामधील याज्ञवल्क्यस्मृती आणि तिच्यावरील विश्वेश्वरभट्टाची सुबोधिनी व बाळंभट्टाची लक्ष्मीदेवी या टीका, देवण्णभट्टाची स्मृतिचंद्रिका, नीळकंठभट्टाचा द्वादशमयूख, वीरमित्रोदय, हे ग्रंथ प्रमुख म्हणता येतील. हे संपूर्ण प्रकाशन घारपुरे यांनी स्वत: केले, हे पाहिल्यावर आज थक्क व्हायला होते.

याशिवाय प्रा.घारपुरे यांनी इंग्रजी पुस्तकेही लिहिली. त्यांतील एक रोमन कायद्याची तत्त्वे व हिंदू कायदा आणि कायद्याच्या इतर प्रणालींची तत्त्वे यांचे तुलनात्मक विश्लेषण करणारे पुस्तक आणि 'हिंदू लॉ' हे स्वतंत्र पुस्तक, त्याशिवाय 'लॉ ऑफ सापिंड्य रिलेशनशिप', 'राइटस् ऑफ विमेन अंडर हिंदू लॉ', 'टीचिंग ऑफ धर्मशास्त्र' ही महत्त्वाची पुस्तके होत.

वर उल्लेखिलेल्या ग्रंथमालेच्या एकोणतिसाव्या खंडात त्यांनी एकूण धर्मशास्त्राचा विस्तृत आढावा घेतला आहे. या खंडाचे शीर्षकच 'ए जनरल इन्ट्रोडक्शन विथ स्पेशल रेफरन्स टू द याज्ञवल्क्य स्मृती अ‍ॅन्ड द मिताक्षर' असे आहे. या खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी 'धर्म', 'शास्त्र' आणि 'धर्मशास्त्र' या संज्ञांचे किंवा संकल्पनांचे अतिशय अभिनव, मार्मिक

आणि तर्कशुद्ध विवेचन केले आहे. ते आजही महत्त्वाचे आणि मार्गदर्शक ठरणारे आहे. एवढा प्रचंड लेखनप्रपंच करीत असतानाच घारपुरे यांचा मुंबई उच्च न्यायालयातील वकिलीचा व्यवसायही चालू होता आणि विविध संस्थांशी संबंध आणि त्यांच्या कार्यात भाग घेणेही चालू होते.

त्याशिवाय मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारत इतिहास संशोधक मंडळ व भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेशी, वाईच्या प्राज्ञ पाठशाळेशीही त्यांचा घनिष्ठ संबंध होता. मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेचेही ते सदस्य होते. १९३५ च्या कायद्यानुसार दिल्ली येथे फेडरल कोर्टाची स्थापना झाल्यावर ते तेथे वकिली करू लागले.

४ मार्च १९२३ रोजी घारपुरे यांनी मुंबई येथे 'इंडियन लॉ सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सर नारायण गणेश चंदावरकर हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष, तर घारपुरे हे पहिले सचिव झाले.

पुढच्याच वर्षी, म्हणजे १९२४ मध्ये या सोसायटीच्या विद्यमाने पुण्याच्या सुप्रसिद्ध पूना लॉ कॉलेजची स्थापना झाली. घारपुरे या कॉलेजचे पहिले प्राचार्य झाले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख नेहमी प्रा.घारपुरे असा केला जातो. संस्थेची रीतसर नोंदणी नंतर पुण्याला झाली. आज हे कॉलेज आय.एल.एस. विधि महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. सोसायटीचे सचिव आणि कॉलेजचे प्राचार्य या दोन्ही नात्यांनी १९२४ ते १९५० या काळात प्रा. घारपुरे यांनी महनीय कामगिरी केली आणि महाविद्यालयाला सार्वत्रिक लौकिक मिळवून दिला.

१९२४ मध्ये कायदेशिक्षणात एवढी मोठी गुंतवणूक करणे हे प्रा. घारपुरे यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते. कायदा म्हणजे केवळ नियम नव्हेत, तर समाजाची धारणा आणि सुधारणा करण्याचे ते एक साधन आहे, यावर त्यांची श्रद्धा होती. 'अभिरूप न्यायालय' ('मूट कोर्ट') हा आज कायदेशिक्षणाचा अविभाज्य भाग समजला जातो. प्रा.घारपुरे यांनी ही अभिनव संकल्पना आय.एल.एस. विधि महाविद्यालयात १९३९ पासून राबविली.

प्रा. घारपुरे यांनी लावलेल्या रोपाचा वेलू आज गगनावरीच नव्हे तर गगनापलीकडे गेला आहे. गेल्या शहाऐंशी वर्षांच्या काळात या महाविद्यालयाने देशाला अनेक वकील, न्यायाधीश, न्यायविद आणि नेते दिले आहेत.

प्रा. घारपुरे यांचे कार्य त्यांच्यानंतर प्रा. ग. वि. पंडित यांनी आणि नंतर प्रा. डॉ. सत्यरंजन साठे यांनी निष्ठेने पुढे चालविले. त्यामुळेच आज या महाविद्यालयाने राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त केली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आगेमागे 'हिंदू कोड' तयार करण्यासाठी सर बी. एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'हिंदू लॉ कोडिफिकेशन कमिटी'चे प्रा. घारपुरे सदस्य होते. या समितीच्या शिफारसींनुसारच नंतर 'हिंदू कोड'ची चार स्वतंत्र विधेयके संसदेने १९५५ व १९५६ मध्ये संमत केली.

महाराष्ट्र विज्ञानवर्धिनी ('महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिवेशन ऑफ सायन्स') किंवा आजची 'आघारकर संशोधन संस्था' या डॉ. आघारकरांच्या संस्थेच्या स्थापनेत प्रा. घारपुरे यांचा सक्रिय सहभाग होता. अनेक वर्षे या संस्थेचे कामकाज आय.एल.एस. विधि महाविद्यालयाच्या आवारातच चालत असे.

ज्येष्ठ वकील, धर्मशास्त्रग्रंथमालेचे लेखक-प्रकाशक आणि आय.एल.एस. विधि महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य या तिन्ही नात्यांनी प्रा. घारपुरे यांनी केलेले कार्य नि:संशय चिरस्थायी स्वरूपाचे आहे.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *अर्वाचीन चरित्रकोश*

२. *मराठी विश्वचरित्रकोश*

* * *

# च

च

## चंद्रचूड, यशवंत विष्णू

**भारताचे सरन्यायाधीश**

**१२ जुलै १९२० – १४ जुलै २००८**



यशवंत विष्णू चंद्रचूड यांचा जन्म पुण्याला झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्याला नूतन मराठी विद्यालयात झाले. त्यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून त्यांनी १९४० मध्ये इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन बी. ए. ची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या आजच्या आयएलएस लॉ कॉलेजमधून एलएल. बी. ही पदवी पहिल्या वर्गात संपादन केली. या परीक्षेत ते मुंबई विद्यापीठात प्रथम वर्गात सर्वप्रथम आले आणि त्यांना सर नाथुभाई मंगळदास शिष्यवृत्ती, जी.के. कांगा शिष्यवृत्ती, त्याचप्रमाणे जज स्पेन्सर पारितोषिक मिळाले.

१९४३ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. दिवाणी व फौजदारी या दोन्ही स्वरूपांचे अनेक महत्त्वाचे खटले त्यांनी चालविले. १९४९ ते १९५२ या काळात ते मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये अर्धवेळ प्राध्यापक होते. १९५२ मध्ये त्यांची मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त सहायक सरकारी वकील म्हणून, १९५६ मध्ये सहायक सरकारी वकील म्हणून, तर १९५८ मध्ये सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १९५९ मध्ये अत्यंत गाजलेला नानावटी खटला सत्र न्यायाधीशांनी उच्च न्यायालयाकडे पाठविल्याने उच्च न्यायालयात न्या. शेलत व न्या. वि. अ. नाईक यांच्यासमोर पुन्हा चालला; त्यात चंद्रचूड यांनी सरकारची बाजू मांडली.

मार्च १९६१ मध्ये न्या. चंद्रचूड यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. उच्च न्यायालयातील त्यांच्या सुमारे साडेअकरा वर्षांच्या कारकिर्दीत मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणी निश्चित करण्यासाठी एक-सदस्य वेतन आयोग म्हणून आणि बेस्ट आणि बेस्ट कर्मचारी युनियन यांच्यातील वादात लवाद म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जनसंघाचे नेते प्रा. दीनदयाळ उपाध्याय यांच्या खुनाची न्यायालयीन चौकशी करण्यासाठीही एकसदस्य चौकशी आयोग म्हणून न्या. चंद्रचूड यांची नियुक्ती झाली. या चौकशीच्या अहवालात त्यांनी चौकशी आणि तपास यांच्या स्वरूपाबद्दल महत्त्वाचे विवेचन केले.

ऑगस्ट १९७२ मध्ये न्या. चंद्रचूड यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. फेब्रुवारी १९७८ मध्ये ते भारताचे सरन्यायाधीश झाले. या पदावरून ते ११ जुलै १९८५ रोजी निवृत्त झाले. भारताचे सरन्यायाधीश म्हणून त्यांना सुमारे साडेसात वर्षांची प्रदीर्घ व उच्चांकी कारकीर्द लाभली, तर सर्वोच्च न्यायालयातील त्यांची एकूण कारकीर्द सुमारे तेरा वर्षांची होती.

न्या. चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाल्यावर लगेचच भारताच्या घटनात्मक इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या केशवानंद भारती खटल्यास सुरुवात झाली. त्याचा निकाल एप्रिल १९७३ मध्ये जाहीर झाला. या निकालात न्यायालयाने घटनेचा मूलभूत संरचना सिद्धान्त (बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन)

प्रस्थापित केला. १९७५ मध्ये आणीबाणीच्या काळातील मूलभूत हक्कांच्या स्थानाविषयीचा 'हेबियस कॉर्पस' खटलाही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला. या खटल्यातील चार न्यायाधीशांचा बहुमताचा निकाल वादग्रस्त आणि धक्कादायक ठरला. या निर्णयात आणीबाणीच्या काळात राष्ट्रपतींनी घटनेने दिलेले मूलभूत अधिकार स्थगित केल्यावर माणूस म्हणून गृहीत असलेले मानवाधिकारही स्थगित होतात, अशी भूमिका घेण्यात आली आहे. न्या. चंद्रचूड या चार न्यायाधीशांपैकी एक होते.

नंतर न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश असतानाच्या काळात घटस्फोटित मुस्लीम स्त्रीला मुस्लीम कायद्याप्रमाणे मर्यादित कालावधीसाठी पोटगी द्यावयाची की धर्मातीत फौजदारी कायद्याप्रमाणे आयुष्यभर द्यावयाची असा प्रश्न उपस्थित झाला. त्याबद्दलचे शाहबानो व बाई तहिराबी हे खटले प्रसिद्ध आहेत. तहिराबीमधील निकालपत्र न्या. चंद्रचूडांचे आहे. कुराणातील आयता उद्धृत करून त्यांनी पोटगीच्या अधिकाराचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. नंतर सरकारने संसदेत कायदा करून मुस्लिम स्त्रियांचा आयुष्यभर पोटगीचा अधिकार काढून घेतला. पुण्याच्या ज्या आय.एल.एस. विधि महाविद्यालयात न्या. चंद्रचूड यांनी कायद्याचे शिक्षण घेतले होते, त्या इंडियन लॉ सोसायटीचे, त्याप्रमाणे शिक्षण प्रसारक मंडळीचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते.


– शरच्चंद्र पानसे

## चंदावरकर, नारायण गणेश

### मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

### २ डिसेंबर १८५५ – १४ मे १९२३

नारायण गणेश चंदावरकर यांचा जन्म कारवार जिल्ह्यातील होनावर येथे त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे सुरुवातीचे शालेय शिक्षण होनावर येथील मिशनरी शाळेत झाले. त्यांचे मामा शामराव विठ्ठल कैकिणी यांनी १८६९ मध्ये त्यांना मुंबईस आणले.



मुंबईत अगोदर त्यांना माझगावच्या सेंट मेरी मिशनरी शाळेत घालण्यात आले, पण पुढच्याच वर्षी चंदावरकर यांना एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला. नंतर १८७२ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला आणि तेथून १८७६ मध्ये त्यांनी बी.ए. ची पदवी पहिल्या वर्गात संपादन केली. कॉलेजमध्ये चंदावरकर हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. बी. ए. ला त्यांनी इतिहास, तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. चंदावरकर एलफिन्स्टन महाविद्यालयात विद्यार्थी असताना काशिनाथ त्रिंबक तेलंग तेथे सीनियर फेलो होते. बी. ए. झाल्यानंतर चंदावरकरांनाही एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये फेलो म्हणून नेमण्यात आले.

१८७८ मध्ये तेलंगांच्या शिफारशीवरून 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाच्या इंग्रजी विभागाचे संपादक म्हणून चंदावरकरांची नेमणूक झाली. जवळजवळ दहा वर्षे त्यांनी ही संपादकपदाची धुरा यशस्वीरीत्या सांभाळली. या काळात त्यांनी 'इंदुप्रकाश' मधून स्त्रीशिक्षणाचा आणि एकंदर सामाजिक सुधारणांचा सातत्याने पुरस्कार केला. याच दरम्यान त्यांनी कायद्याचा अभ्यास करून एलएल. बी. ची पदवी संपादन केली आणि १८८१ पासून वकिलीस सुरुवात केली. त्यांना वकिलीत उत्तम यश मिळाले आणि सार्वजनिक कार्यातही त्यांचा प्रवेश झाला.

१८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली; काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनापासूनच चंदावरकर काँग्रेसचे क्रियाशील सभासद झाले. त्याआधी सप्टेंबर १८८५ मध्ये रामस्वामी मुदलियार आणि मनमोहन घोष यांच्याबरोबर चंदावरकर इंग्लंडला जाऊन त्या वर्षीच्या तेथील पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळी भारताची

आणि भारतीयांची कैफियत मांडून आले होते. प्रार्थनासमाजाशीही ते पहिल्यापासून संबद्ध होते आणि नंतर कित्येक वर्षे त्याचे अध्यक्ष होते. सामाजिक परिषदेच्या (सोशल कॉन्फरन्स) कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असे. प्रांतिक परिषदेच्या (प्रोव्हिन्शिअल कॉन्फरन्स) १८९६ मध्ये कराचीला भरलेल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १८८७ मध्ये आणि पुन्हा १८९९ मध्ये विद्यापीठ मतदारसंघातून त्यांची त्यावेळच्या मुंबई कायदेमंडळावर निवड झाली. त्यानंतर १९०० मध्ये लाहोरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.

जानेवारी १९०१ मध्ये न्यायमूर्ती रानडे यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या जागेवर चंदावरकरांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. न्यायाधीशपदावर त्यांनी बारा वर्षांपेक्षा अधिक काळ काम केले. या काळात साहजिकच ते सक्रिय राजकारणात नव्हते. १९१३ मध्ये त्यांनी न्यायाधीशपदाचा राजीनामा दिला. या दरम्यान १९०९ मध्ये त्यांनी काही काळ उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. १९१० मध्ये त्यांना 'सर' हा किताब मिळाला.

न्यायाधीश होण्यापूर्वी चंदावरकरांनी उच्च न्यायालयात वकिली केलेली असल्याने त्यांना उच्च न्यायालयाच्या मूळ आणि अपील या दोन्ही शाखांत काम करण्यास सांगण्यात येई. योगायोगाने राजकीय संदर्भ आणि महत्त्व असलेले अनेक खटले त्यांच्यासमोर आले. त्यातील बहुसंख्य खटल्यांतील आरोपींवर राजद्रोहाचे आरोप होते. दोन खटले अपील होऊन त्यांच्यासमोर आले होते. एक म्हणजे 'राष्ट्रमत' दैनिकाचे व्यवस्थापक गणपतराव मोडक यांनी बिपिनचंद्र पाल यांच्या 'स्वराज्य' पाक्षिकाचे 'आक्षेपार्ह' मजकूर असलेले अंक वितरित केले म्हणून सरकारने त्यांच्याविरुद्ध भरलेला खटला, तर दुसरा म्हणजे कवी गोविंदांच्या 'आक्षेपार्ह' कविता प्रसिद्ध केल्यावरून बाबाराव सावरकरांविरुद्ध भरलेला खटला. या खटल्यांत आरोपींना सत्र न्यायालयाने दिलेल्या कठोर शिक्षा न्या. चंदावरकरांनी अपीलात कायम केल्या. त्यानंतर नाशिक कटाच्या संबंधीचे एकूण तीन खटले सरळ मुंबई उच्च न्यायालयात स्कॉट, चंदावरकर आणि हीटन या तीन न्यायाधीशांच्या विशेष पीठापुढे चालले. पहिल्यामध्ये अनंत कान्हेरे, देशपांडे, कर्वे आणि अन्य आरोपी होते व दुसऱ्या दोन खटल्यांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर व अन्य आरोपी होते. या सर्व खटल्यांत तिन्ही न्यायाधीशांनी एकमताने बहुतेक आरोपींना फाशी आणि जन्मठेप – काळे पाणी – अशा शिक्षा दिल्या; सावरकरांना तर दुहेरी जन्मठेप दिली. या निकालांमुळे चंदावरकरांबद्दल जनमानसात संतापाची भावना निर्माण झाली.

या भावनेची तीव्रता ताई महाराज खटल्यातील निकालाने अधिकच वाढली, कारण या खटल्यात लोकमान्य टिळक आरोपी होते. ताई महाराजांनी केलेल्या दत्तकविधानाकरिता टिळक आणि खापर्डे यांनी आपल्या वजनाचा दुरुपयोग केला असे चंदावरकरांनी आपल्या निकालात म्हटले, तर सदर दत्तक विधान झालेच नाही, असा न्या. हीटन यांचा निकाल होता. उच्च न्यायालयाचा हा निकाल नंतर प्रिव्ही काऊन्सिलने फिरविला आणि टिळकांना निर्दोष ठरविले; त्यामुळे जनमानसातील नाराजी आणि क्षोभ अधिकच वाढला. त्याचे पर्यवसान चंदावरकरांच्या खुनाचा प्रयत्न होण्यात झाले. त्यांनी न्यायाधीशपदाचा राजीनामा दिला, याचे हेही एक कारण असावे.

राजकीय खटल्यांशिवाय अन्य खटलेही न्या. चंदावरकर यांच्यासमोर चालले. हिंदू कायद्याशी संबंधित दोन महत्त्वाच्या खटल्यांचा उल्लेख करता येईल. एकामध्ये 'मुरळी' म्हणून खंडोबाशी लग्न लावून वस्तुत: वेश्यावृत्तीसाठी सोडून दिलेल्या मुलीच्या तिच्या बापाच्या मालमत्तेतील वारसाहक्काचा प्रश्न होता, तर दुसऱ्यामध्ये काही काळ मार्गभ्रष्ट झालेल्या परंतु नंतर पतीकडे परत आलेल्या पत्नीला सांभाळण्याच्या पतीच्या जबाबदारीचा प्रश्न होता. या

दोन्ही खटल्यांत न्या. चंदावरकर यांनी ‘मिताक्षर’, ‘व्यवहारमयूख’, ‘पराशर स्मृती’ इत्यादि मूळ संहितांमधील वचनांचा बारकाईने विचार करून आणि त्यांचा कालानुरूप अर्थ लावून निर्णय दिले.

न्यायाधीशपदाचा राजीनामा दिल्यानंतर चंदावरकर काही काळ इंदौर संस्थानचे दिवाण म्हणून इंदौरला गेले. परंतु महाराजांशी मतभेद झाल्यामुळे दिवाणपदाचा राजीनामा देऊन ते मुंबईला परत आले. यानंतर ते ‘प्रार्थनासमाज’ आणि कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या ‘डिप्रेस्ड क्लासेस् मिशन’ या संस्थांमध्ये सक्रिय राहिले. ते मुंबई विद्यापीठांचे कुलगुरूही झाले. राजकारणात त्यांनी नेहमी नेमस्त भूमिका मांडली. महात्मा गांधींबद्दल त्यांना आदर होता, परंतु गांधीजींच्या सत्याग्रह आणि असहकारितेच्या मार्गाला त्यांचा विरोध होता. १९१९ नंतर माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांनुसार विस्तार झालेल्या मुंबई विधिमंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. अखेरपर्यंत ते त्या पदावर होते.

देशातील लोकभावनेचा विचार न करता त्यांनी दिलेल्या काही निर्णयांबद्दल व त्यांच्या राजकीय मतांबद्दल मतभेद असले तरी मुंबई उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्यपूर्व काळातले महत्त्वाचे, विद्वान न्यायाधीश तसेच सचोटीचे आणि तत्त्वनिष्ठ नेमस्त नेते हे त्यांचे स्थान अबाधित राहील.

–शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. चपळगांवकर, न्या. नरेंद्र; ‘तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ’; मौज प्रकाशन, २०१०.*

## चांदूरकर, मधुकर नरहर

**सरन्यायाधीश – मुंबई व मद्रास उच्च न्यायालये**

**१४ मार्च १९२६ – २८ फेब्रुवारी २००४**



मधुकर नरहर चांदूरकर यांचा जन्म नागपूरला झाला. त्यांचे शालेय शिक्षण नागपूर येथे सोमलवार ॲकॅडमीमध्ये व उच्चशिक्षण नागपूर येथील हिस्लॉप महाविद्यालयामध्ये झाले आणि त्यांनी नागपूर विद्यापीठातून अर्थशास्त्रात एम. ए. ची पदवी संपादन केल्यावर अगोदर नॅशनल कॉलेजमध्ये आणि नंतर हिस्लॉप महाविद्यालयामध्ये अध्यापन केले. परंतु नंतर वडिलांच्या आणि बंधूंच्या व्यवसायाकडे आकर्षित झाल्याने त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या कायदा महाविद्यालयातून १९५२ मध्ये एलएल. बी. पदवी संपादन केली आणि ते नागपूर जिल्हा न्यायालयात वकिली करू लागले. १३ डिसेंबर १९५४ रोजी ते तेव्हाच्या नागपूर उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. त्यांनी मुख्यत्वे दिवाणी, फौजदारी आणि करविषयक खटले लढविले. ते अनेक कंपन्या इत्यादींचे कायदेशीर सल्लागार होते, त्याचप्रमाणे सहायक सरकारी वकील आणि आयकर विभागाचे स्थायी वकीलही होते. त्यांच्या सहकारी वकिलांमध्ये ते अतिशय लोकप्रिय होते. महाराष्ट्र व गोवा बार काउन्सिलवर त्यांची निवड झाली आणि ते त्याचे उपाध्यक्ष झाले. याशिवाय ते महाराष्ट्र लॉ जर्नलचे संस्थापक-संपादक होते.

२८ ऑक्टोबर १९६७ रोजी चांदूरकर यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ७ ऑगस्ट १९६८ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. मुंबई उच्च न्यायालयातील आपल्या सुमारे सतरा वर्षांच्या कारकिर्दीत न्या. चांदूरकर यांनी एक मनमिळाऊ आणि काटेकोर न्याय देणारे न्यायाधीश म्हणून लौकिक मिळविला. त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. त्यामध्ये महाराष्ट्र कर्जमुक्ती कायद्यासंबंधी खटला, कंपनी कायद्याखालील नॅशनल रेयॉन आणि युनिट ट्रस्ट यांच्यातील खटला, कुलाब्यातील नागरिकांचा मुंबई पोर्ट ट्रस्टविरुद्धचा रिट अर्ज, यांचा विशेष उल्लेख

करता येईल. याशिवाय, १ जानेवारी १९७८ रोजी एअर इंडियाच्या ‘सम्राट अशोक’ या विमानाला झालेल्या अपघाताची चौकशी करण्यासाठी एक-सदस्य आयोग म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सर्वंकष चौकशी करून त्यांनी आपला अहवाल सादर केला.

जानेवारी १९८४ मध्ये न्या. चांदूरकरांची मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. परंतु लगेच एप्रिल १९८४ मध्ये त्यांची बदली मद्रास उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून करण्यात आली. तेथून ते १३ मार्च १९८८ रोजी निवृत्त झाले. चेन्नईमधील आपल्या चार वर्षांच्या वास्तव्यात न्या.चांदूरकर तेथेही लोकप्रिय झाले व त्यांनी तेथील वकीलवर्गाचा आदर व विश्वास संपादन केला.

निवृत्त होऊन मुंबईला परतल्यावर न्या.चांदूरकर लवादाचे काम करीत. अनेकदा एखादा विषय दोन लवादांकडे सोपविला गेल्यास त्या लवादाचे अध्यक्ष म्हणून न्या.चांदूरकरांची निवड होत असे. सर्वोच्च न्यायालयाने आणि कलकत्ता उच्च न्यायालयाने त्यांची काही प्रकरणांत लवाद म्हणून नेमणूकही केली होती.

– शरच्चंद्र पानसे

## चितळे, माधव गोविंद

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**७ जानेवारी १९१० – ५ जून १९९६**

माधव गोविंद चितळे यांचा जन्म रत्नागिरीला झाला. त्यांचे शालेय शिक्षण रत्नागिरी हायस्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये झाले. बी.ए. पदवी मिळविल्यानंतर त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली आणि ती करीत असतानाच शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. पदवी संपादन केली. २२ जुलै १९३७ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. त्यांनी मुख्यत: अपील शाखेत आपले चुलते जी. बी. चितळे यांच्या हाताखाली काम केले. नंतर अपील शाखेत त्यांचा स्वतंत्रपणेही चांगला जम बसला. गरजेनुसार ते अगोदर फेडरल कोर्टात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयातही खटले लढवीत असत. त्यांचे काम अतिशय काटेकोर असे. गरीब अशिलांकरिता ते प्रसंगी पदरमोडही करीत.

४ नोव्हेंबर १९५४ रोजी मुंबई शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २१ जुलै १९६० रोजी ते त्या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले. अनेक स्त्रियांना फसवून त्यांच्याशी लग्ने करणारा कुख्यात माधव काझी याच्यावरील फौजदारी खटला चितळे यांच्यासमोर चालला. त्यांनी काझीला दिलेली शिक्षा नंतर उच्च न्यायालयाने कायम केली.

२३ डिसेंबर १९६० रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून चितळे यांची नियुक्ती झाली. ४ ऑक्टोबर १९६१ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. ६ जानेवारी १९७२ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. उच्च न्यायालयात असताना त्यांनी दिलेले दोन महत्त्वाचे निर्णय विशेष उल्लेखनीय आहेत. पहिला, कॉरोनर मलकानी खटल्यातील निर्णय; यात त्यांनी आरोपीचे ध्वनिमुद्रित संभाषण पुरावा म्हणून ग्राह्य आहे असा निर्णय दिला. (तो नंतर सर्वोच्च न्यायालयानेही कायम केला.) दुसरा, भिवंडी-निजामपूर नगरपालिका खटल्यातील निर्णय; यात न्या.चितळे यांनी ‘गुड फेथ’ या संज्ञेचा अर्थ ‘मॉरल अपराइटनेस’ असा लावला.

उच्च न्यायालयातून निवृत्त झाल्यानंतर न्या. चितळे चार वर्षे मुंबईच्या औद्योगिक न्यायाधिकरणाचे अध्यक्ष होते. याच काळात त्यांनी गोव्यातही औद्योगिक न्यायाधिकरण म्हणून काम केले; ते करीत असताना १९७५ मध्ये त्यांनी कोका-कोला तंटा सोडविला. न्या. चितळे यांचा मुंबईतील अनेक शिक्षणसंस्थांशी घनिष्ठ संबंध होता.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९९६.*

च

## चितळे, वामन वासुदेव

*आप्पासाहेब चितळे*

**‘ऑल इंडिया रिपोर्टर’चे संस्थापक**

**२५ जुलै १८८५ – ११ मार्च १९७१**



वामन वासुदेव ऊर्फ आप्पासाहेब चितळे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात एका गरीब कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दापोली येथे घेतले. मॅट्रिक झाल्यावर त्यांनी उच्च शिक्षणासाठी जोधपूरला जायचे ठरविले, कारण तेव्हा तेथे महाविद्यालयीन शिक्षण मोफत होते. तेथे अनेक अडचणींना तोंड देत त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यासाठी ते दिवसा शिकवण्या करीत आणि रात्री अभ्यास करीत. मग त्यांनी नागपूरला कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आणि ते काटोल येथे वकिली करू लागले. नंतर ते नागपूरला सर मोरोपंत जोशी यांच्या हाताखाली वकिली करू लागले. कालांतराने त्यांनी स्वतंत्रपणे वकिली सुरू केली आणि नागपूर उच्च न्यायालयातील एक आघाडीचे वकील म्हणून त्यांची ख्याती झाली.

तथापि केवळ वकिली व्यवसाय करणे व त्याद्वारे संपत्ती मिळविणे हे त्यांचे ध्येय नव्हते. ते स्वत: वकिली करीत असल्याने वकिलांच्या अडचणींची त्यांना चांगली कल्पना होती. भारतातील सर्व ठिकाणच्या आणि प्रिव्ही काउन्सिलमधील सर्व खटल्यांच्या निकालांची माहिती देणारे विश्वासार्ह नियतकालिक तेव्हा उपलब्ध नव्हते, हे या सर्व अडचणींमागील प्रमुख कारण होते. असे महत्त्वाचे निकाल सांगणारे मासिक काढायचे आप्पासाहेबांनी ठरविले. त्याला त्यांनी ‘ऑल इंडिया रिपोर्टर’ असे नाव दिले. या जर्नलमुळे आप्पासाहेबांचे नाव भारतभरातील वकीलवर्गात आणि कायद्याच्या जाणकारांत परिचयाचे झाले. ‘ऑल इंडिया रिपोर्टर प्रा. लि.’ ही कंपनी आप्पासाहेबांनी १९२२ मध्ये स्थापन केली आणि तिच्यामार्फत ‘ऑल इंडिया रिपोर्टर’ दरमहा नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागला.


आप्पासाहेबांनी सदर संस्था स्वत:च्या आर्थिक लाभासाठी काढली नाही, तर आपल्या व्यावसायिक क्षेत्राविषयी असलेल्या प्रेमापोटी आणि आपल्या व्यवसायबंधूंच्या सेवेसाठी हा उद्योग त्यांनी हाती घेतला. आपल्या वर्गणीदारांच्या सोयीसाठी त्यांनी पृष्ठावरची छपाई सलग न करता दोन स्तंभांत करण्याचा निर्णय घेतला. काही काळानंतर ‘ऑल इंडिया रिपोर्टर’ व्यतिरिक्त इतर काही जर्नल्स आणि विविध कायद्यांवरील सटीप व सभाष्य पुस्तके (कॉमेंटरीज्), न्यायालयांच्या निर्णयांचे सारांश (डायजेस्ट्) आणि कायद्यांच्या संहितांचा संग्रह (मॅन्युअल्स) अशी वकील आणि न्यायालयांसाठी अत्यंत आवश्यक आणि उपयुक्त पुस्तकेही नियमितपणे प्रकाशित होऊ लागली. अशा रीतीने आप्पासाहेबांच्या अथक परिश्रमांमुळे विश्वासार्हता, उपयुक्तता व उपलब्धता ही या प्रकाशनांची व्यवच्छेदक दर्जासूचक ओळख बनली.

आप्पासाहेबांनी आपल्या उद्दिष्टांसाठी व आदर्शांसाठी ज्या निष्ठेने काम केले, ती त्यांची निष्ठा केवळ त्यांचे सहकारी व साथीदार यांनाच माहीत होती. ‘ऑल इंडिया रिपोर्टर’ हे त्यांच्या अखंड परिश्रमाचे मूर्तिमंत स्मारकच आहे. आप्पासाहेबांचे वाचन व व्यासंग उल्लेखनीय होते. आपल्या नित्यक्रमातील कामांवर आपल्या शेवटच्या आजाराचा त्यांनी अजिबात परिणाम होऊ दिला नाही. आपल्यापाशी असलेला थोडा अवधी आपल्या कार्यासाठीच वापरण्याचा त्यांचा निर्धार होता व तो शेवटपर्यंत कायम राहिला.

‘ऑल इंडिया रिपोर्टर’ या देशातील अग्रगण्य न्यायपत्रिकेच्या रूपाने त्यांची स्मृती कायम आहे.

– अ. ना. ठाकूर

## चैनानी, हशमतराय खूबचंद
**मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**
**२९ फेब्रुवारी १९०४ – २८ नोव्हेंबर १९६५**



हशमतराय खूबचंद चैनानी यांचा जन्म सध्या पाकिस्तानात असलेल्या सिंधमधील हैदराबाद येथे झाला. तेथीलच हैदराबाद हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. १९२० मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर तीन वर्षे कराची येथील डी. जे. सिंध महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतल्यानंतर ते इंग्लंडला गेले आणि त्यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या मॅग्डलिन कॉलेजात प्रवेश घेतला. तेथून १९२५ मध्ये त्यांनी ‘नॅचरल सायन्स ट्रायपॉस’ घेऊन केंब्रिज विद्यापीठाची बी.ए.पदवी संपादन केली. पुढच्याच वर्षी १९२६ मध्ये ते आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या वर्षीच्या भारतीय उमेदवारांत त्यांचा पहिला क्रमांक आला.

१९२७ मध्ये आयसीएस अधिकारी म्हणून चैनानी यांची प्रशासकीय कारकीर्द सुरू झाली. त्यांची पहिलि नियुक्ती सोलापूर येथे असिस्टंट कलेक्टर म्हणून झाली. नंतर ते क्रमाने नाशिक, खानदेश आणि पुणे येथे त्याच पदावर होते. त्या काळात निवडक आयसीएस अधिकाऱ्यांची न्यायखात्यात बदली (किंवा प्रतिनियुक्ती) होत असे. त्यानुसार १९३३ मध्ये चैनानींची बदली न्यायखात्यात झाली. त्यात ते आधी पुणे येथे सहायक न्यायाधीश आणि नंतर सोलापूर येथे जिल्हा व सत्र न्यायाधीश होते.

१९३५ मध्ये चैनानी यांची नियुक्ती तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सचिव म्हणून झाली. १९३५ च्या कायद्यानुसार निवडणुका झाल्यानंतर १९३७ मध्ये मुंबई प्रांताची विधानसभा अस्तित्वात आली; चैनानींची नियुक्ती या विधानसभेचे पहिले सचिव म्हणून झाली. त्यांनीच या नव्या विधानसभेच्या कामकाजाचे नियम तयार केले. याशिवाय या पदावरील त्यांच्या कारकिर्दीच्या काळात अनेक महत्त्वाच्या कायद्यांचे मसुदे तयार करण्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. मुंबई औद्योगिक संबंध कायदा (बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स अ‍ॅक्ट) हा त्यांपैकी विशेष उल्लेखनीय कायदा होय. त्यानंतर काही काळ ते मुंबई सरकारच्या गृहखात्यात संयुक्त सचिव आणि भारत सरकारच्या गृहखात्यात उपसचिव होते. त्यानंतर ते पुन्हा न्यायखात्यात गेले आणि त्यांची नियुक्ती आधी सुरत व नंतर अहमदाबाद येथे जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून झाली. त्यानंतर १९४७-४८ मध्ये त्यांची नियुक्ती तेव्हाच्या मुंबई प्रांताच्या मध्य विभागाचे आयुक्त म्हणून झाली.

अशा प्रदीर्घ आणि वैविध्यपूर्ण प्रशासकीय, वैधानिक आणि न्यायालयीन अनुभवाच्या पार्श्वभूमीवर चैनानी यांची ऑगस्ट १९४८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. दहा वर्षांनंतर सप्टेंबर १९५८ मध्ये आधी (सरन्यायाधीश न्या. छागला यांच्या अनुपस्थितीत) कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून आणि नंतर डिसेंबर १९५८ मध्ये कायम सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मुंबई उच्च न्यायालयात आय. सी. एस. न्यायाधीश अनेक झाले असले, तरी न्या. चैनानी हे पहिले आणि एकमेव आय. सी. एस. सरन्यायाधीश होत.

न्यायाधीश आणि सरन्यायाधीश म्हणून उच्च न्यायालयातील आपल्या सतरा वर्षांच्या दीर्घ कारकिर्दीत न्या. चैनानी यांनी आपल्या चौफेर अनुभवामुळे आणि नि:स्पृहता, निर्भीडपणा, सहृदयता आणि चांगुलपणा या आपल्या गुणांमुळे एक आदर्श न्यायाधीश म्हणून लौकिक मिळविला.

दाव्यांच्या व खटल्यांच्या निकालांना होणारा उशीर शक्य तितका कमी करण्याचे, त्याचप्रमाणे वादी-प्रतिवादींमध्ये (विशेषत: घरमालक-भाडेकरू किंवा जमीनमालक-कुळ यांच्यात) दिलजमाई किंवा तडजोड घडविण्याचे प्रयत्न न्या. चैनानी नेहमी करीत.

च

च

विविध प्रश्नांवर व कायद्यांच्या मुद्द्यांवर त्यांनी अनेक महत्त्वाचे निकाल दिले. त्यांची निकालपत्रे अतिशय तर्कशुद्ध, मुद्देसूद आणि वाचनीय असत.

१९५९ चा नानावटी खटला मुंबईतच नव्हे तर संपूर्ण देशात गाजला. या प्रकरणातील मूळ फौजदारी खटल्याच्या निकालानंतर लगेचच एक अत्यंत महत्त्वाचा आणि गुंतागुंतीचा घटनात्मक प्रश्न उच्च न्यायालयासमोर आला. न्यायालयाने दिलेली शिक्षा स्थगित ठेवण्याचा राज्यपालांचा अधिकार हा त्यातील वादाचा मुद्दा होता. त्याची सुनावणी पाच न्यायाधीशांच्या एका विशेष पूर्णपीठासमोर झाली. न्या.चैनानी हे या पीठाचे अध्यक्ष होते. त्यांनी दिलेला या पीठाच्या एकमताचा निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा निकाल मानला जातो. सत्र न्यायालयात ज्यूरीसमोर चाललेला हा भारतातील शेवटचा खटला. त्यानंतर ज्यूरी पद्धत रद्द करण्यात आली.

न्या. चैनानी यांनी दोन वेळा महाराष्ट्राचे हंगामी राज्यपाल म्हणूनही काम पाहिले. पहिल्या वेळी, राज्यपाल डॉ.सुब्बरायन यांचे निधन झाल्यामुळे ६ ऑक्टोबर १९६२ ते ५ डिसेंबर १९६२ पर्यंत, तर दुसऱ्या वेळी राज्यपाल श्रीमती विजयालक्ष्मी पंडित संयुक्त राष्ट्रसंघात भारतीय शिष्टमंडळाच्या नेत्या म्हणून गेल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत ५ सप्टेंबर १९६३ ते १८ डिसेंबर १९६३ पर्यंत. आपल्या न्यायालयीन कामाव्यतिरिक्त न्या.चैनानी शिक्षणक्षेत्रात आणि मुंबईमधील शिक्षणसंस्थांच्या कामात रस घेत असत.

२८ फेब्रुवारी १९६६ रोजी वयाची बासष्ठ वर्षे पूर्ण झाल्यावर न्या.चैनानी सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाले असते, परंतु १४ नोव्हेंबर १९६५ रोजी मरीन ड्राइव्हवरील त्यांच्या घरापासून जवळच एका कारने धडक दिल्यामुळे ते गंभीररीत्या जखमी झाले. दोन आठवडे रुग्णालयात मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्यांचे निधन झाले.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९५८, १९६५.*

* * *

# छ



## छागला, मोहम्मदअली करीमभाई

**मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, ज्येष्ठ न्यायविद**

**३० सप्टेंबर १९०० – ९ फेब्रुवारी १९८१**



मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय सरन्यायाधीश न्यायमूर्ती मोहम्मदअली करीमभाई छागला यांचा जन्म मुंबईमध्ये एका प्रसिद्ध व्यापारी कुटुंबात झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या अँटोनिओ डिसिल्व्हा हायस्कूल आणि सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये झाले. १९१७ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले; परीक्षेत ते लॅटिन विषयात पहिले आले. नंतर १९१९ मध्ये सेंट झेवियर्स महाविद्यालयातून इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते इंग्लंडला गेले आणि त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या लिंकन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथून १९२२ मध्ये त्यांनी इतिहास विषय घेऊन बी.ए.ची पदवी संपादन केली आणि त्याच वर्षी ते इनर टेम्पलमधून बॅरिस्टर झाले. ऑक्सफर्डमध्ये असताना १९२१ मध्ये ते ‘ऑक्सफर्ड एशियाटिक सोसायटी’चे आणि १९२२ मध्ये ‘ऑक्सफर्ड इंडियन मजलिस’चे अध्यक्ष होते.

स्वदेशी परत आल्यावर छागला यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत (ओरिजिनल साइड) महम्मदअली जिना यांच्या हाताखाली वकिली सुरू केली. सुरुवातीच्या काळात त्यांना काम मिळविण्यासाठी झगडावे लागले. १९२७ ते १९३० या काळात ते मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये घटनात्मक कायदा (कॉन्स्टिट्यूशनल लॉ) या विषयाचे प्राध्यापक होते. पुढे भारताचे सरन्यायाधीश झालेले न्या. जे.सी.शाह यावेळी छागला यांचे विद्यार्थी होते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचे सहकारी होते.

१९३० पर्यंत छागला यांचा वकिलीत जम बसला. १९३३ ते १९४१ या काळात ते त्यावेळच्या बॉम्बे बार काउन्सिलचे सचिव होते. १९३७ मध्ये मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून त्यांची नियुक्ती झाली. नंतर १९४१ मध्ये ते मुंबई विद्यापीठाच्या सिंडिकेटवर निवडून आले.

१९४१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून छागला यांची नियुक्ती झाली. थोड्याच काळात एक विद्वान आणि निष्पक्ष न्यायाधीश म्हणून त्यांचा लौकिक झाला. १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेच्या अधिवेशनासाठी गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. एप्रिल १९४७ ते नोव्हेंबर १९४७ पर्यंत ते मुंबई विद्यापीठाचे कार्यवाहक कुलगुरू होते. त्याच वर्षी मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला; त्याचवेळी न्या. छागला यांची मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. १३ फेब्रुवारी १९४८ रोजी त्यांची नियुक्ती कायम सरन्यायाधीश म्हणून झाली. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय सरन्यायाधीश होण्याचा मान त्यांना मिळाला.

सप्टेंबर–ऑक्टोबर १९५८ पर्यंत, म्हणजे सलग अकरा वर्षे ते सरन्यायाधीशपदावर होते. म्हणजेच स्वातंत्र्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे सर्वात दीर्घकाळ सरन्यायाधीश राहण्याचा मानही त्यांच्याकडे जातो. त्यांच्या एकूण सतरा वर्षांच्या न्यायालयीन कारकिर्दीत, कायद्याची अचूक जाण, इंग्रजीवरील प्रभुत्व आणि तांत्रिक बाबींच्या पलीकडे जाऊन त्वरित न्यायदान करण्याची हातोटी याबद्दल त्यांची ख्याती झाली आणि ती आजही कायम आहे.

न्या. छागला व न्या. तेंडोलकर यांच्या खंडपीठाने सलग दहा वर्षे आयकर कायद्याखालील खटल्यांत महत्त्वाचे निर्णय दिले. त्यांचे हे खंडपीठ 'आयकर पीठ' (इन्कम टॅक्स बेंच) म्हणूनच ओळखले जाई.

मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश असतानाच न्या. छागला यांची विधि आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली. १ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्य पुनर्रचना होऊन द्वैभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. त्याच सुमारास, ऑक्टोबर १९५६ पासून सुमारे दोन महिने न्या. छागला यांनी द्वैभाषिक मुंबई राज्याचे कार्यवाहक राज्यपाल म्हणून काम पाहिले.

१९५७ मध्ये द हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात दादरा व नगरहवेलीबद्दल पोर्तुगालने भारताविरुद्ध तक्रार केली होती; त्या तक्रारीच्या सुनावणीच्या वेळी भारतातर्फे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे तात्पुरते न्यायाधीश (अ‍ॅड हॉक जज्) म्हणून न्या. छागला यांची नियुक्ती झाली.

त्यानंतर १७ जानेवारी १९५८ रोजी मुंदडा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक सदस्य न्यायाधिकरण (ट्रायब्यूनल) म्हणून त्यांची नेमणूक झाली. ही चौकशी त्यांनी एका महिन्याच्या आत पूर्ण केली आणि १० फेब्रुवारी १९५८ रोजी आपला अहवाल सादर केला. हा अहवाल म्हणजे एक प्रकारचे निकालपत्रच होते. निष्पक्ष, निर्भीड आणि मुद्देसूद अहवाल किंवा निकालाचे उत्कृष्ट उदाहरण अशी त्याची वाखाणणी झाली.

ऑक्टोबर १९५८ मध्ये भारताचे अमेरिकेतील राजदूत म्हणून न्या. छागला यांची नियुक्ती झाली. त्यामुळे त्यांनी सरन्यायाधीशपदाचा राजीनामा दिला. अमेरिकेबरोबरच ते क्यूबा आणि मेक्सिकोमधील भारतीय राजदूतही होते. सुमारे अडीच वर्षे राजदूतपदी राहून ते भारतात परतले, परंतु लवकरच पुन्हा त्यांची नियुक्ती ब्रिटनमधील भारताचे उच्चायुक्त आणि आयर्लंडमधील राजदूत म्हणून झाली. या सर्व पदांवरील त्यांची कारकीर्द अतिशय यशस्वी ठरली.

ब्रिटनमधून भारतात परतल्यावर न्या. छागला यांची नियुक्ती केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून झाली. न्या. छागला यांच्या या कारकिर्दीत त्यांनी शिक्षणपद्धतीचा पुनर्विचार करण्याकरिता डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची नियुक्ती केली. जवाहरलाल नेहरु विद्यापीठाच्या स्थापनेसंबंधीचे विधेयक त्यांनी तयार केले. (मात्र त्याचे कायद्यात रूपांतर होऊन या विद्यापीठाची स्थापना नंतर १९६८ मध्ये झाली.) अलीगढ मुस्लिम विद्यापीठाची पुनर्रचना करण्यासाठी नव्या कायद्याची आवश्यकता होती. त्यासंबंधीचे विधेयकही त्यांनी तयार केले. (ते विधेयक नंतर १९७२ मध्ये संमत झाले.)

१९६६ मध्ये न्या. छागला यांची नियुक्ती परराष्ट्रमंत्री म्हणून झाली. पंतप्रधान इंदिरा गांधींशी धोरणात्मक मतभेद झाल्याने न्या. छागला यांनी ३१ ऑगस्ट १९६७ रोजी परराष्ट्रमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर न्या. छागला सर्वोच्च न्यायालयात वकिली करू लागले. एप्रिल १९७१ ते मार्च १९७३ या काळात ते सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष होते.

एप्रिल १९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्याचा निकाल लागल्यानंतर लगेच, तीन ज्येष्ठ न्यायाधीशांना डावलून ए. एन. राय यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. या अन्याय्य नियुक्तीचा निषेध करण्यासाठी न्या. छागला यांच्या नेतृत्वाखाली सर्वोच्च न्यायालयातील सर्व वकिलांनी एक दिवस न्यायालयाच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.

३० सप्टेंबर १९७३ रोजी 'रोझेस् इन डिसेंबर' हे न्या. छागलांचे अत्यंत वाचनीय आणि उद्‍बोधक आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. पाच वर्षांत त्याच्या आठ आवृत्त्या निघाल्या. नंतर जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी आल्यानंतर न्या. छागलांनी तिच्याविरुद्ध सातत्याने आवाज उठविला. तीन ज्येष्ठ न्यायाधीशांची अवहेलना आणि आणीबाणी याबद्दलचे अत्यंत परखड विवेचन न्या. छागलांच्या आत्मचरित्राच्या आठव्या आवृत्तीला जोडलेल्या उपसंहारात वाचावयास मिळते.

एक श्रेष्ठ न्यायाधीश, ज्येष्ठ न्यायविद, प्रखर राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्य व लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते म्हणून न्या. छागला यांचे स्मरण सदैव केले जाईल.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. छागला, एम. सी.; 'रोझेस् इन डिसेंबर' (आत्मचरित्र); भारतीय विद्याभवन; आठवी आवृत्ती, एप्रिल १९७८.*

*२. बॉम्बे लॉ रिपोर्टर; १९४८, १९५८, १९८१.*

* * *

छ

# ज



## जयकर, मुकुंद रामराव

**ज्येष्ठ न्यायविद**

**१३ नोव्हेंबर १८७३ – १० मार्च १९५९**

**☞ मुख्य नोंद – राजकारण खंड**



मुकुंद रामराव जयकर यांचा जन्म मुंबईमध्ये एका मध्यमवर्गीय पाठारे प्रभू कुटुंबात झाला. त्यांचे वडील मुंबई सरकारच्या सचिवालयात एक दुय्यम अधिकारी होते. मुकुंदरावांचे शालेय शिक्षण मुंबईच्या प्रसिद्ध एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये झाले. नंतर त्यांनी सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि १८९५ मध्ये बी. ए. ची पदवी घेतली. त्यानंतर ते एम. ए. करण्यासाठी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे त्यांनी इंग्रजी व संस्कृत हे वैकल्पिक विषय म्हणून घेतले. त्यात त्यांना धर्मशास्त्र, वेगवेगळ्या स्मृती आणि पूर्वमीमांसा यांचा अभ्यास करावयास मिळाला. १८९७ मध्ये गटे आणि कालाईल यांच्या साहित्यावर प्रबंध लिहून त्यांनी एम. ए. पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी एलएल. बी. चे एक वर्ष पूर्ण केले. कायद्याचे पुढचे शिक्षण घेण्यासाठी १९०१ मध्ये ते इंग्लंडला गेले, पण प्रकृती बिघडल्याने त्यांना परत यावे लागले. आईच्या उत्तेजनामुळे त्यांनी १९०२ मध्ये एलएल. बी. पूर्ण केले. नंतर एप्रिल १९०३ मध्ये ते पुन्हा इंग्लंडला गेले. ऑक्सफर्ड विद्यापीठातल्या बेलियल कॉलेजमधून कायद्याची बी. सी. एल. ही पदवी घेण्याची त्यांची इच्छा होती, पण तेथे त्यांना प्रवेश मिळाला नाही. मात्र सुदैवाने मार्क रोमर या वकिलाच्या चेंबरमध्ये काम मिळाले. ते दोन वर्षे इंग्लंडमध्ये राहिले. या वास्तव्यात त्यांना कायद्याच्या असंख्य गोष्टी अवगत झाल्या. १९०५ मध्ये ते बॅरिस्टर झाले आणि मुंबईला परत येऊन त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. सुरुवातीची काही वर्षे त्यांना त्यांचे आजोबा (आईचे वडील) वासुदेव जगन्नाथ कीर्तीकर यांचे मार्गदर्शन लाभले. कीर्तीकर तेव्हा सरकारी वकील होते. याच काळात जयकरांवर न्या. रानडे आणि नामदार गोखले यांचा प्रभाव पडला. लोकमान्य टिळकांबद्दलही त्यांना नितांत आदर होता.

जयकरांची अभ्यासाची व मननाची भूक दांडगी होती. तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी पूर्वमीमांसेचे अध्ययन त्यांनी सुमारे बारा वर्षे केले. १९१६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयातील तरुण वकिलांनी सोप्या खटल्यांची कामे त्यांच्याकडे यावीत यासाठी एक योजना तयार केली. त्यांना जयकरांनी मार्गदर्शन केले. १९२० पर्यंत जयकर मुंबईत प्रमुख वकील म्हणून मान्यता पावले.

हिंदू दत्तकविधानांचे खटले लढविणे हे जयकरांचे वैशिष्ट्य होते. अशा खटल्यांतील बहुतेक निर्णय त्यांच्या पक्षकारांच्या बाजूने होत. गाजलेल्या ताईमहाराज खटल्यात मुंबई उच्च न्यायालयात जयकरांनी लोकमान्य टिळकांविरुद्ध युक्तिवाद करून विजय मिळवला. लोकमान्यांचे स्थान लक्षात ठेवून जयकरांनी आपला युक्तिवाद अत्यंत काळजीपूर्वक केला होता. आपल्याबद्दल एवढी कळकळ दाखविल्याबद्दल लोकमान्यांनी त्यांची स्तुती केली. नंतर लोकमान्यांनी प्रिव्ही काउन्सिलमध्ये अपील केले

आणि त्यात ते जिंकले, हा भाग वेगळा. जयकरांनी वेळोवेळी अनेक राजकीय खटलेही चालविले. त्यांना वक्तृत्वाचे चांगले वरदान होते.

वकील व कायदेपंडित म्हणून जयकरांची योग्यता सर्वदूर मानली जाई. अनेक संस्थानिक मंडळी त्यांच्याकडे सल्ल्यासाठी येत. मात्र जयकर संस्थानिकांचे खटले तारतम्याने स्वीकारीत. संस्थानातील न्यायव्यवस्थेचा दर्जा सुधारण्याचा सल्ला ते संस्थानिकांना देत. १९२४ च्या संस्थान परिषदेच्या (स्टेट्स् कॉन्फरन्स) अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी संस्थानात प्रजेला मोफत शिक्षण देण्याचा सल्ला संस्थानिकांना दिला. १९२६ मध्ये त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीशपद देऊ करण्यात आले होते. परंतु ते त्यांनी नाकारले. नंतर १९३७ मध्ये फेडरल कोर्टाचे न्यायाधीश म्हणून जयकरांची नियुक्ती झाली. १९३९ मध्ये त्यांची नियुक्ती प्रिव्ही काउन्सिलवर झाली. पण नंतर एकामागून एक क्षोभकारक घटना घडू लागल्या व त्यातून देशाचे भविष्यच ढवळून निघणार असे स्पष्ट झाले. तेव्हा त्यानंतर राजकारणाला जास्तीत जास्त वेळ देण्याचा निर्णय जयकरांनी घेतला व मार्च १९४२ मध्ये त्यांनी प्रिव्ही काउन्सिलचा राजीनामा दिला. त्यानंतरची तीन-चार वर्षे जयकर आणि सप्रू राजकारणात सक्रीय होते.

कायद्याप्रमाणे राजकारणही जयकरांना प्रिय होते. वर उल्लेखिल्याप्रमाणे काँग्रेसची स्थापना करणाऱ्या थोर नेत्यांच्या प्रभावळीचा प्रभाव मनावर विद्यार्थीदशेपासून होता. न्या. रानडे, ना.गोखले, लो. टिळक हे त्यांचे आदर्श होते. याखेरीज देशातील बहुतेक ज्येष्ठ नेत्यांशी जयकरांचे संबंध होते. बॅ. जिना होमरूल लीगच्या मुंबई शाखेचे अध्यक्ष असताना जयकर उपाध्यक्ष होते. रौलट ॲक्टच्या निषेधार्थ काँग्रेस अध्यक्षांनी नेमलेल्या समितीवर पं.मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल इत्यादींबरोबर जयकरांनी काम केले होते. सहा महिने पंजाबमध्ये असताना त्यांचा महात्मा गांधींशी निकटचा परिचय झाला. महात्माजींबद्दल त्यांच्या मनात परस्परविरोधी भावना होत्या. १९२१-१९२२ मध्ये गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन जयकरांनी काही काळ आपली वकिली स्थगित ठेवली होती. तथापि, गांधी जे करतील ते सारेच योग्य असे जयकरांनी कधी मानले नाही. न्यायालये, कायदेमंडळ यांच्यावर बहिष्कार टाकण्याचा काँग्रेसचा कार्यक्रम त्यांना मान्य नव्हता. ते स्वराज्य पक्षात सामील झाले. नेमस्तपणा हा त्यांचा धर्म बनला. १९२८ साली स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेची तत्त्वे निश्चित करण्यासाठी जी सर्वपक्षीय समिती निर्माण झाली तिचे ते सदस्य होते.

१९२४ मध्ये जयकरांनी विद्यापीठ मतदारसंघातून मुंबईच्या विधिमंडळात प्रवेश केला. विरोधी स्वराज्य पक्षाचे नेते या नात्याने त्यांनी ठळक कामगिरी बजावली. १९२७ मध्ये जयकरांनी हिंदू बालविवाह प्रतिबंधक विधेयकाचा जोरदार पुरस्कार केला. ब्रिटिशांच्या सैन्यविषयक नीतीविरुद्ध ते खवळून उठत. व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील संरक्षण खाते हिंदी माणसाकडे सोपवावे असा त्यांचा आग्रह होता. भारताला वसाहतीचा दर्जा (डोमिनियन स्टेटस्) देण्याची मागणी ते करीत असत. सायमन कमिशनला त्यांनी ठाम विरोध केला. तीनही गोलमेज परिषदांना जयकर हजर होते. त्यानंतरच्या महात्मा गांधींच्या प्राणांतिक उपोषणातून त्यांना वाचविण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले, त्यांत जयकर प्रमुख होते. सप्रू-जयकर समितीने नंतर खूप परिश्रम करून 'इंडिया बिल' तयार केले. क्रिप्स आयोगापुढेही त्यांनी भारताची मागणी समर्थपणे मांडली.

शिक्षणाविषयी जयकरांना अपार आस्था होती. मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलची स्थापना १८९७ मध्ये झाली; त्यात जयकर सहभागी होते. त्यावेळी ते नुकतेच एम.ए. झाले होते आणि त्यांचे वय जेमतेम चोवीस होते. नंतर आपल्या आजोबांप्रमाणेच त्यांनीही शासकीय विधि महाविद्यालयामध्ये सहा वर्षे हिंदू कायद्याचे अध्यापन केले. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचेही ते काही काळ

सदस्य होते. महाराष्ट्राला एक विद्यापीठ असावे या मागणीला त्यांचा पाठिंबा होता. मुंबई विद्यापीठाच्या कारभारात सुधारणा सुचविण्यासाठी मुंबई सरकारने नेमलेल्या चिमणलाल सेटलवाड समितीचे जयकरही एक सदस्य होते. समितीने महाराष्ट्रासाठी वेगळ्या विद्यापीठाची शिफारस केली. आपल्या वेगळ्या टिपणात जयकरांनी महाराष्ट्राबरोबरच गुजरातसाठीही वेगळ्या विद्यापीठाची शिफारस केली. महाराष्ट्रासाठीचे विद्यापीठ पुण्याला असावे, असेही समितीने म्हटले, परंतु हे स्वप्न साकार होण्यास दोन दशकांहून अधिक काळ जावा लागला. अखेर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १० फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे विद्यापीठ अस्तित्वात आले. जयकर या नव्या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले. त्यावेळी कुलगुरुपद हे पगारी नसून मानसेवी (ऑनररी) होते. सात वर्षांच्या आपल्या धवल कारकिर्दीत जयकरांनी पुणे विद्यापीठाचा सर्वार्थांनी पाया घातला. १९५६ मध्ये ते कुलगुरुपदावरून निवृत्त झाले. आपल्या ग्रंथालयाला जयकरांचे नाव देऊन विद्यापीठाने त्यांचे नाव अजरामर केले.

– सविता भावे

**संदर्भ :**

*१. कुलकर्णी व्ही. बी.; 'एम. आर. जयकर'; प्रकाशन विभाग, १९७३.*

* * *

# ट

## टोपे, त्र्यंबक कृष्णाजी

**ज्येष्ठ न्यायविद, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबईचे नगरपाल**

**२८ फेब्रुवारी १९१४**

त्र्यंबक कृष्णाजी टोपे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील येवला या गावी तात्या टोपे यांच्या घराण्यात झाला. त्यांनी एम. ए. व एलएल. बी. या पदव्या मिळविल्या होत्या. १९३९ ते १९४७ या काळात ते मुंबईच्या रामनारायण रुइया महाविद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक होते. १९४६ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट झाले. १९४७ ते १९५८ या काळात ते मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे प्राध्यापक होते. नंतर १९५८ ते १९७५ या काळात ते कॉलेजचे प्राचार्य आणि न्यायशास्त्राचे पेरी प्राध्यापक झाले. प्राचार्य असतानाच ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. १९७७ पर्यंत ते कुलगुरू होते. नंतर ते मुंबईतील के. सी. विधि महाविद्यालयात ते अतिथी प्राध्यापक झाले. १९८२ मध्ये मुंबई विद्यापीठातही ते अतिथी प्राध्यापक होते. ते एलएल. एम. आणि पीएच. डी. या पदव्यांसाठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शकही झाले. याशिवाय चार नवीन विद्यापीठे स्थापण्यासाठी जो प्रकल्प अहवाल तयार करावयाचा होता, तो तयार करण्यामध्ये टोपे यांचा सहभाग होता. टोपे यांचे ‘हिंदू फॅमिली लॉ ॲण्ड सोशल चेंज’ हे पुस्तक मुंबई विद्यापीठाने प्रकाशित केले. या व्यतिरिक्त ‘व्हाय हिंदू कोड?’ हे पुस्तक आणि ‘ए मॉडर्न सेज’ हे डॉ. पां. वा. काणे यांचे चरित्र टोपे यांनी लिहिले. मराठी भाषेत टोपे यांनी लिहिलेल्या ‘भारताचे संविधान’ या पुस्तकात त्यांनी घटनेच्या अंमलबजावणीतून होणारे राजकीय व सामाजिक परिणाम आणि त्याचे आर्थिक गर्भितार्थ यांविषयी पुष्कळ ऊहापोह केला आहे. त्यांनी लिहिलेला ‘कॉन्स्टिट्यूशनल लॉ ऑफ इंडिया’ हा ग्रंथ मोलाचा आहे. मूलभूत कर्तव्ये, मालमत्तेचा हक्क, संसदीय प्रणालीची भारताच्या संदर्भात असलेली युक्तता वा अनुरूपता, अध्यक्षीय पद्धतीच्या शासनव्यवस्थेचे गुण आणि निवडणूक सुधारणा या विषयांवर त्यांनी आपल्या या ग्रंथात प्रकाशझोत टाकला आहे.

टोपे यांना अनेक मानसन्मान लाभले होते. कायदा आयोगाचे ते दोन वेळा (१९६२ आणि १९६८ मध्ये) सदस्य होते. हा मान मिळविणारे टोपे हे भारतातील पहिले विधि अध्यापक होत. १९७७ ते १९८० दरम्यान टोपे महाराष्ट्र कायदा आयोगाचे सदस्य होते. मद्रास व मुंबई विद्यापीठांत त्यांनी व्याख्याने दिली होती. आंध्र विद्यापीठाने त्यांना सन्मान्य एलएल. डी. पदवी दिली होती. १९८६ मध्ये ते मुंबईचे नगरपाल झाले. महाराष्ट्र सामाजिक परिषदेचेही ते अध्यक्ष होते.

– अ. ना. ठाकूर

* * *

ट

# त



## तय्यबजी, बद्रुद्दीन

**पहिले भारतीय बॅरिस्टर**

**८ ऑक्टोबर १८४४ – १९ ऑगस्ट १९०६**



बद्रुद्दीन तय्यबजी यांचे नाव बव्हंशी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्यामुळे लोकांना माहीत आहे. काँग्रेसचे पहिले मुस्लिम अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला हेही माहीत आहे. परंतु भारतात इंग्रजी राजवट स्थिर झाल्यानंतर इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर झालेले पहिले भारतीय, मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली करणारे पहिले भारतीय बॅरिस्टर, उच्च न्यायालयाचे पहिले बॅरिस्टर भारतीय न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे पहिले मुस्लिम न्यायाधीश, त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिलेले पहिले भारतीय न्यायाधीश असे अनेक मान तय्यबजी यांच्याकडे जातात.

न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांचा जन्म मुंबईच्या एका सुस्थितीतील सुलेमानी बोहरा कुटुंबात झाला. त्यांचे पूर्वज सुमारे चारशे वर्षांपूर्वी अरब देशातून येऊन कँबे येथे व्यापार करू लागले आणि नंतर तेथून मुंबईला येऊन स्थायिक झाले.

बद्रुद्दीन यांचे वडील तय्यब अली भाईमिया यांची इच्छा आपल्या मुलाने आधी इंग्लंडमध्ये सर्वसाधारण शिक्षण घ्यावे आणि नंतर बॅरिस्टर व्हावे, अशी होती. त्यानुसार त्यांनी बद्रुद्दीन यांना १८६० मध्ये इंग्लंडला पाठविले. तेथे बद्रुद्दीन यांनी एका खासगी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. तेथे आधी मॅट्रिकसाठी आणि नंतर पदवीसाठी परीक्षा द्यावयाची होती. मॅट्रिकची परीक्षा ते उत्तीर्ण झाले, पण नंतरच्या पदवी-परीक्षेच्या जरा आधी त्यांची प्रकृती बिघडली. विशेषत: त्यांच्या डोळ्यांमध्ये जणू अधूपणा आला. त्यामुळे डॉक्टरांच्या आदेशानुसार त्यांना भारतात परत येऊन एक वर्षभर सक्तीची, संपूर्ण विश्रांती घ्यावी लागली. प्रकृती सुधारल्यानंतर ते पुन्हा इंग्लंडला गेले आणि १८६७ मध्ये मिडल् टेम्पलमधून बॅरिस्टर झाले. वर म्हटल्याप्रमाणे बॅरिस्टर होणारे ते पहिले भारतीय होत.

मुंबईला परत आल्यावर ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. तोपर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेतील सर्व बॅरिस्टर वकील इंग्रज होते. वकिलीत यशस्वी होण्यास तय्यबजींना अजिबात वेळ लागला नाही. सुरुवातीपासूनच, सर्व प्रकारचे खटले यशस्वीपणे चालविणारे निष्णात वकील म्हणून त्यांचे नाव झाले. मुंबईबाहेरचे, विशेषत: काठेवाड भागातले खटले त्यांच्याकडे मोठ्या संख्येने येत असत. ते उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्याआधी गुजरातमधील सचिन या संस्थानाच्या नबाबाच्या कुटुंबातील एका व्यक्तीच्या विरुद्धच्या एका फौजदारी खटल्यात तय्यबजी यांनी आरोपीतर्फे अत्यंत कौशल्याने युक्तिवाद करून खटला जिंकला होता.

वकिलीबरोबरच तय्यबजी यांनी मुंबईच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात सक्रिय भाग घेण्यास सुरुवात केली. १८७६ मध्ये स्थापन झालेल्या अंजुमन-ए-इस्लाम या संस्थेचे ते

एक संस्थापक सदस्य होते. आपले बंधू कमरुद्दीन तय्यबजी यांच्या बरोबर त्यांनी ‘सरमिया-ए-जमात-ए-सुलेमानी’ ही आणखी एक संस्था स्थापन केली. १८८० मध्ये ते या संस्थेचे सचिव, तर १८८२ मध्ये अध्यक्ष झाले. त्याआधी १८७३ मध्ये आणि १८७८ मध्ये असे दोन वेळा ते मुंबई नगरपालिकेवर निवडून आले. १८८२ ते १८८६ पर्यंत ते मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य होते. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली. तय्यबजी पहिल्यापासून काँग्रेसमध्ये सक्रीय होते. दोनच वर्षांत, १८८७ मध्ये मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी तय्यबजी यांची निवड करण्यात आली. त्यामुळे काँग्रेसचे पहिले मुस्लिम अध्यक्ष होण्याचा मानही त्यांना मिळाला. यावरून काँग्रेसमधील त्यांचे स्थानही स्पष्ट होते.

जून १८९५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून तय्यबजींची नियुक्ती झाली. वर म्हटल्याप्रमाणे ते मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले बॅरिस्टर भारतीय न्यायाधीश आणि अर्थातच पहिले मुस्लिम न्यायाधीश. तोपर्यंतचे सर्व बॅरिस्टर न्यायाधीश इंग्रज होते; तर एक तात्पुरते आणि तीन कायम असे जे चार भारतीय न्यायाधीश तोपर्यंत झाले होते, त्यांच्यापैकी कोणीही बॅरिस्टर नव्हते. दुसरे म्हणजे, १८६२ मध्ये उच्च न्यायालय स्थापन झाल्यापासून १८९५ पर्यंत एकच भारतीय व्यक्ती न्यायाधीश असावी, असा जणू संकेत किंवा अलिखित नियम बनून गेला होता, तो तय्यबजींच्या नेमणुकीमुळे मोडला.

मुंबईच्या वकीलवर्गात आणि मुंबईच्या एकंदर सार्वजनिक जीवनात तय्यबजी यांनी जे श्रेष्ठ स्थान मिळविले होते, त्याच्यावर त्यांच्या न्यायाधीशपदाने जणू कळस चढविला. ज्याप्रमाणे अल्पावधीतच ते एक प्रथितयश वकील बनले होते, त्याचप्रमाणे अल्पावधीतच एक उत्तम न्यायाधीश म्हणून त्यांची ख्याती झाली. वकिलांशी ते अतिशय चांगुलपणाने वागत, परंतु त्याचवेळी ते परखड आणि निर्भीड होते. ते स्पष्टवक्ते आणि तापटही होते, परंतु त्यांच्याकडून आपल्याला यथायोग्य न्याय मिळेल, याबद्दल तरुण, कनिष्ठ वकीलही नि:शंक असत.

आपल्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत न्या. तय्यबजी यांनी अनेक महत्त्वाचे निकाल दिले. त्यापैकी कसोजी इस्सर विरुद्ध जी. आय. पी. रेल्वे कंपनी (म्हणजे आजची मध्य रेल्वे) या खटल्यातील निकाल हा त्यांचा एक उत्तम निकाल मानला जातो.

मुंबई शहराचे सार्वजनिक जीवन उंचावण्यात आणि मुंबईला भारतीय राजकारणाचे केंद्र बनविण्यात न्या. तय्यबजी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. न्या. रानडे यांचे समकालीन असलेले न्या. तय्यबजी त्यांच्याप्रमाणेच उदारमतवादी आणि राष्ट्रवादी होते.


न्या. तय्यबजी यांनी काही काळ मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. हा मान मिळालेले ते पहिले भारतीय न्यायाधीश! ऑगस्ट १९०६ मध्ये ते इंग्लंडला गेले असताना, दुसऱ्यांदा अशाच प्रकारे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून सूत्रे घेण्यासाठी ते लंडनहून मुंबईला येण्यास निघण्याच्या तयारीत होते, परंतु हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे अचानक निधन झाले.

– शरच्चंद्र पानसे / डॉ. विजय देव

## तांबे, यशवंत श्रीपाद

**मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**

**३१ जुलै १९०४**



यशवंत श्रीपाद तांबे यांचा जन्म अमरावती येथे झाला. त्यांचे शिक्षण इंदौर आणि मुंबई येथे झाले. मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून एलएल. बी. झाल्यानंतर त्यांनी १९३० मध्ये नागपूर येथे वकिलीस सुरुवात केली.

त

सुरुवातीस जिल्हा न्यायालयात आणि नंतर १९३६ मध्ये नागपूर उच्च न्यायालय स्थापन झाल्यानंतर त्या न्यायालयात, असा २४ वर्षांचा वकिलीचा अनुभव मिळाल्यानंतर ८ फेब्रुवारी १९५४ रोजी नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्यपुनर्रचना झाल्यानंतर न्या. तांबे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले.

मुंबई उच्च न्यायालयातील आपल्या सुमारे दहा वर्षांच्या कारकिर्दीत न्या. तांबे यांनी १९६०, १९६२, १९६३ आणि १९६५ मध्ये कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. पहिल्या वेळी सरन्यायाधीश चैनानी काही कारणाने अनुपस्थित असल्याने, तर दुसऱ्या व तिसऱ्या वेळी ते कार्यवाहक राज्यपाल म्हणून काम पाहत असल्याने. १९६५ मध्ये न्या. तांबे कार्यवाहक सरन्यायाधीश झाले, ते सरन्यायाधीश चैनानी यांच्या आकस्मिक अपघाती निधनामुळे. अखेर ५ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे कायम सरन्यायाधीश म्हणून न्या. तांबे यांची नियुक्ती झाली. ३० जुलै १९६६ रोजी ते आपल्या पदावरून निवृत्त झाले. एक अतिशय सहृदय व मनमिळाऊ तसेच निर्भीड आणि कार्यक्षम न्यायाधीश म्हणून न्या. तांबे यांचा लौकिक होता.

– शरच्चंद्र पानसे

त

## तारकुंडे, विठ्ठल महादेव

**ज्येष्ठ न्यायविद, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**३ जुलै १९०९ – २२ मार्च २००४**



विठ्ठल महादेव तारकुंडे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील सासवड येथे झाला. त्यांचे वडील महादेव राजाराम तारकुंडे हे सासवडला वकील होते. तारकुंडे यांचे प्राथमिक शिक्षण सासवडला आणि माध्यमिक शिक्षण पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर वगैरे मंडळी त्यांच्याबरोबर शाळेत होती. त्या शाळकरी वयातही तारकुंडे स्वतंत्रपणे चिकित्सक विचार करीत असत. ‘प्रार्थनेचा उपयोग किंवा प्रभाव’ या विषयावर त्यांनी प्रत्यक्ष महात्मा गांधींना पत्रे लिहिली होती.

१९२५ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या तत्कालीन मॅट्रिक परीक्षेत तारकुंडे सर्वप्रथम आले. संस्कृत विषयातली प्रतिष्ठेची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती तारकुंडे आणि त्यांचे वर्गबंधू डी. पी. शिखरे यांना विभागून मिळाली. (तारकुंडे यांच्याप्रमाणेच शिखरेही पुढे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले.) सरकारी नोकरी न करण्याचा तारकुंडे यांचा निश्चय असल्याने त्यांनी पुण्याच्या कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि १९२९ मध्ये कृषी मधील बी. एजी. ही पदवी मिळविली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्ती घेऊन ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी बॅरिस्टर होण्यासाठी लिंकन्स इन्मध्ये प्रवेश घेतला; त्याच वेळी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये बहि:स्थ विद्यार्थी म्हणून नाव नोंदविले आणि आय. सी. एस. परीक्षेसाठीही अभ्यास केला. तथापि ते आय. सी. एस. परीक्षेस बसले नाहीत. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि सामाजिक मानववंशशास्त्राचा (‘सोशल अॅन्थ्रोपॉलॉजी’) अभ्यास केला, परंतु तांत्रिक कारणांमुळे त्यांना पदवी मिळू शकली नाही. यथावकाश ते लिंकन्स इन्मधून बॅरिस्टर झाले आणि डिसेंबर १९३२ मध्ये भारतात परत आले.

बॅरिस्टर म्हणून तारकुंडे यांनी वकिलीची सुरुवात पुण्यामध्ये केली. महिन्यातले पंधरा दिवस ते आपले जन्मगाव सासवडच्या परिसरात जाऊन, तेथील शेतकऱ्यांमध्ये राहून त्यांचे प्रश्न समजावून घेत असत. पुढे १९३४ मध्ये त्यांनी एस. एम., ना. ग. गोरे आणि खाडिलकरांबरोबर काँग्रेस समाजवादी पक्षात प्रवेश केला. दरम्यान तारकुंडे यांचा एम. एन. रॉय यांच्या

तत्त्वज्ञानाशी परिचय झाला आणि ते रॉय यांचे अनुयायी (म्हणजे रॉयवादी किंवा 'रॉयिस्ट') बनले. १९३९ मध्ये काँग्रेस समाजवादी पक्षातून बाहेर पडून ते रॉयवाद्यांनी काँग्रेसमध्येच राहून स्थापन केलेल्या 'लीग ऑफ रॅडिकल काँग्रेसमेन' या गटाचे सदस्य बनले.

१९३९ मध्येच दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर धोरणात्मक मतभेदांमुळे या गटाच्या काही सदस्यांना काँग्रेसमधून काढून टाकले गेले. या मंडळींनी मग १९४० च्या अखेरीस मूलगामी लोकशाहीवादी पक्ष ('रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी') हा नवीन पक्ष स्थापन केला. तारकुंडे यांनी काँग्रेस सोडली आणि ते या नव्या पक्षात गेले. १९४२ मध्ये त्यांनी वकिली सोडली आणि ते या पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. १९४४ मध्ये त्यांची पक्षाचे सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली. ते दिल्लीला गेले आणि १९४८ पर्यंत तेथे होते. १९४६ मध्ये एम. एन. रॉय यांनी 'इंडियन रिनेसन्सि इन्स्टिटय़ूट' या संस्थेची स्थापना केली. तारकुंडे या संस्थेच्या संस्थापक-विश्वस्तांपैकी एक होते.

१९४८ च्या आसपास रॉय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नवमानवतावादाची सैद्धान्तिक मांडणी केली. यालाच नंतर मूलगामी मानवतावाद असे नाव मिळाले. राजकीय पक्ष आणि संसदीय लोकशाही या दोन्ही गोष्टी लोकांचे प्रश्न सोडविण्यास असमर्थ आहेत, आणि साम्यवादाचा ऱ्हास होऊन त्याची जागा एकाधिकारशाहीने घेतली आहे, या मूलगामी मानवतावादाच्या दोन प्रमुख धारणा किंवा सिद्धान्त होत. रॉय यांनी आपल्या नव्या तत्त्वज्ञानाची मांडणी बावीस सूत्रांमध्ये ('ट्वेन्टी-टू थीसीज्') केली. त्यांचे सविस्तर विवेचन तारकुंडे यांनी १९८३ मध्ये लिहिलेल्या 'रॅडिकल ह्युमॅनिझम : द फिलॉसॉफी ऑफ फ्रीडम ॲन्ड डेमोक्रसी' या आपल्या पुस्तकात केले आहे. तारकुंडे यांनी पुस्तक असे हे एकच लिहिले. त्यांचे बाकी सर्व लिखाण लेख, निबंध आणि अग्रलेखांच्या स्वरूपात आहे.

१९४८ मध्येच रॉय यांनी मूलगामी लोकशाहीवादी पक्ष अधिकृतपणे विसर्जित केला. याची काहीशी पूर्वकल्पना तारकुंडे यांना असावी, कारण ते त्या आधीच, म्हणजे जून १९४८ मध्ये मुंबईला आले आणि त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिली सुरू केली. थोड्याच काळात वकिलीत त्यांचा जम बसला. १९५७ मध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १५ सप्टेंबर १९६९ रोजी ते मुदतीपूर्वीच राजीनामा देऊन निवृत्त झाले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचे न्यायाधीश म्हणून ते ओळखले जातात. त्यांनी न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही विभागांत यशस्वीपणे काम पाहिले. त्यांच्यासमोर युक्तिवाद करणे हे वकिलांना एक बौद्धिक आव्हान वाटे. करड्या शिस्तीचे आणि स्पष्टवक्ते न्यायाधीश म्हणून त्यांची ख्याती होती. आपल्या एका तपाच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. सोफी केली खटला, जेठवानी खटला आणि ठाकरसी खटल्यातील त्यांचे निर्णय विशेष उल्लेखनीय म्हणता येतील.

न्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यावर न्या. तारकुंडे मुंबईहून पुन्हा दिल्लीला गेले आणि त्यांनी सर्वोच्च न्यायालयात (आणि क्वचित दिल्ली उच्च न्यायालयात) वकिली सुरू केली. वकिलीच्या या 'दुसऱ्या डावा'तही त्यांनी एक श्रेष्ठ वकील म्हणून लौकिक मिळविला. परंतु या काळात त्यांचे खरे नाव झाले ते मूलगामी मानवतावादाचे रॉय यांच्यानंतरचे थोर तत्त्वज्ञ आणि एकाधिकारशाही विरुद्ध आणि लोकांच्या मानवी हक्कांसाठी सातत्याने लढा देणारे एक खंदे कार्यकर्ते म्हणून. १९७० मध्ये 'इंडियन रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन' स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. या संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. १९८४ पर्यंत त्यांनी हे पद सांभाळले. १९७० ते १९९३ पर्यंत ते 'इंडियन

त

रेनेसान्स इन्स्टिटट्यूट' या संस्थेचेही अध्यक्ष होते. नंतर १९७४ मध्ये 'सिटिझन्स फॉर डेमॉक्रसी' (सी. एफ. डी.) आणि १९७६ मध्ये आणीबाणी लागू असताना 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज्' (पी. यू. सी. एल.) या दोन संघटना जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने स्थापन झाल्या; त्यांचे अध्यक्षपदही न्या. तारकुंडे यांच्याकडे चालत आले. सी. एफ. डी.ने बोहरा समाजाच्या धर्मगुरुंविरुद्धच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीचे ते सदस्य होते. १९७८ मध्ये जयप्रकाशांनी न्या. तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक सुधारणा समिती नेमली; या समितीने निवडणूक सुधारणांवर अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला.

त

१९८० नंतरच्या दोन दशकांदरम्यान 'जनहित याचिका' या संकल्पनेचा उदय आणि विकास होऊन भारतीय न्यायव्यवस्थेचा तो एक अविभाज्य घटक बनला. वेगवेगळ्या क्षेत्रांत अनेक बिनसरकारी संघटना (नॉन-गव्हर्नमेंटल ऑर्गनायझेशन किंवा एन. जी. ओ.) कार्य करू लागल्या.

अशा एन. जी. ओ. आणि पी. यू. सी. एल. यांच्या वतीने न्या. तारकुंडे यांनी अनेक विषयांवरील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात आणि उच्च न्यायालयांत लढविल्या. दिल्लीतील १९८४ च्या शीखविरोधी दंगलीनंतर भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. सिक्री आणि न्या. तारकुंडे यांच्या समितीने दिल्लीच्या अनेक भागांत फिरून 'नागरिक चौकशी' केली. अशीच चौकशी न्या. तारकुंडे यांनी पंजाबात आणि काश्मीर खोऱ्यातही केली. १९९० मध्ये अलीगढमध्ये दंगल झाली; त्या घटनेचीही न्या. तारकुंडे यांनी पी. यू. सी. एल. च्या अन्य सदस्यांबरोबर चौकशी केली.

१९३७ मध्ये एम. एन. रॉय यांनी 'इन्डिपेन्डन्ट इंडिया वीकली' हे साप्ताहिक कोलकात्यात सुरू केले होते. त्याचे नंतर 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट' असे नामांतर झाले. न्या. तारकुंडे त्यात सुरुवातीपासूनच लिहीत असत. १९७० मध्ये 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट'चे कलकत्त्याहून दिल्लीला स्थलांतर झाले आणि त्याचे मासिकात रूपांतरही झाले. त्याच वेळी न्या. तारकुंडे त्याचे संपादक झाले.

जवळजवळ एकोणतीस वर्षे, म्हणजे त्यांच्या वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत त्यांनी ही धुरा समर्थपणे व यशस्वीरीत्या सांभाळली. या मासिकातून त्यांनी विविध विषयांवर विस्तृत आणि मूलगामी लेखन नियमितपणे केले. त्यांतील निवडक लेखांचा संग्रह 'थ्रू ह्युमॅनिस्ट आईज्' १९९४ मध्ये प्रसिद्ध झाला. १९९७ मध्ये न्या. तारकुंडे वकिलीच्या व्यवसायातून निवृत्त झाले, परंतु त्यांचे लेखन आणि इतर विविध स्वरूपाचे कार्य शेवटपर्यंत चालूच होते.

न्या. तारकुंडे यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. १९७८ मध्ये 'इंटरनॅशनल ह्युमॅनिस्ट ॲन्ड एथिकल युनियन' या संस्थेने त्यांना 'इंटरनॅशनल ह्युमॅनिस्ट ॲवॉर्ड' देऊन त्यांचा गौरव केला.

१९८४ मध्ये अमेरिकेतील 'अकॅडमी ऑफ ह्युमॅनिझम' या संस्थेने त्यांना 'ह्युमॅनिस्ट लॉरिएट' हा किताब किंवा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९९८ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार दिला.


१९९९ मध्ये न्या. तारकुंडे यांच्या नव्वदाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'व्ही. एम. तारकुंडे ९० : अ रेस्टलेस क्रुसेडर फॉर ह्युमन फ्रीडमस्' हा गौरवग्रंथ प्रकाशित झाला. त्याच्या पहिल्या भागात देशभरातील अनेक नामवंत मंडळींचे न्या. तारकुंडे यांचा गुणगौरव करणारे लेख समाविष्ट आहेत, तर दुसऱ्या भागात न्या. तारकुंडे यांचे विविध महत्त्वाच्या विषयांवरील निवडक लेख आहेत.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. राणे, एस.ए.; संपा., 'व्ही.एम.तारकुंडे ९० : अ रेस्टलेस क्रुसेडर फॉर ह्यूमन फ्रीडम्स'; इंडियन रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन, मुंबई शाखा, १९९९.*

## तुळजापूरकर, विद्यारण्य दत्तात्रेय
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**९ मार्च १९२१ – १ ऑक्टोबर २००४**



विद्यारण्य दत्तात्रेय तुळजापूरकर यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे घराणे मूळचे मराठवाड्यातले. त्यांचे वडील दत्तात्रेय (दत्तो) आप्पाजी तुळजापूरकर आधी हैदराबाद संस्थानात आणि नंतर मुंबई उच्च न्यायालयात वकील होते. 'माझे रामायण' ही प्रदीर्घ आणि संस्थानी राजवटीच्या काळाचे चित्रण करणारी कादंबरी त्यांनी लिहिली होती. संस्थानातून त्यांना हद्दपार करण्याची कारवाई सुरू झाल्यानंतर ते मुंबईत आले. विद्यारण्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये, महाविद्यालयीन शिक्षण विल्सन आणि एल्फिन्स्टन महाविद्यालयांमध्ये आणि कायद्याचे शिक्षण गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये झाले. एलएल.बी. पदवी मिळविल्यानंतर १ डिसेंबर १९४३ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयात अ‍ॅडव्होकेट म्हणून काम करू लागले. त्याचबरोबर ते अ‍ॅटर्नी-अ‍ॅट-लॉ आणि सॉलिसिटरही होते. सुमारे १४ वर्षे त्यांनी उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही शाखांत दिवाणी आणि फौजदारी दोन्ही प्रकारांचे खटले लढविले.

जुलै १९५६ मध्ये तुळजापूरकर यांची बृहन्मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. एप्रिल १९६२ मध्ये ते त्या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले. डिसेंबर १९६३ मध्ये त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून आणि नंतर सप्टेंबर १९६६ मध्ये कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. सप्टेंबर-ऑक्टोबर १९७३ मध्ये आणि पुन्हा डिसेंबर १९७६ ते एप्रिल १९७७ पर्यंत त्यांनी उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. ३० सप्टेंबर १९७७ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ८ मार्च १९८६ रोजी ते त्या पदावरून निवृत्त झाले.

जून १९७५ ते जानेवारी १९७७ या १९ महिन्यांच्या आणीबाणीच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याची अनेक प्रकारे पायमल्ली झाली. हजारो लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. वृत्तपत्रांवर 'सेन्सॉरशिप' लादण्यात आली. सभा घेण्यास बंदी करण्यात आली. मुंबईत वकिलांच्या एका सभेवर बंदी घालण्यात आली, तर पुण्याच्या 'साधना' साप्ताहिकाचे अकरा अंक जप्त करण्यात येऊन 'साधना' मुद्रणालय बंद करण्यात आले. या दडपशाहीविरुद्ध दाद मागण्यासाठी अनुक्रमे मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एन.पी. नाथवानी आणि साधना साप्ताहिक यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल केले. यापैकी पहिला खटला सरन्यायाधीश कांटावाला आणि न्या. तुळजापूरकर यांच्यासमोर चालला, तर दुसरा न्या. तुळजापूरकर आणि न्या. गाडगीळ यांच्यासमोर. या दोन्ही प्रकरणांत न्यायालयाने अर्जदारांच्या बाजूने आणि सरकारच्या विरुद्ध निर्णय दिले. पहिल्यात दोन स्वतंत्र निकालपत्रे होती, तर दुसऱ्यामध्ये एकमताचे निकालपत्र न्या. तुळजापूरकरांचे होते. या दोन खटल्यांमधील निकालांमुळे न्या. तुळजापूरकर यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

न्या. तुळजापूरकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा बॉम्बे लॉ रिपोर्टरने 'द गार्डियन ऑफ सिव्हिल लिबर्टी ऑफ द सिटिझन्स ऑफ इंडिया' या शब्दात त्यांचे वर्णन केले आणि 'तुळजापूरकर विल रेज द प्रेस्टीज अ‍ॅण्ड डिग्निटी ऑफ द सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया. ही विल बी इट्स् सोर्स ऑफ लाइट' या शब्दांत त्यांचा गौरव केला. सर्वोच्च न्यायालयातील आपल्या साडेआठ वर्षांच्या कारकिर्दीत न्या. तुळजापूरकर यांनी हा गौरव पूर्णपणे सार्थ ठरविला. अत्यंत तत्त्वनिष्ठ, नि:स्पृह आणि शिस्तप्रिय न्यायाधीश म्हणून न्या. तुळजापूरकर यांचा

त

लौकिक होता. त्यांची तत्त्वनिष्ठा व निर्भीडपणा केवळ निकालपत्रांपुरती नसे. १६ जानेवारी १९७७ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश असताना नागपूर येथे जिल्हा न्यायालयाच्या नव्या इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ‘आवर ज्युडिशिअल सिस्टिम’ या विषयावर त्यांनी केलेले विचारपरिप्लुत भाषण त्यांच्या निकालपत्रांइतकेच निर्भीड आणि स्पष्टोक्तिपूर्ण होते. सर्वोच्च न्यायालयामधून निवृत्त झाल्यावर न्या. तुळजापूरकर यांनी कोणतेही सरकारी पद किंवा काम स्वीकारले नाही.

भारतीय न्यायपालिकेच्या इतिहासातील एक सचोटीचे व निर्भीड न्यायाधीश म्हणून न्या. तुळजापूरकर यांचे नाव कायम घेतले जाईल, याबद्दल संशय नाही.

त

– शरच्चंद्र पानसे

## तेंडोलकर, शामराव रघुनाथ
### मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश
### २१ ऑक्टोबर १८९९ – २७ मार्च १९५८



शामराव रघुनाथ तेंडोलकर यांचा जन्म कोल्हापूरला झाला. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला तर उच्च शिक्षण अगोदर कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात व पुढे मुंबईत एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. बी. ए. पर्यंत त्यांना अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळाल्या. एल्फिन्स्टन महाविद्यालयामधून बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर लगेच ते इंग्लंडला गेले.

इंग्लंडमध्ये त्यांनी १९२३ मध्ये बेलफास्टच्या क्वीन्स विद्यापीठातून एलएल. बी. ची पदवी प्राप्त केली आणि त्याचबरोबर ते ग्रेज इन्‌मधून बॅरिस्टर झाले. स्वदेशी परतल्यावर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली सुरू केली. प्रथम काही काळ त्यांनी सर जमशेदजी कांगा यांच्या हाताखाली काम केले. १९३८ ते १९४१ पर्यंत ते शासकीय विधि महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापक होते. त्यांना मैदानी खेळांची, विशेषत: क्रिकेटची अतिशय आवड होती. अनेक वर्षे ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होते. १९४७ ते १९५४ पर्यंत ते रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबचे ‘स्टयुअर्ड’ होते.

वीस वर्षांहून अधिक काळ ते मूळ शाखेतील यशस्वी वकील म्हणून ओळखले जात. २ जुलै १९४६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. न्यायाधीशपदावरून त्यांनी नागरिकांच्या हक्कांचे हितरक्षण कसोशीने केले. सरन्यायाधीश छागला व न्या. तेंडोलकर यांच्या खंडपीठाने सलग दहा वर्षे आयकर कायद्याखालील खटल्यांत महत्त्वाचे निर्णय दिले. त्यांचे हे खंडपीठ आयकर पीठ म्हणूनच ओळखले जाई.

डालमिया गटाच्या कंपन्यांच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने नेमलेल्या चौकशी आयोगाच्या अध्यक्षपदी न्या. तेंडोलकरांची नेमणूक झाली. पण पुढे त्यांनी आयोगाचा राजीनामा दिला.

न्यायाधीशपदावर असतानाच न्या. तेंडोलकर यांचे आकस्मिक निधन झाले. त्याच्या काही दिवस आधीच मुंबई टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९५८.*

## तेलंग, काशिनाथ त्रिंबक
### मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश
### १८५० – १८९२

काशिनाथ त्रिंबक तेलंग यांचा जन्म मुंबईला झाला. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. शाळेमध्ये त्यांना उत्तम



शिक्षकांकडून इंग्रजी, विद्वान पारंपरिक पंडितांकडून संस्कृत आणि मामा परमानंदांकडून गणित शिकण्याची संधी मिळाली. १८६४ मध्ये तेलंग मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर १८६७ मध्ये त्यांनी बी. ए. ही पदवी प्राप्त केली, तर १८६९ मध्ये एम. ए. आणि एलएल. बी. या पदव्या एकदम मिळविल्या. १८७२ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेची ॲडव्होकेटची परीक्षा दिली. ती उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी मूळ शाखेत वकिलीस सुरुवात केली. लहानपणापासूनच तेलंगांनी संस्कृत, मराठी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांत भरपूर वाचन केलेले असल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व व्युत्पन्न बनले होते. इंग्रजीवर त्यांचे अनन्यसाधारण प्रभुत्व होते; त्यामुळे त्यांच्या इंग्रज सहकाऱ्यांनाही त्यांच्याबद्दल आदर वाटत असे. मॅक्फर्सन, फॅरन आणि इन्वरॅरिटी यांचा दबदबा असतानाही तेलंगांनी पाच वर्षांतच स्वत:चे स्थान निर्माण केले. त्यांच्या संस्कृत व्यासंगामुळे हिंदू कायदा त्यांनी सहजगत्या आत्मसात केला होता. संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांवरील प्रभुत्वाचा तेलंगांना वकील म्हणून त्याचप्रमाणे नंतर न्यायाधीश म्हणून फार उपयोग झाला.

१९५५ आणि १९५६ मध्ये संसदेने संमत केलेल्या ‘हिंदू कोड’ च्या चार कायद्यांमुळे आणि त्यानंतरच्या पंचावन्न वर्षांत सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी दिलेल्या निकालांमुळे हिंदू कायदा आता निश्चित आणि स्थिर झाला आहे. परंतु एकोणिसाव्या शतकातली परिस्थिती वेगळी होती. हिंदू कायदा त्यावेळी प्राचीन काळातल्या स्मृतींपासून अगदी सोळाव्या-सतराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या टीका आणि भाष्यांपर्यंत विविध संहितांमध्ये विखुरलेला होता. त्यात अनेक पंथ आणि उपपंथ होते. त्यामुळे देशाच्या विविध भागात या कायद्याची वेगवेगळी तत्त्वे अमलात होती. त्यामुळे उच्च न्यायालयासमोर जेव्हा एखादा कौटुंबिक किंवा वैयक्तिक स्वरूपाचा तंटा निवाड्यासाठी येई, तेव्हा संस्कृत जाणणाऱ्या आणि प्राचीन संहिता व भाष्यांचा अर्थ लावू शकणाऱ्या वकिलांची आणि न्यायाधीशांची आवश्यकता भासे. योगायोगाने तेलंग या काळातच वकिली करू लागल्याने मुंबई उच्च न्यायालयाला या क्षेत्रातला जाणकार सहायकच जणू उपलब्ध झाला.

तेलंगांचा दृष्टिकोन अत्यंत समतोल, प्राचीन संहितांतील शब्दांचा किंवा तत्त्वांचा सांप्रत काळातील गरजांना अनुरूप अर्थ लावण्याचा असे. ते न्यायालयाची दिशाभूल कधी करत नसत. त्यामुळे सर्व न्यायाधीश त्यांच्या युक्तिवादाला मान देत. त्यांना ‘हिंदू कायद्याचा चालता-बोलता ज्ञानकोश’ असे म्हटले जाई. एखाद्या खटल्यात तेलंग दोन्ही बाजूंपैकी कोणाचेही वकील नसले, तरी त्यांचे मत विचारण्यासाठी किंवा त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांना न्यायालयात बोलाविले जाई. तेलंगांच्या वकिलीच्या काळात मुंबई उच्च न्यायालयासमोर आलेले दोन अत्यंत महत्त्वाचे खटले म्हणजे लल्लुभाई बापुभाई विरुद्ध मानकुवरबाई आणि दादाजी विरुद्ध रखमाबाई हे होत. यातील पहिल्या खटल्यातील वादाचा मुद्दा हा संहिता आणि स्थानिक रूढी यांच्यात भिन्नता असेल तर प्राधान्य कोणाला द्यावे, हा होता. यात तेलंगांचे मत रूढीच्या बाजूने पडले आणि ते तीन न्यायाधीशांच्या पूर्णपीठाने मान्य केले. रखमाबाई खटल्यातील वादाचा मुद्दा लहानपणी लग्न झालेल्या मुलीला, ती वयात आल्यानंतर तिच्या इच्छेविरुद्ध नवऱ्याबरोबर राहण्यास भाग पाडता येईल काय, असा होता. हा खटला बराच काळ चालला; त्यात प्रारंभी तेलंगांनी रखमाबाईंची बाजू मांडली होती.

१८८९ मध्ये न्या. नानाभाई हरिदास यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर तेलंग यांची उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

त्यावेळी त्यांचे वय जेमतेम अडतीस-एकोणचाळीस वर्षांचे होते. परंतु ते जेमतेम चार वर्षेच न्यायाधीश राहिले. त्यांच्या न्यायाधीशपदावरील कारकिर्दीत उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठासमोर आलेला सर्वांत महत्त्वाचा खटला म्हणजे आप्पाजी नरहर कुलकर्णी विरुद्ध रामचंद्र रावजी कुलकर्णी हा होय. एखाद्या एकत्र कुटुंबात आजोबा - बाप - मुलगा अशा तीन पिढ्या हयात असतील तर तिसऱ्याला, म्हणजे नातवाला पहिल्याकडून (म्हणजे आजोबाकडून) वाटणी मागता येते का, असा प्रश्न या खटल्यात न्यायालयासमोर आला. यावर न्या. तेलंगांचे उत्तर होकारार्थी होते, पण ते अल्पमतात होते. परंतु नंतरच्या काळात अनेक उच्च न्यायालयांनी न्या. तेलंगांचे मत मान्य केले. कायदा व न्याय याव्यतिरिक्त समाजकारण, राजकारण, धर्मकारण आणि अर्थकारण या क्षेत्रांतही न्या. तेलंग यांनी सक्रिय सहभाग घेऊन भरीव कार्य केले. काँग्रेसच्या स्थापनेत न्या. तेलंगांचा सहभाग होता.

न्यायाधीश होण्याआधी वयाच्या छत्तिसाव्या वर्षी मुंबई विद्यापीठाचे पहिले भारतीय कुलगुरू आणि सर्वांत तरुण कुलगुरू होण्याचा मान त्यांना मिळाला. न्या. तेलंग आणि त्यांच्यानंतर न्या. रानडे आणि न्या. चंदावरकर या न्यायमूर्ती-त्रिमूर्तीने परस्परपूरक भूमिका निभावून महाराष्ट्राला उदारमतवादाचा वस्तुपाठ घालून दिला.

- शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. चपळगांवकर, न्या. नरेंद्र; 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ'; मौज प्रकाशन, २०१०.*

* * *

त

# द

## दफ्तरी, सी. के.

**भारताचे दुसरे ॲटर्नी-जनरल**

**जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



सी. के. दफ्तरी हे विसाव्या शतकातील श्रेष्ठ वकिलांपैकी एक होत. ते १९४६ ते १९५१ या काळात मुंबईचे ॲडव्होकेट-जनरल, १९५१ ते १९६३ या काळात भारताचे पहिले सॉलिसिटर-जनरल आणि १९६३ ते १९६८ या काळात भारताचे ॲटर्नी-जनरल होते.

ॲडव्होकेट-जनरल असताना दफ्तरी यांनी दिल्लीला गांधी खून खटल्यात, तसेच नंतर सिमला येथे पंजाब उच्च न्यायालयात चाललेल्या अपिलात सरकारपक्षाची बाजू मांडली.

अत्यंत चाणाक्ष, मिस्किल आणि हजरजबाबी म्हणून दफ्तरी यांची ख्याती होती.

– शरच्चंद्र पानसे

## देशपांडे, व्यंकट श्रीनिवास

**मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश**

**११ ऑगस्ट १९२०**

व्यंकट श्रीनिवास देशपांडे यांचा जन्म अंबाजोगाई येथे झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण शासकीय शाळांत झाल्यानंतर त्यांनी अंबाजोगाई येथे पुनर्जीवित झालेल्या योगेश्वरी नूतन विद्यालयात प्रवेश घेतला. ही राष्ट्रीय शाळा निजामी राजवटीतील भाषिक व सांस्कृतिक दडपशाहीविरुद्धच्या चळवळीचा एक



भाग म्हणून स्थापन झाली होती. शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर औरंगाबाद येथील शासकीय महाविद्यालयात त्यांनी इंटरपर्यंतचे शिक्षण घेतले. नंतर उस्मानिया विद्यापीठातून ते बी.ए.झाले. त्यानंतर काही दिवस त्यांनी अंबाजोगाई येथील आपले शिक्षण झालेल्या राष्ट्रीय शाळेत -योगेश्वरी नूतन विद्यालयात - शिक्षक म्हणून काम केले. १९४२ च्या चळवळीच्या वेळी निजाम सरकारने ‘या शाळेतील काही शिक्षकांना काढून टाकावे आणि संस्थानातील कोणत्याही शाळेत त्यांना नोकरी देऊ नये’ असा आदेश दिला. या शिक्षकांत व्यंकटराव देशपांड्यांचाही समावेश होता. त्यानंतर त्यांनी वकील होण्यासाठी पुढील शिक्षण सुरू केले.

उस्मानिया विद्यापीठातून एलएल.बी. पदवी मिळविल्यानंतर त्यांनी १९४४ मध्ये हैदराबाद येथे सिटी सिव्हिल कोर्टात वकिली सुरू केली. एप्रिल १९४७ मध्ये हैदराबाद उच्च न्यायालयात वकिली करण्याची परवानगी त्यांना मिळाली व तेथेही त्यांनी वकिली सुरू केली. सप्टेंबर १९४८ मध्ये हैदराबाद मुक्त झाल्यानंतर ऑक्टोबर १९५२ मध्ये ते हैदराबाद उच्च न्यायालयात ॲडव्होकेट झाले. १९५५ साली त्यांची सहायक सरकारी वकील म्हणून नेमणूक झाली. १९५६ साली राज्यपुनर्रचना होऊन हैदराबाद राज्यातील मराठीभाषिक विभाग मुंबई राज्यात समाविष्ट झाला. त्यामुळे इतर काही वकिलांबरोबर व्यंकटराव देशपांडेही हैदराबादहून मुंबईला

व्यवसायासाठी आले. मुंबई येथेही त्यांनी सहायक सरकारी वकील म्हणून काम केले.

११ जून १९६७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाली. वकिलांतून थेट या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नेमणूक होणारे ते मराठवाड्यातील पहिलेच वकील. ८ जानेवारी १९६८ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १९ नोव्हेंबर १९८० रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली, तर ७ जानेवारी १९८१ रोजी त्यांची या पदावर कायम नियुक्ती झाली. १० ऑगस्ट १९८२ रोजी ते सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाले.


राज्यपुनर्रचना होत असतानाच मराठवाड्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे वेगळे पीठ स्थापन व्हावे अशी तेथील जनतेची मागणी होती. परंतु ती दीर्घकाळ मान्य होऊ शकली नाही. असे पीठ स्थापन करण्यासाठी मुख्य न्यायाधीश आणि राज्य सरकार यांचे एकमत व्हावे लागते. तसा योग न आल्यामुळे ही मागणी प्रलंबित होती. व्यंकटराव देशपांडे मुख्य न्यायाधीश झाल्यावर त्यांनी असे पीठ औरंगाबाद येथे स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला व राज्य सरकारने अनुकूलता दर्शविल्यानंतर २७ ऑगस्ट १९८१ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पीठाची स्थापना झाली. हे पीठ स्थापन करण्यास मुंबईतील काही वकील व इतरांनी विरोध दर्शविला होता. परंतु कालांतराने मराठवाड्याच्या जनतेची मोठीच सोय या पीठाने झाली असे दिसले. एका दृष्टीने न्या. देशपांडे यांनी महाराष्ट्राच्या न्यायसंस्थेत आपल्या निर्णयाने इतिहास घडविला. हे पीठ स्थापन करण्याचा त्यांचा आदेश कायदेशीर असल्याचा निर्वाळा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने पुढे दिला.

सेवानिवृत्तीनंतर रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांची निवड करणाऱ्या समितीचे अध्यक्ष म्हणून तसेच आजारी कापडगिरण्यांच्या पुनरुज्जीवनासाठी असलेल्या त्रिपक्षीय समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. जून १९८४ मध्ये महाराष्ट्राचे लोकायुक्त म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पाच वर्षे हे काम केल्यानंतर ते निवृत्त झाले. सध्या त्यांचे वास्तव्य पुणे येथे आहे.

– न्या. नरेंद्र चपळगावकर

द

## देशमुख, बाळकृष्ण नरहर
**मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश**
**१९ नोव्हेंबर १९१८ – २४ जानेवारी २००८**



बाळकृष्ण नरहर देशमुख यांचा जन्म अहमदनगर येथे झाला. त्यांचे वडील रावबहादूर नरहर देशमुख अहमदनगर येथे ज्येष्ठ वकील होते. बाळकृष्णांचे शालेय शिक्षण अहमदनगर येथे म्युनिसिपल स्कूलमध्ये आणि ए. ई. सोसायटीच्या शाळेत, तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात आणि कायद्याचे शिक्षण पुण्याच्या आजच्या आय. एल. एस. विधि महाविद्यालयात झाले. फर्गसनमधून बी.ए. व एम.ए. आणि विधि महाविद्यालयामधून एलएल. बी. या पदव्या संपादन केल्यानंतर ५ ऑगस्ट १९४१ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून रुजू झाले. त्यानंतर चौदा वर्षे अहमदनगरच्या जिल्हा न्यायालयात त्यांनी दिवाणी आणि फौजदारी, मूळ आणि अपील असे सर्व प्रकारचे खटले यशस्वीरीत्या लढविले.

१२ एप्रिल १९५५ रोजी देशमुख यांची नियुक्ती सहायक न्यायाधीश म्हणून झाली. १९६५ पर्यंत त्यांनी विविध ठिकाणी संयुक्त न्यायाधीश आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून काम केले. काही काळ ते मुंबई शहर दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीशही होते.

७ जून १९६५ रोजी देशमुख यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ६ जून १९६७ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. ६ ऑक्टोबर १९७८ रोजी उच्च

न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १८ नोव्हेंबर १९८० रोजी ते निवृत्त झाले.

उच्च न्यायालयातील न्या. देशमुख यांच्या पंधरा वर्षांच्या कारकीर्दीत त्यांच्यासमोर अनेक महत्त्वाचे खटले आले आणि त्यांत त्यांनी महत्त्वाचे निर्णय दिले. यामध्ये घटनेच्या कलम २२६ च्या व्याप्तीसंबंधी तसेच दिवाणी प्रकिया संहिता ('सिव्हिल प्रोसिजर कोड') आणि औद्योगिक विवाद कायदा ('इंडस्ट्रियल डिस्प्यूटस् अ‍ॅक्ट') यासंबंधी काही प्रश्न समाविष्ट होते. हिंदू वारसाहक्क कायदा (हिंदू सक्सेशन अ‍ॅक्ट), जमीन अधिग्रहण कायदा (लँड अ‍ॅक्विझिशन अ‍ॅक्ट) आणि महाराष्ट्र शेत जमिनी (धारणा-मर्यादा) कायदा (महाराष्ट्र अ‍ॅग्रिकल्चरल लँड्स् - सीलिंग ऑन होल्डिंग्ज् - अ‍ॅक्ट) कायद्यांतील काही तरतुदींचा अर्थ लावण्यासाठी न्या. देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठापुढे सुनावणी झाली आणि त्यांत न्या. देशमुख यांनी निर्णय दिले. सुंदर नवलकर खटल्याचाही येथे उल्लेख करता येईल. महाराष्ट्र मोकळ्या जमिनी कायद्याच्या ('महाराष्ट्र व्हेकंट लँडस् अ‍ॅक्ट') घटनात्मक वैधतेचा प्रश्नही एका खटल्यात त्यांच्यासमोर आला होता.

निवृत्तीनंतर न्या. देशमुख यांनी कायदा-शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष रस घेतला. पुण्याचे आय. एल. एस. विधि महाविद्यालय आणि स. प. महाविद्यालय यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध होता.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, २००८.*

## देसाई, अशोक हरिभाई

**भारताचे अ‍ॅटर्नी जनरल**

**१८ डिसेंबर १९३२**

अशोक हरिभाई देसाई यांचा जन्म गुजरातमध्ये वडोदरा येथे झाला. त्यांचे उच्च शिक्षण मुंबई आणि लंडनला झाले. मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजातून



त्यांनी १९५२ साली एलएल.बी. पदवी प्राप्त केली. नंतर १९५६ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रातील बी.एस्सी. पदवी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मधून संपादन केली. त्याच वर्षी ते लिंकन्स इनमधून बॅरिस्टर झाले. १९६२ ते १९६४ या काळात ते मुंबईला कायद्याचे प्राध्यापक होते, तर १९६७ ते १९७२ दरम्यान त्यांनी मुंबईच्या बॉम्बे कॉलेज ऑफ जरनॅलिझममध्ये कायद्याचे अध्यापन केले. डिसेंबर १९८९ ते डिसेंबर १९९० या काळात न्या. देसाई भारताचे सॉलिसिटर-जनरल होते व जुलै १९९६ ते मार्च-एप्रिल १९९८ या काळात अ‍ॅटर्नी-जनरल होते.

अगोदर ज्येष्ठ अ‍ॅडव्होकेट आणि नंतर अ‍ॅटर्नी-जनरल या नात्यांनी देसाईंचा अनेक गाजलेल्या खटल्यांशी संबध आला. यांतील काही खटले घटनात्मक आणि प्रशासकीय कायद्याशी निगडित होते. मुंबई उच्च न्यायालयात झालेला विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या 'सखाराम बाइंडर' या नाटकासंबंधीचा सेन्सॉरशिपच्या मुद्द्यावरील खटला, बॅकबे रेक्लमेशनसंबंधीचा खटला, अंतुले खटला, हे त्यांपैकी विशेष उल्लेखनीय खटले म्हणता येतील.

सर्वोच्च न्यायालयातही देसाई यांनी अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये युक्तिवाद केले. रामण्णा शेट्टी खटला, नरसिंह राव खटला, विनीत नारायण खटला हे त्यांपैकी उल्लेखनीय खटले म्हणता येतील.

बेलग्रेड येथे १९८० मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय कायदा परिषदेला आणि बर्लिन येथील इंटरनॅशनल बार असोसिएशनच्या बैठकीला देसाई प्रतिनिधी म्हणून गेले होते. मुंबई बार असोसिएशन आणि सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनशी देसाई यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्याचप्रमाणे 'इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन राईटस्', 'इंडस्ट्रियल लॉ इन्स्टिट्यूट', 'इंटरनॅशनल लॉ

असोसिएशन' यांच्याशीही त्यांचा संबंध आहे. १९८६ ते १९९० पर्यंत ते 'इंटरनॅशनल बार असोसिएशन'च्या 'कमिटी ऑन इंटरनॅशनल लॉ'चे अध्यक्ष होते. झांबियातील लुसाका येथे १९९० मध्ये झालेल्या 'कॉमनवेल्थ वर्कशॉप ऑन अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ' या कार्यशाळेचे ते सल्लागार होते. १९९७ मध्ये जिनिव्हा येथील संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार समितीला भारताचा याविषयीचा अहवाल त्यांनी सादर केला होता.

१९९८ मध्ये व्हिएन्ना येथे 'मनी लाँडरिंग' संबंधीच्या संयुक्त राष्ट्र समितीच्या बैठकीसाठी गेलेल्या भारताच्या प्रतिनिधीमंडळाचे अशोक देसाई नेते होते. (बेकायदेशीर रीतीने मिळविलेला पैसा बहुधा परदेशात पाठवून मग तो कायदेशीर वाटेल अशा मार्गांनी परत स्वदेशात आणण्याला 'मनी लाँडरिंग' म्हणतात.)

सुरुवातीच्या काळात अशोक देसाई 'टाइम्स ऑफ इंडिया' या दैनिकाचे कायदेविषयक वार्ताहर होते. त्यांनी कायद्याविषयी पुष्कळ लेखन केले आहे. त्यांचे प्रकाशित झालेले लेखन पुढीलप्रमाणे आहे. 'सेन्सॉरशिप' व 'सखाराम बाइंडर'(१९७४) 'डेमोक्रसी, ह्युमन राईटस् अँड द रूल ऑफ लॉ' (२०००); २००० मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध झालेल्या 'फायनल बट नॉट इन्फॉलिएबल' या ग्रंथात देसाई यांनी एक प्रकरण लिहिले. त्याचप्रमाणे 'इव्होकिंग मिस्टर सीरवाई' (२००५) आणि 'बॉम्बे हायकोर्ट' या ग्रथांतही त्यांनी प्रकरणे लिहिली. याशिवाय त्यांनी दोन महत्त्वाची व्याख्याने दिली : 'प्रेम भाटिया लेक्चर ऑन द डेंजर्स टू आवर डेमोक्रसी', 'अ‍ॅनी बेझंट लेक्चर ऑन सेक्युलरिझम.'

अशोक देसाई यांना 'पद्मभूषण' आणि 'लॉ ल्युमिनरी अ‍ॅवॉर्ड' हे पुरस्कार मिळाले आहेत. शिवाय ते 'इन्स ऑफ कोर्ट (इंडिया) सोसायटी'चे अध्यक्ष आहेत. अशोक देसाई यांचे वास्तव्य दिल्ली येथे आहे.

– अ. ना. ठाकूर

## देसाई, कपिल कल्याणदास
### मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश
### २७ ऑक्टोबर १९१०



कपिल कल्याणदास देसाई यांचा जन्म मुंबईत एका समाजसुधारकाच्या कुटुंबात झाला. त्यांचे वडील डॉ. कल्याणदास देसाई आर्यसमाजी होते. त्यांनीच स्थापन केलेल्या गुजरातमधील शुक्लतीर्थ येथील 'गुरुकुल रेसिडेन्शियल स्कूल' या निवासी शाळेत कपिल यांचे शालेय शिक्षण झाले. १९२८ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले. या महाविद्यालयातून त्यांनी १९३२ साली पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी मुंबई येथील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण घेतले. तेथे 'हिंदू कायदा' या विषयात त्यांना प्रथम क्रमांक मिळाला आणि जे पारितोषिक मिळवावे अशी तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याची महत्त्वाकांक्षा असे ते जज् स्पेन्सर पारितोषिक त्यांना मिळाले. तसेच सर आर्नॉल्ड स्कॉलरशिप ही मानाची शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली. त्यांनी आपली कायद्याची पदवी १९३४ मध्ये मिळविली. नंतर जानेवारी १९३८ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली सुरू केली. प्रारंभी कन्हैयालाल मुन्शी आणि नंतर पुरुषोत्तम त्रिकमदास यांच्या हाताखाली त्यांनी काम केले. थोड्याच काळात ते एक यशस्वी वकील म्हणून ओळखले जाऊ लागले.

१८ एप्रिल १९५८ रोजी देसाई यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून आणि १२ डिसेंबर १९५९ रोजी कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. मुख्य न्यायाधीश एस. पी. कोतवाल यांच्यानंतर न्या. देसाई २७ सप्टेंबर १९७२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले.

२६ ऑक्टोबर १९७२ रोजी ते या पदावरून निवृत्त झाले. मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांची कारकीर्द अल्प असली, तरी मुंबई उच्च न्यायालयातील त्यांची एकूण कारकीर्द साडेचौदा वर्षांची होती. या काळात त्यांनी केलेल्या कामावरून कायद्याच्या मूलतत्त्वांवरील आणि व्यावहारिक गोष्टींवरील त्यांची पकड, दोन्ही बाजूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन त्वरित निकाल देण्यातले त्यांचे कौशल्य, त्याचप्रमाणे त्यांचा सभ्यपणा व शालीनता या गोष्टींचा प्रत्यय येत असे.

– अ. ना. ठाकूर

## देसाई, कांतिलाल ठाकोरदास

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, गुजरात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश**

**२३ मे १९०३ – जानेवारी १९७७**



कांतिलाल ठाकोरदास उर्फ के. टी. देसाई यांचा जन्म सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे सर्व शिक्षण मुंबई येथे झाले. १९२४ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापाठाची पदवी संपादन केली. नंतर १९२६ मध्ये त्यांनी एलएल.बी पदवी संपादन केली. त्यानंतर १९२८ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाची ॲटर्नीची परीक्षा आणि १९३० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेच्या ॲडव्होकेटची परीक्षा दिली. पुढे १९३० मध्येच त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत ॲडव्होकेट म्हणून वकिली सुरू केली. त्यांची मुद्देसूद दावा मांडण्याची पद्धत आणि कायद्याच्या बारकाव्यांवरील त्यांचे प्रभुत्व यांमुळे एक उत्तम वकील म्हणून त्यांचा अल्पावधीत नावलौकिक झाला. व्यापारविषयक कायद्यावर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. तथापि आपल्या वकिलीच्या काळात त्यांनी विविध क्षेत्रांतले आणि विविध कायद्यांखालील खटले यशस्वीरीत्या लढवले.

१९५७ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून देसाई यांची नियुक्ती झाली. आपल्या ऋजु स्वभावाने, कायद्यावरील प्रभुत्वाने आणि निष्पक्ष न्यायदानामुळे त्यांनी लवकरच वकीलवर्गाचा विश्वास संपादन केला.

नानावटी प्रकरणातील फौजदारी खटल्याचा निकाल लागल्यानंतर निर्माण झालेला गुंतागुंतीचा घटनात्मक प्रश्न उच्च न्यायालयाच्या ज्या पाच न्यायाधीशांच्या विशेष पूर्णपीठासमोर आला, त्याचे न्या. देसाई एक सदस्य होते. या पीठाचा एकमताचा निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा निकाल मानला जातो.

मे १९६० मध्ये मुंबई राज्याचे विभाजन होऊन गुजरात राज्य अस्तित्वात आले, तेव्हा न्या. के. टी. देसाई यांची गुजरात उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून बदली झाली. परंतु त्याचबरोबर केंद्र सरकारने त्यांची एक-सदस्य राष्ट्रीय बँक न्यायाधिकरणाचे (नॅशनल बँक ट्रायब्यूनल) अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. हे न्यायाधिकरण बँक कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी स्थापन करण्यात आले होते. या पदावर असताना त्यांनी बँकिंगचा सखोल अभ्यास केला आणि बँक कर्मचारी व बँक व्यवस्थापन या दोघांचीही बाजू ऐकून निष्पक्षपणे आपला निवाडा दिला. बँकिंग क्षेत्रात प्रसिद्ध असलेला 'देसाई निवाडा' (देसाई ॲवॉर्ड) तो हाच होय.

यानंतर लगेचच म्हणजे जानेवारी १९६१ मध्ये न्या. देसाई यांची गुजरात उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली. यशस्वी कारकीर्दीनंतर २२ मे १९६३ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. न्या. देसाई काही काळ प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष होते आणि सात वर्षे बेनेट कोलमन अँड कंपनीचे उच्च न्यायालय-नियुक्त अध्यक्ष होते. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचेही ते काही काळ अध्यक्ष होते.

नंतरच्या काळात मुंबई व केरळ उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश झालेल्या न्या. सुजाता मनोहर या न्या. देसाई यांच्या कन्या होत.

– डॉ. सु. र. देशपांडे

## देसाई, भुलाभाई जीवनजी

**प्रसिद्ध वकील, काँग्रेसचे नेते**

**१३ ऑक्टोबर १८७७ – ६ मे १९४६**



भुलाभाई जीवनजी देसाई यांचा जन्म गुजरातमध्ये बलसाड येथे झाला. त्यांचे वडील जीवनजी तेथे सरकारी वकील होते. भुलाभाईंचे सुरुवातीचे शालेय शिक्षण बलसाडच्या आवाबाई स्कूलमध्ये झाले. मुंबईच्या भर्दा हायस्कूलमधून १८९५ मध्ये ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले. शाळेत असतानाच त्यांचा विवाह झाला.

मॅट्रिक झाल्यानंतर भुलाभाई मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले. तेथून इंग्रजी व इतिहास हे विषय घेऊन ते बी.ए.ची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. त्यांना वर्डस्वर्थ पारितोषिक मिळाले आणि इतिहास आणि राज्यशास्त्रात पहिले आल्याबद्दल त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली. त्यानंतर लगेच त्यांनी मुंबई विद्यापीठातून इंग्रजी विषयात एम.ए.ची पदवी संपादन केली. नंतर अहमदाबादमधील गुजरात महाविद्यालयात त्यांची इंग्रजी आणि इतिहासाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. तेथे अध्यापन करीत असतानाच त्यांनी कायद्याचा अभ्यास केला आणि एलएल.बी. पदवी संपादन केली. १९०५ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून रुजू झाले आणि थोडक्या काळातच एक प्रथितयश व निष्णात वकील बनले.

ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेल्या ऑल इंडिया होमरूल लीगचे सदस्यत्व घेऊन भुलाभाईंनी राजकारणात प्रवेश केला. नंतर ते इंडियन लिबरल पार्टीमध्ये गेले, पण त्यांनी १९२८ च्या सायमन आयोगाला विरोध केला. १९२८ मधल्याच बार्डोली सत्याग्रहाच्या वेळी भुलाभाईंचा सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी संबंध आला. बार्डोलीच्या शेतकऱ्यांचे म्हणणे भुलाभाईंनी सरकारसमोर प्रभावीपणे मांडले.

१९३० मध्ये भुलाभाई औपचारिकपणे काँग्रेसचे सदस्य बनले. १९३२ मध्ये त्यांनी ‘स्वदेशी सभा’ स्थापन केली. ऐंशी कापडगिरण्या या सभेच्या परदेशी कापडाच्या बहिष्कारात सामील झाल्या. भुलाभाईंना अटक करण्यात आली, पण प्रकृती-अस्वास्थ्यामुळे त्यांची सुटका करण्यात आली. याच वेळी त्यांचा काँग्रेस कार्यकारिणीत समावेश झाला. नोव्हेंबर १९३४ मध्ये भुलाभाई गुजरातमधून केंद्रीय विधानसभेवर निवडून गेले आणि त्यांची त्या सभागृहातील काँग्रेस सदस्यांचे नेते म्हणून निवड झाली. या भूमिकेत त्यांनी अत्यंत प्रभावी कार्य केले. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर व्हाइसरॉयने जेव्हा भारतालाही युद्धात समाविष्ट केले, तेव्हा १९ नोव्हेंबर १९४० रोजी भुलाभाईंनी त्याविरुद्ध केंद्रीय विधानसभेत केलेले भाषण गाजले. सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे १० डिसेंबर १९४० रोजी भुलाभाईंना अटक झाली, पण आजारपणामुळे त्यांची सप्टेंबर १९४१ मध्ये सुटका झाली. ९ ऑगस्ट १९४२ रोजीच्या ‘चले जाव’ ठरावानंतर महात्मा गांधी आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांना अटक झाली. परंतु भुलाभाईंना अटक झाली नाही.

त्यांनी मुस्लीम लीगच्या लियाकत अली खान यांच्या बरोबर काँग्रेस-लीग युती करण्याच्या उद्देशाने बोलणी केली आणि एक करार केला. त्याला ‘देसाई-लियाकत करार’ असे म्हटले जाते. यावरून काँग्रेसचे सगळे ज्येष्ठ नेते भुलाभाईंवर नाराज झाले.

वकील म्हणून भुलाभाईंनी लढविलेला शेवटचा खटला म्हणजे ‘लाल किल्ला खटला’ होय. नेताजी

सुभाषचंद्र बोस यांच्या आजाद हिंद सेनेमधील तीन अधिकारी शाहनवाज खान, प्रेमकुमार सहगल आणि गुरबक्षसिंह धिल्लाँ यांच्यावर ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या आरोपावरून खटला भरला, तेव्हा काँग्रेसने त्यांच्या बचावासाठी १७ वकिलांची एक समिती स्थापना केली. या समितीत स्वत: पंडित नेहरू, सरदार पटेल, तेजबहादूर सप्रू आणि भुलाभाईही होते. परंतु बचावाचे मुख्य भाषण भुलाभाईंनी केले. प्रकृतीची पर्वा न करता, तीन महिने अविश्रांत परिश्रम करून त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार घेऊन असा युक्तिवाद केला की सदरच्या तीन अधिकाऱ्यांना आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी नेताजींनी स्थापन केलेल्या हंगामी सरकारच्या आदेशावरून शस्त्र हाती घेण्याचा अधिकार होता आणि त्यामुळे त्यांच्यावर इंडियन पीनल कोडच्या तरतुदींखाली खटला भरताच येत नाही. अर्थात सैनिकी न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला नाही व या तिन्ही अधिकाऱ्यांना जन्मठेप दिली. पण नंतर परिस्थिती झपाट्याने बदलली. नौदलातील खलाश्यांनी बंड केले. ब्रिटिशांनी भारत सोडताना या तिन्ही अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. या खटल्यातील बचावाच्या भाषणामुळे भुलाभाईंचे नाव सर्वतोमुखी झाले व भारतातील महान वकिलांच्या प्रभावळीत त्यांना अढळ स्थान प्राप्त झाले. परंतु थोड्याच दिवसांत प्रकृती खालावून भुलाभाईंचे निधन झाले.


– शरच्चंद्र पानसे

## देसाई, सुंदरलाल त्रिकमलाल

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, गुजरात उच्च न्यायालयाचे पहिले मुख्य न्यायाधीश**

**जानेवारी १९०१**

सुंदरलाल त्रिकमलाल उर्फ एस.टी. देसाई यांचा जन्म प्रसिद्ध वकिलांच्या कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण मुंबई व अहमदाबाद येथे झाले. एलएल.बी. परीक्षेत त्यांना किन्लॉक फोर्ब्ज सुवर्णपदक मिळाले.



नंतर ते इंग्लंडला गेले व १९२७ मध्ये बॅरिस्टर झाले. परत आल्यावर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली सुरू केली. कालांतराने ते अपील शाखेतही वकिली करू लागले. दोन्ही शाखांमध्ये त्यांचा उत्तम जम बसला. एक विद्वान आणि विशेषत: उलटतपासणीत निष्णात वकील म्हणून ते नावाजले.

वकिलीतील पंचवीस वर्षांच्या अनुभवानंतर १९५२ मध्ये देसाई यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. मे १९६० मध्ये मुंबई राज्याचे विभाजन होऊन वेगळे गुजरात राज्य अस्तित्वात आले, तेव्हा न्या. देसाई यांची नियुक्ती गुजरात उच्च न्यायालयाचे पहिले मुख्य न्यायाधीश म्हणून झाली. त्या काळी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय साठ असल्याने जानेवारी १९६१ मध्ये ते मुख्य न्यायाधीशपदावरून निवृत्त झाले. गुजरात उच्च न्यायालयातील न्या. देसाई यांची कारकीर्द फक्त सात महिन्यांचीच असली, तरी तेवढ्या अवधीत त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले.

त्याआधी मुंबई उच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीतही न्या.देसाई यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. कायद्याचे गुंतागुंतीचे किंवा संदिग्ध प्रश्न सोडवून त्यांच्यावर निर्णय देताना न्या.देसाई यांचा दृष्टिकोन संकुचित किंवा तांत्रिक बाबींवर भर देणारा नसे, तर व्यापक दृष्टीने साधक-बाधक विचार करून कायद्याचा उदारमतवादी अर्थ लावण्याचा असे. घटनेच्या कलम २२६ मधील तरतुदींनुसार ‘रिट’ जारी करण्याचा जो अधिकार उच्च न्यायालयांना आहे, त्याच्या व्याप्तीसंबंधी महत्त्वाचे निर्णय त्यांनी दिले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे नानावटी प्रकरणातील फौजदारी खटल्याचा निकाल लागल्यानंतर निर्माण झालेला गुंतागुंतीचा घटनात्मक प्रश्न उच्च

द

न्यायालयाच्या ज्या पाच न्यायाधीशांच्या विशेष पूर्णपीठासमोर आला, त्याचे न्या.देसाई एक सदस्य होते. या पीठाचा एकमताचा निकाल हा मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा निकाल मानला जातो.

आपल्या न्यायालयीन कामाव्यतिरिक्त न्या. देसाई एक श्रेष्ठ न्यायविदही होते. हिंदू कायद्यावर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. सर दिनशा मुल्ला यांच्या 'हिंदू लॉ' या प्रख्यात ग्रंथाच्या बाराव्या व नंतरच्या अनेक आवृत्त्यांचे न्या. देसाईंनी अत्यंत साक्षेपाने संपादन केले. या प्रत्येक आवृत्तीला त्यांची प्रदीर्घ विवेचक प्रस्तावना आहे. शिवाय भागीदारीच्या (पार्टनरशीप) कायद्यावरही त्यांनी एक प्रमाणभूत ग्रंथ लिहिला.

– शरच्चंद्र पानसे

द

## देसाई, व्ही. एस.

### मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

### ७ सप्टेंबर १९०७ – एप्रिल १९८९

व्ही. एस. देसाई यांचा जन्म सावंतवाडी संस्थानात झाला. त्यांचे शालेय शिक्षण वेंगुर्ला येथे आणि उच्च शिक्षण मुंबईच्या विल्सन महाविद्यालयामध्ये झाले. बी.एस्सी. ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी शासकीय विधि महाविद्यालयात प्रवेश घेतला. परंतु एलएल. बी. च्या पहिल्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, कायद्याचे शिक्षण अर्धवट सोडून त्यांनी मुंबईच्या एका शाळेत शिक्षकाची नोकरी स्वीकारली. गणित हा त्यांच्या आवडीचा विषय होता. नंतर नोकरी करीत असतानाच त्यांनी एलएल. बी. चे दुसरे वर्ष पूर्ण करुन १९३८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिलीस सुरुवात केली.

पुढे भारताचे मुख्य न्यायाधीश झालेले न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेतील ज्येष्ठ आणि प्रथितयश वकील होते. त्यांचे सहायक म्हणून काम करण्याची संधी देसाई यांना मिळाली; त्यामुळे वकील म्हणून त्यांची उत्तम जडणघडण झाली. १९४४ पासून देसाई यांनी स्वतंत्रपणे वकिली सुरू केली. लवकरच एक समतोल विचारांचे आणि शांतपणे युक्तिवाद करणारे वकील म्हणून त्यांचा लौकिक झाला. काही काळ त्यांनी मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम केले. आपल्या वकिलीच्या कारकिर्दीत त्यांनी विविध प्रकारचे खटले यशस्वीरीत्या लढविले. १९५२ मध्ये सहायक सरकारी वकील म्हणून त्यांची नेमणूक झाली आणि नंतर १९५७ मध्ये ते सरकारी वकील झाले. ९ जून १९५८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ८ ऑगस्ट १९६९ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

एक मृदुभाषी, विद्वान आणि लोकप्रिय न्यायाधीश म्हणून न्या. देसाई यांची ख्याती होती. त्यांनी मुख्यत: अपील शाखेतील विविध प्रकारचे खटले चालविले. त्यात हिंदू कायदा, जमीनविषयक कायदा, आयकर कायदा यांमधील विविध खटले होते. त्यांच्यासमोर आलेला महत्त्वाचा फौजदारी खटला म्हणजे त्या काळात गाजलेला पुण्याचे डॉ. अनंत चिंतामण लागू यांच्याविरुद्धचा खुनाचा खटला होय. लक्ष्मीबाई कर्वे यांच्या खुनाबद्दल डॉ. लागू यांना पुण्याच्या जिल्हा न्यायालयाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध त्यांनी केलेले अपील न्या. जे. सी. शाह आणि न्या. देसाई यांच्या खंडपीठाने फेटाळून लावले आणि फाशीची शिक्षा कायम केली. तिच्यावर नंतर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले.

निवृत्त झाल्यानंतर न्या. देसाई यांनी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा वकिली सुरू केली आणि सर्वोच्च न्यायालयातही पूर्वीसारखाच लौकिक मिळवला. १९८८ मध्ये, वयाच्या ८१ व्या वर्षी ते वकिलीच्या व्यवसायातून पूर्णत: निवृत्त झाले.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९८९.*


* * *

# ध

## धर्माधिकारी, चंद्रशेखर शंकर

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**२० नोव्हेंबर १९२७**



चंद्रशेखर शंकर धर्माधिकारी यांचा जन्म रायपूर येथे वकिलीची परंपरा असलेल्या कुटुंबात झाला. प्रख्यात स्वातंत्र्यसैनिक आणि गांधीवादी विचारवंत आचार्य दादा धर्माधिकारी हे न्या. धर्माधिकारी यांचे वडील होत.

न्या.धर्माधिकारी यांचे शालेय शिक्षण वर्धा येथील नवभारत विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण नागपूरचे एस.बी.सिटी कॉलेज आणि नोशेर महाविद्यालय येथे झाले. १९४९ मध्ये त्यांनी बी.ए.ची पदवी संपादन केली. नंतर नागपूर विद्यापीठातून १९५२ मध्ये एम.ए. आणि विद्यापीठ कायदा महाविद्यालयातून १९५४ मध्ये एलएल.बी. या पदव्या त्यांनी संपादन केल्या. दोन वर्षे जिल्हा न्यायालयात वकिली केल्यानंतर दि. २५ ऑक्टोबर १९५६ रोजी ते तेव्हाच्या नागपूर उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. दि. २१ जुलै १९५८ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयात आणि दि. २० जुलै १९५९ रोजी सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले.

ऑगस्ट १९६५ मध्ये धर्माधिकारी यांची नागपूर येथे सहायक सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. नंतर ऑक्टोबर १९७० मध्ये त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाचे अतिरिक्त सरकारी वकील म्हणून झाली. १३ जुलै १९७२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २४ नोव्हेंबर १९७२ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १९ नोव्हेंबर १९८९ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

उच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीत न्या.धर्माधिकारी यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. यामध्ये आणीबाणी लागू असतानाच्या काळातील नागरिकांचा जगण्याचा हक्क, स्त्रियांचे हक्क, मनोरुग्णांचे, कैद्यांचे व आदिवासी मुलांचे हक्क इ. विविध प्रश्नांवरील किंवा मुद्द्यांवरील निकालांचा उल्लेख करता येईल.

त्यांच्यासमोर त्या वेळी अतिशय गाजलेले आणि महत्त्वाचे दोन फौजदारी खटलेही आले. त्यातील पहिला खटला म्हणजे पुण्याचे जोशी-अभ्यंकर हत्याकांड. या हत्याकांडातील आरोपींना पुण्याच्या सत्र न्यायालयाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध त्यांनी केलेले अपील न्या.धर्माधिकारी आणि न्या.विजय कोतवाल यांच्या खंडपीठासमोर चालले. न्यायमूर्तींनी फाशीची शिक्षा कायम केली आणि नंतर ती सर्वोच्च न्यायालयानेही कायम केली. या आरोपींनी राष्ट्रपतींकडे केलेला दयेचा अर्जही फेटाळला गेला. दुसरा खटला म्हणजे चंद्रकला लोटलीकर खून खटला. यात रत्नागिरीच्या सत्र न्यायालयाच्या निकालाविरुद्ध सरकारने केलेले अपील न्या. धर्माधिकारी आणि न्या. अगरवाल यांनी मंजूर केले आणि आरोपींना शिक्षा दिली.

न्या.धर्माधिकारी यांनी काही काळ मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले.

मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांवर न्या. धर्माधिकारी यांचे प्रभुत्व आहे. या तिन्ही भाषांतील त्यांचे वक्तृत्व सारखेच प्रभावी आहे आणि तिन्ही भाषांत त्यांनी घटना व कायदा आणि त्याशिवाय अन्य विविध विषयांवर सोळा पुस्तके आणि अनेक लेख लिहिले आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कार मिळाले आहेत. तसेच त्यांना पद्मभूषण पुरस्कारासह अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळालेले आहेत. न्यायाधीश होण्यापूर्वीच्या काळात त्यांचा नागपुरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांशी निकटचा संबंध होता. त्या काळात राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे ते दीर्घकाळ अध्यक्ष होते. आजही तीसहून अधिक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि विशेषत: गांधीवादी संस्थांशी त्यांचा, पदाधिकारी, विश्वस्त किंवा सदस्य या नात्याने संबंध आहे. त्यांचे वास्तव्य मुंबईला आहे.

– शरच्चंद्र पानसे

* * *

ध

# न

## नरिमन, फली सॅम
**ज्येष्ठ वकील आणि न्यायविद**
**१० जानेवारी १९२९**



फली सॅम नरिमन यांचा जन्म म्यानमारची (पूर्वीचा ब्रह्मदेश) राजधानी यांगॉन (रंगून) येथे झाला. त्यावेळी ब्रह्मदेश हा ब्रिटिशांकित भारताचाच एक भाग होता. त्यांचे वडील सॅम हे न्यू इंडिया अ‍ॅश्युअरन्स कंपनीच्या रंगून शाखेचे व्यवस्थापक होते.

फली यांचे सातव्या इयत्तेपर्यंतचे शालेय शिक्षण रंगूनलाच झाले. त्यानंतर १९४१ मध्ये जपान दुसऱ्या महायुद्धात उतरला आणि जपानी हवाई दलाच्या विमानांनी रंगूनवर बाँबहल्ले सुरू केले. तेव्हा नरिमन कुटुंबाने अगोदर उत्तर ब्रह्मदेशातील मंडाले या शहरी स्थलांतर केले. नंतर रंगून पडल्यानंतर तेथे परत जाणे शक्य नसल्याने ही मंडळी आणखी उत्तरेकडे निघाली आणि रस्ते, जंगले, नद्या-नाले पार करीत, खडतर प्रवास करून भारतात आधी इंफाळ येथे पोहोचली आणि पुढे दिमापूर व कलकत्तामार्गे दिल्लीला पोहोचली. काही काळ दिल्लीत राहिल्यानंतर फली यांना शिमला (सिमला) येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये ज्युनियर केंब्रिजच्या वर्गात प्रवेश मिळाला. अगोदर ज्युनियर केंब्रिज आणि नंतर १९४४ मध्ये सीनियर केंब्रिज या परीक्षा ते उत्तीर्ण झाले.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी फली मुंबईला आले आणि त्यांनी सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या कला शाखेमध्ये प्रवेश घेतला. १९४८ मध्ये ते सेंट झेवियर्समधून बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. फलींच्या वडिलांची इच्छा त्यांनी आयसीएसच्या परीक्षेस बसावे, अशी होती. परंतु फलींचा ओढा कायद्याकडे असल्याने त्यांनी त्यास नकार दिला आणि मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. तेथून १९५० मध्ये ते एलएल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्याच वर्षी अ‍ॅडव्होकेटची परीक्षाही उत्तीर्ण झाले. नोव्हेंबर १९५० मध्ये त्यांनी सर जमशेदजी कांगा यांच्या हाताखाली वकिलीस सुरुवात केली.

दोन दशकांहून अधिक काळ नरिमन यांना मुंबई उच्च न्यायालयाप्रमाणेच मुंबईतील अन्य न्यायालये आणि पुणे व गोवा येथील न्यायालयांतही वकिलीचा अनुभव मिळाला. १९६७ मधील प्रसिद्ध गोलकनाथ खटल्यात त्यांना सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करण्याची संधी मिळाली. १९७२ मध्ये त्यांची नियुक्ती अतिरिक्त सॉलिसिटर-जनरल म्हणून झाल्यावर ते दिल्लीला गेले. वृत्तपत्रीय कागदावरील नियंत्रणाविरुद्ध टाइम्स ऑफ इंडियाने केंद्र सरकारविरुद्ध केलेल्या रिट याचिकेच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात नरिमन यांनी केंद्र सरकारची बाजू मांडली. या याचिकेवरील न्यायालयाचा बहुमताचा निर्णय सरकारच्या विरुद्ध गेला. जून १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर झाल्यावर तिच्या निषेधार्थ नरिमन यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

त्यानंतर नरिमन यांनी अनेक खटले लढवले. त्यांना अनेक सन्मान मिळाले. १९९१ मध्ये ‘बार असोसिएशन ऑफ इंडिया’चे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. १९९१ मध्येच भारत सरकारने त्यांना

पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९९५ मध्ये 'इंटरनॅशनल बार असोसिएशन'च्या 'ह्युमन राईटस् इन्स्टिट्यूट'च्या काउन्सिलचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २००१ मध्ये आणि नंतर पुन्हा २००४ मध्ये त्यांची याच इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते 'इंटरनॅशनल बार असोसिएशन'चेही सक्रिय सदस्य आहेत.

१९९९ मध्ये नरिमन यांची राज्यसभेचे सदस्य म्हणून राष्ट्रपतींनी सहा वर्षांसाठी नियुक्ती केली. या सहा वर्षांत त्यांनी राज्यसभेच्या कामकाजात सक्रियपणे भाग घेतला. 'बिफोर मेमरी फेडस्..' हे त्यांचे उद्बोधक आणि वाचनीय आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे.

डिसेंबर १९८४ मध्ये भोपाळ येथे युनियन कार्बाइडच्या कारखान्यात गॅस-गळती होऊन जी दुर्घटना घडली, त्या संबंधीच्या खटल्यात नरिमन यांनी सर्वोच्च न्यायालयात युनियन कार्बाइडची बाजू मांडली होती. परंतु नंतर मात्र या कंपनीचे वकीलपत्र घेतल्याबद्दल त्यांनी जाहीर खेद व्यक्त केला. नरिमन यांना इंग्रजी साहित्याची आवड आहे. त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व आहे. ते उत्तम वक्ते आहेत. सध्या फली नरिमन यांचे वास्तव्य नवी दिल्ली येथे आहे.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. नरिमन, फली एस.; 'बिफोर मेमरी फेडस्'; हे हाऊस इंडिया, २०१०.*

## नाईक, वि. अ.
**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**१९०५ – १७ जुलै १९८९**

वि. अ. नाईक यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण निपाणीला आणि महाविद्यालयीन शिक्षण सांगली आणि कोल्हापूर येथे झाले. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या लॉ कॉलेजमधून (आजचे आयएलएस लॉ कॉलेज) एलएल. बी. पदवी संपादन केली. वकिलीची सुरुवात त्यांनी १९३० मध्ये बेळगाव जिल्हा न्यायालयात केली. नंतर काही काळ त्यांनी त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानाच्या उच्च न्यायालयात वकिली केली. त्यांचा वकिलीचा अनुभव १९३० ते १९४८ असा अठरा वर्षांचा होता. या काळात त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास केला. आधी काँग्रेस समाजवादी पक्षात आणि नंतर एम. एन. रॉय यांच्या मूलगामी लोकशाहीवादी पक्षात (रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी) त्यांनी काम केले. रॉय यांच्याशी त्यांचा वैयक्तिक परिचय होता.

१९४८ मध्ये नाईक यांची नियुक्ती सहायक न्यायाधीश म्हणून झाली. नंतर ते जिल्हा व सत्र न्यायाधीश झाले. ते पुण्याला जिल्हा व सत्र न्यायाधीश असताना डॉ. लागू खटला त्यांच्यासमोर चालला. लक्ष्मीबाई कर्वे यांचा खून केल्याच्या आरोपावरून डॉ. अनंत चिंतामण लागू यांना न्या. नाईक यांनी फाशीची शिक्षा दिली. ती नंतर उच्च न्यायालयाने आणि सर्वोच्च न्यायालयानेही कायम केली. दरम्यान काही काळ नाईक यांनी उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार म्हणूनही काम केले.

१९५९ मध्ये नाईक यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. उच्च न्यायालयात अनेक फौजदारी खटले त्यांच्यासमोर आले. त्यातील सर्वांत महत्त्वाचा आणि गाजलेला खटला म्हणजे नानावटी खटला होय. मुळात हा खटला मुंबई शहर सत्र न्यायालयात ज्यूरीसमोर चालला. ज्यूरीने आरोपी नानावटी निर्दोष असल्याचा निकाल बहुमताने दिला, परंतु सत्र न्यायाधीश त्याच्याशी असहमत झाल्याने त्यांनी सदर खटला त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यातील तरतुदींनुसार निर्णयासाठी उच्च न्यायालयाकडे पाठविला. त्याची सुनावणी न्या. नाईक व न्या. शेलत यांच्या खंडपीठापुढे झाली आणि त्यांनी ज्यूरीचा निर्णय अमान्य करून नानावटीस जन्मठेपेची शिक्षा दिली. ती शिक्षा राज्यपालांनी तडकाफडकी स्थगित केल्याने गुंतागुंतीचे घटनात्मक प्रश्न उभे राहिले; त्यांची

सुनावणी पाच न्यायाधीशांच्या विशेष पूर्णपीठापुढे झाली. नानावटीची जन्मठेप पुढे सर्वोच्च न्यायालयाने कायम केली.

न्या. बावडेकर यांच्या राजीनाम्यामुळे अर्धवट राहिलेली पानशेत चौकशी पूर्ण करण्यासाठी न्या. नाईक यांची नियुक्ती ते न्यायाधीश असतानाच झाली. चौकशीचा प्रदीर्घ अहवाल त्यांनी सादर केला. १९६७ मध्ये न्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यावर न्या. नाईक यांनी तीन वर्षे औद्योगिक न्यायाधिकरणाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. पुढे ते पुण्याला स्थायिक झाले. तेथे ते शेवटपर्यंत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांशी संबद्ध होते. हिंगणे स्त्री शिक्षण संस्था आणि कर्वे समाजशास्त्र संस्थेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. १९७४ पासून १९७७ पर्यंत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू होते. बेळगावला विधि महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील सीमावादावर केंद्र सरकारने नेमलेल्या न्या. महाजन आयोगासमोर न्या. नाईक यांनी महाराष्ट्रातर्फे साक्ष दिली.

न्या. नाईक व्यक्तिस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते. 'स्वातंत्र्य : प्रेरणा आणि साधना' आणि 'मॅन ॲण्ड दि युनिव्हर्स' ही महत्त्वाची पुस्तके त्यांनी लिहिली. आणीबाणीच्या काळात 'सिटिझन्स फोरम फॉर डेमोक्रसी' ही संघटना स्थापन करून लोकमत संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले.

– शरच्चंद्र पानसे

## नियोगी, भवानीशंकर

**नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**३० ऑगस्ट १८८६ – १८ जुलै १९८७**

शतायुषी होण्याचे विरळा भाग्य लाभलेल्या भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सुपुत्रांपैकी एक, नागपूरचे पुराणपुरुष न्यायमूर्ती सर भवानीशंकर नियोगी यांचा जन्म नागपूरला झाला. त्यांचे घराणे मूळचे



आंध्रातील मच्छलीपट्टणमचे आणि तेलुगूभाषी. परंतु भवानीशंकरांचे पणजोबा बैरागीबाबू नागपूरला येऊन स्थायिक झाले आणि त्यांच्या पुढच्या पिढ्या पूर्णपणे मराठी बनल्या. बैरागीबाबूंच्या एका मुलाचे नाव भवानीशंकर होते; सर भवानीशंकर यांचे ते आजोबा. आजोबांचे नाव नातवाला ठेवण्याच्या प्रथेनुसार त्यांना त्यांच्या आजोबांचे नाव मिळाले.

सर भवानीशंकर यांचे बालपण नागपूर येथेच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला आणि १९०६ मध्ये कोलकाता विद्यापीठाची बी.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी काही काळ सीताबर्डीच्या पटवर्धन हायस्कूलमध्ये शिक्षकाचे काम केले. त्याचवेळी त्यांचा एम.ए. आणि एलएल.बी. चा अभ्यासही चालू होता. डिसेंबर १९०९ मध्ये एलएल.बी., एप्रिल १९१० मध्ये एम.ए. आणि डिसेंबर १९१३ मध्ये एलएल.एम. अशा पदव्या त्यांनी मिळवल्या. शाळकरी वयापासूनच त्यांना वाचनाचा अतिशय नाद असल्याने कायद्याबरोबरच संस्कृत, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र अशा विविध विषयांचाही त्यांचा गाढा व्यासंग होता. सुरुवातीस पत्रकार होण्याची त्यांची इच्छा होती. त्यासाठी ते मुंबईला गेले आणि अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या 'संदेश' पत्राची इंग्रजी आवृत्ती 'द मेसेज'चे त्यांनी काही काळ संपादन केले. याच काळात त्यांची लोकमान्य टिळकांशी भेट झाली. तेव्हा लोकमान्यांनी भवानीशंकरांना वकिली न सोडण्याचा सल्ला दिला. त्यानुसार १९१६ पासून त्यांनी नागपूरला वकिली सुरू केली. लवकरच त्यांना 'फर्स्ट ग्रेड प्लीडर' म्हणून मान्यता मिळाली. याच वेळेस त्यांच्या सार्वजनिक जीवनासही सुरुवात झाली.

१९१५ मध्ये भवानीशंकर नागपूर नगरपालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले. पुढे १९२५ ते १९२८ या काळात ते नागपूरचे नगराध्यक्ष होते. डिसेंबर १९२० मध्ये नागपूरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी त्यांनी डॉ. मुंजे यांच्या हाताखाली सहसचिव म्हणून काम केले. महात्मा गांधींच्या असहकारितेच्या आंदोलनाच्या वेळी भवानीशंकरांनी काही काळ वकिली सोडून दिली होती, पण १९२२ मध्ये पुन्हा सुरू केली आणि यशस्वी वकील म्हणून त्यांचा लौकिक झाला. आमगाव जमीनदारी खटला प्रिव्ही काउन्सिलपर्यंत गेला; तो लढविण्यासाठी १९२७ मध्ये ते इंग्लंडला गेले. त्याच वेळी त्यांनी युरोपचा प्रवास करून अनेक गोष्टींचा अभ्यास केला. नंतर १९३४ मध्ये त्यांनी चीन, जपान आणि पूर्वेकडील इतर देशांचा प्रवास केला.

जून १९३० मध्ये नागपूरचे अतिरिक्त न्याय आयुक्त म्हणून नियोगींची नियुक्ती झाली. १९३६ मध्ये नागपूर उच्च न्यायालय स्थापन झाल्यावर नियोगी यांची नियुक्ती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. नागपूर उच्च न्यायालयाच्या पहिल्या पाच न्यायाधीशांपैकी ते एक. यांपैकी दोन भारतीय होते– एक नियोगी आणि दुसरे विवियन बोस. १९४६ मध्ये नियोगी न्यायाधीशपदावरून निवृत्त झाले. एक अतिशय विद्वान आणि उदार न्यायाधीश म्हणून त्यांचा लौकिक होता. याच सुमारास त्यांना 'सर' ही पदवी मिळाली.

१९२५ ते १९२८ या काळात नागपूरचे नगराध्यक्ष असताना त्यांनी नागपूर शहरात अनेक विधायक गोष्टींना चालना दिली. शुक्रवार तलावाजवळील टिळक पुतळा त्यांच्याच कारकिर्दीत उभारला गेला. नगरपालिकेतील कार्याव्यतिरिक्त सर भवानीशंकर यांनी शिक्षणक्षेत्रात भरीव आणि उल्लेखनीय कार्य केले. नागपूर विद्यापीठाचे ते दोन वेळा कुलगुरू होते. नागपूरमधील अनेक शिक्षणसंस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. नागपूर विद्यापीठाच्या लक्ष्मीनारायण टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. विविध शिक्षणसंस्थांसाठी तसेच अन्य सामाजिक अन्य सामाजिक संस्थांसाठी ते सढळ हाताने पदरमोड करीत मात्र त्यांची स्वतःची राहणी अत्यंत साधी होती.

सर भवानीशंकर पुरोगामी विचारांचे, कर्ते सुधारक होते. विशेषतः अस्पृश्यता निवारण आणि विधवा पुनर्विवाह यांचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वतः (त्याचप्रमाणे आधीच्या पिढीत त्यांच्या काकांनी आणि सासऱ्यांनी) विधवेशी विवाह केला होता.

निवृत्तीनंतर काही काळ सर भवानीशंकर जुन्या मध्य प्रदेश राज्याच्या लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष होते. त्यानंतर १९५४ मध्ये जुन्या मध्य प्रदेश सरकारने राज्यातील ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कामकाजाची, विशेषतः ते घडवीत असलेल्या धर्मांतराची चौकशी करण्यासाठी न्या. नियोगींच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. या प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास करून आयोगाने विस्तृत अहवाल सादर केला आणि विविध शिफारशी केल्या.

१९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांबरोबर न्या. नियोगी यांनीही बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

– सु. ह. जोशी/दिलीप सेनाड

* * *

# प

## पंडित, गणपती विष्णू

**ज्येष्ठ न्यायविद आणि कायद्याचे प्राध्यापक**

**११ जून १९११ – १२ एप्रिल १९७८**



गणपती विष्णू पंडित यांचा जन्म खानदेशात झाला. त्यांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील अडिवरे येथील. त्यांच्याकडे तेथील कुलकर्ण्यांचे वतन होते. त्यांचे वडील विष्णुपंत पंडित हे पोलीस अधिकारी होते. फैजपूर येथे त्यांची नेमणूक असताना तेथे झालेल्या दंग्यात त्यांनी मोठ्या धैर्याने गुंडांना पळवून लावले होते. मात्र त्यांच्या शौर्याचे कौतुक होण्याऐवजी त्यांच्यावरच ठपका ठेवण्यात आला. नंतर त्या संबंधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात केलेल्या अपिलात त्यांची निर्दोष मुक्तता झाली. विशेष म्हणजे त्या अपिलाचा मसुदा त्यावेळी इंग्रजी पाचवीत असलेल्या गणपती यानेच तयार केला होता. गणपती पंडित यांचे शालेय शिक्षण पुण्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन महाविद्यालयात झाले. १९२९ साली गणपती मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे सर्व भावंडांना आपले पुढचे शिक्षण स्वत:च्या हिमतीवर करावे लागले. पेशवाईच्या काळात पंडित कुटुंबाला पुण्यात नारायण पेठेत नदीकाठाजवळ जमीन मिळालेली होती. त्या जागेवर पंडित कुटुंबियांचे घर प्रा. पंडित आणि त्यांचे थोरले बंधू शंकर पंडित यांनी उभे केले.

पंडित यांनी इंग्रजी व संस्कृत हे विषय घेऊन बी.ए. व एम.ए. या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी फर्गसन महाविद्यालयात इंग्रजीचे ‘ट्यूटर’ म्हणून काम केले. याच सुमारास कायद्याच्या अभ्यासक्रमात काही बदल होऊन तेथे पहिल्या वर्षासाठी इंग्रजी विषय आवश्यक झाला. पंडित यांनी पुण्याच्या ‘लॉ कॉलेज’चे (आजचे आय. एल. एस. विधि महाविद्यालय) संस्थापक व प्राचार्य ज. र. घारपुरे यांची भेट घेतली आणि त्यांना त्या महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली. मात्र तेथे दाखल झाल्यावर प्राचार्य घारपुरे यांनी त्यांना कायद्याच्या अभ्यासासाठी त्याच वर्गात विद्यार्थी म्हणून बसण्यास सांगितले. त्यामुळे इंग्रजीचा तास घेऊन झाला की कायद्यातील विषयांच्या तासांसाठी ते समोर आपल्याच विद्यार्थ्यांमध्ये जाऊन बसत. यावेळी त्यांच्या बाकावर बसणारे त्यांचे सहाध्यायी य. वि. चंद्रचूड हे पुढे भारताचे सरन्यायाधीश आणि ‘इंडियन लॉ सोसायटी’चे अध्यक्ष झाले.

पंडित यांचे नाव फर्गसन महाविद्यालयापासूनच इंग्रजीचे उत्तम शिक्षक म्हणून सर्वतोमुखी झाले होते. विधि महाविद्यालयामधून त्यांनी एलएल.बी. केले आणि नंतर १९४५ मध्ये एलएल.एम ची परीक्षाही ते पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. तोपर्यंत मुंबई विद्यापीठात हा मान मिळविणारे ते केवळ दुसरे विद्यार्थी होते. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर इंग्रजीबरोबरच कायद्याचे शिक्षक म्हणूनही काम करणे क्रमप्राप्त होते. त्यांना स्वत:ला त्याबाबत थोडी शंका होती. परंतु लवकरच न्यायशास्त्र (ज्युरिस्प्रुडन्स) आणि हिंदू कायदा, रोमन

कायदा आणि खाजगी आंतरराष्ट्रीय कायदा या विषयांचे नामांकित प्राध्यापक म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक झाला. पुण्याच्या विधि महाविद्यालयाचे नाव महाराष्ट्रातच नव्हे तर बाहेरही मोठे होण्यात प्रा. पंडितांच्या या कामगिरीचा मोठा वाटा होता. त्यामुळे महाविद्यालयामध्ये केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या सर्व भागांतून विद्यार्थी येऊ लागले. न्यायशास्त्र हा विषय पंडित इतक्या परिणामकारक रीतीने शिकवीत की, त्याचा प्रभाव पुढे आपल्या संपूर्ण कारकिर्दीवर राहिल्याचे त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे.

विधि महाविद्यालयाच्या वाढत्या ख्यातीमुळे तेथे एक कला महाविद्यालयही सुरू करावे असे प्रा. घारपुरे यांच्या मनात आले. विधि महाविद्यालयाची मूळ इमारत व वसतिगृह आधीच भव्य व निसर्गसुंदर परिसरात होते. मागील डोंगरावर मोठी जागा उपलब्ध होती. तेव्हा नव्या महाविद्यालयासाठी एक दिमाखदार वास्तू उभी करण्याचा संकल्प घारपुरे यांनी केला व त्यासाठी बरेच मोठे कर्ज काढले. ते १९५० मध्ये वयोमानापरत्वे निवृत्त झाले आणि प्राचार्यपदाचा मुकुट त्यांनी ग. वि. पंडितांच्या शिरावर ठेवला.

मात्र हा मुकुट काटेरी असल्याचे लवकरच प्रा.पंडितांच्या लक्षात येऊ लागले. कारण नवीन महाविद्यालयाचा प्रयोग म्हणावा तसा यशस्वी झाला नाही आणि एक वर्षातच ते महाविद्यालय बंद करावे लागले. कर्जाचा मोठा डोंगर शिरावर घेऊन प्राचार्य पंडित यांना आपली पुढची वाटचाल करावयाची होती. विधि महाविद्यालयाला सरकारी अनुदान मिळत नसे. देणेकरी तर कायम दाराशी येऊन उभे राहत. त्यामुळे अशी वेळ येऊन ठेपली की, महाविद्यालयाची मालमत्ता गहाण ठेवून कर्जफेड करण्याचा प्रस्ताव आला. पण याच मालमत्तेचा मोठ्या चातुर्याने उपयोग करून, आयुर्विमा महामंडळ या संपन्न संस्थेची जागेची गरज भागवून पंडितांनी उत्पन्नाचा मार्ग शोधला. हळूहळू कर्ज फिटू लागले. मात्र त्यांची स्वत:ची प्राचार्यपदाची वर्षे यातच गेली आणि संस्थेकरिता काही नव्या योजना करणे त्यांना शक्यच झाले नाही. उत्तम विद्यार्थी तयार करणे ही मात्र त्यांची महनीय कामगिरी होती. महाविद्यालयात शेकड्यांनी विद्यार्थी असले तरी अक्षरश: प्रत्येकाकडे त्यांचे जातीने लक्ष असे आणि त्याची संपूर्ण माहिती घेऊन ते त्याला उत्तम मार्गदर्शन करीत असत.

१९७१ मध्ये प्राचार्यपदावरून निवृत्त झाल्यानंतरही पंडित प्राध्यापक म्हणून काम करीत असत. त्याशिवाय ते इंडियन लॉ सोसायटीचे सचिवही होते. या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या होत्या. संस्थेला अडचणीच्या काळातून बाहेर काढून त्यांनी ती सुदृढ स्वरूपात प्रथम प्रा. रानडे व नंतर प्रा. डॉ. साठे यांच्या हवाली केली आणि त्या दोघांनाही उत्तम मार्गदर्शन केले.

– सविता भावे

## पळणिटकर, श्रीपतराव

**हैदराबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश**

**१८९७ – ३१ जानेवारी १९५८**



श्रीपतराव पळणिटकर यांचा जन्म नांदेड जिल्ह्याच्या देगलूर तालुक्यातील वझार या गावी झाला. नांदेड जिल्हा तेव्हा हैदराबाद संस्थानात होता. श्रीपतरावांचे शालेय शिक्षण हैदराबादला, महाविद्यालयीन शिक्षण पुण्याला आणि कायद्याचे शिक्षण मुंबईला झाले. बी.ए. (ऑनर्स) आणि एलएल.बी. या पदव्या संपादन केल्यानंतर ते हैदराबादला वकिली करू लागले. सुरुवातीला त्यांनी तेव्हाचे हैदराबादचे प्रसिद्ध वकील काशिनाथराव वैद्य यांच्या हाताखाली काम केले. तेव्हा ते सिकंदराबादच्या कॅन्टॉन्मेंट न्यायालयासह सर्व न्यायालयांत काम करीत असत. थोड्याच

काळात त्यांचा वकिलीत जम बसला आणि हैदराबाद उच्च न्यायालयातील एक वकील प्रमुख म्हणून ते ओळखले जाऊ लागले. उच्च न्यायालयातील अनेक महत्त्वाच्या आणि गाजलेल्या खटल्यांत त्यांचा सहभाग होता.

१९४३ मध्ये हैदराबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पळणिटकरांची नियुक्ती झाली. न्यायाधीशपदावर असतानाच हैदराबादच्या पहिल्या विधानसभेचे सभापती म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. सप्टेंबर १९४८ मध्ये हैदराबाद पोलीस कारवाई होईपर्यंत ते विधानसभेचे सभापती होते. हैदराबाद संस्थानावर भारतीय फौजांनी केलेल्या तथाकथित आक्रमणाविरुद्ध संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा मंडळाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या सुनावणीच्या वेळी हैदराबादची बाजू मांडण्यासाठी जे शिष्टमंडळ गेले, त्यात न्या. पळणिटकरांचा समावेश करण्यात आला होता; परंतु आपण आजारी असल्याचे सांगून ते शिष्टमंडळाबरोबर गेले नाहीत.

हैदराबादमुक्तीनंतर ते उच्च न्यायालयात परत आले. काही काळ त्यांची नियुक्ती कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून करण्यात आली. पण नंतर त्यांना कायम सरन्यायाधीश करण्याऐवजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश मिश्रा यांची नेमणूक हैदराबाद उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून करण्यात आली. न्या. मिश्रा निवृत्त झाल्यानंतर मग न्या. पळणिटकर हैदराबाद उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेच्या वेळी त्यांची मुंबई उच्च न्यायालयात बदली झाली, परंतु त्यांना सरन्यायाधीश न नेमता फक्त न्यायाधीश म्हणून नेमले गेले. १९५७ मध्ये ते न्यायाधीशपदावरून निवृत्त झाले आणि त्यानंतर मुंबईलाच राहिले. एकूण चौदा वर्षांच्या आपल्या न्यायालयीन कारकिर्दीत न्या. पळणिटकरांनी एक अभ्यासू आणि मृदुभाषी न्यायाधीश म्हणून लौकिक मिळवला.

मराठी, इंग्रजी आणि उर्दू या भाषांवर न्या. पळणिटकरांचे प्रभुत्व होते. मराठी साहित्याची त्यांना आवड होती. १९४२-४३ मध्ये हैदराबादला झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते.

मराठवाडा विभागासाठी वेगळे विद्यापीठ असावे, अशी त्या भागातील लोकांची अनेक वर्षांपासूनची मागणी होती. या मागणीवर विचार करण्यासाठी सरकारने, एप्रिल १९५७ मध्ये न्या. पळणिटकरांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. समितीने १ डिसेंबर १९५७ रोजी आपला अहवाल सादर केला आणि मराठवाड्यासाठी वेगळे विद्यापीठ असावे, अशी शिफारस केली. दुर्दैवाने त्यानंतर लवकरच, ३१ जानेवारी १९५८ रोजी न्या. पळणिटकरांचे अल्प आजाराने निधन झाले. मात्र समितीच्या शिफारशींनुसार विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आवश्यक तो कायदा सरकारने केल्यानंतर २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ (आजचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) स्थापन झाले.

– न्या. नरेंद्र चपळगावकर

प

## पाटसकर, हरिभाऊ विनायक

**केंद्रीय कायदामंत्री, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू**

**१५ मे १८९२ – २१ फेब्रुवारी १९७०**



हरिभाऊ विनायक पाटसकर यांचा जन्म इंदापूर येथे झाला. बी.ए. आणि एलएल.बी. या पदव्या मिळवल्यानंतर त्यांनी अनेक वर्षे मुंबई उच्च न्यायालयात व नंतर सर्वोच्च न्यायालयात वकिली केली. १९२० मध्ये ते काँग्रेसचे सदस्य झाले. १९२६ मध्ये ते तेव्हाच्या मुंबई कायदेमंडळाचे सदस्य होते. १९३७ ते १९३९ आणि नंतर पुन्हा १९४५ ते १९५२ पर्यंत ते मुंबई

विधानसभेचे सदस्य होते. १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते लोकसभेवर निवडून आले. १९५५ ते १९५७ पर्यंत ते केंद्रीय कायदामंत्री होते. कायदामंत्री या नात्याने हिंदू संहितेच्या (हिंदू कोड) चार विधेयकांचे संसदेच्या दोन्ही सभागृहांत त्यांनी संचालन केले आणि चारही विधेयके संमत होऊन त्यांचे कायद्यात रूपांतर झाले. आंध्र प्रदेश आणि मद्रास (आताचे तमिळनाडू) या राज्यांमधील सीमावादावर तोडगा काढण्यासाठी त्यांची नेमणूक करण्यात आली. हा तोडगा काढण्यासाठी त्यांनी चार सूत्रे सांगितली आणि तो वाद सामोपचाराने सोडविला. ही चार सूत्रे ‘पाटसकर सूत्रे’ (पाटसकर फॉर्म्युला) म्हणून ओळखली जातात. खेडे हा घटक धरून पण भौगोलिक सलगता कायम राखून, त्याचप्रमाणे भाषिक बहुमताचा विचार करून आणि स्थानिक जनतेच्या इच्छेनुरूप राज्यांमधील सीमा ठरवावी, ही ती चार सुत्रे होत.

जून १९५७ ते फेब्रुवारी १९६५ या काळात पाटसकर मध्य प्रदेशचे राज्यपाल होते. दोन वर्षांनंतर, म्हणजे १९६७ मध्ये ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले. १९६३ मध्ये त्यांना ‘पद्मविभूषण’ हा सन्मान मिळाला.

त्यांचे निधन त्यांच्या कार्यालयातच झाले.


– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *http://www.rajbhavanmp.ind.in*

प

## पालखीवाला, नानी अर्देशिर
### नामवंत वकील आणि ज्येष्ठ न्यायविद
### १६ जानेवारी १९२०–११ डिसेंबर २००२



नानाभाई ऊर्फ नानी अर्देशिर पालखीवाला यांचा जन्म मुंबईच्या एका मध्यमवर्गीय पारशी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांची मुंबईत खंबाला हिल येथे लाँड्री होती. त्यांचे पूर्वज पालख्या बनविण्याच्या व्यवसायात असल्याने त्यांचे आडनाव ‘पालखीवाला’ असे पडले. आपल्या आईवडिलांवर नानींची निस्सीम भक्ती होती. त्यांचे बालपण मुंबईच्या ताडदेव–नाना चौक भागात गेले. त्यांचे शालेय शिक्षण प्रोप्रायटरी हायस्कूल आणि मास्टर्स ट्युटोरियल हायस्कूल या दोन शाळांमध्ये झाले. १९३६ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले; इंग्रजी विषयात ते सर्वप्रथम आले. त्यानंतर त्यांनी सेंट झेवियर्स महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि १९४० मध्ये इंग्रजी विषय घेऊन ते बी.ए. (ऑनर्स) ची परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. लगेच १९४२ मध्ये इंग्रजी विषय घेऊनच ते एम.ए.ची परीक्षाही प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले.

यानंतर नानींची इच्छा प्राध्यापक होण्याची होती, पण त्यांच्याऐवजी अन्य व्यक्तीची नेमणूक झाली. नंतर त्यांना आय.सी.एस. परीक्षेस बसावयाचे होते, पण प्रत्यक्षात त्यांनी आपला अर्जच पाठविला नाही. त्यानंतर वडिलांच्या इच्छेनुसार नानींनी १९४४ मध्ये शासकीय विधि महाविद्यालयमधून एलएल.बी. पदवी संपादन केली. त्याच वर्षी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेची ॲडव्होकेटची परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. एलएल.बी. च्या दोन्ही वर्षांच्या परीक्षेत ते प्रथम वर्गात सर्वप्रथम आले. १९४४ ते १९४६ पर्यंत ते शासकीय विधि महाविद्यालयमध्ये फेलो होते. १९४६ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेची ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झाले; याही परीक्षेत ते प्रत्येक विषयात पहिले आले.

पालखीवाला यांनी वकिलीची सुरुवात सर जमशेदजी कांगा यांच्या चेंबरमध्ये केली. पालखीवाला हे मूलत: इंग्रजी साहित्याचे विद्यार्थी असले, तरी व्यापार आणि करव्यवस्था या विषयांतही त्यांना रस होता आणि गतीही होती. त्यामुळे त्यांनी

सुरुवातीपासून व्यापारविषयक, आयकरविषयक त्याचप्रमाणे घटनात्मक प्रश्नांवरील खटले लढविले. अत्यंत अल्पावधीतच त्यांचा वकिलीत जम बसला. मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी लढविलेला पहिला महत्त्वाचा खटला म्हणजे राव वि. अडवाणी हा होय. नानी या खटल्यात ज्यूनियर वकील होते, पण त्यांचे सीनियर काही कारणाने उपस्थित राहू शकत नसल्याने नानींनी युक्तिवाद केला आणि खटला जिंकला! त्यानंतर फ्राम बलसारा, हेमंत अलरेजा, अब्दुल माजिद असे अनेक खटले त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात लढविले. दरम्यान १९४९ ते १९५२ या काळात ते शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अर्धवेळ प्राध्यापक होते.

१९५० मध्ये वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी पालखीवाला यांनी 'द लॉ अँड प्रॅक्टीस ऑफ इन्कम टॅक्स' हा ग्रंथ लिहिला. त्यावर त्यांनी स्वत:च्या नावाच्या वर आपले गुरू सर जमदेशजी कांगा यांचे नाव त्यांच्या संमतीने घातले. एक प्रकारे ही पालखीवालांनी कांगांना दिलेली जणू गुरुदक्षिणाच होती. भारतातील प्राप्तीकरावरील सर्वश्रेष्ठ ग्रंथ असा या ग्रंथाचा लौकिक झाला आणि तो आजपर्यंत कायम आहे. आता या ग्रंथाला 'कांगा अँड पालखीवाला ऑन इन्कम टॅक्स' असे म्हणतात. त्याच्या नव्या आवृत्त्या नियमित निघतात.

१९५५-५६ पासून पालखीवाला सर्वोच्च न्यायालयात वकिली करू लागले. भानजी मुनजी, प्रिमीअर ऑटोमोबाइल्स, बाँबे टायर्स हे सुरुवातीच्या काळात त्यांनी लढविलेले उल्लेखनीय खटले म्हणता येतील. तथापि ज्या खटल्यामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले, तो म्हणजे १९६७ मधील गोलकनाथ खटला होय. घटनेने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांचा संकोच करण्याचा अधिकार संसदेला आहे काय, हा या खटल्यातील विवाद्य प्रश्न होता. अकरा न्यायाधीशांच्या विशेष पीठाने, असा अधिकार संसदेला नाही असा निर्णय दिला.

१९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले आणि माजी संस्थानिकांचे तनखे आणि अन्य विशेषाधिकार रद्द करण्यात आले. या दोन्ही गोष्टींनाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले; त्या दोन्ही खटल्यांतही अर्जदारांचे वकील नानीच होते. त्यांतही प्रत्येकी अकरा न्यायाधीशांच्या पीठांनी मोठ्या बहुमताने अर्जदारांच्या बाजूने आणि सरकारच्या विरुद्ध निर्णय दिले. गोलकनाथ आणि ह्यानंतरच्या दोन खटल्यांतील न्यायालयाचे निर्णय रद्दबातल करून स्वत:चा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी संसदेने चोवीसावी, पंचवीसावी आणि सव्वीसावी या तीन घटनादुरुस्त्या संमत केल्या.

चोवीसावी, पंचवीसावी आणि नंतरची एकोणतिसावी घटनादुरुस्ती, अशा तीन घटनादुरुस्त्यांना केशवानंद भारती या सुप्रसिद्ध खटल्यात सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले गेले. या खटल्याची सुनावणी न्यायालयाच्या सर्वच्या सर्व तेरा न्यायाधीशांच्या विशेष पीठासमोर झाली. अर्जदारांच्या वतीने मुख्य वकील पालखीवाला होते, तर प्रतिवादींच्या वतीने मुख्य वकील एच. एम. सीरवाई होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद जवळजवळ चार महिने चालला. एप्रिल १९७३ मध्ये न्यायालयाने सात विरुद्ध सहा अशा काठावरच्या बहुमताने असा निर्णय दिला की संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार असला, तरी तसे करताना घटनेची मूलभूत संरचना (बेसिक स्ट्रक्चर) बदलण्याचा किंवा तिला धक्का लावण्याचा अधिकार संसदेला नाही. सुरुवातीला हा निर्णयही वादग्रस्त ठरला, परंतु नंतरच्या काही वर्षांत सर्वोच्च न्यायालयात आणखी अनेक खटल्यांतून विचार होऊन हा 'मूलभूत संरचना सिद्धान्त' सर्वमान्य झाला.

यादरम्यान पालखीवाला यांनी दोन आंतरराष्ट्रीय प्रकरणांत भारताची बाजू मांडली. यांतील पहिले प्रकरण १९६० च्या दशकातील भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील कच्छच्या रणातील

सीमावादासंबंधीचे होते; यामध्ये पालखीवाला यांनी भारताची बाजू एका आंतरराष्ट्रीय लवादासमोर मांडली. दुसरे प्रकरण जानेवारी १९७१ मधील विमान-अपहरणातून उद्‌भवले. त्यातही पालखीवाला यांनी पाकिस्तानविरुद्ध भारताची बाजू अगोदर आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संघटनेच्या कार्यकारी मंडळासमोर आणि त्यानंतर अपिलात हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात मांडली.

आपल्या उमेदवारीच्या काळातच वकिलीसोबतच पालखीवाला कंपनी क्षेत्रातही पुढे आले. १९५९ मध्ये ते आय.सी.आय.सी.आय.च्या संचालक मंडळाचे सदस्य झाले. १९७७ पर्यंत ते त्या मंडळावर होते. १९६१ मध्ये ते टाटा समूहाचे कायदेशीर सल्लागार झाले. नंतर ते अनेक टाटा कंपन्यांच्या संचालक मंडळांवर होते. अखेरपर्यंत त्यांचा टाटा समूहाशी घनिष्ठ संबंध राहिला. १९६३ पासून १९७० पर्यंत ते रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाचे सदस्य होते. १९६७ मध्ये ते ए.सी.सी. या सिमेंट कंपनीच्या संचालक मंडळाचे सदस्य आणि १९६९ मध्ये अध्यक्ष होते. १९७७-१९७९ हा दोन वर्षांचा काळ वगळता ते १९९७ पर्यंत ए.सी.सी.चे अध्यक्ष होते.

प

१९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार केंद्रात सत्तारूढ झाले, तेव्हा पालखीवाला यांची भारताचे अमेरिकेतील राजदूत म्हणून नियुक्ती झाली. ऑक्टोबर १९७७ पासून जून १९७९ पर्यंत ते राजदूतपदावर होते. नुकत्याच संपलेल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर त्यांची नेमणूक झालेली असल्याने त्यांचे अमेरिकेत मोठे स्वागत झाले. पावणेदोन वर्षांच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी अमेरिकेत १७१ जाहीर व्याख्याने दिली. याशिवाय वृत्तपत्रांना आणि वाहिन्यांना मुलाखती दिल्या. न्यू जर्सी राज्यातील प्रिन्स्टन विद्यापीठ आणि विस्कॉन्सिन राज्यातील लॉरेन्स विद्यापीठ यांनी पालखीवालांना सन्माननीय डॉक्टरेट दिली.

१९५७ मध्ये 'फोरम फॉर फ्री एन्टरप्राईज्'च्या विद्यमाने त्यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर पहिले व्याख्यान दिले. ते श्रोत्यांना फार आवडले. मग पालखीवाला दरवर्षी अर्थसंकल्पावर व्याख्यान देऊ लागले. दरवर्षी गर्दी वाढू लागली. कोठलेही बंद सभागृह अपुरे पडू लागले; अखेर १९८३ पासून हे व्याख्यान ब्रेबॉर्न स्टेडियमवर होऊ लागले! नानी अमेरिकेत राजदूत असतानाची १९७८ आणि १९७९ ही दोन वर्षे सोडल्यास, १९९४ पर्यंत त्यांनी अखंडपणे ही व्याख्याने दरवर्षी दिली.

भारतीय विद्याभवनशीही पालखीवाला यांचा दीर्घकाळ घनिष्ठ संबंध होता. अनेक वर्षे ते त्याचे उपाध्यक्ष होते. त्यांची 'इंडियाज् प्राइसलेस हेरिटेज' आणि 'इसेन्शियल युनिटी ऑफ ऑल रिलिजन्स' ही आणि त्यांच्या निवडक लेखांचा व भाषणांचा संग्रह, अशी तीन पुस्तके भवनने प्रकाशित केली.

मुंबई विद्यापीठाने पालखीवाला यांना जानेवारी १९९८ मध्ये सन्मान्य डॉक्टरेट दिली व त्याच वर्षी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी 'पद्मविभूषण' सन्मान देऊन शासनाने त्यांचा गौरव केला. विसाव्या शतकात मुंबईला, महाराष्ट्राला आणि देशाला ललामभूत ठरलेल्या महान व्यक्तींमध्ये नानी पालखीवाला यांचे नाव कायम घेतले जाईल.

-शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. एम. व्ही. कामत; 'नानी ए. पालखीवाला : ए लाईफ'; हे हाऊस इंडिया, २००७*

## पालेकर, देवीदास गणपत

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**४ सप्टेंबर १९०९-९ डिसेंबर २००४**

देवीदास गणपत पालेकर यांचा जन्म उत्तर कन्नड (कारवार) जिल्ह्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण कारवार येथील सरकारी हायस्कूलमध्ये महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयामध्ये आणि कायद्याचे शिक्षण गव्हर्नमेंट लॉ महाविद्यालयमध्ये झाले. बी. ए. आणि एलएल.बी. या पदव्या संपादन



केल्यानंतर २ फेब्रुवारी १९३४ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. पाच वर्षे उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत दिवाणी आणि फौजदारी असे दोन्ही प्रकारचे खटले त्यांनी लढविले. जून १९३९ मध्ये ते मुंबई न्यायसेवेत कनिष्ठ वर्ग दिवाणी न्यायाधीश म्हणून रुजू झाले. १९४९ ते १९५४ या काळात ते सहायक जिल्हा व सत्र न्यायाधीश होते. १९५४ ते १९५६ या काळात त्यांची नेमणूक राज्य सरकारच्या कायदा खात्यात उपसचिव म्हणून झाली. त्यानंतर १९५६ ते १९५८ या दरम्यान ते जिल्हा व सत्र न्यायाधीश होते. ऑक्टोबर १९५८ मध्ये त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त रजिस्ट्रार म्हणून, तर जानेवारी १९५९ मध्ये रजिस्ट्रार म्हणून झाली.

१४ ऑक्टोबर १९६१ रोजी पालेकर यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. २७ ऑगस्ट १९६२ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १९ जुलै १९७१ रोजी त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. ४ सप्टेंबर १९७४ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. न्या. महादेव गोविंद रानडे यांच्यानंतर कनिष्ठ वर्ग दिवाणी न्यायाधीशपदापासून सुरुवात करून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदापर्यंत पोहोचणारे न्या. पालेकर हे पहिले न्यायाधीश होत.

न्या. पालेकर यांच्या सर्वोच्च न्यायालयातील कारकिर्दीतच केशवानंद भारती हा अत्यंत गाजलेला खटला झाला. त्याची सुनावणी त्यावेळच्या न्यायालयाच्या सर्वच्या सर्व तेरा न्यायाधीशांसमोर झाली; त्यामुळे न्या. पालेकरही त्या पीठाचे सदस्य होतेच. यांतील अकरा न्यायाधीशांनी आपापली स्वतंत्र निकालपत्रे लिहिली. न्या. पालेकर यांनीही आपले स्वतंत्र निकालपत्र लिहिले. याशिवाय अन्य अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये न्या. पालेकरांचा सहभाग होता. पी. रॉयप्पा आणि समशेरसिंह खटले आणि राष्ट्रपती निवडणुकीसंबंधी काही मुद्द्यांवर राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाचा मागितलेला सल्ला, ही त्यांतील विशेष उल्लेखनीय प्रकरणे म्हणता येतील. हिंदू कायद्याचे त्यांचे ज्ञान सखोल आणि अचूक होते.

न्या. पालेकर निवृत्त झाल्यावर त्यांची नियुक्ती पत्रकारांचे वेतन आणि सेवाशर्ती ठरविण्यासाठी एक–सदस्य आयोग म्हणून झाली. या संबंधात त्यांनी दिलेला निवाडा ‘पालेकर निवाडा’ (पालेकर ॲवॉर्ड) म्हणून प्रसिद्ध आहे.

अतिशय तत्त्वनिष्ठ म्हणून न्या. पालेकरांचा लौकिक होता. न्यायासनावर असेपर्यंत आपण कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात भाग घ्यायचा नाही, असे त्यांनी कनिष्ठ वर्ग दिवाणी न्यायाधीश असतानाच ठरविले होते आणि हे व्रत त्यांनी अखेरपर्यंत निष्ठेने पाळले. निवृत्तीनंतरचे जीवन त्यांनी लोणावळा येथे जवळजवळ एकांतवासात व्यतीत केले.

– शरच्चंद्र पानसे

प

## पेंडसे, माधव लक्ष्मण

**मुंबई व कर्नाटक उच्च न्यायालयांचे सरन्यायाधीश**

**११ डिसेंबर १९३५**

माधव लक्ष्मण पेंडसे यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या राममोहन हायस्कूलमध्ये, महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या विल्सन महाविद्यालयमध्ये आणि कायद्याचे शिक्षण शासकीय विधि महाविद्यालयामध्ये झाले. एलएल.बी.ची पदवी संपादन केल्यावर त्यांनी २ ऑगस्ट १९५८ पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिली सुरू केली. दिवाणी, फौजदारी आणि रिट असे सर्व प्रकारचे खटले त्यांनी यशस्वीरीत्या लढविले. २५ जानेवारी १९७८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून पेंडसे

यांची नियुक्ती झाली. ११ जानेवारी १९७९ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १ एप्रिल १९९५ रोजी न्या. पेंडसे यांची मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. २८ जुलै १९९५ रोजी कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. २५ मार्च १९९६ रोजी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. तल्लख बुद्धिमत्ता आणि खटल्यांचे निकाल त्वरित देऊन चोख न्यायदान करण्याची हातोटी याबद्दल न्या. पेंडसेंचा लौकिक होता.

– शरच्चंद्र पानसे

* * *

प

# फ

## फैजी, असफ असगर अली

**मुस्लिम कायद्याचे भाष्यकार, न्यायविद**

**१० एप्रिल १८९९ – ऑक्टोबर १९८१**

असफ अली फैजी यांचा जन्म माथेरानला झाला. त्यांचे शालेय, महाविद्यालयीन आणि कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. एलएल.बी.ची पदवी संपादन केल्यावर १९२२ मध्ये ते इंग्लंडला गेले आणि केंब्रिज विद्यापीठाच्या सेंट जॉन्स महाविद्यालयातून बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले; त्याचप्रमाणे १९२५ मध्ये ते मिडल् टेंपलमधून बॅरिस्टर झाले. केंब्रिजमध्ये त्यांनी अरबी आणि फारसी भाषांचा विशेष अभ्यास केला.

१९२६ मध्ये फैजी यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. ती त्यांनी १९३८ पर्यंत केली. १९२९ पासून ते मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अध्यापन करू लागले. १९३८ पासून १९४७ पर्यंत ते महाविद्यालयाचे प्राचार्य होते, त्याचप्रमाणे न्यायशास्त्राचे (ज्यूरिस्प्रुडन्स) ‘पेरी प्राध्यापक’ होते. १९४९ ते १९५१ या काळात ते भारताचे इजिप्तमधील राजदूत होते. १९५२ मध्ये त्यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून झाली. १९५७ ते १९६० या काळात ते श्रीनगर येथील जम्मू व काश्मीर विद्यापीठाचे कुलगुरू होते.

त्यानंतर फैजी सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाले आणि त्यांनी अध्यापन आणि लेखनावर आपले लक्ष केंद्रित केले. त्यांनी अमेरिका आणि कॅनडा या देशांतील अनेक विद्यापीठांत, तसेच शिमला येथील ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड स्टडी’ मध्ये आणि म्हैसूर, गुजरात आणि अन्य विद्यापीठांत अतिथी प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. १९६२–६३ मध्ये ते केंब्रिज विद्यापीठातील आपल्या जुन्या सेंट जॉन्स महाविद्यालयामध्ये ‘कॉमनवेल्थ फेलो’ होते.

१९२९ पासून १९४९ पर्यंत फैजी मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि सोसायटीच्या शोधपत्रिकेचे सहसंपादक होते. १९३३ पासून १९४९ पर्यंत ते ‘इस्लामिक रिसर्च असोसिएशन’ चे मानद सचिव होते. १९८० पर्यंत ते ‘इस्लामिक कल्चर’च्या संपादक मंडळावर होते. ‘एनसायक्लोपीडिया ऑफ इस्लाम’ या प्रकल्पाच्या कार्यकारी समितीचेही ते प्रथमपासून सदस्य होते. १९५६ मध्ये दमास्कस येथील ‘अरेबिक अ‍ॅकॅडमी’चे ‘कॉरस्पाँडिंग मेंबर’ म्हणून त्यांची निवड झाली. १९६२ मध्ये त्यांना पद्मविभूषण सन्मान मिळाला.

‘आऊटलाइन्स ऑफ मोहमेडन लॉ’, ‘ए मॉडर्न अ‍ॅप्रोच टू इस्लाम’, ‘केसेस् इन द मोहमेडन लॉ ऑफ इंडिया, पाकिस्तान अँड बांगलादेश’ ही अत्यंत महत्त्वाची पुस्तके फैजी यांनी लिहिली.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *http://www.jstor.org/pss/4056205*

* * *

# ब

## बावडेकर, राजाराम श्रीपाद

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१६ सप्टेंबर १८९८ - १९ ऑक्टोबर १९६१**

राजाराम श्रीपाद बावडेकर यांचा जन्म कोल्हापूरला एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला कोल्हापूर हायस्कूलमध्ये आणि उच्च शिक्षण अगोदर कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात आणि नंतर पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात झाले. पहिल्यापासूनच ते हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. डेक्कन महाविद्यालयातून मुंबई विद्यापीठाची बी.ए. पदवी घेतल्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला. तेथूनही १९२२ मध्ये बी.ए. पदवी संपादन केली. त्याचवेळी त्यांनी आय.सी.एस. परीक्षेसाठी अभ्यास केला व त्याच वर्षी आय.सी.एस. उत्तीर्ण झाले.

भारतात परतल्यावर त्यांची पहिली नियुक्ती नाशिकचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून झाली. नंतर त्यांनी पूर्व खानदेश (जळगाव) जिल्ह्याचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून काम केले. या काळात त्यांना जमीन महसूल आणि वतनांच्या कायद्याची पूर्ण माहिती झाली आणि या गोष्टीचा ते उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाल्यावर त्यांना उपयोग झाला. १९२७ मध्ये ते न्यायखात्यात गेले. १९३४ पर्यंत ते विविध ठिकाणी सहायक न्यायाधीश आणि जिल्हा न्यायाधीश होते. १९३४ ते १९३८ त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेचे रजिस्ट्रार म्हणून झाली. १९३८ ते १९४५ ते पुन्हा विविध ठिकाणी जिल्हा न्यायाधीश होते. १९४५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १५ डिसेंबर १९५७ रोजी राजीनामा देऊन ते मुदतीपूर्वी निवृत्त झाले.

उच्च न्यायालयातील कारकिर्दीत न्या. बावडेकर यांनी एक अत्यंत निष्पक्ष, न्यायप्रिय आणि बुद्धिमान न्यायाधीश म्हणून लौकिक मिळवला. ते अत्यंत खुल्या मनाचे आणि समतोल विचारांचे होते. वरिष्ठ आणि कनिष्ठ वकिलांत ते भेदभाव करीत नसत.

१२ जुलै १९६१ रोजी पानशेत धरण फुटल्यामुळे पुण्यात महापूर आला. या घटनेची चौकशी करण्यासाठी एक सदस्य चौकशी आयोग म्हणून बावडेकर यांची नियुक्ती केल्याची घोषणा राज्य सरकारने २४ जुलै १९६१ रोजी केली. चौकशीचे प्राथमिक काम पूर्ण करून बावडेकर सार्वजनिक चौकशी सुरू करणार होते, परंतु १३ ऑक्टोबर १९६१ राजी त्यांनी त्या आयोगाचा राजीनामा दिला. त्यानंतर आठवड्याच्या आतच, १९ ऑक्टोबर १९६१ रोजी न्या. बावडेकरांचे अपघाती निधन झाले. त्यानंतर न्या. वि. अ. नाईक यांनी चौकशी पूर्ण केली.

न्या. बावडेकर अनेक वर्षे मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे उपाध्यक्ष होते. ते अविवाहित होते.

— शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**


*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९६१.*

## बोस, विवियन

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**९ जून १८९१ - २९ नोव्हेंबर १९८३**

विवियन बोस यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला. त्यांचे उच्च शिक्षण केंब्रिज विद्यापीठातील डल्विच्



महाविद्यालय आणि पेम्ब्रुक महाविद्यालयामध्ये झाले. तेथे त्यांनी अनुक्रमे बी.ए. व एलएल. बी. या पदव्या संपादन केल्या. १९१३ मध्ये ते मिडल् टेम्पलमधून बॅरिस्टर झाले. परत येऊन त्यांनी नागपूरला वकिली सुरू केली. १९२४ पासून १९३० पर्यंत ते नागपूर विद्यापीठातील कायदा महाविद्यालयाचे प्राचार्य होते. १९३० ते १९३६ या काळात त्यांनी मध्य प्रांत आणि वऱ्हाड सरकारचे कायम वकील म्हणून काम पाहिले. दरम्यान १९३१ पासून १९३४ पर्यंत त्यांची नियुक्ती नागपूरचे अतिरिक्त न्याय आयुक्त म्हणून झाली.

१९३६ मध्ये नागपूर उच्च न्यायालय स्थापन झाल्यावर बोस यांची नियुक्ती त्या न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. नागपूर उच्च न्यायालयाच्या पहिल्या पाच न्यायाधीशांपैकी ते एक. या पाचपैकी दोन भारतीय होते. एक बोस आणि दुसरे भवानीशंकर नियोगी. तेरा वर्षांनंतर, म्हणजे १९४९ मध्ये न्या. बोस नागपूर उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. मार्च १९५१ मध्ये त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. नागपूर उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयावर जाणारे ते पहिले न्यायाधीश होत. ८ जून १९५६ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही काही काळ त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे तात्पुरते न्यायाधीश (अॅडहॉक जज) म्हणून काम पाहिले. सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक अत्यंत विद्वान, सहृदय आणि साक्षेपी न्यायाधीश म्हणून न्या. बोस ओळखले जातात.

कायद्याच्या क्षेत्राव्यतिरिक्त न्या. बोस यांचा स्काउट चळवळीशी जवळचा संबंध होता. १९२१ पासून १९३४ पर्यंत ते मध्य प्रांत आणि वऱ्हाड बॉय स्काउट्स् असोसिएशनचे मानद प्रांतिक सचिव होते, तर १९३४ पासून १९३७ पर्यंत प्रांतिक आयुक्त होते. १९४७ पासून १९४९ पर्यंत ते जागतिक स्काउट समितीचे सदस्य होते, तर नोव्हेंबर १९५७ पासून नोव्हेंबर १९५९ पर्यंत भारत स्काउटस् गाइडस् संघटनेचे मुख्य आयुक्त होते. ‘इंडियन ऑक्झिलरी फोर्स’ या स्वयंसेवक दलाशीही न्या. बोस संबंधित होते. या दलाच्या नागपूर रेजिमेंटचे ते कॅप्टन होते. या दलातील सेवेसाठी त्यांना अनेक पदके मिळाली होती.

न्या. बोस यांना छायाचित्रणाची, खेळांची, प्रवासाची आणि मोटार चालविण्याची आवड होती. आपली पत्नी आणि दीड वर्षाच्या मुलाला बरोबर घेऊन त्यांनी भारतापासून इंग्लंडपर्यंतचा प्रवास स्वत: मोटार चालवीत केला होता.

– शरच्चंद्र पानसे


**संदर्भ :**

*१. हिदायतुल्ला, मोहम्मद; ‘‘माय ओन बॉस्वेल’’ (आत्मचरित्र); अर्नाल्ड - हनेमान; १९८०.*

* * *

# भ

## भगवती, नटवरलाल हरिलाल
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**८ ऑगस्ट १८९४**



नटवरलाल हरिलाल भगवती यांचा जन्म बडोदा येथे झाला. त्यांचे उच्च शिक्षण बडोदा महाविद्यालय आणि मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. १९१४ मध्ये ते बी.ए.(ऑनर्स) उत्तीर्ण झाले आणि त्यांना 'दक्षिणा फेलोशिप' मिळाली. नंतर १९१६ मध्ये ते एलएल.बी. व १९१७ मध्ये एम.ए. या परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२१ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. १९२९ ते १९३१ या काळात ते मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयात प्राध्यापक होते. मुंबई विद्यापीठ अधिसभा आणि सिंडिकेटचे ते अनुक्रमे १९४७ आणि १९४८ मध्ये सदस्य होते.

१९४९ मध्ये कायदा शिक्षणात सुधारणा सुचविण्यासाठी नेमण्यात आलेल्या 'बॉम्बे लीगल एज्युकेशन रिफॉर्म कमिटी'मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. नोव्हेंबर १९४९ ते नोव्हेंबर १९५१ या काळात ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. १९४९ मध्ये मुंबई विद्यापीठ पुनर्रचना समितीचे ते अध्यक्ष होते. ऑगस्ट १९४४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. नंतर सप्टेंबर १९५२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. मुंबई उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयावर जाणारे ते पहिले न्यायाधीश होत. १९५९ मध्ये निवृत्त झाल्यानंतर काही काळ ते बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांचे चिरंजीव प्रफुल्लचंद्र तथा पी. एन. भगवती पुढे १९८५ मध्ये भारताचे सरन्यायाधीश झाले.

– शरच्चंद्र पानसे

## भरुचा, सॅम पिरोज
**भारताचे सरन्यायाधीश**
**६ मे १९३७**



सॅम पिरोज भरुचा यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे सर्व शिक्षण मुंबईतच झाले. बी. एस्सी. व एलएल.बी. या पदव्या संपादन केल्यावर ते २८ जुलै १९६० पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत व नंतर सर्वोच्च न्यायालयात वकिली करू लागले.

१९ सप्टेंबर १९७७ रोजी त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ३ एप्रिल १९७८ रोजी ते उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. १ नोव्हेंबर १९९७ रोजी त्यांची नियुक्ती कर्नाटक उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १ जुलै १९९२ रोजी न्या. भरुचा यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. १ नोव्हेंबर २००१ रोजी ते भारताचे सरन्यायाधीश झाले. ५ मे २००२ रोजी ते निवृत्त झाले.

– शरच्चंद्र पानसे

* * *

भ

# म

## मंडलिक, विश्वनाथ नारायण

*रावसाहेब मंडलिक*

**ज्येष्ठ न्यायविद आणि वकील**

**८ मार्च १८३३ – ९ मे १८८९**

☞ **मुख्य नोंद – राजकारण खंड**



रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड येथे झाला. त्यांचे आजोबा धोंडदेव हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे सासरे होते. पेशव्यांनी सांगितल्याने त्यांनी कुवेशीकर परांजपे घराण्यातील मोरूभाऊ परांजपे यांचा मुलगा दत्तक घेतला. दत्तकविधानानंतर त्याचे नाव नारायण असे ठेवण्यात आले. या नारायण मंडलिकांच्या आठ अपत्यांपैकी विश्वनाथ हे तिसरे होत.

वयाच्या नवव्या वर्षापर्यंत विश्वनाथ यांचे घरीच शिक्षण झाले. नंतर १८४५ ते १८४७ अशी दोन वर्षे इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना रत्नागिरीस पाठविण्यात आले. त्यानंतर सुमारे सव्वाचार वर्षे त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये त्यावेळी उपलब्ध असलेले उच्च शिक्षण घेतले. (मुंबई विद्यापीठाची स्थापना अजून व्हावयाची होती.) पहिल्या वर्षापासून त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. शेवटच्या परीक्षेत ते अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, साहित्य, इतिहास, रसायनशास्त्र आणि देशी भाषा या सर्व विषयांत वेगवेगळे आणि एकंदरीत परीक्षेतही पहिले आले. शिक्षण संपल्यावर लगेच मंडलिकांना सरकारी नोकरी मिळाली. १८५२ ते १८५४ या काळात ते भुज येथे कच्छच्या पोलिटिकल एजंटच्या कचेरीत मुख्य हिशेब तपासनीस होते. तेथील हवा न मानवल्याने त्यांनी तेथून बदली मागितली, त्यामुळे कराची येथे सिंधच्या कमिशनरचे खासगी सचिव म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जुलै १८५४ ते सप्टेंबर १८५५ पर्यंत ते कराचीला होते. या अवधीत त्यांनी फारसी आणि सिंधी भाषांचा अभ्यास केला. सप्टेंबर १८५५ पासून ते ठाणे येथे शाळा खात्यात डेप्युटी इन्स्पेक्टर किंवा व्हिजिटर म्हणून काम करू लागले. याचवेळी त्यांना रावसाहेब हा किताब देण्यात आला. नंतर १८५८ मध्ये सहा महिने वसईला मुन्सिफ, १८५९ मध्ये सरकारी बुक डेपोचे क्युरेटर आणि १८६० ते १८६३ पर्यंत इन्कम टॅक्स कमिशनरचे सहायक, अशा वेगवेगळ्या ठिकाणी काम केल्यानंतर मतभेद व गैरसोयींमुळे रावसाहेबांनी नोव्हेंबर १८६२ मध्ये सरकारी नोकरीचा राजीनामा दिला; तो फेब्रुवारी १८६३ मध्ये मंजूर झाला. राजीनामा दिल्याबरोबरच त्यांनी वकिलीच्या परीक्षेसाठी अभ्यास सुरू केला होता. एप्रिल १८६३ मध्ये ते वकिलीची म्हणजे 'हायकोर्ट प्लीडर' ची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिलीस सुरुवात केली. यादरम्यान थोडे दिवस त्यांनी कापूसबाजारात आणि शेअर बाजारात व्यापार करून पाहिला.

अत्यंत तल्लख बुद्धिमत्ता, कमालीची सचोटी आणि प्रामाणिकपणा, काटेकोर शिस्त आणि वक्तशीरपणा या रावसाहेबांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे ते अल्पावधीतच अपील शाखेतील बिनीचे वकील बनले. एकीकडे त्यांच्या अशिलांमध्ये अनेक जहागिरदार, सरदार,

म

एवढेच नव्हे तर कोल्हापूर, सातारा, बडोदा आणि म्हैसूर संस्थानांचे राजे असत; तर दुसरीकडे एखाद्या गरीब अशिलासाठी ते एखादे अपील मोफतही लढवीत. १८७६ मध्ये अपील शाखेकडील सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सरकारी वकील म्हणूनही त्यांचा व्यवहार अत्यंत सचोटीचा असे.

अशा प्रकारे वकिली उत्तम प्रकारे चालत असतानाच रावसाहेबांचे विविध स्वरूपाचे सार्वजनिक कार्य आणि विविध विषयांवरील विविध प्रकारचे लेखनही अविरतपणे चालू असे. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटच्या 'स्टूडन्टस् लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी' या संस्थेशी ते पहिल्यापासूनच संबंधित होते. या सोसायटीसमोर रावसाहेबांनी अनेक विषयांवर निबंध वाचले. त्यातला एक पेशव्यांच्या राज्यपद्धतीवर होता. त्यानंतर त्यांनी विविध विषयांवर अनेक पुस्तके लिहिली. त्यात काही भाषांतरेही होती. त्यात तुकोबांच्या गाथेपासून यंगच्या बीजगणिताचे सिंधी भाषांतर आणि किंडस्लीच्या पुराव्याच्या कायद्याच्या भाषांतरापर्यंत अनेक पुस्तकांचा समावेश होता. परंतु हिंदू कायद्यासंबंधी त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मराठीतील 'हिंदुधर्मशास्त्र' आणि म्हैसूर संस्थानातील दत्तक प्रकरणाच्या संदर्भातील 'दत्तकाचा अधिकार विरुद्ध संस्थाने खालसा करण्याचा अधिकार' ही त्यांची पुस्तके महत्त्वाची होती. मात्र त्यांच्यापेक्षाही जास्त महत्त्वाची म्हणजे, व्यवहारमयूख आणि याज्ञवल्क्यस्मृती यांचे प्रस्तावना व पुरवणीसह इंग्रजी भाषांतर आणि मानवधर्मशास्त्र म्हणजे मनुस्मृतीची, मेधातिथी, सर्वज्ञनारायण, कुल्लुक, राघवानंद, नंदन आणि रामचंद्र यांच्या टीकांसह त्यांनी काढलेली आवृत्ती, यामुळे धर्मशास्त्राचे आधुनिक भाष्यकार आणि न्यायविद म्हणून मंडलिकांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्या काळात हिंदू कायद्याचे अनेक प्रश्न न्यायालयांसमोर सातत्याने येत असल्याने मंडलिकांचे हे कार्य महत्त्वाचे होते. त्याबरोबरच व्यावहारिकदृष्ट्या गरजेचे आणि उपयोगाचेही होते. त्यांनी सुरुवात करून दिलेले हे कार्य नंतर एकीकडे महामहोपाध्याय पां. वा. काणे व दुसरीकडे प्रा. ज. र. घारपुरे यांनी पूर्णत्वास नेले, असे म्हणता येईल.

वर म्हटल्याप्रमाणे, एवढे सगळे लेखन आणि वकिली, याबरोबरच रावसाहेबांचे विविध स्वरूपाचे सार्वजनिक कार्यही अविरत चालू असे. १८६४ मध्ये त्यांनी लोकजागृती करण्याच्या उद्देशाने 'नेटिव्ह ओपिनियन' हे स्वत:चे वृत्तपत्र चालू केले. सुरुवातीस ते फक्त इंग्रजीत होते, परंतु १८६६ पासून ते इंग्रजी आणि मराठी, दोन्ही भाषांत निघू लागले. १८७१ मध्ये रावसाहेबांनी त्याची मालकी सोडली, पण ते १९०६ पर्यंत चालू राहिले. १८६७ मध्ये मंडलिकांनी बॉम्बे असोसिएशनचे पुनरुज्जीवन केले. (तिचे कार्य पुढे जवळजवळ वीस वर्षे चालले.) १८६५ मध्ये 'पुनर्विवाहोत्तेजक सभा' स्थापन झाली. तिच्याशी रावसाहेबांचा संबंध होता. १८६९ मध्ये ईस्ट इंडिया असोसिएशनची मुंबई शाखा स्थापन झाली. त्याचप्रमाणे प्रार्थनासमाजाचीही स्थापना झाली. या दोन्ही संस्थांशी त्याचप्रमाणे अन्य संस्थाशीही मंडलिकांचा घनिष्ठ संबंध होता. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्यावर लवकरच त्यांचा विद्यापीठाशीही संबंध आला. १८६१ मध्ये मराठीचे परीक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८६२ मध्ये ते विद्यापीठाचे फेलो आणि मराठी व सिंधीचे परीक्षक झाले. १८६८ पासून सलग पंधरा वर्षे ते एलएल.बी. परीक्षेत होते. १८९३ मध्ये ते मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्य झाले आणि नंतर उपाध्यक्षही झाले. सोसायटीत त्यांनी विविध विषयांवर अभ्यासपूर्ण निबंध वाचले.

१८६३ मध्ये मंडलिकांची नियुक्ती 'जस्टिस ऑफ पीस' (जे.पी.) म्हणून झाली. तेव्हापासून त्यांचा तत्कालीन मुंबई नगरपालिकेशी संबंध आला. १८७४ ते १८७७ आणि नंतर पुन्हा १८८० ते १८८४ या काळात मंडलिक मुंबई कायदेमंडळाचे सदस्य होते. दरम्यान १८७९ मध्ये ते मुंबईचे महापौर होते. या

म

काळात विविध विषयांवर महत्त्वाचे कायदे झाले. १८८४ मध्ये त्यांची नियुक्ती केंद्रीय कायदेमंडळावर झाली. तेथेही त्यांनी स्वत:ची छाप पाडली.

त्या काळी सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा व स्वातंत्र्य आधी, हा वादाचा मुद्दा होता. याविषयी मंडलिक मध्यममार्गी होते. अनेक सुधारणांना त्यांचा सरसकट पाठिंबा नसला, तरी सुधारकांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर साधकबाधक विचार करण्यास ते तयार असत. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व व बहुपेडी कर्तृत्व असलेल्या मंडलिकांचे सूत्ररूपाने वर्णन करावयाचे झाल्यास, एकोणिसाव्या शतकात भारतात घडलेल्या पाश्चात्त्य-पौर्वात्य संस्कृतिसंगमाचे एक उत्कृष्ट उदाहरण असे करता येईल.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

१. *शिरगांवकर, वर्षा; 'सोशल रिफॉर्म इन महाराष्ट्र ॲण्ड व्ही. एन. मंडलिक'; नवरंग प्रकाशन, नवी दिल्ली, १९८९.*

## मनोहर, सुजाता वसंत

**सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश**

**२८ ऑगस्ट १९३४**



मुंबई उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश व सुमारे चार महिन्यांसाठी का होईना, पहिल्या महिला सरन्यायाधीश होण्याचा मान न्यायमूर्ती सुजाता मनोहर यांच्याकडे जातो. गुजरात उच्च न्यायालयाचे दुसरे सरन्यायाधीश न्या. के. टी. देसाई यांच्या त्या कन्या होत.

सुजाता वसंत मनोहर यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या आनंदीलाल पोद्दार विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. तेथून बी.एस्सी. उत्तीर्ण झाल्यावर त्या इंग्लंडला गेल्या आणि त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून एम.ए.ची पदवी संपादन केली; त्याचबरोबर त्या लिंकन्स इन्‌मधून बॅरिस्टरही झाल्या. १४ फेब्रुवारी १९५८ रोजी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली सुरू केली. १९७०-१९७१ मध्ये मुंबई शहर दिवाणी न्यायालयातील सहायक सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

२३ जानेवारी १९७८ रोजी सुजाता मनोहर यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. २८ नोव्हेंबर १९७८ रोजी त्या उच्च न्यायालयाच्या कायम न्यायाधीश झाल्या. ५ जानेवारी १९९४ रोजी त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश म्हणून झाली, परंतु सुमारे चार महिन्यांनी, म्हणजे २१ एप्रिल १९९४ रोजी त्यांची बदली केरळ उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश म्हणून करण्यात आली. ८ नोव्हेंबर १९९४ रोजी त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून झाली. २७ ऑगस्ट १९९९ रोजी त्या पदावरून निवृत्त झाल्या.

न्या. मीरासाहिब फातिमाबीवी यांच्यानंतर न्या. सुजाता मनोहर या सर्वोच्च न्यायालयाच्या दुसऱ्या महिला न्यायाधीश होत. त्यांच्या सर्वोच्च न्यायालयातील कारकिर्दीच्या काळातच १९९७ मध्ये न्यायालयाने सुप्रसिद्ध विशाखा खटल्यात कामाच्या किंवा नोकरीच्या जागी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळाला आळा घालण्यासाठी बंधनकारक मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली. तो निर्णय तीन न्यायाधीशांच्या ज्या पीठाने दिला, त्याच्या न्या. मनोहर एक सदस्य होत्या.

मानवी हक्क, स्त्रियांचे हक्क, समाजकल्याण, इ. विषयांवरील अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांत न्या. मनोहर यांनी वेळोवेळी भारताचे प्रतिनिधित्व केले. महाराष्ट्र राज्यात कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यासंबंधात मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेल्या न्यायाधीशांच्या समितीच्या त्या अध्यक्ष होत्या. सर्वोच्च न्यायालयातून

म

निवृत्त झाल्यानंतर त्यांनी केंद्रीय मानवाधिकार आयोगाच्या सदस्य म्हणून काम पाहिले.


न्या. सुजाता मनोहर यांचे वास्तव्य मुंबई येथे आहे.

– शरच्चंद्र पानसे

## मादन, दिनशा पिरोशा

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**७ एप्रिल १९२१ – १९९४**



दिनशा पिरोशा मादन यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईत इंपीरियल हायस्कूलमध्ये आणि पुण्याच्या सरदार दस्तूर नौशिरवान हायस्कूलमध्ये, महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत एल्फिन्स्टन महाविद्यालयात व कायद्याचे शिक्षण मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामध्ये झाले. बी.ए. आणि एलएल. बी. या पदव्या संपादन केल्यानंतर २१ नोव्हेंबर १९४४ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत आणि २ नोव्हेंबर १९४५ रोजी अपील शाखेत वकिली करू लागले. मुंबई उच्च न्यायालयाव्यतिरिक्त त्यांनी सर्वोच्च न्यायालयात, त्याचप्रमाणे भारतातील अन्य न्यायालयांत, तसेच नैरोबी येथील पूर्व आफ्रिका अपील न्यायालय, एडनचे सर्वोच्च न्यायालय, इत्यादी परदेशी न्यायालयांतही वेळोवेळी खटले लढविले. ते मुख्यत: दिवाणी आणि घटनात्मक खटले लढवीत असले, तरी काही वेळा करविषयक आणि फौजदारी खटलेही लढवीत असत. १९५२ पासून १९५५ पर्यंत ते शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अर्धवेळ प्राध्यापक होते.

२५ सप्टेंबर १९६७ रोजी मादन यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ६ ऑगस्ट १९६९ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. मे १९७० मध्ये भिवंडी, जळगाव आणि अन्य काही ठिकाणी झालेल्या जातीय दंगलींची चौकशी करण्यासाठी एक-सदस्य आयोग म्हणून न्या. मादन यांची नियुक्ती करण्यात आली. या चौकशीबद्दल न्या. मादन यांनी सादर केलेला सविस्तर अहवाल अतिशय महत्त्वाचा मानला जातो. जातीय दंगलींची सखोल कारणमीमांसा करून त्या होऊ नयेत म्हणून करावयाच्या उपायांबद्दल त्यांनी विस्तृत सूचना केल्या आहेत.

११ ऑगस्ट १९८२ रोजी न्या. मादन यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १५ मार्च १९८३ रोजी न्या. मादन यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदावरून सर्वोच्च न्यायालयावर जाणारे न्या. मादन हे पहिले न्यायाधीश होत. ६ एप्रिल १९८६ रोजी ते पदावरून निवृत्त झाले. सर्वोच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीत न्या. मादन यांनी घटनात्मक कायदा आणि प्रशासनिक कायदा (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ) या संबंधात अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. तुलसीराम पटेल खटला आणि 'सेंट्रल इनलँड वॉटर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन' खटला, या खटल्यांतील न्या. मादन यांचे निर्णय महत्त्वाचे मानले जातात.

– शरच्चंद्र पानसे

## मिर्जा अली अकबर खान


***खान, मिर्जा अली अकबर***

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**३ नोव्हेंबर १८८० – ७ मार्च १९३४**

मिर्जा अली अकबर खान यांचा जन्म मुंबईला झाला. १८९६ मध्ये मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी विल्सन महाविद्यालयात प्रवेश घेतला. इंटरनंतर १८९९ मध्ये एलएल.बी. च्या पहिल्या वर्षाची परीक्षा ते प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. १९०१ मध्ये त्यांनी तर्कशास्त्र आणि नैतिक तत्त्वज्ञान हे विषय घेऊन

म



बी. ए. (ऑनर्स) ही पदवी प्राप्त केली. १९०१ मध्येच सरकारच्या शिष्यवृत्तीवर ते इंग्लंडला गेले आणि त्यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या सेंट जॉन्स महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. तेथून मॉरल सायन्स ट्रायपॉस घेऊन त्यांनी १९०३ मध्ये बी.ए. पदवी संपादन केली आणि जून १९०४ मध्ये ते इनर टेंपलमधून बॅरिस्टर झाले.

मुंबईला परत आल्यावर खान यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट म्हणून वकिलीस सुरुवात केली आणि लवकरच ते एक यशस्वी वकील म्हणून प्रसिद्धीस आले. १९०९ ते १९१४ या दरम्यान ते 'गव्हर्नमेंट लॉ स्कूल'मध्ये प्राध्यापक होते आणि १९१४ पासून १९१९ पर्यंत प्राचार्य होते. या दरम्यान ते मुंबई विद्यापीठाचे फेलो होते. नंतर सिंडिकेटचे सदस्य आणि डीन होते आणि मग कुलगुरू झाले. त्याचप्रमाणे १९०६ पासून १९२२ पर्यंत ते पर्शियाचे (इराण) मुंबईतील मानद कौन्सल होते.

२५ नोव्हेंबर १९२४ रोजी खान यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. १८ फेब्रुवारी १९२६ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. त्यांनी मूळ आणि अपील या दोन्ही शाखांमध्ये न्यायदान केले. नवोदित वकिलांपासून ज्येष्ठ वकिलांपर्यंत सर्वांना सारख्याच सहृदयतेने वागवून चोख न्याय देण्याबद्दल त्यांची ख्याती होती.

उच्च न्यायालयातील आपल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात न्या. खान यांनी व्यापारविषयक कायदा, लवाद कायदा, जमिनीचा कायदा, पोलीस कायदा, संपत्ती हस्तांतरण कायदा, न्यायालयाच्या अवमानाचा कायदा, दिवाळखोरीचा कायदा, यांमधील त्याचप्रमाणे हिंदू आणि मुस्लीम कायदा आणि फौजदारी कायदा अशा कायद्याच्या विविध शाखांमधील अनेक गुंतागुंतीच्या खटल्यांत महत्त्वाचे निर्णय दिले. १९३२ मध्ये त्यांनी उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले. मुंबईतील अनेक शिक्षणसंस्थांशी न्या. खान यांचा निकट संबंध होता. न्यायाधीशपदावर असतानाच त्यांचे निधन झाले.

– शरच्चंद्र पानसे

## मुधोळकर, जनार्दन रंगनाथ

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**९ मे १९०२ –**



जनार्दन रंगनाथ मुधोळकर यांचा जन्म अमरावतीला झाला. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले, तर उच्च शिक्षण एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. तेथून बी.ए. पदवी संपादन केल्यानंतर ते कायद्याच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या सिडनी ससेक्स महाविद्यालयातून एलएल.बी. पदवी संपादन केली. त्याचबरोबर ते लंडनच्या लिंकन्स इन्‌मधून बॅरिस्टर झाले. स्वदेशी परत आल्यावर त्यांनी १९२५ ते १९२९ या काळात अमरावती येथे आणि त्यानंतर १९३० ते १९४१ अशी अकरा वर्षे नागपूर येथे वकिली केली. सप्टेंबर १९४१ मध्ये त्यांची नियुक्ती जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून झाली. जून १९४८ पर्यंत त्यांनी त्या पदावर विविध ठिकाणी काम केले.

जून १९४८ मध्ये मुधोळकर यांची नियुक्ती तेव्हाच्या नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्य पुनर्रचना झाल्यावर ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. ऑगस्ट–सप्टेंबर १९६० मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले. ऑक्टोबर १९६० मध्ये त्यांची नियुक्ती सर्वोच्च

म

न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. ३ जुलै १९६६ रोजी मुदतीपूर्वीच राजीनामा देऊन ते निवृत्त झाले.

मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय, या दोन्ही न्यायालयांत न्या. मुधोळकर यांचा एकेका अत्यंत महत्त्वाच्या घटनात्मक खटल्याच्या निर्णयात सहभाग होता. नानावटी प्रकरणातील मूळच्या फौजदारी खटल्यानंतर उद्‌भवलेल्या घटनात्मक प्रश्नाच्या निर्णयासाठी मुंबई उच्च न्यायालयात पाच न्यायाधीशांचे जे विशेष पूर्णपीठ स्थापन झाले होते, त्याचे न्या. मुधोळकर एक सदस्य होते. या पीठाचा एकमताचा निर्णय हा मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा निर्णय मानला जातो. नंतर सर्वोच्च न्यायालयात संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकाराच्या व्याप्तीच्या मुद्द्यावरच्या सज्जनसिंह खटल्यातील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाचेही न्या. मुधोळकर सदस्य होते. या खटल्यात न्या. मुधोळकर आणि न्या. हिदायतुल्ला यांनी वेगळी निकालपत्रे लिहून काही मुद्द्यांवर बहुमताच्या निर्णयाशी असहमती व्यक्त केली. (बहुमताचे निकालपत्र सरन्यायाधीश प्र.बा. गजेंद्रगडकर यांनी लिहिले होते.)

न्या. मुधोळकर भारतीय प्रेस परिषदेचे (प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया) पहिले अध्यक्ष होते.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, १९६१.*

म

## मुल्ला, दिनशा फरदूनजी

### ज्येष्ठ वकील आणि न्यायविद

### १८ एप्रिल १८६८ – २७ एप्रिल १९३४

दिनशा फरदूनजी मुल्ला यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शालेय शिक्षण सर जे.जे. पारशी बेनेव्होलंट इन्स्टिट्यूशनमध्ये झाले. मॅट्रिकची परीक्षा ते वयाच्या चौदाव्या वर्षी उत्तीर्ण झाले. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून १८८६ मध्ये ते इतिहास आणि राज्यशास्त्र घेऊन बी.ए. आणि १८८८ मध्ये इंग्रजी



आणि फारसी घेऊन एम.ए. उत्तीर्ण झाले. त्यांना एल्फिन्स्टन महाविद्यालयातच दोन वर्षांसाठी फारसीची फेलोशिप मिळाली. त्यात ते नवागत विद्यार्थ्यांना फारसी शिकवीत असत. नंतर १८९२ मध्ये त्यांनी एलएल.बी. ची पदवी प्रथम वर्गात मिळविली आणि त्यांना जज् स्पेन्सर पारितोषिक मिळाले. १८९५ मध्ये ते सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांनी सॉलिसिटर म्हणून व्यवसायास सुरुवात केली. त्यावेळी हिरालाल सरैया हे त्यांचे भागीदार होते. नंतर त्यांनी मुल्ला अँड मुल्ला या सुप्रसिद्ध फर्मची स्थापना केली.

१९०० मध्ये मुल्ला यांची मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. १९०३ ते १९०९ पर्यंत ते त्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. हे पद मिळविणारे ते पहिले सॉलिसिटर. त्यांची प्राचार्यपदाची कारकीर्द अतिशय यशस्वी झाली. दरम्यान, त्या काळच्या नियमानुसार मुल्ला यांनी आपली प्रॅक्टिस एक वर्षभर स्थगित ठेवली आणि १९०८ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. त्यांचे कायद्याचे आणि न्यायालयीन निर्णयांचे (केस लॉ) ज्ञान विलक्षण होते.

१९१५ मध्ये त्यांची जमीन-अधिग्रहण प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी स्थापन झालेल्या अपील न्यायाधिकरणाच्या (ट्रायब्युनल ऑफ अपील) अध्यक्षपदी नियुक्ती झाली. या पदावरील त्यांची सहा वर्षांची कारकीर्दही अतिशय यशस्वी झाली. १९२२ मध्ये काही काळ त्यांनी मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट-जनरल म्हणून काम पाहिले, तर नंतर काही काळ मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून. या अल्पकालीन नियुक्तीतही एक आदर्श न्यायाधीश म्हणून त्यांचा लौकिक झाला. १९२८ मध्ये मुल्ला

यांची कलकत्ता विद्यापीठात 'टागोर विधि अधिव्याख्याता' (टागोर लॉ लेक्चरर) म्हणून नियुक्ती झाली. १९२८ मध्येच त्यांची नियुक्ती व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे कायदेविषयक सदस्य म्हणून झाली. या दोन्ही पदांवर मुंबई इलाख्यातील व्यक्तीची नियुक्ती होण्याची ती पहिलीच वेळ होती. १८८२ च्या 'संपत्ती हस्तांतरण कायद्या'मध्ये महत्त्वाच्या दुरुस्त्या करणारे विधेयक मुल्ला यांनी या काळात तयार केले. १९२९ मध्ये त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

१९३० मध्ये मुल्ला यांची नियुक्ती प्रिव्ही काउन्सिलच्या न्यायालयीन समितीचे सदस्य म्हणून झाली. हा मान मिळालेले ते चौथे भारतीय होत. (त्यापूर्वी सय्यद अमीर अली, लॉर्ड सिन्हा आणि सर विनोद मित्तर प्रिव्ही काउन्सिलचे सदस्य झाले होते.) या पदावर ते दोन वर्षे होते. १९३० मध्येच त्यांना 'सर' हा किताब मिळाला. या दोन वर्षांच्या काळात प्रिव्ही काउन्सिलने हिंदू कायद्यासंबंधीच्या अनेक गुंतागुंतीच्या खटल्यांत महत्त्वाचे निर्णय दिले. दोन वर्षांनी मुल्ला यांनी प्रकृतीच्या कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा दिला.

तथापि कायद्याच्या क्षेत्रात सर दिनशा यांचे नाव सर्वतोमुखी झाले, आजही आहे आणि यापुढेही राहील, ते म्हणजे त्यांनी अनेक महत्त्वाच्या कायद्यांवर लिहिलेल्या प्रमाणभूत ग्रंथांमुळे. 'कोड ऑफ सिव्हिल प्रोसीजर', 'इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट', 'इंडियन रजिस्ट्रेशन ॲक्ट', 'ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट' त्याचप्रमाणे हिंदू कायदा व मुस्लिम कायदा यावरील मुल्लांचे जाडजूड, पण सुगम आणि सुबोध विवेचन करणारे ग्रंथ दशकानुदशके वकील व न्यायाधीश या दोघांसाठी अपरिहार्य बनले आहेत. त्यांच्या नव्या सुधारित आवृत्त्या नियमितपणे प्रकाशित होतात. या ग्रंथांमुळे सर दिनशा यांना श्रेष्ठ वकिलाप्रमाणेच श्रेष्ठ न्यायविद म्हणून मान्यता मिळाली.

१९३१ मध्ये मुंबई विद्यापीठाने सर दिनशा यांना 'डॉक्टर ऑफ लॉज' ही सन्मानार्थ पदवी दिली. त्यानंतर काही काळाने लिंकन्स इन्‌ने 'ऑनररी बेंचर' म्हणून त्यांची निवड केली. सर दिनशा हे अतिशय सुसंस्कृत, शालीन आणि मनमिळाऊ होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वत:ची बुद्धी, ज्ञान आणि मेहनतीच्या बळावर त्यांनी कायद्याच्या क्षेत्रातली बहुतेक सगळी अत्युच्च शिखरे पादाक्रान्त केली.

– शरच्चंद्र पानसे

## मेकॉले, टॉमस बॅबिंग्टन

**'इंडियन पीनल कोड' चा जनक**

**२५ ऑगस्ट १८०० – २८ डिसेंबर १८५९**



लॉर्ड मेकॉले या नावाने भारतात सर्वांना परिचित असलेला टॉमस बॅबिंग्टन मेकॉले हा एक प्रख्यात इंग्रज इतिहासकार, लेखक आणि राजकीय नेता होता. इंग्लंडमधील लायसेस्टरशायर परगण्यातील रॉथली टेम्पल येथे त्याचा जन्म झाला. अगदी लहानपणापासूनच त्याला लेखनाचे वेडही होते आणि अंगही होते. त्याचे शालेय शिक्षण एका खासगी शाळेत झाले. वयाच्या अठराव्या वर्षी त्याने केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यावर १८२६ मध्ये तो बॅरिस्टर झाला. परंतु वकिलीत त्याचे मन रमले नाही. लेखन आणि राजकारण यांची त्याला आवड होती. १८३० मध्ये तो हाउस ऑफ कॉमन्समध्ये प्रथम निवडून आला. तो ब्रिटनमधील राजकीय सुधारणांचा प्रारंभकाळ होता. १८३३ च्या भारतासंबंधीच्या विधेयकावर मेकॉलेने महत्त्वाचे भाषण केले. त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यात मेकॉलेचा महत्त्वाचा वाटा होता.

योगायोगाने या कायद्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या सुप्रीम काउन्सिलचा सदस्य म्हणून मेकॉलेची नियुक्ती झाली आणि १८३४ मध्ये तो

म

भारतात आला. सुप्रीम काउन्सिलचा सदस्य या नात्याने मेकॉलेने अनेक महत्त्वाचे अहवाल (मिनिट्स्) लिहिले. भारतात ब्रिटिश सरकारचे शिक्षणविषयक धोरण काय असावे यावर मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. या नात्याने मेकॉलेने लिहिलेल्या प्रसिद्ध 'मिनिट्स्'च्या आधारे नंतर संपूर्ण शैक्षणिक धोरण आखले गेले आणि इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारले गेले. मेकॉलेवर आणि त्याच्या या शिक्षणपद्धतीवर आजपर्यंत कितीही टीका झाली असली, तरी थोड्याफार फरकाने तीच शिक्षणपद्धती आजही अस्तित्वात आहे. ही पद्धती हळूहळू देशभर राबविली गेली. अशाच प्रकारचे कार्य मेकॉलेच्या थोडे आधी पश्चिम भारतात माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनने केले होते. एल्फिन्स्टननेही इंग्रजीचे शिक्षण आणि इंग्रजीतून शिक्षण या धोरणाचा पुरस्कार केला होता.

मेकॉलेचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे भारतीय दंड संहितेची (इंडियन पीनल कोड) निर्मिती. शिक्षण समितीप्रमाणेच १८३३ च्या कायद्यानुसार नेमल्या गेलेल्या लॉ कमिशनच्या अध्यक्षपदीही मेकॉलेची नियुक्ती झाली. या कमिशनने १८३५ मध्ये या दंड संहितेचा पहिला मसुदा तयार केला. त्यावर अनेक वर्षे तपशिलवार विचार होऊन अखेर १८६० मध्ये 'इंडियन पीनल कोड' ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेशात लागू झाले. कायद्यातील शब्दप्रयोग कसे असावेत याचा तो एक उत्कृष्ट नमुना आहे. लिखित कायदा, त्याच्या आधारे समाजजीवनाचे नियमन आणि त्या कायद्याचे उल्लंघन करण्याऱ्या शासन, ही कायद्याच्या राज्यांची मूलभूत धारणा. तिला मूर्त स्वरूप देऊन कायद्याच्या राज्याचा पाया अखिल भारतीय पातळीवर 'इंडियन पीनल कोड'ने घातला. खऱ्या अर्थाने तेथूनच आजच्या भारताच्या आणि अर्थातच आजच्या महाराष्ट्राच्याही, जडणघडणीस सुरुवात झाली. असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. याही विषयात असेच कार्य मेकॉलेच्या आधी एल्फिन्स्टनने पश्चिम भारतात केले होते; त्याने १८२७ मध्ये 'बॉम्बे कोड ऑफ रेग्युलेशन्स' तयार करवून दिवाणी कायद्याची जवळजवळ एक समग्र संहिता आणि दिवाणी न्यायालयांची एक समग्र व्यवस्था बनवून अंमलात आणली. अशीच व्यवस्था अशाच प्रकारे 'रेग्युलेशन्स' तयार करून कॉर्नवॉलिसने बंगालमध्येही अमलात आणली होती.

सारांश, आधुनिक भारताच्या किंवा महाराष्ट्राच्या जडणघडणीचा विचार करताना-कायदा आणि न्याय यांच्या संदर्भात-अखिल भारतीय पातळीवर मेकॉले आणि पश्चिम भारतीय पातळीवर एल्फिन्स्टनने कायद्याचे राज्य आणि न्यायाची व्यवस्था यांचा पाया घातला असे मानले जाते. ही संपूर्ण व्यवस्था जवळजवळ जशीच्या तशी आजही अस्तित्वात आहे. एल्फिन्स्टनच्या 'कोड'मधील बरेच विनियम (रेग्युलेशन्स) नंतरच्या काळात रद्द झाले असले, तरी काही आजही तांत्रिकदृष्ट्या अस्तित्वात आहेत. मेकॉलेचे इंडियन पीनल कोड मात्र संपूर्णपणे आणि जवळपास जसेच्या तसे आज अस्तित्वात व अमलात आहे. इंग्रजी राजवटीनंतर भारतात झालेला सर्वांत मोठा बदल म्हणजे देशभरात सर्वत्र समान न्यायपद्धतीचा प्रारंभ झाला. त्या प्रक्रियेत मोठा वाटा या कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेचा होता.

– शरच्चंद्र पानसे

* * *

म

# र

## रांगणेकर, सजबा शंकर
**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**२० डिसेंबर १८७८**



सजबा शंकर रांगणेकर यांचा जन्म मुंबईला झाला. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयातून इंग्रजी विषय घेऊन बी.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर ते अगोदर रॉबर्ट मनी स्कूलमध्ये शिक्षक आणि नंतर माझगावमधील इझ्रेलाइट हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. १९०३ च्या सुरुवातीस ते वेंगुर्ला येथे इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक म्हणून गेले; त्याच वर्षाच्या शेवटी ते एलएल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९०४ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिलीस सुरुवात केली. ते मुंबई आणि इतर ठिकाणच्या कनिष्ठ न्यायालयांमध्येही खटले लढवीत असत. पाच वर्षे वकिली केल्यानंतर ते इंग्लंडला गेले आणि जून १९०९ मध्ये लिंकन्स इन्‌मधून बॅरिस्टर झाले. बॅरिस्टरच्या परीक्षेत ते पहिल्या वर्गात पहिले आले व त्यांना अनेक बक्षिसे मिळाली.

स्वदेशी परतल्यावर रांगणेकर यांनी उच्च न्यायालयाच्या अपील आणि मूळ या दोन्ही शाखांत तसेच इतर न्यायालयात पुन्हा वकिली सुरू केली. डिसेंबर १९१६ ते मे १९२२ या काळात गाजलेल्या अनेक महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांत वकील या नात्याने रांगणेकरांचा सहभाग होता. त्यांत नाशिक कट खटल्याचाही समावेश होता.

सप्टेंबर १९२४ मध्ये त्यांची नियुक्ती मुंबईचे मुख्य इलाखा दंडाधिकारी (चिफ प्रेसिडन्सी मॅजिस्ट्रेट) म्हणून करण्यात आली. त्या पदावर ते दोन वर्षे होते. एवढ्या अल्प कारकिर्दीतील त्यांच्या कार्याची जाहीर प्रशंसा मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांनी केली. रांगणेकर यांची प्रथम ऑगस्ट १९२६ मध्ये चार महिन्यांसाठी व नंतर पुन्हा जून १९२७ ते ऑक्टोबर १९२७ या काळात मुंबई उच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. नंतर जून १९२८ मध्ये त्यांची नियुक्ती उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. एप्रिल १९२९ मध्ये त्यांना कायम न्यायाधीश नेमण्यात आले. १९३६ मध्ये काही काळ त्यांनी कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले. दंडाधिकारीपदावरून थेट उच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नियुक्त झालेले ते एकमेव न्यायाधीश होत. जून १९३८ मध्ये त्यांना ‘सर’ ही पदवी मिळाली. डिसेंबर १९३८ मध्ये ते निवृत्त झाले.

न्या. रांगणेकर यांनी मूळ आणि अपील या उच्च न्यायालयाच्या दोन्ही शाखांत न्यायदान केले. त्यांनी अनेक गाजलेल्या खटल्यांत महत्त्वाचे निर्णय दिले. त्यांत विशेषत: हिंदू कायदा, कंपनी कायदा, व्यापारविषयक कायदा, वकिलांसंबंधी आणि सॉलिसिटर मंडळींसंबंधीचे नियम इत्यादी विविध विषयांतील गुंतागुंतीचे मुद्दे समाविष्ट होते. कुठल्याही खटल्यातील कायद्याचे मुद्दे न्या. रांगणेकर त्वरित समजून घेत आणि त्यांवर दोन्ही बाजूंच्या वकिलांशी चर्चा करीत. त्यामुळे बऱ्याच वेळा खटला पुढे न चालता परस्पर तडजोड होत असे. असे न झाल्यास न्या. रांगणेकर त्वरित निर्णय देत आणि ते सुस्पष्ट व

मुद्देसूद असत. या कार्यपद्धतीमुळे त्यांच्याबद्दल सार्वत्रिक आदराची भावना होती. न्या. रांगणेकर विनयशील, मृदुभाषी, त्याचबरोबर अतिशय मिस्किल व हजरजबाबी म्हणून प्रसिद्ध होते. ते निर्भीड व स्पष्टवक्तेही होते. त्यांना क्रिकेटची खूप आवड होती.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. बॉम्बे लॉ रिपोर्टर, ११३८.*

## रानडे, महादेव गोविंद

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**१८ जानेवारी १८४२ – १६ जानेवारी १९०१**

☞ **मुख्य नोंद – राजकारण खंड**



आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या प्रक्रियेत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सिंहाचा वाटा उचलणारे, मुंबई उच्च न्यायालयाचे तिसरे कायम भारतीय न्यायाधीश, चतुरस्र कर्तृत्वाचे महादेव गोविंद रानडे ऊर्फ माधवराव रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे झाला. त्यांचे वडील गोविंदराव हे तेथे सरकारी नोकरीत होते. नंतर ते कोल्हापूर संस्थानात गेले आणि तेथे खाजगी कारभारीपदापर्यंत चढले. त्यामुळे १८५६ पर्यंत माधवरावांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला झाले.

त्यानंतर वडिलांनी त्यांना मुंबईला पाठविले. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमधून माधवराव १८५९ मध्ये मुंबई विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर ते एल्फिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले आणि तेथून १८६२ मध्ये बी.ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. ती मुंबई विद्यापीठाने घेतलेली पहिली बी.ए. परीक्षा होती. तिच्यात जे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले, त्यांच्यापैकी रानडे हे एक होत. (बाकीचे तिघे म्हणजे सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे आणि वामन आबाजी मोडक हे होत.) रानडे बी.ए. झाल्यावर लगेचच 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाचे संपादक म्हणून त्यांची नेमणूक झाली. नंतर १८६४ मध्ये त्यांनी एम.ए. पदवी प्राप्त केली व लगेच मुंबई विद्यापीठाचे फेलो म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यानंतर १८६६ मध्ये ते एलएल.बी. ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले.

एलएल.बी. झाल्यानंतर रानड्यांनी सरकारी नोकरीत प्रवेश केला. १८६६ ते १८९१ या काळात त्यांना ओरीएंटल ट्रान्सलेटर, अक्कलकोट संस्थानाचे कारभारी, कोल्हापूर संस्थानात न्यायाधीश, एल्फिन्स्टन महाविद्यालयात इंग्रजी आणि इतिहास या विषयांचे प्राध्यापक, स्मॉलकॉज कोर्टात न्यायाधीश, पोलीस मॅजिस्ट्रेट, उच्च न्यायालयात आधी सहायक आणि मग उप–रजिस्ट्रार, अशा विविध नेमणुका कमी –अधिक अवधीसाठी मिळाल्या. १८७१ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाची ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यानंतर कायम न्यायखात्यात राहिले. ॲडव्होकेट म्हणून उच्च न्यायालयात नोंदणी केल्यानंतरही त्यांनी कधी वकिली केली नाही.

त्यांची पहिली नेमणूक पुण्याला कनिष्ठ न्यायाधीश (सबॉर्डिनेट जज्) म्हणून झाली. त्यांचे काम पाहिल्यानंतर सरकारने त्यांना अपिले ऐकून त्यांवर निर्णय देण्याचेही अधिकार दिले. असे अधिकार मिळालेले ते पहिले कनिष्ठ न्यायाधीश होते. पाच वर्षांनंतर त्यांची पुण्याहून नाशिकला बदली करण्यात आली. १८७९ मध्ये त्यांची धुळ्याला बदली झाली. त्यानंतर १८८१ मध्ये त्यांची बदली मुंबईला इलाखा दंडाधिकारी (प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट) म्हणून झाली. तोपर्यंत त्यांनी दिवाणी दाव्यांचेच काम केले होते; आता ते फौजदारी खटल्यांचे काम पाहू लागले. नंतर १८८४ मध्ये त्यांची पुन्हा पुण्याला बदली झाली आणि ते पुण्याच्या स्मॉलकॉज कोर्टाचे न्यायाधीश झाले. १८८५ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरच्या

र

कायदेमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. कायदेमंडळाच्या बैठकीत ते सक्रिय भाग घेत आणि विविध विषयांवर अभ्यासपूर्ण भाषणे करीत. ते कायदेमंडळाचे सदस्य असताना भारत सरकारने संपूर्ण देशासाठी नेमलेल्या आर्थिक समितीवर मुंबई सरकारचे प्रतिनिधी म्हणून त्यांची नेमणूक झाली. दरम्यान त्यांना बढती मिळून आधी त्यांना हंगामी विशेष न्यायाधीश म्हणून आणि नंतर कायम विशेष न्यायाधीश म्हणून नेमण्यात आले. आर्थिक समितीच्या अहवालाला रानड्यांनी आपली सविस्तर भिन्नमतपत्रिका जोडली. १८८७ मध्ये सरकारने त्यांना सी.आय.ई. हा किताब दिला.

सप्टेंबर १८९३ मध्ये न्या. काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांचे निधन झाले. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयात रिकाम्या झालेल्या जागेवर रानड्यांची नियुक्ती नोव्हेंबर १८९३ मध्ये झाली. त्यांची उच्च न्यायालयातील कारकीर्द सात वर्षे दोन महिने इतकी होती. त्यांनी नेहमी उच्च न्यायालयाच्या अपील शाखेतील खटले चालविले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी एकंदर सुमारे ३३७ निकाल दिले. त्यांपैकी सुमारे १५६ निकालपत्रे त्यांनी खंडपीठाची एकमताची म्हणून किंवा स्वत:ची वेगळी म्हणून लिहिली आहेत. हिंदू कायद्यातील विविध प्रश्नांवर त्यांच्यासमोर अनेक खटले आले. यमुनाबाई वि. मनुबाई, कुबेर वि. बुधिया, भगवान वि. मूळजी, महाराणा फतेहसिंहजी वि. कुवर हरिसिंहजी फतेहसिंहजी हे त्यातील विशेष उल्लेखनीय खटले म्हणता येतील. या प्रत्येकात न्यायालयासमोर आलेल्या प्रश्नाचे अतिशय बारकाईने विवेचन करून न्या. रानड्यांनी अचूक निर्णय दिले.

काही महत्त्वाचे फौजदारी खटलेही अपिलांत न्या. रानड्यांसमोर चालले. त्यांतील पहिला खटला कहानजी धरमजी आणि इतर यांनी केलेल्या अपिलाचा होता. त्याला १८९३ मध्ये मुंबईत झालेल्या हिंदू-मुस्लीम दंगलीची पार्श्वभूमी होती. इस्लामपूर येथील ‘प्रतोद’ साप्ताहिकाचे रामचंद्र नारायण यांच्याविरुद्धचा राजद्रोहाचा खटला हा दुसरा महत्त्वाचा फौजदारी खटला होय. यात न्या. रानड्यांनी आपल्या वेगळ्या निकालपत्रात ‘इंडियन पीनल कोड’च्या कलम १२४-अ मधील ‘डिसअफेक्शन’ या शब्दाचा अर्थ बारकाईने विशद करून सांगितला. १८९७ मध्ये पुण्यात झालेल्या रँड व आयर्स्ट यांच्या खुनाबद्दल शिक्षा झालेल्या चापेकर बंधूंचे अपील ज्या खंडपीठासमोर आले, त्यात न्या. रानडे होते. अनंत विनायक पुराणिक खटलाही उल्लेखनीय होता.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर लगेच सरकारी नोकरीत प्रवेश करून, त्यातही बहुतेक काळ विविध ठिकाणी न्यायखात्यात आपले कर्तव्य बजावीत असताना आणि नंतर आयुष्याची शेवटची सात वर्षे उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून आपल्या देशबांधवांची खालच्या न्यायालयांच्या निकालाविरुद्धची अपिले ऐकून त्यांवर निर्णय देताना न्या. रानड्यांनी कायद्याची जाण, व्यापक न्यायबुद्धी, देशभक्ती आणि मानवता यांमध्ये असामान्य समतोल साधून निर्णय दिले. हे सर्व करीत असतानाच त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्व विषयांवर उदंड लेखन केले. ‘राइझ ऑफ द मराठा पॉवर’ हा मोलाचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला, सामाजिक परिषद, प्रार्थनासमाज आणि इतर अनेक व्यासपीठांवरून अनेक व्याख्याने दिली. मुंबई, पुणे व नाशिक येथे जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील सार्वजनिक कार्यांत भाग घेऊन अनेक संस्था स्थापन केल्या. भावी पिढ्यांना प्रेरक ठरेल असे हे विविधांगी चिरस्थायी कार्य करून न्या. रानड्यांनी आधुनिक महाराष्ट्राचा सर्वार्थांनी पाया घातला.

– शरच्चंद्र पानसे

र

**संदर्भ :**


१. *न. र. फाटक; ‘न्या. महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र’, नीलकंठ प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९६६.*

२. *नरेंद्र चपळगांवकर; ‘तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ’, मौज प्रकाशन, २०१०.*


* * *

# ल

## लेंटिन, बख्तावर

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**२५ जुलै १९२७ – २२ एप्रिल २०००**



बख्तावर लेंटिन यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईच्या सेंट मेरीज् हायस्कूल आणि सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये आणि महाविद्यालयीन शिक्षण सेंट झेवियर्स महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. पदवी संपादन केली. त्यानंतर ते इंग्लंडला गेले आणि २६ जानेवारी १९५० रोजी मिडल् टेम्पलमधून बॅरिस्टर झाले. मुंबईला परत आल्यावर त्यांनी त्यावेळचे प्रसिद्ध फौजदारी वकील के.ए.सोमजी यांच्या हाताखाली वकिलीचे धडे घेण्यास सुरुवात केली. २२ मार्च १९५० पासून त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही विभागांत दिवाणी आणि फौजदारी खटले लढविण्यास सुरुवात केली. जरुरीनुसार ते मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायालयातही काम पाहत असत.

२२ मार्च १९६५ रोजी मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून लेंटिन यांची नियुक्ती झाली. १६ एप्रिल १९७० रोजी ते त्या न्यायालयाचे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश झाले. २८ मार्च १९७३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २७ मार्च १९७५ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. २४ जुलै १९८९ रोजी ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतर ते वेळोवेळी लवाद म्हणून काम करीत असत.

१९८६ मध्ये मुंबईच्या जे.जे.रुग्णालयात भेसळयुक्त औषधांमुळे अनेक लोकांचा मृत्यू झाला. या घटनेची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने न्या. लेंटिन यांची एक-सदस्य चौकशी आयोग म्हणून नियुक्ती केली. त्यांनी सतरा महिने चौकशी करून, एकशे वीस साक्षीदारांची साक्ष घेऊन एक महत्त्वपूर्ण अहवाल सादर केला. त्यात राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची अत्यंत निर्भीड आणि सडेतोड चिकित्सा त्यांनी केली.

न्या. लेंटिन यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. त्यांपैकी झुलेलाल पुरस्कार, जागतिक झोरोस्ट्रियन संघटनेचा पुरस्कार, 'रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हिल साउथ'चा 'चॅम्पियन ऑफ ह्युमन राइट्स्' पुरस्कार आणि 'रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअर'चा जीवनगौरव पुरस्कार (लाइफटाइम अचीव्हमेंट ॲवॉर्ड) यांचा विशेष उल्लेख करता येईल.

कडक शिस्तीचे आणि ठाम विचारांचे पण विनयशील आणि सभ्य न्यायाधीश म्हणून न्या. लेंटिन यांचा लौकिक होता.

– शरच्चंद्र पानसे

* * *

# व

## वरियावा, सॅम नरिमन
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**८ नोव्हेंबर १९४०**



सॅम नरिमन वरियावा यांचा जन्म मुंबईत झाला. त्यांचे एलएल.एम. पर्यंतचे सर्व शिक्षण मुंबईतच झाले. २२ जून १९६४ पासून ते मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत वकिली करू लागले. जरुरीप्रमाणे ते मुंबई शहर दिवाणी न्यायालयातही वकिली करीत. ते सिडनहॅम महाविद्यालयात कायद्याचे अर्धवेळ प्राध्यापकही होते.

२१ नोव्हेंबर १९८६ रोजी वरियावा यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. १२ जून १९८७ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. २५ मे १९९९ रोजी त्यांची नियुक्ती दिल्ली उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १५ मार्च २००० रोजी त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. ७ नोव्हेंबर २००५ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

– शरच्चंद्र पानसे

## वाहनवटी, गुलाम एसनजी
**भारताचे विद्यमान ॲटर्नी-जनरल**
**७ मे १९४९**

गुलाम एसनजी वाहनवटी यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयामधून बी.ए. (ऑनर्स) आणि शासकीय विधि महाविद्यालयातून एलएल.बी. या



पदव्या प्रथम वर्गात प्राप्त केल्या. विधि महाविद्यालयात एलएल.बी. करीत असताना ते सेंट झेवियर्स आणि सोफिया महाविद्यालयात विविध विषय शिकवीत असत. १९७२ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीस सुरुवात केली. त्याबरोबरच १९७६ पर्यंत शासकीय विधि महाविद्यालयामध्ये अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी कायद्याच्या विविध विषयांचे अध्यापन केले. अठरा वर्षांच्या अनुभवानंतर १९९० मध्ये त्यांना वरिष्ठ वकील म्हणून मान्यता मिळाली. १९९९ पर्यंत त्यांनी वकिली केली. या काळात त्यांनी मुंबई व इतर उच्च न्यायालये, सर्वोच्च न्यायालय व विविध न्यायाधिकरणांसमोर कायद्याच्या सर्व शाखांमधील विविध प्रकारचे खटले लढविले.

डिसेंबर १९९९ मध्ये त्यांची नियुक्ती महाराष्ट्राचे ‘ॲडव्होकेट-जनरल’ म्हणून झाली. त्यानंतर जून २००४ मध्ये ते भारताचे ‘सॉलिसिटर-जनरल’ आणि जून २००९ मध्ये ‘ॲटर्नी-जनरल’ झाले. या नात्यांनी त्यांनी अनुक्रमे महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात अनेक प्रकरणांत युक्तिवाद केले. त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये वेळोवेळी भारताचे प्रतिनिधित्व केले. सप्टेंबर २००३ ते जून २००४ पर्यंत ते महाराष्ट्र व गोवा बार काउन्सिलचे अध्यक्ष होते.

– शरच्चंद्र पानसे

* * *

# श

## शहा, अजित प्रकाश

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मद्रास व दिल्ली उच्च न्यायालयांचे सरन्यायाधीश**

**१३ फेब्रुवारी १९४८**



अजित प्रकाश शहा यांचा जन्म सोलापूरला वकिलीची परंपरा असलेल्या घराण्यात झाला. त्यांचे वडील प्रकाश शिवलाल शहा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि त्यानंतर महाराष्ट्राचे लोकायुक्त होते.

अजित शहा यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण सोलापूरला झाले. त्यानंतर त्यांनी मुंबईच्या शासकीय विधि महाविद्यालयामधून एलएल.बी. पदवी संपादन केली. १७ एप्रिल १९७५ रोजी त्यांना महाराष्ट्र बार काउन्सिलकडून वकिलीची सनद मिळाली. सुरुवातीची सुमारे दोन वर्षे त्यांनी सोलापूरच्या जिल्हा न्यायालयात वकिली केली. १९७७ पासून ते मुंबई उच्च न्यायालयात वकिली करू लागले. पंधरा वर्षे त्यांनी दिवाणी, फौजदारी, घटनात्मक, सरकारी नोकर व कामगार कायदाविषयक असे सर्व प्रकारचे खटले उच्च न्यायालयात यशस्वीरीत्या लढविले.

१८ डिसेंबर १९९२ रोजी अजित शहा यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ८ एप्रिल १९९४ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. १२ नोव्हेंबर २००५ रोजी त्यांची बदली मद्रास उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. ११ मे २००८ रोजी त्यांची बदली दिल्ली उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १२ फेब्रुवारी २०१० रोजी ते त्या पदावरून निवृत्त झाले.

मुंबई उच्च न्यायालयात असताना न्या. शाह यांनी अनेक खटल्यात महत्त्वाचे निर्णय दिले. आनंद पटवर्धन यांच्या ‘इन मेमरी ऑफ फ्रेंड्स्’, ‘राम के नाम’ आणि ‘आक्रोश’ या तीन लघुपटांवर केंद्र सरकारने किंवा दूरदर्शनने घातलेली बंदी आपल्या एका निर्णयाद्वारे त्यांनी उठविली आणि दूरदर्शनला हे तीन लघुपट प्रक्षेपित करण्याचा आदेश दिला आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाला (सेन्सॉर बोर्ड) त्यांना प्रमाणपत्र देण्याचा आदेश दिला.

मुस्लीम महिलांची पोटगी आणि हिंदू पुरुषाने दुसरे लग्न केल्यास अशा दुसऱ्या पत्नीची पोटगी या प्रश्नांवर, यशस्विनी मर्चंट खटल्यात, हवाई सुंदरींच्या वयाच्या प्रश्नावर, त्याचप्रमाणे एकस्व (पेटंट) कायदा, कामगार कायदे, ॲडमिरॅल्टी कायदा, इत्यादींसंबंधी अनेक प्रकरणांतही न्या. शहा यांनी महत्त्वाचे निर्णय दिले. ‘स्क्रिझोफ्रेनिया’ झाल्याच्या कारणावरून सक्तीने निवृत्त केल्या गेलेल्या एका परिचारिकेला निवृत्तीच्या तारखेपर्यंत पूर्ण पगार मिळण्याचा हक्क असल्याचा निर्णयही त्यांनी दिला.

विविध मुद्द्यांवरील जनहितयाचिकांवरही न्या. शहा यांनी निर्भीड निर्णय दिले. मुंबईतील गिरगाव आणि जुहू चौपाट्यांच्या, तसेच महाबळेश्वर अणि पाचगणी या गिरिस्थानांच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी सरकारला दिले. अंध फेरीवाल्यांविरुद्ध कोणतीही कारवाई न

करण्याचे आदेश त्यांनी मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या प्रशासनांना दिले. अपंगांसाठी असलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेशही त्यांनी सरकारला दिले. माजी मंत्रिमंडळ सचिव भालचंद्र देशमुख यांनी दाखल केलेल्या एका जनहितयाचिकेवर निर्णय देताना वेळोवेळी राजकीय पक्षांकडून केले जाणारे 'बंद' बेकायदेशीर असल्याचे घोषित केले आणि एका राजकीय पक्षाला त्याबद्दल वीस लाख रुपये दंडही केला. मद्रास उच्च न्यायालयात असताना त्यांनी रेल्वे आणि चेन्नई महानगर वाहतूक महामंडळाला, अपंगांसाठी योग्य त्या सोयी उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. त्यांनी लोक-अदालत चळवळीला प्रोत्साहन दिले, लवादाच्या मार्गाने खटल्यांचा निकाल लावण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांना आणि ज्येष्ठ वकिलांना लवाद म्हणून काम करण्यास प्रवृत्त केले, सर्व पातळ्यांवरील न्यायाधीशांना लिंग-भेदाधारित भेदभावविरोधी प्रबोधन करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. न्यायाधीशांनी आचारविचार, भूमिका व न्यायदान-प्रक्रियेत बदलत्या काळाला व बदलत्या परिस्थितीला अनुरूप बदल घडवावयास हवा, असा न्या. शहा यांचा आग्रह असे.

– शरच्चंद्र पानसे

## शाह, जयंतीलाल छोटालाल
**भारताचे सरन्यायाधीश**
**२२ जानेवारी १९०६ –**



जयंतीलाल छोटालाल शाह यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण अहमदाबादमधील आर.सी. हायस्कूलमध्ये तर उच्च शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयामध्ये झाले. एलएल.बी. पदवी संपादन केल्यावर त्यांनी अगोदर अहमदाबाद येथील जिल्हा न्यायालयात व नंतर मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली. १९४९ मध्ये त्यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून झाली. पुढे १२ ऑक्टोबर १९५९ रोजी त्यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशपदी झाली. १२ डिसेंबर १९७० रोजी ते भारताचे सरन्यायाधीश झाले आणि २१ जानेवारी १९७१ रोजी त्या पदावरून निवृत्त झाले.

न्या. शाह मुंबई उच्च न्यायालयात असताना त्यांच्यासमोर आलेला एक महत्त्वाचा खटला म्हणजे त्या काळात गाजलेला पुण्याचे डॉ. अनंत चिंतामण लागू यांच्या विरुद्धचा खुनाचा खटला होय. लक्ष्मीबाई कर्वे यांच्या खुनाबद्दल डॉ. अनंत लागू यांना पुण्याच्या जिल्हा न्यायालयाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध त्यांनी केलेले अपील न्या. शाह व न्या. व्ही. एस. देसाई यांच्या खंडपीठाने फेटाळून लावले आणि फाशीची शिक्षा कायम केली. तिच्यावर नंतर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले.

सर्वोच्च न्यायालयातील न्या. शाह यांच्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत न्यायालयासमोर अनेक महत्त्वाचे खटले आले. त्यांतील गोलकनाथ, बँक राष्ट्रीयीकरण आणि माजी संस्थानिकांचे तनखे, हे तीन खटले सर्वाधिक गाजले. या तिन्ही खटल्यांची सुनावणी अकरा न्यायाधीशांच्या पीठांसमोर झाली. या सर्वांमध्ये न्या. शाह यांचा सहभाग होता. बँक राष्ट्रीयीकरण खटल्याच्या वेळी त्यावेळचे सरन्यायाधीश न्या. हिदायतुल्ला हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहत असल्याने न्या. शाह हंगामी सरन्यायाधीश म्हणून काम पाहत होते; त्यामुळे बँक राष्ट्रीयीकरण खटला ज्या पीठासमोर चालला, त्याच्या अध्यक्षपदी न्या. शाह होते. या तिन्ही खटल्यांतील न्यायालयाचे बहुमताचे निर्णय सरकारच्या विरुद्ध गेले आणि त्यांच्यावर वादविवादांचे काहूर उठले. तिन्ही खटल्यांत न्या. शाह बहुमताच्या बाजूने होते.

१९७५ मध्ये देशात आणीबाणी आली. ती उठल्यानंतर १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत जनता

श

पक्ष केंद्रात अधिकारारूढ झाला. जनता सरकारने आणीबाणीच्या काळातील घटनांची चौकशी करण्यासाठी न्या. शाह यांची एक-सदस्य आयोग म्हणून नियुक्ती केली. 'शाह आयोग' म्हणून अजूनही हा आयोग ओळखला जातो. आपल्या निर्भीड आणि सडेतोड अहवालात न्या. शाह यांनी आणीबाणीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. हा अहवाल गेली कित्येक वर्षे दुर्मीळ झाला होता. इरा शेझियन यांनी तो अलीकडेच पुन:प्रकाशित केला आहे.

– शरच्चंद्र पानसे

## शाह, लल्लुभाई आशाराम
**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**४ फेब्रुवारी १८७३ –**

लल्लुभाई आशाराम शाह यांचा जन्म गुजरातमध्ये एका प्रतिष्ठित कुटुंबात झाला. त्यांचे वडील आशाराम



दलीचंद शाह काठेवाडमधील अनेक संस्थानांचे कारभारी होते. लल्लुभाई शहा यांचे शालेय शिक्षण अहमदाबाद हायस्कूलमध्ये व उच्च शिक्षण अहमदाबादच्या गुजरात महाविद्यालयामध्ये झाले. १८९२ मध्ये गणितात एम.ए. आणि १८९४ मध्ये एलएल.बी. या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. त्यानंतर १८९५ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिली सुरू केली. त्यांना यशस्वी होण्यास वेळ लागला नाही. त्यांचे कायद्याचे ज्ञान आणि वकिलीतील कसब यांमुळे ते प्रसिद्धीस आले.

१९१० मध्ये आणि पुन्हा १९११ आणि १९१२-१३ मध्ये हंगामी सरकारी वकील म्हणून लल्लुभाईंची नेमणूक झाली. ते एक अत्यंत उदार सरकारी वकील होते! केवळ आरोपी दोषी ठरून त्याला शिक्षा व्हावी असे नव्हे, तर न्याय झाला पाहिजे आणि तो होण्याच्या प्रक्रियेमध्ये आपण न्यायालयाला साहाय्य केले पाहिजे, असे ते मानीत.

मार्च १९१३ मध्ये न्या.नारायण गणेश चंदावरकरांनी न्यायाधीशपदाचा राजीनामा दिला, तेव्हा त्यांच्या जागी लल्लुभाईंची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यावेळी लल्लुभाईंचे वय जेमतेम ४० वर्षांचे होते. आताच म्हटल्याप्रमाणे न्यायदान हे महत्त्वाचे, असे न्या. लल्लुभाई मानीत असल्याने, कायद्याच्या तांत्रिक बाबींच्या पलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे त्यांचे नेहमी धोरण असे. त्यांचा मूळ विषय गणित असल्याने कुठल्याही खटल्यामधील विवाद्य प्रश्नांचे किंवा मुद्द्यांचे तर्कशुद्ध आणि सूत्रबद्ध विश्लेषण आणि विवेचन ते सहजगत्या करीत.

त्या काळात हिंदू कायद्यासंबंधीचे अनेक खटले न्यायालयासमोर सतत येत असल्याने, त्यातील बारकावे समजावेत म्हणून न्या. शाह न्यायाधीश झाल्यानंतर संस्कृत शिकले आणि प्राचीन स्मृती वगैरे ग्रंथांतील वचनांचा अर्थ बदलत्या काळानुरूप लावण्याचे प्रयत्न त्यांनी केले.

न्या. शाह यांनी काही काळ उच्च न्यायालयाचे कार्यवाहक सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले.


स्वातंत्र्यपूर्व काळातील मुंबई उच्च न्यायालयाच्या भारतीय न्यायाधीशांत न्या. लल्लुभाई शाह यांचे स्थान महत्त्वाचे आहे, यात शंका नाही.

– शरच्चंद्र पानसे

## शेलत, जयशंकर मणिलाल
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**
**१६ जुलै १९०८**

जयशंकर मणिलाल शेलत यांचा जन्म उमरेठ येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण उमरेठ येथे आणि नंतर महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. तेथून इंग्रजी विषय घेऊन बी.ए.ची. पदवी घेतल्यानंतर शेलत लंडनला गेले

श



आणि त्यांनी लंडन विद्यापीठाच्या बी.ए. आणि एम.ए. या पदव्या संपादन केल्या. यातील एम.ए. पदवीसाठी त्यांनी ‘द क्रिएशन ऑफ दि सिनेट इन द यू.एस. कॉन्स्टिट्यूशन’ या विषयावर प्रबंध सादर केला. जानेवारी १९३३ मध्ये ते इनर टेंपलमधून बॅरिस्टर झाले. स्वदेशी परत आल्यावर ऑक्टोबर १९३३ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही विभागात त्यांनी पंधरा वर्षे वकिली केली.

१ सप्टेंबर १९४८ रोजी शेलत यांची मुंबई शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. जानेवारी १९५७ मध्ये ते त्या न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले. ६ जानेवारी १९५७ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून आणि २४ नोव्हेंबर १९५७ रोजी कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. १ मे १९६० रोजी मुंबई राज्याचे विभाजन होऊन वेगळे गुजरात राज्य अस्तित्वात आल्यावर न्या. शेलत गुजरात उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. २३ मे १९६३ रोजी त्यांची नियुक्ती गुजरात उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. २४ फेब्रुवारी १९६६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

मुंबई उच्च न्यायालयातील न्या. शेलत यांच्या कारकिर्दीत त्यांच्यासमोर आलेला सर्वांत महत्त्वाचा खटला म्हणजे नानावटी प्रकरणातील फौजदारी खटला होय. मुळात हा खटला मुंबई शहर सत्र न्यायालयात ज्यूरीसमोर चालला. ज्यूरीने आरोपी नानावटी निर्दोष असल्याचा निकाल बहुमताने दिला, परंतु सत्र न्यायाधीश त्याच्याशी असहमत झाल्याने त्यांनी सदर खटला (त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यातील तरतुदीनुसार) निर्णयासाठी उच्च न्यायालयाकडे पाठविला. त्याची सुनावणी न्या. शेलत आणि न्या. वि.अ. नाईक यांच्या खंडपीठापुढे झाली. त्यांनी ज्यूरीचा निर्णय अमान्य करून नानावटीस जन्मठेपेची शिक्षा दिली. ती राज्यपालांनी तडकाफडकी स्थगित केल्याने गुंतागुंतीचे घटनात्मक प्रश्न उभे राहिले; त्याची सुनावणी पाच न्यायाधीशांच्या विशेष पूर्णपीठापुढे झाली. पुढे नानावटीची जन्मठेप सर्वोच्च न्यायालयाने कायम केली.

न्या. शेलत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाल्यानंतर गोलकनाथ, बँक राष्ट्रीयीकरण, माजी संस्थानिकांचे तनखे आणि केशवानंद भारती हे अत्यंत महत्त्वाचे खटले न्यायालयासमोर आले. यातील पहिल्या तीन खटल्यांतील प्रत्येकी अकरा आणि केशवानंद भारतीमधील तेरा न्यायाधीशांच्या विशेष पीठांचे न्या. शेलत सदस्य होते. या सर्व खटल्यांतील बहुमताचे निर्णय सरकारच्या विरुद्ध गेले; वरील प्रत्येक खटल्यात न्या. शेलत बहुमतात होते. केशवानंद भारती खटल्याची सुनावणी संपल्यानंतर काही काळ न्या. शेलत यांनी भारताचे हंगामी सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले. या अवधीत त्यांच्या नेतृत्वाखालील सात न्यायाधीशांच्या एका पीठाने ‘प्रतिबंधक स्थानबद्धते’च्या मुद्द्यावरील एका महत्त्वाच्या खटल्यात एकमताने सरकारच्या विरुद्ध निर्णय दिला.

एप्रिल १९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्याचा निर्णय जाहीर झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी सरन्यायाधीश सिक्री निवृत्त झाले; त्यांच्यानंतर न्या.शेलत सर्वांत ज्येष्ठ असल्याने प्रथेनुसार त्यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती होणे अपेक्षित होते, परंतु त्यांना आणि त्यांच्यानंतरच्या न्या. हेगडे आणि न्या. ग्रोव्हर यांना डावलून सरकारने चौथ्या क्रमांकावरील न्या. राय यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केली. याच्या निषेधार्थ या तिन्ही न्यायाधीशांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना काही काळ न्या. शेलत आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी दिल्या जाणाऱ्या जवाहरलाल नेहरू पुरस्कारासाठी असलेल्या निवड समितीचे सदस्य होते.


– शरच्चंद्र पानसे

## श्रीकृष्ण, बेलूर नारायणस्वामी

*बी. एन. श्रीकृष्ण*

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**

**२१ मे १९४१**



बेलूर नारायणस्वामी (बी.एन.) श्रीकृष्ण यांचा जन्म मुंबईला झाला. त्यांचे शिक्षण मुंबईतच झाले. बी. एस्सी. पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी शासकीय विधि महाविद्यालयातून एलएल.बी आणि मुंबई विद्यापीठातून एलएल.एम. या पदव्या संपादन केल्या. २३ डिसेंबर १९६२ रोजी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीस सुरुवात केली. कामगार कायदा आणि औद्योगिक कायद्यावर त्यांचे विशेष प्रभुत्व आहे. अनेक व्यावसायिक संस्था व संघटनांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. विशेषत: अमेरिकेतील 'इंडिस्ट्रिअल रिलेशन्स् रिसर्च असोसिएशन' आणि लंडनच्या 'इंटरनॅशनल बार असोसिएशन'चे ते सदस्य होते.

३० जुलै १९९० रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून श्रीकृष्ण यांची नियुक्ती झाली. ३ ऑक्टोबर १९९१ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. डिसेंबर १९९२ – जानेवारी १९९३ मध्ये मुंबईत झालेल्या दंगलींची चौकशी करण्यासाठी एक-सदस्य आयोग म्हणून न्या. श्रीकृष्ण यांची नियुक्ती करण्यात आली. आपल्या निर्भीड अहवालात त्यांनी या दंगलीची सखोल कारणमीमांसा केली आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील आपल्या कारकिर्दीच्या काळात न्या. श्रीकृष्ण यांनी 'संयुक्त राष्ट्र मानवी हक्क उच्चायोगा'ने आयोजित केलेल्या अनेक मानवी हक्कांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदांत भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांचे मानवी हक्कांविषयीचे शोधनिबंध विविध जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

६ सप्टेंबर २००१ रोजी न्या. श्रीकृष्ण यांची नियुक्ती केरळ उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून करण्यात आली. ३ ऑक्टोबर २००२ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. २० मे २००६ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नेमण्यात आलेल्या सहाव्या वेतन आयोगाचे ते अध्यक्ष होते.

तेलंगणाच्या प्रश्नावर विचार करून त्यावर उपाय सुचविण्यासाठी न्या. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती जानेवारी २०१० मध्ये नेमण्यात आली. या समितीने वर्षभरात आपला अहवाल सादर केला आणि विविध पर्याय सुचविले.

– शरच्चंद्र पानसे

* * *

श

# स

## साठे, सत्यरंजन पुरुषोत्तम

**ज्येष्ठ न्यायविद**

**२७ मार्च १९३१ – १० मार्च २००६**



सत्यरंजन पुरुषोत्तम साठे यांचा जन्म अमरावती येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण त्या वेळच्या मध्य प्रदेशात झाले. आय.एल.एस. विधि महाविद्यालयातून एलएल.बी. आणि एलएल.एम. या पदव्या त्यांनी संपादन केल्या. (त्याकाळी एलएल.एम.चे वर्गही विधि महाविद्यालयामध्येच भरत असत.)

कायद्याच्या अध्यापनाच्या, संशोधनाच्या आणि लेखनाच्या क्षेत्रांतील डॉ. साठे यांच्या प्रदीर्घ आणि धवल कारकिर्दीची सुरुवात बनारस हिंदू विद्यापीठापासून झाली. नोव्हेंबर १९५७ ते मे १९५८ या अवधीत ते तेथे कायदा विद्याशाखेत अधिव्याख्याता (लेक्चरर) होते. त्यानंतर जून १९५८ ते एप्रिल १९६० या काळात ते दिल्लीला ‘इंडियन लॉ इन्स्टिट्यूट’मध्ये संशोधन अधिकारी होते. तेथून ते मुंबई विद्यापीठात आले. तेथे ते कायदा विभागात एप्रिल १९६० ते डिसेंबर १९६६ अधिव्याख्याता आणि नंतर जानेवारी १९६७ ते मे १९७६ प्रपाठक होते. अधिव्याख्याता असतानाच १९६४–६५ मध्ये ‘रेमंड इंटरनॅशनल फेलोशिप’ मिळाल्याने ते अमेरिकेत गेले. शिकागोमधील ‘नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ लॉ’मधून त्यांनी ‘डॉक्टर ऑफ ज्युरिडिकल सायन्स’ (एस.जे.डी.) ही पदवी संपादन केली.

डॉ. साठे ज्या महाविद्यालयाचे एकेकाळी विद्यार्थी होते, त्या पुण्याच्या आय.एल.एस. विधि महाविद्यालयाचे ते जून १९७६ मध्ये प्राचार्य झाले. पंधरा वर्षांहून अधिक काळ म्हणजे नोव्हेंबर १९९१ पर्यंत त्यांनी महाविद्यालयाची धुरा अत्यंत समर्थपणे आणि यशस्वीरीत्या सांभाळली. याच अवधीत एक वर्षभर (एप्रिल १९८५ ते एप्रिल १९८६) ते पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू होते. कायदेविषयक प्रश्नासंबंधी प्रगत संशोधनास चालना आणि उत्तेजन देण्यासाठी इंडियन लॉ सोसायटीच्या विद्यमाने त्यांनी ‘इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड लीगल स्टडीज्’ (आय.ए.एल.एस.) या संस्थेची स्थापना केली. नोव्हेंबर १९९१ मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ. साठे या संस्थेचे मानद संचालक झाले. याशिवाय २००१ पासून अखेरपर्यंत ते पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांची ही नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाने केली होती.

आय.एल.एस. विधि महाविद्यालयाचे प्राचार्य, ‘आय.ए.एल.एस.’चे मानद संचालक आणि नंतर डेक्कन महाविद्यालयाचे अध्यक्ष या मोठ्या आणि महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच डॉ. साठे यांच्याकडे अन्य असंख्य जबाबदाऱ्याही चालत येत असत आणि त्याही ते तेवढ्याच उत्साहाने आणि यशस्वीरीत्या पार पाडीत असत. त्यांपैकी कायद्याशी किंवा कायद्याच्या अध्ययन व अध्यापनाशी संबंधित विशेष महत्त्वाच्या, अ‍ॅकॅडमिक जबाबदाऱ्यांचा उल्लेख करायचा झाल्यास, डॉ. साठे यांनी वेळोवेळी ‘इंडियन लॉ इन्स्टिट्यूट’च्या जर्नलच्या संपादकीय

सल्लागार समितीचे सदस्य, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अभ्यासक्रम विकास केंद्राचे सदस्य, नवी दिल्ली येथील 'पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन सपोर्ट अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर'चे विश्वस्त आणि पुणे विद्यापीठाच्या 'कायदेविषयक सल्लागार समिती'चे सदस्य म्हणून काम पाहिले. याशिवाय ते दिल्ली विद्यापीठाच्या कुलगुरूंनी नेमलेल्या 'लॉ फॅकल्टी रिव्ह्यू कमिटी'चे सदस्य, ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशनाच्या 'लॉ इन इंडिया' या मालेचे सल्लागार, बटरवर्थ्स् कंपनीच्या 'हॅल्सबरीज् लॉज् ऑफ इंडिया' या मालेच्या सल्लागार समितीचे सदस्य आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायदा पॅनलचेही सदस्य होते.

याव्यतिरिक्त १९६६ ते १९७८ डॉ. साठे मुंबईच्या प्रशासकीय कर्मचारी महाविद्यालयामध्ये आणि नंतर पुण्याच्या 'राष्ट्रीय विमा प्रबोधिनी' व 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट', मुंबईची टाटा समाजशास्त्र संस्था व हैदराबादची सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी यांमध्ये अतिथी अधिव्याख्याते होते. त्याप्रमाणे बंगलोरच्या 'नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी' व हैदराबादच्या 'नॅशनल अ‍ॅकॅडमी ऑफ लीगल स्टडीज् अ‍ॅन्ड रिसर्च' या संस्थांचे ते मार्गदर्शक (रिसोर्स पर्सन) होते.

''मी कार्यकर्ता नाही'' असे डॉ. साठे स्वत: म्हणत; तथापि 'अ‍ॅकॅडमिक' विश्वाच्या बाहेरच्या प्रत्यक्षातील जगातल्या जीवनाशी आणि प्रश्नांशी त्यांचा सतत संपर्क असे. वृत्तपत्रांत विविध विषयांवर उद्‌बोधक लेख लिहिण्याव्यतिरिक्त विविध संस्था आणि संघटनांशीही त्यांचा घनिष्ठ संबंध होता. पुण्याच्या 'इंडियन सेक्युलर सोसायटी'चे ते उपाध्यक्ष होते, तर 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज'चे आणि 'शिशुआधार' या संस्थेचे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे 'इचलकरंजी एज्युकेशन एन्डॉवमेंट फंड'चे ते १९७८ पासून विश्वस्त होते.

विविध विद्यापीठांच्या किंवा इतर संस्थांच्या निवड समित्यांचे सदस्य म्हणूनही डॉ. साठे यांनी वेळोवेळी काम केले. यांमध्ये, अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी मिळणाऱ्या फुलब्राइट फेलोशिप आणि फोर्ड फाउंडेशन आंतरराष्ट्रीय फेलोशिप यांसाठीच्या निवड समित्यांचा, तसेच मुंबई विद्यापीठ, कोचिन विद्यापीठ, दक्षिण गुजरात विद्यापीठ, लखनऊचे बाबासाहेब आंबडकर विद्यापीठ, दिल्लीची 'इंडियन लॉ इन्स्टिट्यूट आणि बंगलोर येथील 'नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी' यांच्या अध्यापक-निवड समित्यांचा उल्लेख करता येईल.

याशिवाय विशेष उल्लेखनीय दोन गोष्टी म्हणजे, विवेक पंडित विरुद्ध महाराष्ट्र राज्य या खटल्यात ठाणे जिल्ह्यातील वेठबिगारांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष १तेथे जाऊन पाहणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने डॉ. साठे यांची नियुक्ती केली; त्याचप्रमाणे नोव्हेंबर १९९४ मध्ये नागपूरमध्ये चेंगराचेंगरी होऊन गोवारी समाजाचे शंभरहून अधिक लोक मृत्युमुखी पडले, या घटनेचीही डॉ. साठे यांनी काही सामाजिक संस्थांच्या वतीने चौकशी केली. १९७७ मध्ये 'कायदेविषयक मदत' (लीगल एड) या संकल्पनेचा समावेश घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांत करण्यात आला. त्याच्या आधीच म्हणजे, १९७६ मध्ये डॉ. साठे यांनी आय.एल.एस. विधि महाविद्यालयामध्ये 'लीगल एड सेंटर' सुरू केले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'वकिलीची कौशल्ये' शिकण्याची प्रयोगशाळा आणि त्याचवेळी भारतीय समाज जवळून समजून घेण्याची संधी' अशा दुहेरी भूमिकेतून त्यांनी या केंद्राची उभारणी केली. हे कार्य आजही चालू आहे.

डॉ. साठे उत्कृष्ट वक्ते होते. इंग्रजीत किंवा मराठीत, कोणताही विषय सुगम व ओघवत्या भाषेत प्रभावीपणे मांडण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे देशात आणि परदेशात, विद्यापीठांतील परिसंवाद किंवा इतर व्यासपीठांवरून त्यांनी अनेकानेक महत्त्वपूर्ण व्याख्याने दिली. १९८३ ते २००२ या काळात त्यांनी दिलेल्या अशा व्याख्यानांपैकी निवडक व्याख्यानांची संख्या सव्वीस भरते.

स

डॉ. साठे एकीकडे हाडाचे शिक्षक (किंवा प्राध्यापक) असतानाच दुसरीकडे हाडाचे संशोधक आणि मार्गदर्शक होते. साहजिकच ते पीएच.डी.चे मार्गदर्शक होते. मुंबई, पुणे, उस्मानिया आणि शिवाजी विद्यापीठांतून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोळा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी मिळविली. 'आय.ए.एल.एस.' या आपल्या संस्थेतर्फे डॉ. साठे यांनी स्वत: अनेक संशोधन प्रकल्प पूर्ण केले. याशिवाय या संस्थेने डॉ. साठे यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायाधीश, सरकारी अधिकारी, वकील, यांच्यासाठी विविध विषयांवर कार्यशाळा घेतल्या. ग्राहक संरक्षण कायदा आणि 'स्त्रिया आणि कायदा' या विषयांवर संस्थेने स्वतंत्र अभ्यासक्रमही तयार केले आहेत.

डॉ. साठे यांनी नऊ पुस्तके लिहिली किंवा संपादित केली आहेत, तर विविध नियतकालिकांतून आणि जर्नल्समधून प्रसिद्ध झालेले त्यांचे लेख किंवा शोधनिबंध, त्याचप्रमाणे विविध संपादित पुस्तकांत त्यांनी विशिष्ट विषयांवर लिहिलेली प्रकरणे, या सर्वांची एकूण संख्या सुमारे २०० आहे. 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ' हे त्यांचे गाजलेले पहिले महत्त्वाचे पुस्तक. १९७० मध्ये प्रथम प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाच्या २००४ पर्यंत सात आवृत्त्या निघाल्या. २००२ मध्ये प्रसिद्ध झालेले त्यांचे महत्त्वाचे पुस्तक 'ज्युडिशिअल ॲक्टिव्हिझम इन इंडिया : ट्रान्सग्रेसिंग बॉर्डर्स ॲण्ड एनफोर्सिंग लिमिट्स्' हेही गाजले. त्यानंतर अगदी अलिकडे 'ऑक्सफर्ड'ने प्रकाशित केलेल्या 'इंटरप्रिटिंग कॉन्स्टिट्यूशन्स् : अ कम्पॅरिटिव्ह स्टडी' या पुस्तकात डॉ. साठे यांनी आपल्या घटनेवर लिहिलेले प्रकरण 'फ्रॉम पॉझिटिव्हिझम् टू स्ट्रक्चरॅलिझम्' अतिशय सरस उतरले आहे.

एवढे चतुरस्र कर्तृत्त्व आणि व्युत्पन्न व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. साठे अतिशय साधे, निगर्वी, मनमिळाऊ होते. आपल्या विद्यार्थ्यांवर ते पितृवत् प्रेम करीत. प्रथमदर्शनीच त्यांच्याबद्दल मनात आदर उत्पन्न होई आणि मनावर त्यांची कायमची छाप पडे. न्यायशास्त्र (ज्युरिस्प्रुडन्स), तुलनात्मक कायदा आणि भारताची घटना आणि घटनात्मक कायदा या विषयांवरील त्यांचे वर्ग म्हणजे बौद्धिक मेजवानी असे. कायदा हा त्याच्या सामाजिक पार्श्वभूमीवर समजून घेतला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. मुख्य म्हणजे वर्गात कोणीही, कोणताही प्रश्न केव्हाही विचारण्याची मुभा असे. त्यांच्या घरीही विद्यार्थ्यांना मुक्तद्वार असे.

आय.एल.एस. विधि महाविद्यालयाचे आज देश-विदेशात जे स्थान आहे, त्याला जी प्रतिष्ठा आहे, त्याचा पाया प्राचार्य घारपुरे यांनी १९२४ मध्ये घातला, त्यांच्यानंतर त्यांचे शिष्य प्राचार्य पंडित यांनी त्याचा विस्तार केला आणि विकास घडविला, तर प्रा. पंडितांचे शिष्य डॉ. साठे यांनी त्यावर कळस चढविला, असे म्हणता येईल.

– शरच्चंद्र पानसे

## सावंत, अरविंद विनायकराव

**मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, केरळ उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश**

**१७ सप्टेंबर १९३८**



अरविंद विनायकराव सावंत यांचे शिक्षण बी.कॉम आणि एलएल.एम. या पदव्यांपर्यंत औरंगाबाद येथे झाले. ८ जानेवारी १९६० रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत ॲडव्होकेट म्हणून रुजू झाले. १९७० ते १९७६ पर्यंत त्यांनी कायद्याचे अर्धवेळ प्राध्यापक म्हणून काम केले. १९७४ ते १९७७ पर्यंत ते मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत 'पब्लिक प्रॉसिक्यूटर' आणि सहायक सरकारी वकील होते. केंद्र सरकारच्या वकिलांच्या पॅनलवरही ते काही काळ होते. १२ मार्च १९८२ रोजी त्यांची नियुक्ती महाराष्ट्राचे 'ॲडव्होकेट-जनरल' म्हणून झाली.

६ जानेवारी १९८७ रोजी त्यांनी त्या पदाचा राजीनामा दिला. १ नोव्हेंबर १९८८ रोजी त्यांची नियुक्ती उच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारचे विशेष वकील म्हणून झाली. जुलै १९९० पर्यंत ते त्या पदावर होते.

३० जुलै १९९० रोजी न्या. सावंत यांची नियुक्ती मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून झाली. ३ ऑक्टोबर १९९१ रोजी ते उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश झाले. ३० मे २००० रोजी त्यांची नियुक्ती केरळ उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून झाली. १६ सप्टेंबर २००० रोजी ते त्या पदावरून निवृत्त झाले. सध्या ते दिल्ली येथे वकिली करतात.

– शरच्चंद्र पानसे

## सावंत, परशुराम बाबाराम
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**३० जून १९३०**



परशुराम बाबाराम सावंत यांचा जन्म मुंबईला झाला. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. व एलएल.बी. या पदव्या संपादन केल्या.

१९५७ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. उच्च न्यायालयाच्या मूळ शाखा आणि अपील शाखा या दोन्ही विभागांत त्यांनी दिवाणी, फौजदारी, घटनात्मक, औद्योगिक, सहकार क्षेत्रातील आणि निवडणुकांसंबंधी असे सर्व प्रकारचे खटले यशस्वीरीत्या लढविले. या काळात ते अनेक कामगार संघटनांचे तसेच अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे कायदेविषयक सल्लागार होते. १९६५–६६ मध्ये ते मुंबईच्या ‘न्यू लॉ कॉलेज’मध्ये ‘खासगी आंतरराष्ट्रीय कायदा’ व ‘घटनात्मक कायदा’ या विषयांचे अधिव्याख्याते (लेक्चरर) होते. १९७३ मध्ये न्या. सावंत यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. या पदावर असताना त्यांनी मुंबई व शिवाजी विद्यापीठांच्या कुलगुरू–निवड समित्यांवर राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचे ते राज्यपालनियुक्त सदस्य होते. जून १९८२ मध्ये एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताची चौकशी करण्यासाठी एक–सदस्य चौकशी आयोग म्हणून त्यांनी काम पाहिले.

ऑक्टोबर १९८९ मध्ये न्या. सावंत यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. २९ जून १९९५ रोजी ते पदावरून निवृत्त झाले.

त्यानंतर प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून २००१ पर्यंत त्यांनी काम केले. विविध नियतकालिकांत विविध विषयांवर त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. निवृत्तीनंतर त्यांचे वास्तव्य पुण्याला आहे.

– शरच्चंद्र पानसे

## सिरपूरकर, विकास श्रीधर
**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश**

**२२ ऑगस्ट १९४६**



विकास श्रीधर सिरपूरकर यांचा जन्म वकिली व्यवसायात असलेल्या एका कुटुंबात चंद्रपूर जिल्ह्यात झाला. त्यांचे आईवडील दोघेही वकिली करीत असत. चंद्रपूर येथे शालान्त शिक्षण झाल्यानंतर नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयातून त्यांनी पदवी घेतली आणि नागपूर येथेच विद्यापीठ विधि महाविद्यालयातून एलएल. बी. पदवी प्राप्त केली. १९६८ साली मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठात त्यांनी वकिलीला प्रारंभ केला. उच्च न्यायालय वकील संघाचे ते पदाधिकारीही होते. १९८५ व १९९१ असे दोन वेळा ते महाराष्ट्र व गोवा बार काउन्सिलचे सदस्य म्हणून निवडून आले.

स

१९९२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून सिरपूरकर यांची नेमणूक झाली. सुमारे पाच वर्षे त्यांनी औरंगाबाद आणि नागपूर पीठांवर न्यायाधीश म्हणून काम पाहिले. डिसेंबर १९९७ मध्ये त्यांची मद्रास उच्च न्यायालयात बदली झाली. अल्पावधीतच तमिळ भाषेचा परिचय करून घेऊन एक कर्तव्यदक्ष न्यायाधीश म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. तामिळनाडू राज्याच्या विधिसेवा (कायदा-सेवा) प्राधिकरणाचे ते कार्यकारी अध्यक्ष होते. राज्यात न्यायविषयक प्रशिक्षणासाठी त्यांनी न्यायिक प्रबोधिनी (ज्युडिशिअल ॲकॅडमी) स्थापन करण्यात पुढाकार घेतला. लोकन्यायालयांत काम नियमित व सुलभरीत्या चालावे म्हणून तामिळनाडू राज्यात चौदा ठिकाणी लोकन्यायालय भवने त्यांच्याच पुढाकाराने बांधण्यात आली.

२५ जुलै २००४ रोजी उत्तरांचल (आता उत्तराखंड) उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्या राज्यातही ‘उत्तरांचल ज्युडिशिअल ॲण्ड लीगल ॲकॅडमी’ म्हणजे ‘उजाला’ या संक्षेपाने ओळखली जाणारी शिक्षणसंस्था त्यांनी स्थापन केली. मार्च २००५ मध्ये कोलकाता उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून त्यांची बदली झाली. पश्चिम बंगालमध्येही त्यांनी न्यायिक अकादमी स्थापन करविली. १८६१ च्या ‘इंडियन हायकोर्ट्स् ॲक्ट’ या कायद्याखाली इंग्लंडच्या राणीच्या सनदेने भारतात स्थापन झालेल्या मुंबई, मद्रास आणि कलकत्ता या तीनही उच्च न्यायालयांत काम करण्याची संधी मिळालेले ते एकमेव न्यायाधीश असावेत.

नवी दिल्ली येथे असलेल्या इंडियन लॉ इन्स्टिट्यूटच्या नियामक मंडळावर न्यायाधीशांच्या मतदारसंघातून २००४ आणि २००७ अशी दोन वर्षे न्या. सिरपूरकर यांची निवड झाली. बंगलोर येथील ‘नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया’ या विद्यापीठाच्या सर्वसाधारण सभेवर ‘बार काउन्सिल ऑफ इंडिया’चे प्रतिनिधी म्हणूनही त्यांची निवड झाली.

१२ जानेवारी २००७ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांचा कार्यकाळ २१ ऑगस्ट २०११ पर्यंत आहे. डिसेंबर २०१० मध्ये चीनला भेट देण्यासाठी गेलेल्या न्यायविदांच्या एका आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळाचे त्यांनी नेतृत्व केले.

आपल्या वकिलीच्या कार्यकालात अनेक निवडणूक विषयक खटले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीविषयीचे खटले त्यांनी चालवले. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना तामिळनाडूतील प्रतिबंधक स्थानबद्धता विषयक प्रकरणात त्यांनी दिलेले निर्णय महत्त्वाचे मानले जातात. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांनी शिक्षण व्यवस्था, धार्मिक विश्वस्त न्यास आणि करविषयक कायदे यांच्याशी संबंधित प्रकरणांत अनेक महत्त्वाचे निर्णय दिले.

मराठी, हिंदी आणि इंग्रजीव्यतिरिक्त बंगाली, तमिळ आणि गुजराती या भाषाही त्यांना अवगत आहेत. त्यांच्या पत्नीही नागपूर येथे वकिली व्यवसायात आहेत.

– शरच्चंद्र पानसे

## सीरवाई, होरमसजी माणेकजी

**ज्येष्ठ वकील व न्यायविद**

**५ डिसेंबर १९०६ – २६ जानेवारी १९९६**



होरमसजी ऊर्फ होमी माणेकजी सीरवाई यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण भर्दा हायस्कूलमध्ये व उच्च शिक्षण एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. १९२६ मध्ये ते तत्त्वज्ञान विषय घेऊन बी.ए.ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. १९२९ मध्ये शासकीय विधि महाविद्यालयातून एलएल.बी.

स

पदवी प्राप्त केल्यावर दोन वर्षे ते एल्फिन्स्टन महाविद्यालयात इंग्रजीचे अधिव्याख्याता होते.

१९३२ मध्ये सीरवाई यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत तेव्हाच्या मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट-जनरल सर जमशेदजी कांगा यांच्या हाताखाली वकिलीस सुरुवात केली. उमेदवारीच्या पहिल्या काही वर्षांत त्यांना भरपूर वाचन व व्यासंग करण्याची संधी मिळाली. पुढे तेव्हाच्या मुंबई सरकारने केलेल्या दारुबंदी कायद्याखालील अनेक खटले त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात सरकारतर्फे चालविले. स्वातंत्र्योत्तर काळात १९५६-५७ मध्ये एका महत्त्वाच्या खटल्यात त्यांनी मुंबई सरकारची बाजू आधी मुंबई उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात मांडली. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल करून सरकारच्या बाजूने निर्णय दिला. या खटल्यामुळे सीरवाईंना प्रसिद्धी मिळाली.

१९५७ मध्ये सीरवाई यांची द्विभाषिक मुंबई राज्याचे ॲडव्होकेट-जनरल म्हणून नियुक्ती झाली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले ॲडव्होकेट-जनरल झाले. या पदावर ते १९७४ पर्यंत होते. सलग सतरा वर्षे ॲडव्होकेट-जनरल असण्याचा हा सीरवाईंच्या नावावरील विक्रम अद्याप अबाधित आहे. तो कधी मोडला जाईल, अशी शक्यता नाही. सर्वोच्च न्यायालयात अनेक खटल्यांत महाराष्ट्राची बाजू मांडण्याव्यतिरिक्त, १९७१ ते १९७४ या काळात त्यांनी कृष्णा पाणीवाटप लवादासमोर महाराष्ट्राची बाजू अतिशय प्रभावीपणे व यशस्वीरीत्या मांडली. दुर्दैवाने नंतर लवकरच त्यांना ॲडव्होकेट-जनरलपदाचा राजीनामा द्यावा लागला.

भारतीय घटनात्मक कायद्याच्या इतिहासात सीरवाई यांचे नाव सुवर्णाक्षरात कोरले गेलेले आहे, ते 'कॉन्स्टिट्यूशनल लॉ ऑफ इंडिया - अ क्रिटिकल कॉमेंटरी' या त्यांच्या अनन्यसाधारण ग्रंथामुळे. महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट-जनरलपदाची जबाबदारी सांभाळत असतानाच १९६१ मध्ये त्यांनी या ग्रंथाच्या लेखनास सुरुवात केली. १९६७ मध्ये तो प्रसिद्ध झाला, तेव्हा देशात आणि जगात सर्वत्र त्याचे अभूतपूर्व स्वागत झाले. भारताच्या घटनात्मक कायद्यावर असा अभिजात ग्रंथ त्यापूर्वी लिहिला गेला नव्हता आणि यापुढे लिहिला जाण्याची शक्यताही नाही. यामुळेच त्यांना 'भारताच्या घटनेचे सर्वश्रेष्ठ भाष्यकार' असे म्हणता येते.

महाराष्ट्राचे ॲडव्होकेट-जनरल असले तरी इतर राज्य सरकारांनाही सीरवाई अनेकदा सल्ला देत असत किंवा त्यांची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडत असत. दोन अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकरणांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. १९६४ मध्ये सभागृहाच्या हक्कभंगाच्या प्रश्नावरून उत्तर प्रदेश विधानसभा आणि अलाहाबाद उच्च न्यायालय यांच्यात गंभीर संघर्ष निर्माण झाला, तेव्हा राष्ट्रपतींनी हस्तक्षेप केला व सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागितला. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत सीरवाई यांनी उत्तर प्रदेश विधानसभेच्या सभापतींची बाजू मांडली. (विरुद्ध पक्षाची, म्हणजे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची बाजू एम.सी. सेटलवाड यांनी मांडली होती.)

त्यानंतर १९७२ मध्ये सुप्रसिद्ध केशवानंद भारती खटल्यात सीरवाई यांनी प्रतिवादी केरळ सरकारची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडली. घटनेच्या तिसऱ्या भागातील मूलभूत हक्कांसह घटनेच्या कोणत्याही भागातील कोणत्याही तरतुदीत कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारावर कोणतीही बंधने किंवा कोणत्याही मर्यादा असू शकत नाहीत, असे ठाम प्रतिपादन सीरवाई यांनी न्यायालयासमोर केले. आपल्या ग्रंथातही त्यांनी हीच भूमिका मांडली.

२४ एप्रिल १९७३ रोजी या खटल्याचा निकाल जाहीर झाला आणि भारतीय घटनेच्या आणि घटनात्मक कायद्याच्या इतिहासातील सर्वाधिक महत्त्वाच्या, गुंतागुंतीच्या आणि वादग्रस्त अशा

मूलभूत संरचना सिद्धान्ताचा (बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन) जन्म झाला. त्यावेळी सीरवाई यांना हा सिद्धान्त मान्य झाला नाही.

१९७५ मध्ये देशात आणीबाणी आली. ती अठरा-एकोणीस महिने लागू राहिली. तेवढ्या काळात देशातील कायद्याचे राज्य जवळपास संपुष्टात आले. आणीबाणीच्या काळात घटनेत एकूण पाच दुरुस्त्या- अडतीसावी दुरुस्ती ते बेचाळीसावी दुरुस्ती- करण्यात आल्या. त्यांपैकी एकोणचाळीसावी आणि बेचाळीसावी या दोन दुरुस्त्यांनी घटनेच्या मूलतत्त्वांवर जबरदस्त आघात केले. याच काळात इंदिरा गांधी निवडणूक खटला आणि हेबियस कॉर्पस खटला या दोन खटल्यांत सर्वोच्च न्यायालयाने काही असमर्थनीय असे निर्णय दिले. या सर्वांवर सखोल विचार व चिंतन करून सीरवाई यांनी आपली आधीची भूमिका बदलली. स्वत:च्याच पूर्वीच्या भूमिकेची कठोर चिकित्सा करणारे अतिशय मूलगामी व सूक्ष्म विवेचन त्यांनी 'द इमर्जन्सी, फ्यूचर सेफगार्ड्स् अँड द हेबियस कॉर्पस् केस : ए क्रिटिसिझम' या पुस्तकात केले. हे पुस्तक १९७८ मध्ये प्रसिद्ध झाले.

केशवानंद भारती खटल्यात आपण सर्वोच्च न्यायालयात केलेले प्रतिपादन केवळ तात्त्विक होते, त्याला वास्तवाचा किंवा अनुभवाचा संदर्भ किंवा आधार नव्हता, परंतु आणीबाणीत देशाने घेतलेला प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेता, पुन्हा कधी असे घडू नये यासाठी मूलभूत संरचना सिद्धान्त मान्य केला पाहिजे, त्याचप्रमाणे घटनादुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारावर काही मर्यादा असल्या पाहिजेत आणि या मर्यादा घटनेतील तरतुदींमध्येच अनुस्यूत आहेत, हेही मान्य केले पाहिजे, अशी नवी भूमिका त्यांनी या पुस्तकात मांडली. त्यांचा हा वैचारिक व बौद्धिक प्रामाणिकपणा आणि स्वत:ची आधीची भूमिका बदलून अगदी वेगळी भूमिका मांडण्याचे त्यांनी दाखविलेले नैतिक धैर्य याबद्दल कायदा जगतात त्यांची प्रशंसा झाली.

१९७४ मध्ये ॲडव्होकेट-जनरल पदावरून पायउतार झाल्यापासून सीरवाई यांनी आपल्या ग्रंथाच्या पुढील आवृत्त्यांच्या लेखनास स्वत:ला पूर्णपणे वाहून घेतले होते. प्रत्येक नव्या आवृत्तीत त्यांच्या ग्रंथाचा विस्तार होत गेला. तीन खंड असलेल्या चौथ्या आवृत्तीचे काम त्यांनी आपल्या निधनाच्या आदल्याच दिवशी पूर्ण केले होते. तिसऱ्या आवृत्तीत नव्याने समाविष्ट केलेल्या इतिहासात्मक प्रकरणाचे एक वेगळे छोटे पण महत्त्वाचे पुस्तक 'पार्टिशन ऑफ इंडिया : लिजंड अँड रिॲलिटी' त्यांनी १९८९ मध्ये प्रसिद्ध केले. १९९४ मध्ये त्याची दुसरी आवृत्तीही प्रसिद्ध झाली.

सीरवाईंना अनेक सन्मान मिळाले. भारत सरकारने १९७२ मध्ये पद्मभूषण हा सन्मान देऊन त्यांचा गौरव केला. १९८० मध्ये त्यांना दादाभाई नौरोजी पुरस्कार मिळाला. १९८१ मध्ये 'ऑनररी कॉरस्पाँडिंग फेलो ऑफ द ब्रिटिश ॲकॅडमी' म्हणून त्यांची निवड झाली. १९८२ मध्ये मुंबईच्या एशियाटिक सोसायटीने त्यांना मानद फेलोशिप दिली, तर १९९४ मध्ये इंटरनॅशनल बार असोसिएशन या संस्थेने 'लिव्हिंग लेजंड ऑफ लॉ' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

सीरवाई यांची तत्त्वज्ञानाची आवड शेवटपर्यंत कायम होती. 'बाँबे फिलोसॉफिकल सोसायटी' या संस्थेशी त्यांचा तिच्या स्थापनेपासून घनिष्ठ संबंध होता. 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' (पी.यू.सी.एल.) या संघटनेचेही ते एक संस्थापक व काही काळ अध्यक्ष होते. सीरवाईंचे इंग्रजीवरील प्रभुत्व स्तिमित करणारे होते. इंग्रजी साहित्याचा, विशेषत: काव्याचा व शेक्सपिअरच्या नाटकांचा त्यांचा दीर्घ व्यासंग होता. त्यांचे भाषण ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होत असत. अभिजात पाश्चात्त्य संगीताचीही त्यांना आवड होती. घटनेच्या या सर्वश्रेष्ठ भाष्यकाराचे निधन घटनेच्या सेहेचाळिसाव्या वर्धापनदिनी, म्हणजे २६ जानेवारी १९९६ रोजी व्हावे, हा योगायोग विलक्षण होय.

– शरच्चंद्र पानसे

## सेटलवाड, चिमणलाल हरिलाल

**नामवंत वकील आणि शिक्षणतज्ज्ञ**

**जुलै १८६५ – १० डिसेंबर १९४७**

चिमणलाल सेटलवाड यांचा जन्म गुजराथमधील भडोच येथे झाला. त्यांचे आजोबा अंबाशंकर यांच्यापासून त्यांच्या घराण्यात वकिलीची व कायद्याच्या अभ्यासाची परंपरा चालत आली होती. अंबाशंकर हे अहमदाबादचे 'मुख्य सदर अमीन' होते. चिमणलाल यांचे वडील हरिलाल यांनीही न्यायखात्यामध्ये दुय्यम न्यायाधीश म्हणून विविध ठिकाणी काम केले. त्या पदावरून सेवानिवृत्त झाल्यावर ते सौराष्ट्रातील लिंबडी संस्थानाचे दिवाण होते. ही परंपरा सर चिमणलाल यांचे चिरंजीव मोतीलाल यांनी समर्थपणे पुढे चालविली.

सर चिमणलाल यांचे शालेय शिक्षण उमरेठ आणि अहमदाबाद येथे झाले. १८८० मध्ये अहमदाबादच्या आर.सी. हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर ते पुढील शिक्षणासाठी मुंबईला आले आणि एल्फिन्स्टन महाविद्यालयातून १८८४ मध्ये बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर वडिलांच्या इच्छेखातर त्यांनी केवळ चार दिवस गुजराथमध्ये सरकारी नोकरी केली, परंतु लगेचच नोकरी सोडून कायद्याच्या अभ्यासासाठी ते पुन्हा मुंबईला आले. एलएल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १८८७ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेत वकिलीस सुरुवात केली. १८९८ च्या सुमारास त्यांना मूळ शाखेतही विभागातही वकिली करण्याची अनुमती मिळाली. तोपर्यंतच एक निष्णात वकील म्हणून त्यांचे नाव झाले होते.

सर चिमणलाल यांच्या राजकीय कार्याची तसेच एकंदर सार्वजनिक जीवनाची सुरुवात ते कायद्याचे विद्यार्थी असतानाच झाली. डिसेंबर १८८५ मध्ये मुंबई येथे काँग्रेसची स्थापना झाली, तेव्हाचा समारंभ पाहण्यास आपण हजर होतो, असे त्यांनी आत्मचरित्रात नमूद केले आहे.

स

१८८९ मध्ये मुंबईत भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या स्वागत समितीचे ते सदस्य होते. सर चिमणलाल यांनी दीर्घकाळ विविध पातळ्यांवर लोकप्रतिनिधी म्हणून संस्मरणीय कार्य केले. १८९२ पासून १९२० पर्यंत (मधली तीन वर्षे वगळता) ते मुंबई महानगरपालिकेचे सदस्य होते. या अवधीत १८९३ पासून १८९७ पर्यंत ते तेव्हाच्या मुंबई इलाख्याच्या उत्तर विभागातील नगरपालिकांचे प्रतिनिधी म्हणून गव्हर्नरच्या कायदेमंडळाचे सदस्य होते. १९०३ ते १९२० अशी सलग १७ वर्षे ते मुंबई महानगरपालिकेच्या शाळा समितीचे आधी सदस्य आणि नंतर अध्यक्ष होते. शाळा समितीमधील त्यांच्या कारकिर्दीत मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील प्राथमिक शिक्षणात अनेक सुधारणा झाल्या. अनेक शाळांसाठी इमारती बांधण्यात आल्या.

महानगरपालिकेत असतानाच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही सर चिमणलाल यांनी भरीव कार्य केले. १८९५ पासून अर्धशतकापेक्षा अधिक काळ ते मुंबई विद्यापीठाचे प्रारंभी काही काळ पदवीधरांनी निवडून दिलेले व त्यानंतर कुलपतींनी नियुक्त केलेले फेलो होते, तर १८९९ पासून १९२९ पर्यंत विद्यापीठाच्या सिंडिकेटचे सदस्य होते. या दरम्यान १९०३ ते १९१५ अशी १२ वर्षे ते विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून मुंबई विधिमंडळाचे सदस्य होते. याशिवाय १९१७ पासून १९२९ पर्यंत सलग १२ वर्षे ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरूही होते. कुलगुरू म्हणून एवढी दीर्घ कारकीर्द त्यापूर्वी कोणासही मिळाली नव्हती आणि त्यानंतरही अद्याप कोणास मिळालेली नाही. आपल्या कारकिर्दीत सर चिमणलाल यांनी विद्यापीठात अनेक शैक्षणिक व प्रशासनात्मक सुधारणा केल्या आणि विद्यापीठाचा लौकिक वाढविला. विज्ञान संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स), यू.डी.सी.टी. या संक्षिप्त नावाने प्रसिद्ध असलेला रासायनिक तंत्रज्ञान विभाग आणि इतर अनेक पदव्युत्तर विभाग त्यांच्या कारकीर्दीत सुरू झाले. आजचे प्रसिद्ध जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय

व त्याच्याशी संलग्न असलेले राजे एडवर्ड स्मृती रुग्णालय (के.ई.एम.) स्थापन करण्यातही सर चिमणलाल यांची विद्यापीठ व महानगरपालिका या दोन्ही संस्थांतर्फे महत्त्वाची भूमिका होती.

१९१५ मध्ये नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या तेव्हाच्या केंद्रीय (इंपीरियल) विधिमंडळातील जागेवर सर चिमणलाल यांची प्रथम निवड झाली. १९१७ पर्यंत ते केंद्रीय विधिमंडळात होते. नंतर १९१९च्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या केंद्रीय विधानसभेवर सर चिमणलाल १९२० मध्ये निवडून आले, पण त्याचवेळी मुंबई प्रांताच्या गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळावर त्यांची नियुक्ती झाल्यामुळे ते प्रत्यक्षात केंद्रीय विधानसभेचे सदस्य होऊ शकले नाहीत. १९२० मध्येच चार महिने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश म्हणूनही काम पाहिले. १९२३ मध्ये त्यांनी कार्यकारी मंडळाचा राजीनामा दिल्यावर व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनी त्यांची केंद्रीय विधानसभेचे सदस्य म्हणून नियुक्ती केली. १९२४ मध्ये अल्पकाळ त्यांनी सभागृहाचे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

१९१८ मध्ये काँग्रेसमधील नेमस्त विचारांच्या मंडळींनी नॅशनल लिबरल फेडरेशन ऑफ इंडिया किंवा लिबरल पार्टी या नावाने एक वेगळा पक्ष स्थापन केला. या पक्षाच्या स्थापनेपासून सर चिमणलाल हे त्याचे अग्रगण्य नेते होते. १९१८ मध्येच माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांवर विचार करण्यासाठी ब्रिटिश सरकारने लॉर्ड साउथबरो यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या दोन समित्यांपैकी एका समितीचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९१९ मध्ये अमृतसरमध्ये झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या हंटर समितीच्या तीन भारतीय सदस्यांपैकी सर चिमणलाल हे एक होते. समितीत ब्रिटिश सदस्य व भारतीय सदस्य असे उभे तट पडले आणि तिन्ही भारतीय सदस्यांनी आपला स्वतंत्र भिन्नमत-अहवाल सादर केला.

ब्रिटिश सरकारने १९२० मध्ये चिमणलाल सेटलवाड यांना 'सर' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. मुंबई विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉज्' (एलएल.डी) ही सन्मान्य पदवी दिली.

१९१९ च्या कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२८ मध्ये सायमन आयोग नेमला. त्यात एकही भारतीय सदस्य नसल्यामुळे संपूर्ण देशात असंतोष उसळला. काँग्रेसने सायमन आयोगावर बहिष्कार टाकला. लिबरल पार्टीनेही मुंबईत या आयोगाविरुद्ध आवाज उठविला. त्यामध्ये सर चिमणलाल यांचा सक्रिय सहभाग होता. तथापि १९३० व १९३१ मध्ये लंडनमध्ये भरलेल्या अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेस सर चिमणलाल हे अन्य नेमस्त नेत्यांसमवेत उपस्थित राहिले.

आपल्या संपूर्ण कारकीर्दीत सर चिमणलाल हे तेव्हा अस्तित्वात असलेल्या लहानमोठ्या संस्थानांच्या संस्थानिकांना कायद्याच्या किंवा अन्य प्रश्नांवर सल्ला देत असत, त्याचप्रमाणे न्यायालयांसमोर किंवा अन्यत्र त्यांची बाजू मांडीत असत.

'रिकलेक्शन्स अ‍ॅन्ड रिफ्लेक्शन्स' हे सर चिमणलाल यांचे प्रदीर्घ व उद्बोधक आत्मचरित्र १९४६ मध्ये प्रसिद्ध झाले. ब्रिटिश अमदानीच्या पाऊण शतकाचा देशाचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कायदा-न्यायविषयक इतिहास त्यात प्रतिबिंबित झाला आहे.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. सेटलवाड, चिमणलाल; 'रिकलेक्शन्स अँड रिफ्लेक्शन्स'.*

## सेटलवाड, मोतीलाल चिमणलाल

**कायदेपंडित व न्यायविद, स्वतंत्र भारताचे पहिले अ‍ॅटर्नी-जनरल**

**१२ नोव्हेंबर १८८४ – १ ऑगस्ट १९७४**

मोतीलाल चिमणलाल सेटलवाड यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला. वकिलीची व कायद्याच्या अभ्यासाची परंपरा त्यांच्या घराण्यात त्यांचे पणजोबा



अंबाशंकर यांच्यापासून चालत आली होती. मोतीलाल यांचे वडील सर चिमणलाल सेटलवाड हे अग्रगण्य नेमस्त पुढारी तसेच नामवंत वकील आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

मोतीलाल यांचे सुरुवातीचे प्राथमिक शिक्षण अहमदाबाद येथे झाले, तर उर्वरित प्राथमिक, तसेच माध्यमिक व त्यापुढील सर्व शिक्षण मुंबईत झाले. १८९९ मध्ये ते विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९०४ मध्ये त्यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी. ए. ची पदवी घेतली. त्यावेळी एलएल.बी. चे वर्गही एल्फिन्स्टन महाविद्यालयातच भरत असल्याने, तेथूनच त्यांनी १९०६ च्या अखेरीस एलएल.बी.ची पदवी संपादन केली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेत ‘ॲडव्होकेट’ होण्यासाठी त्याकाळी अगोदर दोन वर्षे उच्च न्यायालयात हजर राहून उमेदवारी करावी लागत असे व त्यानंतर एक अतिशय कठीण परीक्षा द्यावी लागत असे. ही उमेदवारी पूर्ण करून तसेच स्वत:च्या वाचनाने कायद्याचा व्यासंग करून मोतीलाल ही परीक्षा १९११ मध्ये उत्तीर्ण झाले आणि त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात ख्यातनाम वकील भुलाभाई देसाई यांच्या हाताखाली वकिली सुरू केली. व्यवसायात त्यांचा लवकरच जम बसला आणि एक उत्तम वकील म्हणून त्यांचे नाव झाले.

१९३७ मध्ये तेव्हाच्या मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट जनरल म्हणून सेटलवाड यांची नियुक्ती झाली. त्यांनी ऑगस्ट १९४२ मध्ये गांधीजींची ‘चले जाव’ चळवळ सुरू झाल्यानंतर ॲडव्होकेट-जनरलपदाचा राजीनामा दिला. तेव्हापासून १९४७ पर्यंत त्यांनी विविध उच्च न्यायालयात, १९३५ च्या कायद्याने स्थापन झालेल्या फेडरल न्यायालयात, तसेच विविध लवादमंडळांसमोर अनेक महत्त्वाचे खटले चालविले. जुलै-ऑगस्ट १९४७ मध्ये पंजाबची फाळणीनंतरची सीमा निश्चत करण्यासाठी नेमण्यात आलेल्या रॅडक्लिफ आयोगासमोर त्यांनी काँग्रेसची बाजू मांडली.

सप्टेंबर १९४७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या अधिवेशनासाठी गेलेल्या स्वतंत्र भारताच्या पहिल्या शिष्टमंडळाचे सेटलवाड हे सदस्य होते. तेव्हापासून १९४९ पर्यंत त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघात विविध पातळ्यांवर भारतातर्फे महत्त्वाची कामगिरी बजावली. विशेषत: काश्मीर प्रश्नावरील दीर्घ चर्चांमध्ये त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधित्व केले व भारताची बाजू मांडली.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताची नवी घटना लागू झाली. त्याच दिवशी सेटलवाड यांची भारताची पहिले म्हणून नियुक्ती झाली. ३१ डिसेंबर १९६२ पर्यंत, म्हणजे सलग तेरा वर्षे ते या पदावर राहिले. त्यांच्या नावावरील हा विक्रम अद्याप अबाधित आहे.

या काळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या खटल्यांत केंद्र सरकारची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडली. ॲटर्नी-जनरल पदावर असतानाच पहिल्या विधि आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९५८-५९ मध्ये आयोगाने आपला अहवाल सादर केला.

१९५५ ते १९६० याच काळात त्यांनी दादरा-नगरहवेली प्रकरणात भारताची बाजू आंतरराष्ट्रीय न्यायालयात प्रभावीपणे व यशस्वीरित्या मांडली.

निवृत्त झाल्यानंतरही सुमारे अकरा वर्षे सेटलवाड यांचे वकिलीचे इतर विविध क्षेत्रांतले कार्य चालू होते. या अवधीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या खटल्यांत विविध पक्षकारांची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडली. एका प्रकरणाचा विशेष उल्लेख केला पाहिजे, तो म्हणजे १९६४ मध्ये सभागृहाच्या हक्कभंगाच्या प्रश्नावरून उत्तर प्रदेश विधानसभा आणि अलाहाबाद उच्च न्यायालय यांच्यात गंभीर संघर्ष निर्माण झाला, तेव्हा राष्ट्रपतींनी हस्तक्षेप केला व सर्वोच्च

स

न्यायालयाचा सल्ला मागितला. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत सेटलवाड यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची बाजू मांडली. (विरुद्ध पक्षाची, म्हणजे उत्तर प्रदेश विधानसभेच्या सभापतींची बाजू एच. एम. सीरवाई यांनी मांडली होती.)

सेटलवाड यांनी अनेक महत्त्वाची पुस्तके लिहिली. 'वॉर अँड सिव्हिल लिबर्टीज्' हे त्यांचे पहिले व महत्त्वाचे पुस्तक १९४६ मध्ये प्रसिद्ध झाले. १९६५ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या न्या. तेलंग स्मारक व्याख्यानमालेत त्यांनी भारताच्या घटनेवर दिलेली विद्वत्तापूर्ण व्याख्याने १९६७ मध्ये 'द इंडियन कॉन्स्टिट्यूशन : १९५० – १९६५' या पुस्तकात प्रसिद्ध झाली. त्यांनी लिहिलेले भुलाभाई देसाई यांचे चरित्र १९६८ मध्ये प्रसिद्ध झाले.

'माय लाईफ : लॉ अँड अदर थिंग्ज्' हे त्यांचे प्रदीर्घ आणि अत्यंत वाचनीय व माहितीपूर्ण आत्मचरित्र १९७० मध्ये प्रसिद्ध झाले.

सेटलवाड पितापुत्रांच्या प्रदीर्घ आत्मचरित्रांमधून सुमारे १८७० ते १९७० या शतकाभराच्या काळातील देशाच्या समग्र इतिहासाचे प्रत्ययकारी दर्शन घडते.

मोतीलाल सेटलवाड यांना अनेक सन्मान मिळाले. १९५७ मध्ये भारत सरकारने पद्मभूषण हा सन्मान देऊन गौरव केला. (स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी १९४१ मध्ये ब्रिटीश सरकारने त्यांना 'सर' हा किताब देऊ केला होता, परंतु त्यांनी तो स्वीकारण्यास नकार दिला.) १९५० पासून १९६८ पर्यंत ते सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष होते. बार असोसिएशन ऑफ इंडिया ही वकिलांची एक नवी अखिल भारतीय संघटना १९५९ मध्ये स्थापन झाली. सेटलवाड या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. याशिवाय ते ब्रिटिश कौन्सिलच्या 'लॉ कमिटी'चे, त्याचप्रमाणे 'इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अँड कम्पॅरेटिव्ह लॉ' या संस्थेचे 'कॉरस्पाँडिंग मेंबर'सुद्धा होते.

– शरच्चंद्र पानसे

## सोराबजी, सोली जहांगीर

**न्यायविद, भारताचे ॲटर्नी–जनरल**

**९ मार्च १९३०**



सोली जहांगीर सोराबजी यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण व उच्च शिक्षण मुंबईतच झाले. १९५२ मध्ये शासकीय विधि महाविद्यालयातून एलएल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९५३ मध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली सुरू केली. कॉलेजमध्ये त्यांना रोमन कायदा आणि न्यायशास्त्रातील (ज्युरिस्प्रुडन्स) 'किनलॉक फोर्ब्ज सुवर्णपदक' मिळाले.

१९७१ पासून ते सर्वोच्च न्यायालयात वरिष्ठ वकील म्हणून वकिली करू लागले. १९७७ ते १९८० या काळात ते भारताचे सॉलिसिटर–जनरल होते. डिसेंबर १९८९ ते डिसेंबर १९९० या वर्षभराच्या काळात आणि नंतर पुन्हा एप्रिल १९९८ ते मे २००४ पर्यंत ते भारताचे ॲटर्नी–जनरल होते. अशा रीतीने दोन वेळा ॲटर्नी–जनरल होण्याचा मान सोराबजी यांना सर्वप्रथम मिळाला.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरील विविध क्षेत्रांतील संस्था, संघटना, समित्या, आयोग इत्यादींशी सोराबजी यांचा पदाधिकारी म्हणून घनिष्ठ संबंध आहे. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेच्या भारतीय शाखेच्या सल्लागार मंडळाचे ते अध्यक्ष आहेत, तर 'मायनॉरिटी राइट्स् ग्रूप' या संघटनेचे निमंत्रक आहेत. दिल्ली येथील 'इंडिया इंटरनॅशनल सेंटर'चे ते अध्यक्ष आहेत, तर 'इंडियन लॉ इन्स्टिट्यूट'चे उपाध्यक्ष आहेत, बंगलोर येथील 'नॅशनल लॉ स्कूल'मध्ये ते मानद प्राध्यापक आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाच्या आणि अल्पसंख्यांकांच्या हक्करक्षणावरील उप–आयोगाच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. २००० ते

स

२००६ ते हेग येथील 'पर्मनंट कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन'चे सदस्य होते. शिवाय 'युनायटेड लॉयर्स असोसिएशन'चे व 'इंटरनॅशनल बार असोसिएशन'च्या मानवी हक्क समितीचे ते उपाध्यक्ष आहेत.

घटनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी १९९९मध्ये नेमण्यात आलेल्या वेंकटाचलय्या आयोगाचे ते सदस्य होते. नंतर भारतातील पोलिस प्रशासनात आणि १८६१ च्या पोलिस कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचे सोराबजी अध्यक्ष होते. या समितीने २००६ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला.

सोराबजी यांचे इंग्रजीवर प्रभुत्व असून ते सातत्याने लेखन करीत असतात. 'लॉ ऑफ प्रेस सेन्सॉरशिप इन इंडिया' आणि 'दि इमर्जन्सी, सेन्सॉरशिप ॲन्ड दि प्रेस इन इंडिया : १९७५-१९७७' ही त्यांची महत्त्वाची पुस्तके पूर्वी प्रसिद्ध झाली, तर 'लॉ ॲण्ड जस्टिस' हे पुस्तक अलीकडे म्हणजे २००४ मध्ये प्रसिद्ध झाले. अन्य विविध महत्त्वाच्या पुस्तकांतही त्यांचे निबंध समाविष्ट झालेले आहेत. कायदेविषयक नियतकालिकांत तसेच वृत्तपत्रांतही त्यांचे लेखन नियमित सुरू असते. कायदा आणि न्यायविषयक वेगवेगळ्या विषयांवर सोराबजींनी अनेक व्याख्याने दिली आहेत.

भारत सरकारने २००२ मध्ये पद्मविभूषण हा सन्मान देऊन सोराबजींचा गौरव केला. त्यांना इंग्रजी साहित्याची तसेच अभिजात आणि जॅझ या दोन्ही प्रकारच्या पाश्चात्त्य संगीताची अतिशय आवड आहे.

सोराबजी यांचे वास्तव्य नवी दिल्ली येथे आहे.

– शरच्चंद्र पानसे

* * *

स

# ह

## हरिदास, नानाभाई

**मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले कायम भारतीय न्यायाधीश**

**५ सप्टेंबर १८३२ – जून १८८९**

नानाभाई हरिदास यांचा जन्म सुरत येथे झाला. त्यांचे उच्च शिक्षण मुंबईत एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. ते प्रारंभी मुंबईच्या जुन्या ‘सुप्रीम कोर्ट’ या न्यायालयात सहायक भाषांतरकार म्हणून काम करीत.

नानाभाई हरिदास हे मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले कायम भारतीय न्यायाधीश होत. मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना १८६२ मध्ये झाली. परंतु भारतीय व्यक्तीची कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती होण्यास १८८४ साल उजाडावे लागले. न्या. नानाभाई हरिदास यांच्याआधी फक्त जनार्दन वासुदेवजी यांना काही काळ हंगामी न्यायाधीश (ॲक्टिंग जज्) म्हणून नेमण्यात आले होते. ते कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीश होते. अर्थात अनेक ब्रिटिश वकिलांना व आय.सी.एस. अधिकाऱ्यांनाही हंगामी न्यायाधीश म्हणून नेमले जात असे. कामाचे मान पाहून अशा नेमणुका करण्याची तेव्हा प्रथा होती, असे दिसते. ही प्रथा स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत चालू होती. तोपर्यंत जनार्दन वासुदेवजी धरून एकूण अठरा भारतीयांना वेळोवेळी हंगामी न्यायाधीश म्हणून कमी-अधिक अवधीसाठी नेमण्यात आले. त्यांत एम.पी खारेघाट, बालकराम असे आय.सी.एस. अधिकारी आणि सर चिमणलाल सेटलवाड, सर जमशेदजी कांगा व सर दिनशा मुल्ला यांच्यासारखे प्रख्यात वकील होते.

उच्च न्यायालय स्थापन होण्याआधी अस्तित्वात असलेल्या ‘सदर दिवाणी अदालत’ या न्यायालयात नानाभाई हरिदास १८५७ मध्ये वकिली करू लागले. हे दिवाणी अपील न्यायालय होते. उच्च न्यायालय स्थापन झाल्यावर नानाभाई हरिदास यांना अपील शाखेत वकील म्हणून प्रवेश मिळाला. काही काळानंतर त्यांना सरकारी वकील म्हणून नेमण्यात आले. त्याच वेळी ते ‘लॉ स्कूल’मध्ये प्राध्यापकही होते. या ‘लॉ स्कूल’चेच पुढे आजच्या शासकीय विधि महाविद्यालयात रूपांतर झाले.

प्रथम १८७३ मध्ये त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे तात्पुरते न्यायाधीश म्हणून नेमणूक मिळाली. नंतर वेगवेगळ्या कालावधीसाठी त्यांना एकूण नऊ वेळा अशी नेमणूक मिळाली. ती मिळाली की न्यायासनावर बसून न्यायदान करावयाचे, नेमणुकीची मुदत संपली की न्यायासनावरून पायउतार होऊन त्याच्यासमोर वकिली आणि ‘लॉ स्कूल’मध्ये अध्यापन करावयाचे, पुन्हा नेमणूक मिळाली की पुन्हा न्यायासनावर... असा त्यांचा शिरस्ता अकरा वर्षे चालू होता! हा एक विक्रमच समजला पाहिजे. अखेर १८८४ मध्ये कायम न्यायाधीश म्हणून हरिदास यांची नियुक्ती झाली. कायम न्यायाधीश म्हणून त्यांनी पाच वर्षे काम पाहिले. जून १८८९ मध्ये त्यांचे निधन झाले; त्यामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांची नियुक्ती झाली. न्या. नानाभाई हरिदासांचे हिंदू कायद्यावर प्रभुत्व होते. ब्रिटिश राज्यात हिंदू कायद्याची तत्त्वे न्यायालयांकरवी प्रस्थापित होण्याची जी दीर्घ परंपरा आहे, तिची सुरुवात न्या. नानाभाईंच्या आरंभीच्या काही निकालांनी झाली, असे म्हणता येईल.

– शरच्चंद्र पानसे

## हिदायतुल्ला, मोहम्मद

**कायदेपंडित, न्यायविद,**

**भारताचे सरन्यायाधीश, उपराष्ट्रपती.**

**१७ डिसेंबर १९०५ – १८ सप्टेंबर १९९२**



मोहम्मद हिदायतुल्ला यांचा जन्म त्यावेळच्या मध्यप्रांतात एका खानदानी व सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे वडील खानबहादुर हफीझ मोहम्मद विलायतुल्ला तत्कालीन मध्यप्रांत व वऱ्हाडात सरकारी नोकरीत विविध पदांवर होते. १९२८ मध्ये ते भंडारा येथून उपायुक्त (आताचे जिल्हाधिकारी) व जिल्हा दंडाधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला व ते मध्य प्रांत, वऱ्हाडातील राखीव मुस्लिम मतदारसंघातून तेव्हाच्या केंद्रीय विधानसभेवर निवडून गेले. ते फारसी व उर्दूत कविताही करीत असत.

वडिलांच्या वारंवार बदल्या होत असल्याने हिदायतुल्ला यांचे शालेय शिक्षण नागपूर, सिहोर, अकोला, छिंदवाडा, रायपूर, अशा विविध ठिकाणी झाले. १९२२ मध्ये ते रायपूरला मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. छत्तीसगढ विभागात पहिले आल्याने त्यांना फिलिप शिष्यवृत्ती मिळाली. पुढील शिक्षणासाठी त्यांनी नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयात प्रवेश घेतला. (त्याआधीच्या दोन वर्षांत, म्हणजे अनुक्रमे १९२० व १९२१ मध्ये हिदायतुल्लांचे मोठे भाऊ अहमदुल्ला आणि सर्वांत थोरले भाऊ इक्रामुल्ला यांनीही मॉरिस महाविद्यालयातच प्रवेश घेतला होता.) १९२६ मध्ये ते नागपूर विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले व पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला रवाना झाले. केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी महाविद्यालयामध्ये इंग्लिश ट्रायपॉस व लॉ ट्रायपॉससाठी आणि लंडनच्या लिंकन्स इन्‌मध्ये बॅरिस्टरच्या परीक्षेसाठी असा एकत्रित अभ्यास करून ते १९३० मध्ये बॅरिस्टर होऊन स्वदेशी परतले. लगेचच त्यांनी नागपूर येथे वकिली सुरू केली.

१९३० ते १९३६ पर्यंत हिदायतुल्लांनी नागपूरच्या तेव्हाच्या न्याय आयुक्तांच्या न्यायालयात (ज्युडिशियल कमिशनर्स कोर्ट) वकिली केली. १९३६ मध्ये नागपूर उच्च न्यायालय स्थापन झाले. हिदायतुल्ला प्रथमपासूनच त्या न्यायालयातील यशस्वी वकील म्हणून ओळखले जाऊ लागले. १९४२–४३ मध्ये त्यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. नंतर १९४३ ते १९४६ या काळात ते मध्य प्रांत व वऱ्हाडचे ॲडव्होकेट–जनरल होते. दरम्यान १९३५ ते १९४३ एवढा काळ त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या कायदा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणूनही काम केले. याशिवाय नागपूर नगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यासाचेही ते काही काळ सदस्य होते.

१९४६ मध्ये नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून हिदायतुल्लांची नियुक्ती झाली. १९५४ मध्ये ते त्याच उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर अस्तित्वात आलेल्या मध्य प्रदेश राज्यासाठी वेगळे उच्च न्यायालय जबलपूर येथे स्थापन झाले. त्याचे पहिले सरन्यायाधीश म्हणून हिदायतुल्ला यांची नियुक्ती झाली. त्या पदावर ते नोव्हेंबर १९५८ पर्यंत होते. नागपूर व जबलपूर येथील आपल्या वास्तव्यात हिदायतुल्ला यांनी नागपूर, सागर व विक्रम (उज्जैन) या विद्यापीठांत, त्याचप्रमाणे अलीगढ मुस्लीम विद्यापीठातही वेगवेगळी महत्त्वाची पदे भूषविली.

विशेषत: नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी व शैक्षणिक मंडळांचे ते एकोणीस वर्षे (१९३४ ते १९५३) सदस्य होते, तर कायदा विद्याशाखेचे चार वर्षे (१९४९ ते १९५३) अधिष्ठाता होते. या काळात त्यांनी मध्य प्रदेश भारत स्काऊट व गाइडचे मुख्य आयुक्त म्हणून (१९५० ते १९५३) तर भारत स्काउट व गाइडच्या राष्ट्रीय मंडळाचे उपाध्यक्ष म्हणूनही (१९५० ते १९५२) काम पाहिले.

१ डिसेंबर १९५८ रोजी न्या. हिदायतुल्ला यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. नऊ वर्षांनंतर २५ फेब्रुवारी १९६८ रोजी ते भारताचे सरन्यायाधीश झाले. सर्वोच न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांना बारा वर्षांची दीर्घ कारकीर्द लाभली. त्यातील सुमारे तीन वर्षे ते सरन्यायाधीश होते. या काळात सर्वोच्च न्यायालयापुढे अनेक महत्त्वाचे खटले आले व त्यामध्ये न्यायालयाने दिलेले निर्णय दूरगामी परिणाम करणारे ठरले. त्यापैकी सज्जनसिंह, गोलकनाथ आणि माजी संस्थानिकांची मान्यता व तनखे या संबंधीचा खटला आणि 'पाँडेचरी येथील श्रीअरविंदांचा विश्वस्त न्यास हा 'धार्मिक' आहे की नाही' या प्रश्नाबद्दलचा खटला हे विशेष उल्लेखनीय होत.

यातील पहिल्या दोन खटल्यांच्या वेळी हिदायतुल्ला न्यायाधीश होते तर तिसऱ्याच्या वेळी सरन्यायाधीश होते. या तिन्ही खटल्यांत हिदायतुल्ला यांनी स्वत:ची विचारप्रवर्तक वेगळी निकालपत्रे लिहिली. यातील शेवटच्या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जाहीर झाल्यावर लगेचच म्हणजे १६ डिसेंबर १९७० रोजी हिदायतुल्ला सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाले. सरन्यायाधीश असताना ते 'इंडियन लॉ इन्स्टिट्यूट', 'इंटरनॅशनल लॉ असोसिएशन'ची भारतीय शाखा व 'इंडियन सोसायटी ऑफ इंटरनॅशनल लॉ' या संस्थांचे अध्यक्ष होते.

हिदायतुल्ला सरन्यायाधीश झाल्यानंतर काही दिवसांतच सर्वोच्च न्यायालयात एक अकल्पित आणि अभूतपूर्व प्रसंग घडला. सरन्यायाधीशांच्या न्यायालयात त्यांच्यासह तीन न्यायाधीशांसमोर एक खटला चालू असताना एका माणसाने न्यायाधीशांवर खुनी हल्ला केला. सरन्यायाधीश हिदायतुल्ला यांनी प्रसंगावधान राखून हल्लेखोराशी मुकाबला केल्याने प्राणहानी झाली नाही. फक्त न्या. ग्रोव्हर यांच्या डोक्याला जखम झाली. नंतर जेव्हा त्या हल्लेखोरांवर खुनाचा प्रयत्न करण्याच्या आरोपाखाली फौजदारी खटला झाला, तेव्हा सरन्यायाधीशांसह तिन्ही न्यायाधीशांनी सत्र न्यायालयात साक्ष दिली.

१९७४ मध्ये झालेल्या राष्ट्रपती निवडणुकीत विरोधी पक्षांचे उमेदवार होण्याबद्दल हिदायतुल्ला यांना विचारले गेले होते, पण त्यांनी उमेदवार होण्यास नकार दिला. त्यानंतरच्या १९७७ च्या राष्ट्रपती निवडणुकीच्या वेळीही त्यांच्या नावाची थोडीफार चर्चा झाली, पण तो योग आला नाही. पुढे ऑगस्ट १९७९ मध्ये हिदायतुल्ला यांची उपराष्ट्रपती म्हणून बिनविरोध निवड झाली. पूर्ण पाच वर्षे, म्हणजे ऑगस्ट १९८४ पर्यंत ते उपराष्ट्रपती होते. उपराष्ट्रपती या नात्याने ते राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष होते. या दरम्यान १९८२ मध्ये ते इंडियन रेडक्रॉस सोसायटीचेही अध्यक्ष होते.

न्या. हिदायतुल्ला यांच्या नावावर योगायोगाने एक आगळा विक्रम नोंदला गेलेला आहे. तो असा की तेरा वर्षांच्या अंतराने त्यांना दोन वेळा हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहावे लागले. मात्र त्या दोन प्रसंगी ते स्वत: वेगवेगळ्या पदांवर होते. मे १९६९ मध्ये तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांच्या अकस्मात निधनानंतर आधी उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी हे हंगामी राष्ट्रपती झाले. परंतु त्यांनी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा देऊन राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढविण्याचे जाहीर केले. त्यावेळी संसदेने तातडीने एक कायदा करून अशी तरतूद केली की अशा परिस्थितीत भारताच्या सरन्यायाधीशांनी हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहावे. त्यानुसार जुलै-ऑगस्ट १९६९ मध्ये सरन्यायाधीश हिदायतुल्ला यांनी हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहिले. दुसऱ्या वेळी ऑक्टोबर १९८२ मध्ये राष्ट्रपती झैलसिंह यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपराष्ट्रपती हिदायतुल्लांनी पुन्हा हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहिले.

हिदायतुल्ला हे केवळ कायद्यात रमणारे रूक्ष वकील किंवा न्यायाधीश नव्हते. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी, उमदे व प्रसन्न होते. इंग्रजीवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते आणि इंग्रजी साहित्याचा, विशेषत: शेक्सपिअरच्या नाटकांचा त्यांचा व्यासंग

दांडगा होता. उर्दू कविता किंवा शायरीचीही त्यांना आवड होती. आजही त्यांची निकालपत्रे, पुस्तके वा भाषणे वाचताना या सर्व गोष्टींचा प्रत्यय येतो. राज्यसभेचे अध्यक्षपदी कामकाज चालविताना त्यांच्या हजरजबाबीपणाचा व विनोदबुद्धीचा प्रत्यय येई.

न्या. हिदायतुल्ला यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'डेमॉक्रसी इन इंडिया अँड द ज्युडिशिअल प्रोसेस', 'ज्युडिशिअल मेथड्स', 'यू. एस. ए. अँड इंडिया' व 'द फिफ्थ अँड सिक्स्थ शेड्युल्स टू द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया' ही त्यांपैकी प्रमुख होत. त्यांनी देशात व परदेशात वेळोवेळी दिलेल्या भाषणांचे व संकीर्ण लेखांचे संग्रह 'ए जजेस् मिसलेनि' या शीर्षकाने चार खंडांमध्ये प्रसिद्ध झाले. याशिवाय मुस्लीम कायद्यावरील 'मुल्लाज् मोमेडिअन लॉ' या प्रमाणभूत ग्रंथाच्या अनेक आवृत्त्यांचे त्यांनी अत्यंत साक्षेपाने संपादन केले. १९८० मध्ये प्रकाशित झालेले 'माय ओन बॉस्वेल' हे त्यांचे आत्मचरित्र हे अत्यंत वाचनीय असून हे लेखन संयत, संतुलित व डौलदार लेखनाचा वास्तुपाठ आहे.

– शरच्चंद्र पानसे

**संदर्भ :**

*१. हिदायतुल्ला, मोहम्मद; ''माय ओन बॉस्वेल'' (आत्मचरित्र); आर्नल्ड हाइनमन; १९८०.*

* * *

# परिशिष्ट – १

## लेखक परिचय

### न्या. नरेंद्र चपळगांवकर

एम.ए. एलएल.बी.,

न्यायाधीश – उच्च न्यायालय, न्याय व सामाजिक विषयांवर विपुल लेखन. विविध सामाजिक प्रकल्पांमध्ये सहभाग.


### सुहास हरी जोशी



बी.ए. संस्कृत– मराठी, इतिहास, एम.ए. प्राचीन भारतीय संस्कृती, इतिहास, समाजशास्त्र, संस्कृत–मराठी एम.ए.

तरुण भारत, सा. विवेक मध्ये लेखन, पर्यटन, इतिहास, बालकथा आदी विषयांवरील २५ पुस्तके प्रसिद्ध, महाराष्ट्रातील ६२५ गावांमध्ये ३००० व्याख्याने, महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रांमध्ये वाचकांसाठी पत्रव्यवहार, सध्या डायमंड प्रकाशनामध्ये लेखन सुरू.

### प्रा. डॉ. विजय प्रल्हाद देव




एम.ए. राज्यशास्त्र, कौटील्याच्या तुलनेत मॅकीअॅव्हेली या विषयात पी.एच.डी.

३५ वर्षे एस. पी. महाविद्यालयात प्राध्यापक.

स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य, राजकीय विश्लेषण कोश, सुबोध राज्यशास्त्र, आधुनिक वैद्यक एक दृष्टिकोन, पी.एच.डी., एम.फीलसाठी मार्गदर्शन. विविध सामाजिक कार्यांमध्ये सहभाग.

### डॉ. सुरेश रघुनाथ देशपांडे



एम.ए. राज्यशास्त्र, एम.ए. प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास, बी.एड. यादव शिल्पशैली या विषयात पी.एच.डी.

प्राध्यापक, किसनधीर कॉलेज वाई, मराठी विश्वकोष वाई येथे विभाग संपादक म्हणून कार्यरत. इतिहास, पुरातत्त्व विद्या या विषयातील १२ पुस्तकांचे लेखक विश्वचरित्रकोष – गोवाचे संपादक सल्लागार, लेखन

### प्रा. डॉ. नितीश नवसागरे



एल.एल.एम., भारतीय राज्यघटना या विषयावर पी.एच.डी.

लॉ जर्नल्समधून लेखन, 'अन्विक्षण' या त्रैमासिकाचे संपादक, प्राचार्य– मराठवाडामित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय पुणे.

## सविता भावे



बी.ए. एल.एल.बी.

चरित्रलेखक म्हणून प्रसिद्ध

## शरच्चंद्र पानसे



एम.ए. (भाषाशास्त्र), एम.ए. (इतिहास) एल.एल.एम.

भारतीय स्टेट बँकेतून मुख्य व्यवस्थापक पदावरून स्वेच्छानिवृत्ती.

शिल्पकार चरित्रकोश प्रकल्पातील न्यायपालिका खंडाचे संपादक.

## श्री. अशोक नारायण ठाकूर

एम.एस्सी, भू विज्ञान, बी.ए. अर्थशास्त्र

मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ वाई येथून विभाग संपादक म्हणून निवृत्त, नवभारत मासिक वाईचे २० वर्षे संपादक मंडळावर काम.

## प्रा. डॉ. दिलीप मनोहर सेनाड



बी.एसस्सी. एम.ए. एम.एड. पी.एच.डी.

एज्युकेशन सोसायटी नागपूर, सचिव, साहित्य प्रसार केंद्र वाचन स्पर्धा

निवृत्त प्राध्यापक, स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय वर्धा.

संपादक ‘शिक्षण समिक्षा’ द्वैमासिक. नागपूर येथे वास्तव्य.

* * *

विवेक
आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
शिल्पकार चरित्रकोश
ही गाथा कर्तृत्वाची ! प्रगल्भ नेतृत्वाची !



# ।। प्रशासन ।।

# आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
# शिल्पकार चरित्रकोश

खंड ४

भाग २

## प्रशासन

संपादन

दीपक हनुमंत जेवणे

वर्षा जोशी-आठवले

सुपर्णा कुलकर्णी

आशा बापट

खंड सहयोग

पुणे महानगरपालिका, पुणे

प्रमुख प्रायोजक

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

सहप्रायोजक

दि सारस्वत को-ऑप. बँक लि.

प्रकाशक

साप्ताहिक विवेक

(हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
शिल्पकार चरित्रकोश, खंड ४
भाग-२ : प्रशासन

© **साप्ताहिक विवेक** (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

**पहिली आवृत्ती**
चैत्र शु. एकादशी, शके १९३३, १४ एप्रिल २०११

**प्रकाशक**
साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)
५/१२, कामत औद्योगिक वसाहत,
३९६, स्वा. सावरकर मार्ग, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी : (०२२) २४२२ ९४५१
फॅक्स : (०२२) २४३६ ३७५६
e-mail : charitrakosh@gmail.com
Website : www.maharashtranayak.com

**संगणकीय अक्षरजुळणी**
संकल्प ॲडव्हर्टाइझिंग अँड बुकवर्क,
९०२, सदाशिव पेठ, पुणे - ३०.
दूरध्वनी : ०२०-२४४९७९८८

**मुद्रक**
सिद्धी ऑफसेट प्रा. लि. प्रभादेवी, मुंबई - २५.

**मुद्रितशोधन**
मिलिंद वेलिंगकर, वृषाली सरदेशपांडे

**मुखपृष्ठ**
आशुतोष सरपोतदार

**मूल्य :** ९०० रुपये

# प्रशासन खंड

**सल्लागार मंडळ**
डॉ. माधव चितळे  डॉ. शरद काळे
श्री. श्रीधर जोशी  श्री. अरविंद इनामदार
श्री. सूर्यकांत जोग  श्री. प्रभाकर करंदीकर

**कार्यकारी संपादक**
दीपक हनुमंत जेवणे

**संपादन साहाय्य**
वर्षा जोशी-आठवले
राजेश प्रभु-साळगावकर
सुपर्णा कुलकर्णी
आशा बापट

**खंड समन्वयक**
संध्या सुधाकर लिमये

**खंड सहयोग**
पुणे महानगरपालिका, पुणे
पिनॅकल ग्रुप
स. गो. बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट

**विशेष आभार**
यशदा, पुणे
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
भारतीय लोकप्रशासन विभागीय संस्थेचे ग्रंथालय
वन विभाग ग्रंथालय, पुणे
पुणे मराठी ग्रंथालय
रवी पंडित कार्य.संचालक के.पी.आय.टी.

# अनुक्रमणिका


| | चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | सेवा / क्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|---|
| ● | इनामदार अरविंद सिद्धेश्वर | १६९ | भा. पोलीस से. | – | – | |
| ○ | इ.श्रीधरन | १७१ | – | – | – | विज्ञान खंड |
| ● | उपासनी शरद पांडुरंग | १७१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | एकबोटे माणिक श्रीकृष्ण | १७२ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● | एन. रघुनाथन | १७३ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | एडवर्डस एस. एम. | १७५ | पोलीस सेवा | – | – | |
| ● | ओंबळे तुकाराम गोपाळ | १७७ | महाराष्ट्र पोलीस | – | – | |
| ● | करंदीकर प्रभाकर दत्तात्रय | १७९ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | करकरे हेमंत कमलाकर | १८० | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | कर्णिक अशोक वसंत | १८२ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | कात्रे मोहन गणेश | १८३ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | कानेटकर विष्णू गोपाळ | १८५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | कामटे अशोक मारुतीराव | १८७ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | कामटे नारायण मारुतीराव | १८८ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | काळे शरद गंगाधर | १९१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | कुलकर्णी भुजंगराव अप्पाराव | १९४ | – | महा. प्रशा. सेवा | – | |
| ● | कुलकर्णी रमाकांत शेषगिरी | १९६ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● | केली सर पॅट्रीक | १९७ | पोलीस सेवा | – | – | |
| ● | केळकर विजय लक्ष्मण | १९८ | – | – | अर्थतज्ज्ञ | |
| ● | केळकर शरद मनोहर | १९९ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | कॅफिन ए. इ. | २०० | पोलीस सेवा | – | – | |
| ● | कोल्हटकर मधुसूदन रामचंद्र | २०१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● | खुरसाळे नारायण विठ्ठल | २०३ | – | – | महा. अभि. सेवा | |


**अनुक्रमणिकेतील संक्षेपांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे :–** अभि.–अभियांत्रिकी, प्रशा.–प्रशासकीय, भा.–भारतीय, महा.–महाराष्ट्र, से.–सेवा

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | सेवा / क्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| ● खैरनार गोविंद राघो | २०४ | – | महा. प्रशा. सेवा | – | |
| ● गवई पद्माकर गणेश | २०६ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● गवई मधुकर गणेश | २०७ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● गानू प्रभाकर लक्ष्मण | २०८ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● गायकवाड व्यंकट विश्वनाथ | २१० | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● गोखले अच्युत माधव | २१३ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● गोखले अशोक भालचंद्र | २१६ | – | – | भा. परराष्ट्र सेवा | |
| ● गोखले केतन कमलाकर | २१८ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● गोखले भालचंद्र कृष्णाजी | २२१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● गोखले शरच्चंद्र दामोदर | २२२ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● गोखले श्रीपाद गणेश | २२५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● गोगटे माधव गणेश | २२६ | – | – | भा. वन सेवा | |
| ● गोडबोले माधव दत्तात्रय | २२९ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● गोळे पद्माकर विश्वनाथ | २३२ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● चव्हाण कारभारी काशिनाथ | २३४ | – | – | भा. वन सेवा | |
| ● चाफेकर माधव लक्ष्मण | २३६ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ▲ चितळे माधव आत्माराम | २३८ | – | – | महा. अभि. सेवा | विज्ञान खंड |
| ● चिन्मळगुंद पांडुरंग जयराव | २४० | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● चौबळ विनायक वासुदेव | २४१ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● जाधव यशवंत गणेश | २४३ | – | – | भा. वन सेवा | |
| ● जोग सूर्यकांत शंकर | २४५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● जोशी श्रीधर दत्तात्रय | २४७ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● जोशी वसंत कृष्ण | २५२ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● जोसेफ डॅनिअल ट्रेव्हेलीन | २५४ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● टाकळकर वसंत देगुजी | २५७ | – | – | भा. वन सेवा | |
| ● डीसुझा जोसेफ बेन | २६० | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● तांबे-वैद्य मालती वसंत | २६२ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● तिनईकर सदाशिव शंभुराव | २६३ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● दुभाषी पद्माकर रामचंद्र | २६६ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● देवकुळे श्रीकांत त्रिंबक | २६७ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● देवरे सुधीर तुकाराम | २६९ | – | – | भा. परराष्ट्र से. | |
| ● देशमुख चिंतामण द्वारकानाथ | २७३ | – | भा. प्रशा. सेवा | आय.सी.एस. | |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | सेवा / क्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| ● देशमुख भालचंद्र गोपाळ | २७५ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● दोशी ललित नरोत्तम | २७७ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● धर्माधिकारी अविनाश भगवंत | २७९ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● परांजपे केशव गणेश | २८१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● परांजपे वसंत वासुदेव | २८३ | – | – | भा. परराष्ट्र से. | |
| ● पाध्ये माधव गोविंद | २८४ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● पिंपुटकर मोरेश्वर गजानन | २८६ | – | भा. प्रशा. सेवा | आय.सी.एस. | |
| ● पेटीगारा कावासजी जमशेदजी | २८७ | पोलीस सेवा | – | – | |
| ● पेंडसे मधुकर दिनकर | २८८ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● प्रधान श्रीराम दत्तात्रय | २९० | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● फडके गोविंद नारायण | २९१ | – | – | भा. अभि. सेवा | |
| ● फोर्जेट चार्लस | २९२ | – | – | – | |
| ● बर्वे सदाशिव गोविंद | २९४ | – | भा. प्रशा. सेवा | आय.सी.एस. | |
| ● बापट श्रीकांत कृष्णाजी | २९६ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● बाम भिष्मराज पुरुषोत्तम | २९८ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● बूट श्रीधर सदाशिव | ३०० | – | – | भा. वन सेवा | |
| ● बोंगिरवार लक्ष्मण नारायण | ३०१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● ब्रॅडीस डिट्रीच क्रिस्टीयन | ३०३ | – | – | वन सेवा | |
| ● भडकमकर आनंद वामन | ३०४ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● भावे चंद्रशेखर भास्कर | ३०४ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● भावे सदानंद विश्वंभर | ३०६ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● भिडे बाळकृष्ण त्र्यंबक | ३०७ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● मराठे शरद श्रीकांत | ३०९ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● मसलेकर आनंद रामचंद्र | ३१० | – | – | महा. वन सेवा | |
| ● मिरानी नारायण विशनदास | ३१२ | – | – | भा. अभि. सेवा | |
| ● मिसर भास्कर जगन्नाथ | ३१३ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● मुगवे मधुकर गणपत | ३१४ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● मेन्डोसा रोनाल्ड हेसिंथ | ३१५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● मेढेकर कृष्णकांत पांडुरंग | ३१६ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● मेहेंदळे लीना | ३१८ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● मोडक इर्मन्युएल सुमित्र | ३१९ | भा. पोलीस से. | – | – | |
| ○ मोडक नारायण विनायक | ३२० | – | – | – | विज्ञान खंड |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | सेवा / क्षेत्र | | | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|
| ● मोरे दिनकर माधव | ३२० | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● मोहनी श्यामराव पुरुषोत्तम | ३२२ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● मंगलमूर्ती माधव केशव | ३२४ | – | – | भा. परराष्ट्र सेवा | |
| ● यार्दी मधुकर रामराव | ३२७ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● रड्डी अरविंद गोविंद | ३२९ | – | – | भा. वन सेवा | |
| ● राणे रावसाहेब दाजी | ३३० | पोलीस सेवा | – | – | |
| ● राणे विजयकुमार जनार्दन | ३३१ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● रानडे विद्यानंद महादेव | ३३२ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● रिबेरो ज्युलिओ फ्रान्सिस | ३३५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● लिमये शशीकांत दत्तात्रेय | ३३७ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● वैद्य विद्याधर गोविंद | ३४० | भा. पोलीस से. | – | – | |
| ● व्ही.पी.राजा | ३४१ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● व्ही.श्रीनिवासन | ३४३ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● व्ही.सुब्रमणियन | ३४६ | – | भा. प्रशा. सेवा | आय.सी.एस. | |
| ● शिंदे शशांक चंद्रसेन | ३४८ | महाराष्ट्र पोलीस | – | – | |
| ● शेणोलीकर अरुण काशिनाथ | ३४८ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● सगणे शांताराम कोंडाप्पा | ३५० | – | – | महा. प्रशा. सेवा | |
| ● सरदार मीर अकबर अलीखान | ३५१ | पोलीस सेवा | – | – | |
| ● सराफ वसंत केशव | ३५१ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● सत्यनारायण नीला | ३५३ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● साठे गजानन कृष्णाजी | ३५५ | – | – | भा. रेल्वे सेवा | |
| ● साठे दिनकर दत्तात्रय | ३५७ | – | भा. प्रशा. सेवा | आय.सी.एस. | |
| ● साठे रामचंद्र दत्तात्रय | ३५८ | – | – | भा. परराष्ट्र से. | |
| ● सावरकर विश्वास बळवंत | ३५९ | – | – | भा. वन सेवा | |
| ● साळसकर विजय सहदेव | ३६१ | महाराष्ट्र पोलीस | – | – | |
| ● सुकथनकर दत्तात्रय महादेव | ३६२ | – | भा. प्रशा. सेवा | – | |
| ● सोडल सुरेश विठ्ठल | ३६३ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● सोमण दत्तात्रेय शंकर | ३६५ | भा. पोलीस से. | – | – | |
| ● हिरेमठ शांतवीरय्या गदिगेय | ३६८ | – | – | महा. अभि. सेवा | |
| ● हुद्दार श्रीकांत नारायण | ३६९ | – | – | महा. अभि. सेवा | |

# मनोगत

साप्ताहिक विवेकने हाती घेतलेल्या आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण शिल्पकार चरित्रकोश प्रकल्पातील प्रशासन खंड प्रकाशित होत आहे. याबरोबरच न्यायपालिका आणि संरक्षण हे खंड देखील प्रकाशित होत आहेत.प्रशासन खंडासाठी समन्वयक आणि संकलक म्हणून जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रशासकीय विकासाला चालना देणाऱ्या व्यक्तींचा परिचय या खंडाच्या माध्यमातून करून देण्यात आला आहे. यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा, भारतीय रेल्वे सेवा, भारतीय आणि महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, भारतीय वन सेवा, भारतीय परराष्ट्र सेवा या विभागांमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या १०७ नावांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रशासन खंडाचे निकष, कार्यक्षेत्र आणि समाविष्ट करावयाची नावे या बाबी निश्चित करण्याच्या दृष्टीने दि.२७ मार्च २०१० रोजी इन्स्टीस्ट्यूट ऑफ इंजिनिअर्स, पुणे येथील सभागृहामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी श्री.शरद काळे, श्री.माधवराव चितळे, न्या.श्री.नरेंद्र चपळगावकर,श्री.नितीन केळकर,श्री.लक्ष्मीकांत देशमुख, सौ.वैजयंती जोशी,श्री.दादासाहेब बेंद्रे ,प्रकल्पाचे प्रबंध संपादक श्री.दिलीप करंबेळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला या मान्यवरांसमोर ढोबळमानाने तयार करण्यात आलेली प्रशासकीय अधिकाऱ्यांची यादी ठेवण्यात आली. या यादीवर चर्चा होऊन काही बदल सुचविण्यात आले. यावेळी प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या, महाराष्ट्राच्या/देशाच्या प्रशासनाला दिशा देणारे मूलभूत बदल घडवून आणणाऱ्या,अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्याच नावांचा समावेश सदर खंडात करण्यात यावा असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या बैठकीनंतर या खंडाच्या कामास दिशा मिळून यादी निश्चितीचे कामास सुरुवात झाली.

प्रशासनातील चरित्रनायकांची यादी निश्चित करण्यासाठी मी प्रशासनातील तज्ज्ञ मान्यवरांच्या भेटी घेतल्या. तसेच पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे ग्रंथालय, मंत्रालयातील भारतीय लोकप्रशासन विभागीय संस्थेचे ग्रंथालय, पुणे येथील वनविभागाचे ग्रंथालय, दैनिक सकाळ संदर्भ ग्रंथालय यांना भेट देऊन तेथील भारतीय प्रशासन या विभागातील ग्रंथांमधून माहिती शोधण्याचा प्रयत्न केला. या कामामध्ये भारतीय लोक प्रशासन विभागीय संस्थेचे कार्यकारी सहसचिव श्री. शांताराम निलकंठ कुलकर्णी, यशदाचे संशोधन अधिकारी श्री.बबन जोगदंड, पुणे येथील वनविभागाचे ग्रंथालयाचे उपग्रंथपाल श्री.शेनिटकर, दैनिक सकाळ संदर्भ ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री गाडेकर यांचे सहकार्य लाभले. या ग्रंथालयांमध्ये काही प्रशासकीय अधिकाऱ्यांची चरित्रे, आत्मचरित्रे, लेख उपलब्ध होऊ शकले. परंतु प्रशासनाच्या सर्व क्षेत्रांचा विचार करता ही माहिती पुरेशी नव्हती.

त्यानंतर मी प्रशासन खंडामधे समाविष्ट करण्यात आलेले चरित्रनायक, त्यांचे स्नेही, त्यांच्या प्रशासकीय कामगिरी माहिती असणारे प्रशासनातले अधिकारी, दिवंगत अधिकाऱ्याचे स्नेही आणि नातेवाईक यांच्याशी

संपर्क साधला. त्यांच्या माध्यमातून चरित्र लेखनासाठी आवश्यक माहितीचे संकलन करणे शक्य झाले. या माहितीचे वर्गीकरण करून लेखकांना ही माहिती चरित्रलेखनासाठी देण्यात आली. या सर्व व्यक्तींशी संपर्क साधताना निवृत्त प्रशासकीय अधिकारी श्री. शरद काळे, श्री. श्रीधर जोशी, श्री. प्रभाकर करंदीकर, लीना मेहेंदळे, निवृत्त वन अधिकारी श्री. प्रभाकर कुकडोलकर, अभियांत्रिकी सेवेतील निवृत्त ज्येष्ठ अधिकारी श्री. माधवराव चितळे, श्री. माधव गोविंद पाध्ये, श्री. विद्यानंद रानडे, भारतीय रेल्वे सेवेतील अधिकारी श्री. विजयकुमार राणे यांनी वेळोवेळी सहकार्य केले त्यामुळेच सर्वांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. या सर्वांची मी ऋणी आहे.

या सर्व प्रक्रियेमध्ये काही प्रशासकीय अधिकाऱ्यांची पुरेशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे त्यांच्या कर्तृत्त्वाला न्याय मिळेल अशा प्रकारे त्यांचे चरित्रखंडात देण्यात आलेले नाही. याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. तसेच काही चरित्रनायकांची माहिती वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही अशा व्यक्तींची चरित्रे आम्ही घेऊ शकलो नाही. प्रशासन या विषयाचा एकूण विस्तार लक्षात घेता यात काही त्रुटी राहणे शक्य आहे. वाचक त्याबद्दल उदार अंत:करणाने क्षमा करतील असा विश्वास आहे.

– संध्या सुधाकर लिमये
खंड समन्वयक

# प्रस्तावना

‘आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण - शिल्पकार चरित्रकोश’ या प्रकल्पाच्या खंडात प्रशासन हा विभाग आवर्जून घेण्यात आला आहे. त्यामागे महाराष्ट्राच्या जडणघडणीत व विकासात विविध व्यक्तींनी दिलेल्या त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेतली जावी हा प्रधान हेतू आहे. प्रशासनाचं खास करून ब्युरोक्रसीचं (नोकरशाहीचं) वर्णन ‘तटस्थ’, ‘पडद्यामागे राहून काम असणारे’ म्हणूनच प्रसिद्धीपासून दूर असणारे ‘फेसलेस’ असंच केलं जातं. त्यामुळे देश वाङ्‌मयात क्वचितच प्रशासकाची नोंद घेतली गेली आहे. तीही त्यांचीच, ज्यांनी एखाद्या महत्त्वाच्या अभ्यासगट, आयोग वा कमिशनचे अध्यक्षपद वा सदस्यपद भूषवून अहवाल लिहिला आहे. ह्या पार्श्वभूमीवर ज्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत व विकास प्रक्रियेत महत्त्वाचे व लक्षणीय योगदान दिले आहे अशा काही महत्त्वाच्या शिल्पकारांच्या नोंदींमधून लोकप्रशासनाच्या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्र कसा घडला याचं दर्शन होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

तथापि महाराष्ट्राचं प्रशासन हे भारताच्या प्रशासनाचा भाग आहे, त्यामुळे प्रशासनाची चौकट भारतीय मानून त्यात महाराष्ट्र भूमीत ज्यांनी कार्य केलं व आपल्या प्रशासनाचा ठसा उमटविला अशा शिल्पकारांचा हा चरित्रकोश आहे. त्यामुळे या प्रस्तावनेचा संदर्भ हा भारतीय व जागतिक स्वरूपाचा आहे, याची प्रथम नोंद करणे पुढील विवेचनासाठी आवश्यक आहे.

**लोकप्रशासनाचे स्वरूप**

लोकप्रशासनाचे (पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन) दोन पैलू आहेत. एक लोक व्यवहार नियंत्रित करणे व मानवी विकासास चालना देण्यासाठी नीती-धोरणे आखणे आणि दोन त्याची सुविहित पद्धतीने अंमलबजावणी करून अपेक्षित फलश्रुती देणे. कोणत्याही देशात व सर्वच प्रकारच्या राज्यकारभारात (राजेशाही, हुकूमशाही ते लोकशाही) नीती-धोरणे आखणारे राज्यकर्ते / लोकप्रतिनिधी असतात, तर त्यांची चोख अंमलबजावणी करणारे प्रशासक, व्यापक अर्थाने नोकरशाही (ब्युरोक्रसी) असते.

लोकप्रशासन ही अभ्यास शाखा म्हणून साधारणपणे शंभर-सव्वाशे वर्षांपासून अभ्यासली जात असली तरी ती प्राचीन संस्कृती एवढीच जुनी आहे. भारतीय प्रशासनाचा इतिहास हा वैदिक काळापासून सुरू होतो. आजच्या आधुनिक प्रशासनातील दोन बाबी त्या काळापासून अस्तित्वात आहेत. एक म्हणजे ग्राम प्रशासनाचं - गावपातळीवरील कारभाराचं महत्त्व आणि दुसरी बाब म्हणजे केंद्रिभूत प्रशासन विरुद्ध विकेंद्रित प्रशासनाचं द्वंद्व आणि समन्वयाच्या सीमारेषेवरचा विरोध, वितंडवाद. पूर्ण जगाच्या इतिहासाचा धावता आढावा घेतला तर हे लक्षात येतं की सर्वत्र नोकरशाहीची प्रवृत्ती, गती व चाल ही समान आहे. त्यामुळे तिची ‘सायकॉलॉजी’

समजून घेणे आवश्यक आहे. तिची सैद्धान्तिक मांडणी मार्क्स व मॅक्सवेबर यांनी प्रामुख्याने केली आहे. ती विस्तारानं समजून घेणे पुढील विवेचनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

मानवी जीवनाच्या इतिहासात जेव्हा माणसांना एकत्र येऊन व्यक्तिगत कामापलीकडे काही करण्याची निकड भासू लागली, तेव्हा माणसांनी संघटना (ऑर्गनायझेशन) बांधायला सुरुवात केली. संघटनेचा जन्म हाच नोकरशाहीचा अर्थात ब्युरोक्रसीचा जन्म होय.

माणूस हा सामाजिक प्राणी आहे, ही त्यांची प्रकृती जेव्हा आदिम मानवाला जाणवली, तेव्हा एकत्र येण्याची व राहण्याची सुरुवात झाली असणार. माणसाला जसा एकांत लागतो, तसा लोकांतही. हीच सामाजिक गरज सहजतेने सामाजिक संघटनांना जन्म देती झाली असणार. माणसांनी सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन सहमतीने, जी मानवी मनाची, शरीराची व एकूणच जगण्याची गरज वैयक्तिकरीत्या भागविणे शक्य नसते तिच्या पूर्ततेसाठी, संघटना बांधायला सुरुवात केली आणि संघटना म्हटली की, वागण्याचे काही नियम आले, कामाचे वाटप आले. मग त्यासाठी नियोजन, अंमलबजावणी, पाठपुरावा आणि वेळोवेळी आढावा घेणे या प्रक्रिया आल्या. त्या करण्यासाठी कामकाजाचे वाटप झाले असणार. या वाटपात माणसाची बुद्धी व कार्यकुशलता समान नसल्यामुळे कामाचे विषम वाटप झाले. नियोजन व नियंत्रण करणारा वरचा, तर ठरवलेले काम व क्रिया करणारा उतरंडीच्या खालच्या पायरीवर अशी विभागणी आपसूकच झाली. हा संघटनेचा ब्युरोक्रसीचा जन्म नाही का?

‘ब्यूरो’ हा फ्रेंच शब्द आहे. त्याचा अर्थ मेज किंवा डेस्क झाकणारा कपडा. त्याला ग्रीक ‘क्रेसिया’ शब्द जोडून ‘ब्यूरोक्रसी’ हा शब्द व संज्ञा सिद्ध झाली. त्याचा प्राथमिक अर्थ ‘अशी एक कार्यालयीन जागा, जिथं काही माणसे / अधिकारी मेजावर काम करतात.’ आज या सामाजिक संस्थेचा एवढा विस्तार झाला आहे की, आजचे जीवन तिच्याविना आपण कल्पूही शकत नाही!

**मार्क्स आणि ब्युरोक्रसी**

नोकरशाहीच्या व्युपत्तीची सार्थ कल्पना मार्क्सवादी समीक्षेद्वारे बिनतोडपणे करता येते. ब्युरोक्रसीच्या ऐतिहासिक उत्पत्तीचे चार स्रोत आहेत, असं मार्क्स व एंजेलचा सिद्धान्त सांगतो, हे चार स्रोत म्हणजे धर्म, राज्य (स्टेट), व्यापार आणि तंत्रज्ञान.

कोणताही धर्म घ्या, धर्मपीठ, पीठाचार्य, धर्मग्रंथाचे पठण करणारे व अर्थ सांगणारे पंडित, धर्मगुरू हे सर्व आलेच. ही धर्माची ब्युरोक्रसी आहे, असं मार्क्सचा सिद्धान्त सांगतो. हिंदू वैदिक धर्माचं उदाहरण घेऊन याचं स्पष्टीकरण देता येईल. यज्ञ, यज्ञविधी करणारे पुरोहित, धर्मग्रंथ मुखोद्गत असलेले दशग्रंथी दर्जाचे ऋषी-मुनी, सामान्य माणसांच्या जीवनातले जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या बाबींसाठी जे धर्म संस्कार व विधी रूढ झाले, ते करण्यासाठी लागणारा पुरोहित वर्ग, त्यांच्यातील अधिकार व वंशपरंपरेतून विकसित झालेली सत्तेची चढ किंवा उतरंड, त्यांचे आपसातले वर्तन, आज्ञा व आज्ञापालन अशा पद्धतीने घट्ट बांधलेले असते. ही मार्क्सप्रणित धार्मिक नोकरशाहीच झाली!

सुरुवातीला माणूस टोळ्या करून राहायचा. मग त्याचं प्रभावक्षेत्र आलं, त्यातून प्रभावाच्या व सत्तेच्या सीमारेषा निश्चित होत गेल्या. ही राज्याच्या निर्मितीची ढोबळ सुरुवात होती. राज्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या शक्तिमान राजाला राज्याच्या संरक्षणासाठी सेना लागते. सेनेचा खर्च भागविण्यासाठी महसूल लागतो, मग तो जनतेकडून त्यांच्या संरक्षणाच्या हमीच्या बदल्यात वसूल करणे सुरू झाले. त्यातूनच महसुली कराची रचना व

ती वसूल करणारी यंत्रणापण निर्माण झाली. परिणामी राज्यधिष्ठित नोकरशाही- सैन्य व महसूल यंत्रणा पण विकसित होत गेली. जगभर याच पद्धतीने राजा-बादशहाची स्टेट ब्युरोक्रसी निर्माण झाल्याचा इतिहास आहे.

पण नोकरशाहीची जबरदस्त वाढ झाली ती व्यापारामुळे. अगदी प्राचीन काळापासून जगभर व्यापार होता. त्यासाठी हिशोब ठेवणे, वस्तू विक्रयासाठी चलन पद्धती निर्माण करणे, त्याचे कायदेकानून करून त्याचे पालन करण्यासाठी व्यवस्था विकसित करणे यामुळे नव्या प्रकारची वाणिज्यिक व्यवस्थापनाची नोकरशाही जोमानं फोफावत गेली. आज ती शासनाच्या-राज्याच्या ब्युरोक्रसीपेक्षा कैकपटीने मोठी आहे. उदाहरणच द्यायचं झालं तर 'जी.ई.', 'फोर्ड', 'कोकाकोला' आदी बहुराष्ट्रीय कंपन्यांची नोकरशाही कोणत्याही देशाच्या तोडीस तोड अशी प्रचंड व संख्येने मोठी आहे.

चवथ्या प्रकारची ब्युरोक्रसी ही तंत्रज्ञानाच्या विकासातून निर्माण झाली, असं मार्क्सवाद्यांचं विवेचन आहे. मोठ्या प्रमाणात वस्तू निर्माण करणाऱ्या यंत्र सामग्रीच्या व्यवस्थापनासाठी मनुष्यबळ लागतं. त्यातून विशिष्ट वर्गास वरकड उत्पन्न मोठ्या प्रमाणात मिळतं व त्याची सत्ता बळकट होत जाते. याला 'टेक्नाक्रसी'पण म्हटलं जातं!

मार्क्सचं महत्त्वाचं विश्लेषण म्हणजे नोकरशाही ही कधीच संपत्ती निर्माण करीत नाही, तर ती केवळ नियंत्रित करते हे होय. ती संपत्तीची निर्मिती, वितरण व उपभोगाचे विनिमयन करते आणि आपला वाटा त्यातून प्राधान्याने काढून घेते. फी, कर, लेव्ही, लायसेन्स फी व सेवाशुल्क आदीद्वारे संपत्तीचं ती विशिष्ट हुकूमी पद्धतीने वाटप करते. त्यामुळे ब्युरोक्रसी ही समाजाला मोजावी लागणारी किंमत आहे. ती सर्वसामान्य नागरिक समाजव्यवस्था आणि कायदे-कानून व 'जान माल' च्या रक्षणासाठी एका मर्यादेपर्यंत सहन करतात. पण त्यामुळे सामाजिक तणाव निर्माण व्हायचा काही रहात नाही. कारण निर्मात्याला त्याने निर्माण केलेल्या वस्तू व सेवांमधून जास्तीत जास्त संपत्ती व नफा हवा असतो व कमीत कमी प्रशासकीय किंमत द्यावी वाटते. जेव्हा त्याचा समतोल ढळतो, विसंवाद निर्माण होतो. जेव्हा आर्थिक प्रगती जोमदार असते तेव्हा, नोकरशाहीला भरपूर मिळतं. पण लक्षात घेतले पाहिजे की, आर्थिक मंदी आल्यावर तिची कोंडी सुरू होते. नोकऱ्या जातात व पगारात कपात होते.

मार्क्सप्रणित ब्युरोक्रसीच्या विवेचनातला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे उत्पादनाची साधने व उत्पन्न यांचे नोकरशाहीच्या माध्यमातून होणारे वाटप आणि बाजार व्यवस्थेतून होणारे वाटप यातील द्वंद्वाचा आहे. अस्तंगत झालेल्या सोविएत युनियनमध्ये व काही प्रमाणात आजही चीन व क्युबामध्ये संपत्तीनिर्मितीची व उत्पादनाची साधने राज्याकडे-शासनाकडे असल्यामुळे ब्युरोक्रसीमार्फत संपत्ती व उत्पन्नाचे वाटप होत असते. त्याद्वारे सामाजिक न्यायाचा समतोल राखण्याचा प्रयत्न होतो. परंतु बाजार व्यवस्थेमध्ये हे भान अर्थातच असणे शक्य नसते. तरीही भांडवलशाही देशातील लोकशाही व्यवस्थेने लोककल्याणकारी विकासाचे तत्त्वज्ञान स्वीकारले असल्यामुळे स्टेट ब्युरोक्रसीद्वारे संपत्ती वाटपात सामाजिक भान ठेवले जाते.

मार्क्सच्या खऱ्याखुऱ्या समाजवादामध्ये कामगाराचे स्वयं व्यवस्थापन हे तत्त्व अनुस्यूत आहे, त्यामुळे नोकरशाहीची देखरेख तत्त्वत: अप्रस्तुत ठरते. पण मानवी प्रवृत्ती मूलत: स्वार्थमूलक असते व तिला स्वयं अनुशासन मान्य नसते. त्यामुळे तिच्यावर नियंत्रण ठेवणे भाग पडते. म्हणजेच नोकरशाही अपरिहार्य ठरते, जी कायदा-सुव्यवस्थेसाठी काम करते व मानवी समूहांवर त्यांच्या सार्वजनिक कल्याणासाठी नियंत्रण ठेवते. सोविएत युनियन व चीनमध्ये मोठ्या प्रमाणात शासन व पक्ष नियंत्रित नोकरशाही होती व आहे. ही मार्क्सच्या सिद्धान्ताच्या विरोधात जाणारी वस्तुस्थिती आहे.

### मॅक्स वेबरचा नोकरशाहीचा सिद्धान्त

आधुनिक काळात ब्युरोक्रसीचा सखोल व सैद्धान्तिक अभ्यास करून ब्युरोक्रसी म्हणजे 'ठरींळेपरश्र-श्रशसरश्र षीा ेष ेीसरपळूरींळेप वशीळसपशव ीें ीिीेंश ींहश ीरींळेपरश्रळूरींळेप ेष ेीसरपळीरींळेपरश्र ीेंरीज्ञी रपव सेरश्री' असा सिद्धान्त मांडणारा प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ म्हणजे मॅक्स वेबर होय. त्याने 'ब्युरोक्रसी' हा निबंध लिहून त्यात क्लासिकल संघटनेचा सिद्धान्त क्लासिकल ऑरगनायझेशनल थिअरी मांडून आदर्श सिद्धान्तावर आधारलेली नोकरशाही ही संघटनेच्या प्रशासनाची सर्वश्रेष्ठ व्यवस्था असते असे प्रतिपादन केले आहे.

एक तत्त्वचिंतक समाजशास्त्रज्ञ म्हणून वेबरने संघटनेमध्ये सत्ता ही अधिकार माध्यमातून राबविली जाते असे दाखवून दिले. त्याने सत्ता (पॉवर) व अधिकार (ॲथॉरिटी) यातील भेद स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, सत्ता ही विरोध न जुमानता इतरांवर अनियमितपणे गाजविली जाते, तर अधिकार हा सत्तेच्या वैध नीतिनियमातून निर्माण होतो. त्यामुळे अधिकार हा नियंत्रित व संघटनसापेक्ष आणि व्यक्तीनिरपेक्ष असतो. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी राजेशाहीमध्ये सत्तेचा बेधुंद वापर सत्ताधिशांच्या लहरी व मर्जीप्रमाणे व्हायचा. त्यामुळे राज्यकारभारात निर्माण झालेल्या दोषावर उतारा म्हणून नोकरशाही व्यवस्था निर्माण झाली. ती विवेकनिष्ठ कायदेशीर अधिकारांनी सीमित होती. सबब नोकरशाही राबवणारे व्यवस्थापन हे वैयक्तिक लहरीऐवजी चौकटबद्ध, पूर्वनिर्धारित, व्यक्तीनिरपेक्ष नियम व कायद्याच्या आधारे संघटनेचे व्यवस्थापन करतात, त्या मागचे तत्त्व असते ते विवेकनिष्ठ कायदेशीर अधिकाराचे. थोडक्यात नोकरशाही प्रशासन व्यवस्थेची प्रधान वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. कायदा व नियमांची संहिता नोकरशाही नियंत्रित करते व त्या आधारे आज्ञा दिल्या जातात व आज्ञापालन केले जाते. थोडक्यात आज्ञेची एक सुसंबद्ध साखळी असते. प्रत्येक जण त्याच्या वरच्याकडून आज्ञा घेतो व खालच्यांना आदेश देतो व कामाची अंमलबजावणी होत राहते.

२. कामाची स्पष्ट विभागणी हे ब्युरोक्रसीचे दुसरे प्रधान लक्षण आहे. मॅक्स वेबरने ॲडम स्मिथचा 'डिव्हिजन ऑफ लेबर' हा सिद्धान्त संघटन प्रशासनात बसवत प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याची कर्तव्ये, जबाबदारी व अधिकार आणि अधिकाराची मर्यादा आयडियल ब्युरोक्रसीत निश्चित केली व त्यात बदल करतानाही किमान सातत्य राखण्याचा प्रयत्न केला जातो, हे दाखवून दिले.

३. विशिष्ट निवड पद्धतीने कर्मचाऱ्यांची गुणवत्तेच्या आधारे नियुक्ती व त्यांना आयुष्यभराची बढतीसह नोकरीची हमी या व्यवस्थेत असते. त्यामुळे कोणत्याही दडपणाविना संघटनेच्या हितासाठी काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते.

हा सारांशरूपाने बेवरचा आयडीयल ब्युरोक्रसीचा सिद्धान्त आहे. युरोपमध्ये अठराव्या शतकात प्रबोधन युगाच्या पार्श्वभूमीवर लोकशाही खऱ्या अर्थाने रूजत गेली. औद्योगिक क्रांती व विज्ञानाच्या नव्या शोधांमुळे राज्य प्रशासन यंत्रणेची-स्टेट ब्युरोक्रसीची झपाट्याने वाढ झाली. राज्यव्यवस्था युरोप देशात परावर्तित होताना बेवरने तिला सैद्धान्तिक रूप देत तिच्या कार्यव्यवस्थेचे नियम तयार करीत तिला एक आदर्शवत चौकट बहाल केली. आजही त्याच चौकटीत बहुतांश देशात ब्युरोक्रसीचे कामकाज चालते, हे लक्षणीय आहे. हा बेवरच्या सिद्धान्ताचा कालातीतपणा आहे.

मॅक्स वेबरच्या आदर्श ब्युरोक्रसीच्या सिद्धान्तास जी मान्यता मोठ्या प्रमाणात मिळाली, त्यामागे पूर्वीच्या अनिर्बंध सत्तेच्या राजेशाहीमुळे सामान्यजनाच्या होणाऱ्या गळचेपीचा व तिच्या असाहाय्यतेचा इतिहास होता. त्या पार्श्वभूमीवर सत्तेपेक्षा कायदेशीर अधिकाराच्या चौकटीत प्रशासन देणारी व समाज नियंत्रण करणारी

नोकरशाही ही सामान्य नागरिकांना वरदान वाटली तर नवल नाही. पण कोणताही आदर्श विचार व व्यवस्था ही मानवी मनाचा स्वार्थमूलक स्वभाव व दुर्बलतेमुळे तंतोतंत साकार होणे शक्य नसते. या मानवी प्रवृत्तीमुळे ती झाकोळली जाते, तिच्यात मग अनेक दोष निर्माण होतात. नोकरशाहीची चौकट जरी विवेकानिष्ठ कायद्याची असली तरी ती राबवणारी काही विकारग्रस्त, लोभी व स्वार्थी माणसे तिचा गैरवापर करतात. त्यांना जर नियंत्रित करायची व्यवस्था व तत्पर न्यायव्यवस्था नसेल तर ती अधिकच भ्रष्ट, मंदगतीची व विकास प्रशासनामध्ये अवरूद्ध निर्माण करणारे रूप धारण करतील. आज ब्युरोक्रसीला जी नावे ठेवली जातात, याचे हे कारण आहे.

पण त्यामुळे नोकरशाहीचा सिद्धान्त व विचार चुकीचा ठरत नाही. उलट तो आजही किती प्रस्तुत व आधुनिक जबाबदेही जनकल्याणाच्या कारभाराशी सुसंगत आहे हे वर नमूद केलेल्या वैशिष्ट्यांवरून कुणासही पटू शकेल.

सारांश-नोकरशाही व्यवस्था व तिचे सिद्धान्त कालबाह्य व चुकीचे नाहीत तर ती राबवणारे अधिकारी व कर्मचारी मानवी विकार पीडित स्वार्थमूलक आहेत. समाजाची मूल्यविहिनता नोकरशाहीतही आल्यामुळे ती वेबरच्या कसोटीला पूर्णपणे खरी उतरत नाही हे मात्र विदारक सत्य होय!

**‘अर्थशास्त्र’ आणि ‘प्रिन्स’**

ग्रामप्रशासन व केंद्रीय प्रशासन या दोन स्तरावरचं लोकप्रशासन हे भारतात प्राचीन वैदिक काळापासून अस्तित्वात होतं.

त्याला परिपूर्ण रूप मिळाले गुप्त कालखंडात. त्याचं सारं श्रेय आर्य चाणक्य किंवा विष्णुगुप्त याला जातं. त्याचा ‘अर्थशास्त्र’ हा ग्रंथ प्राचीन, अद्वितीय व परिपूर्ण असा लोकप्रशासनाचा ग्रंथ आहे. तो एकाच वेळी अत्यंत व्यवहार्य पण त्याच वेळी काही नीती सिद्धान्त सांगणारा आहे. आजही प्रशासन करताना चाणक्य सूत्रे उपयोगी पडावीत, एवढी ही मूलभूत स्वरूपाची व कालातीत आहेत. अर्थशास्त्र हा आजच्या व्यापक संदर्भातला समाजशास्त्राचा ग्रंथ आहे, त्यात सामाजिक व नैतिक तत्त्वज्ञान आहे, इतिहास, न्यायशास्त्र, अर्थशास्त्र व लोकप्रशासन (ब्युरोक्रसीसह) एवढ्या बाबींचा समावेश आहे.

चाणक्याची अनेकदा मायकेलवली या सोळाव्या शतकातील इटलीच्या राजकीय विचारवंतांशी तुलना केली जाते. त्याचा ‘प्रिन्स’ हा ग्रंथ जगविख्यात आहे. जरी दोघांच्या काळात सुमारे २००० वर्षांचं अंतर असलं तरी त्यांच्या तत्त्वज्ञानात कमालीचं साम्य आहे. ते थोडक्यात पुढे नमूद करतो.

१. दोघांनी राज्य प्रशासनामध्ये राजकारण व नैतिकतेची पूर्णत: फारकत केली आहे (सेपरेशन ऑफ पॉलिटि्क्स फ्रोम एथनिक), चाणक्यानं तर धर्माचीही राजकारणापासून फारकत केली आहे. आजचं राजकारण ही त्याची अपरिहार्य परिणती आहे का? असा प्रश्न विचारी मनाला पडल्यावाचून राहत नाही.

२. दोघेही व्यवहारी, रोखठोक राजकारणाचे (रियल पॉलिटिक्स) चे पुरस्कर्ते होते. त्यांनी राजा व राज्यकर्ता आक्रमक व महत्त्वाकांक्षी असावा असं प्रतिपादन केलं आहे. त्यांनी साध्याला साधनापेक्षा जास्त व प्रमुख महत्त्व दिलं आहे. त्यांच्या दृष्टीने सत्ता महत्त्वाची असून ती मिळवण्यासाठी कोणताही मार्ग हा विधि युक्तच असतो, असावा असा त्यांचा सिद्धान्त होता. ज्ञान, नैतिकता व शुद्धता हे गुण तोवरच चांगले, जोवर ते सत्ते आड येत नाहीत वा सत्ता मिळवण्यात आडकाठी आणत नाहीत. दोघांनी नि:संदिग्धपणे संधिसाधूपणाचा पुरस्कार केला आहे.

३. कौटिल्याने राजा हा विजीगिषु व जग पादाक्रांत करणारा युद्धखोर, आक्रमक व बलवान असावा असे

लिहिले आहे. मायकेलवलीने राजामध्ये सिंहाची शक्ती व कोल्ह्याची धूर्तता असावी असं नमूद केलं आहे. थोडक्यात सत्ताधिशांनी कारभार करताना सत्ता ही निर्घृण व निरकुंशपणे राबवावी व त्याच्या आड येणाऱ्यास साफ करावं असं स्पष्ट रोखठोकपणे प्रतिपादलं आहे.

आज जगभर जे राजकारण व सत्ताकारण चालते ते ह्याच तीन सूत्रांच्या आधारे चालतं असं म्हणता येईल.

पण आज चाणक्याच्या 'अर्थशास्त्रा' चे पुनर्मूल्यांकन चालू आहे. नवे नवे अभ्यासक त्यावर वेगवेगळ्या अंगानं प्रकाशझोत टाकीत आहेत. त्यावरून हे स्पष्ट होतं की, आर्य चाणक्य व मायकेलवली आणि 'अर्थशास्त्र' व 'प्रिन्स' ची तुलना व साम्य शोधण्याचा प्रयत्न चुकीचा व चाणक्यावर अन्याय करणारा आहे. कारण मायकेलवली हा जसा पूर्णत: 'नेफेड पॉवर' व 'राजकारणामध्ये नैतिकता अजिबात नको' या विचारांचा होता, तसा आर्य चाणक्य खचितच नव्हता. त्याचं सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे 'अर्थशास्त्र' हा केवळ राज्य प्रशासनाचा विषय हाताळणारा ग्रंथ नाही तर तो जगातला कदाचित पहिला परिपूर्ण व विस्तृत असा समाजशास्त्रीय ग्रंथ होता. त्यांन अपरिहार्य तडजोड व नंद काळातील छोट्या छोट्या राज्यातल्या स्पर्धा, हाणामारी पाहून ती मिटवण्यासाठी 'रिअल पॉलिटिक्स' चा जरूर अवलंब केला, पण त्याची अंतिम दृष्टी ही जनकल्याणाची होती – वेलफेअर ॲडमिनिस्ट्रेटरची होती. कौटिल्याने राजधर्म सांगताना राजा हा निरंकुश नसून तो 'धर्मा' च्या सीमेने बद्ध असतो व अत्यंत कठोर परिश्रमाचे नियमित व 'श्रीमान योगी' सारखे जीवन व्यतित करणारा तो राज्याचा उपभोगशून्य स्वामी असतो असे नमूद केले.

कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ मूलत: अर्थशास्त्र, राज्यकारभार व राज्य चालवण्यासाठी कला (स्टेट क्राफ्ट) विशद करणारा सामाजिक ग्रंथ आहे. तो शुद्ध तर्कशास्त्र व संशोधनाच्या आधारे रचला गेला आहे. त्याच्या पूर्वी जे भारतीय ग्रंथ रचले गेले, त्यांची सरूवात व अर्थशास्त्राची सुरूवात पाहा, त्यातला फरक लक्षात येईल. सर्व पौराणिक व प्राचीन ग्रंथाची सुरूवात गणेशाच्या स्मरणानं झाली आहे, पण अर्थशास्त्राच्या सुरूवातीला चाणक्यानं देवा ऐवजी दोन महान गुरू, एक असुरांचा व एक देवांचा गुरू–शुक्राचार्य व बृहस्पती यांना वंदन करून केली आहे. हा फार महत्त्वाचा फरक लक्षात घेतला पाहिजे. पुराण काळात देव व असुर हे एकमेकांचे शत्रूपक्ष होते हे सर्वविदीत आहे, त्यामुळे त्यांच्या विचारसरणी, मते व दृष्टिकोन भिन्न असणार. कौटिल्याने दोन्ही विचारांचा अभ्यास करून नीरक्षीर विवेकानं त्यातली उत्तम व ग्राह्य तत्त्वे आपल्या ग्रंथात घेतली आहेत.

### भारतीय नोकरशाहीचा इतिहास

भारताच्या मध्ययुगीन इतिहासात मुघल काळात अकबराचा दिवाण राजा तोडरमलनं आधुनिक महसूल प्रशासनाचा शास्त्रशुद्ध पाया रचला. आजही भारतात सत्तर टक्केपेक्षा जास्त नागरिक शेतीवर अवलंबून आहेत, त्यांच्यासाठी जमीन ही सर्वात महत्त्वाची संपत्ती आहे. राजा तोडरमलने जमीन महसुलाची शास्त्रीय पद्धतीने आखणी केली, त्यानं विशिष्ट नियमांच्या आधारे जमिनीचे सर्वेक्षण व मोजणी केली. त्या काळात उद्योग व व्यापारापेक्षा जमीन महसूल हा राज्यकर्त्यासाठी उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत होता, त्यामुळे रयतेला न्याय देत जसं तोडरमलने कसेल त्याची जमिन हे आधुनिक काळातले तत्त्व स्वीकारले, तसेच राज्यकारभारासाठी शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोतही महसूल करांची आखणी करून केला. आजही भारताचे जमीन व महसूल प्रशासन तोडरमलच्या पद्धतीचे थोडाफार कालानुरूप बदल स्वीकारून चालते. त्यानंतर भारताच्या लोकप्रशासनाचा महत्त्वाचा पण काहीसा दुर्लक्षित राहिलेला टप्पा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचं काळाच्या पुढे असलेले,

आधुनिक प्रशासनाची बीजं असलेले, प्रशासन होय. त्यांच्या लोकप्रशासनाची दोन ध्येये होती, एक रयतेच्या सुखदु:खाशी समरस होणे व दुसरे जुलमी वतनदारी पद्धत नष्ट करणे. त्यांचं अष्टप्रधान मंडळ हे आजच्या मंत्रिमंडळाचं तत्कालीन रूप होतं. त्यांनी केवळ आठ प्रधानांद्वारे राज्यकारभार चालवला. जेवढं मंडळ सुटसुटीत असतं, तेवढं ते गतिमान व प्रभावी असतं, ही महाराजांची दृष्टी आजही स्वीकारार्ह आहे.

पण भारतातील लोकप्रशासन व नोकरशाहीचा पाया ब्रिटिश कालखंड १८७२ साली जिल्हाधिकारी- कलेक्टरांच्या- पदनिर्मितीपासून ठळक रीतीने सुरू झाला असं मानलं जातं. सुमारे दीडशे वर्षे ब्रिटिशांनी केवळ हजारभर आय.सी.एस. अधिकाऱ्यांच्या मदतीनं भारतासारख्या प्रचंड आकारमान व लोकसंख्येच्या देशाचा कारभार चालवला व एतद्देशीयांचे कल्याण हा हेतू नसला तरी राज्यकारभाराच्या सोयीसाठी आधुनिक तेही इंग्रजीतून शिक्षण, न्यायव्यवस्था, टपाल-रेल्वे सारख्या सेवा आणि आधुनिक राज्य प्रशासन व्यवस्था निर्माण केली. तिला सार्थपणे पोलादी प्रशासकीय चौकट अर्थात 'स्टिल फ्रेम' म्हणता येईल.

आज भारतातील प्रचलित प्रशासकीय चौकट व यंत्रणा ही काही प्रमाणात कालानुरूप झालेला बदल सोडता ब्रिटिश कालखंडाप्रमाणेच कायम आहे. त्यात भारतीय शासकांनी - नेत्यांनी खरं तर स्वातंत्र्योत्तर कालखंडात पहिल्या काही वर्षात कौटिलीय अर्थशास्त्र व शिवकालीन प्रशासन प्रणालीचे वर वर्णिलेल्या काही वैशिष्ट्यांचे त्यात रोपण केले असते तर तिला नवे एतद्देशीय वळण लागू शकले असते. पण आता त्याची वेळ निघून गेली आहे असं म्हटलं पाहिजे. पं. नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्था, समाजवाद व लोककल्याणकारी विकास प्रशासनाची कास पकडली, पण त्या साठी 'रूल्स अँड रेग्युलेशन' , 'स्ट्रिक्ट ॲडरन्स टु प्रोसिजर' आणि 'जनतेला काय कळतं? आम्ही अधिकारी अधिक जाणतो' आणि 'वुई आर हिअर टु रुल' व 'लिड द मासेस' ही ब्रिटीशकाळापासून रूजलेली नोकरशहाची मानसिकता बदलण्याचे प्रयत्न झाले नाहीत. विकास प्रशासन हे लोकप्रशासनापेक्षा थोडं भिन्न आहे. विकासासाठी नियमांची चौकट व कायदा-नियमांची जरुरी असली तरी नागरिकांचा विकास हे लक्ष्य हा केंद्रबिंदू विकास प्रशासनात असतो. ब्युरोक्रसीची चौकट ही अजूनही अंमलबजावणीची यंत्रणाच राहिली आहे, तिला सर्वंकष विकास यंत्रणेचे स्वरूप देण्यास आपले राज्यकर्ते-शासन कमी पडले आहेत, असंच म्हणणं भाग आहे. त्यामुळे नव्या अर्थपूर्ण बदलाची संधी आपण गमावली आहे.

ब्रिटिशांनी राज्यकारभार करताना स्थानिक स्वराज्य संस्था-महानगरपालिका व नगरपालिका स्थापन केल्या. त्यांची सुरुवात १६८८ मध्ये प्रथम मद्रास येथे व त्यानंतर मुंबई व कलकत्ता येथे महानगरपालिका स्थापन केली. १८५९ मध्ये लॉर्ड केनिंगने 'पोर्टफोलिओ' व्यवस्था सुरू करून प्रथम वित्त व गृह विभाग स्थापिले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची स्थापना केली. मग क्रमश: शेती, व्यापार, १९०५ साली स्वतंत्र रेल्वे खाते (आधीचे रेल्वेबोर्ड बंद करून), १९१० साली शिक्षण विभाग स्थापन झाले. त्यामुळे नोकरशाहीचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला.

संक्षेपानं विवेचन करायचं तर असं म्हणता येईल की, ब्रिटिशांनी त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली आपणास दिली. केंद्रीय सत्ता (गव्हर्नर जनरल प्रमुख असलेले 'इंडियन सरकार'), प्रांतिक सत्ता (मुंबई, बंगाल, मद्रास आदी प्रांतिक राज्ये - प्रेसिडेंन्सीज) आणि स्थानिक स्वराज्य संस्था, त्यामुळे अधिकाराचे विकेंद्रीकरण क्रमश: होत गेले. या प्रशासन व्यवस्थेत केंद्रीय व प्रांतिक अधिकाराची सुस्पष्ट विभागणी करण्यात आली. सेना विभाग, परराष्ट्र धोरण, कस्टम व कॉमर्स, रेल्वे, पोस्ट व टेलिग्राफ, इन्कम टॅक्स (प्राप्तीकर), चलन (करन्सी), नागरी व फौजदारी कायदे हे केंद्रीय अधिकाराचे - खात्यांचे विषय ठरविण्यात आले. त्यातूनच अखिल भारतीय प्रशासन, पोलीस सेवेबरोबर आज ज्या २३ अखिल भारतीय सेवा - रेव्हेन्यू, कस्टम, पोस्टल, रेल्वे इ. आहेत

त्यांचा जन्म झाला. प्रांतिक अधिकाराच्या यादीत स्थानिक स्वराज्य संस्था, वैद्यकीय मदत, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, जलसिंचन, जमीन महसूल, दुष्काळ निवारण, न्याय, पोलीस व तुरुंग हे विभाग व अधिकार दिले गेले. त्यासाठी प्रांतिक लोक सेवा (प्रोव्हिन्सिअल पब्लिक सर्व्हिस) निर्माण झाल्या हे लक्षात ठेवणं जरुरीचे आहे. म्हणजेच आज देशात जी विषयाची/अधिकाराची केंद्रीय सूची (सेंट्रल लिस्ट) व राज्य सूची (स्टेट लिस्ट) आहे, तिचा हा मूळ अवतार होता. भारतीय प्रशासनानं त्याला समान (कॉंकरंट) सूची निर्माण करून एक पाऊल पुढे टाकलं आहे एवढंच! प्रांतिक राज्याच्या अधिकारांची 'वर्ग केलेले' (ट्रान्सफर्ड) आणि 'राखीव' (ठशीशर्ींशिव) अशा दोन यादीत विभागणी करण्यात आली होती. त्यामध्ये न्याय, पोलीस, तुरुंग, वृत्तपत्रांचे नियंत्रण, महसूल, जलसिंचन, श्रम व वित्त हे राखीव होते व त्यावर केंद्रीय सत्तेचे बऱ्याच अंशी नियंत्रण होते. हीच ती द्विदल (द्याराच) पद्धत होय!

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातले लोक प्रशासन**

ब्रिटिशांनी अवघ्या हजार-बाराशे आय.सी.एस. अधिकारी व लाखभर फौजेच्या मदतीने खंडप्राय देशावर दीडशे वर्ष राज्य कसे केले असेल? हा प्रश्न येथे उपस्थित होऊ शकतो. एक तर आधुनिक शस्त्राचे व तंत्रज्ञान (उदा., रेल्वे, पोस्ट, इत्यादी), पोलादी प्रशासन आणि बऱ्याच प्रमाणात कायद्याचे राज्य या त्रिसूत्रीने त्यांनी सुविहित प्रशासन दिले, हे मान्य करणे भाग आहे.

ब्रिटिश प्रशासकाचा एक मोठा गुण म्हणजे त्यांची अभ्यासू वृत्ती. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात जेथे ब्रिटिश कलेक्टर व इतर आय.सी.एस. अधिकारी काम करीत होते, तेथे त्यांनी अत्यंत बारकाईने व अभ्यासपूर्वक त्या जिल्हा/प्रांताचा भूगोल, इतिहास, त्याचे जनजीवन, तेथील भाषा, संस्कृती आणि आर्थिक-सामाजिक परिस्थितीची माहिती घेतली, तिचे लिखित रूप म्हणजे 'जिल्हा दर्शनिका' (डिस्ट्रीक्ट गॅझेटियर) होय. आजही त्यातली बरीचशी माहिती उपयुक्त व उपयोगी पडणारी आहे. महाराष्ट्र शासनाने अलीकडच्या काळात जिल्हानिहाय दर्शनिकांचे नव्याने संपादन करून त्याच्या ताज्या आवृत्त्या काढल्या आहेत. जिल्ह्यात रुजू झाल्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी त्या वाचून नोंदी ठेवाव्यात व त्या आधारे कारभाराची घडी बसवावी एवढ्या त्या महत्त्वपूर्ण आहेत.

मी स्वत: नांदेड, कोल्हापूर, सातारा आदी जिल्ह्यांच्या जुन्या व नव्या संपादित दर्शनिका वाचल्या आहेत, त्यातील विषयाची यादी पाहिली तरी चकित व्हायला होतं, एवढी ती सर्वंकष स्वरूपाची आहे.

आजच्या काळात कामाची व्याप्ती व धावपळ एवढी वाढली आहे की असे काही प्रकल्प हाती घेऊन पूर्ण करण्यास पुरेसा वेळ व निवांतपणा मिळाला नाही. हे काम आता विश्वकोश व महाराष्ट्र दर्शनिका विभाग आणि साहित्य व संस्कृती महामंडळ अशी प्रकाशने करीत आहे हेही नोंदले पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर काळात ब्रिटिशांनी दीडशे वर्षात विकसित केलेली अखिल भारतीय स्वरूपाची ब्युरोक्रसी तशीच प्रांतिक सरकारामधील राज्यस्तरीय ब्युरोक्रसी स्वातंत्र्योत्तर काळात तशीच ठेवायची, तिच्यात अमूलाग्र बदल करायचा का राजकीय स्वरूपाची कमिटेड ब्युरोक्रसी-अमेरिकेसारखी भारतात आणायची हा प्रश्न भारतीय नेत्यांसमोर होता. महात्मा गांधी व पंडित नेहरूंचे मत ब्रिटिश काळातील दमनकारी नोकरशाही विरुद्ध होते, पण त्यावेळी देशाचे गृहमंत्री तथा उपपंतप्रधान सरदार वल्लभाई पटेल यांनी ही प्रशासकीय यंत्रणा-ब्युरोक्रसी - चालू राहावी यासाठी ठाम भूमिका घेतली. १० ऑक्टोबर १९४९ रोजी 'कॉन्स्टिट्युएंट असेंब्ली'मध्ये त्यांनी जे भाषण केलं, ते अत्यंत महत्त्वाचं व मूलगामी होतं.

सरदार पटेलांच्या या ठाम मतामागे जसा कालातीत द्रष्टेपणा होता, तशीच एक प्रकारची अपरिहार्यता होती. ती म्हणजे स्वतंत्र भारताच्या प्रशासनाचा गाडा चालवण्यासाठी दुसरी यंत्रणा नव्हती. ब्रिटिश काळात जे भारतीय आय.सी.एस. अधिकारी होते, त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात दंगलग्रस्तांचे पुनर्वसन आणि साडेपाचशेच्या वर असलेली संस्थाने खालसा करून देश एकसंघ बनविण्यात महत्त्वाची भूमिका पटेलांच्या नेतृत्वाखाली पार पाडली होती.

ही प्रशासकीय यंत्रणा एतद्देशीय करण्यासाठी व विकास प्रशासनाची जबाबदारी पेलण्यासाठी सक्षम बनावी म्हणून तिचं नवं नामकरण भारतीय प्रशासन सेवा (इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस 'आय.ए.एस.') असे केले आणि त्यांनी व एकूणच नोकरशाहीने तटस्थ राहत निर्भिडपणे सल्ला देणे आणि कायद्यांच्या-घटनेच्या चौकटीत काटेकोरपणे काम करण्यासाठी सरदार पटेलांनी नवे संकेत, परंपरा निर्माण केल्या. साधारणपणे १९७० च्या दशकापर्यंत स्वातंत्र्यलढ्यात नेतृत्व करणारे नेते देश व राज्य पातळीवर राज्यकारभार करीत होते व त्यांच्या कामकाजाचा स्थायिभाव लोकसेवा, नि:स्पृहता व नि:स्वार्थपणा होता. तोवर भारतीय प्रशासनही, आजच्या भ्रष्टाचार व राजकारणाचे रंग धारण केलेल्या प्रशासनाच्या पार्श्वभूमीवर लोकप्रशासनाच्या सैध्दान्तिक भूमिकेत बसणारे, बऱ्याच प्रमाणात आदर्शवत होते.

अशी परिस्थिती काही काळ टिकली, पण पुढे जेव्हा तत्त्वहीन स्वार्थाचे राजकारण सुरू झाले आणि बदलते जागतिक अर्थकारणांचे प्रवाह वेळीच न ओळखता, उदारीकरणाची कास न पकडल्यामुळे निर्माण झालेली कुंठित अर्थव्यवस्था, वाढती बेरोजगारी, परमिट-लायसेन्स राजमुळे बोकाळलेला भ्रष्टाचार, कमकुवत झालेली केंद्रीय सत्ता, विभिन्न राजकीय विचारधारेची राज्यपातळीवर आलेली सत्ता, मग आघाड्यांचे राजकारण, सबंध जगाचे झालेले बाजारीकरण, माहिती-तंत्रज्ञानाचा स्फोट आणि पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त युवावर्गाची समृद्ध जीवनाची वाढती आकांक्षा अशा आव्हानाला तोंड देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रशासकीय सुधारणा करण्यात राज्यकर्त्यांना आलेले अपयश यामुळे भारतीय प्रशासन व्यवस्था गोंधळलेली व काहीशी दिशाहीन झाली आहे. परंतु राजकीय नेतृत्वाची घसरण पाहाता मागील साठ वर्षांत देशाची एकात्मता व अखंडता टिकवून धरण्यात नोकरशाहीने बऱ्यापैकी यश मिळवले आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

### भारतीय प्रशासनाचे पर्यावरण

भारतीय राज्याची वैशिष्ट्ये म्हणजे उदार लोकशाहीवादी राज्य, विकेंद्रित राज्यकारभार, सेक्युलर व लोककल्याणकारी प्रशासन करण्यात भारतीय नोकरशाहीचे योगदान मोलाचे आहे. प्रशासनाला प्रभावित करणारे जातिव्यवस्था, धर्म व जमातवाद, हिंसा आणि दहशतवाद हे चार सामाजिक पर्यावरणाचे घटक आहेत, तर सांस्कृतिक पर्यावरणात म. गांधींच्या प्रभावाने उदात्त अर्थाचे राजकारणाचे व लोकप्रशासनाचे आध्यात्मिकीकरण, सहिष्णुता व विश्वात्मकता हे तीन घटक येतात व तेही भारतीय प्रशासन कमी-अधिक प्रमाणात करतात. या सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणीय घटकातले चांगले नीरक्षीरविवेकाने टिपून ते आत्मसात करणे उच्च शिक्षण आणि प्रभावी प्रशिक्षणामुळे भारतीय प्रशासकांना अवघड नाही. पण वाढता राजकीय हस्तक्षेप, स्पर्धात्मक लोकप्रिय राजकारण करण्याची चढाओढ, लोकशाही संसदीय प्रणालीच्या निकोप संकेत व परंपरांची होणारी पायमल्ली आणि ढासळती मूल्यव्यवस्था यामुळे भारतीय नोकरशाही मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, लाल फितशाही आणि बदलास नकार देण्याची मानसिकता वाढत चालली आहे. त्यामुळे लोकनीती व धोरणाची वेगवान व सुविहित अंमलबजावणी करून जनतेला प्रभावी, विकास व कल्याणकारी

प्रशासन देण्याची व्यावसायिक नीतिमत्ता (प्रोफेशनल एथिक्स) पाळण्याचे तिला भान उरलेले नाही, ही चिंतेची बाब आहे. 'ई-गव्हर्नन्स', माहितीचा अधिकार व स्वतंत्र प्रभावी प्रसारमाध्यमामुळे अलीकडच्या काळात हे भान पुन्हा नोकरशाहीस काही प्रमाणात येत आहे, हेही येथे नमूद केले पाहिजे.

भारतीय प्रशासनाचे घटनात्मक पर्यावरण समजून घेणे महत्त्वाचे आहे. २६ जानेवारी, १९५० पासून भारत हा प्रजासत्ताक देश झाला आहे व घटनेच्या चौकटीत भारताचा राज्यकारभार व प्रशासन चालते, चालले पाहिजे. कारण कोणत्याही देशाच्या घटनेचे स्वत:चे एक एतद्देशीय तत्त्वज्ञान असते. त्या आधारे शासनाची रचना व कार्यपद्धती सिद्ध होते. भारतीय घटनेचा केंद्रबिंदू भारतीय नागरिक आहे. 'आम्ही भारतीय लोक' (वी द पीपल ऑफ इंडिया) या अत्यंत समर्पक शब्दानी सुरू होणारा भारतीय घटनेचा सारनामा, उद्देशिका हे अधोरेखित करते की, भारत हा एक सार्वभौम, समाजवादी, सेक्युलर प्रजासत्ताक देश आहे व न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही त्याची मूल्ये आहेत. जनकल्याण व विकास हे तिचे अंतिम ध्येय आहे. या घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकास काही मूलभूत अधिकार (समता, स्वातंत्र्य, शोषणाविरुद्धचा अधिकार, भाषण, सांस्कृतिक, शैक्षणिक, मालमत्ता व घटनात्मक उपाययोजना) दिले आहेत, ते त्यांना कोणत्याही अडथळ्याविना मिळवण्यासाठी प्रशासन करणं, हे नोकरशाहीचे घटनात्मक कर्तव्य आहे. ती राज्यकर्त्यांशी नव्हे तर त्यांच्या नीती-धोरणे व कार्यक्रमाशी बांधील असते, पण प्रथम व अंतीमत: जनतेप्रत तिची जबाबदेही - बांधीलकी - असली पाहिजे.

**भारतीय लोकशाहीपुढील प्रश्न आणि आव्हाने**

भारतीय नोकरशाही सत्तर-ऐशींच्या दशकापर्यंत घटनेला अभिप्रेत असल्याप्रमाणे काम करीत होती. पण त्यानंतर वाढता राजकीय हस्तक्षेपापासून ती स्वत:चा बचाव करू शकली नाही. उलटपक्षी त्यांच्या भ्रष्टाचार व हितसंबंधी कारभारात सामील झाली आणि ब्युरोक्रसीच्या घसरणीचा प्रारंभ झाला. आज राजकीय क्षेत्रात निर्णायकपणा व अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकशाहीचे चारही स्तंभ-न्यायपालिका, राज्यकर्ते, नोकरशाही व प्रसारमाध्यमे आपल्या मर्यादा व चौकटी ओलांडताना दिसतात, त्यामुळे अराजकतेकडे भारताची वाटचाल वेगात सुरू आहे, असे विचारवंत व अभ्यासकांचे आकलन आहे.

लोकशाही व निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी व प्रभावी संसदीय कारभारातून न्यायपालिका पूर्वपदावर येणे शक्य आहे. प्रसारमाध्यमांनी व्यवसाय व नफा हे एकमेव मूल्य न मानता जनप्रबोधनाची त्यांची मूळ जबाबदारी ओळखून स्वयंनियंत्रणाद्वारे सुधारले व बदलले पाहिजे. प्रशासनाच्या सुधारणेसाठी मात्र राजकीय नेतृत्वाने इच्छाशक्ती दाखवून व्यापक प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. त्या संदर्भात एस. आर. महेश्वरी यांनी त्यांच्या 'ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्मस् इन इंडिया' ग्रंथात भारतात प्रशासकीय सुधारणा का झाल्या नाहीत याचं मार्मिक विवेचन केलं आहे. त्या बद्दल साररूपानं असं म्हणता येईल की, भारतीय घटना समितीच्या सदस्यांना स्वातंत्र्यलढ्याच्या काळात प्रशासनाचे बारकावे व अंतर्भूत मर्यादा-लवचिकता व 'डायनॅमिझम' समजून घेण्यास वेळ मिळाला नाही. पुन्हा ब्रिटिशकालीन नोकरशाही ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणात दमनकारी यंत्रणा म्हणून वापरली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांमध्ये ब्युरोक्रसीबद्दल एक प्रकारचा अविश्वास होता, तो भारतीय जनमानसातही रुजला गेला. प्रशासकीय चौकटीचा ताठरपणा, कामापेक्षा कामाच्या पद्धतीला व नियमांना महत्त्व देणे व मधल्या आणि खालल्या स्तरावरील नोकरशाहीनं जबाबदारी टाळणं यामुळे हा अविश्वास स्वाभाविक होता. पण स्वातंत्र्योत्तरकाळात घटनेच्या माध्यमातून व तिचा मसुदा करताना ज्या चर्चा

झाल्या, त्याद्वारे भारतीय नेत्यांना स्वतंत्र भारत कसा घडवायचा याचं स्पष्ट व नेमकं भान होते. त्याला अनुसरून प्रशासनाची नवी चौकट सिद्ध करणे त्यांना सहज शक्य होते व त्यासाठी व्यापक जनमानसाचा पाठिंबापण मिळाला असता. पण भारताची फाळणी, निर्वासितांचे पुनर्वसन, पाकिस्तानचे काश्मीरसाठी झालेले १९४८ चे आक्रमण, संस्थानांच्या विलिनीकरणाचा प्रश्न अशा अनेक मोठ्या समस्यांचा सामना करताना तयार व सक्षम असलेली (जरी तिचं वळण हे शासन करण्याचं व सत्ता गाजवण्याचं असलं तरी) एकमेव यंत्रणा नोकरशाहीच होती. त्यामुळे ती भारतात तशीच ठेवण्यात आली. पण पुढील काळात त्यात आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी मात्र राजकीय नेतृत्वानं पुढाकार घेतला नाही. त्याचं कारण उलगडत नाही. पंडित नेहरू, सरदार पटेल, आझादांसारखे कुशाग्र बुद्धिमत्तेचे व देश कसा घडवायचा याची पूर्ण जाण असणारे नेते असताना विकास प्रशासनासाठी नोकरशाहीमध्ये प्रशासकीय, ज्या सुधारणा करण्याचे त्यांनी का टाळले याचे कारण सापडत नाही. ज्या सुधारणा झाल्या त्या जुजबी व मलमपट्टीच्या स्वरूपाच्या होत्या.

**प्रशासकीय सुधारणा – जग आणि भारत**

मागील काही वर्षांत अमेरिका व ब्रिटन यांमध्ये नोकरशाहीची कार्यक्षमता वाढण्यासाठी व विकास प्रशासन गतिमान करण्यासाठी व्यापक प्रमाणात प्रशासकीय सुधारणा तेथील राज्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक घडवून आणल्या. ब्रिटनमध्ये १९६८ सालच्या 'फाल्टन कमिटी'चा सुधार अहवाल हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यानंतर मार्गारेट थॅचर यांनी मोठ्या प्रमाणात प्रशासकीय सुधारणा केल्या. १९८२ मधील 'फायनान्शियल मॅनेजमेंट इनिशिएटिव्ह' हा प्रशासकीय सुधारणांचा पहिला टप्पा होता. त्याचा गाभा होता–काटकसर (इकॉनोमी), कार्यक्षमता व प्रभावीपणा मार्गारेट थॅचर यांनी प्रशासकीय सुधारणांचा पुढचा अधिक मूलभूत व क्रांतिकारी टप्पा १९८८ मध्ये 'नेक्स्ट स्टेप इनिशिएटिव्ह'ने सुरू केला, त्याद्वारे प्रशासनाचे यंत्रणीकरण (एजन्सिफिकेशन) केले. या द्वारे नोकरशाहीचे दोन भाग त्यांनी केले. एक छोटा सिव्हिल सर्व्हिसेसचा 'कोअर विभाग', जो मंत्री व सरकारला नीती–धोरणे आखण्यासाठी अभ्यासपूर्ण सल्ला देईल व त्यासाठी मदत करेल. दुसरा भाग म्हणजे कार्यकारी यंत्रणा–जिला एजन्सी म्हणलं जातं, तो अंमलबजावणी व सेवा प्रदान (सर्व्हिस डिलिव्हरी) करेल. त्यामुळे यंत्रणा–एजन्सीमधील अधिकारी–कर्मचारी अधिक जबाबदेही व सजग झाले. त्यांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली. मार्गारेट थॅचरचा प्रशासकीय सुधारणेचा कार्यक्रम जॉन मेजर यांनी पुढे नेत नवी 'बिग आयडिया' मांडली. ती म्हणजे नागरिकांची सनद–'सिटिझन्स चार्टर'. या सनदेचे तीन उद्देश त्यांनी ठरवले, (जे सुप्रशासनाचे (गुड गव्हर्नस) पण आहेत) ती म्हणजे पारदर्शकता (ट्रान्सपरन्सी), जबाबदेही (अकौंटेबिलीटी) व प्रतिसादक्षमता (रिस्पॉन्सिव्हनेस). तिच्यात भर घालत मजूर पक्षाचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी १९९८ मध्ये तिचं 'सर्व्हिसेस फर्स्ट' असं नामकरण केलं. नागरिकांच्या सनदेद्वारे प्रशासकीय सेवेने नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा द्यावी, तिचा दर्जा अत्युच्च राखावा व पगारापोटी मिळणाऱ्या पैशाचा (जो नागरिक देत असलेल्या करातून येतो) पुरेपूर व चोख मोबदला द्यावा आणि कामात अधिक पारदर्शी व जबाबदेहीपणा असावा हे टोनी ब्लेअर व पुढे जॉन मेजर यांनी अधोरेखित केले. सत्ताबदल होऊन प्रशासकीय सुधारणात सातत्य राहिले, हा ब्रिटनच्या राजकीय नेतृत्वाचा समंजसपणा व दूरदृष्टी म्हटली पाहिजे.

अमेरिकेतही उपराष्ट्रपती अल गोर यांनी 'न्यू मॅनेजमेंट' अहवाल बनवला, जो स्वीकारून त्याची अंमलबजावणी करून अमेरिकेत प्रशासनात महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या गेल्या. त्याची चार वैशिष्ट्ये होती. एक – लालफितशाही (रेड टेपिझम) कमी करणे, दोन – नागरिक व ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवणे (पुटींग

कस्टमर फर्स्ट), तीन - कार्यक्रम प्रशासनासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिकार देणे आणि चार - प्रशासनातील अनावश्यक सूज (संख्या) कमी करणे.

या पार्श्वभूमीवर भारतीय प्रशासन सुधारणेचा इतिहास पाहिला तर निराशा पदरी येते. कारण ब्रिटनप्रमाणे कोणतीही नवी  भरीव सुधारणा - अपवाद माहिती अधिकाराचा कायदा (जो अनेक देशांत विद्यमान आहे) वगळता - भारतीय प्रशासनात घडवून आणण्याची राजकीय इच्छाशक्ती व दूरदृष्टी इथल्या राजकीय नेतृत्वानं दाखवली नाही. जे आयोग नेमले, त्यांच्या शिफारशीपण पूर्णपणे अंमलात आणल्या नाहीत. असे असले तरी त्यांचा धावता आढावा येथे घेणे योग्य ठरेल.

स्वातंत्र्योत्तर काळातील प्रशासकीय सुधारणांची सुरूवात १९४९ च्या एन.गोपालस्वामींच्या अहवालाने झाली.  त्यांच्या अहवालात प्रशासन संघटनेतील बदल, विविध मंत्रालयांचे संलग्नीकरण वा विभाजन व वित्तीय नियंत्रणातील बदल या बाबींचा ऊहापोह होता. त्यानुसार प्रशासकीय बदलांना सुरुवात झाली. १९५१ मध्ये ए. डी. गोरवाला कमिटी गठित झाली. त्यांच्या अभ्यासाचा विषय होता 'प्रशासकीय यंत्रणा ही नियोजनबद्ध विकासासाठी कितपत सक्षम आहे.' त्यांनी अहवालात म्हटले होते की, नागरिकांना योजना अंमलबजावणीत दिरंगाई जाणवते, तसेच अधिकाऱ्यांत सचोटी व प्रामाणिकपणा कमी आहे. त्यांच्यात भ्रष्टाचार आहे व गरज आहे ती कामात जलदपणा, कार्यक्षमता, प्रभावीपणा व प्रतिसादीक्षमता विकसित करण्याची. त्यांनी प्रशासकीय सुधारणांसाठी स्वतंत्र मंत्रालय असावे अशी शिफारस केली, पण ती पूर्णांशाने अमलात आलेली नाही.

१९५३ साली पं. नेहरूंनी अमेरिकन विचारवंत पॉल ॲपलबाय यांना बोलावलं. त्यांच्या शिफारशीप्रमाणे 'रचना व कार्यपद्धती विभाग' स्थापन करण्यात आला. पुढे तो 'डिपार्टमेंट ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्म' या नावाने ओळखला जाऊ लागला.

सर्वात महत्त्वाचा प्रशासकीय सुधारणेचा अहवाल म्हणजे १९६६-७० दरम्यानचा 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह रिफॉर्म कमिशन'चा अहवाल होय. या कमिशनचे ५८० शिफारशी असलेले ३३ अहवाल प्रसिद्ध झाले. त्यातली एक महत्त्वाची शिफारस म्हणजे केंद्रात लोकपाल व राज्यात लोकआयुक्त पदे स्थापणे होय. दुसरी महत्त्वाची शिफारस म्हणजे 'परफॉर्मन्स बजेटिंग', वरच्या मध्यम स्तरावर तज्ज्ञ (स्पेशालिस्ट) अधिकारी थेट नेमणे इ. पण हा आयोग मुदतीपूर्वीच गुंडाळले गेल्यामुळे त्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे आयोगाचा अंतिम अहवालपण तयार झाला नाही. हा प्रशासकीय सुधारणेसाठी मोठा आघात होता.

१९७५ मध्ये एल. पी. सिंग व एल. के. झा या दोन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी 'अ नोट ऑन इमकप्रूव्हिंग एफिसिएन्सी इन ॲडमिनिस्ट्रेशन' सादर केला, पण त्यावर फारसा विचार झाला नाही.

१९७६ मध्ये डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अखिल भारतीय सेवाभरती पूर्वपरीक्षा (वस्तुनिष्ठ प्रश्नांची) व मुख्य परिक्षा (मुलाखतीसह) द्वारे करण्यात यावी अशी शिफारस केली होती, ती केंद्राने स्वीकारली व त्याची तातडीने अंमलबजावणीपण केली.

१९७८ साली अशोक मेहतांच्या अध्यक्षतेखालील पंचायत राज कमिटीची, मंडलपंचायतीची महत्त्वपूर्ण शिफारस केंद्राने स्वीकारली नाही; खरे तर विकेंद्रीकरणाची ही महत्त्वपूर्ण शिफारस होती.

'दि नॅशनल पोलीस कमिशन' हे १९७७-८० काळात धरमवीर यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आले. या आयोगाने पोलीस प्रशासनाचा सखोल अभ्यास करून कायदा व सुव्यवस्थेसाठी जबाबदार असलेल्या पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी तसेच भ्रष्टाचार कमी करणे व अधिकाराचा गैरवापर टाळणे यासाठी काही संस्थात्मक बदल सुचविले. या आयोगाचे एकूण आठ अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. खरं तर हा अत्यंत

महत्त्वाचा अहवाल होता, त्यावर विचारमंथन करून त्यांच्या बऱ्याचशा शिफारशी स्वीकारता आल्या असत्या. पण केंद्राने हा अहवाल का स्वीकारला नाही हे आजही ज्ञात नाही.

१९८० च्या सुरुवातीला 'दि इकॉनॉमिक रिफॉर्म कमिशन'ची एल. के. झा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झाली. त्यांनी अनेक अहवाल दिले व आर्थिक प्रशासनाचे आधुनिकीकरणाबाबत महत्त्वाच्या शिफारशी केल्या, असे मानले जाते की, १९९० पासून भारताने आर्थिक सुधारणेचे वळण घेतले, त्याचा आधार या आर्थिक सुधारणा आयोगाच्या शिफारशी होत्या.

हा भारतीय प्रशासनाच्या सुधारणेचा इतिहास पाहिला तर केंद्र सरकारने गांभीर्याने सुधारणा करण्याचा व्यापक प्रयत्न केल्याचे दिसत नाही. समग्र अहवाल न स्वीकारता, एखाद-दुसऱ्या शिफारशी स्वीकारायच्या व लागू करायच्या; या धोरणामुळे आमूलाग्र व किमानपक्षी ठळक बदल तरी झाल्याचे दिसून येत नाही ही खरेच भारतीय प्रशासनाची एक प्रकारे शोकांतिका म्हटली पाहिजे.

राज्यस्तरीय प्रशासकीय सुधारणांमध्ये सर्वात आघाडी घेतलेली राज्ये केरळ, बंगाल व कर्नाटक होते. १९५८ मध्ये केरळ सरकारने 'प्रशासकीय सुधार समिती' स्थापन केली. सदर समितीने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या व त्या केरळ सरकारने मोठ्या प्रमाणात स्वीकारून अमलात आणल्या. यामध्ये 'पंचायत' प्रशासनाचा मूलभूत घटक असावा, तालुका कौन्सिलवर स्त्री प्रतिनिधी असावेत, जिल्हा विकास मंडळ स्थापून विकास कामाचे केंद्रीकरण करावे आणि राज्याचे सचिवालय हे केवळ धोरण (पॉलीसी) आखणारे असावे यांचा समावेश होता.

सामाजिक सेवा आणि विकासकामासाठी पंचायतीना कार्यकारी अधिकार देऊन ते शासनाचे एजंट म्हणून गणले जावेत. पंचायत राजने शिक्षण व आरोग्य सेवा पूर्णपणे हाताळावी, अशीही महत्त्वपूर्ण शिफारस होती. आज भारतातील राज्यांच्या पंचायती राज व्यवस्थेकडे दृष्टिक्षेप टाकला तर असे दिसून येईल की, प्रत्येक राज्यात या धर्तीच्या प्रशासकीय सुधारणा झाल्याचे दिसून येते. कारण पंचायत राज म्हणजे लोकांचे लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत चालवलेले ग्राम, तालुका पंचायत, (महाराष्ट्रात पंचायत समिती) व जिल्हा परिषद / पंचायत राज प्रशासन होय! या सुधारणांचे अर्ध्वयूपण नि:संशयपणे केरळकडे जाते.

कर्नाटक राज्याचा 'कर्नाटक ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्म कमिशन' चा २००१ चा अंतर्गत अहवालही महत्त्वपूर्ण आहे. त्यात दप्तर दिरंगाई दूर करण्यासाठी फाईल्सची हाताळणी, प्रलंबित फाईली कमी करणे, कर्मचाऱ्याची संख्या निश्चित करणे, अधिकारांचे विकेंद्रीकरण, कार्यालयांचे आधुनिकीकरण, आय.टी.चा वापर, अधिकाऱ्यांत असलेल्या सौजन्याच्या अभावावर उपाय सुचविणे, तक्रारनिवारण व्यवस्था, नागरिकांना भेटीसाठी अधिकाऱ्यांची अनुपलब्धता, कृषी व वन विभागाची कामे अशा विषयी या आयोगाने अभ्यास करून अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यांचा आपण आता संक्षेपाने आढावा घेऊ या.

१. प्रत्येक ग्रामपंचायतीला ते जितका निधी ग्रामस्तरावर गोळा करतील, तेवढीच 'मॅचिंग ग्रांट' देणे आणि एकूण निधीच्या पन्नास टक्के रक्कम सामाजिक विभागावर खर्च करावी.

२. पंचायतीला निधी देताना मानवी विकासाची गमके पाहण्यात यावीत. त्यात प्रामुख्याने अर्भक मृत्यूदर (इन्फन्ट मॉरटॅलिटी रेट), माता मृत्यू दर (मॅटर्नल मॉरटॅलिटी रेट), साक्षरता यांचा समावेश होतो. जेथे ही मानवी विकासाची गमके विपरित आहेत, तेथे जादा निधी दिला जावा.

३. ग्रामपातळीवर काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे कामाचे माहितीपत्रक (जॉब चार्ट) प्रत्येक ग्रामपंचायत सदस्यांना देण्यात यावेत.

४. राज्य शासनाच्या योजना मोठ्या प्रमाणात जिल्हा पंचायत / परिषदेकडे हस्तांतरित करण्यात याव्यात.

महाराष्ट्र राज्याने विकेंद्रीकरणात देशात आघाडी घेतलेली आहे. त्यामध्ये पंचायत राज त्रिस्तरीय करणे, जिल्हा स्तरावर नियोजन व विकास मंडळ स्थापन करून शंभरपेक्षा अधिक योजना जिल्हा स्तरावरून राबवणे, भारतात सर्वप्रथम माहितीचा राज्यस्तरीय कायदा करणे, महिला व क्रीडा धोरण आखणे, मानव विकास निर्देशांक व सामाजिक न्यायावर भर देणारा अर्थसंकल्प तयार करणे, लोकसहभागातून विकासकामांवर भर देणे, डी.पी.डी.सी.मध्ये जिल्ह्याला देण्यात येणाऱ्या वार्षिक निधीच्या साडेचार टक्के रकमेच्या आधिन जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हासापेक्ष नावीन्यपूर्ण योजना आखणे, स्वतंत्र असे सांस्कृतिक धोरण आखणे अशा अनेक महत्त्वाच्या प्रशासकीय सुधारणा मागील काही दशकात झाल्या. सर्वाधिक विकेंद्रीकरण व माहितीच्या अधिकाराचा सर्वात व्यापक वापर यामुळे प्रशासनामध्ये बऱ्याच सुधारणा घडून आल्या आहेत. पालकमंत्री व पालक सचिवांच्या माध्यमातून जिल्हास्तरीय विकासाला चालना देणे, प्रशासकीय यंत्रणा गतिमान करणे हेही महाराष्ट्राच्या प्रशासकीय सुधारणांचे एक वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. विकासकामांना गती देण्याबरोबर दर्जा राखण्यासाठी प्राधिकरणांची स्थापना हेही महाराष्ट्रातील प्रशासकीय सुधारणांचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. एम.एम.आर.डी.ए., पी.एम.पी.एम.एल., निगडी प्राधिकरण, म्हाडा, हाऊसिंग बोर्ड, एम.एम.आर.डी.सी., विविध नद्यांचे म्हणजे कृष्णा, गोदावरी व तापी खोरे प्राधिकरण याची ठळक उदाहरणे आहेत. याखेरीज लोकसहभागातून विकासकामांना चालना मिळावी म्हणून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान, नगर स्वच्छता अभियान या योजनांच्या यशस्वितेने देश व जगाचे लक्ष वेधून घेतले, हे विशेष महत्त्वाचे आहे.

**पोलीस प्रशासन**

गुन्हेगारी वृत्ती वाढली आणि विवेकाची कास सुटली की होणारे अपराध ही जुनी मानवी प्रवृत्ती आहे. त्यामुळे गुन्हे नियंत्रण व गुन्हे अन्वेषण यासाठी प्राचीन काळापासून पोलीस दलाचे अस्तित्व (त्या काळी नावं भिन्न असतील) असल्याचा इतिहास आहे. त्याचबरोबर गर्दीच्या मानसशास्त्रामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. जेव्हा सत्ताधीश मनमानी करतात, जनतेच्या आशा-आकांक्षा ध्यानात न घेता धोरण आखतात, कृती करतात. तसेच विरोधी आवाज दडपायचा मार्ग स्वीकारतात; तेव्हा उठाव होतो. मोर्चे, धरणे, हरताळ, बंद ही आधुनिक काळात निर्माण झालेली जनलढ्याची अस्त्रे आहेत. त्याचा जेव्हा लोकनेते विवेकाने वापर करतात, रास्त कारणासाठी वापर करतात; तेव्हा राज्यकर्त्यांच्या वर्तनावरही अंकुश निर्माण होतो. पण जेव्हा दोन्ही बाजूनी लक्ष्मणरेषा ओलांडली जाते, तेव्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होते. तो हाताळण्याचे काम प्रामुख्याने पोलीस दलाचे असते, आहे.

कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्हा अन्वेषण व शोध ही पोलीस प्रशासनाची दोन प्रमुख कामे आहेत. ब्रिटिशकाळापासून भारतात आधुनिक पोलीस प्रशासन सेवेचा प्रारंभ झाला. त्यावेळी तिचे स्वरूप दमनकारी होते, ते स्वातंत्र्योत्तरकाळातही काही प्रमाणात जनमानसातील प्रतिमेप्रमाणे तसेच आहे. आजही पोलीस ठाण्यामध्ये सुबुद्ध नागरिकास काय अनुभव येतात हे सांगायची गरज नाही. पोलीस हा जनतेचा मित्र असायला हवा, त्यांच्या ब्रीदवाक्याप्रमाणे 'दुर्जनांचे निर्दालन व सज्जनांचे रक्षण' पोलिसांनी करायला हवे, ही अपेक्षा दुर्दैवानं आजही पुरी होताना दिसत नाही आणि मुख्य म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही व्यापक पोलीस सुधारणांना कोणतेही राज्य हात घालताना तत्पर दिसत नाही.

खरे तर आज भारतीय लोकशाहीला हिंसा, अराजकता आणि दहशतवाद, गरिबी-श्रीमंती यामधील वाढत्या दरीमुळे वाढणारी गुन्हेगारी, चंगळवादामुळे वाढते स्त्री-अत्याचार असे अनेक प्रश्न भेडसावत असताना पोलीस प्रशासनाचे काम अनेक पटीने वाढले आहे. पुन्हा देशात १०० पेक्षा जास्त जिल्ह्यात नक्षलवादानं आव्हान उभं केलं आहे. सीमेपलीकडून येणारा धार्मिक आतंकवाद व त्याला उत्तर म्हणून बहुसंख्यांकांची टोकाची हापण गंभीर प्रश्न बनला आहे. अशा वेळी कार्यप्रेरित व राजकारण अलिप्त असं प्रशिक्षित, प्रोफेशनल व आधुनिक शस्त्रांनी सज्ज असं पोलीस दल या प्रश्नांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक आहे. पण सत्ताधीशांना पोलीस स्वायत्त होणे रुचत नाही, असा इतिहास आहे. पण त्याविना आजच्या प्रश्नांचा मुकाबला पोलीस दलास करता येणार नाही हे कटू वास्तव आहे. स्वायत्ततेबरोबर जबाबदेहीपणा पोलीसदलात कसा आणणार? सामान्य जनाला अभय देत समाजकंटकांना धाक कसा बसवणार? समाजातला वाढता बेकायदेशीरपणा (अनलॉफुलनेस) कसा नियंत्रित करणार? या साऱ्या प्रश्नांचा साकल्याने अभ्यास करून भारतीय पोलीस दलात प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्याची गरज येथे अधोरेखित करणे आवश्यक आहे.

भावी काळाची आव्हाने पेलण्यासाठी भारतीय सैन्य दलाप्रमाणे पोलीस प्रशासनाच्या तीन प्रमुख कामासाठी त्याची तीन भागांत विभागणी करण्याची आवश्यकता काही तज्ज्ञ मांडतात, त्याचा थोडा विचार होणे आवश्यक आहे. ज्या प्रमाणे भारतीय सैन्यात पायदळ, विमानदळ व नाविकदळ आहे, तद्वतच पोलीस प्रशासनाची तीन भागात विभागणी केली पाहिजे. एक भाग हा कायदा व सुव्यवस्था सांभाळणारा असावा. दुसरा विभाग हा गुन्हे अन्वेषण व नियंत्रणासाठी असावा, तर तिसरा विभाग 'सोशल पोलिसिंग' साठी असावा, जो सामाजिक कायद्यांची (उदा. दारुबंदी, मानवी व्यापार, स्त्री-अत्याचार, भ्रूणहत्या संबंधातील कायद्यांची) अंमलबजावणी करू शकेल. या तीन विभागांचे प्रशिक्षण भिन्न असावे. या तीन विभागांसाठी जिल्ह्यात तीन जिल्हाप्रमुख असावेत व तिघांतला वरिष्ठ हा समन्वयक असावा. त्यासाठी राज्य स्तरावर 'स्टेट पोलीस रेग्युलेटरी ॲथॉरिटी' असावी. हा अत्यंत क्रांतिकारी विचार आहे, त्याचा अभ्यास होऊन निर्णय घेणे आवश्यक आहे, नव्हे ती काळाची गरज आहे.

**महाराष्ट्राचे प्रशासन**

नोकरशाहीच्या (ब्युरोक्रसीच्या) कामकाज व बदलाच्या इतिहासात जग, भारत व इतर राज्ये यांच्या संदर्भात आपण आढावा घेतला, तो महत्त्वाचा यासाठी आहे की, महाराष्ट्रातील प्रशासनातील शिल्पकारांच्या त्यांनी प्रशासकीय सेवेत असताना पेललेल्या आव्हानाचे साकल्याने आकलन व्हावे. तसेच महाराष्ट्रातील प्रशासकीय वाटचालीची समीक्षाही याची पार्श्वभूमी म्हणून समजून घेतली पाहिजे.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली व या वर्षांत आपण राज्य स्थापनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. आपल्याबरोबरच गुजरातही स्थापन झाले. आज उद्योग, शेती व प्रशासनात त्या राज्याने जोमदार प्रगती केली आहे. परंतु मागील पन्नास वर्षात देशातील सर्वात अग्रेसर राज्याचा मान निर्विवादपणे देशपातळीवर महाराष्ट्राला दिला जातो. त्याचे श्रेय जसे मूलगामी व दूरदृष्टीचे निर्णय घेणाऱ्या राज्याचे सुजाण व सुसंस्कृत नेतृत्वाला दिले पाहिजे, तसेच ते त्यांना साथ देणाऱ्या व प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेस 'ब्युरोक्रसीला'पण दिले पाहिजे.

महाराष्ट्राचे पहिले द्रष्टे समजले जाणारे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी उत्तम प्रशासकीय राज्याची मुहूर्तमेढ रोवली. अवघ्या दोन वर्षांत त्यांनी जनहिताचे व राज्याच्या सर्वांगीण विकास होण्यासाठीचे जे महत्त्वपूर्ण निर्णय

घेतले, त्यांना तोड नाही. हे करताना त्यांनी कर्तबगार व अभ्यासू-नि:स्पृह अधिकाऱ्यांना साथ व विश्वास दिला, त्यामुळे उत्तम व नेटक्या प्रशासनाची एक उज्ज्वल परंपरा महाराष्ट्रात सुरू झाली. त्यांच्या काळात महाराष्ट्राच्या विकासाचे पर्व सुरू झाले. गरीब दुर्लक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, विश्वकोश मंडळाची स्थापना, सहकार क्षेत्राला दिलेली चालना व उद्योगांसाठी स्वतंत्र अशा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना हे काही ठळक निर्णय चव्हाणांच्या नावावर जमा आहेत.

त्यानंतरचे सर्वात दीर्घकाळ मुख्यमंत्रीपद भूषवलेल्या वसंतराव नाईकांनी संकरित बियाण्यांचा प्रसार करून शेतीस चालना दिली. वसंतदादा पाटलांचे सहकार क्षेत्राचे योगदानही महत्त्वपूर्ण होते. त्यांनी 'पाणी अडवा - पाणी जिरवा' हा जलसंधारणाचा दूरगामी परिणाम करणारा मंत्र देत कोरडवाहू शेतीच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न हाताळला. त्यांचं आणखी एक योगदान म्हणजे विना अनुदान तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय होय. (पुढे त्यातून अपप्रवृत्ती वाढून शिक्षणसम्राटांचे पेव फुटले व शैक्षणिक गुणवत्ता सुमार झाली, हा भाग अलाहिदा)

शरद पवारांनी आखलेले महिला धोरण व धाडसाने घेतलेला मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा पुरोगामी निर्णय महाराष्ट्र विसरू शकणार नाही. शिवसेनेच्या मनोहर जोशींनी आखलेले क्रीडा धोरण व क्रीडा पीठ- क्रीडा प्रबोधिनीद्वारे खेळास दिलेली चालना, कृष्णा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी मुदतीत अडविण्यासाठी कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना व कर्जरोखे काढून केलेली कामे, मुंबई-पुणे एक्सप्रेस मार्ग व मुंबई शहरातील पंचावन उड्डाणपूल व राज्यभर विणलेले रस्त्यांचे जाळे या कामामुळे आपली कारकीर्द गाजवली. शंकरराव चव्हाणांचे जलसिंचन क्षेत्रातले काम अभूतपूर्व आहे. जायकवाडी, दूधगंगा व उजनीसारखे प्रकल्प आणि सचिवालयाचे 'मंत्रालय' असे केलेले नामांतर यामुळे त्यांची अल्प कारकीर्द संस्मरणीय ठरली. अलीकडच्या काळात मात्र अशी महत्त्वाची दूरगामी परिणामाची कामे झाली नाहीत, हे कटू वास्तव आहे.

मागील पन्नास वर्षांचा जमाखर्च मांडला तर जमेच्या बाजू नक्कीच भरीव आहेत. महाराष्ट्राची आर्थिक प्रगती नेत्रदीपक आहे. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय सकल घरेलू उत्पन्नात (जी.डी.पी.मध्ये) वाटा १३% आहे. मागील दशकात राज्याचे उत्पन्न ७.१% नी वाढले. आर्थिक प्रगतीच्या तीनही क्षेत्रात आपली प्रगती भरीव स्वरूपाची आहे. सेवाक्षेत्राचा ६१% तर उद्योग क्षेत्राचा २६% वाटा राज्याच्या जी.डी.पी. मध्ये आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये राज्या-राज्यांत कमालीची स्पर्धा असली तरी आजही महाराष्ट्र त्यासाठी पहिली पसंती आहे. महाराष्ट्राच्या पुण्याने आय.टी. क्षेत्रात बेंगलोर व हैद्राबादची बरोबरी साधत मोठ्या प्रमाणात रोजगार व संपत्ती निर्माण केली आहे. २०१०-११ या नुकत्याच संपलेल्या वर्षात आय.टी. क्षेत्रात सर्वात जास्त रोजगार निर्मिती पुण्यात झाली आहे असा अहवाल आला आहे. तो महाराष्ट्राच्या प्रशासन व नेतृत्वाचे धोरणीपण अधोरेखित करतो. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे औद्योगिक प्रगतीमध्ये योगदान वादातीत आहे. आज नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, जळगाव, बारामती आदी ठिकाणी औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे ही विकेंद्रित औद्योगिक धोरणाची फलश्रुतीच म्हटली पाहिजे.

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी पूर्वीपासूनच होती, पण मागील पन्नास वर्षांत ती अधिक दृढ झाली आहे. भारताच्या शेअरबाजार उलाढालीची ७०% उलाढाल मुंबई स्टॉक एक्सचेंज मध्ये होते. देशाच्या आयकराच्या उत्पन्नाचा ३४% वाटा मुंबई पुरविते.

महाराष्ट्र ही सहकार चळवळीची जननी आहे. ग्रामीण विकासासाठी सहकार चळवळीने महत्त्वाचे योगदान दिले आहे. मागील पन्नास वर्षांत महाराष्ट्रात सहकारी चळवळ प्रचंड गतीने वाढली आहे. १९६० साली राज्यात

केवळ ३०,००० सहकारी संस्था होत्या, त्या आज दोन लाखांवर गेल्या आहेत. सहकार तत्त्वावर चालणारे साखर कारखाने, डेअरी संस्था, नागरी बँकिंग संस्था देशात सर्वांत जास्त महाराष्ट्रात असून तुलनेने त्या अधिक सक्षमतेने चालतात.

कृषी क्षेत्राची राज्याची प्रगती मात्र समाधानकारक नाही. कारण मुळातच सिंचनक्षमता मर्यादित आहे. पुन्हा दुष्काळी तालुक्यांची संख्याही शंभरच्या वर आहे. जे जलसिंचन आपण निर्माण केले, त्यातून भरपूर पाणी लागणाऱ्या उसाखाली सहकारी कारखानदारीमुळे क्षेत्र आले. त्यामुळे तृणधान्ये, डाळी उत्पादनामध्ये महाराष्ट्र आजही परावलंबी आहे. मात्र फलोत्पादन व दुग्धविकासात देशभरात आघाडी घेतली आहे. पण मागील दशकापासून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या महाराष्ट्राची प्रगती प्रश्नांकित करीत आहे. वीज उत्पादनातही मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. शिक्षण व आरोग्य या मानवी विकासाच्या क्षेत्रात महाराष्ट्राचे स्थान देशपातळीवर बरेच कमी आहे.

असा हा महाराष्ट्राचा मागील पन्नास वर्षांच्या विकास कार्यक्रम व वाटचालीचा संक्षेपाने घेतलेला लेखाजोखा. त्याच्या यशापयशाची जबाबदारी राजकीय नेतृत्वाप्रमाणे प्रशासनाचा गाडा हाकणाऱ्या प्रशासकांची-नोकरशाहीचीपण आहे. कारण अंमलबजावणी व गतिमान प्रशासनाचे मँडेट आहे. पण समग्रतेनं विचार करता महाराष्ट्राच्या प्रशासनाने राज्यकर्त्यांना उत्तम साथ देत महाराष्ट्राचा विकास साधत आपले देशपातळीवरचे अग्रेसरत्व सिद्ध केले आहे. आता आपण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या शिल्पकारांकडे दृष्टिक्षेप टाकणार आहोत.

ज्याप्रमाणे महाराष्ट्रात मुंबई आहे; पण मुंबईत फार कमी महाराष्ट्र आहे, तद्वतच प्रशासकीय सेवेत महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे. पण प्रशासन सेवेत महाराष्ट्र फार कमी आहे, असे मागील दशकापर्यंतचे चित्र होते. पण या दहा वर्षांत मराठी माणसं मोठ्या प्रमाणात भारतीय प्रशासन सेवेत आली आहेत. स्वातंत्र्योत्तरकाळात स.गो. बर्वे, पिंपुटकर, भालचंद्र देशमुखांसारखी मराठी माणसे प्रशासनात भरीव प्रमाणात होती, पण मधल्या काळात मुंबई-पुणे सारख्या शहरात डॉक्टर्स, इंजिनिअर्सना मिळणाऱ्या मोठ्या संख्येतल्या नोकऱ्या यामुळे प्रशासन सेवेकडे ओढा कमी होता. आजही मराठी तरुणाईची पहिली पसंती डॉक्टर, इंजिनिअर तसेच आय.टी. व मॅनेजमेंट क्षेत्रातील खाजगी नोकऱ्यांकडे जास्त आहे. पण प्रशासन हे बद्धिमान युवक- युवतींसाठी आव्हान व क्षमता जोखणारे क्षेत्र आहे व देश, समाज उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान देता येते, या जाणिवेने मराठी तरुण पुन्हा अखिल भारतीय प्रशासन सेवेकडे वळला आहे. त्यामुळे आज मंत्रालय घ्या किंवा जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त या सारखी कार्यपदे पहिल्यास, तेथे मराठी माणसाचे वर्चस्व जाणवताना दिसून येत आहे. त्यासाठी राज्य आयोगाच्या परीक्षेतून उपजिल्हाधिकारी व इतर वर्ग एकच्या पदावर आलेल्या तरुण-तरुणींना पदोन्नतीने मिळणाऱ्या भारतीय प्रशासन सेवेमुळे तसेच मागासवर्गीय, दलित व बहुजन समाजातून निवड झालेल्या तरुणांमुळे महाराष्ट्रातील प्रशासकीय सेवेचा चेहरा आमूलाग्र म्हणता येईल एवढा बदललेला आहे. तरुण प्रशासक हे ग्रामीण मातीशी नाते ठेवून असल्यामुळे प्रशासनाचा केंद्रबिंदू पुन्हा आम आदमी होताना दिसत आहे.

महाराष्ट्रातील पहिल्या पिढीचे कर्तबगार प्रशासक म्हणून स.गो. बर्वे, भालचंद्र देशमुख, माधव गोडबोले, शरद केळकर, राम प्रधान, शरद काणे, म.गो. गवई, भुजंगराव कुलकर्णी, सेतुमाधवराव पगडी यांची नावे त्यांच्या प्रशासकीय कर्तृत्वामुळे आठवतात. विशेषत: स.गो.बर्वे खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे प्रशासक होते. पुण्याचे जिल्हाधिकारी व आयुक्त म्हणून त्यांची कारकीर्द आजही पुणेकरांच्या स्मरणात आहे. भुजंगराव कुलकर्णीपण तसेच विविध क्षेत्रांत छाप टाकणारे प्रशासक, भालचंद्र देशमुखांनी तर भारतीय प्रशासन सेवेतले

कॅबिनेट सचिवाचे पद भूषविले. माधव गोडबोलेंची वित्तीय पदावरील प्रशासकीय कारकीर्द ही महत्त्वाची असली तरी भारताचे गृहसचिव हा त्यांच्या सेवेचा परमोच्च बिंदू होता. सेतुमाधव पगडी हे ब्रिटिश प्रशासकांप्रमाणे 'स्कॉलर ॲडमिनिस्ट्रेटर' होते. त्यांचे इतिहास संशोधन व लेखन केवळ अजोड आहे. महाराष्ट्राचे मुख्य सचिवपद भूषविणाऱ्या मराठी प्रशासकांची यादी मोठी आहे – शरद उपासनी, अरुण बोंगिरवार, अजित निंबाळकरांपासून जे.पी.डांगे व रत्नाकर गायकवाड.

पण क्षेत्रीय स्तरावर काम करताना मराठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आऊट ऑफ द बॉक्स विचार करीत अत्यंत उल्लेखनीय काम केले आहे. नद्याजोड प्रकल्प राबवणारे भास्कर मुंडे, वनविकास महामंडळ स्थापण्याचे श्रेय ज्यांना दिले पाहिजे ते श्रीधर सदाशिव बूट, 'सलग समतत्त्व चरा'चा सफल प्रयोग करणारे वृक्षमित्र वसंत टाकळकर आणि वनसेवेत असताना वन, पशुपक्षी व पर्यावरणावर विपुल ग्रंथसंपदा निर्माण करणारे व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळवणारे पहिलेच प्रशासकीय अधिकारी असणारे मारुती चित्तमपल्ली यांची नावं घेतल्याविना प्रशासनातील शिल्पकारांची यादी पूर्ण होणार नाही. राजर्षी शाहू शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्प राबवणारे प्रभाकर देशमुख, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व महात्मा गांधी तंटामुक्ती अभियानाच्या निर्मितीमध्ये आर.आर.पाटीलांइतकेच सहभागी असणारे चंद्रकांत दळवी आणि स्त्री–भ्रूणहत्या रोखण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून 'सेव द बेबी गर्ल' प्रकल्प राबवणारे लक्ष्मीकांत देशमुख हे आजचे प्रयोगशील व नवनवीन योजना राबवणारे कल्पक अधिकारी आहेत.

परंतु महाराष्ट्राच्या प्रशासनाच्या यशोगाथेचे खरे 'अनसंग हिरो' हे राज्यस्तरीय अधिकारी–उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, शिक्षण अधिकारी, कृषी अधिकारी हे आहेत. आज महाराष्ट्राने निर्मलग्राम अभियान (हागणदारीमुक्त गाव), स्वच्छता अभियान तसेच तंटामुक्ती अभियानात आघाडी घेतली आहे ती अशा 'अनसंग हिरो'ंमुळे. त्यांची नोंद शिल्पकार म्हणून व्यक्तिगत स्तरावर होणार नाही; पण त्यांचे योगदान विसरून कसे चालेल?

भारतीय प्रशासन सेवेप्रमाणे भारतीय व राज्य पोलीस सेवेतही महाराष्ट्राच्या पोलीस अधिकाऱ्यांनी मोठे योगदान दिले आहे. अरविंद इनामदार, श्रीकांत बापट, हेमंत करकरे, अशोक कामटे, विचारवंत असलेले प्रवीण दिक्षीत, भिवंडीमध्ये मोहल्ला पॅटर्न राबवून जातीय सलोखा राखणारे प्रज्ञावंत व लेखक–समाज चिंतक सुरेश खोपडे, म.गांधी तंटामुक्ती अभियानाची यशोगाथा संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत नेणारे रविंद्र दिघावकर, एनकाऊंटर स्पेशालिस्ट विजय साळसकर, शहिद तुकाराम ओंबाळे, किरण बेदींच्या कर्तृत्वाशी नातं सांगणाऱ्या मीरा बोरवणकर, रश्मी शुक्ला, श्रीदेवी गोयल या कर्तबगार महिला पोलीस अधिकाऱ्यांची कारकीर्दही 'जेंडर बायस'ला छेद देणारी ठरली आहे.

महाराष्ट्राच्या पोलिस व जिल्हा प्रशासनाने गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या कल्पनेतून साकारलेल्या 'म.गांधी तंटामुक्ती अभियाना'मध्ये अनेक जिल्ह्यात शेकडो गावे तंटामुक्त झाली आहेत. त्यामध्ये गावपातळीवर फौजदारी, दिवाणी व महसूल प्रकरणे तडजोडीने मिटवणे अभिप्रेत आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा व मनस्ताप वाचतो आणि गावात शांतता नांदते. यामुळे पोलिस प्रशासनावरचा ताण बराच कमी होत आहे. महाराष्ट्राच्या पोलिस प्रशासनासाठी ही अभिमानाची बाब आहे.

पण आज राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्राच्या प्रशासन सेवेवर भ्रष्टाचार व दप्तर दिरंगाईचे प्रश्नचिन्ह लागले आहे. पुन्हा मंत्रालय स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वहीन वाटावी एवढी चाकोरीबद्ध काम करताना दिसते. आज उदारीकरण व जागतिकीकरणामुळे खाजगी क्षेत्राला नवे उन्मेषशाली प्रगतीचे धुमारे

फुटले आहेत. पण पायाभूत व सामाजिक क्षेत्रात सरकारचे काम समाधानकारक नाही, हे कसे नाकारता येईल? राजकीय हस्तक्षेप व चुकीच्या बेकायदेशीर कामांना नकार देण्यासाठी प्रशासकांना वैधानिक व घटनात्मक संरक्षण आहे, तरीही हे राजकारण्यांपुढे झुकायला सांगितले तर लोटांगण घालायच्या मन:स्थितीत का आले आहेत, याचा त्यांनी गांभीर्याने विचार करून आत्मपरिक्षण करावे अशी वेळ आली आहे. सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर झालेली आकर्षक पगारवाढ पाहता प्रशासकांनी भ्रष्टाचार का करावा? हे कोडे आम जनतेला उमगत नाही. उच्च शिक्षण व तेवढेच दर्जेदार प्रशिक्षण असताना प्रशासकांची सदसद्‌विवेकबुद्धी का गहाण पडली आहे? का ते वाईट गोष्टीला ताठ मानेनं नकार नाही देत? त्यांच्याकडून देश व समाजासाठी व्यावसायिक नीतिमत्तेने काम करण्याची अपेक्षा असताना का ते स्वाथप्रेरित वागत प्रवाहपतित होत आहेत?

पन्नास वर्षांच्या पहिल्या तीन-साडेतीन दशकात उत्तम व जबाबदार प्रशासनाचा लौकिक राखणारे महाराष्ट्राचे प्रशासन आज तो लौकिक गमावून बसलेले आहे.त्याला राजकारण व समाजकारणातली घसरण निश्चितच कारणीभूत आहे. सबंध देशात आज एक प्रकारे निर्नायकी अराजकता जाणवत आहे. अशा विपरीत परिस्थितीत देशाची एकसंघता राखण्याचे काम भारतीय प्रशासन नामक अजूनही बऱ्यापैकी सुस्थितीत असणाऱ्या यंत्रणेचे आहे. त्यात पुन्हा महाराष्ट्राने आपला वाटा उचलावा ही अपेक्षा इतिहास पाहता अवाजवी नाही. तेव्हा महाराष्ट्राच्या प्रशासनाने घसरलेली गाडी पूर्वपदावर आणण्यासाठी आत्मपरिक्षण करून योग्य ती पावले उचलावीत व आपली घसरलेली प्रशासनाची गाडी पूर्वपदावर आणावी, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर वर नमूद केलेल्या प्रश्नांना प्रस्तुत खंडातील प्रशासकीय शिल्पकारांची जीवनचरित्रे वाचताना उत्तरे मिळू शकतील. व्यक्तिगत सचोटी, प्रामाणिकपणा, भ्रष्टाचार न करण्याचा प्रण आणि देश-समाज व जनतेची कामाद्वारे सेवा करण्याचा समर्पण भाव पुन्हा एकवार प्रशासन सेवेत आणणे ही काळाची गरज बनली आहे. त्यासाठी दर्जेदार व मूल्यात्मक प्रशिक्षण, ई-गव्हर्नन्सचा अधिकाधिक वापर, भ्रष्टाचार व मंदगती कामासाठी कठोर शिक्षा करणे व सतत कार्यमूल्यमापन करून अधिक चांगल्या कामासाठी प्रेरित करणे या उपायानेच महाराष्ट्र व देशाचे प्रशासन आदर्श व उच्चतर होऊ शकेल!

- लक्ष्मीकांत देशमुख
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

# प्रशासनातील काही महत्त्वाचे विभाग

## गुप्तवार्ता – एक जागरूक प्रहरी

देशाची सुरक्षितता आणि सार्वभौमत्व अढळ राहावे याकरिता गुप्तवार्ता फार महत्त्वाच्या असतात हे भारतीय राज्यकर्त्यांना ज्ञात होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात गुप्तवार्ता हा विषय इतक्या तपशीलात वर्णन करण्यात आला आहे की, जणू ते त्याच विषयावरचे पुस्तक आहे असे वाटावे. मात्र अलीकडच्या राज्यकर्त्यांनी या महत्त्वपूर्ण विषयाकडे अनेकदा दुर्लक्ष केलेले आढळते. छत्रपती शिवरायांसारख्या जाणत्या राजाने आपल्या प्रबळ शत्रूला नामोहरम करण्यासाठी गुप्तवार्तांचा प्रभावी वापर केलेलाही आढळतो. परंतु या गुप्तवार्ता संकलनाला एका शिस्तबद्ध संघटनेचे रूप मिळाले ते मात्र ब्रिटीश राज्यात.

**गुप्तवार्ता संस्थांची रचना:** आज भारतात विविध क्षेत्रातल्या गुप्तवार्ता संकलनाची वेगवेगळी खाती आहेत. त्यांची माहिती सोप्या भाषत मांडणे थोडे किचकटच काम आहे; पण सामान्यत: या कामाचे दोन ठळक भाग आहेत. पहिला, अंतर्गत गुप्तवार्ता संकलन; आणि दुसरा, विदेशी गुप्तवार्ता संकलन. पहिले काम ‘इंटेलिजन्स ब्युरो’ उर्फ आय. बी. ही संस्था पाहते. ती केंद्रिय गृह मंत्रालयाच्या कक्षेत येते. तर दुसरे काम ‘रिसर्च अँड ॲनालिसिस विंग’ उर्फ रॉ ही संस्था पहाते व ती केंद्रिय सचिवालयाच्या (कॅबिनेट सेक्रटारियट्) कक्षेत येते. शिवाय भूदल, वायुदल व नौदल यांची आपापली स्वतंत्र गुप्तवार्ता खाती आहेत. त्यांना अनुक्रमे ‘आर्मी इंटेलिजन्स’, ‘एअर इंटेलिजन्स’ व ‘नेव्हल इंटेलिजन्स’ अशी नावे आहेत. खेरीज केंद्रिय अर्थ मंत्रालयाचेही स्वतंत्र गुप्तवार्ता खाते आहे आणि प्रत्येक राज्य सरकारच्या पोलीस दलांचीही गुप्तवार्ता खाती आहेत. त्यांना ‘स्पेशल ब्रँच’ असे म्हटले जाते. ही सर्व खाती आपापल्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये कार्यरत असतात. आपल्याला कदाचित वाटेल की, इतकी गुप्तवार्ता खाती खरोखरच आवश्यक आहेत का? तर त्याचे उत्तर असे आहे की, जगभरच्या सगळ्याच देशांमध्ये ती तशी आहेत व हे अपरिहार्य आहे. सध्या तर असा विचार चालला आहे की, सीमा सुरक्षा दल, केंद्रिय रिझर्व पोलीस अशा निमलष्करी दलांना देखील त्यांच्या आपापल्या गुप्तवार्ता संकलन खात्याची जोड दिली जावी. अशी भरमसाठ गुप्तवार्ता खाती निर्माण केल्यामुळे गुप्तवार्ता संकलनाचा दर्जा सुधारतो का, हा खरा प्रश्न आहे. कारण विविध खात्यांकडून आलेल्या माहितीचा समन्वय करून त्याचा अचूक अन्वयार्थ लावणे, हे मोठे कठीण काम असते. त्यामुळे अशा विविध गुप्तवार्ता खात्यांच्या कार्याचे रास्त मूल्यांकन करून ते वाजवी खर्चात होत आहे ना, अनुत्पादक तर ठरत नाही ना, हे सर्वोच्च पातळीवर पडताळून पाहिले जायला हवे. मुंबईतल्या २६/११ च्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने ‘मल्टि एजन्सी कमिटी’, नॅशनल इन्व्हेस्टिगेशन’ असे काही गट निर्माण करून गुप्तवार्ता संस्थांमधील समन्वय, सुसूत्रता कार्यक्षम करणे; तसेच गुप्तवार्ता संस्थांना तंत्रज्ञान दृष्ट्या अद्ययावत बनवणे, इत्यादि कामे सुरू केली आहेत.

कमालीचा बिनबोभाटपणा हे यशस्वी गुप्तवार्ता संकलनाचे सर्वात महत्त्वाचे सूत्र आहे. १९६१ मध्ये अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी हे सी. आय. ए. या गुप्तवार्ता खात्याच्या अधिकाऱ्यांचा बैठकित

बोलताना म्हणाले होते,‘‘तुम्ही यश मिळवलेत तर त्याचे कौतुक कुणी करणार नाही; तुमच्या अपयशाचा मात्र डांगोरा पिटला जाईल. तुमच्या यशस्वी कामांचा उल्लेख तुम्ही कुणाहीकडे करू शकत नाही. तुमची अयशस्वी कामे मात्र स्वत:च सगळ्यांना स्वत:ची माहिती ओरडून सांगत असतात.’’ गुप्तवार्ता खात्याला अपयश आले की प्रसारमाध्यमे आणि सामान्य जनतासुद्धा गुप्तवार्ता खात्याच्या नावाने शंख करते. बिचाऱ्या गुप्तवार्ता खात्याला आपल्या अपयशाची कारणे लोकांसमोर खुलेपणाने मांडताही येत नाहीत. गुप्तवार्ता खात्याचे काम कसे चालते याची काहीही माहिती नसताना त्याच्यावर टीका करणे किंवा अतिरेकी हल्ल्यानंतर दरवेळी, हे गुप्तवार्ता खात्याचेच अपयश आहे, असा गदारोळ करणे फार चुकीचे आहे.

**इतिहास :** इंटेलिजन्स ब्यूरो उर्फ आय. बी. च्या पुर्वेतिहासाला मानहानिकारक म्हणायचे की गौरवशाली म्हणायचे, हे आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. भारतात ‘ठग’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लुटारू व खुनी लोकांनी भयानक धूमाकूळ घातला होता. त्यांचा बिमोड करण्यासाठी इंग्रजांनी १८३५ मध्ये ‘ठगी अँड डकैती डिपार्टमेंट’ –टी अँड डी– या नावाचे खाते सुरु केले. या खात्याने ठगांचा साफ नायनाट केला, हे गौरवस्पदच आहे. पण मुळात चोर–दरोडेखोरांचा बंदोबस्त हे काही हे गुप्तवार्ता संकलनाचे काम नव्हे. १८८५ मध्ये काँग्रेस पक्षाची स्थापना होऊन त्यांच्या राजकीय हालचाली वाढू लागली. इंग्रजांनी टी अँड डी ला त्या कामाला लावले. १९२० साली टी अँड डी हे नाव जाऊन अधिकृतपणे आय. बी. हे नाव सुरु करण्यात आले. संपूर्ण देशाच्या अंतर्गत गुप्तवार्ता संकलनाचे काम आय. बी. कडे सोपवण्यात आले. १९६२ मध्ये चीनने भारतावर लष्करी आक्रमण करून भारताचा पराभव केला. यातून सगळ्याच सुरक्षा दलांची पुनर्रचना होऊन १९६८ मध्ये ‘रिसर्च अँड ॲनालिसिस विंग’– रॉ ची स्थापना झाली व परराष्ट्रीय गुप्तवार्ता संकलनाचे काम रॉ कडे सोपवण्यात आले.

आय. बी. चा वापर इंग्रज सरकारने राजकीय नेत्यांवर नजर ठेवण्यासाठी केला होता. स्वातंत्र्यानंतरही तेच कार्य चालू राहिल्याबद्दल वेळोवेळी टीका झाली, चर्चा झाली, उपाय सुचवले गेले; पण कोणत्याही सरकारने त्यात मनापासून लक्ष घातले नाही. १९७५ च्या आणीबाणीनंतर न्यायमूर्ती शहा आयोग व एल. पी. सिंग समिती यांनी आय. बी. ची कार्यपद्धती व कार्यकक्षा यांबाबत अतिशय मौल्यवान सूचना केल्या होत्या. पण त्या कार्यवाहीत कधीच आणल्या गेल्या नाहीत. आय. बी. ची ‘सर्वव्यापी’ हेरगिरी चालूच राहिली. ‘भारत सरकारला महत्वाच्या वाटणाऱ्या राष्ट्रीय जीवनातील सर्व महत्त्वपूर्ण घडामोडी व शांतता आणि सुरक्षा यांना धोका निर्माण करू शकणाऱ्या घटना’ यांचे निरीक्षण करण्याचे तिचे काम चालूच राहिले. (संदर्भ – पोलिटिकल व्हायलन्स अँड दि पोलीस इन इंडिया – लेखक : के. एस. सुब्रमणियन)

**आव्हाने :** फुटीरता आणि आतंकवाद यांच्या विरोधात खंबीरपणे उभा असणारा देशाचा बुलंद बुरूज म्हणजे गुप्तवार्ता खाते होय. जेव्हा परिस्थिती हिंसक वळण घेते, तेव्हा सशस्त्र दले मैदानात उतरतात. पण अतिरेकी हल्ले आणि फुटीर कारवाया यांचे जे भूमिगत कार्य सुरू असते त्याची पूर्वसूचना प्राप्त करणे व त्यांना आळा घालण्याचा प्रयत्न करणे, हे गुप्तवार्ता खात्याचे काम आहे. वर्तमान परिस्थितीत गुप्तवार्ता खात्यांची सर्वाधिक महत्त्वपूर्ण जबाबदारी खालील क्षेत्रांत आहे –

१. फुटीर कारवायांचा बंदोबस्त, २. अतिरेकी, माओवादी, नक्षलवादी बंडखोरांचा बिमोड, ३. अंमली पदार्थ तस्करी व बनावट चलन रोखणे, ४. भ्रष्टाचार रोखणे.

अंमली पदार्थांची तस्करी व बनावट चलनाचा प्रसार रोखण्यासाठी पूर्वीपासूनच खास गट नियुक्त करण्यात आलेले आहेत. पण आता उजेडात आलेल्या काही घटनांमधून असे स्पष्ट झाले आहे की, अंमली पदार्थ

तस्करी, बनावट चलनाचा प्रसार व अतिरेकी, फुटीर चळवळी या सगळ्यांमध्ये अंतर्गत संबंध आहेत. हे सगळेच एकमेकांच्या सहाय्याने कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना रोखण्यासाठी विशेष गट, आय. बी. आणि रॉ यांच्यात उत्कृष्ट समन्वय असण्याची गरज आहे.

आय. बी. आणि रॉ या दोन्ही संस्था शक्तिमान बनवण्याची व देशाच्या सुरक्षेचे काम त्या अधिक जबाबदारीने पार पाडतील हे पाहण्याची गरज आहे. गुप्तवार्ता संस्थांसमोरील कार्य अवघड तर आहेच; पण भारतीय राष्ट्राची सुरक्षा सैन्य दलांप्रमाणेच गुप्तवार्ता खात्यांच्याही हातात आहे.

(भावानुवाद : मल्हार गोखले) – अशोक कर्णिक

## भारतीय रेल्वे प्रशासकीय सेवा

भारतात पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे दरम्यान धावली. प्रथम भारतभर रेल्वे निर्माण व चालन हे खाजगी कंपन्या, ज्या बहुतांशी इंग्लंडमध्ये प्रस्थापित झाल्या होत्या त्यांच्या द्वारे होत असे. परंतु अनेक कारणांमुळे त्यांची कामगिरी समाधानकारक होत नसल्यामुळे ब्रिटिश सरकारने १९२५ पासून त्यांचे राष्ट्रीयीकरण सुरू केले. स्वातंत्र्य मिळाल्यावर, म्हणजे १९४८ मध्ये अशा अठ्ठेचाळीस निरनिराळ्या कंपन्या व खाजगी (राजामहाराजांच्या) रेल्वे भारतात होत्या, त्यांचे राष्ट्रीयीकरण करून त्या सर्व रेल्वे बोर्डाच्या आधिपत्याखाली आल्या. भारत सरकारात रेल्वे बोर्ड ही एकमेव संस्था अशी आहे की ती रेल्वे मंत्रालयाचेही कार्यपण करते. त्यामध्ये रेल्वे बोर्ड अध्यक्षा व्यतिरिक्त सहा सदस्य, सदस्य वित्त, सदस्य यातायात, सदस्य सिव्हिल, सदस्य अभियांत्रिकी, सदस्य विद्युत व सदस्य कार्मिक असे असतात.

ह्या शिवाय रेल्वे बोर्डाच्या आधिपत्याखाली अनेक इंजिन निर्मिती, कोच निर्मिती इत्यादीचे कारखाने, कोकण रेल्वे, राईटस् सारखे अनेक बी.एस्.यू., रेल्वे स्टाफ कॉलेज या सारखी महत्त्वाची प्रशिक्षण केंद्रे आहेत.

अधिकाऱ्यांची निवड संघ लोक सेवा आयोग (यु.पी.एस्.सी.) दोन परीक्षांद्वारा करतात. पहिली अखिल भारतीय सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षा – आय.ए.एस्., आय.पी.एस्., आय.एफ.एस् तसेच रेल्वेच्या वाणिज्य व परिवहन, वित्त, कार्मिक व रेल सुरक्षा बलाचे अधिकाऱ्यासाठी सुद्धा एकच असते. दुसरी टेक्निकल विभागासाठी 'इंजिनियरींग सेवा परीक्षा' असते.

अशा तऱ्हेने जगातील दुसऱ्या नंबरची ही सरकारी रेल्वे सक्षम प्रशासकीय अधिकारी वर्ग चालवितो जो सामान्य नागरिकासाठी पडद्याआड असतो.

– डॉ. केतन कमलाकर गोखले

## महाराष्ट्र वन विभाग –

महाराष्ट्राच्या वन विभागाला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. महाराष्ट्र राज्य १९६० साली अस्तित्वात आले. परंतु त्यापूर्वी मुंबई प्रांताचा तो एक भाग होता आणि ईस्ट इंडिया कंपनी आणि नंतर ब्रिटिश राजवटीत, भारताचा पहिला वन अधिकारी, १८४६ साली पुण्यात नेमला गेला आणि देशाच्या वन व्यवस्थापनाला सुरुवात झाली. डॉ. गिबसन हे पुणे जिल्ह्यांत देशातले पहिले 'वनसंरक्षक' म्हणून नेमले गेले. त्यांनी तयार केलेली देशातली पहिली वनकार्य योजना पण महाराष्ट्रातच बनली. ब्रिटिशकालीन बॉम्बे प्रेसिडेन्सी हीपण कारवारपासून उत्तर–पश्चिमेकडे सिंध कराचीपर्यंत पसरलेली होती. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'बॉम्बे स्टेट' बनले. महाराष्ट्र राज्याची वनसंपदा विविधतेने भरलेली आहे. कोकण किनारपट्टी, सह्याद्री पर्वतरांग, अवर्षणप्रवण पठार, खानदेश आणि

विदर्भाची आपापली वैशिष्ट्यपूर्ण वनसंपदा आहे. वनांनी राज्यातील एकवीस टक्के जमीन व्यापली आहे. मुंबई प्रांत आणि नंतर महाराष्ट्र राज्य हे देशातील असे वनव्यवस्थापनेतील आघाडीचे राज्य मानले जात असे. इथे अनेक नवीन कल्पनांचा उगम झाला. १९४७ साली आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था स्थापल्या गेल्या. वनमजुरांना वनांच्या कामात सहभागी केले गेले. १९५२ साली 'बॉंबे वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन ॲक्ट' अमलात आला. १९६२ साली वनविकास मंडळ स्थापन केले. १९७४ साली, राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशीवरून इतर राज्यांनी वनविकास महामंडळे निर्माण केली. आज देशात सव्वीस वनविकास महामंडळे अस्तित्वात आहेत.

महाराष्ट्र हे वन्यजीव संरक्षणासाठीही पुढे आहे. राज्यांत चार व्याघ्र प्रकल्प, पाच राष्ट्रीय उद्याने व तेहतीस अभयारण्ये आहेत. मुंबई शहरातील एकशे दहा वर्ग कि.मी. क्षेत्रावर असलेले बोरिवली राष्ट्रीय उद्यान हे जगात एकमेव आहे. तर राज्यात दुर्मीळ माळढोक पक्षी आढळतो, त्याच्या संरक्षणासाठी वेगळे अभयारण्य आहे.

– आनंद मसलेकर

## जलसंपदा विभाग

ब्रिटिश राजवटीतील मुंबई प्रांताच्या सार्वजनिक हिताच्या कामासाठी 'सार्वजनिक बांधकाम' विभागाची स्थापना झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग (पी.डब्ल्यू.डी) या नावाने ते खाते ओळखले जायचे. त्या खात्याच्या कार्यक्षेत्रात प्रांतातील सरकारी इमारती, सार्वजनिक रस्ते, पाटबंधारे, ऊर्जा, पाणीपुरवठा व सार्वजनिक आरोग्य यासारखी कामे होती. खऱ्या अर्थाने ते बहुआयामी खाते होते.

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या, भारतरत्न उपाधीने गौरविलेले अभियंता यांनी त्यांच्या आरंभीच्या काळात याच खात्यात सहायक कार्यकारी अभियंता म्हणून शासकीय सेवेस सुरुवात केली आहे. पाटबंधारे, पाणीपुरवठा इत्यादी क्षेत्रात त्यांनी बहुमोल कामगिरी करून आपल्या अभियंता कारकिर्दीची मुहूर्तमेढ रोवली. १८७५ साली, सिंचन व पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी मुठा नदीवर स्वयंचलित दरवाजे असलेले खडकवासला दगडी धरण त्यांच्याच काळात बांधले गेले. ह्याच कालखंडात 'सी.सी.इंग्लीश', 'बील' या सारख्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या योगदानातून खात्याला अभियांत्रिकीची बैठक मिळाली. १९६१ च्या पानशेत धरणफुटीनंतर या धरणाच्या रचनेत बदल करण्यात आला.

सन १९३७ मध्ये प्रांतिक स्वायत्ततेचा कायदा अमलात आला. सन १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना झाली. त्याच दरम्यान राज्यामध्ये 'कोयना' या वैशिष्ट्यपूर्ण व आंतरखोरे पाणी स्थलांतराच्या तत्त्वावर आधारित जल विद्युत प्रकल्पाचा पाया त्यावेळचे मुख्य अभियंता माधवराव चाफेकर यांनी रचला. महाराष्ट्राची निर्मिती १९६० मध्ये झाली. जल विकासाच्या दिशा ठरविण्यासाठी स. गो. बर्वे या सनदी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली राज्याच्या पहिल्या सिंचन आयोगाची स्थापना केली गेली. आयोगाच्या शिफारशी १९६२ ला शासनाच्या हाती आल्या व त्यानुसार राज्यातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व कोकणातील नद्या समूह खोऱ्यातील आराखड्याच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. या भरीव कार्यात मा. ल. चाफेकर, गो. ना. पंडित इत्यादी अभियंत्यांचा सहभाग मोलाचा ठरला आहे. या घटना खात्याच्या कामाच्या व्याप्तीशी जशा संबंधित होत्या, तशाच त्या त्या खात्याच्या एकंदर कार्यकक्षेवर दूरगामी परिणाम करण्याच्या बाबतही कारणीभूत ठरल्या. जसजशी राज्याच्या लोकसंख्येत व पर्यायाने कार्यकक्षेच्या व्याप्तीत वाढ झाली तसे खात्याचे विकेंद्रीकरणाचे पर्व सुरू झाले. १९५८ ला सार्वजनिक बांधकाम खात्यातून इमारती व रस्ते याखेरीज अन्य विषय विभक्त करण्यात आले. या अन्य विषयांना सामावणारे खाते म्हणजे पाटबंधारे व ऊर्जा खाते पुढे चालून पाणीपुरवठा व ऊर्जा हे

विभाग स्वतंत्र होऊन पाटबंधारे विभाग स्वतंत्रपणे कार्यरत झाला. सांप्रतच्या 'जलसंपदा' विभागाचे हे मूळ रूप होय.

निर्मित सिंचनक्षमता व तिचा वापर यातील लक्षणीय तफावतीवर उपाययोजना म्हणून 'लाभक्षेत्र विकास' ही संकल्पना देशपातळीवर उदयास आली. त्या कार्यवाहीचा भाग म्हणून अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही केंद्रीय अर्थ साहाय्याने लाभक्षेत्र विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी १९७४ च्या दरम्यान सुरू होऊन त्या सुमारास खात्यात दोन स्वतंत्र सचिव पदे मंजूर झाली. या कार्यक्रमानुसार राज्यात निवडक मोठ्या प्रकल्पावर यथावकाश लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे म्हणून मंडळस्तरीय कार्यालये सुरू झाली.

डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली १९९५ मध्ये नियुक्त केलेल्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने १९९९ मध्ये दिलेल्या अहवालातील शिफारशीनुसार पाटबंधारे विभागाचे नाव बदलून 'जलसंपदा विभाग' असे नामकरण झाले. तथापि आयोगाच्या त्या शिफारशीला अभिप्रेत असलेली विभागाच्या कार्यकक्षेची व्याप्ती (भू जल विकास व व्यवस्थापन इ.) अद्यापही विस्तारित झालेली नाही.

जलसंपदा विभागाच्या कार्यकक्षेत राज्यातील जलसंपत्तीचे नियोजन, विकास व व्यवस्थापन (जलनिस्सारण, पूर नियंत्रणासह) हे महत्त्वाचे काम असून त्याला अनुसरून अन्य विषय आहेत. गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात विभागानी भीमा, जायकवाडी, पैनगंगा, वर्धा, गोसीखुर्द, भातसा या विशाल प्रकल्पांसह इतर जवळजवळ तीन हजार जल विकासाचे प्रकल्प पूर्ण करून सिंचनाच्या विस्तृत जाळ्याद्वारे राज्याच्या ग्रामीण भागाला आर्थिक अवसान प्राप्त करून दिले आहे. या खात्याचा कार्यभार सचिव पदापासून ते थेट सहायक अभियंता पदापर्यंतचे अभियंते सांभाळत आहेत. सन १८७९ मध्ये मुंबई कालवा अधिनियम तर १९३४ मध्ये त्याचे नियम प्रसृत झाले. सध्या महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अंमलात आहे तथापि त्याचे स्वतंत्र नियम प्रसृत न झाल्याने १९३४ चेच नियम कार्यवाहीत आहेत. विभागाने मागील दशकात तीन महत्वाची धोरणे / अधिनियम अंगीकारल्याने व त्याची अंमलबजावणी सुरू असल्याने विभागाच्या कार्यपद्धतीला संस्थात्मक अधिष्ठान लाभले आहे. त्या बाबी म्हणजे १. महाराष्ट्र राज्य जल नीती (जुलै २००३).

२. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम – २००५.

३. महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम – २००५ या आहेत.

१९९६ ला निर्माण केलेल्या 'नदी खोरे निहाय महामंडळाचे' रूपांतरण 'नदी खोरे अभिकरणामध्ये' करण्याची प्रक्रिया चालू आहे.

पाटबंधारे खात्याच्या सचिव पदावर स्वातंत्र्यपूर्व कालावधीत आय.सी.एस. अधिकाऱ्यांची नियुक्ती होत असे. तद्नंतर 'आय.ए.एस्.' (भारतीय प्रशासन सेवा) अधिकाऱ्यांची नियुक्ती होऊ लागली. १९७४ मध्ये या शृंखलेतील शेवटचे सचिव श्री. भुजंगराव कुलकर्णी होते. त्यानंतर पुढे अभियंता वर्गातील (महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा) सचिवांनी हे पद भूषवावयास सुरुवात केली. असे पहिले सचिव म्हणून वि. रा. देउस्कर यांनी पदभार स्वीकारला. ती परंपरा आजही चालू आहे. व या प्रवर्गातील अधिकारी सचिव पद समर्थपणे व सक्षमपणे भूषवित आहेत.

– डॉ. दि. मा. मोरे

* * *

# अ ते औ

## इनामदार, अरविंद सिद्धेश्वर

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य**

**११ नोव्हेंबर १९४०**



अरविंद सिद्धेश्वर इनामदार यांचा जन्म सांगलीतील तडसर या गावी झाला. वडील सिद्धेश्वर यशवंत इनामदार हे पट्टीचे पहिलवान होते. ते धाडसी होते. त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले होते. त्यांच्या आईचे नाव अहिल्या. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला होता. त्यामुळे घरात राहूनच त्या वाचायला, लिहायला शिकल्या. त्यांचे संस्कृतचे पाठांतर भरपूर होते. लहानपणापासूनच वाचनाचे वेड लागले. त्यामुळे भरपूर वाचन करण्याची सवय अरविंद इनामदारांनाही लागली.

अरविंद इनामदार यांनी प्राथमिक शिक्षणास तडसर गावातून सुरुवात केली. त्यांनी येथे दुसरीपर्यंत शिक्षण घेतले, नंतर मात्र त्यांना शिक्षणासाठी पुणे गाठावे लागले. महात्मा गांधींचा खून झाल्यानंतर वादातून ब्राह्मणांविरुद्ध उसळलेल्या रोषातून तडसर गावातील इनामदारांचा भव्य वाडा जाळण्याचा प्रयत्न झाला. त्यात मालमत्तेचे मोठे नुकसानही झाले होते.

तिसरीपासून पुण्यातील मॉडर्न विद्यालयामध्ये शिक्षण घेतलेल्या अरविंद इनामदारांनी पुण्यातीलच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतले.

अर्थशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच १९६४ मध्ये त्यांची भारतीय पोलीस सेवेसाठी निवड झाली. १९७६ मध्ये नागपूर येथे गुन्हे विभागाचे पोलीस उपायुक्त असताना त्यांनी नक्षलवादी चळवळीचा कुप्रसिद्ध म्होरक्या कोडापल्ली सितारामैया याला बेड्या ठोकल्या. दोनशेहून अधिक व्यक्तींची हत्या केल्याचा त्याच्यावर आरोप होता. या कामगिरीमुळे त्यांना, तसेच त्यांच्या सहकाऱ्यांना आंध्रप्रदेश सरकारने ५० हजार रुपयांचे रोख इनाम दिले. कुठच्याही राज्य सरकारने एखाद्या गुन्हेगारासाठी एवढ्या रकमेचे पारितोषिक यापूर्वी ठेवले नव्हते.

मुंबईच्या गुन्हे विभागाच्या सह पोलीस आयुक्त पदाची सूत्रे १९८७ मध्ये हाती येताच त्यांनी येथील माफियाविरुद्ध धडक कारवाई सुरू केली. पाकमोडीया स्ट्रीटवरील कुविख्यात दाऊद इब्राहिमच्या मुख्य अड्ड्यावर त्यांनीच प्रथम छापा टाकला. या कारवाईत त्यांनी अडीच कोटी रुपयांचे सोने जप्त केले. या विभागात सेवा बजावताना अरविंद इनामदार यांनी कुप्रसिद्ध छोटा शकील याला व त्याच्या पाठोपाठ अरुण गवळीला अटक केली. गवळीला तर अकरा वर्षे गजाआड घालवावी लागली.

अरविंद इनामदार यांच्यामुळेच गुन्हेगारी जगतावर दरारा निर्माण करणारा ‘टाडा’ कायदा महाराष्ट्रात प्रथमच लागू करता आला. या कायद्यामुळे संघटित गुन्हेगारी आणि माफिया यांना वेसण घालता आली.

पोलीस आयुक्त म्हणून १९९१ मध्ये नागपुरात पुन्हा एकदा त्यांचे आगमन झाले. वादग्रस्त बाबरी ढांचा पाडल्यानंतर देशात अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लीम दंगलीचा वणवा भडकला असताना नागपुरात सुव्यवस्था ठेवण्यात मिळालेल्या यशाबद्दल येथील नागरिकांनी त्यांना दुवा दिला. जळगाव-परभणी सेक्स स्कँडल त्यांनी उजेडात आणले.



महाराष्ट्र पोलीस मुख्यालय

पोलीस महासंचालक पदावर असताना त्यांनी राज्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची २२ हजार पदे निर्माण केली. ही पोलीस दलाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानली जाते. अशा रितीने पोलीस पदे निर्माण होणे हा एक देशातील विक्रमच आहे.

महासंचालक गृहनिर्माण, महासंचालक लाचलुचपत विभाग आणि अंतिमत: महाराष्ट्र पोलीस महासंचालक असा प्रवास करताना अरविंद इनामदारांना अनेक बऱ्या-वाईट प्रसंगांनाही सामोरे जावे लागले. पोलीस दलाची जनमानसात प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले. सहकारी पोलिसांची वेतनश्रेणी वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले.

जिवाची बाजी लावून हौतात्म्य पत्करणाऱ्या पोलिसांची त्यांनी कदर ठेवली. पुणे येथील हुतात्मा पोलीस स्मारक वास्तुनिर्मितीतील त्यांचा पुढाकार हे त्याचेच प्रतीक आहे.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची आपली नेमकी जबाबदारी कोणती हे पोलीस शिपायांना चांगल्या प्रकारे समजावे म्हणून त्यांनी पोलीस माहितीपत्रकांचे मराठीत भाषांतर करून घेण्याच्या कामात पुढाकार घेतला.

तत्त्वनिष्ठेची किंमत तर अरविंद इनामदारांना अनेकदा मोजावी लागली. ३६ वर्षांच्या सेवेत चक्क २९ वेळा त्यांना बदल्यांना सामोरे जावे लागले. पण त्यांनी आपल्या प्रतिमेला तसेच कर्तव्यनिष्ठेला कधीही तडा जाऊ दिला नाही. अशा परिस्थितीतही बजावलेल्या प्रामाणिक, धाडसी सेवेमुळे त्यांना उल्लेखनीय व विशेष सेवेबाबतची दोन्ही राष्ट्रपती पदके सन्मानाने प्रदान करण्यात आली.

बदली आणि नियुक्तीच्या वादातून सत्ताधाऱ्यांशी झालेल्या मतभेदांमुळे अरविंद इनामदारांनी सेवानिवृत्तीच्या निरोपाची प्रतीक्षा न करताच स्वाभिमानाने राजीनामा देण्याचा मार्ग स्वीकारला. अर्थातच यामुळे निवृत्तीनंतर मिळणाऱ्या सुमारे १० ते १२ लाख रुपयांच्या लाभावर त्यांना पाणी सोडावे लागले. स्वेच्छानिवृत्ती स्वीकारणारे भारतीय पोलीस सेवेच्या इतिहासातील ते एकमेव अधिकारी आहेत.

समाजात विविध घटकांशी व महनीय व्यक्तींशी अरविंद इनामदारांचे अतूट नाते आहे. विविध संस्थांनीही अरविंद इनामदारांना सन्मानित केले आहे. विदर्भाचा मैत्री पुरस्कार, पिंपरी-चिंचवडवासीयांनी केलेला गौरव, याज्ञवल्क्य पुरस्कार, मुंबईतील नॉर्थ इंडियन्स संस्थेने केलेला गौरव, युनियन बँक ऑफ इंडियाचा 'मॅन ऑफ द इयर' पुरस्कार असे कितीतरी सोनेरी क्षण या पोलीस अधिकाऱ्याच्या आयुष्यात गुंफले गेले आहेत.

नाशिक येथील पोलीस अकादमीचे संचालक म्हणून करीत असलेल्या त्यांच्या कामगिरीने ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांनाही भारावून टाकले. यातूनच 'पाथेय'ची निर्मिती त्यांनी अरविंद इनामदार यांना समर्पित केली.

अरविंद इनामदार यांनी विविध विषयांवर निरनिराळ्या वृत्तपत्रांसाठी लेखन केले आहे. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांना तर अनेकदा त्यांची प्रतिक्रिया जाणून घ्यायची उत्सुकता असते. विविध विषयांवरील सुमारे तीन हजार पुस्तके त्यांनी संग्रहित केली आहेत. पोलीस दलात सेवा बजावत असतानाही त्यांनी सामाजिकच नव्हे, तर पर्यावरणाच्या दृष्टीने

वातावरण निकोप राहावे यासाठीही लक्ष दिले. आत्तापर्यंत त्यांनी वृक्षारोपण मोहिमेनुसार आठ लाखांहून अधिक झाडे लावली आहेत. त्यांना देशभरातून विविध संस्था व्याख्यानासाठी निमंत्रित करतात. त्यांनी आजवर ५०० पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत. यापोटी मानधन म्हणून मिळालेली सात लाखांपेक्षा अधिक रक्कम त्यांनी ती विविध धर्मादाय संस्थांना अर्पित केली आहे.

अरविंद इनामदार यांच्या पत्नी अंजली यांनी ग्रंथालय शास्त्र (लायब्ररी सायन्स)ची पदवी संपादित केली आहे. त्यांच्या दोन्ही कन्या उच्च शिक्षित आहेत. मोठी पद्मा हिने पीएच.डी. मिळविली आहे, तर जुई ही एम.ए. झाली आहे.

– विजयकुमार बांदल

## ई. श्रीधरन्

*इलाटूवलापिल श्रीधरन्*

☞ **मुख्य नोंद – विज्ञान व तंत्रज्ञान खंड**

## उपासनी, शरद पांडुरंग

**मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य**

**१ ऑक्टोबर १९३८**



शरद पांडुरंग उपासनी यांचा जन्म नंदुरबार येथे झाला. बडोदा येथील सयाजी विद्यापीठातून त्यांनी बी.कॉम. पदवी प्राप्त केली, तर मुंबई विद्यापीठातून त्यांनी एम.कॉम. पदवी प्राप्त केली. मुंबई विद्यापीठातूनच एलएल.बी. पदवीही त्यांनी १९६१ मध्ये मिळवली.

१९६२ मध्ये उपासनी भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाले. १९६८ मध्ये त्यांनी हवाई विद्यापीठ, अमेरिकेतून एम.बी.ए. अभ्यासक्रम पूर्ण केला. प्रशासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर त्यांना राज्य आणि राष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर काम करण्याची संधी मिळाली. काही काळ ते गोव्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव होते. तसेच काही काळ केंद्र सरकारात वित्त मंत्र्यांचे (यशवंतराव चव्हाण) ते विशेष साहाय्यक होते. आंतरराष्ट्रीय नाणे निधी (वॉशिंग्टन) येथे १९७४ ते १९७८ या कालावधीत त्यांची नेमणूक झाली.

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावरही उपासनी यांनी काम केले. त्यांच्या कार्यकाळात महामंडळाच्या ताब्यातील प्रत्येक कापड गिरणी नफ्यात आली.

उपासनी यांनी केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण विभागाचे सहसचिव म्हणूनही काम पाहिले. या काळात म्हणजे १९८२ मध्ये देशात पहिल्यांदाच आशियाई खेळ आयोजित केले गेले. या खेळांच्या प्रसारणासाठी त्यांनी संपूर्ण देशात चाळीस प्रक्षेपकांची उभारणी केली. त्यामुळे देशाच्या चौऱ्याण्णव टक्के भागात दूरदर्शनच्या माध्यमातून या खेळांचे प्रसारण पोहोचले. या काळात दूरचित्रवाहिनीवरील कार्यक्रम कृष्णधवल स्वरूपात दिसत असत. या कार्यक्रमांच्या रंगीत प्रसारणाला उपासनी यांनीच सुरुवात केली. वार्तांकनासाठी कार्यक्रमस्थळी जाऊन चित्रण करता येईल, संकलन करता येईल अशा बाह्य प्रक्षेपणासाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्यांच्या (ओ.बी. व्हॅनच्या) वापराला त्यांनी चालना दिली.

महावित्तच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर त्यांनी सर्व आघाड्यांवर उत्तम कामगिरी केली.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) उपाध्यक्ष पदावर त्यांनी १९८४ ते १९८७ या काळात काम केले. या काळात त्यांनी महामंडळाच्या कारभारातही काही लक्षणीय सुधारणा घडवून

आणल्या. महामंडळाच्या कार्यालयांचे त्यांनी संगणकीकरण केले. त्यामुळे संगणकीकृत तिकीट केंद्रांची सुरुवात झाली. अशा काही सुधारणांमुळे परिवहन महामंडळ नफ्यात आले.

राज्याचे उद्योग सचिव पद भूषविल्यानंतर केंद्र सरकारात 'कंपनी लॉ बोर्डा'चे अध्यक्ष व त्यानंतर 'ब्युरो ऑफ इंडस्ट्रियल कॉस्टस् अ‍ॅन्ड प्राईसेस'चे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.


महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव पदावरून १९८८ मध्ये उपासनी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतरही ते कंपनी कायदाविषयक सेवा देतात. त्यांनी वाणिज्य, बँकिंग, कायदा आणि व्यवस्थापनाची पार्श्वभूमी आणि व्यवस्थेमधील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आहे. उत्तम मार्गदर्शक म्हणून त्यांचा लौकिक आहे.

'महाराष्ट्र बोर्ड ऑफ रिकन्स्ट्रक्टिंग ऑफ स्टेट एन्टरप्रायझेस'च्या अध्यक्षपदावरही त्यांनी काम केले आहे. याअंतर्गत सार्वजनिक उपक्रमांचे व्यवस्थापन व पुनर्रचना यासंबंधी अभ्यासपूर्ण शिफारशी त्यांनी शासनास केल्या होत्या. विश्व व्यापार केंद्र (वर्ल्ड ट्रेड सेंटर), मुंबईच्या उपाध्यक्षपदी तसेच ग्राहक मार्गदर्शक सोसायटीचे अध्यक्ष, 'ब्रिटिश गॅस कंपनी'चे सल्लागार या पदांवरही त्यांनी काम केले आहे. त्याचबरोबर भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. (भेल) या कंपनीत संचालक पदावर त्यांची २००१ मध्ये नेमणूक झाली. या पदावर त्यांनी चार वर्षे काम केले.

– प्रभाकर करंदीकर

## एकबोटे, माणिक श्रीकृष्ण
### भारतीय रेल्वे अभियांत्रिकी सेवा
### ११ ऑगस्ट १९४३

माणिक श्रीकृष्ण एकबोटे यांचा जन्म राजस्थानातील कोटा या गावी झाला. त्यांचे वडील श्रीकृष्ण हरी एकबोटे कोटा येथील शासकीय महाविद्यालयात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक होते. माणिक एकबोटे हे पंधरा वर्षांचे असताना त्यांच्या



पितृछत्र हरपले.

माणिक एकबोटे यांचे प्राथमिक शिक्षण कोटा येथील न्यू हायस्कूलमध्ये झाले. १९५७ साली ते दहावी उत्तीर्ण झाले, तर १९५९ साली ते इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांचे अभियांत्रिकी शिक्षण मुंबईच्या व्ही.जे.टी.आय. येथे झाले. १९६२ साली त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीतून बी.ई.ची पदवी घेतली. त्या वेळी त्यांचा क्रमांक विद्यापीठात दुसरा आला होता. त्यानंतर त्यांनी १९६२ ते १९६४ या कालावधीत बंगलोरच्या भारतीय विज्ञान संस्था या जगप्रसिद्ध संस्थेतून अभियांत्रिकीचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आणि १९६४ साली त्यांनी राऊरकेला येथील पोलाद कारखान्यात साहाय्यक आरेखन अभियंता म्हणून कामाला सुरुवात केली. याच दरम्यान त्यांनी १९६५ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाची अभियांत्रिकीची परीक्षा दिली आणि संपूर्ण भारतातून ते दहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांची भारतीय रेल्वेच्या अभियांत्रिकी सेवेमध्ये निवड झाली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना जानेवारी १९६९ साली अहमदाबाद ते कांडला या नवीन रेल्वेमार्गाच्या निर्मितीच्या कामावर साहाय्यक अभियंता म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानंतर १९७१ साली गुजरात येथे विद्युत मंडळासाठी कोळसा वाहून नेण्याच्या कामावरचा बांधण्यात येणाऱ्या रेल्वेमार्ग कामावर कार्यकारी अभियंतापदावर बढती देण्यात आली. विद्युत मंडळासाठी ने-आण करणाऱ्या रेल्वेमार्गातील अडथळे दूर करून कारखान्यापर्यंतचा रेल्वेचा मार्ग बनवण्यात आला. त्यामुळे विद्युतनिर्मिती केंद्रावर लागणाऱ्या कोळशाच्या गाड्या जाणे शक्य झाले. यानंतर त्यांना १९७३ साली भारतीय रेल्वे अनुसंधान, अभिकल्प व मानक संगठन लखनऊत साहाय्यक



चर्चगेट स्थानक, मुंबई

संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले. रेल्वेमार्गातील पुलांच्या मजबुतीच्या दृष्टीने एकबोटे यांनी या संशोधन काळात एक संहिता तयार केली.

१९८२ ते १९८९ या कालावधीत ते चर्चगेट येथील रेल्वेच्या कार्यालयात उपमुख्य अभियंता व मुख्य अभियंता या पदावर असताना लोहमार्गची देखभाल आधुनिकीरणाचे काम त्यांच्याकडे आले. त्या वेळी त्यांनी लोहमार्गाच्या व्यवस्थापनाचे पूर्णत: संगणकीकरण केले. त्यामुळे सर्व अहवाल अद्ययावत राहू लागले आणि सर्व इत्थंभूत माहिती मिळून लोहमार्गाच्या कामातील गुणवत्ता वाढली. याच विभागात १९९५ साली एकबोटे यांना मुख्य ट्रॅक अभियंता या पदांवर काम करावयाचा अनुभव मिळाला व असताना त्यांना पश्चिम रेल्वे च्या पूर्ण रेल्वे ट्रॅकचे काम देण्यात आले. या वेळी मुंबईच्या उपनगरी रेल्वेत लाकडी रूळपट्ट्या (स्लीपर्स) होते व त्यांच्या देखभालीत बऱ्याच अडचणी येत कधीकधी रेल्वेमार्ग बंद पडण्याचे प्रकार घडता व त्यामुळे लोकल उशिराने येत असत. पर्यायाने जनतेची गैरसोय होत असे. सर्व रूळपट्ट्या काँक्रिटच्या करण्याचे काम सुरू केले व ते २-३ वर्षांत पूर्ण झाले. क्राँक्रिटच्या रूळपट्ट्यांच्या वापरामुळे रेल्वेमार्ग बंद पडण्याचे प्रकार घडणे थांबले.

१९९३ साली त्यांची हुबळी येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापक पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या कार्यकालात हुबळीच्या पूर्ण डिविजनचे गेज परिवर्तन (मीटर गेज ते ब्रॉड गेज १९९३-९५ ह्या काळात झाले.) त्या कामामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

११ डिसेंबर १९९३ रोजी पुण्यातील फुरसुंगी येथील रेल्वे रूळ ओलांडणाऱ्या एका सहल बसला सह्याद्री एक्स्प्रेसच्या धडकेने अपघात झाल्यामुळे त्या बसमधील ४० चिमुरड्या शाळकरी मुलांना आपल्या प्राणास मुकावे लागले. या वेळी एकबोटे यांनी ताबडतोब हुबळी येथून पुण्याला जाऊन परिस्थिती हाताळली होती. मृतांच्या नातेवाइकांना योग्य आर्थिक मदतही मिळवून दिली होती. १९९८ ते २००१ ह्या काळात एकबोटे हे पश्चिम रेल्वेत मुख्य अभियंता या जबाबदार पदावर होते व त्या काळात पश्चिम रेल्वेची अभियांत्रिकी विभागात चांगली प्रगती झाली. २६ जानेवारी २००१ला झालेल्या गुजरातचा भूकंपात रेल्वेच्या संपत्तीचे (ट्रॅक, कॉलनीतील घरे) प्रचंड नुकसान झाले होते; पण सर्व अडचणींवर मात करुन लगेच अठ्ठेचाळीस तासात रहदारी परत सुरू करण्यात आली होती. पश्चिम रेल्वेला या बद्दल त्याकाळी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कडून प्रशस्तिपत्र मिळाले होते. २००१ ते २००३ या कालावधीत रेल्वे बीड (रेल्वे मंत्रालय) येथे अपर सदस्य या अतिशय जबाबदारीच्या व महत्त्वाच्या पदावरून २००३ साली ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी मोनार्क सर्व्हेअर्स या कंपनीमध्ये मार्गदर्शक म्हणून काम केले. सध्या कामातून पूर्णत: निवृत्त होऊन ते पुण्यात स्थायिक झालेले आहेत.

– दत्ता कानवटे

## एन. रघुनाथन

**भा. प्र. सेवा, मुख्य सचिव-महाराष्ट्र राज्य**

**मार्च १९३६ – ३ जुलै २०१०**

एन. रघुनाथन यांचा जन्म नवी दिल्लीत झाला. त्यांचे वडील एका केंद्रीय कार्यालयात लघुलेखक (स्टेनो) होते. दिल्लीच्या सेंट स्टिफन्स



महाविद्यालयामधून त्यांनी १९५७ मध्ये प्राचीन इतिहास विषयात प्रथम श्रेणीत एम.ए. पदवी मिळवली. महाविद्यालयात अल्पकाळ अधिव्याख्याता म्हणून काम करताना ते १९५९ मध्ये आय.ए.एस. परीक्षेत उत्तीर्ण होऊन महाराष्ट्रात प्रशासनिक सेवेत दाखल झाले. त्यांनी ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती येथे व मंत्रालयात काम केले. केंद्रीय कार्यालयात अन्न, नागरी पुरवठा, संरक्षण, नियोजन विभागात काम करून, व्यापक अनुभव घेऊन १९९३-९४ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यसचिव पद त्यांनी यथार्थपणे भूषविले.

१९९३ सालच्या अभूतपूर्व घटनांनी रघुनाथन यांच्या गुणवत्तेची जितकी सखोल, तितकीच व्यापक परीक्षा घेतली. विशेष म्हणजे ज्या दिवशी त्यांनी कार्यभार स्वीकारला, त्याच दिवशी दुपारी १-२० वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत मुंबई एका पाठोपाठ झालेल्या बारा स्फोटांच्या मालिकेने हादरून गेली. २६० माणसे मृत्युमुखी, ७१३ जखमी व सुमारे ५० कोटीच्या मालमत्तेची हानी झाली.

धैर्य व प्रसंगावधान राखून रघुनाथन यांनी ताबडतोब वरिष्ठ पोलीस व वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना तत्काळ अचूक आदेश दिले. त्यामुळे सर्वत्र नाकेबंदी, वाहने तपासणे, टेलिफोन व वीज सेवा पूर्ववत आणणे, मोक्यांच्या जागी गस्त घालणे, स्फोट झालेल्या रक्तरंजित जागा धुऊन साफ करणे, इत्यादी विविध कामे त्यांनी युद्धपातळीवर करवून घेतली. आठवडाभर रघुनाथन स्वत: रोज अठरा तास काम करून राज्यातील एकूण परिस्थितीवर बारीक नजर ठेवून होते.

त्यानंतर दुसरा असाच कसोटीचा क्षण लातूरच्या भूकंपामुळे आला. ३० सप्टेंबर १९९३ रोजी सकाळी चार वाजता लातूर व आसपासच्या भागांत ६.४ तीव्रतेचा भूकंप झाला. त्यात लातूर जिल्हा व उमरगा तालुक्यातील ६७ गावे भूकंपाच्या तडाख्यात सापडली. जवळजवळ दहा हजार मृत्यू, सोळा हजार जखमी झाले व तीस हजार घरे पडली, अशी या भूकंपाची तीव्रता होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भूकंप होण्याचा हा महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील पहिला प्रसंग होता.

रघुनाथन यांना या दुर्घटनेची सूचना पोलीस बिनतारी यंत्रणेवर सकाळी ६-०० वाजता मिळताच ते कार्यालयात पोहोचले, मंत्रालयाजवळच्या निवासातील सर्व सचिवांना त्यांनी तत्काळ बोलावून, (नियंत्रण कक्ष) (कंट्रोल रूम) ची स्थापना करून तेथे सचिव दर्जाचे अधिकारी २४ तास कार्यरत ठेवले आणि भूकंपग्रस्तांना लवकरात लवकर मदत पोहोचेल अशी व्यवस्था केली. यात प्रमुख कंपन्या, स्वयंसेवी संस्था, जवळची राज्य सरकारे यांच्याकडून, लष्कराकडून साहाय्य घेतले. लातूर, किल्लारी, उस्मानाबाद, उमरगा, सोलापूर येथे थेट दूरध्वनी (डायरेक्ट टेलिफोन, हॉटलाइन) सेवा उपलब्ध केली.

तंबूसाठी बांबू, पाले, डॉक्टरांची पथके, औषधे, धान्य, बेकरी उत्पादने, कपडेलत्ते, दूध इत्यादी आवश्यक वस्तू गोळा करवून त्यांची तत्परतेने रवानगी केली गेली. महत्त्वाचे म्हणजे रक्तपुरवठ्यासाठी रक्तपेढीची व्यवस्था केली आणि अध्येमध्ये कुठेही गैरवापर, गडबड न होता ही मदत भूकंपग्रस्तांपर्यंत पोहोचली. तेथे उत्तम वितरण व्यवस्था केली. अनेक औद्योगिक संस्थाही मदतीला धावून आल्या. मंत्रालयातील २४ तास कार्यरत नियंत्रण कक्षासाठी उपाहारगृहही जवळजवळ २४ तास काम करीत असे. प्रस्तुत मदतकार्यात जागतिक बँकेनेही योगदान दिले आणि योग्य विनियोग होतो आहे यावर लक्ष ठेवले. कसलेले प्रशासक एन. रघुनाथन यांच्यावर विलंबाचा डाग लागला नाही हे नमूद केले पाहिजे.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरणाचा ठराव वास्तविक १९८० मध्येच झाला होता. परंतु त्या

चळवळीने नोव्हेंबर १९९३ मध्ये उसळी मारून उग्र रूप धारण केले. मुख्यमंत्री शरद पवार यांनी सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करून, जवळजवळ संमती मिळवली आणि १४ जानेवारी १९९४ रोजी या बाबतचा अध्यादेश जारी करून या ज्वलंत प्रश्नास पूर्णविराम दिला. मुख्य सचिव या नात्याने रघुनाथन यांनी कायदा व सुव्यवस्था चिघळू न देण्याचा पूर्ण प्रयत्न केला. स्काउट व गाइडच्या अनुदानाचा प्रश्न समोर आला तेव्हा त्या संस्थेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. केंद्रीय लोकसेवा आयोगासमोर झालेल्या त्यांची मुलाखत झाली होती.

तेव्हा आयोगाच्या अध्यक्षांनी रघुनाथन यांच्या शालेय जीवनातील समाजकार्याविषयी विचारले व त्यांचा स्काउटमध्ये सहभाग होता हे ऐकून त्याचे नियम विचारले. अचूक उत्तराने अध्यक्षांचे समाधान झाले. आय.ए.एस.साठीची मुलाखत पंधरा मिनिटांतच संपली आणि रघुनाथन ती परीक्षा उत्तीर्ण झाले. शालेय जीवनात स्काउटच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवा केली आणि प्रशासक या नात्याने ती अखंडपणे चालू ठेवली.

रघुनाथन यांनी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविलेच, त्याचप्रमाणे पंजाबी, गुजराती व तामीळमध्येही ते सहज वार्तालाप करू शकत. त्यांची स्मरणशक्ती जबरदस्त असून संस्कृत व पुरातत्त्व हे त्यांचे आवडीचे विषय होते. ज्योतिषशास्त्रावर त्यांचा विश्वास व त्याचा अभ्यास असला तरी त्यांनी प्रशासनाच्या कामात कोणताही अडथळा येऊ दिली नाही. विवेकी असल्याने कोणत्या कर्तव्याला प्राथमिकता द्यावी याचा ते निर्णय घेत. परदेश प्रवासाच्या संधीवर पाणी सोडून ते कर्करोगग्रस्त वडिलांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणी हजर राहिले.

आपल्या कार्यकाळात त्यांनी महाराष्ट्रात योग्य रेशन –पुरवठ्याची पद्धत राबवली. राज्य लॉटरी सुरू करण्याचे श्रेय त्यांनाच आहे. शेतकऱ्याकडील कापूस वाजवी भावात खरेदी करण्याची यशवंतराव मोहिते यांची कल्पना कार्यान्वित करण्यात त्यांनी मोठा हातभार लावला आणि अशी योजना महाराष्ट्रात तालुका पातळीपर्यंत राबविण्याचा धाडसी निर्णय घेतला. शासनातर्फे केंब्रिज येथे जाऊन त्यांनी पदव्युत्तर पदवी संपादन केली.

रघुनाथ आपल्या निर्णयावर ठाम असत. कोणतेही प्रलोभन त्यांना विचलित करू शकले नाही. सेवानिवृत्तीनंतर मुदतवाढ न स्वीकारण्याचा निर्णय हे याचे ज्वलंत उदाहरण. आदर्श प्रशासक कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणून एन. रघुनाथन यांचा निर्देश करावा लागेल. आस्थापूर्ण कार्यशैली व तत्परतेने वागणारा हा प्रशासक देशाच्या राजधानीत जन्मला आणि आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत शिल्पकाराची भूमिका यशस्वीपणे पार पाडून त्याच राज्याच्या ‘मुंबई’ या राजधानीत निधन पावला.

– वसंत फातर्पेकर

## एडवर्ड्स, स्टीफन मेरिडिथ

**पोलीस आयुक्त – मुंबई इलाखा**

**जन्म दिनांक अनुपलब्ध – १ जानेवारी १९२७**



स्टीफन मेरिडिथ एडवर्ड्स हे भारतीय नागरी सेवेतून पोलीस आयुक्त म्हणून नियुक्त केलेले एकमेव सदस्य अधिकारी होते. मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी (कमिशनर) नेमणूक व्हायच्या आधी त्यांनी मुंबईत विविध जागांवर काम केले होते. त्यामुळे त्यांना त्या शहराची, तेथील लोकसंख्येची, इतिहासाची माहिती होती.

१९०८ मध्ये लो. टिळकांच्या पुढाकाराने मुंबईत झालेल्या उठावानंतर, मुंबईच्या पोलिसांच्या कार्यपद्धतीचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या

मॉरिसन समितीचे ते सदस्य होते. या समितीने भविष्यातील या व्यवस्थेच्या कार्यपद्धतीबाबत सरकारला अहवाल सादर केल्यावर एडवर्ड्स हे इंग्लंड येथे निघून गेले. इंग्लंड येथे असतानाच त्यांना मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी नेमणुकीचे पत्र मिळाले. त्यांना इंग्लंड येथील स्कॉटलंड यार्ड येथे जाऊन तेथील लंडन पोलिसांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे एडवर्ड्स यांनी गुन्हा शोधण्यातील पोलिसांची कार्यपद्धती, त्यांचे विविध विभाग, त्यांना दिले जाणारे दैनंदिन काम याचा अभ्यास केला. तसेच वेस्टमिनिस्टर येथील हवालदारांचे प्रशिक्षण विद्यालय, ठसे तपासणी कार्यालय व विविध ठिकाणांतील पोलीस स्थानकांचासुद्धा अभ्यास केला.

त्यानंतर एडवर्ड्स यांनी मुंबईच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतली. तेव्हा या ठिकाणी पोलीस कार्यालयाच्या जागेपासून ते सर्व प्रकारच्या रचनांपर्यंत गोंधळ होता. त्यांनी पहिल्याप्रथम जून १९०९ मध्ये गुन्हा अन्वेषण विभागाची स्थापना केली. त्यामध्ये चार विभाग होते. राजकीय, विदेश, गुन्हा व अन्य. त्या वेळेस या विभागाच्या कार्यातील एक भाग म्हणजे संवेदनशील अशा राजकीय व धार्मिक गोष्टींची छाननी करणे. गणपती उत्सव व मेळ्याच्या ठिकाणी म्हटली जाणारी गीते यांच्यावर बारीक लक्ष ठेवले जाई.

गुन्हा अन्वेषण विभागाखेरीज आता पोलिसांत कायमच्या संस्था बनलेल्या अनेक गोष्टींची सुरुवात ही एडवर्ड्स यांनी केली. १९११ मध्ये त्यांनी पोलीस वृत्तपत्र (गॅझेट) सुरू केले. हे अंतर्गत वितरणासाठी होते व त्यामधून पोलिसांना गुन्हेविषयक सर्व बातम्या कळत, तसेच पोलीस विभागात इतर ठिकाणी चालू असलेल्या घडामोडीबाबतही माहिती कळे.

त्यांनी नवीन पोलीस स्थानकांची रचना केली. त्यांमध्ये आधुनिक यंत्रणा बसविली, तसेच प्रशिक्षित कर्मचारीवर्गही नेमला. तसेच गुन्ह्याच्या नोंदींची पुस्तिका, माहितीचे कागद, वेळापत्रक, इंग्रजी बोलणारा एखादा अधिकारी अशीही व्यवस्था त्यांनी सुरू केली.

मुंबईतील कुलाबा, भायखळा व नागपाडा येथील पोलीस स्थानकांची पुनर्रचना ही लंडन येथील पोलीस स्थानकांच्या पद्धतीने केली गेली. एडवर्ड्स यांनी पोलीस कार्यपद्धतीत रात्रपाळी व दिवसपाळीही सुरू केली, तसेच उपनिरीक्षक पदावर लोकांमधून उमेदवार निवडून थेट नेमणूक करण्याची पद्धत सुरू केली.

त्या वेळेस रस्त्यावर राहणाऱ्या अल्पवयीन मुलींना पोलीस बरेच वेळा पकडून पोलीस स्थानकात आणत असत; कारण त्यांना रस्त्यावर बेवारस सोडून दिल्यास त्या वाममार्गाला लागण्याची शक्यता असे. म्हणूनच एडवर्ड्स यांनी पुढाकार घेऊन अब्दुल्लाह हाजी दाऊद बावला मुहम्मदन मुलींचे अनाथगृह सुरू केले. अब्दुल्लाह हाजी यांनी तीन लाख रुपये देणगी दिल्याने त्यांचे नाव या अनाथगृहास देण्यात आले. आज त्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस आयुक्तांचे कार्यालय आहे.

एडवर्ड्स यांनी विपुल लेखन केले. एडवर्ड्स यांचे एक प्रमुख योगदान म्हणजे त्यांनी मुंबईच्या इतिहासाचे दस्तऐवज नोंदीकरण (डॉक्युमेंटेशन) केले. त्याचा पुढे अनेकजणांना संशोधनासाठी खूप उपयोग झाला.

त्यांनी 'द राइझ ऑफ बॉम्बे : अ रेस्ट्रोस्पेक्ट' हे पुस्तक लिहिले, तसेच जुनागड व काठियावाड येथील राजांवर 'बायबेज् ऑफ बॉम्बे' या पुस्तकाचे सहलेखन केले. आणखीन एक महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'द बॉम्बे सिटी पोलीस, अ हिस्टॉरिकल स्केच' (१६७२-१९१६) लिहिले. मुंबई पोलिसांबद्दलचा हा सर्वांत वास्तवदर्शी व आकर्षक वृत्तान्त मानला जातो. याशिवाय 'सर दिनशॉ पेटीट - अ मेमॉइर' व 'बाबर' ही दोन पुस्तकेही एडवर्ड्स यांनी १९२४ मध्ये लिहिली. सात वर्षांच्या सेवेनंतर, प्रकृती-अस्वास्थ्यामुळे ते १५ एप्रिल १९१६ मध्ये मुंबई पोलीस आयुक्त पद सोडून, इंग्लंडला परत गेले.

**- आशा बापट**

## ओंबळे, तुकाराम गोपाळ

**साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक**

**१ जून १९५५ – २६ नोव्हेंबर २००८**



तुकाराम गोपाळ ओंबळेंचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात जावली तालुक्यात वसलेल्या केंडबे ह्या खेड्यात झाला. केंडबे गाव डोंगराच्या कडेकपारीत वसलेले, त्यामुळे शेतीमधील उत्पन्नदेखील तुटपुंजे असायचे. त्यामुळे तुकारामांनी जगण्यासाठी आपल्या थोरल्या व धाकट्या भावांसह मुंबई गाठली. मुंबईत लहानसहान नोकऱ्या केल्यानंतर त्यांना अठराव्या वर्षीच मुंबई पोलीस दलात नोकरी मिळाली.

कॉन्स्टेबल म्हणून सेवेला सुरुवात केलेल्या ओंबळेंनी त्यानंतर ३४ वर्षांच्या कारकिर्दीत साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत यशस्वी मजल गाठली होती. अतिशय शिस्तप्रिय, वक्तशीर, वरिष्ठ व सहकाऱ्यांशी सभ्यतेने वागणे आणि मितभाषी स्वभावामुळे ओंबळेंबद्दल पोलीस खात्यात आदरच होता. डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग पोलीस ठाण्यात नियुक्ती असलेल्या तुकाराम ओंबळेंच्या आयुष्यातील २६ नोव्हेंबर २००८ हा दिवस आगळावेगळा ठरला. कारण तो त्यांच्यासह आणखी सोळा अधिकारी, कर्मचारी, तसेच २०० हून अधिक निरपराध नागरिकांसाठी मृत्यूचा दूत बनून आला होता.

२६ नोव्हेंबर २००८ च्या रात्री ओंबळे गिरगाव चौपाटीवर बीट मार्शल म्हणून कर्तव्य बजावीत होते. त्याच वेळी त्यांच्या बिनतारी यंत्रावर संदेश थडकला की, ‘दक्ष राहा, गेटवे परिसरातून दोन दहशतवादी, चौपाटीच्या दिशेने येत आहेत. त्यांच्याकडे स्कोडा एमएच ०२ जेपी १२७६ ह्या क्रमांकाची गाडी आहे.’ इस्माईल नावाचा दहशतवादी ती गाडी हाकत होता व



अशोकचक्र

त्याच्या शेजारी अजमल कसाब एके-४७ मशीनगन घेऊन बसला होता.

संदेश ऐकताच एरवी रस्त्यावर दोन अडथळे (बॅरॅकेड) उभे करणाऱ्या ओंबळेंनी या वेळी सहा-सहा फुटांच्या अंतराचे तीन अडथळे लावले. अंदाजाप्रमाणेच गाडी हाकणाऱ्या इस्माईलने दोन अडथळे तोडले; परंतु तिसऱ्या अडथळ्यापाशी त्यांची स्कोडा गाडी बंद पडली.

ही संधी साधत तुकाराम ओंबळेंनी कसाबच्या दिशेचा दरवाजा विजेच्या चपळाईने झेपावत उघडला. तोवर दुसरीकडून ओंबळेंच्या दोन सहकाऱ्यांनी इस्माईलला आपल्या ९ एम.एम. पिस्तुलामधून कंठस्नान घातले होते. परंतु कसाबने मात्र आपल्या एके-४७ मशीनगनमधून ह्या अत्याधुनिक बंदुकीतून ओंबळेंच्या दिशेने बेछूट फैरी झाडायला सुरुवात केली. गोळ्या लागून ओंबळे कोसळत होते. त्यांच्या हाती काहीही शस्त्र नव्हते. तरीही जिवाच्या आकांताने त्यांनी गोळ्या ओकणाऱ्या बंदुकीची नळी पकडली आणि नंतर त्याला विळखा घालून बाहेर खेचला.

कसाब हतबल झाला आणि ओंबळेंच्या अन्य साथीदारांनी त्याला पुरता जेरबंद केला. ओंबळेंच्या प्रसंगावधानामुळे आणि योग्य कृतीमुळे कसाब ह्या एकमेव दहशतवाद्याला जिवंत पकडता आले.

त्यामुळेच २६/११ च्या हल्ल्याच्या खटल्यातील चौकशी व तपासाचे मार्ग सुलभ झाले. पण या हातघाईत तुकाराम ओंबळे मात्र गिरगाव चौपाटीजवळ आपल्या प्राणांचे बलिदान करून हुतात्मा झाले. उण्यापुऱ्या सहा मिनिटांच्या ह्या कल्पनेहूनही थरारक घटनेमध्ये एरवी अन्य सर्व दहशतवाद्यांप्रमाणेच कसाबलाही पोलिसांच्या गोळ्यांनी मृत्यूचा मार्ग दाखविता आला असता; परंतु त्यामुळे ह्या कटाची व पाकिस्तानच्या कुटिल कारवायांची माहिती जगाला कधीच कळली नसती. ओंबळेंमुळेच कसाब जिवंत सापडू शकला व पाकिस्तानचे पितळ उघडे पडले. ओंबळेंच्या ह्या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांना २००९ च्या प्रजासत्ताक दिनी 'अशोकचक्र' मरणोत्तर प्रदान करण्यात आले. ह्या वेळी बोलताना भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई देवीसिंग पाटील ह्यांनी असे प्रशंसोद्‌गार काढले, की ''कोणत्याही शस्त्राविना दहशतवाद्यांवर तुटून पडणारे साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे यांच्या अतुलनीय शौर्याला माझा सलाम आहे.''

ओंबळेंची सेवा अजून साडेचार वर्षे शिल्लक होती. त्यांच्या पश्चात पत्नी ताराबाई, तसेच चार कन्या असा परिवार आहे.

– संदीप राऊत

* * *

# क

क

## करंदीकर, प्रभाकर दत्तात्रेय
**उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म.प्र.से**
**विभागीय आयुक्त पुणे**
**३० डिसेंबर १९४९**



प्रभाकर दत्तात्रेय करंदीकर यांचा जन्म बारामती येथे झाला. त्यांचे वडील आणि आजोबाही वकील होते. त्यांचे वडील अत्यंत तत्त्वनिष्ठ आणि सात्त्विक वृत्तीचे होते. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांना कारावासही झाला होता. पण त्यासाठी मिळणारे मान आणि मानधन त्यांनी स्वीकारले नाही. प्रभाकरांच्या मातोश्री पद्माताई, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या पदवीधर होत्या. त्यांनी गीता व संत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता.

प्रज्ञा, प्रतिभा आणि कर्तृत्व याचा सुंदर मिलाफ प्रभाकर करंदीकरांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांनी आपल्या संपूर्ण प्रशासकीय कारकिर्दीवर आपल्या स्वच्छ आणि कर्तव्यनिष्ठ कामगिरीची मोहोर उठवली. त्यांचे माध्यमिक शिक्षण बारामतीच्या म.ए.सो. विद्यालयात झाले. शालान्त परीक्षेत बोर्डात त्यांचा चव्वेचाळीसावा क्रमांक आला. त्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्तीही मिळाली. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथील फर्गसन महाविद्यालयात झाले. या काळात अभ्यासाबरोबरच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातही त्यांनी लौकिक मिळवून आपली रसिकता प्रगट केली.

१९६९ मध्ये राज्यशास्त्र विषयात पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाचे वझे पारितोषिक मिळवून ते बी.ए. झाले. याच विषयात एम.ए. करून ते आय.ए.एस. झाले आणि भारतीय शासकीय सेवेत रुजू झाले. त्यांनी पुणे जिल्हा परिषद प्रशासकीय प्रमुख, सोलापूर येथे जिल्हाधिकारी, शेती महामंडळ, सी.कॉम, रस्ते महामंडळ अशा जबाबदाऱ्या कौशल्याने पेलल्या.

पंढरपूर क्षेत्रातील श्री दर्शनाची व्यवस्था हे त्यांचे उल्लेखनीय काम. शेती महामंडळाचे कार्यकारी संचालक असताना त्यांनी पडीक जागेत सुबाभूळ, सिल्व्हर ओक, साग यांच्या लागवडीला चालना दिली. पुणे येथे विभागीय आयुक्त म्हणून अतिशय उल्लेखनीय काम केले. बचतगटांच्या अगदी प्राथमिक अवस्थेत उत्कृष्ट मार्गदर्शन करून बँकेच्या माध्यमातून बचतगटांच्या कार्याचा पाया भक्कम केला.

त्यांनी आर.एम.डी.आर. पुणे या संस्थेची 'डिप्लोमा इन बिझिनेस अँड इंडस्ट्रियल मॅनेजमेंट' ही पदवी १९८२ मध्ये मिळवली. १९८८ मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत अभ्यास करून एम.एस्सी. ही पदवी मिळवली. त्यांनी सार्वजनिक आरोग्य, प्रगतीच्या पद्धती, नागरी नियोजन इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास केला. यासाठी भारत सरकारने विशेष शिष्यवृत्ती देऊन त्यांना इंग्लंडला पाठवले होते.

आपल्या शासकीय सेवेत त्यांनी मुंबई महानगर पालिका उपायुक्त (१९८५ ते १९८८), महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट-मुख्य कार्यकारी अधिकारी (१९९१-१९९४), सीकॉम-व्यवस्थापकीय संचालक (फेब्रुवारी १९९४ ते एप्रिल १९९७), ग्रामीण विकास

सचिव (जून १९९७ ते एप्रिल १९९८), अणुऊर्जा आयोग सहसचिव (अर्थ)–१९९८ ते २००१, रस्ते विकास महामंडळ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक–२००१ ते २००३, पुणे विभागीय आयुक्त – जून २००३ ते एप्रिल २००७ आदी पदांवर यशस्वीरीत्या काम केले. पुणे विभागीय आयुक्तपदी काम करत असताना त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. सध्या ते ‘महिंद्र अँड महिंद्र’ मुंबई या कंपनीत कॉर्पोरेट सल्लागार म्हणून काम पाहत आहेत.

अत्यंत कर्तबगार, शिस्तप्रिय व पारदर्शक अधिकारी म्हणून करंदीकरांना अनेकवेळा गौरविले गेले आहे. भारत सरकारतर्फे १९८२ मध्ये सोलापूर जिल्हा जनगणनेच्या कामातील कुशल संचालनासाठी राष्ट्रपती पदक देण्यात आले. १९९२ मध्ये औद्योगिक पायाभूत सुविधा आणि विकास क्षेत्रातील योगदानासाठी नेशन सिटिझन कमिटी, नवी दिल्ली तर्फे पुरस्कार, १९९३ मध्ये औद्योगिक विकास क्षेत्रातील योगदानासाठी उद्योग रत्न पुरस्कार, टॉप मॅनेजमेंट कन्सॉर्शिअम–पुणेच्या वतीने प्रशासन कौशल्यासाठी जीवनगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले गेले आहे.

करंदीकर हे उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म्हणून जसे गौरवास पात्र आहेत त्याप्रमाणेच त्यांचे मन अतिशय संवेदनशील आहे. ते एक प्रतिभासंपन्न कवी व लेखक आहेत. त्यांच्या चौफेर ज्ञानामुळे राज्य शासनामार्फत जी अभ्यास मंडळे नेमली जात त्यात त्यांचा समावेश असे. त्यामुळे त्यांचा जगभरातील अनेक देशांत प्रवास झाला. त्यांचे इंग्लिश मासिकांतून तसेच दैनिके व नियतकालिकांतून प्रशासन, अर्थकारण या विषयावर अनेक अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध झाले. त्यांची ‘आदिबंध’ ही कादंबरी प्रकाशित झाली आहे.

– विजया सस्ते

## करकरे, हेमंत कमलाकर
**दहशतवादविरोधी पथक प्रमुख**
**१२ जुलै १९५४ – २६ नोव्हेंबर २००८**



मुंबई पोलीस सेवेमधील अतिशय सुसंस्कृत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व अशी ख्याती लाभलेले हेमंत कमलाकर करकरे ह्यांचा जन्म मध्यप्रदेशातील आमला ह्या खेड्यात झाला. वडिलांची रेल्वेत नोकरी असल्यामुळे बदलीमुळे सतत शहरे, गावे बदलत राहावी लागायची, त्यामुळे तीन भाऊ, एक बहीण आणि आईवडिलांसह करकरे यांचे बालपण आणि शालेय, महाविद्यालयीन शिक्षण विविध शहरांत पूर्ण झाले. मध्यप्रदेशातून पुढे वर्धा येथील वास्तव्यात त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. माध्यमिक शिक्षण नागपुरात न्यू इंग्लिश हायस्कुलामध्ये घेतले. नागपुरातच सर विश्वेश्वरय्यांच्या महाविद्यालयातून यांत्रिकी अभियांत्रिकी ही पदवी प्राप्त केली. शाळेत त्यांचा नेहमी पहिलाच क्रमांक असायचा.

करकरे यांच्या मातोश्रीदेखील बी.ए., एम.ए., एम.एड. अशा उच्च विद्याविभूषित असल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनातून तयार झालेल्या हेमंत करकरे यांनी ‘पहिलीचा सगळा अभ्यास पाठ येतो’ म्हणून बदलीच्या ठिकाणच्या वर्धा येथील शाळेच्या पहिलीच्या वर्गात बसण्यास नकार दिला आणि दुसरीत बसण्याचा हट्ट धरला. मुळातच तल्लख बुद्धीच्या हेमंत करकरे ह्यांनी अभियांत्रिकीनंतर टाटा

इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्या अभ्यासक्रमातून त्यांना पीएच. डी. नंतर परदेशी जाण्याची आणि सुबत्तेची करिअर करण्याची संधी चालून आली. परंतु, करिअर करायचे ते देशसेवेतील आस्थापनेतच, हाच करकरे यांचा विचार व ध्यास त्यांना मिळालेल्या संस्कारातून ठाम झाला होता. त्यामुळे काही वर्षे इंटरनॅशनल ट्रॅक्टर येथे नोकरी केल्यानंतर ते स्पर्धा-परीक्षांकडे वळले. भारतीय परराष्ट्र सेवेच्या प्रवेश चाचण्यांमध्ये महाराष्ट्रातून ते सुवर्णपदक विजेते ठरले. तो ही मार्ग नाकारून, पुन्हा भारतीय पोलीस सेवेसाठी अभ्यास करून ते 'आय.पी.एस.' ह्या आपल्या आवडीच्या करिअरकडे झेपावले.

१९८२ ची ती आयपीएसची बॅच, आयपीएस होण्याआधी शिक्षणाच्या निमित्ताने, तसेच अन्य ठिकाणी नोकरी करताकरताच त्यांना जंगलविषयक, कोळसा खाणी, पर्यावरण, लोकजीवन ह्यांचे जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाली. ह्या साऱ्या अनुभवांचा उपयोग त्यांना पोलीस सेवेत करता आला. मानसशास्त्र उत्तमप्रकारे जाणणाऱ्या करकरे ह्यांनी अमली पदार्थविरोधी खात्यात, तसेच आर्थिक गुन्हे शाखांमध्ये आपल्या अभ्यासपूर्ण कार्यपद्धतीमुळे गुन्हेगार आणि कार्यालयीन यंत्रणेतही आपला दबदबा निर्माण केला होता. शासनाला अशा गुन्ह्यांसंबंधीचे प्रभावी अहवालही सादर केले होते. हेमंत करकरे यांनी आपल्या सव्वीस वर्षांच्या प्रशासकीय सेवेत अतिशय संवेदनशील खात्यांत आणि तितक्याच धाडसी उपक्रमांत आपले योगदान दिले.

एरवी चंद्रपूरसारख्या नक्षलग्रस्त भागात काम करण्यास कुणीही शासकीय अधिकारी, कर्मचारी नाखूष असतो; परंतु त्यांनी तेही आव्हान आनंदाने स्वीकारले. आपल्या उगवत्या संसाराला सुरक्षित ठिकाणी ठेवले. चंद्रपूरमध्ये पोलीस अधीक्षक ह्या भूमिकेत काम करताना त्यांनी नक्षलवाद्यांशी दोन हात केले. प्रसंगी नक्षलवाद्यांना सळो की पळो करून सोडले. तेथील यशस्वी कालखंडानंतर त्यांना 'रिसर्च अँड ॲनॅलिसिस विंग' म्हणजे 'रॉ'मध्ये आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळाली. तेथे ते पाच वर्षे होते.

'रॉ'मधून त्यांना मुंबई सह पोलीस आयुक्त पदावर पदोन्नती मिळाली. हा मुंबई पोलीस विभागाचा प्रशासन विभाग होता. ह्या विभागात सह पोलीस आयुक्त म्हणून काम करताना त्यांनी अनेक प्रलंबित कामे मार्गावर आणून पूर्ण केली. समाजाभिमुख पोलीस अधिकारी अशी प्रतिमा तयार करून त्यांनी पोलीस यंत्रणेचीच एक वेगळी ओळख समाजमनात रुजवली. अपंग, ज्येष्ठ नागरिक, महिला अशा एरवी वंचित असणाऱ्या वर्गासाठी त्यांनी अनेक सोयी, सुविधा उपलब्ध करून दिल्या. आपल्याच खात्यातील सर्वसामान्य पोलिसांच्या अडचणी, हितांबाबत ते नेहमी विचार करीत आणि त्यांच्या आश्वासक भवितव्यासाठी प्रयत्नशील असत.

करकरे हे एक 'हटके' ह्या प्रकारचे पोलीस अधिकारी होते, असे म्हणायला हरकत नाही. कारण पोलीस वर्दीतील ह्या करड्या शिस्तीच्या अधिकाऱ्याच्या आत एक रसिक आणि व्यासंगी वाचक, भाष्यकार दडला होता. त्यामुळेच घरच्याप्रमाणे आपल्या कार्यालयाच्या कपाटातही कार्यालयीन कामाच्या संदर्भातील पुस्तके, ग्रंथांप्रमाणेच अन्य वाङ्मयीन विषयांवरील पुस्तकांचे वाचनालयही खुले असायचे. इंग्रजी, मराठी, हिंदी ह्या भाषांतील साहित्यकृतींबरोबरच अन्य भारतीय साहित्यांतही त्यांना विशेष रुची होती. टागोर, खलिल जिब्रान, प्रेमचंद, रसेल, शरच्चंद्र, शेक्सपिअर अशा अनेक दिग्गजांच्या साहित्यकृतींवर ते समर्थपणे बोलत असत; सामाजिक विषयांवर व्याख्यानेही ते आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून देत असत.

२००८ मध्ये त्यांनी दहशतवादविरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुखपद स्वीकारले. ह्याच काळात मालेगाव बॉंबस्फोट हे गाजलेले प्रकरण त्यांनी हाताळले. ह्या प्रकरणानंतर ते 'एटीएस प्रमुख' म्हणून

अधिकच प्रकाशमान झाले. त्यानंतर सात-आठ महिन्यांनंतरच पाकिस्तानी अतिरेक्यांच्या दहशतवादी हल्ल्यात अतिरेक्यांशी लढताना त्यांना कामा इस्पितळ, मुंबई येथे हौतात्म्य प्राप्त झाले. कुलाबा, सीएसटी, कामा इस्पितळ परिसरात २६ नोव्हेंबर २००८ च्या सायंकाळी, सीएसटी येथील परिसरात अतिरेकी घुसल्याची बातमी मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने आखणी केली आणि ते अतिरेक्यांच्या मागावर निघाले. परंतु, अतिरेक्यांशी झालेल्या धुमश्चक्रीत ह्या शूर, अभ्यासू आणि सुसंस्कृत पोलीस अधिकाऱ्याला आपल्या प्राणास मुकावे लागले. भारत सरकारने हेमंत करकरे ह्यांना 'अशोकचक्र' हा पुरस्कार दिला. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती कविता करकरे ह्यांनी तो स्वीकारला.

– संदीप राऊत

## कर्णिक, अशोक वसंत

**उपसंचालक केंद्रीय गुप्तचर विभाग**

**१३ डिसेंबर १९३१**



अशोक वसंत कर्णिक यांचा जन्म गिरगावातला. त्यांच्या वडिलांचे नाव वसंत भगवंत कर्णिक, तर आईचे नाव विमलाबाई. कर्णिक यांचे आजोळ (आईचे माहेर) बडोदा येथील सरदार आंबेगावकर यांच्याकडील, तर वडील मात्र मानवेंद्रनाथ रॉय यांचे अत्यंत निकटचे सहकारी. कर्णिकांचे बालपण हे अशा वातावरणात, मुंबईमध्येच घडलेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण आर्यन हायस्कूल या शाळेत, तर गिरगावातील विल्सन महाविद्यालयात कर्णिक यांचे शिक्षण झाले. एकीकडे शालेय शिक्षण सुरू असतानाच, घरामध्ये प्रत्यक्ष एम. एन. रॉय यांच्यासह अनेक कम्युनिस्ट विचारवंतांचे, अभ्यासकांचे, कामगार चळवळीतील नेत्यांचे, महाराष्ट्र टाइम्सचे संस्थापक-संपादक असणाऱ्या डी. व्ही. कर्णिकांसारख्या लेखकांचे सहवास लाभल्याने वैचारिक बैठक घडत होती.

१९५२ मध्ये रसायनशास्त्र हा मुख्य विषय घेऊन, मुंबई विद्यापीठामधून, कर्णिक यांनी बी.एस्सी. ही पदवी संपादन केली. अशोक कर्णिक १९५३ मध्ये भारताच्या केंद्रीय गुप्तचर विभागात निवडले गेले. १९५३ ते १९५६ या तीन वर्षांच्या काळात माऊंट अबू येथील इंडियन पोलीस अकॅडमी येथे कर्णिक यांचे प्रशिक्षण झाले. या दरम्यानच कायदे, वैद्यकीय न्यायशास्त्र (फॉरेन्सिक सायन्स) अशा विविध विषयांचा त्यांनी अभ्यास केला. १९५६ ते १९६२ या काळात त्यांनी दिल्ली येथे गुप्तचर खात्याशी संलग्न अशी अनेक महत्त्वाची कामे केली. भारताच्या अंतर्गत, तसेच बाह्य सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या शक्तींना 'निष्क्रिय' करणे, त्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती गोळा करणे, तिचे पृथःक्करण करणे असे या कालावधीमधील कामाचे मुख्य स्वरूप होते.

१९६२ मध्ये तत्कालीन गुप्तचर खात्याचे प्रमुख श्री. मलिक यांनी भारताचा ईशान्येकडील राज्यांमध्ये प्रशासकीय दाव्यांबरोबरच भारताच्या कायदेशीर हक्कही अबाधित राहावा म्हणून गुप्तचर खात्यातील नव्याने भरती झालेल्या युवकांना सीमावर्ती भागात पाठविण्याचे आदेश जारी केले. त्यामुळे अशोक कर्णिक यांची 'फर्नो' भागात बदली झाली. तावांग येथून काही अंतरावर गुप्तचर खात्याचे 'कँप' उभारण्याची अवघड जबाबदारी, सर्व नैसर्गिक आपत्तींना तोंड देत, आणि इंडो-तिबेटन बॉर्डर पोलिसांच्या सहकार्याने कर्णिक यांनी पार पाडली.

दरम्यान अरुणाचल प्रदेश आणि अन्य ईशान्य राज्यांमध्ये विकास काम करण्याचे आणि तेथील जनतेमध्ये विश्वासार्हता निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. स्थानिक लोकांना जागृत करणे, प्रशिक्षण देणे, त्यांना सुशिक्षित करणे असे या कामाचे अनेक पैलू होते. १९७२ ते १९७७ या काळात कर्णिक यांची




गुप्तचर खाते

नागपुरात बदली झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोणत्याही प्रकाशझोतापासून अलिप्त याहून कार्य करत होता. याच दरम्यान बाळासाहेब देवरस आणि कर्णिक यांची भेट झाली. केंद्रीय पातळीला गुप्तचर खात्याकडून, कर्णिक यांची नागपुरात नियुक्ती होण्यापूर्वी, संघाबद्दल पारदर्शी आणि सत्यान्वेषी अहवाल पाठवले जात नव्हते. मात्र देवरसांचा स्पष्टवक्तेपणा आणि पारदर्शकता यांमुळे कर्णिकांनी संघाबद्दल-संघकार्याबद्दल प्रांजळ आणि पारदर्शी अहवाल पाठवले आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सलोखा राखण्यास मदत केली. विशेष म्हणजे नवनिर्माण आंदोलन, जयप्रकाशजींची संपूर्ण क्रांती, देशातील आणीबाणी या तुलनेने आव्हानात्मक कालखंडात कर्णिक यांनी आपली निष्कलंक प्रतिमा अबाधित राखली.

१९७७ ते १९८७ या दहा वर्षांच्या कालखंडामध्ये कर्णिक यांनी पुन्हा एकदा दिल्ली येथे विविध 'डेस्क' वर साहाय्यक संचालक या पदावर काम केले. या कालखंडात त्यांनी गुप्त तपास, माहिती संकलन-पृथक्करण, महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींची सुरक्षा, औद्योगिक सुरक्षा, मनुष्यबळ प्रशिक्षण, विविध मोहिमांची आखणी आणि अंमलबजावणी असे विविध स्वरूपाचे कार्य केले.

१९९० मध्ये अशोक कर्णिक महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांचे उपसंचालक या पदावरून निवृत्त झाले. सेवाकाळात असतानाही आपली टेनिसची आवड त्यांनी मनस्वीपणे जोपासली. प्रशासकीय सेवकांच्या कामगिरीनुसार 'गतिशील बढती' 'ॲक्सलरेटेड प्रमोशन' राबविण्याची संकल्पना कर्णिक यांनी मांडली. त्यांच्या या अत्युत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना १९७८ मध्ये भारतीय पोलीस पदक आणि १९८७ मध्ये सन्मानाचे राष्ट्रपती पोलीस पदक हे प्रशासकीय सेवांमधील सर्वोच्च पुरस्कारही मिळाले.

निवृत्तीनंतरही आज ते संरक्षण क्षेत्राबाबत सक्रिय आहेत. दहशतवाद हा त्यांचा अभ्यासाचा विषय असून, विविध शाळा-विद्यालये- फोरम यांमध्ये ते या संदर्भात व्याख्याने देतात. 'फ्रिडम फर्स्ट' या मासिकामध्ये ते नियंत्रित संरक्षणविषयक लेख प्रसिद्ध करतात. २००६ ते २०१० या कालावधीत 'फोरम फॉर इंटिग्रेटेड नॅशनल सिक्युरिटी' या संस्थेच्या महाराष्ट्र विभागाचे ते प्रमुख होते. तसेच निवृत्तीनंतर गोदरेज आणि फिलिप्स यांसारख्या कंपन्यांमध्ये त्यांनी संरक्षणविषयक सल्लागार म्हणून काम केले.

– स्वरूप पंडित

## कात्रे, मोहन गणेश

**महासंचालक, केंद्रीय अन्वेषण विभाग**

**११ ऑक्टोबर १९२९ – १९ मार्च २००३**



मोहन गणेश कात्रे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे या गावी झाला. त्यांचे वडील हे स्वातंत्र्यपूर्व काळात न्यायव्यवस्थेमध्ये कार्यरत होते. न्यायव्यवस्थेतील विविध पदांवर काम केल्यावर ते १९५३ मध्ये जिल्हा न्यायाधीश या पदावरून बेळगाव येथून निवृत्त झाले.

नोकरीनिमित्ताने वडिलांच्या सतत होणाऱ्या बदल्यांमुळे मोहन कात्रे यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण महाराष्ट्रात विविध ठिकाणी झाले. मुंबई येथील एलफिन्स्टन महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्र आणि

इंग्रजी वाङ्मय या विषयात पदवी संपादन केली. तसेच मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयामधून एलएल.बी.चे शिक्षण पूर्ण केले.

भारतीय स्वातंत्र्यलढा जवळून पाहिल्यामुळे तसेच वडिलांच्या न्यायव्यवस्थेतील कार्यामुळे त्यांच्या मनात नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाची सेवा करण्याची इच्छा जागृत झाली आणि इच्छेला त्यांनी मूर्त स्वरूप दिले. (भारतीय प्रशासकीय सेवेच्या रूपाने त्यांना तशी संधी प्राप्त झाली.)

१९५२ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते आय.पी.एस. झाले. भारतीय पोलीस सेवा ही अखिल भारतीय सेवा असली तरी प्रत्येक उमेदवाराला एक राज्य (होम स्टेट) नेमून दिले जाते. त्याप्रमाणे मोहन कात्रे यांची नेमणूक मुंबई राज्यात करण्यात आली. पुढे १९६० मध्ये कात्रे यांची नियुक्ती महाराष्ट्रात झाली.

१९५२ ते १९८९ या एकूण सत्तावीस वर्षांच्या कार्यकालात मोहन कात्रे यांनी पोलीस प्रशासनातील विविध महत्त्वाची पदे भूषविली आहेत. तसेच संपूर्ण कार्यकालात अनेकदा त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात निर्माण झालेले प्रश्न कौशल्याने हाताळले होते. त्यामुळेच देशाच्या सुरक्षेसंदर्भात निर्माण झालेले प्रश्न सोडवण्याची जबाबदारी मोहन कात्रे यांच्यावर अनेकदा सोपवली जात असे.

१९५२ मध्ये त्यांची नियुक्ती गोध्रा या धार्मिकदृष्ट्या नेहमीच संवेदनशील असलेल्या ठिकाणच्या पोलीस अधीक्षकपदी करण्यात आली. १९६२ च्या चीन आक्रमणाच्या वेळी त्यांनी स्वेच्छेने युद्धात भाग घेण्याची तयारी दर्शवली आणि विशेष राखीव पोलीस दलाचे नेतृत्व केले. या वेळी त्यांची नियुक्ती बिहारमधील रांची येथे आणि आसाममधील तेजपूर येथे करण्यात आली.

१९६० च्या दशकात मुंबईमध्ये अनेकदा शिवसेनेच्या माध्यमातून आंदोलने करण्यात आली. त्यामुळे अनेकदा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असे. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९६९ मध्ये त्यांची नियुक्ती मुंबई पोलीस मुख्यालयामध्ये उपायुक्त या पदावर करण्यात आली.

त्यानंतर १९७३ मध्ये कात्रे यांची नियुक्ती केंद्रीय अन्वेषण खात्यात महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा हा तीन विभागांचे उप महानिरीक्षक या पदावर करण्यात आली. १९७९ मध्ये याच विभागातून पदोन्नती मिळून त्यांची नियुक्ती सहसंचालक या पदावर करण्यात आली. १९७९ ते १९८१ या कालावधीत कात्रे या पदावर कार्यरत होते. १९७५ मध्ये देशात आणीबाणी जाहीर झाली. या कालावधीत अनेक संवेदनशील घटना त्यांनी अत्यंत कौशल्यपूर्वक आणि जबाबदारीने हाताळल्या.

१९८१ मध्ये महाराष्ट्रात पोलीस महानिरीक्षक कायदा आणि सुव्यवस्था हे पद नव्याने निर्माण करण्यात आले. यावेळी मोहन कात्रे केंद्रीय अन्वेषण खात्यामध्ये कार्यरत होते. महाराष्ट्र शासनाच्या विनंतीवरून त्यांनी या नव्याने निर्माण झालेल्या प्रमुख पदाची सूत्रे हातात घेतली. या पदावर ते १९८५ पर्यंत कार्यरत होते.

फेब्रुवारी १९८५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी कात्रे यांची निवड केंद्रीय अन्वेषण विभागाचे महासंचालक या पदावर केली. या पदावर ते ऑक्टोबर १९८९ पर्यंत कार्यरत होते.

१९८६ पासून इंटरपोलमध्ये त्यांनी आशिया विभाग कार्यकारी संचालक पदाची जबाबदारी पार पाडली. या पदावर निवड झालेले ते दुसरे भारतीय पोलीस अधिकारी होते. १९८५ ते १९८९ या त्यांच्या केंद्रीय अन्वेषण खात्यात संचालक असतानाच्या कार्यकालात पंजाब दहशतवाद, जनरल अरुणकुमार वैद्य हत्या, बोफोर्स खरेदी प्रकरणाचा शोध यासारख्या देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटना घडल्या. या काळात त्यांनी केंद्रीय अन्वेषण खात्याचे नेतृत्व केले. केंद्रीय अन्वेषण खात्याची पुनर्रचना आणि विस्तार करण्याबाबतचा रचनात्मक आराखडा तयार करण्यामध्ये त्यांनी

महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

१९७० मध्ये त्यांना पोलीस पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच १९७९ मध्ये त्यांना पोलीस सेवेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केल्यामुळे राष्ट्रपती पोलीस पदक देण्यात आले. १९६२ च्या चीन युद्धात विशेष राखीव पोलीस दलाचे नेतृत्त्व केल्याबद्दल पश्चिम स्टार, संग्राम पदक आणि स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त पदक देऊन त्यांना गौरवण्यात आले.

पोलीस सेवेतील मोहन कात्रे यांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे १९८२ साली त्यांनी विशेष राखीव पोलीस दलाने केलेल्या संपाच्या काळातील परिस्थिती कौशल्याने हाताळली.

१९८९ मध्ये केंद्रीय अन्वेषण विभागाचे महासंचालक (डायरेक्टर जनरल) या पदावरून मोहन कात्रे निवृत्त झाले. १९८९ मध्ये निवृत्त झाल्यानंतर कात्रे पुणे येथे स्थायिक झाले. त्यांनी विविध सामाजिक आणि न्यायविषक (सामान्य माणसाला जलद न्याय मिळवून देण्याच्या) उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

मोहन कात्रे यांनी गुन्हे विषयक तपासामध्ये न्यायदानामध्ये होणारा विलंब टाळता यावा, यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या विचार गटाची स्थापना केली. यामध्ये त्यांच्यासोबत महाराष्ट्राचे पहिले आय.जी.पी. व्ही. जी. कानेटकर, 'रॉ'चे निवृत्त संचालक कर्णिक, गुप्तवार्ता विभागाचे (आय.बी.) निवृत्त संचालक व्ही. जी. वैद्य यांनी सहभाग घेतला. गुन्हे विषयक तपास आणि न्यायदान प्रक्रियेच्या सुधारणेसाठी मार्गदर्शक अशा पुस्तिकेचे प्रकाशन त्यांनी केले.

नागरिक चेतना मंच या पुणे येथील विविध सामाजिक, आणि कायदा सुव्यवस्थेविषयक जागृती निर्माण करणाऱ्या संस्थेमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. १९९० च्या प्रारंभी 'सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड'च्या प्रारंभीच्या प्रयत्नामध्ये आणि या संस्थेचा स्थापनेमध्ये डॉ. शां. ब. मुझुमदारांसोबत कात्रे यांचादेखील सहभाग होता.

पुणे येथील इंडियन लॉ सोसायटीशी ते सलग्न होते. १९९९ साली कात्रे यांचे वडील गणेश कात्रे यांच्या १०० व्या जयंती निमित्त कात्रे परिवाराने या संस्थेला सहा लाख रुपयांची देणगी दिली. या देणगीमधून दर वर्षी गुन्हे न्यायदान व संबंधित घटकांबाबत अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. मोहन कात्रे यांचे १९ मार्च २००३ या दिवशी निधन झाले.

– संध्या लिमये

## कानेटकर, विष्णू गोपाळ

**महासंचालक, केंद्रीय राखीव पोलीस दल**

**१५ सप्टेंबर १९११ – १२ एप्रिल २००८**



विष्णू गोपाळ कानेटकरांचा जन्म सोलापूर येथे झाला. हरिभाई आणि देवकरण शाळेत शालेय शिक्षण संपवून फर्गसन महाविद्यालयमधून त्यांनी बी.एस्सी. पदवी घेतली. १९३४ मध्ये आय. पी. म्हणजे त्या वेळची इम्पिरियल पोलीस ह्या परीक्षेत गणित विषयात सर्वोच्च गुण मिळवून ते पहिले आले व पोलीस खात्यात रुजू झाले. सौराष्ट्र व राजस्थानातील गुंड व दरोडेखोरांच्या टोळ्यांचा नि:पात करून तेथे त्यांनी सुव्यवस्था निर्माण केली, हा त्यांच्या कारकिर्दीचा मानबिंदू ठरावा.

१९४९ मध्ये पुण्याचे डी.एस.पी. म्हणून काम करत असताना सौराष्ट्रात भूपत नामक दरोडेखोराने धुमाकूळ घातला होता. भूपतने जवळपास ऐंशी लोकांचा बळी

घेतला होता. श्रीमंत जमीनदार व राजकारण्यांना मारून त्यांची संपत्ती तो लुटायचा व त्यांतील काही हिस्सा गरिबांमध्ये वाटायचा. हा भूपत शंकराचा भक्त होता. त्यामुळे गरीब लोक त्याला शंकराचा अवतार मानत. छोट्या संस्थानांचे राजे घाबरून त्याला आश्रय देत. पोलीस अधिकारी व पोलीस दलाचे संपूर्ण खच्चीकरण झाले होते. सूचना देऊन दरोडा घालण्याइतका तो धीट झाला होता. घाबरून तेथील पोलीस चक्क पलायन करीत व भूपतला मोकळे मैदान मिळे. अशा परिस्थितीत उच्च अधिकारी सौराष्ट्रात जाण्यास तयार नसत. १९५१ मध्ये परिस्थिती फारच बिकट झाल्यामुळे त्या वेळचे देशाचे गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी कानेटकरांना सौराष्ट्रात जाण्याबद्दल विचारणा केली. कानेटकरांनी हे आव्हान लगेच स्वीकारले. दोन बढत्या मिळून ते आय. जी. म्हणून राजकोट येथे (सौराष्ट्राची राजधानी) रवाना झाले.

'कानेटकरचा बच्चा आला आहेस खरा; पण इतर अधिकाऱ्यांप्रमाणे दोन दिवसांत लंगोटी धरून पळून जाशील', अशी धमकीवजा चिठ्ठी पाठवून भूपतने कानेटकरांचे स्वागत केले.

कानेटकर दुसऱ्या दिवसापासूनच कार्यरत झाले. स्वत: जातीने मोहिमा आखून, पोलिसांबरोबर गावोगावी दरोडेखोरांचा मागोवा घेत फिरू लागले. आपले प्रमुख जातीने रात्रंदिवस कशाचीही पर्वा न करता आपल्याबरोबर वणवण करीत आहेत हे अनुभवल्यावर पोलिसांचे मनोधैर्य वाढू लागले. सुरुवातीस त्यांनी थोडे अपयश अनुभवले; पण खचून न जाता त्यांनी लढा चालू ठेवला व शेवटी भूपतचा उजवा हात मानला जाणारा 'देवायत' मारला गेला. भूपतला हा मोठा धक्का होता. त्या पाठोपाठ त्याचा 'बच्चू' नामक साथीदार जिवंत पकडला गेला. कानेटकर यांनी पोलिस खात्याचा चेहरामोहराच बदलून टाकला होता. हे बघून, 'तू लंगोटी धरून पळ काढशील', असे लिहिणारा भूपत घाबरून, स्वत:चे कुटुंब सोडून पाकिस्तानात पळून गेला. सौराष्ट्रातल्या




जनतेने सुटकेचा नि:श्वास सोडला. ह्या कार्याबद्दल कानेटकर यांना १९५४ चे पोलीस शौर्यपदक त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांच्या हस्ते देण्यात आले. यानंतर राजस्थानात सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांची जयपूरला बदली झाली. तेंव्हा राजकोटचा रेल्वे फलाट पोलिसांनी भरला होता. साश्रू नयनांनी अधिकाऱ्याला निरोप देणारे पोलीस जनतेने प्रथमच पाहिले.

१९६० मध्ये मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणून त्यांची नियुक्ती झाली. कठोर पण नि:स्पृह, धुतल्या तांदळासारखे स्वच्छ व कोणाच्याही दबावाला बळी न पडणारे अशी त्यांची प्रतिमा होती.

आयुक्त असताना एका वाढदिवशी इन्स्पेक्टर फ्रॅमरोज पुष्पगुच्छ घेऊन आले. त्यांनी खूप विनवण्या केल्यावर कानेटकरांनी त्यातील एक गुलाब घेतला व सदिच्छेशिवाय दुसरे काही न आणण्याची विनंती केली. त्याच काळात इजिप्तच्या एका उच्चाधिकाऱ्याची चोख सुरक्षा व्यवस्था ठेवल्यामुळे खूश होऊन त्याने उंटाच्या कातड्याचे दोन मौल्यवान स्टूल्स पाठवले. दुसऱ्याच दिवशी कानेटकरांनी ही भेट आयुक्तांच्या कार्यालयात पाठवून दिली. 'मी माझं कर्तव्य बजावले, त्यासाठी मोबदल्याची आवश्यकता नाही,' असे त्यांनी कळवून टाकले.

ह्या काळात कानेटकरांच्या पत्नी कुसुमताई ह्यांनीही त्यांना साथ दिली. अहोरात्र काम करणाऱ्या सामान्य पोलिसांच्या घरांची अवस्था वाईट होती. पावसाळ्यात गळणाऱ्या घरांमुळे मुले व बायका बऱ्याचदा पलंगाखाली आश्रय घेत. एकदा पोलीस लाइन्समध्ये जाऊन त्या त्यांची विचारपूस करत.

गळकी घरे, नहाणी घर व इतर दुरावस्था कानेटकरांमार्फत सरकारच्या (प्रशासनाच्या) नजरेसमोर आणण्याचा त्या प्रयत्न करीत. पोलिसांच्या बायकांना सक्षम करण्यासाठी त्यांना शिवणाचे प्रशिक्षण, शिवणाची यंत्रे देणे असे उपक्रम सुरू करून त्याचा पाठपुरावा त्यांनी केला.

कानेटकरांची शेवटची नियुक्ती दिल्लीला झाली. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे महानिरीक्षक व याच दलाचे ते पहिले महासंचालक झाले. कानेटकरांनी सैन्याप्रमाणेच या दलाच्या बटालिअन्स तयार केल्या. हे दल भारतीय सैन्याच्या तोडीस तोड करण्याचा मान कानेटकरांकडेच जातो.

पोलिसांचे मानसिक स्वास्थ्य त्यांच्या कौटुंबिक स्थैर्यावर अवलंबून असते याची जाणीव कानेटकरांना होती. त्यामुळेच केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या प्रशिक्षण केंद्राजवळ त्यांनी पोलिसांच्या कुटुंबांची निवासव्यवस्था केली. पुणे जिल्ह्यात पवना धरणाजवळ हे केंद्र उभारले आहे. या परिसरात पोलिसांसाठी निवासस्थाने आणि शाळाही उभारल्या आहेत. ‘टेल्स ऑफ क्राइम’ आणि ‘क्राइम इन द फ्यूचर’ या दोन पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले आहे.

कानेटकर सेवानिवृत्त झाल्यावर जवळजवळ वीस वर्षांनी ‘लोकसत्ते’त मुंबईबद्दल अग्रलेख आला होता. त्यात शेवटची ओळ होती, ‘कानेटकर व पिंपुटकरांसारखे अधिकारी लाभल्याशिवाय मुंबई शहराला भवितव्य नाही.’

– अशोक कानेटकर

## कामटे, अशोक मारुतीराव

### अतिरिक्त पोलीस आयुक्त-मुंबई

### २३ फेब्रुवारी १९६५ – २६ नोव्हेंबर २००८

२६ नोव्हेंबर २००८ हा मुंबईच्या इतिहासातील एक काळा दिवस. संपूर्ण देशाला हादरा देणारा असा दहशतवादी हल्ला होता तो. या हल्ल्याचा प्रतिकार करताना देशाने अनेक लढवय्ये योद्धे गमावले.



त्यांतीलच एक अशोक मारुतीराव कामटे होते.

महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातले हे कुटुंब. आजोबा गणपतराव कामटे यांनी मुंबई प्रांताचे पहिले भारतीय इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस म्हणून काम केले. वडील मारुतीराव कामटे भारतीय सैन्यात होते. अशा पिढ्यान्‌पिढ्या देशसेवेसाठी वाहून घेतलेल्या कुटुंबात अशोक कामटे यांचा जन्म झाला.

राजकोट येथील राजकुमार महाविद्यालयातून १९७२-१९७७ या कालावधीत त्यांनी शिक्षण घेतले. १९८२ मध्ये त्यांनी बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली. १९८५ मध्ये सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई येथून त्यांनी पदवी मिळवली, तर दिल्ली येथील सेंट स्टिफन्स महाविद्यालयामधून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. १९८७ मध्ये पेरू येथे झालेल्या कनिष्ठ पॉवर लिफ्टिंगमध्ये मध्ये अशोक कामटे यांनी भारताचे नेतृत्व केले होते.

अशोक कामटे हे १९८९ सालच्या भारतीय पोलीस सेवेच्या महाराष्ट्र तुकडीतील अधिकारी होते. त्यांनी देशात अनेक ठिकाणी काम केले. सन १९९१ मध्ये भंडारा जिल्ह्यात त्यांची साहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. १९९४ ते २००८ या त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातल्या विविध जिल्ह्यांत, पोलीस अधीक्षक, यूएन मिशन ऑफिसर, पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त अशा पदांवर काम केले. जून २००८ मध्ये त्यांची नियुक्ती अतिरिक्त म्हणून मुंबईतील पूर्व महामंडळावर झाली होती.

सांगली जिल्ह्यात नियुक्ती झाल्यानंतर थोड्याच कालावधीत कुख्यात गुंड राजू पुजारी पोलीस चकमकीत मारला गेला. धाडसी, करारी व्यक्तिमत्त्वाचे कामटे शांत स्वभावाचे होते. म्हणूनच अत्यंत बिकट परिस्थितीतसुद्धा ते शांतपणे आपले डावपेच तयार




अशोकचक्र

करत. याचा प्रत्यय २६ नोव्हेंबर २००८ रोजी प्रत्येक भारतीयाला आला. भंडारा जिल्ह्यासारखा नक्षलवादी भाग असो किंवा सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई असो, प्रत्येक ठिकाणी त्यांनी दाखवलेल्या शौर्याची गाथा ही युवकांना प्रेरणादायी आहे.

ते इंडी या मतदारसंघातून तीन वेळा निवडून आलेले आमदार रविकांत पाटील यांना ऑगस्ट २००७ मध्ये अशोक कामटे यांनी अटक केली तेव्हा ते सर्वप्रथम प्रकाशझोतात आले. त्यावेळी ‘टाइम्स ऑफ इंडिया’शी बोलताना ते म्हणाले होते, ‘‘कायदा हा सर्वांना समान असतो. कोणालाही त्याचा भंग करण्याचा अधिकार नाही.’’

२६ नोव्हेंबर २००८ या दिवशी मुंबईतील गेटवे परिसरात काही दहशतवादी शिरले आणि त्यांनी भारताविरुद्ध युद्ध पुकारले. एके-४७ सारखी अद्ययावत शस्त्रे, मुंबईतील विविध ठिकाणांचे इत्थंभूत नकाशे, सॅटेलाइट फोन अशी अद्ययावत सामग्री या दहशतवाद्यांकडे होती. या गंभीर व धीरोदात्त प्रसंगाला शांत डोक्याने, प्रसंगावधान राखून ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी तोंड दिले, त्यांतील अशोक कामटे हे एक होते. मुंबईच्या मेट्रो परिसरात दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत अशोक कामटे हे हुतात्मा झाले.

अशोक कामटे यांनी त्यांच्या पोलीस दलातील कारकिर्दीत आपल्या भरीव कामगिरीने अनेक पुरस्कार मिळवले. १९९५ मध्ये नक्षलवादविरोधी कारवायांसाठी ‘विशेष सेवा पुरस्कार’, १९९९ मध्ये ‘संयुक्त राष्ट्र पुरस्कार’ आणि संयुक्त राष्ट्रासाठी ‘विदेश सेवा पुरस्कार’, २००५ मध्ये नक्षलवादविरोधी कारवायांसाठी ‘आंतरिक सुरक्षा पदक’ तर २००६ मध्ये ‘पोलीस पदक’, तर २००८ मध्ये मरणोत्तर ‘अशोकचक्र’ देऊन त्यांचा सन्मान केला गेला.

– प्रतिभा संकपाळ

## कामटे, नारायण मारुतीराव

**स्वतंत्र भारतातील पहिले पोलीस महानिरीक्षक**
**११ सप्टेंबर १९०० – १३ ऑक्टोबर १९८२**



स्वतंत्र भारतातील पहिले पोलीस महासंचालक (इन्स्पेक्टर जनरल) म्हणून तत्कालीन मुंबई प्रांत (आता महाराष्ट्र)ची जबाबदारी नारायण मारुती कामटे यांच्यावर सोपवण्यात आली होती. त्यापूर्वी विविध पदांवर काम करून आपल्या सेवेचा ठसा उमटविणाऱ्या या वरिष्ठ अधिकाऱ्याने ब्रिटिशांच्या अमलाखाली असलेल्या पोलीस दलाला स्वतंत्र भारताच्या अखत्यारीत आणण्यासाठी मोठ्या जोखमीने कर्तव्य पार पाडले होते.

नारायण कामटे यांचा जन्म पुण्यात झाला. कसबा पेठेतील शिंपी आळीत बालपण गेलेल्या नारायणरावांचे वडीलही तत्कालीन इंग्रज राजवटीतील नावाजलेले पोलीस अधिकारी होते.

नारायणरावांचे वडील मारुतीराव हे १८८५ मध्ये जमादार म्हणून पोलीस सेवेत रुजू झाले. पुणे जिल्ह्याचे अधीक्षक एम. के. केंडी यांनी नंतर मुख्य कॉन्स्टेबल म्हणून मारुतीराव कामटे यांची नियुक्ती केली.

आताच्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या तोडीची ही जबाबदारी होती. तडफदार कामाने त्यांनी वरिष्ठांची मर्जी संपादन केली. राजकीय वादातून झालेल्या खुनाच्या एका प्रकरणात त्यांनी दाखवलेल्या कौशल्यामुळे त्यांना चांदीचे घड्याळ बहाल करण्यात आले होते. 'ते' घड्याळ आपल्यालाही पोलीस सेवेत प्रदीर्घ काळ प्रेरणा देत होते, असा उल्लेख नारायणराव कामटे आवर्जून करत असत.

मारुतीरावांना पुढे निरीक्षक म्हणून पदोन्नती मिळाली. गुन्हे अन्वेषण विभागामध्ये त्यांनी दीर्घकाळ सेवा केली. उल्लेखनीय सेवेची दखल घेऊन त्यांना दिल्ली दरबारी सुरक्षा सेवेसाठी प्रतिनिधी म्हणूनही पाठवण्यात आले होते. पुढे त्यांना रावसाहेब, तसेच रावबहादूर असे किताब देण्यात आले. इंडियन पोलीस पदक, किंग्ज पोलीस पदक देऊन त्यांचा सन्मान झाला. मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड विलिंगहन यांच्या हस्ते त्यांना मानाची तलवारही प्रदान करण्यात आली, अशा वारशाचे पाठबळ नारायणरावांच्या पाठीशी होते.

नारायणराव यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथील भावे शाळेत सुरू झाले. इंग्रजीतून त्यांनी पहिली, दुसरीचा अभ्यास केला. त्यानंतर वडिलांची नाशिक येथे बदली झाल्यामुळे तेथील शाळेतून त्यांनी चौथी इयत्ता पूर्ण केली. ठाणे येथे वडिलांची बदली होताच त्यांना तेथील शाळेत प्रवेश घ्यावा लागला.

वडिलांची पुढे कैरा येथे बदली झाली. तेथे गुजराती भाषा वापरली जात असल्याने नारायणरावांचा पुढील शैक्षणिक प्रवास पुण्यातून झाला. मॅट्रिक झाल्यानंतर १९१८ मध्ये त्यांनी डेक्कन महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. त्यांनी एम.बी.ई.,बी.ए. (ऑनर्स) असे उच्च शिक्षण घेतले.

नाशिक येथील (पीटीएस) पोलीस ट्रेनिंग स्कूलसाठी नारायणरावांची १८ ऑगस्ट १९२३ रोजी निवड झाली. या सुखद घटनेची नोंद घेण्यासाठी वडील हयात नसल्याची खंत त्यांना होती. दोन आठवड्यांपूर्वीच ते अचानक हे जग सोडून गेले होते.

चार भारतीय आणि चार इंग्रज यांची १९२३ च्या 'पीटीएस बॅच'साठी निवड झाली होती. त्या वेळी पोलीस दलात भारतीयांची संख्या तशी नगण्यच होती. प्रशिक्षणाच्या काळात भेटीसाठी आलेल्या पोलीस संचालकांनी प्रशिक्षणार्थींना ''तुम्हांला कुठल्या ठिकाणी काम करायला आवडेल?'', असे विचारले. या प्रश्नाला उत्तर देताना नारायणराव यांनी असे सांगितले की, ''अधिक गुन्हेगारी असलेल्या जिल्ह्यात काम करायला मला आवडेल.'' त्यांच्या इच्छेने भारावलेल्या वरिष्ठांनी सांगितले, ''फार छान, तुझ्यासाठी 'कैरा' योग्य आहे.''

नारायणरावांच्या मनासारखेच घडले. कैरा येथे त्यांची नियुक्ती करण्यात आली. प्रारंभी पाच महिने त्यांनी अहमदाबाद येथेच घालविले. कामाच्या अनुषंगाने त्यांनी तेथील मातृभाषा गुजरातीचाही अभ्यास केला. 'खून की आत्महत्या?' असा संभ्रम असलेल्या गुन्ह्याचे प्रकरण त्यांना हाताळावे लागले. ढोलका तालुक्यापासून सुमारे १८ मैलांवर असलेल्या खेडेगावात त्यांना पायपीट करावी लागली. मृत व्यक्तीला त्याच्या पत्नीने खिचडीतून अफूसारखा अमली पदार्थ दिला असावा, असा संशय होता. तथापि हा पदार्थ माहितगारच मिळवू शकत होता. त्यामुळे सदर महिला हे कृत्य करू शकणार नाही, असा निष्कर्ष होता. शवविच्छेदन अहवालात मृताने अफूचे सेवन केल्याचे उघड झाले. त्यामुळे त्या व्यक्तीने आत्महत्या केल्याचेच स्पष्ट झाले.

गुन्हेगारी कारवायांनी प्रभावित असलेल्या जिल्ह्यात काम करायला आवडेल असे नारायणरावांनी प्रशिक्षण काळात सांगितले होते. त्यानुसार त्यांना कैरा येथे नोव्हेंबर १९२४ मध्ये जावे लागले. जानेवारी १९२७ पर्यंत त्यांना तेथील गुन्हेगारी साम्राज्याशी सामना करावा लागला. खतरनाक दरोडेखोर, खुनी, गुन्हेगारी जमाती यांच्याविरुद्ध लढताना आलेला अनुभव त्यांना पुढील सेवाकाळात उपयुक्त ठरला.




गुप्तचर विभाग

पोलीस खात्याची जबाबदारी सांभाळत असतानाच उच्च शिक्षण घेणे, सेवेत बढतीसाठी परीक्षा देणे यांकडेही नारायणरावांना लक्ष द्यावे लागत होते. तल्लख बुद्धीमुळे ते झटपट प्रगतिपथावर पोहोचत होते. पोलीस प्रशिक्षणही इतरांच्या तुलनेने कमी मुदतीत पूर्ण करून त्यांनी आपल्या उज्ज्वल भवितव्याची दिशा दाखवून दिली होती.

कैरा येथून त्यांची १९२७ मध्ये सोलापूर जिल्ह्यात साहाय्यक पोलीस अधीक्षक या पदावर नियुक्ती झाली. पंढरपूर उपविभागाची सूत्रे त्यांच्या हाती आली. येथे विठ्ठलाचे दर्शन घेत असता त्यांना जबरदस्तीने पैसे उकळणाऱ्या बडव्यांचा कटू अनुभव आला. जबरदस्ती करणाऱ्या एका बडव्याच्या त्यांनी श्रीमुखात लगावताच वातावरण चिघळले. बडव्यांनी नारायणरावांविरुद्ध गणवेषधारी पोलिसांकडे तक्रार केली. सर्वसामान्य भक्ताप्रमाणे गेलेल्या नारायणरावांनाच पोलिसांनी ठाण्यावर आणले. आपण कुणाला पकडले आहे हे कळताच साऱ्यांचे धाबे दणाणले. बडवे आणि पोलिसांच्या संगनमतानेच भक्तांकडून खंडणीप्रमाणे पैसे उकळले जात असल्याचे नारायणरावांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांच्या मनधरणीला न जुमानता नारायणरावांनी बडव्यांविरुद्ध गुन्हा नोंदविला. त्यांना तुरुंगात जाण्यास भाग पाडले. सोलापुरात सेवेत असताना त्यांनी दरोडेखोरांच्या टोळ्यांविरुद्धही यशस्वी कारवाई केली.

सातारा, महाबळेश्वर, बेळगाव, पुन्हा सोलापूर, पंचमहाल असा १९३४ पर्यंत सेवाकाळ बजावून १९३४ च्या नोव्हेंबर महिन्यात त्यांनी मुंबई परिसरातील सूत्रे हाती घेतली. येथून त्यांना अधिकाधिक आव्हानांना सामोरे जावे लागले. हिंदू-मुस्लीम जातीय दंगलीसारख्या कटू प्रसंगांना नियंत्रणाखाली आणण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागली. पोलीस उपायुक्त पदाचा दर्जा त्यांना मिळाला होता.

भेंडी बाजार भागात जातीय दंगलींना सुरुवात झाली असे लक्षात येताच ते तेथे थडकले. दंगलखोर एकमेकांना जिवे मारत आहेत, असे लक्षात येताच, त्यांनी ताबडतोब नायगाव मुख्यालयातून पोलिसांची जादा कुमक मागविली, आणि संचारबंदी पुकारून काही तासांतच दंगल काबूत आणली. त्यामुळे पोलीस आयुक्त स्मिथ यांनी त्यांना शाबासकी दिली. तथापि ताबडतोब संचारबंदी (कर्फ्यू) जारी केल्याने हे घडल्याचे नारायणरावांनी सांगताच ते संतप्त झाले.

संचारबंदी जारी करण्याचा अधिकार मुंबई पोलिसांना नव्हता. तो चीफ प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेटनाच असतो. यामुळे पोलीस खाते अडचणीत असतानाही चीफ प्रेसिडेंसी दस्तूर यांनी आपणच तसा आदेश दिला असल्याचे सांगून पोलिसांसमोरील संकट दूर केले. निरपराध लोकांचे प्राण वाचावे यासाठी नारायणरावांनी हा खटाटोप केला होता.

मुंबई प्रदेश काँग्रेस समितीचे तत्कालीन अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांच्यासमोर एक मोठा पेचप्रसंग निर्माण केला होता. प्रेमप्रकरणात फसगत झालेल्या सरलाबेन नावाच्या एका युवतीच्या विवाहात अडथळा निर्माण झाला होता. लफंगा निघालेला प्रियकर छायाचित्रे, तसेच प्रेमपत्रे दाखवून तिला वेठीला धरत होता. तिने याबाबत महात्मा गांधींना पत्र

लिहिले आणि संकटातून मुक्त करण्याची विनंती केली. महात्माजींनी ते काम सरदार पटेल यांच्यावर सोपविले. त्यांनी ही जबाबदारी नारायणरावांवर सोपविली. 'त्या' माणसाकडील पुरावा काढून आणण्यास सांगितले.

कायद्याच्या कक्षेत न बसणारे असे हे काम होते. कारण त्या मुलीचे लग्न मोडू नये म्हणून गुन्हा नोंदवायचा नव्हता. मग पुरावा कसा मिळवायचा? अखेर पोलिसांनी जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार 'त्या' व्यक्तीच्या घराची झडती घेतली. तिची छायाचित्रे, प्रेमपत्र अलगद हस्तगत केले. अर्थातच त्या व्यक्तीकडे काही आक्षेपार्ह सापडले नाही असे न्यायालयात सांगून त्याच्या सुटकेचा मार्गही मोकळा केला. अशा प्रसंगांनाही नारायणराव चातुर्याने सामोरे गेले.

नारायणराव १९३९ मध्ये इंग्लंडमध्ये गेले. त्यांनी स्कॉटलंड यार्डचा अभ्यास केला. नंतर ते मुंबईत वाहतूक विभागाचे उपायुक्त झाले. या काळात मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी त्यांनी कठोरपणे उपाययोजना केली. १९४२ मध्ये ते धारवाडचे 'डीएसपी' म्हणून नियुक्त झाले. 'भारत छोडो' आंदोलनकर्त्यांविरुद्धच्या कारवाईला त्यांना सामोरे जावे लागले.

डेप्युटी कंट्रोलर - जनरल ऑफ सिव्हिल सप्लाय, डी.सी.पी. अँटी करप्शन, डी.आय.जी. अहमदाबाद, डी.आय.जी., सी.आय.डी., पुणे अशी जबाबदारी सांभाळणाऱ्या नारायणरावांची स्वातंत्र्याची पहाट उजाडत असताना म्हणजे १४-१५ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबईचे पहिले भारतीय पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती झाली.

स्वतंत्र भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी पुढे दिल्ली येथे डायरेक्टर ऑफ इन्टेलिजन्स ब्यूरोपदी त्यांना बोलावून घेतले. पोलीस अधिकाऱ्याच्या सर्वोच्च पदाचीच ही निवड होती. त्यांनी युरोपचेही दौरे केले. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांशीही त्यांचा वारंवार संपर्क आला.

स्वतंत्र भारताच्या पोलीस यंत्रणेत, सेवेत आवश्यक ते बदल आणण्यासाठीही नारायणराव यांचे उपयुक्त योगदान आहे. बापूसाहेब कामटे या नावाने त्यांच्याबद्दल आजही पोलीस दलात आदराने बोलले जाते. वयाची ५५ वर्षे पूर्ण झाल्यावर ११ सप्टेंबर १९५५ रोजी त्यांनी प्रदीर्घ पोलीस सेवेचा निरोप घेतला. सरकार सेवेसाठी देत असलेली मुदतवाढ त्यांनी विनम्रपणे नाकारली. तथापि लवकरच त्यांची युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन (यु.पी.एस.सी.) च्या निवड मंडळावर नियुक्ती झाली. त्यासाठी ते दिल्लीत गेले. १९६१ पर्यंत ते या पदावर होते. 'फ्रॉम देम टू अस' आणि 'दि पोलीस इन इंडिया अँड अॅब्रॉड' या पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले.

– विजयकुमार बांदल

## काळे, शरद गंगाधर

**आयुक्त - मुंबई महानगर पालिका, लोकायुक्त, योजना सचिव, सहकार आयुक्त**

**१७ ऑक्टोबर १९३९**



शरद गंगाधर काळे यांचा जन्म पुण्यात झाला. नूतन मराठी विद्यालयात शालेय शिक्षण, तर सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून त्यांनी गणित विषयात पदवी घेतली. जागोजागी असणाऱ्या इतिहास व स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणा, अत्यंत सुरक्षित कौटुंबिक वातावरण, समाजाभिमुख संस्कार आणि त्या काळात असलेल्या शिकवणी वर्गातील शिक्षकांकडून मिळणारे जीवनाचे धडे यांतून काळे यांचे बालपण आकार घेत गेले. घरातील आर्थिक परिस्थिती बेताची होती, अन् त्यामुळेच त्यांनी कला शाखेत प्रवेश घेतला. त्यांना

अर्थशास्त्राची आणि गणिताची गोडी होती, पण विषयांची ही जोडी तेव्हा नव्हती. त्याच वेळी मनामध्ये ‘फळ्याशिवाय गणिते’ शिकवणाऱ्या पं. गो.म. जोशी यांच्याबद्दल प्रचंड औत्सुक्य निर्माण होत गेल्याने त्यांनी गणित हा विषय निवडला. भविष्यातही शरद काळे यांच्यावर या निर्णयाचा प्रचंड प्रभाव असल्याचे जाणवते.

गो.मं.कडून गणिताबरोबरच जीवनातले प्रश्नही स्वत:चे स्वत: सोडवायचे, चौकटीबाह्य विचार करायचा आणि पाठांतरापेक्षा ज्ञान आत्मसात करण्याचे बाळकडू त्यांना मिळाले. प्रशासकीय सेवेत याच गुणांचा त्यांना सर्वाधिक फायदा झाला. शरदरावांनी यथावकाश पुणे विद्यापीठातून गणितामधून एम.ए. पूर्ण केले, तेसुद्धा कुलगुरूंच्या सुवर्णपदकासह! हे वर्ष होते १९६२.

पुन्हा एकदा गो.म. जोशींचेच मार्गदर्शन आणि आपल्या आईची इच्छा म्हणून त्यांनी भारतीय सनदी सेवेची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. १९६३ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत, महाराष्ट्र केडरमध्ये ते दाखल झाले. आपल्या छत्तीस वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीमध्ये त्यांनी अनेक मानाची पदे भूषविली. या दरम्यानच अमेरिकेच्या ईस्ट-वेस्ट सेंटरकडून मिळालेल्या पाठ्यवृत्तीवर त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ हवाई येथून एम.बी.ए. पूर्ण केले. अर्थशास्त्राची आवड, जगातील अर्थव्यवस्थेची बदलती वाटचाल, प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे भविष्यात येऊ पाहणारी व्यवस्थापकीय गुणवत्तेची आव्हाने यांची दूरदृष्टीने जाणीव ठेवूनच काळे यांनी १९७२ मध्ये एम.बी.ए. पूर्ण केले.

१९६४ - ६५ मध्ये पुण्याचे साहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी काम बघितले. त्यानंतर त्यांनी फलटणचे प्रांताधिकारी, महाराष्ट्र राज्याच्या वित्तविभागाचे उपसचिव, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशा महत्त्वपूर्ण पदांवर काम केले. अवघ्या पाच वर्षांच्या सेवेतील चमक, लोकाभिमुख आणि कार्यक्षम प्रशासन चालविण्याची पद्धती आणि सर्जनशीलता या गुणांमुळे वयाच्या तिसाव्या वर्षी गोव्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. चीनचे युद्ध, १९६५, १९७१ या वर्षांमधील भारत-पाक युद्धे अशा पार्श्वभूमीवर शरद काळे यांनी वित्त विभागामध्ये काम केले.

पंचवार्षिक योजना, ‘प्लॅन्ड हॉलिडे’ या काळात त्यांनी वित्तक्षेत्राशी संबंधित महत्त्वाची पदे भूषविली. १९७२ ते १९७४ या काळात महाराष्ट्र राज्याच्या योजना विभागाचे उपसचिव म्हणून, त्यानंतर तत्कालीन केंद्रीय अर्थ आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह प्रतिनियुक्तीवर दिल्लीत वित्तयोजना विभागाचे संचालक म्हणून शरद काळे कार्यरत होते. हा आणीबाणीनंतरचा काळ होता.

उत्तर भारतातील अनेक राज्ये भारतीय रिझर्व्ह बँकेकडून ‘ओव्हरड्राफ्ट’ घेत होती, त्याच वेळी दुसरीकडे समाजवादी प्रभावातून करपद्धती रद्द करण्याची मागणी जोर धरत होती. त्यामुळे वित्तीय मागण्यांवरून केंद्र-राज्य संबंध ‘नाजूक’ झाले होते. योजनांवर काम करण्याऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना या काळात प्रचंड तणावाखाली काम करावे लागत होते.

राज्यसरकारकडून आलेल्या मागण्या, त्यांची व्यवहार्यता तपासणे, आर्थिक आणीबाणीची वारंवार होणारी मागणी, मध्यप्रदेश सरकारने प्रवेश कर आकारण्यासंदर्भात विधिमंडळामध्ये मंजूर केलेले विधेयक, ओव्हरड्राफ्टवर उपाय अशा अनेक प्रश्नांवर काळे एकाच वेळी लक्ष देत होते. त्यांचे वरिष्ठ आय.एच. कौल यांच्या मदतीने काळे यांनी ‘रेग्युलेशन ऑफ ओव्हरड्राफ्ट’ हा कायदा तयार केला आणि त्यामुळेच भारतीचे उपपंतप्रधान व गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे विशेष सहकारी म्हणून काळे यांना बढती मिळाली. या सर्व काळात भारतीय घटनेच्या ‘आशया’चा अनेकदा प्रश्न उपस्थित झाला

आणि शरद काळे यांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'भारतीय संविधान सभे'च्या पार्लमेंटरी डिबेटचा अक्षरश: मुळातून अभ्यास करावा लागला, पण त्यामुळे निर्णय घेताना परिपक्वता येत गेली.''

सुमारे सात वर्षे केंद्रात काम केल्यानंतर १९८१ ते ८३ या काळात शरद काळे महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालकपदी रुजू झाले. तेथील उत्कृष्ट कामामुळे १९८३ मध्ये त्यांची 'सहकार सचिव' म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि महाराष्ट्राच्या सहकारविषयक प्रश्नांवर उपाययोजना करणारे सुसूत्रीकरण करणारे निर्णय पाहून १९८३ ते १९८६ या काळात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले.

भारतीय प्रशासकीय सेवेतील या योगदानामुळे शरद काळे यांच्या आयुष्यात आणखी एक मोलाची संधी १९८९ मध्ये आली. जगभरातील उत्तमोत्तम प्रशासकीय अधिकाऱ्यांसह एकत्र अभ्यास करण्याची आणि शोधनिबंध सादर करण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठ या अमेरिकेमधील अग्रगण्य विद्यापीठाच्या पाठ्यवृत्तीसाठी काळे यांची निवड झाली.

बर्लिनची भिंत कोसळणे, सोव्हिएत संघराज्याचे विभाजन, चीनच्या तिआनामेन चौकातील हत्याकांड अशा नाट्यमय घटनांनी भरलेल्या जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जगभरातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह झालेला अभ्यास आपल्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट' असल्याचे शरद काळे आजही आवर्जून नमूद करतात.

या वर्षभरामध्ये आग्नेय आशियातील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचा अभ्यास, स्टीफन गोल्ड या अग्रगण्य अभ्यासकाकडून 'पॅलेंटोलॉजी' अभ्यास, कॅनडा, युरोपियन युनियन अशा देशांना भेटीचा योग, भारतातील जेमिनी ऋषींनी लिहिलेल्या 'मीमांसा' या ग्रंथाचे जर्मन शिक्षकांकडून विवेचन असा विविधांगी अभ्यास वयाच्या पन्नासाव्या वर्षी काळे यांनी उत्साहाने आणि परिपूर्णपणे केला. न्यायशास्त्र, लष्करी तज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ अशा अनेक व्यक्तींच्या उपस्थितीत त्यांनी 'भारतातील आजारी उद्योग' अर्थात 'सिक इंडस्ट्रीज'वर आपला शोधनिबंध सादर केला.

ऐन जागतिकीकरणात ते महाराष्ट्राच्या योजना विभागाचे सचिव म्हणून १९९१ मध्ये रुजू झाले. या काळात खासगीकरणाची दिशा आणि धोरण ठरविणारे 'खासगी क्षेत्राचे सहकारी राजपत्र' (जी.आर.) त्यांनी तयार केले. यानंतरही १९९१ ते १९९५ या काळात मुंबई महापालिकेचे आयुक्त, १९९५ ते १९९६ या काळात पुन्हा एकदा ते महाराष्ट्राच्या योजना विभागाचे सचिव झाले. नंतर १९९६ ते १९९७ मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष, १९९९ ते २००१ या कालावधीत रिझर्व्ह बँकेच्या नोकरभरती विभागाचे अध्यक्ष, आणि सर्वांत शेवटी लोकायुक्त अशी विविध पदे त्यांनी भूषविली. १९९८ पासून मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सरचिटणीस या पदावर ते आजही सक्रिय आहेत. या प्रतिष्ठानातर्फे विविध जनोपयोगी प्रकल्प राबवण्यात, व्याख्यानांचे आयोजन करण्यात ते पुढाकार घेतात.

आपल्या प्रशासकीय गुणांबरोबरच शास्त्रीय संगीताविषयीचे प्रेम महाविद्यालयीन जीवनात त्यांनी तबला शिकून टिकवून ठेवले. आईकडून आलेला बॅडमिंटनचा वारसा त्यांनी जपला. क्रिकेट आणि फुटबॉलसारख्या खेळांत त्यांनी शाळेचे आणि महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले होते.

– स्वरूप पंडित

क

## कुलकर्णी, भुजंगराव आप्पाराव

**सचिव, महाराष्ट्र राज्य**

**५ फेब्रुवारी १९१८**



भुजंगराव आप्पाराव कुलकर्णी यांचा जन्म परळी तालुक्यातील पिंपळगाव या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. १९३२ ला औरंगाबाद येथून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९३४ ला वयाच्या १७ व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. १९३६ साली हैदराबाद येथून ते प्रथमात प्रथम क्रमांकाने बी.एस्सी. उत्तीर्ण होऊन उस्मानिया विद्यापीठातून त्यांनी सुवर्णपदक पटकावले. १९३८ साली एम.एस्सी. भौतिकशास्त्रामध्ये उस्मानिया विद्यापीठातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९३९ मध्ये ते निजाम राजवटीत मेदक तालुक्यात 'तहसीलदार' या पदावर मुलकी प्रशासकीय सेवेत रुजू झाले. विद्यार्थीदशेत आर्य समाजाच्या विचार आचारांची त्यांना जवळीक वाटत असे. १९४० ला ते 'डिस्ट्रीक्ट लँड रेकॉर्ड ऑफीसर' म्हणून औरंगाबाद येथे रुजू झाले. प्लेगची साथ असल्याने ह्या नवीन कामासाठी ते निलंगा तालुक्यातील 'दाबका' या गावात दीड वर्षे कुटुंब व मुलाबाळांसह रानात राहिले. हेवा वाटावा असा ग्रंथांचा त्यांनी संग्रह केला. जवळचे पैसे संपले म्हणून हातातील अंगठी त्यांनी मोडली व ग्रंथ घेतले.

१९४७ ला ते 'असिस्टंट कमिशनर' या श्रेणी-१ च्या मुलकी सेवेत आले. ते १९५० साली आय. ए. एस. झाले. याच काळात हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्याचे एक सदस्य राज्य झाल्यावर हैदराबाद राज्यातील जवळ जवळ १८०० जहागिरी बरखास्त करून तालुका व जिल्ह्याची फेररचना करण्याचे अवघड काम भुजंगरावांच्या हातून पार पडले. १९५३ ला ते नांदेडला जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. १९५४ ला भूमी आयोग स्थापन झाला. त्या विभागाचे सचिव म्हणून भुजंगरावांची नेमणूक झाली. या आयोगाचा अहवाल सचिव म्हणून भुजंगरावांनी तयार केला. १९५६ ला राज्य पुनर्रचनेमुळे मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांबरोबर भुजंगराव मुंबई राज्यात आले आणि औरंगाबादला जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले.

१९५९ ला ते जनगणनेच्या कामासाठी भारतातील सर्वात मोठ्या राज्याच्या जनगणनेसाठी 'प्रमुख' म्हणून मुंबईत हे काम अवघड, जोखमीचे आणि भुजंगराव यांच्या प्रशासकीय कुशलतेला व कर्तृत्वाला आव्हान देणारे ठरले. एक मे १९६० ला महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांची निर्मिती झाली. ही जनगणना म्हणजे महाराष्ट्राचे दर्शन घडविणे असा भावनात्मक आयाम भुजंगरावांनी या कामाला दिला. २६ जिल्ह्यातील जवळ जवळ १ लाख गणनाकारांना प्रशिक्षण देणे, व त्यांच्याकडून काम करून घेणे असे प्रचंड काम त्यांना करावे लागले.

१९६५ ला पुणे महानगर पालिकेकडे ते म.न.पा. आयुक्त म्हणून आले. पुण्यातील नागरी जीवनाची सर्वांगीण प्रगतीचा तो काळ होता. या काळात पुण्याचे नेहरू स्टेडियम, बालगंधर्व रंगमंदिर, मंडईची इमारत, स्वच्छ पाणी, पुरवठा, चौकांची व रस्त्यांची सुधारणा, सारस बाग ही कामे त्यांच्या हातून पार पडली. पुण्याच्या प्रगतीतील हे मैलाचे दगड आहेत. हे सारे होत असताना १९६५ चे पाकिस्तान युद्ध, १९६७ चा कोयनेतील भूकंप यांना सुद्धा त्यांना तोंड द्यावे लागले.

१९६९ ला ते सचिव म्हणून मुंबईत आले. सुरूवातीला नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण या तीन खात्याचे सचिव म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली. एका मंत्र्यांनी आकसाने अवमूल्यन केल्याच्या संदर्भात त्यांनी मंत्र्यांना शांतपणे सांगितले,''माझे आव्हान आहे की, तुम्हाला माझ्याइतका चांगला सचिव मिळावयाचा नाही.''



**भंडारदरा धरण**

अभियंत्यांची पदे निर्माण करण्यास तेच कारणीभूत ठरले आहेत.

याच कालावधीत १९७२-७३ चा भयानक दुष्काळ, भंडारदरा धरणास आडवी भेग पडून निर्माण झालेला धरण फुटण्याचा धोका ह्या दोन मोठ्या संकटांवर त्यांना मात करावी लागली.

१९७२-७३ च्या दुष्काळाने राज्यावर गंभीर परिस्थिती ओढवली. रिकाम्या हातांना काम देण्यासाठी दररोज ५० लक्ष लोक हजेरी पत्रकावर लावून जवळ जवळ ६५ ते ७० हजार दुष्काळी कामे हाती घेण्यात आली होती. रोजंदारीचा दर रु.२.५० होता. दुष्काळ निवारण्यासाठी केवळ मजुरीवर २५० कोटी रुपये खर्च झाले. या दुष्काळ निवारण्यात सिंचन विभागाला समर्थ नेतृत्व देण्यात भुजंगराव अग्रक्रमावर राहिले. कृष्णा, गोदावरी आणि नर्मदा या आंतरराज्यीय नदी खोऱ्यातील पाणी वाटपात महाराष्ट्र राज्याचे हित जपण्यात भुजंगरावजी यांच्या कार्यकुशलतेचा फारच मोठा वाटा आहे.

१९६९ च्या अखेरीस त्यांनी राज्याच्या सिंचन विभागाचा सचिव म्हणून जबाबदारी स्वीकारली व १९७४ च्या अखेरीस भारतीय प्रशासकीय सेवेतील शेवटचे सचिव म्हणून ते निवृत्त झाले. त्यांच्यानंतर अभियांत्रिकी सेवेतील ज्येष्ठ अधिकारी सचिव म्हणून नेमण्याची परंपरा सुरू झाली. सुरुवातीलाच त्यांना कृष्णा, गोदावरी आणि नर्मदा या तीन खोऱ्यातील राज्या-राज्यातील पाण्याची वाटणी निश्चित करण्यासाठीच्या नेमलेल्या लवादाच्या समोर जावे लागले. याच कालखंडात खात्यात वेगवेगळ्या श्रेणीतील, वर्गवारीतील वर्ग १, वर्ग २ व वर्ग ३ मधील अभियत्यांच्या ज्येष्ठता ठरविण्यामध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. बढत्या थांबल्या होत्या, याला दीर्घकालीन उत्तर देण्याचे ऐतिहासिक काम १९७० साली भुजंगरावजी यांच्या कारकिर्दीतच हातावेगळे झाले आहे. म्हणून एका सभेत मा. शंकररावजी चव्हाण यांनी भुजंगरावजी यांचा ‘अभियांत्रिकी सेवांचे पुनर्रचनाकार’ म्हणून गौरव केला होता. सिंचन खात्यातील अंमलबजावणीच्या कामाचे विकेंद्रीकरण करून महसूल विभागाच्या धर्तीवर प्रादेशिक मुख्य

अशा वेगवेगळ्या कठीण जबाबदाऱ्या सांभाळून सचिव म्हणून ते १९७४ मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांच्याकडे ‘मराठवाडा विकास महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक’ पदाची जबाबदारी देण्यात आली. भुजंगराव हे पीएच. डी. झालेले नसतानाही त्यावेळचे राज्यपाल अलियावर जंग यांनी विद्यापीठाला चांगला प्रशासक हवा म्हणून त्यांना मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू नेमले. भुजंगरावांनी ही जबाबदारी उत्तमपणे पार पाडली.

राज्य नियोजन मंडळावर व दांडेकर समितीवर सदस्य म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे सदस्य व अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगावर ते सदस्य म्हणून असताना त्यांच्या अनुभवाचा लाभ आयोगाला झालेला आहे. दांडेकर समितीच्या अहवालातील काही मुद्द्यांवर त्यांची भिन्न मते होती. त्याबद्दल त्यांनी भिन्नमतपत्रिका अहवालाला जोडली. याच मतपत्रिकेतील विचारांच्या आधाराने राज्यामध्ये प्रदेशा-प्रदेशांमधील विकासाचा असमतोल निवारण्यासाठी वैधानिक विकास मंडळांची निर्मिती झाली आहे.

– डॉ. दि. मा. मोरे

## कुलकर्णी, रमाकांत शेषगिरी

**भारतीय पोलीस सेवा – पोलीस महासंचालक**

**१६ डिसेंबर १९३१ – २३ मार्च २००५**



महाराष्ट्र राज्याचे माजी पोलीस महासंचालक (डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस - डी.जी.) रमाकांत कुलकर्णी यांच्याबद्दल माहिती घेताना, प्रथम गुप्तहेर कथांतील गाजलेले पात्र शेरलॉक होम्स आणि त्याचा जनक सर आर्थर कॉनन डॉयल यांची विस्तृत माहिती असणे आवश्यक आहे. कारण 'भारताचे शेरलॉक होम्स', असा जो त्यांचा अतिशय सार्थ गौरव का केला जातो का, हे समजण्यासाठी ही पार्श्वभूमी आवश्यक आहे. आपली अचूक निरिक्षणशक्ती आणि सुस्पष्ट तर्कसंगती यांच्या बळावर अनेक कूट प्रकरणांचा उलगडा हा कथानायक करतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातही फॉर्जेटसारखे निष्णात पोलीस अधिकारी होऊन गेले. पण रमाकांत कुलकर्णी यांनी गुन्हे संशोधनाला जे एक जवळपास परिपूर्ण अशा शास्त्राचे रूप दिले, ती त्यांची कामगिरी भारतीय गुन्हे-संशोधन क्षेत्रात युगप्रवर्तकच म्हटली पाहिजे. रमाकांत शेषगिरी कुलकर्णी यांचा जन्म कारवारमध्ये अवर्सा या ठिकाणी झाला. अंकोला येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईत आले. तत्त्वज्ञान हा विषय घेऊन एम.ए. व पुढे एलएल. बी. करीत असताना काही काळ ते सेंट्रल बँकेत नोकरीही करत होते.

१९५४ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते भारतीय पोलीस सेवेत दाखल झाले. तत्त्वज्ञान आणि कायदा या विषयांचा त्यांनी जसा कसून अभ्यास केला होता, तसाच आता गुन्हे अन्वेषण शास्त्र, गुन्हेगार आणि त्याचे मानसशास्त्र याही विषयांचा त्यांनी अभ्यास केला.

साहजिकच मुंबई पोलीस गुन्हेगारी प्रतिबंधक शाखेचे उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त, प्रमुख संचालक; दिल्लीच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ क्रिमिनॉलॉजी अँड फॉरेन्सिक सायन्स' या अत्यंत महत्त्वपूर्ण संस्थेचे प्रमुख संचालक, अशी एकाहून एक वरचढ जबाबदारीची पदे त्यांच्याकडे येत गेली. १९८९ साली महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक (डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस - डी.जी.) या राज्यसरकारच्या सर्वोच्च पदावरून ते निवृत्त झाले.

मुंबई, महाराष्ट्र आणि एकंदर देशभरात काही गुन्हेगारी प्रकरणे अतिशय गाजलेली आहेत. महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान, ज्याला राजभवन म्हणून ओळखले जाते, तिथेच झालेली चोरी; लोकसभा निवडणुकीत उमेदवार असलेल्या फिरोज दारूवाला याने केलेले खून; चंद्रकला लोटलीकर नावाच्या महिलेचा प्रवासात झालेला खून; साम्यवादी पक्षाचे खासदार कृष्णा देसाई यांचा त्यांच्या अगदी बालेकिल्ल्यात शिरून केलेला खून, अशा प्रकरणांनी त्या-त्या वेळेला जनमानसात प्रचंड खळबळ उडवून दिली होती.

रामन राघवन या खुन्याने तर लागोपाठ अनेक खून पाडून मुंबई आणि उपनगरांमधील रहिवाशांची झोपच उडवून टाकली होती. लोक कमालीचे घाबरले होते, आणि त्यांचा पोलीस खात्यावरचा विश्वास जवळपास

संपुष्टात आला होता. मराठवाड्यात, परभणी जिल्ह्यात, मानवत जादूटोणा, जारणमारण नरबळी असे गूढ प्रकार आढळल्यामुळे प्रचंड घबराट उडाली होती. ही सर्व प्रकरणे रमाकांत कुलकर्णी यांनी आपल्या निरीक्षण, निष्कर्ष, गुन्हा अन्वेषण शास्त्र, गुन्हेगार मानसशास्त्र पद्धतीने तपास करून उलगडली.

रमाकांत कुलकर्णी यांनी आपल्या पोलीस सेवेवर तीन इंग्रजी पुस्तके लिहिली असून त्यांपैकी एकाचे 'मागोवा' या नावाने मराठीत भाषांतर झालेले आहे. त्यात त्यांनी वरील प्रकरणांच्या तपासकार्याच्या कथा सांगितल्या आहेत. त्यातून कुलकर्णी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलोभनीय पैलू ध्यानात येतो. तो असा की, गुन्हे तपासात कुलकर्णी तीव्र निरीक्षणशक्ती, तर्कसुसंगत विचार यांच्याइतकेच महत्त्व अतींद्रिय शक्तींना म्हणजे गुन्हेगाराचा जणू वास येणाऱ्या 'सहाव्या इंद्रिया'ला व परमेश्वराला देतात. विशेष अवघड तपासकाम करताना ते कुलदैवत मंगेशाची प्रार्थना करण्यात कसलाही कमीपणा मानत नाहीत. देवाने आपली प्रार्थना ऐकली व यश दिले हेदेखील ते कोणताही बुद्धिवादी आव न आणता स्पष्टपणे कबूल करतात.

रमाकांत कुलकर्णी यांच्या कारकिर्दीचा कळस म्हणजे पंतप्रधान इंदिरा गांधी हत्येचा तपास. रीतसर खटला उभा राहण्यासाठी भरपूर पुरावा हवा होता. तो गोळा करणे हे काम फार अवघड होते. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर शीख समाजावर भयंकर असे खुनी हल्ले करण्यात आले होते. त्यामुळे एकंदर सामाजिक स्थिती कमालीची बिघडली होती. या सर्वांतून मार्ग काढून, इंदिरा गांधींच्या हत्येचे कारस्थान कसे शिजले याचा सज्जड पुरावा गोळा करून न्यायालयात सादर करणे, हे काम गुन्हे तपासाच्या दृष्टीने तर अवघड होतेच; पण राजकीय व सामाजिकदृष्ट्याही कमालीचे संवेदनशील होते.

रमाकांत कुलकर्णी यांनी त्यांच्या आजवरच्या लौकिकाला साजेल अशाच तडफेने ते पार पाडले. शेवटी इंदिरा गांधींचे मारेकरी फासावर लटकले. अशा प्रकारे आपली कारकीर्द गाजवून १९८९ साली रमाकांत कुलकर्णी महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक या पदावरून निवृत्त झाले.

– मल्हार कृष्ण गोखले

## केली, पॅट्रिक

**पोलीस आयुक्त–मुंबई**

**जन्म–मृत्यू अनुपलब्ध**



पॅट्रिक केली हे मुंबईमधील अत्यंत लोकप्रिय आणि आदरणीय पोलीस आयुक्त म्हणून ओळखले जात असत. कायदा अमलात आणताना जुलूम–जबरदस्ती करू नये आणि शक्यतो लाठीचा वापर टाळावा ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये होती. पोलीस अधिकाऱ्याने पारदर्शकतेने व प्रामाणिकपणे काम केले, तर ते लोकांच्या विश्वासास नक्कीच पात्र ठरतात, असे सर केली मानत असत. त्यामुळेच महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीच्या काळात आणि तसेच केली यांच्या कार्यकालात निर्माण झालेल्या जातीय तणावांच्या पार्श्वभूमीवरदेखील त्यांना सर्वसामान्य जनतेचा विश्वास आणि पाठिंबा प्राप्त झाला हे सर्वांत मोठे वैशिष्ट्य मानले जाते.

मुंबईच्या पोलीस पोलीस आयुक्त पदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी मुख्यत्वे दोन कामे स्वीकारली. पहिले काम म्हणजे पठाण टोळीचे पारिपत्य करणे. त्या वेळी या पठाण टोळ्यांनी अनेक ठिकाणी दरोडे, खून, लुटालुट करून दहशत निर्माण केली होती. सर केली यांनी स्वीकारलेले दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे कापसाच्या सट्टेबाजीवर नियंत्रण निर्माण करणे. हे काम मात्र ते तडीस नेऊ शकले नाहीत. पण पठाण टोळ्यांचा मात्र त्यांनी चांगल्या प्रकारे बंदोबस्त केला.

पठाण लुटारूंवर वचक निर्माण करण्यासाठी त्यांनी वायव्य प्रांतातील अधिकाऱ्यांची मदत घेतली. या अधिकाऱ्यांकडून त्यांनी पठाणांचे मानसशास्त्रही जाणून घेतले. त्यांनी पठाणांना देवाची भीती दाखवली. पठाणांसारख्या लढाऊ जमातीवर अशा प्रकारे वचक निर्माण करणे हे अत्यंत कठीण काम होते.

डिसेंबर १९३२ मध्ये मुंबई शहर पोलिसांचा मोटार ट्रान्सपोर्ट विभाग सुरू करण्यात आला आणि घोडेस्वार दल विभाग पूर्णपणे रद्द करण्यात आला त्या वेळेस सर केली यांनी मोटारकारच्या युगातही घोडेस्वार दलातील पोलीस अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतात हे सरकारला पटवून दिले. अजूनही जगातल्या सर्वोत्तम पोलीस दलांमध्ये जोश निर्माण करण्यासाठी घोडदळांचा समावेश केला जातो.

५ फेब्रुवारी १९२९ या दिवशी पठाणांच्या एका टोळीने पोलीस मुख्यालयावर हल्ला केला. हल्लेखोर पठाण समोर दिसेल त्याच्यावर तुटून पडत होते. एका पोलीस शिपायाला अत्यंत क्रूरपणे मारहाण करत असताना सर केली यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून त्याचे प्राण वाचवले. या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल त्यांना १९२१ मध्ये किंग्ज पोलीस पदक देऊन सन्मानित करण्यात आले. लोकांच्या मनांत त्यांच्याविषयी अत्यंत आदराची भावना होती. सर केली निवृत्त झाले तेव्हा मुंबईतील जनतेने उत्स्फूर्तपणे एकत्र येऊन त्यांचा पुतळा मुंबईच्या पोलीस मुख्यालयासमोरील चौकात उभा केला होता. सध्या तो पुतळा क्रॉफर्ड मार्केट येथील संग्रहालयामध्ये जतन करून ठेवण्यात आला आहे.

– संपादित

## केळकर, विजय लक्ष्मण

### अर्थतज्ज्ञ, तेराव्या वित्त आयोगाचे उपाध्यक्ष


### १५ मे १९४२



विजय लक्ष्मण केळकर यांचा जन्म विदर्भातील खामगाव येथे झाला. मुळचे औंध येथील केळकर यांचे शालेय शिक्षण पुणे येथे झाले. पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिक्षण घेतले व १९६३ मध्ये त्यांनी यांत्रिकी व विद्युत याविषयात बी.ई. ही पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी १९६६ साली अमेरिकेच्या मिनेसोटा विद्यापीठातून एम.एस.केले. त्यांनी १९७० साली अमेरिकेतील बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठामधून अर्थशास्त्र या विषयात प्रबंध सादर करून पीएच.डी. मिळविली. आपल्या पुढील आयुष्यात त्यांनी एकूण कार्यकाळात आर्थिक क्षेत्रातच सेवा बजावली. त्यात शेअर बाजार, वित्त आयोग अशा अनेक संस्थांचा समावेश आहे. विशेष म्हणजे त्यांनी बहुतेक संस्थांत किंवा सरकारी खात्यात उच्च पदावर कामे केली आहेत.

१९७० मध्ये केळकर हैदराबादच्या ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया’ मध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तेथे असतानाच त्यांना नेपाळचे राष्ट्रीय आर्थिक नियोजन करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर नेपाळी एअरवेज कॉर्पोरेशनचे दीर्घकालीन नियोजन त्यांनी केले. १९७७ मध्ये डॉ. केळकर हे केंद्र सरकारच्या व्यापार खात्याचे आर्थिक सल्लागार झाले. या पदावर ते १९८१ पर्यंत कार्यरत होते.

पुढच्याच वर्षी त्यांनी केंद्र सरकारच्याच पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयात आर्थिक धोरण व नियोजन विषयक सल्लागार म्हणून सेवा बजावली. १९८५ साली राजीव गांधी पंतप्रधान असताना डॉ. केळकर यांची पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे सचिव म्हणून नेमणूक झाली. एक वर्ष त्यांनी हे पद अत्यंत कार्यक्षमपणे सांभाळले. हे पद सांभाळत असतानाच १९८७ मध्ये त्यांना औद्योगिक खर्च व किंमत



पद्मविभूषण पुरस्कार

विभागाचे अध्यक्षपद तसेच भारत सरकारच्या अर्थसचिव पदावरून कार्य करण्याची संधी लाभली.

केळकर तेराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष झाले. भारतात आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर लगेच त्यांना 'युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलमेंट' या जिनिव्हास्थित आंतरराष्ट्रीय संस्थेच्या व्यापार विभागात संचालक व समन्वयक म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. १९९४ पर्यंत त्यांनी या पदावर उत्कृष्ट कार्य केले.

त्यानंतर १९९४ मध्ये भारतात येऊन त्यांनी केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू खात्यातील सचिवपद स्वीकारले. तीन वर्षे हे पद सांभाळल्यानंतर पुढे त्यांनी विविध खात्यांत अध्यक्षपदावरूनच काम केले. त्यामध्ये केंद्रीय जकात (टॅरिफ) आयोग, औद्योगिक विकास वित्त महामंडळ (आयडीएफसी, प्रायव्हेट इक्विटी, मुंबई), वित्त आयोग, भारतीय विकास प्रतिष्ठान, राष्ट्रीय शेअर बाजार या सर्व संस्थांचे अध्यक्षपद भूषविले. मधल्या काही वर्षात त्यांनी भारत सरकारचे अर्थ सचिव (१९९८-९९) म्हणून तसेच जागतिक नाणेनिधीच्या भारत, श्रीलंका, बांगला देश व भूतान विभागासाठी कार्यकारी संचालक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले.


२००२-२००४ या काळात त्यांनी भारत सरकारच्या वित्त खात्याचे सल्लागार म्हणूनही काम पाहिले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च पदांवर काम करण्यासाठी त्यांना विविध सरकार व विदेशी संस्थांनी आमंत्रित केले. त्यांच्या कार्याचा, वेग व आवाकाच मोठा होता. नेमणूक मिळेल तिथे डॉ. केळकर यांनी देशाची सेवा केली. यामुळेच २०११ मध्ये भारत सरकारने त्यांन पद्मविभूषण हा सन्मान प्रदान त्यांचा गौरव केला.

– अनिल शिंदे

## केळकर, शरद मनोहर

**कार्यकारी संचालक आशियाई विकास बँक, राज्य उद्योग आयुक्त**

**२५ नोव्हेंबर १९३७ – १ मे १९८८**



शरद मनोहर केळकर यांचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांचे वडिल वकिल होते तर आजोबा दिवाण बहाद्दूर व्ही.एम.केळकर हे अकोला येथील जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे न्यायाधीश होते. त्यांचे संपूर्ण शिक्षण नागपूर येथेच झाले. बालक मंदिर येथे प्राथमिक तर शालेय शिक्षण पटवर्धन विद्यालयात झाले. विज्ञान महाविद्यालयातून त्यांनी १९५७ मध्ये गणित विषयात एम.एस्सी.ची पदवी घेतली.

ते उत्तम क्रिकेटपटू होते. त्याचबरोबर टेनिसमध्येही त्यांनी नैपुण्य मिळवले होते.

विज्ञान महाविद्यालयातच केळकर यांनी काळ काळ गणित विषय शिकवला. १९५७ मध्येच त्यांनी आय.ए.एस.ची परीक्षा दिली. या पहिल्याच प्रयत्नात ते यशस्वी झाले आणि भारतीय प्रशासकीय सेवेत त्यांना प्रवेश मिळाला. दिल्ली, भावनगर तसेच नागपूर येथे येथे त्यांना प्रशिक्षण मिळाले. १९५९ मध्ये नागपूर येथे नाग विदर्भ आंदोलन झाले. या काळात त्यांना कायदा आणि सुव्यवस्था राखणे म्हणजे काय याचे प्रात्यक्षिकच पाहायला मिळाले. १९६० मध्ये केळकर यांचा विवाह मालती कुंटे यांच्याशी झाला.

त्यानंतर त्यांची उपविभागीय अधिकारी (सब डिव्हिजनल ऑफिसर) या पदावर मूर्तीजापूर येथे

नेमणूक झाली. यानंतर मुंबईतही त्यांची बदली झाली. पुण्यातील बदलीत त्यांनी सेल्स टॅक्स विभागात साहाय्यक आणि उप आयुक्त (असिस्टंट ॲण्ड डेप्युटी कमिशनर सेल्स टॅक्स) या पदावर काम केले.

१९६४ मध्ये यशवंतराव चव्हाण केंद्र सरकारात संरक्षण मंत्री असताना त्यांनी केळकर यांची विशेष सचिव म्हणून नियुक्ती केली. पुढे १९७२ पर्यंत त्यांनी सचिव पदावर काम केले.

यानंतर नाशिकचे जिल्हाधिकारी, सिकॉमचे व्यवस्थापकीय संचालक, केंद्र सरकारात पेट्रोलियम व रसायन विभागाचे सहसचिव तसेच राज्याचे उद्योग आयुक्त या पदावरही त्यांनी काम केले.

महाराष्ट्र उद्योजकता प्रशिक्षण व विकास केंद्र (औरंगाबाद), उद्योगमित्र या संस्था आणि संघटनांच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला.

केंद्र सरकारच्या बँकिंग विभागाचे अतिरिक्त सचिव पदावरचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर त्यांना 'एशियन डेव्हलपमेंट बँके'च्या कार्यकारी संचालक पदासाठी मनिला येथे त्यांची निवड झाली. ७ मे १९८८ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

– प्रभाकर करंदीकर

## कॅफिन, ए. ई.

**शेवटचे ब्रिटिश पोलीस आयुक्त – मुंबई**

**जन्म–मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



ए. ई. कॅफिन हे मुंबई इलाख्याचे शेवटचे ब्रिटिश पोलिस आयुक्त होते. १९४७ साली भारत स्वतंत्र होण्याच्या फक्त सहा महिन्यांपूर्वी ते मुंबईचे पोलिस आयुक्त झाले. स्त्रियांना पोलीस दलात प्रवेश मिळावा यासाठी त्यांनीच प्रथम आपल्या कार्यकालात कायदा केला. त्यांनी १ ऑगस्ट १९४७ या दिवशी एका महिलेची पोलीस



सुसज्ज महिला पोलीस दल

उपनिरीक्षक या पदावर नियुक्ती केली. त्यानंतर दोन आठवड्यांनी १४ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी आपला पदभार जे. एस. भरुचा यांच्याकडे सन्मानपूर्वक सोपवला. पोलीस निरीक्षक जे. एस. भरुचा हे त्यांचे नाशिकच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रातील सहाध्यायी होते.

मुंबईचे माजी डी. सी. सी. व्ही. जी. कानेटकर यांनी कॅफिन यांचे जे वर्णन केले आहे त्यातून त्यांची पोलीस अधिकारी म्हणून बजावलेली कामगिरी अधोरेखित होते. व्ही.जी. कानिटकर लिहितात, ''१४ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी आपला पदभार जे. एस. भरुचा यांच्याकडे सन्मानपूर्वक सोपविला. या प्रसंगाची नोंद ठेवणे ही मी माझी जबाबदारी समजतो. ब्रिटिश शासनाने दिलेली मुदतपूर्व निवृत्ती स्वीकारण्याची सवलत कॅफिन यांच्या सोबतच्या अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनी स्वीकारली. परंतु कॅफिन यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी निष्ठापूर्वक पूर्ण केली. शिल्लक राहिलेले प्रत्येक काम पूर्ण केले. त्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी केल्या आणि त्यानंतरच त्यांनी आपला पदभार भरुचा यांच्याकडे समारंभपूर्वक सुपूर्त केला. आपल्या लौकिकाला शोभेल अशा पद्धतीने निवृत्ती स्वीकारली.''

परक्या देशावरील आपले शासन समाप्त होण्याच्या काळातही अत्यंत काळजीपूर्वक कर्तव्यनिष्ठेने काम

करणाऱ्या या मुंबईच्या शेवटच्या ब्रिटिश पोलीस आयुक्ताचे हे वर्तन प्रेरणादायक म्हटले पाहिजे.

– संपादित

## कोल्हटकर, मधुसूदन रामचंद्र

**सचिव – शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य**

**२९ मार्च १९३६**



मधुसूदन रामचंद्र कोल्हटकर यांचा जन्म कराड येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कराड येथेच झाले. १९५३ मध्ये एस.एस.सी.च्या परीक्षेत चार विषयांत त्यांनी प्रथमपदाचे पारितोषिक पटकावले. मराठीचे राम गणेश गडकरी, तर संस्कृतची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती त्यांनी मिळवली. पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्रात बी.ए. पदवी घेतली. सामाजिक शास्त्र विषय घेऊन ते १९५९ मध्ये एम.ए.ला पुणे विद्यापीठात पहिले आले. ते केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा त्याच वेळी देत होते.

१९५९–६० या वर्षात ते या आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. दि.१६ मे १९६० पासून आय.ए.एस. अधिकारी म्हणून त्यांनी शासकीय सेवेस प्रारंभ केला.

शासकीय सेवेत काम सुरू केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र शासनातील अर्थ, नियोजन, शेती, अन्न, सामान्य प्रशासन अशा महत्त्वाच्या खात्यांबरोबरच त्यांच्या आवडत्या शिक्षणखात्यातही काम केले. उपसचिव, सहसचिव, तसेच सचिव पदाची जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे, अभ्यासपूर्ण रितीने पार पाडली. त्यामुळेच केंद्र शासनाने सोपविलेली अत्यंत महत्त्वाची कामेही त्यांच्याकडे चालून आली. ३३ वर्षे (१९६० ते १९९३) शासकीय कामे करून त्यांनी कार्याचा आनंद मिळविला. १९८५ ते १९८७ या कालखंडात शिक्षण सचिव म्हणून कार्य करताना त्यांच्यातील विद्यार्थी जागृत होता. त्यांनी शासकीय विधी महाविद्यालय मुंबईमधून एलएल.बी.ची पदवी प्राप्त केली. सेवानिवृत्तीनंतर म्हणजे १९९३ ते १९९८ या काळात त्यांनी 'सेंट्रल अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रायब्यूनल'चे अहमदाबाद व मुंबई बेंचचे सदस्य म्हणून साडेचार वर्षे काम केले.

सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे वाचन, लेखन, मनन, चिंतन चालू असते. वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी, ऑगस्ट २००७ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठातून फेडरेशन इन अॅक्शन–द केस ऑफ एज्युकेशन सेक्टर या विषयात पी.एच.डी.ची पदवी मिळविली. कोल्हटकर यांनी काही पुस्तकांचे लेखनही केले आहे. 'एज्युकेशनल प्लॅनिंग अॅण्ड नॅशनल डेव्हलपमेंट', तसेच 'पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन इनोव्हेशन' या दोन पुस्तकांचे ते लेखक आहेत.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांनी अकरा संशोधनपर लेख लिहिले आहेत. समीक्षक म्हणून अनेक नियतकालिकांमध्ये त्यांनी काम केले आहे. शैक्षणिक तज्ज्ञ परीक्षक म्हणून महत्त्वाची जबाबदारीही त्यांनी पार पाडली आहे. डॉ. कोल्हटकर यांना प्रशासकीय कामानिमित्त आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणाच्या निमित्ताने इटलीत २४ आठवड्यांचे परदेशगमन करावे लागले. तसेच वॉशिंग्टन येथे अकरा आठवड्यांसाठी जावे लागले. थायलंड, मनिला, सिंगापूर, काठमांडू, सार्क परिषदेच्या निमित्ताने ढाका, इस्लामाबाद येथे जाऊन त्यांनी भारताची बाजू समर्थपणे मांडण्याचे कार्य केले. डॉ. कोल्हटकर यांनी अनेक अभ्यासवर्ग परिषदा, परिसंवाद यांत भाग घेतला आहे. आयआयएम, बंगलोर टाटा मॅनेजमेंट सेंटर, पुणे, एनआयबीएम, पुणे, आयआयएम, कोलकाता, इंडियन सोसायटी ऑफ सीए, न्यू दिल्ली इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक एंटरप्राइझेस, हैद्राबाद या नामवंत संस्थांच्या प्रशिक्षणवर्गात प्रशिक्षक म्हणून त्यांनी उत्तम काम केले. एशियाटिक सोसायटी ऑफ

मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी जुलै २००५ ते जुलै २००७ पर्यंत काम पाहिले. २०१० च्या या संस्थेच्या अहवालात कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे भाषण छापले आहे. 'राइज अ‍ॅण्ड फॉल ऑफ टीचिंग, लर्निंग ऑफ संस्कृत लंग्वेज इन द पीरियड ऑफ १५०० टू २०००' हा विषय डॉ. मधुसूदन कोल्हटकर यांनी भाषणात मांडला.

अलीकडच्या काळात, नोव्हेंबर २००९ मध्ये नवी दिल्ली येथील 'वर्ल्ड कॉन्फरन्स ऑन फेडरॅलिझम' या भारत सरकारच्या गृहखात्याने आयोजिलेल्या परिषदेत डॉ. कोल्हटकर उपस्थित होते. तसेच मार्च २००९ मध्ये डॉ. वि.म. दांडेकर यांनी पुणे येथे स्थापन केलेल्या 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल अ‍ॅकॅडमी' या संस्थेत अ क्रिटिकल अ‍ॅण्ड कॉम्प्रिहेन्सिव्ह सर्व्हे ऑफ हायर एज्युकेशन इन पोस्ट-इंडिपेंडन्स इंडिया' हे प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. गेल्या पन्नास वर्षांत अशा अनेक प्रकल्पांची कामे सतत करण्याचे सामर्थ्य डॉ. कोल्हटकरांकडे आजही आहे.

शिक्षण क्षेत्राची बांधीलकी त्यांनी केली आहे, त्याबरोबर इतर क्षेत्रांना नाकारले नाही. ज्याचा खास उल्लेख करावासा वाटतो ते एमएसएफसी या महामंडळाने दिलेल्या एप्रिल १९७९ च्या मानपत्रात म्हटले आहे, ''डॉ. कोल्हटकर साहेब, आपण आपल्या छोट्या कारकिर्दीत महामंडळाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी रात्रंदिवस झटलात, परिणामी महामंडळाच्या कामात गती व नीटसपणा तर आलाच; पण त्याचबरोबर महामंडळाच्या कार्याची व्याप्तीही अधिक सखोल व विस्तारित झाली,'' हे कौतुकास्पदच होय. शासनाच्या विविध विभागांत काम करताना महाराष्ट्राचे अनेक यूजीसी, एनसीईआरटी मुख्यमंत्री, मंत्री, वरिष्ठ अधिकारी यांच्याशी त्यांचा संपर्क आला. नियोजन मंडळ इत्यादी संस्थांमध्ये काम करण्याची त्यांना संधी मिळाली. या संधीचे त्यांनी देशहितासाठी सोने केले.

जुलै-डिसेंबर २०१० च्या 'समाजप्रबोधन पत्रिके'त डॉ. कोल्हटकरांचा 'यशपाल समितीचा अहवाल - एक गमावलेली संधी' हा लेख प्रसिद्ध झाला. त्याचा उल्लेख करून कै. डॉ.चित्रा नाईक (शिक्षणतज्ज्ञ) यांनी २४ ऑगस्ट २०१० रोजी डॉ. कोल्हटकरांना पत्र देऊन सन्मानच केला आहे.

प्रशासनाच्या माध्यमातून देशसेवा करून देशविदेशात त्यांनी कराड नगरीची कीर्ती विश्वपातळीवर पोहोचविली, या कार्याच्या गौरवार्थ १९९८ मध्ये 'कराडभूषण' हा पुरस्कार 'आदरणीय पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान कराड' यांनी देऊन त्यांचा गौरव केला.

– डॉ. मधुकर नानकर

* * *

# ख



## खुरसाळे, नारायण विठ्ठल

**मुख्य अभियंता - पाटबंधारे विभाग**

**१५ मार्च १९१४ - १३ एप्रिल २००८**



नारायण विठ्ठल खुरसाळे यांचे गाव अंबेजोगाई होय. त्या काळात अंबेजोगाईस केवळ सातवीपर्यंतची शाळा होती. नारायणराव आठवी पासूनच हैद्राबादला गेले. मॅट्रिकच्या परीक्षेत ते हैद्राबाद राज्यात प्रथमश्रेणीत सर्वप्रथम उत्तीर्ण झाले होते व त्यामुळे त्या काळात त्यांना गोखले स्कॉलर म्हणायचे. आठवी ते बारावी असे त्यांचे शिक्षण त्या काळी शिक्षणाचा दर्जा चांगला असल्यामुळे नावाजलेल्या 'सीटी कॉलेज' मध्ये झाले. बारावीच्या परिक्षेत ते सर्वप्रथम आले होते.

पुढे ते हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठातील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये गेले. ते १९३६ मध्ये अभियांत्रिकीच्या अंतिम परीक्षेत प्रथम श्रेणीत आणि सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. परिक्षेच्या एक दिवस आधी नारायणरावांच्या वडिलांचे निधन झाले होते. पण मनाला खंबीर ठेवून त्यांनी परीक्षा दिली.

अभियांत्रिकी मध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यामुळे नारायणरावांची सरकारी नियमाप्रमाणे सहाय्यक अभियंता म्हणून नेमणूक झाली. मांजरा नदीवर असलेल्या निझामसागर धरणाच्या कामावर त्यांची पहिल्यांदा नेमणूक झाली होती.

नंतर कार्यकारी अभियंता म्हणून ते तुंगभद्रा धरणाच्या कामावर होते. त्या काळात हैद्राबाद व मुंबई या दोन्ही राज्यांत सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे खाते हे एकच होते आणि या दोन्ही शाखांकडे अधिकाऱ्यांच्या नेमणूका आलटून-पालटून होत रहायच्या. नारायणराव यांना राज्य सरकारतर्फे अमेरिकेतील महामार्ग रचना (हायवे सिस्टिम) बघायला आणि त्याचा अभ्यास करायला पाठविण्यात आले.

राज्य पुनर्रचना झाल्यावर ते औरंगाबादेत मराठवाड्याचे अधिक्षक अभियंता म्हणून आले. पुढे ते काही वर्षे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमध्ये व मुख्य अभियंता होईपर्यंत पुण्यात दख्खन पाटबंधारे मंडळाचे (डेक्कन इरिगेशन सर्कल) अधिक्षक अभियंता म्हणून होते. नंतर निवृत्तीपर्यंत ते मंत्रालयात मुख्य अभियंता म्हणून राहिले. १९७३ साली निवृत्त झाल्यानंतर ते काही वर्षे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य होते.

वयाची साठ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते लोकसेवा आयोगाचे सदस्य होते. निवृत्तीनंतर या नेमणुकीमुळे आणि दोन्ही मुले व्यवसायामुळे कायम मुंबईतच रहात असल्यामुळे नारायणराव सांताक्रुझला एका सोसायटीत घर घेऊन राहिले होते.

निवृत्तीनंतर नारायणरावांनी संस्कृत शिकून उपनिषदांचा अभ्यास केला. याच काळात मुंबईच्या रामकृष्ण आश्रमातील त्यांचे जाणे वाढले.

नारायणराव कर्तव्यकठोर होते. तत्त्वाशी तडजोड करत नसत. मंत्रालयात एका उच्च पदावरून काम करत असताना अभियंता वर्गाला इतर व्यवस्थेकडून दुय्यम वागणूक देण्याचा जेव्हा जेव्हा कळत नकळत प्रयत्न झाला त्या त्या वेळी त्यांनी निर्भिडपणे राज्याचे



तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींसमवेत नारायण खुरसाळे

हित, समाजाचे हित डोळ्यापुढे ठेवून त्याला विरोध केला. प्रसंगी शासकीय सेवेवर पाणी सोडण्याची तयारी देखील त्यांनी दाखविली होती.

– डॉ. दि. मा. मोरे

**संदर्भ :**

*१. कुलकर्णी, भुजंगराव; 'मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र'.*

## खैरनार, गोविंद राघो

**उपायुक्त – बृहन्मुंबई महानगरपालिका**

**१४ एप्रिल १९४२**



बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अतिक्रमणविरोधी कारवाया करिता व देशव्यापी चर्चेसाठी सर्वाधिक गाजलेली कारकीर्द म्हणून गोविंद राघो खैरनार यांची कारकीर्द ओळखली जाते. लहानपणापासून प्रत्येक बाबतीत केवळ सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास न ठेवता ती गोष्ट स्वानुभवाने तावून सुलाखून घेणे व मगच योग्य व खऱ्या निष्कर्षाप्रत पोहोचणे ही खैरनार यांची सवय, तसेच अन्यायाविरुद्ध आपला आवाज उठवणे व विरोध करणे ही त्यांची वृत्ती या गोष्टी प्रेरणादायक आहेत.

एका शेतकरी कुटुंबात नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातल्या पिंपळगाव (वाखारी) येथे गोविंद राघो खैरनार यांचा जन्म झाला. पूर्णपणे अशिक्षित अशा घराण्यातील गोविंद खैरनार हे शाळेत जाणारे पहिलेच. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नाशिक येथील भिकुसा यमासा क्षत्रिय वाणिज्य महाविद्यालयातून त्यांनी बी.कॉम. पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षणासोबत त्यांनी एन.सी.सी. मध्येही प्रवेश घेतला व उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून पारितोषिकही मिळविले. शालेय, महाविद्यालयीन जीवनातही अपात्र शिक्षक व भ्रष्टाचारी वसतिगृह चालक यांच्याविरुद्ध त्यांनी आवाज उठवलेला आहे. प्रथमत: १९६४ पासून राज्यशासनाच्या सेवेत त्यांनी नोकरीची सुरुवात केली व नंतर १९७४ पासून बृहन्मुंबई महापालिकेच्या सेवेत ते विभाग अधिकारी म्हणून रुजू झाले.

अनधिकृत बांधकामविरोधी कारवायांमुळे खैरनार यांची कारकीर्द विशेष गाजली. मुंबईतील फोर्ट वस्तुसंग्रहालयाजवळील अनधिकृत दुकाने व फेरीवाले हटविण्याची मोहीम ही अशा प्रकारच्या मोहिमांची सुरुवात होती. प्रचंड राजकीय विरोध, वरिष्ठांचा विरोध अशा एकूणच दबावपूर्ण स्थितीतही आपण आपले काम चोखपणे बजावण्याची हातोटी व प्रसंगी आवश्यक असा निर्भयपणा व कर्तव्य, कार्यतत्परता या गुणांमुळेच खैरनार भविष्यकाळात 'वन मॅन डिमॉलिशन आर्मी' या विशेषणाने ओळखले जाऊ लागले.

कुर्ला विभागातील कुर्ला स्टेशनच्या पश्चिमेला लागून असलेल्या बस टर्मिनसच्या ठिकाणी दोनशे–अडीचशे फेरीवाले, पथारीवाले, हातगाडीवाले, टपऱ्या इत्यादींनी अतिक्रमण केल्याने बससेवा बंद करण्याची वेळ आली होती. पोलिसांच्या मदतीने प्रथम अतिक्रमण हटविण्याच्या प्रयत्नात अपयश आले. सोबत आवश्यकतेपेक्षा जास्त पोलीस ताफा असूनही केवळ राजकीय इच्छाशक्तीवरच देशातील यंत्रणा

चालतात याचा प्रत्यय त्या ठिकाणी आला. परंतु नंतर योग्य पोलीस अधिकारी सदर विभागात बदलून आल्यावर हीच कार्यवाही कमीतकमी पोलीस ताफा व म.न.पा. कर्मचाऱ्यांच्या मदतीने चार ते पाच तासांत निकालात निघाली. सदर फेरीवाल्यांनी खैरनार यांच्या घरासमोर कारवाईच्या निषेधार्थ रोज रात्री अकरा वाजेपर्यंत मोर्चा नेण्याचे उद्योग साधारण आठ-दहा दिवस केले. नंतर पालिकेच्या कार्यालयात बैठक चालू असताना घुसून तोडफोड, तसेच सामानाची फेकाफेकी करण्याचे विध्वंसक कृत्य केले. सदर परिस्थितीतही स्वत:चा व सहकाऱ्यांचा बचाव करण्यासाठी प्रसंगी आक्रमकता दाखवून समोरच्याचे मनोबल खच्ची करून त्या परिस्थितीवर खैरनार यांनी विजय मिळवला.

शीव (सायन) रस्ता रुंदीकरण या कामासाठी आवश्यक असलेल्या जागेवर अनधिकृत मटका व्यवसाय, मच्छी मार्केट, मंदिर, इत्यादींवर त्यांनी योग्य कारवाई केली. त्या ठिकाणी मोठा व लांब सिमेंटचा रस्ता तयार झाला.

तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातेवाईक, चंद्रकांत पाटील यांचे अनधिकृत हॉटेल त्यांनी पोलिसांच्या मदतीने जमीनदोस्त केले.

शिवाजी पार्कवरील बेकायदा धार्मिक स्थळे, धारावी येथील कुख्यात 'डॉन' दाऊद इब्राहिमची मेहजबिन इमारत, भेंडीबाजार, मुसाफिर खाना, अशा अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामविरोधात कारवाया करण्यात खैरनार यांचा पुढाकार होता. पैकी काही कारवाया यशस्वी झाल्या, तर काही राजकीय हस्तक्षेपामुळे अयशस्वी ठरल्या.

खैरनार यांची १ जानेवारी १९८८ पासून उपायुक्तपदी नेमणूक करण्यात आली. वरील प्रकारच्या अतिक्रमणविरोधी कारवायां-बरोबरच पालिका कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीचे वातावरण निर्माण करणे, राजकीय भ्रष्टाचारी अधिकारी, तसेच कुविख्यात गुंडाना टक्कर देणे, विविध प्रकारचे भ्रष्टाचार जवळून



**अतिक्रमणविरोधात धडाडीची कामगिरी**

पाहणे व शक्य तेथे विरोध करणे, दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेल्या वेश्यांची कुंटणखाण्यातून सुटका व पुनर्वसन करणे असे अनेक प्रकारचे कार्य खैरनार यांच्या नावावर जमा आहे.

अशा प्रकारच्या नि:स्पृह, नि:स्वार्थी व कर्तव्यतत्पर अधिकाऱ्यास समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिलेला आहे, तसेच वृत्तपत्रांनीही त्यांच्या कामाची योग्य दखल वेळोवेळी घेतलेली आहे.

तरीही आपल्या देशात अशा अधिकाऱ्यास २९ जून १९९४ पासून महापालिका सेवेतून राजकीय आकसाने तांत्रिक कारण दाखवून निलंबित करण्यात आले. निलंबनानंतरही त्यांची भ्रष्टाचाराविरोधी वैयक्तिक लढाई चालूच राहिली. देशव्यापी, राज्यव्यापी, व्याख्यान दौरे, तसेच अनेक सभा-संमेलने या माध्यमातून त्यांनी भ्रष्टाचारविरोधी व्यापक जनआंदोलन लढा चालू ठेवला.

– वसुधा कानडे

**संदर्भ :**

*१. खैरनार, गो. रा., 'एकाकी झुंज', (आत्मचरित्र); पुष्प प्रकाशन लि.; प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९८; रॉयल एडिशन, ऑगस्ट १९९९*

* * *

# ग



## गवई, पद्माकर गणेश
**केंद्रीय गृह सचिव**
**११ जानेवारी १९२६ - १२ फेब्रुवारी २००९**



पद्माकर गणेश गवई यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील गणेश आकाजी गवई हे लंडन येथे झालेल्या गोलमेज परिषदेत सहभागी झाले होते. दलित समाज हा हिंदू समाजातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे प्रतिपादन त्या वेळी त्यांनी केले होते.

गवई यांनी नागपूर येथील मॉरिस महाविद्यालयातून संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मय या विषयांत पदवी संपादन केली. नंतर याच महाविद्यालयातून त्यांनी इंग्रजी वाङ्मयात एम.ए. केले.

१९५० साली गवई महाराष्ट्रातून भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झालेले पहिले दलित अधिकारी ठरले. सेवेच्या आरंभी त्यांची नियुक्ती मॅगनिज ओअर इंडिया ली., नागपूर या केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाचे कार्यकारी संचालक म्हणून झाली. ते या पदावर असतानाच या महामंडळास सर्वोत्तम केंद्रीय उपक्रम म्हणून पुरस्कार मिळाला. नागपूर महानगर पालिकेच्या भ्रष्ट कारभारामुळे तेथील लोकनियुक्त शासन राज्यसरकारने १९६४ मध्ये बरखास्त केले आणि तेथे प्रशासकांची नेमणूक करण्यात आली. परंतु दुर्दैवाने या प्रशासकांच्या कार्यकालात नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अधिकच ढासळत गेली. तेव्हा शासनाने नागपूर महानगरपालिकेच्या नव्याने निवडणुका घेऊन तेथे लोकनियुक्त शासन आणले आणि गवई यांची नियुक्ती महानगरपालिका आयुक्त या पदावर करण्यात आली. त्यांनी अवघ्या दोन वर्षात प्रचंड आर्थिक सुधारणा आणि शिस्त बाणवून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती भक्कम केली.

त्यानंतर १९७५ च्या आणीबाणीच्या वेळी गवई हे राज्याचे गृह सचिव होते तर त्यांचे ज्येष्ठ बंधू मधुकर गवई हे नागपूरचे पोलीस आयुक्त होते. या बंधुद्वयांनी महाराष्ट्रात आणीबाणीचे अतिरेक शक्य तेवढे रोखले.

गवई यांचे इंग्रजी भाषेवर असामान्य प्रभुत्व होते. कोणत्याही विषयावर चटकन पक्की पकड घेण्याचा त्यांचा गुण, विषयाचे आर्जवी आणि स्पष्ट, परखड प्रतिपादन तसेच कार्यकुशलता या त्यांच्या गुणामुळे इंदिरा गांधी अत्यंत प्रभावित झाल्या. त्यांनी गवई यांना पंजाबमधील राष्ट्रपती राजवटीच्या काळात राज्यपालांचे सल्लागार म्हणून १९८१-८२ मध्ये नेमणूक केली. तद्नंतर दिल्ली या राज्याचे नायब राज्यपाल म्हणून १९८४ मध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली.

इंदिराजींच्या भोवती कार्यरत असलेल्या तत्कालीन चौकडीच्या हस्तक्षेपाला न जुमानता त्यांनी कणखरपणे कारभार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही विशिष्ट व्यक्ती दुखावल्या गेल्या. इंदिराजींची ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी दुर्दैवी हत्या झाल्यानंतर, गवई यांनी शिखविरोधी दंगलीत बघ्याची भूमिका घेतली अशा प्रकारचा अपप्रचार या दुखावल्या गेलेल्या व्यक्तींनी केला. त्यामुळे राजीव गांधी यांनी अचानक गवई यांचा सक्तीने राजीनामा घेतला.

त्यानंतर मात्र काही काळाने या कार्यक्षम दलित अधिकाऱ्यावर काहीसा अन्याय झाला आहे याची जाणीव होऊन राजीव गांधी यांनी गवई यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्षपद देऊ केले. परंतु एकदा राज्यपालपद भूषवलेल्या अतिशय स्वाभिमानी अशा गवई यांनी हे पद नाकारले. यानंतर काही काळाने गवई यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पक्षाने त्यांना १९९१ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत बुलढाणा मतदार संघातून उभे केले. ते प्रचंड बहुमताने जिंकणार असे स्पष्ट संकेत असतानाच २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी यांची दुर्दैवी हत्या झाली. त्यामुळे उसळलेल्या सहानुभूतीच्या लाटेत गवई पराभूत झाले. भाजपात त्यांच्या प्रशासकीय कौशल्य व अनुभव यांचे योग्य चीज करून घेतले नाही असे वाटल्यामुळे भाजप सत्तेवर येण्याच्या केवळ सहा महिने आधी त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यानंतर गवई यांची प्रकृती ढासळत गेली. शिखविरुद्ध दंगलीत चौकशीसाठी नेमलेल्या नानावटी आयोगासमोर त्यांच्या एका सहकाऱ्याने त्यांच्याविरुद्ध खोटी साक्ष दिली. या कारणाने नानावटी आयोगाने आपल्या अहवालात गवई यांच्यावर ठपका ठेवला. याविरुद्ध गवई यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका प्रलंबित असतानाच त्यांचा मूत्रपिंड विकाराने मृत्यू झाला.

– अरुण पाटणकर

## गवई, मधुकर गणेश

**पोलिस महासंचालक**

**२१ मार्च १९२१ – जुलै २००४**

मधुकर गणेश गवई यांचा जन्म अमरावती येथे एका दलित कुटुंबात झाला. त्यांचे वडील गणेश आकाजी गवई सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत होते. भारतीय संसदीय कायदा (१९३५) यानुसार निर्माण झालेल्या कायदे मंडळाच्या मध्य प्रांत आणि वऱ्हाड याचे ते निवडून आलेले सदस्य होते.




मधुकर गवई यांनी अमरावती येथील किंग एडवर्ड महाविद्यालयामधून (आताचे विदर्भ महाविद्यालय) बी.ए. पदवी प्राप्त केली. १९५९ मध्ये त्यांची भारतीय पोलीस सेवेमध्ये निवड झाली. मधुकर गवई हे दलित समाजातून आय.पी.एस. उत्तीर्ण झालेले पहिलेच अधिकारी होत. आपल्या कार्यकालात त्यांनी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत पोलीस अधीक्षक हे महत्त्वाचे पद भूषविले. नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख, महाराष्ट्र राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रमुख या महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही त्यांनी पार पाडल्या.

मधुकर गवई यांना मुंबई, पुणे आणि नागपूर या महत्त्वाच्या शहरांच्या पोलीस आयुक्तपदी काम करणारे पहिले अधिकारी असण्याचा मान मिळाला. त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच विशेष पोलीस सेवेसाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती पोलीस पदकानेही त्यांना सन्मानित करण्यात आले. १९७९ मध्ये पोलीस महासंचालक (आय.जी.पी.) या पदावरून निवृत्त झाल्यावर गवई यांची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून करण्यात आली. या पदावर त्यांनी चार वर्षे काम केले. याच काळात त्यांची नियुक्ती राज्य ग्राहक आयोगावर झाली होती.

पोलीस सेवेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही गवई कार्यरत होते. दलित समाजाच्या उत्कर्षासाठीही त्यांनी बरेच कार्य केले, तसेच येथे मुस्लीम मुलांसाठी असलेल्या शाळेलाही त्यांनी मदत केली होती.

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये राज्यपालांनी नेमलेले प्रतिनिधी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मुंबईमध्ये वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी मधुकर गवई यांचा मृत्यू झाला.

ग



राष्ट्रपती पोलीस पदक

दलित समाजातील पहिले आय.ए.एस. अधिकारी पद्माकर गवई हे त्यांचे कनिष्ठ बंधू होत. मधुकर गवई यांची दोनही मुले प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. ज्येष्ठ चिरंजीव शशीशेखर गवई हे भारतीय परराष्ट्र सेवेमध्ये अधिकारी असून सध्या ते कॅनडामध्ये भारताचे उच्चायुक्त म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांचे धाकटे चिरंजीव सतीश गवई हे सध्या म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

– संध्या लिमये

## गानू, प्रभाकर लक्ष्मण

**मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग**

**२५ जानेवारी १९३१ – ऑक्टोबर २०१०**



प्रभाकर लक्ष्मण गानू यांचा जन्म हैद्राबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचा हैदराबाद मुक्तिसंग्रामातही सहभाग होता. व्यवसायाने वकील असलेल्या लक्ष्मणराव गानू यांचा हैदराबाद येथील ‘विवेकवर्धिनी’ या संस्थेच्या स्थापनेत मोठा वाटा होता.

प्रभाकर यांचे प्राथमिक, माध्यमिक सर्व शिक्षण विवेकवर्धिनीतच झाले. १९५४ मध्ये त्यांनी स्थापत्यशास्त्रात अभियांत्रिकीची पदवी मिळविली. १९५५ मध्ये त्यांचा विवाह बार्शीच्या सुधा सहस्रबुद्धे यांच्यासमवेत झाला.

१९५४ मध्ये त्यांची नियुक्ती कर्नाटकातील रायचूर येथील तुंगभद्रा प्रकल्पावर झाली. भाषावार प्रांतरचनेनंतर १९५७ मध्ये ते मराठवाड्यातील येलदरी प्रकल्पावर रुजू झाले. शासकीय सेवेतील ओव्हरसियर ते मुख्य अभियंता अशा पदांवर त्यांनी काम केले.

येलदरी प्रकल्पात त्यांना आरेखन विभागापासून वीजघराच्या कामापर्यंत अनुभव घेता आला. १९६६ मध्ये ते पदोन्नतीवर जायकवाडी प्रकल्पाच्या दगडी धरणाचे कार्यकारी अभियंता झाले. सुरुवातीला धरणाचे अंदाजपत्रक, संकल्पचित्रे, निविदाविषयक प्राथमिक कामे पूर्ण केल्यावर १९६९ मध्ये प्रत्यक्ष धरणाच्या बांधकामाला सुरुवात झाली. या कामाचे बांधकाम ज्या कंत्राटदाराला देण्यात आले होते, त्याच्याकडून बऱ्याच चुका होऊन काम ठप्प झाले. त्यामुळे तत्कालीन पाटबंधारे खात्याचे मंत्री शंकरराव चव्हाणांच्या पुढाकाराने हे बांधकाम कंत्राटदाराऐवजी पाटबंधारे खात्यामार्फत करण्याचा निर्णय घेतला गेला. हा असा पहिलाच प्रयोग होता. कार्यकारी अभियंता म्हणून प्रभाकर गानूंनी ही जबाबदारी समर्थपणे पेलली.

या कामाचा पूर्वानुभव कोणासही नव्हता. परंतु व्यवस्थित केलेल्या नियोजनामुळे प्रभाकर गानू यांनी सहकाऱ्यांसमवेत दोन ते तीन पाळ्यांत काम करून, तसेच कामाची गती व गुणवत्ता राखून वेगाने, अवघ्या तीस महिन्यांत व कमी खर्चात धरणाचे काम पूर्ण केले. या प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण करण्यात पैठणच्या खुल्या कारागृहातील कैद्यांचाही विशेष सहभाग होता. १९७२ मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्याच्या या कामात योगदान दिलेल्या कार्यकारी अभियंता ते शिपाई स्तरापर्यंतच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान देण्यात आले.

जायकवाडी दगडी धरणाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामात प्रस्तंभ, द्वारे व ब्रिजचा अंतर्भाव होता. याच अभियंता चमूने पहिल्या टप्प्याच्याच जिद्दीने हे काम अवघ्या साडेतीन वर्षांत पूर्ण केले. हे करताना द्वार उभारणीचे काम दोन द्वार उभारणी उपविभागांच्या साहाय्याने एकाच वेळी धरणाच्या दोन्ही तीरांकडून



**जायकवाडी धरण**

सुरू करून शेवटी मधली द्वारे उभारण्याचा अभिनव प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला. २४ फेब्रुवारी १९७६ रोजी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते हा प्रकल्प राष्ट्राला अर्पण करण्यात आला. त्यासाठी त्यांनी कोयना व जायकवाडी प्रकल्पातील काही अभियंत्यांना भातसा प्रकल्पात सामावून घेतले.

भातसाच्या परिसरात पावसाचे प्रमाण अधिक होते. या कालावधीत कामाचे दिवस वाया न घालविता गानू यांनी या पावसाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. खात्यामार्फत काम सुरू होण्यापूर्वी कंत्राटदाराने नऊ वर्षांत साडेचार लक्ष घनमीटर बांधकाम केले होते, तर गानू यांच्यासमोर साडेचार वर्षांत नऊ लक्ष घनमीटर काम करण्याचे आव्हान होते.

या कामासाठी मदत म्हणून एक वेगळा यांत्रिकी विभाग सुरू करण्यात आला. त्यामध्ये त्यांना कृ. अ. ग्रामपुरोहित, नं. द. वडनेरे व एम. बी. देशपांडे या कार्यकारी अभियंत्यांची विशेष मदत झाली. सर्वांच्या सहकार्याने प्रभाकर गानू यांच्या नियोजनाखाली जून १९८० मध्ये ठरल्याप्रमाणे प्रकल्पातील पहिला टप्पा पूर्ण होऊन मुंबईला शंभर दशलक्ष घनमीटर पाणी पुरविण्याचे उद्दिष्ट साध्य झाले.

यानंतर प्रभाकर गानू यांची नियुक्ती गुणनियंत्रण मंडळ, पुणे, अहमदनगर पाटबंधारे मंडळ, अहमदनगर व ऊर्ध्वपेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड येथे झाली. त्यानंतर त्यांची माजलगाव प्रकल्प मंडळावर व पुन्हा एकदा निम्न तेरणा प्रकल्पावर नियुक्ती झाली. बुडित क्षेत्रातील व परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रखर विरोधामुळे सर्वत्र दहशतीचे वातावरण होते. या ठिकाणी शासनाने राज्य राखीव पोलीस दलाची एक सशस्त्र तुकडी तैनात केली होती. अशा वेळी पाटबंधारे विभागाचे तत्कालीन मंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्याशी सातत्याने संपर्कात राहून प्रभाकर गानू यांनी हा प्रश्न कौशल्याने हाताळला. लोकांचा प्रकल्पाला असलेला विरोध कमी करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळेच १ डिसेंबर १९८३ रोजी सुरू झालेला हा प्रकल्प अवघ्या सहा वर्षांत द्वार उभारणी व प्रिकास्ट ब्रिजसह १९८९ मध्ये पूर्ण झाला.

त्यानंतर प्रभाकर गानू यांची नियुक्ती औरंगाबाद येथे मुख्य अभियंता पदावर झाली. या कालावधीत त्यांनी कालव्याच्या कामासाठी, विविध भूस्तरांसाठी वितरकांचे काटछेद (प्रमाणीकरण) करण्याचा प्रयत्न केला. यामुळे कालवे कामांची संकल्पना व अंमलबजावणीत सुलभता आली.

३१ जानेवारी १९८९ रोजी ते मुख्य अभियंता पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर प्रभाकर गानूंच्या पुढाकाराने त्यांच्या काही नातेवाइकांसह त्यांनी गानू ट्रस्टची स्थापना केली. त्याद्वारे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. अनाथाश्रमांना देणग्या दिल्या. त्यांच्या आईवडिलांच्या नावाने औरंगाबाद येथील सरस्वती भुवन या संस्थेत त्यांनी 'लक्ष्मण जानकी स्मृती सभागृह' बांधून दिले.

त्यांची कर्मभूमी मराठवाड्यातील ते कार्यरत असलेल्या प्रकल्प परिसरातील महाविद्यालयीन गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी दरवर्षी एक लाख रुपये विभागून देण्याची संकल्पना कार्यान्वित होत आहे.

– प्रदीप चिटगोपेकर

ग

ग

## गायकवाड, व्यंकट विश्वनाथ
**मुख्य सचिव, जलसंपदा विभाग**
**२९ ऑक्टोबर १९५१**



व्यंकटराव विश्वनाथराव गायकवाड यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा येथे झाला. त्यांचे वडील विश्वनाथराव गायकवाड हे स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचे मूळ गाव उमरगा तालुक्यातील आष्टा जहांगीर हे होय. विश्वनाथराव गायकवाड यांनी वकिलीचे शिक्षण घेतलेले असले तरी त्यांचा ओढा शिक्षण क्षेत्राकडे होता. मराठवाड्यात एक आदर्श शिक्षण संस्था म्हणून गणल्या गेलेल्या उमरगा येथील भारत शिक्षण संस्थेच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता.

घरी शेतीवाडी भरपूर असली तरी त्यात त्यांचे मन रमत नव्हते. त्यामुळेच ते पत्नी झिंगुबाईसह आष्टा जहांगीर या खेड्यातून पुणे-हैदराबाद महामार्गावर असणाऱ्या उमरगा या तालुक्याच्या गावी वास्तव्यास आले. त्या वेळी एकत्र कुटुंबपद्धती होती. व्यंकटराव गायकवाड यांच्यासोबत त्यांची भावंडे, चुलत भावंडे असा मोठा परिवार होता. घरात शिक्षणाचे वातावरण होते. वडील स्वत:च भारत शिक्षण संस्थेत होते. आजूबाजूच्या परिसरातील नातेवाइकांची मुले शिक्षणासाठी ते आपल्या घरी आणून ठेवत आणि त्यांचा राहण्या-जेवण्याचा खर्च करीत.

व्यंकटरावांच्या शिक्षणाचा ओनामा एका खाजगी शाळेतून झाला. मालतीबाई नावाच्या एक ब्राह्मण महिला ती खाजगी शाळा चालवत. त्या शाळेतून त्यांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. पुढे तिसरीला त्यांनी भारत विद्यालयात प्रवेश घेतला. व्यंकट गायकवाड लहानपणापासून हुशार आणि कुशाग्र बुद्धीचे होते. चौथीच्या बोर्डाच्या परीक्षेत तालुक्यात त्यांनी पहिला क्रमांक पटकावला. तो यशाचा आलेख कायम ठेवत त्यांनी १९६६ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर त्यांनी भारत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला.

त्या वेळी मॅट्रिकनंतर पीयूसीचा बारावी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बी.एस्सी. प्रथम वर्षाला प्रवेश मिळायचा. त्यानंतर मग पुढे वैद्यक किंवा अभियांत्रिकीला जाता येत असे. सत्तरच्या दशकात मराठवाड्यात अनेक धरणांची कामे चालू होती. या धरणांची कामे करणारे मराठवाड्याचेच मारुतीराव शिंदे हे पाटबंधारे खात्यात अधीक्षक अभियंता होते. त्यांचे गावही उमरगा तालुक्यातच होते आणि ते व्यंकट गायकवाडांचे मामा होते. मारुतीराव शिंदे ते जेव्हा गावी येत, तेव्हा त्यांच्यासोबत प्रचंड मोठा फौजफाटा असे. सरकारी गाडी, नोकर-चाकर आणि त्यांना मिळणारा सन्मान हे बघून व्यंकटरावांच्या मनात त्या वेळी पहिल्यांदा महत्त्वाकांक्षा चमकून गेली की, आपणही शिंदे साहेबांसारखे इंजिनिअर व्हावे. त्यात व्यंकटरावांचा गणित विषय आवडीचा आणि पक्का होता. अनेकदा त्यांना शंभरपैकी शंभर गुण मिळत त्यामुळे त्यांनी पुढे अभियांत्रिकीला जाण्याचा निर्णय घेतला.

छत्रपती शिवाजी महाविद्यालयात बी.एस्सी. प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी औरंगाबादच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य अभियांत्रिकीला प्रवेश घेतला आणि १९७२ मध्ये बी.ई. होऊन ते बाहेर पडले. पुढे एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन मारुतीराव शिंदे यांच्यासारखे मोठे अधिकारी व्हावे असे त्यांचे स्वप्न होते. परंतु त्या वेळी एम.पी.एस.सी. परीक्षेला बसण्यासाठी एकवीस ते सव्वीस वर्षांची अट होती. त्या निकषात न बसल्यामुळे त्यांना ताबडतोब ती परीक्षा देता आली नाही.

व्यंकटरावांचे मामा मारुतीराव शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार ते पाटबंधारे खात्यात कनिष्ठ अभियंता म्हणून १६ जून १९७२ रोजी जायकवाडी प्रकल्प

मंडळ, औरंगाबाद येथे आरेखन (डिझाइन) विभागात रुजू झाले. दरम्यानच्या काळात एम.पी.एस.सी.चा अभ्यासही त्यांनी चालू ठेवला. १९७४ मध्ये ते एम.पी.एस.सी. उत्तीर्ण झाले आणि सहायक अभियंता-श्रेणी-१ म्हणून त्यांची निवड झाली. पण दुर्दैवाची गोष्ट अशी, की त्याच वर्षी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी शून्याधारित अर्थसंकल्प (झीरो बजेट) जाहीर केला होता. पुढे त्यातून मार्ग निघून १९७६ मध्ये त्यांची विदर्भात अप्पर पेनगंगा प्रकल्पात नेमणूक झाली. व्यंकट गायकवाड हे सुरुवातीपासून धाडसी आणि झोकून देऊन काम करणारे व्यक्तिमत्त्व असल्याने अल्पावधीतच त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. पुढे व्यंकटरावांची बढती होऊन ते जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे कार्यकारी अभियंता म्हणून रुजू झाले. त्या वेळी जायकवाडीच्या उजव्या कालव्याचे काम सुरू होते. परंतु गेवराईजवळच्या जातेगावाजवळ कठीण खडकामुळे काम रखडले होते. अधिकारी वैतागून गेले होते. ते अधिकारी रजेवर गेल्यामुळे वरिष्ठांनी ती जबाबदारी व्यंकटराव यांच्यावर सोपविली. व्यंकटरावांनी अवघ्या तीस दिवसांत ते काम पूर्ण करून दाखवले. तेव्हापासून त्यांच्या नावाची प्रशंसा पाटबंधारे खात्यात सुरू झाली.

१९८३ मध्ये व्यंकटरावांची बदली नांदेडला विष्णुपुरी प्रकल्पात कार्यकारी अभियंता म्हणून झाली. विष्णुपुरी प्रकल्प म्हणजे आशिया खंडातील सर्वांत मोठी उपसा सिंचन योजना म्हणून तिचा गवगवा झाला होता. इतके मोठे काम पूर्वी महाराष्ट्रात झाले नसल्याने पाटबंधारे खात्यापुढेच प्रश्न निर्माण झाला होता. ते आव्हान व्यंकट गायकवाड यांनी समर्थपणे पेलले आणि अतिशय मेहनत घेऊन त्यांनी विष्णुपुरी प्रकल्प पूर्णत्वास नेला. विष्णुपुरी प्रकल्प म्हणजे पाटबंधारे खात्यातला एक मैलाचा दगड ठरला आहे.

पुढे राजकीय घडामोडी घडल्या आणि डॉ. पद्मसिंह पाटील राज्याचे पाटबंधारे मंत्री झाले. त्या वेळी उस्मानाबाद जिल्हा सर्वांत जास्त दुष्काळग्रस्त जिल्ह्यांपैकी एक होता. कमी पाऊस, कमी नद्या असलेला भाग असल्याने पाणी साठवण करणे अवघड होते. परंतु आव्हानांचा सामना करणे हा व्यंकटरावांचा स्वभाव असल्याने त्यांनी आपल्या चांगल्या अधिकाऱ्यांचा एक गट तयार केला. सांघिक कामावर त्यांचा भर होता. भौगोलिक असमतोलावर मात करून त्यांनी एकेकाळी सर्वांत जास्त दुष्काळग्रस्त असणारा उस्मानाबाद जिल्हा टँकरमुक्त केला. छोट्या छोट्या ओढ्या-नाल्यांवर कोल्हापुरी बंधारे घालून पाण्याचा थेंब नि थेंब अडवून जिल्ह्याचा कायापालट केला. अडचणींचा डोंगर उभा राहिला, पण प्रशासनाचे कौशल्य पणाला लावून व्यंकटराव आणि त्यांच्या अधिकारीवर्गाच्या चिवटपणामुळे लोअर तेरणा, माकणी यांसारखी अनेक मोठी धरणे व अनेक साठवण तलाव निर्माण झाले. दिडशेहून अधिक पाझर तलाव आणि एक हजाराहून जास्त कोल्हापुरी बंधारे या जिल्ह्यात निर्माण झाले. त्यामुळे आजही हा जिल्हा टँकरमुक्तच आहे.

पुढे व्यंकटरावांना अधीक्षक अभियंतापदी पदोन्नती मिळाली. त्या वेळी त्यांच्याकडे लातूर व बीड जिल्ह्यांचा कारभार होता. तेथेही त्यांनी अनेक प्रकल्पांची उभारणी केली. दरम्यानच्या काळात १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे सरकार आले आणि राजकीय बदलाचे वारे वाहिले. अनेक धोरणात्मक बदल घडून आले. कृष्णा खोऱ्याच्या पाण्याचा वापर कालबद्ध कार्यक्रम आखून सन २००० पर्यंत पूर्ण करण्याचा निर्णय झाला. याची अंमलबजावणी व्यंकटरावांनी केली. त्यासाठी खाजगी क्षेत्रातून निधी संकलन करणे आणि चांगल्या अधिकाऱ्यांचा गट तयार करणे अशी प्रशासकीय कौशल्याची कामे त्यांनी केली.

ग

कृष्णा खोरे विकास महामंडळात अधीक्षक अभियंता म्हणून त्यांची पुण्याला बदली झाली. पश्चिम महाराष्ट्रातही त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवली. पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सह्याद्रीत मोठ्या प्रमाणात असते. ते पाणी धरणात अडवून त्याचे पूर्वेकडील सखल भागात कालव्याचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन व्यंकटरावांनी केले. त्यांनी आपले प्रशासकीय कौशल्य पणाला लावले. डिंबे धरणाचे रखडलेले काम पूर्ण करून येडेगाव तळ्यात पाणी सोडले. या त्यांच्या प्रशासकीय कामाची वरिष्ठ पातळीवर दखल घेऊन त्यांना ब्रिज असोसिएशन ऑफ इंडियाचा पुरस्कारही मिळाला.

कृष्णा खोरे विकास महामंडळात असताना त्यांनी सीना-भीमा या दोन नद्यांना जोडणाऱ्या कालव्याचे काम केले. या नद्या जोडण्यासाठी २० कि.मी. लांबीचा बोगदा तयार करण्याची कल्पना त्यांनी मांडली, त्या वेळी अनेकांनी त्यांची टर उडविली. पण हा २० कि.मी. लांबीचा आशियातील सर्वांत लांब बोगदा तयार करून सीना आणि भीमा नद्या जोडण्याचा उपक्रम त्यांनी यशस्वी करून दाखवला. आज राष्ट्रीय पातळीवर नद्याजोड प्रकल्पांची चर्चा अजून सुरू आहे. परंतु १५-१६ वर्षांपूर्वीच व्यंकटरावांनी ते करून दाखविले आहे. दुष्काळग्रस्त सोलापूर जिल्ह्यातली वर्षातले दहा महिने कोरडी असणारी सीना नदी बारमाही पाण्याने भरलेली दिसते.

मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाल्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लावले. सन २००० मध्ये महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या कोयना प्रकल्पावर त्यांची नियुक्ती झाली. भूकंपग्रस्त असलेल्या कोयना धरणाच्या मजबुतीकरणाचा प्रश्न अनेक दिवस रेंगाळला होता. कारण त्यासाठी धरणालगत सुरुंग घ्यावे लागणार होते. कुणी अधिकारी हे धाडस करीत नव्हते. परंतु व्यंकटरावांनी ते धाडस दाखवून मजबुतीकरणाचे काम यशस्वी केले. त्याचबरोबर त्यांनी मांजरा नदीवर असेच सात बांध



गोदावरी पाटबंधारे विभाग

घालून वाहून जाणारे पाणी अडविले आहे. पुढे व्यंकट गायकवाड गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक झाले. या वेळी त्यांनी मराठवाड्यातील अनेक रेंगाळलेल्या प्रकल्पांना गती दिली. विशेषत: गोदावरी नदीवर जायकवाडी धरणाच्या खाली नदीत जमा होणारे पावसाचे पाणी वाहून आंध्रप्रदेशात जात होते. ते पाणी अडविण्यासाठी गोदावरीवर अकरा ठिकाणी बांध घालून ते पाणी अडविण्याच्या खास योजनेवर व्यंकटरावांनी अतिशय मेहनत घेतली. त्याचे नियोजन आणि अंमलबजावणी त्यांच्या कार्यालयातच झाली. पुढे त्यांची मंत्रालयात जलसंपदा विभागाच्या मुख्य सचिवपदी नेमणूक झाली, तरी गोदावरीवरील अकरा बंधारे त्यांनी पूर्ण करून घेतले. त्या अकरा बंधाऱ्यांमुळे गोदावरीच्या ४२० कि.मी.च्या पात्रात बारमाही पाणी साठून राहिले आहे. त्यांच्या हातून घडलेले हे आणखी एक ऐतिहासिक कार्य आहे.

एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांनी जलसंपदा खात्यात जे काही निर्णय घेतले, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. मंत्रालयात सचिव पदावर कार्यरत असताना त्यांच्या असे लक्षात आले होते, की या खात्यातल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या अनेक वर्षे रखडल्या होत्या. रिक्त झालेल्या जागा भरल्या जात नव्हत्या. त्यामुळे विकास कामांना खीळ बसत होती. त्यांनी पदोन्नत्यांचे आणि बदल्यांचे प्रश्न मार्गी लावून विकासाला गती प्राप्त करून दिली. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले

आहे. त्यांना राज्यपालांच्या हस्ते ‘उत्कृष्ट अभियंता पुरस्कार’ देण्यात आला. त्याचप्रमाणे सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन अ‍ॅण्ड पॉवरचा ‘आयपी सिन्हा पुरस्कार’, पुणे इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचा ‘रावबहादूर पुरस्कार’, तसेच प्रेरणा फाउण्डेशनचा ‘जीवनगौरव पुरस्कार’ प्राप्त झाला आहे.

त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेत शासनाने त्यांच्यावर अनेकदा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. औरंगाबाद येथील वाल्मी संस्थेचे ते अध्यक्ष होते. आर्बिट्रेटर इंडियन काउन्सिलचे सदस्य, भारतीय जलसंपदा संस्था, कोलकाता या संस्थेचे सदस्य अशा विविध शासकीय संस्थांवर त्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली आहे. ३१ ऑक्टोबर २००९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा खात्याच्या सचिव पदावरून ते सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतरही ते शासनाच्या जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

– विजयकुमार मोरे

## गोखले अच्युत माधव

**सचिव, शिक्षण, ग्रामीण विकास, (नागालँड)**
**केंद्रीय सचिव, वन-पर्यावरण व ऊर्जा खाते**
**३ जानेवारी १९४६**



अच्युत माधव गोखले यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा या लहानशा गावात झाला. त्यांच्या आईचे नाव सुशीला होते. त्यांचे वडील माधव श्रीपाद गोखले हे जुन्या सोशालिस्ट पार्टीमध्ये कार्यरत होते. जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, मधू लिमये या महत्त्वाच्या समाजवादी नेत्यांबरोबर त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात काम केले होते. १९७५ च्या जनता सरकारच्या नेत्यांबरोबर त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात काम केले होते. १९७५ च्या जनता सरकारच्या स्थापनेतही त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. खादी ग्रामोद्योग आयोगातून ते संचालक या पदावरून निवृत्त झाले.

अच्युत गोखले यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण चेंबूर एज्युकेशन सोसायटीच्या चेंबूर विद्यालयामध्ये झाले. या विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम आयोजित केले जात. याचा गोखले यांच्या सर्वांगीण विकासासाठी फायदा झाला. मुंबई येथील एलफिन्स्टन महाविद्यालयातून आणि इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसमधून त्यांनी गणित आणि भौतिकशास्त्र या विषयांत बी.एस्सी. पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी व्ही.जे.टी.आय.मधून अभियांत्रिकीचे एक वर्ष पूर्ण केले. परंतु पूर्ण होण्याअगोदरच १९६६ मध्ये ते शॉर्ट सर्व्हिस कमिशनची परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय नौदलात लेफ्टनंट या पदावर दाखल झाले.

भारतीय नौदलातील एकूण सात वर्षांच्या कारकिर्दीत साडेतीन वर्षे त्यांनी मिसाइल बोट्स स्क्वॉड्नमध्ये काम केले. त्या वेळी भारताने रशियाकडून मिसाइल बोट्स विकत घेतल्या होत्या. त्यासाठीचे विशेष प्रशिक्षण घेण्यासाठी अच्युतराव गोखले १९६९ ते ७० हे एक वर्ष रशियामध्ये गेले होते. रशियाकडून घेण्यात आलेल्या बोटींपैकी आर.एन.एस. विनाश या बोटीने १९७१ च्या पाकिस्तानच्या युद्धामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. आर.एन.एस. विनाश या बोटीवर अच्युत गोखले कार्यरत होते. या बोटीने सौराष्ट्राजवळ पाकिस्तानच्या दोन बोटी बुडवल्या. एवढेच नव्हे, तर थेट कराचीपर्यंत जाऊन पाकिस्तानच्या तीन बोटींना जलसमाधी दिली. या ठिकाणी असणारा तेलाचा प्रचंड साठा उद्ध्वस्त केला. या युद्धात गाजवलेल्या पराक्रमाबद्दल गोखले यांना सन्मान चिन्ह देण्यात आले.

१९६२ च्या भारत-चीन युद्धामध्ये मोठ्या संख्येने भारतीय युवक सैन्यात दाखल झाले होते. या

युवकांना प्रशासकीय सेवेत येण्याची संधी मिळावी म्हणून भारत सरकारने विशेष कायदा करून १९६२ ते ७४ या कालावधीत विशेष भरती सेवा सुरू केली होती. या योजनेद्वारे अच्युत गोखले यांनी १९७२ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली. १९७३ मध्ये ही परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय लष्करातून या परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ते पहिले आले. होम स्टेटमध्ये काम करण्याऐवजी त्यांनी इतर राज्यात जाण्याचा पर्याय निवडला. मसुरी येथील एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर १९७४ मध्ये त्यांची नेमणूक नागालँड राज्यातील मोकाकेचुंग या जिल्ह्यात सहायक आयुक्त (असिस्टंट कमिशनर) या पदावर करण्यात आली. त्यानंतर लगेचच मोन या जिल्ह्यात उपविभागीय अधिकारी या पदावर त्यांची नेमणूक करण्यात आली.

भारतीय नौदलात सात वर्षे काम केल्याचा अनुभव असल्यामुळेच सेवाज्येष्ठतेमुळे १९७६ मध्ये त्यांची नेमणूक नागालँडमधील फेंक या जिल्ह्यात उपायुक्त या पदावर करण्यात आली. या जिल्ह्यातच त्यांची कारकीर्द खऱ्या अर्थाने घडली असे म्हणता येईल. प्रत्येक गाव आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असावे आणि त्यासाठीचा निधी त्या गावाने स्वत: उभारावा या त्यांच्या संकल्पनेला मूर्तरूप फेंक या जिल्ह्यात मिळाले. नागालँडमध्ये पंचायतराज व्यवस्थेतील एकस्तरीय यंत्रणा असल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेशी थेट संपर्क साधून, त्यांच्या गरजा जाणून घेऊन त्यानुसार शासनाच्या योजना ठरविणे यासाठी अच्युत गोखले यांना संधी मिळाली.

प्रत्येक गावातील धार्मिक व सामाजिक उपक्रम साजरे करण्यासाठी ग्रामनिधी गोळा केला जातो. परंतु तो जेवण आणि दारूत उडवला जातो. गावासाठी एक कायम निधी असावा, ज्यातून गावाच्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकतील ही कल्पना अच्युत गोखले यांना सुचली. त्यातूनच ‘व्हिलेज डेव्हलपमेंट बोर्ड’ या संकल्पनेचा उदय झाला. फेंक या ठिकाणच्या व्हिलेज काउन्सिलने (नागालँडमध्ये ग्रामपंचायत) अच्युत गोखले यांच्या सल्ल्यावरून व्हिलेज डेव्हलपमेंट बोर्डाची स्थापना केली. जेवढा निधी गाव जमा करेल तेवढी रक्कम सरकार या निधीसाठी देईल असे गोखले यांनी ग्रामस्थांना सांगितले. विशेष म्हणजे अशा प्रकारचा कोणताही कायदा सरकारने केलेला नव्हता, तरीही गोखले यांनी स्वत: जबाबदारी घेऊन ही योजना अभिनवपणे सुरू केली.

या योजनेमध्ये गावातील सर्व युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यांनी गावातील लोकांच्या आर्थिक कुवतीनुसार ते किती रक्कम ग्रामनिधीसाठी देऊ शकतात त्याची यादी तयार केली. (रु. दहा ते दहा हजार) केवळ दहा दिवसांच्या कालावधीत शंभर घरे असणाऱ्या या गावाने पंच्याहत्तर हजार रुपयांचा ग्रामनिधी गोळा केला. याच कालावधीत अच्युत गोखले यांनी या योजनेला सरकारकडून मान्यता मिळवून दिली. पंच्याहत्तर हजार लोकवर्गणी आणि पंच्याहत्तर हजार सरकारी जमा अशी दीड लाख रुपयांची रक्कम गावाच्या नावाने ठेव म्हणून ठेवण्यात आली. या निधीमधून गावकऱ्यांना शेतीचे काम, घरबांधणी, गावातील सार्वजनिक बांधकामे यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. या ग्रामनिधीवर बँक गावाला कर्ज देत असे. व्हिलेज डेव्हलपमेंट काउन्सिलमध्ये कर्ज घेण्यासाठी गावकऱ्यांचे अर्ज गोळा होत असत आणि गरजेनुसार या कर्जाचे वितरण गावकऱ्यांना करण्यात येत असे. यामुळे आज नागालँडमधील सर्वच गावे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाली आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी त्यांनी सात वर्षे सातत्याने अथक परिश्रम केले. राजकारण्यांच्या अनेक कारवायांना त्यांना या काळात सामोरे जावे लागले. परंतु ग्रामीण जनतेचा विश्वास संपादन करून त्यांनी ही योजना चालू ठेवली. आपण चालू केलेली योजना आपल्यानंतरही तेवढ्याच कार्यक्षमतेने चालू राहील यासाठी त्यांनी योजनेचा मूलभूत आराखडा तयार केला. सरकारनेही ही योजना



नागा समाज

उचलून धरली. आजही ही योजना सुरळीतपणे सुरू असून नागालँडमधील एक हजार गावांचे चौसष्ट कोटी रुपये आज बँकेमध्ये जमा आहेत. नागालँडच्या जनतेने गोखले यांना २००९ मध्ये 'फादर ऑफ व्हिलेज डेव्हलपमेंट बोर्ड' हा किताब देऊन गौरवले. ग्रामविकासाच्या या मूलभूत कामाबद्दल त्यांना जानेवारी १९९० मध्ये भारत सरकारकडून 'पद्मश्री' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

१९८० ते १९८३ या कालावधीत गोखले यांची नेमणूक नागालँडची राजधानी कोहिमा येथे ग्रामीण विकास विभागाचे सचिव म्हणून करण्यात आली. याच काळात व्हिलेज डेव्हलपमेंट बोर्ड या योजनेचे नियम व कायदे तयार झाले. त्याअगोदर अमलात येणारी ही योजना संपूर्णत: गोखले यांनी केलेल्या प्रारूपावर आधारित होती.

अजूनही नागालँडमधील व्हिलेज काउन्सिलचे (ग्रामपंचायत) स्वरूप ग्रामन्यायालयासारखे असल्याने साहजिकच उपायुक्तांना जमिनींच्या मालकी संदर्भातील खटल्यांमध्ये न्यायदानाचे काम करावे लागते. गोखले यांनी असे अनेक जमीनविषयक खटले अत्यंत कौशल्याने सोडविले आहेत. एवढेच नव्हे, तर नागालँडमधील संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी सहा खुनांच्या खटल्यामध्येही न्यायदान केले आहे. विशेष म्हणजे निकाल देण्याआधी गोखले खूप पायपीट करून त्या ठिकाणाला स्वत: भेट देत असत. त्यामुळे त्यांच्या न्यायदानावर लोकांचा विश्वास दृढ होता. वरिष्ठ अधिकाऱ्याने घटनेच्या जागी प्रत्यक्ष भेट देणे हा त्यांनी पाडलेला पायंडा पुढील अधिकाऱ्यांनाही पाळावाच लागला.

१९८३ मध्ये गोखले यांची नेमणूक नागालँडचे शिक्षण सचिव म्हणून करण्यात आली. त्यानंतर १९८४ ते १९८६ ही दोन वर्षे त्यांना नागालँडच्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'च्या संचालक पदावर नेमण्यात आले. त्यानंतर १९८७ मध्ये त्यांची नेमणूक केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव या पदावर करण्यात आली. १९८८-८९ मध्ये गोखले यांच्या सल्ल्यावरून ग्रामीण भूमिहीनांसाठीची रोजगार हमी योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना या दोन्ही योजना एकत्र करून 'जवाहर रोजगार योजना' तयार करण्यात आली. त्यामुळे दोन लाख ग्रामपंचायतींना त्याचा फायदा झाला.

पर्यावरण रक्षणासह ग्रामीण विकासाबाबत गोखले यांनी केलेले मूलभूत काम म्हणजे १९९४ मध्ये निर्माण केलेली 'एनईपीईडी' म्हणजेच नागालँड पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभागातून आर्थिक विकास ही योजना. ईशान्य भारतामध्ये विशेषत: नागालँडमध्ये फिरती शेती केली जाते. यामध्ये दरवर्षी जंगलतोड करून शेतीसाठी जमीन निर्माण केली जाते. त्यामुळे वनांचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होतो. या योजनेमार्फत ग्रामीण लोकांना वनांचे व पर्यावरणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या मार्फतच पर्यावरणीय संतुलन राखले गेले.

आज ही योजना भारत सरकारने स्वीकारली असून संपूर्ण देशभरात पर्यावरण संवर्धनाचे मोठे काम यामुळे होत आहे. १९९७ ते २००० या कालावधीत ते नागालँड सरकारचे मुख्य सचिव होते. त्यानंतर त्यांची नेमणूक २००० ते २००२ या काळात वन आणि पर्यावरण मंत्रालयात केंद्र सरकारचे सचिव म्हणून करण्यात आली. या वेळी त्यांनी बी.टी. कॉटनला

ग

(जनुकीयदृष्ट्या सुधारित कापसाची जात) मान्यता दिली. जानेवारी २००३ ते ऑगस्ट २००३ या दरम्यान ते भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष होते.

२००३ सप्टेंबर ते २००६ जानेवारी या कालावधीत ते (न्यू ॲण्ड रिन्युएबल एनर्जी मिनिस्ट्री) नवीन आणि नवीनतम ऊर्जा केंद्र सरकारचे सचिव होते. याच पदावरून गोखले निवृत्त झाले. या कार्यकालात त्यांनी ग्रामीण ऊर्जा सुरक्षा कार्यक्रमांतर्गत 'द एनर्जी रिसोर्स इन्स्टिट्यूट'ची (टेरी) स्थापना केली. यामार्फत त्यांनी ग्रामीण भागातील ऊर्जा सुरक्षेसाठी कार्यक्रमाचा आराखडा तयार केला आहे. ३१ जानेवारी २००६ रोजी ते या पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी दीड वर्षे एम.एस. स्वामिनाथन संशोधन केंद्र, चेन्नई येथे कार्यकारी संचालक या पदावर काम केले. अच्युत गोखले यांना वनस्पतींची छायाचित्रे काढण्याचा आणि त्यांचा संग्रह करण्याचा छंद आहे, तसेच हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत ऐकणे हादेखील त्यांचा छंद आहे.

– संध्या लिमये

## गोखले, अशोक भालचंद्र

**भारतीय परराष्ट्र सेवा, सचिव परराष्ट्र मंत्रालय**
**२८ ऑक्टोबर १९३०**



अशोक भालचंद्र गोखले यांचा जन्म बिहार (आत्ताचे झारखंड) राज्यातील रांची येथे झाला. त्यांचे वडील आय.सी.एस. होते. त्यांनी १९१५ ते १९५२ या कालावधीत ब्रिटिशकालीन बिहार आणि ओरिसा या प्रांतात प्रांताधिकारी म्हणून काम केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते केंद्र सरकारच्या खाणकाम आणि ऊर्जा मंत्रालयाचे सचिव होते. त्यानंतर त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान राजेंद्र प्रसाद यांचे सचिव म्हणून काम केले तर १९५३ ते ५४ या कालावधीत ते भारताचे नेपाळमधील राजदूत होते. अशोक गोखले यांच्या आईचे नाव मनोरमा असे होते.

गोखले यांचे माध्यमिक शिक्षण सेंट झेवियर हायस्कूल पटना आणि उत्तराखंड मधील डून स्कूलमध्ये झाले. १९५१ मध्ये त्यांनी पुणे येथील फर्गसन महाविद्यालयामधून गणित या विषयात बी.एस्सी. पूर्ण केले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी गोखले इंग्लंडमधील फिट्झविल्यम हाऊस केंब्रिजमध्ये दाखल झाले.

१९५२–५३ मध्ये अशोक गोखले यांनी इम्पिरिअल बँक ऑफ इंडियामध्ये हैदराबाद येथे सहायक अधिकारी या पदावर काम केले. १९५५ मध्ये गोखले केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची भारतीय परराष्ट्र सेवेमध्ये निवड झाली. दिल्लीमधील मेटकॉफ हाऊसमधील प्रशिक्षणानंतर त्यांची प्रथम नियुक्ती ऑस्ट्रिया देशाची राजधानी व्हिएन्ना येथे दूतावासाचे तृतीय सचिव (थर्ड सेक्रेटरी टू एम्बसी) या पदावर करण्यात आली. १९५८ ते १९६२ या काळात गोखले यांनी पश्चिम जर्मनीमधील बर्न येथे अर्थ आणि वाणिज्य या विषयाचे प्रथम सचिव या पदावर काम केले. या कालावधीत आपल्या देशात दुसऱ्या पंचवार्षिक योजने अंतर्गत सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांची उभारणी करण्यात आली. त्यासाठी आपल्या देशाला परकीय गुंतवणुकीची आवश्यकता होती. त्यावेळी गोखले यांनी दाखवलेल्या राजनैतिक कौशल्यामुळेच, ओरिसामध्ये रुरकेला येथे उभारण्यात येणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील पहिल्या लोह-पोलाद कारखान्यासाठी पश्चिम जर्मनीकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळू शकली. १९६२ ते ६५ या काळात गोखले यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या पश्चिम युरोप विभागाचे उपसचिव या पदावर काम केले.

१९६५ मध्ये भारत सरकारने जॉर्डनमध्ये भारतीय दूतावास सुरू करण्याचे ठरवले. या दूतावासाच्या

उभारणीची संपूर्ण जबाबदारी अशोक गोखले यांच्याकडे देण्यात आली. तेथे त्यांची 'ॲम्बॅसेडर सी.डी.ए.' या पदावर जून १९६७ मध्ये नेमणूक झाली. नंतर अरब-इस्राईल यांच्यामध्ये ६ दिवसांचे युद्ध झाले. जॉर्डन हा अरब देश आहे. या युद्धात भारताचा इस्राईलला पाठिंबा होता. यामुळे भारताची भूमिका जॉर्डनला समजावून देण्याची खूप मोठी जबाबदारी गोखले यांनी पार पाडली.

१९६८ ते ७१ या काळात फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये गोखले यांची नियुक्ती काउन्सिलर या पदावर करण्यात आली. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धामध्ये फ्रान्सकडून पाकिस्तानला जो शस्त्रास्त्र पुरवठा करण्यात येत होता तो थांबवण्यासाठी गोखले यांनी भारतीय दूतावासामार्फत खूप प्रयत्न केले.

नंतर गोखले यांची भूतानमध्ये राजदूत म्हणून नियुक्ती करण्यात आली. या छोट्याशा देशाला विविध क्षेत्रांतील विकास कामासाठी भारतातर्फे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी गोखले यांच्यावर होती. चुखा हा नेपाळचा पहिला जलविद्युत प्रकल्प त्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला.

१९७४ ते ७७ या कालावधीत गोखले परराष्ट्र मंत्रालयाचे सहसचिव या पदावर कार्यरत होते. यावेळी त्यांच्यावर पश्चिम युरोप आणि संसद विभाग या पदांची जबाबदारी होती. संपूर्ण परराष्ट्र व्यवहारांचा समन्वय ठेवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी यावेळी अशोक गोखले यांनी पार पाडली. १९७४ मध्ये पोखरण येथे भारताने पहिली अणुचाचणी घेतली. त्यामुळे संपूर्ण जगभर विशेषत: युरोपीय देशांमध्ये भारताविरुद्ध प्रतिकूल वातावरण निर्माण झाले होते. परराष्ट्र मंत्रालयाच्या पश्चिम युरोप विभागाचे सचिव म्हणून युरोपियन देशांना भारताची भूमिका समजावून देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी गोखले यांनी पूर्ण केली.

गोखले यांच्या कारकिर्दीत 'इंडो-पोर्तुगीज ट्रिटि ऑफ रिझम्शन ऑफ डिप्लोमॅटिक रिलेशन' हा महत्त्वपूर्ण परराष्ट्र करार झाला. स्वातंत्र्यपूर्व भारतातील गोवा या राज्यावर पोर्तुगिजांचा अंमल होता. १९६१ मध्ये लष्करी कारवाई करून गोवा मुक्त करण्यात आला. त्यानंतर पोर्तुगालने नाराज होऊन भारतासोबतचे सर्व राजनैतिक संबंध तोडले होते. पण ३१ डिसेंबर १९७४ रोजी झालेल्या या कराराने पोर्तुगालने गोव्यावरील आपला हक्क जाहीरपणे सोडून दिला. पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष मारिओ यांनी भारताला भेट देऊन भारतासोबतचे राजनैतिक संबंध पुन्हा सुरू केले. १९७५ मध्ये आपल्या देशात राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्यात आली. लोकशाहीचे पुरस्कर्ते असणाऱ्या युरोपीय देशांमध्ये भारताविरुद्ध प्रतिकूल वातावरण निर्माण झाले. गोखले यांना यावेळी आपले राजनैतिक कौशल्य पणाला लावावे लागले. युरोपियन देशांसोबत परराष्ट्र व्यवहार सांभाळत असताना त्यांनी आणीबाणी विरुद्ध त्या देशांमध्ये निर्माण झालेली प्रतिकूल भूमिका सांभाळण्याचा प्रयत्न केला.

मार्च १९७७ मध्ये जनता सरकारच्या राज्यात अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री होते. त्यावेळी अशोक गोखले यांची नियुक्ती वॉशिंग्टनमध्ये अतिरिक्त सचिव म्हणून करण्यात आली. यावेळी अमेरिकेत राजदूत असलेल्या नानी पालखीवाला यांनी कार्यकाळ पूर्ण होण्याअगोदरच पद सोडले. त्यानंतर १३ महिने गोखले यांनी आपल्या पदावर काम करून राजदूताच्याही सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या. याच कालावधीत भारताने केलेली अणुचाचणी, आणीबाणी या कारणांमुळे अमेरिकेने भारताला अणुऊर्जा निर्मितीसाठी लागणारे समृद्ध युरेनियम खनिज देण्याचे नाकारले. परंतु गोखले यांच्या प्रयत्नांमुळे युरेनियमचा पुरवठा सुरू ठेवण्यात आला.

१९८० ते ८७ या काळात गोखले इराण, इस्लामिक प्रजासत्ताकामध्ये राजदूत या पदावर कार्यरत होते. १९८० ते ८९ या ९ वर्षांच्या कालावधीत इराण आणि इराक यांच्यामध्ये युद्ध झाले. यावेळी भारताकडे अलिप्त राष्ट्र चळवळीचे अध्यक्षपद होते.

ग

त्यामुळे आपण युद्धामध्ये कोणत्याही देशाची बाजू घेऊ शकत नव्हतो. भारत या देशांकडून दरवर्षी ३ दशलक्ष टन कच्चे तेल आयात करतो. युद्ध काळातही त्याचा पुरवठा सुरू राहावा यासाठी गोखले यांनी महत्त्वपूर्ण काम केले.

१९८७ मध्ये अशोक गोखले यांची नियुक्ती दिल्ली येथे परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव या पदी करण्यात आली. १९८७-८८ या एक वर्षाच्या काळात परराष्ट्र सेवा प्रशिक्षण संस्था दिल्लीचे प्रमुख म्हणून गोखले यांनी काम पाहिले. या संस्थेचा प्रशिक्षण कार्यक्रम गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. ऑक्टोबर १९८८ मध्ये अशोक गोखले परराष्ट्र मंत्रालय सचिव या पदावरून निवृत्त झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमा निर्माण करण्यामध्ये गोखले यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. परराष्ट्र सेवेतील आपले अनुभव अशोक गोखले यांनी 'इनसाइड थ्री मोनार्किज अँड सिक्स रिपब्लिक - मेमरिज ऑफ ॲन इंडियन डिप्लोमॅट' या आत्मचरित्रात शब्दबद्ध केले आहेत. भारतीय परराष्ट्र सेवेचा इतिहास आणि तसेच त्या देशातील राजकीय परिस्थिती आणि भारताची भूमिका जाणून घेण्यासाठी हे पुस्तक म्हणजे एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज आहे.

निवृत्तीनंतर १९८९ ते ९७ या काळात गोखले वरळी येथील हिंदुजा फाउण्डेशनचे अध्यक्ष होते. सध्या ते पुणे येथे स्थायिक झाले आहेत. नागरिक चेतना मंच, नॅशनल सोसायटी फॉर क्लिन सिटी अशा विविध सामाजिक उपक्रमांचे ते सदस्य आहेत.

— संध्या लिमये

## गोखले, केतन कमलाकर

**व्यवस्थापकीय संचालक - कोकण रेल्वे**

**२१ जून १९४७**



केतन कमलाकर गोखले यांचा जन्म बेळगाव येथे झाला. त्यांचे वडील केंद्र सरकारच्या रक्षालेखा विभागात (डिफेन्स अकाउंट सर्व्हिस) मध्ये नोकरीला होते. त्यांच्या आईचे नाव कालिंदी होते. नोकरीनिमित्त वडिलांच्या सातत्याने होणाऱ्या बदल्यांमुळे त्यांचे शिक्षण विविध ठिकाणी झाले. त्यांचे तिसरीपर्यंतचे शिक्षण लखनऊ येथे हिंदी माध्यमात झाले. चौथी ते नववीपर्यंतचे शिक्षण अहमदनगरमधील दादा चौधरी विद्यालयात मराठी माध्यमात झाले. तर नववी व दहावीचे शिक्षण त्यांनी १९६० ते ६२ पर्यंत कैरो येथे केले. १९६३ ते ६५ या कालावधीत त्यांनी दिल्लीमधून रामजास महाविद्यालयात शिक्षण घेतले तर १९६४ मध्ये पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये बी.ई. पूर्ण केले. त्यानंतर वडाळा येथील वीर जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट (पूर्वीचे व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट) मधून रचना अभियांत्रिकीमध्ये एम.ई. पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी वाणिज्य शाखेतील व्यवस्थापन शास्त्रातून पीएच.डी. पूर्ण केले. त्यांनी १९७० मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आणि १९७१ मध्ये त्यांची भारतीय रेल्वे वाहतूक सेवेसाठी निवड झाली.

रेल्वे स्टाफ कॉलेज, बडोदा येथील प्रशिक्षणानंतर त्यांची नियुक्ती साहाय्यक परिचालक अधीक्षक, माल वाहतूक या पदावर जबलपूर येथे करण्यात आली. भारतीय रेल्वे सेवेमध्ये केतन गोखले यांनी छत्तीस वर्षांच्या कारकिर्दीमध्ये कमर्शिअल, ऑपरेशन्स, सेफ्टी, जनरल मॅनेजमेंट संबंधातील महत्त्वाच्या पदांवर काम केले.

जून १९८२ ते १९८६ या कालावधीत गोखले वडोदरा येथील 'रेल्वे स्टाफ कॉलेज'मध्ये ऑपरेशन आणि रिसर्च त्याचबरोबर कमर्शियल मार्केटिंग मॅनेजमेंट या विषयासाठी वरिष्ठ व्यवस्थापक पदावरील



**कोकण रेल्वे**

अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करत असत. याच काळात ते आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे अभ्यासक्रम संचालकही होते.

मे १९८६ ते जून १९९१ या कालावधीत केतन गोखले सेंटर फॉर रेल्वे इन्फर्मेशन सिस्टिम्स येथे मुख्य प्रशिक्षण व्यवस्थापक या पदावर कार्यरत होते. रेल्वेमधील अधिकाऱ्यांना माहिती तंत्रज्ञान या विषयाचे अद्ययावत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी गोखले यांच्यावर होती. जून १९९१ ते जून १९९६ या काळात गोखले मुख्य व्यवस्थापक (दळणवळण) या पदावर कार्यरत होते. भारतीय रेल्वे यंत्रणेसाठीचे प्रवासी सेवा व्यवस्थापन (लिंक मॅनेजमेंट, क्रू मॅनेजमेंट) करण्याची जबाबदारी गोखलेंवर होती.

जून १९९६ ते ऑक्टोबर ९७ या कालावधीत गोखले यांनी चीफ ऑपरेशन मॅनेजर या पदावर मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पासाठी काम केले. १९९७ ते २००० या कालावधीत गोखले यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक या पदावर आग्नेय रेल्वे विभागात ओरिसा येथे काम केले. या विभागातील मनुष्यबळ विकास, कर्मचारी संघटना, मार्केटिंग सर्व्हिस अशा सर्वच विभागाच्या व्यवस्थापनाचे काम केले.

१९९९ मध्ये ओरिसामध्ये झालेल्या चक्रीवादळात गोखले यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य केले. गोखले यांनी अवलंबलेल्या आराखड्याचे (मॉडेल) सर्वत्र कौतुक करण्यात आले. तसेच रेल्वे स्टाफ कॉलेजच्या प्रशिक्षण कार्यक्रमात त्याचा समावेश करण्यात आला.

मे २००० ते जानेवारी २००५ या कालावधीत गोखले यांची नियुक्ती कोकण रेल्वे महामंडळाच्या संचालक पदावर करण्यात आली. त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय, नवीन संकल्पना अमलात आणल्या आणि कोकण रेल्वेला नफ्यात आणले.

गोखले यांनी 'रोल ऑन रोल ऑफ' सुविधा या योजनेचे काम हाती घेण्याअगोदर ही योजना पंच्याहत्तर लाख रुपये तोट्यात होती. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे कोलाड ते मंगलोर या मार्गावरून होणारी ट्रक वाहतूक रेल्वेच्या वॅगन्समधून करण्यात येऊ लागली. यामुळे मालवाहतूक सुलभ झाली व ट्रेनच्या एका फेरीत देशाचे तीन ते पाच लाख लिटर डिझेल वाचले. या योजनेचे यशस्वी नियोजन केल्यामुळे आता कोकण रेल्वेमार्गावर अशा पाच ट्रेन धावत आहेत. त्यामुळे कोकण रेल्वेचा कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला आहे.

कोकण रेल्वेमध्ये स्थानिक लोकांना रोजगार मिळावा यासाठी गोखले यांनी विशेष प्रयत्न केले. सर्व स्थानकांवरील ठेल्यांचे (स्टॉल्स) ठेके स्थानिकांना, विशेषत: महिला बचतगटांना देण्यात आली. रेल्वेमध्ये हापूस आंब्याच्या विक्रीसाठी स्थानिकांना परवाने देण्यात आले. रेल्वेच्या खानपान सेवेमध्ये स्थानिक पदार्थांचा समावेश करण्यात आला. गोखले यांनी कोकण रेल्वेच्या खानपान सुविधेचे आधुनिक पद्धतीने नियोजन केले. प्रवाशांना प्रथमच छापील 'मेनू कार्ड' देण्यात येऊ लागले. खानपान सेवेचे तीन वर्षांसाठी ठेके देण्यात आले. त्यामुळे खानपान ठेकेदारांना कार्यक्षम सेवा देण्याची संधी देण्यात आली. या सुविधांबाबत गोखले स्वत: प्रवाशांशी संवाद साधत असत. कोकण रेल्वेमधील स्वच्छता व्यवस्थेचे श्रेयही गोखले यांनी आखलेल्या योजनेलाच आहे. त्यासाठी त्यांनी चालू गाडीत सफाई

सुरू केली. त्याचा ठेकाही खानपान ठेकेदाराला देण्यात आला. गोखले यांनी स्थानकांवर ‘इलेक्ट्रॉनिक डिसप्ले’ सुविधा सुरू केली. प्रवाशांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात असा आदेश गोखले यांनी काढला. त्यामुळे प्रवाशांमध्ये निर्माण होणारा गोंधळ टळला.

रेल्वेमध्ये तसेच प्लॅटफॉर्मवर स्वच्छता असावी यासाठीही गोखले यांनी अनेक उपक्रम अवलंबले. एखाद्या ट्रेनमधून खानपान विभागातील लोकांकडून फलाटावर कचरा फेकला जात असेल तर गस्त विभागातील लोकांकडून ती माहिती तत्काळ पुढील स्थानकावर कळवण्यात येत असे. पुढील स्थानकावर ती ट्रेन थांबवून खानपान कंत्राटदाराकडून तात्काळ दोन हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात येत असे. फलाटावर थुंकणाऱ्या व्यक्तीस पकडून देणाऱ्याला पन्नास रुपये बक्षिस देण्यात येत असे. स्वच्छ स्थानक स्पर्धा घेतल्या जात असत. टेलिमेडीसिन ही गोखले यांची एक अभिनव योजना होय.

गोखले यांनी कोकण रेल्वेच्या कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना जागृत केल्यामुळेच ते आपल्या अनेक योजना पूर्ण कार्यक्षमतेने राबवू शकले. कर्मचाऱ्यांमध्ये त्यांनी कोकण रेल्वे महामंडळाप्रत आपलेपणाची भावना निर्माण केली. त्याचबरोबर एक चांगली कार्यसंस्कृती विकसित केली. त्यामुळेच भारतीय रेल्वेचा एक लहानसा भाग असणाऱ्या कोकण रेल्वेला आपले स्वतंत्र वैशिष्ट्य लाभले. कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक वाढवण्यासाठी गोखले यांनी भारतीय रेल्वेतील दक्षिण भारतातून उत्तरेकडे जाणाऱ्या गाड्यांची वाहतूक कोकण रेल्वे मार्गावरून व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. फेब्रुवारी २००५ गोखले यांनी कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक हे पद स्वीकारले.

१९९० मध्ये स्थापन झालेली कोकण रेल्वे ही कंपनी भारतीय रेल्वेत विलीन करावी असा केंद्राचा आग्रह होता कारण त्यामध्ये ५१% गुंतवणूक केंद्र सरकारने केलेली होती; तर ४९% वाटा महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा आणि केरळ या राज्यांचा होता. त्यामुळे राज्य सरकारेदेखील ही रेल्वे स्वतंत्र राहावी यासाठी फारशी राजी नव्हती. त्यावेळी गोखले यांनी पुढाकार घेऊन कोकण रेल्वे कंपनी वेगळी ठेवण्याचे फायदे सर्वांना समजावून दिले. यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांत समन्वय साधला. कोकण रेल्वा ही पुढील पंधरा वर्षे स्वतंत्र रेल्वे म्हणून राहावी यासाठी संमती घेतली. कोकण रेल्वे प्रशासनाने आंतररेल्वे विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये सर्वाधिक प्रावीण्य मिळवणाऱ्या संघासाठी २००९ पासून के. के. गोखले ट्रॉफी देणे सुरू केले आहे.

कोकणामध्ये होणाऱ्या मुसळधार पावसामुळे दरवर्षी कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प होत असते. काही वेळा अपघातही घडत असतात. हे टाळण्यासाठी गोखले यांनी कोकण रेल्वेसाठी पावसाळ्यातील वेगळे वेळापत्रक केले. रेल्वेचा वेग नेहमीपेक्षा कमी करण्यात आला. ज्यामध्ये रेल्वेचा कमाल वेग शंभर कि. मी. ते सत्तर कि. मी. करण्यात आला. अनेक समस्यांना तोंड दिल्यावर अखेरीस त्याला मान्यता मिळाली. अशा प्रकारे पावसाळ्यासाठी वेगळे वेळापत्रक बनवणे, भारतीय रेल्वेच्या इतिहासात प्रथमच घडत होते. कोकण रेल्वेमार्ग सुरक्षिततेसाठी गोखले यांनी खूप प्रयत्न केले. दरड कोसळणे टाळण्यासाठी गोखले यांनी रेल्वेमार्गावरील सर्व दरडींची स्वत: पाहणी केली. त्यातून शंभर धोकादायक ठिकाणे निश्चित करण्यात आली. एकशे पन्नास कोटी रुपये खर्च करून या ठिकाणांची पुन्हा बांधणी करण्यात आली. रेल्वेमार्गा शेजारच्या दरडींवर खस या गवताची लागवड करण्यात आली. त्यामुळे दरड कोसळण्याचे प्रमाण खूपच कमी झाले. जून २००७ मध्ये गोखले कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक या पदावरून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर गोखले पुण्यात स्थायिक झाले आहेत. त्यांनी पुणे विद्यापीठाचे बांधकाम आणि देखभाल यासाठी एक वर्ष सल्लागार म्हणून काम पाहिले. सध्या

ते महाराष्ट्र आणि गोव्यामधील धरणातील गळती नियंत्रणासाठी सल्ला देणे तसेच पाणी व्यवस्थापन या विषयाचे सल्लागार म्हणून काम पाहतात.

– संध्या लिमये

## गोखले, भालचंद्र कृष्णाजी

**आय. सी. एस., पहिल्या राष्ट्रपतींचे प्रथम सचिव**

**२३ जुलै १८९२ – १० ऑक्टोबर १९७३**



भालचंद्र कृष्णाजी गोखले यांचे शालेय शिक्षण पुण्यातल्या नूतन मराठी विद्यालयात तर पदवीपर्यंतचे शिक्षण फर्गसन महाविद्यालयात आणि इंग्लंडच्या केंब्रिज विद्यापीठात झाले. केंब्रिजमध्ये असतानाच १९१४ साली यांनी तत्कालीन ब्रिटिश राजवटीतील भारतीय नागरी सेवा (आय.सी.एस.) परीक्षा उत्तीर्ण केली.

त्यांचे वडील कृष्णाजी केशव गोखले ब्रिटिश राजवटीतल्या जत संस्थानात न्यायाधीश आणि प्रशासक (कारभारी) म्हणून नोकरीला होते. भालचंद्र गोखले यांनी इंग्लंडहून १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर ओरिसातल्या खुर्दा येथे जिल्हाधिकारी आणि सहायक न्यायाधीश या पदाचा कार्यभार यांनी स्वीकारला. यानंतर यांची नियुक्ती बिहारातील पुरूलियाचे जिल्हाधिकारी म्हणून झाली. काही काळातच यांनी छोटा नागपूरचे विशेष पुनर्वसन अधिकारी म्हणून सूत्र हाती घेतली. या पदावर असताना १९१८–१९२५ या सहा–सात वर्षात यांनी मानभूम जिल्ह्यासाठी महसूल आणि पुनर्वसनाचा खास अहवाल सादर केला. या प्रदेशासाठी हा अहवाल इतका उपयोगी ठरला की १९२८ मध्ये ब्रिटिश प्रशासनाने गोखले यांचा खास गौरव केला.

यानंतर बिहार शासनाने गोखले यांची प्रदेशाचे शिक्षण सचिव म्हणून नियुक्ती केली. ते काही काळ गयाचे जिल्ह्यात जिल्हाधिकारी होते. १९३७ मध्ये मुंगेर या जिल्ह्यात त्यांची नियुक्ती झाली. मुंगेरला असताना आपल्या देशप्रेमामुळे त्यांनी ब्रिटिश शासनाचा रोषही ओढवून घेतला होता. नंतर त्यांनी काही काळ प्रदेशाचे अर्थसचिव म्हणून काम पाहिले. १९४२ मध्ये गोखले यांची भागलपूर येथे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. यावेळी संपूर्ण देशभर ‘छोडो भारत’ चळवळ उसळली होती. तेव्हा गोखले यांनी संयम बाळगून पण खंबीरपणे परिस्थिती हाताळली.

नंतर बिहारमध्ये पटना येथे आयुक्त या पदावर १९४४ मध्ये गोखले यांची नियुक्ती झाली. हा काळ स्वातंत्र्यलढ्याचा असल्याने डॉ. राजेंद्र प्रसाद, जयप्रकाश नारायण आणि बाबू जगजीवनराम अशा अनेक राष्ट्रीय नेत्यांशी गोखले यांचा प्रशासक म्हणून संबंध आला. नंतर १९५० मध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद भारताचे पहिले राष्ट्रपती झाले तेव्हा त्यांनी आपले सचिव म्हणून आग्रहाने गोखले यांचीच निवड केली होती.

१९४३ मध्ये ब्रिटिश शासनाने सी.आय.ई. (कँपॅनियन ऑफ इंडियन एम्पायर) हा किताब देऊन गोखले यांचा गौरव केला. पुढच्या दोन वर्षांत यांना सी.एस.आय. (कँपॅनियन ऑफ दी स्टार ऑफ इंडिया) हा आणखी एक प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. याच सुमारास देशातल्या बहुतेक राज्यातल्या काँग्रेस सरकारांनी राजीनामे दिले होते. या कारणास्तव राज्यांचे प्रशासकीय प्रमुख म्हणून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी गव्हर्नर नेमले होते. परिणामी ओरिसाचे गव्हर्नर या पदावर सर हॉथोर्न लुईस यांची नेमणूक झाली होती. त्यांचे प्रशासकीय मदतनीस दोन अधिकारी सल्लागार नेमण्यात आले आणि गोखले हे त्यापैकी एक होते. या काळात गोखले यांनी ओरिसाच्या विकासासाठी योजना आलेख तयार केला होता. या योजनेत हिराकूड धरण, पारादीप बंदर विकास आणि ओरिसाची नवी राजधानी म्हणून

ग



भारत-नेपाळ दरम्यानचा त्रिभुवन रस्ता

भुवनेश्वरची जडणघडण यांचा समावेश होता. या योजनांमुळे गोखले ओरिसात लोकप्रिय झाले होते. भारत स्वतंत्र होण्याआधी काहीच महिने गोखले यांची दिल्लीत बदली झाली. नंतर स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील काकासाहेब गाडगीळ यांच्या सार्वजनिक बांधकाम, खाण आणि ऊर्जा मंत्रालयाच्या सचिवपदाची जबाबदारी गोखल्यांवर सोपवण्यात आली. या विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सिंचन आणि वीजनिर्मिती क्षेत्रातल्या अनेक बहुउद्देशीय प्रकल्पांचा पाया गोखले याच्या कारकिर्दीत रचला गेला. याशिवाय दिल्लीत आज जगभरच्या राजदूतांची कार्यालये असलेल्या चाणक्यपुरी विभागाची आखणी करण्यात गोखले यांचा मोठा सहभाग होता.

१९५२ मध्ये निवृत्तीनंतर जवाहरलाल नेहरू यांनी गोखले यांची नेपाळमध्ये भारताचे राजदूत म्हणून नियुक्ती केली. नेपाळला भूपृष्ठ वाहतुकीने भारताशी जोडणारा काठमांडूपासूनचा त्रिभुवन राजमार्ग तयार करण्यात गोखले यांचे महत्त्वाचे योगदान होते.

गोखले यांचे देशातल्या नदी-खोरे विकास या विषयावर चांगले प्रभुत्व होते. म्हणूनच भारतात परतल्यावर १९५५ मध्ये गोखले यांची तुंगभद्रा आंतरराज्य पाणी वाटप मंडळाच्या अध्यक्षपदावर नियुक्ती झाली. या प्रकल्पाअंतर्गत सिंचन आणि वीजनिर्मितीचा प्रस्ताव होता. भारत सरकारने १९५८-५९ मध्ये गोखले यांच्या नेतृत्वाखाली आंतरराज्य जलवाहतूक समिती स्थापन केली. या समितीच्या अहवालातल्या शिफारशी आजही महत्त्वाच्या मानल्या जातात. प्रकृतीच्या कारणास्तव गोखले यांनी १९६७ मध्ये तुंगभद्रा आंतरराज्य पाणीवाटप मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि ते सक्रिय सेवेतून निवृत्त झाले. गोखले यांनी पुण्यातल्या कर्वे सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि डेक्कन जिमखाना व्यवस्थापकीय समितीचे सदस्य म्हणूनही काम पाहिले. तसेच नदी खोरे विकास, शिक्षण, यांसारख्या विषयांवर भरपूर लेखनही केले. गोखले यांचे प्रदीर्घ आजाराशी झगडत असताना निधन झाले. यांचे पुत्र अशोक गोखले यांनी भारतीय परराष्ट्र सेवेत विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले.

– संपादित

## गोखले, शरच्चंद्र दामोदर

**भारतीय समाजकल्याण संस्था, आंतरराष्ट्रीय समाज विकास महामंडळ, आशिया व पॅसिफिक विभाग प्रमुख**

**२१ सप्टेंबर १९२५**



शरच्चंद्र दामोदर गोखले यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांच्या आईचे नाव वत्सला. त्यांचे वडील दामोदर वि. गोखले, हे नामवंत समाजसेवक आणि पत्रकार, केसरीचे संपादक होते. गोखले यांना बालपणीच मातृसुखाला पारखे व्हावे लागले. मात्र वडील बाबूराव, क्रांतिकारक काका नानासाहेब आणि आत्या यांनी त्यांच्यावर भरभरून संस्कार केले. त्यांचे घर ही एक सामाजिक संस्थाच होती. वडिलांच्या बरोबर त्यांना भरपूर वाचायला मिळाले. घराजवळच्या

न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग येथे त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. त्या शाळेच्या टिळक बालवीर कुलात ते होते. त्यामुळे त्यांची सामाजिक जाणीव आपोआप बळकट होत गेली.

तेथील स्काउट मास्तर वि. सी. भागवत हे एक असामान्य शिक्षक होते. घरात पत्रकारिता आणि राजकारण होतेच. १९४६ मध्ये फर्गसन महाविद्यालयातून अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांत त्यांनी बी.ए. पदवी मिळवली. पदवी मिळविल्यावर पुढे काय करावे याबद्दल दोन-तीन पर्याय होते. वकील होऊन राजकारणात पडावे, लंडनला जाऊन पत्रकारितेचे शिक्षण घ्यावे किंवा विकासाच्या कामात स्वत:ला झोकून द्यावे.

१९४२ ते १९४६ हा राजकीयदृष्ट्या फार नाट्यपूर्ण काळ होता. सर्व राजकीय पक्षांची माणसे त्यांच्या घरी येत असत. फर्गसन महाविद्यालयात प्रा. कोगेकर, प्रा. मावळंकर यांचा विद्यार्थ्यांवर मोठा प्रभाव होता. गोखले राजनीती आणि अर्थशास्त्राचे विद्यार्थी असले तरी मराठी साहित्याची आवड असल्याने प्रा. रा. श्री. जोग, पारसनीस, मोरे यांचेही ते शिष्य झाले. घरी येणाऱ्या मंडळींपैकी अच्युतराव पटवर्धन यांनी त्यांची जे. कुमारप्पा यांच्याशी गाठ घालून दिली. त्यांचे बंधू डॉ. जे. सी. कुमारप्पा हे त्या वेळी टाटा इन्स्टिट्यूटचे प्रमुख होते. त्यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर गोखले त्या इन्स्टिट्यूटमध्ये दाखल झाले.

टाटा समाजविज्ञान संस्थेत अभ्यास करणे हा एक वेगळाच अनुभव होता. या संस्थेतून १९४९ मध्ये त्यांनी एम.एस.डब्ल्यू.ची पदवी घेतली. पुण्याच्या मराठी वातावरणातून एकदम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वातावरणात नेणारा तो बदल होता. सर्व राज्यांतले, परदेशांतले विद्यार्थी व प्राध्यापक तिथे होते. मुंबईला डॉ. पी. व्ही. मंडलिक यांच्या घरी गोखले राहत असत. त्यांच्या घरी येऊन राहणाऱ्या साने गुरुजी, अरुणा असफअली अशांचा प्रभाव गोखले यांच्यावर पडला. देशाची फाळणी झाली त्या वेळी पंडित नेहरू यांच्या सांगण्यावरून निर्वासितांचे काम करण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूटमार्फत वीस विद्यार्थी व विद्यार्थिनींना दिल्ली व कुरुक्षेत्र येथे पाठविण्यात आले. त्या दरम्यान पंडित नेहरू, गांधीजी यांच्या भेटी होण्याचा योग आला. विद्यार्थी असतांनाच पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेने निर्वासितांच्या प्रश्नावर गोखले यांचे व्याख्यान ठेवले व बावीसाव्या वर्षी त्यांचा मोठा गौरव झाला. 'मौजे'च्या भागवतांनी त्यांच्या साप्ताहिकासाठी निर्वासितांच्या प्रश्नावर लेखमाला लिहायला सांगितली त्यातून 'निर्वासितांचा प्रश्न' हे पुस्तक निर्माण झाले. त्याला काकासाहेब गाडगीळांनी प्रस्तावना लिहिली. शिक्षण चालू असतांनाच मुंबईच्या रघुनाथराव आपटे या उद्योगपतींच्या मुलीशी, मालतीशी गोखले यांचा विवाह झाला.

टाटा इन्स्टिट्यूटमध्येच विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वतीने अभ्यागत प्राध्यापक म्हणून गोखले यांना एक वर्षासाठी निमंत्रित करण्यात आले. त्यावेळी इन्स्टिट्यूटकरिता भारतातील सुधार प्रशासन आणि गुन्हेगारी या विषयावर एक ग्रंथ प्राध्यापक जे. जे. पानाकल यांच्याबरोबर गोखले यांनी संपादित केला. सामान्य विज्ञानात डॉक्टरेट मिळविण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. इन्स्टिट्यूटमध्ये ती सोय नसल्याने बनारसच्या काशी विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट पूर्ण केली. ते शिकत असताना सरकारी समाजकल्याण खात्याचे उपसंचालक गोविंदराव हर्षे यांच्यामुळे ते त्या खात्यात दाखल झाले. पुण्याच्या रिमांड होमचा चीफ ऑफिसर म्हणून त्यांची नेमणूक झाली. हर्षे व के. डेव्हिस या इंग्रज बाईंनी महाराष्ट्रात रिमांड होमची चळवळ

CASP
COMMUNITY AID AND SPONSORSHIP PROGRAM

रुजविली. त्यांच्याबरोबर महाराष्ट्रभर फिरल्याने गोखले यांना एक वास्तव दृष्टिकोन मिळाला. याच काळात गोखले यांनी त्या खात्याचे ‘समाजसेवा’ नावाचे मासिक सुरू केले. या मुलांसाठीच्या कायद्यात बदल होण्यासाठी चळवळ करावी असा आग्रह गोखले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धरला. त्यावेळच्या चिंतनातून गोखले यांनी ‘नावडती मुले’ हे आपले दुसरे पुस्तक लिहिले. त्याला महाराष्ट्र शासनाचा व इतर मिळून पाच पुरस्कार प्राप्त झाले. पाठ्यपुस्तक म्हणून मान्यताही मिळाली. सर्व महाराष्ट्रातून या विषयावर बोलण्यासाठी गोखले यांना निमंत्रणे येत.

मुलांच्या या कामात रमलेले असताना अचानक सरकारी खलिता आला. मुंबईला भिक्षा प्रतिबंधनाचे व कुष्ठ निवारण्याचे काम सुरू करण्यासाठी शासनाच्या चेंबूर येथील संस्थेच्या प्रमुखपदी म्हणून गोखले यांची बढतीवर बदली झाली होती. त्यानुसार चेंबूरला कुष्ठरोग्यांच्या संस्थेत गोखले रहावयास गेले. तेथील अनुभव फारच वेगळे होते. गोखले पत्नी व मुलांना घेऊन कुष्ठधामात रहायला गेले हे त्यांच्या सासऱ्यांनाही आवडले नाही. पण मोठ्या निष्ठेने व निर्धाराने गोखले यांनी तेथे काम केले. दोनच वर्षात त्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेची (युनो) शिष्यवृत्ती मिळाली आणि इंग्लंड, नॉर्वे, स्कॅन्डिनेव्हिएन देश व इस्त्रायल येथे वर्षभर राहून त्यांनी अभ्यास केला. सर्वोत्तम परदेशी विद्यार्थी असा त्यांचा गौरव झाला. बी.बी.सी.वर त्यांची मुलाखत झाली. परदेशातून परत आल्यावर बढती मिळून साहाय्यक संचालक म्हणून त्यांची पुण्यास बदली झाली. मोठा अधिकार मिळाला पण काम पुष्कळसे कागदी असे. सरकारी बंधनांची जोखडबंदी त्यांना बोचू लागली होतीच. त्यामुळे भारतीय समाजकल्याण संस्था व आंतरराष्ट्रीय समाज विकास महामंडळ या संस्थांच्या आशिया व पॅसिफिक विभागाचा प्रमुख म्हणून त्यांची निवड झाल्याबरोबर गोखले यांनी सरकारी नोकरी सोडायचे ठरविले. तेथे काम करीत असतांना त्या क्षेत्रातील अनेक प्रमुख व्यक्तींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यातून १९७५ मध्ये ते आंतरराष्ट्रीय संस्थेमध्ये प्रशासक झाले. सर्व देशांत राष्ट्रीय समाजकल्याण महामंडळे स्थापन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्या दृष्टीने बांगलादेश, श्रीलंका, इराण, व्हिएतनाम अशा अनेक देशातून त्यांना कार्य करता आले. काही जागतिक परिषदा संघटित कराव्या लागल्या. जगातील सर्व खंडांतून आणि प्रमुख देशांतून जाण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. महामंडळाचे काम स्थिर झाले आहे असे लक्षात येताच १९८८ मध्ये त्यांनी त्या संस्थेचा राजीनामा दिला व पुढच्या काळात कोणतीही नोकरी न करता आपल्या आवडीने काम करावे असा निर्णय त्यांनी घेतला.

आंतरराष्ट्रीय वयोवर्धन संस्थेकडून आलेले निमंत्रण स्वीकारून डॉ. गोखले यांनी तिचे अध्यक्षपद स्वीकारले. त्या कामात साऱ्या जगातील वयोवर्धन संस्थांचे काम पाहण्याची वा तेथे नव्याने काम सुरू करण्याची संधी होते. दक्षिण आफ्रिकेतील पहिले कार्यालय त्यांनी सुरू केले. चीनमध्येही त्या संदर्भात बोलणी केली. भारतात पहिली जागतिक वयोवर्धन परिषद त्यांनी मुंबई व पुण्यामध्ये घेतली. याच सुमारास इंटरनॅशनल लेप्रसी युनियन स्थापन करण्याचे ठरले व अध्यक्ष म्हणून डॉ. गोखले यांची निवड झाली. त्याच काळात ते गांधी मेमोरियल लेप्रसी फौंडेशनचे अध्यक्ष झाले. मुंबईत काम करीत असतांना डॉ. गोखले यांच्या ध्यानात आले की अपंग कुष्ठरुग्ण यांच्या मुलांचा प्रतिपाळ कोणीच करीत नाही. त्यासाठी झालेल्या विचारमंथनातून कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम (कास्प) या संस्थेचा जन्म झाला. दोन मुलांपासून सुरू झालेला हा कार्यक्रम आता देशातील बारा राज्यात राबविला जात असून त्यामार्फत सुमारे साठ हजार मुलांच्या प्रतिपालनाची जबाबदारी घेण्यात आली आहे.

जयंतराव टिळक यांच्या सूचनेवरून गोखले यांनी केसरीचे संपादकपद स्वीकारण्याचे ठरविले आणि

त्यामुळे काही काळ कास्पचे अध्यक्षपद सोडले. ते संपादक असताना केसरीच्या जन्मशताब्दीचा मोठा समारंभ झाला. केसरीचे संपादक म्हणून त्यांना राजीव गांधीबरोबर युरोप, रशिया व चीनचा दौरा करता आला. केसरीचा निरोप घेतल्यावर प्रतापराव पवार यांच्या सूचनेवरुन सकाळ चॅरिटी ट्रस्टचे विश्वस्तपद डॉ. गोखले यांनी स्वीकारले. त्याच वर्षी पुणे विद्यापीठावर गव्हर्नरांचा प्रतिनिधी म्हणून त्यांची नेमणूक झाली. अलीकडे ते प्रामुख्याने कास्पचेच काम करीत असतात व त्यामुळे देश-विदेशात त्यांना भ्रमंती करावी लागते.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांनी त्यांची बऱ्याच समित्या, शिक्षण संस्था व प्रतिष्ठानांवर संचालक म्हणून नेमणूक केली आहे. या सर्व प्रवासात डॉ. गोखले यांच्या हातून इतरही अनेक कामे घडली. इंग्रजी मराठी मिळून त्यांची तीसहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

१९९८ सालचा कुष्ठकार्याविषयीचा आंतरराष्ट्रीय गांधी पुरस्कार त्यांच्या वाट्याला आला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेला संबोधित करण्याचा बहुमान जे. आर. डी. टाटा यांच्यानंतर डॉ. गोखले यांच्याकडेच आलेला आहे. वयोवर्धन क्षेत्रातील कामाबद्दल १९९६ मध्ये त्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने सन्मानपत्र देण्यात आले.

– सविता भावे

## गोखले, श्रीपाद गणेश

**महासंचालक – केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग**
**संचालक – लाचलुचपत विरोधी खाते**
**१ ऑगस्ट १९१६ – २२ मार्च २००४**


श्रीपाद गणेश गोखले यांचा जन्म मिरज येथे एका सुसंस्कृत कुटुंबात झाला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत प्रथमत: बी.ए.पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला. पुण्याच्या भावे स्कूलमध्ये १९३८ ते १९४३ पर्यंत त्यांनी शिक्षक



म्हणून नोकरी केली. त्याच वेळी इंग्रजीमधून एम.ए. पदवीसुद्धा घेतली. १९४३ ते १९४९ मध्ये त्यांनी इंडियन आर्मी ऑर्डनन्स कोअरमध्ये ऑर्डनन्स ऑफिसर म्हणून काम केले. १९४८ च्या मध्यात केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे एका विशेष निवड समितीतर्फे पोलीस सेवेसाठी अर्ज मागवण्यात येत होते. याद्वारे गोखले १९४९ च्या जानेवारीत जोखीम सेवेत रुजू झाले. प्रशिक्षणानंतर सुरत जिल्ह्यात सहायक पोलीस अधीक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यानंतर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी पालनपूर, सुरत, नाशिक, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी १९६२ पर्यंत काम केले. त्यानंतर नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण शाळा येथे त्यांची नेमणूक प्राचार्य पदावर झाली.

१९६४ पर्यंत प्राचार्य म्हणून काम केल्यावर १९६४ ते १९६६ मध्ये त्यांनी दिल्ली येथील केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग उपमहानिरिक्षक पद भूषविले. १९६६ ते १९७० औरंगाबाद येथे उपमहानिरिक्षकपदी काम केले. १९७० ते जून १९७१ लाचलुचपतविरोधी खात्याच्या संचालकपदी काम केले. जुलै १९७१ ते जानेवारी १९७२ दरम्यान त्यांनी पुणे पोलीस आयुक्त पद भूषविले. १ फेब्रुवारी १९७२ ते ३१ जुलै १९७४, अर्थात सेवानिवृत्तीपर्यंत त्यांनी हैदराबादच्या सरदार वल्लभभाई पटेल नॅशनल पोलीस अकॅडमीच्या संचालकपदाची धुरा सांभाळली. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्यही श्रीपाद गोखले यांनी विविध सामाजिक कार्यात हिरिरीने भाग घेऊन व्यतीत केले.

लहान गोष्टीतही स्पष्ट मुद्देसूद विचार करावा असे मार्गदर्शन आपल्या अधिकाऱ्यांना गोखले आपल्या कृतीतून देत असत. सुरुवातीच्या काळात गोखले यांच्या हाताखाली प्रशिक्षण मिळाल्याने जमाव नियंत्रित करताना लाठीहल्ला व गोळीबार करण्याचे




प्रसंग टाळता आल्याचेही अधिकारी सांगतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत नाना पाटील, आचार्य अत्रे अशा प्रमुख नेत्यांनी कोल्हापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीवर धडक मोर्चा काढण्याचे ठरविले होते. गोखले त्या वेळी कोल्हापूर येथे डी.एस.पी. होते. धक्काबुक्की, चेंगराचेंगरी अशा गोष्टी न होता मोर्चा अडविण्याची योजना त्यांनी तपशीलवार आखलेली होती; परंतु वरिष्ठांच्या हस्तक्षेपामुळे ती योजना त्यांना काही काळ बाजूला ठेवावी लागली. परंतु योग्य वेळ येताच मूळ योजना वरिष्ठांच्याच परवानगीने कार्यान्वित करून ती यशस्वीपणे पार पाडली. एखादी योजना नियोजनपूर्वक कशी पार पाडावी, याचे सुयोग्य उदाहरणच त्यांनी घालून दिले. हाताखालचे अधिकारी, तसेच अकॅडमीमध्ये येणारे ट्रेनी ऑफिसर्स यांना ते अतिशय सन्मानाने व प्रेमाने वागवीत. शिस्तीचे काटकोर पालन करावयास लावीत. सर्वांना समान न्याय हे त्यांचे तत्त्व होते.

हाताखालील अधिकाऱ्यास योग्य प्रकारे आपल्या कामाची माहिती करून देणे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांना निर्णयक्षम बनविणे, विचारपूर्वक योग्य निष्कर्ष घेण्यास प्रवृत्त करणे, कोणतेही काम समजून व सखोल झाले पाहिजे यावर भर देणे, प्रसंगी टिपणी तयार करणे या व अशा अनेक प्रकारांनी हाताखालील अधिकाऱ्यास आत्मनिर्भर बनविणे, अशा प्रकारे कार्य त्यांनी अविरतपणे केले.

नगरहवेली मुक्तिसंग्राम प्रसंगातही त्यांनी प्रसंगावधान राखून अवघड जबाबदारी पार पाडली होती. तसेच, १९५६ मध्ये जेव्हा मुंबई भाषिक राज्याची घोषणा झाली, तेव्हा सुरत येथे तणावपूर्ण भीती निर्माण झाली होती. तेथील काँग्रेस भवनावर द्विभाषिक विधेयक आंदोलकांचा रोष ओढवेल अशी परिस्थिती होती. या वेळी विलक्षण व्यूहरचना करून, पोलीस बळाचा कमीतकमी वापर करून गोखले यांनी योग्य कामगिरी केली. त्या योगे संभाव्य हिंसाचार टळून शांतता टिकून राहिली.

संपूर्ण पोलीस दल हे एक कुटुंब आहे व दलातील सर्वांनी एकोप्याने राहिले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्यानुसार ते सर्वांना सर्वतोपरी मदत करीत असत. नि:स्पृह, कर्तव्यनिष्ठ, तत्पर, स्वच्छ, धैर्यशील, दक्ष, उत्साही, स्पष्टवक्ते अशा प्रकारची त्यांची प्रतिमा जनमानसात झाली.

सेवानिवृत्तीनंतर दोन वेळा त्यांनी मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून काम केले. तसेच अनेक सामाजिक संस्थांवर त्यांनी अध्यक्ष म्हणून काम केले, उदा. कैद्यांच्या पुनर्वसनासाठी काम करणारी संस्था, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, औरंगाबाद शाखा, श्री संस्थान एकनाथ महाराज, पैठण येथे विश्वस्त.

गोखले यांच्या सहधर्मचारिणी इंदुमती यांनीही त्यांना सर्व गोष्टींत पाठिंबा दिला व कुटुंबाची संपूर्ण जबाबदारीही त्यांनी समर्थपणे पेलली होती.

– वसुधा विशाल कानडे

## गोगटे, माधव गणेश

**मुख्य वनसंरक्षक**

**१५ नोव्हेंबर १९४३**

माधव गणेश गोगटे यांचा जन्म मुंबई येथे झाला. मुंबई येथील अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलमध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. १९६४ मध्ये त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र या विषयांत बी.एस्सी.चे शिक्षण पूर्ण केले. तसेच तारापोरवाला मत्स्यालय मुंबईमधून त्यांनी एम.एस्सी. पूर्ण केले. वडील गणेश गोखले यांना ‘टॅक्सिडर्मी’ ही कला अवगत होती. त्यामुळेच माधव



यांनीही लहानपणापासून पक्षी-प्राणी हाताळले होते. वनांबद्दल, पशुपक्ष्यांबद्दल लहानपणापासूनच त्यांना प्रेम होते. १९६४ मध्ये महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या वनविभागाच्या परीक्षेत ते महाराष्ट्रात पहिले आले. १९६६ मध्ये वनसेवा ही अखिल भारतीय सेवा करण्यात आली. १९६८ मध्ये गोगटे यांनी परीक्षा दिली आणि त्यांची भारतीय वनसेवेमध्ये निवड झाली आणि त्यांची महाराष्ट्रात नियुक्ती करण्यात आली. १९६८-६९ या वर्षी ते परिविक्षाधीन अधिकारी म्हणून मेळघाटातील अत्यंत निबिड अशा कोट्टू या ठिकाणी कार्यरत होते. मेळघाटातील जैववैविध्य या काळात त्यांनी अभ्यासले. या अनुभवाचा त्यांना पुढील काळात खूप उपयोग झाला. वने म्हणजे फक्त वृक्षच नाहीत तर वनांसोबत वाढणाऱ्या इतर जीवसृष्टीचेदेखील आपण जतन केले पाहिजे, तरच आपण खऱ्या अर्थाने जैववैविध्य जोपासू शकतो हे तत्त्व गोगटे यांनी वन विभागातील आपल्या कार्यकाळात कसोशीने पाळले.

१९७२ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी माधव गोगटे यवतमाळमध्ये काम करत होते. या काळात त्यांच्या असे लक्षात आले की, दुष्काळाचा पहिला परिणाम सगळ्यांत आधी वनांतील चाऱ्यावर होतो. चाऱ्याअभावी दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना आपल्या गायी-गुरे विकावी लागतात, कसायाच्या हवाली करतात. त्यांना त्यामुळेच निसर्गत:च उपलब्ध होणाऱ्या गवती कुरणांचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. या दुष्काळाने त्यांचा वनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्यांनी ‘गवती कुरणांचे व्यवस्थापन’ या विषयावर सखोल अभ्यास केला. गवत नैसर्गिकरित्याच वाढू देणे, बी आल्यावरच त्यांची कापणी करणे यांमुळे चांगल्या प्रतीचे गवत नैसर्गिकरित्याच निर्माण होऊ शकते. अशा गवताचे पुनरुत्पादनाच्या दृष्टीने संवर्धन केल्यास आपण दुष्काळातदेखील टिकून राहू शकतो हे गोगटे यांनी संशोधनाने सिद्ध केले. त्याचबरोबर साठवणुकीच्या गवताचे आगीपासून संरक्षण करणे, अतिरिक्त चराईवर नियंत्रण मिळवणे ही कामेदेखील त्यांनी केली.

१९८० ते १९८४ या कालवधीत गोगटे डेहराडून येथील वन अनुसंधान केंद्रात वानिकिशास्त्राचे (सिल्विकल्चर) संशोधक म्हणून कार्यरत होते. या संशोधनाचा त्यांना नंतरच्या काळात मेळघाट व्याघ्रप्रकल्पात काम करताना खूप उपयोग झाला.

गवती कुरण व्यवस्थापनाच्या गोगटे यांच्या कामामुळेच १९८६-८७ च्या दुष्काळामध्ये वनविभागाकडून पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात चारा वनविभागाकडून उपलब्ध करून देण्यात आला. गोगटे यांच्या या कामाची दखल घेऊन भारत सरकारने ‘नॅशनल वेस्टलँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन’च्या माध्यमातून ‘नाशिकमधील गवती कुरणांचे व्यवस्थापन : एक यशोगाथा’ (ग्रीनिंग ऑफ ग्रास लँड इन नाशिक : अ सक्सेस स्टोरी) या पुस्तकाचे प्रकाशन केले. यावेळी गोगटे नाशिक येथे कार्यरत होते. योगायोग म्हणजे त्याच वेळी त्यांचे सहकारी कारभारी काशिनाथ चव्हाण (काका चव्हाण या नावाने परिचित) यांचा नाशिक येथील सामाजिक वनीकरण विभागात चराऊ-बंदी, कुऱ्हाड-बंदी हा उपक्रम सुरू होता.

१९८७ ते १९९१ या काळात गोगटे यांची नियुक्ती संचालक व्याघ्रप्रकल्प, मेळघाट या पदावर करण्यात आली. याकाळात त्यांनी तेथील जैववैविध्य या विषयावर अभ्यास केला. मेळघाटाच्या व्याघ्रप्रकल्पाकडे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून त्यापूर्वी पाहिले गेले नव्हते. गोगटे यांनी मेळघाट व्याघ्रप्रकल्पाच्या पर्यटन व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण काम केले. मेळघाटातील वनस्पतींच्या प्रजाती,



मेळघाट व्याघ्रप्रकल्पातील वाघ

पक्षीवैविध्य, स्थानिक कोरकू आदिवासींची जीवनपद्धती या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी मेळघाट व्याघ्रप्रकल्पाचा आराखडा तयार केला. तेथे पर्यटनासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची उभारणी केली. मेळघाटात पर्यटक फक्त वाघ पाहायला जायचे. परंतु गोगटे यांनी आपल्या प्रयत्नांतून मेळघाटातील जैववैविध्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधले. या महत्त्वपूर्ण योगदानामुळे माधव गोगटे यांना १९९२-१९९३ 'मेरिटोरियस सर्व्हिस फॉर टायगर कॉन्झर्व्हेशन' हा पुरस्कार देऊन भारत सरकारकडून गौरवण्यात आले.

१९९१-१९९५ 'वनसंरक्षक संशोधन' या पदावर पुणे येथे कार्यरत असताना गोगटे यांनी 'इकॉलॉजिकल ऑडिट ऑफ टीक प्लँटेशन' या विषयावर शास्त्रोक्त संशोधन केले. या संशोधनाबद्दल त्यांना वनसंशोधन क्षेत्रातील मानाच्या समजल्या जाणाऱ्या ब्रँडिस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार डेहराडूनच्या वनअनुसंधान केंद्राद्वारे प्रकाशित होणाऱ्या 'इंडियन फॉरेस्टर' या मासिकाकडून दिला जातो. या काळात सागाची लागवड करून त्याचे बॉण्ड विकणाऱ्या कंपन्यांचे जाळे महाराष्ट्रभर निर्माण झाले होते. याची सत्यता, त्यातून होणारा नफा यांबाबतही गोगटे यांनी संशोधन केले. या कामाबद्दल त्यांना १९९४ मध्ये 'इंडियन फॉरेस्टर' या मासिकाकडून चतुर्वेदी पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले.

'मुख्य वनसंरक्षक वन्यजीव' या पदावर १९९७ ते २००० या काळात गोगटे नागपूर येथे कार्यरत होते. यावेळी महाराष्ट्रातील सर्व अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने यांच्या व्यवस्थापनाचे महत्त्वाचे काम गोगटे यांच्याकडे होते.

व्याघ्रप्रकल्पातील माधव गोगटे यांच्या महत्त्वपूर्ण कामाबद्दल त्यांना 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या 'कॅट स्पेशालिस्ट ग्रूप' चे मानद सभासदत्व १९९२ मध्ये बहाल करण्यात आले.

'संचालक सामाजिक वनीकरण' या पदावर ते २००० ते २००२ पुणे येथे कार्यरत होते. नोव्हेंबर २००३ मध्ये माधव गोगटे मुख्य वनसंरक्षक वन्यजीव या पदावरून नागपूर येथून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर गोगटे यांनी वनसंवर्धन आणि संशोधन या क्षेत्राबद्दल वृत्तपत्रांमधून लिखाण सुरू केले. 'अॅग्रोवन' या वृत्तपत्रामध्ये त्यांनी वृक्षांची ओळख करून देणारी 'अॅग्रो फॉरेस्ट्री' या विषयावरील लेखमालिका वर्षभर चालवली. यामध्ये दर आठवड्याला एका वृक्षप्रकाराची लागवड, संगोपन, उपयोग, त्यातून मिळणारा आर्थिक नफा यांबाबतच्या शास्त्रीय माहितीचे लेखन केले जात असे. २००४ ते २००७ या कालावधीत ते 'सेवानिवृत्त वनकर्मचारी संघटनेचे' अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी पुणे येथे 'शहरातील वनीकरण' या विषयावर विविध उपक्रमांचे आयोजन केले. सामान्य माणसांमध्ये वनांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी या तीन वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांनी सातत्याने लिखाण केले. वनांबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन केले. त्यांचे वनव्यवस्थापन आणि संशोधन या विषयावरील तीनशेहून अधिक लेख वृत्तपत्रे, मासिके, संशोधन

प्रकल्प यांमधून आजवर प्रकाशित झाले आहेत. वन आणि जैववैविध्याच्या संवर्धनासाठी त्यांनी आपल्या संपूर्ण कार्यकाळात महत्त्वपूर्ण संशोधन केले. याबाबतच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित सल्लागार म्हणून ते ओळखले जातात.

डिसेंबर २००७ मध्ये जपानच्या 'जॅपनीज बँक फॉर इंटरनॅशनल ऑपरेशन' या बँकेने ओरिसा सरकारला सहाशे पन्नास कोटी वनव्यवस्थापनासाठी मदत दिली. या प्रकल्पाबाबत ओरिसा सरकारला सल्ला देण्यासाठी, तसेच ओरिसा सरकार हा प्रकल्प कशा प्रकारे राबवत आहे याचे निरीक्षण करणाऱ्या जपानच्या 'निप्पोन कोईका' या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेचे सल्लागार म्हणून गोगटे यांची नेमणूक झाली.

या प्रकल्पासाठी त्यांनी तीन वर्षे काम केले. सध्या ते पुणे येथे स्थायिक झाले आहेत.

– संध्या लिमये

## गोडबोले, माधव दत्तात्रेय

**केंद्रीय गृहसचिव, अर्थतज्ज्ञ**

**१५ ऑगस्ट १९३६**



आजच्या रायगड जिल्ह्यातील महाड येथे डॉ. माधव दत्तात्रेय गोडबोले यांचा जन्म झाला. त्यांचे वडील दत्तात्रेय बळवंत गोडबोले हे न्यायाधीश होते. साहजिकच, दर दोन ते तीन वर्षांनी त्यांची बदली होत असे. त्यामुळे गोडबोले यांचे शालेय शिक्षण कोरेगाव-दहिवडी-संगमनेर-जळगाव अशा विविध गावांत झाले. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात दोन वर्ष व्यतीत केल्यानंतर गोडबोले पुढे मुंबईला गेले आणि मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून १९५६ मध्ये ते बी.ए. झाले. पुढे अर्थशास्त्र हा प्रधान विषय घेऊन त्यांनी मुंबई विद्यापीठाची एम.ए. पदवी धारण केली. पदव्युत्तर शिक्षणानंतर गोडबोले यांनी मुंबई विद्यापीठातच प्रा. डॉ. पी. आर. ब्रह्मानंद यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेटसाठी नावनोंदणी करून संशोधनास प्रारंभ केला. परंतु त्याच दरम्यान, भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये त्यांची निवड झाल्याने १९५९ मध्ये गोडबोले यांना प्रथम नवी दिल्ली व पुढे मसुरी येथे जावे लागले आणि डॉक्टरेटच्या कामात खंड पडला. पुढे त्यानंतर तब्बल सतरा वर्षांनी म्हणजे १९७६ मध्ये डॉ. संदरेसा यांच्या मार्गदर्शनाखाली 'औद्योगिक अर्थकारण' या विषयावरील प्रबंधाचे काम गोडबोले यांनी पूर्ण केले. १९७८ मध्ये डॉक्टरेटची पदवी त्यांना प्रदान करण्यात आली.

मसुरी येथील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर गोडबोले यांची सातारा येथे साहाय्यक जिल्हाधिकारी पदावर १९५९ मध्ये पहिली नियुक्ती झाली. त्यानंतर १९६१ सालच्या मे महिन्यात अहमदनगर जिल्ह्याचे साहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून गोडबोले यांनी सूत्रे घेतली. त्यांच्या कार्यकालाची ती तीन-साडेतीन वर्षे बव्हंशी अवर्षणाची राहिल्याने जिल्ह्यात ठायी ठायी दुष्काळी कामे हाती घेण्याकडेच त्यांचा मुख्य भर राहिला. १९६४ सालच्या जून महिन्यात बढती मिळून नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने गोडबोले यांनी पदभार सांभाळला. लोकनियुक्त प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या दरम्यानच्या खडाजंगीबाबत नाशिक जिल्हा परिषद त्या काळी गाजत होती. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने सूत्रे हाती घेतल्यानंतर मात्र गोडबोले यांनी प्रगल्भतेने, पदाच्या प्रतिष्ठेचा बाऊ न करता लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या दरम्यान विविध पातळ्यांवर सुसंवाद आणि सामंजस्य प्रस्थापित होण्यासाठी पावले उचलली. नाशिक जिल्हा तेंव्हा टंचाईग्रस्त असल्याने गोडबोले यांनी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले. कालव्यांची बांधबंदिस्ती व पाझर तलावांच्या कामाला जोरदार चालना देण्यात आली. राज्यभर सर्वत्र या कामाची प्रशंसा झाली.




**माधव गोडबोले यांची काही गाजलेली पुस्तके**

खासगी सावकारीच्या जोखडातून जिल्ह्यातील आदिवासींची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने आदिवासींना तगाई तसेच खावटी कर्जांचे वाटप करण्याचा उपक्रमही गोडबोले यांनी नेटाने राबविला. रस्ते, शाळा, प्राथमिक आरोग्याच्या सुविधा जिल्ह्याच्या आदिवासी पट्ट्यात जोमाने प्रवर्तित करण्याबाबतही गोखले यांनी पुढाकार घेतला.

नाशिक येथील दोन वर्षांच्या कार्यकालानंतर गोडबोले यांची केंद्र सरकारच्या उद्योग मंत्रालयात नियुक्ती झाली. दिल्लीत जाऊन मंत्रालयात पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच मॅसेच्यूसेट्स् येथील विल्यम्स महाविद्यालयात ‘विकासाचे अर्थशास्त्र’ हा ज्ञानशाखेतील एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिष्यवृत्ती बहाल करून सरकारने गोडबोले यांची पाठवणी केली. अभ्यासक्रम पूर्ण करून भारतामध्ये परतलेल्या गोडबोले यांची नियुक्ती तत्कालीन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिगत सचिव म्हणून झाली. १९६८ ते १९७० या काळात गृहमंत्री म्हणून तर, १९७० ते १९७२ दरम्यान अर्थमंत्री म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळात असलेल्या यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिगत सचिव या नात्याने गोडबोले नवी दिल्ली येथेच कार्यरत होते.

पुढे केंद्रीय अर्थमंत्रालयातील अठरा महिन्यांची नियुक्ती १९७२-७३ मध्ये पूर्ण करून परतलेल्या गोडबोले यांची महाराष्ट्र सरकारने राज्याच्या उद्योग मंत्रालयात संयुक्त सचिव या पदावर १९७३ सालच्या जून महिन्यात नियुक्ती केली. राज्यात उद्योगांचे स्थानांकन करण्याबाबतच्या सर्वंकष धोरणाची निर्मिती, त्या वेळी, गोडबोले यांच्या धुरिणत्वाखाली केली गेली. १९७४ सालच्या डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध झालेले ते धोरण व्यापक स्तरावर नावाजले गेले. उद्योगांच्या स्थापनेबाबत एक सुसूत्रमय धोरण राज्याच्या पातळीवर आखले जाण्याचा आद्य प्रयोग महाराष्ट्रात साकारला. १९७५ सालातील एप्रिल महिन्यात महाराष्ट्र राज्याचे उद्योग आयुक्त म्हणून गोडबोले यांनी सूत्रे स्वीकारली. परंतु, त्यानंतर केवळ चारच महिन्यांनी, म्हणजे १९७५ सालच्या ऑगस्ट महिन्यात, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे सचिव म्हणून महाराष्ट्र सरकारने गोडबोले यांची नेमणूक केली. यशवंतराव चव्हाण आणि शंकरराव चव्हाण या दोन भिन्न वृत्ती-प्रवृत्तीच्या महनीय व्यक्तींचे सचिव म्हणून गोडबोले यांची केली गेलेली नियुक्ती गोडबोले यांच्या व्यक्तिमत्त्वातील सडेतोड, निःस्पृह, कर्तव्यदक्ष आणि नेमून दिलेल्या कामाशी प्रांजल बांधिलकी जपणाऱ्या प्रशासकावर प्रखर झोत टाकणारी आहे. डॉक्टरेटच्या प्रबंधाचे काम पूर्ण करण्यासाठी १९७६ सालच्या एप्रिल महिन्यात गोडबोले रजेवर गेले.

डॉक्टरेटच्या प्रबंधाचे काम संपवून आलेल्या गोडबोले यांची महाराष्ट्र सरकारने १९७६ सालच्या जुलै महिन्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. राज्याच्या ऊर्जा खात्याचे सचिव पदही त्यांच्याकडेच सुपूर्त करण्यात आले. राज्य विद्युत मंडळाचे अध्यक्ष या नात्याने गोडबोले यांनी बजावलेली कामगिरी खरोखरच स्पृहणीय ठरली. राज्यात त्या वेळी विजेचा तुटवडा होता. १९७४-

७५ च्या दुष्काळापायी जलविद्युतनिर्मितीच्या आघाडीवर गंभीर परिस्थिती होती. वीजक्षेत्रात गुंतवणुकीची आबाळ त्याआधी काही वर्षे होतीच. ही सगळी दुरवस्था पालटून टाकण्यासाठी गोडबोले यांनी नियोजनबद्ध पावले उचलली. मुख्य म्हणजे, राज्याच्या वार्षिक योजनेतील किमान तीन टक्के निधी उर्जा विभागासाठीच राखीव ठेवण्याबाबत सरकारचे मन वळविण्यात गोडबोले यांना यश आले. वाढीव निधीच्या जोडीनेच विद्युत मंडळाचे कामकाज, रचना, प्रशासन व मनुष्यबळाचीही फेररचना घडवून आणण्याचा उपक्रम गोडबोले यांनी राबविला. वीजनिर्मिती तसेच वीज वहनाच्या पायाभूत सेवासुविधांचे जाळे वाढविण्यावर त्यांनी भर दिला. या विविधांगी उपाययोजनांचे अपेक्षित असे सकारात्मक परिणाम विद्युत मंडळाच्या कारभारात तसेच ताळेबंदात प्रतिबिंबित होऊ लागले. मात्र, राज्य विद्युत मंडळाच्या विविध कामांसाठी दिल्या जाणाऱ्या कंत्राटांच्या वितरणात हस्तक्षेप करू पाहणाऱ्या तत्कालीन उद्योगमंत्र्यांना, नियमांच्या चौकटीत राहून, खंबीर विरोध केल्याबद्दल राज्य विद्युत मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा डॉ. गोडबोले यांच्याकडे मागण्यात आला. अर्थात, त्यासाठी आधार घेण्यात आला तो शुद्ध तांत्रिक अशा प्रशासकीय कारणवजा तरतुदीचा!

‘कुशल आणि कल्पक अर्थ प्रशासक’ अशी डॉ. गोडबोले यांची ख्याती आणि प्रतिमा निर्माण झाली ती महाराष्ट्राचे अर्थसचिव या नात्याने. नोव्हेंबर १९८५ ते डिसेंबर १९८९ या काळात त्यांनी बजावलेल्या स्मरणीय कामगिरीमुळे. त्यापूर्वी, दोन वर्षे केंद्रीय अर्थखात्यात आणि १९८० ते १९८५ या काळात आशियाई विकास बँकेत डॉ. गोडबोले हे कार्यरत होते. महाराष्ट्र राज्याच्या अर्थखात्याचे सचिव म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. गोडबोले यांचे नाव सर्वतोमुखी झाले ते २८ ऑक्टोबर १९८६ रोजी त्यांनी कार्यवाहीत आणलेल्या ‘शून्याधारित अर्थसंकल्प’ या संकल्पनेमुळे. सरकारच्या खर्चाचा, विविध कार्यक्रम, उपक्रम, योजना व अभियानांसाठी करण्यात आलेल्या वित्तीय तरतुदींचा प्रत्येक अर्थसंकल्पाच्या वेळी नव्याने आढावा घेणे हे ‘झीरो बेस बजेटिंग’ चे गाभा वैशिष्ट्य. खर्चाची व निधीच्या वापराची कार्यक्षमता, उत्पादकता आणि प्रस्तुतता या तीन निकषांच्या आधारे हे मूल्यमापन काटेकोरपणे करावयाचे आणि या निकषांच्या कसोटीस न उतरणाऱ्या योजना बंद करून त्या योजनांसाठी पुरविलेला पैसा व मनुष्यबळ यांचे विनियोजन अन्यत्र करावयाचे ही शून्याधारित अर्थसंकल्पाची कार्यपद्धती. या व्यवस्थेचे सकारात्मक लाभ व्यवहारात दिसत असतानाही, योजनांचे पुनर्विलोकन, सरकारी नोकरभरतीवरील बंदी अशी या संकल्पनेची काही उपांगे राजकीय दृष्ट्या गैरसोयीची असल्याने राज्यात नेतृत्वबदल झाल्यानंतर ‘शून्याधारित अर्थसंकल्पा’च्या कार्यवाहीस पूर्णविराम देण्यात आला. त्यानंतर डॉ. गोडबोले रजेवर गेले.

महाराष्ट्राच्या अर्थखात्याचे सचिवपद सांभाळत असतानाच केवळ राज्यच नाही तर देशाच्या कॉर्पोरेट विश्वातील एका बलाढ्य, धनाढ्य आणि सरकारच्या आर्थिक-औद्योगिक धोरणांवर प्रभाव टाकणाऱ्या एका आक्रमक उद्योग समूहाशी डॉ. गोडबोले यांचा संघर्ष झडला.

राज्याच्या मागास विभागात व्यवसाय स्थापणाऱ्या उद्योगांसाठी असणाऱ्या प्रोत्साहक योजनेतील विक्रीकर विषयक काही वाढीव सवलती आपल्याला मिळाव्यात अशी त्या उद्योगसमूहाची अर्जविनंती संबंधित योजनेतील तरतुदींच्या चौकटीत बसत नसल्याने डॉ. गोडबोले यांनी अमान्य केली. ही विनंती मान्य व्हावी, यासाठी त्या उद्योगसमूहाने प्रथम राजकीय पातळीवरून दबाव आणला. त्यानंतर प्रलोभने दाखविली व शेवटी जिवाचे बरेवाईट करण्याच्या धमक्या गोडबोले यांना देण्याची व्यवस्था करण्यापर्यंत मजल गाठली. पुढे १९८९ सालच्या

ग

डिसेंबर महिन्यात केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतर, डॉ. गोडबोले यांची त्या पदावरून गच्छन्ती व्हावी यासाठी तोच उद्योगसमूह वरिष्ठ पातळीवरून सक्रिय बनला.

केंद्रीय नगरविकास खात्याच्या सचिव पदाचा कार्यभार १९९१ सालच्या एप्रिल महिन्यात स्वीकारलेल्या डॉ. गोडबोले यांची केंद्रीय गृहसचिव पदावर सरकारने ४ ऑक्टोबर १९९१ रोजी नियुक्ती केली. राष्ट्रीय शहरी व गृहनिर्माण व अनिवासी भारती यांच्या गुंतवणुकीसंबंधातील धोरण आखण्यात त्यांचा सहभाग होता. बाबरी ढांचा पाडण्याचे प्रकरण डॉ. गोडबोले यांच्या गृहसचिवपदाच्या कार्यकालादरम्यानच घडले. बाबरी ढांचाचा विध्वंस आणि त्यानंतर देशाच्या विविध भागांत उसळलेल्या हिंसाचाराचे खापर गृहसचिवांच्या माथ्यावर फोडण्याची रीतसर मोहीमच जणू हाती घेण्यात आली. त्यासाठी माध्यमांतील काही घटकांनाही हाताशी धरले गेले. या सगळ्या अपप्रचाराला आणि ‘वड्याचे तेल वांग्यावर’ काढण्याच्या प्रवृत्तीला विटून, अखेर २३ मार्च १९९३ रोजी डॉ. माधव गोडबोले यांनी भारतीय प्रशासकीय सेवेचा राजीनामा सादर केला व प्रशासकीय सेवेमधून रीतसर निवृत्त होण्यास सुमारे दीड वर्षाचा कालावधी असताना मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्ती घेतली.


याचबरोबर भारतीय लोकशाहीविषयक माधव गोडबोले यांनी विपुल लेखन केले आहे. ‘इंडियाज् पार्लमेंटरी डेमॉक्रसी ऑन ट्रायल’ तसेच भारतीय न्यायव्यवस्थेवर ‘ज्युडिशिअरी ॲण्ड गव्हर्नन्स इन इंडिया’ ही त्यांची महत्त्वाची पुस्तके आहेत. ‘द होलोकास्ट ऑफ इंडियन पार्टिशन ॲण्ड इन्क्वेस्ट’ हे पुस्तक फाळणीबाबत असून पब्लिक अकाउंटॅबिलिटी ॲण्ड ट्रान्स्फरन्सी : द इम्परेटिव्हज् ऑफ गुड गव्हर्नन्स’ हे अभ्यासपूर्ण पुस्तकसुद्धा प्रसिद्ध आहे.

– अभय टिळक

## गोळे, पद्माकर विश्वनाथ

**भारतीय रेल्वे सेवा**

**७ डिसेंबर सन १९२२**



पद्माकर विश्वनाथ गोळे यांचा जन्म इंदौर येथे झाला. त्यांचे वडील हे इंदौरमधील होळकर महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक होते. आई कमलाबाई घरी मुलांना स्वयंशिस्तीचे धडे देत असेत. त्यांचे आजोबा गोपाळ शिवराम गोळे हे इंदौर संस्थानात जिल्हा न्यायाधीश होते तर आजोबांचे बंधू महादेव शिवराम गोळे हे फर्गसन महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. गोळेंचे दहावीपर्यंतचे शिक्षण इंदौरलाच झाले. त्यानंतर १९३८ मध्ये अकरावी–बारावीसाठी त्यांनी पुण्यात सर परशुरामभाऊ महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९४० मध्ये बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी (सिव्हील इंजिनिअरिंग) प्रवेश घेतला. १९४३ मध्ये अर्थात वयाच्या एकवीसाव्या वर्षी ते अभियांत्रिकी उत्तीर्ण झाले आणि त्याच वर्षी त्या काळी घेतली जाणारी फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशनची परीक्षा उत्तीर्ण झाले व त्यांची आय.आर.एस.ई. म्हणून रेल्वेत निवड झाली.

त्यांची पहिली नियुक्ती सिकंदराबाद येथे झाली. या परिसरात नद्यांवरील रेल्वे पूल वाहून जाण्याचे प्रकार नेहमी घडत असत. पूल वाहून गेल्यानंतर रेल्वे सेवा एक एक महिना विस्कळीत व्हायची व जनजीवन ठप्प व्हायचे. एका पावसाळ्यात वेरूर नदीवरील महत्त्वाचा रेल्वे पूल वाहून गेला आणि रेल्वेसेवा विस्कळीत झाली. किमान एक महिना तरी व्यवहार बंद राहणार होते. तेव्हा गोळेंनी नदीवर हंगामी गाईडर्स टाकले आणि अवघ्या दहा दिवसात रेल्वेसेवा सुरळीत चालू केली. त्यानंतर मुख्य पुलाच्या उभारणीला सुरुवात झाली. अशा प्रकारची महत्त्वपूर्ण कामगिरी रेल्वेच्या




इतिहासात पहिल्यांदाच घडत होती. गोळे कर्तव्यदक्ष व प्रखर राष्ट्रभक्त आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताची सैनिक व्यवस्था सबल करण्यासाठी इतर शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनाही स्वयंसेवक म्हणून काम करता येत असे. गोळे रेल्वेच्या टेरिटोरियल आर्मीत स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले आणि त्यांना त्यांचे कर्तृत्व दाखवून देण्याची संधीही चालून आली. कारण त्याच दरम्यान १९७१च्या लढाई नंतर बांगलादेशाची निर्मिती झाली. यावेळी बंडखोरांनी रेल्वेची अतिशय नासधूस केली होती. तेथील रेल्वे रुळ व रेल्वे पूल उभारण्यात आणि रेल्वे सेवा पूर्वपदावर आणण्यात त्यांनी सहभाग घेतला.

बांगलादेशवाद्यांचा सशस्त्र हल्ला होत असल्याने रेल्वे मार्ग उखडले जात होते. पकडले जाणाऱ्या बांगलादेशवाद्यांना रेल्वेने आग्र्याला आणून सोडण्याचे महत्त्वपूर्ण काम गोळे यांच्या नेतृत्वाखालील गटाने यशस्वीरीत्या पार पाडले. रेल्वे मार्ग उखडल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. हे रेल्वेमार्ग व्यवस्थित करण्याचे काम गोळेंकडे सोपविण्यात आले. त्यासाठी त्यांना फक्त १५ दिवसांचा अवधी देण्यात आला होता. हे काम चालू असताना दहशतवाद्यांनी पेरून ठेवलेल्या भूसुरूंगाचे स्फोट होऊन त्यांचे सहकारी जखमीही होत होते पण गोळे मागे हटले नाहीत आणि त्यांनी हे काम अवघ्या १० दिवसात पूर्ण केले. बंगाली जनतेला आपापल्या गावी परत जाण्यासाठी व सैन्याला जलद हालचाली करण्यासाठी या रेल्वेमार्गाचा मोठा उपयोग झाला. रेल्वे सेवेत असताना सैन्याच्या खांद्याला खांदा लावून केलेल्या या कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने ‘अतिविशिष्ट सेवा पुरस्कार’ देऊन सन्मानित केले.

तसेच त्यांची एअर इंडियाच्या संचालकपदी नियुक्ती करून त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवण्यात आला. ते एअर इंडियात येण्याअगोदर या संस्थेची स्थिती अतिशय वाईट झालेली होती. वैमानिक आणि कामगार संघटना मनमानी करत होत्या. अवास्तव मागण्या केल्या जात होत्या आणि त्यामुळे एअर इंडियाची व्यवस्थापन समिती प्रचंड तणावात होती.

अशा मागण्यांसाठीच सर्व वैमानिकांनी बेमुदत संप पुकारला. विमान वाहतूक विस्कळीत झाली. वैमानिकांच्या अवास्तव मागण्या मान्य करणे एअर इंडियाला कधीच शक्य नव्हते. अशा परिस्थितीत गोळेंची संचालकपदी झालेली निवड ही एअर इंडियासाठी संजीवनीच ठरली.

गोळेंनी संप केलेल्या सर्व वैमानिकांना निलंबित केले. नवीन वैमानिकांची भरती सुरू केली.

याच दरम्यान इंग्लंडमध्ये कडक अशा मार्गारेट थॅचर यांचे सरकार आले होते. त्यांच्या प्रशासनाने एअर इंडियाच्या लंडनमधील कर्मचाऱ्यांना बंद पुकारूच दिला नाही. त्यामुळे वैमानिकांचा हा बंद सपशेल फसला. त्यांच्या मागण्या मान्य करणे सोडाच उलट गोळेंनी व्यवस्थापनाच्याच अटी संघटनेला मान्य करायला लावल्या.

गोळे हे १९७८ साली एअर इंडियातून निवृत्त झाले व पुण्यातच कायमचे स्थायिक झाले. निवृत्तीनंतर त्यांनी प्रदीप वाघ या शिक्षणतज्ज्ञाबरोबर उद्योजक विकास संस्थेमार्फत शिक्षण क्षेत्रात काम केले. आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्यात यावे यासाठी ते सदैव आग्रही राहिले. २००० साली महाराष्ट्र शासनाने त्यांची ही मागणी मान्य केली व शिक्षणात तांत्रिक शिक्षणाचा अंतर्भाव केला.

सध्या अठ्ठ्याऐंशीव्या वर्षी गोळे यांचा पुण्यात मुक्काम आहे.

– दत्ता कानवटे

* * *

# च



## चव्हाण, कारभारी काशिनाथ

**संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, सुबाभूळ, सामाजिक वनीकरणाचे प्रणेते**

**२० जुलै १९३७**



कारभारी काशिनाथ चव्हाण ऊर्फ काका चव्हाण यांचा जन्म मालेगाव तालुक्यातील खडकी या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव शारदाबाई होते. वडिलांची फक्त विहिरीवर अवलंबून असलेली एक एकर शेती होती. परिणामी, चरितार्थासाठी या कुटुंबाला रोजंदारीवर शेतमजूर म्हणून काम करणे अपरिहार्य होते. कारभारी यांच्या घरातले सगळेच अशिक्षित होते. वडिलांनी कारभारींना चवथीपर्यंत असलेल्या स्थानिक शाळेत दाखल केले.

पुढील शिक्षणासाठी ते शाळेसाठी मालेगावात आले. काकांची आर्थिक क्षमता नसल्याने मालेगावच्या शिक्षकांनी त्यांची फी भरून वसतिगृहाच्या दैनंदिन कामाच्या मोबदल्यात विमुक्त मुलांच्या वसतिगृहात राहण्याची सोय केली. हे वसतिगृह शाळेपासून चार किलोमीटर अंतरावर असल्याने काकांना रोज आठ किलोमीटर अंतर चालावे लागत असे. प्रतिकूल परिस्थितीतही काका जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवून शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. मुळातच संशोधनाची आवड असल्याने काकांनी रोजच्या पायी चालण्याचा उपयोग निसर्गाचे बारकाईने निरीक्षण करण्यासाठी केला. या शोधवृत्तीचा फायदा त्यांना शासकीय वनसेवेत झाला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी पाचशे रुपये कर्ज काढून काकांनी पुण्याच्या कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतला. कृषी विषयात बी. एस्सी. पदवी घेतल्यानंतर पदवीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड म्हणून चव्हाणांनी भाऊसाहेब हिरे यांच्या शेतकी शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली. या काळात डेहराडूनच्या संस्थेत त्यांची निवड होऊन ते १९६१ मध्ये वनसेवेत रुजू झाले.

चव्हाणांनी अनेक छोटे पण सर्वांगांनी समाजोपयोगी प्रकल्प कार्यान्वित केले. त्यांची निरीक्षण वृत्ती आणि त्यावर आधारित संशोधनाची आवड यांमुळे त्यांनी अनेक उपकरणांचा विकास केला.

ग्रामीण भागात आजही जळणाचे इंधन म्हणून बेकायदेशीर जंगलतोड झाल्याने वनांचा ऱ्हास होतो. यावर ‘वनज्योती शेगडी’ हा उत्तम पर्याय चव्हाणांनी विकसित केला. एका पत्र्याच्या पिंपात ही शेगडी बनवली जाते. या शेगडीच्या मध्यावर एक पी.व्ही. सी. पाइप उभा केला जातो. पाइपाभोवती पालापाचोळा घट्ट दाबून बसवला जातो. नंतर पाईप काढून शेगडीच्या खाली असलेल्या छिद्रात पेटते लाकूड घालून शेगडी प्रज्वलित केली जाते. या शेगडीवर बरेच तास स्वयंपाक करूनही आतला पालापाचोळा बऱ्याच प्रमाणात शिल्लक राहतो.

चंद्रपूर जिल्ह्यात सागाच्या वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात होते. पारंपरिक पद्धतीने ही लागवड करणे हे अतिशय त्रासदायक काम असते. काका चव्हाणांची १९७७ मध्ये चंद्रपूरला नियुक्ती झाली आणि त्यांनी हे काम अगदी सोपे करण्याचा उपाय शोधून काढला.



**सामाजिक वनीकरण**

मोठे खड्डे खणून लागवड करण्याऐवजी छोट्या खड्ड्यांसाठी त्यांनी इंग्रजी 'एफ' आकाराचे उपकरण तयार केले. हे उपकरण जमिनीत खोचायचे आणि धग देऊन ते जमिनीत दाबायचे व त्याने तयार झालेल्या खड्ड्यात सागाची रोपे किंवा बियाणे पेरायचे असे हे तंत्र विकसित झाले. परिणामी, जुन्या पद्धतीने एक कामगार दिवसाला जर तीनशे रोपे लावत असेल, तर नवीने तंत्राने हाच आकडा सहाशेच्या वर गेला.

लागवडीसाठी असलेल्या रोपांची लगेच लागवड केली नाही तर ती वाळून जातात. यावर काका चव्हाणांना शेतकऱ्यांच्या एका गटाकडून अचानक उपाय मिळाला. हा गट रोपांना हळद, कापूर आणि हिंग यांचे मिश्रण केलेल्या पाण्यात रोपे भिजवून काढत असे, ज्यामुळे ती खूप दिवस ताजीतवानी राहत. काकांनी याचा उपयोग औरंगाबादला केला आणि हजारो रोपे लावली. आजही त्यांचे हे क्षेत्र हिरवेगार दिसते.

बुलढाण्याला त्यांनी जनावरांचे खाद्य असलेल्या गवताचे उत्पादन वाढवले आणि राज्याची मागणी पूर्ण करून तिथले गवत दुष्काळग्रस्त गुजरातला पुरवले. यात आर्थिक फायदा तर झालाच; पण स्थानिक लोकांनाही चांगले उत्पन्न मिळाले.

शासनाने काकांची बदली गोंदियाला केली. गोंदिया हा घनदाट जंगलाचा भाग! तिथे फार मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत होती. तातडीचा उपाय म्हणून त्यांनी फिरत्या जीपने गावांत जाऊन ध्वनिवर्धक लावून 'जंगल तोडू नका' असे आवाहन ग्रामस्थांना केले. हा उपक्रम 'वनवाणी' म्हणून नावाजला गेला.

याच भागातल्या कोळसा खाणींना उत्पादन प्रक्रियेचा भाग म्हणून बांबूच्या चटयांची जरूर भासे. उत्पन्नाचे एक साधन या अनुषंगाने स्थानिक जनता अशा चटया विणून पुरवठा करत असे. चटयांसाठी बांबू आवश्यक असल्यामुळे जंगलात भरमसाठ अनधिकृत बांबूतोड होत असे. काकांनी लोकांना अधिकृतरीत्या तोडणीला आलेला बांबू पुरवला. तसेच लोकांना चटया विणण्यासाठी मिळणारी मजुरी प्रति चौरस फूट ६ पैशांवरून २२ पैसे करून दिली. विशेष नोंद करण्याजोगी बाब म्हणजे काकांच्या या प्रयोगामुळे वनउत्पादनाच्या कायदेशीर यादीत चटयांचा समावेश झाला. त्याआधी फक्त बांबू हेच वनउत्पादन समजले जात होते.

काका चव्हाण यांनी प्रशासकीय सेवेत दिलेली योगदानाची यादी मोठी आहे. आता देशभर माहीत झालेले 'सुबाभूळ' या नगदी पिकाच्या पहिल्या लागवडीचे श्रेय चव्हाणांचे आहे. एकदा वनखात्याकडे सागाची पन्नास लाख रोपे जास्तीची होती. काकांनी ती लोकांना फुकट वाटली आणि जिथे शक्य आहे तिथे ती लावण्यासाठी लोकांना उद्युक्त केले. परिणामी, अनेकांनी स्वत:च्या जमिनीवर पारंपरिक पिकाऐवजी सागाची लागवड केली. आज लोकप्रिय झालेली 'सामाजिक वनीकरणा'ची कल्पनाही त्यांचीच आहे. सामाजिक वनीकरणाच्या वनखात्यातील वेगळ्या विभागाचे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. डोंगर उतारावर चर खणून ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' या चळवळीचा पायाही चव्हाणांनी घातला. एकूणच आपल्या शासकीय सेवाकालात आंतरिक विरोध पत्करूनही वनखात्यात अनेक नावीन्यपूर्ण कल्पना अमलात आणून काका चव्हाण सामाजिक वनीकरण विभागाचे संचालक या पदावरून

च

१९९५ साली निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही काका चव्हाण प्रचंड सक्रिय आहेत. पुण्याजवळ भोसरी हे काकांचे वास्तव्याचे ठिकाण आहे; पण नाशिक परिसर हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. घरगुती औषध पद्धतीतल्या शिवांबू, आवळा लागवड आणि गुळवेल, आजपर्यंत दुर्लक्षित, अशा औषधी वनस्पतींचा प्रचार करण्याचे कार्य सध्या ते करत आहेत.

– सुधाकर कुलकर्णी



## चाफेकर, माधव लक्ष्मण

**भारतीय अभियांत्रीकी सेवा**
**मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम खाते**
**७ फेब्रुवारी १८९९ – ७ सप्टेंबर १९८७**




माधव लक्ष्मण चाफेकरांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील वेरणेश्वर या ठिकाणी झाला. वडील कुलाबा वेधशाळेत कारकून होते. १९०२ साली त्यांचे पितृछत्र हरपले. त्यांचे प्राथमिक शिक्षण वेरणेश्वर व त्यानंतर पुढचे शिक्षण धुळे व पुणे येथे झाले. वयाच्या पंधराव्या वर्षी पुण्यातील विश्रामबाग वाड्यातील सरकारी शाळेतून ते मॅट्रिक झाले. वयाच्या सोळाव्या वर्षी फर्गसन महाविद्यालयात इंटर सायन्सचे एक वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांची पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये एक वर्षाच्या 'मिस्त्री' या प्रशिक्षणार्थी (अ‍ॅप्रेंटिस) अभ्यासक्रमासाठी निवड झाली. पुढे त्यांना तेथेच अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळाला आणि १९२२ साली बी.ई. सिव्हिल ही पदवी मिळाली. ते परिक्षेत सर्वप्रथम आले आणि त्या वेळच्या नियमाप्रमाणे त्यांना भारतीय अभियांत्रिकी सेवा (इंडियन सर्व्हिस ऑफ इंजिनिअरिंग) या सेवेमध्ये थेट 'सहायक कार्यकारी अभियंता' या पदावर घेण्यात आले.

१९२४ च्या सुमारास त्यांची पुण्यातील शनिवारवाड्याजवळील बांधकामावर नेमणूक झाली. नंतर निरा कालव्याच्या बांधकामावर त्यांना नेमण्यात आले. त्याकाळातील समाजापेक्षा चाफेकरांची विचारसरणी एका पावलाने पुढे होती. हुंडा घेणे प्रतिष्ठेचे अशी समाजात धारणा असली, तरी त्यांनी लग्नात हुंडा घेतला नाही. ब्रिटिश राजवटीत निरा कालव्यावर काम करीत असतानासुद्धा ते खादीचे कपडे वापरत असत. माळशिरस हे त्यांचे मुख्यालय होते. शासकीय सेवेत असतानाच त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीमधील मास्टर्स डीग्री (एम.सी.ई.) ही पदवी संपादन केली. १९३० च्या दरम्यान त्यांची सिंध येथे नेमणूक झाली.

१९३५ साली सिंध प्रांत हा 'मुंबई प्रेसिडेन्सी' मधून वेगळा झाला. सिंध प्रांतातील मिरपूरखास या ठिकाणी कार्यकारी अभियंता म्हणून ते दोन वर्षे कार्यरत होते. १९३४ साली ते लारखानाला गेले व १९३७ मध्ये ते कराचीस उपसचिव (अधीक्षक अभियंता) म्हणून रुजू झाले.

नंतर पाकिस्तानातील हैद्राबाद जवळील सिंधू नदीवर 'ट्रिन बॅरेज' प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी पार पाडले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व ते सप्टेंबर १९४७ मध्ये मुंबई राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागात रुजू झाले. फाळणीनंतर पाकिस्तान सरकारने हा प्रकल्प हाती घेऊन पूर्ण केला.

एक वर्षाच्या कालावधीनंतर त्यांच्यावर मुख्य अभियंता म्हणून एका नावीन्यपूर्ण व गुंतागुंतीच्या कोयना या भुयारी जलविद्युत प्रकल्पाचा आराखडा बनविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. कोयना अवजल प्रकल्पाचा लेआउट हा त्यांचा या क्षेत्रातील प्रतिभेचा आविष्कारच घडवितो. याच प्रकल्पाच्या बांधकामासाठी त्यांनी पुढे मुख्य अभियंता या पदाचे कार्यालय मुंबईहून हलवून कोयनानगर या प्रकल्पस्थळी नेले.



**कोयना धरण**

एंगेज्ड लेबर - डी.इ.एल.) हाती घेऊन तडीस नेले. दुर्दैवाने नेव्हल डॉकयार्ड या क्षेत्रातील चाफेकरांची ही अलौकिक कामगिरी दुर्दैवाने पडद्याआड राहिली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर 'राज्य सिंचन आयोगा'वर चाफेकरांची शासनाने सन्माननीय सदस्य म्हणून नेमणूक केलेली होती. राज्याच्या सिंचन विकासाचा पाया याच आयोगाने रचला आहे. आयोगाने केलेल्या

कोयना प्रकल्पावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर भारत सरकारने त्यांची मुंबई येथील भारतीय नौसेनेच्या डॉकयार्डच्या विस्तारासाठी अभियांत्रिकी प्रशासक (इंजिनिअरिंग ॲडमिनिस्ट्रेटर) म्हणून नेमणूक केली. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने भारतीय नाविक दलाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई येथे डॉकयार्ड व तदनुषंगिक सुविधांच्या निर्मितीचे बांधकाम क्षेत्रातील एक मोठे आव्हान हाती घेण्याचे ठरविले. या कामातील पाईल्सवर आधारित डेक फ्लोअरचे अवघड काम एका विदेशी कंपनीला दिलेले होते. त्यात गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होऊन १९५६ च्या दरम्यान ते थांबले.

भारत सरकारने या रेंगाळलेल्या कामाला गती देण्यासाठी मुंबई राज्यातील बांधकाम खात्यातील एका निष्णात निवृत्त मुख्य अभियंत्याची सेवा घेण्याचा निर्णय घेतला आणि ओघानेच ती अवघड जबाबदारी स्वीकारण्याचा मान चाफेकर यांना मिळाला. चाफेकरांनी स्वत:च्या अभियांत्रिकी कौशल्याने आणि कल्पकतेने कामाला गती दिली. चाफेकरांनी दीड वर्षाच्या कालावधीनंतर राजीनामा दिल्यावर इंडियन नेव्हीने सदरील काम खात्यामार्फत (डिपार्टमेंटली

बहुतांशी शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या.

चाफेकर पुण्यामध्ये आल्यानंतर सहा वर्षे पुणे म.न.पा. मध्ये नगरसेवक होते. तसेच एक निष्णात अभियंता म्हणून अनेक वर्षे 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरअर्स' या अभियांत्रिकी क्षेत्रातील ज्येष्ठ अशा संस्थेत त्यांनी सतत सक्रिय योगदान दिले. राज्य पातळीवर या संस्थेचे अध्यपदही त्यांनी भूषविले आहे. जागतिक कीर्तीचे जलतज्ज्ञ डॉ. माधव चितळे यांना पाणी या क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा देणारे चाफेकरच आहेत.

चितळे यांनी पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९५५ साली पुणे विद्यापीठात अग्रक्रमाने बी.ई.(स्थापत्य) ही पदवी मिळवली. राज्याच्या (एम.पी.एस.सी.) व भारतीय संघराज्याच्या (यू.पी.एस.सी.) या दोन्ही स्पर्धा परीक्षांत उत्तीर्ण झाल्यावर चितळे यांच्यापुढे शासकीय सेवेचा कोणता पर्याय निवडावा याबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिले.

चितळे यांनी विचारले असता चाफेकरांनी त्यांना सल्ला दिला की, ''आर्थिक लाभ, मर्यादित क्षेत्र या दृष्टीने केंद्र सरकारची नोकरी बरी वाटते; पण समाजाशी निगडित अशा पायाभूत क्षेत्रात काम

च

करण्यासाठी भविष्याचा वेध घेता, राज्य सरकारची ‘पाणी’ या क्षेत्रातील तुमची सेवा फार उजवी ठरेल.’’ डॉ. चितळे यांना हा सल्ला भावला आणि त्यांनी ‘पाणी’ या क्षेत्रात केलेल्या अद्वितीय कामाच्या स्वरूपात आपणां सर्वांना याची प्रचिती आलेली आहे. चाफेकर हे प्रखर राष्ट्रीय वृत्तीचे होते. परदेशी सल्ले आपण गरजेपुरते वापरावेत पण भारतवासीयांना जे अनुकूल आहे, स्थानिक वैशिष्ट्याशी जे साधर्म्य ठेवणारे व काटकसरीचे आहे, त्याचाच स्वीकार करावयास पाहिजे, या विचाराचा ते आयुष्यभर पाठपुरावा करत राहिले.

वैतरणा धरणाच्या धर्तीवर कोयना धरणपण पूर्णपणे काँक्रीटचे बांधावे, असा परदेशी सल्लागारांचा आग्रह असतानाही चाफेकरांनी यात बदल करून सहा ते आठ घनफूट आकाराचे मोठे दगड, जवळजवळ एक तृतीयांश जागा व्यापणाऱ्या काँक्रीटमध्ये मूरवून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम शैलीचा आविष्कार घडविला. या रबल काँक्रीटमुळे खर्चात काटकसर झाली आणि काँक्रीट अधिक घन झाले. मुंबई महानगरपालिकेस जागतिक बँकेने भातसा हे धरण काँक्रीटमध्ये करावे असा सल्ला दिला. या प्रकल्पावर महाराष्ट्र शासनाच्या वतीने काम करणाऱ्या डॉ. चितळे यांनी काँक्रीटऐवजी दगडी धरण करावे, या प्रकल्पात सिंचनाचाही अंतर्भाव करावा व धरणाच्या पायथ्याशी एक जलविद्युत्केंद्र उभे करावे असा आग्रह धरला होता. जागतिक बँकेच्या सल्लागारांना हे पटत नव्हते. डॉ. चितळे यांनी भातसा प्रकल्प स्थळी चाफेकरांना आणले व स्वत:चा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला. चाफेकरांनी डॉ. चितळे यांच्या आग्रही भूमिकेस पूर्ण पाठिंबा दिला. आजच्या भातसा प्रकल्पाचा उगम चाफेकर आणि चितळे यांच्या दूरदृष्टीत आहे.

राज्यामध्ये सिंचनाचा विस्तार करण्याच्या दृष्टिकोनातून सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या नद्यांवर रांगेने ठरावीक अंतरावर बंधारे बांधावेत आणि नदीच्या दोन्ही बाजूंना साधारणत: २५ ते ३० मी. उंचीपर्यंतचे क्षेत्र उपसा सिंचन पद्धतीने सिंचनाखाली आणण्याचा पाठपुरावा ते करत राहिले. या दृष्टीने त्यांनी उपसा सिंचनावर आधारित सिंचनाचा बृहत् आराखडा तयार केला होता असे समजते. काळाच्या ओघात तो मागे पडला.

त्यांचा एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचे चिरंजीव पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९५३ मध्ये बी.ई. (मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल) झाले व त्यांनी खाजगी क्षेत्रात सेवा केली.

– डॉ. दिनकर मोरे

## चितळे, माधव आत्माराम

**अध्यक्ष केंद्रिय जल आयोग, महासचिव– आंतरराष्ट्रीय सिंचन व निस्सारण आयोग**


**८ ऑगस्ट १९३४**

☞ **मुख्य नोंद – विज्ञान व तंत्रज्ञान आणि शिक्षण खंड**



माधव आत्माराम चितळे यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे यवतमाळ येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण चाळीसगाव येथे झाले. पुणे विद्यापीठाच्या बी.ई. परीक्षेत ते पहिल्या वर्गात पहिले आले. १९५६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवेच्या परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

शासकीय नोकरीत असताना त्यांनी विविध ठिकाणी काम केले. १९६० मध्ये जागतिक बँकेने मंजूर केलेल्या एका योजनेनुसार मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणाच्या कामाला सुरुवात झाली. मूळ योजनेत चितळे यांनी काही बदल सुचवले. या बदलांमुळे मुंबईच्या पाणीपुरवठ्याबरोबरच आसपासच्या भागाला जलसिंचनासाठी पाणी मिळाले, कालवा झाला, जलविद्युत केंद्रही तयार झाले.



चितळे यांच्या आग्रही भूमिकेतून साकारलेले भातसा धरण

१९६१ मध्ये पुण्याला पाणीपुरवठा करणारी पानशेत व खडकवासला ही धरणे फुटली. पुण्याचा पाणीपुरवठा बंद पडला. चितळे यांनी त्यांचे अभियांत्रिकीचे कौशल्य पणाला लावले. कंत्राटदारांना विश्वास देत त्यांना बरोबर घेऊन १२० दिवसांच्या आत त्यांनी पुण्याचा पाणीपुरवठा पूर्ववत केला.

१९६४ ते १९६६ या काळात ते मुळा या मातीच्या धरणाच्या कामात गुंतले होते. या धरणाच्या पायातल्या खडकांत विवरे सापडली. त्यामुळे धरणाचा पाया नीट होत नव्हता. त्यासाठी लवचीक पायाची नवीन रचना करण्यात आली. त्यामध्ये चितळे यांचा सहभाग होता.

चितळे पुणे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी समितीचे दहा वर्षे सभासद होते. त्यांनी विद्यापीठाच्या स्थापत्य अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम तयार केला.

नाशिक येथील महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट म्हणजे ‘मेरी’ आणि ‘इंजिनिअरिंग स्टाफ कॉलेज ऑफ महाराष्ट्र’ या संस्थांची त्यांनी पुनर्रचना केली, अभ्यासक्रम बदललेले, सक्षम अभियंते घडविण्यासाठी उपयुक्त प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र लँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि डायरेक्टोरेट ऑफ इरिगेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट, पुणे या संस्थांनाही त्यांचे मार्गदर्शन मिळाले. पाटबंधारे योजनांच्या व्यवस्थापनाला वाहिलेले ‘सिंचन’ हे त्रैमासिक १९८२ मध्ये त्यांनीच सुरू केले. महाराष्ट्र जल आयोगाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. ‘निळी क्रांती’ या मराठी पुस्तकाचे ते लेखक आहेत.

१९८४ मध्ये चितळे यांची नियुक्ती नद्यांवर बांधलेल्या धरण प्रकल्पाचे आयुक्त म्हणून झाली. या पदावर काम करताना त्यांनी फराक्का, बेटवा, बनसागर, सरदार सरोवर व नर्मदा या धरणांच्या कामाकडे लक्ष पुरवले. १९८५ मध्ये केंद्रीय जल आयोगाचे अध्यक्ष व पदसिद्ध सचिव म्हणून त्यांची नेमणूक झाली. जलसंपत्ती विकासविषयक ही देशातील सर्वोच्च संस्था आहे. १९८९ मध्ये भारत सरकारच्या जलसंपत्ती मंत्रालयाचे ते सचिव झाले. त्यांनी केंद्रीय जलधोरण तयार केले. १९९३ ते १९९७ या काळात त्यांनी आंतरराष्ट्रीय सिंचन व निस्सारण आयोगाचे महासचिव म्हणून काम पाहिले. जगभरातल्या पाणी समस्यांचे अनुभव एकत्र करून त्यांनी ‘पाण्याची बचत’ हे पुस्तक संपादित केले. त्याचबरोबर त्यांनी ‘पाणी व जमीन यांची उत्पादकता’ या पुस्तकाचे संपादनही केले.

जुलै २००५ मध्ये मुंबईत पावसाने कहर केला. त्या वेळी मिठी नदीच्या पुराने हाहाकार उडवला. कारण या नदीत अतिक्रमणे झाली होती. शासनाने डॉ. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अशी पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उपाय सुचवले. त्यांच्या बहुविध कामगिरीमुळे त्यांना विविध विद्यापीठांनी डॉक्टरेट प्रदान केली आहे. तसेच डॉयल

स्विडिश अकॅडमी ऑफ सायन्सेसने त्यांना ४८ लक्ष रुपयांच्या जलपुरस्काराने गौरविले आहे. हा पुरस्कार नोबेल पुरस्काराच्या समकक्ष मानला जातो.

– वर्षा जोशी-आठवले

## चिन्मुळगुंद, पांडुरंग जयराव

**गृहसचिव, महाराष्ट्र राज्य**

**१२ ऑक्टोबर १९३१ – २९ एप्रिल १९८३**

च



पांडुरंग जयराव चिन्मुळगुंद यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. कर्नाटक राज्यातील धारवाड जिल्ह्यातील चिन्मुळगुंद हे त्यांचे मूळ गाव होते. त्यांचे वडील मुंबई प्रांतामध्ये न्यायाधीश होते. त्यांच्या आईचे नाव सीताबाई होते. पांडुरंग चिन्मुळगुंद यांचे शिक्षण पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. फर्गसन महाविद्यालयामधून त्यांनी भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या दोन विषयांत बी.ए. पूर्ण केले. ते संस्कृत या विषयाचे गाढे अभ्यासक होते. त्यांचा ज्ञानेश्वरीचा विशेष अभ्यास होता.

१९३८ मध्ये चिन्मुळगुंद आय.सी.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि प्रशासकीय सेवेमध्ये मुंबई प्रांतात त्यांची नियुक्ती करण्यात आली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील इतर संस्थानांप्रमाणेच सांगलीच्या पटवर्धनांच्या संस्थानाचेही स्वतंत्र भारतात विलीनीकरण करण्यात आले. सांगली संस्थानामधून दक्षिण सातारा जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली. (सध्याच्या सांगली जिल्ह्यास पूर्वी दक्षिण सातारा असे म्हणत असत.) १९४८ ते १९५० या कालावधीत या जिल्ह्याचे ते पहिले जिल्हाधिकारी होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा हा काळ संक्रमणाचा होता. विशेषत: संस्थानातील प्रजेला प्रशासकीय प्रक्रियेची माहिती करून देणे याची जबाबदारी चिन्मुळगुंद यांनी



**चिन्मुळगुंद यांनी आराखडा तयार केलेले राजा केळकर संग्रहालय**

अतिशय चोखपणे पार पाडली. १९५० ते १९५४ या चार वर्षांच्या कालावधीत चिन्मुळगुंद सहकार निबंधक या पदावर कार्यरत होते. महाराष्ट्रात सहकार खात्याची नुकतीच सुरुवात करण्यात आली होती. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे-पाटील यांच्यासह चिन्मुळगुंद यांनी सहकार विभागाची रचना, कायदे, नियम तरतुदी यांच्या निर्मितीमध्ये मोठे योगदान दिले. आज महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात सहकार क्षेत्र आघाडीवर आहे. हे चिन्मुळगुंद यांनी केलेल्या सहकारविषयक मूलभूत कामाचे फलित आहे.

१९५४ नंतर ते शिक्षण खात्याचे सचिव होते. त्या वेळी सांस्कृतिक खातेदेखील शिक्षण खात्यामध्येच समाविष्ट होते. चिन्मुळगुंद शिक्षण सचिव म्हणून काम करत असताना शासनाने पुणे येथील राजा दिनकर केळकर संग्रहालय चालवण्यास घेतले. या कामाचा संपूर्ण आराखडा आणि नियोजन चिन्मुळगुंद यांनी केले होते. विद्वान वैदिक घनपाठी ब्राह्मणांना शासनाकडून पुरस्कार आणि मानपत्र देण्याची योजना त्यांनी सुरू केली.

त्यांनी मोठ्या कलावंतांना वृद्धापकाळामध्ये निवृत्तिवेतन देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. त्या वेळी

बालगंधर्व यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला. चिन्मुळगुंद नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव होते.

१९६८ मध्ये गृहसचिव या पदावरून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती पत्करली. संस्कृत भाषेचा व्यासंग असल्यामुळे अनेक विद्वान व्यक्तींशी त्यांचा स्नेह होता.

निवृत्तीनंतर चिन्मुळगुंद यांनी वैदिक अध्ययन आणि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या भारतीय चरित्रकोश मंडळाच्या कामाला वाहून घेतले. भारतीय चरित्रकोश मंडळाचे ते अध्यक्ष होते. समाजातील उत्तम गुणांची पारख करणे आणि स्वत:चे मोठेपण विसरून समाजातील विद्वज्जनांचा आदर करणे ही त्यांच्या व्यक्तित्वाची वैशिष्ट्ये होती. फलटण येथील सत्पुरुष गोविंद महाराज उपळेकर यांना ते गुरुस्थानी मानत.

भारतीय नाणकशास्त्र विभागाचे ते अध्यक्ष होते. चिन्मुळगुंद यांचा स्वत:चादेखील प्राचीन नाण्यांचा मोठा संग्रह होता. अवकाश निरीक्षण हादेखील त्यांचा छंद होता. त्यांनी स्वत: महाविद्यालयात शिकत असताना आकाशनिरीक्षणासाठीची दुर्बीण तयार केली होती.

प्रशासकीय सेवेतील त्यांच्या महत्त्वपूर्ण कामामुळे भारतीय चरित्रकोश मंडळाच्या ट्रस्टकडून चिन्मुळगुंद यांच्या नावाने प्रशासनात शाश्वत, नावीन्यपूर्ण आणि झोकून देऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी १९८६ पासून पुरस्कार देण्यास सुरुवात केली गेली. सरकारकडून या पुरस्काराला मान्यता देण्यात आली. राज्याचे मुख्य सचिव या पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष असत.

प्राचीन भारतीय प्रशासक चाणक्य यांची मूर्ती आणि ‘‘न्याययुक्तं प्रशासकम् मातरं मन्यंते प्रज:’’ हे चाणक्यनीतीतील सुभाषित कोरलेले सोन्याचे नाणे असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

वैदिक संस्कृती आणि संस्कृत या विषयावरच्या काही अभ्यासपूर्ण पुस्तकांचे लेखन चिन्मुळगुंद यांनी केले आहे. या पुस्तकांचे प्रकाशन भारतीय चरित्रकोश मंडळाकडून करण्यात आले.

अशा या विद्वान आणि कार्यकुशल प्रशासकीय अधिकाऱ्याचा मृत्यू लंडन येथे झाला.

– संध्या लिमये

## चौबळ, विनायक वासुदेव

**महाराष्ट्र राज्याचे पहिले पोलीस महानिरीक्षक**
**११ ऑगस्ट १९२१ –**



विनायक वासुदेव चौबळ यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे वडील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातीतील पहिले पदवीधारक होते. बी.टी. (बॅचलर ऑफ टीचिंग) ही पदवी त्यांनी घेतली होती. तसेच एम.एड.(मास्टर ऑफ एज्युकेशन) ही पदवीही त्यांनी मिळवली होती. मुंबईच्या तत्कालीन शिक्षण विभागात कुलाबा (रायगड) जिल्ह्याचे ते शिक्षणाधिकारी होते.

विनायक चौबळ यांचे शिक्षण नाशिक, एलफिन्स्टन विद्यालयात व विल्सन महाविद्यालयात झाले. त्यानंतर काही काळ त्यांनी महाविद्यालयातच अध्यापनाचे काम केले. नंतर मुंबई सचिवालयात ते नोकरी करू लागले. १९४८ मध्ये त्यांनी भारतीय पोलीस खात्यात प्रवेश केला. नाशिक, खेडा व धारवाड जिल्ह्यांत त्यांनी साहाय्यक पोलीस आयुक्त पदावर काम केले. नंतर पोलीस सुपरिंटेंडट म्हणून कारवार, ठाणे, सोलापूर, सातारा व अहमदाबाद येथेही त्यांनी काम केले. दरम्यान न्यायाधीश अनंतराव फडकर यांच्या कन्या पद्मजा यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

१९५७ ते १९७२ या काळात भारत सरकारच्या गुप्तवार्ता विभागात ते काम करत होते. मुंबई, नागपूर, गोवा, दिल्ली, कोहिमा (नागालँड) व शिलाँग

(मेघालय) अशा विविध ठिकाणी ते या काळात काम करत होते. नागालँड, मणिपूर, आसाम, मेघालय व मिझोराम या क्षेत्रात काम करत असताना ते गुप्तवार्ता विभागाचे प्रमुख होते.

१९७४ मध्ये चौबळ यांची बदली महाराष्ट्र शासनाकडे झाली. त्यानंतर औरंगाबाद विभागाच्या उपमहानिरीक्षक पदावर त्यांची नेमणूक झाली.

महाराष्ट्र राज्य गुप्त विभागाचे व गुन्हा अन्वेषण विभागाचे उपमहानिरीक्षक, पुण्याचे व बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त, लाचलुचपत विरोधी विभागाचे संचालक अशी विविध पदे त्यांनी भूषवली. १९७८ मध्ये महाराष्ट्र राज्याचे पहिले पोलीस महानिरीक्षक (इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस) या सर्वोच्च पदावर त्यांची नेमणूक झाली. ३१ ऑक्टोबर १९७९ रोजी ते या पदावरून निवृत्त झाले. सेवा काळातील उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरीबद्दल तसेच कठीण प्रदेशातील उत्कृष्ट सेवेबद्दल पोलीस पदक, राष्ट्रपतींचे सुवर्णपदक आणि इतर सात पदकांचेही ते मानकरी आहेत.

महाराष्ट्राच्या राज्यपालांनी चौबळ यांच्या शासकीय ज्ञानाचा व उत्कृष्ट सेवेचा गौरव म्हणून १९८२ ते १९८४ या काळात त्यांची मराठवाडा कृषी विद्यापीठाचे उप कुलगुरू (व्हाईस चॅन्सेलर) म्हणून नेमणूक केली. चौबळ यांची दोन्ही मुले उच्चविद्याविभूषित असून थोरला मुलगा मिलिंद अमेरिकेत वास्तव्यास आहे. तर, धाकटा राजीव याचा अभियांत्रिकीचा व्यवसाय औरंगाबाद येथे आहे. निवृत्तीनंतर चौबळांचे वास्तव्य औरंगाबाद येथे आहे.

– वर्षा जोशी-आठवले

**संदर्भ :**

*१. मोकाशी, प्र. ल.; 'चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजाचा इतिहास'.*

* * *

# ज

## जाधव, यशवंत गणेश
**भारतीय वनसेवा, केंद्रीय वन महानिरीक्षक**
**१० एप्रिल १९३०**



यशवंत गणेश जाधव यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील देवळाली येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सुंदराबाई असे होते. त्यांचे वडील वकील होते. त्यांनी अमरावती येथे काही वर्षे दिवाणी न्यायाधीश (सिव्हिल जज्ज) म्हणून काम केले. यशवंत जाधव यांनी १९४९ मध्ये नागपूर विद्यापीठामधून बी.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. त्या वेळी ते विद्यापीठात पहिले आले.

१९५० मध्ये 'सुपिरिअर फॉरेस्ट सर्व्हिस' या मध्यप्रदेश सरकारच्या वनसेवेमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी दिलेल्या मुलाखतीमध्ये ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. डेहराडून येथील प्रशिक्षणानंतर जाधव यांची प्रथम नियुक्ती अमरावती येथे साहाय्यक वनसंरक्षक (असिस्टंट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट) या पदावर करण्यात आली.

मध्यप्रदेशातील होशंगाबाद, हर्दा, नेपानगर या ठिकाणी त्यांच्या बदल्या झाल्या. नेपानगर या ठिकाणी उत्तम प्रतीचा कागद निर्माण करणारा कारखाना आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर सलाई या लाकडाची तोड केली जाते. या सलाईच्या जंगलाची पुन: लागवड आणि नियोजन करण्यासाठी जाधव यांनी या ठिकाणी सलाईच्या झाडाचे लागवड तंत्र विकसित केले. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला गेलाच, त्याबरोबरच कागदनिर्मितीसाठी सलाईचे लाकूडही उपलब्ध होऊ लागले.

१९५६ मध्ये भाषावार प्रांतरचनेनंतर यशवंत जाधव यांची नियुक्ती द्वैभाषिक मुंबई राज्यात अमरावती विभागातील अल्लापल्ली येथे करण्यात आली. त्यानंतर त्यांना बढती मिळून त्यांच्यावर नागपूरमधील वर्धा विभाग येथे त्यांची वनसंरक्षक या पदावर नेमणूक करण्यात आली. या पदावर ते तीन वर्षे कार्यरत होते. या वेळी त्यांनी सलाईचे जंगल आणि मुख्य रस्ता यांच्या दरम्यान कच्च्या रस्त्यांचे बांधकाम केले. त्यामुळे त्या हंगामात संत्र्यांच्या पेट्या तयार करण्यासाठी लागणारे सलाईचे लाकूड बाजारात योग्य वेळी पोहोचू शकले. हे कच्चे रस्ते बांधण्यासाठी जाधव यांनी सात लाख रुपये खर्च केले. त्याकाळात ती रक्कम खूपच मोठी होती. परंतु जाधव यांनी धोका पत्करून हे काम पूर्ण केले. याचे फलित म्हणून वनविभागाच्या इतिहासात प्रथमच नागपूर विभागाला बावीस लाख रूपये नफा झाला. त्या वर्षी वनातून नफा मिळवून देणाऱ्या राज्यातील सर्व विभागांत वीस ते बावीसाव्या क्रमांकावर असणारा नागपूर विभाग तिसऱ्या क्रमांकावर आला होता.

त्यानंतर सहा वर्षांच्या काळासाठी जाधव यांची नियुक्ती पुणे येथे वनाधिकारी या पदावर करण्यात आली. या वेळी वनविभागातील नावाजलेले मुख्य वनसंरक्षक सदाशिव बूट यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी त्यांना मिळाली. या वेळी जाधव यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह पुढील दहा-पंधरा वर्षांतील महाराष्ट्राचे वनस्पती नियोजन करणारा आराखडा तयार केला. या आराखड्याचे संपूर्ण देशभर

कौतुक करण्यात आले. याच काळात मुख्य वनसंरक्षक सदाशिव बूट यांनी जंगल विकासासाठी शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी ‘वनविकास महामंडळा’ची संकल्पना मांडली. ती प्रत्यक्षात येण्यामध्ये जाधव यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. या काळात जाधव यांनी ‘मिश्र जंगल’ निर्माण करण्याचा प्रयोग यशस्वी केला. या प्रयोगाचेही देशभर कौतुक झाले.

ज

आपल्या राज्यात निर्माण होणाऱ्या वनउत्पादनावर प्रक्रिया करणारे कारखाने आपल्याच राज्यात व्हावेत ज्या योगे रोजगारनिर्मिती होऊ शकेल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे ‘वन औद्योगिक धोरण’ तयार करण्यात आले. या धोरणाच्या निर्मितीमध्येही जाधव यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

याच कालावधीत जाधव यांनी केलेले महत्त्वाचे काम म्हणजे तेंदूच्या पानांचे राष्ट्रीयीकरण. ही सूचना जाधव यांनी मांडली व ती प्रत्यक्षात येण्यासाठी आराखडा तयार केला. यामुळे तेंदूच्या पानांना एक स्थिर किंमत मिळाली. ग्रामीण भागातील वनवासींना रोजगार उपलब्ध झाला आणि वनविभागालाही त्यातून निश्चित नफा मिळू लागला.

१९६७ ते १९६८ मध्ये जाधव अमेरिका आणि पश्चिम जर्मनी या ठिकाणी वनउद्योग, जंगल उत्पादनांचे यांत्रिकीकरण, वनकामगारांचे प्रशिक्षण आणि जंगलातील रस्त्यांची निर्मिती या चार विषयांचे प्रशिक्षण घेण्यासाठी गेले. त्यांनंतर राज्य औद्योगिक महामंडळामध्ये संशोधन आणि विकास प्रमुख (रिसर्च अँड डेव्हलपमेंट चीफ) या पदावर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. या वेळी त्यांच्या प्रयत्नामुळे चंद्रपूर जिल्ह्यात तीन सिमेंट उद्योगांची उभारणी करण्यात आली. लहान आकाराचे कागद कारखाने उभारण्यासाठी परदेशातून यंत्रसामग्री आणण्यास जाधव यांनी सरकारला राजी केले.

डहाणूच्या जंगलात विपुल प्रमाणात आढळणाऱ्या ऐनाच्या झाडापासून ऑक्झेलिक आम्ल तयार करण्याचा कारखानासुद्धा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आला. औद्योगिक महामंडळाला नफा मिळवून देणारे विविध उपक्रम जाधव यांनी अवलंबले. यामुळेच नंतर त्यांची नियुक्ती १९७१-७२मध्ये विदर्भ विकास महामंडळाच्या सल्लागार विभागाचे प्रमुख या पदी करण्यात आली. तेथे त्यांनी टसर (रेशीम) प्रकल्प हाती घेतला. धागानिर्मिती, रंगसंगती, कापडनिर्मिती अशा अनेक प्रकारच्या प्रयोगांनंतर या प्रकल्पातून उत्तम प्रकारचे रेशीम उत्पादन होऊ लागले.

त्यानंतर जाधव वनविकास महामंडळाच्या संशोधन आणि विकास विभागाचे सहसचिव या पदावर होते. ठाणे येथे वनसंरक्षक या पदावर असताना स्थानिक आदिवासींना वनजमिनींमध्ये उत्पादन काढण्यास देण्याचा उपक्रम त्यांनी अवलंबिला.

१९८० मध्ये महाराष्ट्र सरकारच्या ‘महाराष्ट्र अ‍ॅग्रिकल्चरल अ‍ॅण्ड फूड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन’ (मॅफ्को) या डबघाईला आलेल्या कंपनीला सावरण्यासाठी जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. या कंपनीचे दोन-तृतीयांश भांडवल बुडीत गेले होते. जाधव यांनी केवळ दोन वर्षांच्या कालावधीत या कंपनीची आर्थिक घडी नीट बसवली.

१९८४ मध्ये जाधव यांची पुणे येथे मुख्य वनसंरक्षक, उत्पादन या पदावर नेमणूक करण्यात आली. नाशिक विभागातून अनेक वर्षे होणाऱ्या मोठ्या लाकूडचोरीला आळा घालण्यासाठी तेथे जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. १९८२ मध्ये नाशिक येथे वनसंरक्षक असताना भुसावळ-सुरत या मार्गावरून होणारी दोन कोटी रुपयांची लाकूडचोरी त्यांनी उघडकीस आणली व नंतर ती पूर्णपणे बंद झाली.

१९८६ मध्ये जाधव यांच्या कार्यकालातील कामाचे वैविध्य, काटेकोरपणा आणि अभिनव कल्पना अमलात आणण्याची वृत्ती लक्षात घेऊन त्यांची नियुक्ती केंद्र सरकारच्या अतिरिक्त इन्स्पेक्टर जनरल,

वनविभाग या पदावर करण्यात आली. हे पद भारतीय वनविभागातील दुसऱ्या क्रमांकाचे पद मानले जाते. वनसंवर्धनावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळेच 'नॅशनल वेस्टलँड डेव्हलपमेंट बोर्डा'च्या सचिव पदाची जबाबदारीही या वेळी त्यांच्यावर देण्यात आली. जाधव यांच्या केंद्र सरकारमधील या दोन वर्षांच्या कार्यकालात निर्वनीकरणाचा दर शून्यावर आला होता. वनसंवर्धनासाठीच्या प्रयत्नांची सुरुवात सरकारपासून व्हावी म्हणून सरकारी कार्यालयामध्ये लाकडाचे पॅनलिंग, लाकडी फर्निचर होऊ नये असा आदेश त्यांनी काढला.


रेल्वेच्या रूळपट्ट्या तयार करण्यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर चांगल्या प्रतीच्या झाडांची तोडणी केली जाते. लाकडी रूळपट्ट्यांना पर्याय म्हणून त्यापेक्षा चांगले, कमी किमतीचे आणि दीर्घकाळ टिकाऊ असे काँक्रीटच्या रूळपट्ट्या वापरावेत असे त्यांनी रेल्वे मंत्रालयाला सुचविले. याला नकार मिळाल्यावर जाधव यांनी वनविभागाकडून रेल्वे मंत्रालयाला रूळपट्ट्या विकल्या जाणाऱ्या लाकडाच्या किंमती ७० टक्क्यांनी वाढवून सांगितल्या. शेवटी ते प्रकरण तत्कालीन रेल्वेमंत्र्यांकडे गेल्यावर जाधव यांनी त्यांना ही बाब पटवून दिली आणि लाकडाच्या रूळपट्ट्या वापरणे बंद झाले. जाधव यांनी स्थानिक जनतेचा वन-व्यवस्थापनामध्ये सहभाग असावा व वनसंवर्धन म्हणजे केवळ सरकारची जबाबदारी न राहता ती लोकांना स्वत:ची जबाबदारी वाटावी म्हणून वनविस्तार (फॉरेस्ट एक्स्टेंशन) योजना सुरू केली. अर्थसंकल्पामध्ये वनीकरणासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. १९८८ मध्ये जाधव क्रेंद्र सरकारच्या वनविभाग इन्स्पेक्टर जनरल या पदावरून निवृत्त झाले. सध्या ते पुणे, अमरावती येथे स्थायिक झाले आहेत. निवृत्तीनंतर ते वनसंवर्धन कायद्याबद्दल मार्गदर्शन करण्याचे काम करत आहेत.

राष्ट्रीय पडित जमीन विकास महामंडळाचे सचिव म्हणून कार्यरत असताना जाधव यांच्या सूचनेवरून पंतप्रधान राजीव गांधी यांनी सामाजिक वनीकरणामध्ये महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तीसाठी इंदिरा प्रियदर्शिनी पुरस्कार सुरू केला.

– संध्या लिमये

## जोग, सूर्यकांत शंकर
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य**
**२५ जुलै १९२९**

ज



सूर्यकांत शंकर जोग यांचा जन्म अमरावती येथे झाला. वडील शंकर जोग हे १९२९ ते १९३५ या काळात सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीचे सभासद होते. देशाच्या संरक्षण व प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची परंपरा जोग घराण्यात आहे. त्यांचे मामा परांजपे हे मुंबई शहराचे पोलीस उपायुक्त होते. जोग यांच्या आठ भावांपैकी दोन भाऊ भूसेनेतून कर्नल या पदावरून निवृत्त झाले आहेत, तर दोन भावांनी भारतीय वायुसेनेतून देशसेवा केली आहे.

सूर्यकांत जोग यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावती येथे झाले. किंग एडवर्ड मेमोरियल शिष्यवृत्तीमधून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनात एन.सी.सी.मध्ये अंडर ऑफिसर आणि त्यानंतर अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. एन.सी.सी.मधील या जबाबदारीतूनच पुढील काळात भारतीय पोलीस सेवेत (आय. पी. एस.) मध्ये प्रवेश करण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

याच काळात क्रिकेट आणि फुटबॉल या खेळांमध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले होते. त्या काळातील चार परदेशी संघांविरुद्ध असणाऱ्या कर्नल सी.के. नायडू यांच्या नेतृत्वाखालील क्रिकेट संघात त्यांची निवड झाली होती. तसेच रणजी ट्रॉफी आणि फुटबॉल संघातही त्यांची निवड झाली होती.




सीमा सुरक्षा बल

नागपूर विज्ञान महाविद्यालयामधून रसायनशास्त्र या विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्यांनी एम.एस्सी.ची पदवी घेतली. १९५३ मध्ये अखिल भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत ते देशात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि त्यांनी भारतीय पोलीस सेवेत जाण्याचा निर्णय घेतला.

जोग यांची प्रथम नियुक्ती त्या वेळच्या द्विभाषिक मुंबई राज्यात करण्यात आली. त्यानंतर त्यांची बदली महाराष्ट्र राज्यात करण्यात येऊन बुलढाणा, औरंगाबाद, गोवा, मुंबई अशा विविध ठिकाणी महत्त्वाच्या पदांवर त्यांची नेमणूक करण्यात आली.

१९६९ मध्ये झालेल्या गोवामुक्ती संग्रामातील संरक्षण दलाच्या कार्यवाहीत त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यानंतर १९७० ते १९७३ या कालावधीत ते गृहमंत्रालयात सहसचिव या पदावर कार्यरत होते. त्यानंतर दोन वर्षे त्यांची नियुक्ती सीमा सुरक्षा दलामध्ये पोलीस संचालक या पदावर करण्यात आली.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये जोग यांच्यावर दिल्लीचे पोलीस आयुक्त म्हणून महत्त्वाची कामगिरी सोपवण्यात आली. या वेळी दिल्ली येथील कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी जोग यांनी अत्यंत कौशल्याने हाताळली.

१९८५ मध्ये सूर्यकांत जोग महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक झाले. या पदावर असताना महत्त्वपूर्ण घटना घडली. कुख्यात आंतरराष्ट्रीय गुन्हेगार चार्ल्स शोभराज दिल्ली येथील तिहार कारागृहातून आपल्या साथीदारांसह पसार झाला. जोग यांनी त्या वेळचे मुंबईचे पोलीस आयुक्त दत्तात्रेय सोमण आणि चार्ल्स शोभराज याला पूर्वी अटक करणारे पोलीस अधिकारी झेंडे यांच्या सहकार्याने चार्ल्स शोभराजला पुन्हा अटक करण्यासाठी सापळा रचला. गुन्हेगारांचा माग काढत जोग यांच्या चमूने गोव्यापर्यंत तपासजाळे विणले आणि अखेरीस या प्रयत्नांना यश येऊन चार्ल्स शोभराजला गोवा येथील ‘एल पेकेव्हा’ या हॉटेलमधून अटक करण्यात आली. आपल्या संपूर्ण कारकिर्दीतली ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे असे जोग मानतात. या कामगिरीबद्दल तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्यांचे आणि त्यांच्या चमूचे विशेष कौतुक केले.

१९८७ मध्ये सूर्यकांत जोग महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक या पदावरून निवृत्त झाले. सध्या ते अमरावती येथे स्थायिक झाले आहेत. निवृत्तीनंतरचे जीवन हे कमावण्यासाठी न घालवता समाजातील तरुण होतकरू मुले-मुली आणि इतरांसाठी कसे उपयोगी होईल, यासाठी सूर्यकांत जोग सातत्याने विचार आणि प्रयत्न करत असतात. १९९१ मध्ये त्यांनी अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा येथे एका सैनिकी शाळेची स्थापना केली. विशेष करून विदर्भातील विद्यार्थ्यांना आवश्यक अशी ही संस्था आहे. विदर्भात पाण्याचे दुर्भिक्ष ही तर नित्याचीच बाब आहे.

जोग यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त आणि नियोजनातून आपण या समस्येवर मात करू शकतो हे उदाहरणाने पटवून दिले. छपरावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची साठवण करण्याचा नवीन प्रयोग याठिकाणी शाळेच्या माध्यमातून करण्यात आला. आज या योजनेला सरकारी मान्यता मिळून ‘शिवकालीन योजना’ असे तिचे नामकरण करण्यात आले आहे. सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांच्या

ज

अंघोळीनंतर जमा होणाऱ्या सांडपाण्यावर ६०-७० फळझाडांची एक बाग उभारण्यात आली आहे.

संपूर्ण अमरावती जिल्ह्यात अशा प्रकारची जलव्यवस्थापनाची कामे करण्याचा जोग यांचा मानस आहे. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी हा तालुका संत्र्यांसाठी प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणची संत्र्यांची झाडे पाण्याच्या अभावामुळे वाळली होती. जोग यांनी आपल्या शाळेच्या माध्यमातून येथील पाच नाल्यांवर 'चेक डॅम' बांधून मुबलक पाणी उपलब्ध करून दिले आहे.

आज वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षीदेखील जोग या सामाजिक कामांमध्ये तरुणांना लाजवेल अशा उत्साहाने भाग घेतात. यांनी आपली साधी राहणी व सामाजिक कामातून निवृत्तीनंतरच्या समाजसमर्पित जीवनाचा एक वस्तुपाठच घालून दिला आहे.

सूर्यकांत जोग यांच्या दोनही मुलांचा मृत्यू दुर्दैवाने त्यांच्या तरुण वयात झाला. त्यांचा मोठा मुलगा दीपक जोग मुंबई येथे उपायुक्त, गुन्हे अन्वेषण शाखेत या पदावर असतानाच मृत्युमुखी पडला दुसरे पुत्र तर दुसरा मुलगा भारतीय वायुसेनेत फायटर पायलट या पदावर असताना, विमान अपघातात मृत्युमुखी पडला. आपल्या दोन्ही मुलांच्या स्मरणार्थ जोग यांनी दोघांच्याही नावाने ट्रस्ट निर्माण केले आहेत. या ट्रस्टच्या माध्यमातून दरवर्षी हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना त्या शिष्यवृत्त्या देण्यात येतात. तसेच मयत पोलिसांच्या दहा मुलांना दरवर्षी त्यांच्या फी आणि पुस्तकांकरिता मदत देण्यात येते. या दोन्ही ट्रस्टमधून दरवर्षी १५,००० रुपये खर्च करण्यात येतात. हा उपक्रम गेली वीस वर्षे अव्याहत चालू आहे.

जोग यांची कन्या अंजली बॅनर्जी या अर्थशास्त्र आणि गणित या विषयात एम.ए.एम.एड. असून सध्या त्या पुणे येथील शरद पवार इंटरनॅशनल स्कूलमध्ये नोकरी करत आहेत, तर त्यांचे जावई अजय बॅनर्जी हे आर्मी ब्रिगेडियर या पदावर कार्यरत आहेत.

– संध्या लिमये

## जोशी, श्रीधर दत्तात्रय

**भारतीय प्रशासकीय सेवा**

**उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण**

**सचिव, अन्न व नागरी पुरवठा, महाराष्ट्र राज्य**

**२५ ऑगस्ट १९४१**



श्रीधर दत्तात्रय जोशी यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे झाला. त्यांचे वडील दत्तात्रय दिनकर जोशी हे मध्य रेल्वेत सॅनिटरी इन्स्पेक्टर या पदावर होते. त्यांच्या आईचे नाव आनंदीबाई श्रीधर जोशी यांचे प्राथमिक शिक्षण मनमाड येथील नगरपालिकेच्या शाळेत व माध्यमिक शिक्षण मध्य रेल्वे माध्यमिक शाळेतून झाले. जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्र व संख्याशास्त्र घेऊन बी.ए. (ऑनर्स) ही पदवी मिळवली.

१९६२ मध्ये महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयात श्रीधर जोशी कमर्शिअल ऑडिटर या पदावर रुजू झाले. या पदावर असताना त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य वाहतूक मंडळ, आकाशवाणी, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया वगैरे केंद्र व राज्यशासनाच्या संस्थांचे लेखापरिक्षण केले, त्यामुळे त्यांना शासनाची मूलभूत माहिती मिळाली. याचा उपयोग त्यांना पुढे प्रशासनातील विविध पदांवर काम करताना झाला.

१९६४ मध्ये श्रीधर जोशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांची निवड उपजिल्हाधिकारी या पदावर झाली. पहिली नेमणूक ठाणे येथे परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी या पदावर झाली. तेथे ते जून १९६५ पर्यंत कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे प्रभारी तहसीलदार म्हणून चार महिने काम केले. नंतर १९६७ मध्ये त्यांची रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे

ज

प्रांताधिकारी म्हणून नेमणूक झाली. याच वर्षी महाराष्ट्रात भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू कोयनानगर (जि. सातारा) जवळ होता. त्यामुळे सातारा जिल्ह्यास लागून असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील प्रामुख्याने, चिपळूण व देवरूख तालुक्यांत मोठ्या प्रमाणांवर घरांची पडझड होऊन जीवितहानी व वित्तहानी झाली. या आपत्ती-व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी श्रीधर जोशी यांची विशेष कार्यकारी अधिकारी (भूकंप सहायता) या पदावर नियुक्ती करण्यात आली.

ज

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातच ही जबाबदारी म्हणजे त्यांच्यासाठी खूप मोठा अनुभव होता. आपद्ग्रस्त भागांसाठी मंजूर करण्यात आलेल्या मदतीचे वाटप शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसारच केले जावे असा त्यांचा कटाक्ष होता व त्यानुसार नियोजन करण्यात आले. या कामात प्रसंगी त्यांना वरिष्ठांचा रोषदेखील ओढवून घ्यावा लागला. परंतु जोशी आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्यांची बदली करण्यात आली. काही कालावधीनंतर वरिष्ठांना आपली चूक लक्षात आली व त्यांनी ती मान्य केली. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी प्रामाणिकपणे शासनाच्या नियमांनुसार काम केले तर आपले कोणी वाईट करू शकत नाही हा अनुभव त्यांना या प्रसंगातून मिळाला. यामुळेच संपूर्ण कारकिर्दीत कोणत्याही दबावाला बळी न पडता ते निर्भीडपणे काम करू शकले असे ते मानतात.

चिपळूण येथील त्यांच्या कार्यकाळात झालेला एस.टी.चा संप त्यांनी कौशल्याने हाताळला. कोकणासारख्या दुर्गम भागात एस.टी. हेच प्रवासाचे मुख्य साधन असल्याने संप लवकर मिटवणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांना भारतीय दंड संहितेच्या १४४ कलमांतर्गत कारवाई करावी लागली.

१९७१ मध्ये श्रीधर जोशी यांची नियुक्ती उल्हासनगर वसाहतीचे प्रशासक म्हणून करण्यात आली. शासकीय जमीन लाटण्याच्या उद्देशाने खोटी कागदपत्रे तयार केलेल्या प्रकरणांचा सामना त्यांना येथे करावा लागला. याच वर्षी ते मुंबई विद्यापीठाच्या सेकंड एलएल.बी.ची परीक्षा दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

ऑल इंडिया कमिटीच्या शिफारशीनुसार अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी केंद्रशासनाने देशभरात प्रायोगिक प्रकल्प हाती घेतले. त्यातील एक प्रकल्प ठाणे जिल्ह्यातील सहा व नाशिक जिल्ह्यातील चार अशा एकूण दहा आदिवासी तालुक्यासाठी घेण्यात आला. प्रकल्प राबविण्याकरिता अल्पभूधारक विकास संस्था, ठाणे, नाशिक, येथे स्थापन करण्यात आली. संस्थेचे प्रकल्पाधिकारी म्हणून जोशी यांची नेमणूक करण्यात आली. सदर संस्थेच्या माध्यमातून अल्पभूधारकांना जमीन सुधारणा, अवजारे खरेदी, पाण्याचे साधन, शेतीस, उद्योगांसाठी पूरक असे दुग्धविकास, कुक्कुटपालन, बँकांकडून कर्ज मिळवून देणे, शासकीय यंत्रणा व बँका यांत समन्वय साधणे, कर्जाचा विनियोग योग्य तऱ्हेने होतो किंवा नाही हे पाहणे व त्यासाठी दर्जेदार बी-बियाण्यांचा पुरवठा, शेती व संलग्न व्यवसायांतील तंत्रज्ञान, शेतीमालांकरिता बाजारपेठ उपलब्ध करून देणे वगैरे ही संस्थेची जबाबदारी होती.

बँकांकडून घेतलेल्या कर्जावर अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक यांना अनुक्रमे २५ व ३३ टक्के अनुदान दिले जात असे. जोशी यांच्या पुढाकाराने संस्थेच्या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. प्रकल्पाधिकारी या पदावर असताना त्यांनी शेतकऱ्यांना शेतीचे अद्ययावत तंत्रज्ञान, शासनाच्या विविध योजना यांची माहिती देणारे ‘प्रगती’ हे मासिक सुरू केले. या मासिकाचे वितरण प्रकल्पक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांना केले जात असे. ग्रामपातळीवर वितरित होणारे हे पहिलेच शासकीय मासिक असावे.

अल्पभूधारक विकास संस्थेचा प्रकल्प राबविण्याचा जोशी यांचा अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने

एक द्विसदस्य समिती नेमली. श्रीधर जोशी त्यांतील प्रमुख सदस्य होते. सदर समितीने नांदेड, बुलढाणा, उस्मानाबाद, धुळे व रायगड जिल्ह्यांचा अभ्यास करून प्रकल्प अहवाल तयार केले व त्यानुसार या जिल्ह्यांत प्रकल्प राबविण्याकरिता ग्रामीण विकास संस्था स्थापन करण्यात आल्या. या धर्तीवरचा प्रकल्प महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत राबविला जात आहे. श्रीधर जोशी यांनी केलेले हे काम म्हणजे जिल्हा ग्रामीण विकास संस्थेची पायाभूत रचना होती असे म्हणता येईल.

१९७६ मध्ये श्रीधर जोशी यांची नियुक्ती मुंबई येथे उपजिल्हाधिकारी, करमणूक कर शाखा या पदावर झाली. मुंबईतील काही हॉटेल्समध्ये 'कॅब्रे डान्स' चालत असत व तेथे येणाऱ्या प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन मोजके खाद्यपदार्थ दिले जात असत. याच काळात मुंबईत 'डिस्को डान्स क्लब' सुरू झाले होते. क्लबचे सभासद होण्यासाठी मोठी सभासद फी आकारली जात असे. कॅब्रे डान्स व डिस्को डान्स ही करमणूकच आहे व तेथे प्रवेश करणाऱ्यांवर करमणूक कर लावला जाणे आवश्यक आहे. जोशी यांनी ही गोष्ट शासनाच्या प्रथमच लक्षात आणून दिली व त्या प्रयत्नांतूनच पुढे डिस्को व कॅब्रे डान्सवर नियमितपणे करमणूक कर आकारला जाऊ लागला. याचप्रमाणे मुंबई रेसकोर्सवर प्रवेश दिला जात असे. वार्षिक वर्गणी ही प्रवेश फीच आहे म्हणून त्यावरही जोशी यांच्या प्रयत्नामुळे करमणूक कर लावला जाऊ लागला व त्यामुळे शासनाच्या महसुलात भर पडली.

देशातील आणीबाणी संपवून १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या. त्याच वेळी श्रीधर जोशी यांची नेमणूक उपजिल्हा निवडणूक अधिकारी या पदावर झाली. मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघ व ३४ विधानसभा मतदारसंघ येथे राज्यांतील इतर जिल्ह्यांप्रमाणे तालुकास्तरांवर यंत्रणा नसल्याने निवडणुकीची संपूर्ण व्यवस्था जिल्हा निवडणूक शाखेसच करावी लागे. मुंबईतील निवडणुका सुरळीतपणे पार पाडणे हे एक मोठे आव्हान असते. जोशी यांनी त्यांच्या कारकिर्दीत दोन लोकसभेच्या व दोन विधानसभेच्या निवडणुका पार पाडण्याची जोखमीची जबाबदारी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकाऱ्यांच्या सहकार्याने समर्थपणे पार पाडली.

१९८० मध्ये पुलोदची सत्ता जाऊन राज्यात काँग्रेसचे सरकार आले व बॅ. अ.र.अंतुले मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात लोकमान्य टिळकांचे नातू जयंतराव टिळक यांना ऊर्जामंत्री म्हणून घेण्यात आले. शासनाने जोशी यांची ऊर्जामंत्र्यांचे खाजगी सचिव या पदावर नियुक्ती केली. या पदावर कार्यरत असताना विधानमंडळाचे कामकाज, मंत्रिमंडळाच्या बैठकी, धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया यांसंबंधीची मौलिक माहिती जोशी यांना मिळाली व त्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडली.

१९८२ मध्ये अंतुले सरकार गेले. जयंतराव टिळक विधान परिषदेचे अध्यक्ष झाले. यामुळे जोशी यांची सक्षम अधिकारी, नागरी कमाल जमीन धारणा, मुंबई या पदावर नियुक्ती झाली. या पदावर सुमारे सहा महिने काम केल्यावर त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी, रोजगार हमी योजना, या पदावर नियोजन विभागात नेमणूक झाली.

१९७९ पासून भारतीय प्रशासन सेवेत त्यांना पदोन्नती देण्यात आली व नियोजन विभागात उपसचिव म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. राज्याची पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले. राष्ट्रीय विकास परिषदेत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना राज्याचे विकासविषयक प्रश्न मांडण्यासाठी भाषण करावयाचे असते. त्या भाषणाचा मसुदा तयार करण्याची संधी जोशी यांना प्राप्त झाली. त्याचप्रमाणे राज्याचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रक्रियेसंबंधी संपूर्ण माहिती झाली. योजनांतर्गत तरतूद व अंदाजपत्रकात केलेली तरतूद यांचा मेळ त्वरित घेता यावा या उद्देशाने

प्रत्येक योजनेच्या संदर्भातील अंदाजपत्रकांतील संबंधित लेखाशिष्ट पंचवार्षिक व वार्षिक योजनेच्या आराखड्यात नमूद करण्याची पद्धत जोशी यांनी सुरू केली. त्यामुळे योजनेवर केलेली तरतूद खर्च होते किंवा नाही, हे पाहणे सुलभ झाले.

जून १९७८ मध्ये जोशी यांची नियुक्ती सांगलीचे जिल्हाधिकारी म्हणून झाली. राज्याच्या राजकारणात सांगली जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान होते व आहे. सहकाराच्या माध्यमातून उभारलेले साखर कारखाने, काही तालुक्यात आलेली सुबत्ता, ग्रामीण भागातून पुढे आलेले नेतृत्व, गटबाजीचे राजकारण, स्वातंत्र्यसैनिकांची परंपरा ही या जिल्ह्याची वैशिष्ट्ये. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नि:पक्षपणे व कोणालाही डावे-उजवे न करता प्रामाणिकपणे काम केले तर त्यांना कोणतीही अडचण येत नाही याचा अनुभव जोशी यांना आला.

१९८७ व १९८९ या दोन वर्षांच्या त्यांच्या कारकिर्दीत आर्थिक व सामाजिकदृष्ट्या कमकुवत वर्गासाठी राबविल्या जाणाऱ्या वीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सांगली जिल्ह्याचा पहिला क्रमांक आला व १९८६-१९८९ पासून राज्यशासनाने सुरू केलेले रु. पंधरा लाखांचे पहिले बक्षीस मिळवण्याचा मान सांगली जिल्ह्यास मिळाला. याच काळात भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी, सांगली जिल्ह्याचे पहिले जिल्हाधिकारी पी. जी. चिन्मुळगुंद, आय.सी.एस. याच नावाने दिला जाणारा चिन्मुळगुंद पुरस्कार सुवर्णपदक जोशी यांना प्राप्त झाला.

नद्यांतून सतत होणाऱ्या वाळू उपशामुळे पर्यावरणावर होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास, त्या वेळचे कोल्हापूर विद्यापीठाचे उपकुलगुरू पवार यांच्या साहाय्याने करण्यात आला. तसेच वाळू उत्खननाचा परवाना खाजगी व्यावसायिकाला न देता, शासनाचे आर्थिक नुकसान होऊ न देता एका बिगरशासकीय संस्थेला देण्यात आला व संस्थेतर्फे बलवडी येथे बंधारा बांधण्यास सक्रिय मदत केली व ज्या भागांतून वाळू उत्खनन केले जाते, त्या भागाचा विकास करण्याचा एक आगळावेगळा प्रयोग जोशी यांनी केला. जोशी सांगली येथे कार्यरत असतानाच राज्याचे माजी मुख्यमंत्री व सहकारमहर्षी वसंतदादा पाटील यांचे मुंबईत एक मार्च १९८९ रोजी निधन झाले. त्यांच्या देहावर सांगली येथे अंत्यसंस्कार करण्याचे ठरले. अंत्यसंस्काराची संपूर्ण तयारी करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर होती. त्या दिवशी देशाचे पंतप्रधान राजीव गांधी व इतर मान्यवर सांगलीत आले. एकूण चौदा विमाने सांगलीसारख्या छोट्या शहरात उतरली. संपूर्ण जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासन यांना शासनाकडून व जनतेकडून धन्यवाद मिळाले. जोशी यांनी त्यांच्या कार्यकाळात मिरज येथील संगीतरत्न अब्दुल करीम खाँ साहेब यांच्या स्मारकासाठी भरघोस मदत मिळवून दिली.

मार्च १९८९ मध्ये जोशी यांची नेमणूक औरंगाबादच्या जिल्हाधिकारी या पदावर झाली. ते येथे येण्यापूर्वी औरंगाबाद शहरात मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली झाल्या होत्या. जोशी यांनी त्यांच्या दोन वर्षांच्या काळात पोलिसांच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न समर्थपणे हाताळला. हिंदू व मुस्लीम समाजात ऐक्य राहील यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे त्यांच्या काळात लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुका असतानाही औरंगाबाद शहरात एकही जातीय दंगल झाली नाही.

याच १९८९-९० या वर्षात कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत जिल्ह्याचा विभागात प्रथम क्रमांक आल्याने रु. पाच लाखांचे बक्षीस मिळाले. याच काळात १९९१ च्या जनगणनेचे काम झाले. त्यांनी या संदर्भात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रपतींचे रौप्यपदक देण्यात आले. पैठण येथे झालेला संत ज्ञानेश्वर जन्मशताब्दी सोहळा यशस्वीपणे साजरा करण्यात जोशी यांनी मोलाचे योगदान दिले.

पुढे बर्मिंगहॅम (इंग्लंड) येथील इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज या संस्थेत ‘ग्रामीण विकास नियोजन व व्यवस्थापन’ या विषयावर होणाऱ्या तीन महिन्यांच्या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी मार्च १९९१ मध्ये ते इंग्लंडला गेले. इंग्लंडहून परतल्यानंतर त्यांची नेमणूक पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या राज्याच्या अग्रणी प्रशिक्षण संस्थेच्या अतिरिक्त संचालक व प्राध्यापक ग्रामीण विकास या पदांवर झाली. ते या पदांवर जुलै १९९१ ते फेब्रुवारी १९९६ या काळात कार्यरत होते. त्यांनी राज्यशासनाच्या अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविले.

१९९३ मध्ये केंद्रशासनाने ब्रिटिश काउन्सिलच्या मदतीने जेन्डर प्लॅनिंग ट्रेनिंग हा प्रकल्प हाती घेतला होता. भारतातील पुरुषप्रधान संस्कृती, स्त्रीवर्गास दिली जाणारी दुय्यम दर्जाची वागणूक व स्त्रीवर्गावरील अत्याचार या पार्श्वभूमीवर सदरचा प्रकल्प महत्त्वाचा होता. या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी जोशी यांची निवड झाली व त्यांना ससेक्स विद्यापीठ (इंग्लंड) येथे तीन महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. तेथे त्यांनी त्यांच्या गटांतील इतर सहकाऱ्यांच्या मदतीने ‘स्त्रिया व हिंसाचार’ या विषयावर प्रशिक्षणाचा आराखडा तयार केला. जोशी यांचा अनुभव लक्षात घेऊन ‘महिला उद्योजकता’ (विमेन एन्टरप्रिनरशिप) या विषयावर प्रशिक्षण आराखडा करण्याकरिता निवडलेल्या कर्नाटक गटाला मार्गदर्शन करण्याकरिता ब्रिटिश काउन्सिलने त्यांना नियुक्त केले.

१९९६ ते १९९९ या काळात त्यांनी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून काम पाहिले. याच काळात भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा मुंबईतील सुवर्णमहोत्सव साजरा झाला. तसेच एक्स्प्रेस टॉवरला लागलेली आग, मुंबईतील अतिवृष्टी इत्यादी महत्त्वाच्या घटना घडल्या. या सर्व घटनांमध्ये महापालिकेच्या वतीने जोशी यांनी समर्थपणे जबाबदारी पार पाडली.

१९९९ ते २००० या काळात ते मंत्रालयात सचिव, अन्न व नागरी पुरवठा या पदावर कार्यरत होते. त्यांच्या काळात शालेय पोषणांतर्गत तांदूळ पुरवठा या योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या पदावर असताना त्यांची सदस्य, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण या पदावर निवड झाल्याने, त्यांनी सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी सव्वा वर्ष आधी स्वेच्छानिवृत्ती घेतली.

२००० ते २००६ या काळात जोशी यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे सदस्य व उपाध्यक्ष म्हणून काम केले. तेथे त्यांना उत्तम न्यायिक अनुभव मिळाला. प्रत्येक गोष्टीला दुसरी बाजू असते व त्याचा डोळसपणे विचार करून निर्णय करण्याची दृष्टी या काळातील अनुभवांमुळे मिळाली असे ते नम्रपणे सांगतात. या पदावर काम करताना अनेक शासकीय कर्मचाऱ्यांना न्याय देता आला. देशातील न्यायसंस्थेमुळेच सामान्य नागरिकाला न्याय मिळू शकतो ही त्यांची धारणा दृढ झाली. त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणातील निकाल देण्याच्या निमित्ताने त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण व उत्तम इंग्रजीत लिहिलेल्या निकालपत्रांचा अभ्यास केल्याने न्यायसंस्थेबाबतचा आदर दुणावला असे ते नमूद करतात. जोशी हे उपाध्यक्ष पदावरून २४ ऑगस्ट २००६ रोजी सेवानिवृत्त झाले.

प्रशासनातील व न्यायाधिकरणातील अनुभवाचा फायदा सर्व संबंधितांना व्हावा म्हणून सेवानिवृत्तीनंतर त्यांनी ‘डिसिप्लिनरी प्रोसिडिंग्ज : व्हाय ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल्स इंटरफिअर’, ‘महाराष्ट्र सिव्हिल (डिसिप्लिन ॲण्ड अपील) रूल्स १९७९’, ‘महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९’ ही पुस्तके लिहिली. ती ‘यशदा’ संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. पहिल्या पुस्तकाची मानधनाची रक्कम त्यांनी सार्वजनिक संस्थांना देणगी म्हणून दिली, तर नंतरच्या दोन्ही पुस्तकांचे मानधन

त्यांनी घेतले नाही. यशदाच्या 'यशोमंथन' या त्रैमासिकातून शासनाच्या विविध निर्णयांची माहिती देणारे सदर ते चालवतात. त्यांनी विभागीय चौकशी या विषयाची सर्वंकष व अद्ययावत माहिती देणारे संकेतस्थळ सुरू केले आहे. त्याचा पत्ता http://departmentalenquirymarathi.blogspot.com असा आहे.

जोशी यांनी आपल्या कारकिर्दीत एखादे पद मिळावे म्हणून कधीच अट्टहास अथवा प्रयत्न केला नाही. कोठलेही पद कमी महत्त्वाचे नसते, जे पद मिळेल त्या पदावर प्रामाणिकपणे व निष्ठेने काम केल्यास महत्त्वपूर्ण योगदान देता येते यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. म्हणूनच त्यांनी जेथे-जेथे काम केले, मग ते पद मंत्रालयातील असो वा क्षेत्रीय पातळीवर असो, तेथे-तेथे त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला.

श्रीधर जोशी हे अभ्यासू, प्रामाणिक, नि:स्पृह, निगर्वी, मेहनती, सुसंस्कृत, सोज्वळ, कर्तव्यदक्ष व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन जाणारे लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच वरिष्ठांना त्यांच्याविषयी प्रेम व कनिष्ठांना आदर वाटत असे.

शासनयंत्रणेतील दोष काढून टाकायचे असतील तर त्याची सुरुवात स्वत:पासून केली पाहिजे, असे ते मानतात.

नोकरीच्या निमित्ताने कराव्या लागणाऱ्या दौऱ्यांत आपल्यासाठी कनिष्ठ कर्मचाऱ्यांना आर्थिक तोशीस लागू नये याची ते काळजी घेत. सेवेच्या सुरुवातीच्या काळात तर दौऱ्याच्या वेळी ते स्वत:चा जेवणाचा डबा घेऊन जात असत. स्वत:च्या कामासाठी त्यांनी सरकारी वाहन कधी वापरले नाही.

त्यांची सुविद्य पत्नी भक्ती हिच्या पाठिंब्यामुळेच प्रशासन क्षेत्रातील चढउतार, ताणतणाव यांना धीराने सामोरे जाऊन त्यांनी यशस्वी कारकीर्द घडवली, त्यांच्या दोन्ही कन्यांपैकी मोठी योगिता आपटे हिने बी.एस्सी. व एम.एस्सी. करून काही काळ नोकरी केली. धाकटी मुलगी कीर्ती ही एम.ए. व एम.बी.ए. असून प्रख्यात आयटी कंपनीत प्रकल्प व्यवस्थापक म्हणून नोकरी करत आहे.

– बबन जोगदंड

## जोशी, वसंत कृष्ण

**भारतीय पोलीस सेवा**

**संस्थापक संपादक – 'दक्षता' मासिक**

**लोकप्रिय पोलीस तपास कथाकार**

**१५ फेब्रुवारी १९१८ – २० डिसेंबर २००४**



वसंत कृष्ण तथा व. कृ. जोशींचा जन्म अलिबागमध्ये झाला. त्या काळात, इंग्रजांच्या जमान्यात त्यांच्या वडिलांनी उपजिल्हाधिकारी हे पद भूषवले. व.कृं.ना तीन भाऊ आणि तीन बहिणी. व.कृ. अगदी लहान असताना त्यांच्या आईचे छत्र हरपले. मोठ्या भावाच्या पत्नीने त्यांना मातेचे प्रेम दिले. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयाचे ते विद्यार्थी. त्यांनी वक्तृत्वस्पर्धा, राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धा जिंकल्या. उंचेपुरे, गोरेपान, बळकट शरीरयष्टी, धारदार नाक या त्यांच्या प्रसन्न आणि सतत हसतमुख व्यक्तिमत्त्वामुळे ते सर्वांना आवडायचे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे वर्गमित्र त्यांना 'युरोपियन' म्हणायचे. पुढे मुंबई विश्वविद्यालयातून रसायनशास्त्र विषयात त्यांनी बी.एस्सी.ची पदवी संपादन करून पोलीस सेवेत प्रवेश केला. सेवेत असतानाच त्यांनी कायद्याची पदवी घेतली.

तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता आणि पोलीस सेवा म्हणजे तारेवरची कसरतच होती. त्या वेळी मुंबई राज्यात गुजरात आणि कर्नाटक यांचाही समावेश होता. त्यांना या तिन्ही भाषाभागांत काम करण्याचा अनुभव मिळाला. केंद्रीय डिक्टेटर ट्रेनिंग स्कूल, कोलकाता येथे त्यांनी अनेक वर्षे प्राध्यापक म्हणून


काम केले. विज्ञानाच्या साहाय्याने गुन्ह्याचा तपास कसा करावा या तंत्राचा तेथे त्यांनी अभ्यास केला. भारतातील सर्व भागांतून तेथे प्रशिक्षणासाठी अधिकारी येत. त्यांच्यासह चर्चा, विचारविनिमय, संपूर्ण भारतातील महत्त्वाच्या गुन्हेगारी घटना, त्यांचे तपासकामातील अनुभव, हा सर्व मौल्यवान खजिना त्यांच्या हाती आला.

अगदी लहानपणापासून त्यांच्यावर झालेले संस्कार, घरातील वातावरण, त्यांचे पोलीस खात्यातील अनुभव, या सर्व शिदोरीचा त्यांनी आपल्या लेखनात मोठ्या कौशल्याने उपयोग केला. त्यांचे लेखन केवळ पोलीस तपासकथा न राहता त्या अध्यात्म, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण असत.

व.कृ. जोशींच्या 'इन्स्पेक्टर प्रधान' या व्यक्तिरेखेने वाचकांना भुरळ घातली होती. त्यांच्या लेखनकालाच्या सुमारास पोलीस तपास कथा लिहिणारे अनेक लेखक होते. ते पोलीस स्टेशनमध्ये जाऊन केस माहीत करून घेत व त्यावर काल्पनिक साज चढवत. घटनांची जंत्रीच वाचकांसमोर मांडत. पण व.कृ. जोशींच्या लेखनाचे वैशिष्ट्य हे, की ते अशा लेखनाच्यापलीकडे जाऊन, गुन्हेगार आणि त्यांचे निकटवर्तीय यांचे मनोव्यापार लक्षात घेऊन घटनेच्या मुळापर्यंत पोहोचत. घडलेल्या घटनेकडे फक्त पुरावा शोधण्यासाठी न पाहता गुन्हेगाराच्या सर्व शक्यता पडताळून पाहत अन् संशयित गुन्हेगाराच्या जाबजबाबातून तोच खरा गुन्हेगार आहे का आणि कोणी, हे शोधून काढत. त्यांच्या तपासकामाचे जसे वैशिष्ट्य होते, तसेच लेखनाचेही वैशिष्ट्य होते.

जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यामुळेच पोलीस तपास करताना सापडलेले सत्य समाजासमोर यायला हवे, असे त्यांना वाटे. या अंत:प्रेरणेतूनच त्यांनी लेखनाला सुरुवात केली.

पोलीस अधिकारी असूनही, सतत गुन्हे अन् गुन्हेगारांशी संबंध येत असूनही त्या व्यवसायामुळे येणारी आढ्यता, तुच्छता व मग्रूरी यांपासून ते कोसो




दूर होते. प्रत्येक व्यक्तीशी सहृदयतेने, संवेदनशीलतेने अन् हळुवारपणे बोलून त्यांची मने जिंकण्याचे कसब त्यांच्यापाशी होते. त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पाहावयास मिळते. व. कृ. जोशींनी सत्यघटनांवर, शास्त्रीय तपासकामाच्या तंत्रावर आणि आपल्या प्रत्यक्ष जीवनातल्या अनुभवांवर अनेक कथा लिहिल्या. त्यांचे ३३ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'गुन्हाकबूल', 'पाठलाग', 'सतीचं वाण', 'विज्ञान पोलीसकथा' हे त्यांपैकी काही. महाराष्ट्रात आणि अन्य राज्यांत त्यांची अनेक व्याख्याने व कथाकथने झाली आहेत. त्यांच्या कथांच्या ध्वनिफिती आणि कथांवर आधारित दूरदर्शन मालिका प्रदर्शित झाल्या. 'हॅलो, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' या कथासंग्रहावरची दूरदर्शन मालिकाही गाजली. विज्ञानावर आधारित शास्त्रीय तपासकामांवरील त्यांचे अभ्यासक्रम पुस्तक प्रकाशित झाले आहे आणि महाराष्ट्र राज्य पोलिसांच्या शिक्षणक्रमात त्याचा समावेश झाला आहे.

खरे म्हणजे त्यांनी लिहिलेली प्रत्येक कथा, लेख भारतातील सर्व पोलीस खात्यांनी आणि गुन्हेगारी विश्वाला मार्गावर आणू इच्छिणाऱ्या सर्व सरकारी खात्यांनी 'संदर्भ' म्हणून वापरायला हवी. कारण व.कृं.नी ते निश्चित विचारांनी, ध्येयाने लिहिले आहे. म्हणूनच व.कृ. जोशी हे नाव प्रत्येक मराठी साहित्यप्रेमी रसिकाच्या मनात कायम राहील. वकृंना प्राप्त झालेले महत्त्वाचे पुरस्कार: १९७४ मध्ये राष्ट्रपती पोलीस सेवा पदक (अतुलनीय स्तुत्य सेवेसाठी), 'गुन्ह्याचा तपास आणि विज्ञान' या पुस्तकाकरिता त्यांना महाराष्ट्र राज्य विज्ञान पुरस्कार मिळाला. निवृत्तीनंतरही त्यांनी महाराष्ट्र राज्यासाठी केली महत्त्वाची कामे पोलीस सुधारणांसाठी मुख्यमंत्र्यांनी

नेमलेल्या समितीचे ते सदस्य होते, तसेच पोलीस कोठडीत होणाऱ्या कैद्यांच्या मृत्यूची चौकशी करणाऱ्या समितीचेही ते सदस्य होते.

पोलीस सेवेत असताना त्यांनी जनसंपर्क अधिकारी, 'दक्षता' मासिकाचे संस्थापक, संपादक, महासंचालक तसेच अतिरिक्त पोलीस व ज्ञानेश्वर विद्यापीठाचे विश्वस्त म्हणूनही काम केले.

मातब्बर वृत्तपत्रांनी आणि नियतकालिकांनी त्यांच्या साहित्याला कायमच प्रसिद्धी दिली. त्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत होता. त्याच वेळी महाराष्ट्र राज्य सरकारने जनता आणि पोलीस यांच्यामध्ये सहकाराचा दुवा निर्माण व्हावा यासाठी एका मासिकाची निर्मिती करण्याची योजना आखली. त्यासाठी जनसंपर्क अधिकारी आणि संपादक म्हणून व.कृं.जोशीची निवड करण्यात आली. 'दक्षता' मासिकाची सुरुवात करताना व.कृं.ना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. या मासिकासाठी सरकारने निधी मंजूर केला नव्हता. तेव्हा पोलीस कल्याण निधीतून त्यांनी ३०,०००/- रुपयांचे कर्ज घेतले. मासिक सुरू झाले. छपाई, सजावट, व.कृं.चे स्वत:चे व त्यांनी निवडलेले उत्तम साहित्य, त्यांचे व्यवस्थापकीय कौशल्य, जाहिरात व विक्रीसाठी आवश्यक असलेला जनसंपर्क, सौजन्य यांमुळे 'दक्षता' अल्पावधीतच वाचकप्रिय झाले. त्यांनी घेतलेले कर्ज एका वर्षातच परत फेडले. मराठी मासिकाच्या इतिहासात हे नोंद करण्यासारखेच आहे.

प्रामाणिक आणि कायद्याच्या मार्गाने जाणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला जे जे सहन करावे लागते त्याला ते सामोरे गेलेच, परंतु या सर्वांपेक्षा त्यांच्या कुटुंबावर झालेला आघात, डोके सुन्न करणारा होता.

व.कृं.चा मुलगा सुहास, वय वर्षे पंचवीस भारतीय वायुसेनेत फ्लाइंग ऑफिसर होता. १९७० मध्ये सुहासचे अपघाती निधन झाले. यातून त्यांनी स्वत:ला सावरले आणि आपला वेळ लेखनात व सामाजिक कार्यात गुंतवला. मुलाच्या निधनानंतर त्यांना सरकारतर्फे जमीन व अन्य सुविधा मिळत होत्या पण त्यांनी त्या स्वीकारल्या नाहीत.

२० सप्टेंबर २००४ रोजी व.कृं.जोशींचे निधन झाले आणि इन्स्पेक्टर प्रधानांच्या रूपाने, कायम अन्यायाविरुद्ध लढणारी लेखणी शांत झाली.

– राजेंद्र कुलकर्णी

## जोसेफ, डॅनिअल ट्रेव्हेलिन

**भारतीय प्रशासकीय सेवा,**

**सचिव – आरोग्य, नगरविकास विभाग**

**२१ डिसेंबर १९४५**



जोसेफ डॅनिअल ट्रेव्हेलिन यांचा जन्म तामिळनाडू मधील तुतिकोरीन या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पॉल सॅम्युएल जोसेफ होते. मदुराईमध्ये लहानपण गेल्यानंतर मद्रास विद्यापीठातून १९६६ मध्ये इंग्रजी या विषयात एम.ए.ची पदवी मिळविली. पुढे ब्रिटनमधील मँचेस्टर विद्यापीठातून १९८५ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. केले. शालेय, पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षणातही ते कायमच प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

दोन वर्षे मदुराई येथील एस.व्ही.एन. महाविद्यालयात व्याख्यात्याची नोकरी केल्यानंतर १९६७-६८ मध्ये त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली. उत्तीर्ण झाल्यानंतर जोसेफ यांना महाराष्ट्र कॅडरमध्ये नियुक्त करण्यात आले. एक वर्ष मसुरी येथे प्रशिक्षण घेतल्यावर ते सातारा येथे पुढील प्रशिक्षणासाठी रुजू झाले व नंतर त्यांची नियुक्ती सातारा जिल्ह्यातील फलटण येथे उपजिल्हाधिकारी म्हणून करण्यात आली. १९७२ मध्ये जोसेफ यांचा विवाह सिलका यांच्याशी झाला.

१९७३ मध्ये त्यांची बदली अतिरिक्त जिल्हाधिकारी

म्हणून बीड जिल्ह्यात करण्यात आली होती, परंतु त्याच वर्षी ते सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून साताऱ्यात परत आले. आणीबाणीच्या वेळेस १९७५ मध्ये त्यांची नियुक्ती कोल्हापूर येथे झाली होती. त्यांच्या तेथील चार वर्षांच्या कालावधीत त्यांनी मागासवर्गीय लोकांना जमीन मिळवून देणे, पाटबंधारे खात्याची बाकी रकमेची वसुली, कुटुंबनियोजनासाठी शिबीर यासारख्या कामांसाठी प्रयत्न केले.

शाहू ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून काम पाहताना त्यांनी 'शाहू स्मारका'चे बांधकाम करवून घेतले तसेच कोल्हापूरच्या महानगरपालिकेचे आयुक्त असताना 'महाराणी ताराबाईं'चा पुतळा उभारला.

१९७९ मध्ये कोल्हापूरहून जोसेफ यांची कोकण विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक म्हणून मुंबई येथे बदली झाली. त्या काळात सावंतवाडीजवळ त्यांनी रबरच्या झाडांची लागवड केली. काही काळ त्यांनी योजना मंत्रालयात रोजगार हमी योजनेवरही काम केले. त्याच काळात योजना मंत्रालयाचे मुख्य सचिव परांजपे यांच्या सहकार्याने 'जलविभाजन' क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली.

१९८३ मध्ये जोसेफ यांची नियुक्ती मुंबई विद्यापीठात परीक्षा विभागाकडे लक्ष देण्यासाठी झाली. त्यांनी उत्तरपत्रिकेची केंद्रवर्ती तपासणी (सेंट्रलाइज्ड असेसमेन्ट) सुरू केली.

त्यानंतर त्यांची बदली मुंबईचे जिल्हाधिकारी म्हणून करण्यात आली. तेव्हा मुंबई शहर व उपनगर म्हणून एक जिल्हा मानला जायचा. त्याचे विभाजन होण्याआधीचे ते शेवटचे जिल्हाधिकारी होत. त्यानंतर जोसेफ यांना पुढील शिक्षणासाठी ब्रिटनमधील मँचेस्टर या विद्यापीठात पाठविण्यात आले. १९८५ मध्ये ते अर्थशास्त्रातील पदवी घेऊन, परत येऊन सार्वजनिक आरोग्य खात्यात संयुक्त सचिव म्हणून रुजू झाले. ज्या दिवशी त्यांची आरोग्य खात्यात नियुक्ती झाली त्या दिवसापासून त्यांनी धूम्रपान पूर्णपणे बंद केले, हे




विशेष होय. ऑगस्ट १९८७ मध्ये मुंबई पोलीस कायदा, १९५१ अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे हा गुन्हा ठरवण्यात आला. त्याचे श्रेय जोसेफ यांनाच जाते. तसेच त्यांनी टाटा स्मारक रुग्णालयाबरोबर कर्करोग नियमन कार्यक्रम राबविला.

१९८५ च्या सुमारास गर्भाचे लिंगनिदान करून गर्भपात करण्यासाठी गर्भलिंग चिकित्सेचा गैरवापर मोठ्या प्रमाणात होत होता. जोसेफ यांनी या विषयाचा अभ्यास करून गर्भलिंग चिकित्सेवर कायद्याने मर्यादा आणल्या. लिंगनिदानासाठी चिकित्सा हा गुन्हा ठरवून १९८८ मध्ये तसा कायदा करण्यात आला. परंतु लोक शेजारच्या गुजराथ राज्यात जाऊन लिंगनिदान करून इकडे परत येऊन गर्भपात करून घेत होते. याला निर्बंध घालण्यासाठी जोसेफ यांनी केंद्रीय आरोग्य खात्यातील अतिरिक्त सचिव मीरा सेठ यांच्या सहकार्याने एक समिती स्थापन केली. जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली या समितीने गर्भलिंग चिकित्साबंदीचा कायदा करण्यात यश मिळविले. १९९४ मध्ये हा कायदा देशभर लागू करण्यात आला.

१९८९-९० मध्ये जोसेफ यांनी यशदाचे महाव्यवस्थापक म्हणून कार्य केल्यानंतर १९९० मध्ये त्यांची नगर विकास खात्यात सचिव म्हणून बदली करण्यात आली. तेथे त्यांनी मुंबईसाठी विकास आराखडा मान्य करून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले. फेब्रुवारी १९९१ मध्ये, जुन्या महत्त्वाच्या इमारतींना वारसाहक्क नियमन लागू करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यानुसार या इमारतींची प्रतवारी करण्यात आली. नगर विकास आराखड्यासाठी टी.डी.आर.द्वारे

महानगरपालिकेला जमीन संपादित करता यावी यासाठीचे नियम जोसेफ यांच्या कार्यकाळात लागू करण्यात आले.

१९९६ मध्ये त्यांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन अधिकार विभागाचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आली. त्यानंतर 'एसआयसीओएम' चे महाव्यवस्थापक म्हणून त्यांनी काम पाहिले. १९९९ मध्ये जहाज व्यवस्थापनाचे संचालक म्हणून जोसेफ यांची नियुक्ती झाली. ते केंद्र सरकारच्या जहाज व्यवस्थापन मंत्रालयाचे सचिव म्हणून २००५ मध्ये निवृत्त झाले. या त्यांच्या कार्य काळात त्यांनी समुद्रविषयक प्रशिक्षणासाठी खाजगी संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. वल्लारपदम, सेतुसमुद्रम यासारखे प्रकल्प त्यांच्याच कारकिर्दीत सुरू झाले.

निवृत्त झाल्यावरही काही काळ या मंत्रालयाच्या सल्लागारपदी त्यांची नियुक्ती केंद्र सरकारकडून करण्यात आली होती.

– आशा बापट

* * *

ज

# ट

## टाकळकर, वसंत देगुजी

**वनसंरक्षक, भारतीय वनसेवा**

**१ जून १९४४**



वसंत देगुजी टाकळकर यांचा जन्म पुण्याजवळ ४५ किलोमीटरवर असणाऱ्या टाकळवाडी (राजगुरुनगर, ता. खेड, पुणे) या छोट्याशा गावी झाला. वडील देगुजी टाकळकर आणि आई सीता यांच्या शेतकरी कुटुंबात वाढत असताना त्यांनी अनेक कठीण प्रसंगांना तोंड दिले. घरच्या शेतीमुळे तिकडेच त्यांचा विशेष ओढा होता. शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या अगदी जवळून अनुभवल्या असल्याकारणाने शेतकऱ्यांसाठी, समाजासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, ही तळमळ लहानपणापासून होती.

टाकळकर यांचे प्राथमिक शिक्षण राजगुरुनगर महात्मा गांधी विद्यालयात झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते १९६६ मध्ये पुण्यात आले. त्यांनी कृषी महाविद्यालयातून कृषी विषयात पदवी शिक्षण घेतले. त्यानंतर १९६७ मध्ये त्यांनी डेहराडून येथील असोसिएशन ऑफ इंडियन फॉरेस्ट महाविद्यालय येथून पदव्युत्तर पदविका घेतली. १९७८ मध्ये कायद्याचे पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. १९८९ मध्ये लॉस बॅनोस विद्यापीठ, फिलिपीन्स येथून ‘फॉरेस्ट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट’ या विषयात प्रमाणपत्र मिळविले.

टाकळकरांनी १९८२ मध्ये आयआयएम, अहमदाबाद येथून शेतकी विषयात प्रकल्प व्यवस्थापन शिक्षण घेतले. तसेच हैदराबाद येथील ‘एनआयआरडी’ येथून त्यांनी प्रकल्प व्यवस्थापन (प्रॉजेक्ट प्लॅनिंग) आणि मूल्यांकन या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. लोकसेवा आयोगामधून त्यांची प्रथम प्रयत्नात निवड झाली.

वनसंरक्षक पदावर काम करताना टाकळकर यांनी सुरुवातीची २५ वर्षे नाशिक, चंद्रपूर, ठाणे येथे काढली. १९९० मध्ये त्यांची बदली सोलापूरसारख्या दुष्काळी भागात झाली. या जिल्ह्यात मुळात वनखात्याची जमीन कमी, त्यातून पावसाचे प्रमाणही अत्यल्प. या प्रतिकूल परिस्थितीमुळे टाकळकरांना आव्हान दिसले. त्यांना प्रा. भागवतराव धोंडे यांनी शोधलेल्या ‘कंटूर मार्कर’ या उपकरणाची आठवण झाली. सलग समपातळी चर ऊर्फ ‘कन्टिन्युअस कंटूर ट्रेंच’ या पद्धतीने काम केले तर सोलापुरातल्या उजाड माळरानांचे भवितव्य उजळून निघेल याची त्यांना खात्री वाटली. त्यांनी या तंत्राचा वापर आपल्या कार्यकक्षेतील असंख्य वनजमिनी व डोंगर टेकड्यांवर झाडे लावण्यासाठी केला. त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांनाही हे तंत्र शिकविले. सोलापूर, अहमदनगर, धुळे, नंदूरबार व जळगाव जिल्ह्यात लक्षावधी हेक्टरमधील वनक्षेत्रांत समपातळी रेषेवर चर खोदून त्यांनी असंख्य झाडे लावली.

डोंगरमाथ्यापासून उतारापर्यंत माती आणि पाणी अडविण्यासाठी टाकळकरांनी ‘सलग समतल चर’ या तंत्राचा अवलंब केला. डोंगरावर समपातळीचे सलग चर खणले तर वाहणारे पाणी आणि त्याबरोबर येणारी माती थांबते. या चरांमध्ये झाडे वाढू शकतात. हे चर सलग आणि समपातळीतच घेणे आवश्यक असते. या



सलग समतल चर

तंत्राचा सुपरिणाम म्हणजे, पाण्याचा थेंब अन् थेंब त्याच क्षेत्रात अडवला गेला. दोन चरांच्या अंतरामध्ये पडणारा पाऊस चरांतच अडून राहू लागला. यामुळे जमिनीची धूप थांबून जास्तीचे पाणी जमिनीत पाझरून खाली जाऊन तलाव, विहिरींमध्ये साठू लागले.

आपले काम शेतकऱ्यांच्या उपयोगी पडावे, त्यातून त्यांचे कष्ट हलके व्हावेत, अशी टाकळकरांची तळमळ होती. वनविभागातील त्यांची कारकीर्द नाशिकपासून सुरू झाली. चंद्रपूरच्या जंगलातही त्यांनी काही काळ काम केले. कुठेही असोत, प्रयोगशील टाकळकर आपल्या कल्पकतेचा, बांधीलकीचा, सचोटीचा, कर्तव्यदक्षतेचा प्रत्यय देत राहिले.

१९९२ मध्ये राज्यसरकारने ग्रामस्थांच्या सहभागातून वनविकासाच्या संकल्पनेचा कार्यक्रम पुढे आणला, त्या वेळी टाकळकर हे सोलापूर जिल्ह्यात उप वनसंरक्षक होते. सोलापूरसारख्या दुष्काळी जिल्ह्यात त्यांनी सलग समतलचरांच्या कामाला सुरुवात केली. बहरून फुललेली रोपे पाहून कर्मचाऱ्यांची उदासीनता पळून गेली. त्यानंतर टाकळकरांची अहमदनगर जिल्ह्यात बदली झाली तिथेही ही मोहीम धडाक्याने सुरू झाली. १९९३ ते १९९६ या काळात सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यात सुमारे दहा हजार हेक्टर क्षेत्रावर सलग समतल चरांची कामे करण्यात आली. सुमारे २५,००० कि.मी. लांबीचे चर खोदले गेले. कर्जत तालुक्यात आधीच्या वर्षी जनावरांना पिण्यासाठीसुद्धा पाणी नव्हते. तिथे सलग समतल चरांचे काम झाल्यानंतर लगेचच्या वर्षी विहिरीतल्या पाण्याची पातळी वाढली. शेतकरी बागायती भुईमूग घेऊ लागले. टाकळकरांना गावकरी सांगत, गावात पाणी नाही, कितीही खोल खणले तरी पाणी लागत नाही, तेव्हा टाकळकर त्यांना डोंगराकडे बोट दाखवून म्हणत, ''तुमचे पाणी तिथे आहे!'' या उक्तीचा प्रत्यय शेतकऱ्यांना येत होता.

२००४ पर्यंत टाकळकरांच्या पुढाकार आणि मार्गदर्शनातून धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यांमध्येही अनेक भागांत सलग समतल चरांची कामे उभी राहिली. त्याआधी २००३ पर्यंत नगर, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यांमध्येही अनेक भागांत सलग समतल चरांच्या साहाय्याने एकशे तीस दशलक्ष घन मीटर एवढे पाणी अडविण्यात वनविभागाला यश आले. हे पाणी बावीस हजार हेक्टर पडीक जमिनीत जिरवल्यावर तिथल्या पाण्याच्या प्रश्नाची तीव्रता कमी झाली. नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्याच्या म्हसवंडी गावात तर हा प्रयोग खूप यशस्वी ठरला. इथल्या मंदिराजवळ बांधलेल्या रस्त्याला लोकांनी टाकळकरांचेच नाव

दिले व त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. भेजदरी, सुरेगाव, वराड, लासूर, डोळ्यासणे ही गावे हिरवीगार, झाली. छत्तीस हजार कि.मी. हेक्टरवरील चार हजार पाचशे कि.मी. लांबीची शास्त्रोक्त सलग समतल चरांच्या साहाय्याने पंधरा लाख लोकांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली. मांगी-तुंगीजवळच्या डोंगराला ‘वसंत हिल्स’ नाव देऊन लोकांनी वसंत टाकळकरांच्या कामाची पावती दिली.

हिवरे बाजार या गावच्या पोपटराव पवारांना समतल चराची शास्त्रीय माहिती पटवून देणारे वसंतराव प्रसिद्धीपासून मात्र दूरच राहिले. काही आदिवासी गावांमध्ये त्यांना ‘पाण्याचा देव’ म्हणून संबोधत, हीच टाकळकरांच्या दृष्टीने खरी प्रसिद्धी आहे.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा या तालुक्यातील वऱ्हाड हे एक हजार चारशे लोकवस्तीचे आदिवासी गाव. २००२ सालच्या उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईमुळे इथे लोकांना जगणे नकोसे झाले होते, बारा दिवसांनंतर पाण्याच्या टँकरची पाळी येई. या भागात टाकळकरांनी उन्हाळ्यात वीस हेक्टर भागात जल-मृदा संधारणाचे काम हाती घेतले. पुढच्या वर्षी झालेल्या पावसात इथल्या विहिरी तुडुंब भरलेल्या दिसल्या. हे विधायक चित्र केवळ टाकळकरांमुळे पाहणे शक्य झाले.

वसंतरावांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सलग समपातळी चर खोदण्यामध्ये काटेकोरपणा आणला. वनखात्याच्या रोपवाटिकेत रोपांसाठी प्लॅस्टिक पिशव्या वापरल्या जात. रोपांच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या इतस्तत: पडून राहत. त्या गोळा करून पुनर्नवी करणासाठी द्यायचे कामही त्यांनी जातीने पाहिले. महाराष्ट्रात एक कोटी हेक्टरपेक्षा अधिक जमीन पडीक आहे. त्यावर प्रयोग केला, तर तीन हजार सहाशे कोटी टन पाणी वाचवणे शक्य असल्याचे ते सांगतात. तज्ज्ञांनी टाकळकरांच्या या उपक्रमाला ‘टाकळकर पॅटर्न’ असे सार्थ नावही सुचवले. नद्यांच्या खालच्या भागातून पाणलोट क्षेत्र योजना करणे अशास्त्रीय आहे, पाणी अडवायला डोंगरमाथा ते पायथा असेच गेले पाहिजे, असे टाकळकर मानतात. अचूकतेचा आग्रह आणि प्रशिक्षणाची शिस्त यांचे धडे त्यांनी वनखात्याच्या ‘करड्या शिस्तीत’ त्यांच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून गिरवून घेतले. या करड्या शिस्तीचा नेमका उपयोग टाकळकरांनी केला. दऱ्याखोऱ्यांतील, कानाकोपऱ्यांतील त्यांची कामे बोलू लागली आणि प्रसिद्धिमाध्यमांनी त्यांवर बातम्या दिल्या, पुस्तके लिहिली गेली. अनेक राज्यांतून प्रशिक्षणासाठी लोक येऊ लागले. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशने तर त्यांच्या या कामाला ‘मिशन’चे स्वरूप दिले. टाकळकरांच्या तंत्राला भारतभर मान्यता मिळाली. २००४ मध्ये उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणींबरोबर झालेल्या चर्चेत पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा मानून विकेंद्रित जलव्यवस्थापनाचा आग्रह टाकळकरांनी धरला.

२००४ मध्ये टाकळकर सेवानिवृत्त झाले असले तरी राज्यभरातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुलांना जलसंधारणाचे प्रशिक्षण देण्यात ते व्यग्र आहेत. सध्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळात ते मार्गदर्शकाच्या भूमिकेतून आपल्याकडील संचित नव्या पिढीकडे सुपूर्त करत आहेत. वसंतराव टाकळकर यांच्या या कामामुळे त्यांना केंद्र सरकारने २००५ मध्ये ‘इंदिरा प्रियदर्शिनी’ पुरस्कार दिला. पुणे विद्यापीठाच्या समर्थ भारत अभियानाचे मार्गदर्शक म्हणूनही त्यांचे काम सुरू आहे. पुणे शहरातील तीन टेकड्यांवर सलग समतल चर तंत्राच्या साहाय्याने काम सुरू आहे.

टाकळकर हे ॲपेक्स कमिटीचे सदस्य आहेत. याच माध्यमातून भारतातील पावसाचे पाणी साठविण्याच्या पुरातन पद्धती, तसेच ग्रामीण भागातील पावसाचे पाणी अडविणे, जिरवणे यांसंबधी ११० पानी तांत्रिक पुस्तिका तयार केली गेली असून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध होत आहे.

— अनघा फासे

* * *

ट

# ड

## डिसूझा, जोसेफ बेन

**मुख्याधिकारी, स्वस्त गृहनिर्माण योजना**
**आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका**
**३ जून १९२१ – सप्टेंबर २००७**



जोसेफ बेन डिसूझा यांचा जन्म एका कॅथलिक कुटुंबात झाला. वडील जॉन आणि आई लिडवाइन यांच्या संस्कारांच्या छायेत ते वाढले. जन्माच्या वेळी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण असल्यामुळे देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. दोन भाऊ व एक बहीण असा त्यांचा परिवार होता.

डिसूझा यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईतील सेंट झेविअर्स हायस्कूलमध्ये झाले. १९४४ साली त्यांनी सेंट झेविअर्स महाविद्यालयामधून गणित या विषयात पदवी घेऊन शिक्षण पूर्ण केले. पुढे १९५५ साली ते उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत गेले. तेथील सिरॅक्यूझ विद्यापीठामधून लोकसेवा व्यवस्थापन या विषयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण संपादन केले. तसेच १९५६ मध्ये पुन्हा हार्वर्ड विद्यापीठ, केंब्रिज येथून लोकसेवा व्यवस्थापन या विषयात पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला.

डिसूझा यांनी देशसेवा करण्याच्या प्रेरणेतून १९४४ मध्ये भारतीय नौसेनेत प्रवेश घेतला; पण त्यांना भारतीय प्रशासनात काम करण्याची विशेष इच्छा झाल्यामुळे पुढे त्यांनी भारतीय नौसेना सोडून प्रशासकीय सेवेत प्रवेश केला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४७ मध्ये ते प्रशासकीय सेवेत रुजू झाले. त्यांनी फाळणीच्या वेळी पंजाबमध्ये निर्वासितांसाठी मदतकार्य केले. डिसूझा यांच्या कार्याचे भौगोलिक कार्यक्षेत्र बिहार, महाराष्ट्र, नवी दिल्ली इ. ठिकाणी होते. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर पूर्व पाकिस्तानातील निर्वासितांच्या पुनर्वसनाचेदेखील काम संचालकपदी राहून केले.

१९५० मध्ये ते अलिबाग येथे जिल्हाधिकारी होते. त्यानंतर १९६४ मध्ये औरंगाबाद येथे ते आयुक्त पदावर कार्यरत होते.

स. गो. बर्वे यांच्या सोबत काम करण्याचा अनुभव डिसूझांसाठी संस्मरणीय ठरला. बर्वे यांची न्याय्य वर्तणूक, सचोटी व कार्याला वाहून घेण्याची वृत्ती यांमुळे ते भारावून गेले.

१९६६ ते १९६९ मध्ये त्यांनी बी.ई.एस.टी.चे महाव्यवस्थापक म्हणून काम पाहिले. १९६९ मध्ये ते बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त होते.

१९७० ते १९७४ या काळात त्यांनी नवी मुंबई प्रकल्पात सिडकोचे व्यवस्थापन निदेशक म्हणून काम पाहिले. तसेच नवी दिल्ली येथील हुडको प्रकल्पातदेखील ते व्यवस्थापन निदेशक पदावर कार्यरत होते. त्यांनी प्रशासनातील अनेक जबाबदाऱ्या अत्यंत चोखपणे निभावल्या. त्यांच्यातील कार्यक्षमता आणि प्रामाणिकपणा या गुणवैशिष्ट्यांसाठी ते प्रसिद्ध होते.

दिल्ली, आग्रा व भोपाळ येथील स्वस्त गृहनिर्माण योजना राबविण्यात डिसूझा यांचा महत्त्वाचा वाटा होता. १९७९ मध्ये डिसूझा हे प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या सेवाकाळात त्यांना अमेरिकेत




**सिडको भवन**

सिरॅक्यूझ विद्यापीठाकडून ‘आदर्श माजी विद्यार्थी पुरस्कार’ मिळाला होता.

डिसूझा हे कॅथलिक पंथाचे होते; पण त्यांची कोणत्याही धर्माशी वैचारिक बांधीलकी नव्हती. त्यांच्या ह्या वैशिष्ट्यासाठी १९९४ मध्ये त्यांना राजीव गांधी निधर्मवाद पुरस्काराने गौरविले गेले. निवृत्तीनंतर १९८१ ते २००१ मध्ये ते महाराष्ट्र शासनाच्या मुंबई विकास प्रकल्पांच्या परीक्षण समितीचे सदस्य होते. १९७९ ते १९८२ या काळात डिसूझा हे हैदराबाद येथील ‘ॲडमिनिस्ट्रेशन स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया’ येथे प्राचार्य होते. तसेच १९८२ ते १९८५ या काळात त्यांनी वर्ल्ड बँकेत नागरी व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम केले. त्यानंतर ते पुन्हा भारतात परतले. १९९२ मध्ये मुंबईतील जसलोक रुग्णालय येथे ते मुख्य अधिकारी पदावर होते.

२००२ मध्ये प्रकाशित झालेले त्यांचे ‘नो ट्रंपेट्स नॉर ब्यूगल्स : रेक्लेशन्स ऑफ ॲन अनरिपेन्टट बाबू’ हे आत्मचरित्र त्यांच्या विविधांगी कर्तृत्वावर प्रकाश टाकते. त्याचाच एस.ए. वीरकर यांनी ‘ना जलसा ना जल्लोष’ या नावाने मराठी अनुवाद केला आहे.

१९९७ ते २००७ या काळात ते मुंबई येथील ‘नागरी निवारा’ या स्वस्त गृहनिर्माण योजनेत मुख्याधिकारी होते. आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत ते कार्यरत होते.

– अनघा फासे

* * *

ड

# त



## तांबे-वैद्य मालती

**पहिल्या महाराष्ट्रीय महिला आय. ए. एस.,**
**संचालक - महाराष्ट्र पर्यटन विभाग**
**जन्मदिनांक अनुपलब्ध - ३ मार्च २०१०**

मालती तांबे-वैद्य यांचा जन्म अकोला येथे झाला. त्यांचे वडील के.व्ही. तांबे हे नागपूर येथे न्यायाधीश होते. मालती यांचे शिक्षण अकोला आणि नागपूर येथे झाले. १९५३ मध्ये त्यांनी नागपूर येथील विज्ञान महाविद्यालयामधून रसायनशास्त्र या विषयात एम.एस्सी.चे शिक्षण घेतले. या परीक्षेत त्यांनी 'डबल फर्स्ट'चा मान मिळवला. एम.एस्सी.मध्ये त्यांना सुवर्णपदक ही मिळाले होते.

१९५५ मध्ये त्या भारतीय प्रशासकीय सेवेची परिक्षा उत्तीर्ण झाल्या. ही परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या त्या पहिल्या महाराष्ट्रीय महिला अधिकारी आहेत. त्यांची प्रथम नियुक्ती नागपूर येथे उपजिल्हाधिकारी या पदावर करण्यात आली.

मंत्रालयाच्या सचिव वर्गात आज महिला अधिकाऱ्यांची मोठी संख्या असली तरी १९७०-८० च्या दशकात मंत्रालयात एकमेव महिला सचिव म्हणून मालती तांबे-वैद्य गाजत होत्या. मालती तांबे-वैद्य यांनी मंत्रालयात सचिव शिक्षण, समाजकल्याण, सामान्य प्रशासन, सांस्कृतिक अशी अनेक खाती हाताळली असली तरी त्यांनी आपल्या प्रशासकीय कौशल्याचा ठसा उमटविला तो पर्यटन खात्यावर. किंबहुना महाराष्ट्राला पर्यटनाच्या नकाशावर आणण्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. कारण तोपर्यंत पर्यटन क्षेत्राचा आर्थिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून कुणी फारसा विचार केला नव्हता.

१९६९ मध्ये मालती तांबे-वैद्य यांना फ्रान्स सरकारच्या शिष्यवृत्तीवर पर्यटनाचा विशेष अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून फ्रान्स येथे पाठवण्यात आले. तेथील एक्स मार्सेलय या विद्यापीठातील 'सेंटर ऑफ टुरिझम स्टडी' या विभागाचे संचालक आणि जगप्रसिद्ध पर्यटन तज्ञ डॉ. बारेटज यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एक वर्षाचे पर्यटन याविषयाचे प्रगत प्रशिक्षण घेतले. तेथून परतल्यावर १९७० मध्ये मालती तांबे-वैद्य महाराष्ट्र पर्यटन खात्याच्या सचिव झाल्या.

फ्रान्स मधील प्रशिक्षणामुळे महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी त्यांना प्राप्त झाली. महाराष्ट्रातील सागरकिनाऱ्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. महानगरी मुंबईमधील पर्यटकांचे आकर्षण ठरलेले घारापुरी लेण्याचे बेट पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

राज्याच्या पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची स्थळे निश्चित करून पर्यटकांसाठी तेथे आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी त्यांनी केली.

मालती तांबे-वैद्य सचिव असतानाच सांस्कृतिक विकासालाही चालना मिळाली. त्यांनी पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाखेरीज सामान्य प्रशासन व महसूल या खात्याचेही सचिवपद सांभाळले होते.

नंतर मालती तांबे-वैद्य यांना राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या पहिल्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करण्याचा मान मिळाला. केंद्र सरकारकडे प्रतिनियुक्तीवर गेल्यानंतर या पदावर

MAHARASHTRA TOURISM
NFDC
cinemas of india

असताना त्यांनी समांतर सिनेमाच्या विकासासाठी भरीव योगदान दिले. प्रायोगिक किंवा समांतर सिनेमा त्यांच्या काळात रुजला व फोफावला.

मालती तांबे-वैद्य यांना चित्रपटविषयक व्यासंग दांडगा असल्यामुळे एनएफडीसीमधील त्यांच्या कामाचे सर्व स्तरातून नेहमीच कौतुक होत असे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या काळात आणि त्या नंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या राज्याच्या वाटचालीला विकासाची दिशा दाखविण्यात ज्या धुरिणांनी मोलाची कामगिरी बजावली त्यात मालती तांबे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. प्रागतिक विचार, आधुनिक राहणी, मृदु भाषा, शांत स्वभाव, प्रशासनावर पकड, आत्मविश्वास, मेहनती वृत्ती ही त्यांची वैशिष्ट्ये होती.

त्या उत्तम बॅडमिंटनपटू होत्या व बॅडमिंटनच्या अनेक स्पर्धांत त्यांनी भाग घेतला होता. क्रीडांगणावर हे कर्तृत्व बजावताना शैक्षणिक आघाडीवरही त्यांनी अव्वल स्थान राखले होते. प्रशासकीय सेवेत रुजू झाल्यानंतरही क्रीडांगणावरही त्यांची कारकीर्द सुरूच होती. १९६८ मध्ये बॅडमिंटनच्या राष्टीय स्पर्धेत त्यांनी मिश्र दुहेरीचे अजिंक्यपद पटकावले होते.

प्रशासकीय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत असताना त्या घरची आघाडीही उत्तम सांभाळत होत्या. नेत्रतज्ज्ञ असलेले त्यांचे पती डॉ. वसंत वैद्य, एक मुलगा आणि एक मुलगी अशा चौकोनी कुटुंबाचे तहहयात गृहसचिवपद त्यांनी तितक्याच समर्थपणे सांभाळले. वयाच्या ७९ व्या वर्षी मुंबईत हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

—नितीन केळकर

## तिनईकर, सदाशिव शंभूराव

**अतिरिक्त मुख्य सचिव – महाराष्ट्र राज्य**
**आयुक्त – बृहन्मुंबई महानगरपालिका**
**३ एप्रिल १९३२ – २२ मे २०१०**



सदाशिव शंभूराव तिनईकर हे भारतीय प्रशासन क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव. त्यांचा जन्म बेळगावनजीक असलेल्या खानापूर येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे शालेय शिक्षण खानापूर येथेच झाले. वयाच्या सोळाव्या वर्षी ते मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा वरच्या श्रेणीत उत्तीर्ण झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबई येथील विल्सन महाविद्यालयात दाखल झाले. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञान हा विषय निवडला. १९५२ मध्ये बी.ए. आणि १९५४ मध्ये एम.ए. ह्या पदव्या त्यांनी प्राप्त केल्या.

मॅट्रिकपासून उच्च श्रेणी मिळविलेले हुशार विद्यार्थी तेव्हा प्राय: भारतीय प्रशासन सेवेत जाण्यासाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षेची संधी घेत. सदाशिव तिनईकरांनीही ती संधी घेतली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात तिनईकर अखिल भारतात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९५६ च्या निवड तुकडीतील आय.ए.एस. अधिकारी म्हणून त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. त्यांची पहिली नेमणूक सुरत येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून झाली. लवकरच म्हणजे, १९५७ मध्ये मधुमती बोरकर उर्फ मायावती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यानंतर फाउण्डेशनची शिष्यवृत्ती मिळवून ते जपान, युरोप व अमेरिकेला जाऊन आले.

१९६० मध्ये झालेल्या जनगणना उपक्रमात ते महाराष्ट्राचे जनगणना निरीक्षक होते. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होत असताना झालेली जनगणना विशेष



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

त

महत्त्वाची होती. तरुण आय.ए.एस. अधिकारी सदाशिव तिनईकर यांनी जनगणना निरीक्षक म्हणून आपली जबाबदारी उत्तम रितीने पार पाडली. मनमिळाऊ प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. त्यानंतर तिनईकर यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रात आणि विशेषत: मुंबईमध्ये विविध अधिकारपदे भूषविली.

१९६३-६४ मध्ये तिनईकर ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. तेव्हाच्या ठाणे जिल्ह्यात आदिवासी विकासाचा प्रश्न फारच ज्वलंत होता. आपल्या दोन वर्षांच्या कार्यकालातच तिनईकर यांनी आदिवासी विकासाबाबत महत्त्वपूर्ण धोरण राबविले. किंबहुना आदिवासी विकासाचा प्रश्न मार्गी लागण्याची सुरुवात ही तिनईकर यांनी त्या धोरणाची केलेली अंमलबजावणी होती असे म्हणणे अगदी योग्य ठरेल.

नाशिक येथे हिंदुस्थान एअरोनॉटिक्सचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक होण्याचा मानही तिनईकरांना मिळाला. केंद्र शासनाच्या अखत्यारीत असलेला हा उद्योग चालविण्याची जबाबदारी ह्या तरुण प्रशासकावर होती.

शंकरराव चव्हाण हे काँग्रेसचे मुख्यमंत्री असताना तिनईकर यांना मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तेव्हा, मुंबईपुरत्या मर्यादित असलेल्या शिवसेना या संघटनेची नुकतीच स्थापना झाली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या वेगळ्या राजकारणशैलीची सुरुवात झाली होती. शिवसेनाप्रमुखांशी म.न.पा. अध्यक्षांचे जेव्हा मतभेद अनेकदा झाले तेव्हा त्यातून तिनईकर यांनी मार्ग काढला. तसेच मुंबईच्या प्रश्नांच्या संदर्भात शिवसेनेला बरोबर घेऊन जाण्याची राजकीय प्रशासकीय कला त्यांनी आत्मसात केली असे म्हटले, तर ते अयोग्य ठरणार नाही.

मुंबई महानगरातील महत्त्वाकांक्षी ‘मलनिस्सारण प्रकल्पा’ला त्यांच्या कारकिर्दीत सुरुवात झाली. पण तो पुढे काही कारणाने रखडला. विदेशी कंपनीची कोणतीही निविदा स्थायी समितीपुढे पंधरा दिवसांपेक्षा जास्त काळ पडून राहिली तर ती मंजूर करण्याचा अधिकार स्थायी समितीला न राहता, पालिका आयुक्तांच्या अधिकारात ती आपोआप मंजूर होते, हा राज्य सरकारने केलेला कायदा वापरणारे तिनईकर हे पहिले आयुक्त ठरले.

महापौरांच्या निवडणुकीची आधीची पद्धत बदलून त्यांनी एका वेळी एकानेच मतदान करायची पद्धत आणली. या निर्णयामुळे त्यांना राज्यकर्त्यांशी बऱ्याच प्रमाणात संघर्ष करावा लागला. महापौर त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटी महानगरपालिकेच्या खर्चाने जवळजवळ हजार लोकांना जेवण देत असत. ही पद्धत तिनईकरांनी बंद केली. महापौरांना पालिकेतर्फे दिले गेलेले वाहन त्या शहराच्या बाहेर घेऊन जाण्यास परवानगी नसते. पण बरेच महापौर ही प्रथा पाळत नाहीत. मुंबई महानगरपालिकेत तिनईकरांच्या पुढाकाराने याची कडक अंमलबजावणी सुरू झाली. पालिकेच्या विविध समित्यांच्या बैठका मुंबईबाहेर रम्य ठिकाणी आपआपल्या कुटुंबासह व्हायच्या. ही प्रथाही त्यांनी बंद पाडली.

सार्वजनिक संस्थांना देणग्या देण्यासंबंधी निश्चित नियम आहेत. पण ते नियम मोडून ठराविक पक्षांच्या सदस्यांना मदत देण्यात येऊ लागली. तेव्हा ही देणग्या

देण्याची पद्धत तिनईकरांनी बंद केली. त्या वेळचे मुंबई महानगरपालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष पुष्पकांत म्हात्रे यांच्याशी तिनईकरांचा बराच संघर्ष झाला. तरीही म्हात्रे यांनी तिनईकरांनी नगरसेवकांमध्ये व व्यवस्थापनात आणलेल्या शिस्तीचे कौतुक केले आहे आणि त्याचे श्रेय त्यांच्या स्वच्छ व स्पष्ट कारभाराला दिले आहे. तिनईकरांची जेव्हा मुंबई आयुक्तपदी नेमणूक झाली, तेव्हा महानगरपालिकेत अनेक आर्थिक प्रश्न व रेंगाळलेले प्रकल्प होते. पण त्यांनी महापालिकेला यातून बाहेर काढले.

१९६६ ते १९७० या कालावधीत कोणाही आय.ए.एस. अधिकाऱ्याला मिळाली नसेल अशा कामाची संधी तिनईकर यांना लाभली. ती म्हणजे, पुणे येथील पशुवैद्यकशास्त्र संस्थेचे संचालक या पदावर नियुक्त झालेले ते पहिलेच आय.ए.एस. अधिकारी म्हणावे लागतील.

मुंबई महानगरपालिकेत आयुक्त पदावर असताना त्यांनी त्यांचे समकालीन आय.ए.एस. अधिकारी द.म. सुकथनकर यांच्या मार्गदर्शनानुसार मुंबईतील धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसंबंधीचा अहवाल तयार केला होता. परंतु त्यांनी अहवालात केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नाही.

१९९० मध्ये तिनईकर मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त असताना निवृत्त झाले. ते त्यांच्या सहकाऱ्यांची नेहमीच पाठराखण करीत. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत. त्यांच्या स्वच्छ व स्पष्ट कारभारामुळे राज्य सरकारने तिनईकरांना आयुक्तपदावरून बढती देऊन अतिरिक्त मुख्य सचिव पदावर नेमले. मुंबई महानगरपालिकेच्या १०० वर्षांच्या इतिहासात अशी बढती मिळणारे ते एकमेव आयुक्त आहेत. तिनईकर यांच्यासारख्या समाजाभिमुख प्रशासकीय अधिकाऱ्याला महानगरपालिकेतून निरोप देताना मुंबईच्या नागरिकांतर्फे त्यांचा भव्य सत्कार झाला. ही जनतेच्या प्रेमाची पावती होय.

सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकाऱ्याने काय करावे असा प्रश्न तिनईकर यांना कधीच पडला नाही. मुंबईच्या जसलोक रुग्णालयाचे मानद प्रशासक म्हणून त्यांनी निःशुल्क काम करायला सुरुवात केली. त्याच काळात ‘लोकसत्ता’ ह्या दैनिकात तिनईकर यांनी ‘चालू घडामोडी’ या विषयावर लेखमालिका लिहिली. अरुण टिकेकर हे त्या वेळी लोकसत्तेचे संपादक होते. तिनईकर यांची ही लेखमाला चांगलीच गाजली.

तिनईकर हे एक उत्तम चित्रकार होते. सतारवादन व वक्तृत्वकलेत ते प्रवीण होते. आपली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रेरणा ते कधीही विसरले नाहीत. सतत समाजाभिमुख राहिले. शासनाकडून त्यांना अनेकदा अडचणी आणि त्रास सोसावा लागला. परंतु सामान्य माणसांनी त्यांच्यावर सतत प्रेम केले. त्यामुळे अर्थातच तिनईकर हे एक आगळेवेगळे प्रशासक म्हणून सदैव लक्षात राहतील.

– प्रा. डॉ. विजय देव


* * *

त

# द

## दुभाषी, पद्माकर रामचंद्र

**संस्थापक संचालक - वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकार प्रबंध संस्था,**
**पहिले प्राचार्य-कृषीवित्तीय महाविद्यालय (पुणे)**
**७ मार्च १९३०**



भारतीय प्रशासकीय सेवेतील एक नामवंत प्रशासक अधिकारी, विद्वान शिक्षणतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक व लेखक पद्माकर रामचंद्र तथा पी. आर. दुभाषी आजही सहकार, शिक्षण व अर्थशास्त्रीय विषयावर लेखन करीत आहेत. पुण्यातील राष्ट्रीय स्तरावरची अधिकाऱ्यांना शिक्षण प्रशिक्षण देणाऱ्या आणि संशोधन करणाऱ्या वैकुंठ मेहता राष्ट्रीय व प्रबंध संस्थानचे ते संस्थापक व पहिले संचालक आहेत.

भारतीय प्रशासकीय सेवेतील एक ज्येष्ठ अधिकारी असताना भारत सरकारच्या ध्येयधोरणाला त्यांनी विशेष चालना दिली आहे. भारत सरकारने २०१० मध्ये त्यांना 'पद्मभूषण' हा मानाचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

डॉ. पी.आर. दुभाषी तत्कालीन महाराष्ट्र, गुजरात, व कर्नाटक प्रदेशासाठी असणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या एम.ए.परीक्षेत प्रथम आले, कृषि व ग्रामीण विकासात स्वातंत्र्यानंतरचे कार्य' या विषयामध्ये त्यांनी पीएच.डी. मिळविली. मुंबई विद्यापीठाचा 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' हा बहुमान त्यांना 'नियोजनासंबंधीची मूलभूत व्यवस्था-चौकट' या विषयावरील प्रबंधासाठी मिळाला. तो ग्रंथ भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्था यांनी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशनने) प्रकाशित केला. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या परीक्षेतही ते सर्वप्रथम आले आहेत. त्या विद्यापीठाने त्यांना 'वित्तीय आणि सामाजिक प्रशासन' (इकॉनॉमिक अँड सोशल ॲडमिनिस्ट्रेशन)या विषयासाठी पदव्युत्तर पदविका दिली.

डॉ. पद्माकर दुभाषी हे भारतातील केंद्रीय प्रशासकीय (आय.ए.एस.) स्पर्धा परीक्षेत उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. एक उत्तम प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. भारत सरकारने त्यांच्यावर सोपविलेल्या विविध जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी त्यांचा गौरव केला आहे.

देशातील सहकार क्षेत्रातील एका मोठ्या खत-कारखान्याच्या उभारणीत त्यांनी मोठी भूमिका पार पाडली आहे. 'कृषक भारती' या सहकारी संस्थेचे ते पहिले अध्यक्ष झाले. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना योग्य व दर्जेदार खतांचा पुरवठा व्हावा आणि शेती उत्पादन वाढावे या योजनेचा त्यांनी पाठपुरावा केला. ग्रामीण भारताचा त्यांचा डोळस अभ्यास आहे. अनेक घटकराज्यांमध्ये समूह विकास आणि सहकार प्रशिक्षण यांच्या संस्था भक्कम पायावर उभारण्यात त्यांचा मुख्य वाटा आहे. मसुरीच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिटी डेव्हलपमेंट'चे ते संचालक होते. पुण्यात रिझर्व्ह बँकेने वित्तीय शेतकी महाविद्यालय सुरू केल्यावर त्याचे पहिले प्राचार्यपद त्यांनी भूषविले. त्या

द

महाविद्यालयामार्फत भारतातील (वित्तीय/बँकिंग) क्षेत्रातील अनेक अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करून बँकिंग क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा हेतू त्यांनी पूर्णत्वास नेला. कोणत्याही संस्थेचा विकास हा शिक्षण, प्रशिक्षण आणि नियोजनाशिवाय होऊ शकत नाही यावर त्यांचा कटाक्ष आहे.

कर्नाटकच्या 'मलप्रभा' व 'घटप्रभा' या प्रकल्पांचे प्रशासक असताना त्यांनी 'कमांड एरिया डेव्हलपमेंट'साठी पाणीपुरवठ्याची पुरेपूर क्षमता यावी म्हणून अनेकमुखी कार्यक्रमांची रचना केली. बेळगावचे आयुक्त असताना डॉ. दुभाषींनी मराठी व कानडी लोकांमध्ये समन्वयाची चांगली भूमिका पार पाडली. बेळगाव शहराला चांगला आकार यावा आणि या शहराचे वैभव वाढावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. कर्नाटक सरकारचे मुख्य सचिव या नात्याने राज्याच्या कार्याला त्यांनी गती दिली. कर्नाटक सरकारच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध योजना आखून त्या त्यांनी राबविल्या. रस्ते, पूल, धरणे, शहरांचे सुशोभीकरण, बागा, यांचे विस्तारीकरण केले.

१९८० च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना आसाममध्ये कृषी अर्थरचनेचा विकास करायची निकड भासली, तेव्हा त्यांनी डॉ. दुभाषींसारख्या प्रदीर्घ अनुभव असलेल्या अधिकाऱ्यास विशेष प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. पुढे राजीव गांधी पंतप्रधान झाल्यावर त्यांनीही त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या टाकल्या. भारत सरकारच्या शेती, सहकार व पंचायतराज या खात्याचा कारभार अधिक लोकाभिमुख करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सरकारच्या ध्येयधोरणाची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे कशी राबविली जाईल याबाबत ते दक्ष असत. भारतातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना अधिक गतिमान करण्यासाठी त्यांनी सरकारच्या ध्येयधोरणानुसारच प्रशिक्षणाची योजना आखून तशी व्यवस्था केली. अधिकारी अधिक द्रष्टा व्हावा व त्याच्या कामात गती यावी, यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त होऊन आज ३७ वर्षे झाली तरी अनेक सार्वजनिक संस्थांना त्यांचे थेट मार्गदर्शन लाभत आहे. केंद्र सरकारच्या अनेक तज्ज्ञ समित्यांचे नेतृत्व त्यांच्याकडे येत असतेच. गोवा विद्यापीठाच्या उभारणीत त्याचा सिंहाचा वाटा आहे. येथे पाच वर्षे कुलगुरू म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. अभ्यासक्रम, शैक्षणिक दर्जा यांमध्ये त्यांनी आधुनिकपणा आणला. ज्ञान, विज्ञान यांमध्ये विद्यार्थ्यांत पारंगतता यावी व आपले विद्यार्थी जागतिक क्षेत्रात पुढे यावेत अशा प्रकारचे शिक्षण विद्यापीठातून दिले जावे यासाठी गोवा विद्यापीठात नवे धोरण आखले आणि भारतात या विद्यापीठाला त्यांनी नवा दर्जा प्राप्त करून दिला.

डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी असे एक चतुरस्र, अनुभवी, विद्वानमान्य शिक्षणतज्ज्ञ; शेती, सहकार, अर्थनियोजन व कलात्मक प्रशासक अधिकारी म्हणून साऱ्या भारतभर ज्ञात आहेत. सध्या ते भारतीय विद्या भवन, पुणे केंद्राचे अध्यक्षपद भूषवीत आहेत.

– जयराम देसाई

## देवकुळे, श्रीकांत त्र्यंबक

**मुख्य अभियंता, सहसचिव, प्रधान सचिव – पाटबंधारे विभाग**

**२१ ऑगस्ट १९३५ – ६ जानेवारी २०१०**

श्रीकांत त्र्यंबक देवकुळे यांचा जन्म जोधपूर येथे झाला. देवकुळे घराणे मूळचे वाईचे होते. श्रीकांत यांचे वडील राजस्थानातील जोधपूरच्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षणही जोधपूरलाच झाले. पुढे देवकुळे



यांचे वडील गुजरातमध्ये, आणंद जवळील वल्लभ विद्यानगरीच्या एका महाविद्यालयात प्राचार्य म्हणून दाखल झाले. त्यामुळे श्रीकांत देवकुळे यांचे महाविद्यालयीन शिक्षण वल्लभ विद्यानगरी येथे झाले. त्यांनी महाविद्यालयीन परीक्षांत नेहमीच पहिली श्रेणी आणि वरचा क्रमांक कायम ठेवला. १९५६ साली देवकुळे गुजरात विद्यापीठाची बी.ई. स्थापत्यची परीक्षा प्रथम श्रेणीत विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले. पदवी मिळविल्यानंतर एक वर्षभर ते वल्लभ विद्यानगरीच्या सरदार वल्लभभाई महाविद्यालयात शिकवत होते. काही काळ त्यांनी बडोद्याला (वडोदरा) सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीसुद्धा केली. १९५९ साली देवकुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिले आले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ते महाराष्ट्रात येऊन पाटबंधारे खात्यात साहाय्यक अभियंतापदी रुजू झाले.

मे १९५९ ते ३१ ऑगस्ट १९९३ या काळात देवकुळे यांनी पाटबंधारे खात्यात विविध पदांवर राहून महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय कामे केली. १९५९ ते १९६३ पर्यंत साहाय्यक अभियंता म्हणून त्यांची गंगापूर धरणावर नेमणूक झाली. १९६३ साली कार्यकारी अभियंता म्हणून त्यांना बढती मिळाली. १९६३ ते १९६८ दरम्यान मातीच्या धरणाचे तज्ज्ञ म्हणून त्यांनी धरणाचे नकाशे तयार केले. १९६८ च्या ऑगस्ट महिन्यात पानशेत धरणाच्या पुनर्निर्मितीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. मे १९७१ पर्यंत त्यांच्या देखरेखीखाली पानशेत आणि खडकवासला धरणांची नव्याने उभारणी करण्याचे काम झाले.

जून १९७१ ते जुलै १९७६ पर्यंत पाटबंधारे खात्याच्या सातारा विभागाच्या 'अधीक्षक अभियंता' या पदावर त्यांची नेमणूक झाली. त्यांनी त्या काळात कृष्णा, वारणा आणि दूधगंगा पाटबंधारे योजनांना गती दिली.

देवकुळे यांनी जुलै १९७६ पासून जानेवारी १९८० पर्यंत अधीक्षक अभियंता आणि उपसचिव म्हणून कार्यभाग सांभाळला.

१९८० नंतर वर्षभर मुख्य अभियंता आणि सहसचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. त्या काळात बी.एम.आर.डी. आणि पाणी पुनर्वापर व्यवस्थापनाच्या संदर्भात देवकुळेंनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मुंबई महानगरातील पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनासंबंधीच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने त्यांनी उपाययोजना सुचविल्या.

श्रीकांत देवकुळे फेब्रुवारी १९८१ ते १९८५ दरम्यान औरंगाबाद विभागाचे मुख्य अभियंता असताना मराठवाडा विभागातील मांजरा, तेरणा आणि दुधना प्रकल्प मार्गी लागले.

मे १९८७ पासून पाटबंधारे खात्यात ते मुख्य अभियंता आणि सचिवपदी कार्यरत होते, तर ११ मे १९९२ पासून ३१ ऑगस्ट १९९३ पर्यंत देवकुळे पाटबंधारे खात्याचे मुख्य सचिव होते.

त्यांच्या पस्तीस वर्षांच्या सेवेत राज्यातील महत्त्वाचे मोठे मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्प आकाराला आले. धोरणात्मक निर्णय, प्रशासकीय कामकाज, प्रकल्पाची निवड, धरणांची आखणी, उभारणी या साऱ्याच बाबतीत श्रीकांत देवकुळे यांचा निर्णय महत्त्वाचा मानला जात असे. मातीच्या धरणांची आखणी, उभारणी आणि देखभाल यांतील तज्ज्ञ अशी खात्यात त्यांची प्रतिमा होती.

जागतिक बँक, युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी आदि संस्थांकडून मिळणाऱ्या मदतीवर आधारित पाटबंधारे प्रकल्पांसंबंधीची धोरणे ठरविण्याचे, त्या प्रकल्पाची आखणी-नियोजन करून ते उभे करण्याचे कामही देवकुळे यांनी केले आहे.



पानशेत धरण

निवृत्तीनंतरही त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर कामे केली. भारत सरकारच्या नवव्या पंचवार्षिक योजना समितीचे ते सदस्य होते. भारतातील धरणाच्या, पाटबंधारे प्रकल्पाच्या आधुनिकीकरणासाठी तयार करण्यात आलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते. मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनासंबंधीच्या तंट्यात त्यांनी अध्यक्ष म्हणून काम केले.

किल्लारी भूकंपानंतर बाधित झालेल्या धरणांच्या मजबुतीकरणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने गठित केलेल्या अभ्यासगटाचे ते सल्लागार होते.

महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे आणि जलसिंचन विभाग, तसेच कृष्णा खोरे विकास प्राधिकरणाच्या सल्लागारपदी त्यांची नेमणूक झाली होती. सर्वोच्च न्यायालयातील आंतरराज्य पाणी तंट्याच्या संदर्भात राज्य सरकारचे सल्लागार, मार्गदर्शक म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

भारतात आणि भारताबाहेरील अनेक परिषदा, संमेलनांत उपस्थित राहून त्यांनी 'शोधनिबंध' वाचले आहेत.

१९८५ च्या मार्च महिन्यात पाटबंधारे प्रकल्पासाठीच्या कर्जासाठी जागतिक बँकेशी सल्लामसलत करण्यासाठी वॉशिंग्टनला गेलेल्या शिष्टमंडळाचे ते सदस्य होते. जलसिंचनाच्या विकासाच्या संदर्भात इंटरनॅशनल इरिगेशन सेंटर, लोगन येथील जुलै १९८५ मध्ये झालेल्या कार्यशाळेला देवकुळे उपस्थित होते. १९८७ मध्ये मोरोक्को येथे भरलेल्या जलसिंचन आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या तेराव्या परिषदेला ते हजर होते. तलाव-सरोवरांच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी १९९० च्या सप्टेंबर महिन्यात त्यांनी अमेरिकावारी केली.

कलकत्त्याच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स' या संस्थेचे ते फेलो होते. राऊरकेलाच्या 'इंडियन वॉटर रिसोर्स सोसायटी' आणि नवी दिल्लीच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन'चे तहहयात सदस्य होते. त्याचप्रमाणे दिल्लीच्या 'इंडियन काउन्सिल ऑफ आर्बिट्रेशन'चेही ते सदस्य होते.

वैयक्तिक आयुष्यातही 'शिस्तबद्ध' पद्धतीने जगलेले श्रीकांत देवकुळे यांना हॉकी, बॅडमिंटन या खेळांत विशेष रुची होती. ते उत्कृष्ट खेळाडू होते. कोणतीही गोष्ट करताना मग वैयक्तिक भटकंती वा पर्यटनही असो, त्या संदर्भातील संपूर्ण माहिती मिळवून निश्चित आखणी करावी, असा देवकुळेंचा आग्रह असे. त्यांचे हृदयविकाराने निधन झाले.

– प्रकाश कामत

## देवरे, सुधीर तुकाराम

**भारतीय परराष्ट्र सेवा**
**सहसचिव, अर्थसचिव-विदेश मंत्रालय,**
**राजदूत, महासंचालक – इंडियन काउन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स**
**५ जून १९४१**

आंतरराष्ट्रीय जगताचे आकलन, राजकारणाची एक अंगभूत जाणीव, देशाची वकिली करण्याची कुशलता या तीन घटकांनी बनलेले रसायन म्हणजे विदेशनीती. अशा या चाणक्याच्या विश्वात गुणवत्तेच्या जोरावर प्रवेश मिळवणे ही कामगिरीच काहीशी असामान्य!

द



भारताचा राजदूत त्या देशातला भारताचा सर्वोच्च प्रतिनिधी असतो. मराठी माणसाने हे पद मिळवणे म्हणजे अवघड काम होय. त्यात जी निवडक माणसे यशस्वी झाली, त्यांत सुधीर देवरे हे एक महत्त्वाचे नाव आहे. तुकाराम आणि सुमती देवरे यांचे ज्येष्ठ सुपुत्र सुधीर तुकाराम देवरे यांचा जन्म सोलापूर येथे झाला. वडिलांचे देवरे घराणे मराठवाड्यातल्या करडखेड इथले, तर मातोश्रींचे एकबोटे घराणे तुळजापूर या क्षेत्रस्थानाचे.

सुधीर देवरे यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथील नूतन मराठी शाळेतून झाले, तर मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मॉडर्न हायस्कूलमध्ये झाले. शालेय शिक्षणात सुधीर केवळ अभ्यासातच नव्हे, तर वक्तृत्वामध्येही आघाडीवर राहिले. त्यांनी आंतरशालेय वादविवाद स्पर्धांमध्ये सतत बक्षिसे मिळवली. १९५० साली मॅट्रिकला गुणवत्ता यादीत आठव्या क्रमांकावर येऊन सुधीर देवरे यांनी उज्ज्वल यश प्राप्त केले, तर १९५९ साली मॅट्रिकला त्यांची धाकटी बहीण सुधा, बोर्डात पहिली आली. या बहीण-भावंडांची नावे मॉर्डर्न हायस्कूलच्या पटलावर नोंदली गेली. मात्र दोघांचे हे यश बघायला वडील हयात नव्हते. पुणे येथील वाडिया महाविद्यालयात उपप्राचार्यपदाची धुरा सांभाळत असतानाच त्यांचे निधन झाले.

सुधीर देवरे यांनी पुण्यातील वाडिया महाविद्यालय, नंतर मुंबईतील पार्ले महाविद्यालय व इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथून भूगोल व रसायनशास्त्र हे विषय घेऊन बी.एस्सी.च्या परीक्षेत उच्च गुण प्राप्त केले. या काळात पार्ले महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.सी.बी. जोशी यांचा प्रशासन सेवेबद्दल सुधीर यांच्या मनात आवड निर्माण करण्यात मोठा वाटा होता. १९५४ साली सुधीर यांची आय.ए.एस.च्या परीक्षेत निवड झाली. त्यांना लहानपणापासून राजकारणामध्ये रुची होतीच. सर्व विषयांचा चौफेर अभ्यास करण्याचीही आवड होती. घरातले कौटुंबिक वातावरणही त्यासाठी पोषक असेच होते. प्रखर देशभक्तीचे उपजतच बाळकडू मिळालेले! आंतरराष्ट्रीय विश्वासंबंधीचे कुतूहल, टेनिस, बॅडमिंटन, ब्रिज यांसारखे खेळ यांची पार्श्वभूमी वाडिया महाविद्यालयाच्या परिसरात तयार झालेली होतीच. आय.ए.एस.च्या परीक्षेला बसण्याची तयारी चालू असताना चीनने आक्रमण केले, त्यामुळे देशभक्तीची लाट उफाळली होती. आय.ए.एस.मध्ये निवड झाल्याने देशसेवेची संधी मिळाली. त्यांनी विदेशसेवा हे क्षेत्र आणि रशियन भाषेचे सुरुवातीपासून आकर्षण वाटत असल्याने ती निवडली.

१९६५ साली डॉ. ना.र. देशपांडे यांची कन्या हेमा हिच्याशी विवाहबद्ध होऊन सुधीर देवरे मॉस्कोला रवाना झाले. भाषा शिक्षण आणि विदेशसेवेचे प्रशिक्षण यांची सुरुवात सोबतच झाली. इंदिरा गांधींची १९६६ सालची मॉस्को भेट हा विदेश सेवेतला पहिला अध्याय होता. पुढे वॉशिंग्टन, सिक्किम, जिनिव्हा, ब्रह्मदेश, दक्षिण कोरिया, जर्मनी, युक्रेन आणि इंडोनेशिया अशा अनेक ठिकाणी देवरे यांच्या बदल्या झाल्या. युरोप आणि आशिया असा क्रम राहिला. त्या देशांशी भारताचे राजनैतिक व आर्थिक संबंध वृद्धिंगत करणे आणि दोन्ही देशांना आपल्या कार्याने जवळ आणणे हा त्यांचा प्रयत्न प्रत्येक देशात कायम राहिला.

१९७० ते १९७४ हा सिक्किममधला काळ भारताच्या इतिहासातला फार महत्त्वाचा टप्पा ठरला. या काळातच तिथली राजसत्ता संपुष्टात येऊन लोकशाही आली आणि त्यानंतर सिक्किम भारताचे एक राज्य बनले. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने ही फार मोठी घटना होती. तेथील घडलेल्या घडामोडींमध्ये अप्रत्यक्षरीत्या देवरे यांना फार मोठी भूमिका बजावावी लागली. विदेश मंत्रालयात जॉइंट सेक्रेटरी म्हणून त्यांनी १९८२-१९८५ या काळात



**इंडियन काउन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर**

श्रीलंका, बांगलादेश, मालदीव व म्यानमार या शेजारी देशांबरोबरचे नाजूक संबंध हाताळले होते.

त्यांची दक्षिण कोरियामध्ये १९८५ साली राजदूत म्हणून पहिली नेमणूक झाली. त्या वेळी भारत आणि कोरिया यांचे संबंध फार जुजबी स्वरूपाचे होते. 'बुद्धाचा देश' हीच भारताची प्रतिमा तोपर्यंत कोरियात होती. १९८५ ते १९८९ या काळातील देवरे यांच्या वास्तव्यात भारत-कोरिया संबंधांचा पूर्ण आराखडा तयार झाला. ह्युन्देई, देऊ, सॅमसंग ह्या कंपन्यांची नावे आज भारताच्या घराघरांमध्ये पोहोचली आहेत. त्या संबंधांची पायाभरणी त्या काळात झाली. कोरियामध्ये लोकशाही आली. आशियाई खेळ व ऑलिम्पिक्स त्याच काळात झाले. त्या सर्वांच्या व्यवस्थापनात राजदूताची भूमिका आणखी महत्त्वाची झाली. १९८९ ते १९९२ या कालावधीत फ्रँकफर्टला काउन्सिल जनरल असण्याचा अनुभव आणखीनच वेगळा. जर्मनीमधल्या व्यापार संबंधात औद्योगिक प्रदर्शनांचा भाग मोठा असे. भारतातल्या उद्योजकांना प्रोत्साहन देऊन जर्मनीत त्यांचा सहभाग वाढवण्याची कामगिरी काउन्सिल जनरलची असायची. दोन्ही जर्मनींचे एकीकरण झाल्यावर ही जबाबदारी वाढली.

पुढे सोव्हियत युनियनची शकले झाली आणि १९९२ साली युक्रेन या स्वतंत्र देशाचा पहिला राजदूत म्हणून सुधीर देवरे यांची नेमणूक झाली. नव्याने राजनैतिक संबंध निर्माण करणे हे काम दुर्गम तसेच आव्हानात्मक होते. युक्रेनबरोबर आर्मेनिया आणि जॉर्जिया या देशांच्या राजदूतपदाची जबाबदारीही त्यांना सांभाळायची होती. दूतावासाची उभारणी हा अनुभव अनोखा व त्यातून चेर्नोबिलचा बागुलबुवा भेडसावणाऱ्या कीव्हसारख्या ठिकाणी तो उभारणे आणि दूतावासाचे मनोबल कायम ठेवणे याचाही ताण होता. दोन वर्षांत संबंधांना जेव्हा स्थिरता आली. राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांची युक्रेन भेट, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ पातॉन यांची भारतभेट आणि युक्रेन शेअरची भारताला येण्याची सुरुवात या देवरेंच्या तेथील वास्तव्यात घडलेल्या महत्त्वाच्या घटना होत्या. देवरे यांनी सातत्याने सरकारबरोबर राजनैतिक संवाद साधून भारतीय विद्यार्थ्यांना युक्रेनमधील विद्यापीठात मोफत शिक्षणाच्या सवलती परत मिळवून दिल्या. त्यामुळे जवळजवळ एक हजार विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग, वैद्यकीय शास्त्र इत्यादी विषयांत आपले शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले.

द

१९९५ साली सुधीर देवरेंची इंडोनेशियात भारताचे राजदूत म्हणून नेमणूक झाली. हे फार वरिष्ठ पद समजले जाते. एक विस्तृत देश, जगात सर्वांत अधिक मुस्लीम लोकसंख्येचा देश, 'आसियान'मधली मुख्य सत्ता व भारताशी अनेक सूत्रांनी प्राचीन काळापासून जोडलेला देश. जकार्ता हे आसियानचे मुख्य कार्यालय आहे. आसियानबरोबर संबंध प्रस्थापित करण्यात, 'आसियान रीजनल फोरम'मध्ये भारताचा समावेश करण्यात व आसियानबरोबरची 'संवाद भागीदारी' (डायलॉग पार्टनरशिप) यांत देवरे यांचा फार महत्त्वपूर्ण कार्यभाग होता. या काळात भारत व इंडोनेशिया दरम्यान अनेक करार झाले व संबंध खूप दृढ झाले.

१९९८ साली सुधीर यांची विदेश मंत्रालयात अर्थसंबंधी सचिवपदी नियुक्ती झाली. विदेश मंत्रालयात एकूण तीन सचिव असतात व ते विदेश धोरणाची धुरा सांभाळत असतात. १९९८ ते २००१ या साडेतीन वर्षांच्या दीर्घ काळात सुधीर देवरे विदेश मंत्रालयात सचिव पदावर होते. आशिया, आफ्रिका यांतले देश, अनेक आंतरराष्ट्रीय संस्था यांबाबतची त्यांच्यावर थेट जबाबदारी होती. अनेक परिषदांत ते भारताचे प्रतिनिधित्व करीत असत. त्या काळात 'लुक ईस्ट' हे पौर्वात्य देशांवरचे नवे धोरण प्रस्थापित झाले, त्यात देवरेंचा मोठा हातभार होता. ते धोरण यशस्वी झाले असून आज भारताला फार उपयोगी पडत आहे.

फिजी या पॅसिफिक महासागरातल्या देशात २००० साली, जेव्हा पुंडगिरीमुळे भारतीय वंशाच्या पंतप्रधानास पदच्युत केले गेले व हिंसेचे वातावरण निर्माण झाले, तेव्हा भारत सरकारतर्फे फिजीतल्या भारतीय समाजासोबत संवाद चालू ठेवण्यासाठी देवरे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली होती.

२००१ साली देवरे यांची विदेश मंत्रालयातली कारकीर्द संपली; पण नंतरच्या दहा वर्षांत त्यांनी भारतातल्या व परराष्ट्रांतल्या अनेक नामवंत संस्थांमध्ये उच्च पदांवर काम केले व आजही ते करीत आहेत.

२००१ ते २००३ या काळात देवरे 'राष्ट्रीय सुरक्षाविषयक सल्लागार मंडळ' (नॅशनल सिक्युरिटी ॲडव्हायजरी बोर्ड) या आपल्या देशातल्या सर्वोच्च सिक्युरिटी संस्थेचे सदस्य होते. २००२ साली दिल्लीच्या प्रसिद्ध जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयात ते अभ्यागत प्राध्यापक होते. पूर्व आशिया अध्ययनाविषयी ते मार्गदर्शन करीत असत. आर.आय.एस. ह्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधाबाबतच्या दिल्लीतल्या सुप्रसिद्ध संस्थेचे २००२ ते २००६ या काळात ते उपाध्यक्ष होते.

२००३ मध्ये त्यांना सिंगापूरच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ साउथ-ईस्ट एशियन स्टडीज'ने 'व्हिजिटिंग सीनियर फेलो' म्हणून सिंगापूरला आमंत्रित केले. देवरे यांनी तिथे २००६ पर्यंत काम केले. या काळात त्यांनी दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांवर काम केले. 'इंडिया ॲण्ड साउथ-ईस्ट एशिया : टोवर्ड्स सिक्युरिटी कन्व्हर्जन्स' हे पुस्तक त्यांनी २००५ मध्ये लिहिले व 'ए न्यू एनर्जी फ्रॉण्टियर : दी बे ऑफ बेन्गॉल रीजन' हे पुस्तक संपादित केले. सिंगापूरमध्ये असताना त्यांनी अनेक लेख लिहिले व भाषणे दिली. २००७ मध्ये अमेरिकेतल्या सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठाने त्यांना 'फेलो' म्हणून आमंत्रित केले. एक वर्ष त्यांनी त्या विद्यापीठात काम केले.

भारतात परत आल्यावर २००९ साली 'इंडियन काउन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स' या नामवंत संस्थेने (पंडित नेहरूंच्या प्रेरणेतून १९४३ साली ही संस्था निर्माण झाली. भारतातील आंतरराष्ट्रीय अभ्यासाबाबतची ही सर्वांत जुनी व प्रसिद्ध संस्था आहे) त्यांना महासंचालक या पदाची धुरा सांभाळण्यासाठी खास आमंत्रण दिले. सुधीर आजही तिथे कार्यरत आहेत. भारताचे उपराष्ट्रपती या संस्थेचे अध्यक्ष आहेत. गेल्या ६७ वर्षांच्या संस्थेच्या इतिहासात सुधीर देवरे हे पहिलेच मराठी 'डायरेक्टर जनरल' आहेत.

– हेमा देवरे

## देशमुख, चिंतामण द्वारकानाथ

**आय.सी.एस., स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री, गव्हर्नर – भारतीय रिझर्व्ह बँक**

**१४ जानेवारी १८९६ – २ ऑक्टोबर १९८२**



चिंतामण द्वारकानाथ (सी. डी.) देशमुख त्यांचा जन्म किल्ले रायगडाजवळील नाते या गावी झाला. त्यांचे वडील द्वारकानाथ व्यवसायाने वकील, तर आई भागीरथी धार्मिक वृत्तीची गृहिणी होती. आईचे संस्कार आणि वडिलांचे मार्गदर्शन या बळावर चिंतामणीच्या बुद्धिमत्तेने मोठी झेप घेतली. जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती सर्वांत प्रथम मिळवणाऱ्या या विद्यार्थ्याने पुढे देश–परदेशांतल्या सगळ्याच परीक्षांमध्ये अव्वल स्थान मिळवत नंतर आपल्या कारकिर्दीत कार्यक्षम सनदी अधिकारी ते स्वतंत्र भारताचे पहिले वित्तमंत्री पद भूषवून या देशाच्या अर्थव्यवस्थेला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

रायगड जिल्ह्यातल्या आडवळणाच्या गावात असूनही खडतर परिस्थितीपुढे हार न मानता वेळप्रसंगी परीक्षेसाठी मैलोन्‌मैल अंतर पायी तुडवत सी.डी. देशमुखांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिकच्या परीक्षेत ते पहिले आले. केम्ब्रिज विद्यापीठातून १९१७ मध्ये त्यांनी वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र आणि भूगर्भशास्त्र हे विषय घेऊन नैसर्गिक विज्ञानात पदवी प्राप्त केली. विद्यापीठात ते पहिले आले. लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे १९१८ मध्ये देशमुखांनी भारतीय नागरी सेवा ही परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केली.

नागरी सेवेत दाखल झाल्यानंतर चिंतामणराव देशमुख यांची प्रशासकीय कारकीर्द जवळपास २१ वर्षांची होती. सी.डी. देशमुख यांची पहिली नेमणूक १९१८ मध्ये आत्ताचा विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगड म्हणजेच त्या वेळचा मध्यप्रांत आणि वऱ्हाड या राज्यांत झाली होती. पुढे ते या राज्याचे महसूल सचिव आणि वित्त सचिव या पदापर्यंत पोहोचले. या पदापर्यंत पोहोचणारे ते सर्वांत कमी वयाचे प्रशासकीय अधिकारी असावेत. याच दरम्यान सुट्टीवर लंडनला असताना त्यांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेत सचिव म्हणून काम पाहिले होते. या गोलमेज परिषदेत महात्मा गांधीही सहभागी झाले होते. मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या वतीने तत्कालीन केंद्र–सरकारला सादर केलेल्या निवेदनाबद्दल त्यांना १९३५ मध्ये केंद्र – राज्य वित्तीय संबंधांसाठीचा पुरस्कार मिळाला होता.

जुलै १९३९ मध्ये देशमुख यांची नियुक्ती रिझर्व्ह बँकेत लियाझन ऑफिसर म्हणून झाली. भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्यातला दुवा म्हणून ते काम पाहू लागले. तीन महिन्यांनंतरच ते केंद्रीय बँक मंडळाचे सचिव झाले. डिसेंबर १९४१ मध्ये रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर म्हणून त्यांनी कारभार स्वीकारला आणि दि. ११ ऑगस्ट १९४३ रोजी सी.डी. देशमुख हे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर झाले. ते रिझर्व्ह बँकेचे तिसरे आणि मूळ भारतीय वंशाचे पहिले गव्हर्नर होते.

त्यांच्याच कार्यकाळात दि. १ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण झाले. या परिवर्तनासाठी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया त्यांच्याच देखरेखीखाली पूर्ण झाली.

१९४९ साली रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण झाले तेव्हा अधिकोषण कंपन्यांच्या नियमांसाठीचे कायदे तयार करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. स्वतंत्र भारताची पहिली वित्तसंस्था, औद्योगिक वित्त महामंडळ अर्थात इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (आयएफसीआय) स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ग्रामीण भागात पतपुरवठ्याची यंत्रणा मजबूत करण्यासाठी देशमुख यांनीच पुढाकार घेतला होता. त्यांच्या या योगदानामुळे कृषी क्षेत्राला कर्जपुरवठा सुकर झाला



भारतीय रिझर्व्ह बँक

१ एप्रिल १९५० रोजी नियोजन आयोगाची स्थापना झाली आणि नेहरूंनी त्यांची या आयोगावर सदस्य म्हणून नेमणूक केली. त्यानंतर लगेचच स्वतंत्र भारताचे पहिले वित्तमंत्री म्हणून त्यांची निवड करण्यात आली. सलग सहा वर्षे त्यांनी देशाचे वित्तमंत्री म्हणून धुरा वाहिली. त्यानंतर नेहरूंशी मतभेद झाल्यामुळे जुलै १९५६ मध्ये वित्तमंत्री पदाचा त्यांनी राजीनामा दिला.



आणि रिझर्व्ह बँकेतून प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत कर्ज पोहोचण्याची यंत्रणा तयार झाली.

जुलै १९४४ मध्ये ब्रेटन वुड्स परिषद झाली. या परिषदेत सी.डी. देशमुखांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. या परिषदेत आंतरराष्ट्रीय नाणे निधी(इंटरनॅशल मॉनिटरी फंड) आणि आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास अधिकोष (इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट) या दोन संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. विकसनशील देशांसाठी या दोन्ही संस्था महत्त्वाच्या ठरल्या. डॉ. सी. डी. देशमुख या दोन संस्थांच्या संचालक मंडळाचे दहा वर्षे सदस्य होते. १९५० मध्ये या दोन्ही संस्थांच्या झालेल्या वार्षिक बैठकीत सी. डी. देशमुखांनी अध्यक्षस्थान भूषवले होते.

सप्टेंबर १९४९ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सी.डी. देशमुख यांची अमेरिका आणि युरोप या देशांचा विशेष वित्तीय राजदूत म्हणून नेमणूक केली. त्या वेळी सी.डी. देशमुख यांनी गव्हाच्या कर्जासाठी अमेरिकेशी वाटाघाटी केल्या होत्या.

वित्तमंत्री असताना त्यांनी दोन पंचवार्षिक योजनांची आखणी केली आणि त्यांच्या कारकिर्दीत एका पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी झाली. ते वित्तमंत्री असताना वित्तीय सुधारणा होण्यासाठी नवा कायदा तयार झाला होता. हा कायदा तयार करण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते.

इंपिरिअर ऑफ इंडिया या बँकेचे राष्ट्रीयीकरण याच दरम्यान झाले. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया या नावाने ही बँक रूढ झाली.

त्यांच्याच कार्यकाळात खाजगी विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि आयुर्विमा महामंडळाची स्थापना झाली.

१९५६ मध्ये वित्तमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर सी.डी. देशमुख यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारले. १९५६ ते १९६० या काळात त्यांनी देशभरातल्या विद्यापीठीय शिक्षणात सुधारणा केल्या.

१९६२ ते १९६७ या काळात त्यांनी दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरुपद सांभाळले. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक संस्थांच्या

उभारणीत त्यांचा वाटा मोठा होता. भारतीय सांख्यिकी संस्था (इंडियन स्टॅटिस्टिक इन्स्टिट्यूट (आयएसआय) या संस्थेची त्यांनी स्थापना केली आणि १९४५ ते १९६४ पर्यंत या संस्थेचे अध्यक्षपद भूषवले. याच दरम्यान ते वित्तमंत्रीही होते तेव्हा १९५१-१९५२ या वर्षी भारतीय सांख्यिकी संस्थेमार्फत राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाची सुरुवात झाली.

भारताच्या संस्कृतीची माहिती जगभरात पोहोचावी या उद्देशाने सी.डी. देशमुख यांनी साली 'इंडिया इंटरनॅशनल सेंटर'ची स्थापना केली. या संस्था निर्माण झाल्यापासून ते तहहयात या संस्थेचे ते अध्यक्ष होते.

१९५७ ते १९६० या कालावधीत ते 'नॅशनल बुक ट्रस्ट'चे मानद अध्यक्ष झाले. १९६३-६४ या वर्षी दिल्लीच्या भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्थेचे आणि १९६५ ते १९७४ या कालावधीत ते आर्थिक विकास संस्थेचे अध्यक्ष होते. १९५९ ते १९७३ या कालावधीत देशमुख हैदराबादच्या प्रशासकीय कर्मचारी महाविद्यालयाच्या संचालक मंडळाचे प्रमुख होते. त्यांच्या पत्नी दुर्गाबाई देशमुख या 'आंध्र महिला सभा' या समाजसेवी संस्थेच्या संस्थापक आणि अध्यक्ष होत्या. या संस्थेच्या माध्यमातून आपल्या पत्नीसह सी. डी. देशमुख यांनी साक्षरता प्रसार, कुटुंबनियोजनासारख्या सामाजिक कार्यात भाग घेतला होता. १९४४ मध्ये ब्रिटिश सरकारने 'सर' किताब देऊन त्यांचा सन्मान केला. १९५२ मध्ये केम्ब्रिजमधल्या जीजस महाविद्यालयाने माजी विद्यार्थी सी.डी. देशमुख यांना भारतीय आंतरराष्ट्रीय वित्त आणि व्यवस्थापन क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल 'ऑनररी फेलो' हा सन्मान दिला.

१९५९ मध्ये त्यांनी सरकारी सेवेत दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना रॅमन मॅगसेसे फाउण्डेशन पुरस्कार प्रदान करण्यात आला. सी. डी. देशमुख यांना संस्कृत भाषेची आवड होती. १९६९ मध्ये त्यांचा संस्कृत भाषेतील कवितांचा काव्यखंड प्रकाशित झाला होता. १९७५ मध्ये भारत सरकारने देशमुख यांना 'पद्मविभूषण' देऊन गौरविले.

अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ प्रिन्स्टन, लंडनमधील लाइस्टर, पुणे विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ, अलाहाबाद विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ आणि ओस्मानिया विद्यापीठ, तसेच भारतीय सांख्यिकी संस्था या संस्थांनी डॉक्टरेट ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला.

आपल्या कारकिर्दीत त्यांनी प्रशासकीय, वित्तीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अनमोल कार्य केले. तत्त्वनिष्ठता आणि वस्तुनिष्ठता, विज्ञान-संस्कृती, काल्पनिकता, समर्पकता आणि प्रामाणिकपणा अशा आगळ्यावेगळ्या गुणधर्मांमुळे सी. डी. देशमुख यांनी असाध्य गोष्टी साध्य केल्या आणि स्वत:ची ओळख जगभरात निर्माण केली.

– नितीन केळकर

द

## देशमुख, भालचंद्र गोपाळराव

**केंद्रीय कॅबिनेट सचिव, आयुक्त –मुंबई म.न.पा.**
**अतिरिक्त सचिव – केंद्रीय गृहखाते**
**२६ मार्च १९२९**



भालचंद्र गोपाळराव उपाख्य बी. जी. देशमुख यांचा जन्म अहमदनगर येथे झाला. भालचंद्र देशमुख त्यांचे वडील सांगलीला शेतकी खात्यात नोकरीला होते. १९३६ मध्ये भालचंद्र देशमुख पुण्याला आले आणि त्यांचे नाव नूतन मराठी विद्यालयात घालण्यात आले. तेथे त्यांच्या जीवनाचा पायाच घातला गेला. देशमुखांचा इंग्रजी हा विषय चांगला आहे हे हेरून त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळविण्यास मुख्याध्यापक ना. ग. नारळकर यांनी त्यांना प्रवृत्त केले. त्यांच्या प्रेरणेतून इंग्रजी भाषेवर मिळविलेल्या प्रावीण्याच्या

आधारेच देशमुखांचे शैक्षणिक व व्यावसायिक यश साध्य झाले.

फर्गसन महाविद्यालयामध्ये त्यांचे इंटर सायन्सपर्यंत शिक्षण झाले. वैद्यकीय शिक्षणाकडे जाण्याच्या हेतूने त्यांनी ‘बी’ ग्रूप घेतला होता. पण आपल्या मुलाने प्रशासकीय सेवेत जावे आणि राष्ट्रकार्य करावे असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. त्यांची इच्छा प्रमाण मानून देशमुखांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला आणि १९५१ मध्ये ते आय.ए.एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.



या परीक्षेनंतर दिल्लीला प्रशिक्षण होऊन बडोदा जिल्ह्यात त्यांना पहिली नेमणूक मिळाली. भिवंडीला असिस्टंट कलेक्टर म्हणून बदली झाल्यानंतर त्यांना स्वतंत्र चार्ज मिळाला. त्यानंतर त्यांचा विवाह झाला आणि गुजरातेत बनासकांठा येथे त्यांची बदली झाली. कलेक्टर व्ही. शंकर यांचे उत्तम मार्गदर्शन मिळून कलेक्टर म्हणून देशमुखांना बढती मिळाली. त्यांची पहिली नेमणूक डांग जिल्ह्यात झाली. १९५७ पर्यंत सहा वर्षे त्यांनी जिल्हा स्तरावर काम केले. १९५८ मध्ये त्यांची केंद्र सरकारच्या सेवेत ‘अंडरसेक्रेटरी कम्युनिकेशन’ म्हणून नेमणूक झाली.

त्याच काळात त्यांना फोर्ड फाउण्डेशनची शिष्यवृत्ती मिळाली आणि एक वर्ष अमेरिकेतील विल्यम महाविद्यालयात त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. केले. त्यामुळे परत आल्यावर जेव्हा त्यांची नेमणूक महाराष्ट्रात झाली, तेव्हा अर्थविभाग त्यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यानंतर सामान्य प्रशासन (जनरल ॲडमिनिस्ट्रेशन) खात्यात उपसचिव (डेप्युटी सेक्रेटरी) म्हणून त्यांना कार्यभार सांभाळावा लागला. तो विभाग मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत होता आणि इतर आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या कामाकडे लक्ष देणे ही त्यांची जबाबदारी असे. त्यांचा मुख्यमंत्र्यांबरोबर दैनंदिन संबंध येई. त्यामुळे १९७२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्यांना स्वत:चा सचिव म्हणून नेमून घेतले.

पुढे देशमुख यांची मुंबईला महानगरपालिका आयुक्त म्हणून नेमणूक झाली. ती एक अवघड आव्हानात्मक जबाबदारी होती. तेथे त्यांना नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष पुरविता आले. त्यासाठी त्यांनी आपली स्वत:ची एक पेटी ठेवली. त्या पेटीत कोणीही महानगरपालिकेसंबंधी तक्रार वा सूचना टाकू शकत असे. देशमुख त्याची स्वत: दखल घेत.

त्यानंतर केंद्रामध्ये गृहखात्यात अतिरिक्त सचिव म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या वेळी यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर काम करताना त्यांना चांगला अनुभव आला. तेथून लेबर सेक्रेटरी म्हणून देशमुखांची बदली झाली व त्या काळात आय.एम.ए.चा अध्यक्ष म्हणून त्यांना एक वर्ष काम करण्याची संधी मिळाली. पुढे पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्यांची कॅबिनेट सेक्रेटरी या स्थानावर नेमणूक केली. या काळात कॅबिनेट सेक्रेटरीच्या पदाला पूर्वीची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त झाली. हे पद भूषवून निवृत्त झाल्यानंतर सत्तेशी संबंधित असे कोणतेही पद स्वीकारण्याचे देशमुखांनी कटाक्षाने टाळले.

१९९९ मध्ये फारुख अब्दुल्ला यांनी त्यांना जम्मू व काश्मीरमध्ये राज्यपालपद स्वीकारण्याविषयी विचारले असता देशमुखांनी निर्धारपूर्वक नकार दिला. कारण पूर्वी राज्यपालांच्या नेमणुका करण्याची कामगिरी त्यांच्याकडे होती. त्यामुळे नंतरच्या काळात एखादे काम स्वीकारायचे तर ते त्याच तोलामोलाचे असणे आवश्यक होते. नशिबाने तशी संधी त्यांच्याकडे चालून आली.

भारतीय उद्योगातील सर्वश्रेष्ठ अशा टाटा समूहाने त्यांचे सहकार्य मागितले. आता देशमुखांना पैशासाठी

काम करायचे नव्हते. त्या दृष्टीने जे.आर.डी. टाटा यांच्याशी त्यांचे बोलणे झाले. त्यांच्या समूहातर्फे चालणाऱ्या सामाजिक कार्यातच केवळ लक्ष घालण्याचे देशमुखांनी मान्य केले आणि टाटा मंडळींनी तो शब्द कायमचा पाळला.

मूळचे पुणेकर असलेले देशमुख १९६१ पासून मुंबईला स्थायिक झाले आणि त्यांनी स्वत:चे घर बांधले. अधूनमधून ते तेथे राहू लागले. त्या दरम्यान त्यांचा अनेक सांस्कृतिक संस्थांशी संबंध आला. जात्याच साहित्य व कला यांची आवड असल्याने एशियाटिक सोसायटी, मॉडर्न आर्ट गॅलरी अशा संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले. प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम, अग्नी वगैरे अनेक संस्थांशीही ते संबंधित आहेत. त्यांचे स्नेही डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या सूचनेवरून कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम (कास्प) या संस्थेशी त्यांचा संबंध आला आणि आज ते या संस्थेचे नेतृत्व करीत आहेत.

– सविता भावे

## दोशी, ललित नरोत्तम
**उद्योग सचिव, महाराष्ट्र राज्य**
**सिकॉमचे प्रबंध संचालक**
**४ ऑगस्ट १९४२ – ३० जानेवारी १९९४**



ललित नरोत्तम दोशी यांचा जन्म कच्छ (गुजरात) मधील एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव कांताबेन. कमी शिकलेल्या आई-वडिलांची इच्छा आपली तिन्ही मुले उच्चशिक्षित व्हावी अशी असल्याने ते मुंबईला आले. शिक्षणासाठी बोरीबंदरजवळ त्यांच्या मित्राच्या लहानशा घरात ते राहिले. ललितचे शालेय शिक्षण भरडा न्यू हायस्कूलमध्ये झाले. सेंट झेवियर्स महाविद्यालयात शिकून त्यांनी मुंबई विद्यापीठ येथून अर्थशास्त्रातील एम.ए. ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली. त्यांनी मुंबईच्या जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजची पदविका मिळविली. यापुढे त्यांनी युनायटेड किंगडमच्या लीड्स युनिव्हर्सिटीची मॅनेजमेंट ऑफ पब्लिक एण्टरप्रायझेस ही परीक्षा दिली.

ललित दोशी यांनी १९६६ मध्ये वयाच्या चोविसाव्या वर्षी उच्च शिक्षण पूर्ण होताच प्रशासनिक सेवेत पदार्पण केले. आपल्या सव्वीस वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी महाराष्ट्र शासन, तसेच केंद्र शासनाच्या अधीन महत्त्वपूर्ण पदांवर काम केले. यांत महाराष्ट्र औद्योगिक विकास निगमचे (एम.आय.डी.सी.) मुख्य कार्यकारी अधिकारी, हाउसिंग, संस्थात्मक वित्त आणि नियोजन (इन्स्टिट्यूशनल फायनान्स ॲण्ड प्लॅनिंग) विभागात सचिव, महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळाचे (स्टेट इंडस्ट्रियल ॲण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र, सिकॉम) प्रबंध संचालक व महाराष्ट्र शासन (उद्योग) खात्याचे सचिव (१९९२ ते १९९४) यांचा आणि नंतर १९८५ ते १९९० पर्यंत भारत सरकारच्या पेट्रोकेमिकल्स मंत्रालयात संयुक्त सचिव म्हणून झालेल्या नेमणुकांचा समावेश होतो.

वरिष्ठ पदांवर ललित यांच्या नेमणुका आणि भारत सरकारने अचानक अवलंबलेल्या आर्थिक उदारीकरण नीती या घटना एकाच वेळी घडत गेल्या. सर्व पदांवर परिश्रम आणि निष्ठापूर्वक कार्यरत असताना आपल्या पदाचा विचार न करता जे-जे कोणी त्यांच्याकडे आले, त्यांना मदत करण्याचा ललित यांनी सदैव

प्रयत्न केला आणि अधीनस्थ त्यांच्याकडे मार्गदर्शन व सल्ला विचारण्यासाठी मोकळेपणाने येत.

सर्वसामान्यांच्या दृष्टीने ललित असे समर्थ प्रशासक होते, की लालफितीला बाजूला सारून ते स्वत: मदत करीत असत. त्यांनी मुख्यत: औद्योगिक व नागरी विकास विभागात काम केले आणि शहरी कमाल जमीन धारणा कायद्याला (अर्बन सीलिंग ॲक्ट) व्यावहारिक बनवून विकास कार्याला गतिमान केले व त्यांच्या या कामगिरीचे कौतुक झाले. देशात पेट्रोकेमिकल्स उद्योगाच्या विकासासाठी धोरण निर्धारित करण्याशी ते निगडित होते. कार्यक्षम, परिश्रमी, इमानदार व सेवाभावी ललित दोशी यांना भ्रष्टाचाराचा कधी स्पर्श झाला नाही. हा निरभिमानी प्रशासक नियमांचे कटाक्षाने पालन करी; पण रचनात्मक कार्यात कधी बाधा पडू देत नसे. ललित मितभाषी, सदाचारी, विनीत वृत्तीचे असून अर्थशास्त्रीय प्रशासनात त्यांचे बहुमूल्य योगदान स्मरणीय राहिले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सोबत औद्योगिक धोरणाविषयी माहिती देण्यासाठी १९९४ मध्ये उद्योग सचिव या नात्याने ललित दोशी स्वित्झर्लंड येथे गेले असताना त्यांचे अकस्मात निधन झाले.

– अरुण बोंगिरवार/भरत दोशी

* * *

द

# ध

## धर्माधिकारी, अविनाश भगवंत

**मुख्यमंत्र्यांचे सचिव**

**२ ऑगस्ट १९५९**



अविनाश भगवंत धर्माधिकारी यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव मंगला होते. त्यांचे वडील भगवंतराव सामाजिक वनीकरण खात्यात टंकलेखक होते. पुण्यातील कसबा पेठेत जुन्या वाड्यात एका खोलीत अविनाश यांचे बालपण गेले.

घरची परिस्थिती अगदीच बेताची होती. पण संस्कारांची श्रीमंती मात्र त्यांना भरपूर मिळाली. परिस्थितीशी दोन हात करताना आक्रमक वृत्तीचे बाळकडू याच वयात मिळाले. पुढे प्रशासकीय सेवेत लोकाभिमुख प्रशासनाचे अनेक प्रयोग ठामपणे राबवताना आणि योग्य कारणासाठी पाय रोवून उभे राहताना हीच प्रवृत्ती कामी आली. केवळ ‘स्वच्छ’ आणि ‘कार्यक्षम’ असतानाच अभ्यासपूर्ण आक्रमकताही असायला हवी, हे त्यांनी वेळोवेळी आपल्या कार्यकालात दाखवून दिले.

‘देशाचा कार्यकर्ता’ होण्याचे स्वप्न वयाच्या सोळाव्या वर्षी पाहिल्यावर अविनाश यांनी जाणीवपूर्वक वाणिज्य आणि कलाशाखेचा रस्ता धरला. बी.कॉम., एम.ए. (इतिहास), एम.ए. (अर्थशास्त्र), एम.फिल. अशा पदव्या घेताना एकीकडे ज्ञानप्रबोधिनीचा कार्यकर्ता म्हणून काम चालू होते आणि मुक्त पत्रकारिताही सुरू होती. सामान्य लोकांपासून नेत्यांपर्यंत सर्वांशी बोलून त्यावर मुख्यत: ‘माणूस’ साप्ताहिकात लेखन करायचे. पंजाब, आसाम, काश्मीर व दिल्लीतील राजकारण, शहाबानो प्रकरण, गुजरातमध्ये पेटलेले राखीव जागांविरोधी आंदोलन आणि महाराष्ट्रातली शेतकरी चळवळ, अयोध्या विवाद या सर्वांवर त्यांनी जे अभ्यासपूर्ण लेखन केले, त्यातूनच त्यांचे पहिले पुस्तक ‘अस्वस्थ दशकाची डायरी’ आकाराला आले व त्याला पुढे राज्यशासनाचा उत्कृष्ट ग्रंथाचा पुरस्कार मिळाला.

या कार्यकर्ता काळातच त्यांची सहधर्मचारिणी पूर्णा त्यांना भेटली. तिनेही पंजाबमध्ये दोन वर्षे राहून राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम केले होते.

देशस्थितीचा अभ्यास करतानाच अविनाश धर्माधिकारी यांना जाणवले, की अंतरात कार्यकर्त्याचीच प्रेरणा ठेवून हातात जर प्रशासकीय अधिकाऱ्याचे अधिकार आले, तर अधिक ठोस परिवर्तन घडवता येईल. म्हणून त्यांनी यूपीएससीची परीक्षा दिली आणि ते आयएएससाठी निवडले गेले. महाराष्ट्र केडर मिळाले, तसेच एकाहून एक मोक्याच्या जागांवर नियुक्त्या होत गेल्या.

स्वामी विवेकानंद आणि महात्मा गांधीजींना गुरुस्थानी मानणाऱ्या धर्माधिकारींनी ‘अंत्योदया’च्या सूत्रानुसार प्रशासनाला सामान्य जनतेला उत्तरदायी, म्हणजेच ‘लोकाभिमुख’ करण्याचे काम सुरू केले. महसूल अधिकारी या नात्याने त्यांच्यासमोर जमिनींच्या दाव्यांचे खटले निकालासाठी यायचे. .

वर्षानुवर्षे निकालच न लागता पडून असलेल्या हजारो खटल्यांचा जलद गतीने, पण योग्य व न्याय्य निकाल लावण्यासाठी त्यांनी ‘महसूल न्यायालय’ हा

प्रयोग यशस्विरीत्या राबवला. रत्नागिरी जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी असताना व पुणे जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी असताना त्यांनी साक्षरता चळवळ विशेषत्वाने राबवली. त्यांनी स्वत: तयार केलेल्या 'साक्षरोत्तर कार्यक्रमा'ची नमुना कार्यक्रम म्हणून राष्ट्रीय साक्षरता मिशनकडून वाखाणणी झाली.

भू आणि जलसंवर्धन चळवळ, स्त्री-चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, ग्राहक चळवळ, शेतकरी चळवळ अशा अनेक विधायक आंदोलनांच्या पाठीशी ते ठामपणे उभे राहिले.

धर्माधिकारींच्या सेवाकाळात जिथे कारण योग्य होते, तिथे त्यांनी लोकप्रतिनिधींना सहकार्य केले आहे आणि अयोग्य कामे करायला स्वच्छ नकारही दिलेले आहेत. जिल्हाधिकारी म्हणून कार्यकाळ झाल्यावर नोकरीतून बाहेर पडायचे हे आधीच ठरलेले होते. रायगडचे जिल्हाधिकारी असताना त्यानी मतदार ओळखपत्रांचे काम निवडणूक आयुक्त शेषन यांनाही आश्चर्य वाटेल इतक्या वेगाने केले.

महाराष्ट्रात सेना-भाजप युती सरकार सत्तेत आल्यावर मुख्यमंत्री मनोहर जोशींनी त्यांना आपल्या कार्यालयात नियुक्तीवर मुद्दाम बोलावून घेतले, म्हणून धर्माधिकारींचा राजीनामा थोडा लांबणीवर पडला. कारकिर्दीच्या सुरुवातीला त्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे काम केलेले होते आणि आता मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातलाही एक वर्षाचा अनुभव घेतल्यावर त्यांनी मार्च १९९६ मध्ये प्रशासकीय (आय.ए.एस.) सेवेचा राजीनामा दिला.

परिवर्तनाची प्रत्येक लढाई शेवटी राजकीय इच्छाशक्ती नसेल तर फोल ठरते हेच जाणवल्यामुळे त्यांनी राजीनाम्यानंतर राजकारणात सक्रिय व्हायचे ठरवले. १९९८ साली त्यांनी अपक्ष म्हणून लोकसभेची निवडणूक लढवली. काळ्या पैशांच्या माध्यमातून चालणाऱ्या राजकारणाला आळा घालण्यासाठी म्हणून निवडणूक कायद्यात बदल करण्यासाठी काही ठोस मागण्याही त्यांनी केल्या व त्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. 'माहितीचा अधिकार' हा कायदा येण्याची मागणी सर्वप्रथम त्यांनीच केली.

नागरिकांच्या सबलीकरणासाठी चळवळ उभी केली. नागरिकांची सरकारदरबारची कामे विशिष्ट वेळेत झाली नाहीत तर संबंधित अधिकाऱ्याला व्यक्तिश: जबाबदार मानण्यात यावे अशीही मागणी त्यांनी लावून धरली.

१९८६ सालच्या बॅचचे आय.ए.एस. अधिकारी म्हणून त्यांनी महाराष्ट्र केडरमध्ये दहा वर्षे काम केले आणि १९९६ साली राजीनामा दिला. १९८६ साली महाराष्ट्रातून निवडले गेलेले ते एकटेच 'आय.ए.एस.' अधिकारी होते.

राजीनाम्यानंतर त्यांनी १० ऑगस्ट १९९६ रोजी 'चाणक्य मंडल' ही शैक्षणिक संघटना स्थापन केली. एक धर्माधिकारी प्रशासकीय सेवेतून बाहेर पडले, पण त्यांनी आपल्यासारखेच अनेक 'कार्यकर्ते अधिकारी'सुद्धा प्रशासनात पाठवलेले आहेत. युवकांनी प्रशासकीय सेवांमध्ये कोणती मूल्यव्यवस्था घेऊन जावे यासाठी त्यांनी 'नवा विजयपथ' हे पुस्तक लिहिलेले आहे. तसेच नागरिकांनी स्वत:चे प्रश्न स्वत: कसे सोडवावेत याबाबतचे मार्गदर्शन करणारे 'नागरिक' हेही त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे.

मुळात अविनाश धर्माधिकारी हे हाडाचे शिक्षक आहेत. भरपूर वाचन, अभ्यास, स्वतंत्र चिंतन यांच्याच जोडीला अमोघ वक्तृत्व आणि कार्यकर्त्यांची समर्पणवृत्ती ही त्यांची गुणवैशिष्ट्ये अगदी शालेय जीवनापासूनच जतन केलेली आहेत.

– पूर्णा धर्माधिकारी

* * *


ध

# प

## परांजपे, केशव गणेश

**मुख्य सचिव – महाराष्ट्र राज्य**

**१७ सप्टेंबर १९३०**



केशव गणेश परांजपे यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गणेश राजाराम परांजपे व आईचे नाव सरस्वती (ऊर्फ शांता). त्यांचे प्राथमिक शिक्षण कल्याण नगरपालिकेच्या शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण जनरल एज्युकेशन सोसायटीच्या कल्याण येथील माध्यमिक विद्यालयात झाले. त्यांचे वडील प्रख्यात वकील होते.

वडिलांच्या पावलांवर पाऊल टाकून वकील व्हावे या उद्देशाने त्यांनी प्रथम शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथे अध्ययन करून मुंबई विद्यापीठाची एलएल.बी. ही पदवी मिळवली. प्रख्यात विधिज्ञ कै. नानी पालखीवाला, तसेच प्रि. टी.के. टोपे हे विधि महाविद्यालयातील प्राध्यापक होते. वकिलीची सनद प्राप्त केल्यानंतर त्यांनी वडिलांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण शहरातच दिवाणी न्यायालयात वकिली सुरू केली व थोड्या काळातच आपला जम बसविला.

आय.ए.एस. परीक्षेत उत्तीर्ण होणे तितकेसे सोपे नाही व त्या परीक्षेत बुद्धीची कसोटी लागते अशी काहीशी त्यांची धारणा होती. तेव्हा या परीक्षेत आपल्याला उत्तीर्ण होता येते की नाही हे अजमावून पाहण्यासाठी ते परीक्षेला बसले व उत्तीर्ण झाले. त्यानंतर प्रशासन सेवेत रुजू व्हावे की वडिलांबरोबर वकिलीचा व्यवसाय चालू ठेवावा, असा प्रश्न उभा राहिला. अनेक मित्रांनी व हितचिंतकांनी वकिली चालू ठेवावी असा सल्ला दिला. मात्र, प्रशासकीय सेवेत आपल्या देशासाठी व जनतेसाठी खूप काही करण्याची संधी असते असे वाटल्यानंतर ते भारतीय प्रशासन सेवेत दाखल झाले.

त्यांच्या सेवेचा प्रारंभ सध्याच्या गुजरात राज्यात (तत्कालीन द्वैभाषिक राज्य) बडोदा (वडोदरा) येथे झाला. त्यांची पहिली नेमणूक अधिसंख्य साहाय्यक समाहर्ता म्हणून बडोदा येथे झाली. त्यानंतर त्यांनी साहाय्यक समाहर्ता म्हणून ध्रंगध्रा, जि. झालवाड म्हणजे सध्याचे सुरेंद्रनगर पलिताना येथे व त्यानंतर विक्रीकर साहाय्यक आयुक्त, अहमदाबाद या पदावर गुजरात राज्यात सेवा केली. गुजरातमध्ये राहून गुजराती भाषा त्यांनी चटकन आत्मसात केली. राज्यकारभाराची भाषा गुजराती असल्याने महसूल प्रकरणातील निकालपत्रे त्यांनी गुजरातीत लिहिली व भाषणेदेखील गुजरातीत लिहिली. गुजराती लोक मेहनती व प्रेमळ स्वभावाचे असतात याचा त्यांना अनुभव आला.

भाषावार प्रांतरचनेनुसार १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यांची प्रथम मुंबई येथे विक्रीकर विभागाच्या साहायक आयुक्तपदी नियुक्ती झाली. पुढील चार महिन्यांतच त्यांना पदोन्नती मिळाली व त्यांची पुणे येथे विक्रीकर उपायुक्त म्हणून नेमणूक झाली. पुणे येथे विक्रीकर उपायुक्त या पदावर त्यांनी सुमारे दोन वर्षे काम केले. त्या वेळी अत्यंत कडक शिस्तीचे म्हणून गणले गेलेले एम.एन. हेबळे हे



पेट्रोल व नैसर्गिक वायू

राज्याचे विक्रीकर आयुक्त होते. त्यांच्याकडून त्यांना खूप शिकावयास मिळाले.

त्यानंतर त्यांची नाशिकच्या जिल्हाधिकारी या पदावर नेमणूक झाली. जिल्हादंडाधिकारी या नात्याने जिल्ह्यातील कायदा व सुलभ व्यवस्था यांची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. मालेगाव हे अत्यंत संवेदनशील शहर नाशिक जिल्ह्यातच आहे. जातीय दंगलींनी अनेक वेळा हे शहर होरपळून निघालेले आहे. त्यामुळे हिंदू व मुस्लिमांच्या धार्मिक सणांच्या वेळी जिल्हा प्रशासनाला विशेष खबरदारी घ्यावी लागत असे. १९६३ मधील गणेशोत्सवात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून विशेष दक्षता घेण्यात आली होती. तरीदेखील अनंतचतुर्दशीच्या दिवशी निघालेल्या गणपती विसर्जनाच्या मिरवणुकांवर काही समाजकंटकांनी दगडफेक केल्याने शहरात दंगल उसळली. दंगल आटोक्यात यावी यासाठी जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशावरून पोलिसांनी गोळीबार केला. त्यात चार-पाच माणसे मृत्युमुखी पडली.

पुढे या प्रकरणात राज्यशासनाने चौकशी केली. पोलिसांनी केलेला गोळीबार समर्थनीय होता असा निष्कर्ष चौकशी अहवालात काढला गेला व जातीय दंगल समर्थपणे हाताळल्याबद्दल जिल्हादंडाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांचे राज्यशासनातर्फे कौतुक करण्यात आले. नाशिकनंतर त्यांनी बुलढाणा व मुंबई येथे जिल्हाधिकारी या पदावर काम केले. मुंबईचे जिल्हाधिकारी असताना देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. मुंबई शहरातील निवडणुका शांतपणे व सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. ती त्यांनी समर्थपणे पार पाडली. त्यानंतर त्यांनी केंद्रशासनाच्या महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या पेट्रोलियम मंत्रालयात उपसचिव म्हणून पाच वर्षे काम केले.

केंद्रशासनातील प्रतिनियुक्तीवरून आल्यावर मंत्रालयात सहसचिव, विभागीय आयुक्त, मुंबई, सचिव (महसूल), सचिव (शिक्षण), सचिव (सामान्य प्रशासन विभाग), सचिव (नियोजन) या महत्त्वाच्या पदांवर काम केले. पुढे त्यांची केंद्रशासनाच्या नियोजन मंडळाचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली. तेथे त्यांनी दोन वर्षे काम केले. महाराष्ट्रात परत आल्यावर त्यांनी पुन:श्च सचिव (नियोजन) या महत्त्वाच्या पदाची धुरा सांभाळली. याच काळात त्यांनी डॉ. एस.एच. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘जिल्हा नियोजन’ या विषयावर प्रबंध लिहिला व मुंबई विश्वविद्यालयातून पीएच.डी. मिळवली.

सचिवपदावर असताना, राज्यकर्त्यांना न रुचणारे असले तरी आपले मत परखडपणे व स्पष्टपणे नोंदविणारे म्हणून परांजपे यांची ख्याती होती. ‘मुख्यमंत्रिपदावर असताना शासनाची जमीन सवलतीने घेणे उचित ठरणार नाही’, असा परखड सल्ला त्यांनी एका मुख्यमंत्र्यांना दिला होता. तो सल्ला त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांनी मानला एवढेच नव्हे, तर परांजपे यांना त्याबद्दल धन्यवाद दिले.

तसेच एका प्राध्यापकाला पदोन्नती नाकारली म्हणून तक्रार आल्याने त्या वेळचे मुख्यमंत्री प्रक्षुब्ध झाले होते व सबंध शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करावी असा त्यांचा मानस होता. त्या वेळी परांजपे शिक्षण विभागाचे सचिव होते. परांजपे यांनी स्वत: मुख्यमंत्र्यांकडे जाऊन

प

प्रकरणातील परिस्थिती विशद केली व संबंधित प्राध्यापकास पदोन्नती योग्य कारणास्तव नाकारली हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच जर कारवाई करावयाची असेल, तर ती प्रथम त्यांच्याविरुद्ध परखडपणे करा असे सांगितले. मुख्यमंत्र्यांना या प्रकरणात परांजपे यांचे म्हणणे पटले व प्रकरण योग्य तऱ्हेने हाताळल्याबद्दल शिक्षण विभागाची प्रशंसा केली.

मुख्य सचिवपदी असताना, कै. पांडुरंग जयराव चिन्मुळगुंद, आय.सी.एस. यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या चिन्मुळगुंद ट्रस्टतर्फे प्रशासनातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्येष्ठ प्रशासकांना दिला जाणारा चिन्मुळगुंद पुरस्कार १९८९ मध्ये त्यांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सेवानिवृत्तीच्या नियमानुसार ते मुख्य सचिव या पदावरून ३० सप्टेंबर १९८८ रोजी सेवानिवृत्त होणार होते. त्या सुमारास त्यांच्या सुविद्य पत्नी रजनी परांजपे यांना 'इंटरनॅशनल सोशल वेल्फेअर' या विषयासाठी अतिथी प्रोफेसर म्हणून शिकोकू ख्रिश्चन विद्यापीठ, जपान येथून बोलावणे आले होते. तेथे त्यांना सप्टेंबर १९८८ च्या पहिल्या आठवड्यात रुजू व्हावयाचे होते. त्यांच्यासमवेत जपानला जाता यावे म्हणून परांजपे यांनी सेवानिवृत्तीच्या एक महिना आधीच म्हणजे ३१ ऑगस्ट १९८८ रोजी सेवानिवृत्ती घेतली.

जपानमधून वर्षभराने परत आल्यानंतर रजनी परांजपे यांना जपानमध्येच कायमस्वरूपी प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली. या वेळीदेखील परांजपे दाम्पत्य जपानला गेले. जपानमधील वास्तव्यात परांजपे यांनी जपानमधील सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्थेचा सर्वंकष अभ्यास केला व 'जपान, अ जायंट इन डिस्ट्रेस' हे माहितीपूर्ण पुस्तक लिहिले. ते दिल्ली येथील 'अजंठा बुक्स इंटरनॅशनल' या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यात आले आहे.

जपानच्या वास्तव्यात परांजपे यांनी शिकोकू विद्यापीठात 'पीस फिलॉसॉफी ऑफ गांधी' या विषयावर अनेक व्याख्याने दिली. परांजपे यांनी सेवानिवृत्तीनंतर पुण्यात वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला.

पुणे शहराच्या विकासासाठी कृती आराखडा करण्याकरिता त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती (परांजपे समिती) नेमण्यात आली होती. सदर समितीने पुणे शहराच्या वाहतूक, कचरा, रस्ते, पाणीपुरवठा या समस्यांच्या संदर्भात अभ्यास करून महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.

– श्रीधर जोशी

## परांजपे, वसंत वासुदेव

**राजदूत – चीन, कंबोडिया**

**१९२४ – ८ एप्रिल २०१०**



भारताच्या चीनबरोबरच्या परराष्ट्रधोरणावर स्वातंत्र्यानंतर साधारणत: अडीच दशके महत्त्वपूर्ण ठसा उमटवणारे मराठी अधिकारी म्हणजे वसंत वासुदेव परांजपे.


वसंत परांजपे यांचे शालेय शिक्षण पुणे येथे झाले. मॅट्रिकमध्ये त्यांना 'जगन्नाथ शंकरशेठ' शिष्यवृत्ती मिळाली होती.

त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथील फर्गसन महाविद्यालयात झाले. बी.ए.ला असताना त्यांना 'भाऊ दाजी लाड' शिष्यवृती मिळाली.

व्याकरण या विषयात पुणे विद्यापीठातून एम.ए. करत असताना ते प्रथम श्रेणी मिळवून विद्यापीठात प्रथम आले.

भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक आणि सांस्कृतिक संबंध दृढ व्हावेत या उद्देशाने पंडित नेहरू यांनी विद्यार्थी एक्स्चेंज कार्यक्रम तयार केला. या कार्यक्रमांतर्गत चीनमध्ये विविध विषयांचे शिक्षण घेण्यासाठी दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार

प



भारत – चीन मैत्री

होती. परांजपे यांना चीनमधील बौद्धधर्माचा अभ्यास करायचा होता. म्हणून ही शिष्यवृत्ती मिळवून ते १९४६ ते १९५० या कालावधीत चिनी भाषा अभ्यासण्यासाठी चीनला गेले. या कालावधीत त्यांनी चिनी भाषा, संस्कृती, बौद्ध धर्म या विषयांचा सखोल अभ्यास केला. भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन त्यांनी चीनची राजधानी पेकिंग येथे साजरा केला.

१९५४ मध्ये इंडोनेशियामधील बांडुंग येथे झालेल्या आफ्रिकी आणि आशियायी देशांच्या बांडुंग परिषदेमध्ये पंडित नेहरू परांजपे यांना दुभाषी म्हणून घेऊन गेले. परांजपे यांचे चिनी भाषेवरील प्रभुत्व पाहून पंडित नेहरू प्रभावित झाले आणि त्यांनी परांजपे यांची भारतीय परराष्ट्र सेवेमध्ये नियुक्ती केली. पंतप्रधान नेहरू आणि चिनी पंतप्रधान चाऊ एन लाय यांच्या अनेक चर्चांचे ते साक्षीदार होते.

भारत-चीन संबंध अत्यंत कठीण प्रसंगातून जात असताना परांजपे चीनमध्ये राजदूत होते. चिनी, चिनी भाषा, संस्कृती यांवर त्यांचा अभ्यास होता. चीनबद्दल त्यांच्या मनात जिव्हाळा होता. त्यामुळेच त्यांनी राजदूत पदाच्या संपूर्ण कारकिर्दीत चीन-भारत संबंध सुधारावेत यासाठी कसोशीने प्रयत्न केले. पुढे भारत-चीन या दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध बिघडले तरीही परांजपे यांची त्यांच्या चीनमधील मित्रांशी असणारी मैत्री टिकून राहिली.

त्यांच्या चिनी मित्रांमध्ये ते 'बाई चून हुई' या नावाने प्रसिद्ध होते, तर पंडित नेहरू आणि चिनी नेते त्यांना खासगीत 'पाय' असे संबोधत. १९५१ पासून परराष्ट्र सेवेमध्ये त्यांनी अंडर सेक्रेटरी, सहसचिव, उपसचिव अशा विविध पदांवर काम केले. कंबोडिया येथील इंटरनॅशनल कमिशनचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. १९७७ ते १९७८ या कालावधीत परांजपे इथिओपियामध्ये राजदूत होते, तर १९७८ ते १९८१ या कालावधीत ते दक्षिण कोरियातील पहिले भारतीय राजदूत होते.

१९८८ मध्ये राजीव गांधी यांच्या चीन दौऱ्याच्या वेळी सेवानिवृत्त असतानाही परांजपे यांनी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानादेखील ते त्यांचे दुभाषी म्हणून काम करत असत. १९८२ मध्ये ते परराष्ट्रसेवेतून निवृत्त झाले.त्यानंतरही त्यांचा चीनविषयीचा अभ्यास सुरूच राहिला.

भारतात परतल्यावर ते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

निवृत्तीनंतर काही वर्षांनी ते पुणे येथे स्थायिक झाले. पुणे शहरातील वयोवृद्धांसाठी उभारण्यात आलेल्या 'अथश्री' प्रकल्पातील ते पहिले रहिवासी होते. भारत-चीन राजनैतिक संबंधांना २०१० मध्ये ६० वर्षे पूर्ण झाली, त्या वेळी दिल्ली येथील चिनी दूतावासाने त्यांना आवर्जून आमंत्रण दिले होते. प्रकृती ठीक नसूनदेखील या कार्यक्रमात ते उत्साहाने सहभागी झाले. पुणे येथे त्यांचे निधन झाले.

– संपादित

## पाध्ये, माधव गोविंद

**सचिव-जलसंसाधन मंत्रालय, केंद्रीय जल आयोग**

**२५ एप्रिल १९२७ – २१ एप्रिल २०११**

कृषिप्रधान भारत देशाच्या दृष्टीने जलसिंचनाचे अनन्यसाधारण महत्त्व जाणून स्वातंत्र्यानंतर शासनाने जलसिंचन तंत्रज्ञानाला उत्तेजन देणारं जे धोरण अमलात आणलं त्याला कार्यान्वित करणाऱ्या अभियंता पिढीचे एक प्रतिनिधी असलेल्या माधव गोविंद पाध्ये यांचा



जन्म कोल्हापूरजवळच्या ऐतिहासिक पन्हाळा गावात झाला. याच परिसरात शेती हा तुलनेने सुखवस्तू आणि मोठ्या पाध्ये कुटुंबाचा व्यवसाय होता. माधव पाध्ये यांच्या आईचे नाव अन्नपूर्णा होते.

माधव पाध्ये यांचे प्राथमिक शालेय शिक्षण पन्हाळा येथील शाळेत झाले. त्यानंतर ११वी पर्यंतचे शिक्षण कोल्हापूरला झाले. माधव पाध्ये इंटरची परीक्षा कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातून उत्तीर्ण झाले. इंटरनंतर बांधकाम अभियांत्रिकी (सिव्हील इंजिनीअरिंग) क्षेत्रातील पदवीसाठी त्यांनी पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी ते मुंबई विद्यापीठाशी संलग्न होते. १९४८ साली झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या अभियांत्रिकी पदवी परीक्षेत माधवरावांसह फक्त तीन विद्यार्थ्यांना पहिला वर्ग मिळाला होता. माधवरावांनी एका विषयात सुवर्णपदकही मिळवले होते.

भारतीय प्रशासन सेवेत माधव पाध्ये यांचा प्रवेश ब्रिटिश राजवटीतल्या सरकारी धोरणानुसार झाला. ते १९४८ ला पदवीधर झाले आणि हे वर्ष स्वतंत्र भारत सरकारचे पहिलेच वर्ष असल्याने प्रशासकीय सेवा ब्रिटिश धोरणानुसारच होती. त्यामुळे अभियांत्रिकी महाविद्यालयातून पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना त्या काळच्या 'बॉम्बे सर्व्हिस ऑफ इंजिनीअर्स' अंतर्गत थेट प्रथम वर्गपदावर नियुक्त केले जात असे. पाध्ये या नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लगेचच सेवेत रुजू करून घेण्यात आले. त्या वेळचा मुंबई इलाखा हे त्यांचे भौगोलिक कार्यक्षेत्र होते. यात महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांच्या काही भागांचा समावेश होता. या भौगोलिक क्षेत्रासाठी सिंचनासह एकत्र सार्वजनिक बांधकाम विभाग होता.



**केंद्रीय जल आयोग**

माधवराव यांचा १९५३ मध्ये पद्मजा यांच्याशी विवाह झाला. आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेत माधव पाध्ये यांचा तत्कालीन मुंबई इलाखा आणि त्यानंतर महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व लहान-मोठ्या सिंचन प्रकल्पात सक्रीय सहभाग होता. पुण्याजवळ खडकवासला आणि पानशेत, नाशिकचे गंगापूर, अहमदनगर-संगमनेर परिसर, कृष्णा खोऱ्यातली कोयना-धोम-भीमा-कुकडी नद्यांवरची धरणं, जळगावातली गिरणा आणि हातनूर धरणं या सर्व प्रकल्पांच्या जडणघडणीत त्यांचे योगदान आहे. गुजरातच्या सरदार सरोवर आणि पंजाबच्या भाक्रा-नानगल प्रकल्पातही त्यांचा सहभाग होता. पानशेत धरण १९६१ फुटलं त्यावेळी ते त्या धरणावरच कार्यरत होते. धरणाला असलेला धोका लक्षात येताच त्यांनी जीवितहानी टाळण्याचे खूप प्रयत्न केले.

१९७६ मध्ये पाध्ये प्रतिनियुक्तीवर केंद्र सरकारच्या सेवेत रुजू झाले. केंद्रीय जलसंसाधन विभागाच्या योजना मंडळाचे सदस्य म्हणून त्यांचा नवनवीन सिंचन प्रकल्पांचा आराखडा तयार करण्यात सहभाग होता. बदलत्या तंत्रज्ञानानुसार धरणांसाठी आवश्यक असलेले प्रचंड दरवाजे भारतातच तयार करता यावेत यासाठीचे आलेखन (डिझाईन) करण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. केंद्रीय जलआयोगाचे पदसिद्ध सचिव म्हणून त्यांनी १९७८ ते १९८२ पर्यंत काम केले. जलसंसाधन

प

मंत्रालयातून सचिव पदावरून १९८५ मध्ये पाध्ये निवृत्त झाले. प्रचलित संकेतानुसार केंद्र शासनात सचिव पदावर भारतीय प्रशासन सेवा परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवारच नियुक्त होतात. पण माधव पाध्ये हे प्रशासन सेवा परीक्षेच्या बाहेरून आलेले पहिले सचिव होते. आपल्या प्रदीर्घ सेवेत सिंचनासंदर्भात भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून नेपाळ, श्रीलंका, भूतान, सिक्किम, बांगला देश आणि इतरही अनेक देशांत जाण्याची संधी त्यांना मिळाली होती.

– सुधाकर कुलकर्णी

## पिंपुटकर, मोरेश्वर गजानन

**आय.सी.एस. सचिव, केंद्रीय नियोजन आयोग, आयुक्त मुंबई महानगरपालिका, अध्यक्ष–केंद्रीय दक्षता आयोग**

**१९१६ – १९८६**



‘एम. जी. पिंपुटकर म्हणजे पोलादी, कठोर, शिस्तप्रिय प्रशासक!’ पंतप्रधान मोरारजी देसाईंचे हे गौरवोद्‌गार सार्थ ठरवणारे मोरेश्वर गजानन पिंपुटकर हे तत्कालीन मुंबई प्रांतातील उंबरगावचे (आता गुजरातेत असलेल्या) मूळ रहिवासी होते. त्यांच्या आईचे नाव गंगाबाई होते.


मोरेश्वर सात वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांना देवाज्ञा झाली. लहानपणीच पितृछत्र हरवलेल्या मोरेश्वरचे पुढील संगोपन व शिक्षण त्यांचे चुलते व मामा यांच्याकडे झाले.

त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. त्यानंतर ते आय.सी.एस. परीक्षेसाठी इंग्लंडला गेले. मोरेश्वर पिंपुटकर हे त्यांच्या समाजातील पहिले व ब्रिटिश राजवटीतील शेवटचे आय.सी.एस. अधिकारी बनून १९४० मध्ये मुंबई येथे परतले. पिंपुटकर आय.सी.एस. परीक्षादेखील प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १९४६ ते १९४९ या कालावधीत पिंपुटकर गुजरातमधील गोधरा येथे जिल्हाधिकारी होते. हा कालखंड म्हणजे भारताच्या इतिहासातील महत्त्वाच्या घडामोडींचा काळ आहे. या कालखंडातच भारताला स्वातंत्र्य (१९४७) मिळाले. गोधऱ्याला या सर्व पार्श्वभूमीचा संदर्भ आहे.

गोधरा हे अतिशय संवेदनशील ठिकाण समजले जाते. येथे हिंदू–मुस्लीम दंग्यांचा मोठा इतिहास आहे. गोधऱ्यात पिंपुटकर जिल्हाधिकारी असताना मोठी दंगल झाली. पिंपुटकरांनी मोठ्या धाडसाने व कौशल्याने दंगेखोरांना रोखले व जेरबंद केले. तेव्हापासून गोधऱ्यामध्ये पिंपुटकरांचा जबरदस्त दरारा निर्माण झाला.

गोधऱ्यातील काही समाजकंटक गणेशोत्सव मिरवणुकीला विरोध करत व मिरवणूक काढू देत नसत. पिंपुटकरांनी गणेश उत्सव पुन्हा सुरू केला. काही लोकांना हे आवडले नाही, पण पिंपुटकरांनी निषेध व्यक्त करणाऱ्यांना प्रसंगी कायद्याचा बडगा दाखवला आणि तेव्हापासून गणेशोत्सवाची मिरवणूक वाजतगाजत, मोठ्या आनंदाने काढण्यास सुरुवात झाली. पिंपुटकरांच्या या अजोड कार्यामुळे दरवर्षी पिंपुटकरांच्या प्रतिमेस हार घालून मिरवणुकीची सुरुवात होते. पिंपुटकरांची गोधरामधील कारकीर्द खूपच जोखमीची व धाडसाची होती. गोधरातील सट्टेबाज, गुन्हेगार, दंगेखोर समाजकंटक पिंपुटकरांना जबरदस्त घाबरत असत. या त्यांच्या कामाची लोकप्रियता एवढी होती, की गोधऱ्यातून त्यांची बदली झाल्यानंतर तेथील मुख्य चौकाचे नामकरण ‘एम. जी. पिंपुटकर चौक’ असे करण्यात आले.

गोधऱ्याहून त्यांची नियुक्ती अहमदाबाद येथे अन्नधान्य वाटप आयुक्त (फूड कमिशनर) म्हणून करण्यात आली. या ठिकाणीदेखील त्यांनी तडफदार वृत्ती दाखवून साठेबाजी, काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करून अन्नधान्य वाटपाची उत्तम व्यवस्था लावली.




**लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी**

१९६० साली पिंपुटकर मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त झाले. मुंबईतील त्यांची कारकीर्द वादळी ठरली. ते मुंबईचे आयुक्त असताना मुंबई प्रदेश काँग्रेस हाउसचा कर न भरल्यामुळे त्यांनी मुंबई प्रदेश काँग्रेसच्या इमारतीवर जप्ती आणली. त्यामुळे त्यांची तेथून बदली करण्यात आली. ४ सप्टेंबर १९६५ रोजी पिंपुटकर मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीमध्ये मुख्य संचालक या पदावर रुजू झाले. या ठिकाणी त्यांनी २८ एप्रिल १९६८ पर्यंत यशस्वीपणे पदभार सांभाळला. पुढे १९७४ साली मा. इंदिरा गांधी यांनी पिंपुटकरांची केंद्रीय नियोजन आयोगाच्या सचिवपदी नेमणूक केली. १९७७ पर्यंत ते या पदावर होते.

१९७७ साली आणीबाणीनंतर जनता पक्षाचे सरकार आले व मा. मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. मोरारजींनी पिंपुटकरांना प. बंगाल राज्याच्या राज्यपालांचे सल्लागार म्हणून पाठवले. त्या वेळी बंगालमध्ये अशांततेची परिस्थिती पिंपुटकरांनी कौशल्याने हाताळली. लवकरच १७ सप्टेंबर १९७७ रोजी मोरारजींनी पिंपुटकरांची नियुक्ती केंद्रीय दक्षता आयोगाचे अध्यक्ष म्हणून केली. या पदावरून पिंपुटकर ३० एप्रिल १९८० रोजी सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर पिंपुटकर सहा महिने दिल्लीचे हंगामी राज्यपाल होते.

राज्यपाल पदाची कारकीर्द संपल्यानंतर ते दिल्ली (गाझियाबाद) येथे स्थायिक झाले. या नि:स्पृह, प्रामाणिक, कठोर शिस्तीच्या प्रशासकाचा मृत्यू दिल्ली येथे झाला.

– संपादित

**संदर्भ :**

१. *'देवरुखे ब्राह्मणाचा इतिहास'*

## पेटीगारा, कावसजी जमशेटजी
**पहिले भारतीय डी.सी.पी., प्रमुख – गुप्तहेर खाते**
**जन्म–मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



कावासजी जमशेटजी पेटीगारा हे गुप्तहेर खात्याचे पहिले भारतीय प्रमुख होते. त्यांचा सेवाकाळ १९०३–१९३८ होता. ते गुप्तहेर खात्यामध्ये सफेदवाला म्हणून ओळखले जात असत. १९२८ मध्ये ते मुंबईचे उपायुक्त झाले. या पदावर त्यांनी दहा वर्षे काम केले. ते अत्यंत प्रामाणिक अधिकारी होते.

महात्मा गांधीजींचा त्यांच्यावर विलक्षण विश्वास होता. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जेव्हा जेव्हा म. गांधीजींना अटक करण्यात आली तेव्हा 'मी फक्त पेटीगारा यांच्याकडूनच अटक करून घेईन,' अशी अट गांधीजींनी घातली होती. पेटीगारा हे मुंबईत सामान्य जनतेमध्ये अत्यंत लोकप्रिय अधिकारी होते. पेटीगारा यांनी जनतेची नाडी चांगली ओळखली होती. मुंबईतील मेट्रो चित्रपटगृहाजवळ जनतेच्या प्रयत्नांमधून त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. त्रावणकोरचे दिवाण रामस्वामी अय्यर यांनी पुढाकार घेऊन जनतेच्या सहकार्याने पेटीगारा यांचा पारशी डगल्यामधील उभा केलेला हा पुतळा आजही त्यांच्या शानदार कर्तृत्वाची आठवण करून देतो.

– संपादित

प

## पेंडसे, मधुकर दिनकर
**मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग**
**२५ ऑक्टोबर १९४०**



मधुकर दिनकर पेंडसे यांचा जन्म कोकणातील वेरळ या खेड तालुक्यातील गावात झाला. वेरळ येथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पार पडले. माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना खेड येथे दाखल व्हावे लागले. कोकणात भरपूर पाऊस, आठ महिने झुळझुळत वाहणारे नदीनाले, हिरवा निसर्ग म्हणूनच मी भावी आयुष्यात जल क्षेत्राकडे वळलो असे सांगणारे पेंडसे, दहावीच्या परीक्षेत १९५७ मध्ये जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकाने पास झाले, व इंटरच्या शिक्षणासाठी ते मुंबईतील एल्फिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले. १९५९ मध्ये इंटर झाल्यानंतर त्यांनी वालचंद महाविद्यालय, सांगलीहून स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. १९६२ मध्ये ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि साहाय्यक अभियंता म्हणून ते कोयना जलविद्युत प्रकल्पात रुजू झाले.



संस्कारक्षम कुटुंबातून आलेल्या पेंडसेंनी आयुष्यभर आपल्या घासातला घास इतरांना देऊन त्यांची दु:खे निवारण्याचे काम केले. समाजाचे आपणही काहीतरी देणे लागतो आणि आपण ते दिले पाहिजे या जाणिवेने आयुष्यभर झटणाऱ्या मधुकर पेंडसेंचे जीवन म्हणजे एक समाजसमर्पित व्रतस्थ जीवन आहे. समाजाला सुखकारक आणि उपयुक्त ठरतील अशाच योजना त्यांनी अमलात आणल्या व सामान्य नागरिकाला अडचणीत आणणाऱ्या योजनांमध्येही त्यांनी सुधारणा केल्या.

कोयना धरणग्रस्तांच्या प्रकल्प उभारणीत ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी धरणाखाली गेल्या होत्या, त्या जमिनींची नुकसानभरपाईही शासन शेतकऱ्यांना




**इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स**
**'सर्वोत्कृष्ट अभियंता' पुरस्कार**

धनादेशामार्फत देत होते. पण त्या भागातील शेतकरी अशिक्षित होते. त्यांना बँकेचे व्यवहार करता येत नव्हते. यातून सर्रास शेतकऱ्यांची फसवणूक व्हायला लागली. तेव्हा ही नेमकी अडचण एक उत्तम प्रशासक असलेल्या पेंडसे यांच्या लक्षात आली आणि शासनाकडे विनंती करून पेंडसे यांनी या सर्व शेतकऱ्यांना रोख स्वरूपात मोबदला देण्याची व्यवस्था केली.

याच कोयना प्रकल्पासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. त्याच भागातील तरुणांना नोकऱ्या दिल्या जात. यासाठी दूरदूरच्या खेडेगावांतून अनेक गरीब मुले कार्यालयात येत. बसची व्यवस्था नसल्यामुळे त्यांना रात्रीचे तिथेच अडकून पडावे लागत असे. ही त्या गरीब तरुणांची अडचण मधुकर पेंडसे यांनी ओळखली आणि नोकरभरतीसाठी विशिष्ट तारखा ठरवून ज्या भागातून नोकरीसाठी तरुण येत, त्याच भागात त्या दिवसापुरते कार्यालय हलविण्याची व्यवस्था पेंडसे यांनी केली आणि तरुणांना नोकऱ्या दिल्या.

युनेस्को या आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे पेंडसे यांना जल –व्यवस्थापनाच्या अभ्यासासाठी रशियाला पाठविण्यात आले. पेंडसे यांनी रशियात जाऊन तिथल्या जलव्यवस्थापन शास्त्राचा सखोल अभ्यास केला. त्या वेळी भारतात अशा प्रकारचा कुठलाही अभ्यास केला गेला नव्हता. रशियातून अभ्यास करून

आलेल्या पेंडसे यांनी भारतात पहिल्यांदाच जलविज्ञानाचे कार्यालय उघडले आणि त्याद्वारे अभ्यासाला सुरुवात केली. याद्वारे भारतीय जलाच्या प्रवाह दिशा, त्यांचे ओघ, पाणी साठवण्याची ठिकाणे, बाष्पीभवनाचे प्रमाण अशा वेगवेगळ्या विषयांवर अभ्यासाला सुरुवात केली. याच पार्श्वभूमीवर पुढे जलविज्ञानाचे मुख्य कार्यालय नाशिकला उघडण्यात आले आणि व्यापक पातळीवर त्याचा अभ्यास व संशोधन सुरू झाले. याचे जनक आहेत मधुकर पेंडसे.

पाटबंधारे विभागाच्या पुणे कार्यालयात पेंडसे यांची नियुक्ती झाली. अगदी त्याच दिवशी मुसळधार पाऊस झाला आणि पुण्याच्या जवळील असलेले एक धरण फुटायला सुरुवात झाली. त्याचा धोका रात्रीच्या वेळी अधिक वाढला. त्या धरणावरचा अभियंता घाबरलेला होता. तेव्हा रात्री दोन वाजता कालव्यातून वाहणाऱ्या चार फूट पाण्यातून पेंडसे धरणात पोहोचले. हे धरण मातीचे होते. मुसळधार पाऊस सुरू होता आणि धरणाला भेग पडली होती. परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधीच सैन्य बोलवायला हवे याबाबत सगळीकडून पेंडसे यांना विचारले जाऊ लागले. पण हे धरण वाचवता येईल अशी खात्रीच पेंडसे यांनी वरिष्ठांना दिली. पेंडसे स्वत: उपस्थित राहून त्यांनी कर्मचाऱ्यांना धीर दिला. कर्मचाऱ्यांना मदतीला घेऊन आधी त्यांनी दगड, विटांच्या मदतीने भेग बुजवली. कालव्यातूनही पाणी सोडले आणि धरणफुटीचा धोका टळला.

सर्वसामान्य जनतेचे सामाजिक प्रश्न व्यवस्थापनाच्या कुठल्याही पुस्तकात लिहिलेले नसतात असे पेंडसे म्हणतात. त्यांनी व्यवस्थापन क्षेत्रात राहून प्रत्यक्ष अनुभव घेऊनच जनतेचे सामाजिक प्रश्न लीलया सोडवले. याच कामाची पेंडसे यांना अप्रत्यक्ष पावतीही मिळाली. बार्शीच्या एका शेतकऱ्याने त्याच्या एका वादाविषयी पेंडसे यांच्या वरिष्ठांना पत्र पाठवले. या पत्रातून 'प्रकरणाची चौकशी पेंडसे यांच्याकडे सोपवावी, तरच मला योग्य न्याय मिळू शकेल,' असे त्याने लिहिले होते. शेतकऱ्याचे हे पत्र म्हणजे पेंडसे यांच्या सत्यनिष्ठ कामाची पावती होती.

"नेता तोच असतो जो संकटाच्या वेळी सर्वांच्या पुढे असतो, आणि सुखाच्या वेळी सर्वांच्या पाठीशी असतो," हे वाक्य पेंडसे यांच्या तोंडी सदैव असते. प्रत्यक्ष आयुष्यातसुद्धा ते त्याच पद्धतीने जगले आणि एक अनुकरणीय आदर्श समाजासमोर ठेवला.

१९९० मध्ये कोयना लेक टॅप स्टेज-४ कामावर त्यांची नियुक्ती झाली. या वेळी जमिनीअंतर्गत भुयार पाडून धरणाच्या मधोमध लेक टॅप घ्यावयाचा होता, अगदी या वेळी धरणाचे पाणी व भुयार यांच्यामध्ये लेक टॅपच्या ठिकाणी केवळ सहा मीटर अंतर उरले होते. या वेळी धरणालाही धोका होता.

हा फारच अटीतटीचा प्रसंग होता. सर्व कामगार घाबरत होते. तेव्हा त्यांचे मनोधैर्य खचू नये म्हणून मधुकर पेंडसे मागचा-पुढचा विचार न करता त्या ठिकाणी जाऊन थांबले. त्यांनी योग्य वेळी देखरेख केली आणि तो लेक टॅप अतिशय चांगल्याप्रकारे यशस्वी झाला. या वेळी पेंडसे त्या ठिकाणी मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

आपल्या संपूर्ण आयुष्यात कर्तव्यदक्ष आणि समाजहितदक्ष असलेल्या पेंडसे यांना १९९८ सालचा इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचा 'सर्वोत्कृष्ट अभियंता' हा पुरस्कार मिळाला. निवृत्तीनंतर पेंडसे हे कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात खाजगी तत्त्वावर लहान स्वरूपात वीजनिर्मिती कशी करता येऊ शकते यावर संशोधन करून, शासनामार्फत ते अमलात आणण्याचे काम करत आहेत. याच हायड्रो पॉवर असोसिएशनचे ते संस्थापक सदस्य आहेत. या माध्यमातून ते वेगवेगळ्या परिषदा भरवणे, परिषद परिसंवादात सहभाग घेणे आदी संशोधनात्मक महत्त्वपूर्ण काम करीत असतात.

– दत्ता कानवटे

**प्रधान, श्रीराम दत्तात्रेय**
**भारतीय प्रशासकीय सेवा,**
**केंद्रिय गृहसचिव,**
**२७ जून १९२८**



श्रीराम दत्तात्रेय प्रधान यांचा जन्म मुंबईत दादर येथे झाला. त्यांचे घराणे मूळचे रोह्याचे. वडिलांच्या नोकरीमुळे त्यांचे बालपण दिल्लीत गेले. १९४२ च्या सुमारास ते शिक्षणासाठी पुण्यात आले. त्यांनी न्यू इंग्लीश स्कूल येथून शालेय शिक्षण घेतले आणि फर्गसन महाविद्यालयातून पदवी संपादन केली. पदवीनंतर ते आय.ए.एस.ची स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण झाले व १९५२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सेवेत रुजू झाले. तेव्हाच्या रीतीनुसार काही जिल्ह्यांतून प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. प्रधान यांचा बाबासाहेब गडकरी यांची कन्या लोपामुद्रा यांच्याशी विवाह झाला.

कोल्हापूरचे जिल्हाधिकारी असताना त्यांनी तेथील सुप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिरात लक्षणीय सुधारणा घडवून आणली. त्यानंतर ना. यशवंतराव चव्हाण यांनी आपले विश्वासू सहकारी म्हणून प्रधान यांना नियुक्त केले. त्यांच्याबरोबर प्रधान यांनी गृह, संरक्षण आणि अर्थखात्याच्या कारभाराचा अनुभव घेतला. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ‘युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट’च्या मुख्य सचिवांचे सल्लागार, डायरेक्टर ऑफ शिपिंग, महाराष्ट्र राज्याचे गृहसचिव, नंतर केंद्रीय गृहसचिव अशी शासकीय सेवेतील विविध मानाची पदे त्यांनी भूषविली. केंद्रीय गृहसचिव असताना त्यांनी आसाम करार पुरा केला ही त्यांची सर्वात मोठी कामगिरी म्हणावी लागेल. या



**पद्मभूषण पुरस्कार**

त्यांच्या कामगिरीमुळे ते पंतप्रधानांच्या अगदी विश्वासातील व्यक्ती बनले.

यानंतर १९८७ मध्ये प्रजासत्ताकदिनी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा बहुमानाचा किताब दिला. १ फेब्रुवारी १९८९ पासून बिहार व अरुणाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून श्रीराम प्रधान यांची नियुक्ती झाली. त्यापूर्वी लोकनायक बापूजी अणे व आर.डी.भंडारे यांनीही काही काळ तो कार्यभार पाहिला होता. नंतर प्रधान बिहारचे राज्यपाल झाले. तेव्हा बिहार हे एक ‘समस्या राज्य’ झाले होते. एका बाजूला आर्थिक मागासलेपणा व दुसऱ्या बाजूला सामाजिक तणाव अशा कात्रीत बिहार सापडला होता. त्या परिस्थितीत राज्यातील राजकीयच नव्हे तर कायदा व सुव्यवस्थेची स्थिती सुधारण्यासाठी एका चांगल्या प्रशासकाची आवश्यकता होती. राम प्रधान यांच्या नियुक्तीने हे कार्य साधले गेले. त्यानंतर प्रधान यांना महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे नामनियुक्त सभासद म्हणून नेमणूक मिळाली.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी आघातानंतर चौकशीसाठी दोन सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. श्रीराम प्रधान यांचा त्यात समावेश होता. त्यांनी याची सखोल चौकशी केली व आपला अहवाल सादर केला. प्रधान यांनी आपल्या सामाजिक जबाबदाऱ्याही विविध मार्गांनी पूर्ण केल्या आहेत. निवृत्तीनंतरही श्री.राम प्रधान यांनी अनेक संस्था व संघटनातून आपले कार्य चालू ठेवले आहे.

– सविता भावे


* * *

# फ

## फडके, गोविंद नारायण

**महाव्यवस्थापक-पश्चिम रेल्वे**

**३० एप्रिल १९३४**



गोविंद नारायण फडके यांचा जन्म मुंबईत झाला. त्यांच्या आईचे नाव सुभद्राबाई होते. त्यांचे वडील मुंबईतच इस्माईल यूसुफ महाविद्यालय व नंतर रूपारेल येथे गणिताच्या अध्यापनाचे काम करीत असत. वडील शिक्षक असल्याने गोविंदरावांना घरातूनच शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण छबिलदास शाळेतून पूर्ण झाले. मॅट्रिकच्या परीक्षेत ते बोर्डातून अकरावे आले. १९५२ साली त्यांनी इंटरची परीक्षा एलफिन्स्टन महाविद्यालयातून दिली व त्या वेळी ते विद्यापीठात दुसरे आले. त्या काळी समाजात अभियांत्रिकीच्या शिक्षणाचे वारे असल्यामुळे ते आपसूकच अभियांत्रिकीकडे वळले आणि नावाजलेल्या मुंबईच्याच व्ही.जे.टी.आय. अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांना नागरी अभियांत्रिकीसाठी प्रवेश मिळाला.

१९५५ साली त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर फरीदपूरच्या आयआयटीत पुढचे शिक्षण घेण्याची त्यांची तीव्र इच्छा होती; परंतु वडिलांच्या आग्रहाखातर त्यांना नोकरी स्वीकारावी लागली. लोणावळ्याच्या सैन्य अभियांत्रिकीमध्ये ते रुजू झाले. परंतु तेथे स्वस्थ न बसता त्यांनी इंडियन रेल्वे सर्व्हिस इंजिनिअरिंगची परीक्षा दिली. १९५७ साली ते रेल्वे सेवेत साहाय्यक अभियंता म्हणून रुजू झाले. गोंदिया येथे त्यांची रेल्वे सेवेतील पहिली नेमणूक झाली. या ठिकाणी त्यांना नागपूर ते कलकत्ता जाणाऱ्या एकेरी रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण काम देण्यात आले. या मार्गात येणाऱ्या नद्यांवरील पूल बांधून रेल्वेच्या दुहेरीकरणाचे काम त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडले. त्यांच्या या कामगिरीमुळे सोबतच्या १०० अभियंत्यांपैकी त्यांची एक्स्क्ल्यूझिव्ह अभियंता म्हणून निवड करण्यात आली.

या दरम्यान कलकत्त्यात (कोलकाता) हल्दिया हे नवीन बंदर उभारण्यात येत होते. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने या बंदराच्या उभारणीसाठी आणि बंदरातून होणारा व्यापार संपूर्ण भारतात पोहोचवण्यासाठी रेल्वेमार्गाची आवश्यकता होती. बंदर परिसरात २०० मैलांपर्यंत कुठेच चांगला दगड मिळत नव्हता आणि बंदर उभारण्यासाठी दगडांची आवश्यकता होती. बाहेरचा दगड आणण्यासाठी रेल्वेची नितांत गरज होती म्हणून या रेल्वे उभारणीच्या कामावर गोविंद फडके यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणापासून ते रेल्वे त्या मार्गावरून धावली जाण्यापर्यंतचे संपूर्ण काम पूर्ण केले.

या दरम्यान त्यांना एक महत्त्वाची अडचण आली. गाळाच्या मातीने बनवलेल्या एका कालव्यावरील पुलाचा (हिजली टाइडल कॅनाल) एक हजार फूट लांब भराव पूर्णत: खचला आणि ३० फुटांवरून तो २० फुटांपर्यंत खाली आला होता. कॅनालमधली वाहतूक थांबली होती. हा पूल पुन्हा उभारणे गरजेचे



हल्दिया येथील रेल्वे पूल

होते. तेव्हा गोविंद फडकेंनी एक कल्पना मांडली. लोखंड बनवताना शिल्लक राहणारी पंचवीस ट्रेन राख पोलादपूरहून आणली गेली व खचलेला भराव पूर्ण करून रेल्वेमार्ग उभारण्यात आला. त्यांच्या या अभूतपूर्व कार्यावरून तेंव्हाच्या कलकत्ता मेट्रो रेल्वेचे महाप्रबंधक एम. एस. मुखर्जींनी त्यांची मेट्रो रेल्वेच्या कामात मुख्य अभियंता म्हणून नेमणूक केली.

फ

१९७२ मध्ये सुरुवात झालेल्या पूर्णत: जमिनीखालून जाणाऱ्या मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा १९८४ मध्ये पूर्ण झाला. या रेल्वे प्रकल्पाला जगातील सर्व मेट्रो रेल्वेंचे निरीक्षण केलेल्या कॅनेडियन सरकारच्या खास वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने अगदी दहा पैकी दहा गुण दिले ही भारतीय अभियंत्यांच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत अनेक अडचणी आल्या. त्या वेळचे रेल्वेमंत्री मधू दंडवते हे मेट्रो प्रकल्पाच्या विरोधात होते. तेव्हा फडके यांनी त्यांची भेट घेतली व त्यांना प्रकल्पाचे महत्त्व विशद करून सांगितले. त्यामुळे या प्रकल्पासाठी आवश्यक आर्थिक मदत तातडीने मिळाली व अल्पावधीतच हा प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने निघाला.

पावसाळा लागल्यामुळे मेट्रोच्या खड्ड्यात पाणी जाऊ नये म्हणून रस्त्यात भिंती उभारल्या होत्या. भिंतीबाहेर भरपूर पाणी साचले. रस्त्याच्या शेजारील दुकानांत पाणी घुसले आणि संतप्त लोकांनी भिंती पाडून टाकल्या. मेट्रो रेल्वेच्या बोगद्यात पाणी घुसले. गाळ साचला व इलेक्ट्रॉनिक यंत्रणा बंद पडल्या. त्यांनी पुन्हा बोगद्यातले पाणी व गाळ काढला, इलेक्ट्रॉनिक यंत्रणा बदलली.

इंदिरा गांधी यांच्या हस्ते या रेल्वेचे उद्घाटन होणार होते, पण त्याच वेळी त्यांची हत्या झाली. परंतु तेव्हा अभियंत्यांनी कोणत्याही राजकीय व्यक्तीला न बोलवता या मेट्रो प्रकल्पाचे उद्घाटन केले. देशातला हा पहिला प्रकल्प असेल, की ज्याचे उद्घाटन अभियंत्यांनी केले. ही रेल्वे सुरू होऊन २५ वर्षे झाली तरी एकही अपघात झाला नाही, हेच या प्रकल्पाच्या यशस्वितेचे उदाहरण आहे.

गोविंद फडके यांची नेमणूक नंतर वेस्टर्न रेल्वेच्या प्रमुखपदी मुख्य अभियंता म्हणून झाली. १९९२ साली ते नॉर्थ ईस्ट फ्रँटीयर रेल्वेच्या महाव्यवस्थापक या पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही मुंबईतील वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरूळ, बेलापूर या प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार म्हणून त्यांनी चार वर्षांपर्यंत काम केले.

वरील रेल्वे स्थानकांवर रंगीबेरंगी काचा लावून सूर्याचा वेगवेगळ्या रंगांतला प्रकाश पडल अशी त्यांची अभिनव रचना करण्यात आली. या संकल्पनेचे सर्वच स्तरांतून कौतुक करण्यात आले. सध्या गोविंद फडके पुण्यातच निवासाला असतात.

– दत्ता कानवटे

## फोर्जेट, चार्लस्

**पोलीस सेवा गुप्तचर विभाग**

**जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध**

चार्लस् फोर्जेट यांचा जन्म भारतात चेन्नई (मद्रास) येथे झाला. स्थानिक चालीरीती आणि बोलीभाषांचा त्यांचा उत्तम अभ्यास होता. ते वेशांतर करून शहरात हिंडत असत. फोर्जेट यांचा वर्ण आणि शारीरिक ठेवण भारतीयांसारखी होती. त्यामुळे स्थानिक लोकांना



समजून घेण्यासाठी त्याचा त्यांना खूप फायदा झाला. १८५५ ते १८६३ या आपल्या सेवाकाळात त्यांनी अत्यंत कुशलतेने मुंबई शहराचे व्यवस्थापन सांभाळले. बीट सिस्टीम, रात्रीची गस्त घालणे या दोन्ही पद्धती फोर्जेट यांनीच मुंबई शहरात प्रथम सुरू केल्या. बेमालूम वेशांतर करून गुन्ह्यांचा तपास करणे यासाठी त्यांची ख्याती होती. त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर एलफिन्स्टन यांच्या कानावर त्यांच्या या कामगिरीची कीर्ती पोहोचली. एलफिन्स्टन यांनी त्यांना बोलावून मला वेशांतर करून फसवून दाखवा अशी पैज लावली. त्यांनी एलफिन्स्टन यांच्या घरात प्रवेश करून दाखवून ही पैज जिंकली. निवृत्तीनंतर ते इंग्लंडमधील वायकोम येथे स्थायिक झाले. परंतु त्यांच्या भारतीय रंगरूपामुळे त्यांच्या राष्ट्रीयत्वाबद्दल शंका उपस्थित करून इंग्लंडच्या उच्चभ्रू लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता.

मुंबई शहराबद्दल त्यांच्या मनात अत्यंत जवळीक निर्माण झाली होती. मुंबई शहराच्या स्मृती जपण्यासाठी त्यांनी आपल्या वायकोम मधील घराचे नाव ‘कावसजी जहांगीर हॉल’ असे ठेवले होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्या घराचे शाळेत रूपांतर करण्यात आले. अशा या विलक्षण चतुर प्रामाणिक अधिकाऱ्याने मुंबई शहराच्या पोलीस प्रशासनावर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवला.

– संपादित

* * *

फ

# ब

## बर्वे, सदाशिव गोविंद

**आय.सी.एस., अर्थमंत्री–महाराष्ट्र राज्य, सचिव – उद्योग खाते, अध्यक्ष–शासन सुधारणा आयोग**

**२७ एप्रिल १९१४ – ६ मार्च १९६७**



सदाशिव गोविंद बर्वे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे झाला. त्यांचे वडील (अण्णासाहेब) उपजिल्हाधिकारी व नंतरच्या काळात सांगलीत दिवाण म्हणून काम करत होते. सदाशिव बर्वे यांचे शालेय शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल नाना वाडा येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन महाविद्यालयात झाले. इंग्रजी व अर्थशास्त्र या विषयांत त्यांनी विशेष पारितोषिके मिळवत पदवी प्राप्त केली. पुढे त्यांनी एकाच वेळी केंब्रिज विद्यापीठाची पदवी मिळवली व आयसीएस परीक्षेतील यश प्राप्त केले. त्या वेळी त्यांना परदेशात उत्तम संधी असूनही, लोकसेवा करण्यासाठी बर्वे भारतात परतले.

बर्वे यांनी प्रथम अहमदाबाद येथे उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले. त्यांनी प्राध्यापक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या (तरुणांच्या) मदतीने आसपासच्या ग्रामीण भागातले रस्तेही श्रमदानाने सुधारले. ही त्यांच्या 'ऑफ ट्रॅक' कामाची सुरुवात होती. याच सुमाराला त्यांनी वैयक्तिक जीवनातही परंपरेला छेद देणारा एक निर्णय घेतला. त्यांनी जून १९३८ मध्ये शरयू गुप्ते यांच्याशी आंतरजातीय विवाह केला. बर्वे हे स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांच्या सेवेत अधिकारी होते. कायदेभंगाची चळवळ जोमात चालू असताना त्यांनी अगदी 'तारेवरची कसरत' केली. सुरत, अहमदाबाद, मुंबई, धारवाड व पुणे येथे त्यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप पाडली. स्वातंत्र्यपूर्व काळात अहमदाबाद येथे झालेल्या धार्मिक दंगलीत त्यांनी कठोर व धाडसाने निर्णय घेतले आणि दंगल आटोक्यात आणली.

देश स्वतंत्र होत असताना ते पुण्याचे जिल्हाधिकारी होते. नियमांच्या चाकोरीत राहूनही कल्याणकारी राज्यकारभार कसा करता येतो, याचे त्यांनी उदाहरण घालून दिले. जुन्या दप्तरांची विल्हेवाट, स्वच्छता सप्ताह, विशिष्ट कालमर्यादेत ठरवून कामे पूर्ण करणे; पूर्ण झालेल्या कामाची कागदपत्रे मुदतीनंतर निकालात काढणे अशी आधुनिक कार्यपद्धती त्यांनी राबवली.

म. गांधींची हत्या झाली, त्या वेळी बर्वे पुण्याचे जिल्हाधिकारी होते. ज्याने हत्या केली, तो नथुराम गोडसे पुण्याचा. त्या वेळची प्रचंड तणावाची परिस्थिती बर्वे यांनी संयमाने व धाडसाने हाताळली.

पुणे महानगरपालिका १९४९ मध्ये अस्तित्वात आली. पुण्याचे पहिले आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारण्याआधी त्यांनी मुंबई म.न.पा.च्या कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या कामाचा पाया शास्त्रशुद्ध होता, नियोजन व पूर्वतयारी तपशीलवार असायची, तसेच योग्य कामासाठी सुयोग्य अधिकारी हे सूत्रही पक्के ठरलेले असायचे. पूर्वीच्या नगरपालिकेत पंचवीस वर्षांत जी कामे पूर्ण झाली नाहीत, ती कामे त्यांनी तीन वर्षांत पूर्ण केली. रस्ते, पूल, पाणी, सांडपाणी, वीज, गृहप्रकल्प, दवाखाने, बाजार, उद्याने... असा विविधांगी विचार करून त्यांनी पुढील पंचवीस वर्षांसाठीचा 'नगर आराखडा'



पुणे महानगरपालिका

कालबद्ध नियोजन व खर्चासह तयार केला. हडपसर, चिंचवड, सातारा रस्ता येथे औद्योगिक वसाहती उभ्या केल्या. संभाजी उद्यान, पेशवे पार्क यांच्या निर्मितीचे श्रेय त्यांनाच आहे.

त्यांनी लक्ष्मी रस्ता व जंगली महाराज रस्ता हे दोन प्रमुख रस्ते तयार केले. लक्ष्मी रस्ता रुंद करण्यात एक गणपतीचे देऊळ आड येत होते. बर्वे यांनी धाडसाने निर्णय घेऊन, रातोरात मंदिर हलवले; रस्ता रुंद केला. पुढे त्या गणपती मूर्तीचीही यथोचित पुनर्स्थापना केली आणि पुण्याची नगररचनात्मक, आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झाली. यामध्ये बर्वे यांचा निश्चितच मोठा वाटा आहे. १२ जुलै १९६१ हा पुण्यासाठी काळा दिवस ठरला. पानशेत धरण फुटले. या वेळी बर्वे यांची उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. बर्वे यांनी ‘सरकारी अधिकाऱ्यांच्या विश्रामगृहा’चे कार्यालयात व ‘वॉर रूम’मध्ये रूपांतर केले. या काळात त्यांनी रात्रंदिवस अथक परिश्रम केले. पाणीपुरवठा, शहराची पुन:उभारणी, आरोग्यसेवा, लोकांना तातडीची मदत, त्यांचे पुनर्वसन, दळणवळण, संपर्क साधने इत्यादी सर्वच आघाड्यांवर त्यांनी स्वत: उत्तम कार्य केले आणि वेगाने कामे करवूनही घेतली.

पं. नेहरू व चिंतामणराव देशमुख यांनी बर्वे यांच्यावर दिल्लीजवळील फरीदाबादच्या उभारणीची जबाबदारी (१९५३) टाकली. एका वर्षात त्यांनी हे कार्य यशस्वीपणे पार पाडले. पुढे त्यांनी केंद्रीय अर्थमंत्रालयात सहसचिव म्हणून काम केले. ‘‘आंतरराज्य विक्रीकर कायदा या क्लिष्ट कायद्याची उकल करताना बर्वे यांनी दर्शवलेले कौशल्य म्हणजे अर्थखात्याच्या कामाचे शिखर होते,’’ ही सी. डी. देशमुख यांची प्रतिक्रियाच सर्वकाही सांगून जाते. अनेक खाजगी विमा कंपन्यांचे एल.आय.सी.मध्ये रुपांतर व इंपिरीयल बँकेचे स्टेट बँकेमध्ये रुपांतर करण्यातही त्यांचे विशेष योगदान होते.

बर्वे यांचे मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कानडी, उर्दू इत्यादी भाषांवर प्रभुत्व होते. त्यांनी भाषा मंडळावर चिटणीस म्हणून कार्य केले. मोठ्या द्वैभाषिक राज्याची विभागणी होत असताना विभाजन समितीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून काम केले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होताना बर्वे यांनी उत्तम, निर्णायक कामगिरी बजावली.

कोयना प्रकल्प निधीअभावी मागे पडत होता. या प्रकल्पाच्या आर्थिक नियोजनामध्ये त्यांनी मुख्य भूमिका बजावली. या प्रकल्पासाठी जागतिक बँकेचे दोन कोटी पन्नास लाख डॉलरचे कर्ज मंजूरीसाठी गेलेल्या शिष्टमंडळाचे ते अध्यक्ष होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ते महाराष्ट्राच्या पहिल्या सिंचन आयोगाचे अध्यक्ष झाले. सिंचनविषयक संशोधनासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात प्रवास केला आणि अभ्यासांती सहा पट (त्या वेळच्या प्रमाणाचा) जमीन सिंचनाखाली आणण्याचा अहवाल सादर केला.

एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असताना त्यांनी दापोडी, सातारा, भोर येथे स्थानकांसाठी घेतलेल्या जागा, या स.गो.बर्वे यांच्या द्रष्टेपणाचे द्योतक आहे. महाराष्ट्र उद्योग खात्याचे सचिव असताना मुंबईवरचा अतिरिक्त बोजा कमी

ब

करण्याचा केलेला प्रयत्न, उद्योगविषयक मूलभूत संस्थांची केलेली स्थापना, महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ, पिंपरी-चिंचवड परिसरात उभारलेला टाटा उद्योग समूह, कृष्णा-गोदावरी पाणीतंटा आदी कामांच्या संदर्भात बर्वे यांनी निर्णयप्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावल्यामुळे पुणे परिसरात नवीन मोठ्या उद्योगांची मुहूर्तमेढ रोवली गेली.

मुंबईचा विकास साधताना 'वांद्रे-कुर्ला खाडीत भर घालावी' आणि 'त्या जागेचा उपयोग मध्यमवर्गीय व गरिबांच्या घरांसाठी करावा', अशा सूचना त्यांनी केल्या होत्या. बर्वे यांनी शासन सुधारणा आयोगाचे अध्यक्ष म्हणून एक कडक अहवाल सादर केला. या अहवालात त्यांनी सत्ताधारी काँग्रेस पक्षावर सप्रमाण टीका केली. तत्कालीन नेते यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसजनांना हा अहवाल गांभीर्याने घेण्यास सुचवले होते.

स्व. यशवंतराव चव्हाण यांनी बर्वे यांना राजकारणात आणले. बर्वे यांनीही महाराष्ट्राच्या विकासासाठी 'समंजस नेतृत्वाला' साथ द्यायचे ठरवले. १९६१ मध्ये त्यांनी सनदी नोकरीचा राजीनामा दिला. १९६२ मध्ये त्यांनी पुण्यातील शिवाजीनगर मतदारसंघातून निवडणूक लढवली. ते आपली प्रतिमा व कार्याच्या बळावर विजयी झाले.

१९६२ च्या राज्य मंत्रिमंडळात त्यांच्याकडे अर्थमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. पुढे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी उद्योग खात्याची जबाबदारी दिली. ठाणे, बेलापूर, खोपोली, पनवेल, चिपळूण, औरंगाबाद येथील औद्योगिक विकासाची मुळे ही बर्वे यांच्या कारकिर्दीतली आहेत.

१९६५ च्या दरम्यान बर्वे यांची केंद्रीय नियोजन आयोगाचे (उद्योग) सदस्य म्हणून नेमणूक झाली. महाराष्ट्रातील नेते अन्य राज्यांतील नेत्यांप्रमाणे आपल्या राज्याच्या मागण्या दिल्लीदरबारी पुढे रेटण्याकरिता एकत्र येत नाहीत, हे कटू वास्तव त्यांनी अनुभवले. तसेच नियोजन उत्तम प्रकारे केल्यावरही त्याची अंमलबजावणी किमान कार्यक्षमतेइतकीसुद्धा होत नाही, हेही त्यांच्या नजरेला आले. हे मुद्दे बर्वे यांनी परखडपणे मांडले होते.

कोणत्याही पदावरून काम करताना त्यांनी परखडपणा, निर्भीडपणा कधीही सोडला नाही. कातडी बचाव - खुर्ची बचाव असली कार्यपद्धती त्यांना माहीतच नव्हती. 'सत्त्वाचा आणि तत्त्वाचा आग्रह व त्यासाठी कोणताही त्याग करायची तयारी'; त्याबाबत ते डॉ. चिंतामणराव देशमुख यांचे निष्ठावान अनुयायी होते.

सदाशिव बर्वे राज्यसभेवर सहजपणे खासदार होऊ शकले असते. पण त्यांनी १९६७ ची ईशान्य मुंबईची निवडणूक लढवली. काँग्रेसने बर्वेंना तिकीट दिले व आपल्याला नाकारले म्हणून कृष्ण मेनन यांनी बंड केले. 'हा नेहरूंचा अपमान' असा कांगावा केला. मेनन यांनी निवडून येण्यासाठी शक्य तितके अनेक मार्ग वापरले. नव्याने स्थापन झालेल्या शिवसेनेने बर्वे यांना पाठिंबा दिला. ही निवडणूक राज्यात व देशात गाजली. बर्वे यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही गैरमार्गाचा वापर न करता त्यांनी विजय मिळवला आणि जनता सामाजिक कामाला महत्त्व देते हे सिद्ध केले.

निवडणूक जिंकल्यानंतर पुढील वाटचालीच्या दृष्टीने बर्वे दिल्लीला गेले. त्यांना अर्थ किंवा उद्योग खाते मिळणार हे स्पष्ट होते. पण दिल्ली येथेच सदाशिव बर्वे यांचे दु:खद निधन झाले.

— बळवंत शंकर बर्वे/विनय मावळणकर

## बापट, श्रीकांत कृष्णाजी

**भारतीय पोलीस सेवा, पोलीस आयुक्त-मुंबई, अधिक्षक-गुप्तचर खाते**

**६ ऑक्टोबर १९३७**

श्रीकांत कृष्णाजी बापट यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सुशीला होते. त्यांचे वडील रमणबाग शाळेत उपमुख्याध्यापक होते. त्यांना



ब



आपल्या घरातच स्वयंशिस्तीचे बाळकडू मिळाले. घरात लोकशाहीचे वातावरण असल्यामुळे त्यांना लहानपणापासूनच जबाबदारीने वागण्याची, विचारपूर्वक निर्णय घेण्याची आणि इतरांसाठी झटण्याची सवय लागली. रमणबाग शाळेतील शिक्षक आणि महाराष्ट्र मंडळातील मान्यवरांच्या सहवासात त्यांची जडणघडण झाली. महाराष्ट्र मंडळात बॉक्सिंग, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल इ. खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. या मंडळात तसेच पुढे बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय येथे त्यांना उत्तम शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन लाभले.

बापट यांनी आपली खेळाची आवड जोपासत महाविद्यालयात बॉक्सिंग संघ तयार केला आणि या संघाने विजेतेपदही प्राप्त केले. त्यांना पुणे विद्यापीठाचे रमा-विष्णू पदकासहित अन्य पदकेही त्यांना मिळाली. ॲडव्हान्स अकाउंटिग आणि ऑडिटिंग हे विषय घेऊन पुणे विद्यापीठात ते बी.कॉम.च्या परीक्षेत प्रथम आले. पालकांवर आर्थिक भार टाकून परदेशात एम.बी.ए. करायला जाण्यापेक्षा त्यांनी सी.ए. करता-करता स्पर्धा परीक्षा देण्याचा पर्याय निवडला.

महाराष्ट्र मंडळात तत्कालीन चीफ ऑफ स्टाफ जनरल नागेश आले असताना त्यांनी लहानग्या श्रीकांतला ‘आर्मीत येतोस का?’ असे विचारले होते. तसेच सी.ए.ची अंतिम लेखी परीक्षा देण्यापूर्वी त्यांना ‘तू समाजाचं ऑडिट कर, पोलीस सेवेत दाखल हो’, असा सल्ला काकासाहेब गाडगीळ यांनी दिला होता. परिणामी बापट यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची लेखी परीक्षा व मुलाखत दिली आणि त्यांची पोलीस सेवेसाठी निवड झाली. १९६२ पासून त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. मसुरी, माउण्ट अबू आणि नाशिक येथे त्यांचे प्रशिक्षण झाले.

त्यांना शारीरिक क्षमता वाढवणे आणि भाषेचे व शिस्तीचे प्रशिक्षण मिळाले. सेवेसाठी आपल्या राज्याचा पर्याय निवडल्याने श्रीकांत बापट महाराष्ट्र कॅडरमध्ये दाखल झाले. त्यांची पहिली नेमणूक नागपूर येथे झाली. ग्रामीण जिल्हा पोलीस प्रमुख तसेच पोलीस उपायुक्त (नागपूर), जिल्हा अधीक्षक (नगर), जिल्हा अधीक्षक (नाशिक), उपआयुक्त विशेष शाखा -१, महाराष्ट्र गुप्तहेर खात्याचे पोलीस अधीक्षक (मुंबई) अशा विविध महत्त्वाच्या पदांवर त्यांनी १६ वर्षे काम केले.

त्यानंतर त्यांना देशाच्या गुप्तचर विभागात वरिष्ठ पदावर काम करण्याची संधी मिळाली. दिल्लीत त्यांनी हे काम सुरू केले, पण नंतर १२ वर्षे ते याच कामासाठी मुंबईत होते. त्यावेळी देशाच्या पश्चिम प्रभागाची म्हणजे राजस्थान, गुजरात, गोवा व महाराष्ट्राची जबाबदारी त्यांच्यावर होती. देशाच्या सुरक्षेला कोणत्याही प्रकारे धक्का लागू नये याकरिता काम करण्याची संधी त्यांना मिळाली. समाजातल्या खालच्या थरापासून सर्व मोठमोठ्या पातळीवरची माणसे भेटण्याची-पाहण्याची, तसेच सहकाऱ्यांच्या आणि हाताखालच्या लोकांसमोर स्वत:च्या वागणुकीतून आदर्श उभे करण्याची संधी त्यांना पोलीस सेवेत मिळाली. खरे म्हटले तर तेच समाजशिक्षण असते.

हाताखालच्या लोकांना शिस्त, वक्तशीरपणा, शारीरिक तंदुरुस्ती, सजगता, धाडस, निगर्वीपणा या सर्वच बाबतीत स्वत: आदर्श घालून देण्याचा पायंडा पाडणाऱ्यातले श्रीकांत बापट एक होते. त्याचे प्रत्यंतर मुंबईत १९९२-१९९३ साली झालेल्या दंगलीच्या काळात आले.

दंगलीच्या काळात ते मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी काम करत होते. दिवसभराच्या कामानंतर ते रात्री ३-४ वाजता मुंबईत गस्त घालत असत. त्यावेळी आणि कोणत्याही तणावपूर्ण वातावरणात त्यांचा सच्चा पोलीस ताफा त्यांच्यासह असे. या दंगलीच्या

काळात मुंबईत शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाची कामगिरी त्यांनी पोलीस दलामार्फत केली. पोलीस सेवेत असताना त्यांना 'इंडियन पोलीस मेडल', 'प्रेसिडेन्स पोलीस मेडल फॉर डिस्टिन्विश्ड सर्व्हिस' ही पदके देण्यात आली. भारतीय पोलीस सेवेतल्या काही ठराविक लोकांना कोलंबो शिष्यवृत्ती दिली जाते, ती श्रीकांत बापट यांना मिळाली. पोलीस प्रशासनातले अत्युच्च शिक्षण घेण्याची संधी त्यांना या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळाली. त्यासाठी ते ऑस्ट्रेलियातील कॉमनवेल्थ पोलीस प्रशिक्षण अकादमीमध्ये गेले होते. भारतीय गुप्तचर विभागात काम करताना पाश्चिमात्य देशांमधल्या गुप्तचर संघटनेत विचारांचे आदानप्रदान करण्याची संधीही त्यांना मिळाली.

आज पोलीस सेवेतून ते सेवानिवृत्त झाले आहेत. पण त्यांना पुन्हा संधी मिळाल्यास ते पोलीस सेवेतच येतील इतकी त्यांची या कामावर श्रद्धा आहे. त्यामुळेच सेवानिवृत्त झाल्यानंतर ते पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये १९९३ ते १९९९ या काळात ज्येष्ठ सदस्य पदावर जेव्हा कार्यरत होते, तेव्हा त्यांनी प्रशासकीय सेवेसाठी योग्य व्यक्तींची निवड केली. त्यानंतर त्यांनी आरोग्य आणि शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या 'हिंदुजा फाउण्डेशन'चे अध्यक्ष म्हणून ७ वर्षे काम केले.

राजस्थान इथल्या युनायटेड रिसर्च डेव्हलपमेंट प्रोग्राम या सामाजिक संस्थेचेही ते विश्वस्त आहेत. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या व्यवस्थापकीय समितीसमोर कुलगुरूंचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी पाच वर्षे काम पाहिले. आज खाजगी क्षेत्रातल्या नामांकित कंपन्यांच्या संचालक मंडळावरही ते आहेत. इथे मनुष्यबळ विकासाचे काम ते करतात. राष्ट्रीय सुरक्षा, मनुष्यबळ विकास, फळशेती अशा विषयांत रस असल्याने ते आज या क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत.

— पल्लवी गाडगीळ

ब

## बाम, भीष्मराज पुरुषोत्तम


**सहसंचालक – महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता विभाग, पोलीस महासंचालक – मध्य प्रदेश, क्रीडा प्रशिक्षक व मानसशास्त्रज्ञ**

**१ ऑक्टोबर १९३८**



भीष्मराज पुरुषोत्तम बाम यांचा जन्म हैद्राबाद येथे झाला. त्यांनी उस्मानिया विद्यापीठातून गणित विषय घेऊन प्रथम क्रमांकासह पदवी प्राप्त केली. 'खेळ' हा लहानपणापासून त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. हैद्राबादेतील 'हनुमान व्यायाम मंडळा'त बालपणापासून जाऊन व्यायाम, पोहणे, जिम्नॅस्टिक्स व बॉक्सिंग या खेळांमध्ये शालेय-महाविद्यालयीन जीवनात राष्ट्रीय स्तरावरचे यश व पुढे पोलीस पदाधिकारी असतानाही नेमबाजी, बिलियर्डस्, स्नूकर यांत मिळवलेले कौशल्य यांतून बाम यांचे अस्सल क्रीडाप्रेम दिसून येते. त्यांनी महाविद्यालयीन जीवनात वक्तृत्व स्पर्धाही गाजवल्या.

१९६३-१९६४ मध्ये त्यांनी पोलीस प्रशिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला यवतमाळ, वर्धा व बामगाव येथे त्यांनी पोलीस उपअधीक्षक म्हणून काम केले. मुंबई रेल्वे विभागातही त्यांनी पुन्हा यवतमाळसह नाशिक येथे काम केले. मुंबई पोलीस उपायुक्त म्हणून चांगली कामगिरी केली. १९८२ मध्ये भारतीय गुप्तहेर खात्यात निवड झाल्यानंतर त्यांनी 'परदेशी गुप्तहेरांच्या कारवायांवर नियंत्रण' या विषयावर प्रभुत्व मिळवले. परिणामी दिल्ली येथे त्यांची उपनिरीक्षक म्हणून महत्त्वाच्या पदी नियुक्ती करण्यात आली. पुढे परदेशी गुप्तहेरांच्या कारवाया रोखण्यासाठी त्यांना मुंबई येथे खास पदी नेमण्यात आले. मध्य प्रदेशात बढतीसह पोलीस महासंचालक पद (१९९०) आणि नंतर गुप्तवार्ता विभागात महाराष्ट्र, गुजरात व गोवा राज्यात सहसंचालक पद या पदांची जबाबदारी त्यांनी




**मध्यप्रदेश पोलीस महासंचालक भवन**

निवृत्तीपर्यंत उत्तमरीत्या सांभाळली. १९९६ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यांनी पोलीस खात्याचे ‘दक्षता’ मासिक संपादक या नात्याने उत्तम रीतीने चालवले. त्यांच्या लेखनामुळे, संपादनामुळे दक्षताच्या लोकप्रियतेत भर पडली. १९८२ च्या दक्षता दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या जोशी-अभ्यंकर खून खटल्यावरील त्यांच्या प्रदीर्घ लेखामुळे त्या अंकाचा विक्रमी खप झाला. दिवाळी अंकांतील निवडक लेखांचे संकलन असणाऱ्या ‘अक्षर दिवाळी’च्या अंकामध्येही या लेखाचा समावेश करण्यात आला.

राष्ट्रपती पोलीस पदक आणि भारतीय पोलीस पदक हे त्या क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार त्यांना लाभले. आजही स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत. ते पतंजल योगाचे, भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, योग प्रशिक्षक, क्रीडा प्रशिक्षक, मानसशास्त्रज्ञ, क्रीडा प्रशासक व संघटक आणि एक प्रेरणादायी लेखक म्हणून भारतात सुपरिचित आहेत. पतंजल योग, भारतीय तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासाच्या भक्कम पायावरच त्यांचे प्रशिक्षण, लेखन, समुपदेशन यशस्वीपणे उभे आहे. शारीरिक सक्षमतेबरोबरच मनोबल, मन:शक्ती, मन:स्थिती, मनाचे संतुलन, मानसिकता, मनोवस्था इत्यादी घटकांना महत्त्व देणारे क्रीडामानसतज्ज्ञ म्हणून ते ओळखले जातात. योगशास्त्र, भारतीय तत्त्वज्ञान, वेद-उपनिषदे आणि भगवद्‌गीतेचा अभ्यास आणि त्या ज्ञानाचा -माहितीचा यशस्वी अवलंब यांमुळे भीष्मराज बाम वेगळे ठरतात. सर्वच खेळांत परदेशी प्रशिक्षक नेमण्याची जणू स्पर्धाच लागलेल्या काळात त्यांची कामगिरी एक प्रेरणा निर्माण करते. सचिन तेंडुलकर, राहूल द्रविड, पी. गोपीचंद, अपर्णा पोपट, गीत सेठी, देवेंद्र जोशी, मायकेल फरेरा, जसपाल राणा, अंजली भागवत, सुमा शिरूर, गगन नारंग अशा विश्वविख्यात खेळाडूंना बाम यांनी मार्गदर्शन केले आहे. शिवाय - उद्योग व्यापार-वैद्यक-कला या क्षेत्रांतील होतकरूंना व प्रस्थापितांनाही ते मार्गदर्शन करतात. सामान्य कुटुंबातील खेळाडूंना, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही ते यशाचा मंत्र देतात. त्यांनी यासाठी पुरुषोत्तम अकादमी, नाशिक येथे योगविद्याधाम व पुण्यात स्पर्धा परीक्षा केंद्रे स्थापन केलेली आहेत.

मना सज्जना, विजयाचे मानसशास्त्र, मार्ग यशाचा ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. यांचे तामिळ व हिंदी भाषांतरही झाले आहे. विजयाचे मानसशास्त्र हे त्यांचे पुस्तक खेळाडूंसह प्रशिक्षकांनाही उपयुक्त आहे. एकाग्रता, शिस्त, ध्येयनिष्ठा, सातत्य, अचूक दिशा आदी गुण स्पष्ट करणारी सूत्रे बाम यांनी ‘मना सज्जना’ या पुस्तकाच्या माध्यमातून दिली आहेत.

महाराष्ट्र शासनाने एकूण क्रीडा धोरणासाठी बाम यांच्या नेतृत्वाखाली एक समिती २००६ मध्ये नेमली होती. २००८ मध्ये त्यांनी शासनाला अहवाल सादर केला. महाराष्ट्र रायफल संघटनेचे अध्यक्ष, भारतीय रायफल संघटनेचे उपाध्यक्ष ही पदे त्यांनी भूषवली. आज भारतीय नेमबाजांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक यश मिळत आहे, याच्या मुळाशी बाम यांचे प्रयत्न आहेत.

**- विनय मावळणकर**

## बूट, श्रीधर सदाशिव

**प्रधान वनसंरक्षक–महाराष्ट्र राज्य**

**२८ मे १९१८ – ९ जून १९९८**



श्रीधर उर्फ बाबा सदाशिव बूट यांचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव पार्वती होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण नागपूरजवळील बुटीबोरी येथे झाले. पुढील शिक्षण नागपूर शहरात झाले. वनस्पतीशास्त्र या विषयात ते नागपूर विद्यापीठातून प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी याच विषयात एम. एस्सी. ही पदव्युत्तर पदवीही प्राप्त केली. याच काळात श्रीधर बूट यांची योगायोगाने प्रसिद्ध साहित्यिक पु. भा. भावे यांच्याशी त्यांची कायमची मैत्री जुळली.

यानंतर १९४० मध्ये श्रीधर बूट यांनी भारतीय वन सेवा (इंडियन फॉरेस्ट सर्विस) ची परीक्षा दिली. त्यामध्ये त्यांची निवड झाल्यावर त्यांनी डेहराडूनला दोन वर्षे प्रशिक्षण घेतले. १९४२ मध्ये बूट यांची नेमणूक मध्य प्रदेशात जबलपूर जिल्ह्यातील ‘बरेली’ या वनग्रामी फॉरेस्ट रेंज चार्जचे प्रशिक्षण व अनुभव घेण्यासाठी झाली.

पुढे १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना झाल्यावर त्यांची महाराष्ट्राच्या जंगल खात्यात नियुक्ती झाली. १९५६ ते १९६३ ह्या कालावधीत त्यांनी जिल्हा वन अधिकारी व वन संरक्षक (कॉन्झरवेटर ऑफ फॉरेस्ट) या पदांवर चांदा येथे व पुढे सहा–सात वर्षे अमरावती येथे मेळघाटात वन अधिकारी म्हणून काम केले.

१९६३ मध्ये त्यांची महाराष्ट्र प्रदेशाचे प्रमुख वनसंरक्षक (चीफ कॉन्झरवेटर ऑफ फॉरेस्टस्) म्हणून नेमणूक झाली आणि १९७६ मध्ये ते याच पदावरून निवृत्त झाले. चंद्रपूर विभागात चंद्रपूर, अलापल्ली, गडचिरोली व सातपुडा पर्वतराजीमधील मेळघाट, चिखलदरा, धारणी, सीमाडोह, कोलखास येथे साग, साल, बांबू इ. इमारतींसाठी उपयुक्त वृक्षांची लागवड केलेली आहे. त्यावेळी प्रथमच भारतात मोठ्या प्रमाणावर वनविकास करण्यासाठी योजनाबद्ध असा वनविकास कार्यक्रम निरनिराळ्या प्रांतात आखला गेला होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विकास योजनेचे (फॉरेस्ट व–र्किंग प्लॅन प्रोजेक्टचे) आद्यप्रवर्तक श्रीधर बूट हे होते.

या योजनेचा प्रारंभ महाराष्ट्रात केला गेला आणि चंद्रपूर परिसरात उजाड माळरानात मैलोन्‌मैल साग, साल, बांबू इ. वृक्षांचे रोपण केले गेले. तसेच मेळघाटातील धारणी, सीमाडोह या विभागात साग, बाभूळ इ. वृक्षांचे रोपण व संवर्धन करण्यात आले. मेळघाट व चंद्रपूर या दोन्ही भागात साग, साल, बांबू व तत्सम महत्त्वाची वनराजी विकसित झाल्याने त्यातून उत्पन्न होणारे इमारती लाकूड व त्यावर आधारित कागद कारखाने व अन्य उद्योगधंदे यांची भरभराट झाली.

देशभरातील वनांचा विकास, वनआधारित उद्योग, त्यातून होणारा आर्थिक लाभ व सर्वांगीण वनविकासासाठी ‘वनविकास महामंडळ’ स्थापण्याच्या कल्पनेचे श्रेयही श्रीधर बूट यांना जाते. त्यांच्या कारकिर्दीत १९७० मध्ये ‘महाराष्ट्र वनविकास मंडळ’ स्थापन झाले.

भारत सरकार व महाराष्ट्र सरकारनेही इतर प्रगत देशातील वनविकासाचे निरीक्षण व अभ्यास करण्यासाठी त्यांना अनेक वेळा परदेशात पाठविले. जागतिक ‘एफएओ’ आणि ‘कोलंबो प्लॅन’ या संस्थांच्या आधिपत्याखाली विदेशात अभ्यास दौऱ्यावर भारताचा प्रतिनिधी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

जंगलविकासासाठी भरविलेल्या निरनिराळ्या सभा, समित्या व संमेलनांचे श्रीधर बूट यांनी अनेकदा अध्यक्ष–पद भूषविले. त्यांनी अनेक शोधनिबंध सादर केले. १९८१–८२ मध्ये महाराष्ट्रातील उजाड प्रदेशांचे

व ओसाड टेकड्यांचे वनीकरण करणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते.

श्रीधर बूट यांचे प्रशासकीय कार्य, वनविकासाचा अभ्यास, महाराष्ट्र राज्याची वनसमृद्धी व त्यावर आधारित उद्योगांची उन्नती व महाराष्ट्राला तसेच पर्यायाने देशाला मिळवून दिलेला महसुलाच्या रूपाने आर्थिक लाभ या सर्व कार्यासाठी भारतीय वन संस्था (सोसायटी ऑफ फॉरेस्टस्) यांच्या वतीने दि. ७ नोव्हेंबर १९९४ रोजी डेहराडून येथे त्यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. देशातील फक्त पाच लोकांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आलेला आहे.

प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरात सुंदर फुलझाडे लावून सुशोभीकरणाची कल्पना श्रीधर बूट यांची होती. येथील पर्यटनस्थानी 'प्रताप गार्डन' विकसित करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. श्रीधर बूट यांनी मेळघाट विभागात 'कोलखास' या ठिकाणी शिल्पा नदीसमोर मोठे आधुनिक विश्रामधाम बांधले. तसेच 'ताडोबा' अभयारण्यात पर्यटकांसाठी पंचतारांकित विश्रामगृह उभे केले. मुंबईत बोरिवलीतील 'उपवन' विकसित करण्यात श्रीधर बूट यांचा मोठा वाटा होता. तसेच तेथून जवळच तुलसी, विहार व पवई या तिन्ही सरोवरांच्या सानिध्यात अत्याधुनिक विश्रामधामसुद्धा बांधले.

सुंदर कलात्मक वस्तूंचा संग्रह करण्याचा तसेच फुले व फुलझाडांचा श्रीधर बूट यांना छंद होता. तसेच छायाचित्रे काढण्याची आवड होती. श्रीधर बूट यांचे पुणे मुक्कामी निधन झाले.

– आशा बापट

## बोंगिरवार, लक्ष्मण नारायण

**नियोजन सचिव – महाराष्ट्र राज्य,**
**पहिले कुलगुरू – पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ**
**२१ जुलै १९१७ – ३ जून १९७९**



लक्ष्मण नारायण बोंगिरवार यांचा जन्म विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातल्या वणी या गावी सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील प्राथमिक शाळेत शिक्षक होते आणि ते 'स्कूल इन्स्पेक्टर' म्हणून निवृत्त झाले. त्यांची आई शांतीबाई चौथी पर्यंत शिकलेली होती. ती आपल्या मुलांसोबतच गरीब व हुशार अशा दोन तरी विद्यार्थ्यांना कायम आपल्या घरी ठेवून घेत असे. त्यांचे मोठ्या आनंदाने संगोपन करीत असे. मुलांनी उच्च शिक्षण घेऊन सरकारी नोकरी करावी हे आई-वडिलांचे ध्येय होते.

लक्ष्मणरावांनी अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातून भौतिकशास्त्र विषयात एम.एस्सी.पदवी संपादन केली आणि पुढील शिक्षणाकरिता दक्षिणा शिष्यवृत्ती मिळवली. स्पर्धा परीक्षेमार्फत ते त्या वेळच्या मध्य प्रदेश सरकारच्या सेवेत अतिरिक्त साहाय्यक आयुक्त या पदावर १९४१ मध्ये रुजू झाले. त्यांचा सुरुवातीचा सेवाकाळ विदर्भ भागात बुलढाणा, रामटेक, गोंदिया व नागपूर येथे व्यतीत झाला. गोंदियाला ते अधिकारी (फूड ऑफिसर) म्हणून कार्यरत होते.

१९४८ मध्ये पोलीस कार्यवाहीद्वारे निजामाचे राज्य भारतात विलीन केल्यावर लक्ष्मणरावांची नेमणूक नागरी प्रशासक या पदावर हिंगोली येथे झाली. त्यांनी या भागाला देशाच्या यंत्रणेत सहभागी करून घेण्याची प्रशासकीय कामगिरी उत्तमरीत्या पार पाडली. स्वातंत्र्योत्तर काळात आय.सी.एस्. सेवेचे रूपांतर



पंजाबराव कृषि विद्यापीठ

आय.ए.एस.मध्ये केले गेले आणि या केडरच्या प्रथम तुकडीची निवड स्टेट सिव्हिल सर्व्हिसच्या अधिकाऱ्यांमधून मुलाखतीद्वारे करण्यात आली. यामध्ये लक्ष्मणरावांची निवड होऊन जिल्हाधिकारी म्हणून पहिली नेमणूक १९५० मध्ये सरगुजा म्हणजे सध्याच्या छत्तीसगढ राज्यात झाली. हे राज्य जंगल व उत्तम कोळशाच्या खाणींसाठी प्रसिद्ध आहे. मागासलेल्या आणि दुर्गम अशा या भागात पहिली जनगणना यशस्वीपणे पार पाडल्यामुळे लक्ष्मणरावांना राष्ट्रीय स्तरावर 'जनगणना पदक' देऊन गौरविण्यात आले. १९५२ मध्ये देशात कम्युनिटी डेव्हलपमेंट योजना नव्याने सुरू करण्यात आली. अमरावतीसह काही जिल्ह्यात ही योजना प्रायोगिक स्वरूपात सुरू करण्यात आली.

लक्ष्मणरावांची नेमणूक पहिला जिल्हा विकास अधिकारी म्हणून अमरावतीला करण्यात आली. एस.के.डे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे ते सदस्य होते. देशाचे पहिले कम्युनिटी डेव्हलपमेंट मॅन्युअल तयार करण्याचे श्रेय या समितीला आहे. १९५८ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर त्यांनी महाराष्ट्राच्या आय.ए.एस. केडर करता पसंती दिली आणि त्यानुसार त्यांची नेमणूक मंत्रालयात उपसचिव पदावर झाली. दोन वर्षांनी ते राज्याचे सहकार निबंधक म्हणून पुणे येथे नियुक्त झाले आणि पाच वर्षे तेथे राहिले.

सहकार चळवळीत कर्तव्यदक्ष, नियम पाळणाऱ्या, लोकाभिमुख प्रवृत्तीच्या या प्रशासकाचे योगदान मोठे आहे. सहकार खात्यात अनेक कार्यपद्धती त्यांनी ठरवून दिल्या. प्रत्येक जिल्ह्याला उपनिबंधक व तालुक्याला सहायक निबंधक देण्याची तरतूद केली. राज्यातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीचे ते साक्षीदार होते. खात्याचा प्रचंड विस्तार झाल्याने 'निबंधक' या त्यांच्या पदाचे रूपांतर 'आयुक्त' मध्ये झाले. औरंगाबाद येथे विभागीय आयुक्त म्हणून काम केल्यावर १९६० मध्ये मंत्रालयात त्यांची कृषी सचिव व कृषी आयुक्त पदी नियुक्ती झाली. एक अनुभवी, उत्साही, तत्पर प्रशासक म्हणून कृषी क्रांतीत त्यांचा मोठा वाटा होता.


१९६९ मध्ये अकोला येथे पहिले कृषी विद्यापीठ स्थापन होताच लक्ष्मणरावांना त्याचे कुलगुरूपद बहाल करण्यात आले. या विद्यापीठात त्यांनी प्रशासनास लोकहितासाठी नवीन यंत्रणा दिली. ही आव्हानात्मक कामगिरी लक्ष्मणरावांनी समर्थपणे पेलली म्हणूनच तिथला कालावधी संपल्यावर त्यांच्यावर मुंबईत नियोजन खात्याच्या सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्यामुळे अनेक गरजूंना रोजगार मिळाला आणि अनेक उत्पादक व जलसंवर्धनाची कामे झाली. नंतर त्यांनी जिल्ह्याविकास योजनेची रूपरेषा तयार केली. सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याने जिल्हा स्तरावर नियोजन होऊन स्थानीय नेत्यांना त्यात सहभागी होता आले. नवीन योजना, तिची उपयुक्तता, मांडणी, कार्यान्वयन इत्यादींचे ड्राफ्टिंग करण्यात लक्ष्मणरावांचा हातखंडा होता.

नियोजन सचिव या नात्याने एका सभेत भाग घेत असतानाच त्यांना पॅरॅलिसिसचा आजार होऊन सुमारे दोन आठवडे त्यांची वाचा गेली, उजवे अंग लुळे पडले. जबर इच्छाशक्ती व निर्धार यांमुळे तीन महिन्यात ते काठीच्या आधाराने चालू लागले व डाव्या हाताने लिहू लागले. त्यानंतर निवृत्त होईपर्यंत ते राज्य नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत होते.

**– अरुण बोंगिरवार**

ब

## ब्रॅण्डीस, डिट्रिच क्रिस्टीयन
## पहिले वनमहानिरीक्षक
## १ एप्रिल १८२४ – २८ मे १९०७



ब्रॅण्डीस यांचा जन्म जर्मनीतील बॉन या शहरात झाला. त्यांचे वडील क्रिस्टीयन ब्रॅण्डीस हे बॉन विद्यापीठामध्ये तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. ब्रॅण्डीस यांचे शिक्षण बॉन, कोपनहेगन, गॅाटीजेन या ठिकाणी झाले. त्यांनी पीएच.डी. संपादन केली. त्यानंतर त्यांनी बॉन विद्यापीठात वनस्पती शास्त्राचे व्याख्याता म्हणून काम केले.

१८५६ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनी सर ब्रॅण्डीस यांची निवड ब्रह्मदेशाच्या पेगू वनाच्या नियंत्रक पदी केली व वर्षभरातच त्यांच्या उत्तम कामामुळे त्यांच्याकडे संपूर्ण ब्रह्मदेशाच्या वनविभागाचा कार्यभार सोपविण्यात आला.

वनाच्या उत्पन्नाला अन्याय्य पद्धतीने लुबाडणाऱ्या ठेकेदारांना कडवा विरोध करीत सर ब्रॅण्डीस यांनी ब्रह्मदेशाच्या वनविकासाची योजना मांडली व अंमलात आणली. लिनियर व्हॅल्युएशन सर्वेक्षणाची कल्पना सर्वप्रथम सर ब्रॅण्डीस यांनी मांडली. या सर्व्हेच्या साहाय्याने मिळविलेल्या नोंदीवरून एकूण क्षेत्रातील उभ्या झाडांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेणे व त्यावरून दरवर्षी नियमित उत्पन्न मिळविणे शक्य होऊ लागले.

ब्रह्मदेशातील त्यांच्या कामगिरीवर खूष होऊन १८६२ मध्ये सर ब्रॅण्डीस यांना भारत सरकारच्या वनविषयक सल्लागारपदी निमंत्रित केले गेले. १८६४ मध्ये हिंदुस्थानचे पहिले ‘इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट’ होण्याचा त्यांना मान मिळाला. शास्त्रोक्त पद्धतीने वनांचे व्यवस्थापन आणि वनखात्याची संरचना तयार करण्याचे श्रेय सर ब्रॅण्डीस व त्यांचे सहकारी स्लीच आणि शिबनट्रप या तिघांकडे जाते. १८७८ मध्ये सरकारने त्यांना ‘कम्पॅनियन ऑफ इंडियन एम्परर’ हा सन्मानदर्शक किताब देऊन गौरविले.

१८६४ मध्ये इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट या पदाची धुरा सांभाळतानाच क्ले हॉर्न या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी वनसंरक्षणाच्या दृष्टीने १८६५ मध्ये पहिला फॉरेस्ट ॲक्ट (वनविषयक कायदा) अस्तित्वात आणला. १८७० पर्यंत सर ब्रॅण्डीस यांनी वनखात्याचा पाया रचला.

सर ब्रॅण्डीस हे केवळ उत्तम प्रशासक नव्हे तर ते उच्च प्रतीचे शास्त्रज्ञही होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत असंख्य संशोधनपर अहवाल व शोध निबंध लिहिले. १८७२ ते १८७४ या काळात त्यांनी ‘दी फॉरेस्ट फ्लोरा ऑफ नॉर्थवेस्ट अ‍ॅण्ड सेंट्रल इंडिया’ हे पुस्तक लिहिले. १८७५ मध्ये त्यांची ‘फेलो ऑफ रॉयल सोसायटी’ म्हणून निवड झाली. १८८३ पर्यंत जवळजवळ १९ वर्षे त्यांनी भारतीय वनखात्यात ‘इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट इंडिया’ या पदाची जबाबदारी सांभाळली. या कालावधीत केलेल्या कामाची पावती म्हणून १८७७ मध्ये सर ब्रॅण्डीस यांना ‘नाईट कमांडरशीप’ या सन्मानाने गौरविण्यात आले.

१८८३ मध्ये निवृत्त झाल्यावर ते कुपर्स हॉल या जगप्रसिद्ध वनविषयक प्रशिक्षण केंद्रात कार्यरत राहिले. १८८८ ते १८९६ या काळात त्यांनी हे काम केले. गेल्या १२५ वर्षांत भारतात वनसंबंधितांचा जो विकास झाला व आज जे काही वन अस्तित्वात आहे त्याचे श्रेय सर ब्रॅण्डीस यांच्या प्रयत्नांना जाते. खऱ्या अर्थाने वन खात्याचे ‘भीष्माचार्य’ हे संबोधन त्यांना लागू होते. बॉन येथे त्यांचे निधन झाले.

– आशा बापट

* * *

ब

# भ

## भडकमकर, आनंद वामन

**नियोजन सचिव, महाराष्ट्र राज्य**

**६ ऑगस्ट १९४२ - ३ डिसेंबर १९९३**



आनंद भडकमकर यांचा जन्म व शिक्षण नागपूर येथे झाले. नंतर शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारा त्यांनी सेनादलात प्रवेश केला व तेथील कार्यकाळ संपल्यानंतर भारतीय प्रशासन सेवेमध्ये (महाराष्ट्र केडर) प्रवेश केला. त्यांनी पुणे व नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुण्याचे जिल्हाधिकारी, मराठवाडा विकास महामंडळाचे व्यवस्थापक संचालक इ. पदांवर असताना लक्षणीय कार्यकौशल्य दाखविले. तसेच त्यांनी टेक्सकॉम व गोदावरी गारमेण्टस् इ. उप कंपन्यांची स्थापना करून मराठवाड्यात वस्त्रोद्योग रुजविण्याचे कार्य केले. महाराष्ट्र राज्याचे दिल्ली येथील विशेष आयुक्त, सिकॉमचे व्यवस्थापकीय संचालक, राज्याचे उद्योग आयुक्त व सचिव इ. पदांवर काम करताना राज्यात औद्योगिक गुंतवणूक आकृष्ट करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले व त्यात चांगले यश मिळवले. राज्याचे नियोजन सचिव पदावर कार्यरत असतानाच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे मुंबईत आकस्मिक निधन झाले. त्यांचे चाहते व मित्र परिवाराने ''कै.आनंद भडकमकर मेमोरियल ट्रस्ट' ही संस्था स्थापन केली असून या संस्थेच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक कार्य केले जात आहे.

– प्रभाकर करंदीकर

## भावे, चंद्रशेखर भास्करराव

**अध्यक्ष-सेबी**

**२८ ऑगस्ट १९५०**




चंद्रशेखर भास्करराव भावे यांचा जन्म नागपूर येथे झाला. तेथेच त्यांचे बालपण व्यतीत झाले. वडील रेल्वेत अधिकारी होते. चंद्रशेखर यांचे प्राथमिक शिक्षण नागपूरला येथे झाले. शाळेत त्यांचा कायम प्रथम क्रमांक येत असे. शालान्त परीक्षेत देखील ते बोर्डात प्रथम आले. त्यानंतर त्यांनी अभियांत्रिकी (विद्युत) शाखा निवडली. ही पदवीदेखील त्यांनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केली.

जबलपूरला अभियांत्रिकीचा अभ्यास करताना प्राध्यापक भटनागर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना पुढे कोण होणार असे विचारले होते. विद्यार्थ्यांनी त्याची वेगवेगळी उत्तरे दिली. चंद्रशेखर भावे मात्र अंतर्मुख झाले. त्याच क्षणी विचार करताना चंद्रशेखर भावे यांनी आपली आवड प्रशासकीय सेवेत आहे हे ओळखले आणि ते कठोर परिश्रम करून आय.ए.एस. झाले.

प्रारंभी त्यांनी नगरच्या पारनेर तालुक्यात प्रांताधिकारी म्हणून कार्य केले. नांदेड व नाशिक जिल्ह्यातही सेवा बजावली. नांदेडला अभूतपूर्व महापूर आला, तेव्हा नागरिकांना वेगाने सुरक्षित स्थळी हलविणे, त्यांची भोजनाची व्यवस्था करणे, त्यासाठी गुरुद्वारा व शहरातील व्यापारी वर्गाची मदत घेणे आदी

कार्य भावे यांनी केले. पण स्थानिक राजकारण्यांनी प्रशासन सुस्त आहे अशा तक्रारी केल्या. तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील पाहणीसाठी आले. दादांनी स्वत: पाहणी केली व परतताना एक सल्ला भावेंना दिला की, अशी कामे करताना स्थानिक पुढाऱ्यांचा समावेश करून घेऊन विविध समित्या स्थापन कराव्यात म्हणजे शासनाने काम करूनही वृथा ओरड होण्याचे टळते.



**मुंबई शेअर बाजार**

१९८५ मध्ये भावे पेट्रोलियम खात्यात उपसचिव झाले. तेव्हा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले होते. खनिज संशोधन व खोदकाम (एक्स्प्लोरेशन) क्षेत्रात विदेशी कंपन्यांना संधी देण्याचा निर्णय झाला. अमेरिकन, युरोपियन व ऑस्ट्रेलियन कंपन्यांची शिष्टमंडळे आली. त्यांच्याशी चर्चा करताना त्यांची शिस्त, स्वत:च्या अधिकारमर्यादांची पूर्ण कल्पना असणे, भरपूर गृहपाठ करणे, आपसातले मतभेद स्वतंत्र बैठक घेऊन सोडविण्याची हातोटी या गोष्टी भारतीय अधिकाऱ्यांनी आत्मसात करण्याची निकड जाणवली. भारतीय अधिकारी या गोष्टी हळूहळू शिकत गेले.

१९८९ मध्ये चंद्रशेखर भावे यांची महाराष्ट्र उद्योग खात्यात अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. त्या पदावर त्यांनी तीन वर्षे सेवा बजावली. १९९२ मध्ये त्यांना सिक्युरिटी अ‍ॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया 'सेबी'च्या अध्यक्षपदी प्रतिनियुक्तीवर जाण्याची संधी मिळाली. भावे यांनी 'सेबी'चे पद स्वीकारले. तेव्हा 'सेबी' कायदा नव्हता. १९९५ पर्यंत त्यांनी या प्रतिनियुक्ती पदावर काम केले.

दरम्यान 'डिपॉझिटरी' ही एक नवी कल्पना व संस्था आकार घेत होती. १९९५ साली त्या संदर्भातला वटहुकूम जारी झाला. भावे यांना याचे नेतृत्व करण्याबाबत विचारण्यात आले. त्यांनी विचार करून सनदी अधिकारी म्हणून राजीनामा देऊन डिपॉझिटरीची संधी टिपण्याचे ठरविले. ही संकल्पना भारतात नवीच होती. भावे हे मुळात अभियंता होते, त्यामुळे त्याचा उपयोग त्यांना हे काम करताना झाला. लोकांच्या मनांत या संदर्भात अनेक शंका होत्या; पण भावे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे काम संकल्पनेपासून कार्यवाहीपर्यंत यशस्वी करून दाखविले. सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे हित त्यामुळे अबाधित राहिले. डिपॉझिटरीतील यशानंतर भावे यांना पुन्हा सेबीचे अध्यक्षपद सांभाळण्याची संधी लाभली. २००८ ते २०११ अशा तीन वर्षांसाठी त्यांनी करार केला. या काळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या गोष्टी करून घेण्यात यश मिळवले. याच काळात त्यांनी 'मार्जिन' बाबतचा निर्णय घेतला. देशी-विदेशी गुंतवणूकदार कंपन्यांनादेखील मार्जिन भरणे आवश्यक केले. याबाबत अनेकांनी, विशेषत: विदेशी कंपन्यांनी संताप व्यक्त केला. मात्र, पुढे जेव्हा २००८ मध्येच जागतिक स्तरावर आर्थिक समस्या निर्माण झाली, तेव्हा तिचा भारताला त्रास झाला नाही याचे कारण हे 'मार्जिन'च ठरले. तेव्हा मात्र सर्वांनी 'मार्जिन'बाबत सेबीला (भावे यांना) धन्यवाद दिले.

२००८ मध्येच २६ नोव्हेंबरला मुंबईत अतिरेक्यांचा हल्ला झाला. तेव्हा शेअरबाजार कोसळणार असे वाटले होते; पण सेबीच्या नेतृत्वाखाली शेअरबाजार समर्थ होता. तो विचलित झाला नाही. भावे यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीतच शेअरबाजाराबाबत जनजागरणाचा यशस्वी प्रयत्न झाला. व्यवहार पूर्ण न करणाऱ्यांकडून दंडाची वसुलीदेखील याच काळात झाली. एकूणच भावे यांच्या कारकिर्दीत भारतीय

भ

शेअर बाजारांवरील नियंत्रण, त्यांचा विकास, त्यांच्याबाबत सर्वसामान्यांचे जनजागरण अशा नानाविध प्रकारे सेबीने वाटचाल केली. चंद्रशेखर भावे यांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्ता, अनंत परिश्रम, त्यातील सातत्य, कल्पकता व सहकाऱ्यांना बरोबर नेण्याची वृत्ती यांमुळे एक प्रशासक, एक सनदी अधिकारी म्हणून उत्तम यश मिळवले.

– अनिल शिंदे

## भावे, सदानंद विश्वंभर

**सचिव–जम्मू–काश्मीर राज्य**

**८ ऑक्टोबर १९४८**



आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत सर्वसामान्य माणसाची बाजू मांडणारे अधिकारी सदानंद विश्वंभर भावे हे मूळचे अकोल्याचे! विदर्भातील अकोला येथे एका कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. या काळात स्वतंत्र भारताची निर्मिती झाली होती. भावे यांचे वडील शिक्षण खात्यात कारकून होते. ते गांधीवादी विचारांचे होते.

भ

त्यांची आई एक खंबीर स्त्री होती. त्यांनी त्या काळात धाडसी पाऊल उचलत शेजाऱ्यांच्या मदतीने एक बालवाडी सुरू केली होती. आपल्या मुलांनी योग्य शिक्षण घ्यावे याकडे वडिलांचा कटाक्ष असे. शाळेच्या पहिल्या दोन इयत्ता त्यांनी आपल्या आईच्या मार्गदर्शनाखाली घरीच पार पाडल्या. तिसरीपासून ते नगरपालिकेच्या शाळेमध्ये दाखल झाले. शाळेतील वक्तृत्व स्पर्धांमध्येही ते भाग घेत.

त्यांची शैक्षणिक कारकीर्द उज्ज्वल होती. भौतिकशास्त्र या विषयात त्यांनी एम.एस्सी. केले. या परीक्षेत ते विद्यापीठात पहिले आले. शाळा आणि महाविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण वाढीस लागले. कोणतेही आव्हान स्वीकारण्याची मानसिक घडण याच काळात झाली.

भावे यांचे काका एस. व्ही. भावे हे १९४८ साली आय.ए.एस. झाले होते. भावे यांच्या जीवनावर काकांचा मोठा प्रभाव होता. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसण्याची प्रेरणा त्यांनीच भावे यांनी दिली. प्रशासकीय सेवेस सुरुवात करताना सर्वसामान्य माणसाच्या हिताचे धोरण ठरविणे, निर्णय घेणे हे उद्दिष्ट भावे यांच्या डोळ्यांसमोर होते. प्रशासकीय कारकिर्दीत लडाख, काश्मीर आणि जम्मूसारख्या संवेदनशील भागांत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. हा भाग सोडताना तो पूर्वीपेक्षा अधिक चांगला होईल, या दृष्टीने काम करण्याचा निश्चय त्यांनी केला होता. ‘कोणत्याही गोष्टीत सुधारणेसाठी वाव असतो’, असे ते म्हणतात.

आपल्या प्रशासकीय कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या भूमिका बजावल्या. जम्मू व काश्मीरचे मुख्य निवासी आयुक्त, पी.डब्ल्यू.डी.चे मुख्य सचिव, जम्मू व काश्मीरचे मुख्य निवडणूक अधिकारी, जम्मू व काश्मीरच्या पर्यटन विकास निगमचे व्यवस्थापकीय संचालक, कारगिल आणि कथुआचे जिल्हाधिकारी, अनंतनागचे साहाय्यक आयुक्त अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. जम्मू व काश्मीरचे १९९६ च्या सुमारास सचिव असताना त्यांनी लिंगनिदान चाचणी संदर्भात काही नियमावली बनवली. ती नंतर त्या राज्यात लागू करण्यात आली. याच वेळी त्यांनी जम्मूकाश्मीरमधील जमीन धारणा कायद्यात काही बदल करून तो देशाच्या इतर भागांबरोबर जुळवून आणला.

याच काळात त्यांनी विविध मंत्रालयांनाच सल्लागार म्हणूनही काम पाहिले. दहशतवादाने पोखरलेल्या जम्मू–काश्मीरमध्ये विकासकामांना चालना देण्यासाठी भावे यांनी अनेक कामांचे नियोजन केले व प्रत्यक्ष कामांवर देखरेखही केली.

केंद्र सरकारच्या अवजड उद्योग मंत्रालयातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मारुती उद्योग, भेल, स्कूटर इंडिया लिमिटेड, अवजड अभियांत्रिकी निगम (हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन) या देशातील प्रमुख उद्योगांच्या संचालक मंडळाचे ते सदस्य होते. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना सर्वसामान्य जनतेला उपकारक अशा भूमिका ते घेत असत. ३६ वर्षांच्या प्रशासकीय सेवेतून ते २००८ मध्ये निवृत्त झाले.

'न्यूक्लिअर' मॅग्नेटिक रेझोनन्स टेक्निक्सचे मॉलेक्युलर असोसिएशन या विषयावरील शोधनिबंधाचे त्यांनी सहलेखन केले. त्यानंतर त्यांनी देशाच्या विविध भागांत 'सॅनिटेशन'ला चालना देणाऱ्या 'फिनिश' या कंपनीत कार्यभार स्वीकारला. आपल्या सर्व यशाचे श्रेय आपले मार्गदर्शक आणि लोकांनी दिलेले आशीर्वाद यांच्याकडे जाते, असे ते कृतज्ञतेने म्हणतात.

– सुनिता लोहोकरे

## भिडे बाळकृष्ण त्र्यंबक


**विभागीय व्यवस्थापक – रेल्वे**
**संचालक – इंटिग्रल कोच फॅक्टरी चेन्नई**
**३० ऑक्टोबर १९३५**



प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक पदापर्यंत पोहोचलेले कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणजे बाळकृष्ण त्र्यंबक भिडे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातल्या पाले या गावी झाला. कुटुंबाचा व्यवसाय हा शेती होता. वडील त्र्यंबक हरी भिडे हे पोस्टात कार्यालय अधिक्षक (ऑफीस सुपरीटेंडंट) होते. आईचे नाव गंगाबाई होते. भिडे बारा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचे अकाली निधन झाले. घरची हलाखीची परिस्थिती शिक्षण घेण्यात अडचणी निर्माण झाल्या. परंतु परीक्षेत पहिला क्रमांक सतत मिळवत गेल्यामुळे मिळणाऱ्या बक्षिसांच्या रकमांतून त्यांना शिक्षणासाठी खर्च करणे सोपे गेले. त्यांची वक्तृत्वकलाही चांगलीच फुलली असल्यामुळे विविध बक्षिसे मिळवत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. भिडेंचा १९५१ साली शालान्त परीक्षेत ठाण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून ठाणे केंद्रात पहिला नंबर आला.

नंतर त्यांनी नारायण टोपीवाला महाविद्यालयात प्रवेश घेतला. परंतु ते महाविद्यालय बंद पडल्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी १९५२ साली पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात यावे लागले. १९५३ साली इंटरला ते फर्गसन महाविद्यालयातून ते विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला-विज्ञान शाखेतही गणितात प्रथम येण्याचे बक्षीस त्यांना मिळाले. १९५६ साली ते पुण्याच्या सी.ओ.ई.पी मधून बी.ई.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर डिसेंबर १९५६ मध्ये झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. ते संपूर्ण भारतातून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. परंतु त्यांच्यासमोर शारिरीक चाचणीचे संकट उभे राहिले. परंतु त्यांनी नियमित व्यायाम करून तब्येत सुधारली आणि १९५८ साली त्यांची रेल्वेत नियुक्ती झाली.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९६० साली पहिल्यांदा त्यांची इंटिग्रल कोच फॅक्टरी चेन्नई येथे नियुक्ती झाली. सहाय्यक कार्य व्यवस्थापक या पदावरून त्यांनी कारकीर्दिला सुरवात केली. त्यांचे सर्व अहवाल हे काटेकोर बिनचूक असत. काम वेळेत आणि अगदी व्यवस्थित होत असे. १९६७ साली भारतीय रेल्वेने १२ जणांचा एक गट अभ्यासासाठी जर्मनीला पाठवायचे ठरवले अणि त्यात भिडेंची निवड करण्यात आली. जर्मनीत अनेक ठिकाणी त्यांनी अभ्यास केला. नीट अभ्यास करता यावा यासाठी त्यांनी जर्मन भाषाही अवगत केली. १४ महिने अभ्यास करून भारतात परत आल्यानंतर त्यांनी जर्मनीतील तंत्रज्ञान भारतीय रेल्वेचे डबे बनवण्यात



इंटिग्रल कोच फॅक्टरी, चेन्नई

वापरण्याचा प्रयत्न केला. या वेळी नवीन निर्माण केलेल्या मीटर गेजच्या डब्यात एक मोठी समस्या उभी राहिली. त्या डब्यांची चाके अल्पावधीत झिजत असल्याचे दिसून आले. या प्रश्नाचा विचार करून ज्या चुकीच्या कार्यप्रणालीमुळे हे घडत होते. त्याचे मूळ शोधण्यात आले व निरनिराळ्या रेल्वेकडे जावून योग्य ती सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन केले. अशाप्रकारे एक मोठा प्रश्न सुटला.

याच काळात त्यांनी ''आयसीएफ मधील उत्पादन व पुनरावलोकनाची अवश्यकता'' हा निबंध लिहीला. याला 'रेल्वे मिनिस्टर्स ॲवॉर्ड ' मिळाले आणि १९७१ साली त्यांची 'ब्युरो ऑफ पब्लिक इंटरप्रायजेस'च्या संयुक्त संचालकपदी नेमणूक करण्यात आली. भिडे यांनी व्यवस्थापनविषयक भरपूर संशोधन करून वेगवेगळे निबंध व छोटी-मोठी पुस्तके लिहिली आहेत. देखभाल, इन्सेटिव्हज आदी विषयावर वेगवेगळे सुधारणात्मक कार्य केले.

भ

याच कालावधीत पश्चिम बंगालमधील कामगार संघटनांच्या भूमिकेमुळे व स्वार्थी व्यवस्थापनामुळे कोलकाता येथील इंडिया मशिनरी कंपनी डबघाईला आली होती. तिचे व्यवस्थापन केंद्र सरकारने आपल्या हातात घेतले व भिडे यांची त्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक केली. अशा परिस्थितीत भिडेंनी तब्बल तीन वर्षे या ठिकाणी पाय रोवून कार्य केले. पूर्णत: डबघाईला आलेल्या या कंपनीला भिडेंनी आर्थिक संकटातून बाहेर काढले. पश्चिम बंगालचे उद्योगमंत्री डॉ.कन्हाईलाल भट्टाचार्य यांनी त्यांचे काम पाहून त्यांना याच पदावर कायम राहण्याची विनंती केली. पण भिडे यांनी ती स्वीकारली नाही.

पुढे ते रेल्वे सेवेत परत आले नंतर पूर्व रेल्वे, दक्षिण रेल्वेत विभागीय व्यवस्थापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. नंतर १९९०च्या मे महिन्यात त्यांची नेमणूक चेन्नईच्या कोच फॅक्टरीत महाव्यवस्थापक म्हणून झाली. भिडेंनी याच ठिकाणी सर्वांत कनिष्ठ पदावरून आयुष्याची सुरुवात केली होती. त्याच ठिकाणी त्यांना सर्वोच्च पदावर बसण्याचा बहुमान मिळाला.

निवृत्तीनंतर त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी सल्लागार म्हणून काम केले. 'पॅलेस ऑन व्हिल्स' ही राजस्थानातील महत्त्वपूर्ण रेल्वे बनवण्याचेही महत्त्वाचे काम त्यांनी केले. रेल्वेत चौकशी अहवालासाठीही त्यांनी निवृत्तीनंतर महत्त्वाचं काम केले. सध्या ते पुण्यातच निवासाला असतात.

– दत्ता कानवटे

* * *

# म

## मराठे, शरद श्रीकांत

**उद्योग सचिव–महाराष्ट्र राज्य**

**अध्यक्ष – आय.डी.बी.आय.**

**१ ऑक्टोबर १९२२ – २२ सप्टेंबर २००८**



शरद श्रीकांत मराठे यांचा जन्म पुणे येथे झाला. नूतन मराठी विद्यालय पुणे येथे त्यांचे शालेय शिक्षण, तर सर परशुरामभाऊ महाविद्यालयात त्यांचे पुढील शिक्षण चालू असतानाच त्यांनी ‘छोडो भारत’ आंदोलनात भाग घेतला. याच आरोपावरून त्यांना जानेवारी १९४३ ते सप्टेंबर १९४३ या काळात तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर अर्धवट राहिलेले महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी पूर्ण केले.

रुईया महाविद्यालयात नोकरी करत असतानाच १९४७ मध्ये निवड चाचणीद्वारे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये त्यांना प्रवेश मिळाला. अर्थशास्त्र या विषयातील बी.एस्सी. पदवी प्राप्त केल्यानंतर एक वर्ष केंब्रिज विद्यापीठात त्यांनी ‘रिसर्च फेलो’ म्हणून काम केले. १९५१ ते १९५६ या कालावधीत फेडरेशन ऑफ कॉमर्स इंडस्ट्री या संघटनेत काही काळ काम केल्यानंतर त्यांनी इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसमध्ये त्यांनी प्रवेश मिळवला. त्यानंतर २४ वर्षे त्यांनी वित्तविभाग, वाणिज्य विभाग या विभागांत अर्थशास्त्रीय सल्लागार म्हणून काम केले. यानंतर वॉशिंग्टन येथील भारतीय दूतावासात त्यांची आर्थिक व्यवहार मंत्री या पदावर निवड करण्यात आली, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये भारताचे प्रतिनिधी अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली. त्यानंतर १९७२ मध्ये भारतात परतल्यानंतर ब्यूरो ऑफ इंडस्ट्रियल कॉस्ट्स अ‍ॅण्ड प्राइझेस या संस्थेचे अध्यक्ष–सचिव या समकक्ष पदावर त्यांची नेमणूक झाली. १९७० मध्ये उद्योग विभागाचे सचिव या पदावरून ते सेवानिवृत्त झाले.

सेवानिवृत्तीनंतर ग्रिंडलेज बँक, व्होल्टास, किर्लोस्कर, फिरोदिया, कल्याणी, फिनोलेक्स, शिर्के, लार्सन अ‍ॅण्ड टूब्रो यांसारख्या नामवंत उद्योगसमूहांच्या संचालक मंडळांवर मानद संचालक या नात्यांने त्यांनी काही काळ काम पाहिले. त्याचप्रमाणे पुणे स्टॉक एक्स्चेंज प्रथम अध्यक्ष, सिकॉमचे अध्यक्ष, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया वेस्टर्न रिजन संचालक मंडळाचे सदस्य, आयडीबीआय बँकेचे अध्यक्ष अशा जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी अर्थशास्त्र, सार्वजनिक वित्त आणि आंतरराष्ट्रीय अर्थसंबंध या विषयांचे त्यांना असलेले ज्ञान याचा फायदा अनेक शासकीय, आणि निमशासकीय संस्थांना झाला.

सिकॉमचे खाजगीकरण या प्रक्रियेत त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. याव्यतिरिक्त प्रिन्सिपल म्हणून नारळकर ट्रस्ट, आयुर्विद्यावर्धिनी ट्रस्ट इत्यादी शैक्षणिक तसेच सामाजिक संस्थांच्या कार्यांत त्यांचा मोलाचा वाटा होता. नॅशनल इन्श्युरन्स अकॅडमीच्या सी.डी. देशमुख व्याख्यान मालिकेतील दिलेली

म

'भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावरील त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे नावाजली गेली होती.

त्यांचे आत्मचरित्र 'रेमिनिसेन्सेस अ‍ॅण्ड रिफ्लेक्शन्स' या नावाने प्रसिद्ध झाले आहे.

– प्रभाकर करंदीकर

## मसलेकर, आनंद रामचंद्र

**मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य**

**२६ सप्टेंबर १९३६**



आनंद रामचंद्र मसलेकर यांचा जन्म अहमदनगर येथे झाला. त्यांचे वडील रामचंद्र मसलेकर हे हैद्राबाद येथे दिवाणी न्यायाधीश होते.

आनंद मसलेकर यांचे प्राथमिक शिक्षण अहमदनगर येथे झाले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते पुण्यात आले. १९५२ ते १९५७ या काळात त्यांनी पुण्यातील फर्गसन महाविद्यालयात बी.एस्सी.पर्यंतचे पदवी शिक्षण घेतले. याच कालावधीत त्यांनी हिंदी (प्रवीण) या विषयातील ज्ञान मिळविले. १९५७ मध्ये महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेत त्यांचा सहभाग होता. त्यानंतर १९५८ ते १९६१ या कालावधीत त्यांनी डेहराडून येथील 'इंडियन फॉरेस्ट महाविद्यालया'त पदव्युत्तर शिक्षण घेतले. येथे साठ जणांच्या बॅचमध्ये त्यांचा पाचवा क्रमांक आला. डॉ. मसलेकर 'बॉम्बे पब्लिक सर्व्हिस कमिशन'च्या निवड चाचणी परीक्षेत सर्वप्रथम आले.

म

१९६० मध्ये डॉ. मसलेकरांची पुणे येथे पहिली नियुक्ती झाली. १९६२ ते १९६३ या काळात त्यांनी जोधपूरच्या 'ए.झेड.आर.आय.' या संस्थेत चार महिन्यांचा 'एअर फोटो इंटरप्रिटेशन' या विषयाचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविला. तसेच १९६५ ते १९६६ मध्ये डेहराडून येथेदेखील 'इंडियन फोटो इंटरप्रिटेशन' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला. त्यानंतर 'आय.पी.आय' या संस्थेत 'इंटरनॅशनल ट्रेनिंग सेंटर फॉर अर्थ सायन्स' या विषयात त्यांनी एका वर्षाचा पदव्युत्तर प्रशिक्षण कोर्स केला. संपूर्ण वर्गात ते प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले होते.

पुढे १९६९ ते १९७१ या काळात नेदरलँड येथे जाऊन त्यांनी याच विषयात एम.एस्सी पदवी प्राप्त केली. या विषयात ही पदवी घेणारे मसलेकर हे पहिले वनाधिकारी होते. त्यानंतर जर्मनी, ऑस्ट्रिया या देशांत त्यांनी काम केले. १९८१ मध्ये 'बिझनेस मॅनेजमेंट अ‍ॅण्ड मार्केटिंग' या विषयात त्यांनी गुजरात विद्यापीठातून पी.एच.डी. केली. १९८९ मध्ये बंगळुरू येथील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स स्टडीज' येथून मसलेकर यांनी दहा आठवड्यांचा प्रशिक्षण कोर्स केला. त्यानंतर मद्रासच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट' या संस्थेचा 'ए.आय.बी.एम' हा पदव्युत्तर अभ्यासक्रमही त्यांनी पूर्ण केला.

१९८५ ते १९८७ या काळात केंद्र सरकारतर्फे 'बिझनेस मॅनेजमेंट' या विषयातील अभ्यासक्रम वनाधिकाऱ्यांसाठी अनिवार्य केला होता. डॉ. मसलेकर यांनी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान या राज्यात समन्वयक आणि अध्यापक म्हणून काम केले. त्यांनी पुणे, राजपिपला आणि जोधपूर येथे तीन अभ्यासक्रम सत्रे घेतली.

डॉ. मसलेकर यांनी विदर्भातील आठ जिल्ह्यांत कामे केली. नागपूर येथे त्यांनी साहाय्यक वनसंवर्धन अधिकारी म्हणून काम पाहिले. १९६३ मध्ये त्यांनी नरनाळा किल्ला पर्यटनासाठी विशेष योजना तयार केली. १९७२ ते १९७४ मध्ये डेहराडून येथे 'प्री-इन्व्हेस्टमेंट सर्व्हे ऑफ फॉरेस्ट' या संस्थेत त्यांनी 'एअर फोटो अँड मॅपिंग' या विषयावर काम पाहिले. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार आणि भूतान या प्रदेशांत मसलेकरांनी वनाधिकारी म्हणून काम केले. १९७३ मध्ये भारताच्या परदेश मंत्रालयातर्फे तीन वनाधिकाऱ्यांना भूतानमध्ये विशेषज्ञ म्हणून पाठविण्यात आले होते, त्यांत डॉ. मसलेकरदेखील

सभासद होते. या वेळी ‘वनसर्वेक्षण आणि भूतानची वनसंपदा’ या विषयावर त्यांनी अहवाल सादर केला.

१९७४ ते १९७६ मध्ये इथिओपियात त्यांनी ‘युएनडीपी-वर्ल्ड-फूड प्रोग्रॅम’ साठी वनतज्ज्ञ आणि प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले. तिथे वनीकरणाच्या २४ कामांची आखणी केली. खाद्यसामग्री आणि वितरणाची व्यवस्था केली. त्यांनी ‘अंगमेहनत आणि खाद्य’ यांची सांगड घालणारे परिमाण तयार केले. १९६८ ते १९६९ मध्ये ‘महाराष्ट्र वनविकास मंडळा’ची स्थापना केली. यात चार विभागवार रचनेनुसार पश्चिम चांदा विभागाचे पहिले उपसंचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जगातील पहिली ६० एकर क्षेत्रात असलेली सागवान नर्सरी मसलेकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील लोहारा येथे निर्माण केली.

१९७८ मध्ये अहमदाबाद येथील ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये त्यांची प्राध्यापक आणि कार्यक्रम समन्वयक म्हणून नेमणूक झाली. तेथील सात तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मदतीने ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेस्ट मॅनेजमेंट’ ही संस्था स्थापण्यात आली. येथे प्रशिक्षण कार्यक्रमांचे संपूर्ण काम डॉ. मसलेकरांनी पाहिले. नंतर पंतप्रधानांच्या आदेशानुसार ही संस्था भोपाळ येथे स्थापित झाली आणि वन-व्यवस्थापनात एक वेगळे पर्व सुरू झाले. याच काळात ‘गुजरात स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट’ या संस्थेत त्यांनी अध्यापन केले. गुजरात विद्यापीठात त्यांनी संशोधनोत्तर पी.एच.डी. पूर्ण केली.

१९८३ ते १९८५ दरम्यान चंद्रपूर येथे वनविकास महामंडळात प्रादेशिक व्यवस्थापक म्हणून ते नियुक्त झाले. डॉ. मसलेकरांच्या प्रामाणिक आणि झोकून देऊन काम करण्याच्या वृत्तीमुळे सर्वांमध्ये उत्साह निर्माण झाला. अलापल्ली विभागात जुन्या अयशस्वी रोपवनांना त्यांनी प्रयोगाद्वारे तरतरीत केले. लोहारा येथील हस्तकागद गिरणी चालू केली. कनारगाव (चंद्रपूर) आणि यामला (गडचिरोली) या ठिकाणी दोन वसाहतींतील एकूण १७० जुने येरवडा तुरुंगाचे कैदी होते, त्यांच्या समाजातील पुन:स्थापनेसाठी विशेष प्रयत्न केले. सर्व प्रदेशांत बिनतारी योजना कार्यान्वित केली. चांदा जिल्ह्याचे दोन जिल्हे झाले : चंद्रपूर आणि गडचिरोली; या जिल्ह्यांत प्रवेश केलेल्या नक्षलवादी चळवळीकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. या क्षेत्रात (एफ.डी.सी.एम.) ‘आगप्रतिबंधक’ योजना चालू केली.

डॉ. मसलेकरांनी आलापल्ली येथे आदिवासींसाठी सुतारकाम प्रशिक्षण सुरू केले, तज्ज्ञांच्या सल्ल्याने अनेक उत्पादने व विक्रीही सुरू केली. या दोन वर्षांत आदिवासी भागात डॉ. मसलेकरांनी लक्षणीय सुधारणा केल्या.

त्यांनी १९८७ मध्ये वनमंत्रालयात वनसहसचिव म्हणून काम पाहिले, त्यानंतर त्यांची वन आणि महसूल विभागांत नियुक्ती करण्यात आली. डॉ. मसलेकरांच्या पुढाकाराने वनविभागात संगणकाचा वापर करण्याची योजना अमलात आली. मसलेकरांच्या या कामगिरीबद्दल त्यांना पुढे सहसचिव म्हणून नियुक्त करण्यात आले.

१९८८ ते १९९१ मध्ये बंगळुरू येथे त्यांनी केंद्राचे पहिले प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक म्हणून काम पाहिले. यात आंध्रप्रदेश, कर्नाटक, गोवा, केरळ, तामीळनाडू आणि लक्षद्वीप या राज्यांत त्यांनी वनाधिकारी म्हणून काम पाहिले. याच काळात ‘सार्क’च्या वनसंशोधन तज्ज्ञांच्या बैठकीसाठी श्रीलंकेत भारताचे प्रतिनिधी म्हणून डॉ. मसलेकरांची निवड झाली. १९९१ मध्ये त्यांची महाराष्ट्राच्या सामाजिक वनीकरण संचालनालयात संचालक म्हणून नेमणूक झाली. १९९३ मध्ये डॉ. मसलेकरांची महाराष्ट्राचा मुख्य वनसंरक्षक म्हणून नेमणूक झाली.

१९६० मध्ये डॉ. आनंद मसलेकरांनी बॉम्बे फॉरेस्ट मॅन्युअलच्या कामासाठी एका वनसंरक्षकाची नेमणूक

म

केली. १९९३ आणि १९९४ साली 'इंटरनॅशनल फॉरेस्ट कॉन्फरन्स' झाली. यात राज्यातर्फे वनमंत्र्यांना पाठविले होते. नागपूर येथे १९८६ मध्ये वनविभागाचे मुख्यालय म्हणून 'वनभवन' इमारतीसाठी डॉ. मसलेकरांनी पाठपुरावा करून शासनाची मंजुरी घेतली.

१९९३ – ९४ मध्ये डॉ. मसलेकरांनी सई परांजपे दिग्दर्शित 'पपीटा' या चित्रपटासाठी केंद्र आणि राज्यशासनाकडून आर्थिक मदत मिळवून दिली. हा चित्रपट वने आणि आदिवासींवर आधारित होता.

डॉ. मसलेकरांनी 'फॉरेस्ट पॉकेट बुक' हे इंग्रजी पुस्तक लिहिले व वनव्यवस्थापनावर आधारित असलेल्या या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या काढल्या. त्यांचे अनेक शास्त्रोक्त लेख प्रसिद्ध झाले. त्यांचे 'जंगलची वाट' हे आत्मवृत्त १९९४ साली प्रसिद्ध झाले.

डॉ. मसलेकरांना उत्कृष्ट संशोधन लेखांबद्दल १९७२ साली 'सर डेट्रिच ब्रॅन्डीस' हे पारितोषिक मिळाले. १९८३ मध्ये टाटा रिसर्च फाउण्डेशन, पुणेतर्फे घेतलेल्या निबंध स्पर्धेत त्यांना दुसरे पारितोषिक मिळाले. १९९८ मध्ये केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्रालयाने त्यांना 'कार्य आयोजन सुधारणा समिती'चे अध्यक्ष केले. १९९४ मध्ये 'जंगलची वाट' या पुस्तकाला उत्कृष्ट आत्मवृत्ताबद्दल कै. हरी नारायण आपटे स्मृती पारितोषिक मिळाले. २००९ मध्ये सांगलीच्या शांतिनिकेतन लोकविद्यापीठातर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत मसलेकरांना प्रथम पारितोषिक मिळाले. डॉ. मसलेकर यांनी ड्रॉइंग ,पेंटिंग, यांसाठी अनेक पारितोषिके मिळवली होती. त्यांना नाटकात काम करायलादेखील आवडायचे. १९५५ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या 'यूथ फेस्टिव्हल'मध्ये पुणे विद्यापीठाच्या 'सतरा वर्षे' या नाटकाला त्यांनी प्रथम पारितोषिक मिळवून दिले होते.


– अनघा फासे

म

## मिरानी, नारायण विशनदास

**प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन**

**२३ ऑक्टोबर १९३३**



नारायण मिरानी हे मूळचे पाकिस्तानातील सिंध प्रांतातील. फाळणीनंतर ते मुंबईमध्ये स्थायिक झाले. १९५५ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठातून स्थापत्य अभियांत्रिकी(बी.ई.सिव्हील) या विषयात सुवर्णपदक मिळवून पदवी घेतली. १९५५ मध्ये त्यांनी महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेची परीक्षा दिली. ही परीक्षा ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.१९६२ ते ६८ या कालावधीत ते कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते.तर १९६८ ते ७६ या कालावधीत त्यांची नेमणूक वरिष्ठ अभियंता या पदावर करण्यात आली.१९७६ ते ८४ या कालावधीत मिरानी यांनी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता म्हणूनही जबाबदारी पार पाडली.

नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्यात वाहतूक जलद आणि सुलभ व्हावी या उद्देशाने करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बांधकाम प्रकल्पांच्या उभारणीमध्ये मिरानी यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यामध्ये ठाणे खाडीवरील पूल, बॉम्बे ट्रान्स हार्बर लिंक, बांद्रा-कुर्ला संकुल, इस्ट ॲण्ड वेस्ट आयलॅंड फ्री वे, मलबार हील बोगदा, कशेळी खाडीदरम्यानचा बोगदा, तसेच जागतिक बॅंकेच्या सहकार्याने महाराष्ट्रभर बांधण्यात आलेले रस्ते या सर्व बांधकाम प्रकल्पांचा समावेश आहे.

महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पांचा आराखडा तयार करणे, त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे या कामी मिरानी यांनी आपले अभियांत्रिकी आणि व्यवस्थापकीय

कौशल्य पणाला लावले. १९८२ ते १९८६ या कालावधीत ते महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाचे संचालक होते. याच कालवधीत त्यांनी बोर्ड ऑफ टेक्निकल एक्सामची जबाबदारीही सांभाळली, तर १९८४ ते १९८९ या कालावधीत मिरानी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य सचिव होते.

१९८९ मध्ये त्यांना भारतीय चरित्रकोश मंडळ ट्रस्टच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या चिन्मळगुंद विशेष प्रशासकीय तंत्रज्ञ पुरस्काराने गौरवण्यात आले.याच वर्षी ते इंडियन रोड काँग्रेसचे अध्यक्षही होते. सार्वजनिक बांधकाम विभागातील एकूण पस्तीस वर्षांच्या कारकिर्दीत मिरानी यांनी सार्वजनिक बांधकामासंबंधातील विविध समित्यांवर मार्गदर्शक म्हणूनही काम पाहिले. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाच्या मार्गदर्शक समितीचे ते सदस्य सचिव होते.जे.आर.डी.टाटा या समितीचे अध्यक्ष होते.


सहाव्या पंचवार्षिक योजनेतील केंद्र सरकारच्या राज्य रस्तेबांधकामाचा आराखडा तयार करणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते.तर आठव्या पंचवार्षिक योजनेच्या रस्ते आराखडा समितीचे सदस्य सचिव म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.महाराष्ट्र, गोवा, गुजरात, उत्तर प्रदेश या राज्यांतील सार्वजनिक बांधकामासंबंधातील महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी त्यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले.

इंडियन रोड काँग्रेसच्या जर्नल्समध्ये मिरानी यांचे चौपन्न संशोधन प्रकल्प सादर केले आहेत.यातील अनेक प्रबंधांना पुरस्कार प्रदान करण्यात आले असून विशेष प्रमाणपत्रेही मिळाली आहेत. १९८९ मध्ये मिरानी यांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्वोच्च पदी म्हणजेच प्रधान सचिव या पदावर करण्यात आली. याच पदावरून ते १९९१ मध्ये निवृत्त झाले.मिरानी यांना इंडियन कॉन्क्रीट इन्स्टीट्यूटच्या लाइफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड तसेच इन्स्टीट्यूट ऑफ इंजिनिअर्स या संस्थेच्या विशेष सेवा पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे.

निवृत्ती नंतरही मिरानी यांनी शासनाच्या विविध समित्यांवर सल्लागार म्हणून काम केले.बेंगलोर मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथोरीटीचे तांत्रिक सल्लागार म्हणून त्यांनी १९९१ ते ९५ या कालावधीत काम केले.याच काळात ते सिडकोचे संचालक देखील होते.मुंबईतील मल्टीप्लेक्स मधील आपत्कालीन नियंत्रण समितीच्या तज्ज्ञ समितीचे ते अध्यक्ष होते. मिरानी सध्या मुंबई( वरळी) येथे स्थायिक झाले आहेत.

– संध्या लिमये

## मिसर, भास्कर जगन्नाथ
**भारतीय पोलीस सेवा,**
**२३ एप्रिल १९३५**



कायद्याच्या चौकटीत राहून कायदे राबविताना त्यामध्ये लोकसहभाग करून घेण्याचे वेगवेगळे यशस्वी प्रयोग करणारा पोलिस अधिकारी अशी श्री. मिसर यांची थोडक्यात ओळख सांगता येईल. मिसर यांचा जन्म नाशिक येथे झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण पिंपळगाव व नाशिक येथे झाले. बी.ए. (अर्थशास्त्र) ही पदवी त्यांनी प्राप्त केली त्यानंतर पुणे येथील आयएलएस लॉ कॉलेज येथून १९६८ साली कायद्याची पदवी घेतली. कायद्याचा अभ्यास करीत असतानाच आय.पी.एस.साठी निवड झाली व त्यांची भारतीय पोलिस सेवेतील कारकीर्द सुरू झाली.

भारतीय पोलिस सेवेत असताना अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली. १९५८ला प्रशिक्षण घेऊन १९५९ साली ते प्रथम अमरावती येथे रूजू झाले. त्यानंतर १९६१ साली ते पुण्यात रूजू झाले. त्यानंतर १९६५

म

साली उपआयुक्त, तर १९९५ साली ते पोलिस आयुक्त झाले. १९८७ साली पुण्यातच महानिरीक्षक (गुन्हे अन्वेषण विभाग) या पदावर नियुक्ती झाली. त्यांच्या पुण्यातील कारकिर्दित पानशेतचा पूर, मंडईची गणपती दंगल, जनरल वैद्य यांचा खून हे महत्त्वाचे प्रसंग आले. सी.आय.एस.एफ.च्या स्थापनेपासून सात वर्षे ते कमांडर होते. नंतर ॲटोमिक कमिशनवर डायरेक्टर सिक्युरिटी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. निवृत्तीच्या शेवटच्या तीन वर्षात ते महाराष्ट्र सचिवालयात प्रधान सचिव होते. तेथेच पोलिस महोसंचालक पद त्यांना मिळाले.

सेवेत असताना त्यांना १९७५ साली विशेष सेवेसाठीचे भारतीय पोलीस पदक गुणवत्ता पदक व १९८५ साली विशिष्ट सेवा पदक व १९८५ साली विशिष्ट सेवा पदक हे सन्मान प्राप्त झाले.

त्यांच्या कारकिर्दितील विशेष उल्लेखनीय कार्याचा आढावा घ्यायचा झाल्यास पुढील गोष्टी नमूद करता येतील, धुळ्याला श्रमिक संघटनेकडून होणारा हिंसाचार रोखण्यासाठी प्रथमच सौम्य प्रतिबंधक कार्यवाहीचा उपयोग केला. तसेच पुण्याला आयुक्त असताना महिला संरक्षणासाठी कलम ११० (ग) भा.दं.प्र. विधानाचा वापर केला. मुक्तांगण व पोलिस सहकार्याने गर्दचा प्रचार रोखला. औरंगाबादला लाँग मार्चचे वेळी संभाव्य दंगली व दलितांवरील अत्याचार सौम्य मार्गाने टाळला. तसेच हिंदू व मुस्लिमांनी परस्परांचा जामिन दिला पाहिजे अशी योजना करून जातीय तणाव टाळला.

औरंगाबादचे डी.आय.जी. तसेच पुण्याचे पोलीस आयुक्त म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगावर निरीक्षक म्हणून त्यांनी काम केले.


'माहिती हक्क ही पोलिस यशाची गुरूकिल्ली' या पुस्तकाचे लेखन त्यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. पोलिसांना न्यायदंडाधिकाऱ्यांचे काही अधिकार मिळवून देण्याचा कायदा बनविण्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. इंटरनॅशनला लॉंगिटीव्हीटी सेंटरचे ते सदस्य आहेत. कायद्याची अंमलबजावणी अधिकाधिक लोकाभिमुख व्हावी, तसेच लोकसहभागाने गुन्हे नियंत्रण व सुकर न्यायदान व्हावे म्हणून निवृत्तीनंतरदेखील भास्कर मिसर आजही कार्यरत आहेत.

– संतोष शिंत्रे

## मुगवे, मधुकर गणपत

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य**

**३१ जानेवारी १९२०**



मधुकर गणपत मुगवे यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण विल्सन हायस्कूल, सेंट झेवियर्स हायस्कूल व एल्फिन्स्टन महाविद्यालयामध्ये पार पडले. १९४० मध्ये महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षाला असतानाच मधुकर व त्यांचे मोठे भाऊ दत्तात्रेय यांनी कलकत्ता (कोलकाता) येथे राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरीची स्पर्धा जिंकून नेत्रदीपक यश मिळवले होते.

मात्र इतिहास या विषयात पदवी घेतल्यानंतर १९४२ मध्ये मधुकर मुगवे तत्कालीन मुंबई प्रांताच्या पोलीस खात्यात दाखल झाले.

१९४७ सालच्या मे महिन्यापासून 'इंपीरियल पोलीस सर्व्हिस' या ब्रिटिश व्यवस्थेच्या जागी 'इंडियन पोलीस सर्व्हिस' ही नवी प्रणाली अस्तित्वात आली. मधुकर मुगवे यांना या नव्या प्रणालीत 'सुपरिन्टेंडंट ऑफ पोलीस' या पदावर बढती देऊन १९४२ च्या वरिष्ठतेसह सामावून घेण्यात आले.

त्यानंतर तत्कालीन मुंबई प्रांतातल्या (जो अहमदाबादपासून कारवारपर्यंत पसरलेला होता) सोलापूर, अलिबाग, मेहसाणा, सांगली, पुणे इत्यादी अनेक जिल्ह्यांमध्ये त्यांनी जिल्हा पोलीस प्रमुख म्हणजे डी.सी.पी. (डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेंडंट ऑफ पोलीस) म्हणून उत्तम कामगिरी बजावली.

१९५७ साली ते पुण्याचे जिल्हा पोलीस प्रमुख असताना संयुक्त महाराष्ट्र व गोवामुक्ती ही दोन्ही आंदोलने ऐन भरात होती. दोन्ही आंदोलनांचे मुख्य केंद्र पुणे हेच होते. केंद्र सरकार संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाकडे अनुदार दृष्टीने बघत असल्यामुळे आणि गोव्याचे पोर्तुगीज पोलीस मुक्ती आंदोलकांवर जबरदस्त दडपशाही करीत असल्यामुळे वातावरण अतिशय तंग होते. अशा स्थितीत मधुकर मुगवे यांनी कौशल्याने परिस्थिती हाताळून कायदा आणि सुव्यवस्था बिघडू दिली नाही.

मे १९५७ मध्ये 'डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस' (डी.आय.जी.) या पदावर बढती मिळून त्यांची राजकोट येथे बदली झाली. तिथे त्यांनी हुसेन कोडिया नावाच्या कुख्यात गुंडाला ठार मारून पोलीस खात्याची शान एकदम उंचावली. हुसेन कोडिया हा गुंड पाकिस्तानातून अवैध मार्गाने भारतात पळून आला होता. तो जुनागडच्या परिसरात राहत असे आणि त्याने एका फौजदाराला ठार मारले होते. मधुकर मुगवे आणि त्यांच्या पोलीस दलाने जामनगर-जुनागड-राजकोट परिसरातील डोंगराळ भागात हुसेन कोडियाचा पिच्छा पुरवून सर्व बाजूंनी त्याला कोंडले. पोलिसांच्या शरणागतीच्या आवाहनाला उत्तर म्हणून त्याने बारा बोअर बंदुकीतून पोलिसांवर गोळ्या झाडल्या. त्यामुळे त्याला गोळी घालून ठार करण्यात आले.

१९६० मध्ये पोलीस अतिरिक्त उपप्रमुख (ॲडिशनल डी.आय.जी.) म्हणून मुगवे परत मुंबईला आले. १९६५ साली नागपूर येथे पोलीस आयुक्त (कमिशनर ऑफ पोलीस-सी.पी.) हे नवे पद निर्माण होऊन मधुकर मुगवे यांची तिथे नेमणूक झाली.

१९६६ मध्ये पुन्हा ते मुंबईत सी.आय.डी. खात्याचे डी.आय.जी. इंटेलिजन्स या पदावर आले. ते १९७३ पर्यंत म्हणजे सात वर्षे तिथे होते. या अत्यंत महत्त्वाच्या पदावर इतका दीर्घकाळ टिकलेले ते पहिलेच अधिकारी होत.

१९७३ ते १९७५ या काळात ते मुंबईचे पोलीस आयुक्त झाले. १९७५ ते १९७७ या कालखंडात महाराष्ट्र राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंध खात्याचे संचालक म्हणून काम केल्यावर, कारकिर्दीच्या अखेरीस ते इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस (आय.जी.पी.) या राज्यातील त्या वेळच्या सर्वोच्च पदावर विराजमान होऊन १९७८ मध्ये निवृत्त झाले.

– दीपक राव

## मेन्डोन्सा, रोनाल्ड हॅसिंथ

***रॉनी मेन्डोन्सा***

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य**

**११ सप्टेंबर १९४१**



रोनाल्ड हॅसिंथ मेन्डोन्सा उपाख्य रॉनी मेन्डोन्सा यांचा जन्म कर्नाटकात झाला. एका ख्रिश्चन घराण्यात त्यांचा जन्म झाला असला तरी त्यांना त्यांच्या मातृभाषेबरोबरच मराठीही उत्तम बोलता येते. कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यातील कालियनपूर येथे त्यांचे शालेय शिक्षण पार पडले.

मुंबईच्या रामनारायण रुईया महाविद्यालयातून त्यांनी प्राणिशास्त्रात बी.एस्सी.ची पदवी प्रथम क्रमांकाने

मिळवली. शांताराम दाभोळकर हे पारितोषिकही त्यांनी मिळवले. १९६६ मध्ये त्यांनी एम.एस्सी.ची पदवी मिळवली. त्याच वर्षी भारतीय पोलीस सेवेतही त्यांची निवड झाली. त्यांना ठाणे येथे त्यानंतर वर्षभराचे प्रशिक्षण मिळाले. पोलीस सेवेत दाखल झाल्यानंतर त्यांना त्यांची पहिली नियुक्ती अहमदनगर येथे मिळाली.

अहमदनगर जिल्ह्याचे सहअधीक्षक म्हणून पोलीस सेवेत दाखल झाल्यावर त्यानंतर त्यांनी नागपूर जिल्ह्याचे ग्रामीण अधीक्षक, तर यवतमाळ, मुंबई, सातारा, नाशिक, ठाणे ग्रामीण आणि मुंबई जिल्ह्याचे अधीक्षक म्हणूनही काम पाहिले. त्यानंतर मुंबई व नागपूरचे अतिरिक्त आयुक्त, ‘रॉ’ विभागाचे डेप्युटी सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी काम केले. काही काळ ठाणे जिल्ह्याचे पोलीस आयुक्त म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

प्रत्येक नियुक्तीच्या वेळी पोलीस खात्यात काही नवीन करता येईल का, पोलिसांच्या दैनंदिन कामात काय बदल करता येऊ शकतील, याचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी नेहमीच केला.

पुण्याच्या गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस महासंचालक म्हणून आणि मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणून काम करताना गुन्हे शाखेचे प्रश्न, सायबर क्राइम यांसारखे प्रश्न सोडविण्यावर त्यांनी भर दिला. मोक्का (महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाइझ्ड क्राइम ॲक्ट) राबवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

म

त्यांच्या विशेष व महत्त्वपूर्ण सेवेसाठी त्यांना भारतीय पोलीस पदक व राष्ट्रपती पोलीस पदकाने गौरविण्यात आले आहे. १९९८ मध्ये नेदरलँड येथे झालेल्या इंटरनॅशनल पोलीस वीक परिषदेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्वही केले आहे.

महाराष्ट्राच्या पोलीस दलाचे महासंचालक या पदावरून ते ३० सप्टेंबर २००१ रोजी निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही त्यांनी स्वत:ला सामाजिक संस्थांशी जोडून घेतले आहे. मोहल्ला कमिटी मूव्हमेंट ट्रस्टचे ते विश्वस्त आहेत. तसेच सरकारी कामकाजात पारदर्शकता, प्रामाणिकपणा यावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्टचेही ते विश्वस्त आहेत.

– वर्षा फडके-आंधळे

## मेढेकर, कृष्णनाथ पांडुरंग

**अतिरिक्त संचालक – गुप्तवार्ता विभाग**
**पोलीस महासंचालक – महाराष्ट्र राज्य**
**१ फेब्रुवारी १९२७**



स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पोलीस प्रशासनाची घडी बसवणाऱ्या काही निवडक आय.पी.एस. अधिकाऱ्यांतीलच एक महत्त्वाचे नाव म्हणजे कृष्णनाथ पांडुरंग मेढेकर. बुद्धिमान व अभ्यासू विद्यार्थी म्हणून कृष्णनाथ यांची वाटचाल सुरू होती. जीवशास्त्रात त्यांनी विशेष श्रेणी (विज्ञान शाखा-पदवी) मिळवली होती. सागरी जीवशास्त्र या विषयाचा विशेष अभ्यास करून त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी व जर्मन या भाषांवरही प्रभुत्व मिळवले होते. मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात ते काही काळ प्राध्यापक होते, तसेच त्यांचा पीएच.डी.चा अभ्यासही सुरू होता. पण १९४९ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये मेढेकर यांनी सुयश प्राप्त केल्यानंतर ते भारतीय पोलीस सेवेमध्ये दाखल झाले. १९४९ ते १९८५ अशी सुमारे ३६ वर्षे त्यांनी पोलीस प्रशासनाद्वारे आपली सेवा रुजू केली.

पोलीस प्रशासनातील प्रदीर्घ सेवेत मेढेकर यांनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पदांवर कार्य केले. एक कर्तव्यदक्ष व जबाबदार पोलीस अधिकारी या भूमिकेबरोबरच संरक्षणतज्ज्ञ, पर्यावरणप्रेमी, कुशल खेळाडू, गिर्यारोहक, लेखक व एक अनुभवी प्रशासक या त्यांच्या भूमिकाही



तेवढ्याच समाजोपयोगी ठरल्या आहेत.

मेढेकर यांनी १९८२ ते १९८५ या काळात महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक म्हणून जबाबदारी पार पाडली. १९४७ पासून पाहता मेढेकर हे राज्याचे १५ वे महासंचालक होत. त्यांची वाटचाल प्रामुख्याने गुप्तवार्ता विभागातून झाली. इंटेलिजन्स ब्युरो (आय.बी.) चे अतिरिक्त संचालक, अँटिकरप्शन अँड प्रोहिबिशन इंटेलिजन्स खात्याचे संचालक व आय.बी. चे सहसंचालक या भूमिकाही त्यांनी बजावल्या. मुंबई शहराचे पोलीस आयुक्त (१९८१) म्हणूनही त्यांची कारकीर्द लक्षणीय ठरते. ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ४ वर्षे सदस्यही होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीआधी त्यांनी तत्कालीन मुंबई प्रांतामध्ये व नाशिक, पुणे, कोल्हापूर व विजापूर या जिल्ह्यांमध्ये साहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. १९५५ दरम्यान त्यांनी मुंबईत उपआयुक्त म्हणून काम केले. त्या काळातील भाषावार प्रांतरचना, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या संदर्भातील प्रक्षोभ व ताणतणाव मेढेकर यांनी कुशलतेने हाताळले. त्यांनी भारत सरकारच्या वतीने भूतानच्या राजांचे (राष्ट्र प्रमुखांचे) पोलीस सल्लागार म्हणूनही जबाबदारी सांभाळली. भारताचे राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे वैयक्तिक सुरक्षा सल्लागार ही जोखमीची भूमिकाही त्यांनी काही काळ पार पाडली.

ऊर्जा निर्मिती केंद्रे, मोठे उद्योगसमूह, मोठी धरणे, दूरसंचार केंद्रे आणि संसद-विधानसभा या वास्तू इत्यादी महत्त्वाचे घटक ही राष्ट्राची मर्मस्थळे असतात, ही गोष्ट ध्यानात घेऊन या घटकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी विशेष योजना आखल्या होत्या. 'आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीतील सुरक्षा' हाही त्यांच्या अभ्यासाचा व आवडीचा विषय होय. या बाबतच्या आंतरराष्ट्रीय संशोधन समितीमध्ये त्यांनी आपले योगदान दिले.

सुरक्षाविषयक अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादांमध्ये ते सहभागी झाले. १९७७ मध्ये घाना या देशाची राजधानी आकरा येथे झालेल्या इंटरपोलच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील त्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता.

मेढेकर यांना कार्यक्षम सेवेबद्दल पोलीस पदक, दोन वेळा सेवापदक व वैशिष्ट्यपूर्ण सेवेबद्दल सर्वोच्च असे राष्ट्रपती पदक असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले. पोलीस पदाधिकारी म्हणून विविध ठिकाणी, अनेक स्तरांवर काम करताना मेढेकर यांनी आपल्या आवडी-निवडी जोपासल्या. ते अनेक वर्षे पोलीस क्रिकेट संघाचे कर्णधार होते. ईशान्य भारतातील नेमणुकीच्या काळात त्यांनी गिर्यारोहणाचा अभ्यास व सराव केला. याच काळात त्यांनी हिमालयातील वनस्पती व प्राणिजीवन आणि तेथील आदिवासी जमातींचे जीवन यांचाही सखोल अभ्यास केला.

निवृत्तीनंतरही (१९८५ नंतर) मेढेकर विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. दादरची 'शारदाश्रम शाळा' व 'आदर्श शिक्षण संस्था' या शैक्षणिक संस्थांचे ते अनुक्रमे उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. आदर्श शिक्षणसंस्था ही आदिवासी व झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कामे करणारी संस्था आहे. 'युनायटेड वर्ल्ड कॉलेजेस' या आंतरराष्ट्रीय संस्थेचे ते मानद सदस्य आहेत.

कृष्णनाथ मेढेकर सध्या मुंबईतील खेरवाडी सोशल वेल्फेअर असोसिएशनचे विश्वस्त म्हणून कार्यरत आहेत. महत्त्वाचे म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेशी संलग्न दिल्ली येथील 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी अँड सेफ्टी मॅनेजमेंट' या संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. तसेच 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन' (लोकप्रशासन) या संस्थेचेही ते कार्यकारी सदस्य आहेत.

त्यांचे व्यक्तिगत ग्रंथालय समृद्ध असून त्यांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये लिखाण केले आहे. दोन कादंबऱ्या व सुमारे १२५ लघुकथा अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. त्यांचे आत्मचरित्र 'वृत्तमानस' या वृत्तपत्राने क्रमश: प्रसिद्ध केले होते.

– विनय वसंत मावळणकर

## मेहेंदळे, लीना

**अतिरिक्त मुख्य सचिव – महाराष्ट्र राज्य**
**सचिव–सामान्य प्रशासन विभाग**
**३१ जानेवारी १९५०**



लीना मेहेंदळे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे झाला. त्यांच्या आईचे नाव नीला असे होते. बिहार राज्यातील दभर्का या जिल्ह्याच्या ठिकाणी त्यांचे वडील डॉ.बलराम सदाशिव अग्निहोत्री हे मिथिला संस्कृत संशोधन संस्थेमधे तत्त्वज्ञान आणि संस्कृत या विषयांचे प्राध्यापक होते.

त्यांनी अर्थशास्त्र या विषयात नागपूरच्या एस.एन.डी.टी.महाविद्यालयातून पदवी संपादन केली. नंतर १९७० साली त्यांनी पटना विद्यापीठातून भौतिकशास्त्र या विषयात एम.एस्सी.ची पदवी संपादन केली. १९८९ साली त्यांनी इंग्लंडमधील ब्रॅडफोर्ड विद्यापीठातून 'प्रकल्प नियोजन' या विषयात एम.एस्सी. पूर्ण केले. १९७४ साली भारतीय प्रशासकीय सेवेची परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या आणि त्यांना महाराष्ट्र कॅडर मिळाले.

महसूल, प्रशासन, प्रशासकीय कायद्याची अंमलबजावणी, विकास प्रशासन, औद्योगिक विकास, प्रशिक्षण आणि मनुष्यबळ विकास, कार्यालयीन कामकाजात संगणक व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अशा प्रशासनाच्या सर्वच क्षेत्रातील विषय त्यांनी

[redacted]
राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान
NATIONAL INSTITUTE OF NATUROPATHY

कौशल्याने हाताळले आहेत. सांगली महानगर पालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगलीच्या जिल्हाधिकारी, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ पुण्याच्या अध्यक्षा अशा विविध महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले.सांगली जिल्ह्यातील जत या तालुक्यात देवदासींची अनिष्ट प्रथा पाळली जात असे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळेच समाजातील वाईट लोकांकडून देवदासींचे शोषण केले जाते, हे लीना मेहेंदळे यांच्या लक्षात आले. त्यांनी देवदासींना व्यवसाय प्रशिक्षण देऊन सक्षम करण्याचा अभिनव उपक्रम अवलंबला. सांगलीच्या जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी एकात्मिक ग्रामविकास योजनेअंतर्गत देवदासींच्या आर्थिक पुनर्वसनाचे काम केले.

या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाचा कालावधी खूपच कमी होता. मेहेंदळे यांनी हा कालावधी वाढवून घेतला. जत तालुक्यातील सरकारी जमिनीवर देवदासींसाठी घरे बांधून देण्यात आली. त्यांच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले. देवदासींना यंत्रावर लोकरीचे विणकाम, लोकरीच्या कपड्याचे पॅकींग, मार्केटींग या सर्व गोष्टी शिकवण्यात आल्या. देवदासींनी तयार केलेल्या लोकरीच्या उत्पादनांना पश्चिम महाराष्ट्र विकास मंडळाच्या मार्फत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. सरकारमार्फत विविध ठिकाणी भरवण्यात येणाऱ्या विक्रीमेळ्यांमध्ये या वस्तूंची विक्री होऊ लागली. लांबच्या गावातून प्रशिक्षणासाठी येणाऱ्या देवदासींना सायकली उपलब्ध करून देण्यात आल्या व या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास जागवण्याच्या कामी लीना मेहेंदळे यांनी पुढाकार

घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून सरासरी २८ ते ४० वयोगटातील १५० महिलांचे आर्थिक पुनर्वसन करण्यात आले.

'पेट्रोलियम कॉन्झर्वेशन रिसर्च असोसिएशन'मध्ये संचालक पदावर काम करत असताना, ऊर्जा बचतीसंदर्भात जनजागृती निर्माण व्हावी यासाठी आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून प्रसारित केल्या जाणाऱ्या साप्ताहिक मालिकांसाठी मार्गदर्शनाचे काम मेहेंदळे यांनी केले. एनर्जी ऑडिट विभागाची पुनर्रचना करून बायोडिझेल मंत्रालयासाठी नवीन योजना व कार्यक्रमांची आखणी केली. राष्ट्रीय महिला आयोगाच्या जॉईंट सेक्रेटरी या पदावर असताना लीना मेहेंदळे यांनी महाराष्ट्र, बिहार आणि राज्यस्थान या राज्यांमध्ये महिलांविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांचा अभ्यास केला आणि हिंदी वृत्तपत्रामध्ये महिलांसाठी कायद्याचे मार्गदर्शन करणारे साप्ताहिक सदर चालवले. महिलांना न्याय मिळावा यासाठी महिलाविषयक कायद्यांमध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्या. संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये 'द कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट वुमेन' (सीइडीएडब्ल्यू) या विषयावर झालेल्या परिषदेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.

जमाबंदी आयुक्त आणि नाशिकच्या जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत असताना लीना मेहेंदळे यांनी कार्यालयांचे संगणकीकरण घडवून आणले. तसेच जमिनींचे नकाशे, जमिनी संदर्भातील कागदपत्रांचे तपशील यांचे देखील संगणकीकरण करण्यात आले. त्याचबरोबर त्यांनी कार्यालयीन कामकाजाची सोपी पद्धत अंमलात आणून कामाला एक नवी दिशा दिली.

पुणे येथे १९८६ साली स्थापन झालेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी'चे देशव्यापी नेटवर्क त्यांनी तयार केले तसेच आरोग्य मंत्रालयासाठी अनेक योजनाही तयार केल्या.

अतिरिक्त मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग या पदावरून त्या निवृत्त झाल्या. त्या सतत नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत आणि सोबतच्या कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षित करत. त्यांनी संगणक वापरासंबंधीच्या महत्त्वाच्या बाबी विशद करणारे 'संगणकाची जादुई दुनिया' या पुस्तकाचे लेखन केले आहे. चालू घडामोडींबरोबरच शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, बालवाङ्मय, संगणक, कायदा, लोकप्रशासन अशा विविध विषयांवर त्यांचे ५०० लेख आणि २३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. लोकप्रशासनातील अनुभवांवर त्यांनी लिहिलेली 'समाजमनाची बिंबे' आणि 'इथे विचारांना वाव आहे' ही पुस्तके समाजातील समस्यांकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाचकाला देतात तर प्रशासकीय सेवेत आपले भविष्य घडवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रशासकीय सेवेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन देतात. इंटरनेटवरील मराठी भाषेच्या वापराबाबत त्या विशेष आग्रही असून संगणकावरील भारतीय भाषा वापरण्यासाठीच्या सॉफ्टवेअरचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे. सध्या लीना मेहेंदळे या केंद्रीय प्रशासन लवादाच्या सदस्या म्हणून बंगलोर येथे कार्यरत आहेत.

– संध्या लिमये

## मोडक, इमॅन्युएल सुमित्र

**पोलीस महासंचालक – महाराष्ट्र राज्य**

**२५ मार्च १९२० – २९ एप्रिल २०१०**

इमॅन्युएल मोडक यांचा जन्म सातारा येथे झाला. पुणे येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. मुंबईतील महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्राची पदव्युत्तर पदवी घेतली. त्याच काळात ते ब्रिटिश इंडियन पोलीस परीक्षा उत्तीर्ण झाले आणि १९४२ मध्ये सातारा येथे ते साहाय्यक पोलीस अधीक्षक या पदावर रुजू झाले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाचा तो काळ होता. साताऱ्यात त्यावेळी स्वातंत्र्यसैनिकांनी पत्री सरकार स्थापन केले होते. सरकारी काम ठप्प करण्यासाठी सशस्त्र आंदालन करण्यात येई. त्या

म



काळातील परिस्थिती मोडक यांनी अत्यंत कौशल्याने हाताळली. प्रसंगी वसंतदादा पाटील यांना त्यांनी अटकही केली होती. पण, तरीही 'आपले कर्तव्य बजावणारे मोडक' म्हणून या नेत्यांशी त्यांचे संबंध सलोख्याचेच राहिले. १९४३ मध्ये किरण सेनगुप्त या बंगाली युवतीशी त्यांचा विवाह झाला.

साताऱ्यानंतर विजापूर, अहमदाबादजवळील खेडा, कोल्हापूर, सोलापूर नंतर मुंबई येथे त्यांनी पोलीस उपायुक्तपदी काम केले. त्यानंतर लाचलुचपत विभागाच्या उपमहासंचालकपदी त्यांना बढती मिळाली. पुणे शहरात पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर १९६५ मध्ये पुण्याचे पहिले पोलीस आयुक्त होण्याचा मान त्यांना मिळाला.

१९६६ मध्ये जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती हाताळण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मोडक यांचे नाव सुचवले. जम्मू-काश्मीरच्या पोलीस संचालकपदी त्यांची नियुक्ती झाली. या पदावर उत्कृष्ट काम करून मोडक यांनी त्यांची निवड योग्य ठरवली.

१९७६ मध्ये महाराष्ट्राचे पोलीस महासंचालकपदावर त्यांची नेमणूक झाली. या पदावरूनच ते १९७८ मध्ये निवृत्त झाले. पोलीस सेवा पदकाने त्यांचा गौरव करण्यात आला. तरुण वयात पोलीस पदक मिळवणारे आजपर्यंतचे ते एकमेव पोलीस अधिकारी आहेत. प्रामाणिक, हुशार, आणि कडक शिस्तीचे म्हणून ते प्रसिद्ध होते.

मोडक यांच्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तसेच त्यांच्या काही कथाही प्रसिद्ध झालेल्या आहेत. सेंटिनेल ऑफ सह्याद्री-मेमरीज ॲण्ड रिफ्लेक्शन्स या पुस्तकाचे लेखनही त्यांनी केलेले आहे. साताऱ्यातील पत्री सरकार, १९६९ मधील शिवसेनेची आंदोलने, काश्मीरमध्ये ते कार्यरत असतानाची परिस्थिती अशा अनेक विषयांचा उहापोह त्यांनी या पुस्तकात केला आहे. पुणे येथील गणेश उत्सवाच्या काळातील दंगल हाताळताना गृहमंत्री बाळासाहेब देसाई आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी दिलेले आदेश, त्यातून प्रत्यक्ष घडलेल्या घटना यांचं नाट्यमय वर्णनही त्यांनी या पुस्तकातून केलेले आहे. दंगल कशी हाताळायची, पोलीस दल कसे वापरायचे याबाबत मार्गदर्शक पुस्तिका त्यांनी तयार केली होती. जातीय दंगली होऊ नयेत यासाठी काय करायला हवे याबाबतचे आपले मतही ते अनेकदा स्पष्टपणे मांडत.

त्यांचे वाचन अफाट होते. धावपळीच्या कामातून वेळ काढून त्यांनी सम्राट अशोकाच्या जीवनावरची १४१ पुस्तके वाचून काढली होती. त्यावर त्यांनी बीलव्हेड ऑफ द गॉडस्-अ स्टोरी ऑफ अशोका द ग्रेट ही कादंबरी लिहिली. वयाच्या ९० व्या वर्षी २९ एप्रिल २०१० रोजी त्यांचे निधन झाले.

– वर्षा जोशी-आठवले

## मोडक, नारायण विनायक

☞ **मुख्य नोंद – विज्ञान व तंत्रज्ञान खंड**

## मोरे दिनकर माधव

**सचिव-महाराष्ट्र जलसिंचन आयोग, अभियंता**
**२० डिसेंबर १९४७**

दिनकर माधवराव मोरे यांचा जन्म लातूर जिल्ह्यातल्या निलंगा तालुक्यातील सरदारवाडी खेड्यात एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. १९६६ साली त्यांनी कर्नाटक राज्यातील बसवकल्याण येथून



मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण केली. १९६६ ते १९६८ हे दोन वर्षं महाराष्ट्रातील उमरगा या ग्रामीण आणि मागासलेल्या भागातील महाविद्यालयात काढली आणि मराठवाडा विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. एक वर्षानंतर विद्यापीठात परत अग्रक्रमावर असल्यामुळे या वेळच्या नियमाप्रमाणे १९६९ ला पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'इलेक्ट्रॉनीक्स आणि टेलिकम्युनीकेशन' या महत्त्वाच्या शाखेसाठी त्यांची निवड झाली. पुणे येथे एक वर्ष घालविल्यानंतर त्यांनी सिव्हिल इंजिनिअरींग शाखेकडे वळून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. १९७२ साली पुणे विद्यापीठातून सर्व विषयातली बक्षीसे घेऊन सुवर्ण पदकांसह प्रथम क्रमांकाने बी.ई. (सिव्हिल) ही पदवी संपादन केली. २००६ साठी अभ्यासाचा छंद जोपासून जल विकासाचा इतिहास या विषयात पीएच.डी. पदवी त्यांनी संपादन केली.

'वालचंद हिराचंद' या नामवंत संस्थेचे ते शिष्यवृत्तीधारक होते आणि कराराप्रमाणे या संस्थेच्या 'हिन्दुस्थान कन्स्ट्रक्शन' या बांधकाम कंपनीत पदवीनंतर काही काळासाठी सेवा देण्यास ते बांधील होते. निकालाच्यापूर्वीच त्यांना कामावर रुजू होण्यासाठी बोलविण्यात आले. मुंबई येथील मुलाखतीत त्यांनी स्पर्धात्मक परिक्षेच्या माध्यमातून शासनाच्या सेवेत जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांच्या इच्छेला मान देऊन मुलाखतकाराने त्यांना कंपनीशी केलेल्या करारातून मुक्त केले. पुढे मोरे यांनी नोकरीचा सुरुवातीचा काही काळ यु.पी.एस.सी.च्या माध्यमातून 'मिलीटरी इंजिनिअर सर्व्हिसेसमध्ये' विशाखापट्टणम येथील 'ड्रायडॉक' या अतिअवजड व अवघड कामावर घालवून 'मे १९७६' मध्ये एम.पी.एस.सी.द्वारे महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे (जलसंपदा) विभागात रूजू झाले. भावंडांना मार्गी लावण्याच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याकडे त्यांनी लक्ष पुरविले.

डिसेंबर २००५ ला जलसंपदा विभागाचे महासंचालक (संशोधन, संकल्पचित्र, प्रशिक्षण) या सचिव समकक्ष पदावरून सेवानिवृत्त होईपर्यंत वेगवेगळ्या पदांवर सेवारत राहून सचोटी व गुणवत्तेला प्राधान्य देऊन भीमा, पेंच, विष्णुपुरी, भातसा, मांजरा, तेरणा, पेनगंगा, मनार, लेंडी, माजलगांव, बाभळी, कोयना यासारख्या मोठ्या प्रकल्पांबरोबरच अनेक लहान व मध्यम प्रकल्पांवरील वेगवेगळ्या प्रकारची जसे नियोजन, संशोधन, बांधकाम, व्यवस्थापन इत्यादी कामे करून त्यांन आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. राज्यात पडलेल्या १९८६, १९९२, २००१ ते २००३ दुष्काळामध्ये ग्रामीण, गरीब लोकांना रोजगार निर्माण करत राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या कामात हिरिरीने भाग घेतला. हाताखालील प्रशासकीय यंत्रणेला राष्ट्रीय व सामाजिक बांधिलकीच्या विचाराने प्रेरित करून रोहयो योजनेत स्वच्छ प्रतिमेने काम कसे करता येते हे दाखवून दिले. ग्रामीण भागात पक्क्या रस्त्याचं जाळं निर्माण करणाऱ्या केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री ग्रामसडक योजने'ची जिल्हा परिषदेसारख्या अभियांत्रिकी पाठबळ नसणाऱ्या व्यवस्थेच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहून या योजनेचा पाया घालण्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मोरे यांनी शासनातील अधिकाराच्या वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असताना बदल घडविणाऱ्या अनेक बाबी परिपत्रकाच्या माध्यमातून शासनस्तरावरून त्यांनी सूचित केल्या. उपसा सिंचन योजनेसाठी मार्गदर्शक सूचना देताना स्टँड-बाय पंपाचा विचार त्यांनी कालबाह्य ठरविला.

शासनातील चाकोरी बाहेरच्या वेगळ्या प्रकारच्या कामाची जबाबदारी घेण्यास ते सदैव पुढे असत. प्रसिद्ध विचारवंत व जलतज्ज्ञ डॉ.माधवरावजी चितळे

म



गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र जल व सिंचन आयोगा'चे सचिव म्हणून समर्थपणे त्यांनी धुरा सांभाळली आणि राज्याचा 'जल विकासाचा' आराखडा दिग्दर्शित करणारा २००० पानांचा पाच खंडात विभागला गेलेला अहवाल (१९९९) प्रसिद्ध करून अलौकिक असे योगदान प्रदान केले आहे. डॉ.मोरे यांना इतिहासाचं प्रेम आहे यातूनच मानवी जीवन, संस्कृती घडविण्यास कारणीभूत ठरणारे दोन ते अडीच हजार वर्षांपासूनचे पाण्याच्या सामाजिक, आर्थिक, तांत्रिक आणि न्यायिक अंगांवर प्रकाश टाकणारे अनेक पदर त्यांनी समाजापुढे उलगडून ठेवले. याचा परिपाक म्हणून विद्यापीठाने त्यांना या विषयातली डॉक्टरेट ही पदवी बहाल केली आहे.

भीमा जलसेतुसारखी सुंदर वास्तू, विष्णुपुरी प्रकल्पाचे नाविन्यपूर्ण संकल्पचित्र अशा अनेक सुंदर व मजबूत वास्तूंच्या निर्मितीत ते खूप रमले. माकणी येथील तेरणा नदीवरील नदीपात्रातील थांबलेले, कंत्राटदारांनी पाठ फिरविलेले अवघड काम ७-८ महिन्यांच्या (१९८९) कालावधीत शासकीय यंत्रणा व स्थानिक मजूरवर्ग यांना विश्वासात घेऊन ते काम तडीस नेण्याची त्यांची प्रशासकीय व अभियांत्रिकी हातोटी ही वाखाणण्यासारखी होती. हेच कसब त्यांनी (१९९२) पेनगंगा या विशाल प्रकल्पाच्या १० ते १२ वर्षे वयाच्या कालव्यावरील अनेक बांधकामांना पडझडीपासून सावरताना दाखविले. ३० सप्टेंबर १९९३ या किल्लारीच्या भूकंपात स्वयंप्रेरणेने संकटग्रस्तांना त्यांनी मदतीचा हात दिला. शेतकऱ्यांचे अज्ञान व दारिद्र्य, यातून त्यांचे होणारे शोषण आणि पर्यायाने समाज व देश आर्थिकदृष्ट्या दुबळा होणे, हे टाळण्यासाठी व शेतकऱ्यांना सक्षम केलं पाहिजे यासाठी समविचारी मंडळींना बरोबर घेऊन राज्यभर सिंचन संमेलने, परिषदा भरवून हजारो शेतकऱ्यांना सबल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. 'महाराष्ट्र सिंचन सहयोग' व 'भारतीय जलसंस्कृती मंडळ' या सेवाभावी संस्थांचे ते अध्यक्ष आहेत. खाजगी क्षेत्रातील ताकदीचा विकास कार्यासाठी सहभाग घ्यावा असे त्यांना वाटते. पुण्याजवळ मुठा नदीवर एम.आय.टी., पुणे संस्थेकरवी पूर्णत: खाजगीकरणातून एक धरण उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

पाण्यासंबंधीच्या चांगल्या लेखनाचे एकत्रीकरण करून त्यांचं ग्रंथ रूपात संपादन करण्याचे कामपण त्यांनी हाती घेतलेले आहे. सिंचन साधना हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे तर सिंचन चिंतन प्रकाशनाच्या मार्गावर आहे. महाराष्ट्र शासनाने (२००७) गोदावरी खोऱ्याच्या एकात्मिक विकास आणि व्यवस्थापनाचा बृहत आराखडा तयार करण्याची जबाबदारी शासनाचे तांत्रिक सल्लागार म्हणून त्यांच्यावर सोपविलेली आहे.

त्यांना २००४ साली सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन अँड पॉवर संस्थेचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा वनश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे. ते महाराष्ट्र सिंचन सहयोग या शिखर संस्थेचे अध्यक्ष आहेत.

– संपादित

## मोहनी, श्यामकांत पुरुषोत्तम

**मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य**

**१८ ऑगस्ट १९२५ – २१ एप्रिल २००५**

श्यामकांत पुरुषोत्तम मोहनींचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सरस्वती होते. त्यांचे

म



आरंभीचे शालेय शिक्षण घरीच झाले आणि नंतर त्यांनी घराजवळच्या शाळेत नववीत प्रवेश घेतला. घरातील लोकांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग असल्यामुळे महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई अशा अनेक महान नेत्यांचे दर्शन घेण्याची संधी मोहनी यांना लहानपणीच मिळाली. याच पार्श्वभूमीवर त्यांची जीवनमूल्ये विकसित झाली. एकोणिसाव्या वर्षी नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयामध्ये बी.ए. ऑनर्स (अर्थशास्त्र) करून नागरी प्रशासन सेवेत ते दाखल झाले आणि वयाने सर्वात लहान पण अत्यंत कर्तबगार अधिकारी म्हणून अल्प कालावधीत त्यांची ओळख झाली.

आपल्या १९४७ ते १९८४ सेवाकाळात मोहनी यांनी सब डिव्हिजनल ऑफिसर, ट्रेजरी ऑफिसर, डेप्युटी कलेक्टर, अंडर सेक्रेटरी मिनिस्ट्री ऑफ ॲग्रिकल्चर (नवी दिल्ली), कलेक्टर, कमिशनर, सेक्रेटरी टू चीफ मिनिस्टर, कार्यकारी संचालक सिडको आणि उपलोकायुक्त ही पदे भूषविली.

ह्या सर्व जबाबदाऱ्या पेलत असताना त्यांनी अंधश्रद्धानिर्मूलन आणि समाजप्रबोधनाचे काम देखील केले. आदिवासींच्या जीवनातील जगावेगळ्या रूढी व त्यांचे गहन प्रश्न सोडविण्यासाठी सखोल अभ्यास करून मोहनींनी ह्या संदर्भात अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. नरबळीची प्रथा कशी घातक आहे हे समजावण्याचा प्रयत्न केला. त्या जमातींच्या वास्तव्यासाठी आणि परिरक्षणासाठी आवश्यक नोंद सरकारात करून ठेवण्याचे काम मोहनींनी फार परिश्रमपूर्वक केले.

निस्तार ऑफिसर असताना मालगुजारी कायदा नष्ट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली. कृषीयोग्य जमिनीशिवाय मोठमोठे तलाव व विस्तृत जंगले मालगुजारांच्या ताब्यात असत. निरनिराळ्या मालगुजारांनी अशा जंगलामध्ये राहणाऱ्या लोकांना छोटे-मोठे मालकीचे हक्क, वहिवाटीचे हक्क दिले असत. मोहनी यांनी गावोगाव आणि जंगलाजंगलातून फिरून, विस्तृत माहिती गोळा करून आणली आणि त्याची सरकारात अत्यंत काळजीपूर्वक नोंद केली. आजही त्या भागात कुठला विवाद निर्माण झाला तर मोहनींनी तयार केलेल्या निस्तारपत्रकाचा आधार मूलभूत समजला जातो.

मोहनींच्या अभ्यासपूर्ण कामातून स्वातंत्र्योत्तर पहिल्या दशकात फाशीची शिक्षा, जंगल जोपासना, वन्य प्राणी सँक्च्युरी, वनसंरक्षण इत्यादी बाबींमध्ये अनेक कायदे आणि धोरणे अंमलात आली, याचे श्रेय मोहोनी यांच्याकडे जाते अशी त्यांच्या कर्तबगारीची महती आहे.

१९५२ पासून मोहनी यांच्याकडे जबलपूरचे अन्नधान्य पुरवठा अधिकारी हे पद आले. जीवनावश्यक वस्तूंची तीव्र टंचाई आणि साठेबाजी व काळाबाजार अशा अवघड समस्यांना सामोरे जाऊन त्यावर उपाय करण्यासाठी पंतप्रधान लालबहादुर शास्त्रींनी अनेक ठोस निर्णय घेतले आणि कृषी मंत्रालयात या क्षेत्रातील राज्यपातळीवर अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या. श्री. श्यामकांत मोहनी यांना तेथे अवर सचिव पदी नेमण्यात आले. अत्यंत अनुभवसंपन्न आणि कर्तबगार अधिकारी आणि प्रशासक म्हणून त्यांच्या नावलौकिकात भर पडतच गेली. महाराष्ट्रात परत आल्यावर कलेक्टर, कमिशनर अशा जबाबदाऱ्या राजकीयदृष्ट्या कठीण अशा जिल्ह्यांमध्ये त्यांना देण्यात आल्या. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मोहनींना सचिव पदी नेमले. मोहनी सामान्यजन, महत्त्वाचे पदाधिकारी, मंत्रीमंडळ सदस्य आणि मुख्यमंत्री यांच्यातील महत्त्वाचा दुवा बनले. अनेक अवघड निर्णय स्वत:च्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून, कायद्याच्या चौकटीत पण सर्वांना पटवून देऊन घेण्याचे काम अत्यंत निर्लेप राहून श्री. मोहनी यांनी

केले. त्यांनी वसंतदादा पाटील, शरद पवार, अब्दुल रहमान अंतुले ह्या सर्वांच्या कारकिर्दीत सचिवपद सांभाळले. काही मुख्यमंत्र्यांच्या आयुष्यात अनेक वादळे उठली, पण मोहनी यांचे काम धुतल्या तांदळासारखे स्वच्छच राहिले. कोणत्याही टीकाकारांना एकही संधी त्यांच्या प्रशासन शैलीने दिली नाही.

प्रशासन सेवेच्या शेवटच्या टप्प्यात मोहनींची उपलोकायुक्त म्हणून नेमणूक झाली. नंतर पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरूपद त्यांना चालून आले पण वयोमर्यादेमुळे ते ते स्वीकारू शकले नाहीत. ते निवृत्त झाले आणि कुठल्याही पदांच्यापासून अलिप्त राहून जनसेवेच्या नव्या जबाबदाऱ्या आणि नवी आव्हाने त्यांनी पेलली.

– सुनंदा कुलकर्णी

## मंगलमूर्ती, माधव केशव

**उच्चायुक्त – द.आफ्रिका**

**४ मे १९३८**

माधव केशव मंगलमूर्ती यांचा जन्म मध्यप्रदेशातील (त्या काळातील मध्यप्रांत) जबलपूर येथे झाला. त्यांचे वडील केशव मंगलमूर्ती हे आय.सी.एस. अधिकारी होते. ते नागपूर येथे काही काळ न्यायाधीश होते. नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरुपदही त्यांनी भूषवले.

म

माधव यांच्या आईचे नाव मालती असे होते. मंगलमूर्ती यांचे प्राथमिक शिक्षण नागपूरमधील पटवर्धन हायस्कूलमध्ये झाले. नागपूर येथील गव्हर्नमेंट ऑफ सायन्स महाविद्यालयातून त्यांनी गणित या विषयात एम.एस्सी. केले. वडील आय.सी.एस. असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत आपण काम करावे असे वाटत असे.

१९६१ मध्ये त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली. भारतीय परराष्ट्र सेवेत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ते तिसऱ्या स्थानावर होते. सध्याचे भारताचे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी हेदेखील या तुकडीमध्ये होते.

नोव्हेंबर १९६२ मध्ये त्यांची प्रथम नियुक्ती अर्जेंटिनाची राजधानी बुएनस आयरेस (Buenos Aires) येथील भारतीय दूतावासात तृतीय सचिव (थर्ड सेक्रेटरी) म्हणून करण्यात आली. स्पॅनिश भाषा शिकणे हा येथील नियुक्तीचा मुख्य उद्देश होता.

स्पॅनिश भाषा अवगत केल्यानंतर माधव मंगलमूर्ती यांची नियुक्ती चिली देशाची राजधानी सॅटियागो येथे द्वितीय सचिव या पदावर करण्यात आली. पेरू आणि कोलंबिया या चिलीच्या शेजारील देशांशी भारताचा परराष्ट्र व्यवहार सॅटियागो या शहरातूनच चालत असे. त्याची जबाबदारी मंगलमूर्ती यांच्यावर होती. १९ जुलै १९६५ रोजी मंगलमूर्ती यांना पदोन्नती देण्यात येऊन त्यांची नियुक्ती कराची येथे द्वितीय सचिव, राजकीय (सेकण्ड सेक्रेटरी, पोलिटिकल) या पदावर करण्यात आली.

त्यानंतर पुढील एक ते दीड महिन्यातच भारत–पाक युद्ध सुरू झाले. पाक सरकारने भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांना स्थानबद्ध केले. त्यांच्या सामानाची/कागदपत्रांची कसोशीने तपासणी करण्यात आली. अशा मोक्याच्या प्रसंगी मंगलमूर्ति यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने भारत सरकारच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गुप्त कागदपत्रे पाकिस्तानच्या हाती सापडणार नाहीत याची काळजी घेतली. युद्धसमाप्तीनंतर साडेतीन वर्षांच्या कालावधीसाठी मंगलमूर्ती यांची नेमणूक पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे करण्यात आली.

१९६८ मध्ये मंगलमूर्ती यांची नियुक्ती दिल्ली येथे अंडर सेक्रेटरी, परराष्ट्र मंत्रालय या पदावर करण्यात आली. १९६९ ते १९७२ या काळात त्यांच्यावर परराष्ट्र मंत्रालयाच्या आग्नेय आशिया (साउथ–ईस्ट आशिया) या विभागाचे डेप्युटी सेक्रेटरी म्हणून जबाबदारी होती. १९७३ मध्ये मंगलमूर्ती यांची

नियुक्ती जिनिव्हा येथे पर्मनन्ट मिशन ऑफ इंडिया टू यूएन ऑफिस इन जिनिव्हा या कामासाठी काउन्सेलर म्हणून करण्यात आली. या वेळी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये होणाऱ्या नि:शस्त्रीकरणाच्या संदर्भातील अनेक बैठकांमध्ये त्यांनी ब्रिजेश मिश्र यांच्यासह सहभाग घेतला. १९७४ मध्ये भारताने पहिली अणुचाचणी केली. त्या वेळी मंगलमूर्ती यांना संयुक्त राष्ट्रसंघामध्ये भारताची अणुचाचणीमागची भूमिका पटवून द्यावी लागली.

१९७५ ते १९७७ या काळात मंगलमूर्ती इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे काउन्सिलर, डेप्युटी हेड ऑफ मिशन या पदावर कार्यरत होते. १९७७ मध्ये ते हाँगकाँगचे कमिशनर या पदावर कार्यरत होते. हाँगकाँग ही भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची वसाहत होती. तसेच चीनमधील घडामोडी जाणून घेण्यासाठीही हाँगकाँगला ‘विंडो टू चायना’ असे म्हणत असत. या देशाबरोबरचे व्यापार, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच प्रकारच्या संबंधांची जबाबदारी मंगलमूर्ती यांनी सांभाळली होती. या पदावर ते १९८० पर्यंत कार्यरत होते.

१९८१ मध्ये मंगलमूर्ती यांची नियुक्ती दिल्ली येथे करण्यात आली. जॉइंट सेक्रेटरी, कंट्रोलर जनरल ऑफ इमिग्रेशन, चीफ पासपोर्ट ऑफिसर अशा विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर देण्यात आल्या. भारतातील सर्व पासपोर्ट कार्यालयांचे व्यवस्थापक त्यांच्या नियंत्रणाखाली होते. या काळात मध्य आशिया आणि इतर राष्ट्रांमध्ये भारतामधून मोठ्या प्रमाणावर कामगार नेले जात असत. या कामात कामगारांची फसवणूक तर होत नाहीना, हे पाहणे ही जबाबदारी पासपोर्ट ऑफिसर म्हणून मंगलमूर्ती यांनी पूर्ण केली.

१९८१ ते १९८५ या काळात मंगलमूर्ती दिल्ली येथील नॅशनल डिफेन्स कॉलेजचे सीनियर डायरेक्टर ऑफ स्टाफ, फॅकल्टी या पदावर होते. या ठिकाणी आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, आय.ए.एस., आय.पी.एस., आय.एफ.एस. अशा महत्त्वपूर्ण पदांवर असणारे अधिकारी ‘अॅडव्हान्स ट्रेनिंग’साठी येत असत. परदेशातील काही अधिकारीही हे प्रशिक्षण घेण्यासाठी येत असत. या सर्वांसाठीच्या अभ्यास कार्यक्रमाचे (स्टडी प्रोग्राम) नियोजन करण्याची जबाबदारी मंगलमूर्ती यांच्याकडे होती.

१९८५ ते १९८९ या कालावधीत मंगलमूर्ती क्यूबा येथे राजदूत होते. त्या वेळी अलिप्त राष्ट्रवादी देशांच्या बैठकांना ते उपस्थित राहत असत. या वेळी त्यांना क्यूबाचे राष्ट्राध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली आणि त्या निमित्ताने त्यांना कम्युनिस्ट चळवळ जवळून पाहता आली.

१९८९ ते १९९४ या पाच वर्षांतील त्यांची स्वित्झर्लंडमधील बर्न येथे राजदूत म्हणून झालेली नियुक्ती त्यांच्या कार्यकाळात सर्वांत महत्त्वपूर्ण ठरली. याच काळात बोफोर्स घोटाळा प्रकरणाची चौकशी सुरू होती. या कालावधीत भारतातील सत्ताबदलामुळे बदलत्या राजकीय भूमिकांमुळे मंगलमूर्ती यांना बोफोर्स चौकशी सुरू असताना खूप दबावाखाली काम करावे लागले.

या कालावधीत स्वित्झर्लंडमधील दावोस या ठिकाणी दरवर्षी होणाऱ्या ‘वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम’मध्ये ते सहभागी होत असत. स्वित्झर्लंडची भारतातील गुंतवणूक व पर्यटन, बँकिंग या क्षेत्रांतील दोन्ही देशांचे संबंध यांसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. परराष्ट्र व्यापारात महत्त्वपूर्ण मानला जाणारा ‘डबल टॅक्सेशन करार’ मंगलमूर्ती स्वित्झर्लंडचे राजदूत असताना दोन्ही देशांमध्ये झाला.

१९९४ मध्ये मंगलमूर्ती यांची नियुक्ती दक्षिण आफ्रिकेचे उच्चायुक्त (हाय कमिशनर) या पदावर करण्यात आली. हा देश त्या वेळी नुकताच स्वतंत्र होऊन नेल्सन मंडेलांच्या अध्यक्षतेखालील सरकार सत्तेवर आले होते. भारताचा नेल्सन मंडेला यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्यामुळे पूर्वीच्या सरकारचे भारताशी शत्रुत्व होते. या ठिकाणची नोकरशाही गौरवर्णीयांची, तर सत्ता कृष्णवर्णीयांची, अशा

म

परिस्थितीत दक्षिण आफ्रिकेसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध दृढ करण्याचे महत्त्वाचे काम मंगलमूर्ती यांनी केले. दोन्ही देशांमधील राजनैतिक, सांस्कृतिक, व्यापारविषयक आणि संरक्षणविषयक संबंधांचा पाया घालण्याची जबाबदारी मंगलमूर्ती यांनी पूर्ण केली. जून १९९६ मध्ये द. आफ्रिकेचे उच्चायुक्त या पदावरून ते अठ्ठावन्नाव्या वर्षी निवृत्त झाले. निवृत्तीनंतर काही वर्षे त्यांनी हिंदुजा फाउण्डेशन चॅरिटेबल ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष म्हणून काम केले. सध्या ते पुणे येथे स्थायिक झाले आहेत.

– संध्या लिमये

* * *

म

# य

## यार्दी, मधुकर रामराव

**केंद्रिय वित्त सचिव, संस्कृत अभ्यासक**

**२२ ऑगस्ट १९१६ – २० ऑगस्ट २००१**



मधुकर रामराव यार्दी यांचा जन्म कोकणातल्या सुपे नावाच्या छोट्या गावात झाला. काळ्या नदीवर वसलेले हे गाव धरणाखाली गेल्यामुळे आता अस्तित्वात नाही. त्यांच्या आईचे नाव जानकीबाई होते. वडील सरकारी नोकरीत होते. आठ मुलांचे त्यांचे मोठे कुटुंब होते. मधुकरला उत्तमोत्तम शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आईवडिलांनी कंबर कसली. मधुकर शालेय शिक्षणासाठी कारवार व धुळ्यामध्ये मोठ्या भावांकडे राहिला.

नंतर यार्दींनी पुण्यात येऊन प्रथम फर्गसन व नंतर सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. गणित व संस्कृत हे त्यांचे आवडते विषय होते. बी.ए. व एम.ए ला त्यांना कुलपती पदकाचा (चँसलर मेडल) मान मिळाला. प्राध्यापक रा.ना.दांडेकर, डी.डी.कोसंबी व डी. डब्ल्यू. केरकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संस्कृत, गणित व प्राच्यविद्या यांचा अभ्यास केला. १९४० मध्ये भारतीय प्रशासकीय सेवा आयसीएस परीक्षेत सर्वप्रथम येण्याचा मान त्यांनी मिळविला. त्या वेळच्या मुंबई राज्यात जिल्हाधिकारी म्हणून त्यांची कारकीर्द फार गाजली. नंतर महाराष्ट्राचे गृह सचिव व वित्त सचिव म्हणून त्यांनी काम केले. १९६२ मध्ये त्यांची केंद्रीय



विद्या भवन

अर्थ खात्यामध्ये नियुक्ती करण्यात आली. केंद्र सरकारच्या नियोजन विभागाचे सल्लागार आणि गृह खात्यात अतिरिक्त सचिव म्हणून त्यांनी काम केले. योजना व गृह खात्यामधील विविध समित्यांवरही त्यांनी काम केले. केंद्रीय वित्तसचिव ह्या पदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर १९७४ मध्ये ते निवृत्त झाले.

शासकीय सेवेत कार्यरत असताना सुद्धा यार्दी यांनी संस्कृतचा अभ्यास चालू ठेवला होता. नाशिकला जिल्हाधिकारी असताना करवीर पीठाचे शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली शांकरभाष्यातील ब्रह्मसूत्रांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. पूर्वी प्रा.कोसंबी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संख्याशास्त्राचा अभ्यास केला होता. मार्क्सवादी कोसंबी आणि परंपरावादी डॉ.कुर्तकोटी या दोन टोकाच्या विद्वानांचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडला.

निवृत्तीनंतर यार्दी यांनी संस्कृतचा अभ्यास व लेखनकार्य आणि शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांच्या

कार्यामध्ये स्वत:ला वाहून घेतले. आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानाचे ते विश्वस्त होते. त्यांच्या प्रेरणेने आणि पुढाकाराने पुण्यामध्ये 'भारतीय विद्या भवन' या संस्थेच्या केंद्राची स्थापना झाली. त्यांच्या अध्यक्षतेखाली दोन उत्तम दर्जाच्या शाळा आणि अनेक अभ्यासक्रम सुरू झाले. १९७९ मध्ये 'दि योगा ऑफ पातंजली' हा त्यांचा पहिला ग्रंथ भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने प्रसिद्ध केला. महाभारत हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. महाभारताच्या अनुष्टुभ छंदाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन, या श्लोकांना संख्याशास्त्राचे निकष लावून प्रत्येक पर्वाचा चिकित्सक अभ्यास केला. यापूर्वी त्यांनी संख्याशास्त्रावर आधारित शेक्सपियरला अभ्यासून 'क्रोनोलोजी ऑफ शेक्सपीयर्स प्लेज' हा ग्रंथ तयार केला होता. त्याच पद्धतीने त्यांनी महाभारत अभ्यासून काही निष्कर्ष काढले. भगवद्‌गीता हा सुद्धा त्यांच्या संशोधनाचा प्रमुख विषय होता. 'भगवद्‌गीता – ए सिंथेसिस' हे त्या संशोधनाचे फलस्वरूप. त्यांची पत्नी अनुसूया हिच्यासह त्यांनी रामकृष्ण मिशन व शारदा मठाच्या कार्यात रस घेतला होता.

– भारती कोतवाल

* * *

य

# र

## रड्डी, अरविंद गोविंद

**भारतीय वन सेवा, प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**२७ डिसेंबर १९३७**



अरविंद गोविंद रड्डी यांचा गुजरात मधील अमरेली या गावात झाला. त्यांचे वडील भारतीय प्रशासन सेवेत, सेंटलमेंट कमीशनर व कलेक्टर या पदावर कार्यरत होते. तर त्यांचे आजोबा कर्नाटक कॉलेज धारवाड येथे संस्कृत विषयाचे प्राध्यापक होते व पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्रातीही त्यांचा जवळचा संपर्क होता.

अरविंद रड्डी यांचं प्राथमिक शिक्षण द्वारकेला झालं. द्वारकेला अथांग समुद्र आहे. बालवयातच त्या समुद्राच्या हिंदकळणाऱ्या लाटांनी मनात घर केलं आणि तेव्हापासूनचं मनात निसर्गाचं वेड निर्माण झालं. परंतू वडीलांच्या बदलीमुळे द्वारका सोडावी लागली आणि त्यानंतरचं शिक्षण पुण्यात दस्तुर हायस्कूलमध्ये त्यांनी ते एस.एस्सी. पर्यंतच शिक्षण त्यांनी घेतलं. त्यानंतर १९५३ साली त्यांनी बी.एस्सी.ला फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. निसर्गाचे प्रचंड वेड हेच होते. इथून बी. एस्सी. प्रथम क्रमांक एम.एस्सी. प्रथम क्रमांक. १९५९ साली वनसेवेची स्पर्धा परीक्षा त्यांनी दिली आणि भारतभरातून या परीक्षेत पास झालेले प्रशिक्षण पास झालेले प्रशिक्षणाकरिता डेहराडून येथे केले जातात. त्या ठिकाणी अरविंद रड्डींना भारतातील विविधतेचे आणि त्यातील एकात्मतेचं जवळून दर्शन झाले. प्रशिक्षणानंतर १९६२ साली अरविंद रड्डी यांची चंद्रपूरच्या वनविभागात सहाय्यक वन संरक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. या ठिकाणी नेमणूक झाल्यानंतर योगायोगानेच त्यांच्या आनंद द्विगुणित करणारी घटना घडली. ती म्हणजे चंद्रपूरच्या त्या जंगल परिसरात ताडोबा अभयारण्याच्या झाली आणि अरविंद रड्डी यांनी त्यात मनापासून सहभाग घेतला आणि त्या अभयारण्यात काम केले.

यादरम्यान त्यांच्यासाठी आणखी एक संधी चालून आली ती म्हणजे १९६८ साली त्यांना कॅनेडियन सरकारची कॉमनवेल्थ शिष्यवृत्ती मिळाली आणि त्यांनी ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी.च्या अभ्यासक्रमाला सुरुवात केली. यासाठी त्यांचा विषय होता. वन्यप्राणिशास्त्र या प्रबंधासाठी त्यांनी हरणांवरती प्रबंध तयार केला. या दरम्यान त्यांनी रात्ररात्र जागरण करून हरणांवरती संशोधन केले. अशा प्रकारच्या अभ्यास करून सादर करणारे अरविंद रड्डी हे पहिलेच भारतीय अस शकतील. त्यांनी दृष्टिकोन व्यापक होणे या संशोधनांना १९६८ मध्ये पुन्हा त्यांची चंद्रपूर विभागीय वनाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या कालावधीत भारत सरकारचे विशेष अतिथी म्हणून चंद्रपूरचे अभयारण्य पाहण्यासाठी व जंगलात वास्तव्य करण्यासाठी अफगाणिस्तानचे पंतप्रधान नईम व त्यांच्यानंतर इराणचे शहेनशहा मुहम्मद रेझा पेहलबी हे आले होते. जंगलात कुठलाही धोका होऊ शकतो, त्यासाठी सुरक्षा व्यवस्था अतिशय कडक ठेवण्यापासून ते जंगलातील सर्व ठिकाणे व्यवस्थित दाखवण्यापर्यंतची मुख्य जबाबदारी सहकार्यासह रड्डी यांनी अतिशय उत्साहाने पार पाडली.

र

१९७१ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासकार्यक्रमांतर्गत वनप्राणी व निसर्ग आधारित पर्यटन अभ्यास करण्यासाठी ते अफ्रिकेला रवाना झाले. भारत सरकारच्या सहकार्याने जंगलवाढीसाठी प्रायोगिक तत्त्वावर हवाई बीज पेरणे कार्यक्रम झाला. याचे रड्डी समन्वयक होते. घूस उंदिरांची संख्या वाढते. घनदाट झाडी, प्रचंड मोठी जंगले आणि वन्यप्राण्यांचे असलेले वैविध्य यांचा सखोल अभ्यास रड्डींनी आपल्या या दौऱ्यात केला. १९८५ मध्ये भारतात सामाजिक वनीकरण नावाची एक अभिनव कल्पना उदयास आली. या कल्पनेस अमेरिकेचे साहाय्य होते. यादरम्यान जंगलेतर पडीक जमिनीवर वृक्षलागवड करायची परंतु वृक्षलागवडीनंतर सामाजिक दुर्लक्षाने ती झाडे वाढत नाहीत तेव्हा समाजात जाऊन त्या झाडाचे महत्त्व, वन्यजीवाचे महत्त्व व इतर माहिती जनतेला द्यायची आणि सामाजिक वनीकरण करायचे हे काम अरविंद रड्डी यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या प्रकल्पानंतरच सरकारी पातळीवरच्या प्रयत्नावरच हिरवा झाल्याचे दिसून आले.

सामाजिक वनीकरण प्रकल्पादरम्यान आलेली महत्त्वाची अडचण म्हणजे कोकणातली कोकणात सरकारी मालकीची जमीन राबवणे कठीण होते. तेव्हा अरविंद रड्डी यांनी एक वेगळीच युक्ती लढवली आणि ती म्हणजे समुद्राकाठची खारफुटीची जमीन या जमिनीत कुठलीही वनस्पती येत नाही पण समुद्राच्या खाऱ्या पाण्यात येणारी कांदणी, योनर, चोपी या वनस्पतींची समुद्रकाठावरच्या परिसरात खूप मोठ्या प्रमाणात लागवड केली आणि ही वनस्पती गुरेही आवडीने खातात. तेव्हा त्यांच्याप्रमाणे चाराही झाला समुद्रातील लहान मासे यांना प्रजोत्पादनासाठी या वनस्पतींच्या मुळात अडचणीत अंडी घालण्यास जागाही मिळाली आणि समुद्रकिनारा हरित झाला. हे त्यांचे संशोधन अतिशय महत्त्वाचे ठरले. त्याचा या संशोधनासाठी जगभरातून गौरव झाला आणि जपानमधील एका आंतरराष्ट्रीय चर्चासत्राप्रमाणे निमंत्रित करण्यात आले.

आज निवृत्तीनंतर अरविंद गोविंद रड्डी पुण्यात स्थायिक असून एम.आय.टी. कॉलेज, पर्यावरण संतुलित ग्रामीण विकास, निसर्ग पर्यटन, एम.बी.ए. पर्यावरण विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कार्य करतात. याही वयात त्यांचे जंगल व निसर्गवेड संपलेले नसून आजही त्यांनी मातीशिवाय पालापाचोळ्याचा उपयोग करून आपल्या घरात आणि गच्चीत भले मोठे वैविध्यसंपन्न उद्यान उभे केले आणि तेवढ्याच नेटाने ते आता सांभाळत असतात. आजही ते निसर्गसंवर्धन, सामाजिक वनीकरण, पर्यावरण संतुलित ग्रामीण विकास आणि निसर्ग पर्याटन यासाठी आग्रही असतात.

– दत्ता कानवटे

## राणे, रावसाहेब दाजी
**सुभेदार**
**जन्म–मृत्यू अनुपलब्ध**



१८६० ते १९०० या कालावधीत ते मुंबई पोलीस सेवेत कार्यरत होते. रावसाहेब दाजी राणे यांना मुंबई शहराची खडान्खडा माहिती होती. त्यावेळी मुंबईमध्ये मुस्लीम आणि पारशी यांच्यात निर्माण झालेला तणाव कमी करण्याचे महत्त्वाचे काम रावसाहेब राणे यांनी केले. कोणतेही काम अत्यंत कौशल्याने पार पाडण्याचे कसब त्यांच्या अंगी होते. आर.सी.एस. अधिकारी एम.एस.एडवर्डस् यांनी ‘मुंबई शहर पोलीस’ या पुस्तकात रावसाहेब राणे यांचे केलेले वर्णन हे त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष पटवून देते. रावसाहेब राणे यांचे वर्णन करताना एडवर्डस् लिहितात, ‘‘हा एक असा भारतीय अधिकारी होता

की, फार शिकलेला नसूनही त्याच्यामध्ये नैसर्गिकपणेच पोलिसी गुण होता. कोणतेही काम अत्यंत बांधिलकीने आणि कौशल्याने करणे हा त्यांचा महत्त्वाचा गुण विशेष होता. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांनी अनेक दशके मुंबई पोलीस सेवेत उत्कृष्ट कामगिरी केली. शहराची लोकसंख्या आणि विविध पंथांमध्ये निर्माण होणारा ताण यांचे नियोजन कसे करावे याची त्यांना उत्तम जाण होती.''

– संपादित

## राणे, विजयकुमार जनार्दन

**पहिले कार्यकारी संचालक – भारतीय रेल्वे बांधकाम कंपनी (आय.आर.सी.सी.)**

**२४ मार्च १९३०**



विजयकुमार जनार्दन राणे यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे वडील महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागातून उपसचिव होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे सचिव म्हणून प्रबोधनकार ठाकरे यांच्यासोबतही काम केले होते. विजयकुमार यांच्या आईचे नाव अनसुया असे होते.

१९४७ मध्ये विजयकुमार राणे यांनी मुंबई येथील विल्सन हायस्कूल मधून मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. राणे यांनी मुंबई येथील व्ही.जे.आय.टी. (सध्याचे वीरमाता जीजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट) मधून १९५२ मध्ये स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी घेतली. १९५३ मध्ये ते भारतीय रेल्वे अभियांत्रिकी सेवेची परीक्षा उत्तीर्ण झाले. बडोदा येथील रेल्वे स्टाफ कॉलेजमधील प्रशिक्षणानंतर १९५५ मध्ये ते पश्चिम रेल्वेमध्ये मुंबई येथे रुजू झाले. १९५५ ते १९९० या कारकिर्दीत त्यांनी पश्चिम रेल्वे, उत्तर सिमांत रेल्वे, दक्षिण–पूर्व रेल्वे, मुंबई मेट्रोपॉलिटन ट्रान्सपोर्ट रेल्वे, रेल्वे स्टाफ कॉलेज अशा विविध विभागात काम केले. साहायक अभियंता ते मुख्य अभियंता अशी पदोन्नत्ती घेत त्यांनी भारतीय रेल्वेमध्ये सर्वेक्षण बांधकाम, रेल्वे व्यवस्थेचे नियोजन अशा जबाबदाऱ्या पार पडल्या. १९६० ते १९६३ या कालावधीत राणे उत्तर सिमान्त रेल्वेमध्ये कार्यरत होते. या कार्यकालात हिमालयाच्या पायथ्याशी, ब्रह्मपुत्रानदीच्या तीरावर तसेच अरुणाचल प्रदेशमध्ये रेल्वेमार्ग बांधकामाची जबाबदारी त्यांच्यावर होती. इराक येथे बांधण्यात आलेल्या स्टॅण्डर्ड गेज ६०० कि.मी. लांब रेल्वेमार्गाच्या व्यावसायिक तंत्रज्ञ अभ्यासगटाचे नेतृत्त्व त्यांनी केले.

१९७२ मध्ये राणे यांच्या नेतृत्त्वाखाली राजधानी एक्सप्रेस या गाडीचा मुंबई सेंट्रल ते मथुरा जंक्शन या १३०० कि.मी. लांबीच्या मार्गाचे आधुनिक सुधारित बांधकाम करण्यात आले. या कामामुळे राजधानी एक्सप्रेस ताशी १२० कि. मी. वेगाने सुलभतेने धावू लागली. १९७२ मध्ये राणे यांना भारतीय रेल्वेकडून फ्रान्स येथे रेल्वे ट्रॅक बांधकाम आणि डागडुजी यांचे अत्याधुनिक प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आले. या काळात त्यांनी पॅरीस शहरातील मेट्रो रेल्वे आणि फ्रान्समधील रेल्वेमार्गांचा अभ्यास केला.

नोव्हेंबर १९७७ मध्ये राणे यांच्यावर इंडियन रेल्वे कन्स्ट्रक्शन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. या पदावर त्यांनी उत्तम कामगिरी करून भारतीय रेल्वेला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून दिले. इंडियन रेल्वे कन्स्ट्रक्शन कंपनीने इराण, इराक, सौदी अरेबिया, जॉर्डन, तुर्कस्तान, अल्जेरिया, नायजेरिया, झांबिया, इंडोनिशिया, मलेशिया, नेपाळ आणि बांग्लादेश या १२ विकसनशील देशांमध्ये रेल्वेमार्ग बांधकामाची कंत्राटे घेतली. राणे यांच्या नेतृत्त्वाखाली ही सर्व बांधकाम कंत्राटे नियोजित वेळेत, नियिजित बजेटमध्ये आणि गुणवत्तेने पूर्ण होवू शकले. यामुळे रेल्वेमार्ग बांधकाम क्षेत्रातील युरोपियनांची आणि अमेरिकेची

र

मक्तेदारी संपुष्टात आली. जागतिक पातळीवर भारतीय अभियंत्यांनी आपली योग्यता सिद्ध केली. विजयकुमार राणे यांचे उत्तम नेतृत्त्व, संघटन कौशल्य आणि कामातील गुणवत्ता टिकवून ठेवण्याची कार्यपद्धती यामुळेच हे यश भारतीय रेल्वेला प्राप्त होवू शकले.

१९८४ मध्ये त्यांना इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल मॅनेजर यांच्याकडून बेस्ट इंडस्ट्रियल मॅनेजर हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. १९८४-१९८५ मध्ये भारतीय रेल्वे इंडियन रेल्वे कन्स्ट्रक्शन कंपनीला सार्वजनिक क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कंपनी म्हणून 'द इकोनॉमिक टाइम्स' या दैनिकाकडून गौरवण्यात आले. तसेच त्याच वर्षी या कंपनीला वाणिज्य मंत्रालयाकडून सर्वाधिक नफा आणि परकीय चलन मिळवून देणारी कंपनी म्हणून गौरवण्यात आले. राणे यांच्या व्यवस्थापकीय कौशल्याचे हे फलित होते. या अनुभवामुळेच आंतराष्ट्रीय कामगार संघटनेच्या माध्यमातून राणे यांनी मार्केटिंग ॲण्ड मॅनेजमेंट ऑफ इंटरनॅशनल प्रोजेक्ट या विषयावर चीनमध्ये एका आठवड्याची कार्यशाळा आयोजित केली होती. १९९० मध्ये राणे भारतीय रेल्वे बांधकाम कंपनीचे कार्यकारी संचालक या पदावरून निवृत्त झाले.

इराकमधील बगदाद-हुसैबाद या ५५० कि. मी. लांबीच्या स्टॅण्डर्ड गेज रेल्वेमार्गाचा कार्य आराखडा तयार करणे, मलेशियातील कौलालंपूर ते सिंगापूर दरम्यानच्या रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण, बांग्लादेशमधील ढाक्का ते चितगाव दरम्यानचा रस्ता, नेपाळमधील रस्ते आणि पूल यांचे बांधकाम, मुंबई सेंट्रल ते मथुरा दरम्यानच्या १३०० कि. मी. रेल्वेमार्गाचे अत्यंत कठीण असे नियोजन, कार्य आराखडा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी ही राणे यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहे.

१९९५ ते १९९७ या कालावधीत राणे यांनी बी.ओ.टी तत्त्वावर उभारण्यात आलेल्या पश्चिम रेल्वेच्या विरंगम मेहेसाणा रेल्वे प्रकल्प, कलकत्ता-हल्दीया दरम्यानचा नवीन रस्ता, मुंबई-पुणे दृतगती महामार्ग आणि केरळमधील एका उर्जा प्रकल्पाचे आर्थिक विश्लेषण (फायनान्सिअल व्हाइबिलिटी ॲनालिसीस) करण्याचे महत्त्वाचे काम केले.

संपूर्ण कारकिर्दीमधील स्थापत्य अभियांत्रिकीतील विशेष वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी राणे यांना २००४ मध्ये 'विश्वेश्वरय्या कन्स्ट्रक्शन एक्सलन्स' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारतीय रेल्वेच्या बांधकाम संदर्भातील अनेक सरकारी आणि खासगी राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय कंपन्यांसाठी राणे यांनी सल्लागार म्हणून काम पाहिले आहे.यामध्ये कोकण रेल्वे कॉर्पोरेशन,कॉन्टिनेंटल कन्स्ट्रक्शन, मेट्रो रेल्वे मुंबई, मेट्रो रेल्वे हैद्राबाद यांचा समावेश होतो.

मेट्रो रेल्वे या विषयावर राणे यांचा विशेष अभ्यास आहे. मेट्रो रेल्वेमुळे शहराच्या मुळ सौदर्याला बाधा निर्माण होवू नये, मेट्रो रेल्वेच्या बांधकामाचा आराखडा तयार करताना किमान पुढील २५ वर्षांचा विचार करावा या विषयी ते आग्रही आहेत. सध्या राणे पुणे येथे कार्यरत असून अभियांत्रिकी संबंधातील विविध संस्थांमध्ये ते व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करतात. नव्या पिढीतील अभियंत्यांना मार्गदर्शन करणे यामध्ये त्यांना रुची आहे. अभियांत्रीकी क्षेत्रातील ज्ञान तरुण अभियंत्यांना देत असतानाच राणे त्यांना विविध प्रकारचे संशोधनात्मक काम करण्यासाठीदेखील सतत प्रोत्साहित करत असतात.

— संध्या लिमये

र

## रानडे, विद्यानंद महादेव

**सचिव पाटबंधारे विभाग - महाराष्ट्र शासन**

**२९ नोव्हेंबर १९३७**

विद्यानंद महादेव रानडे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील फलटण येथे झाला. त्यांना अभियांत्रिकी क्षेत्रात काम करण्याचा वारसा वडील आणि आजोबा यांच्याकडून लाभला. त्यांचे आजोबा गोविंद रामचंद्र रानडे हे फलटण संस्थानामध्ये अभियंता म्हणून काम



करत असताना १९१०च्या सुमारास त्यांनी फलटणच्या जलव्यवस्थेची आखणी केली. लोखंडी पाईपच्या सहाय्याने नैसर्गिकरीत्या विहिरीचे पाणी (पंपाशिवाय) संपूर्ण फलटणला पुरविले गेले. पुढील पन्नास ते साठ वर्षे ही योजना कार्यरत होती.

रानडे यांचे वडील महादेव रानडे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता होते. नीरा कालव्याच्या सर्वेक्षणाचे तसेच सिंचन व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले. आजोबा आणि वडील यांच्याकडून अभियांत्रिकी सेवेत येण्याची प्रेरणा विद्यानंद रानडे यांना मिळाली. विद्यानंद रानडे यांचे प्राथमिक शिक्षण बारामती आणि अहमदनगर येथे झाले.

फलटणमधील मुधोजी हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. पुणे येथील फर्गसन महाविद्यालयातून इंटर सायन्सपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर १९६० मध्ये त्यांनी पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयामधून स्थापत्य अभियांत्रिकी या विषयात पदवी घेतली. यावेळी ते पुणे विद्यापीठात प्रथम वर्गात दुसरे आले. त्यानंतर काही काळ त्यांनी पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम केले. हे काम करत असतानाच त्यांनी १९६२ मध्ये महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेची परीक्षा दिली. या परीक्षेत ते राज्यात पहिले आले आणि प्रथम वर्ग अधिकारी म्हणून महाराष्ट्र अभियांत्रिकी विभागात त्यांची नियुक्ती करण्यात आली. थोड्याच कालावधीत रानडे यांच्या अभियांत्रिकी कौशल्याची जाणीव त्यांच्या वरिष्ठांना झाली. १९६२ ते १९७८ या कालावधीत ते कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. या काळात त्यांनी एक मोठा प्रकल्प, ९ मध्यम प्रकल्प आणि २० लघु प्रकल्पांचे सर्वेक्षण, आराखडा, नियोजन बांधकाम या सर्व बाबी पूर्ण केल्या. १९७६ मध्ये त्यांची नियुक्ती भीमा नदीवरील उजनी हे धरण नियोजनापेक्षा एक वर्ष आधी पूर्ण करण्यासाठी करण्यात आली. हे काम त्यांनी १९७८ पर्यंत हाताळले. या कालावधीत त्यांनी आपल्या कामामुळे तत्कालीन पाटबंधारे मंत्री शंकरराव चव्हाण यांचा विश्वास संपादन केला.

१९७८ ते १९८१ या कालावधीत त्यांची नियुक्ती वॉटर अ‍ॅण्ड पॉवर कन्सल्टन्सी सर्व्हिस या केंद्राच्या सरकारच्या संस्थेत नवी दिल्ली येथे करण्यात आली. या कार्यकालात त्यांनी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा, ओरिसा, बिहार आणि प. बंगाल राज्यांतील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून जलसंधारण प्रकल्पांसाठी अर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक असे प्रकल्प अहवाल तयार केले.

१९८१ ते १९८२ या काळात रानडे यांच्यावर वॉटर अ‍ॅण्ड पॉवर कन्सल्टन्सी सर्व्हिस, दिल्लीतर्फे या फिलिपिन्समधील मनिला येथे नॅशनल इरिगेशन अ‍ॅडमिनिस्ट्रेशनला तेथील कालवे बांधकामाचा आराखडा तयार करण्यासाठी वरिष्ठ तांत्रिक सल्लागार ही जबाबदारी सोपवण्यात आली.

१९८३ ते ८८ या कालावधीत रानडे अधिक्षक अभियंता म्हणून मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा व वैतरणा धरणांचे जलविद्युतगृहांचे काम केले.

उपसचिव म्हणून राज्यातील लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या नियोजन व संनियंत्रण केले. दरम्यान फेब्रुवारी ते जून १९८८ या काळात युटाह स्टेट युनिव्हर्सिटी फिनिक्स व शिकागो येथे वॉटर रिसोर्सेस सिस्टीम अ‍ॅनेलेसिस या विषयाचे प्रशिक्षण घेताना पाटबंधारे विभागातील १० अभियंत्यांचे नेतृत्त्व केले.

नोकरीच्या संपूर्ण काळात श्री. प. र. गांधी (सेवा निवृत्त सचिव पाटबंधारे विभाग) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. १९८९ मध्ये पदोन्नती मिळाल्यावर मराठवाड्यातील जायकवाडी, मालजगाव, निम्न

र

तेरणा, निम्न दुधना, ऊर्ध्व पैनगंगा या मोठ्या प्रकल्पांच्या उभारणीच्या कामाची जबाबदारी पाच वर्षे पार पाडली. त्यानंतर एक वर्ष नागपूर येथून पेंच, गोसीखुर्द या मोठ्या व बऱ्याच मध्यम प्रकल्पांच्या उभारणीचे काम त्यांनी पाहिले. १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाचे सचिव, लाभक्षेत्र विकास पाटबंधारे विभाग या पदावरून रानडे निवृत्त झाले. नोकरीत असतानाच गुजरातमधील पानम प्रकल्प आणि इंडोनेशियातील एका प्रकल्पावर जागतिक बॅंकेचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. भिमा-सीना या नद्यांना जोडणाऱ्या १९ कि. मी. लांबीच्या पाणीपुरवठा कालव्याचा आराखडा तयार करण्याचे काम त्यांनी केले.

रानडे यांनी जागतिक बॅंकेच्या जलव्यवस्थापन प्रकल्पासाठी, तसेच जगभरातील विविध देशांतील जलव्यवस्थापन प्रकल्पासाठी सल्लागार म्हणूनही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९८९ ते १९९१ या कालावधीत त्यांनी जागतिक बॅंकेच्या सहकार्याने चाललेल्या माजलगाव येथील जलप्रकल्पासाठी कालवा बांधणीचा आदर्श आराखडा तयार केला. १९९२ मध्ये रानडे यांनी जागतिक बॅंकेच्या सहकार्याने ब्राझिल येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'माजलगाव पाटबंधारे प्रकल्प आणि महाराष्ट्र शासनाची पुनर्वसन योजना' या विषयावरील शोधनिबंधाचे वाचन केले. जलसंधारण आणि व्यवस्थापन या विषयवरील रानडे सातत्याने लेखन करत असतात. १९९२ मध्ये त्यांचे रिझर्वायर्स ॲण्ड एन्व्हॉर्नमेंट (जलसाठे आणि पर्यावरण) हे इंग्रजी भाषेतील पुस्तक प्रकाशित झाले.

१९९३ मध्ये तिरुअनंतपुरम येथे झालेल्या चौथ्या राष्ट्रीय जल परिषदेत रानडे यांनी जायकवाडी धरण परिसरातील पक्ष्यांची वसतिस्थाने आणि पर्यावरण यांच्या संवर्धनाचा अभ्यास या विषयावरील शोधनिबंधांचे सादरीकरण केले. २००० मध्ये जळगाव येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय ठिबक आणि तुषार सिंचन परिषदेत रानडे यांनी मोकाट सिंचन ते ठिबक सिंचन या बदलामुळे निर्माण झालेली समानता आणि समृद्धी या विषयावरील शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

नोकरीच्या काळात व विशेषत: सेवानिवृत्तीनंतर पाण्याच्या क्षेत्रात कशाप्रकारे योगदान द्यावे याबाबत जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांना केलेल्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे रानडे त्यांना सल्लागार आणि गुरू मानतात. त्यांच्यामुळे ग्लोबल वॉटर पार्टनरशिप आणि दक्षिण आशियायी तांत्रिक सल्लागार समिती या संस्थांमध्ये काम करण्याची संधी रानडे यांना मिळाली. डॉ. चितळे यांच्या सल्ल्याने रानडे यांनी अप्पर भीमा नदी पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापक म्हणून काम करत असताना 'व्हीजन फॉर डेव्हलपमेंट ऑफ अप्पर भीमा बेसीन बाय २०२५' या महत्त्वपूर्ण नियोजन आराखड्याचे लेखन केले. या नियोजन आराखड्याचे सादरीकरण त्यांनी २००२ मध्ये काठमांडू येथे झालेल्या पहिल्या दक्षिण आशियायी जल परिषदेमधे केले. अशाप्रकारे एकाच खोऱ्याच्या जलव्यवस्थापनाचा सर्वंकश अभ्यास करून विकासाचे परिप्रेक्ष तयार करण्याचा हा जगातील पहिलाच प्रयत्न होता.

२००३ व २००४ मध्ये रानडे यांना स्टॉकहोम स्वीडन येथील 'वर्ल्ड वॉटर विक' वॉटर फेस्टीवल आणि २००५ व २००६ मध्ये ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथील 'इंटरनॅशनल रिव्हर फेस्टीव्हल'मध्ये शोध निबंध वाचण्यासाठी व पोस्टर प्रेझेंटेशनसाठी आमंत्रित करण्यात आले. २००४ मध्ये मॉस्को रशिया येथे झालेल्या कार्यशाळेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. २००५ मध्ये झेंगझाऊ, चीन येथे दुसऱ्या आंतराष्ट्रीय 'यलो रिव्हर फोरम मध्ये' भारताच्या नदीजोड प्रकल्पावरील शोधनिबंधवाचन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले.

'रानडे यांनी आजवर पन्नासहून अधिक शोधनिबंधांचे वाचन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये केले आहे. तसेच विविध शासकीय आणि अशासकीय संस्थांमध्ये तांत्रिक विषयावर ३५० पेक्षा

र

अधिक भाषणे दिली आहेत. 'पाणलोट क्षेत्र विकास तंत्र आणि मंत्र' हे पुस्तक त्यांनी २००४ मध्ये लिहून प्रसिद्ध केले. तर विविध मासिके आणि वर्तमानपत्रांमध्ये पाण्यासंबंधी सुमारे ८० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

आजवर सात पाटबंधारे प्रकल्पांसाठी रानडे यांनी लवाद म्हणून काम पाहिले असून एका जलविद्युत प्रकल्पाच्या 'डिस्प्युट रिसोल्युशन बोर्ड'चा सभासद म्हणून ते गेली आठ वर्षे काम पाहत आहेत. सुमारे ३०० कोटी रु. खर्चाच्या तारळी दगडी धरणाच्या कामावर गुणवत्ता नियंत्रण सल्लागार म्हणून त्यांनी सुमारे सहा वर्षे काम पाहिले. इथोपिया देशाच्या ७०००० हेक्टर सिंचन प्रकल्पाच्या संपूर्ण कालवा वितरण व्यवस्थेची संकल्पचित्रे रानडे यांनी तेथे राहून तयार केली. मार्च २००६ ते नोव्हेंबर २००९ या कालावधीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुक्यातील सिंचन अनुशेष निर्मूलन समितीवर पाटबंधारे तज्ज्ञ म्हणून त्यांनी सहभाग घेतला. गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी वाटप या विषयावरील समितीचे अध्यक्षापदही त्यांनी भूषवले. या समितीचा अहवाल डिसेंबर २०१० मध्ये शासनाला सादर करण्यात आला. महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील जागतिक बँक प्रकल्पांच्या धरण सुरक्षा समितीचे सल्लागार म्हणून ते २००६ पासून काम पाहत आहेत.

– संध्या लिमये

## ज्युलिओ फ्रान्सिस रिबेरो

**केंद्रीय पोलीस महासंचालक पोलीस महासंचालक पंजाब**

**५ मे १९२९**

ज्युलिओ रिबेरो यांचे घराणे मूळ गोव्यातले. त्यांचे पूर्वज हिंदू होते. १६ व्या शतकात पोर्तुगिजांनी त्यांचे धर्मांतर करविले. त्यांच्या पूर्वजांचा शिक्षणक्षेत्राशी जवळचा संबंध होता. त्यांच्या समाजात पदव्युत्तर शिक्षण घेण्याचा मान पहिल्यांदा त्यांच्या आजोबांनी



मिळविला. त्यांच्या वडिलांनीही मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात शिक्षण घेतले होते. अशा कुटुंबात रिबेरो यांचा जन्म झाला. मुळात त्यांना पोलिस सेवेमध्ये जाण्याची फारशी इच्छा नव्हती. त्यांनी केंद्रीय सेवेसाठी स्पर्धात्मक परीक्षा दिली होती. पण केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांनी दुसरा पर्याय दिला नव्हता. त्यावेळचे नियमच असे होते की ज्या उमेदवाराची निवड पोलिस सेवेसाठी झाली आहे त्याला दुसऱ्या केंद्रीय सेवेत जाण्याची मुभा नव्हती. ऑक्टोबर १९७३ मध्ये प्रशिक्षणासाठी माऊंटअबूला जावे असा संदेश रिबेरोंना मिळाला व त्यानुसार पोलिस प्रशिक्षण महाविद्यालयाच्या सुप्रसिद्ध संस्थेत ते दाखल झाले. १९५४ च्या नाताळपर्यंत त्यांनी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण केला. प्रत्यक्ष कामाची सवय व्हावी म्हणून एखाद्या जिल्ह्यात ६ महिने काम करावे लागे. त्यानुसार सध्या गुजरात राज्यात असणाऱ्या भडोच येथे रिबेरो यांना अतिरिक्त सहाय्यक पोलिस अधिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले.

प्रशिक्षण संपल्यावर त्यांच्यावर कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लजची जबाबदारी सोपविण्यात आली. पण चार महिन्यानंतर पश्चिम विभागाची सूत्रे हाती घेण्यासाठी त्यांची नाशिकला नेमणूक झाली. या नेमणूकीच्या काळात १९५६ साली त्यांना प्रथमच दंगल काळातील स्थिती हाताळण्याचा अनुभव मिळाला. जून १९५८ मध्ये रिबेरो यांनी मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याचा पोलिस अधिक्षक म्हणून सूत्रे हाती घेतली. तेथे असतानाच एप्रिल १९५९ मध्ये त्यांचा विवाह झाला. नंतर नोव्हेंबर १९५९ मध्ये त्यांचेवर शेजारच्या नांदेड जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली. अडीच वर्षे नांदेड, नंतर दोन वर्षे सोलापूर अशी सेवा झाल्यानंतर प्रथमच

र



पंजाब पोलीस

पोलिस अधिक्षक म्हणून शहरी भागात काम करण्यासाठी रिबेरो हे पुण्यात दाखल झाले. सुमारे १५ वर्षे वेगवेगळ्या जिल्ह्यांच्या ठिकाणी काम केल्यानंतर १९६८ साली त्यांची मुंबईला नेमणूक झाली. पुणे येथील नेमणूकीच्या काळात रिबेरो यांचा भारतीय सेनेशी निरनिराळ्या कारणांनी जवळून संबंध आला. पुण्याचे पोलिस अधिक्षक म्हणून वर्षभराचे काम केल्यानंतर शहरातील पोलिस यंत्रणेचा दर्जा वाढून तो आयुक्तालय श्रेणीचा करण्याचा प्रस्ताव देण्यासाठी त्यांना पोलिस महानिरीक्षकांनी सांगितले. पुढे हा प्रस्ताव स्वीकारण्यात येऊन १ जून १९६५ रोजी पुण्याचे पोलिस आयुक्तालय अस्तित्वात आले. ऑक्टोबर १९६८ मध्ये अखिल भारतीय संमेलन झाले. त्यावेळी शिबिराचे आयोजन करण्याची जबाबदारी रिबेरो यांचेकडे सोपविण्यात आली होती. ते संमेलन झाल्यानंतर त्यांना मुंबईतील आपल्या नव्या पदावर रूजू होता आले.

मुंबईत ४ वर्षे काम केल्यानंतर रिबेरो यांची हैद्राबाद येथे पोलिस उपमहानिरीक्षक म्हणून नेमणूक झाली. केंद्रीय राखीव पोलिस दलात २ वर्षे काम केल्यानंतर ते १९८२ मध्ये पुन्हा मुंबईचे पोलिस आयुक्त म्हणून नियुक्त झाले. मुंबईतील नेमणूकींच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखताना राजकीय पक्ष व कामगार नेते यांच्याशी कठोरपणे वागणेही भाग पडले. त्याचप्रमाणे टोळीयुद्धाचाही बंदोबस्त त्यांना करावा लागला. महिलांसाठी त्यांनी स्वतंत्र कक्ष उभारला. कठोर पावले उचलून विद्यार्थ्यांमध्ये पसरणाऱ्या अंमली पदार्थांच्या व्यसनालाही आळा घातला. १९८५ मध्ये त्यांनी मुंबईतील पदाची सूत्रे खाली ठेवली.

नंतर केंद्रीय राखीव पोलिसदलाचे महासंचालक म्हणून रिबेरो यांची नियुक्ती झाली. तथापि थोड्याच दिवसात दंगलग्रस्त गुजरातचे पोलिस आयुक्त म्हणून बढती देण्यात आली.

त्यानंतर रिबेरो यांचेकडे दहशतवादग्रस्त पंजाबचे पोलीस महासंचालक म्हणून विशेष जबाबदारी सोपविण्यात आली. तेथे सुवर्णमंदिर मुक्त करून शिरोमणी गुरूद्वारा प्रबंधक समितीच्या ताब्यात देण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. त्या कारवाईची देशभरातील वृत्तपत्रातून प्रशंसा झाली. मात्र त्यामुळे रिबेरो यांचेवर प्राणघातक हल्ला झाला होता व त्यांच्या पत्नीही गोळी लागून जखमी झाल्या होत्या. त्यानंतर पंजाबमध्येच त्यांना दोनदा मुदतवाढ देण्यात आली. मात्र ६० वय पूर्ण झाल्यामुळे त्यांनी निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली.

याच काळात त्यांना ‘ऑपरेशन ब्लॅक थंडर’ची पुनश्च सुवर्णमंदिरातील अतिरेक्यांचा बिमोड करण्याची जबाबदारी देण्यात आली. तेव्हा अतिरेक्यांच्या शरणागतीचा कार्यक्रम जगभर थेट प्रक्षेपित करण्यात आला होता.

निवृत्तीनंतर काही काळ रिबेरो यांचेकडे मिझोरामचे राज्यपालपद सोपविण्यात आले. त्यानंतर ४ वर्षांसाठी त्यांना रूमानिया येथे भारताचे राजदूत म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्या देशातही १९९१ साली शीख अतिरेक्यांनी त्यांच्या हत्येचा एक प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना रूग्णालयात राहावे लागले होते. रूमानियाचे राजदूत म्हणून रिबेरो यांचेकडे अल्बानिया आणि मालोव्हॉं या देशांचीही जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानंतर मात्र ते नवीन कामगिरी न स्वीकारता मुंबईत स्थायीक झाले.

– सविता भावे

* * *

र

# ल

## लिमये, शशिकांत दत्तात्रेय

**मुख्य अभियंता – कोकण रेल्वे, मंडल रेल्वे प्रबंधक**

**४ ऑगस्ट १९४९**



शशिकांत दत्तात्रेय लिमये यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे वडील दत्तात्रेय रामचंद्र लिमये हे पुण्यातील नावाजलेले सल्लागार अभियंता आणि मूल्यमापक होते.

शशिकांत लिमये यांची आई कुमुदिनी या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यालयाच्या पदवीधर होत्या. शशिकांत यांच्या वडिलांना पुरातत्त्व विज्ञान, इतिहास, शिवकालीन किल्ले, योग, वास्तुशास्त्र, अध्यात्म अशा विविध विषयांचा व्यासंग होता. घरी या सर्व विषयांच्या पुस्तकांचा मोठा संग्रह होता. घरात देशभक्तीचे वातावरण होते. शाळेत असताना स्काउट आणि महाराष्ट्र मंडळ, पुणे येथील सांघिक व्यायाम प्रकार, खेळ आणि इतर उपक्रमांचा त्यांना व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये खूप फायदा झाला.


लिमये यांचे शालेय शिक्षण पुणे येथील भावे प्राथमिक शाळा आणि न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. १९६५ ते १९६७ या कालावधीत त्यांनी पुणे येथील फर्गसन महाविद्यालय आणि सर परशुरामभाऊ महाविद्यालय येथून बी.एस्सी. पूर्ण केले.

१९७१ मध्ये त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून स्थापत्य अभियांत्रिकीची (बी.ई. सिव्हिल) पदवी घेतली. या अभ्यासक्रमात प्रथम क्रमांकात उत्तीर्ण होऊन त्यांनी ‘शारंगपाणी सुवर्णपदक’ मिळवले. १९७३ मध्ये त्यांनी मुंबई ‘आयआयटी’ मधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग या विषयात एम.टेक.चे शिक्षण पूर्ण केले.

भारतरत्न एम. विश्वेश्वरय्या यांचे चरित्र वाचून शशिकांत यांच्या मनात अभियांत्रिकी प्रशासक बनण्याची प्रेरणा निर्माण झाली. एक कुशल अभियंता समाजाला केवढ्या सुविधा प्राप्त करून देऊ शकतो, याची जाणीव त्यांना झाली. ‘हिराकूड’ प्रकल्पाचे जनक डॉ. खोसला, ‘नदी जोड’ प्रकल्पाची कल्पना मांडणारे डॉ. के.एल. राव यांच्या कार्याने ते प्रेरित झाले. या क्षेत्रात काम करताना सामाजिक आणि विकासात्मक सुधारणा करण्याची संधी आणि त्यामुळे घडणारी देशसेवा या सर्व गोष्टींमुळे शशिकांत यांनी भारतीय अभियांत्रिकी सेवेत काम करण्याचे ठरवले.

१९७३ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवेच्या परीक्षेमध्ये ते संपूर्ण देशात पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. भारतीय रेल्वे अभियांत्रिकी सेवेमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्याच वर्षी त्यांना अमेरिकेमध्ये उच्चशिक्षण घेण्यासाठी देण्यात येणारी अत्यंत मानांकित अशी ‘दोराब टाटा’ शिष्यवृत्ती मिळाली, तसेच अमेरिकेतील एका सुप्रसिद्ध विद्यापीठात प्रवेशही मिळाला. परंतु शशिकांत यांनी ही संधी ठामपणे नाकारून भारतीय रेल्वेमध्येच देशसेवा करण्याचा निर्णय घेतला. १९७१ मध्ये पश्चिम रेल्वेमध्ये त्यांची प्रथम नियुक्ती साहाय्यक अभियंता या पदावर करण्यात आली.

१९७७ ते १९७९ मध्ये लिमये प. रेल्वेमध्ये सवाई माधोपूर येथे साहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत होते. त्या वेळी त्यांनी सवाई माधोपूर जंक्शन व बाजार



**कोकण रेल्वे**

यांमध्ये असलेल्या सामाईक ड्रेनेजच्या आमूलाग्र सुधारणेची योजना अमलात आणली.

संयुक्त राष्ट्र विकास प्रकल्पाचा (युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) 'इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिज इंजिनिअरिंग' या संस्थेत पुणे येथे राष्ट्रीय उपप्रकल्प निर्देशक या पदावर त्यांनी काम केले. या प्रकल्पात लिमये यांच्यासह बारा रेल्वे अभियंत्यांना अमेरिका व इंग्लंडमध्ये वर्षभरासाठी आधुनिक पूल विज्ञानावर अभ्यास करण्याची संधी मिळाली. त्यानंतरही त्यांनी पाश्चात्त्य पूल तज्ज्ञांकडून पुण्यात विविध अभ्यासक्रम राबवून घेतले. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लिमये आणि त्यांच्या गटाने अविरत कष्ट घेतले. या प्रकल्पानंतर काही वर्षांनी त्यांची कोकण रेल्वेच्या मुख्य अभियंता पदावर नेमणूक झाली. १९९० ते १९९८ या कालावधीत लिमये यांनी कोकण रेल्वेत काम केले.

कोकण रेल्वे मार्गावरील सर्व पूल, बोगदे, खडीविरहित लोहमार्ग, यार्ड्स यांचे डिझाइन शशिकांत लिमये यांच्या मार्गदर्शनाखालीच पूर्ण झाले. या वेळी ज्येष्ठ अभियंता ई. श्रीधरन यांच्यासोबत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. कोकण रेल्वेच्या ७४० कि.मी. मार्गाच्या सर्वेक्षणापासून ते पूर्णत्वापर्यंत संपूर्ण बांधकामामध्ये लिमये यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पूल अभिकल्प व बांधकामातील अनेक नवीन कल्पना सत्यात उतरण्याची संधी लिमये यांना कोकण रेल्वे कॉर्पोरेशनमध्ये मिळाली. यांतील बऱ्याच कल्पना पुढे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, दिल्ली मेट्रो या ठिकाणी वापरण्यात आल्या. कोकण रेल्वेच्या कार्यकाळातील लिमये यांची अभिनव आणि सर्वोत्तम कामगिरी म्हणजे गोव्यातील मांडवी नदीवरील काम होय. मांडवी पुलाच्या आरेखन आणि नियोजनापासून ४०० मीटर लांबीचा अजस्र गर्डर 'बार्ज माउण्टेड क्रेन' वापरून, उचलून 'लॉन्च'करण्यात आला. स्वत: लिमये ही आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी मानतात.

१९८० मध्ये लिमये पश्चिम रेल्वेचे मुख्य अभियंता या पदावर काम करत होते. त्या वेळी पावसाळ्यात कोटा व मथुरेवरील एक पूल पुरात वाहून गेला व लोहमार्ग अवरुद्ध झाला. गाडीच्या लोहमार्गावरची खडी पुराने वाहून गेल्याने कोट्याहून दिल्लीकडे जाणारी फ्रँटिअर मेल कोटा-बीना-भोपाळ मार्गावर वळवली. परंतु दुर्दैवाने ती गाडी कोटागुणा सेक्शनमध्ये अडकली. रेल्वेच्या पुढील व मागील लोहमार्गावरची खडी पुराने वाहून गेली व मार्ग खचला. अशा आणीबाणीच्या प्रसंगी लिमये यांनी तातडीने सर्व सूत्रे हाती घेतली. लिमये स्वत:, वरिष्ठ रेल्वे-पथनिरीक्षक व सात-आठ गँगमनना घेऊन मोटर ट्रॉलीने सेक्शनमध्ये गेले. लोहमार्गाखाली खडी भरून लोहमार्ग सुरळीत केला गेला.

१९९८ ते १९९९ मध्ये शशिकांत लिमये द. पू. रेल्वेमध्ये कोलकाता येथे मुख्य रेल्वे पथ-अभियन्ता होते. १९९९ ते २००१ या काळात लिमये यांची नियुक्ती प. रेल्वेमध्ये अजमेर येथे 'मंडळ रेल्वे प्रबंधक' या पदावर झाली होती. याच वेळी त्यांच्यावर रेल्वे मंत्रालयात सहसचिव जबाबदारीदेखील होती.

अजमेर शहरातील जवळजवळ २५% जमीन रेल्वेच्या अखत्यारीत आहे. अजमेर शहराच्या विकास नियोजनामधील रस्ते व सांडपाण्यासंबंधीच्या योजना अमलात आणताना अजमेरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या साहाय्याने रेल्वे मंडळ प्रबंधक या नात्याने त्यांनी रेल्वेसंबंधीच्या अडचणी तातडीने दूर केल्या.

आपले काम सचोटीने करणाऱ्या शशिकांत लिमये यांना कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातच स्वत्त्वाची

ल

कसोटी घेणारा अनुभव आला. सवाई माधोपूर येथे साहाय्यक अभियंता असताना कंत्राटदाराचे काम तपासून बिले देण्याची जबाबदारी लिमये यांच्यावर होती. एक बिल पास केल्यावर एका कॉन्ट्रॅक्टरने लिमये यांना काही रक्कम देऊ केली. परंतु लिमये यांनी आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहून ती नाकारली. यामुळे ही बातमी सर्व कॉन्ट्रॅक्टरांमध्ये पसरून पुन्हा त्यांना लाच देण्यास कोणीही धजले नाही. सरकारी सेवेत काम करताना तुम्हांला भ्रष्ट बनवण्यासाठी अनेक लोक टपलेले असतात; परंतु आपण आपल्या निर्णयावर ठाम राहिल्यास आपले कोणीही काही वाकडे करू शकत नाही, उलट आपल्याबद्दलचा आदर अधिक वृद्धिंगत होतो याचे उदाहरण लिमये यांनी घालून दिले. २००१ मध्ये शशिकांत लिमये वयाच्या एकावन्नाव्या वर्षी 'मंडळ रेल्वे प्रबंधक' ह्या पदावरून निवृत्त झाले. २००१ ते २००६ या कालावधीत त्यांनी 'ओवन विल्यम्स' या ब्रिटिश फर्ममध्ये लंडन-ग्लासगो रेल्वेमार्गाच्या सुधारित डिझाइनचे काम केले.

२००६ पासून आतापर्यंत ते 'स्तूप कन्सल्टंट' या सुप्रसिद्ध इंडो- फ्रेंच कंपनीत कार्यकारी निर्देशक या पदावर कार्यरत आहेत. त्या योगे नवीन पिढीतील अभियंत्यांना त्यांच्या पुलाचे डिझाइन या क्षेत्रातील अनुभवांचा फायदा होत आहे. त्याचबरोबर भारतीय रेल्वेमध्येदेखील अनेक समित्यांवर ते मार्गदर्शक म्हणून काम करत असून आपल्या ज्ञानाचा उपयोग करीत आहेत. सध्या ते एम.एम.आर.डी.ए.च्या 'मोनोरेलसाठीच्या' तांत्रिक सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणून काम पाहत आहेत.

शशिकांत लिमये यांच्या कामगिरीबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. १९९६ मध्ये त्यांना इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे 'एस. बी. जोशी स्मृती पारितोषिक' देण्यात आले. २००० मध्ये मुंबई आय.आय.टी.चा सन्माननीय वैशिष्ट्यपूर्ण 'माजी विद्यार्थी पुरस्कार' देऊन त्यांना गौरवण्यात आले. १९९८ मध्ये कोकण रेल्वे उभारणीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना 'कोकण रेल्वे प्रॉजेक्ट पदक' देण्यात आले. लिमये यांना पर्यटनाची आणि ऐतिहासिक वास्तू पाहण्याची आवड आहे. सध्या ते मुंबई येथे स्थायिक झाले आहेत.

– संध्या लिमये

* * *

ल

# व

## वैद्य, विद्याधर गोविंद

**संचालक – केंद्रीय गुप्तहेर खाते**

**२५ जुलै १९३६**



विद्याधर गोविंद वैद्य हे इंटेलिजन्स ब्युरो ऑफ इंडिया या भारतीय गुप्तहेर संस्थेच्या संचालक पदावर नियुक्त झालेले आतापर्यंतचे एकमेव महाराष्ट्रीयन पोलीस अधिकारी आहेत. त्यांचा जन्म मध्य प्रदेशातल्या बऱ्हाणपूर इथं झाला. गोविंद कृष्ण आणि राधाबाई वैद्य हे त्यांचे आई-वडील अकाली निवर्तल्यानं त्यांचे संगोपन वडीलबंधूंनी केले. मध्य प्रदेशात बंधूंची नोकरी फिरस्तीची असल्यानं त्यांचे शालेय शिक्षण मुख्यत्वेकरून नागपूर, रायपूर आणि जबलपूर येथे मराठी आणि हिंदी माध्यमातून झालं. महाविद्यालयीन शिक्षण नागपूरला झालं. नागपूर विद्यापीठाची संपूर्ण गणित या विषयाची एम.एस्सी.पदवी त्यांनी १९५६ साली सुवर्णपदकासह प्रथम क्रमांकाने प्राप्त केली.

पदवी मिळाल्यावर १९५६ ते १९५८ या काळात वैद्य यांनी नागपूरच्या सायन्स महाविद्यालयात व्याख्याता म्हणून अध्यापनाचं काम केलं. नोकरी करत असतानाच त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यु.पी.एस.सी.) परीक्षेची तयारी केली. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांची निवड भारतीय पोलीस सेवेत झाली आणि निवृत्त होईपर्यंत ते याच सेवेत कार्यरत होते. पोलीस सेवेच्या आवश्यक प्रशिक्षणानंतर १९५९ साली साहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून त्यांची पहिली नियुक्ती सुरत इथं झाली. नोव्हेंबर १९५९ ते मार्च १९६२ या काळात याच पदावर त्यांनी पुणे आणि कोल्हापूर इथंही काम पाहिलं. त्यानंतर वैद्यांची केंद्र शासनाच्या गुप्तहेर विभागात प्रतिनियुक्तीवर नेमणूक झाली आणि त्याच विभागाच्या संचालक पदावरून ते निवृत्त झाले.

गुप्तहेर खात्याच्या कामाचं स्वरूप नावाप्रमाणेच गुप्त आणि त्याचबरोबर संवेदनशील असल्यानं खास नोंद घेण्याजोगी कामगिरी केली असली तरी त्याची सविस्तर माहिती जाहीर करण्याबाबत प्रशासकीय मर्यादा आहेत. देशांतर्गत सुरक्षा अबाधित राहावी यासाठी देशभरच्या समाजविरोधी घटकांबद्दल गुप्त पद्धतीने माहिती संकलित करून त्यांचा बिमोड करणे हे या संघटनेचे प्रमुख कार्य आहे. सारांशाने नोंद घ्यायची झाली तर देशांतर्गत घडलेल्या अनेक संवेदनशील घटनांसंदर्भात वैद्य यांचं प्रशासकीय प्रक्रियेतील योगदान महत्त्वाचं ठरलं आहे.

‘विविधतेत एकता’ हे खंडप्राय भारतीय समाजरचनेचं खास वैशिष्ट्य आहे. असं असून देखील देशात राजकीय, धार्मिक परंपरा, भाषा, प्रादेशिक अस्मिता, जातिभेद, वर्णभेद, सीमावाद, नद्यांचं पाणीवाटप, दहशतवाद, नक्षलवाद, प्रचंड आर्थिक विषमता आणि इतर अनेक कारणांमुळे अगदी गाव पातळीवरही हिंसाचार उफाळतो, हा अनुभव आहे. अशा घटना घडू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक पूर्व माहिती संकलन आणि घडल्यानंतर त्याची सखोल चौकशी हे भारतीय गुप्तहेर संस्थेचे मुख्य कार्य आहे. हे काम देशभर नेमलेल्या मनुष्यबळाच्या माध्यमातून गुप्तपणे करावे लागते. अशा प्रकारे जमवलेली माहिती

देशभराच्या कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या विविध यंत्रणांपर्यंत जलद पोहोचवणं हा गुप्तहेर संस्थेच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो.

गुप्तहेर संस्थेचे संचालक असताना वैद्य यांनी आपल्या कार्याचा एक भाग असलेल्या इमिग्रेशन प्रक्रियेचे संगणकीकरण करण्याची अत्यंत मोलाची कामगिरी केली. यामुळे देशातल्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवरच्या प्रत्येक प्रवाशाबद्दल सर्व प्रकारची माहिती आता स्थानिक कार्यालयात लगेच नोंदवली जाते. यामुळे धोकादायक समाजविरोधी, विशेषत: आंतरराष्ट्रीय दहशतवादी घटकांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना मिळते आणि ते वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करू शकतात.

संचालक असताना वैद्य यांनी सुरक्षाविषयक अनेक आंतरराष्ट्रीय संमेलनं आणि परिषदांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केले आहे. यापैकी टोकियो इथं जून १९८७ ला झालेली इंटरपोल आणि युगांडात कंपाला इथं जून १९९३ ला भरलेली राष्ट्रकूल देशांची सुरक्षा परिषद या विशेष नोंद घेण्याजोग्या होत्या. याशिवाय निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांच्या एका अभ्यास गटानं त्वरित पोलीस चौकशी आणि त्यानंतर जलद न्यायालयीन प्रक्रिया या विषयावर अहवाल तयार केला होता. या अहवालाचे सहलेखन वैद्य यांनी केलं. राष्ट्रीय आणि इतर सुरक्षा या विषयावर त्यांनी संरक्षण प्रबोधिनीत व्याख्यानं दिली आहेत. याच विषयावर वैद्य यांचे अनेक लेख प्रकाशित झाले आहेत.

आपल्या सेवा काळात त्यांनी १९७८ ला राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी संस्थेत सुरक्षेसंबंधी एक वर्षाचं प्रशिक्षण घेतलं. तसंच भारतीय सार्वजनिक प्रशासन अध्यासनात सहा आठवड्यांचा कोर्स केला. संगणक प्रणाली संदर्भात सखोल ज्ञानही त्यांनी आत्मसात केले. परदेशातील सुरक्षा विषयक प्रशिक्षणातही वैद्य सहभागी झाले.

पोलीस सेवेतल्या कालखंडात वैद्य यांना भारतीय पोलीस सेवा पदक, खास कामगिरीसाठी राष्ट्रपतींचं उत्कृष्ट सेवा पोलीस पदक आणि निरनिराळ्या विभागातल्या नोंद घेण्याजोग्या कार्यासाठी विशेष पोलीस पदक असे तीन पुरस्कार मिळाले आहेत.

– सुधाकर कुलकर्णी

## व्ही. पी. राजा

***वीरराघवन पक्षीराजा***

**संचालक, महाराष्ट्र विद्युत – नियामक मंडळ**

**५ सप्टेंबर १९४८**



व्ही. पी. राजा यांचा जन्म केरळ राज्यातील कोट्टेंकल येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मी असे होते. पक्षीराजा म्हणजे गरुड होय. वडिलांचे नाव वीरराघवनमधील व्ही. हे आद्याक्षर आणि पक्षीराजा या त्यांच्या नावातील पी. हे आद्याक्षर लावून व्ही. पी. राजा असे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांचे वडील वीरराघवन हे भारत सरकारमध्ये नोकरीला होते. राजा यांनी दिल्ली येथील सेंट स्टीफन्स महाविद्यालयातून १९६७ साली भौतिकशास्त्र या विषयात बी.एस्सी. पूर्ण केले व नंतर एम.एस्सी.ची पदवी १९७१ मध्ये तेथूनच प्राप्त केली. याच वर्षी त्यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठातून भौतिकशास्त्रातच एम.ए.ची पदवी संपादन केली. तसेच १९८८ साली त्यांनी इंग्लंडमधील ईस्ट अँग्लिया विद्यापीठातून 'ग्राम विकास योजना' या विषयात एम.ए. केले. नंतर पंजाब विद्यापीठामधून १९९६ साली सामाजिक शास्त्र या विषयात एम.फील. पूर्ण केले. १९७६ मध्ये ते केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले.



अणुऊर्जा प्रकल्प

त्यांना महाराष्ट्र कॅडर मिळाले आणि त्यांची प्रथम नियुक्ती औरंगाबाद येथे उपजिल्हाधिकारी या पदावर करण्यात आली.

राजा यांच्या कार्यपद्धतीचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांना आपल्या कार्यकाळात ज्या पदावर नियुक्त करण्यात आले त्या विभागात त्यांनी अनेक अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणल्या. त्यांनी केलेले हे काम अत्यंत मूलभूत स्वरूपाचे असून त्या त्या विभागाच्या विकासाला दिशा आणि चालना देणारे ठरले आहे.

१९८० ते १९८२ सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत असताना त्यांनी अनेक प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यामध्ये पुढाकार घेतला. त्यांच्या कामाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात येऊन त्यांनी अवलंबलेली ही पद्धत देशभर प्रसिद्ध झाली आहे.

१९८२ ते १९८६ या कालावधीत राजा महाराष्ट्राचे वाहतूक आयुक्त होते. या कार्यकालात त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणजे सर्व वाहनांसाठी पीयूसीचे (पोल्यूशन अंडर कंट्रोल) प्रमाणपत्र असणे बंधनकारक केले. तसेच रस्त्यावरून वाहतूक होणाऱ्या धोकादायक (हॅझर्डस् गुडस्) वस्तू/मालासंदर्भात कायदे आणि नियम तयार केले.

लोकप्रशासनातील विशेष योगदानाबद्दल राजा यांना १९८७ साली 'चिन्मुलगुंद डिस्टींगविश गव्हर्नमेंट ॲडमिनिस्ट्रेशन' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा प्रशासकीय अधिकाऱ्यांना मिळणारा सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. १९८७ साली वित्त विभागाचे (महाराष्ट्र) सह सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी महाराष्ट्राला दिलेले महत्त्वाचे योगदान म्हणजे शून्याधारित अर्थसंकल्प (झीरो बजेट) ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. १९८८ ते ९० या कालावधीत ग्रामीण विकास विभागाचे सह सचिव असताना राजा यांनी जवाहर रोजगार योजना कार्यक्षमपणे राबवली.

१९९० चे दशक म्हणजे माहिती तंत्रज्ञान आणि संगणक यांच्या प्रसाराचे दशक मानले जाते. जुलै १९९० ते डिसेंबर १९९० या काळात राजा यांनी महाराष्ट्रभर सर्व विभागांच्या मुख्यालयात मनुष्यबळ विकास प्रशिक्षण दिले. तसेच त्यांनी मुंबईतील झोपडपट्टीवासियांना घरे उपलब्ध करून देण्याच्या योजनेमध्ये महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला.

राजा यांनी आपल्या सर्वच योजनांमध्ये प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे मार्च १९९९ ते जून १९९९ या फक्त ३ महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्र उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी महाराष्ट्रातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रवेश शुल्काच्या रचनेमध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण भागातील स्वच्छतेसाठी महाराष्ट्र सरकारने आखलेली 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' ही योजना राजा हे पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण या विभागाचे सचिव असताना साकार झाली.

२००२ ते २००८ या कालावधीत राजा केंद्र सरकारच्या अणू ऊर्जा विभागाचे सहसचिव आणि मुख्य सल्लागार म्हणून कार्यरत होते. याचवेळी ते युरेनियम पुरवठा वृद्धी समितीचे सदस्य सचिव होते. या पदावर असताना त्यांनी अणू ऊर्जा आयोगाला दिलेले पथदर्शी योगदान म्हणजे या समितीचा समन्वय

व

करणे आणि तिच्या कामकाजाचा मूल्यमापनात्मक अहवाल तयार करणे. त्यांनी तयार केलेले हे अहवाल युरेनियम खाणी आणि युरेनियम उत्खननाच्या भविष्यातील कामासाठी पथदर्शी ठरत आहेत. अणू ऊर्जेच्या माध्यमातून विद्युत निर्मिती करण्यासाठी ते विशेष आग्रही भूमिका घेत असत. अणू ऊर्जा निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियमचे उत्खनन आणि आवश्यक पुरवठा करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. जानेवारी ९१ ते जून ९१ या कालावधीत राजा यांनी केंद्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मोहन धारिया यांचे सचिव म्हणून काम पाहिले.

जुलै १९९१ ते ९३ या कालावधीत राजा यांची नियुक्ती केंद्रीय संरक्षण मंत्र्यांचे स्वीय सचिव या पदावर करण्यात आली. राजा यांनी या पदावर असताना देशाच्या तिन्ही संरक्षण दलांसाठी आवश्यक साहित्यांच्या खरेदी करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. १९९६ ते १९९७ या वर्षी राजा हे महाराष्ट्राच्या व्यापार आणि वाणिज्य मंत्रालयाचे सचिव होते. यावेळी 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र' या बॅनर खाली मुंबई येथे 'ग्लोबल इन्व्हेस्टर्स कॉन्फरस' भरवण्यात आली होती.


१९९७ ते ९९ या कालावधीत महाराष्ट्राच्या गृहनिर्माण आणि विशेष सहायता विभागाचे सचिव म्हणूनही राजा यांनी महत्त्वपूर्ण काम केले. आपल्या कार्यकालात राजा यांनी स्वत:बरोबर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यामध्ये विशेष रस घेतला.

'झिरो बजेट इन महाराष्ट्र', 'टेकनिक ऑफ झिरो बेस्ड बजेटिंग', 'द पोलिटिकल इकोनॉमी इन डेअरी डेव्हलपमेन्ट इन महाराष्ट्र', 'स्टेट फायनान्स अँड इकोनॉमिक रिफॉर्मस्' ही राजा यांनी लिहिलेली पुस्तके महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरणारी आहेत. २००८ मध्ये अणू ऊर्जा विभागाचे मुख्य सल्लागार, या पदावरून निवृत्त झाल्यावर त्यांच्या प्रशासकीय कौशल्यांचा व अनुभवांचा उपयोग व्हावा यासाठी त्यांची नेमणूक महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाचे संचालक या पदावर करण्यात आली.

– संध्या लिमये

## व्ही. श्रीनिवासन

**सार्वजनिक आरोग्य सचिव – महाराष्ट्र राज्य**
**व्यवस्थापकीय संचालक**
**सिकॉम सोस्व्हा, सिडको**
**१९ ऑगस्ट १९३० – २५ ऑक्टोबर २००६**



महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या भौगोलिक विकेंद्रीकरणात मोलाचे योगदान देणाऱ्या व्ही. श्रीनिवासन यांचा जन्म तामीळनाडूच्या तंजावर जिल्ह्यात असलेल्या कोम्बूर या गावी झाला. वेदान्त देसिकन हे त्यांच्या वडिलांचे नाव होते. श्रीनिवासन यांनी मुंबई विद्यापीठाची रसायन अभियांत्रिकी पदवी १९५१ मध्ये प्राप्त केली. आपल्या प्रशासकीय सेवाकाळातच श्रीनिवासन यांनी १९६५ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून आर्थिक आणि सामाजिक प्रशासन या विषयात पदविका मिळवली.

भारतीय प्रशासन सेवेत निवड झाल्यावर त्यांनी अकोल्याचे जिल्हाधिकारी म्हणून १९५१ मध्ये पदभार स्वीकारला. त्यानंतर १९६२ ते १९७२ दरम्यान श्रीनिवासन यांनी राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ (स्टेट इंडस्ट्रियल अॅण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र म्हणजेच सिकॉम) या महाराष्ट्र शासनाच्या नव्या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून सूत्रे स्वीकारली. सिकॉमबरोबरच जुळ्या मुंबईच्या निर्मितीसाठी सिडको (सिटी अॅण्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) स्थापन करण्यातही त्यांचाच पुढाकार होता. मधली काही वर्षे श्रीनिवासन

सोस्वा

यांची अफगाणिस्तानात नियुक्ती झाली. तेथे त्यांनी बँक-ई-सनाती-ई अफगाणिस्तानची स्थापना केली. याशिवाय त्यांनी नायजेरियात हेल्थ सिस्टिम फंडही निर्माण केला. भारतात परतल्यावर १९८१ मध्ये त्यांची महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य सचिव म्हणून नियुक्ती झाली. या पदाचा कार्यभार त्यांनी १९८६ पर्यंत सांभाळला. त्यानंतर श्रीनिवासन यांनी राज्यात कार्यरत असणाऱ्या अशासकीय सेवाभावी संस्थांसाठी सोसायटी फॉर सर्व्हिस टू व्हॉलंटरी एजंसिज (सोस्व्हा) या संस्थेची उभारणी केली. ते स्वत: २००६ पर्यंत सोस्व्हाचे संस्थापक-मुख्य अधिकारी या पदावर कार्यरत होते. सोस्व्हाच्या कामाचा एक भाग म्हणून स्थापण्यात आलेल्या सोस्व्हा ट्रेनिंग अँड प्रमोशन इन्स्टिट्यूट च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी भरीव योगदान दिले.

औद्योगिकदृष्ट्या महाराष्ट्र आघाडीवर असला तरी कारखान्यांचे जाळे फक्त मुंबई-पुण्यापुरतेच मर्यादित आहे याची जाणीव श्रीनिवासन यांना होती. त्या काळी कारखानदारीला अत्यावश्यक अशा उत्तम पायाभूत सुविधा मुंबई-पुणे विभागातच असल्याने बहुतेक सर्व उद्योजक आपल्या आस्थापनांसाठी या पट्ट्यालाच प्राधान्य देत. याचा परिणाम म्हणून राज्याचा इतर भाग औद्योगिक प्रगतीपासून वंचित राहिला. शिवाय वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई-पुण्यात जटिल नागरी समस्या उभ्या झाल्या.

पुणे-मुंबई विभागात झालेल्या प्रचंड औद्योगिकीकरणामुळे रोजगारासाठी देशभरातून वाढत्या संख्येने या शहरात येणाऱ्या नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा पुरवणे दिवसेंदिवस दुरापास्त होईल हे त्यांनी ओळखले होते. यावर मोठ्या उद्योगांना हव्या त्या पायाभूत सुविधा राज्याच्या मागासलेल्या भागात विकसित करणे हा एकच उपाय आहे हे त्यांच्या मनावर बिंबले होते. अशा सुविधा फक्त शासनाच्या पुढाकारानेच निर्माण करता येतात याची श्रीनिवासन यांना खात्री होती.

या विचाराने श्रीनिवासन यांनी मुंबई-पुण्याला पर्याय म्हणून राज्याच्या इतर महत्त्वाच्या शहरांत उद्योगांचे भौगोलिक विकेंद्रीकरण करावे अशी कल्पना शासनापुढे मांडली. उत्तम दर्जाच्या पायाभूत सोयी, प्रस्थापित सवलतींपेक्षा नव्या आणि उद्योजकांना आकर्षित करणाऱ्या आर्थिक सवलती या प्रमुख सूत्रांवर आधारित प्रोत्साहनपर योजना आखून त्यांनी 'सिकॉम'ची स्थापना केली. सिकॉमची ही कार्यपद्धती देशातली पहिलीच अशी प्रणाली होती, की ज्यामुळे देशात औद्योगिक भांडवलाचा ओघ अविकसित भागाकडे वळला. परिणामी, राज्यातली नागपूर, औरंगाबाद, नाशिक, तारापूर, कोल्हापूर, जळगाव, धुळे, सोलापूर आणि चंद्रपूर ही सिकॉमच्या माध्यमातून विकसित झालेली नवी शहरे आता उद्योजकांना आकर्षित करत आहेत.

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी मुंबई बेटापलीकडे असलेल्या राज्याच्या मुख्य भूभागावर नवी मुंबई निर्माण करणे अत्यावश्यक आहे हे श्रीनिवासन यांनी ओळखले होते. ही कल्पना त्यांनी तत्कालीन शासनकर्त्यांना पटवून दिली आणि त्याचा परिणाम म्हणून 'सिडको' स्थापन झाली. सुरुवातीला खाडीवर पूल बांधून वाशी गाव मुंबईला जोडण्यात आले. सिडकोमार्फत वाशीत मुख्यत: निवासी वस्ती उभी झाली. हळूहळू नवी मुंबई थेट बेलापूरपर्यंत विस्तारली. यात औद्योगिक आस्थापनांचाही समावेश झाला आणि आज हा पूर्ण पट्टा विकसित झालेला आपण पाहत आहोत.

श्रीनिवासन यांच्या दूरदर्शी धोरणामुळे सिकॉम आणि सिडको या महाराष्ट्राने उभारलेल्या दोन संस्था संपूर्ण देशासाठी आदर्श ठरल्या. सिकॉमचे यश पाहून

व

बहुतेक सर्व राज्यांनी तशीच महामंडळे आपल्या भौगोलिक कार्यक्षेत्रात स्थापन केली. सिडकोने विकसित केलेली नवी मुंबई बघून इतर राज्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात तशीच जुळी शहरे उभी करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपवण्याचा मार्ग स्वीकारला.

राज्याच्या ग्रामीण विभागात कृषिविकासाला चालना मिळावी या उद्देशाने श्रीनिवासन यांनी सिकॉमची उपकंपनी महाराष्ट्र ॲग्रिकल्चर आणि फर्टिलायझर प्रमोशन कॉर्पोरेशन 'मॅफको'ची उभारणी केली. फळ-फूल बागायत आणि कुक्कुटपालन या शेतीला पूरक अशा उत्पादकांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे काम ही उपकंपनी आजही करते आहे.

चंद्रपूर हा विदर्भाचा अतिशय खनिजसमृद्ध जिल्हा आहे. इथल्या खनिज संपत्तीचे मूल्यवर्धित उत्पादनात रूपांतर करून चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र इलेक्ट्रो स्मेल्ट' कंपनीची स्थापना झाली. या कारखान्यात कच्च्या लोखंडापासून स्पाँज आयर्नची निर्मिती केली जाते. अशा प्रकारे स्थानिक खनिज संपत्तीचा योग्य तो उपयोग केल्याने चंद्रपूर जिल्ह्यात आज अनेक पूरक उद्योग उभे राहिले आहेत.

औद्योगिक क्षेत्राबरोबरच श्रीनिवासन यांनी राज्याच्या आरोग्य विभागातही भरीव कामगिरी नोंदवली आहे. शासनाने त्यांना काही काळ अमेरिकास्थित जागतिक बँकेत प्रतिनियुक्तीवर पाठवले होते. तिथून परतल्यावर शासनाने त्यांना औद्योगिक सचिव किंवा न्हावा-शेवा पोर्ट ट्रस्ट अध्यक्ष ही पदे देऊ केली होती.

श्रीनिवासन यांनी मात्र, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करण्याच्या आंतरिक इच्छेनुसार, आपणहून राज्याच्या आरोग्य विभागाचे सचिव या पदावर नियुक्ती मागितली. पाच वर्षे ते राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव होते. राज्यातल्या ग्रामीण भागांत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या आणि दर्जा यांत त्यांनी गुणात्मक बदल घडवून आणले. याच्या जोडीला कुटुंब नियोजन कार्यक्रमाचा प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला. याबाबतची खाली दिलेली आकडेवारी ही श्रीनिवासन यांनी केलेल्या कार्याचे प्रतिबिंब आहे : प्राथमिक आरोग्य केंद्रांची १९८२ मध्ये ४७७ असलेली संख्या १९८५ मध्ये १५३९ झाली. कॉटेल आणि ग्रामीण रुग्णालयांचा १९८४ मध्ये असलेला आकडा १४७ वरून १९८६ मध्ये २७७ झाला. प्राथमिक आरोग्य केंद्रांवर आजारानंतरच्या उपचारांबरोबरच रोगप्रतिबंधक सुविधा उपलब्ध झाल्या. संसर्गजन्य रोगप्रतिबंधक लसीकरण, माता आणि बालक यांच्या आरोग्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजनांची सुरुवात आणि त्यांचा प्रचार घडून आला. आणीबाणीमुळे थंडावलेल्या कुटुंबनियोजन मोहिमेला लोकांना स्वीकारार्ह होईल अशा पद्धतीने पुन्हा चालना दिली. केंद्र शासनाकडून कुटुंब नियोजनात लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल सलग दोन वर्षे राज्याला सर्वोत्तम कामगिरीचे नामांकन मिळाले. आरोग्य क्षेत्रात काम करताना ध्येयपूर्तीसाठी श्रीनिवासन यांनी अनेक नावीन्यपूर्ण योजना अमलात आणल्या. राज्यकोषातल्या एकूण अवांतर खर्च निधीपैकी शक्य होईल तेवढा निधी त्यांनी ग्रामीण आरोग्यसेवांचा दर्जा आणि क्षमता सुधारण्यासाठी वळवला. आर्थिक अनुदानाचा वापर करण्याऐवजी परिणामकारक प्रचारमाध्यमातून कुटुंबनियोजनाबाबत जनतेची मानसिकता अनुकूल करण्यावर त्यांनी भर दिला.

राज्यातल्या समाजसेवी संस्थांना एका व्यवस्थापकीय सूत्रात बांधण्यासाठी श्रीनिवासन यांच्या 'सोस्व्हा' या संस्थेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले. अत्यंत सुस्पष्ट विचार, समाजसेवेचा ध्यास, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन तंत्र आणि नावीन्यपूर्ण योजना यांच्या आधारावर श्रीनिवासन यांनी सोस्व्हामार्फत सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात स्वयंसेवी संस्थांना मोलाची मदत देऊन परिणामकारक मार्गदर्शन केले.

वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत असलेल्या संस्थांसाठी योग्य त्या सेवा प्रकल्पांची आखणी आणि कार्यवाही, व्होलॅक्ट या उपसंस्थेमार्फत स्वयंसेवकांची निवड आणि नियुक्ती, प्रत्येक समाजसेवी यंत्रणेसाठी आवश्यक ती सर्व आरोग्य उपकरणे आणि औषधांची आयात आणि पुरवठा, स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षणाची सोय, संशोधन केंद्र, स्वतंत्र निधी उभारणी, हाती घेतलेल्या कार्याची प्रगती आणि उपयुक्ततेचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र समिती ही सर्व जबाबदारी श्रीनिवासन यांनी यशस्वीपणे पेलली.

एकूणच महाराष्ट्राच्या शासकीय सेवेत जुळ्या मुंबईची निर्मिती, जिल्हास्तरावर अनेक नव्या औद्योगिक शहरांची जडणघडण आणि जनतेच्या आरोग्य संवर्धनासाठी भरीव कामगिरी ही प्रशासकीय अधिकारी म्हणून श्रीनिवासन यांची खास बलस्थाने ठरली.

– परिणीता कानेटकर

## व्ही. सुब्रमनियन

**सचिव–महाराष्ट्र योजना विभाग**

**२६ जानेवारी १९१९ – २९ मार्च २००३**



सुब्रमनियन यांचा जन्म तामिळनाडू प्रांतातील शिवगंगा येथे जन्म झाला. त्यांचे शिक्षण व कार्य मात्र महाराष्ट्रातच झाले. त्यांच्या आईचे नाव अलमेलू. सुमारे ९० वर्षांपूर्वी त्यांचे वडील विद्यानाथन मुंबईस आले व त्यांनी बी.ए. झाल्यावर इंडियन ऑडिट अँड अकाउंट सर्व्हिसमध्ये नोकरी केली. ते 'सिनियर डेप्युटी अकाउंटंट जनरल' या पदापर्यंत पोहोचले.

सुब्रमनियन हे त्यांच्या पाच भावंडातील पहिले. त्यांचे शिक्षण एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये झाले. इंग्रजी साहित्यात पहिल्या क्रमांकाने त्यांनी एम.ए. ही पदवी मिळविली. अशी पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय. पुढे त्यांनी एलएल.बी. ही पदवी पहिल्या क्रमांकाने मिळविली. या दोन्ही परीक्षांत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. सुब्रमनियन यांनी आय.सी.एस.परीक्षा दिली. पण दृष्टिक्षमता कमी (उणे नऊ) असल्याने ब्रिटिश सरकारने त्यांना अधिकारपद देणे नाकारले.

ते नाराज झाले पण त्यांचे प्रयत्न चालूच होते. भारतीय सैनिक विभागात ते अधिकारी झाले. टाटांनी त्यांना टिस्कोमध्ये मानाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी पद देऊ केले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी इंग्रज काळात शारिरीक अक्षमता यावर नोकरी नाकारली गेलेल्यांना पत्र पाठवून बोलावून घेतले. सुब्रमनियन यांनी या सुवर्णसंधीचा फायदा घेतला.

त्यांनी पोस्ट – असिस्टंट कलेक्टर विजापूर (१९४७ ते १९४९), संयुक्त निबंधक सहकारी संस्था (१९४९ ते १९५७), संयुक्त वस्त्रनिर्माण आयुक्त (१९५७ ते १९६१), खादी ग्रामोद्योग–प्रमुख कार्यकारी अधिकारी (१९६१ ते ६७–१९६८), विक्रीकर आयुक्त (१९६९ ते १९७०), व्यवस्थापकीय संचालक–महाराष्ट्र राज्य शेतकी महामंडळ (१९६९–१९७०), सचिव–महाराष्ट्र योजना विभाग (१९७० ते १९७४) व अतिरिक्त सचिव (१९७४ ते १९७७) अशी विविध पदे भूषविली.

नंतर ते महसूल खात्यात दुष्काळ पीडितांचे कार्यालयामध्ये सचिव होते. येथील कामाच्या अनुभवावर त्यांनी 'पर्चड अर्थ' (तहानलेली पृथ्वी) असे पुस्तक लिहिले. त्यावर त्यांना डॉक्टरेटही पदवी मिळाली. त्यास देशातील व आंतरराष्ट्रीय स्तरातील तज्ज्ञांची मान्यता मिळाली. देशविदेशात दुष्काळ या प्रश्नावर या पुस्तकाचा संदर्भ नेहमी घेतला जातो.

ते माटुंगा मतदारसंघाचे दहा वर्षे आमदार होते. राज्य योजना मंडळाचे १९८०–१९८१ मध्ये उपाध्यक्ष

व

होते. या शिवाय १९८१ ते १९९३ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र राज्याचे वित्तमंत्री पद, गृहनिर्माण व नागरी विकास खात्याचे मंत्रीपद, ऊर्जा, अन्न व नागरी पुरवठा खात्याचे पद भूषविले. १९९० ते २००३ मध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व बजाज प्रतिष्ठान यांचे ते संचालक होते. तसेच ते २७ वर्षे षण्मुखानंद सभेचे अध्यक्ष होते तर १५ वर्षे विश्वस्त मंडळाचे सदस्य अध्यक्ष होते.

– रोहिणी गाडगीळ

* * *

व

# श

## शिंदे, शशांक चंद्रसेन
**पोलीस निरीक्षक – मुंबई पोलीस**
**८ ऑक्टोबर १९६२ – २६ नोव्हेंबर २००८**



मुंबईवर झालेल्या २६ नोव्हेंबर २००८ च्या दहशतवादी हल्ल्यात छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे शहीद झालेले पोलीस निरीक्षक शशांक शिंदे हे त्या हल्ल्यात बळी पडलेले पहिले अधिकारी.

रत्नागिरीतील चिपळूणमधील रिक्तोली या मूळ गावी जन्मलेल्या शशांक चंद्रसेन शिंदेंचे शालेय शिक्षण गुहागरात आणि रत्नागिरीच्या ह्यूम हायस्कुलात झाले. पुढे मुंबईतील सिद्धार्थ महाविद्यालयातून बी.ए. पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी मुंबईतील न्यू लॉ कॉलेजातून एलएल.बी.देखील पूर्ण केले. परंतु पोलीस अधिकारी बनून समाजासाठी उपयोगाचे काही केले पाहिजे ह्या ध्यासातून त्यांनी पोलीस निरीक्षकपदाची परीक्षाही उत्तीर्ण केली. १९८७ च्या बॅचमधून त्यांनी मुंबई पोलीस खात्यात प्रवेश केला.

२६ नोव्हेंबर २००८ च्या त्या दुर्दैवी दिवसापर्यंत २४ पासून तीन दिवस एस.टीच्या रेल्वे पोलीस ठाण्यात अथक ड्यूटी शिंदेंनी निभावली होती. २६ नोव्हेंबर २००८ रोजी रात्री ८ वाजता ते तीन दिवसांची ड्यूटी संपवून घरी जायला निघाले आणि त्याच वेळी सीएसटी स्थानकाच्या मोठ्या कॉरिडॉरमध्ये इस्माईल आणि अजमल कसाब ह्या दहशतवाद्यांनी धुमाकूळ सुरू केला. खरे तर दहशतवाद्यांचा त्या वेळी प्रवाशांना ओलीस ठेवण्याचा इरादा होता. परंतु त्याच वेळी शिंदेंनी आपल्या रिव्हॉल्व्हरमधून कसाब आणि इस्माईलच्या दिशेने फायरिंग सुरू केली, त्यामुळे प्रवांशावरील लक्ष विचलित होऊन त्यांनी शिंदेंच्या दिशेने गोळीबार केला आणि त्यातच शशांक शिंदेंचा अंत झाला.

एक कर्तव्यदक्ष, आपल्या पेशाशी इमान राखणारे, मनमिळाऊ सहकारी आणि कुटुंबवत्सल प्रापंचिक म्हणून शशांक शिंदे ह्यांची ओळख सदैव स्मरणात राहील. त्यांच्या असामान्य अशा शौर्याबद्दल त्यांना मरणोत्तर किर्तीचक्र देऊन सन्मानित करण्यात आले.

– संदीप राऊत

## शेणोलीकर, अरुण काशिनाथ
**मुख्य अभियंता, संयुक्त सचिव– जलसिंचन**
**२८ डिसेंबर १९२७**



अरुण काशिनाथ शेणोलीकर यांचा जन्म जि. चंद्रपूर ब्रह्मपुरी येथे झाला. त्यांचे लहानपण आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ब्रह्मपुरी या गावात झाले. त्यांनी नागपूर येथून बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण घेतले व त्यानंतर जबलपूर येथून स्थापत्यशास्त्रात बी.ई. ही पदवी घेतली. १९५३ ते १९६० मध्ये ते महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागात आणि नंतर जलसिंचन विभागात कार्यरत होते. १९६०

ते १९७० या काळात शेणोलीकर यांनी कोयना प्रकल्पावर अभियंता म्हणून काम पाहिले. १९७० पासून पुढील दहा वर्षे शेणोलीकर मध्यप्रदेश व महाराष्ट्र यांतील आंतरराज्य नियामक मंडळावर होते. त्यानंतर ते नाशिक व नागपूर येथील पाणीपुरवठा खात्यात होते. १९८० पासून १९८६ पर्यंत म्हणजेच त्यांच्या निवृत्तीपर्यंत ते नागपूर जलसिंचन विभागात मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

विदर्भ क्षेत्रातील सिंचन प्रकल्पांचा आराखडा तयार करण्याचे महत्त्वाचे मूलगामी कार्य अरुण शेणोलीकर यांनी आपल्या कार्यकाळात केले. १९८०-१९८२ च्या आधी इटिया डोह व शिरपूर धरण सोडले, तर संपूर्ण विदर्भात कुठेही धरण नव्हते. सी.पी.ॲण्ड बेरार प्रांतात हा भाग असताना १९३१ साली ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या सिंचन कमिशनने येथे सिंचनाची गरज नाही या भावनेतून या भागात सिंचनाचे कुठलेच प्रकल्प आरेखित केले नव्हते. त्यामुळे संभाव्य धरणांसाठी सर्वेक्षणदेखील झाले नाही.

१९६० साली संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर विदर्भाला सिंचनासाठी निधी उपलब्ध करून द्यायचा तर एकही अन्वेषित प्रकल्प नव्हता. हे अत्यंत महत्त्वाचे काम शेणोलीकर मुख्य अभियंता झाले तेव्हा त्यांनी केले. सुमारे दीड वर्षांच्या काळात गोसीखुर्दसह ७०० ते ८०० कोटी रुपयांचे प्रकल्प त्यांनी अन्वेषित केले. यात ११ मोठे व ४८ मध्यम प्रकल्प होते. यानंतर विदर्भातही सिंचनाची आवश्यकता आहे, याचे महत्त्व लोकांना व राजकीय नेत्यांना पटू लागले. त्या आधारावर मग सिंचनासाठी निधी मागण्यात येऊ लागला.

विदर्भात त्या काळी सिंचनामुळे जमीन खारट होते, अशी भावना होती. त्यामुळे सिंचनाला विरोध होता. लोकांची ही भावना बदलविण्याचे कामही शेणोलीकर यांनी केले. त्यांना 'डायनॅमिक इरिगेटेड ॲग्रिकल्चर' ही कल्पना त्यांनी समजावून सांगितली. शेणोलीकर यांचे खरे कसब लागले ते तोतलाडोह योजना करताना. पेंच नदीवरील या धरणाचा उजवा कालवा नागपूर जिल्ह्यातील संत्री बाग व कापूस क्षेत्रातून जाणार होता. परंतु शेणोलीकर यांनी स्वत:च्या प्रयत्नांनी डावा कालवा मंजूर करून बांधून घेतला. या कालव्यामुळे रामटेक तालुक्यातील शेतकऱ्यांनी धानाचे पीक घेणे सुरू केले. उजव्या कालव्यामुळे २८ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती. डावा कालवा तयार केल्यामुळे ७८ हजार हेक्टर अतिरिक्त जमीन सिंचनाखाली आली आहे.

शेतकऱ्यांशी सतत संपर्क ठेवून त्यांना कुठल्या प्रकारचे सिंचन हवे, याची ते माहिती घेत असत. त्या आधारे त्यांनी सिंचन प्रकल्पांचे आरेखन केले.

विदर्भातील सर्वांत महत्त्वाकांक्षी प्रकल्प गोसीखुर्द, वैनगंगेवरील भंडारा शहरानजीकच्या या प्रकल्पाची संकल्पना देशात कदाचित एकमेव असावी. वैनगंगा नदीकाठची जमीन अत्यंत सुपीक आहे. ही जमीन धरणात जाऊ नये म्हणून शेणोलीकरांनी एक नवा प्रयोग केला.

धरणापासून १०० कि.मी. दूर असलेल्या आसोलामेंढा धरणात हे पाणी न्यायचे आणि त्या धरणाची सिंचनक्षमता वाढवायची असे त्यांनी ठरविले. आसोलामेंढा धरणामुळे २४ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येत होती. शेणोलीकरांच्या या प्रयोगामुळे आता हेच धरण एक लाख हेक्टर जमिनीचे सिंचन करीत आहे. तिथले लोक आता धान्याचे दुबार पीक घेऊन संपन्न झाले आहेत.

निवृत्तीनंतर शेणोलीकर जलसिंचन संबंधातील शासकीय, तसेच खाजगी प्रकल्पावर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. याच दरम्यान त्यांनी कोयना प्रकल्प, घाटघर हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्प, तसेच अनेक दुष्काळी प्रकल्पांवर काम केले आहे. शेणोलीकर यांनी जलसिंचन विषयाशी संबंधित सुमारे ५० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.

**– श्रीनिवास वैद्य**

* * *

श

# स

## सगणे, शांताराम कोंडाप्पा

**अतिरिक्त आयुक्त – मुंबई महानगरपालिका**

**२ नोव्हेंबर १९३८ – ७ सप्टेंबर १९९२**



शांताराम कोंडाप्पा सगणे यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर या लहानशा गावी झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पारनेर व अहमदनगर येथे झाले. पुणे येथील फर्गसन महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी घेतली.

१९६४ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिल्यानंतर त्यांची निवड उपजिल्हाधिकारी या पदावर झाली.

१९६४ ते १९८६ या कालावधीत शांताराम सगणे यांनी उपजिल्हाधिकारी, मराठवाड्याचे विशेष विकास अधिकारी, नांदेड नगर परिषद प्रशासक अशा विविध पदांवर काम केले. १९७४ मध्ये त्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती मिळाली. १९७५ ते १९७८ या कालावधीत शांताराम सगणे यांची नेमणूक नांदेड नगर परिषदेचे प्रशासक या पदावर करण्यात आली. आपल्या या कार्यकालात त्यांनी कर्तव्यदक्षपणे सुयोग्य निर्णय घेऊन नांदेड शहराचा कायापालट केला. त्यांच्या या प्रशासकीय कार्याची सर्वत्र प्रशंसा करण्यात आली.

१९७८ मध्ये औरंगाबाद विभागाचे उपायुक्त, १९७९ ते १९८४ या काळात पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्याच्या नागरी विकास मंत्रालयाचे उपसचिव, जनसंपर्क विभाग संचालक या विविध पदांवर सगणे यांनी काम केले. १९८४ मध्ये ते इंग्लंडमध्ये झालेल्या 'ग्रामीण विकास आणि उपयोजन' या विषयावरील प्रशिक्षणामध्ये सहभागी झाले होते.

१९८६ मध्ये सगणे यांच्यावर वाहतूक आयुक्त पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. या कार्यकालात त्यांनी वाहतूक विभागाचे आधुनिकीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. बँकांमार्फत वाहनांचा कर भरणा करणे, दुचाकी वाहनांकरिता एकमुठी वाहनकर, इलेक्ट्रॉनिक टॅक्सी मीटर, दुचाकी वाहन चालकांसाठी शिरस्त्राण (हेल्मेट) घालणे सक्तीचे करणे, धोकादायक वस्तूंचे वहन करणाऱ्या वाहनांवर बोधचिन्ह लावणे अशा विविध अभिनव उपक्रमांचा अवलंब त्यांनी केला.

१९८९ ते १९९२ या कालावधीत सगणे ठाण्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी या पदावर कार्यरत होते.

जानेवारी १९९२ मध्ये सगणे यांची नेमणूक बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त या पदावर करण्यात आली. या पदावर असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

नांदेड महानगरपालिकेने १९९७ मध्ये ऑलिंपिक स्पर्धेसाठी बांधलेल्या जलतरण तलावाला शांताराम सगणे यांचे नाव देऊन त्यांच्या कामाचा गौरव केला. १९९६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने सगणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार' सुरू केला.

– प्रभाकर करंदीकर

स

## सरदार, मीर अकबर अली (खान बहादूर)
**भारतीय पोलीस सेवा (ब्रिटिशकालीन)**
**पोलीस निरीक्षक, गुप्तहेर**

सरदार मीर अकबर अली खान हे निष्णात गुप्तहेर होते. गुन्हेगाराला शोधून काढण्याचे कौशल्य त्यांना निसर्गत:च अवगत होते. गुन्ह्याचा शोध घेताना कोणत्याही परिस्थितीचे उत्तम निरीक्षण हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. मुंबई शहराची त्यांना खडान्‌खडा माहिती होती. मानवी मनाचा उत्तम अभ्यास, उत्तम वेशांतर करण्याचे कौशल्य या अंगभूत गुणांमुळे त्या काळातील एक महत्त्वपूर्ण गुप्तहेर म्हणून त्यांनी उल्लेखनीय व महत्त्वाची कामगिरी बजावली.

१ सप्टेंबर १८३१ या दिवशी त्यांनी मुंबई पोलीस सेवेत प्रवेश केला. कॅप्टन श्रॉट यांच्या हाताखाली असताना त्यांनी गुप्तहेर विभागात महत्त्वपूर्ण कामगिरी करून नाव कमावले. सरदार मीर अकबर अली यांना मराठी, हिंदी व उर्दू या तीनही भाषा अवगत होत्या.

भारतीय सेवेतील त्यांच्या प्रचंड अनुभवामुळे त्यांना १८४० मध्ये ईडन येथील पोलीस दलाची पुनर्रचना करण्यासाठी पाठवण्यात आले.

मीर अकबर यांनी १८४४ मध्ये मुंबई येथील प्रवासी जहाज नष्ट करणाऱ्या अल्लू पारू या कुप्रसिद्ध गुन्हेगाराचे खूप मोठे कारस्थान उघडकीस आणण्याची महत्त्वाची कामगिरी बजावली. सरदार मीर अकबर अली खान यांच्या कामगिरीमुळे अल्लू पारू पकडला गेला व त्याला शिक्षा झाली. या कामामुळे त्यांच्या नावाचा दबदबा निर्माण झाला.

१८४६ मध्ये कॅप्टन कोर्टीस यांच्याबरोबर जोरदार मतभेद झाल्यामुळे त्यांनी पोलीस सेवा सोडली होती.

१४ डिसेंबर १८४७ रोजी त्यांनी पुन्हा मुंबई पोलीस सेवेत प्रवेश केला. १८४७ ते १८८३ या काळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. १८५२ साली सरदार मीर अकबर अली खान यांची जमादार पदावर नियुक्ती करण्यात आली. १८५७ च्या उठावाच्या वेळी त्यांच्याकडे मुंबईतील बंदोबस्ताचे काम होते. १८६१ साली ते नेटिव्ह कमांडंट झाले, तर १८६२ मध्ये ते सुभेदार झाले. त्यानंतर त्यांना ‘खान बहादूर’ या पदवीने गौरवण्यात आले.

१८६५ साली मुंबई पोलीस दलाची पुनर्रचना करण्यात आली, त्या वेळेस सरदार मीर अकबर अली खान यांची पोलीस निरीक्षक (इन्स्पेक्टर ऑफ पोलीस) या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्याचा गौरव म्हणून १८८३ मध्ये या गुप्तहेर खात्यातील पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली. आताच्या काळाशी तुलना करता, हे पद ‘डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस’ या दर्जाचे होते.

– अरविंद इनामदार

## सराफ, वसंत केशव
**पोलीस महासंचालक – महाराष्ट्र राज्य**
**५ ऑगस्ट १९३४**



महाराष्ट्र राज्य स्थापन होण्याआधी तत्कालीन द्वैभाषिक राज्याच्या पोलीस सेवेत रुजू झालेल्या अधिकाऱ्यांपैकी वसंत केशवराव सराफ हे एक आहेत.

वसंत सराफ यांचा जन्म विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यातल्या चांदूर बझार येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सुमती होते. वडील केशवराव आत्माराम सराफ पोलीस खात्यातच नोकरीस होते. केशवरावांचे नोकरीचे बहुतांश कार्यक्षेत्र त्यावेळचा मध्य भारत होते तरी ते महाराष्ट्रातच पोलीस उपअधीक्षक या पदावरून निवृत्त झाले. केशवरावांच्या निरनिराळ्या ठिकाणी बदल्या होत असल्यामुळे वसंत सराफ यांचे शालेय शिक्षण परतवाडा, होशंगाबाद, भंडारा, नागपूर आणि यवतमाळ येथील वेगवेगळ्या शाळांमध्ये झाले. पदवीसाठी त्यांनी नागपूरच्या विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेतला. गणित आणि पदार्थविज्ञान हे त्यांचे

स



**विशेष राष्ट्रपती पदक**

आवडते विषय होते. पदवीसाठी त्यांना इंटरनंतर देशातल्या अत्यंत प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या बंगलुरू इथल्या विज्ञान संस्थेतही प्रवेश मिळाला होता. त्यांच्या वडिलांना मात्र वसंतरावांनी पोलीस दलात अधिकारी व्हावे असेच वाटत होते. परिणामी वसंतरावांनी १९५६ ला गणित विषयात एम.एस्सी. पदवी मिळवली. नंतर वसंत सराफ भारतीय प्रशासन सेवा (आय.ए.एस) परीक्षेत पहिला वर्ग मिळवून उत्तीर्ण झाले. पहिला वर्ग मिळाल्याने सराफ कुठल्याही नागरी सेवा विभागाची निवड करू शकत होते. मात्र या नागरी सेवांसाठी त्यांचे वय नियमापेक्षा कमी पडले, परंतु पोलीस सेवेसाठी ते पात्र ठरले.

पोलीस प्रशिक्षणानंतर १९५८ मध्ये उपसाहाय्यक अधीक्षक म्हणून त्यांची पहिली नियुक्ती सुरत येथे झाली. १९६० सालामध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आली आणि त्यानंतर सराफ महाराष्ट्र पोलीस सेवेचे घटक झाले.

पदोन्नती मिळून १९६१ मध्ये ते नाशिक इथं पोलीस अधीक्षक पदावर रुजू झाले. १९६२ मध्ये वसंतरावांचा विवाह कीर्तीबाला पाटील यांच्याशी झाला. पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी चार जिल्ह्यात काम पाहिले. त्याचबरोबर त्यांना पोलीस आयुक्तालय आणि राज्य गुप्तहेर विभागाच्या कामाचाही अनुभव मिळाला. सराफांचं राज्यातील उल्लेखनीय कार्य बघून १९६६ मध्ये त्यांची केंद्रीय गुप्तचर संस्थेत अधीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीवर बदली झाली. आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख या पदावर १९६९ पर्यंत काम करून ते राज्य सेवेत परत आले.

केंद्राच्या सेवेसाठी सराफ यांना १९७१ ला पुन्हा केंद्रीय सचिवालयात जाण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांची नियुक्ती संशोधन आणि विश्लेषण शाखेत (रॉ) झाली. या कालावधीत सराफ यांनी वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांबरोबर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत एक वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केला. तसंच चार वर्षे परदेशातल्या भारतीय वकिलातीत संरक्षण प्रतिनिधी (कौन्सेलर) या पदावर काम केले.

यानंतर १९८५ ला ते महाराष्ट्र राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या (सी.आय.डी.) गुन्हे शाखेचे महानिरीक्षक झाले. सराफ यांनी यशस्वीरीत्या पेललेल्या अनेक आव्हानांमुळे शासनाने त्यांच्या सेवेची दखल घेतली व ते १९८६ मध्ये राज्य गुन्हा अन्वेषण विभागाचे आयुक्त झाले. सराफ यांची मुंबई पोलीस आयुक्त या पदावर नियुक्ती झाल्यानंतर एका वर्षातच त्यांना अतिरिक्त पोलीस महासंचालक पदावर बढती मिळाली. याच काळात मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवाचा योग १९८९ मध्ये जुळून आला. यानिमित्त आयोजित भव्य समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून तत्कालीन राष्ट्रपती वेंकटरामन उपस्थित होते. भारताचे राष्ट्रपती पोलीस दलाच्या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचं हे पहिलं उदाहरण होते.

वसंतराव सराफांनी डिसेंबर १९८९ मध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक पदाची सूत्रं हाती घेतली आणि अत्यंत कर्तव्यदक्षपणे कार्यभार सांभाळून ऑगस्ट १९९२ ला ते निवृत्त झाले.

पोलीस दलात अधिकारी असताना सर्व प्रकारच्या समाजकंटकांबाबतची विश्वासार्ह गुप्त माहिती संकलित करण्यात वसंतराव सराफांचं योगदान महत्त्वपूर्ण होतं. मुंबईतल्या तरुण पिढीला मोठ्या प्रमाणात मादक द्रव्यांचा पुरवठा करणाऱ्या असामाजिक घटकांविरुद्ध सराफ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आघाडी उघडून या व्यापाराला परिणामकारक पायबंद घातला.

धनिकांकडून जबरदस्तीने खंडणी गोळा करणाऱ्या व टोळीयुद्ध करणाऱ्या गुंडांच्या टोळ्यांना नामोहरम करण्यात सराफांनी यश मिळवले. पाकिस्तानी आय.एस.आय.च्या मुंबईत आलेल्या हस्तकांसंदर्भात

स

महत्त्वाची माहिती मिळवण्यातही ते यशस्वी झाले होते. राज्याचे पोलीस महासंचालक असताना महामार्ग पोलीस संरक्षण यंत्रणेत आवश्यक ते प्रशासकीय बदल करण्यातही सराफांचा पुढाकार होता.

निवृत्तीनंतर त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने संघटित गुन्हेगार टोळ्यांविरुद्धचा संशोधन अहवाल तयार करण्यात महत्त्वाची कामगिरी केली. राज्य पोलीस दलांच्या अगदी गावपातळीपर्यंतच्या पोलीस स्टेशनात आवश्यक त्या संख्येत मनुष्यबळ कसं पुरवावं याचा सांख्यिकी आलेख त्यांनी तयार केला होता. आज गुजरातमध्ये या अहवालाच्या आधारे मनुष्यबळ कार्यरत आहे. शासनातर्फे पुण्यात स्थापन झालेल्या पोलीस संशोधन केंद्राचे ते पहिले मानद संचालक होते.

आपल्या पोलीस खात्यातील अनुभवांवर आधारित वृत्तपत्र लेखांबरोबर कादंबरी आणि कथा असे विपुल लेखन सराफांनी केले आहे. व्यवस्थापन आणि नेतृत्व या विषयांवरही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. भगवद्‌गीतेतील कर्म या विषयावर सराफ यांनी लिहिलेले 'दी मिस्ट्री ऑफ कर्म' (कर्माचं गूढ) हे अभ्यासपूर्ण आणि वाचनीय पुस्तक वाचकांमध्ये लोकप्रिय ठरलं आहे.

पोलीस दलातील नोकरीत महत्त्वाचं योगदान दिल्याबद्दल सराफांना १९७४ ला पोलीस पदक मिळालं. तर १९८६ साली त्यांना विशेष कामगिरीसाठी राष्ट्रपती पदकानं गौरवण्यात आलं. याशिवाय त्यांना 'इंटरनॅशनल जायंट्स ॲवार्ड फॉर पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन' हा पुरस्कार १९८९ ला मिळाला. तसंच १९९० ला पोलीस प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सराफ यांना उपराष्ट्रपतींच्या हस्ते 'नॅशनल सिटीझन्स ॲवार्ड' मिळाले आहे. वसंतराव सराफ आज निवृत्तीनंतरचं आयुष्य लेखन आणि सामाजिक कार्यात मग्न राहून सफल करत आहेत.

– सुधाकर कुलकर्णी

## सत्यनारायण, नीला पीलरसेट्टी


**राज्य निवडणूक आयुक्त – महाराष्ट्र राज्य**

**५ फेब्रुवारी १९४९**



महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण यांचा मुंबई येथे जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव सुशिला आणि वडिलांचे नाव वासुदेव आबाजी मांडके होत. ते पोलीस खात्यात कार्यरत होते. नीला सत्यनारायण यांना घरातूनच आध्यात्मिकतेचा वारसा व संस्कार मिळाले. मुंबई, पुणे, नाशिकमध्ये शालेय शिक्षण व शालान्त परीक्षा दिल्लीमध्ये, असा त्यांचा शालेय जीवनाचा प्रवास झाला. १९६५ साली दिल्लीत बोर्डाच्या परीक्षेत संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळवून त्या बोर्डात पहिल्या आल्या. त्यांनी इंग्रजी वाङ्मय या विषयात पदवी व पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला आणि त्या आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र कॅडरमध्ये १९७२ ला रुजू झाल्या.जगामध्ये काहीतरी करून दाखवायचे असेल तर जगात जी भाषा स्वीकारली जाते त्याच्यावर आपण प्रभुत्व मिळविणे आवश्यक आहे हाच इंग्रजी विषय मुद्दाम निवडण्याचा त्यांचा हेतू होता.

प्रशासकीय अधिकारी झाल्यानंतर नागपूरपासून त्यांनी आपल्या कामाची सुरुवात केली. सेवाकाळात त्यांनी भूषविलेली महत्त्वाची पदे त्यांना थोडी उशीराच मिळाली. त्या काळी प्रशासकीय व्यवस्थेला स्त्री अधिकाऱ्यांची सवय नव्हती. त्यामुळे प्रशासनाचा आणि शासनाचा विश्वास संपादन करता करता पहिली काही वर्षे स्वत:ला सिद्ध करण्यात गेली. परंतु एकदा शासनाने त्यांच्यावर विश्वास टाकल्यानंतर नगर विकास, गृह, माहिती व जनसंपर्क, अन्न व नागरी पुरवठा, महसूल व वन विभाग अशा काही महत्त्वाच्या



धारावीमधील
चर्म प्रक्रिया उद्योग

खात्यांमधून काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

समाजकल्याण विभागात त्यांनी केलेल्या कामाची पावती आज अनेक स्वयंसेवी सेवा आणि विविध सामाजिक संस्था त्यांना देतात. मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे मार्गावर अपंगांसाठी सदनिका विकत घेऊन त्या अपंग संस्थांना देण्याची संकल्पना त्यांचीच. हेतू हा की, अपंगांना दक्षिण मुंबईमध्ये दूरवर प्रवास करायला लागू नये. वरळीच्या नॅबसाठी म्हणजे अंध शाळेसाठी परदेशातून वाद्ये मागवून ऑर्केस्ट्रा बनविण्यासाठी निधी देण्याची कल्पनाही त्यांचीच. आज नॅबचा ऑर्केस्ट्रा परदेशात जाऊन कार्यक्रम करतो याचा त्यांना रास्त अभिमान वाटतो. धारावीमधील उभे राहिलेले लेदरचे सेंटर हाही त्यांच्या अभिमानाचाच एक विषय आहे. प्रत्येक झोपडीमध्ये जाऊन त्यांनी तेथील लोकांना हा उद्योग मोठ्या प्रमाणात घेण्यासाठी उद्युक्त केले होते. आज त्याचे एवढे मोठे स्वरूप झाले आहे की धारावीतील चामड्याच्या वस्तू निर्यात होतात.

गृह विभागात असताना कारागृहातील महिलांसाठी उद्योग प्रशिक्षण, स्त्रियांसाठी खुले कारागृह करणे तसेच बंदिवानांच्या मुलांसाठी योजना हाती घेणे यासारखी काही उदात्त कामे त्यांनी केली आहेत.

अन्न व नागरी पुरवठा विभागात एका जपानी कंपनीबरोबर टेट्रा पॅक या विषयावर संशोधन केले. आज सर्वत्र छोट्या पॅकमधून, सॅशेमधून खाद्यपदार्थ, तेल मिळते, हे त्यांच्याच संशोधनाचे फळ आहे.

त्यांच्या संशोधन निबंधाची दखल घेऊन केंद्र शासनानेही त्यांना प्रशस्तिपत्रक दिले आहे. युनायटेड नेशन्समधील एपीसीडब्लू या स्त्रियांच्या कामासाठी झटणाऱ्या संस्थेने त्यांचा शोधनिबंध संदर्भ पेपर म्हणून त्यांच्या लायब्ररीमध्ये ठेवला आहे. सध्याच्या नवीन पदावर काम करताना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून येणाऱ्या स्त्रियांना सक्षम करण्यासाठी क्रांतिज्योती महिला प्रशिक्षण अभियान त्यांनी सुरू केले आहे. ऑन लाईन व्होटिंगचा प्रयोग करायचीही त्यांची तयारी चालू आहे.

नीला सत्यनारायण कवयत्री, संगीत दिग्दर्शक, लेखक या अनेकविध भूमिका जगतात. हिंदी, मराठी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून त्यांनी १३ पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे मराठीतील 'एक पूर्ण अपूर्ण' हे आत्मचरित्रपर पुस्तक १० आवृत्त्या ओलांडून पुढे गेले आहे. मानसिकदृष्ट्या अपंग असलेल्या मुलाला जन्म दिल्यानंतर पालकाला ज्या कटू अनुभवातून जावे लागले आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले त्या अनुभवांवर आधारित हे पुस्तक आहे. ज्या मातांना अशी मुले आहेत त्यांना धीर आणि सामर्थ्य देण्यासाठी हे पुस्तक प्रेरणादायी ठरले आहे. 'सत्यकथा' हे त्यांचे पुस्तक उद्योजकतेबाबत आहे आणि 'एक दिवस (जी)वनातला' हे त्या वन विभागात सचिव असताना त्यांना आलेल्या अनुभवांवर आधारित आहे.

प्रशासनाच्या विविध खात्यातून काम करून ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून २००९ साली नीला सत्यनारायण सेवानिवृत्त झाल्या. नीला सत्यनारायण यांनी लिहिलेल्या जवळजवळ १५० गीतांचे ध्वनिमुद्रण झाले असून, त्यांनी बसविलेली वेधक नृत्ये आणि त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय झालेले आहेत. त्यांना त्यांच्या सांस्कृतिक योगदानाबद्दल केंद्र शासनाचा अहिंदी भाषिक लेखक पुरस्कार - १९८५, महात्मा गांधी पुरस्कार - १९८६, भारत निर्माण पुरस्कार- १९८७,महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार २००७,

महाराष्ट्र हिंदी साहित्य संस्था पुरस्कार २००८, लोकसत्ता वुमन ऑफ द इयर पुरस्कार २००८, संकल्प प्रतिष्ठान (कल्याण) जीवन गौरव पुरस्कार २००९, मातृवंदन पुरस्कार २००९, मनोविकास विशेष बाल शिक्षण सोसायटी (अमरावती), आशीर्वाद पुरस्कार २००९, हिंदी साहित्य जीवन गौरव आदी पुरस्कार मिळाले आहेत.

– मीनाक्षी राजेंद्र पाटील

## साठे, गजानन कृष्णाजी

**भारतीय रेल्वे अभियांत्रिकी सेवा**
**उपविभागीय व्यवस्थापक, मुंबई (सी.एस.टी.)**
**२२ मे १९२८**



भारतीय रेल्वे सेवेतून मोझांबिक या मागासलेल्या पूर्व आफ्रिकेतील राष्ट्राची रेल्वे सेवा सुरळीत करून देण्यासाठी गेलेले व ही कामगिरी योग्य पद्धतीने पार पाडलेले अधिकारी म्हणजे गजानन कृष्णाजी साठे यांचा जन्म पुण्यात झाला. वडील कृष्णाजी गणेश साठे कोकणातले देवाचे गोठणे हे त्यांचे मूळ गाव. हे साठे कुटुंब पुढे कर्नाटकात धारवाडजवळ स्थायिक झाले. त्यांचे आजोबा मद्रास येथे रेल्वे स्टेशन मास्तर होते. कालांतराने गजानन साठे यांचे वडील पुण्यात स्थायिक झाले. आईचे नाव रूक्मिणी साठे असे होते.

गजानन साठेंचे शालेय शिक्षण पुण्यातील नावाजलेल्या नूतन मराठी विद्यालय शाळेत झाले. अंगभूत हुशारीमुळे ते शाळेत नेहमी बक्षीस मिळवत. त्या वेळी नानासाहेब नारळकर हे मुख्याध्यापक होते. त्या वेळी साठे यांचा एका विषयांत पहिला क्रमांक आला आणि नारळकरांनी गजाननला शेजारच्या दुकानातून हवी असेल ती वस्तू घेण्याची मुभा दिली आणि गजाननने एक पियानो घेतला. परंतु तो पियानो



मोझांबिक रेल्वे

जपान मध्ये तयार केलेला होता. त्याच वेळी नारळकर यांनी गजानन यांना स्वदेशीचे महत्त्व पटवून दिले.

आपल्या देशातल्या पैसा परदेशात जाणार तेव्हा स्वदेशीच वस्तू घेत जा. त्या बालवयात गजानन साठेंवर झालेल्या या संस्काराने त्यांची आयुष्यभर पाठ सोडलेली नाही. पु. ग. सहस्त्रबुद्धे रा. सं. वाळिंबे यांसारखे विद्वान त्यांना शिक्षक म्हणून लाभले. त्याच्या संस्कारतून साठे यांचे व्यक्तीत्त्व घडले. शाळेमध्ये असताना स्काउट चळवळीमध्ये ते सक्रिय होते. १९४५ मध्ये ते नूतन मराठी शाळेतून मॅट्रिकची परीक्षा ८०% गुण घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे सुट्टीत काम करून गजानन साठे पैसे मिळवत. १९४८ मध्ये फर्गसन महाविद्यालयातून बी.एस्.सी. पूर्ण केल्या नंतर ते विजयचित्र मंदीर मध्ये काम करत असत. त्याच वेळी ते आय.ए.एस्. आणि इतर सेवांच्या परीक्षेची तयारी करत होते. १९५३ मध्ये ते युपीएस ची परीक्षा उत्तीर्ण झाले त्यांची भारतीय रेल्वे मध्ये निवड झाली.

रेल्वे मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९५५ मध्ये जामनगर येथे साहाय्यक वाहतूक अधीक्षक या पदावर त्यांची नियुक्ती झाली. १९५६ साली राजकोट येथे विभागीय वाणिज्य निर्देशक म्हणून नियुक्ती झाली. १९५९ मध्ये त्यांची मुंबई विभागात भ्रष्टाचार विरोधी अधिकारी म्हणून नेमणूक झाली. याचवेळी गोध्रा येथे

नदीवर पूल बांधण्याचे काम चालू होते. या कामादरम्यान नदीचे पाणी अडविण्यासाठी बंधारे घालावे लागत. तेथील अभियंत्याने लबाडीने कागदपत्रात खोटे बंधारे दाखवले व भ्रष्टाचार केला. साठे यांनी याबाबत हाताखालच्या इन्स्पेक्टर्स करवी चौकशी केली. त्यानंतर ती केस विशेष पोलीस अस्थापनेकडे सोपविण्यात आली. त्यामुळे त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली. त्यांच्या याच कामाला दाद देऊन त्या वेळचे पश्चिम रेल्वेचे महाप्रबंधक संचालक श्रीराम सुब्बन यांनी गजानन साठे यांना आपला स्विय सचिव म्हणून निवडले. १९६७ सालापर्यंत ते या ठिकाणी ते कार्यरत होते.

१९६७ मध्ये त्यांना रेल्वे आधुनिक करण्याचे दृष्टीने अभ्यासासाठी अमेरिकेला पाठवण्यात आले. यामध्ये भारतीय रेल्वेतील तीस अधिकाऱ्यांचा समावेश होता. साठे या गटाचे प्रमुख होते. अमेरिकेत राहून त्यांनी तेथील रेल्वेचा सखोल अभ्यास केला आणि त्यावरचा 'मार्केट प्राइस ऑफ रेल्वे' या विषयावरचा अहवाल भारतीय रेल्वेला सादर केला. त्यातील बऱ्याच शिफारसी नंतर भारतीय रेल्वे लागू करण्यात आल्या.

यानंतर त्यांची १९६९ मध्ये राजस्थानातल्या उदयपूर येथे असलेल्या रेल्वे प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यपदी त्यांची नेमणूक झाली. या कालावधीत साठे यांनी केंद्रात बऱ्याच सुधारणा केल्या. साधारण १००० प्रशिक्षणार्थी या ठिकाणी प्रशिक्षण घेत होते. केंद्रातील शौचालये आणि भोजनगृहातून वाहणारे सांडपाण्यामुळे त्यातून येणाऱ्या घाणीमुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली होती. यासाठी साठे यांनी तात्काळ सांडपाण्याची योग्य व्यवस्था केली आणि त्याच्या खतापासून केंद्राच्या आवारात गहू, मका, भाजीपाला पिकवायला सुरवात केली. तेथील गहू एवढा उत्कृष्ट झाली की, राजस्थान सरकारने बियाणे म्हणून विकत मागितला. याच ठिकाणी कुटुंबनियोजन, व्यायाम, पेपर फुटीवर उपाय अशाही वेगवेगळ्या योजना त्यांनी राबविल्या.

१९७० मध्ये पश्चिम विभागात उपमुख्य वाणिज्य अधिकारी म्हणून त्यांनी चर्चगेट येथे काम केले. नंतर १९७५ मध्ये वडोदरा येथे डिव्हिजन मॅनेजर या पदावर त्यांची नियुक्ती झाली. १९८० ते १९८१ या कालावधीत मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनस (तेव्हाचे व्ही.टी.) येथे त्यांनी उपविभागीय व्यवस्थापक पदावर काम केले. ते या पदावर असतानाच मोझांबिक या देशात त्यांची भारतीय रेल्वेच्या 'राईटस्' तर्फे नियुक्ती करण्यात आली.

२२० कि.मी. किनारपट्टी लाभलेला आफ्रिका खंडातील हा एक मागासलेला देश. सतत होणाऱ्या बंडांमुळे आणि लुटालुटीमुळे इथली रेल्वे सेवा सततच ठप्प झालेली असे. त्यातून शेजारील देशांकडून चलनात होणाऱ्या फसवणुकीमुळेही मोझांबिकचे नुकसान होत असे. मोझांबिककडून दक्षिण आफ्रिकेत कोळशाचा पुरवठा होत असे. रेल्वेमार्फतच हा कोळसा पाठविण्यात येई. त्या वेळी दक्षिण आफ्रिकेत सर्व व्यवहारांसाठी सरकारात संगणकाचा वापर होऊ लागला होता. मोझांबिककडून आलेल्या कोळशाचा मोबदला द.आफ्रिकेला द्यावा लागत असे. प्रत्यक्षात दक्षिण आफ्रिका तेथील अधिकाऱ्यांनी कागदपत्रात, संगणकीय नोंदीत फेरफार करून मोझांबिक देशाची, अधिकाऱ्यांची फसवणूक केली.

इथली विस्कळीत रेल्वेसेवा सुधारण्यासाठी गेलेल्या साठे आणि त्यांच्या सहकाऱ्याने यांनी द. आफ्रिकेने केलेली ही फसवणूक उघडकीस आणली. दोन्ही राष्ट्रांच्या बैठकीत त्यांनी ती सिद्ध करूनही दाखवली. त्यामुळे द. आफ्रिकेने दहा लाख रँड एवढी रक्कम मोझांबिकला परत केली. साठे यांच्यासोबत याकाळात ३६ जणांचा गट पाठवण्यात आला होता.१९८१ ते १९८५ या काळात साठे यांनी मोझांबिक रेल्वेत काम केले. मोझांबिक वाहतूक मंत्र्यांची पत्नी व गजानन साठे यांच्या पत्नी मीराताईंची एक दिवस भेट झाली. मीराताईंनी ग्रंथालय व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम व नोकरी केल्याचे

स

समजल्यावर त्यांनी मीराताईंना मोझांबिक मधील वाहतूक मंत्रालयातील ग्रंथालये नवीन तांत्रिक पद्धतीने व्यवस्थित बनवण्याची विनंती केली व मीराताईंनी ती पूर्णही केली. १९८६ मध्ये साठे पश्चिम आणि मध्य रेल्वेचे अतिरीक्त महाप्रबंधक म्हणून निवृत्त झाले.

निवृत्तीनंतर साठे पुण्यातच स्थायिक झालेले आहेत. ते कविता, कथा असे लिखाण करतात. वेगवेगळ्या दिवाळी अंकांतून त्यांच्या कथाही प्रकाशित झाल्या आहेत.

– दत्ता कानवटे

## साठे, दिनकर दत्तात्रय

**मुख्य सचिव – महाराष्ट्र राज्य**

**२३ सप्टेंबर १९१७ – १९ डिसेंबर १९९९**



दिनकर दत्तात्रय साठे यांचा जन्म एका उच्चभ्रू कुटुंबात पूर्वीच्या इंदूर राज्यातील मंडलेश्वर या गावी झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील मालघर हे आहे. त्यांचे वडील दत्तात्रय लक्ष्मण साठे भारतीय वनसेवेत कार्यरत होते. त्यांचे एक काका सिव्हिल सर्जन तर दुसरे काका जगन्नाथ साठे हे आय.सी.एस. होते. आई चारुमती या पुण्यात एक कर्तृत्ववान समाजसेविका म्हणून ओळखल्या जात. त्या अनेक वर्षे पुणे वुमन काउन्सिल मध्ये कार्यरत होत्या. आई आणि वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा दिनकर साठे यांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा होता.

साठे यांचे शालेय शिक्षण बंगळुर येथे झाले. इंदूरच्या होळकर महाविद्यालयातून त्यांनी पहिल्या वर्गात बी.ए. पूर्ण केले तर सेंट जान्स कॉलेज, केंब्रिजमधून त्यांनी एम.ए. (कॅांटॅब) ची पदवी संपादन केली. १९४१ मध्ये त्यांची निवड भारतीय प्रशासकीय सेवेत झाली. डेहराडून मधील प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर




महाराष्ट्र राज्य परिवहन

मद्रास कॅडरमधील कुंदापूर येथे उप जिल्हाधिकारी या पदावर त्यांची पहिली नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ते महामार्ग विकास महामंडळाचे (सी.आर.टी.बी.) केंद्रीय सचिव म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी मद्रास राज्यातील खासगी वाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणाची योजना तयार करून ती एका वर्षाच्या कालावधीत यशस्वीपणे कार्यान्वित केली. यावेळी द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी या योजनेचे यश पाहून मुंबई राज्यामध्ये खाजगी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्याची योजना राबवण्यासाठी साठे यांना मुंबई येथे बोलावून घेतले. १९४७ ते १९५३ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यात रस्ते वाहतूक योजना कौशल्याने राबवली. १९५२ मध्ये तेव्हाच्या मुंबई राज्यातील खाजगी वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि राज्य परिवहन महामंडळाची स्थापना करण्यात आली. यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. महाराष्ट्रातील खेडोपाडी राज्यपरिवहन महामंडळाच्या गाड्या पोहोचाव्यात यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. राज्यपरिवहन महामंडळाचा विस्तार महाराष्ट्रात सर्वत्र होण्याचे श्रेय साठे यांच्या प्रयत्नांनाच आहे. (१९५३ ते ५६) भाषावार प्रांत रचनेनंतर अहमदाबाद या प्रांताची विभागणी करण्यात आली आणि १९५६ ते ५८ या कालावधीत त्यांची अहमदाबादचे विभागीय आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. १९५८ मध्ये साठे यांची नेमणूक मुंबई राज्याचे सचिव–कृषी आणि नागरीपुरवठा या

स


पदावर करण्यात आली. या वेळी त्यांनी ग्रामीण दुग्ध योजना सुरू केली. याद्वारे दूध उत्पादकांना दुधाचे कंटेनर आणि फिरत्या गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या. १९६० साली साठे यांची नियुक्ती ग्रामीण विकास मंत्रालयाचे सचिव या पदावर झाली. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचा कायदा तयार केला तसेच या दोनही योजना संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वीपणे कार्यान्वित केल्या. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री झाले त्यावेळी १९६४ ते ६६ या काळात साठे संरक्षण विभागाचे सह सचिव होते. १९६८ साली एका वर्षासाठी त्यांची नेमणूक नियोजन आयोगाचे अतिरिक्त सचिव या पदावर करण्यात आली. १९६९ ते ७१ या कालावधीत मसुरीच्या लालबहादुरशास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे ते संचालक होते. त्यावेळी पहिल्या महिला आय.पी.एस. डॉ.किरण बेदी या संस्थेत प्रशिक्षणासाठी दाखल झाल्या होत्या. १९७३-७६ या कालावधीत ते महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव होते. याच पदावरून ते १९७६ साली निवृत्त झाले. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

— संध्या लिमये

## साठे, रामचंद्र दत्तात्रेय

**सचिव-परराष्ट्र मंत्रालय, राजदूत - चीन, जर्मनी उपायुक्त - द. आफ्रिका**

**१५ एप्रिल १९२२ - ३१ जुलै २००४**



रामचंद्र दत्तात्रेय साठे यांचा जन्म आंध्र प्रदेशातील गुंटुर येथे झाला. शालेय वयाचे झाल्यानंतर त्यांना पुणे येथील शिवाजी सैनिकी शाळेत पाठविण्यात आले. नंतर ते डेहराडून येथील 'डेहराडून स्कूल' या निवासी शाळेत शिकले. रामचंद्र ऊर्फ राम साठे हे १९५५ मध्ये स्थापन झालेल्या स्कूलच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी होत. शाळेत असताना ते क्रिकेट, हॉकी व टेनिस या खेळांचे कर्णधार होते. ते शाळेचेही गटनायक होते. नंतर राम साठे यांनी सैनिकी शिक्षण घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे डेहराडून येथील भारतीय सैनिकी संस्थेमधून १९४१ मध्ये ते किंग्ज कमिशन घेऊन उत्तीर्ण झाले.

त्यांची नेमणूक त्या वेळच्या बर्मा विभागात सैन्यातील अभियांत्रिकी पदावर झाली.

त्यानंतर वयाच्या तेविसाव्या वर्षी राम साठे यांची नेमणूक चीनमधील भारताचे त्या वेळचे प्रतिनिधी के.पी.एस. मेनन यांचे सैनिकी साहाय्यक म्हणून करण्यात आली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा राम साठे यांची नेमणूक नानकिंग येथे होती. त्यानंतर मात्र के.पी.एस. मेनन यांनी स्वत:बरोबर त्यांना विदेश सेवा विभागात नेले. त्यांची या सेवेतील पहिली नेमणूक ही दक्षिण सिनकिआंगची राजधानी कशगर येथे होती. ही जागा 'जगाचे छप्पर' म्हणून ओळखली जाते.

त्यानंतर स्टॅलिनच्या राजवटीत राम साठे हे रशियामध्ये होते. नंतर माऊमाऊच्या उदयाच्या वेळेस ते केनयात होते. त्यानंतरची त्यांची नेमणूक ही अफगाणिस्तानात होती. त्यानंतर जर्मनीमधील हॅम्बर्ग येथे ते काही काळ होते. तेथे त्यांनी परराष्ट्रातील व्यापाराचा अनुभव घेतला. पुढे काही काळ त्यांनी परराष्ट्र खात्यातील व्यापार विभागाचे प्रमुख म्हणूनही काम पाहिले.

राम साठे यांची विविध देशांत परराष्ट्र खात्यामार्फत नेमणूक झाली होती. १९६२ मध्ये ते आफ्रिकेतील टांगानिका येथे भारतीय उच्चायुक्त म्हणून रुजू झाले. १९६५ मध्ये त्यांनी राष्ट्रीय महाविद्यालयात (प्रबोधिनी) प्रवेश घेतला. तेथे ते एक वर्षभर होते.

यानंतर १९६६ मध्ये ते परत चीनला गेले. राम साठे यांच्या सेवेतील बराच काळ हा चीन व इराण

स

या दोन देशांत गेला. या दोन्ही देशांसंबंधी परराष्ट्र धोरण ठरविण्यात त्यांचा मोठा पुढाकार होता. १९६६ ते १९६९ या तीन वर्षांच्या त्यांच्या चीन येथील वास्तव्यात चीनमध्ये खूप उलथापालथ सुरू होती.

१९६९ मध्ये दिल्ली येथे परत येऊन त्यांनी परराष्ट्र खात्यातील अर्थ विभाग सांभाळला.

१९७२ मध्ये त्यांची नेमणूक इराण येथे झाली. त्या वेळेस इराणमधील वातावरण हे भारतविरोधी होते. परंतु राम साठे यांच्या कार्यकाळात हळूहळू वातावरण निवळत गेले. ते तिथे असताना भारत व इराण दरम्यान आर्थिक संबंध निर्माण झाले. त्यातील एक महत्त्वाचे म्हणजे कुद्रेमुख लोह खनिज प्रकल्प.

इराणनंतर फ्रान्स येथे ते राजदूत म्हणून नेमले गेले. परत १९७९ मध्ये एका वर्षासाठी त्यांची नेमणूक चीनमध्ये झाली.

त्यानंतर राम साठे यांची नेमणूक परराष्ट्र खात्याच्या सचिव पदावर झाली.

१९८२ मध्ये ते परराष्ट्र खात्यामधून निवृत्त झाले. परंतु पुढे त्यांची नेमणूक जर्मनीमध्ये राजदूत म्हणून करण्यात आली. तेथील कार्यकाळ संपल्यावर ते पुण्यात स्थायिक झाले.

– आशा बापट

## सावरकर, विश्वास बळवंत

**संचालक – भारतीय वन्यजीव संस्था**

**१५ जुलै १९४३**

कर्नाटकातील धारवाड या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात विश्वास बळवंत सावरकर यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा दिनकर सावरकर यांना कैसर-ए-हिंद हा किताब मिळाला होता. नौरोसजी वाडिया महाविद्यालयाच्या संस्थापकांपैकी ते एक होते.

विश्वास सावरकर यांची आई मनोरमा (पूर्वाश्रमीची गद्रे) या इंग्लिश साहित्यात नागपूर विद्यापीठातून एम.ए. होत्या. त्यांनी सुवर्णपदक मिळविले होते. मनोरमा यांच्या इंग्लिश या विषयातील गुणांची बरोबरी



अजूनही कोणी करू शकलेले नाही. नंतर त्यांना इंग्लंडमधील केंब्रीज येथे पुढील शिक्षणाची संधी मिळाली.

विश्वास सावरकर यांचे शालेय शिक्षण रमणबाग, पुणे येथे व महाविद्यालयीन शिक्षण नौरोसजी वाडिया महाविद्यालयात झाले. त्यांनी रसायन, पदार्थविज्ञान व भूगर्भशास्त्रात पदवी मिळवली. त्यानंतर १९६६ मध्ये त्यांनी डेहराडून येथून इंडियन फॉरेस्ट कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेतले. याच महाविद्यालयाचे नाव आता इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी झाले आहे. मार्च १९६८ मध्ये या संस्थेतून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून ते नाशिक येथे नाशिक वन विभागात सह वन संरक्षक (असिस्टंट कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट) या पदावर रुजू झाले. विश्वास सावरकर १९६९ मध्ये सरोज दोरायस्वामी यांच्याशी विवाहबद्ध झाले.

बारा वर्षे महाराष्ट्र राज्यात वनाधिकारी म्हणून काम केल्यावर त्यांना केंद्रीय वन सेवेत पाठविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असताना त्यांनी दोन वर्षे नाशिक, चार वर्षे पुणे येथेही काम केले. या काळात आणखी एका वरिष्ठ सहकाऱ्यांसमवेत त्यांनी मेळघाट जंगलासाठी वन्य जीवन व्यवस्थापनाचा आराखडा तयार केला. मेळघाट हे वाघांसाठी संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते. भारतात त्यावेळी 'वाघ संरक्षित' तयार होत असलेल्या नऊ वेगवेगळ्या आराखड्यांपैकी हा एक होता. अशा प्रकारचे काम भारतात पहिल्यांदाच होत होते. या त्यांच्या कामाचे केंद्र व राज्य सरकारकडून खूप कौतुक झाले.१९७४-७९ या काळात नंतर त्यांनी अमरावती विभागातील परतवाडा येथील मेळघाट प्रकल्पात पण काम केले. या वेळेस विश्वास सावरकरांना विशेष प्रशिक्षणासाठी डेहराडून येथेही पाठविण्यात आले होते.

१९७९ मध्ये केंद्र सरकारच्या सेवेत पाठविण्यात आल्यानंतर प्रथम वरिष्ठ संशोधन अधिकारी म्हणून ते डायरेक्टोरेट ऑफ वाइल्ड लाइफ रिसर्च अँड एज्युकेशन या संस्थेत रुजू झाले. याच दरम्यान रेडिओ टेलिमेट्रीच्या साहाय्याने प्राण्यांचा माग काढणे, वाघ, जंगली हत्ती व इतर अनेक प्राण्यांना रसायनांचा वापर करून पकडणे व हाताळणे या गोष्टींचेही प्रशिक्षण त्यांनी घेतले. विश्वास सावरकर यांनी इटलीतील रोम येथेही कॉम्प्युटराइज्ड जिऑग्राफिक इन्फर्मेशन सिस्टिमचेही प्रशिक्षण घेतले.

त्याचवेळेस मेळघाट येथील प्रकल्पाला दहा वर्षे झाल्याच्या निमित्ताने २३ डिसेंबर १९८३ ला व्याघ्र प्रकल्पाला दिलेल्या अतिविशिष्ट सेवेबद्दल विश्वास सावरकरांना पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

१९८२ मध्ये डि.डब्ल्यू.आर.ई.चे वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामध्ये रूपांतरण झाले. ही संस्था भारतीय शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयांतर्गत स्वायत्त संस्था म्हणून १९८४ मध्ये जाहीर करण्यात आली. तेव्हा वन्यजीव व्यवस्थापनाच्या अभ्यासक्रमाचे प्रमुख म्हणून सावरकर यांची नेमणूक झाली. त्या अंतर्गत १९८४ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या फेलोशिपवर त्यांना वन व्यवस्थापनाच्या पुढील शिक्षणासाठी अमेरिकन विद्यापीठात पाठविण्यात आले. या वर्षात त्यांना अमेरिकन वन विभागासोबत प्रत्यक्ष जंगलात काम करण्याचा अनुभव घेता आला.

त्यानंतर १९९२ मध्ये अमेरिका व भारत यांच्या संयुक्त प्रकल्पात काम करताना त्यांनी मोठ्या भूभागावर जैवविविधतेचे व्यवस्थापन या प्रकल्पात काम केले. याच प्रकारच्या प्रकल्पासाठी त्यांनी नंतर मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया व ऑस्ट्रेलिया येथेही प्रकल्पाचे नेतृत्व केले. या त्यांच्या कामामुळे दक्षिण आशिया भागात भारतीय वन्यजीव संस्था, वन्यजीव व्यवस्थापन, प्रशिक्षण व संशोधन या क्षेत्रात अग्रगण्य



वन्यजीव व पर्यावरण रक्षण

म्हणून मान्यता पावली. १९९५ मध्ये श्रीलंकेतील वन्य जीव संरक्षणासाठी तेथील विभागाचे दृढीकरण व या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांसाठी प्रशिक्षक यासाठी विश्वास सावरकर यांची नेमणूक झाली. १९९६ मध्ये सहा वर्षांसाठी भारत व अमेरिका यांच्यात वन्यजीव संरक्षण व जैवविविधता संरक्षणासाठी महत्त्वाचा प्रकल्प करार झाला. यात भारतातर्फे विश्वास सावरकर यांनी नेतृत्व केले. त्यामध्ये जैवविविधतेसाठी मोठ्या भूभागाच्या व्यवस्थापनासाठीचे तत्त्व व दृष्टिकोन ठरविण्यात आले. त्याचा आजही विविध ठिकाणी उपयोग केला जातो.

दक्षिण आफ्रिकेतील काही हिमालयीन तहार जातीच्या प्राण्यांना भारतात परत आणण्यासाठी २००१ मध्ये विश्वास सावरकरांची नेमणूक झाली.

नार्वे येथील कृषी विद्यापीठ व भारतीय वन्यजीव संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने काही अभ्यासक्रम सुरू करण्यातही त्यांचा मोठा वाटा आहे.

१९९८ ते २००१ पर्यंत त्यांनी भारतीय वन्यजीव संस्थेचे सह प्रमुख म्हणून काम पाहिले. २००१-२००२ ते या संस्थेच्या वन्यजीवशास्त्र शाळेचे पहिले अधिष्ठाता म्हणून निवडले गेले. त्यानंतर २००३ मध्ये ते निवृत्त होईपर्यंत त्यांनी या संस्थेचे प्रमुख संचालक म्हणून काम पाहिले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी पॅलेस्टाईन, तुर्कस्थान, अफगणिस्तान, पाकिस्तान,

बांग्लादेश, चीन, मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम, लाओस पीडीआर व मॉरिशस यासारख्या अनेक देशांतील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण केले.

दुधवा राष्ट्रीय वन, उत्तर प्रदेश येथील पर्यावरण विषयक अनेक संशोधन प्रकल्पात त्यांचा सहभाग होता. तसेच याच उद्यानातील पाणघोडा प्रकल्प, बिहार, उत्तर प्रदेश व बंगालमधील उंच गवत क्षेत्र, भारतीय कोल्हा प्रकल्प, सातपुड्यातील जैवविविधता प्रकल्प यासारख्या अनेक प्रकल्पातही त्यांचा सहभाग होता. त्यांचे अनेक संशोधन पर लेखही प्रसिद्ध झाले आहेत. स्वेच्छानिवृत्तीनंतरही विश्वास सावरकर कार्यरत आहेत. २००४ च्या दरम्यान मुंबईत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली याच्या आसपास मोठ्या प्रमाणावर बिबट्याने हल्ले केले. याचा अभ्यास करून उपाय सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विश्वास सावरकरांची नियुक्ती केली होती. त्यांनी दिलेल्या सूचना नंतर यशस्वीपणे अमलात आणल्या गेल्या.

‘गाईड फॉर प्लॅनिंग वाईल्डलाइफ मॅनेजमेंन्ट इन प्रोटेक्टेड एरियाज अन्ड मॅनेजड् लॅन्डस्केप’ हे मार्गदर्शक पुस्तक त्यांनी २००५ मध्ये लिहिले. २००५ पासून त्यांनी प्रशिक्षण, संशोधन व अकादमीत काउन्सिलचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. २००४–२००५ मध्ये वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मध्ये बदल सुचविणाऱ्या समितीचे ते सभासद होते.२००६–०७ मध्ये जागतिक बँकेतर्फे सातपुडा जंगलातील जैवविविधता संरक्षण समितीचे ते सदस्य होते. महाराष्ट्रातील ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्याची सीमा आखणी करणाऱ्या समितीचे २००७–०८ मध्ये अध्यक्ष होते. सध्या विश्वास सावरकर मध्य प्रदेशातील सहा व्याघ्र प्रकल्पांच्या समितीचे अध्यक्ष आहेत. तसेच महाराष्ट्र व अंदमान निकोबारच्या राज्य वन्यजीव सल्लागार समितीचे सदस्य आहेत. डेहराडून येथील डि.जी.एन.एफ.ए.मध्ये विविध अभ्यासक्रमात व्याख्याते म्हणूनही ते काम पाहतात. पुणे येथील भारती विद्यापीठाच्या पर्यावरण शिक्षण व संशोधन संस्थेत पदव्युत्तर विद्यार्थ्यांनाही ते मार्गदर्शन करतात.

– आशा बापट

## साळसकर, विजय सहदेव

**महाराष्ट्र पोलीस सेवा**

**प्रमुख – खंडणीविरोधी पथक, मुंबई पोलीस दल**

**५ एप्रिल १९५७ – २६ नोव्हेंबर २००८**



विजय सहदेव साळसकर यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एडगाव येथे झाला. त्यांनी मुंबई येथील दालमिया महाविद्यालयात बी.कॉम. व मुंबई विद्यापीठातून एम.कॉम.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांना सायकल चालवण्याचे वेड होते. त्यांनी सायकलने मुंबई–गोवा, मुंबई–दिल्लीपर्यंत प्रवासही केला होता. शिक्षण पूर्ण केल्यानंतर पाच वर्षे त्यांनी ‘न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी’त मासिक ७५० रु. पगारावर नोकरी केली.

गुन्हेगारी जगाबद्दल मुळातच चीड असल्यामुळे १९८३ मध्ये ते पोलीस दलात रुजू झाले. १९८३ मध्ये साळसकर यांनी नाशिक येथे पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयात महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक अरविंद इनामदार यांच्या हाताखाली प्रशिक्षण घेतले.

विजय साळसकर हे मुंबई पोलीस दलात ‘एन्काउण्टर स्पेशलिस्ट’ या नावाने ओळखले जायचे. त्यांनी आपल्या २४ वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे पंचाहत्तरहून अधिक गुंडांना ठार केले होते. दि. २६ नोव्हेंबर २००८ या दिवशी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ते दहशतवाद्यांचा सामना करत असताना धारातीर्थी पडले. विजय साळसकर यांना त्यांची देशभक्ती व शौर्याबद्दल मरणोत्तर ‘अशोकचक्र’ देऊन सन्मानित करण्यात आले. विजय साळसकर

स



अशोकचक्र

यांनी १९८३ मध्ये राजू शहाबुद्दीन याचा पहिला एन्काउण्टर केला. त्याच्यावर बलात्कार व खुनाचे अनेक आरोप होते. त्यांना या शौर्याबद्दल 'राष्ट्रपती पोलीस पदक' देण्यात आले होते. त्यानंतर साळसकरांनी आपल्या कारकिर्दीत अमर नाईक, जग्गू शेट्टी, साधू शेट्टी, कुंदनसिंग रावत, झाहूर रमाखंडा अशा कुविख्यात गुंडांना तसेच अरुण गवळीच्या टोळीतील अनेक गुंडांना ठार केले. अखेरच्या काळात ते मुंबई पोलीस दलात खंडणीविरोधी पथकाचे प्रमुख होते.

– शैलेश राजपूत

## सुकथनकर, दत्तात्रेय महादेव

**मुख्य सचिव–महाराष्ट्र शासन, केंद्रीय नगर विकास मंत्रालय**

**२१ फेब्रुवारी १९३२**

भारतीय प्रशासकीय सेवेत सुमारे तीन दशकांहून अधिक काळ सेवा करणाऱ्या दत्तात्रेय महादेव सुकथनकर यांचा जन्म बडोदा येथे झाला. त्यांचे आईवडील हे दोघेही बडोदा संस्थानात नोकरी करीत होते. दत्तात्रेय सुकथनकर १९४७ मध्ये मुंबई विद्यापीठातून मॅट्रिक परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले. पुढे बडोद्याच्या सर प्रतापसिंहराव कॉलेज ऑफ



कॉमर्समधून त्यांनी बी.कॉम. ही बडोदा विद्यापीठाची पदवी उच्च श्रेणीत प्राप्त केली. त्यांनी पदव्युत्तर शिक्षण मुंबईच्या पोद्दार महाविद्यालयामधून पूर्ण करून एम.कॉम. ही पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी सुरत येथील के.पी. वाणिज्य महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम केले. एकीकडे अध्यापनाचा अनुभव घेत असताना त्यांची भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारीही होत होती. वयाच्या चोविसाव्या वर्षी (१९५६) त्यांची आय.ए.एस.साठी निवड झाली. तेव्हापासून सुमारे साडेतीन दशके त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत विविध खात्यांमध्ये विविध अधिकारपदे भूषविली. शिक्षण खात्यात उपसचिव व सचिवपदी ते सर्वाधिक काळ राहिले.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर त्यांच्या प्रशासकीय कार्याला विशेष बहर आला. १९६२ मध्ये वसंतराव नाईक यांच्या काळात नव्यानेच स्थापन झालेल्या पुणे जिल्हा परिषदेचे ते पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी झाले. १९६४ ते १९७२ अशी आठ वर्षे ते महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागात उपसचिव होते. पुढे १९७६ ते १९७९ पर्यंत त्याच खात्याचे सचिव म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली.

नंतर त्यांनी औद्योगिक विभागाचे सचिव म्हणून काम पाहिले. पुढे वर्षभर मुंबई महानगराचे आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून त्यांनी आपले उत्तरदायित्व पार पाडले. पुढील दोन– तीन वर्षे ते भारत सरकारच्या नगरविकास मंत्रालयात सचिव म्हणून काम पाहत होते. नंतर महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिवपद भूषवून ३१ ऑगस्ट १९९० रोजी सुकथनकर रोजी आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले.

स

सेवानिवृत्तीनंतर पुण्यात स्थायिक झालेले सुकथनकर सतत कार्यमग्न राहिले. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध उपक्रमांशी त्यांनी आपला अनुभव-संबंध जोडला. ते अनेक शासकीय समित्यांचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. सरकारी समित्यांप्रमाणे विविध औद्योगिक समूहांचे कार्यकारी संचालक म्हणूनही ते काम पाहतात.

पुण्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, तसेच सांस्कृतिक संघटनांशी त्यांचा जवळचा संबंध आहे. 'संगीत महाभारती' आणि 'मुंबई प्रथम' ह्या संस्थांचे ते उपाध्यक्ष आहेत. शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानाच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले. नवी दिल्ली येथील 'नागरी संघटना जीवनक्रम' या राष्ट्रीय संस्थेच्या नियंत्रक मंडळाचे ते अध्यक्ष होते. मोडकळीस आलेल्या जुन्या निवासी इमारतींची वेळीच पुनर्बांधणी करणे हे उद्दिष्ट ठेवून काम करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या एका विशेष समितीचे सुकथनकर प्रमुख सल्लागार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वेतन आयोगाच्या विविध समित्यांवर सुकथनकर यांनी सदस्य, अध्यक्ष, सल्लागार या नात्याने काम पाहिले. १९९७-१९९८ मध्ये स्थापन झालेल्या पाचव्या वेतन आयोगाशी सुकथनकर संबंधित होते. आयोगाच्या शिफारशी प्रत्यक्षात कशा अमलात आणाव्यात यासंबंधी त्यांनी केलेले मार्गदर्शन विशेष मोलाचे ठरले.

त्यांनी नागरी पाणीपुरवठा आणि सांडपाण्याची व्यवस्था आणि विल्हेवाट समितीवर महत्त्वाचे काम केले. 'सुंदर शहर, स्वच्छ शहर' या विचाराला चालना देण्यात सुकथनकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे होते.

एक आदर्श प्रशासक या नात्याने त्यांनी सतत प्रशासकीय सुधारणांचा विचार केला. प्रशासन साधे, स्वच्छ, पारदर्शी आणि गतिमान असावे ह्यावर सुकथनकर यांचा भर असतो. २००३ मध्ये त्यांनी प्रशासकीय सुधारणा समितीचा अहवाल शासनाला सादर केला होता. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनसंपदा मंत्रालयाकडून इ.स. २००० मध्ये किनारपट्टीवरील पर्यावरण संवर्धन आणि रक्षण यासाठी एक समिती नियुक्त केली गेली. सुकथनकर त्या समितीचे सदस्य होते. किनारपट्टीवरील नियंत्रण सर्व घटक राज्यांना लागू करण्याचे काम आणि त्यासंबंधीचे नियम तयार करण्याचे काम या समितीकडे सोपविण्यात आले होते.

ते 'कोकण भूमी प्रतिष्ठान' या बिगर शासकीय सेवाभावी संघटनेचे सल्लागार सदस्य आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा निसर्गप्रिय उपयोग करून कोकण भूमीचा सर्वांगीण विकास कसा घडवून आणता येईल, याबाबत ही संघटना कार्यरत आहे. सेवानिवृत्तीनंतर ही बिगर शासकीय सेवाभावी संस्था, शासन आणि खाजगी उद्योग यांचा सुयोग्य मेळ घालून काही भरीव कार्य करणे ही फारच कठीण बाब म्हणावी लागेल. परंतु एक सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी किती भरीव कामगिरी करू शकतो ह्याचे सुकथनकर हे एक चांगले उदाहरण आहे.

– प्रा. विजय देव

## सोडल, सुरेश विठ्ठल

**सचिव – जलसिंचन विभाग**

**१० मार्च १९४८**

सुरेश सोडल यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यात मोहोळ येथे झाला. त्यांच्या वडिलांनी १९४२ च्या चळवळीत भाग घेतला होता. १९४३ साली तुरुंगातून मुक्तता झाल्यावर त्यांनी अशिक्षित लोकांसाठी प्राथमिक रात्रशाळा काढली. त्यांच्या आई राधनबाई जिल्हा परिषदेच्या शाळेच्या अध्यक्ष होत्या.

गावात शाळा आणि चांगला रस्ता बांधण्याची परवानगी घेण्यासाठी जिल्ह्यातील सरकारी बांधकाम विभागात त्यांच्या वडिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. तेव्हा आपल्या मुलाने इंजिनिअर व्हावे व खेड्यातील लोकांचे प्रश्न सोडवावेत असे त्यांना

स



वाटले. त्यातूनच सोडल यांना प्रेरणा मिळाली.

त्यांचे शिक्षण कोल्हापूर-कराड येथे शिवाजी विद्यापीठातून झाले. १९६५ ते ६९ या काळात शिक्षण पूर्ण करून त्यांनी पहिला क्रमांक मिळवून बी.ई. (सिव्हील) ही पदवी व सुवर्णपदक मिळवले. १९७५-७६ मध्ये उत्तर प्रदेशातील रूरकी विद्यापीठातून 'जलस्रोतांचा विकास' (वॉटर रिसॉर्सेस डेव्हलपमेंट) व 'पाण्याची उपलब्धता व विकास' यातील पदविका घेतली.

भारत शेतीप्रधान देश असल्यामुळे स्वातंत्र्यानंतर बांधकाम खात्याकडे विकासासाठी विविध प्रकारची कामे देण्यात आली.

जुलै १९६९ ते एप्रिल १९७१ मध्ये 'कुकडी योजने'तील 'येदगाव' धरणासाठी मातीची परीक्षा करण्यासाठी क्षेत्र शोधणे, पायासाठी जागेचा शोध घेणे, १९७१ ते १९७४ मध्ये उज्जैन येथील मुख्य कालव्यांचे संकल्पन चित्रण व बांधकाम संरचना, १९७४ ते १९७८ मध्ये उज्जैन योजनेतील भीमा नदीवरील सेतू प्रणालीचे संकल्पना चित्रण व बांधकाम, ऑक्टोबर १९७८ ते १९८३ मध्ये कार्यकारी अभियंता असताना नाशिक-केंद्रीय संरचना चित्रण संघटना- (भूमीवरील व भूमीखालील) पृष्ठभागावरील व पृष्ठभागाखालील ऊर्जाघर यांचे नियोजन संरचना चित्रण करणे अशा जबाबदाऱ्या सोडल यांनी सांभाळल्या.

तसेच सप्टेंबर १९८३ ते डिसेंबर १९८६ मध्ये कार्यकारी अभियंता असताना त्यांनी सावंतवाडी-लघुसिंचन व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लघुसिंचन योजनांचे नियोजन, संरचना, बांधकाम व व्यवस्थापन याकडे लक्ष पुरविले. त्यांनी सप्टेंबर १९८६ ते डिसेंबर १९८९ मध्ये कार्यकारी अभियंता या नात्याने हेटावणे मध्यम योजना, पेण याचे नियोजन व बांधकाम व चार खेडेगावातील शेतकऱ्यांचा सहभाग घेऊन नियोजन व पुनर्वसन आणि ४५ मी. उंचीचे मातीचे धरण याचे नियोजन व बांधकाम याकडे लक्ष पुरविले.

१९८९ मध्ये कार्यकारी अभियंता असताना माणगाव, रायगड जिल्हा येथील क्षारयुक्त जमीन व कोकण क्षेत्रातील क्षारयुक्त जमिनींचे नियोजन, संरचना, बांधकाम याकडे लक्ष पुरविले आणि सागरी माती पसरून जमिनीचा पोत सुधारण्याची संकल्पनासुद्धा राबविली.

जून १९९१ ते ९३ मध्ये कार्यकारी अभियंता असताना जायकवाडी मुख्य कालवा याचे फ्रान्स व जागतिक बँक यांच्या साहाय्याने जेसर द्वारे नियोजन व व्यवस्थापन करून त्यास गती दिली.

जून १९९३ ते १९९५ मध्ये अधीक्षक अभियंता, व्यवस्थापक उजनी योजना सोलापूर, भीमा योजनेतील सिंचनाचे व्यवस्थापन, भीमा योजनेतील क्षेत्राचे विकसन करण्यासाठी प्राधिकारी अशा जबाबदाऱ्या त्यांच्याकडे होत्या. सिंचन व्यवस्थापनेतील तीस संघटनांमध्ये शेतकऱ्यांच्या सहभागाचे व्यवस्थापन करून चौपटीने वाढलेल्या सिंचनाची वसुली केली.

जुलै ९५ ते एप्रिल ९७ मध्ये ते प्रतिनियुक्त कार्यवाह होते. महाराष्ट्रातील पाण्याच्या उपलब्धतेचे नियोजन करणे, आंतरराज्यीय योजनांचा विचार करणे, महाराष्ट्र राज्यातील ५ सिंचन विकास महामंडळं स्थापनेसाठी प्रयत्न करणे, खुल्या बाजारात ९००० कोटी रोख्यांच्या विक्रीतून जलसिंचन विकास महामंडळाची स्थापना करणे या कामात त्यांचा सहभाग होता.

नंतर एप्रिल १९९७ ते २००१ या काळात सोडल यांनी मुख्य अभियंता व सह सचिव म्हणून मुंबई येथील जलसिंचन विभाग मंत्रालयात जबाबदारी सांभाळली.

महाराष्ट्र राज्यातील जल विद्युत योजनांचे नियोजन, आंतरराज्य योजनांचा विचार, महाराष्ट्रातील कृष्णा

खोरे योजनेतील पाचशे योजनांचे नियोजन व त्यांच्या कामातील प्रगतीवर नियंत्रण हे काम त्यांनी केले. जागतिक बँकेच्या साहाय्याने जलविद्युत प्रकल्पांची दिलेल्या मुदतीमध्ये कार्यवाही केली. त्याबद्दल जागतिक बँकेने त्यांची प्रशंसाही केली.

भंडारदरा जलविद्युत (१२ मेगावेट) योजनेचे नियोजन व १५ महिन्यात कार्यवाही याकडे सोडल यांनी लक्ष पुरविले. जलसिंचन विभाग सचिव, जलशक्ती विभाग व जलसिंचन व्यवस्थापनाचे प्रमुख अशाही जबाबदाऱ्या सोडल यांनी सांभाळल्या.

भारतात प्रथमच घाटगर धरणामध्ये राखेचा मर्यादित उपयोग क्रॉंक्रिटमध्ये केला. जल व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग अनिवार्य केला. यासाठी पाण्याच्या पुरवठ्याच्या आकारमानासहित कायद्याचा मुसदा तयार केला. २००१-२००२ मध्ये प्रथमच जलसिंचनाचा अहवाल सादर केला. त्यात महाराष्ट्रातील सर्व धरणांमध्ये एकूण पाणीसाठा किती? प्रत्येक पाणीसाठ्याचा उपयोग पिण्यासाठी, सिंचनासाठी व उद्योगांसाठी कसा होतो याचा तपशील बारकाईने नमूद केला.

उपग्रहाद्वारे जलसिंचन क्षेत्राचे मापन व त्यावरील वसुलीचे दर ठरविणे, पाण्याच्या विविध उपयोगांचा तुलनात्मक अभ्यास करून पाण्याचे दर ठरविणे, त्यासाठी पाणी नियंत्रण अधिकारी नेमणे व पाणीकराच्या वसुलीसाठी त्यांचा हिशेब ठेवणे, अंमलबजावणी करणे व लेखापरीक्षा करणे, जलधोरणाचा मसुदा व धरण सुरक्षा मसुदा, जलसिंचन व्यवस्थापनेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण अनिवार्य करणे व जलआकारणी दर काळानुसार बदलणे, सरकारी नियमानुसार दरवर्षी १५% वाढ करणे, औद्योगिक क्षेत्रातील पाण्याचा पुनर्वापर याचीही त्यांनी चर्चा केली.

सोडल यांनी आपल्या कामाच्या संदर्भात ६ संशोधनपर व १० विस्तृत विवेचनपर विचारपत्रे सादर केली. जलस्रोत विभागातील उल्लेखनीय सहभागाबद्दल २००२-२००३ मध्ये ‘शांती यादव मोहन’ पुरस्कार मिळाला. २००४ मध्ये रशियातील मॉस्को येथे ‘जलसिंचन व जलविकास’ यावर आंतरराष्ट्रीय आयोगाकडून नवीन पद्धतीच्या व्यवस्थापनेबद्दल वात्साव अवार्ड मिळाले. त्यांनी या संदर्भाने ४२ राज्यस्तरीय, २० राष्ट्रीय व ६ आंतरराष्ट्रीय कृतिसत्रे, चर्चासत्रे, परिषदांना हजेरी लावली. नेदरलँड व इंग्लडमध्ये १५ दिवसांचे ‘जल योजना’ यावर त्यांचे प्रशिक्षण झाले. तसेच फ्रान्स, मेक्सिको, अमेरिका, कॅनडा, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, तुर्कस्थान, स्वीडन येथे चर्चासत्रे परिषदा यात त्यांचा सहभाग होता. महाराष्ट्र राज्यातील ‘बेंचमार्किंग ऑफ इरिगेशन प्रोजेक्ट’, जल आकारणी (वॉटर प्राइसिंग) या विषयांच्या संदर्भाने ‘जागतिक बँक’ वॉशिंग्टन येथे तसेच कॅनडातील मॉन्ट्रीयल येथे भारताचे प्रतिनिधित्व केले.

– रोहिणी गाडगीळ

## सोमण, दत्तात्रेय शंकर

**पोलीस महासंचालक – महाराष्ट्र राज्य**

**पोलीस आयुक्त – मुंबई**

**८ मे १९३०**



दत्तात्रेय शंकर सोमण यांचा जन्म जळगाव येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथील नूतन मराठी शाळेत झाले, तर इंग्रजी पाचवीपर्यंतचे शिक्षण पुणे येथीलच न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग येथे झाले.त्यांचे वडील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत होते. १९४५ मध्ये त्यांच्या वडिलांची बदली सोलापूर येथे झाल्यामुळे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण तेथील हरिभाई देवकरण प्रशाला येथे झाले. १९४७ मध्ये ते मुंबई विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर

इंटर आर्टस्पर्यंत सोलापूरच्या डी.ए.व्ही. महाविद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते पुण्याला आले. पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र हे विषय घेऊन त्यांनी बी.ए. आणि एम.ए.ची पदवी घेतली.

शिक्षण घेत असतानाच दत्तात्रेय सोमण यांनी नोकरीदेखील केली. दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी काही काळ सार्वजनिक बांधकाम खात्यात लिपिक म्हणून काम केले. बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर सोमण यांनी पुणे येथील कॅम्प एज्युकेशनच्या शाळेत शिक्षक म्हणून काम केले, त्या वेळी ते एम.ए.चा अभ्यास करत होते.

१९५३ मध्ये ते केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची भारतीय पोलीस सेवेमध्ये निवड झाली. ऑक्टोबर १९५३ मध्ये ते माउण्ट अबू येथील केंद्रीय पोलीस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी दाखल झाले. प्रशिक्षणानंतर दत्तात्रेय सोमण यांची प्रथम नियुक्ती त्या वेळच्या मुंबई राज्यात सुरत येथे झाली. येथे सहा महिने पोलीस खात्याची माहिती घेतल्यावर नवसारी येथे त्यांची स्वतंत्र नेमणूक साहाय्यक पोलीस अधीक्षक या पदावर करण्यात आली.

ऑगस्ट १९५७ मध्ये सोमण यांची नियुक्ती परभणी जिल्ह्यात साहाय्यक पोलीस अधीक्षक (ए.सी.पी.) या पदावर करण्यात आली.तेथून ऑगस्ट महिन्यात कच्छ जिल्हा पोलीस प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली. तेथे असतानाच मुंबई राज्याचे विभाजन झाले आणि त्यांची नेमणूक महाराष्ट्र राज्यात करण्यात आली.

अहमदनगर येथे जिल्हा पोलीस प्रमुख म्हणून तीन वर्षे काम केल्यावर १९६३ मध्ये मुंबई येथे पोलीस उपायुक्त या पदावर ते रुजू झाले. त्या वेळी उत्तर मुंबई या विभाग तीनची संपूर्ण जबाबदारी सोमण यांच्यावर होती. विविध पदांवर काम केल्यावर १९६७ मध्ये सोमण पोलीस उपायुक्त, विशेष शाखा या विभागाचे प्रमुख झाले. या पदावर असतानाच त्यांना भूतान येथे सरकारचा पोलीस खात्याचा सल्लागार म्हणून जाण्याची संधी मिळाली. तेथे त्यांनी १९७० ते १९७४ या कालावधीत काम केले. वेगळी भाषा बोलणाऱ्या संपूर्ण वेगळ्या संस्कृतीच्या लोकांबरोबर काम करण्याचा एक अपूर्व अनुभव या काळात सोमण यांना मिळाला. १९७३ मध्ये सोमण यांना पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले.

यानंतर केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाच्या गुप्तचर विभागात सोमण यांनी १९७४ ते १९७६ दिल्ली आणि मुंबई येथे डेप्युटी डायरेक्टर या पदावर काम केले. तेथून त्यांना पोलीस महानिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येऊन त्यांच्यावर ‘स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया’चे सतर्कता सल्लागार म्हणून जबाबदारी देण्यात आली. या संघटनेकडे त्या वेळी खाद्य तेलाची निर्यात, वृत्तपत्रांची छपाई, मळी निर्मिती, साखर उद्योग अशा विविध उद्योगांची मक्तेदारी होती.या संघटनेचे काम नियमांनुसार होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी सोमण यांनी पार पाडली. या व्यापारी संघटनेमध्ये काम करत असताना युरोपमधील काही देश तसेच अमेरिका आणि रशिया या देशांना त्यांनी भेटी दिल्या.

१९८२ मध्ये दत्तात्रेय सोमण महाराष्ट्रात परत आले.त्या काळात पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पोलीस कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर विचार करण्यासाठी सोमण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल नियोजित वेळेत, तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण सादर केला.यानंतर सोमण यांची नेमणूक गृहखात्यात अवर सचिव म्हणून करण्यात आली.त्याच वर्षी गोवा येथे राष्ट्रकूल परिषदेचे दोन दिवसांचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाचे व्यवस्थाप्रमुख म्हणून सोमण यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. १९८४ मध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्तांची दोन

पदे निर्माण केली गेली होती. त्यांपैकी एका पदावर सोमण यांची नियुक्ती झाली. या पदावर त्यांनी तेरा महिने काम केले, तेथून त्यांची नेमणूक बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त या पदी करण्यात आली.या कार्यकालात त्यांनी अनधिकृत बांधकामांविरोधात काम केले, तसेच मुंबई महानगरपालिकेच्या साधनसामग्रीची देखभाल करणाऱ्या केंद्रांमध्ये सुसूत्रता निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम सोमण यांनी केले. या पदावर त्यांनी सव्वादोन वर्षे काम केले.

१९८५ ते १९८७ या काळात सोमण मुंबईचे पोलीस आयुक्त या पदावर होते.१९८४-१९८५ मध्ये मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात बँकलुटीच्या घटना घडल्या. अशा एकूण नऊ केसेसपैकी सात केसेसचा तपास सोमण यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पूर्ण झाला.१९८५ मध्ये दत्तात्रेय सोमण हे मुंबईचे पोलीस आयुक्त या पदावर असताना महत्त्वपूर्ण घटना घडली. कुख्यात आंतरराष्ट्रीय गुन्हेगार म्हणून कुप्रसिद्ध असलेला चार्ल्स शोभराज दिल्ली येथील तिहार कारागृहातून आपल्या साथीदारांसह पसार झाला. सूर्यकांत जोग त्या वेळी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक होते. चार्ल्स शोभराजला पूर्वी अटक करणारे पोलीस अधिकारी झेंडे, सूर्यकांत जोग, आणि दत्तात्रय सोमण यांच्या सहकार्याने त्याला अटक करण्यासाठी सापळा रचण्यात आला.एक अप्रतिम तपास कसा असू शकतो याचे हे एक उत्तम उदाहरण मानले जाते. चार्ल्स शोभराजला गोवा येथील एल पेकेव्हा या हॉटेलमधून अटक करण्यात आली. या केसची सर्व वृत्तपत्रांनी प्रशंसा केली आणि मुंबई पोलीस हे स्कॉटलंड पोलीस पथकानंतर जगातले दुसऱ्या क्रमांकाचे पोलीस दल आहे असा मुंबई पोलिसांचा गौरव केला. त्या वेळी सोमण म्हणाले होते की, ‘आमची तुलना कोणाशी करू नका. आम्ही जगात पहिल्या क्रमांकाचे पोलीस दल आहोत.’

१९८५ साली राष्ट्रपती पोलीस पदक देऊन दत्तात्रेय सोमण यांचा गौरव करण्यात आला. ज्यूलिओ रिबेरो यांनी पोलीस महासंचालक म्हणून केलेल्या नेत्रदीपक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक म्हणून १९८८ मध्ये दत्तात्रेय सोमण हे महाराष्ट्र राज्याचे तिसरे पोलीस महासंचालक झाले. त्यांची कारकीर्दही रिबेरो यांच्यासारखीच चमकदार ठरली. या पदावर दहा महिने काम करून ३१ मे १९८८ रोजी ते निवृत्त झाले. संपूर्ण कारकिर्दीत त्यांना ज्या ज्या पदांवर नियुक्ती मिळाली, त्या पदावर त्यांनी मनापासून आणि आनंदाने काम केले. निवृत्तीनंतर ते मुंबई येथे स्थायिक झाले आहेत.

निवृत्तीनंतरही विविध सामाजिक प्रकल्पांमध्ये / उपक्रमांमध्ये ते कार्यरत आहेत. मफतलाल मिल,फोर्स कंपनी यांचे डायरेक्टर म्हणून ते काम पाहत होते. सध्या ते मुंबई येथील श्रद्धानंद महिला आश्रमाचे ट्रस्टी आहेत, तसेच ब्रीच कॅण्डी या हॉस्पिटलाचे विश्वस्त ही जबाबदारीही ते पार पाडत आहेत. ‘संगीत महाभारती’ या संस्थेचे देखील ते ट्रस्टी आहेत. रुबी मिल या कंपनीचे संचालक म्हणूनही ते काम पाहत आहेत.

– संध्या लिमये

* * *

स

# ह

## हिरेमठ, शांतवीरय्या गदिगेया

**मेकॅनिकल इंजिनीअर, व्यवस्थापक व प्रशासक**

**१२ डिसेंबर १९१३ – २३ फेब्रुवारी १९९७**



शांतवीरय्या गदिगेया हिरेमठ यांचा जन्म कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यात झाला. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र त्यांच्या डोक्यावरून हरपले होते, त्यामुळे हिरेमठ यांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. लहानपणापासून स्वावलंबी जीवन जगत, त्यांनी कष्ट करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. ते फर्गसन महाविद्यालयामधून शासकीय इंजिनीअरींग कॉलेजमध्ये गेले. त्यांनी १९३७ साली मेकॅनिकल इंजिनिअरींगची पदवी द्वितीय श्रेणीत प्राप्त केली.

१९३८ साली राज्याच्या मेकॅनिकल विभागाची सुरुवात झाली, त्याचे हिरेमठ हे खऱ्या अर्थाने संस्थापक ठरले. ही संघटना त्यांनी अगदी छोट्या उपविभागापासून बांधून महाराष्ट्रभर फैलावली. याच विभागाने पुढे महाराष्ट्र राज्यात अनेक विकासाची कामे केली.

नाशिक जवळील गंगापूर हे देशातील पहिले मातीचे धरण त्यांनी अवजड यंत्रसामग्री वापरून व स्थानिक अर्धशिक्षित तरुणांना हाताशी घेऊन पूर्ण केले. यानंतर लगेच त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती करून कोयना जलविद्युत प्रकल्पात अवजल भुयार खोदण्याची जबाबदारी शासनाने त्यांच्यावर सोपविली. हेही आव्हान त्यांनी स्वीकारून पाच वर्षात शासनाच्या विभागातर्फे या भुयाराचे काम कमी खर्चात करून शासनाचा आर्थिक फायदा करून दाखविला. कोयना प्रकल्पातील कामामुळे ते भारतभर प्रकाशझोतात आले. अशी यांत्रिकी संघटना विकसित केल्याबद्दल इतर राज्यांनी त्यांचे कौतुक करून त्यांचे मार्गदर्शन स्वीकारले.

यानंतर १९५९ साली त्यांना यांत्रिकी मंडळ स्थापन करण्यास सरकारने पाचारण करून त्याची धुरा अधीक्षक अभियंता म्हणून त्यांच्या स्वाधीन केली. या यांत्रिकी मंडळाचे मुख्यालय पुण्यात होते. हिरेमठांनी त्यांच्या प्रशासकीय कुशलतेने महाराष्ट्र राज्यभर यंत्रणेचे जाळे फैलावले. दापोडी येथील शासकीय कर्मशाळेचा विकास मोठ्या प्रमाणात करून राज्यभर धरणासाठी लागणारे पोलादी दरवाजे व पोलादी वक्राकार झडपा तयार करण्याची सुसज्ज यंत्रणा व त्याबरोबरच तंत्रज्ञ तयार केले. अशा कर्मशाळा नांदेड व अकोले या ठिकाणीही बांधण्यात आल्या व त्या त्या विभागातील मशिनरींच्या दुरुस्तीचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले. यांत्रिकी मंडळाचा विस्तार १९५९ ते १९६६ या सात वर्षात मोठ्या झपाट्याने झाला व कर्मचारी व तंत्रज्ञ यांची संख्या ३५०० पर्यंत पोहोचली. राज्यातील सर्व मातीची धरणे उदा., वीर (जिल्हा पुणे) मुळा, घोड, सिद्धेश्वर, येलदरी इत्यादी धरणे, बांधण्याचे काम अवजड यंत्रसामग्री वापरून यांत्रिकी मंडळाने करून दाखविली. मातीची धरणे, कोयना प्रकल्पातील अवजल भुयाराचे काम व राज्यातील धरणांसाठी बनविलेली पोलादी द्वारे व रेडियल गेटस ही हिरेमठ यांच्या जीवनातील सर्वोच्च

कामगिरी होय. १९३८ साली छोट्या उपविभागापासून सुरू केलेल्या संघटनेची धुरा आपल्या द्वितीय अधिकाऱ्याकडे १९६६ साली सोपवताना तिच्यात दोन यांत्रिकी मंडळे व १६ यांत्रिकी विभाग समाविष्ट होते.

१९६६ साली 'भारत फोर्ज' कंपनीच्या फोर्जींगचा कारखाना उभारण्याचे काम चालले होते. त्या कंपनीचे अध्यक्ष नीलकंठराव कल्याणी यांनी हिरेमठ यांना आपल्याकडे येण्याचे आमंत्रण दिले. प्रदीर्घ तीस वर्षांच्या सेवेनंतर, निवृत्तीस ५ वर्षे अवकाश असतानाच हिरेमठ यांनी शासकीय सेवा सोडली आणि 'भारत फोर्ज' कंपनीत ते रुजू झाले. आपल्या अभ्यासू वृत्तीने त्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात केले. पुढे अल्पावधीत ही कंपनी भारतभर नावाजली गेली त्यात हिरेमठांचा सिंहाचा वाटा होता. परंतु याच सुमारास त्यांना अती श्रमामुळे हृदयविकाराचा त्रास झाला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे काही वर्षे भारत फोर्जमध्ये त्यांना मनाविरुद्ध काढायला लागली. त्यानंतर १९७३ मध्ये अचानक त्यांना सिपोरेक्स इंडिया कंपनीचे प्रमुख बी.जी.शिर्के यांनी आपल्याकडे बोलावले. त्यांनी जनरल मॅनेजर म्हणून कार्यभार स्वीकारला. पुढील १० वर्षे त्यांनी नेमाने उत्तम इंजिनीअरिंग कौशल्याने सिपोरेक्स कंपनीला परदेशांच्या नकाशावर विराजमान केले. मध्यपूर्वेत सौदी अरेबिया, इराक इत्यादी ठिकाणी निर्यात करून कंपनीने खूप नफा व नाव कमावले. उत्पादनाची व निर्यातीची सर्व जबाबदारी हिरेमठांनी चोखपणे पार पाडली. अशा तऱ्हेने प्रकृतीची उत्तम तऱ्हेने काळजी घेत वयाच्या ७० वर्षापर्यंत ते सिपोरेक्समध्ये कार्यरत राहिले.

स्वत:चा कारखाना असावा या हेतूने त्यांनी चिंकवे हा गाड्यांकरिता सुटे रबरी भाग बनविण्याचा कारखाना वयाच्या ७० व्या वर्षी विकत घेतला. त्यात कमालीची सुधारणाही केली. परंतु लघु उद्योगाचे अर्थशास्त्र सांभाळणे त्यांना त्या वयात जमले नाही. त्यांनी अकरा वर्षे अथक परिश्रम करून, कारखाना चालू ठेवून कामगारांचे हित जपले परंतु त्यावेळी कारखानदारीची वाईट वर्षे व अवास्तव व्याजदर या कारणांमुळे तो कारखाना १९९४ मध्ये विकून टाकण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

त्यांना खेळांची आवड होती. क्रिकेट, टेनिस व बॅडमिंटन हे खेळ ते उत्तम खेळत. वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. जगदीश हिरेमठ हे त्यांचे चिरंजीव आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हृदयरोग तज्ज्ञ आहेत तर मोठे चिरंजीव मृत्युंजय पाटबंधारे खात्यात व महांतेश हे इंजिनिअरींगमध्ये डॉक्टरेट मिळवून उपग्रह निर्मिती व त्याचे अवकाशात प्रक्षेपण या क्षेत्रात अमेरिकेत नावाजलेले आहेत.

– मृत्युंजय हिरेमठ

## हुद्दार, श्रीकांत नारायण
**सचिव – पाटबंधारे विभाग**
**१ ऑक्टोबर १९४८**



श्रीकांत नारायण हुद्दार यांचा जन्म तसेच शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षणही नागपूर येथे झाले. घरची परिस्थिती व वडिलांची नोकरीही बेताचीच असल्याने त्यांना हातभार लावण्याच्या दृष्टीने त्यांनी शालान्त परीक्षेनंतर स्थापत्य शास्त्रात पदविका परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वयाच्या १८ व्या वर्षी चंद्रपूर येथे नोकरीस प्रारंभ केला.

१९६७ ते १९७३ या काळात त्यांनी आवेक्षक या पदावर काम केले. ते प्रथमत: पाटबंधारे खात्यात नागपूर अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ येथे रुजू झाले आणि सुरुवातीच्या काळामध्ये चंद्रपूर जिल्हा, नागपूर जिल्हा व यवतमाळ जिल्हा या भागातील पाटबंधारे प्रकल्पांचे सर्वेक्षण व अन्वेषण करून विदर्भातील जंगलाने वेढलेल्या परिसरात त्यांनी

मोठ्या व मध्यम प्रकल्पांचा पाया घातला. चंद्रपूरच्या जंगलात सर्वेक्षण करीत असताना अत्यंत मागासलेल्या गोंड, माडीया अशा आदिवासी लोकांशी त्यांचा संपर्क होत असे. त्यांच्यात मिळूनमिसळून त्यांना सर्वेक्षणाची (माडीया भाषेत 'पैमास') रूपरेखा समजावून सांगून त्यांनी या कालखंडात विदर्भातील अनेक प्रकल्पांचे सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण करून प्रकल्प अहवाल मंजूर करून घेतले. यातील बरेचसे प्रकल्प सध्या कार्यान्वित झाले असून गोसीखुर्द प्रकल्प हा केंद्र शासनाने राष्ट्रीय प्रकल्पात समाविष्ट केलेला आहे.

चंद्रपूरच्या जंगलात सर्वेक्षण करीत असतानाच त्यांनी स्थापत्य शास्त्रातील पदवीशी समकक्ष अशी ए.एम.आय.ई.ची परीक्षा उत्तीर्ण केली. १९७३ पासून ते कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत होते. याच कालावधीत त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या परीक्षा दिल्या. त्या दोन्ही ठिकाणी त्यांची प्रथम वर्ग अधिकारी म्हणून निवड झाली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ते सर्वप्रथम आले. सन १९७५-७६ मध्ये ते केंद्रीय जल आयोगामध्ये साहाय्यक संचालक पदी कार्यरत असताना, जलविद्युत प्रकल्पांच्या संकल्पाबाबतचे काम त्यांचेकडे आले. त्यांनी ओरिसातील रंगाली प्रकल्प, जम्मू-काश्मीरमधील स्टकना प्रकल्प, अफगणिस्तानातील बामीयान आदी जलविद्युत प्रकल्पांसंबंधीत कामे केली.

सन १९७६ च्या नोव्हेंबर मध्ये ते महाराष्ट्र शासनात प्रथम श्रेणी अधिकारी या नात्याने रुजू झाले व त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभागाच्या सचिव पदावरून सप्टेंबर २००६ अखेर ते निवृत्त झाले. त्यांच्या या जवळपास ३९ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी १६० मे. वॅटचा पेंच जलविद्युत प्रकल्प, १००० मे. वॅटचा कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा-४ या दोन्ही प्रकल्पांचे संपूर्ण बांधकाम करून हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित केले.

प्रशिक्षणानंतर त्यांची नेमणूक पेंच पाटबंधारे प्रकल्प या मोठ्या प्रकल्पावर झाली. या प्रकल्पाच्या पायात मोठ्या प्रमाणात घळी असून, संगमरवरी दगडाचा पाया असल्याने त्यामध्ये 'कर्टन ग्राऊंटींग' पद्धतीने पायाला मजबुती आणली, कालव्याच्या सरेखेमध्ये बऱ्याच ठिकाणी 'फिशर क्ले' प्रकाराची माती असल्याने त्यांनी या मातीवर उछड पद्धतीच्या मातीचा भराव टाकून अस्तरीकरणाचा नवा प्रयोग तडीस नेला व याच प्रकल्पावर 'बॅलेन्स कॅन्टी लिव्हर'पद्धतीचे दोन जलसेतूचे निर्माण केले. तसेच धरण पायथ्याला मत्स्य व्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टीने फिश सिडस् फार्म व पिंपळाच्या आकाराची एक सुंदर बाग निर्माण केली. नागपूर येथे फलोत्पादन विभागातर्फे भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनात या बागेतल्या विविध फुलांना सातत्याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळालेले आहे.

पदोन्नतीवर ते कार्यकारी अभियंता म्हणून पेंच जलविद्युत प्रकल्पावर रुजू झाले. भुयारी विद्युतगृहात मोठ्या प्रमाणामध्ये घसरण होऊन दरडी कोसळल्या असल्यामुळे कोणीही ते काम करण्यास तयार नव्हते. त्यांनी जिवावर उदार होऊन, पुढाकार घेऊन मजुरांना प्रोत्साहित करून या संपूर्ण भुयाराला मजबुती व आधार देण्याचे काम केले. सन १९८६-८७ मध्ये प्रकल्पांची दोन्ही संयंत्रे कार्यान्वित झाली.

हुद्दार यांच्या कामावर प्रभावित होऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांनी त्यांची कोयना प्रकल्पाच्या ४ थ्या टप्प्याच्या कामासाठी निवड केली. सुरुवातीच्या काळासाठी त्यांची नियुक्ती कोयना प्रकल्पाच्या संकल्पनेसाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (विद्युतगृहे) येथे झाली. कोयना प्रकल्पाच्या ४ थ्या टप्प्याचे अधिजल/अवजल भुयार, भूगर्भातील विद्युत गृह, आदान मनोरे, जलाशय छेद प्रक्रिया असे केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडातील सर्वप्रथम होणाऱ्या या प्रक्रियेचे त्यांनीच संकल्पन केले. यामुळे त्यांचे नाव

महाराष्ट्रातच नव्हे तर केंद्र शासनातही सर्वतोमुखी झाले.

सन १९९३ मध्ये त्यांची अधीक्षक अभियंता पदी नियुक्ती झाल्यानंतर व संकल्पनास परिपूर्ण अशी दिशा दिल्यानंतर, १९९४ साली त्यांची शासनाने कोयना प्रकल्पाच्या बांधकामावर नियुक्ती केली. प्रकल्पावर त्यांनी कठीण परिस्थितीत उल्लोळ विहीर, भुयारी विद्युतगृह, भुयारी प्रेशर शाफ्ट, आधीजल/अवजल बोगदे, आदान मनोरे आणि धरणाच्या तळाखालील जलाशय छेद प्रक्रियेची धाडसाने तयारी पूर्ण केली. मुख्य अभियंता पदी पदोन्नती झाल्यानंतर १३ मार्च १९९९ रोजी संपूर्ण आशिया खंडातील पहिल्या जलाशय छेद प्रक्रियेची त्यांनी यशस्वी सांगता केली. त्यानंतर १९९९ मध्ये पहिले संयंत्र व टप्प्याटप्प्याने उर्वरित ३ संयंत्रे त्यांनी २००० सालापर्यंत कार्यान्वित करून १००० मे. वॅट जलविद्युत निर्मितीची सुरुवात केली.

त्यांच्या कामाने प्रभावित होऊन महाराष्ट्र शासनाने त्यांच्याकडे घाटघर जलविद्युत प्रकल्पाचे पंप उदंचन योजनेचे काम सोपविले. या प्रकल्पासाठी त्यांनी जपानी अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून विद्युतगृहाचे संकल्पनाची आखणी, त्याचप्रमाणे भारतातील पहिल्या औष्णिक प्रकल्पातील राखेचा वापर करून बांधकाम करावयाच्या धरणाचे संकल्पन पूर्ण करून, प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात केली. नंतर मंत्रालयातील नियोजनविषयक कामासाठी शासनाने त्यांची सहसचिव पदी नियुक्ती केली. या कालावधीत राज्यातील अनुशेषाचा प्रश्न, त्यासाठी निधीचे वाटप, तसेच केंद्र शासनाकडून पाटबंधारे प्रकल्पांसाठी वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत निधी मिळविण्यासाठी त्यांनी हिरिरीने प्रयत्न करून महाराष्ट्र राज्याच्या लाभाच्या दृष्टीने बहुमोल कामगिरी केली.

वर्ष २००५ मध्ये त्यांची कार्यकारी संचालक पदावर पदोन्नती होऊन त्यांनी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या कामात गतिमानता आणली. २००३-०४ मध्ये राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना पाटबंधारे प्रकल्पासाठी अतिरिक्त निधी मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी फार मोलाची कामगिरी करून राज्यातील विविध प्रकल्पांना टंचाई कामातील निधी प्राप्त करून दिला. याच कालावधीत औष्णिक राखेचा वापर करून भारतातील पहिले ‘रोलर कॉम्पेक्टेड काँक्रीट’चे धरण त्यांनी ३७८ दिवसात पूर्ण करून घेतले. स्थापत्य शास्त्रज्ञाच्या मानबिंदूत त्यांनी जलाशय छेद प्रक्रिया व रोलर कॉम्पेक्टेड धरण या दोन्ही संकल्पना भारतात पहिल्यांदाच राबवून महाराष्ट्रातच नव्हे तर देशात राज्याची मान उंचावण्यामध्ये अहम भूमिका पार पाडली. २००६ मध्ये सचिव म्हणून नियुक्ती झाल्यानंतर विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी त्यांनी पंतप्रधान पॅकेज मंजूर करून घेतले.

जलसंपदा विभागातील सर्वोच्च पदावरून शासकीय खात्यातील निवृत्ती घेत असतानाच, अनेक अनुभव असल्यामुळे निवृत्तीच्या दिवशीच शासनाने त्यांची समुपदेशक या नात्याने कृष्णा पाणी वाटप तंटा लवादासाठी नेमणूक केली. तसेच केंद्र शासनाच्या पंतप्रधान पॅकेज व वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत निधी मिळविण्याच्या दृष्टीने त्यांची, राज्यातील जे प्रकल्प केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी सादर केले जातात त्यांची मंजुरी प्राप्त करून घेणे व केंद्रातील विविध खात्यांशी संपर्क ठेवून महाराष्ट्र राज्यातील प्रकल्प मार्गी लावणे या दृष्टीने विविध महामंडळांचे सल्लागार म्हणून नियुक्ती केली गेली. ते या विविध भूमिका पार पाडीत असून, केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळविणारे राज्य म्हणून महाराष्ट्रास प्रथम क्रमांकावर आणून ठेवले.

आदिवासी लोकांबरोबर सर्वेक्षण योजनेची कामे करत असताना जंगली प्राण्यांचे छायाचित्रण करण्याचा व विविध प्रकारची फुलझाडे लावण्याचाही त्यांना छंद लागला. त्यातूनच त्यांनी कोयना प्रकल्पावर नेहरू

उद्यान विकसित केले. कोयना प्रकल्पाच्या विकासात त्यांचे योगदान आणि अनुभव यापोटीच त्यांची कोयना प्रकल्पाच्या तज्ज्ञ समितीवर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यकुशलतेसाठी त्यांना महाराष्ट्र शासनाने सर विश्वेश्वरय्या पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. तसेच त्यांना फाय फाऊंडेशन पुरस्कार, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींगचा विश्वेश्वरय्या पुरस्कार, पुणे व नागपूर महानगरपालिकेतर्फे त्यांचा सत्कार, तसेच केंद्र शासनातर्फे जवाहरलाल नेहरू पुरस्कार व पुण्यातील निनाद संस्था, इंजिनिअर फोरम, नागपूर यांचेतर्फे स्थापत्य शास्त्रातील भरीव कामगिरीबद्दल जीवन गौरव, सेंटर फॉर इंडिस्ट्रियल डेव्हलपमेंट कौन्सिल या संघटनेतर्फे २००९ मधील विश्वकर्मा पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे. त्यांना काव्य, साहित्य यासाठीचा प्रेरणा फौंडेशनतर्फे २००६ मधील पहिला जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला आहे. त्यांनी अनेक स्थापत्य विषयक परिषदा तसेच विविध महाविद्यालयांमधून मार्गदर्शन केले. सेवानिवृत्तीनंतरही कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद व बाभळी प्रकल्प, पोलावरम व मांडवी खोरे तंटा या संदर्भातील महाराष्ट्र राज्याची भूमिका ते हिरिरीने मांडत आहेत.

– संपादित

* * *

# परिशिष्ट – १

## लेखक परिचय



**वर्षा आंधळे–फडके**
बी.कॉम.एलएल.एम.
पत्रकार–दै.सामना, महाराष्ट्र शासन पी.आर.ओ.



**अरविंद सिद्धेश्वर इनामदार**
एम.एस्सी.,
निवृत्त – आय. पी. एस.
पोलीस महासंचालक




**प्रभाकर दत्तात्रेय करंदीकर**
एम.ए.राज्यशास्त्र, एम.एस्सी.
निवृत्त – आय. ए. एस.
लेखक



**दत्ता शिवाजीराव कानवटे**
बी.ए.,पत्रकारिता
पत्रकार – साप्ताहिक विवेक



**वसुधा विशाल कानडे** एम. पी. एम.,बी.कॉम.
एम.बी.एम.फायनान्स



**प्रकाश कामत**
पत्रकार, विविध नियतकालिकांमधून लेखन, सा.विवेकमधून लेखन, मुंबई दूरदर्शनसाठी संहिता लेखन.




**परिणिता कानेटकर**
बी.ए. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, सध्या सोस्वा ट्रेनिंग इन्स्टीट्यूट मुख्य कार्यकारी अधिकारी




**सुनंदा अशोक कुलकर्णी**
एम.एस्सी.,एल.एल.बी.,डी.बी.एम.
प्राध्यापक–हरिप्रसाद ऑईल मिल, चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स,



**राजेंद्र शंकरराव कुलकर्णी**
वास्तुशास्त्रज्ञ
संपादक – धनंजय व चंद्रकांत दिवाळी अंक



**सुधाकर कुलकर्णी**
एम.ए.अर्थशास्त्र
अर्थसल्लागार




**नितीन केळकर**
बी.ए.,एम.सी.जे., वृत्त सहसंपादक मुंबई दूरदर्शन, सहसंपादक योजना मासिक, माध्यमक्षेत्राचे अभ्यासक , संशोधक, लेखक, निवेदक, कवी



**पल्लवी गाडगीळ**
एम.ए.मराठी, पत्रकारिता पदविका पत्रकार-दूरदर्शन-आकाशवाणी, कालनिर्णय दिवाळीअंक,चरित्रकोश प्रकल्प, जनसंपर्क अधिकारी



**मल्हार कृष्ण गोखले**
बँक ऑफ इंडियामध्ये कार्यरत, पत्रकार, लेखक, दै.सकाळ तरूण भारत,सा.विवेकमध्ये नियमित लेखन



**प्रदीप नारायणराव चिटगोपेकर**
बी.ई. सिव्हिल अभियंता
संपादक - जलसंवाद मासिक



**बबन पंडितराव जोगदंड**
बी.ए., पत्रकारिता एम.ए. समाजशास्त्र, राज्यशास्त्र संशोधन अधिकारी यशदा, पुणे यशदा-यशमंथन त्रैमासिकाचे संपादक

.




**वर्षा जोशी-आठवले**
बी.ए.इंग्रजी, एम.ए. मराठी, पत्रकारिता-पदवी, पत्रकार शिल्पकार चरित्रकोश संपादक शिक्षणखंड



**श्रीधर दत्तात्रय जोशी**
बी.ए. संख्याशास्त्र, अर्थशास्त्र
निवृत्त आय.ए.एस. निवृत्त उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण



**अभय टिळक**
एम.फिल-अर्थशास्त्र, स्तंभ लेखक, संशोधक-अर्थशास्त्र अभ्यासक, संपादक भारतीय अर्थविकासवर्धिनी अर्थबोध मासिक



**प्रा. डॉ. विजय प्रल्हाद देव**
एम.ए. राज्यशास्त्र, कौटील्याच्या तुलनेत मॅकीअॅव्हेली या विषयात पीएच.डी.,प्राचार्य-स. प. कॉलेज पी.एच.डी., एम.फील मार्गदर्शन.



**हेमा सुधीर देवरे**
बी.ए.संस्कृत,मानसशास्त्र,संगित,दै. लोकसत्ता-सांस्कृतिक वार्ताहर लेखिका, नाटककार, सांस्कृतिक माहितीपट निर्मिती-दिग्दर्शन



**जयराम देसाई**
सहकार या विषयाचे अभ्यासक,लेखक, संपादक साहित्य शिवार, मुक्त पत्रकार,अध्यक्ष पुणे सह. गृह.संस्था, स्वयंसेवी संस्थांना सल्ला मार्गदर्शन



**पूर्णा धर्माधिकारी**
एम.कॉम.
१९९६ पासून 'चाणक्य मंडल'मध्ये प्रशासक म्हणून कार्यरत



**मधुकर लक्ष्मण नानकर**
बी.एड.एम.एड.,प्राचार्य,गणित, संख्याशास्त्र, शिक्षण या विषयावर संशोधन, मार्गदर्शन,वैदिक गणित या विषयावर लेखन



**अरुण पाटणकर**
निवृत्त आय.ए.एस.




**मिनाक्षी राजेंद्र पाटील**
एम.ए. मराठी वाङमय, व्याख्याता प्राध्यापक-रूपारेल कॉलेज, सहाय्यक संचालक लेख महसूल वनविभाग चित्रकार,



**अनघा फासे**
बी.ए.इंग्रजी वाङ्मय, एम.ए. पत्रकारिता,
पत्रकार - दै.सामना



**वसंत लक्ष्मण फातर्फेकर**
एम.एस्सी., एम.बी.ए.
लेखक, भारतीय लोकप्रशासन संस्था, मानद खजिनदार



**बळवंत शंकर बर्वे**
आर्किटेक्ट,
ट्रस्टी स. गो. बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट पुणे




**विजयकुमार शांताराम बांदल**
बी.कॉम., पत्रकार
कार्यवाह मुंबई मराठी पत्रकार संघ



**अरूण लक्ष्मण बोंगिरवार**
एम.एस.सी.
नृिवत्त आय.ए.एस.
माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य



**सविता भावे**
बी.ए., एलएल. बी.
चरित्रलेखक
अनेक चरित्रात्मक पुस्तकांचे लेखन



**दिनकर माधवराव मोरे**
बी.ई. सिव्हिल
अभियंता - महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे व जलसंपदा विभाग, जल अभ्यासक व विचारवंत



**विजयकुमार मोरे**
बी.एस.सी., केसरी,पुढारी,आणि गावकरी या वृत्तपत्रांमधून गेली १८ वर्षे पत्रकारीतेचा अनुभव
**संपादक आजचा आमदार**



**विनय मावळणकर**
बी.एस्.स्सी.(गणित),एम.बी.ए.(एच.आर.) पुणे येथील महाराष्ट्र सामाजिक नवनिर्माण अकादमीमध्ये संशोधक-अभ्यासक, व्यक्तीमत्त्व विकासाचे प्रशिक्षक



**शैलेश दत्तु राजपूत**

बी.ए. पत्रकारिता

पत्रकार - साप्ताहिक विवेक



**संदीप राऊत**

वृत्तपत्र, स्तंभलेखक, विविध मासिके नियतकालिकांमधून लेखन, त्रैमासिक 'नंदादीप' चे कार्यकारी संपादक, 'जनसंवाद' मासिकाचे संपादक



**संध्या सुधाकर लिमये**

बी.ए., इंग्रजी वाङ्मय

पत्रकार - वृत्तपत्र आणि जनसंवाद पदवी, प्रशासन व न्यायपालिका खंड समन्वयक



**संतोष शिंत्रे**

एम.एस स्सी.

इंडस्ट्रीयल मायक्रोबायोलॉजी,वृत्तपत्रविद्या आणि जनसज्ञापन पदविका

व्यावसायिक संज्ञापन आणि संहिता लेखन या क्षेत्रात कार्यरत,या संदर्भातील ग्रे सेल या संस्थेची स्थापना,विविध वृत्तपत्रांमधुन पर्यावरण,विज्ञान, आधुनिक शेती या विषयांवर लेखन



**प्रतिभा संतराम संकपाळ**

बी.ए., पत्रकारिता

पत्रकार - गृहशोभिका, रूची, विवेक, शब्दांची प्रतिमा, दिवाळा अंक



**विजया अर्जुनराव सस्ते**

एम.ए.

चेअरमन -

बारामती रिमांड होम

**विवेक कुलकर्णी**

एम.ए.हिंदी, पत्रकार

**भारती कोतवाल**

आलोचना सेंटर फॉर डॉक्युमेंटेशन ॲन्ड रिसर्च पुणे या संस्थेमार्फत मुस्कान या बालकांच्या लैंगिक शोषणाविरूद्धच्या उपक्रमात कार्यरत

**स्वरूप रमेश पंडित**

पत्रकार, लेखक, सध्या ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशनमध्ये कार्यरत

**सुनिता लोहोकरे**

एम.ए.इंग्रजी साहित्य, पत्रकारीता पदवीका, पत्रकारीत क्षेत्रात गेली १५ वर्षे कार्यरत. सध्या

दै.महाराष्ट्र टाईम्स उप संपादक म्हणून कार्यरत

**श्रीनिवास माधव वैद्य**

बी.एस्सी.

पत्रकार - तरूण भारत


**अनिल पांडुरंग शिंदे**

एम.ए. इकॉनॉमिक्स, बी. जे.

पत्रकार - प्रभात, पुढारी

संपादक - रिक्षावाला मंच मासिक

* * *



# ।। संरक्षण ।।

# आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
# शिल्पकार चरित्रकोश

## खंड ४

## भाग ३

# संरक्षण


संपादन

लेफ्ट. जन. द. ब. शेकटकर

अविनाश पंडित

दीपक हनुमंत जेवणे

राजेश प्रभु साळगांवकर

वर्षा जोशी - आठवले



खंड सहयोग

पुणे महानगरपालिका, पुणे

प्रमुख प्रायोजक

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्

सहप्रायोजक

दि सारस्वत को-ऑप. बँक लि.

प्रकाशक

साप्ताहिक विवेक

(हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
शिल्पकार चरित्रकोश, खंड ४
भाग - ३ : संरक्षण

© साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)

**पहिली आवृत्ती :**
चैत्र शु. एकादशी, शके १९३३, १४ एप्रिल २०११

**प्रकाशक :**
साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था)
५/१२, कामत औद्योगिक वसाहत,
३९६, स्वा. सावरकर मार्ग, प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी : (०२२) २४२२ ९४५१
फॅक्स : (०२२) २४३६ ३७५६
e-mail : charitrakosh@gmail.com
Website : www.maharashtranayak.com

**संगणकीय अक्षरजुळणी :**
संकल्प ॲडव्हर्टाइझिंग अँड बुकवर्क
९०२, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

**मुद्रक :**
सिद्धी ऑफसेट प्रा. लि. प्रभादेवी, मुंबई - २५.

**मुद्रितशोधन :**
वृषाली सरदेशपांडे

**मुखपृष्ठ :**
आशुतोष सरपोतदार

**मूल्य :** ९०० रुपये

# संरक्षण खंड

**संपादन :**
लेफ्ट. जन. द. ब. शेकटकर
अविनाश पंडित
दीपक हनुमंत जेवणे
राजेश प्रभु साळगांवकर
वर्षा जोशी - आठवले

**खंड समन्वयक :**
रूपाली गोवंडे

**खंड सहयोग :**
पुणे महानगरपालिका, पुणे
पिनॅकल ग्रुप
के.पी.आय.टी., पुणे
स. गो. बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट

**विशेष आभार :**
राज्य सेवा सैनिक बोर्ड
सदर्न कमांड लायब्ररी

'डिफेन्स रिव्ह्यू'ने प्रकाशित केलेल्या 'पोर्ट्रेट्स् ऑफ वेलर' या पुस्तकातून अनेक संदर्भ व माहिती उपलब्ध झाली, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार

# अनुक्रमणिका


| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर | मुख्य नोंद |
|---|---|---|---|---|---|---|
| ● आवटी मनोहर प्रल्हाद | ४११ | – | ॲडमिरल | – | – | |
| ● इंजिनिअर मिनू मेरवान | ४१२ | – | – | एअरमार्शल | – | |
| ● इनामदार सतीश गोविंद | ४१३ | – | – | एअरमार्शल | – | |
| ● कात्रे लक्ष्मण माधव | ४१५ | – | – | ए.ची.मार्शल | – | |
| ● कुलकर्णी रमेश विष्णू | ४१६ | ले.जन. | – | – | – | |
| ● कुलकर्णी सदानंद कृष्णराव | ४१७ | – | एअरमार्शल | – | | |
| ● खेत्रपाल अरुण एम. | ४१९ | से लेफ्ट. | – | – | – | |
| ● गांधी अडी रुस्तमजी | ४२० | – | – | एअरमार्शल | – | |
| ● गांधी रुस्तुम खुशरो शापोरजी | ४२१ | – | व्हाईस ॲड. | – | – | |
| ○ गाडगीळ मिलींद | ४२२ | – | – | – | युद्ध पत्र. | प.ल.सा. |
| ● गुप्ते राजेंद्र केशव | ४२३ | मेजर जन. | – | – | – | |
| ▲ गोखले दिनकर विनायक | ४२३ | – | – | – | युद्ध पत्र. | प.ल.सा. |
| ● गोखले भूषण नीळकंठ | ४२४ | – | – | एअरमार्शल | – | |
| ● ग्रीन जॉनी विल्यम | ४२६ | – | – | एअरमार्शल | – | |
| ● घाडगे यशवंत बाळाजीराव | ४२७ | नाईक | – | – | – | |
| ● चिटणीस अजय हेमंत | ४२९ | – | कमोडोर | – | – | |
| ● चिटणीस हेमंत रामकृष्ण | ४३० | – | – | एअरमार्शल | – | |
| ● जठार अरविंद निळकंठ | ४३२ | ब्रिगेडिअर | – | – | – | |
| ● जाधव तुकाराम | ४३३ | नाईक | – | – | – | |
| ● जाधव नामदेव रामजी | ४३३ | हवालदार | – | – | – | |
| ● जोगळेकर ए. एम. | ४३४ | मेजर जन. | – | – | – | |
| ○ जोगळेकर जयवंत दत्तात्रेय | ४३५ | – | – | – | लेखक | |


**अनुक्रमणिकेतील संक्षेपांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे :–** ॲड–ॲडमिरल, एअर–एअर मार्शल, कमा–कमांडट, जन–जनरल, फ्ला–फ्लाईट लेफ्टनंट, मे–मेजर, लेफ्ट–लेफ्टनंट, सुभे–सुभेदार, स्क्वा–स्क्वाड्रन, पत्र–पत्रकार, प.ल.सा.–पत्रकारिता आणि ललितेतर साहित्य खंड, राज–राजकीय खंड

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|
| ● जोगळेकर प्रभाकर के. | ४३५ | मेजर जन. | – | – | – | |
| ● जोशी अविनाश देवदत्त | ४३६ | – | – | एअरमार्शल | – | |
| ● जोशी पंकज शिवराम | ४३८ | लेफ्ट.जन. | – | – | – | |
| ● टिपणीस अनिल यशवंत | ४४० | – | – | ए.चीफ मार्शल | – | |
| ● डायस फ्रिंसिस तिबुर्तियस | ४४२ | लेफ्ट. जन. | – | – | – | |
| ● डिकोस्टा अॅलन अल्बर्ट | ४४३ | – | – | ग्रुप कॅप्टन | – | |
| ● तारापोर अर्देशीर बुर्ज़ोरजी | ४४४ | लेफ्ट. जन. | – | – | – | |
| ● थोरात-पाटील शंकरराव पांडुरंग | ४४६ | लेफ्ट. जन. | – | – | – | |
| ● नवले प्रकाश धुळाप्पा | ४४९ | – | – | फ्लाईट लेफ्ट. | – | |
| ● नाईक प्रदीप वसंत | ४४९ | – | – | ए.चीफ.मार्शल | – | |
| ● नाडकर्णी जयंत गणपत | ४५० | – | अॅडमिरल | – | – | |
| ● नातू अनंत विश्वनाथ | ४५४ | मेजर जन. | – | – | – | |
| ● नानावटी रुस्तुम कैखुशरू | ४५६ | लेफ्ट. जन. | – | – | – | |
| ● निमसे त्र्यंबक दादा | ४५७ | हवालदार | – | – | – | |
| ● पंडित आनंद रामदास | ४५९ | – | – | एअर मार्शल | – | |
| ● पंडित भर्तुहरी त्रिंबक | ४६० | लेफ्ट. जन. | – | – | – | |
| ● परमेश्वरन रामस्वामी | ४६१ | – | – | एअर मार्शल | – | |
| ● पाटकर विजय अच्युत | ४६२ | – | – | एअर मार्शल | – | |
| ● पाटणकर मनोहर सदाशिव | ४६४ | लेफ्ट.जन. | – | – | – | |
| ● पिंटो वॉल्टर अॅन्थनी | ४६५ | लेफ्ट.जन. | – | – | – | |
| ● पित्रे शशिकांत गिरीधर | ४६६ | मेजर जनरल | | | | |
| ● बाहेकर रमेश चंद्रभान | ४६९ | हवालदार | – | – | – | |
| ● बेवूर गोपाळ गुरुनाथ | ४६९ | जनरल | – | – | – | |
| ● भिडे विजयकुमार विनायक | ४७१ | – | – | – | – | |
| ● मालशे यशवंत विनायक | ४७४ | – | – | ए.व्हॉ.मार्शल | – | |
| ● मिशीगन अॅन्टोनी हेरॉल्ड ए | ४७४ | मेजर जन. | – | – | – | |
| ▲ मुंजे बाळकृष्ण शिवराम | ४७५ | – | – | – | सै.शि.प्र. | राज.खंड |
| ● मुळगावकर हृषीकेश श्यामराव | ४७७ | – | – | ए.चीफ मार्शल | – | |
| ● राजवाडे माधव गणपत | ४७९ | मेजर जन. | – | – | – | |
| ● राणे रामा राघोबा | ४८० | सेकंड जन. | – | – | – | |
| ● रोमण सुनील मारुती | ४८१ | लान्स हवाल. | – | – | – | |
| ● लाखकर श्रीनिवास वामनराव | ४८२ | – | व्हॉ. अॅड. | – | – | |
| ● वालकर शंकरराव शंखपान | ४८४ | कॅप्टन | – | – | – | |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर |
|---|---|---|---|---|---|
| ● विल्सन पीटर | ४८४ | – | – | ए.कमोडोर | – |
| ● वैद्य अजित विश्वनाथ | ४८५ | – | – | एअर मार्शल | – |
| ● वैद्य अरुण श्रीधर | ४८६ | सरसेना. | – | – | – |
| ● शेकटकर दत्तात्रेय बालाजीराव | ४८९ | लेफ्ट.जन. | – | – | – |
| ● सरसर मुकुंद | ४९२ | मेजर | – | – | – |
| ● सहस्रबुद्धे यशवंत दत्तात्रेय | ४९२ | लेफ्ट. जन. | – | – | – |
| ● सातपुते सतीश भालचंद्र | ४९४ | लेफ्ट. जन. | – | – | – |
| ● सामंत मोहन नारायण | ४९४ | – | कॅप्टन | – | – |
| ● साळुंके पांडुरंग बाळकृष्ण | ४९५ | शिपाई | – | – | – |
| ● सुभेदार जर्नादन संभाजी | ४९५ | – | – | – | – |
| ● सुर्वे मधुसुदन नारायण | ४९५ | – | – | – | – |
| ● सोनावणे कृष्णा सयाजी | ४९६ | मेजर जन. | – | – | – |
| ● सोमण भास्कर सदाशिव | ४९६ | – | ॲडमिरल | – | – |
| ● हरोलीकर अरुण भीमराव | ४९९ | ब्रिगेडिअर | – | – | – |

## वीरचक्र विजेते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंभोरे भिवासन लक्ष्मण | ५०१ | सुभे. मेजर | – | – | – |
| अडिसरे गजानन नारायण | ५०१ | मेजर | – | – | – |
| आपटे प्रदीप विनायक | ५०२ | – | – | फ्ला.लेफ्ट. | – |
| कडू मच्छिंद्र रामभाऊ | ५०३ | शिपाई | – | – | – |
| करकरे अशोक | ५०३ | कॅप्टन | – | – | – |
| कर्डिले एकनाथ महिपती | ५०४ | नाईक | – | – | – |
| कर्णिक सुरेश दामोदर | ५०५ | – | – | विंग कमां. | – |
| कल्याणीवाला आर एस | ५०५ | – | – | स्कॉ. लीडर | – |
| कविना बहादूर नरीमन | ५०५ | – | लेफ्ट.कमां. | – | – |
| कांबळे काशीनाथ शिवरुद्रा | ५०६ | शिपाई | – | – | – |
| कांबळे गोविंद भागा | ५०७ | हवालदार | – | – | – |
| काकफळे पांडुरंग आनंद | ५०७ | हवालदार | – | – | – |
| कितकुले प्रकाश दिगंबर | ५०८ | लेफ्ट.कर्नेल | – | – | – |
| किरतकुडे आबा कोंडिबा | ५०९ | सुभेदार | – | – | – |
| कुरणकर श्रीधर विठ्ठल | ५०९ | नाईक | – | – | – |
| खोत गौतम शशिकुमार | ५११ | – | – | लेफ्ट. जन. | – |
| गणपती नंदेपांडा अपाच्यु | ५१३ | – | – | स्कॉ.लिडर | – |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर |
|---|---|---|---|---|---|
| गम्रे अमृत शामा | ५१३ | सुभेदार | – | – | – |
| गरुड गोपाळ कृष्णा | ५१४ | – | – | एअर.कमो. | – |
| गायकवाड तात्याबा | ५१४ | नाईक | – | – | – |
| गुरव कृष्णा एकनाथ | ५१५ | नायब सुभे. | – | – | – |
| घोडेस्वार दादाराव रामराव | ५१६ | सुभे. मजर. | – | – | – |
| चंदावरकर प्रकाश सत्येंद्र | ५१७ | – | लेफ्ट.कमां. | – | – |
| चव्हाण अंकुश महादेव | ५१८ | सुभेदार | – | – | – |
| चोप्रा मनमोहन चेतराम | ५१८ | मेजर | – | – | – |
| जगदाळे किसनराव शामा | ५२० | हवालदार | – | – | – |
| जठार मधुकर शांताराम | ५२० | – | – | विंग कमां. | – |
| जवळगे उत्तम भानुदास | ५२१ | – | – | सुभे.मेजर. | – |
| जाधव अर्जुन राघव | ५२१ | सुभेदार | – | – | – |
| जाधव धोंडू गोविंद | ५२२ | हवालदार | – | – | – |
| जामसजी परवेज रुस्तम | ५२२ | – | – | स्कॉ.लिडर | – |
| जुन्नरकर नितीन गजानन | ५२३ | – | – | फ्ला. लेफ्ट. | – |
| टकले मनोहर माधव | ५२४ | – | – | एअर. कमो. | – |
| ठाकरे नारायण पुरमल | ५२५ | लान्सनाईक | – | – | – |
| डाफले राजेंद्रसिंग विजयसिंग | ५२६ | कॅप्टन | – | – | – |
| तेजिंदर सिंग हरबन्स सिंग | ५२७ | ब्रिगेडिअर | – | – | – |
| त्रिहोन मुरारीलाल महेशदास | ५२७ | – | एअर कमो. | – | |
| दडकर रमेश कुमार | ५२८ | मेजर | – | – | – |
| दास्तीदार प्रद्योत | ५२८ | स्कॉड्रन लि. | – | – | – |
| दिघे दिलीप कमलाकर | ५२९ | | | | |
| | | | –ग्रुप कॅप्टन | – | |
| दिवाण अश्विनीकुमार के. | ५३० | मेजर जन. | – | – | – |
| देउस्कर अरुण लक्ष्मण | ५३० | – | – | ग्रुप कॅप्टन | – |
| देशपांडे प्रभाकर शांताराम | ५३१ | ब्रिगेडियर | – | – | – |
| देशपांडे मनोज मधुकर | ५३१ | मेजर | – | – | – |
| देशपांडे शरदचंद्र नरेश | ५३२ | – | – | ए.व्हॉ.मार्शल | – |
| देशमुख पांडुरंग तुकाराम | ५३३ | सुभे.मेजर | – | – | – |
| नाईक बाळकृष्ण रामचंद्र | ५३४ | – | – | – | – |
| नांबियार सतीश | ५३४ | लेफ्ट.जन. | – | – | – |
| नाकिल मारुती हरी | ५३५ | नाईक | – | – | – |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर |
|---|---|---|---|---|---|
| नादिरशा जमशेद दादाभाऊ | ५३५ | ब्रिगेडिअर | – | – | – |
| निंबाळकर सचिन अण्णाराव | ५३६ | मेजर | – | – | – |
| पत्रे प्रभाकर बायाजी | ५३८ | शिपाई | – | – | – |
| परांजपे दिवाकर अनंत | ५३८ | ब्रिगेडिअर | – | – | – |
| परेरा लॉरेन्स फ्रेडरिक | ५४० | – | – | फ्ला.लेफ्ट. | – |
| पाटील सीताराम | ५४१ | सुभेदार | – | – | – |
| पिंगळे प्रकाश सदाशिवराव | ५४१ | – | – | ए.कमो. | – |
| पोवार लक्ष्मण गणपत | ५४२ | सॅपर | – | – | – |
| फराटे राजाराम कोंडिंबा | ५४३ | हवालदार | – | – | – |
| बनसोडे धोंडिराम | ५४४ | – | – | हवालदार | – |
| बाजिना रुसी होरमसजी | ५४४ | ब्रिगेडिअर | – | – | – |
| भागवत बिपीनचंद्र भास्कर | ५४५ | – | कमांडर | – | – |
| भारद्वाज प्रबोधचंद्र | ५४५ | कर्नल | – | – | – |
| भिंगारदिवे गोपीनाथ अहिलाजी | ५४६ | हवालदार | – | – | – |
| भोसले विश्वनाथ तुकाराम | ५४७ | सुभे.मेजर | – | – | – |
| भोसले शामु चंद्रप्पा | ५४७ | नाईक | – | – | – |
| महार पुंडलीक बाकाराम | ५४९ | नायब सुभे. | – | – | – |
| माउशो अँथनी लुईस | ५४९ | – | – | स्कॉ. लिडर | – |
| माळी अरुण रामलिंग | ५५० | लान्स हवाल. | – | – | – |
| माळी बाबू संतू | ५५१ | मे.हवालदार | – | – | – |
| मिलन रॉय जोसेफ | ५५१ | कमांडर | – | – | – |
| मिस्त्री जल माणीकर्शा एम. | ५५१ | – | – | स्कॉ. लिडर | – |
| मोरे हनुमान कृष्णा | ५५२ | सुभेदार | – | – | – |
| राईलकर गंगाधर रंगनाथ | ५५३ | – | – | ग्रुप कॅप्टन | – |
| राणे चेरी हासंद | ५५३ | – | – | फ्लाईट लेफ्ट. | – |
| राणे लक्ष्मण वासुदेव | ५५४ | लान्स हवाल. | – | – | – |
| रेगे पंढरीनाथ अनंत | ५५४ | मेजर | – | – | – |
| रेवाणे बाबू धोंडू | ५५५ | नाईक | – | – | – |
| वालानकर जी. बी. | ५५७ | असि.कमांडन्ट | | | |
| वार्लिंदर सिंग | ५५७ | मेजर | | | |
| विश्वनाथन रामकृष्ण | ५५८ | लेफ्टनंट कर्नल | | | |
| शर्मा सतीशचँन्द्र | ५५९ | – | – | विंग कमांडन्ट | |
| शहाणे शिवाजी वासुदेव | ५६० | – | – | ब्रिगेडियर | – |

| चरित्रनायकाचे नाव | पृष्ठ | भूसेना | नौसेना | वायुसेना | इतर |
|---|---|---|---|---|---|
| शिंगे वैजनाथ तुळशीराम | ५६० | – | – | पॅराट्रुपर | – |
| शिंदे अशोक प्रतापराव | ५६१ | – | – | स्कॉ.लिडर | – |
| शिंदे शांताराम रामचंद्र | ५६१ | हवालदार | – | – | – |
| शेटे एम. वाय. | ५६२ | लेफ्ट.जन. | – | – | – |
| सप्रे विजयकुमार नारायण | ५६३ | – | – | ग्रुप कॅप्टन | |
| सरदेसाई हेमंत शरदकुमार | ५६३ | – | – | फ्लाईट लेप्टनंट | |
| साठे उदय परशुराम | ५६४ | मेजर | – | | |
| साठ्ये अरुण वसंत | ५६५ | – | – | फ्लाईट लेप्टनंट | |
| सामंत सुरेश गजानन | ५६५ | – | लेप्टनंट | – | |
| सावंत विनायक भिवाजी | ५६६ | – | – | विंग कमांडंट | |
| साळवी बळीराम विठ्ठल | ५६६ | हवालदार | | | |
| साळवे कचरु वेडू | ५६७ | हवालदार | | | |
| साळुंके लक्ष्मणराव सिधू | ५६७ | सुभे.मेजर | | | |
| साळुंके सदानंद बळवंत | ५६८ | कर्नल | | | |
| सुर्वे अप्पासाहेव दादासाहेब | ५६८ | मेजर | | | |

## परिशिष्ट


१. विशेष योगदान ५७१
२. पदनामे आणि ज्येष्ठताक्रम ५७७
३. विविध पदकांची क्रमवारी ५८१
४. अतिविशिष्ट सेवापदक विजेते ५८३
५. संरक्षणविषयक संस्था ५८७
६. शौर्य व सेवा पदक ५९३



राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.)



मराठा बटालियन



वायुसेना



भूसेना



नौसेना

# मनोगत

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण -शिल्पकार चरित्रकोश या प्रकल्पातील कोशमालिकेतील हे चवथे पुष्प आहे. या खंडाला जोडून प्रशासन व न्यायपालिका हे दोन खंडही प्रकाशित होत आहेत.

संरक्षण खंडासाठीची पहिली बैठक ले. शेकटकर व साप्ताहिक विवेकचे प्रबंध संपादक दिलीप करंबेळकर यांच्या उपस्थितीत मार्च मध्ये झाली. या वेळी खंडाच्या रचनेसंदर्भात काही निकष ठरवण्यात आले. त्यावेळी चर्चेतून असे लक्षात आले की, साधारणपणे गेल्या दोनशे वर्षात संरक्षण क्षेत्रामध्ये योगदान दिलेल्या सर्व शुरवीरांचा समावेश या खंडात करणे जागेअभावी केवळ अशक्य आहे त्यामुळे निकष तयार करणे व त्यानुसार खंड पूर्ण करणे गरजेचे होते. ज्यांनी संरक्षण क्षेत्रात विविध आघाड्यांवर अभिमानास्पद कामगिरी बजावली आणि त्यासाठी त्यांना शौर्यपदके बहाल करण्यात आली. तसेच या क्षेत्रासाठी प्रोत्साहनपर काम केले अशाही व्यक्तींचा उल्लेख या खंडात येणे आवश्यक होते.

यानंतरचा पुढचा महत्वाचा टप्पा होता तो म्हणजे विविध शौर्यपदक मिळालेल्या व्यक्तींच्या नावांची यादी तयार करणे महत्वाचा स्त्रोत ठरला तो म्हणजे पुण्यातील राज्य सैनिक बोर्ड. याद्या बनवण्यासाठी राज्य सैनिक बोर्ड आणि संरक्षण क्षेत्राशी संबधित संकेतस्थळे हे दोन महत्वाचे स्त्रोत ठरले. याद्या अधिक परिपूर्ण बनवण्यासाठी भूसेना, नौसेना व वायुसेना यांच्या मुख्यालयांशी संपर्क साधण्यात आला, परंतु त्यांच्याकडून फारशी मदत मिळू शकली नाही.

दि. २१ नोव्हेंबर २००९ रोजी संरक्षण खंडाच्या सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी एअर मार्शल भूषण गोखले, रिटायर्ड नेव्हल ऑफिसर विनायक अभ्यंकर, अविनाश पंडीत, पत्रकार प्रसाद कुलकर्णी, प्रकल्प समन्वयक महेश पोहनेरकर ही मंडळी उपस्थित होती. या बैठकीमध्ये आतापर्यंत करण्यात आलेल्या याद्या तपासण्यात आल्या व काही नवीन नावेही उपस्थितांच्या सुचनेनुसार समाविष्ट करण्यात आली. तसेच एकूण खंडाचे स्वरूप व आराखडा याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संरक्षण क्षेत्रातील व या क्षेत्राशी संबधित मान्यवर व्यक्तींबरोबरच या क्षेत्राशी संबधित महाराष्ट्रातील संस्थाची किमान माहिती समाविष्ट करावी असे ठरवण्यात आले. खंडातील श्रेणीविभाजन, शब्दसंख्या निश्चिती यांबाबतही बैठकीमध्ये चर्चा झाली.

भूसेना, वायुसेना तसेच नौसेना या तिन्ही सेनांमध्ये व्हिक्टोरिया क्रॉस या लष्करी सन्मानप्राप्त वीरांपासून ते इतर शौर्यपदके व सेवापदके मिळवणाऱ्या वीरांचा समावेश यादीमध्ये आहे, तसेच संरक्षण क्षेत्रामध्ये विविध उच्चपदांवर नेतृत्व गाजवलेल्या मराठी अधिकाऱ्यांचा समावेश यादीत आहे. मात्र या सगळ्यापर्यंत पोचणे व त्यांची महिती मिळवणे तेवढे सोपे नव्हते. यातील काही वीरांना मरणोत्तर शौर्यपदक मिळाल्याने त्यांच्याबाबत खुप तपशील उपल्ब्ध झाले नाहीत परंतु अशा नावांचे किमान तपशील व फोटो मिळवणे एस एस गांधी यांनी संपादित केलेल्या ऑफ व्हेलॉर या पुस्तकामुळे अतिशय सुकर झाले. सध्या निवृत्त असणाऱ्या अथवा सेवेत असणाऱ्या जास्तीत जास्त वीरांना प्रत्यक्ष भेटून महिती घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही व उपलब्ध लेखकांनी केला.

मात्र लेखकांची कमतरता व लष्करी अधिकाऱ्यांच्या वा त्यांच्या नातेवाईकांच्या राहत्या घरांचे अपुरे पत्ते ह्या दोन अडचणी ह्या टप्प्यात प्रकर्षाने जाणवल्या. काही मराठी लष्करी अधिकारी महाराष्ट्राबाहेर स्थायिक झाल्याने त्यांच्यापर्यंत पोचणे थोडे अवघड गेले. जणांचा वारंवार पाठपुरावा करुनही काही अडचणींमुळे ग्रंथ छपाईला जाईपर्यंत माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. अशा चरित्रनायकांची यादी परिशिष्टात दिली आहे. जर वाचकांच्या सहकार्याने यांची महिती मिळू शकली तर पुढच्या आवृत्तीत त्यांचा समावेश करता येईल.

या सगळ्या प्रक्रियेमध्ये संरक्षण खंडाच्या सल्लागार समितीतील सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले या सर्वांची मी व्यक्तीश: आभारी आहेत. अविनाश पंडीत, वर्षा जोशी, राजेश प्रभु यांनी सर्व नोदींचे संपादन केले व वेळप्रसंगी त्यातल्या अनेक नोदींचे पुर्नलेखनही केले.

या खंडाचे दोन भाग केले आहेत. यामधे सुरुवातीला मुख्य चरित्रनायकांच्या नोंदी असून त्यानंतर वीरचक्रप्राप्त सैन्यातील अधिकारी व सैनिकांची भाषांतरित संक्षिप्त माहिती दिली आहे.

महाराष्ट्र हा लढवय्यांचा देश आहे. अनेक वीरांनी कायमच आपल्या अतुलनीय शौर्य धैर्य वीर्याचे दर्शन भारताला घडवले. या संरक्षण खंडाच्या माध्यमातून या सर्व वीरांना व सैनिकीकरणाची उर्मी समाजात जागवणाऱ्या अनेक धुरींणांना सलाम केला आहे तसेच उगवत्या तरुणाईपुढे त्यांचा आदर्श शब्दांतुन मांडण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

संरक्षण क्षेत्रातले महाराष्ट्राचे योगदान इतके प्रचंड आहे की काहीतर संपूर्ण गावेच्या गावे या समर्पणाच्या भावनेतून गेली अनेक वर्षे भारतमातेला गावातल्या पिढ्यान् पिढ्या अर्पण करत आहेत. या सगळ्यांचा नामोल्लेख खंडात करणे केवळ अशक्य असल्याने खंडात नक्कीच त्रुटी राहणे शक्य आहे. वाचक त्याबद्दल उदार अंत:करणाने क्षमा करतील असा विश्वास आहे.

– रुपाली गोवंडे
खंड समन्वयक

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील दोनशे वर्षांच्या कालखंडातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणाऱ्या चरित्रकोश प्रकल्पाची संकल्पना 'विवेक'ने मांडली. त्यांतील 'संरक्षण खंड' आपल्या हाती देत असताना आम्हांला आनंद होत आहे. या प्रकल्पासाठी विवेकने गेल्या दोनशे वर्षांचा कालखंड निवडला याचे कारण, आज जे आधुनिक संस्थाजीवनाचे आपण रूप पाहत आहोत, त्याचा संकल्पनात्मक आधार व त्यातील संस्थात्मक आशय गेल्या दोनशे वर्षांतच भरला गेला आहे. संरक्षण क्षेत्राचीही कथा यापेक्षा वेगळी नाही.

आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाचे व प्रादेशिक अखंडतेचे संरक्षण करण्यास सिद्ध असलेले संरक्षक दल हे आधुनिक राष्ट्रजीवनाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. राष्ट्राचे अस्तित्वच या घटकाच्या सक्षमतेवर, कार्यक्षमतेवर आणि सैन्यदलाची राष्ट्रभक्ती, शौर्य व नीतिधैर्यावर अवलंबून असते.

एक काळ असा होता, की सैन्यदलाचा राजकीय निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग असे. परंतु आधुनिक राष्ट्र संकल्पनेत दैनंदिन राजकीय निर्णय प्रक्रियेतील सैन्यदलाचा सहभाग समाप्त करण्यात आला. नागरी प्रशासन जे राजकीय निर्णय घेईल त्यांची अंमलबजावणी करणे, हे लष्कराचे काम राहिले. ब्रिटिशांकडून ही परंपरा भारतीय शासनप्रणालीत आली. भारताने ती टिकवून ठेवली ही महत्त्वाची बाब म्हटली पाहिजे. कारण पाकिस्तानी व भारतीय लष्कराला एकच वारसा मिळाला असला, तरी पाकिस्तानला ती परंपरा टिकविता आली नाही.

हा आधुनिक दृष्टिकोन व आज असलेली सैन्यदलाची आधुनिक रचना ही आपल्याला ब्रिटिशांनी दिलेली देणगी असली व जरी भारताच्या लष्कराचा स्वातंत्र्यपूर्व काळातला इतिहास हा ब्रिटिश साम्राज्याकरिता लढला गेलेला इतिहास असला, तरी पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामुळे भारतीय लष्कराचा विकास झाला, भारतीय लष्करामध्येही आपण ब्रिटिशांच्या खांदाला खांदा लावून तेवढ्याच शौर्याने लढू शकतो असा आत्मविश्वास आला. या महायुद्धांमुळे जगाचे व्यापक भान आलेल्या व स्वातंत्र्याची जाणीव झालेल्या सैन्यबळाच्या आधारावर यापुढे आपल्याला भारताला पारतंत्र्यात डांबून ठेवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली.

महाराष्ट्राच्या परिवर्तनाला हातभार लावलेल्या महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांचा परिचय असे या प्रकल्पाचे स्वरूप असले तरी या खंडापुरते त्याचे स्वरूप बदललेले आहे. कारण लष्कराची संकल्पना ही अखिल भारतीय असल्याने भारतीय लष्करी क्षेत्रात महाराष्ट्रातील ज्या महत्त्वपूर्ण व्यक्तींचा सहभाग राहिला, त्यांची ओळख या खंडातून करून देण्याचे आम्ही निश्चित केले. भारताच्या आधुनिक संरक्षण क्षेत्राच्या जडणघडणीत महाराष्ट्राचाही महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. एक तर मोगल काळातच शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने अखिल भारतीय स्वातंत्र्याचे स्वप्न महाराष्ट्राने पाहिले होते. मराठी सैनिक देशाच्या सर्व भागांत जाऊन लढले होते. तो महाराष्ट्र राज्याचा वारसा आधुनिक काळातही कायम राहिला आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने त्या वारशाची ओळख करून दिली जाणार आहे.

परकीय शत्रूपासून आपल्या सीमांचे रक्षण, देशातील हिंसक फुटीरतावादी चळवळींना तोंड देणे, हाताबाहेर जात असलेल्या स्थितीशी मुकाबला करण्यास जेव्हा नागरी सेवांना अपयश येते, तेव्हा अपवादात्मक स्थितीत केलेला हस्तक्षेप, नैसर्गिक व अन्य आपत्तींच्या वेळी केलेले साहाय्य, भारताच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता श्रीलंकेसारख्या देशात जाऊन केलेले कार्य व संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी दिलेली अन्य देशांतील जबाबदारी पार पाडणे अशी अनेक कामे भारतीय लष्कराने केलेली आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय राज्यकर्त्यांना जगातील अन्य प्रमुख देशांतील नेत्यांना जशी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची लष्करी पार्श्वभूमी होती, तशी भारतीय नेत्यांना नव्हती. त्यामुळे भारताच्या राजकीय नेतृत्वाला लष्करी तयारीची आवश्यकता कळायला चीनपुढे १९६२ साली दारुण पराभव पत्करावा लागला. परंतु त्यानंतर मात्र लष्करी तयारीच्या बाबत राज्यकर्त्यांनी सैन्यदलाला भरपूर पाठिंबा दिला व त्याचा सकारात्मक परिणाम पुढील सर्व युद्धांवर दिसून आला.

दोन महायुद्धे, १९४७-१९४८, १९६५, १९७१ व सियाचेन, कारगिल अशी पाकिस्तानबरोबर झालेली युद्धे, १९६२ चे चीन युद्ध, पूर्वांचलातील सशस्त्र बंडाळी, काश्मीर व भिंद्रनवाले यांच्या विरोधातील कारवाई यांतून १९६२ च्या चीन युद्धाचा अपवाद वगळता भारतीय लष्कराने त्याच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविला असून हिंसात्मक मार्गाने भारताच्या सार्वभौमत्वाला व अखंडतेला धोका पोहोचविणे कोणत्याही शक्तीला शक्य नाही याची खात्री आजवरच्या इतिहासाने दिली आहे.

भूसेना, वायुसेना व नौसेना अशी भारतीय लष्कराची तीन प्रमुख अंगे आहेत. तसेच सीमासुरक्षा दल आदी निमलष्करी दले आहेत, त्याचबरोबर गुप्तचर यंत्रणाही देशाच्या सुरक्षेचे काम करीत असतात. या सर्वांच्या प्रगतीचा थोडक्यात आढावा प्रस्तावनेत घेतला आहे.

या खंडासाठी चरित्रनायक म्हणून निवडताना आम्ही पुढील निकष आमच्यासमोर ठेवले होते. महाराष्ट्र ही जन्मभूमी हा पहिला महत्त्वाचा निकष आमच्यासमोर होताच. रणांगणावर शौर्य गाजवताना ज्यांना (ब्रिटिश अमदानीत) व्हिक्टोरिया क्रॉस, परमवीरचक्र, महावीरचक्र, परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, अशोकचक्र, किर्तीचक्र, शौर्यचक्र ही पदके मिळालीत, त्यांच्या नावांचा चरित्रनायक म्हणून विचार करण्यात आला. तसेच संरक्षण दलात अतिशय उच्च पदावर असणाऱ्या व्यक्तींचीही चरित्रनायक म्हणून निवड करण्यात आली. यात भूसेनेच्या दृष्टीने जनरल व लेफ्टनंट जनरल, नौसेनेच्या दृष्टीने ॲडमिरल व व्हाइस ॲडमिरल आणि वायुसेनेच्या दृष्टीने एअर चीफ मार्शल व एअर मार्शल या पदांवरील व्यक्तींचा चरित्रनायक म्हणून विचार करण्यात आला. याशिवाय सेनेच्या हेरखात्यातील वरिष्ठ पदांवर विशेष कामगिरी बजावणाऱ्या व्यक्ती, संरक्षण क्षेत्राशी संबंधित लेखक व पत्रकार, तज्ज्ञ, विश्लेषक व्यक्ती, निमलष्करी दलात वरिष्ठ पदांवर अथवा विशेष कामगिरी बजावणाऱ्या व्यक्ती यांचाही समावेश चरित्रनायकांत केलेला आहे. तसेच संरक्षणाशी संबंधित संशोधन करणाऱ्या व सैन्यदलाला प्रोत्साहन देणाऱ्या संस्था व संस्थाचालक, तीन व त्यापेक्षा जास्त पिढ्या लष्करात असणाऱ्या कुटुंबांविषयी माहितीसुद्धा या खंडाच्या परिशिष्टांत दिलेली आहे.

या सर्व चरित्रनायकांची माहिति मिळविणे हे फार मोठे कष्टाचे व जिकिरीचे काम होते. परंतु शशिकांत मेहंदळे, निवृत्त कमांडर अनिल आठल्ये, शरद रानडे, भगतसिंग देशमुख, डॉ. अरविंद परांजपे, प्रसाद कुलकर्णी व कर्नल तांबेकर यांनी चरित्रनायकांची नावे निवडणे व त्यांची माहिती संकलन करणे या कामांत उत्स्फूर्त सहकार्य केले आणि अविनाश पंडित यांनी नोंदी तपासणे, अनुवाद करणे आदी संपादकीय कामांतही मोठे सहकार्य केले. या सहृदांच्या साहाय्यामुळे हे महत्कार्य शक्य झाले. त्यांचे ऋण शब्दांत मांडणे कठीण आहे.

या चरित्रनायकांची यशोगाथा जाणून घेण्याअगोदर आपल्या भारतीय सेनेचे स्वरूप आणि पार्श्वभूमी जाणून घेणे उद्‌बोधक ठरेल असे वाटते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या सेनेचा खऱ्या अर्थाने विकास झाला. आता सेनेला जे स्वरूप लाभले आहे, त्यापर्यंत जो विकासक्रम आहे त्याचा भूसेना, नौसेना व वायुसेना असा येथे स्वतंत्र धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## भूसेना

मानवी संस्कृतीच्या प्रारंभापासूनच समाजाने वीरवृत्तीचा सन्मान व आदर केला आहे. आदिम काळात मानवाने जेव्हा टोळीच्या स्वरूपात आपल्या समाजजीवनाला प्रारंभ केला, तेव्हा त्या टोळीतील सर्वाधिक शक्तिवान व्यक्तीचीच सर्वोच्चपदी निवड होत असे. त्यानंतर मानवी संस्कृतीचा विकास होते असताना राजकारणात व राज्य प्रशासनात सैन्याची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली. राज्यकर्त्याला आपल्या अस्तित्वासाठी सैन्याचे पाठबळ असणे महत्त्वाचे वाटत असे. आधुनिक कालखंडातही राष्ट्राला जगात सन्मान मिळायचा असेल तर समर्थ सैन्याचे पाठबळ आवश्यक असते. राष्ट्रभक्तीला राष्ट्रशक्तीचे पाठबळ नसेल तर त्या देशाला जगात पुरेसा सन्मान मिळत नाही. त्यामुळे समर्थ, सुदृढ, संघटित व सुसंचालित सैन्यदल नसेल तर त्या देशाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव टिकू शकत नाही.

आपल्या देशातही अगदी वैदिक काळापासून शस्त्रसज्जतेचे महत्त्व सांगितले आहे. अनेक ऋषीही शस्त्रास्त्र विद्येचे उपासक होते. आपल्या शौर्याने युद्धात जे विजय मिळवून देतात त्या सैनिकांचा योग्य सन्मान करण्याची आवश्यकता मनुस्मृतीसारख्या प्राचीन ग्रंथातही नमूद केली आहे. आज जगातील सर्वच देशांत विविध पदकांच्या रूपाने शौर्याला सन्मानजनक प्रतिष्ठा दिली जाते. जर युद्धात वीरगती प्राप्त झाली, तर स्वर्गप्राप्ती आणि जर युद्धात विजय मिळाला, तर राज्यप्राप्ती यांपैकी काहीतरी एक निश्चित मिळेलच अशी ग्वाही भगवद्‌गीतेमध्ये दिली गेली आहे.

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।<br>
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चय: ।। २.३७ ।।

कौटिल्यानेही आपल्या अर्थशास्त्रात सैन्यदलाचे महत्त्व सांगून सैनिकांच्या शौर्याचा सन्मान करण्याची आवश्यकता नमूद केली आहे. युद्धात पराक्रम करणाऱ्या सैनिकांना राजाने जमीन द्यावी व युद्धात वीरगती प्राप्त करणाऱ्या सैनिकांवर अवलंबून असणाऱ्यांचीही उचित काळजी राजाने घ्यावी असे चाणक्य म्हणतो.

भारताच्या आधुनिक सैन्यदलाची मुहूर्तमेढ इस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याने रोवली गेली. इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे सैनिकांना वेगवेगळ्या पदकांनी गौरविले जात असे, तीच प्रथा या कंपनीने भारतात सुरू केली. इंग्लंडमध्ये सर्वोच्च पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकाला ‘व्हिक्टोरिया क्रॉस’ हे सर्वोच्च पदक दिले जात असे. १८५६ च्या ‘क्रिमियन युद्धा’त हे पदक प्रथम दिले गेले. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात अनेक भारतीय सैनिकांनाही या पदकाने गौरविले गेले. त्यांत महाराष्ट्रातील सैनिकांचाही समावेश आहे. पहिल्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्लीला ‘इंडिया गेट’ची उभारणी करण्यात आली, त्याच्यावर अशा सर्व सैनिकांचा नामोल्लेख आहे.

भारतात सोळाव्या व सतराव्या शतकाच्या दरम्यान आपल्या राज्यविस्तारासाठी इंग्रजांनी ‘स्टेट फोर्सेस ॲण्ड आर्मीज ऑफ द किंग’ उभी करायला सुरुवात केली. यात प्रामुख्याने मराठा, राजपूत, रोहिला व शीख सैनिकांचा समावेश असे. मराठा सैन्य आपले शौर्य, कार्यक्षमता, अनुशासन व किमान साधनांवर निर्भर असणारे

म्हणून विख्यात होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर स्वतंत्र मराठी सैन्याची उभारणी झाली. त्यानंतर पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड आदी सरदारांनीही स्थायी सैन्य व्यवस्था सुरू केली.

सतराव्या शतकाच्या मध्यावर ईस्ट इंडिया कंपनीने फोर्ट विलियम, फोर्ट सेंट जॉर्ज व बाँबे प्रेसिडन्सीची स्थापना केली. मुंबई व कलकत्ता येथे नेटिव्ह इंडियन कंपनीची स्थापना सैन्याच्या स्वरूपात केली. त्यानंतर हीच सैन्याची व्यवस्था वाढत गेली. तत्कालीन भारतीय सैनिकांकडे मस्केट व बायनट ही शस्त्रे १८५३ पर्यंत होती. त्यानंतर नवी शस्त्रसामग्री यायला सुरुवात झाली. प्रारंभीची भारतीय सैन्याची रचना पायदळावर (उन्फन्ट्री) आधारित होती. हळूहळू या सैन्यात तोफखाना, मशीनगन्स, रणगाडे आदी शस्त्रास्त्रांचा समावेश झाला. त्यानंतर मराठा, राजपूत, जाट, शीख, डोगरा, गुरखा अशा वेगवेगळ्या रेजिमेंट्सही स्थापन करण्यात आल्या. त्यानंतर त्यांत आर्म्ड कोअर, आर्टिलरी, इंजिनिअर, सिग्नल आदी विभागांची निर्मिती करण्यात आली.

पहिल्या महायुद्धात (१९१४-१९१८) भारतीय सैन्याने अनेक युद्धक्षेत्रांत कर्तबगारी बजावली. ब्रिटिश शासनाने भारतीय सैनिकांना पूर्व आफ्रिका, इजिप्त, फ्रान्स, गेलिपोली, मेसोपोटेमिया, पॅलेस्टाइन आदी युद्धक्षेत्रात पाठविले. या सर्व युद्धक्षेत्रांवर भारतीय सैन्य मोठ्या शौर्याने लढले व या शौर्याची व युद्धकौशल्याची दखल ब्रिटिश शासन व जगानेही घेतली. जेव्हा भारतीय सैन्याला फ्रान्समध्ये पाठविले गेले, तेव्हा त्यांच्याकडे फक्त साधे कपडे व गणवेश होता.

त्यामुळे तेथील थंडी व बर्फवर्षाव यांमुळे सैन्याचे मोठे नुकसान झाले तरी भारतीय सैनिकांनी आपल्या शौर्याची चमक दाखविली. पहिल्या महायुद्धाअखेरीस भारतीय सैन्य हे ब्रिटिश सत्तेचा प्रमुख आधार बनले. (बाय एंड ऑफ फर्स्ट वर्ल्ड वॉर, इंडियन आर्मी हॅड नाऊ बिकम द ब्रिटिश एंपायर्स स्ट्रॅटेजिक रिझर्व्ह.) पहिल्या महायुद्धात साठ हजार भारतीय सैनिकांनी आपले प्राण अर्पण केले. या युद्धात भारतीय सैनिकांना दोनशे विविध प्रकारचे शौर्य पुरस्कार मिळाले. पंजाब, मराठा, राजपूत, बलुची, शीख आदी अनेक रेजिमेंट्सनी आपल्या शौर्याचा ठसा उमटविला.

मराठी सैन्याने मेसोपोटेमियाच्या युद्धक्षेत्रात आपला पराक्रम गाजविला. मराठा सैन्याच्या नावानेच शत्रू घाबरायचा ही वस्तुस्थिती अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही मान्य केली. मराठा सैनिकांच्या तीन बटालियननी कुत अल अमारा क्षेत्रात आपल्या अद्वितीय शौर्याचे प्रदर्शन केले. त्याबद्दल या बटालियनना 'रॉयल' हा किताब देऊन गौरविण्यात आले. आज त्या बटालियनला 'मराठा लाइट इन्फन्ट्री रेजिमेंटची पाचवी रॉयल बटालियन' या नावे संबोधले जाते. पहिल्या महायुद्धात मराठा सैन्याने आपल्या पराक्रमाने छाप पाडली.

दुसऱ्या महायुद्धातही भारतीय सैन्याने अप्रतिम शौर्य, साहस आणि आपल्या युद्धकौशल्याचा प्रत्यय जगाला दिला. या काळात भारतीय सैन्याचा मोठा विस्तार झाला. इन्फन्ट्री बटालियनची युद्धापूर्वीची संख्या ९६ होती, ती युद्धानंतर २५० पर्यंत पोहोचली. या युद्धासाठी सैन्यात व्यापक प्रमाणात भरती करण्यात आली. भारतीय सैनिकांनी या युद्धात आफ्रिका, इटली, इराण, ब्रह्मदेश, मलेशिया व युद्धाच्या अखेरीस जावा, सुमात्रा, बोर्निओ येथील रणांगणे आपल्या शौर्याने गाजविली. या युद्धापूर्वी काही विशिष्ट जाती किंवा प्रांतांना 'मार्शल रेस'चा दर्जा देऊन भरती होत असे. परंतु या युद्धात व्यापक प्रमाणात भरती करावी लागल्याने 'मार्शल रेस'चा सिद्धान्तच रद्दबातल झाला. याच युद्धाने भारतीय स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने पाया रचला गेला व ब्रिटिश साम्राज्याच्या अस्ताला प्रारंभ झाला.

युद्धकाळात इन्फन्ट्री, मेकॅनाईज्ड इन्फन्ट्री, आर्टिलरी, मशीनगन बटालियन, आर्म्ड कोअर अशा विविध शाखांची स्थापना व संख्या वाढली. युद्धकाळातच ब्रिटिश सरकारने भारतात पाच डिव्हिजन सैन्य उभे करण्याचा

निर्णय घेतला. प्रामुख्याने रशियाचा सामना करण्याकरिता व अफगाणिस्तान यांच्या सीमेवर या सैन्याचा उपयोग व्हायचा होता. परंतु नंतर रशियाचे धोरण बदलून तो मित्रराष्ट्र बनल्यानंतर यांपैकी तीन डिव्हिजन्स इराक येथे व एक डिव्हिजन मलेशियाला पाठविण्यात आली. या वेळी ब्रिटिश सैन्य हे जर्मन आघाडीवर लढत होते व पराभूत होत होते. या पार्श्वभूमीवर पूर्व आफ्रिकेत भारताच्या चौथ्या व पाचव्या डिव्हिजनने उत्कृष्ट पराक्रम दाखवून विजयश्री प्राप्त केली. 'सिदी बरानी'च्या लढाईत फोर्थ इन्फन्ट्री डिव्हिजन व सेव्हंथ आमर्ड डिव्हिजनने आपल्या संयुक्त कारवाईत आपल्या शौर्याने इटलीच्या सैन्याचा पाडाव केला व या एकाच लढाईत १,३०,००० सैनिकांना कैद केले आणि ४०० टँक्स व १२४० तोफा हस्तगत केल्या. नंतर 'अल अमीन' व इटली येथील युद्ध आघाड्यावर भारतीय सैन्याने मोठे विजय मिळविले. भारताच्या चौदाव्या इन्फन्ट्री डिव्हिजनने ब्रह्मदेशाचा मोठा प्रदेश जपानी सैन्याकडून जिंकून घेतला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या वेळी भारतीय सैन्य संख्या वीस लाख होती व अधिकाऱ्यांची संख्या १५,००० होती.

दुसऱ्या महायुद्धात २,४३,३८८ भारतीय सैनिकांना वीरगती प्राप्त झाली व ६४,३५४ सैनिक जखमी झाले, तर ११,७५४ सैनिक बेपत्ता झाले. भारतीय सैन्याच्या पराक्रमाविना ब्रिटिशांना जर्मनी व जपानविरुद्ध विजय मिळविता आला नसता. या युद्धात ३१ भारतीयांना 'व्हिक्टोरिया क्रॉस' हा सर्वोच्च वीर सन्मान मिळाला. यात महाराष्ट्रातील यशवंत घाडगे व नामदेव जाधव या दोघांचा समावेश आहे. हे दोन्ही वीर मराठा इन्फन्ट्री रेजिमेंटचे होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या अधीन असलेल्या एका लहान स्थानिक सैनिकांच्या तुकडीचे दुसऱ्या महायुद्धाअखेर जगातील एका मोठ्या सैन्यात रूपांतर झाले होते. वीस लाखांहून अधिक असलेल्या भारतीय सैन्याने जो पराक्रम गाजविला, त्यामुळे भारताला आता फार काळ पारतंत्र्यात जखडून ठेवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिशांना झाली. भारतीयांनी चालवलेल्या स्वातंत्र्यलढ्याबरोबरच भारताला स्वातंत्र्य मिळण्याचे हेही एक मोठे कारण आहे.

ज्या भारतीय सैन्याच्या शौर्याने ब्रिटनला दुसऱ्या महायुद्धात विजय मिळाला, त्याच भारतीय सैन्याचे स्वातंत्र्याच्या वेळी विभाजन करण्यात आले. या विभाजनात अनेक सैनिक, युद्धसामुग्री पाकिस्तानात गेली व त्या आधारे स्वातंत्र्य मिळताक्षणीच पाकिस्तानने काश्मीर गिळंकृत करण्यासाठी भारतावर आक्रमण केले. या आक्रमणाची पूर्ण कल्पना ब्रिटिश अधिकाऱ्यांना होती, पण ती त्यांनी भारतीय अधिकाऱ्यांना न देण्याचा कृतघ्नपणा दाखविला. भारताच्या फाळणीने आजवर भारतीय सैन्याचा असलेला एक भागच शत्रू म्हणून भारतीय सैन्याविरुद्ध उभा राहिला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय सैन्य**

स्वातंत्र्यानंतर भारताची फाळणी झाली तशी भारतीय सैन्याचीही फाळणी झाली. जे सैन्य व अधिकारी एका सैन्यातून लढले होते, ते आता वेगवेगळ्या सैन्यांत गेले. फाळणीनंतरही भारत व पाकिस्तान यांचे एकच व एकत्रित सैन्यदल असावे असा विचार काही सेनेतील अधिकाऱ्यांनी मांडला. तसे झाले असते तर केवळ भारताचाच किंवा आशियाचा नव्हे तर जगाचा इतिहासही बदलला असता. भारताच्या विभाजनाचा फार मोठा परिणाम इन्फन्ट्रीवर झाला. विभाजनाच्या अगोदर अनेक रेजिमेंट्स संयुक्त रेजिमेंट्स (मिक्स्ड) होत्या. त्यांत दोन्ही धर्मांचे सैनिक होते. बटालियन, प्रशिक्षण केंद्रे आदी संयुक्त होते. त्या सर्वांचे विभाजन झाले. त्यामुळे रेजिमेंटची संपत्ती, इतिहास, त्यांच्या नोंदी आदी सर्वांचेच विभाजन झाले. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारतीय सैन्यरचना पूर्णपणे पुनर्गठित करण्यात आली.

भारताला स्वातंत्र्य मिळत असताना भारतातील ४४ संस्थानांचे एकूण ७५,००० लढवाय्यांचे सैन्य होते. या सर्व संस्थानांचे विलीनीकरण होत असताना या सैन्याचे भवितव्य हा एक महत्त्वाचा विषय होता. या सर्व सैन्याचे भारतीय सैन्यातील विविध विभागांत विलीनीकरण करण्यात आले. यात प्रामुख्याने राजेंद्र शिख इन्फन्ट्रीचे रूपांतर सध्याच्या १५ पंजाब, प्रथम मेवार इन्फन्ट्रीचे रूपांतर सध्याच्या ९ ग्रेनेडियर, बडोदा फोर्सचे रूपांतर २० मराठा, राजाराम रायफलचे रूपांतर १९ मराठा, हैद्राबाद फोर्सचे रूपांतर २२ मराठा, सिंदीया फोर्सचे रुपांतर कुमांऊ बटालियनमधे विलीनीकरण करण्यात आले. ब्रिगेड ऑफ गार्ड व पॅरेशूट रेजिमेंटची पुनर्रचना करण्यात आली. याच काळात दुसऱ्या महायुद्धात मोठ्या संख्येने भरती केलेले सैनिक व त्यांच्या तुकड्यांचीही पुनर्रचना करण्यात आली. युद्धकाळात उभ्या केलेल्या महार रेजिमेंटमधून नवीन मीडियम मशीनगन रेजिमेंट करण्यात आली, परंतु पुन्हा तिचे नामकरण 'महार रेजिमेंट' असे करण्यात आले. विभाजनाच्या वेळी सीमेची सुरक्षा करण्याकरिता बॉर्डर स्काउटची स्थापना करण्यात आली होती, १९५६ मध्ये तिचे भारतीय सैन्यात विलीनीकरण करण्यात आले. सर्व भारतीय संस्थानांचे विलीनीकरण सुरळीतपणे होत असताना जुनागढ व हैद्राबाद या दोन संस्थानांनी मात्र विलीनीकरणात अडथळे आणले. त्यामुळे जुनागढमध्ये नसला तरी हैद्राबादमध्ये मात्र लष्करी बळाचा वापर करावा लागला.

१९४७ - ४८ मध्ये पाकिस्तानमधील रझाकारांचा वापर करून काश्मीरवर आक्रमण केले व त्याला पाकिस्तानच्या लष्कराचेही सक्रिय साहाय्य होते. या आक्रमणाला उत्तर देण्यासाठी भारतीय सैन्यशक्तीचा वापर करण्याशिवाय अन्य पर्यायच नव्हता. काश्मीर युद्धात ९०,००० भारतीय सैनिकांनी भाग घेतला. आजवर भारतीय सैन्य हे ब्रिटिश साम्राज्य वाचविण्याकरिता लढत होते. काश्मीरमध्ये आता मात्र ते स्वतंत्र भारताच्या संरक्षणाकरिता लढत होते. या युद्धात १५०० सैनिकांना हौतात्म्य प्राप्त झाले, ३५०० जखमी झाले. पाकिस्तानचे सैन्य व रझाकार मिळून वीस हजारांवर मृत्युमुखी पडले. भारतीय सैन्याच्या पराक्रमामुळे जम्मू-काश्मीरचा मोठा भाग भारतात राहिला.

१९६१ मध्ये पोर्तुगिजांच्या ताब्यातून गोवा मुक्त करण्यासाठी भारताला लष्करी कारवाई करावी लागली. वस्तुत: ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिल्यानंतर ज्याप्रमाणे फ्रेंचांनी पाँडिचरीला स्वातंत्र्य दिले त्याप्रमाणे पोर्तुगिजांनीही गोव्याला द्यायला हवे होते. परंतु ते न दिल्याने भारताला नाइलाजाने लष्करी कारवाई करून गोवा स्वतंत्र करावा लागला.

१९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. अनेक वरिष्ठ सैनिकी अधिकारी व राजकीय नेत्यांनी वारंवार इशारे देऊनही तत्कालीन राजकीय नेत्यांनी चीनच्या धोक्याची योग्य नोंद घेतली नाही व चीनच्या आक्रमणाला तोंड देण्याची कोणतीही पूर्वतयारी केली नाही. त्या मुळे त्यावेळचे राजकीय नेतत्व व भारतीय लष्कर या आक्रमणाला तोंड देण्यास सज्ज नव्हते. कोणतीही पूर्वतयारी नसताना भारतीय सैन्याला ''थ्रो द चाईनीज् आउट,'' असे आदेश दिले गेले. कोणत्या प्रकारे व कशाच्या बळावर याचे उत्तर मात्र कोणापाशी नव्हते.

चीनने लडाख व नेफा (आताचा अरुणाचल प्रदेश) भागांत आक्रमण केले तरी त्याची खरी दृष्टी हिमाचल प्रदेश, आताचा उत्तराखंड व सिक्कीम यांच्यावर होती.

चीन युद्धात भारताचा दारुण पराभव झाला असे सर्वसाधारणपणे मानले जात असले, तरी चीनच्या सैन्याशी मात्र विपरीत स्थितीत लढूनही भारतीय सैन्याने जो शौर्य व धैर्याचा परिचय दिला, त्याची प्रशंसा केली गेली. चिनी सैन्य लेहपर्यंत आले नाही किंवा अरुणाचल अजूनही भारताचाच अविभाज्य भाग राहिला आहे, तो भारतीय सैन्याने दाखविलेल्या आपल्या शौर्याच्या परिचयामुळेच.

१९६५ चे भारत-पाक युद्ध हे भारतीय उपखंडातले पहिले आधुनिक युद्ध ठरले. विमानदल, रणगाडे, तोफा या सर्व शस्त्रास्त्रांचा वापर या युद्धात केला गेला. १९६२च्या युद्धाच्या अनुभवामुळे भारताला सहज पराभूत करता येईल असे पाकिस्तानचे हूकूमशहा जनरल अयुबखान यांना वाटत होते. पाकिस्तानने प्रथम कच्छ भागात व नंतर पंजाबमध्ये आक्रमण केले, काश्मीरमध्ये सशस्त्र मुजाहिदीन पाठविले ज्यांचे नेतत्व पाकिस्तानचे सेनाधिकारी करीत होते. पंजाबमधल्या खेमकरण भागात, जम्मूच्या अखनूर व छांब, राजौरी क्षेत्रात, काश्मीरमध्ये उरी व हाजीपीर क्षेत्रात तुंबळ युद्ध झाले. या युद्धात छांब क्षेत्रातील भौगोलिक स्थिती पाकिस्तानला अनुकूल असल्यामुळे प्रारंभी पाकिस्तानचा वरचष्मा राहिला, तरी अन्य सर्व क्षेत्रांत भारतीय सैन्याने मुसंडी मारली व पाकिस्तानला तह करणे भाग पडले. त्यानंतर रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद येथे करार होऊन युद्धात जिंकलेला सर्व भूभाग भारताला परत द्यावा लागला. या करारावर सही केल्यानंतर काही तासांतच भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे आकस्मिक निधन झाले.

१९६५ च्या महाराष्ट्रातील अनेक सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी युद्धात भाग घेतला व आपल्या शौर्याचा परिचय दिला. मराठा लाइट रेजिमेंटच्या अनेक बटालियनांनी युद्धभूमीवर आपल्या शौर्याचे प्रकटीकरण केले. आर्टिलरी, आर्म्ड कोअर, पॅरॅशूट रेजिमेंट इन्फन्ट्री, सिग्नल्स, इंजिनिअरिंग कोअर विभांग आणि इतर विभागांतही महाराष्ट्रातील अधिकारी व सैनिक चमकले. वायुसेनेत व नौसेनेतही त्यांचा समावेश होता.

१९७१ च्या युद्धाने तर भारतीय सैन्याने इतिहास घडविला. बांगलादेश मुक्त करण्यासाठी स्थापन झालेल्या मुक्ती वाहिनीला साहाय्य केले. त्यानंतर जेव्हा पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारतावर वायुदलाने हल्ला चढविला, तेव्हा भारताने प्रतिआक्रमण करून अवघ्या पंधरा दिवसांत पूर्व पाकिस्तानातील पाक सैन्याचा संपूर्ण पराभव करून बांगलादेश मुक्त केला. ९८,००० पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय सैन्याच्या पूर्व कमांडचे सेनापती जनरल जगजितसिंह अरोरा यांच्यापुढे शरणागती पत्करली. एक नवे राष्ट्र निर्माण करून व विजयश्री घेऊन भारतीय सैन्य परत आले.

पूर्व रणक्षेत्राबरोबरच पश्चिम रणक्षेत्रावरही, राजस्थान ते काश्मीर या क्षेत्रांत भारतीय सैन्याने मोठे विजय मिळविले. पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले. तत्कालीन भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांच्यात सिमला येथे करार झाला व या करारात भारताने पाकिस्तानचा जिंकलेला सर्व प्रदेश परत दिला व युद्धबंदी मुक्त केले.

१९८७ मध्ये श्रीलंका सरकारच्या निमंत्रणावरून भारतीय सैन्य तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'ऑपरेशन पवन' योजनेअंतर्गत गेले होते. लिबरेशन टायगर्स ऑफ तामीळ इलम (एलटीटीए) ने दहशतवादी मार्गाने श्रीलंकेची फाळणी करण्याचे ठरविले होते. परंतु भारतीय सैन्याने आपल्या प्राणांची आहुती देऊन श्रीलंकेचे अखंडत्व कायम राखले. जर त्या वेळी भारतीय सैन्याने कारवाई केली नसती, तर आजचा श्रीलंकेचा नकाशा वेगळाच दिसला असता.

१९९९ मध्ये पाकिस्तानने कारगिल भागावर १९४७ प्रमाणे दहशतवाद्यांच्या रूपाने सैन्य पाठवून आक्रमण केले. भारतालासुद्धा आपले सैन्य पाठवून आपल्या हद्दीचे संरक्षण करावे लागले. या युद्धातही भौगोलिक स्थिती पाकिस्तानला अधिक अनुकूल असतानाही भारतीय सैन्याने व विशेषत: भारतीय अधिकाऱ्यांनी आपल्या शौर्याचा पाकिस्तानी सैन्याला परिचय करून देऊन आपला सर्व भूभाग परत मिळविला. या संदर्भात एक अभ्यासाचा व विश्लेषणाचा विषय असा आहे, की पाकिस्तानच्या ज्या-ज्या राज्यकर्त्यांनी भारतविरोधी धोरणांची आखणी व त्यावर कार्यवाही केली त्या सर्वांना राज्य सोडावे लागले किंवा मृत्यू पत्करावा लागला.

भारतीय सैन्याने संयुक्त राष्ट्रसंघाच्या (युनोच्या) नेतृत्वाखाली अनेक देशांत शांतता निर्माणाच्या कामात आपला सहयोग दिला आहे. युनोच्या सेक्रेटरी जनरल यांनी या कामासाठी भारतीय सैन्य व अधिकारी यांची प्रशंसा केली आहे.

जेव्हा-जेव्हा भारतावर भीषण नैसर्गिक आपत्ती आल्या तेव्हा-तेंव्हा भारतीय सैन्याने आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. लातूर, कच्छ, काश्मीर येथील भूकंप, त्सुनामीसारख्या संकटांत भूसेना, वायुसेना व नौसेना यांनी उत्तम कार्य केले आहे.

आंतरिक सुरक्षेच्या बाबतही भारतीय लष्कराने महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. ईशान्य भारतात मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, मणिपूरमधला दहशतवाद मोडून काढणे, उल्फा व बोडो यांसारख्या संघटनांनी निर्माण केलेला उत्पात काबूत आणणे यांसारख्या सोपवलेल्या सर्व जबाबदाऱ्या भारतीय लष्कराने समर्थपणे पार पाडल्या आहेत.

पंजाब, काश्मीर येथील दहशतवादाला समर्थपणे तोंड देऊन देशाची भौगोलिक अखंडता टिकविण्याचे ऐतिहासिक कार्यही भारतीय लष्कराने केले आहे. १९९० मध्ये काश्मीर भारतात राहील की नाही अशी शंका उत्पन्न झाली होती. परंतु दहशतवादाच्या मार्गाने काश्मीर मिळविण्याचे पाकिस्तानचे सर्व मनसुबे भारतीय लष्कराने उधळून लावले. भारताचा कोणताही भूभाग बंदुकीच्या किंवा दहशतवादाच्या मार्गाने कोणालाही बळकावता येणार नाही याची अनुभूती भारतीय लष्कराने जगाला दिली आहे.

## नौसेना

अनादी काळापासून ज्याप्रमाणे श्रीगणेशाची आद्यपूजा सांकेतिक प्रघात म्हणून चालत आली आहे, त्याचप्रमाणे वरुणाच्या आराधनेची परंपराही भारतीय दर्यासारंग पूर्वापार पाळत आहेत.

पाश्चिमात्य संस्कृतीचा उदय होण्यापूर्वी अगदी वैदिक काळापासून हिंदु समाजाला सामरिक सामर्थ्याची जाण होती. इ.स.पू. २३०० साली जगातील पहिली गोदी (डॉकयार्ड) गुजरातच्या किनाऱ्यावरील लोथल नावाच्या बंदरात उभारण्यात आली असे संदर्भ सापडतात. श्रीवरुणदेवालाच प्राचीन काळी देवांचा राजा मानत असत. समुद्रमंथनात मौल्यवान वस्तूंचा शोध लागल्याने लक्ष्मीने परिप्लुत समुद्र हे अमूल्य भांडार आहे, ह्या सार्थ श्रद्धेपोटी वरुणाला लोक 'देवांचा राजा' मानू लागले. आजही नवीन युद्धनौकेचे जलावतरण (राष्ट्रार्पण) करताना कश्यपऋषी-दिती, आदिती व वरुणदेव ह्यांचेच स्मरण करून तिला समुद्राच्या हवाली करतात. भारतीय आरमाराच्या बोधचिन्हात म्हणूनच तर, 'शं नो वरुण:' ह्या वचनाचेच दर्शन होत आहे.

पूर्वोत्तर पसरलेल्या हिमालयाच्या रांगा, इराणमार्गे जाणारा खुष्कीचा मार्ग व तीनही दिशांना वेढणारा विस्तृत समुद्रकिनारा हाच मुख्यत्वे वैदिक काळातील दळणवळण, व्यापार व परराष्ट्रीय संबंधांचा प्राचीन दुवा होता. अलेक्झांडरच्या आक्रमणापूर्वी हिंदुस्थानचे रोम, जावा-सुमात्रा, मलाया, इंडोनेशिया, पर्शिया, तुर्कस्तान व श्रीलंका इत्यादी देशांशी व्यापारी व राजकीय संबंध होते हे रोमन पर्यटक प्लीनी ह्याने आपल्या प्रवासवर्णनात स्पष्ट केले आहे.

नौकानयन शास्त्राचा अभ्यास जगाला प्रथम शिकवला तो आर्यभट्ट व मिहिरसेन ह्या दोन हिंदुस्थानी शास्त्रज्ञांनीच. सन ४३० च्या सुमारास 'मत्स' यंत्राचा (मॅग्नेटिक कंपास) भारतात शोध लागून सामुद्रिक मार्गाचे (सी-कोर्स) नकाशे (नेव्हिगेशन चार्ट्स) तयार होऊ लागले.

अलेक्झांडरच्या आक्रमणानंतर सम्राट चंद्रगुप्ताने आरमार उभे करून आपल्या दर्याधुरंधरांना नद्या, समुद्र, महासागर ह्यांची निगराणी करून गस्त (पॅट्रोलिंग) घालण्याचा आदेश दिला. ज्या जहाजातून अलेक्झांडर व

त्याचे सैन्य मेसोपोटेमियात परतले, ती सागवान लाकडापासून बनवलेली अत्युच्च दर्जाची (सी वर्दी) दणकट जहाजे सिंध प्रांतात (आता पाकिस्तानात) बनवलेली होती. दक्षिणेतील विजयनगर व पूर्वेकडील कलिंग सम्राटांनी इसवी सनाच्या पाचव्या व दहाव्या शतकात समुद्रमार्गे मलाया, जावा, सुमात्रा, बाली ह्या परराष्ट्रांशी व्यापारी संबंधांद्वारे आपले साम्राज्य उभे केले. सन ८५०-८६० काळात पाश्चिमात्य व पौर्वात्य देशांतून भारतात आयात होणाऱ्या सोन्याचे रोजचे महसुली उत्पन्न १५० ते २५० मण होते.

भारतीय समुद्रातील चाचेगिरीला वेसण घालण्यासाठी चौल वंशीय राजांनी आपले आरमार उभे करून बर्मा (म्यानमार), मलाया, जावा-सुमात्रा ह्या देशांवर सन ९९० ते १०५० च्या दरम्यान हल्ले करून त्या देशांना आपले मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडले होते. बाराव्या व तेराव्या शतकांत शंभर वल्ह्यांची मजबूत, अद्यायावत, लक्ष्यभेदी व ६० ते १०० नौसैनिक वाहून नेण्याची क्षमता असणारी जहाजे भारतात बनत. जहाजबांधणीचा उद्योग पाश्चिमात्य राष्ट्रांपेक्षा हिंदुस्थानात अधिक प्रगत होता असा निर्वाळा मार्कोपोलो ह्या विदेशी पर्यटकाने देऊन ठेवला आहे.

परंतु इसवीसन १३०० नंतर पोर्तुगिजांनी समुद्रमार्गाने हिंदुस्थानाच्या दक्षिण भागावर आक्रमण करून भारताच्या विस्कळीत-खंडित आरमारावर विजय मिळवून भारतीय व्यापारी नौकांवर 'परवाना कर' (ट्रेडिंग लायसन्स टॅक्स) लादला. १५३४ सालापर्यंत कोचीन ते मुंबईपर्यंत आपले वर्चस्व निर्माण करत पार्तुगीज आरमाराने भारतीय किनाऱ्यावर आपला झेंडा रोवला. त्याच सुमारास ब्रिटिश आरमाराचे आव्हान पोर्तुगिजांना पेलता आले नाही. त्यामुळे १६६२ साली पोर्तुगिजांनी आपली राजकन्या इन्फंटा कॅथेरीन हिचा विवाह ब्रिटिश राजपुत्र दुसरा चार्लस ह्याच्याशी लावून दिला व एक तह करून मुंबई हे बेट ब्रिटिशांना 'आंदण' म्हणून दिले.

पोर्तुगिजांच्या आक्रमणाचा बीमोड करण्याचा प्रयत्न केरळातील झामोरीन व कुंजाली राजवंशानी केला. १५०३ साली झामोरीन व पोर्तुगिज यांच्यात कोचीनच्या किनाऱ्यालगत व १५०९ साली कुजाली व पोर्तुगिज यांच्यात दिवू बंदराच्या जवळ दोन घनघोर सागरी युद्धे होऊन पोर्तुगिजांनी ह्या केरळी सत्ता नेस्तनाबूत केल्या. ह्या राजांचे आपसात असलेले हाडवैर पोर्तुगिजांच्या पथ्यावर पडले. ह्या सागरी युद्धानंतर केरळ ते महाराष्ट्रपर्यंत पोर्तुगीज अंमल सुरू झाला. हा अंमल १३०० व्या शतकापासून १७०० व्या शतकापर्यंत होता. व्यापारासाठी हातात तागडी घेऊन आलेले हे फिरंगी सागरी व लष्करी सामर्थ्यावर साम्राज्याचे धनी झाले. विविध जाती, भाषा, प्रात यांतील भेदभाव आणि राज्यकर्त्यांचे आपसातील हेवेदावे या सर्वांचा उपयोग करून घेत 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाने भारताला ब्रिटिशांनी दीडशे वर्षे गुलामीत ठेवले.

मात्र १७०० व्या शतकात मराठ्यांच्या आरमाराने ब्रिटिश व पोर्तुगीज आरमाराचा प्रतिकार करून त्यांच्यावर जरब बसवली. शिवकालीन व पेशवेकालीन आंग्रांच्या नेतृत्वाखालील मराठा आरमाराने, जंजिऱ्यातील सिद्दी बंधूंचा अपवाद वगळता, ब्रिटिश, डच, फ्रेंच व पोर्तुगीज आरमाराला कोकण किनारपट्टीतून हद्दपार करून टाकले होते.

हिंदुस्थानी इतिहासात जे प्रमुख राज्यकर्ते झाले, त्यांत सागरीबळाचे अनन्यसाधारण महत्त्व फक्त छत्रपती शिवाजी महाराजांनी ओळखले व मराठा आरमाराच्या बांधणीला १६४९ साली सुरुवात केली. तेव्हा मराठ्यांच्या जंगी बेड्यात (वॉरशिप्स) केवळ २८ नौका होत्या. १६७४ साली हीच संख्या ७४ युद्धनौका इतकी झाली होती. मराठ्यांच्या ह्या आरमारात वेगवेगळ्या प्रकाराची जहाजे होती. नाव किंवा मचवा ही लहान जहाजे मालाची ने-आण करून रसद पुरवठा कायम ठेवून शिबंदीचा (लॉजिस्टिक सपोर्ट) व्यवहार पाहत असत. गलबत ही तीन-तीन शिडांची मध्यम पल्ल्याची जहाजे होती. या जहाजांवर एका दर्यासारंगाच्या हाताखाली २० ते २५

तांडेल कार्यरत असत. पाल व शिरब ही जहाजे ३० ते ५० टन वजनांची असून त्यांवर तीन-तीन ध्वजदंड संकेत (कम्युनिकेशनल फ्लॅग मास्ट) असत. ह्या जहाजांच्या भिंतींना भोके पाडून (पोर्ट होल्स) त्यावर उखळी तोफा बसवलेल्या असत. किनारपट्टीच्या गस्ती (पॅट्रोलिंग) बरोबरच व्यापारी नौका व मच्छीमारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ह्या जवानांवर असे. या आरमारातील जंगी बेडा (फ्लीट) या संज्ञेस पात्र ठरणारी नौका म्हणजे 'गुराब' होय. ह्या नौकेवर स्वार होऊन सरखेल दर्यासारंग (अ‍ॅडमिरल) हा युद्धाची मोहीम आखून बेड्याचे (फ्लीटचे) नेतृत्व करत असे. गोड्या पाण्याच्या साठवणीसाठी या जहाजांच्या भिंतींवर मोठमोठ्या पखाली व लाकडी पिंपे ठेवलेली असत. 'गुराब' ही तत्कालीन ध्वजनौकाच. या जहाजांवर १००-१५० खलाशी २० तांडेलांच्या हाताखाली कार्यरत असत. ह्या जहाजावर दारूगोळा ठेवण्यासाठी भांडारे असत. ह्या मजबूत, टिकाऊ व मर्मभेदी अशा एका जहाजांच्या बांधणीचा तत्कालीन खर्च २५ ते ३० हजार होन (शिवकालीन नाणे) इतका होता.

१६७४ साली शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी ईस्ट इंडिया कंपनीने हेन्री ऑक्झीडन नावाचा प्रतिनिधी महाराजांच्या दरबारात पाठवला होता. तो धूर्त व चतुर इंग्रज उंची नजराणा पेश करून सागरी सवलती मागत होता. तेव्हा महाराजांनी नजराणा स्वीकारून फिरंगी जहाजांनी कोकण समुद्रकिनाऱ्यापासून ३० सागरी मैलांच्या बाहेरूनच ये-जा करावी व स्थानीय व्यापारी नौका व मच्छीमारांना धक्का न लावता जलपर्यटन करावे अशी सक्त ताकीद दिली होती. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हा पोर्तुगीज वकीलाने सालाझार ह्या आपल्या राजाला लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे, की मराठ्यांचे आरमार हे दोन विभागांत विभागलेले आहे. एक किनाऱ्यालगत गस्त घालणारे ज्यात ३५०/४०० मचवा, नावा, होड्या असून, दुसरे ७४ जंगी बेड्यांचे (वॉरशिप्स) आक्रमक आरमार आहे. या आरमारावर सालीना दहा लक्ष मोहरा इतका खर्च होतो. ह्या आरमारात आंग्रे जातीच्या प्रमुख नेतृत्वाखाली वारली, कातकरी, भंडारी, रोहिला, हबशी, चाऊस जमातीची माणसे काम करतात. हे पत्र मराठ्यांच्या आरमारावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, अंजनवेल, रत्नदुर्ग ह्या जलदुर्गांवर १०/१० टनांच्या तोफा कशा काय चढवण्यात आल्या हे एक कोडेच आहे. कुलाबा प्रांतात (आताचा रायगड जिल्हा) जहाजबांधणीचा कारखाना शिवाजी महाराजांनी सुरू करून भारतीय जहाजबांधणी उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. कुलाबा हा शब्दच फार्सी असून कुल+अब म्हणजे 'गोदी' (डॉकयार्ड) असा त्याचा अर्थ आहे. ह्या तत्कालीन कुलाबा प्रांतातच आंग्रे ह्यांची जहागीर-मनसबदारी होती. रत्नदुर्ग (रत्नागिरी) या सागरी किल्ल्याच्या दक्षिण अंगाला एक भुयार उत्खननात सापडले. तेव्हा असे लक्षात आले की, तो एक तरता तराफा (फ्लोटिंग डेक) होता, की ज्यावर जायबंदी जहाजांची दुरुस्ती होऊन ती परत युद्धमोहिमेवर रवाना होत असत.

मराठ्यांच्या ह्या आरमारात खानगी-सारंग-तांडेल-दर्यासारंग-दर्याधुरंधर-दर्यादिलेर व सरखेल (अ‍ॅडमिरल) असे चढत्या क्रमाचे हुद्दे होते. पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर आंग्रे व पेशवे ह्यांचे वाद होऊन कान्होजींच्या मृत्यूनंतर म्हणजे १७२९ साली मराठ्यांचे आरमार दुबळे झाले आणि फिरंग्यांच्या आरमाराचा वरचष्मा निर्माण झाला. मराठा आरमाराच्या पतनानंतर कोकण किनाऱ्यावर ब्रिटिश सत्ता शिरजोर झाली.

मोगल बादशहा जहांगिराच्या हुकमाने व्यापाराच्या नावावर मिळालेल्या परवानगीचा फायदा घेऊन ब्रिटिशांनी सुरतेत ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय उभारून संपूर्ण भारतीय किनाऱ्यावर सुरतेपासून कलकत्त्यापर्यंत 'रॉयल नेव्ही'ची सत्ता स्थापन केली. १८५७ चे स्वातंत्र्यसमर ब्रिटिशांनी आपल्या धूर्त कारस्थानी डावपेचांनी मोडून काढत तैनाती फौज व आरमाराच्या सहाय्याने भारतातील आपली सत्ता पुन्हा स्थिरस्थावर केली.

सन १६१२ साली हत्यारबंद जहाजांचा काफिला इंग्लंडहून पोर्तुगिजांना हरवून सुरतेच्या किनाऱ्यावर पोहोचला. १६१५ साली फिरंग्यांनी जहांगिराकडून व्यापारी दळणवळणाची शासकीय परवानगी मिळवली. कावेबाज ब्रिटिशांनी मुगल दरबाराला बंदुका, तोफा, दुर्बिणी व सोन्याचांदीच्या उंची वस्तूंची भेट देत, नजराणा पेश करत वश करून सुरत, अहमदाबाद, कँम्बे येथे व्यापारी वखारी उघडून भारतास लुटण्यास सुरुवात केली. ह्या काळात म्हणजे १६४९ ते १७३० सालापर्यंत ब्रिटिशांचा प्रतिकार केला तो फक्त मराठा आरमाराने. मराठ्यांच्या पराक्रमी आरमाराची योजनाबद्ध उभारणी शिवाजी महाराजांनी केली म्हणून छत्रपती शिवाजीराजांना 'भारतीय आधुनिक नौदलाचे आद्य प्रणेते' मानण्यात आले असून आय.एन.एस. शिवाजी व आंग्रे ह्या नावाची भारतीय नौसेनेची प्रशिक्षण केंद्रे सध्या कार्यरत आहेत.

ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी जहाजांच्या संरक्षणासाठी १६१३ साली इंग्लंडने इंडियन मरीन्सची स्थापना करून डच, फ्रेंच, पोर्तुगीज व मराठा आरमाराबरोबर सागरी युद्धे लढून एक तर त्यांना प्रतिबंध घातला किंवा नेस्तनाबूत तरी करून टाकले. १७३५ साली ब्रिटिशांनी मुंबई बंदरात एक डॉकयार्ड बांधून जहाजनिर्मितीस सुरुवात केली. त्याच गोदीला आता नेव्हल डॉकयार्ड म्हटले जाते. ह्याच नेव्हल डॉकयार्डमध्ये १७९५ साली एच.एम.एस. हिंदोस्थान (हर मॅजेस्टिज शिप हिंदुस्थान), १८०० साली एच.एम.एस. कॉर्नवॉलीस, एच.एम.एस. कॅमल यांची बांधणी केली. १९ आक्टोबर १८१७ साली मुंबई गोदीत बांधण्यात आलेली एच.एम.एस. त्रिंकोमाली ही सध्या पाण्यावर तरंगणारी सर्वांत जुनी युद्धनौका होय. मराठ्यांच्या आरमाराने कुलाबा (रायगड) येथे १६५० च्या दरम्यान सुरू केलेला जहाजबांधणीचा हा व्यवसाय अव्याहतपणे चालू आहे. मुंबई, कोचीन, गोवा, विशाखापट्टणम, कलकत्ता गोदीतून जहाजबांधणी जोरात चालू असून आपण तिसऱ्या जगाला (थर्ड वर्ल्ड) युद्धनौका विकून परकीय चलन मिळवत आहोत. १७८२ साली इंडियन मरीनचे नामकरण 'द रॉयल इंडियन मरीन' असे करण्यात येऊन ब्रिटिश नौसेना अधिकाऱ्यांच्या हाताखाली भारतीय नौसैनिकांची, विशेषत: दर्याबहाद्दर कोकणी माणसांची भरती करण्यात आली. ह्या 'रॉयल इंडियन मरीन'ने पहिल्या महायुद्धात पराक्रम गाजवला. युद्ध संपल्यावर आर्थिक चणचणीचे कारण सांगून ह्या आरमारातील बहुसंख्य भारतीयांना निवृत्त करण्यात आले. त्यानंतर राणीच्या आदेशाने हे आरमार पूर्णतया 'रॉयल नेव्ही'च्या म्हणजे ब्रिटिशांच्या अखत्यारीखाली देण्यात आले. १९३० साली ह्या आरमाराचे 'रॉयल इंडियन नेव्ही' असे परत नामकरण होऊन भारतीयांना ह्या आरमारात अधिकारी म्हणून (किंग्ज कमिशन) नेमण्यास मान्यता मिळाली. सब लेफ्टनंट डी.एन. मुखर्जी निवड होऊन त्यांना पहिला भारतीय किंग्ज कमिशन प्राप्त नौसेना अधिकारी पदाचा मान प्राप्त झाला.

१९३५ साली रॉयल इंडियन नेव्हीला 'किंग्ज कलर'चा बहुमान बहाल करण्यात येऊन ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याप्रमाणे अनेक भारतीयांनाही शौर्यपदके जाहीर झाली. ह्याच सुमारास दुसऱ्या महायुद्धाच्या नौबती झडू लागल्या. १९३९ मध्ये ह्या 'रॉयल इंडियन नेव्ही'कडे फक्त आठ जंगी नौका (वॉरशिप्स) होत्या. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले तेव्हा हीच संख्या ११७ युद्धनौका व ३०,००० कर्मचारी इतकी झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या ब्रिटिश सरकारने आरमारात नोकरकपात करून ११७ पैकी ३२ युद्धनौका व ११,००० नाविक कर्मचारी एवढीच संख्या ठेवली. रॉयल इंडियन नेव्हीचे सेनापति पद रिअर ॲडमिरल जॉन व्यालनॉट सेव्हिकमॅक हॉल ह्या अधिकाऱ्यास देण्यात आले. मुंबई हे मुख्यालय म्हणून निवडण्यात आले असले तरी आदेश मात्र लंडनहूनच देण्यात येत असत.

१९४७ साली जरी भारताला स्वातंत्र्य मिळाले, तरी कॉमनवेल्थचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे व २६ जानेवारी १९५० पर्यंत गव्हर्नर जनरल हाच सरकारचा प्रमुख असल्यामुळे 'प्रजासत्ताक भारत' जाहीर झाल्यावरच

भारतीय आरमाराच्या नावातून 'रॉयल' हा शब्द वगळून 'भारतीय नौसेना'(इंडियन नेव्ही) या नावे भारतीय नौदल ओळखले जाऊ लागले व युद्धनौकांवर तिरंगा फडकू लागला. भारत सरकारच्या विनंतीवरून ॲडमिरल सर एडवर्ड पॅरी ह्यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले सेनापतिपद सांभाळले. २२ एप्रिल १९५८ ह्या दिवशी व्हाइस ॲडमिरल स्टिफन टोप कार्लाइल ह्यांच्याकडून व्हाईस ॲडमिरल रामदास कटारी ह्या भारतीय नौसेना अधिकाऱ्याने सेनापतिपदाची सूत्रे हाती घेतली व खऱ्या अर्थाने भारतीय आरमाराची धुरा भारतीयांकडे आली. त्यानंतरचे नौसेना प्रमुख होते, ॲडमिरल भास्कर सोमण. नौसेनेचे मुख्यालय राजधानी दिल्ली येथे स्थापण्यात येऊन पश्चिमी नौसेना बेडा, मुख्यालय मुंबई व पूर्वी नौसेना बेडा, मुख्यालय विशाखापट्टणम अशा दोन स्वतंत्र कमांड सुरू झाल्या.

१९८५ साली अंदमानातील पोर्ट ब्लेअर येथे तीनही सशस्त्र सेनादलांची एकत्रित कमांड (इंटिग्रेटेड कंबाइंड कमांड) सुरू करण्यात आली आहे. ह्या कमांडच्या आधिपत्याखाली बंगालच्या उपसागरातील परिसर व त्यालगतच्या समुद्रातील कमोर्टा, कदमत, कच्छल, कवरत्ती, रोझ, ॲन्ड्रोथ इत्यादी १०० पेक्षा जास्त बेटे आहेत. ह्या भारतीय सागराच्या परिसरातील सर्व शेजारी राष्ट्रांच्या हालचालींवर देखरेख ठेवणे ही जबाबदारी ह्या कमांडवर आहे. पोर्टब्लेअरपासून बांगला देश ४०० मैलांवर, म्यानमार ४० मैलांवर, मलेशिया/थायलंड ५०० मैलांवर व इंडोनशिया १५० मैलांवर असून भारताचा किनारा पोर्टब्लेअरपासून १६५० मैल इतक्या दूर अंतरावर आहे. या द्वीपसमूहाचे विशिष्ट असे सागरामधील सामरी डावपेचात्मक स्थान (स्ट्रॅटेजिक पोझिशन) महत्त्वाचे असून युद्धजन्य परिस्थितीमध्ये निर्णायक ठरू शकते. चीनसारख्या विस्तारवादी राष्ट्रांचा डोळा ह्या द्वीपसमूहावर आहे. म्हणून भूसेना-नौसेना-वायुसेना ह्या तिन्ही भारतीय सशस्त्र सेनादलांची ही सामाईक कमांड असून तिची धुरा व्हाइस ॲडमिरल हुद्याच्या नौसेना अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. बेटांचे संरक्षण ही महत्त्वपूर्ण जबाबदारी ह्या कमांडवर आहे.

१६४ लहान-मोठी बंदरे असणाऱ्या सागरकिनाऱ्याचे संरक्षण व निगराणी करीत, व्यापारी जहाजांना व मच्छीमारांना अडचणीत मदत करत, त्यांचे व्यवहार व्यवस्थित अडथळ्याशिवाय सुरळीतपणे चालू राहण्यास साहाय्यभूत होणे, भारताच्या सागरी संपत्तीचे संरक्षण व देखभाल करणे, सागरी संपत्तीच्या विकासास व संशोधनास मदत करणे, राष्ट्रीय आपत्तीच्या काळात उदा. महापूर, भूकंप, त्सुनामी इ. प्रसंगी मुलकी अधिकाऱ्यांना सरकारच्या आदेशाप्रमाणे मदत करणे, सरकारच्या राष्ट्रीय ध्येय, धोरणांचा पाठपुरावा करणे, मित्रराष्ट्रांसोबत संबंध दृढ करणे, परदेशातील भारतीयांना भावनिक आधार देत जगामध्ये भारतीय शक्तीचे मिळेल ती संधी साधून प्रत्ययकारी प्रदर्शन घडवणे, भारताच्या आर्थिक महसुलात भर घालत राहणे इत्यादी महत्त्वाची कर्तव्ये भारतीय नौसेनेला पार पाडावी लागत आहेत.

९५ टक्के जागतिक व्यापारी मालाची ने-आण ही सागरी मार्गानेच होत असून भारताच्या महसुलात ह्या आर्थिक उलाढालींचा वाटा ७५ टक्के आहे.

ही आर्थिक उलाढाल नौसेनेच्या संरक्षणाच्या आधारानेच अबाधितपणे चालू आहे. सागरी तेलावर प्रक्रिया करणारे समुद्रातील ३० तराफे (प्लॅटफॉर्म्स) व सागरातील भारतीय किनाऱ्यालगत असणाऱ्या १२५ पेक्षा जास्त तेलाच्या विहीरींचे संवर्धन व संरक्षण ही जबाबदारी भारतीय नौसेनेचीच आहे.

१९७२ ते १९८० ह्या काळात आय.एन.एस. (इंडियन नेव्हल शिप) दर्शक, सतलज, जमुना, इन्व्हेस्टिगेटर, निर्देशक इत्यादी भारतीय नौसेनेच्या सर्वेक्षक नौकांनी (सर्व्हे शिप्स) सागरी साम्राज्याच्या उभारणीत, सागरी तेल उत्खननाच्या कार्यात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

देशाच्या फाळणीनंतर भारताच्या वाट्याला ३३ युद्धनौका आल्या, तर पाकिस्तानला १६ युद्धनौका बहाल करण्यात आल्या. ब्रिटिशांच्या तालमीत तयार झालेल्या ह्या भारतीय आरमारासाठी सरकारने ब्रिटनकडून दुसऱ्या महायुद्धात लढलेली क्रूझर्स, फ्रिगेट्स, ड्रायझर्स, माइनस्विपर्स इत्यादी प्रकारची जुनी जहाजे, योग्य ती डागडुजी करून घेऊन, विकत घेतली. त्यात आय.एन.एस. दिल्ली, म्हैसूर या क्रूझर्स; व्यास, बेटवा, ब्रह्मपुत्रा या फ्रिगेट्स; रणजित, रजपूत, राणा या डिस्ट्रॉयर्स; गंगा, गोमंती, गोदावरी या हंटक्लास विनाशिका; मगर, धरणी, कारवार, शक्ती, विक्रांत या विमानवाहू नौका इत्यादी युद्धनौका भारताने १९५५ ते १९६२ सालापर्यंत संपादन केल्या. भारताची पहिली ध्वजनौका (फ्लॅग शिप) होण्याचा मान भारतीय नौसेना पोत दिल्लीस मिळाला. ह्याच जहाजावरून भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनी १९५८ साली नौसेनेचा युद्धाभ्यास पाहून पुढील संदेश दिला होता :

"भारत हा समुद्राने अगदी लपेटलेला देश आहे. पूर्वीच्या काळी समुद्राशी आपले निकटचे संबंध होते. परंतु नंतर आपण दुर्बळ झालो. आता आपण स्वतंत्र झालो आहोत. त्यामुळे आपली सागरी शक्ती दुबळी राहून चालणार नाही; कारण ज्याचे सागरावर प्रभुत्व आहे त्यापासून भारताच्या स्वातंत्र्याला धोका आहे हा इतिहासाने दिलेला धडा आहे." ('India is in the very lap of an ocean. Earlier, we had intimate connection with the sea. Later on, we became weak. Now that we are free, we cannot afford to be weak at sea history has shown that whichever power controls the seas has India at her mercy and India's very independence itself).

१९४७ ते १९६२ ह्या काळात नौसेनेची प्रगती ही कूर्मगतीने होत होती. 'आधी विकास की आधी सुरक्षितता' या वादात सरकारने सेनादलाकडे खूप कमी प्राधान्य दिले.

१९६२ साली चीनने आक्रमण केल्यावर सरकारच्या लक्षात आले, की आपले हेतू आक्रमणाचे नसले तरी स्वतंत्र राष्ट्राच्या संरक्षणासाठी व आपल्या सीमासुरक्षेसाठी प्रबळ सेनादलांची आवश्यकता आहे.

सेनादलांच्या दृष्टीने १९६२ चे चिनी आक्रमण ही इष्टापत्ती ठरली, कारण त्यानंतर लष्करी अंदाजपत्रकात घसघशीत वाढ होऊन लष्कराच्या प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या. तत्पूर्वी १९६० साली भारतीय आरमाराने गोवा मुक्तिसंग्रामात महत्त्वाची भूमिका बजावून गोवा स्वतंत्र केला. १९६२ च्या चिनी आक्रमणात आरमाराला विशेष कामगिरी बजावता आली नाही; कारण हे युद्ध हिमालयाच्या कुशीतच लढले गेले.

१९६५ च्या पाकिस्तानसोबतच्या युद्धात मात्र आरमाराने पश्चिम व पूर्व समुद्रकिनाऱ्यांचे संरक्षण केले. ह्या युद्धात पाकिस्तानने द्वारका बंदरावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला; पण तो हाणून पाडण्यात आला. हे युद्धसुद्धा पश्चिम रणभूमीवरच लढले गेल्यामुळे आरमाराची कामगिरी ही मर्यादित होती.

वरील दोन युद्धांच्या समाप्तीनंतर व पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या अकाली निधनानंतर पंतप्रधानपदी विराजमान झालेल्या इंदिरा गांधींनी राष्ट्राची धुरा सांभाळताच भूसेना, नौसेना व वायुसेनेची दस्तुरखुद्द पाहाणी करून सेनापतींशी उत्साहवर्धक चर्चा करून भारतीय सैन्यात चैतन्याचे वारे आणले. आरमारावर तर त्यांचे विशेष प्रेम होते. त्यांनी ॲडमिरल ए.के. चटर्जी, करसटजी, गांधी, परेरा, नंदा, कृष्णन, नाडकर्णी, मनोहर आवटी ह्या वरिष्ठ नौसेना अधिकाऱ्यांशी वैयक्तिक संपर्क साधून आरमाराच्या समस्या व अडचणी ह्यांचा सखोल अभ्यास करत नाविकांच्या प्रशिक्षणावर भर देण्यास सुरुवात केली. रशियाशी नाविक करार करून अत्याधुनिक जहाजे विकत घेतली. पाणबुड्या व मिसाइल क्रूझर्स भारताच्या जंगी बेड्यात सामील झाल्या. रशियन पेटीया क्लास आय.एन.एस. कमोर्टा, कदमत, आंद्रोथ इत्यादी जहाजे, आय.एन.एस. खंदेरी, क्रूरसुरा, वागीर ह्या

पाणबुड्या, आय.एन.एस. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, होशदुर्ग इत्यादी मिसाइल गाइडेड कॉरव्हेटस् जहाजे भारतीय नौसेनेत रुजू झाली. पाणबुडीच्या प्रशिक्षणाची गरज लक्षात घेऊन १९६९ च्या प्रारंभी विशाखापट्टणम मुक्कामी आय.एन.एस. वीरबाहू व आय.एन.एस. सातवाहन ह्या दोन प्रशिक्षण केंद्रांची उभारणी करण्यात येऊन भारताने सागरी जलपृष्ठाखालील युद्धाच्या (अंडरवॉटर वॉरफेअर) युगात यशस्वी पदार्पण केले. १९७० मध्ये अतिशय लहान परंतु मर्मभेदी व महाशक्ती शाली मिसाइल बोट्स आय.एन.एस. प्रचंड, प्रताप, निर्भीक, नाशक इत्यादी भारताच्या नौसेनेत दाखल झाल्या. ह्या मिसाइल स्क्वॉड्रन्सनी १९७१ च्या भारत-पाक युद्धात शत्रूवर एवढी जरब बसवली, की अमेरिकनांनी ह्या स्क्वॉड्रनला 'किलर स्क्वॉड्रन' ह्या नावाचा लष्करी बहुमान दिला. भारतीय नौसेनेच्या विमानवाहू नौका विक्रांत व विराटसाठी सीहॉक, सी-हॅरिअर, आलीझे व जग्वार इत्यादी विमानेही भारतीय आरमाराला मिळाली आणि नौसेनेचे विमानदल हे प्रभावी व गरुड भरारी घेण्यास सज्ज झाले.

या सर्व प्रगतीमुळे व नौसेनेच्या विकासाकडे लक्ष दिल्याने १९७१ च्या भारत-पाकमधील बांगलादेश मुक्ति संग्रामात भारतीय आरमाराने पाकिस्तानी आरमाराचे कंबरडे मोडून भीमपराक्रम केला. युद्धाच्या पहिल्या चार दिवसांतच प्रभावशाली, प्रत्ययकारी कामगिरी बजावून पाकिस्तानची पी. एन. एस. शहाजहान, जहांगीर, आलमगीर, बाफर, नूरजहांन इत्यादी जहाजे बुडवली. अनेक जहाजे जायबंदी केली. महत्त्वाचे म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील पाकिस्तानी पाणबुडी पी.एन.एस. गाजीला जलसमाधी देऊन अमेरिकेच्या ह्या पाणबुडीचा धुव्वा उडवला.

पाकिस्तानच्या मदतीला अमेरिकेने एंटरप्राइझ ह्या वैमानिक जहाजाच्या नेतृत्वाखालील आपले सातवे आरमार बंगालच्या उपसागात उतरवलेले असताना न डगमगता भारतीय आरमाराने जी विजिगीषु व लढाऊ वृत्ती दाखवली, ती पाहून अमेरिका स्तिमित झाली. 'हजारों साल लडेंगे।' ही जनाब भुट्टो ह्यांची दर्पोक्ती भारतीय सेनेने केवळ दहा दिवसांत मोडीत काढत पाकिस्तानला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. १९७१ चे भारत-पाक हे एक सर्वंकष युद्ध होते. स्वातंत्र्योत्तर काळात नौसेना व वायुसेना ह्यांना ह्या युद्धातच प्रथम लढण्याची व आपली प्रतिकारशक्ति जगाला दाखविण्याची संधी मिळाली. या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन भारतीय नौसेनेने जगाला आपली ताकद दाखवून दिली.

दुर्दैवाने ह्या युद्धात आय.एन.एस. खुकरी ह्या भारतीय नौसेनेच्या फ्रिगेट जहाजाला जलसमाधी मिळून १३० पेक्षा जास्त नौसेना अधिकाऱ्यांनी सर्वोच्च बलिदानाचा, प्राणार्पण करण्याच्या नौसेनेच्या परंपरेचा आदर्श जगासमोर ठेवून एक इतिहास घडविला. ह्यानंतरच्या १९९८ च्या कारगिल युद्धात सागरी किनाऱ्याची देखभाल करण्याइतकीच मर्यादित कामगिरी भारतीय नौसेनेला पार पाडावी लागली.

परदेशाकडून युद्धनौका विकत घेत असतानाच १९७० ते १९८० ह्या दशकात भारतीय आरमाराने स्वावलंबी व्हावे म्हणून लिएंडर क्लास फ्रिगेटची निर्मिती मुंबई गोदीत सुरू केली. ह्या युद्धनौका पूर्णत: देशी बनावटीच्या आहेत. या बोटींवर सरफेस टू सरफेस मिसाइल्स व विमानवेधी तोफा, अत्याधुनिक रडार यंत्रणा व सोनार गेम यंत्रणा बसवण्यात आली आहे. ह्या बोटीवर हेलिकॉप्टरसुद्धा तैनात असते. ह्या जहाजांना गिरी स्क्वॉड्रन हे नाव असून ह्या युद्धनौकांची नावे आहेत, आय.एन.एस. नीलगिरी, हिमगिरी, उदयगिरी, द्रोणागिरी इत्यादी.

१९८५-२०१० या काळातील नौसेनेची प्रगती

आता तर भारताने स्वतःची पहिली अणुपाणबुडी तयार केली आहे. अत्याधुनिक क्षेपणास्त्र आणि सोनार यंत्रणा या पाणबुडीत बसवण्यात आली आहे. आता ही अणु पाणबुडी सामरिक डावपेचांची युद्धप्रणाली अवलंबत शत्रूला प्रतिबंध करत आहे. २०१०-११ मध्ये भारतीय नौसेनेने रशियन बनावटीची आय.एन.एस. विक्रमादित्य

ही विमानवाहू नौका खरेदी केली आहे. त्याचबरोबर मिग २९ के लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टर्सही घेतली आहेत.

नौसेनेने जर्मनीकडून उच्च दर्जाची आधुनिक यंत्रणा असलेली पाणबुडी जर्मनीतील एचडीडब्ल्यू शिपयार्ड मधून १९८६ मध्ये घेतली आहे. तसेच रशियन बनावटीच्या किलो क्लास हंटर किलर पाणबुड्याही भारतीय नौसेनेने प्राप्त केलेल्या आहेत. फ्रेंच बांधणीच्या स्कॉरपिन क्लास पाणबुड्या तयार करण्याचे काम मुंबईच्या माझगांव गोदीत सध्या सुरु आहे.

स्टील्थ फ्रिगेटस् आणि कॉरव्हेटस् यामधील नव्या शिवालिक जातीच्या क्षेपणास्त्र वाहू विनाशिकेने नौसेनेला समुद्रात खोलवर जाण्याची (ब्ल्यू वॉटर) क्षमता प्राप्त करून दिली आहे. या उद्‌दीष्टांसोबत नौसेनेला आपल्या आपल्या किनारपट्टीला लागून समुद्रावर टेहळणी करायची असते. किनारपट्टीला लागून समुद्रावर आणि खोल समुद्रातह दहशतवादविरोधी कारवायांसाठी त्यांना जागता पहारा ठेवावा लागतो. तटरक्षक दलाच्या सहकार्याने गस्तीचे काम सुरू असताना शांततेच्या वेळी आणि लढाईच्या वेळी समुद्री चाच्यांना पकडण्याचे कामही बरेचदा नौसेनेला करावे लागते.

पश्चिम किनाऱ्यावरील कारवार येथे आय.एन.एस. कदंबा नौकेवर नौसेनेचा अत्याधुनिक नावल बेस आहे. नौसेनेने सध्या लांब पल्ल्याची पाणबुडी वेधी विमाने पी ३ सी ओरायन अमेरिकेकडून घेतली आहेत. त्याचबरोबर अतिरिक्त लढाऊ विमाने व हेलिकॉप्टर्स उतरवता येतील अशा क्षमतेची जहाजंही अमेरिकेकडून घेतली आहेत. या जहाजाचे नाव आहे जलाश्व.

भारतीय नौसेनेत खालीलप्रमाणे विभाग (खाती) असून कंसात त्यांच्या प्रशिक्षण केंद्रांची नावे आहेत. (१) कार्यकारी विभाग : आय.एन.एस. द्रोणाचार्य, (वेन्दुरथी, कोचीन), (२) वीजतंत्री विभाग : आय.एन.एस. वलसुरा (जामनगर), (३) अभियंता विभाग : आय.एन.एस. शिवाजी (लोणावळा), (४) साधनसामग्री विभाग : आय.एन.एस. हमला (मुंबई), (५) कायदा विभाग : आय.एन.एस. कंजाली (मुंबई), (६) वैद्यकीय विभाग : आय.एन.एच.एस. अश्विनी (मुंबई), (७) प्रारंभिक प्रशिक्षण केंद्र : आय.एन.एस. चिलला (ओरिसा), (८) व्यवस्थापन व नेतृत्व विभाग : आय.एन.एस. आगक्णी (कोइमतूर), (९) नौकानयन विभाग : आय.एन.एस. गोमंतक, (गोवा) (१०) नाविक वायुदल : आय.एन.एस. गरुडा (कोचीन), (११) अण्वस्त्र प्रशिक्षण : आय.एन.एस. अग्निबाहू (मुंबई), (१२) जहाज बांधणी : शिपराइट स्कूल (विशाखापट्टणम). (१३) पाणबुडी विभाग – वीरबाहू (विशाखापट्टणम्), वज्रबाहू (मुंबई)

भारतीय नौसेनेचे मुख्यालय नवी दिल्लीत असून नौसेनाध्यक्ष (चीफ ऑफ नेव्हल स्टाफ) ॲडमिरल, हे नौदलाचे प्रमुख म्हणून काम करतात. त्यांच्या साहाय्याला धोरणात्मक व भविष्यकालीन योजनांसाठी व्हाइस ॲडमिरलच्या हुद्याचा नौसेना अधिकारी वरिष्ठ साहाय्यक या नात्याने असतो. रिअर ॲडमिरल/व्हाइस ॲडमिरल या हुद्याचे दुय्यम वरिष्ठ अधिकारी युद्धाभ्यास/मोहिमा यांची आखणी करून मोन्केस, ॲम्फेससारखी सराव शिबिरे आयोजित करतात. मानवसंसाधन व युद्धसामुग्री विभागही रिअर/व्हाईस ॲडमिरल हुद्याचे अधिकारी सांभाळतात. हे सर्व अधिकारी सातत्याने परिस्थितीचा आढावा घेऊन भविष्यकालीन योजना आखत असतात.

याचबरोबर विविध देशांच्या नौदलांसोबत आपल्या नौसेनेच्या संयुक्त कवायती होत असतात. अमेरिका, फ्रान्स, रशिया, जर्मनी, बिक्टन, इटली, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, व्हिएतनाम, इराण, सौदी अरेबिया, श्रीलंका, स्पेन, न्यूझीलंड, कुवेत, केनिया इत्यादी २५ पेक्षा अधिक राष्ट्रांच्या नौसेनेबरोबर युद्धसराव, सांघिक अभ्यास गेल्या पाच वर्षांत पूर्ण केला आहे. भारतीय नौसेनेचे युद्धाभ्यास निरीक्षण चार वर्षांतून एकदा स्वत:

राष्ट्रपती, सर्व सेनादलांचे सर्वोच्च प्रमुख या नात्याने करतात. त्याला 'प्रेसिडेन्शिअल रिव्ह्यू' असे संबोधले जाते. हा एक नयनमनोहारी, डोळ्यांचे पारणे फेडणारा असा नाविकोत्सवच असतो.

भारतीय नौसेनेकडे आजमितीस १३७ युद्धनौका असून २०० नाविक लढाऊ विमाने आहेत. नाविक दलात ७०२० नौसेना अधिकारी व ३९,८२० नौसैनिक सध्या कार्यरत आहेत.

पाकिस्तानी नौसेनेच्या जंगी बेड्यात ३६ युद्धनौका व ५ पाणबुड्या असून २४ हजार कर्मचारी तैनात आहेत. पाकिस्तानी नाविक आकाश बळ ३६ लढाऊ विमाने इतके आहे. लॉकहीड, अलौटे ३, टार्कीन झेड-९, एअरोस्पाटाइल एसए-३१९ बी ही अण्वस्त्रधारी जपानी, अमेरिकन, फ्रेंच बनावटींची लढाऊ विमाने सध्या पाकिस्तान आपल्या काफिल्यात जमा करत आहे. पाकिस्तानचे नाविक मुख्यालय इस्लामाबादमध्ये असून पश्चिमी नौसेना कमांड, उत्तरी नौसेना कमांड व दक्षिणी नौसेना कमांड हे तीन मुख्य तटीय विभाग आहेत.

पीपल्स लिबरेशन आर्मी-नेव्ही ही चीनची नौसेना अमेरिकन नाविक ताकदीची बरोबरी करण्यात गुंतली असून चीनच्या नाविक तांड्यात २६० युद्धनौका व ६० पाणबुड्या आहेत. अमेरिकन नौसेनेकडे २८६ युद्धनौका व अंदाजे ७५/९० अणुपाणबुड्या आहेत. दक्षिणपूर्व आशिया खंडात चीन आपले नाविक प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या उद्योगात गुंतला असून सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, पाकिस्तान इत्यादी राष्ट्रांशी संधान बांधून भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहे. रशियाच्या विघटनामुळे व अमेरिकेच्या पाकिस्तानधार्जिण्या हेतूमुळे चीन १९६२ ची पुनरावृत्ती करू शकतो. १०५ कोटी हजार अमेरिकन डॉलर्स इतका खर्च चीन आपल्या सेनादलावर करत आहे. पाकिस्तानी लष्करी अंदाजपत्रक हे भारताच्या दीडपट असून अमेरिका २०१०-२०११ ह्या आर्थिक वर्षात ५०० कोटी हजार डॉलर्स इतकी रक्कम सेनादलावर खर्च करत आहे.

एकंदरीतच चीन आणि पाकिस्तान ह्यांचे दृढ होत चाललेले सैनिकी संबंध आणि अमेरिका, पाकिस्तानसारख्या आक्रमक राष्ट्राला करत असलेली सैनिकी व आर्थिक मदत हे आपल्या दृष्टीने असलेले चिंतेचे विषय. ह्या सर्व बाबींचा गंभीर विचार करून हिंदुस्थानी सरकारने नौसेनेचा विस्तार करणे अगत्याचे आहे, नव्हे त्यास अग्रक्रम देणे गरजेचे आहे असे वाटते. भारतीय नौसेनेला बराच मोठा पल्ला गाठण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची आहे, हे मात्र खरे.

भारत हे एक सागरी राष्ट्र आहे. शांततेच्या व युद्धाच्या काळात समुद्री व्यापार आणि सागरी दळणवळणाच्या मार्गांचे व सागरी हद्दींचे संरक्षण करणे ही गांभीर्याने लक्ष देण्याची बाब आहे. 'जमिनीवर सुरक्षित राहण्यासाठी आपण आधी समुद्रावर अधिराज्य गाजवायला हवे,' अशी एक म्हण आहे. आजच्या काळानुसार ती अधिकच लागू पडते.

## वायुसेना

हवेपेक्षा जड असे मानवसहित विमान, ही संकल्पना भारतीयांना प्राचीन काळापासून माहीत आहे. रामायण आणि महाभारतात विमानोड्डाणाचे उल्लेख आहेत. किमान सहा हजार वर्षांपूर्वी महर्षी भारद्वाज यांनी लिहिलेल्या 'वैमानिक शास्त्र' या ग्रंथात चार प्रकारची विमाने वर्णिली आहेत. ती कशी बांधावीत आणि त्यांच्या वैमानिकांना कसे प्रशिक्षण द्यावे, याचाही उल्लेख त्यात आहे. मुंबईचे एक रहिवासी शिवकर बापूजी तळपदे यांनी सन १८९५ साली असे एक विमान तयार करून ते उडविण्याचे प्रात्यक्षिकही मुंबईच्या चौपाटीवर करून दाखविले होते. मात्र, या संदर्भात अधिक विश्वसनीय माहिती मिळत नाही.

राइट बंधूंनी त्यांचे पहिले ऐतिहासिक विमानोड्डाण १६ डिसेंबर १९०३ या दिवशी केले. त्यानंतर सातच वर्षांनी म्हणजे डिसेंबर १९१० मध्ये भारतातले पहिले विमानोड्डाण अलाहाबाद येथे एका फ्रेन्च वैमानिकाने केले. आणखी तीन वर्षांनी म्हणजे डिसेंबर १९१३ मध्ये उत्तर प्रदेशात सीतापूर या ठिकाणी पहिले लष्करी विमानोड्डाण विद्यालय सुरू करण्यात आले. पुढच्याच वर्षी म्हणजे १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले. त्यात ब्रिटनच्या 'रॉयल फ्लाइंग कोअर' या विमानदलात अनेक भारतीय सैनिकांना विमान स्वतः उडविण्याची संधी मिळाली. तिचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला. कित्येकांनी शौर्यपदकेही मिळवली. लेफ्टनंट इंद्रलाल रॉय हे 'डिस्टिंग्विश्ड फ्लाइंग क्रॉस' या शौर्यपदकाचे पहिले भारतीय मानकरी ठरले.

**वायुशक्तीचे प्रकटीकरण**

नंतरच्या काळात लष्करी कार्यांसाठी विमानांचा उपयोग करणे म्हणजेच वायुसेनेची निर्मिती करणे या बाबतीत अनेक बदल होत गेले. वायुसेनेला 'वायुशक्ती' असा शब्द वापरला जाणे यातच त्याची अमर्याद शक्ती व्यक्त होते. आज कोणत्याही आधुनिक राष्ट्राच्या युद्धप्रयत्नांमध्ये त्याच्या वायुसेनेचा सहभाग महत्त्वपूर्ण असतो आणि तो निर्णायक असतो. अलीकडच्या सर्व आंतरराष्ट्रीय संघर्षांमध्ये हवाई शक्तीचे हे महत्त्व पुनःपुन्हा प्रत्ययास आले आहे.

भारताच्या संदर्भात सांगायचे तर अलीकडच्या कारगिल युद्धात भारतीय वायुसेनेचा सहभाग निर्णायक ठरला. वायुसेनेच्या झंझावाती हल्ल्यांना सुरुवात झाल्यावर घुसखोरांनी भारतीय प्रदेशातून पळ काढला.

आजच्या या सामर्थ्यशाली भारतीय वायुसेनेची सुरुवात मात्र ब्रिटिश शाही वायुसेनेचे एक विस्तारित दल म्हणून झाली.

**भारतीय वायुसेनेची निर्मिती**

८ ऑक्टोबर १९३२ या दिवशी कराची या ठिकाणी, तत्कालीन ब्रिटिशांकित भारत सरकारच्या एका आदेशानुसार भारतीय वायुदल अस्तित्वात आले.

अशा प्रकारे ब्रिटिश रॉयल एअरफोर्सची एक शाखा म्हणून निर्माण झालेली ही भारतीय वायुसेना, प्रारंभीच्या काळात, ब्रिटिश वायुसेनेच्याच एकंदर धोरणांप्रमाणे चालावी, यात काहीच आश्चर्य नव्हते. हाताच्या बोटावर मोजण्याएवढे भारतीय सैनिक आणि विमाने यांनी बनलेले ते एक छोटे दल होते. परंतु या भारतीयांनी ब्रिटिशांकडून विमानविद्या अवगत करून घेतली नि प्रत्यक्ष अनुभव व राष्ट्रीय भावना यांच्या जोरावर त्यांनीच स्वतंत्र भारताच्या वायुसेनेचा पाया घातला. त्याची ध्येयधोरणे निश्चित केली.

ब्रिटिश सेनापती लेफ्टनंट जनरल ॲण्ड्र्यू स्कीन हे चीफ ऑफ जनरल स्टाफ या हुद्यावर असताना त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने एक महत्त्वाचा अहवाल भारताच्या व्हाइसरॉयना पाठवला. त्यात रॉयल एअर फोर्सच्या धर्तीवर भारतीय वायुदल तुकडीची निर्मिती करण्यात यावी, अशी जोरदार शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार व्हाइसरॉय काउन्सिलने निर्णय घेतला व ८ ऑक्टोबर १९३२ या दिवशी अधिकृत सरकारी राजपत्रामध्ये (गॅझेट) तो जारी करण्यात आला.

त्या सुरुवातीच्या कालखंडात वायव्य सरहद्द प्रांतातील आक्रमक अफगाणी टोळीवाल्यांचा बंदोबस्त करण्यात लष्कराला मदत करणे, एवढेच भारतीय वायुदलाचे काम होते. वायुदलाकडे काही वेस्टलँड वापिती विमानेच फक्त होती. नंतर १९३९ साली, त्या वेळी फ्लाइट लेफ्टनंटच्या हुद्द्यावर असलेले सुब्रतो मुखर्जी यांची

भारतीय वायुदलाच्या पहिल्या स्क्वॉड्रनचे कमांडर म्हणून नेमणूक करण्यात आली. मग भारतीय संरक्षण दलांच्या पुनर्रचनेत वायुदलाला स्वतंत्र सैन्यदलाचा दर्जा देण्यात आला.

**काश्मीरमधील १९४७ ची मोहिम**

देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच रॉयल इंडियन एअर फोर्सचेही विभाजन झाले. भारताच्या वाटणीला लढाऊ विमानांच्या सहा स्कॉड्रन व मालवाहतूक विमानांची एक स्कॉड्रन, तर पाकिस्तानच्या वाटणीला लढाऊ विमानांच्या दोन स्कॉड्रन व मालवाहू विमानांची एक स्कॉड्रन गेली. २६ ऑक्टोबर १९४७ या दिवशी काश्मीरचे महाराज हरिसिंह यांनी भारत सरकारशी सामीलनाम्याचा करार केला. त्याबरोबर जम्मू-काश्मीर हा अधिकृतपणे भारताचा भाग बनला.

परंतु त्यापूर्वीच पाकिस्तानने जम्मू-काश्मीरवर हल्ला चढवला होता. चार ते पाच हजार टोळीवाले काश्मीर खोऱ्यामध्ये घुसले होते. त्यांच्या पाठोपाठ पाकिस्तानी सैन्याने नागरी वेशात काश्मीरवर आक्रमण केले.

२७ ऑक्टोबर १९४७ या दिवशी भारतीय वायुदलाच्या विमानांनी लेफ्टनंट कर्नल राय यांच्या नेतृत्त्वाखालील भारतीय सैन्याची पहिली रेजिमेंट काश्मीर खोऱ्यात उतरवली. अशा ऐन आणीबाणीच्या क्षणी भारतीय सैन्य काश्मीरमध्ये उतरू शकले म्हणूनच केवळ काश्मीर वाचवले गेले. लॉर्ड लुई माउण्टबॅटन यांनी या घटनेचे वर्णन, 'आग्नेय आशियातील माझ्या सेनापतित्वाच्या काळातील सर्वांत वेगवान आणि निर्णायक हवाई हालचाल' अशा शब्दांत केले. या पाठोपाठ लेहमध्येही भारतीय सेना उतरवण्यात आली. त्यामुळे लडाख आणि कारगिल वाचले. मग विमानांनी फेऱ्यांमागून फेऱ्या करून तेथे सैन्य आणि सामग्री उतरवण्यात आली. श्रीनगर, पूंछ आणि लेह यांच्या रक्षणाबरोबरच कोटली, झांगर, नौशेरा आणि टिथवाल इथल्या लढायांमध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन वायुदलाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. भारतीय सैन्य हवाई मार्गाने श्रीनगरमध्ये उतरवण्यात जर विलंब झाला असता, तर पुढील सर्व इतिहास बदलून गेला असता. या कारवायांमध्ये श्रीनगरच्या विमानतळाचे प्रमुख म्हणून तत्कालीन ग्रूप कॅप्टन हृषिकेश मुळगावकर यांनी फार मोलाची कामगिरी बजावली. त्यांनी हवाई हल्ल्यांचे नेतृत्वही केले. पुढे ते एअर चीफ मार्शल झाले.

**जागतिक उच्चांक**

काश्मीर मोहिमेत एअर कमांडर मेहर सिंग यांनी वायुदल क्षेत्रातील काही जागतिक उच्चांक प्रस्थापित केले. डकोटा हे विमान मालपुरवठा, मालवाहतूक यांसाठी वापरले जाणारे; त्याचा चक्क लढाऊ बॉंबफेकी विमानाप्रमाणे उपयोग करून मेहर सिंगांनी पाकिस्तानी सैन्यावर बॉंबफेक केली. त्याचप्रमाणे लडाखची राजधानी लेह या ठिकाणी, समुद्रसपाटीपासून ११ हजार ५४० फूट उंचीवर त्यांनी डकोटा विमान उतरवले आणि तेदेखील त्या भागाचे नकाशे उपलब्ध नसताना!

**प्रारंभीचा काळ**

देशाच्या फाळणीपाठोपाठ लगेचच झालेल्या या काश्मीर युद्धाने भारतीय वायुसेनेला आत्मविश्वास दिला, गगनभरारीसाठी लागणारे बळ दिले. भविष्यात एक शक्ती बनण्यासाठी जो भक्कम पाया लागतो, तो या १९५० च्या दशकाने घातला. भारतीय वायुसेनेचे भक्कम संघटन उभे राहिले. त्यात मोहिमा, प्रशिक्षण, प्रशासन आणि विमानांची, उपकरणांची तत्पर देखभाल या सर्वच घटकांचा समावेश करण्यात आला.

लवकरच भारतीय वायुसेनेत 'व्हॅम्पायर' या नव्या जेट विमानांचा समावेश करण्यात आला. विमान दुरुस्ती विभाग नव्याने उघडण्यात आला. वैमानिकांसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण सुरू करण्यात आले. वायुसेनेचे तांत्रिक प्रशिक्षण महाविद्यालय जलहळ्ळी इथे सुरू करण्यात आले. आज जी अद्यावत अशी वायुसेना आपल्या दृष्टीस पडते, ती हळूहळू आकार घेऊ लागली.

### ध्वज प्रदान

१९५० पासून पुढे दशकभराच्या काळात वायुसेनेची ही प्रगती सुरूच राहिली. १ एप्रिल १९५४ या दिवशी एअर मार्शल सुब्रतो मुखर्जी यांनी वायुसेना प्रमुखाचा पदभार स्वीकारला. भारतीय वायुसेनेचे ते पहिले भारतीय प्रमुख होत. त्याच दिवशी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी वायुसेनेला ध्वज प्रदान केले. प्रशिक्षण विभाग, पूर्व विभाग, देखभाल विभाग आणि मध्यवर्ती विभाग असे वायुसेनेचे चार विभाग (कमांड) करण्यात आले. मिस्टेअर, कॅनबेरा, नॅट आणि हंटर अशी चार प्रकारची अगदी नवी विमाने वायुसेनेत दाखल करण्यात आली.

### १९६२ ची भारत-चीन लढाई

या युद्धात वायुसेनेवर भारतीय सैन्य आणि युद्धसाहित्य दोन्हींच्या वाहतुकीची जबाबदारी सोपवण्यात आली. ती पार पाडण्यासाठी वायुसेनेने अगणित विमानफेऱ्या केल्या. दुर्दैव असे की, वायुसेनेचा उपयोग शत्रूवर बाँबफेक करण्यासाठी केला गेलाच नाही.

चिनी वायुसेनेच्या सामर्थ्याबाबत हेरखात्याने चुकीची माहिती दिल्यामुळेच वरील निर्णय घेण्यात आला होता असे आता निष्पन्न झाले आहे. वायुसेनेची शक्ती ही मुळातच आक्रमक असते. आगेकूच करणाऱ्या चिनी सैन्याला रोखण्यासाठी वायुसेनेने बाँबफेक करून कडे कोसळवले असते, तरी पुरेसे होते. चिनी सैन्याच्या वाटा रोखल्या गेल्या असत्या आणि आपला एवढा मोठा भूभाग चीनच्या घशात जाण्यापासून वाचला असता. वायुसेनेच्या शक्तीने भारताचा इतिहास आणि भूगोल पुन्हा एकदा आपल्याला अनुकूल असा बदलला गेला असता. पण दुर्दैवाने तसे घडले नाही.

### १९६५ चे भारत-पाक युद्ध

१ सप्टेंबर १९६५ या दिवशी पाकिस्तानने छांब-जौरियां भागात भारतीय प्रदेशावर जोरदार आक्रमण केले. पाकिस्तानकडे भारी तोफखाना आणि चिलखती दल होते. पाकिस्तानच्या या मोहिमेचे लष्करी सांकेतिक नाव होते 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम.' भारत आणि पाकिस्तान यांच्या सरहद्दी दरम्यान जम्मू-काश्मीरकडे जाणारा एक अगदी चिंचोळा रस्ता आहे. त्याला 'चिकन नेक' असे म्हटले जाते. हा रस्ता जिंकून भारताचा जम्मू-काश्मीरशी संबंधच तोडून टाकायचा, असा पाकिस्तानचा डाव होता नि त्यात तो जवळजवळ यशस्वी झालाही होता.

त्या दिवशी संध्याकाळी ठीक ४ वाजता भारतीय भूसेनेकडून भारतीय वायुसेनेला तातडीने मदतीला येण्याचा संदेश गेला आणि बरोबर १ तास १९ मिनिटांनी म्हणजे ५ वाजून १९ मिनिटांनी वायुसेनेने पाकिस्तानी लष्करावर पहिला हल्ला चढवला. पुढच्या दीड तासात २६ हवाई हल्ले करण्यात आले आणि त्या दिवसाअखेर भारतीय वायुसेनेच्या खात्यावर १४ रणगाडे, २ तोफा आणि ६७ चिलखती गाड्या उद्ध्वस्त केल्याच्या पराक्रमाची नोंद झाली.

तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ सप्टेंबर १९६५ या दिवशी भारतीय वैमानिक स्क्वॉड्रन लीडर ट्रेव्हर किलर यांनी आपले 'किलर' हे आडनाव सार्थ केले. त्यांनी आकाशात समोरासमोरच्या लढाईत पाकिस्तानचे एक अवाढव्य सेबर जेट विमान नष्ट केले. भारताच्या नॅट या छोट्याशा लढाऊ विमानाने, अमेरिकेने पाकिस्तानला दिलेले भले प्रचंड सेबर जेट विमान उद्ध्वस्त करावे हा एक चमत्कार होता. या एकंदर युद्धात भारतीय नॅट विमानांनी अशी एकूण तेरा सेबरजेट विमाने पाडली.

## १९७१ ची पाकिस्तानविरुद्धची लढाई

१९७१ साली पाकिस्तानने तिसऱ्यांदा भारतावर आक्रमण करण्याचा आततायीपणा केला. त्यातून भारतीय वायुसेनेला पराक्रमाची सुवर्णसंधी मिळाली. ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानने भारताच्या अनेक विमानतळांवर एकाच वेळी योजनाबद्ध हल्ला चढवला. श्रीनगर, अवंतीपूर, हलवाडा, अंबाला, आग्रा, जामनगर, जोधपूर, शिरसा इत्यादी विमानतळांवर पाकने बॉंबफेक केली. ही सगळी ठिकाणे पश्चिम आघाडीवरची होती. त्यामुळे सुरुवातीला भारतीय वायुसेनेने पश्चिम आघाडीवर बचावात्मक धोरण स्वीकारले आणि ४ डिसेंबर १९७१ च्या पहाटेपासून पूर्व आघाडीवरील पाकिस्तानी विमानतळांवर झंझावाती हवाई हल्ले चढवायला सुरुवात केली. तेजगाव आणि ढाका येथील विमानतळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. फक्त ४८ तासांमध्ये पूर्व विभागाच्या आकाशावर भारतीय वायुसेनेचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले. भारतीय सैन्याच्या हाती लागू नयेत म्हणून पाकिस्तानने स्वतःच आपली किमान आठ सेबर जेट्स निकामी किंवा नष्ट करून टाकली.

यानंतर वायुसेनेने पश्चिम आघाडीवरही आक्रमणाला सुरुवात केली. ४ डिसेंबरलाच आपल्या हंटर विमानांनी पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराचीवर हल्ला चढवला. कराची बंदरातल्या तेलटाक्या आणि बादिन सिग्नल विभागावर बॉंबफेक करण्यात आली. ८-९ डिसेंबरला विंग कमांडर बधवार यांनी कहरच केला. त्यांनी कराची बंदराच्या तेलटाक्यांवर इतका तुफानी हल्ला चढवला, की ती भडकलेली आग पुढे कित्येक दिवस जळतच होती. त्याचप्रमाणे सुई या ठिकाणचा वायुप्रकल्पही साफ नष्ट करण्यात आला. चंगा-मंगा येथील पाकिस्तानी लष्कराचे मुख्यालय, हाजी पीर हे अत्यंत महत्त्वाचे ठाणे, लष्कराला रसदपुरवठा करणारे मॉंटगोमेरी रेल्वे केंद्र ही ठिकाणेदेखील भारतीय हवाई हल्ल्यांनी साफ उद्ध्वस्त करून टाकली.

या सर्व कामगिरीवर यशाचा तुरा चढवला तो मात्र पूर्व आघाडीने. पाकिस्तानी सेना टेकीला आल्याच होत्या. भारतीय वैमानिकांनी ढाक्याच्या पाकिस्तानी गव्हर्नर हाउसवर बॉंबफेक केल्यावर पाकने गुडघे टेकले. चौदा दिवसांच्या या युद्धात भारतीय वायुसेनेने पाकिस्तानची एकंदर ९४ विमाने नष्ट केली. 'परमवीरचक्र' हे तीनही भारतीय सेनादलांमधले सर्वोच्च शौर्यपदक. या युद्धात भारतीय वायुसेनेने आपल्या पहिल्या परमवीरचक्राची नोंद केली. फ्लाइंग ऑफिसर निर्मलजितसिंग सेखों यांना 'परमवीरचक्र' हे सर्वोच्च शौर्यपदक मरणोत्तर प्रदान करण्यात आले.

## सामर्थ्याची वाढ

१९६० आणि १९७० च्या दशकांमध्ये भारत-चीन व भारत-पाक संघर्षांमध्ये भारतीय वायुसेनेचा कस लागला. त्यात तावून-सुलाखून उतरत असतानाच वायुसेनेने त्या अनुभवांच्या आधारावर पुढील धोरण ठरवले. अधिक सुसंघटितपणा आणि विस्तार यांसाठी ही योग्य वेळ होती. नवी विमाने, नवी शस्त्रास्त्रे वायुसेनेच्या भांडारात भरती करण्यात आली. आंध्रप्रदेशातील दिंडीगल या ठिकाणी वायुसेना अकादमीची स्थापना करण्यात

आली. 'एअरक्राफ्ट ॲण्ड सिस्टिम टेस्टिंग एस्टॅब्लिशमेंट' म्हणजे विमाने व विमानोड्डाण यंत्रणा यांची सतत तपासणी करीत राहणारी यंत्रणा, अशा अनेक अत्याधुनिक यंत्रणा विकसित करण्यात आल्या. 'एअर डिफेन्स ॲण्ड ग्राउण्ड एन्व्हायरन्मेंट सिस्टिम' अशासारख्या यंत्रणांचे पुनरुज्जीवन करण्यात आले.

**आधुनिकीकरण व विविध मोहिमा**

१९७९ साली वायुसेनेचे आणखी आधुनिकीकरण करण्यात आले. जग्वार ही अत्याधुनिक विमाने वायुसेनेच्या ताफ्यात दाखल झाली. १९८२ साली भारतीय वायुसेनेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. त्या मुहूर्तावर मिग-२३ व मिग-२५ ही नवी विमाने वायुसेनेत दाखल झाली. आणखी काही काळाने डकोटा आणि पॅकेट ही जुनी विमाने निवृत्त करण्यात येऊन मिग-२७, आयएल-७६ आणि एएन-३२ या नव्या विमानांचा समावेश करण्यात आला.

१९८५ साली मिराज २००० या प्रचंड क्षमतेच्या विमानाचे आगमन झाले. या अत्याधुनिक विमानात तंत्रज्ञान व आक्रमकता यांचा उत्कृष्ट समतोल आहे. त्याच वर्षी मिग- २९, एमआय- १७, एमआय- २६ आणि डॉर्निअर ही नवी विमानेही आली. नवीनतम अशा जमिनीवरील व आकाशातील इलेक्ट्रॉनिक यंत्रणांचा वापरही त्याच वर्षी सुरू झाला. त्याअगोदर वर्षभर म्हणजे २० जुलै १९८४ रोजी दक्षिण विभाग हा वायुसेनेचा नवा विभागही अस्तित्वात आला होता.

१९८० च्या दशकात एका पाठोपाठ एक अनेक मोहिमा पार पाडण्यात आल्या. ३ एप्रिल १९८४ रोजी हिमालयात सियाचीन क्षेत्रात 'ऑपरेशन मेघदूत' या मोहिमेची सुरुवात झाली. २७ जून १९८७ रोजी पाच एएन-३२ विमाने व चार मिराज-२००० विमानांनी मिळून श्रीलंकेत जाफना या ठिकाणी वेढ्यात अडकून पडलेल्या तमीळ लोकांना रसद पुरवठा करण्याचे काम हाती घेतले. श्रीलंका सरकारच्या विनंतीवरून वरील 'ऑपरेशन पवन', तर मालदीव सरकारच्या विनंतीवरून 'ऑपरेशन कॅक्टस' या मोहिमा राबविण्यात आल्या.

'ऑपरेशन पवन'मध्ये रसदपुरवठ्यासाठी एएन- ३२ आणि आयएल- ७६ ही विमाने व आक्रमणासाठी एमआय- २५, एमआय- १७ व एमआय- ८ ही हेलिकॉप्टर्स वापरण्यात आली. 'ऑपरेशन पवन'मध्ये वायुदलाने विविध उद्दिष्टे ठरवली व ती यशस्वीपणे पार पाडली. दिवसाउजेडी आणि रात्रीसुद्धा आकाशातून शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, रसदपुरवठ्याप्रमाणेच बॉंबफेकीसाठीसुद्धा शस्त्रसज्ज हेलिकॉप्टर्सचा वापर करणे; शस्त्रे व अन्य सामग्रीसह सैन्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे-आणणे; नवीन सैनिकांना रणभूमीचा प्रत्यक्ष अनुभव देणे, अशी ही विविध उद्दिष्टे होती.

'ऑपरेशन कॅक्टस' ही एक फार मोठी आणि अतिशय वेगवान अशी हवाई मोहीम होती. आयएल-७६ या विमानातून भूसेनेचे छत्रीधारी दल (पॅराट्रुपर्स) पहिल्यांदाच उतरवण्यात आले. ग्रूप कॅप्टन बेवूर यांनी स्वत: त्या विमानाचे चालकत्व घेतले होते. ही मोहीम पूर्णपणे यशस्वी झाली. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष श्री. एम.ए. गयूम भारतीय वायुसेनेच्या या पराक्रमावर बेहद्द खूष झाले. भारतीय सैन्यदले माघारी निघाल्यावर ३ नोव्हेंबर १९८९ रोजी त्यांनी स्वत: वायुसेनेला एक स्मरणचिन्ह भेट दिले.

१९९२ साली 'ऑपरेशन ऱ्हायनो' ही मोहीम हाती घेण्यात आली. आसामात घुसलेले अतिरेकी व त्यांना मदत करणारे विदेशी लोक यांना हुसकावण्यासाठी ही मोहीम होती. एमआय-८ व एमआय-१७ या हेलिकॉप्टर्सनी या मोहिमेत भाग घेतला.

**कारगिल मोहीम**

२६ जून १९९९ रोजी लडाखमधील कारगिलजवळच्या हिमालय पर्वतीय रांगांमध्ये 'ऑपरेशन सफेद सागर' ही मोहीम सुरू झाली. आजवर जगातल्या कोणत्याही वायुसेनेने कधीही हाती न घेतलेली, अशा प्रकारची ही अद्वितीय मोहीम होती. अद्वितीय यासाठी, की पर्वतीय प्रदेशात, इतक्या उंचीवर, दर मिनिटाला बदलणाऱ्या हवामानात, छोट्या-छोट्या गटांमध्ये विखरून, लपतछपत घुसखोरी करणाऱ्या शत्रूविरुद्ध ही मोहीम होती. वायुसेनेने शत्रूची रसद तोडली आणि लढाईचा तोल आपल्या बाजूने झुकवला. यामुळे लढाई झपाट्याने संपली. पाकिस्तानी सेनापतींनीही वायुसेनेचे हे निर्णायक वर्चस्व मान्य केले. वायुसेनेने या लढाईत आपले पाच झुंजार मोहरे गमावले; पण देश जिंकला.

अशा प्रकारे १९८० आणि १९९० च्या दशकांत भारतीय वायुसेनेचे झपाट्याने आधुनिकीकरण झाले. मिग-२३, मिग-२७, जग्वार आणि तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम विकास मानले जाणारे एसयू-३० ही सगळी विमाने याच काळात वायुसेनेत सामील झाली.

भारतीय अंतराळवीर : स्क्वॉड्रन लीडर राकेश शर्मा

स्क्वॉड्रन लीडर राकेश शर्मा हा लढाऊ विमानाचा वैमानिक, भारताचा पहिला अवकाशयात्री ठरला. ३ एप्रिल १९८४ रोजी एका भारत-सोवियत रशिया संयुक्त अवकाश मोहिमेतून राकेश शर्मांने अंतराळात सफर केली. १२ मे १९८४ रोजी राष्ट्रपती भवनात एका भव्य समारंभात त्याला 'अशोकचक्र' हे शौर्यपदक बहाल करण्यात आले.

**वायुसेनेत महिला**

वायुसेनेने जमिनीवरील अतांत्रिक कामे, तांत्रिक कामे व प्रत्यक्ष विमान उड्डाण या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना प्रवेश देण्यास सुरुवात केली. अल्प कार्यकाळासाठी महिला अधिकाऱ्यांना वायुसेनेच्या सेवेत घेण्यात येऊ लागले. जमिनीवरील कामकाजासाठी पहिली महिला अधिकारी तुकडी २१ जून १९९३ रोजी सेवेत दाखल झाली. त्या पाठोपाठ तंत्रज्ञ महिला अधिकाऱ्यांची तुकडी समाविष्ट झाली. रसद पुरवठा दलातील वैमानिक महिलांच्या प्रशिक्षणाला ११ जुलै १९९३ रोजी सुरुवात झाली. काही काळाने हेलिकॉप्टर चालक म्हणून महिलांच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली. आता अशा महिला अधिकाऱ्यांची वायुसेनेत कायमस्वरूपी नियुक्ती (पर्मनंट कमिशन) करण्यात येत आहे.

**आपद्ग्रस्तांना मदत**

पूर, चक्रीवादळे किंवा भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जनतेच्या साहाय्यार्थ धावून जाण्यात वायुसेना नेहमीच अग्रेसर असते. काही वर्षांपूर्वी इराणमध्ये भीषण भूकंप झाला. त्या वेळी वायुसेनेच्या पुरवठा विभागाने फार मोठे मदतकार्य केले. १९९१ साली इराकने कुवेतवर स्वारी केली. त्या वेळी तिथे अडकून पडलेल्या सुमारे पाच हजार भारतीय नागरिकांना आपल्या वायुसेनेने भारतात सुखरूप परत आणले. १९९४ च्या मे महिन्यात एका भीषण चक्रीवादळाने बांगलादेशाला झोडपून काढले. त्या वेळीही एमआय-८, एमआय-१७ व एएन-३२ या भारतीय हेलिकॉप्टर विमानांनी भरपूर मदतकार्य केले.

१९९२ च्या सप्टेंबरमध्ये एएन-३२ या विमानाद्वारे अफगाणिस्तानच्या मझारे शरीफ या शहरालाही मदत पोहोचवण्यात आली. अशा प्रकारचे संकटकालीन साहाय्य २००५ मध्ये पाकिस्तानलाही करण्यात आले. २००१

सालच्या गुजरातच्या भूकंपात आणि २००४ सालच्या अंदमानमधल्या त्सुनामी संकटातही वायुसेनेने आपले मदतकार्य चालू ठेवले. त्सुनामीमुळे अंदमानमधल्या वायुसेनेच्या तळाचे अतोनात नुकसान झाले होते. खूप मोठ्या प्रमाणावर वायुसेनेची जिवीत हानी व साधनसामुग्रीची हानी झाली असूनही वायुसेनेने आपले मदतकार्य जारी ठेवले.

एप्रिल २०११ मध्ये ही प्रस्तावना लिहीली जात असताना लिबियातील अंतर्गत लढाईत अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुखरुप स्वदेशी आणण्याची कामगिरीही भारतीय वायुसेनेने तत्परतेने यशस्वी केली आहे. तसेच जपानमधील भूकंपप्रवास नागरिकांना मदत म्हणून भारतीय वायुसेने तातडीने आयएल-७६ विमानातून आवश्यक मदत सामग्री पोहोचवली आहे.

### संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात सहभाग

विविध परकीय देशांमधल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या मोहिमांमध्ये भारतीय वायुसेना नेहमीच सहभागी होत आली आहे. त्या-त्या देशांमधल्या स्थानिक जनतेकडून त्याबाबत तिचे नेहमीच कौतुक झाले आहे. १९५२-१९५३ मधल्या कोरिया किंवा काँगो मोहिमेपासून ते १९९३ च्या सोमालिया मोहिमेपर्यंत प्रत्येक वेळी भारतीय वायुसेनेने आपला वाटा उचलला आहे. नंतरच्या काळातही सुदान, सिएरा लिओने किंवा अगदी कालपरवा झालेल्या काँगो पेचप्रसंगात वायुसेनेने योग्य तो सहभाग दिलेला आहे.

### नवे सहस्रक

एकविसाव्या शतकात, नव्या सहस्रकातही भारतीय वायुसेनेची गरुडभरारी सुरूच आहे. एसयू- ३० आणि मानवरहित विमान या नव्या विमानांनी वायुसेनेच्या प्रहारक्षमतेची धार आणखी वाढवली आहे. आयएल- ७८ हेही आणखी एक नवे विमान वायुसेनेत दाखल झाले आहे. २६ जानेवारी २००२ रोजी वायुसेनेच्या इतिहासात एक नवे गौरवशाली पान लिहिले गेले. भारत सरकारने एअर चीफ मार्शल अर्जनसिंग यांना भारतीय वायुसेनेचे 'मार्शल ऑफ एअरफोर्स' असा किताब दिला. भूसेनेत जसा 'फील्ड मार्शल' हा सर्वोच्च मानांकित पद आहे, तसाच हेही वायुसेनेतील मानांकित पद आहे.

४ जानेवारी २००१ रोजी विंग कमांडर राजीव कोठियाल यांनी 'लाइट कॉम्बॅट एअरक्राफ्ट' या विमानाचे पहिले उड्डाण केले. हे विमान पूर्णपणे भारतीय बनावटीचे आहे. ही एक अतिशय अभिमानास्पद घटना आहे. या विमानाचे नाव 'तेजस' असे ठेवण्यात आले असून २०१२ पासून ते मिग-२१ ची जागा घेईल. त्याचप्रमाणे 'इंद्र' या संपूर्ण भारतीय बनावटीच्या रडार यंत्रणेचा व जमिनीवरून आकाशात मारा करणाऱ्या 'आकाश' या क्षेपणास्त्राचाही समावेश झाल्यामुळे वायुसेनेचे सामर्थ्य अनेक पटीने वाढले आहे. त्याचप्रमाणे, आकाशातच इंधन भरणारी यंत्रणा आणि 'ॲवॅक्स' ही रडार प्रणालींच्या समावेशाने वायुसेना पुन्हा अत्याधुनिक बनली आहे.

### भविष्याचा वेध

२००७ साली भारतीय वायुसेनेने आपला अमृत महोत्सव म्हणजे पंचाहत्तरावा वाढदिवस साजरा केला. आपल्या आकाशाचे कमालीच्या सावधानतेने रक्षण करणे, लढायांमध्ये यश मिळवणे, नैसर्गिक संकटात तत्परतेने धावून जाणे, आपल्या उदात्त परंपरांची जपणूक करत असतानाच तांत्रिकदृष्ट्या सतत अत्याधुनिक राहणे, अशा सर्व देदीप्यमान वैशिष्ट्यांसह वायुसेनेची आगेकूच सुरूच आहे. आजच्या आण्विक युगातही

आमची ही अत्याधुनिक आणि तंत्रकुशल वायुसेना आकाशातून येणाऱ्या कोणत्याही शत्रूचा नि:पात करण्यास सक्षम व सुसज्ज आहे.

आज भारतीय वायुसेना ही हवाई योद्ध्यांनी (एअर वॉरिअर्स) सुसज्ज आणि आत्मविश्वासाने रसरसलेली अशी एक शक्ती आहे. 'नभ: स्पर्शम् दीप्तम्' हे वायुसेनेचे बोधवाक्य आहे. त्याचा अर्थ, तेजस्वीपणे आकाशाला स्पर्श करा, म्हणजेच शौर्याच्या, पराक्रमाच्या तेजाने आकाश जिंका. आपल्या या गौरवशाली परंपरेची जपणूक करण्यास भारतीय वायुसेना सदैव सज्ज आहे.

## समारोप

स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर व नंतर महाराष्ट्रातल्या ज्या शूरवीरांनी आपल्या पराक्रमाने भारतीय सैन्याचा इतिहास गौरवान्वित केला आहे, अशा सर्वांची नोंद या खंडात करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. विविध भारतीय सैनिकी, अर्ध सैनिकी दलात व गुप्तचर खात्यात ज्यांना त्यांच्या कर्तृत्वाने विविध पदकांनी सन्मानित केले आहे अशा महाराष्ट्रातील सर्वांचा समावेश या खंडात करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. गेल्या दोन वर्षे हे कार्य सुरु होते. ही माहिती परिपूर्ण नाही व त्यात काही कमतरता असू शकतात याचीही आम्हांला कल्पना आहे. त्या कमतरतांची पूर्ती करण्यासाठी जर सूचना आल्या, तर पुढील आवृत्तीत त्यांचा आम्ही अवश्य विचार करू.

या प्रकल्पाच्या रूपाने महाराष्ट्राच्या शौर्याचा इतिहास आम्ही आताच्या पिढीपुढे ठेवत आहोत. महाराष्ट्र राज्याची तरुण पिढी आपल्या कर्तृत्वाने त्यात आणखी भर घालेलच, असा आम्हांला विश्वास वाटतो.

**भूसेना लेखक :**
लेफ्ट. जन. दत्तात्रेय ब. शेकटकर (निवृत्त)

**नौसेना लेखक :**
ले.क. विनायक श्रीधर अभ्यंकर (निवृत्त)


**वायुसेना लेखक :**
एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त)

* * *

# आ ते इ

## आवटी, मनोहर प्रल्हाद

**नौसेना - ॲडमिरल**
**परमविशिष्ट सेवा पदक, वीरचक्र**
**७ सप्टेंबर १९२७**



मनोहर प्रल्हाद आवटी यांचा जन्म गुजरात राज्यातील सुरत येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शांताबाई होते. नगर जिल्ह्यातील त्या वेळच्या राहुरी तालुक्यातील मळुंजे बुद्रुक हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे पूर्वज नारोपंत रत्नपारखी ह्यांनी राघोबादादांची नदीत हरवलेली वस्तू शोधून परत आणून दिली. त्यांच्या ह्या कामगिरीवर खूष होऊन पेशव्यांनी त्यांना 'आवटकी' (शासकीय महसुलाचा अंदाजे एक दशांश भाग) बहाल केली. त्याच आवटकीचे पुढे आवटी ह्या आडनावात रूपांतर झाले.

आवटी ह्यांचे पूर्वज उच्चशिक्षित, वैभवसंपन्न असून समाजसुधारणेसाठी, विशेषत: स्त्रियांच्या प्रश्नांबाबतीत कार्यरत होते. एफ.आर.सी.एस., एम.आर.सी.पी. पर्यंत शिक्षण घेतलेल्या त्यांच्या आजी श्रीमती द्वारकाबाई केळवकर ह्या सुरतच्या महिलांसाठी असलेल्या तत्कालीन गोषा रुग्णालयाच्या पर्यवेक्षिका होत्या.

आवटी यांचे शालेय शिक्षण हे १९३५ ते १९४२ ह्या कालावधीत मुंबईतील दादरमधील राजा शिवाजी विद्यालय (तत्कालीन किंग जॉर्ज शाळा) येथे झाले. १९४२ मध्ये महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आवटी भावंडांची रवानगी कोल्हापूर येथे झाली. जून १९४२ मध्ये त्यांनी कोल्हापूरहून थेट पुण्यातील डेक्कन जिमखाना येथील शाळेत (सध्याची विमलाबाई गरवारे प्रशाला) सातवीत प्रवेश घेतला.

'डफरीन' या प्रशिक्षण जहाजावर शिकणाऱ्या मोठ्या भावाच्या रुबाबाकडे आकर्षित होऊन ऑक्टोबर १९४२ मध्ये त्यांनीही डफरीनची प्रवेश परीक्षा दिली. शिष्यवृत्तीसह उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे पुढील शिक्षण डफरीनमध्ये पार पडले. सप्टेंबर १९४५ मध्ये रॉयल इंडियन नेव्हीच्या परीक्षेत त्यांची सरकारतर्फे पुढील शिक्षणासाठी ब्रिटन येथे रवानगी झाली व मार्च १९५० मध्ये शिक्षण पूर्ण करून ते भारतात परतले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रॉयल इंडियन नेव्हीचे 'भारतीय नौसेने'त रूपांतर झाले. त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी २७ मे १९५१ रोजी आपला पहिला ध्वज नौसेनेला मुंबईत बहाल केला.

आवटी यांनी १९६१ ते १९६४ ह्या कालावधीमध्ये लंडन येथे तत्कालीन उपायुक्त विजयालक्ष्मी पंडित यांचे सल्लागार म्हणून काम पाहिले. त्यांनी १९६० मध्ये 'आय.एन.एस. बेटवा'चे कमांडिंग ऑफिसर म्हणून काम पाहिले. पुढे १९६५-१९६६ मध्ये 'आय.एन.डी.एस. तीर' या प्रशिक्षण नौकेचे व १९६६-१९६७ मध्ये सिग्नल स्कूलचे काम त्यांनी पाहिले. वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजचे मुख्य प्रशिक्षक म्हणून १९६७ ते १९७० मध्ये त्यांनी कार्यभार सांभाळला.

१९७१ मध्ये पाकबरोबरील युद्धात त्यांच्या नेतृत्वाखालील भारतीय नौसेनेने अतुलनीय कामगिरी

बजावली. त्यांनी शत्रुपक्षाची तीन जहाजे ताब्यात घेतली, तसेच एक पाणबुडी उद्ध्वस्त केली. १९७१ च्या युद्धामधील युद्धकैद्यांना घेऊन त्यांनी चितगाव ते कलकत्ता असा प्रवास केला. त्यांच्या ह्या कामगिरीबद्दल त्यांना जानेवारी १९७२ मध्ये 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले तसेच फलटणजवळ जमीनही देण्यात आली.

'आय.एन.एस. म्हैसूर'चे १९७३-१९७४ मध्ये ते कमांडिंग ऑफिसर होते. १९७५ मध्ये रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीजचे, तर १९७६-१९७७ मध्ये राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनी (एन.डी.ए) चे कमांडर म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर १९७९-१९८० दरम्यान नौसेना मुख्यालयात उपप्रमुख, तर १९८० ते १९८३ या काळात ते नौसेनेच्या पश्चिम विभागाचे प्रमुख होते.

३१ मार्च १९८३ रोजी ते सेवानिवृत्त झाले. नौदलातील त्यांच्या सेवेबद्दल २६ जानेवारी १९८२ रोजी त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' बहाल करण्यात आले.

निवृत्तीनंतर त्यांनी तोलानी शिपिंग कॉर्पोरेशनमध्ये अध्यक्ष म्हणून नोकरी पत्करली, तसेच ब्लिट्झ प्रकाशनाचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम बघितले. भारताच्या सागरी इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन आणि त्याबद्दलची एकंदर अनास्था पाहून त्यांनी १९७८ मध्ये 'मेरिटाइम हिस्टरी सोसायटी ऑफ इंडिया'ची स्थापना केली. यान्द्वारे सागरी सामरिक इतिहास लोकांपर्यंत पोहोचवणे, त्याच्या अभ्यासाकरिता शिष्यवृत्ती देणे व विद्यापीठांमध्ये या विषयाचा समावेश करण्याचा आग्रह धरणे इत्यादी उपक्रम या संस्थेतर्फे केले जातात.

मराठा आरमाराचे प्रमुख सरदार कान्होजी आंग्रेंच्या अलिबाग येथील स्मारकाच्या कामात त्यांनी या संस्थेचे प्रमुख म्हणून विशेष लक्ष घातले. त्यांच्या विशेष प्रयत्नांतून भारतीय नौसेनेचा इतिहास सांगणारे संग्रहालय त्याच परिसरात उभे राहिले आहे. सध्या त्याची देखभाल भारतीय नौसेना करीत आहे. 'वर्ल्डवाइड फंड फॉर नेचर' या संस्थेच्या महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

मेरिटाइम हिस्टरी सोसायटी ऑफ इंडियातर्फे आत्तापर्यंत सागरी इतिहासाशी संबंधित बारा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांमध्ये आवटी यांचा पूर्ण सहभाग होता. भारतीय वनसेवेतील आय.एफ.एस अधिकारी एम.एम. जामखंडीकर यांच्या डायरीवर आधारित 'रिलेशन ऑफ होमोसॅपिअन अ‍ॅण्ड पॅन्थेरा लिओ', तसेच 'द व्हॅनिशिंग इंडियन टारगर' या दोन पुस्तकांचे त्यांनी संपादन केले आहे.

संपूर्ण भारतीय बनावटीच्या जहाजामधून जगप्रवास करण्याच्या मोहिमेचे ते मार्गदर्शक आहेत. इकॉलॉजिकल सोसायटीच्या माध्यमातून ते 'पर्यावरण' हा विषय हाताळतात. निवृत्तीनंतर त्यांचा मुक्काम फलटणजवळील विंचुर्णी या गावात आहे.

– प्रणव पवार

## इंजिनिअर, मीनू मेरवान

**वायुसेना – एअर मार्शल**

**पद्मभूषण, महावीरचक्र, परमविशिष्ट सेवा पदक**

**१ डिसेंबर १९२१**



मीनू मेरवान इंजिनिअर यांचा जन्म मुंबईत झाला. ते त्यांच्या भावंडांमध्ये सहावे होते आणि त्यांचे दोन मोठे भाऊ सेनादलात अधिकारी होते. मीनू यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात झाले. १ ऑगस्ट १९४० रोजी ते भारतीय वायुसेनेत वैमानिक म्हणून दाखल झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रह्मदेशातील युद्धात

त्यांनी पहिल्या स्पिटफायर स्क्वॉड्रनचे नेतृत्व केले. या युद्धातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना ब्रिटिश सरकारने 'डिस्टिंग्विश्ड फ्लाइंग क्रॉस' देऊन सन्मानित केले. हीच स्कॉड्रन १९४६ मध्ये जपानमध्ये कार्यरत असलेली एकमेव भारतीय स्क्वॉड्रन होती.

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये त्यांनी वायुसेनेचा पहिला तळ उभारला. याच काळात पाकिस्तानने भारतावर काश्मीरमध्ये हल्ला केला. तेव्हा विंग कमांडर असलेल्या मीनू इंजिनिअर यांच्या नेतृत्वाखाली वायुसेनेने केलेल्या कामगिरीने किशनगंगा पूल, स्कारडू, गिलगित या भागात शत्रूला रोखण्यात भारताला यश आले. गुराईसचा प्रदेश पुन्हा जिंकून घेतानाही भूसेनेला वायुसेनेची खूप महत्त्वाची मदत झाली. या काळात दाखविलेल्या असामान्य धैर्य व गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यांना 'महावीरचक्र' देण्यात आले.

१९६२ मध्ये त्यांची पूर्व विभागाचे 'सीनियर एअर स्टाफ ऑफिसर' म्हणून विशेष नियुक्ती झाली. याच काळात चीनने भारतावर हल्ला केला. उपलब्ध असलेल्या अत्यंत कमी साधनसामग्रीच्या बळावर त्यांनी भारतीय भूसेनेला वायुसेनेचे उत्तम पाठबळ उपलब्ध करून दिले. या काळातील त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' देऊन गौरविण्यात आले.

१९६५ मध्ये त्यांची नियुक्ती वायुसेना मुख्यालयात वायुसेनेचे उपप्रमुख म्हणून केली गेली. १९६९ मध्ये वायुसेनेच्या पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानी इलाख्यात खोलवर मुसंडी मारून हवाई हल्ले करण्याच्या त्यांच्या रणनीतीचा भारताला खूप फायदा झाला. ३ व ४ डिसेंबर रोजी त्यांनी केलेल्या हल्ल्यांमुळे युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने निर्णायकरीत्या झुकले. त्यांच्या या उत्कृष्ट युद्धनेतृत्वाबद्दल १९७२ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' देऊन सन्मानित करण्यात आले. वायुसेनेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी एका जाहिरात संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम सुरू केले. तेथेही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. १९९० मध्ये 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' देऊन महाराष्ट्र सरकारने त्यांचा सन्मान केला.

– राजेश प्रभु साळगांवकर

## इनामदार, सतीश गोविंद

**वायुसेना – एअर मार्शल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**१० जानेवारी १९४३**



सतीश गोविंद इनामदार यांचा जन्म ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचे कुटुंब मूळचे कोल्हापूरचे. गणितज्ञ असलेले त्यांचे वडील पुण्याचे फर्गसन महाविद्यालय, ग्वाल्हेरचे व्हिक्टोरिया महाविद्यालय, इंदूरचे होळकर महाविद्यालय आदी ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम करून जबलपूरच्या रॉबर्टसन महाविद्यालयातून प्राचार्यपदावरून निवृत्त झाले. त्यामुळे सतीश इनामदारांचे शिक्षण या सर्व ठिकाणी झाले. त्यांनी मद्रास विद्यापीठातून 'संरक्षण व युद्धशास्त्र'या विषयात एम. एस्सी. पदवी प्राप्त केली.

त्यांनी वायुसेनेच्या उड्डाण प्रशिक्षण महाविद्यालयात १९६१ साली प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेतले. ते मार्च १९६३ मध्ये भारतीय वायुसेनेत लढाऊ जेट वैमानिक म्हणून दाखल झाले. त्यानंतर बंगळूरच्या 'ए.एस.टी.ई.'च्या विमानचाचणी वैमानिक प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी प्रशिक्षण प्राप्त केले. ते उत्तम विमानचाचणी वैमानिक आहेत. तामीळनाडूतील वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज, सिकंदराबादच्या कॉलेज ऑफ डिफेन्स मॅनेजमेंट,

हैदराबादच्या कॉलेज ऑफ एअर वॉरफेअर आणि नवी दिल्लीच्या नॅशनल डिफेन्स कॉलेज या संस्थांमधून त्यांचे विविधांगी प्रशिक्षण झाले.




भारतातील सर्व प्रमुख व्यावसायिक लष्करी प्रशिक्षणाच्या अर्हता त्यांच्या नावावर जमा आहेत. वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजचे ते मुख्य प्रशिक्षक (चीफ इन्स्ट्रक्टर) म्हणून काही काळ कार्यरत होते. १९७४ ते १९७७ या काळात त्यांची नियुक्ती बंगळूरच्या हिंदुस्थान अरोनॉटिक्स लि.मध्ये विमान चाचणी वैमानिक म्हणून झाली होती. १९८३ ते १९८५ अशी दोन वर्षे इराकी वायुदलाच्या बगदाद रेथील 'फायटर लीडर स्कूल'मध्ये उड्डाण प्रशिक्षक म्हणून ते प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. भारतीय लढाऊ विमानांच्या 'बॅटलअॅक्स' या नावाने प्रसिद्ध असलेल्या सातव्या स्क्वॉड्रनचे ते प्रमुख होते. वायुसेनेच्या सैनिक परीक्षा मंडळा (ए.ई.बी.)चेही ते काही काळ प्रमुख होते. कलाईकुंडा येथील वायुसेनेच्या तळाचे प्रमुख म्हणूनदेखील त्यांनी काम केले. पुढे ते काही काळ हिंदुस्थान अरोनाटिक्सच्या संचालक मंडळाचे सदस्य होते.

वायुसेनेतील सर्व महत्त्वाच्या चार उच्च पदांवर काम केलेल्या मोजक्या अधिकाऱ्यांत सतीश इनामदार यांचा क्रमांक वरचा आहे. वायुसेनेच्या मध्य विभागाचे सीनिअर एअर स्टाफ ऑफिसर, वायुसेनेच्या मुख्यालयाचे उपप्रमुख, वायुसेनेच्या पूर्वविभागाचे प्रमुख आणि वायुसेनेचे उपाध्यक्ष (व्हाइस चीफ ऑफ एअर स्टाफ) या चार सर्वांत महत्त्वाच्या पदांवर त्यांनी निर्धारित कालावधी पूर्ण केला आहे. या सर्व ठिकाणी त्यांनी स्वत:चा वेगळा ठसा उमटवला आहे. वायुसेनेच्या नियोजन व संपादन विभागाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. लढाऊ विमाने, हवाई युद्धातील शस्त्रास्त्रे, रडार व रडारचे विविध प्रकार यांची खरेदी त्यांच्या अखत्यारीत झाली.

ब्रिटनकडून खरेदी करण्यात येणाऱ्या 'हॉक' या अत्याधुनिक जेट प्रशिक्षण विमानांच्या किंमत निर्धारण समितीवर सेनादलांतर्फे ते एकमेव प्रतिनिधी होते. दोन दशकांपूर्वी सुरू झालेली ही 'हॉक' विमानांची संपादन प्रक्रिया सतीश इनामदारांनी पाठपुरावा करून पूर्णत्वास नेली. भारतीय संसदेवर पाकिस्तानने दहशतवादी हल्ला घडवून आणला होता, तेव्हा ते वायुसेनेचे उपाध्यक्ष होते. तेव्हा त्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सेनादलांनी आखलेल्या 'ऑपरेशन पराक्रम' या मोहिमेतील वायुसेनेच्या सहभागाची व वायुसेनेच्या संपूर्ण हालचालींची जबाबदारी एअर मार्शल सतीश इनामदारांनी समर्थपणे पार पाडली. त्यांना 'विशिष्ट सेवा पदक' आणि 'परमविशिष्ट सेवा पदक' यांनी सन्मानित करण्यात आले आहे. वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी तेरा हजार फूट उंचीवरून पॅराशूटच्या साहाय्याने उडी घेणारे ते जगातील एकमेव वायुसेना अधिकारी आहेत.

एअर मार्शल इनामदारांच्या निवृत्तीनंतर २००३ मध्ये त्यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली. इन्स्टिट्यूट ऑफ डिफेन्स स्टडीज अँड अॅनलिसिस या संस्थेचे ते कार्यकारिणी सदस्य आहेत. राष्ट्रीय अपंग ऑलिम्पिक समितीचे ते अध्यक्ष आहेत.

विविध खेळांच्या क्रीडा नियमन समित्यांचे ते सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय घडामोडी, राष्ट्रीय सुरक्षाविषयक घटना, संरक्षण व लष्करी धोरणे, आण्विक युद्धशास्त्रातील घडामोडी अशा संरक्षण क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर त्यांचा अभ्यास आहे. भारतीय शास्त्रीय संगीत आणि मराठी नाटकांची आवड असलेले सतीश इनामदार निवृत्तीनंतरही विविध क्षेत्रांत देशसेवेत कार्यरत आहेत.

– राजेश प्रभु साळगांवकर

* * *

# क



## कात्रे, लक्ष्मण माधव

**वायुसेना - एअर चीफ मार्शल**

**अतिविशिष्ट सेवा पदक, परमविशिष्ट सेवा पदक**

**२६ जानेवारी १९२७ - १ जुलै १९८५**



लक्ष्मण माधव कात्रे यांचा जन्म चेन्नई (तत्कालीन मद्रास) येथे झाला. त्यांचे वडिल माधव कात्रे हे तुरुंग खात्याचे महानिरीक्षक होते.

लक्ष्मण कात्रे यांचे शिक्षण डेहराडून येथील डून विद्यालयात झाले. तेथील शिक्षणानंतर थेट प्रवेशप्रक्रियेतून ते ३ ऑगस्ट १९४४ रोजी वायुसेनेत दाखल झाले.

९ एप्रिल १९४५ रोजी त्यांना तेव्हाच्या 'रॉयल इंडियन एअरफोर्स'मध्ये वैमानिक म्हणून नियुक्ती (कमिशन) मिळून ते वैमानिक अधिकारी झाले. २६ एप्रिल १९४७ रोजी त्यांना कायमस्वरूपी नियुक्ती मिळाली. एप्रिल १९४८ ते ऑक्टोबर १९४८ या दरम्यान इंग्लंडला जाऊन त्यांनी 'ऑल पर्पझ फ्लाइंग इन्स्ट्रक्टर्स कोर्स' यशस्विरीत्या पूर्ण केला. ते एक अत्यंत निष्णात व सफल उड्डाण प्रशिक्षक होते.

करारी व्यक्तिमत्त्वाचे, प्रेमळ स्वभावाचे, खिलाडू वृत्तीचे, प्रसन्न चेहऱ्याचे लक्ष्मण कात्रे एक उत्तम फ्लाइट कमांडर, उत्कृष्ट कमांडिंग ऑफिसर व सक्षम स्टेशन कमांडर होते. ते शिस्तप्रिय व लोकप्रिय होते. कात्रे यांनी वायुसेनेच्या अनेक स्कॉड्रन्सचे कुशल व सफल नेतृत्व केले. १९७१ मध्ये बांगलादेश युद्धात लढाऊ वैमानिक म्हणून ते दिवसरात्र सक्रिय होते. अग्रिम मोर्च्यांवरील विमानतळांवरून उड्डाण करून, ते आपल्या वैमानिकांचे सक्षम नेतृत्व करत होते. त्यांचे धाडसी नेतृत्व व वैमानिकी कर्तृत्व वादातीत होते. हवाईयुद्ध योजना व उड्डाण रणनीती या बाबतींतील त्यांची कार्यक्षमता व दक्षता अद्वितीय होती.

हैदराबादजवळील दिंडिगल येथील 'एअरफोर्स अकॅडमी'चे कमांडंट म्हणून त्यांनी अद्वितीय योगदान दिले. उड्डाणासकट वायुसेनेच्या इतर शाखांच्या प्रशिक्षणार्थ सर्व आवश्यक सोयीसुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. जेट विमानांवर उच्च दर्जाचे प्रशिक्षण सुरू केले. उड्डाण सुरक्षेचे उच्चांक प्रस्थापित केले. त्यांनी १९७६ मध्ये इंग्लंडला जाऊन 'रॉरल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीज'चा अभ्यासक्रम पूर्ण केला. तेथून परतल्यावर ते एका महत्त्वपूर्ण कमांडचे 'सीनियर एअर स्टाफ ऑफिसर' व नंतर लगेच वेस्टर्न एअर कमांडचे 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली वैमानिकांनी आकाशयुद्धाचे नवनवीन आयाम पडताळून पाहणारी प्रात्यक्षिके केली.

अत्युच्च कोटीच्या अत्युत्तम वैमानिकी, वायुसैनिकी सेवेबद्दल कात्रे यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' व 'परमविशिष्ट सेवा पदक' प्राप्त झाले.

बंगळरू येथील हिंदुस्थान एअरोनाटिक्स लिमिटेडचे ते अध्यक्षही होते. त्यानंतर ४ सप्टेंबर १९८४ रोजी वायुसेनाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या पदावर कार्यरत असतानाच पेरिकार्डियाटिस या हृदयरोगामुळे त्यांचे निधन झाले.

- विंग कमांडर (निवृत्त) अशोक मोटे


क

## कुलकर्णी, रमेश विष्णू

**भूसेना - लेफ्टनंट जनरल**

**परम विशिष्ट सेवा पदक**

**१४ एप्रिल १९३५**



रमेश विष्णू कुलकर्णी यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातल्या निपाणीजवळच्या शिरगुप्पी या खेडेगावात झाला. त्यांचे शालेय शिक्षण बेळगावातील बेनन्स स्मिथ विद्यालयात, तर उच्चशिक्षण मुंबईमधील सेंट झेवियर्स महाविद्यालयात झाले. नेहमीच्या सरधोपट मार्गावरून न जाता काहीतरी वेगळे करायचे या अंत:प्रेरणेतून त्यांनी संरक्षण दलाचे कार्यक्षेत्र निवडले.

१९५६ च्या जून महिन्यात पायदळ भूसेनेत प्रथम गढवाल रायफल्समध्ये त्यांची नियुक्ती झाली. १९७१ ते १९७३ या काळात अरुणाचल प्रदेशातील (पूर्वीचे नेफा) उंच डोंगराळ भागात एका तुकडीचे त्यांनी नेतृत्व केले. त्यानंतर १९८१ ते १९८३ या काळात नागालँडमध्ये बंडखोर आणि प्रतिकूल वातावरणात त्यांनी अतिशय जबाबदारीचे काम पार पाडले.

एप्रिल १९८७ ते फेब्रुवारी १९८९ या काळात उत्तरेकडील सीमारेषेवर म्हणजे कारगिलपासून काडगोदम भागात मुख्यत्वे सियाचीनच्या सीमासंरक्षणाची जबाबदारी असलेल्या एका तुकडीचे त्यांनी नेतृत्व केले. याच कालावधीत दोन महत्त्वाच्या लढायांचे त्यांनी यशस्वीरीत्या नियोजन केले. वीस हजार फूट उंचीवर शून्याखालील तापमानात हे युद्ध लढले गेले. या युद्धात शौर्य गाजवलेल्या जवानांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना सन्मान पदके देऊन गौरवण्यात आले. १९८७ मध्ये पाकिस्तानकडून आपल्यावर जो हल्ला झाला, त्या हल्ल्याची सर्व आखणी परवेझ मुशर्रफ यांची होती. त्यावेळी मुशर्रफ पाकिस्तानचे ब्रिगेड कमांडर होते.

१९९० ते १९९१ या काळात ते आसाम रायफल्सचे महासंचालक होते. त्या वेळी संपूर्ण पूर्वांचलातल्या आठ राज्यांची त्यांच्यावर जबाबदारी होती. आठही राज्यांच्या राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांचे ते सुरक्षा सल्लागार होते. उंच पर्वतशिखरांवरील, तसेच भूप्रदेशावरील अनेक सैनिकी कारवायांचे नियोजन आणि प्रत्यक्ष कारवाईत त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. १९८८ ते १९९३ या काळात त्यांनी आसाम रायफल्समध्ये कर्नलपदी काम केले. १९९३ सालच्या एप्रिल महिन्यात ते ‘अॅडज्युटंट जनरल’ म्हणून भूसेनेतून निवृत्त झाले.

त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या गव्हर्निंग बॉडी ऑफ सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूटचे (औरंगाबाद) ते अध्यक्ष होते. ज्या तरुण मुलांना एन.डी.ए., आय.एम.ए. इत्यादी ठिकाणी प्रवेश घ्यायचा आहे, अशा विद्यार्थ्यांची या संस्थेत सर्व प्रकारची तयारी करून घेतली जाते. १९९४ ते २००५ या काळात त्यांनी या विद्यार्थ्यांच्या निवडप्रक्रियेचे काम केले.

निवृत्तीनंतर भारत सरकारच्या गृहमंत्रालयाकडून एक महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांना भारत सरकार आणि नागा फुटीरतावादी यांच्यातील ‘युद्धबंदी करारा’च्या अंमलबजावणीची देखरेख करणाऱ्या समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. दोन्ही बाजूंकडून कराराचे पालन योग्य रीतीने होते आहे का नाही ते पाहणे आणि नियंत्रण ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. ते एकमेव असे सेनाधिकारी होते, की जे युद्धबंदी करारावर सह्या करणाऱ्या दोन्ही गटांना मान्य होते.

यापूर्वी नागालँडमध्ये ब्रिगेड कमांडर म्हणून आणि आसाम रायफल्समध्ये महासंचालक म्हणून काम करताना नागा फुटीरतावाद्यांकडे बघण्याच्या त्यांच्या मानवी दृष्टिकोनाचा सर्वांना चांगलाच अनुभव होता; त्यामुळे त्यांनी कुलकर्णी यांच्यावर विश्वास दाखवला. या कामाची धुरा सांभाळत असताना भारत सरकारची संरक्षण दले म्हणजे भूसेना, आसाम रायफल्स, केंद्रिय

राखीव पोलीस दल, सीमासुरक्षा दल आणि राज्य पोलीस अशा ईशान्य प्रदेशातील सर्व शासकीय संरक्षण संस्था आणि नागा फुटीरतावादी यांच्यामधील दूत म्हणून त्यांनी काम केले. या दोन्ही गटांतील एकमेकांच्या तक्रारी तटस्थपणे कोणालाही झुकते माप न देता सोडवणे, घेतलेल्या निर्णयांवर ठाम राहणे आणि ठरलेले नियम दोघांनाही पाळायला लावणे ह्या सर्व गोष्टी तोलामोलाने सांभाळणे ही तारेवरची कसरत त्यांनी लीलया पार पडली. अर्थात हे त्यांच्यासाठी फार मोठे आव्हान होते.

त्यांनी आपल्या पदाची बांधीलकी कायमच अधिक महत्त्वाची मानली. दोन्ही गटांच्या प्रतिनिधींची वेळोवेळी बैठक घेणे, नागा फुटीरतावाद्यांशी अनौपचारिक संवाद साधणे, एखाद्या ठिकाणी त्यांची उपस्थिती आवश्यक आहे अशा ठिकाणी जातीने भेट देणे आणि समस्येवर तोडगा काढणे ही कामे त्यांना करावी लागत. अनेकदा त्यांना नागा फुटीरतावाद्यांच्या छावण्यांनाही भेट द्यावी लागत असे. अशा वेळी कधी त्यांच्याबरोबर पोलीस संरक्षण असे, तर कधी ते संरक्षणाशिवाय भेटी देत.

नागालँडमधल्या सर्व स्तरांतल्या लोकांना त्यांच्याविषयी विश्वास वाटावा म्हणून त्यांच्यावर जबाबदारी असलेल्या सर्व भागांतून त्यांनी प्रत्यक्ष प्रवास केला. अध्यक्षपदी जबाबदारी सुरुवातीला एक वर्षासाठी ठरलेली होती, पण प्रत्येक वर्षी ती वाढत जाऊन साडेसात वर्षे म्हणजे २००८ पर्यंत त्यांनी या पदावर काम केले. ते वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षापर्यंत हे काम करत होते.

त्यांनी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे आणि प्रभावीपणे सांभाळल्या. त्यासाठी त्यांना प्रतिष्ठेची ‘आर्मी कमांडर’ ही पदवी मिळाली. संरक्षण दलातील त्यांच्या कारकिर्दीत त्यांना अनेक सन्मान देऊन गौरवण्यात आले.

१९८१ ते १९८३ या काळात नागालँडमधल्या फुटीरतावाद्यांना नियंत्रणात ठेवल्याबद्दल १९८४ मध्ये त्यांना ‘अतिविशिष्ट सेवा पदक’ मिळाले. १९८७ च्या सियाचीन युद्धाच्या उत्तम नियोजन आणि कामगिरीबद्दल १९८८ मध्ये त्यांना ‘उत्तम युद्ध सेवा पदक’ मिळाले आहे. सैन्यदलातल्या ३७ वर्षांच्या संपूर्ण कामगिरीबद्दल १९९३ मध्ये ‘परमविशिष्ट सेवा पदक’ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

– मानसी आपटे

## कुलकर्णी, सदानंद कृष्णराव

**वायुसेना – एअर मार्शल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**२ जानेवारी १९३७**



सदानंद कृष्णराव कुलकर्णी यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सरला होते. त्यांचे शिक्षण पुण्यातील भावे शाळेत झाले. १९५२ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. मॅट्रिकनंतर त्यांनी बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घेतला. शाळेपासूनच ते राष्ट्रीय छात्रसेनेत (एन.सी.सी.) होते. त्यांना लहानपणापासूनच सैन्यात जाण्याची आवड होती व त्याला घरच्यांचाही पाठिंबा होता. १९५३ मध्ये त्यांनी डेहराडून येथील ‘राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालया’त प्रवेश घेतला. ती त्यांची पहिली तुकडी होती.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मार्च १९५७ मध्ये त्यांनी वायुसेनेत प्रवेश केला. १९५७ ते १९९५ या कालावधीत ते वायुसेनेत कार्यरत होते. भारतीय वायुसेनेच्या सेवेत असताना त्यांनी ४२०० तास उड्डाण केले आहे. त्यांनी १९६५ व १९७१ च्या युद्धात भाग घेतला होता.

१९६७ ते १९७१ या कालावधीत त्यांना भारतातर्फे इजिप्तमधील अधिकाऱ्यांना व विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पाठविण्यात आले. याच काळात

१९६९ मध्ये त्यांना 'वायुसेना पदक' देण्यात आले. १९७९ मध्ये त्यांना भारतातर्फे संरक्षण व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी अमेरिकेत पाठविण्यात आले. त्यांना १९९५ साली राष्ट्रपतींच्या हस्ते 'परमविशिष्ट सेवा पदक' देण्यात आले. कुलकर्णी यांनी १९८१ मध्ये चेन्नई (तत्कालीन मद्रास) विद्यापीठातून संरक्षण शास्त्रातील एम.एस्सी. अभ्यासक्रम पूर्ण केला. १९८९ मध्ये उस्मानिया विद्यापीठातून त्यांनी 'राज्यशास्त्र' या विषयात पीएच.डी पदवी घेतली. त्यांनी मेथड ऑफ इन्स्ट्रक्शन (१९६२), नेव्हिगेशन इन्स्ट्रक्टर कोर्स (१९६२), ज्यूनियर कमांडर कोर्स (१९७१), डिफेन्स सर्व्हिस स्टाफ कोर्स (१९७२), ॲडव्हान्स वर्क स्टडी कोर्स (१९७४), सीनियर डिफेन्स मॅनेजमेंट कोर्स (१९७९), इंटरनॅशनल डिफेन्स मॅनेजमेंट कोर्स (१९७९) असेही अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत.

१९८३ ते १९८४ या काळात ते वायुदलाच्या बेगमपेट तळावर स्टेशन कमांडर म्हणून कार्यरत होते. सप्टेंबर १९८८ ते १९८९ या काळात चेन्नई (तत्कालीन मद्रास) येथे ते कमांडर म्हणून कार्यरत होते. तसेच नॅशनल डिफेन्स कॉलेजमध्येही ते काही काळ कार्यरत होते. १९९५ मध्ये त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले.

वायुसेनेत असताना त्यांनी इजिप्त, अमेरिका, इंडोनेशिया, केनिया, टांझानिया, जपान, हाँगकाँग, सिंगापूर, थायलंड, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, चीन या देशांना भेटी दिल्या आहेत.

वायुसेनेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी सेंटर फॉर ॲडव्हान्स स्ट्रॅटेजिक स्टडीज येथे संचालक म्हणून दि. १ फेब्रुवारी १९९५ पासून काम केले. 'काउन्सिल फॉर सिक्युरिटी को-ऑपरेटिव्ह इन आशिया-पॅसिफिक इंडिया कमिटी' (१९९९-२००४), 'यशदा'च्या संचालक मंडळाचे सभासद (१९९८-२०००), आणि रक्षा प्रबंधन संस्थान व रक्षा महाविद्यालय या संस्थांचे ते महासंचालक होते.

त्यांनी संरक्षणशास्त्राचे व्यवस्थापन आणि अर्थसंकल्प यांवर लिखाण केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा हे त्यांच्या अभ्यासाचे विषय होत.

– सायली अग्निहोत्री

* * *

# ख



**खेत्रपाल, अरुण एम.**
**भूसेना – सेकंड लेफ्टनंट**
**परमवीरचक्र**
**१४ ऑक्टोबर १९५१ – १६ डिसेंबर १९७१**



अरुण एम. खेत्रपाल यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे वडील ब्रिगेडिअर एम.एल.खेत्रपाल कोअर ऑफ इंजिनिअरिंगमध्ये कार्यरत होते. त्यांची बदली होईल तिथे तिथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. आणि पाचवी ते दहावी ते सनवार मधल्या लॉरेन्स शाळेमध्ये होते.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एन.डी.ए.) ते स्कॉड्रन कॅडेट कॅप्टन होते आणि डेहराडूनच्या इंडियन मिलिटरी ॲकॅडमीत सिनिअर केडर ऑफिसर होते.

१३ जून १९७१ रोजी ते इंडियन मिलिटरी ॲकॅडमीमधून नियुक्त अधिकारी (कमिशन्ड ऑफिसर) झाले. ‘पूना हॉर्स’ मध्ये त्यांची भरती झाली. वाहनचालक, गनर, रेडिओ ऑपरेटर, कमांडर ते रेजिमेंटचा नेता ही सर्व पदे त्यांनी सांभाळली. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी त्यांना लढण्याची संधी मिळाली. भारत-पाक युद्धात बसंतारच्या लढाईत यांनी भरीव कामगिरी केली. १६ डिसेंबर १९७१ रोजी पूना हॉर्सच्या ‘बी’ स्कॉड्रनच्या स्कॉड्रन कमांडरने अधिक फौजेची मागणी केल्यावर ते आपले पथक घेऊन स्वत:हून गेले. बसंतार नदी पार करत असताना त्यांच्या सैनिकांवर पाकिस्तानी सैनिकांनी गोळीबार केला. तेव्हा ते शत्रूच्या मुख्य मोर्चांवर तुटून पडले. त्यांच्या रणगाड्यांनी शत्रूच्या बचाव फळीवर सरळ धडक दिली. शत्रूच्या सैनिकांना ताब्यात घेतले. शत्रुसैन्याच्या सर्व ठाण्यांचा प्रतिकार संपेपर्यंत ते सतत लढत होते. रणांगणातून माघारी परतणाऱ्या रणगाड्यांचाही त्यांनी पाठलाग केला. शत्रूचे एकूण १० रणगाडे त्यांनी स्वत: नष्ट केले. या लढाईतच ते जबर जखमी झाले. त्यांना रणगाडा सोडण्याचा आदेश मिळाला तरीही शत्रूला चारही मुंड्या चित करण्याच्या आंतरिक उर्मीमुळे त्यांनी रणगाडा सोडला नाही. त्यांनी शत्रुसैन्याची प्रचंड हानी केली. त्यांच्या रणगाड्यावर दुसऱ्यांदा हल्ला झाला. त्यातच या अधिकाऱ्याला वीरमरण आले.

‘‘नाही सर, मी माझ्या रणगाड्यावरून उतरणार नाही. माझी बंदूक अजून काम करते आहे. मी त्यांचा पाडाव करेन....’’ हा शेवटचा संदेश अरूण खेत्रपाल यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना पाठवला होता. त्याक्षणी त्यांच्या रणगाड्यावर हल्ला झाल्याने रणगाडा पेटला होता. पण तरीही त्या भागातून शत्रूला पुढे येऊ द्यायचे नाही. ह्याची जाणीव असल्यानेच अरूण खेत्रपाल यांनी रणगाड्यातून बाहेर पडण्यास नकार दिला. खेत्रपाल यांच्या धडाडीमुळे शत्रुसैन्याच्या एकाही रणगाड्याला प्रवेश करता आला नाही. १९७१ च्या भारत-पाक युद्धातली ही महत्त्वाची घटना ठरली. त्याबद्दल त्यांना मरणोत्तर ‘परमवीर चक्र’ प्रदान करण्यात आले. उत्तम नेतृत्वगुण, उद्दिष्टाला चिकटून राहण्याची उर्मी व शत्रूला थेट भिडण्याची मनीषा या गुणांचा प्रत्यय त्यांच्या लढ्यातून आला.

– पल्लवी गाडगीळ

* * *

# ग



## गांधी, अडी रुस्तुमजी

**वायुसेना - एअर मार्शल**
**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, वीरचक्र**
**१६ जून १९४४**



अडी रुस्तुमजी गांधी यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांच्या आईचे नाव डॉली होते. त्यांचे वडील रुस्तुमजी 'फ्रेण्डस कॅबिन' नावाच्या उपाहारगृहाचे मालक होते. ते मोठे साहसी होते. आपल्या दोन मित्रांसह सायकलीवरून पन्नास हजार मैलांचा प्रवास करून त्यांनी जग पाहिले होते. त्यांच्या प्रवासवर्णनांची दोन पुस्तकेही प्रसिद्ध झाली होती.

अडी गांधी सर्व खेळांत तरबेज होते व पोहण्यात त्यांचे विशेष प्रावीण्य होते. सैन्याबद्दलच्या आकर्षणापोटीच त्यांनी 'सी कॅडेट कॉर्पस्' या स्वयंसेवी संस्थेच्या कामात सहभाग घेतला. परंतु ते शाळेच्या शेवटच्या वर्षात असताना वायुसेनेने आपल्या सत्ताविसाव्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईच्या मरीन ड्राइव्हवरील आकाशात केलेले प्रात्यक्षिक त्यांनी पाहिले आणि त्यांनी वायुसेनेत जायचे ठरविले.

१९६० मध्ये ते सीनियर केंब्रिज ही परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९६१ मध्ये त्यांनी एस.एस.सी.ची परीक्षा झाल्यावर, सेंट झेवियर महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या प्रवेश परीक्षेत त्यांची निवड झाली. अडी हे एकुलते पुत्र असल्यामुळे आईने त्यांना सेनेत जाण्याची परवानगी दिली नाही. सैन्यात जायची एक संधी हुकली; पण मनातली इच्छा कायम होती. घरच्या विरोधाला न जुमानता थेट प्रवेश योजनेतून त्यांनी वायुसेनेत प्रवेश मिळवला.

अलाहाबादच्या वैमानिक प्रशिक्षण आस्थापनेमध्ये (पायलट ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट) नोव्हेंबर १९६२ मध्ये त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. एचटी २ व हावर्ड या विमानांवरचे प्रशिक्षण संपवून ते जोधपूरच्या वायुसेना महाविद्यालयात दाखल झाले. तेथे त्यांना टेक्सन विमानावर प्रशिक्षण मिळाले. त्यानंतर कर्नाटकातील बिदर येथे व्हॅम्पायर विमानांवर प्रशिक्षण मिळाले.

विविध विमानांवरील प्रशिक्षणांनंतर २८ ऑक्टोबर १९६३ रोजी त्यांना भारतीय वायुसेनेत लढाऊ वैमानिक म्हणून नियुक्ती मिळाली. त्यानंतर ४१ वर्षांच्या दीर्घ कालावधीत त्यांनी व्हॅम्पायर, हंटर, नॅट, मिग-२१, मिग-२९, मिराज-२००० आणि सुखोई-३० अशा २३ प्रकारच्या विमानांची ५,५००हून अधिक उड्डाणे केली. दहा विविध स्क्वॉड्रन्समध्ये त्यांनी काम केले.

हलवारा येथे १९६५ च्या लढाईत एका कामगिरीसाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत हंटर विमानातून उड्डाण केले. या दोन विमानांवर शत्रूच्या चार एफ-८६ सेबरजेट विमानांनी हल्ला केला. नेतृत्व करणाऱ्या वैमानिकाचे विमान शत्रूच्या हल्ल्यात नष्ट झाले. त्यांनी मनोधैर्य शाबूत ठेवून त्या हल्ल्याचे चोख उत्तर दिले व शत्रूचे एक एफ-८६ सेबर विमान खाली पाडले. या धाडसी कामगिरीबद्दल राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांच्याकडून त्यांना 'वीरचक्र'



१९६५ च्या युद्धातील 'नॅट' विमान

प्रदान करण्यात आले. हा सन्मान स्वीकारणारे ते सर्वांत कमी वयाचे अधिकारी होते.

त्यांनी अनेक शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले. फायटर कॉम्बॅट लीडर्स कोर्स, ज्युनिअर कमांड, हायर एअर कमांड, सीनियर डिफेन्स मॅनेजमेंट आणि नॅशनल डिफेन्स कॉलेज कोर्स अशा पाठ्यक्रमांत त्यांनी उत्तम यश मिळवले. नायजेरियन वायुसेनेत प्रशिक्षक म्हणून त्यांनी दोन वर्षे काम केले.

महू येथील आर्मी कॉलेज ऑफ कॉम्बॅट मध्ये त्यांनी निर्देशक प्रशिक्षकाचा (स्टाफ डायरेक्टिंग एअर) कार्यभार सांभाळला. त्यानंतर त्यांनी सिकंदराबादच्या कॉलेज ऑफ एअर वॉरफेअरचे कमांडंटचे पद भूषविले. पंधराव्या स्क्वॉड्रनचे व चाळीसाव्या विंगचे नेतृत्व केले.

.वायुसेनेच्या मुख्यालयात 'ॲडिशनल असिस्टंट चीफ ऑफ एअर स्टाफ-ऑपरेशन्स', 'असिस्टंट चीफ ऑफ एअर स्टाफ-पर्सोनेल' अशी महत्त्वाची पदे सुद्धा सांभाळली. वायुसेनेच्या नैऋत्य विभागामध्ये गांधीनगर येथे सीनियर एअर स्टाफ ऑफिसर म्हणून काम केले. मानाचा शिरपेच समजल्या जाणाऱ्या वायुसेनेच्या पश्चिम विभागात व नैऋत्य विभागाचे सर्वोच्च अधिकारी म्हणजेच 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' म्हणून त्यांनी मोठ्या कौशल्याने धुरा सांभाळली.

त्यांना वीरचक्र (१९६५), एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफचे प्रशस्तिपत्र (१९७५), चीफ ऑफ एअर स्टाफचे प्रशस्तिपत्र (१९७८), अतिविशिष्ट सेवा पदक (१९९४) व परमविशिष्ट सेवा पदक (२००३) असे सन्मान मिळाले. १९८७ मध्ये महाराष्ट्र शासनाचा गौरव पुरस्कार व १९९४ मध्ये फेडरेशन ऑफ पारशी अंजुमनने दिलेला 'कर्नल अडी तारापोर अचीव्हमेंट पुरस्कार'ही त्यांना मिळाले.

डॉ. राधाकृष्णन, शंकर दयाळ शर्मा व डॉ. अब्दुल कलाम ह्या तीन राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान स्वीकारण्याचे भाग्य त्यांना लाभले.

– गीतांजली जोशी

## गांधी, रुस्तुम खुशरो शापोरजी

**नौसेना – व्हाइस ॲडमिरल**
**परमविशिष्ट सेवा पदक, वीरचक्र**
**१ जुलै १९२४**



रुस्तुम खुशरो शापोरजी गांधी यांचा जन्म मध्यप्रदेशातील जबलपूर येथे झाला. १ मे १९४५ पासून त्यांनी भारतीय नौसेनेत सेवेस सुरुवात केली.

१९७१ च्या भारत-पाक युद्धात कॅप्टन रुस्तुम गांधी यांच्याकडे नौसेनेच्या पश्चिम विभागातील ताफ्याचे फ्लॅग कॅप्टन म्हणून जबाबदारी होती. शत्रूच्या पाणबुड्या आणि वायुसेनेकडून मोठा धोका होता. परंतु गांधी यांनी धोक्याची पर्वा न करता त्यांनी पश्चिम विभागातील तुकड्यांचे अत्यंत स्फूर्तीने नेतृत्व केले आणि कराची बंदराकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवरील दबाव कायम ठेवला.

कराची बंदराच्या परिसरात या तुकड्यांनी केलेल्या हल्ल्यांमुळे एकाही जहाजाला बंदरात प्रवेश करणे शक्य झाले नाही. अशा प्रकारे नौसेनेची कारवाई

यशस्वी करण्यात कॅप्टन रुस्तुम गांधी यांनी मोलाची कामगिरी बजावली.

आपल्या मोहिमांदरम्यान कॅप्टन रुस्तुम गांधी यांनी धाडस, निष्ठा आणि नेतृत्वगुणांचे सर्वोच्च प्रदर्शन घडविले. या कामगिरीबद्दल त्यांना डिसेंबर १९७१ मध्ये ‘वीरचक्र’पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नोकरीच्या उर्वरित काळात ‘परमविशिष्ट सेवा पदक’ देऊनही त्यांचा गौरव करण्यात आला.

– रूपाली गोवंडे

ग

## गाडगीळ मिलिंद

**युद्ध पत्रकार**

☞ **मुख्य नोंद – पत्रकारिता आणि ललितेतर साहित्य खंड**

## गुप्ते, राजेंद्र केशव

**भूसेना – मेजर जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक**

**५ डिसेंबर १९२७**



राजेंद्र केशव गुप्ते यांचा जन्म मध्यप्रदेशातील कटणी येथे झाला. पुण्यातील आंबेगाव हे त्यांचे मूळ गाव. आंबेगावकर गुप्ते म्हणूनच ते सर्वांना परिचित आहेत. सरदार गायकवाडांनी त्यांच्या पणजोबांना वडोदरा (बडोदा) येथे नेले व सुमारे ६० एकर जमीन बक्षीस दिली. तेथे ते वरिष्ठ नागरी अधिकारी म्हणून काम पाहात. तेव्हापासून आजतागायत त्यांच्या सहा पिढ्या वडोदऱ्यातच वाढल्या. त्यांचे वडील इंपीरियल बँक ऑफ इंडिया येथे व्यवस्थापक होते.

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धुळे, वडोदरा व अमरावती येथे झाले. त्यानंतर पुणे येथील वाडिया महाविद्यालयात त्यांनी दोन वर्षे शास्त्रशाखेचे शिक्षण घेतले. त्या काळी युनिव्हर्सिटी ऑफिसर्स ट्रेनिंग कोर्स नव्यानेच सुरू झाला होता. तेथे त्यांनी प्रवेश घेतला. वडिलांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे एप्रिल १९४६ मध्ये त्यांनी सैनिकी प्रवेश परीक्षा दिली व ते उत्तम प्रकारे उत्तीर्णही झाले.

डेहराडून येथे प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘रेडिओ अभियांत्रिकी’ या अडीच वर्षांच्या कोर्ससाठी त्यांची निवड झाली. या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने महू येथील सैनिकी महाविद्यालयात कनिष्ठ प्रशिक्षक म्हणून ते रुजू झाले. १९५० मध्ये कॅप्टन म्हणून त्यांना बढती मिळाली. अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी दिलेल्या स्पर्धापरीक्षेतही त्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतर अमेरिकेतील चेल्पार्क येथील मार्कोनी कॉलेज ऑफ रेडिओ इंजिनिअरिंग येथून त्यांनी मार्च १९५३ ते जुलै १९५६ या काळात पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केले. पुढे दिल्लीमध्ये मुख्यालयात ‘स्टाफ ऑफिसर इन चार्ज’ या पदावर त्यांना बढती मिळाली. सैन्यासाठी उपयोगात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा विकास साधण्याचे व त्यासाठीच्या दीर्घकालीन योजना आखण्याचे जबाबदारीचे काम त्यांनी या कालावधीत पार पाडले. त्यांनी आखलेला धोरणांचा हा आराखडा पुढे भारतीय प्रशासनाने जसाच्या तसा स्वीकारला. डॉ. होमी भाभा समितीनेही त्यांच्या या कार्याचे विशेष कौतुक केले.

१९६२ च्या भारत-चीन युद्धात पूर्वेकडील सीमेवर त्यांनी सेकंड-इन-कमांड म्हणून काम पाहिले. त्यानंतर पुन्हा एकदा दिल्लीतील मुख्यालयात त्यांना धोरण व सुसंवाद अधिकारी म्हणून बोलवण्यात आले. १९६५ मध्ये लेफ्टनंट कर्नल म्हणून, तर १९७४ मध्ये ब्रिगेडिअर म्हणून त्यांना बढती मिळाली. सैन्यात सिग्नल यंत्रणेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेषत: १९६५ व १९७१ च्या युद्धांमध्ये आजसारखी संपर्क साधने अस्तित्वात नसल्याने ही यंत्रणा म्हणजे संपूर्ण सैन्याचा कणा समजला जाई. याच काळात त्यांनी सिग्नल कोअरचे आधुनिकीकरण केले. पुढे १४,०००

फूट उंचीवर असलेल्या 'से ला' खिंडीच्या परिसरात माउंटन ब्रिगेडच्या सिग्नल विभागात त्यांनी कमांडिंग ऑफिसर म्हणून कार्य केले. 'बोमदि ला', 'से ला', तवांग, पेनकिन्सो अशा उंच शिखरांवरील संपर्कव्यवस्थेचा आराखडा ठरविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण वाटा उचलला. डिसेंबर १९७१ ते जानेवारी १९७२ या काळात त्यांची नेमणूक जम्मू-काश्मीर येथे रणभूमीवर होती. या वेळी शत्रूकडून सुमारे एक लाख चौरस फूटांएवढा भूप्रदेश जिंकून घेण्यासाठी त्यांनी मोठा पराक्रम गाजविला.

अशा प्रकारे युद्धकक्षातील अत्युच्च दर्जाची कामगिरी केल्याने पुणे येथील भूसेनेच्या दक्षिण विभागाच्या मुख्यालयात चीफ सिग्नल ऑफिसर म्हणून त्यांची नियुक्ती केली गेली. दळणवळण व्यवस्थेची धोरणे निश्चित करून त्यांची योग्य अंमलबजावणी करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी येथे पार पाडले. याच प्रकारचे कार्य त्यांनी लखनऊ येथील मध्य विभाग मुख्यालय आणि उधमपूर येथील उत्तर विभाग मुख्यालय येथेही मोठ्या जबाबदारीने पार पाडले. वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी सेवानिवृत्त होताना राष्ट्रपतींच्या हस्ते 'परम विशिष्ट सेवा पदक' (१९८४) देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. संपूर्ण सेवाकालात आपल्या प्रखर बुद्धिमत्तेचा व अचूक निर्णयक्षमतेचा प्रत्यय त्यांनी वारंवार दिला.

सेवानिवृत्तीनंतर लगेचच, म्हणजे फेब्रुवारी १९८४ मध्ये पुण्यातील फिनोलेक्स केबल्स लि. व फिनोलेक्स सॉफ्टवेअर सिस्टिम्सच्या संचालकपदावर त्यांची निवड झाली. त्यांनी या पदावर १९९८ पर्यंत कार्य केले. त्यानंतर अशोक ऑरगॅनिक इंडस्ट्रिज लिमिटेड या कंपनीत पूर्णकालीन संचालक म्हणून त्यांनी काम केले. मध्य गुजरातमधील वडोदरा, अंकलेश्वर व बोरीदरा येथे या संस्थेची मुख्यालये होती. इथाइल अल्कोहोल व संलग्न उत्पादने घेणाऱ्या या कंपनीला त्यांनी नाजूक स्थितीतून बाहेर काढले व भरघोस फायदा मिळविणारी कंपनी म्हणून नावारूपास आणले. अशोक अल्कोहोल्स लिमिटेड या कंपनीची वालचंदनगर व महाड येथे स्थापना करण्यातही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

त्यांच्या या सेवेची दखल घेऊन महाराष्ट्र शासनानेही उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना एक लाख रुपयांचा पुरस्कार दिला. सध्या त्यांचे पुणे येथे वास्तव्य आहे.

– ज्योती आफळे

ग

**गोखले, दिनकर विनायक**
**युद्ध पत्रकार**
**२५ मार्च १९२३ – २० ऑक्टोबर १९९६**

☞ **मुख्य नोंद – पत्रकारिता आणि ललितेतर साहित्य खंड**



मराठीत संरक्षण पत्रकारिता सुरू करणारे आद्य पत्रकार म्हणून दिनकर विनायक गोखले ओळखले जातात. आता भारतात युद्धपत्रकारितेने खूपच प्रगती केली आहे व वार्ताहर प्रत्यक्ष रणभूमीवरून युद्धाच्या बातम्या पाठवू शकतात. पण ज्या काळी हे शक्य नव्हते व एवढी साधने नव्हती, तेव्हा संरक्षण खात्याकडून आणि सैन्यातील माहीतगारांकडून माहिती मिळवून युद्धाचे वृत्त द्यावे लागे. गोखले अशा प्रकारे वृत्त देणारे व विश्लेषण करणारे पहिले मराठी पत्रकार होत.

दि. वि. गोखले यांनी मुंबईच्या 'नवशक्ती' या दैनिकात १९४५ मध्ये पत्रकारितेची कारकीर्द सुरू केली. नंतर १९६२ मध्ये ते 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये गेले व तेथे वृत्तसंपादक, सहसंपादक या पदांवर काम करून ते १९८५ मध्ये निवृत्त झाले.

१९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. त्या वेळी मराठी पत्रकारितेने पूर्ण व्यावसायिक रूप धारण केले होते. त्यामुळे त्या वेळी या युद्धाचे वृत्त कसे द्यावे आणि युद्ध डावपेचांचे विश्लेषण कसे करावे

असा पेच मराठी वृत्तपत्रांपुढे उभा राहिला. त्या वेळी 'महाराष्ट्र टाइम्स'चे वृत्तसंपादक असलेल्या गोखले यांनी हे आव्हान स्वीकारले आणि या युद्धाचे दररोज विश्लेषण करणारा स्तंभ लिहिण्यास सुरुवात केली. मराठी वर्तमानपत्रातला हा पहिलाच प्रयोग होता आणि तो कमालीचा गाजला. पुढे या स्तंभातील लेखांचे पुस्तक प्रसिद्ध झाले, तेव्हा त्याला पु.ल. देशपांडे यांनी प्रस्तावना लिहून गोखले यांच्या युद्धविषयक लिखाणाचा गौरव केला.



१९६२ च्या युद्धामुळे सैन्याला अनेक नव्या गोष्टी शिकाव्या लागल्या. त्यातली एक म्हणजे वृत्तपत्रांशी संपर्क ही एक गोष्ट होय. यानंतर सैन्याची कार्यालय पत्रकारांसाठी खुली झाली व त्यांना बोलावून आवश्यक ती माहिती देण्यात येऊ लागली. त्यांना सैन्याचे कार्य दाखविण्यात येऊ लागले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे केवळ इंग्रजी वृत्तपत्रांशी संबंध ठेवणाऱ्या सैन्याचा प्रादेशिक वृत्तपत्रांशी संबंध दिवसेंदिवस वाढू लागला. याचे श्रेय गोखले यांना द्यावे लागेल.

युद्धाचे विश्लेषण करण्यासाठी सैन्याच्या युद्धपद्धती व युद्धनीतीची माहिती असावी लागते. तसेच कोणती शस्त्रे व अस्त्रे केव्हा व कशी वापरली जातात, याचीही माहिती असावी लागते. गोखले यांच्या काळात ही माहिती देण्याएवढे भारतीय सैन्य पारदर्शक झाले नव्हते. त्यामुळे गोखले यांना पहिल्या व दुसऱ्या महायुद्धावर पाश्चात्त्य लेखकांनी लिहिलेली खूप पुस्तके वाचून अभ्यास करावा लागला. त्यातून त्यांनी जे निष्कर्ष व ठोकताळे काढले ते बरोबर आहेत की नाही, याचा सेनाधिकाऱ्यांशी चर्चा करून पडताळा घ्यावा लागला. त्यामुळे अनेक उच्चपदस्थ सेनाधिकाऱ्यांशी त्यांच्या ओळखी झाल्या. त्यामुळेच १९७१ चे बांगलादेश युद्ध, अरब-इस्त्रायल युद्ध, फॉकलंड युद्ध आणि पहिले इराक-अमेरिका युद्ध यांचे अचूक विश्लेषण करणारे स्तंभलेखन ते करू शकले.

या निमित्ताने त्यांना शेकडो युद्धविषयक ग्रंथ, युद्धनेत्यांची चरित्रे, आत्मचरित्रे, इतिहास या विषयांवरची पुस्तके वाचावी लागली. त्यातून त्यांनी स्वत: अनेक पुस्तके लिहिली. त्यांतील 'माओचे लष्करी आव्हान', 'युद्ध नेतृत्व', 'पहिले महायुद्ध' ही पुस्तके गाजली. लेफ्टनंट जनरल शंकरराव थोरात यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा 'माझी शिपाईगिरी' या नावाने मराठी अनुवाद त्यांनी प्रसिद्ध केला.

गोखले यांच्यातील पत्रकार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून घडला होता. त्यामुळे त्यांच्या पत्रकारितेला प्रखर राष्ट्रवादाची जोड होती. त्यांनी त्या वेळी सुरू केलेली अनेक सदरे पुढे 'म.टा.'मध्ये जशीच्या तशी चालू राहिली.

युद्धशास्त्राच्या अभ्यासकाला कार्ल फान-लॉजवित्स या युद्धतज्ज्ञाच्या 'ऑन वॉर' या ग्रंथाला टाळून पुढे जाताच येत नाही. जगातल्या सर्व युद्धतज्ज्ञांची ती 'गीता'च आहे. गोखले यांनी या ग्रंथाच्या अनुवादाचे काम निवृत्तीनंतर हाती घेतले होते. हा अनुवाद शेवटच्या टप्प्यात असताना गोखले यांना कर्करोगाने ग्रासले. तरीही त्यांनी हे काम जिद्दीने पूर्ण करीत आणले. परंतु त्याच्या प्रकाशनाच्या आधीच त्यांना मृत्युने गाठले. त्यांच्या मृत्युनंतर 'युद्धमीमांसा' या नावाने हा ग्रंथ प्रकाशित झाला.

गोखले यांच्या युद्धपत्रकारितेने अनेक तरुण पत्रकारांना प्रेरित केले. स्वत: गोखले मराठी पत्रकारितेत तरुण युद्धपत्रकार तयार व्हावेत यासाठी प्रयत्न करीत व प्रोत्साहन देत. त्यामुळे मराठी युद्धपत्रकारितेचे जनक म्हणून 'दि.वि.' यांचे नाव घेतले जाणे अपरिहार्य आहे.

– दिवाकर देशपांडे

## गोखले, भूषण नीळकंठ

**वायुसेना – एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक**

**२५ डिसेंबर १९४७**

भूषण नीळकंठ गोखले यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे शिक्षण पुण्यातल्या बालशिक्षण मंदिर आणि



भावे शाळा (आताची विमलाबाई गरवारे विद्यालय) येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्याच वेळी म्हणजे १९६२ मध्ये भारत आणि चीनमध्ये युद्ध झाले. या युद्धाचा परिणाम म्हणजे त्या वेळच्या तरुण पिढीतील बहुतेक तरुणांनी सैन्यात जाऊन देशसेवा करण्याचे ठरवले. भूषण गोखले आणि त्यांचे मोठे बंधू वैभव हेही या पिढीतलेच. पैकी भूषण गोखले यांनी वायुसेनेत, तर त्यांच्या बंधूंनी भूसेनेत दाखल व्हायचे ठरवले.

गोखले यांनी १९६४ मध्ये राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.) मध्ये प्रवेश घेतला. भारतीय वायुसेनेत ते जून १९६८ मध्ये दाखल झाले. लढाऊ विभागामध्ये (फायटर स्ट्रीम) त्यांची नियुक्ती झाली. भारत पाकिस्तान दरम्यान १९७१ मध्ये झालेल्या युद्धात फ्लाइंग ऑफिसर गोखले यांच्याकडे हंटर या लढाऊ विमानाची जबाबदारी होती.

१९७३ मध्ये भूषण गोखले यांनी फ्लाईंग इन्स्ट्रक्टर अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतरच्या काळात हवाई प्रशिक्षणाचे आणि लढाऊ विमानांचे नेतृत्व करण्याचे कार्य त्यांनी केले. देशाच्या वायुसेनेतील युद्धनीति विकसित करण्याच्या कामी ते रुजू होते. वायुसेनेमार्फत इराक आणि इजिप्त या देशांतही ते कार्यरत होते. इराकमध्ये १९७७ ते १९७९ या कालावधीत ते उड्डाण प्रशिक्षक होते.

ऐंशीच्या दशकात सोव्हिएट रशिया येथे प्रशिक्षण झाल्यानंतर हलवाडा एअर फोर्स तळावर २२१ स्क्वॉड्रनमध्ये त्यांची मिग २३ विमानावर नियुक्ती झाली. त्याच दरम्यान लायन्स स्क्वॉड्रन ही एकतिसावी स्क्वॉड्रन जोधपूरवरून हलवाडा तळावर दाखल करण्याचा निर्णय वायुसेनेतर्फे घेण्यात आला. विंग कमांडर एम.एस. ग्रेवाल यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्यास या स्क्वॉड्रनमध्ये फ्लाइट कमांडर म्हणून गोखले यांची निवड झाली. त्या दोन वर्षांत फायटर पायलट म्हणून अनेक आव्हानात्मक अनुभव त्यांना घेता आले.

मिग २३ या लढाऊ विमानांची संपूर्ण स्क्वॉड्रन हलवाडा तळावर प्रस्थापित करणे ही अत्यंत अवघड कामगिरी तेव्हा गोखले आणि त्यांच्या संपूर्ण तुकडीवर सोपवण्यात आली होती. यासोबतच रोजची सराव उड्डाणेही या तुकडीवरून करून घेतली जात. शत्रूला बेसावध ठेऊन त्याच्यावर हल्ला करण्यासाठी आखण्यात येणाऱ्या पहाटेच्या आणि सायंकाळी करण्यात येणाऱ्या हल्ल्यांचे विशेष प्रशिक्षणही त्यांना या काळात लायन्समध्येच मिळाले. १९८४ मध्ये त्यांनी सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये, तर १९९१-१९९२ मध्ये त्यांनी अमेरिकेतल्या एअर वॉर कॉलेजमध्ये वायुसेनेतील शिक्षण घेतले.

इजिप्तमध्येही ते काही काळ कार्यरत होते. १९९४ ते १९९८ या काळात इजिप्तमधल भारतीय दुतावासात डिफेन्स अॅडव्हायझर या पदावर त्यांनी वेळोवेळी काम केले.

गोखले यांच्या वायुसेनेतील प्रत्यक्ष सहभागात सियाचीन इथल्या आघाडीचाही समावेश आहे. त्यांनी या आघाडीवरील मिग २३ या विमानाच्या स्क्वॉड्रनचे नेतृत्व केले. तसेच १९९९ मध्ये झालेल्या कारगिल युद्धादरम्यानही त्यांनी अतिशय महत्त्वाच्या हवाईतळाचे नेतृत्व केले. व्हॅम्पायर, हंटर, किरण मिराज, एल ३९, एल २९, सुखोई ७, जग्वार, सुखोई ३०, यांसारख्या लढाऊ विमानांचे उड्डाण त्यांनी केले आहे. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे लढाऊ आणि प्रशिक्षण विमानांच्या ३५०० तासांच्या उड्डाणांचा त्यांना अनुभव आहे.

याशिवाय वायुसेनेच्या प्रशासकीय कामातही गोखले यांचे योगदान आहे. डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये डायरेक्टिंग स्टाफ म्हणून, तर वायुसेनेच्या

मुख्यालयातल्या एअर स्टाफ इन्स्पेक्शनच्या आयुक्तालयात इनस्पेक्टर म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तसेच वायुसेनेच्या प्रमुखांचे वायुदल मार्गदर्शक, ऑपरेशन पराक्रमच्या कालावधीत वायुसेनेच्या प्रमुखांचे साहायक, वायुसेनेतल्या प्रशिक्षणासाठीचे कमांडिंग इन चीफ या पदांवर ते कार्यरत होते. वायुसेनेतील अंतिम टप्प्याच्या कार्यकाळात त्यांनी वायुसेनेच्या मुख्यालयात व्हाईस चीफ (उपप्रमुख) या पदावर १ नोव्हेंबर २००६ पासून भूषण गोखले यांनी काम केले आणि ३१ डिसेंबर २००७ रोजी ते या पदावरून निवृत्त झाले.

ग

निवृत्तीनंतरही गोखले संरक्षणक्षेत्रासाठी सतत काम करीत आहे. निवृत्तीनंतर संरक्षण, संशोधन आणि विकास संस्थेच्या (डी.आर.डी.ओ.) सल्लागारपदी त्यांची नेमणूक झाली.

भूषण गोखले भारत सरकारच्या सेवेत मुख्य वैज्ञानिक सल्लागार म्हणूनही ते कार्यरत आहेत. राष्ट्रीय सुरक्षा परिषदमध्येही (नॅशनल सिक्युरिटी काउन्सिल) ते काम करीत आहेत. आत्तापर्यंत त्यांनी 'परमविशिष्ट सेवा पदक', 'अतिविशिष्ट सेवा पदक' आणि 'वायुसेना पदक' लाभले आहे. याव्यतिरिक्त १ फेब्रुवारी २००७ रोजी माननीय राष्ट्रपतींच्या सेवेत ए.डी.सी. या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

२२ मे २०१० रोजी झालेल्या मंगळूर विमान अपघाताच्या चौकशीसाठी केंद्र सरकारने एक समिती नियुक्त केली होती. या समितीचे प्रमुख म्हणून गोखले यांनी काम पाहिले. सध्या ते महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष आणि विश्वस्तही आहेत. तसेच डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या दोन्ही संस्थांच्या नियामक मंडळावरही (गव्हर्निंग काउन्सिल) ते काम पाहत आहेत.

– पल्लवी गाडगीळ/रूपाली गोवंडे

## ग्रीन, जॉनी विल्यम

**वायुसेना – एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, वीरचक्र, वायुसेना पदक**

**२१ मार्च १९२९ –**



जॉनी विल्यम ग्रीन यांचा जन्म मद्रास (चेन्नई) येथे झाला. १६ जून १९५१ रोजी त्यांची हवाई दलामध्ये नियुक्ती करण्यात आली. १९६५ सालच्या पाकिस्तान युद्धाच्या सुरुवातीच्या टप्प्यांमध्ये स्क्वॉड्रन लीडर जॉनी विल्यम ग्रीन यांनी छांब भागात हल्ला करणाऱ्या नॅट विमानांच्या तुकडीचे नेतृत्व केले. याच भागात पाकिस्तान मात्र क्षेपणास्त्रांनी युक्त अशा एफ-८६ सेबर व एफ १०४ स्टारफाइटर यां सारख्या विमानांचा वापर करीत होता. ३ व ४ सप्टेंबर रोजी त्यांनी केलेल्या व्यूहरचनेनुसार शत्रूबरोबर पहिली चकमक सुरू झाली. शत्रूकडील वरचढ युद्धसाहित्याला न जुमानता त्यांनी आपल्या व्यूहरचनेत अशा कौशल्याने बदल केले की त्यामुळे त्यांना या पहिल्याच चकमकीत शत्रूची दोन विमाने टिपता आली. त्याचबरोबर, जमिनीवरील लक्ष्यांवर हल्ला करणाऱ्या मिस्टरी व कॅनबेरा विमानांना सुरक्षा पुरवणाऱ्या व्यूहरचना त्यांनी वापरल्या. या सर्व हल्ल्यांतील यश हे मुख्यत्वे त्यांचे शौर्य आणि नेतृत्व यांमुळेच मिळाले. ३ सप्टेंबर १९६५ रोजी 'वीरचक्र' देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना एअर मार्शल पदापर्यंत बढती मिळाली. 'परमविशिष्ट सेवा पदक' 'अतिविशिष्ट सेवा पदक' व 'वायुसेना पदक' असे पुरस्कारही मिळाले.

– आनंद गोवंडे

* * *

# घ



## घाडगे, यशवंत बाळाजी

**भूसेना - नाईक**
**व्हिक्टोरिया क्रॉस**
**१९१९-१९४४**



यशवंत बाळाजी घाडगे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात पळसगाव-आंब्रेची वाडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई होते. वडील बाळाजीराव हे गरीब शेतकरी होते. या जोडप्याला दोन मुले व चार मुली अशी सहा अपत्ये होती. यशवंत अवघ्या तीन महिन्यांचा होतो न होतो, तोच त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्यांचे निधन होण्यापूर्वी यशवंतचा मोठा भाऊ वामन हा सैन्यात भरती झाला होता. त्यामुळे त्याचा तुटपुंजा पगार हाच या कुटुंबाचा आधार होता.

कुटुंबाचा गाडा ओढण्यासाठी विठाबाईंना शेतात काम करावे लागले व मोलमजुरी करावी लागली. यशवंतने शिकून पुढे चांगले नाव कमवावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे यशवंतला त्यांनी पळसगावच्या मराठी शाळेत घातले. वयाच्या अकराव्या वर्षी यशवंत मराठी चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाला. उच्च शिक्षणासाठी शहरात जाणे हे गरिबीमुळे अशक्य होते. त्यामुळे यशवंत लोकांच्या शेतांवर मोलमजुरी करू लागला.

सहा वर्षांनंतर थोरला भाऊ वामन निवृत्त होऊन गावी परतला, तेव्हा आपणही भावाप्रमाणे सैन्यात जावे असे यशवंतला वाटू लागले. तसा त्याला लाठी, बोथाटी व दांडपट्टा फिरवणे व कसरत करण्याची आवड होती. त्याची शरीरयष्टी सडपातळ, काटक आणि मजबूत होती. मात्र यशवंतने सैन्यात जावे असे विठाबाईला वाटत नव्हते. पण वामनचा आग्रह व यशवंतचा निग्रह यांमुळे विठाबाईचा नाइलाज झाला. यशवंतने लग्न केल्यास आपण त्याला सैन्यात जाण्यास परवानगी देऊ अशी अट विठाबाईने घातल्यामुळे यशवंतला लग्न करावे लागले. पाटणूसच्या पांडुरंग महामुणकरांची कन्या लक्ष्मीबाई हिच्याशी त्याचा विवाह झाला. दुसऱ्या महायुद्धाचे वारे वाहू लागल्यावर सैन्यात भरती सुरू झाली. तेव्हा १९३८ साली यशवंत घाडगे पाचव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये साधे शिपाई म्हणून दाखल झाले. त्यांनी कडक सैनिकी प्रशिक्षण घेऊन आपल्यावर सोपविलेल्या लहानमोठ्या कामगिऱ्या व विशेष अवघड जबाबदाऱ्या अतिशय कौशल्याने व तत्परतेने पार पाडल्या. त्यांच्या अंगभूत गुणांमुळे त्यांना लवकरच नाईक पदावर बढती मिळाली.

दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश फौजांसोबत लढण्यासाठी पाचव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीला इटलीत पाठविण्यात आले. तेथे ब्रिटिश फौजेला इटली व जर्मनीच्या फौजेशी लढायचे होते. १० जुलै १९४४ रोजी जर्मन सैन्याच्या एका तुकडीसोबत नाईक यशवंतरावांच्या सैन्याची गाठ पडली. दोन्ही बाजूंनी बंदुका, टॉमीगन्स, तोफा धडधडू लागल्या.

शत्रूच्या ताब्यात असलेले ठाणे जिंकून घेण्याच्या ईर्ष्येने मराठा पलटण पुढे सरकत होती. यशवंत घाडगे यांनी हातबॉंब फेकून शत्रूची मशीनगन बंद पाडली.

ठाण्याचे रक्षण करणारे अनेक जर्मन सैनिक त्यांनी यमसदनी पाठविले. आपल्याच कैफात घाडगे पुढे सरकत चालले होते.

अचानक आपल्याकडील काडतुसे व हातबाँब यांचा साठा संपल्याचे त्यांच्या लक्षात आले. आता ते ठाण्याच्या अगदी जवळ आले होते. त्यांनी मग मागचापुढचा विचार न करता आपली बंदूक उलट धरून शत्रूच्या सैनिकांवर झेप घेतली. बंदुकीच्या दस्त्याने हाणामारी करून ते शत्रुसैनिकांना लोळवू लागले. त्यांचा त्वेष पाहून शत्रुसैनिक माघारी पळू लागले. त्यांच्या पलटणीने शर्थ करून ते ठाणे काबीज केले.

आपला विजय झाल्याचे लक्षात आल्यावर घाडगे यांनी क्षणभर थांबून मोकळा श्वास घेतला. त्यांचा संपूर्ण देह रक्ताने न्हाला होता. ते शांतपणे उभे राहिल्याचे पाहून जवळच्याच खंदकात लपलेल्या एका जर्मन सैनिकाने संधी साधून त्यांच्यावर गोळी झाडली. या गोळीने अचूक वेध घेतला व घाडगे खाली कोसळले. क्षणार्धात त्यांची प्राणज्योत मावळली.

ब्रिटिश सरकारला त्यांच्या या पराक्रमाची दखल घ्यावी लागली. लाल किल्ल्यासमोरील मैदानात भरलेल्या दरबारात त्यांना ‘व्हिक्टोरिया क्रॉस’ हा सर्वोच्च सन्मान मरणोत्तर प्रदान करण्यात आला. व्हाइसरॉय आणि गव्हर्नर जनरल फील्ड मार्शल लॉर्ड वेव्हेल यांच्या हस्ते घाडगे यांच्या वीरपत्नी लक्ष्मीबाईंना हे मानाचे पदक प्रदान करण्यात आले.

नाईक यशवंतराव घाडगे यांच्या स्मरणार्थ माणगावच्या मामलेदार कचेरीजवळ त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. तेथे दरवर्षी ९ जानेवारीला ‘घाडगे महोत्सव’ साजरा करण्यात येतो.

– डॉ. शुभलक्ष्मी मा. जोशी

* * *

# च

## चिटणीस, अजय हेमंत

**नौसेना - कमोडोर**

**शौर्यचक्र, नौसेना पदक**

**८ जून १९५०**



अजय हेमंत चिटणीस यांचा जन्म गुजरात राज्यातील कैरा जिल्ह्यातील पेटलाड या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण दिल्ली येथे झाले. नंतर त्यांनी १९६६ मध्ये मुंबईतील भारतीय प्रौद्योगिकी संस्था, पवई (आय.आय.टी.) येथे विद्युत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. हा अभ्यासक्रम सुरू असतानाच त्यांनी १९६९ मध्ये नौसेनेत प्रवेश घेतला. अजय यांच्या मावशीचे पती ॲडमिरल दया शंकर यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्यामुळे त्यांनी नौसेनेत प्रवेश घ्यायचे ठरवले. त्यांचे वडील हेमंत चिटणीस वायुसेनेत होते. त्यामुळे घरातून पाठिंबा होताच.

ऑक्टोबर १९६९ ते जून १९७१ या कालावधीत त्यांना कोची, जोधपूर, हैदराबाद येथे प्रशिक्षण मिळाले. १९७४ साली त्यांचा विवाह नाशिक सिक्युरिटी प्रेसचे व्यवस्थापक चिटणीस यांची कन्या आदिती हिच्यासोबत झाला.

नौसेनेतील कारकिर्दीत त्यांनी गोवा, मुंबई, विशाखापट्टणम, कोची, नवी दिल्ली आणि वेलिंग्टन येथील नौसेनेच्या तळांवर काम केले.

विमानोड्डाण आणि लढाऊ विमानोड्डाण प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हेलिकॉप्टर उड्डाणासाठी त्यांची निवड झाली. वयाच्या पंचविसाव्या वर्षी जहाजावरून हेलिकॉप्टरचे उड्डाण करणारे त्या वेळचे ते सर्वांत तरुण अधिकारी होते.

आज जहाजावरून होणाऱ्या हेलिकॉप्टर उड्डाणाचे ते तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांच्या उत्तम आणि सातत्यशील प्रगतीमुळे रशियन बनावटीच्या हेलिकॉप्टर्सवर प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आलेल्या गटामध्ये त्यांची निवड झाली. आय.एन.एस. रजपूत या नव्याने आलेल्या विनाशिकेवर त्यांची वरिष्ठ वैमानिक (सीनियर पायलट) म्हणून निवड झाली. ‘कमाऊ २५’ या पाणबुडीविरोधी हेलिकॉप्टरच्या नौसेनेतील आगमनाची त्यांनी पूर्वतयारी केली. तसेच, त्या ताफ्याचे नेतृत्वही अजय चिटणीस यांनी केले.

१९८४ मध्ये आय.एन.एस.रजपूत या युद्धनौकेला दोन पदके मिळाली. मासेमारीसाठी समुद्रात गेलेले १५०० कोळी अचानक आलेल्या वादळामुळे भरकटले. या कोळ्यांची तेथून सुटका करण्यासाठी एक मोहीम राबवली गेली. या मोहिमेच्या २५ तासांच्या काळात हे हेलिकॉप्टर फक्त इंधन भरण्यासाठी जहाजावर उतरत होते. त्या वेळी जहाजावर कोणीही वैमानिक उपलब्ध नसल्यामुळे चिटणीस यांनी एकट्यानेच ही मोहीम एकहाती पार पाडली. या काळात त्यांनी या कोळ्यांना अन्न आणि पाणी यांचा पुरवठाही केला. तसेच त्यांना किनाऱ्यावर परतण्यासाठी मार्गदर्शनही केले. याच मदत व बचाव मोहिमेबद्दल अजय चिटणीस यांना ‘नौसेना’ पदक बहाल करण्यात आले. रशियन बनावटीची हेलिकॉप्टर्स भारतीय नौसेनेत दाखल झाली होती.

हेलिकॉप्टरचे एखादे इंजिन बंद पडले तर असे हेलिकॉप्टर जहाजावर उतरावयाचे नाही असा या हेलिकॉप्टरबाबत दंडक होता. आय.एन.एस. रजपूतवर रशियन हेलिकॉप्टर उतरवत असताना त्याचे एक इंजिन निकामी झाले. एक इंजिन बंद पडलेले हेलिकॉप्टरही आपण व्यवस्थितरीत्या जहाजाच्या डेकवर उतरवू शकतो असे चिटणीस यांनी जहाजावर कळवले. अत्यंत काळजीपूर्वक व सावकाशपणे त्यांनी हे हेलिकॉप्टर जहाजावर उतरवले. असे नादुरुस्त झालेले हेलिकॉप्टर जहाजावर उतरवण्याचे धाडस रशियन वैमानिकांनीही केले नव्हते. या त्यांच्या कृतीमुळे प्रवाशांचे प्राण वाचले आणि हेलिकॉप्टरही सुखरूप राहिले. या त्यांच्या धाडसासाठी त्यांना ‘शौर्यचक्र’ प्रदान करण्यात आले.

च

अजय चिटणीस यांनी जून २००१ मध्ये भारतीय नौसेनेतून सेवानिवृत्ती घेतली. त्यानंतर त्यांनी व्यापारी नौदलामध्ये नवीन कामास सुरुवात केली. पुरवठा जहाजांवर ‘मास्टर’ या पदावर त्यांनी पाच वर्षे काम केले. सध्या ते ग्रेट ऑफशोअर लि., या कंपनीत प्रशिक्षण प्रमुख म्हणून काम बघत आहेत.

– वर्षा जोशी-आठवले

## चिटणीस, हेमंत रामकृष्ण

**वायुसेना – एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, वायुसेना पदक**

**१९ फेब्रुवारी १९२४ –**

हेमंत रामकृष्ण चिटणीस यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे वडील रामकृष्ण उर्फ बाळासाहेब चिटणीस हे ठाण्यातील नामवंत वकील होते. चिटणीस यांचे प्राथमिक शिक्षण ठाणे येथील एम्. एच्. विद्यालयात झाले. मुंबईत एलफिन्स्टन महाविद्यालयात शिकत असतानाच ते १९४३ मध्ये पुण्यात वायुसेनेत दाखल झाले. १९४४ मध्ये त्यांना सिकंदराबादला नियुक्ती मिळाली. अंबाला, पेशावर



इत्यादी ठिकाणी ते काही काळ होते. नंतर त्यांना ब्रह्मदेशावर झालेले जपानी आक्रमण थोपवण्यासाठी रंगूनला पाठवण्यात आले.

१९४६ मध्ये चिटणीस कलकत्ता येथे परतले आणि तेथून उड्डाण प्रशिक्षक अभ्यासक्रमासाठी इंग्लंडला गेले. हा सात महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून ते भारतात परत आले. त्यांच्या प्रयत्नाने १९४७ मध्ये अंबाला येथे ‘फ्लाइंग इन्स्ट्रक्टर्स स्कूल’ची स्थापना झाली. १९५२-५२ च्या दरम्यान त्यांनी राष्ट्रीय छात्र सेनेत वायुसेना विभागाची स्थापना मुंबईत केली. १९५२ ते १९५४ या काळात जोधपूर ॲकॅडमीत स्कॉड्रन लीडर म्हणून त्यांना बढती मिळाली. हैद्राबादेतील हकीम पेठमधील तळावर असिस्टंट डायरेक्टर ऑफ फोरकास्टिंग ॲंड प्लॅनिंग आणि हंटर विमानाचे स्कॉड्रन लीडर म्हणून १९६० पर्यंत त्यांनी काम पाहिले. १९६० मध्ये विंग कमांडर म्हणून दिल्ली येथे मंत्रिमंडळ सचिवालयामध्ये त्यांची बदली झाली. ते ‘जॉईंट आपरेशन कमांड’मध्ये कार्यरत होते.

याच काळात चिटणीस वेलिंग्टन येथे डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये दाखल झाले व १९६१-६२ मध्ये तेथील परीक्षा उत्तीर्ण झाले. १९६२ मध्ये चिनी आक्रमणाच्या काळात त्यांची नियुक्ती दिल्लीला सेनाध्यक्षांच्या समितीवर झाली. १९६३ मध्ये चुम्बी व सिलिगुडी नेक येथे चिनी आक्रमणाची शक्यता ध्यानात घेऊन त्यांची बदली बदादोरा वायुदलाच्या तळावर झाली. १९६५ मध्ये चिटणीस दिल्लीला परत आले. त्यानंतर त्यांनी विविध महत्त्वाची पदे भूषविली. वायुसेनेतील सैनिकांची वेतन आयोगाला द्यावयाची कैफियत त्यांनी तयार केली.

१९६९ मध्ये चिटणीस यांना वायुसेनेचे पहिले पदक एअर मार्शल अर्जनसिंग यांच्या हस्ते मिळाले. नंतर

त्यांना एअर व्हाईस मार्शल म्हणून पदोन्नती मिळाली व ते एअर चीफ मार्शल मुळगांवकर यांच्या हाताखाली 'असिस्टंट चीफ ऑफ एअर स्टाफ - प्लॅनिंग' म्हणून दिल्लीस आले. त्यांच्या काळात जग्वार विमाने वायुसेनेने खरेदी केली.

१९७४ मध्ये त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. भारत सरकारने १९७७ मध्ये त्यांना अमेरिकेत आंतरराष्ट्रीय संरक्षण व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी पाठविले. १९७८ मध्ये त्यांना एअर मार्शल पद मिळाले. दुरुस्ती व देखभाल (मेटेनन्स) विभागात 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' म्हणून त्यांची नागपूरला नियुक्ती झाली. हंटर, जग्वार इत्यादी विमानांचा वायुसेनेत समावेश, प्रशिक्षक शाळा (इन्स्ट्रक्टर्स स्कूल), सुधारित वेतनश्रेणी इत्यादी सुधारणा त्यांनी केल्या.

त्यांची उत्कृष्ट सेवा लक्षात घेऊन सरकारने २६ जानेवारी १९८० रोजी त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करून त्यांचा गौरव केला. लगेचच २९ फेब्रुवारी १९८० रोजी एअर मार्शल हेमंत चिटणीस सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतरही त्यांनी इतर क्षेत्रातही आपला ठसा उमटवला. इन्स्टिट्यूट ऑफ पोल्ट्री मॅनेजमेंटची त्यांनी शून्यातून सुरुवात केली. तंत्र शिक्षण विभागाकडूनही या संस्थेला मान्यता मिळाली. कुक्कुटपालन व्यवसायातील विविध विषयांचे प्रशिक्षण आज या संस्थेतून दिले जाते.

चिटणीस यांचे थोरले चिरंजीव अजय चिटणीस यांनी नौसेनेच्या वायुदलात वैमानिक म्हणून काम केले. त्यांनाही १९८४ मध्ये शौर्यचक्र मिळाले. चिटणीस यांचे धाकटे पुत्र अमोल चिटणीस हेही १९७० मध्ये नौसेनेच्या वायुदलामध्ये दाखल झाले. हेलिकॉप्टरचे वैमानिक म्हणून काम करताना त्यांनीही अनेक मोहिमांमध्ये भाग घेतला.

– वर्षा जोशी-आठवले

* * *

च

# ज

## जठार, अरविंद नीळकंठ

**भूसेना - ब्रिगेडियर**

**महावीरचक्र, अतिविशिष्ट सेवा पदक**

**२० डिसेंबर १९२३ - ९ नोव्हेंबर १९९१**





अरविंद नीळकंठ जठार यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे वडील नीळकंठ श्रीराम जठार हेही लष्करात लेफ्टनंट कर्नल या पदावर होते. पुण्यातील श्री शिवाजी मिलिटरी प्रिपरेटरी स्कूलमध्ये (एस.एस.पी.एम.एस.) त्यांचे शालेय शिक्षण झाले. मुंबईतल्या एलफिन्स्टन महाविद्यालयात ते पुढील शिक्षण घेत असतानाच त्यांना इमर्जन्सी कमिशनच्या माध्यमातून सैन्यात भरती होण्याची संधी मिळाली. १९४२ मध्ये ते सैन्यात भरती झाले. बंगळूर येथे नऊ महिने प्रशिक्षण झाल्यानंतर डिसेंबर १९४२ मध्ये ते लेफ्टनंट पदावर रुजू झाले.

त्या काळी भारतावर इंग्रजांचे राज्य असल्याने त्यांची लढण्यासाठी इटली येथे रवानगी करण्यात आली होती. १९४४ मध्ये ते इटलीमध्ये लढताना जखमी झाले. त्यानंतर त्यांना भारतात आणण्यात आले. उपचारानंतरही त्यांचा एक पाय तोकडा झाला होता. पण तरीही ते सैन्यात कार्यरत राहिले.

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ते सहाव्या डी.सी.ओ. लान्सर या रेजिमेंटमध्ये लेफ्टनंट पदावर होते. त्या वेळी त्यांच्या समवेत झिया उल हक हेही होते. या रेजिमेंटमध्ये मुसलमान संख्येने अधिक असल्याने देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर यांतले बहुतेक सैनिक पाकिस्तानात गेले. त्या वेळी अरविंद जठार यांची रवानगी सेंट्रल इंडिया हॉर्स रेजिमेंटमध्ये झाली. ते या रेजिमेंटमधून काश्मीरमधल्या लढाईत सहभागी झाले.

८ एप्रिल १९४८ रोजी त्यांच्या रेजिमेंटच्या सहकार्याने चौथ्या डोग्रा पलटणीने जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानी टोळीवाल्यांनी ताब्यात घेतलेल्या बरवलीवर हल्ला केला. जठार सुरुवातीच्या कंपनीबरोबर होते. शत्रूने तुफान गोळीबार करून कंपनीचा हल्ला थोपविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा जठार गोळ्यांचा वर्षाव झेलत सफाईने पुढे गेले. त्यांनी आपल्या रणगाड्यांना शत्रूची ठिकाणे निर्देशित केली.

१० एप्रिल १९४८ रोजी झालेल्या लढाईत अरविंद जठार पहिल्या रणगाड्याचे नेतृत्व करीत होते. तावी नदीच्या पात्रातून रणगाडे जाताना ते या पात्रातील गाळात रुतून बसू नयेत म्हणून जठार यांनी नदीच्या पात्रातून चालत चालत रणगाडे चालकांना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांना प्रचंड गोळीबाराचा सामना करावा लागला. तो चुकवत त्यांनी रणगाड्यांना सुरक्षितपणे तावी नदीच्या पात्रातून पुढे नेले. रणगाड्यांच्या तीनपट वेगाने पुढे जाऊन ते चिंगास (विभागीय नकाशातील एम.आर. स्क्वेअर ३६०९) या नियोजित जागी पोहोचले होते.

१२ एप्रिल १९४८ रोजी राजौरी येथे रणगाड्यांना मार्गदर्शन करताना जठार यांनी अकरा वेळा नदी ओलांडली. राजौरीवर कब्जा मिळवल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशानुसार अडीच मैल परत जाऊन नदीच्या पात्रात रुतलेल्या दोन रणगाड्यांना त्यांनी यशस्वीपणे बाहेर काढले. जठार यांच्या धाडसामुळे

सर्व रणगाडे नियोजित ठिकाणी वेळेत पोहोचू शकले. भारतीय सैन्य शत्रूला चित करण्यात यशस्वी झाले.

या लढाईत जठार यांनी स्वत:च्या सुरक्षिततेची पर्वा न करता दाखवलेल्या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांना १५ ऑगस्ट १९५० रोजी 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

त्यांनी १९६५ साली गाझामध्ये भारतीय सैन्यातर्फे कमांडर म्हणून जबाबदारी सांभाळली. सातत्याने विविध कामगिऱ्या यशस्वीपणे पार पाडणारे अरविंद जठार १९७५ मध्ये ब्रिगेडियर पदावरून सैन्यातून निवृत्त झाले. त्या वेळी त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. त्यांचे चुलत बंधू स्कॉड्रन लीडर मधुकर शांताराम जठार यांनाही पाकिस्तानविरुद्धच्या १९६५ च्या लढाईमध्ये 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले आहे.


– पल्लवी गाडगीळ

## जाधव, तुकाराम वसंतराव

**भूसेना – नाईक**

**शौर्यचक्र**

**१ जून १९५९ – ३० मार्च २०१०**



तुकाराम वसंतराव जाधव यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात हिंगणे गावी झाला. दहिवडी गावातील महात्मा गांधी विद्यालयात त्यांचे शालेय शिक्षण झाले. २२ नोव्हेंबर १९७८ रोजी 'बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुप' (बी.ई.जी.) मध्ये ते दाखल झाले.

१९८५ मध्ये हिमवर्षावात श्रीनगर-लेह महामार्गावर 'जोझी ला' विभागात एकशे सत्तेचाळिसाव्या कि.मी.जवळ हिम काढण्याच्या कामावर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली होती. प्रतिकूल हवामानात अद्ययावत यंत्रांच्या मदतीने हे काम सुरू होते.

जाधव आणि कॅप्टन रस्तोगी हे दोघे २३ मार्च १९८५ या दिवशी काम करत असताना त्यांच्या यंत्रावर बर्फाचा कडा कोसळला. त्यांच्यासह ते यंत्र काही फूट बर्फाखाली दबले गेले. प्रचंड दमलेले असतानादेखील विनाविलंब त्यांनी बर्फामधून आपली सुटका करून घेतली आणि ते मौल्यवान आणि महाग यंत्र बाहेर काढण्यास सुरुवात केली. इतकेच नव्हे, तर त्यात यशस्वी ठरल्यावर लगेच वैयक्तिक सुरक्षेची पर्वा न करता पुन्हा हिम हटवण्याच्या कामाला सुरुवात केली.

काही दिवसांनंतर २९ मार्च १९८५ रोजी ११९२ व्या कि.मी.जवळ बावीस तास सलग काम करून जाधव यांनी आपल्या श्मिड्ट यंत्राद्वारे एकोणीस मीटर उंच आणि दोनशे दहा मीटर लांब उतरता असणारा बर्फाचा कडा फोडला. ९ एप्रिल १९८५ रोजी १०९१ व्या कि.मी.जवळ हिम हटविण्याच्या मोहिमेदरम्यान काम करताना त्यांचे काही सहकारी बर्फाखाली दबले गेले होते. त्या सहकाऱ्यांना त्यांनी बर्फातून बाहेर काढले आणि बर्फाखाली दबलेले बर्फ हटविण्याचे महाग यंत्रसुद्धा त्यांनी बर्फाच्या ढिगाखालून बाहेर काढले. त्याच वेळी थकवा आणि ताण यांनी ग्रस्त आपल्या सहकाऱ्याला खांद्यावर टाकून आपला तळ गाठला. या अतुलनीय कार्याबद्दल त्यांना 'शौर्यचक्र' प्रदान करण्यात आले. ३० नोव्हेंबर १९९५ रोजी ते सैन्यामधून निवृत्त झाले.

– रूपाली गोवंडे

## जाधव, नामदेव रामजी

**भूसेना – हवालदार, मानद सुभेदार**

**व्हिक्टोरिया क्रॉस**

**१८ नोव्हेंबर १९२१ – २ ऑगस्ट १९६४**

नामदेव रामजी जाधव यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातल्या निमज या गावात झाला. त्यांचे मूळ गाव अहमदनगरमधील वीरगाव हे हाय. त्यांचे वडील हे एक गरीब शेतकरी होते. घरातल्या गरीब



परिस्थितीमुळे नामदेव शालेय शिक्षण घेऊ शकले नाहीत. शेतीवर वडिलांना मदत करणे व गुरेढोरे राखणे हेच त्यांचे काम. त्यांची आवडती गोष्ट म्हणजे आपल्या मित्रमंडळींना घेऊन प्रवरा नदीत पोहणे. पुढे ह्याच आवडीचे छंदात रूपांतर झाले. मात्र हाच छंद त्यांचे आयुष्य पूर्णपणे बदलून टाकेल असा विचार त्यांनी स्वप्नातही केला नव्हता.

काही वर्षांनी नामदेव जाधव यांनी काही काळ सर्कशीत घालवला. वयाच्या एकविसाव्या वर्षी म्हणजे १८ नोव्हेंबर १९४१ रोजी ते मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये दाखल झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, ९ एप्रिल १९४५ रोजी इटलीमध्ये सिनिओ नदीच्या काठावर १/५ मराठा लाइट इन्फन्ट्रीची जर्मन सैन्याशी गाठ पडली. त्या वेळी १/५ मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या दोन्ही तुकड्यांनी एकाच वेळी सिनिओ नदीकाठावर पूर्व-पश्चिम भागातल्या बेसावध शत्रुसैन्यावर हल्ला केला.

हा हल्ला करणाऱ्या तुकडीमध्ये नामदेव जाधव हे कंपनी कमांडरबरोबर आघाडीवर होते. त्यांच्याकडे 'कंपनी गनर' म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. ते आपल्या तुकडीबरोबर सिनिओ नदी पार करत असताना काठावरच्या तीन जर्मन ठाण्यांमधून जोरदार गोळीबाराला सुरुवात झाली. या गोळीबारामध्ये कंपनी कमांडर व तुकडीतले इतर दोघे जखमी झाले. हे तिघे व नामदेव जाधवांव्यतिरिक्त अन्य सर्वच ठार झाले.

नामदेव जाधवांनी एका जखमी सोबत्याला घेऊन नदीचे खोल पात्र पार केले व उताराच्या दिशेने चालायला सुरुवात केली. त्यांनी पुन्हा एकदा याच पद्धतीने दुसऱ्या जखमी सैनिकालाही पलीकडे सुखरूप नेऊन पोहोचवले. या दोन्ही वेळेस शत्रुसैन्याकडून तोफेचा व बंदुकीचा मारा सुरूच होता. अशा बिकट



**नामदेव जाधव यांचा पराक्रम**

परिस्थितीमध्ये नदी पार करताना लहानपणी जोपासलेला जाधव यांचा पोहण्याचा छंद त्यांच्या कामी आला.

अशा दोन फेऱ्यांनंतर दमून न जाता पुन्हा तिसऱ्यांदा त्यांनी नदी पार केली व जर्मनीच्या शत्रुसैन्यावर आपल्या बंदुकीतून गोळ्यांचा वर्षाव केला. त्यांच्या हाताला जखम झाली व बंदूक हातात घेणे अशक्य झाले, तेव्हा त्यांनी हातबॉम्ब टाकून शत्रूची दोन ठाणी पार नामशेष करून टाकली. त्यांनी आपल्या जखमी सहकाऱ्यांना मोठ्या शिताफीने व धाडसाने नदीपार नेऊन त्यांचे प्राण वाचवले. यासाठी अत्यंत महत्त्वाचा व मानाचा 'व्हिक्टोरिया क्रॉस' हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

– रूपाली गोवंडे

## जोगळेकर, अरविंद मोरेश्वर

**भूसेना – मेजर जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक**

**३१ जानेवारी १९२८ – सप्टेंबर १९९७**

अरविंद मोरेश्वर जोगळेकर यांचा जन्म कानपूर येथे झाला. त्यांचे वडील हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये चीफ इंजिनिअर होते, तर आई गृहिणी होती. तसेच दोन भाऊ व दोन बहिणी होत्या. कुटुंबातील त्यांचे टोपणनाव 'दाजी' होते. ते अभ्यासात हुशार व

मनमिळाऊ होते. त्यांचे इयत्ता चौथीपर्यंतचे शालेय शिक्षण मुंबईतील गिरगावात विल्सन हायस्कूलमध्ये झाले. शाळेतल्या बऱ्याच मुलांचा कल सैन्यात जाण्याचा होता. अरविंद जोगळेकर यांनीही सैन्यात जाण्याचे ठरविले.

त्यानंतर त्यांनी डेहराडून येथील राष्ट्रीय सैनिकी प्रबोधिनीमधून (आय.एम.ए.) शिक्षण घेतले. पुण्यात खडकी येथील 'बॉम्बे सॅपर्स'मध्ये ते प्रशिक्षणासाठी दाखल झाले. तेथून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रम केले. त्यांना 'बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रूप'मध्ये पहिली नियुक्ती मिळाली. त्यानंतर १९५४ मध्ये त्यांचे बदली पंजाबमध्ये संग्रुर येथे झाली. त्यानंतर त्यांना इंग्लंडमध्ये बॉम्ब निकामी करण्याच्या प्रशिक्षणासाठी पाठविले गेले. त्यानंतर ते १९५५ ते १९६० या काळात पुण्यात सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयात (सी.एम.ई.-कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग) प्रशिक्षक होते. त्यानंतर ते काही काळ पूंछमधील भारत-पाक सीमेवर तैनात होते. त्यानंतर त्यांना तामीळनाडूमध्ये वेलिंग्टन येथील स्टाफ कॉलेजमध्ये विशेष प्रशिक्षण मिळाले. त्यानंतर ते गोव्यात काही काळ कार्यरत होते. नंतर लगेचच त्यांना आफ्रिकेत काँगो येथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतिसेनेच्या कार्यासाठी तेरा महिन्यांसाठी पाठविण्यात आले. १९६३ पासून काही काळ ते एका रेजिमेंटमध्ये भारताच्या पूर्व सीमेवर कार्यरत होते. त्यानंतर त्यांची नियुक्ती पुण्यात 'बॉम्बे सॅपर्स'चे कमांडट म्हणून झाली. १९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात त्यांचा सहभाग होता.

त्यानंतर जोगळेकर यांनी दिल्ली येथे राष्ट्रीय रक्षा महाविद्यालयात प्रशिक्षण प्राप्त केले. या प्रशिक्षणानंतर ते आसामात तेजपूर येथे 'बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन' मध्ये दोन वर्षे कार्यरत होते. त्यानंतर त्यांची दिल्ली येथे सेना मुख्यालयात नियुक्ती झाली. निवृत्त होताना ते पुण्यात भूसेनेच्या दक्षिण विभागाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

अभियंता म्हणून त्यांचे काम सैन्याला लागणाऱ्या पुलांचे बांधकाम, त्यावर देखरेख, तसेच सुरुंग पेरले जाऊ शकतील अशा भूभागांची टेहळणी आणि सुरुंग निकामी करणे आदी स्वरूपाचे होते.

जानेवारी १९८४ मध्ये ते निवृत्त झाले. त्याच वेळी त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. निवृत्त झाल्यानंतर गोल्फ खेळणे, पोस्टाची तिकिटे जमा करणे हे छंद त्यांनी जोपासले. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता.

ब्राँकोन्युमोनियाने त्यांचे निधन झाले. मेजर जनरल जोगळेकर यांचा मुलगा व्यापारी नौदलात आहे.

– रूपाली गोवंडे

ज

## जोगळेकर, जयवंत दत्तात्रेय
**संरक्षण विषयक लेखक**

☞ **मुख्य नोंद – पत्रकारिता आणि ललितेतर साहित्य खंड**

## जोगळेकर, प्रभाकर काशिनाथ
**भूसेना – मेजर जनरल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**२ डिसेंबर १९३०**

प्रभाकर काशिनाथ जोगळेकर यांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव येथे झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. कर्नाटकातील राणीबेन्नुर येथे त्यांचा दवाखाना होता व ते १९४१ ते १९४७ या काळात सैन्यात मेडिकल डिव्हिजनला होते. प्रभाकर जोगळेकर यांचे शालेय शिक्षण बेळगाव येथे झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण सांगलीला विलिंग्टन महाविद्यालयात व पुणे येथील वाडिया महाविद्यालयात झाले. त्यांच्या मनात सैन्यात जाण्याची आवड वडिलांमुळे निर्माण झाली होती. त्या प्रभावामुळे जोगळेकर हे राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये रुजू झाले.

वाडिया महाविद्यालयामधून बी.एस्सी. पदवी घेतल्यानंतर जुलै १९४९ मध्ये सैन्यात त्यांची निवड झाली व प्रशिक्षणासाठी त्यांना डेहराडूनला पाठवण्यात

आले. तेथे दोन वर्षे प्रशिक्षण घेतल्यावर जोगळेकर यांची ‘कोअर ऑफ सिग्नल्स’मध्ये (आर्मी कम्युनिकेशन ब्रँच) सेकंड लेफ्टनंट म्हणून नेमणूक झाली.

१९५१ मध्ये त्यांची पहिली नियुक्ती सिग्नल रेजिमेंटला झाली. बिनतारी व दूरध्वनी आणि इतर पद्धतीने सैन्याची संपर्कयंत्रणा सांभाळणे हे त्यांच्या रेजिमेंटचे काम होते. काश्मीरनंतर पंजाब, आसाम, झाशी अशा ठिकाणी त्यांनी काम केले. १९६५ मध्ये ते कमांडर झाले. १९६९ मध्ये प्रभाकर जोगळेकर यांना लेफ्टनंट कर्नल म्हणून बढती मिळाली. अर्थात ही नियुक्तीही सिग्नल रेजिमेंटमध्येच होती. १९७१ मधील भारत-पाक युद्धाच्या वेळी ते ‘सिग्नल डायरेक्टोरेट’मध्ये मुख्य समन्वयक या पदावर दिल्लीतील सेना मुख्यालयामध्ये कार्यरत होते. त्यानंतर १९७८ मध्ये ब्रिगेडियर पदावर पुण्यातील दक्षिण विभाग मुख्यालयामध्ये चीफ सिग्नल ऑफिसर म्हणून त्यांची नियुक्ती झाली.



त्यांनी वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिस स्टाफ कॉलेज येथे पदवी घेतली. त्यानंतर १९८० मध्ये ब्रिगेडियर असताना नॅशनल डिफेन्स कॉलेज येथे एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

त्यानंतर दिल्लीत सेना मुख्यालयात ते १९८४ मध्ये मेजर जनरल म्हणून सुरुवातीला डेप्युटी सिग्नल ऑफिसर इन चीफ या हुद्द्यावर काम करत होते. जोगळेकर यांना एका वर्षाने डेप्युटी कोड मास्टर जनरल हा हुद्दा मिळाला व डिसेंबर १९८६ मध्ये ते तिथूनच निवृत्त झाले.

१९८६ च्या जानेवारीमध्ये त्यांना त्यांच्या सैनिकी सेवेसाठी ‘परमविशिष्ट सेवा पदक’ प्रदान करण्यात आले. ह्या दोन युद्धांमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

निवृत्त झाल्यानंतर ते चार वर्षे गुजरातमध्ये ॲन्टिफ्रिक्शन बेअरिंग्ज कॉर्पोरेशनमध्ये जनरल मॅनेजर या पदावर काम करत होते.

१९९१ पासून त्यांचे पुण्यात वास्तव्य आहे. मेजर जनरल जोगळेकर सैन्यात असताना हॉकी आणि बास्केटबॉल खेळत असत. त्यांना स्क्वॉश, टेनिस व गोल्फ या खेळांचीही आवड आहे.

– रूपाली गोवंडे

## जोशी, अविनाश देवदत्त

**वायुसेना – एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक**

**२० डिसेंबर १९४६**



अविनाश देवदत्त जोशी यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे वडील सैन्य अभियांत्रिकी सेवेमध्ये (एम.इ.एस.) मोठ्या पदावर होते. वडिलांच्या फिरतीच्या नोकरीमुळे अविनाश यांचे शालेय शिक्षण पुणे, हैद्राबाद, विशाखापट्टणम आणि नागपूर येथे झाले. नागपूरच्या हडस् विद्यालयामधून त्यांनी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी हिस्लॉप महाविद्यालयामध्ये वैद्यकपूर्व पाठ्यक्रमाला प्रवेश घेतला. त्याच वेळी थेट प्रवेश पद्धतीतून १९६४ मध्ये त्यांना वायुसेनेत प्रवेश मिळाला.

वायुसेनेत एअरफोर्स ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कॉलेज (कोईंबतूर), ई.एफ.टी.यू. (नागपूर), पायलट ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट (अलाहाबाद), एअरफोर्स फ्लाइंग कॉलेज (जोधपूर), नं १ जेट ट्रेनिंग विंग (हकीमपेठ) अशा विविध संस्थांमध्ये त्यांचे प्रशिक्षण झाले. एल-५, एचटी-२, हावर्ड व व्हॅम्पायर अशा विविध विमानांवर त्यांना वैमानिक कौशल्याचे धडे मिळाले. या प्रत्येक पातळीवर त्यांनी सर्वांत कमी कालावधीत पहिले ‘सोलो’ उड्डाण केले. तसेच त्यात प्रथम क्रमांक पटकाविण्याचा विक्रम केला. अविनाश जोशी यांना ४ जून १९६७ रोजी नियुक्ती मिळाली व तत्कालीन

संरक्षणमंत्री स्वर्णसिंग यांच्या हस्ते त्यांना फ्लाइंग ट्रॉफी देण्यात आली. पुण्याच्या पहिल्या नेमणुकीनंतर हलवारा आणि पठाणकोट येथे असताना त्यांनी हंटर विमानांवर कामगिरी केली.

१९७१ च्या लढाईत अविनाश जोशी यांनी हंटर विमानातून सत्ताविसाव्या स्क्वॉड्रनमधून सरहद्दीपार सात आक्रमक उड्डाणे करून उरी आणि पूंछ भागातील पाकिस्तानी सैनिकी ठिकाणांवर हल्ले केले व 'सपोर्ट मिशन्स'ही पार पाडली. ह्या सर्व हल्ल्यांमधील उड्डाणपथकांचे त्यांनी नेतृत्व केले होते. ह्या कार्यासाठी त्यांचे 'मेन्शन इन डिस्पॅच' द्वारा कौतुक केले गेले.

जोशी यांनी तांबरम येथे फ्लाइंग इन्स्ट्रक्टरचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर १९७४ मध्ये हैद्राबादच्या 'एअरफोर्स अकॅडमी' मध्ये एच.जे.टी.-१६ ह्या विमानावर छात्रसैनिकांना शिकवण्याचे काम केले. त्यावेळच्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना 'कमांडर इन चीफ'ने प्रशस्तिपत्रक दिले. वायुसेनेच्या पश्चिम विभागाकडून त्यांना दोनदा प्रशस्तिपत्रके देण्यात आली. १९७६ मध्ये सदतिसाव्या स्क्वॉड्रनमध्ये असताना हंटर व मिग-२१ मधून त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये 'कलर फ्लाय पास्ट'ही सादर केले.

१९७९ साल हे त्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारे ठरले. श्रीनगरच्या खोऱ्यातले लढाऊ विमानाचे रात्रीचे पहिले उड्डाण त्यांनी केले. 'फायटर कॉम्बॅट लीडर'चे प्रशिक्षण त्यांनी १९८० मध्ये पूर्ण केले. १९८१ मध्ये मिग-२३, ~~बीएक्सच्या~~ प्रशिक्षणासाठी ते सोव्हिएट युनियनला गेले. त्यानंतर त्याच विमानांच्या दोनशेएकविसाव्या स्कॉड्रनमध्ये 'फ्लाइट कमांडर' म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या वेळी त्यांनी लढाऊ विमानांच्या डावपेचांच्या तंत्रात सुधारणा केली. अनेक नव्या शस्त्रास्त्रांची चाचणी त्यांनी स्वत: पार पाडली. श्रीनगरच्या खोऱ्यात उड्डाणाचे नवे प्रयोग केले. २३ एप्रिल १९८४ रोजी लेह या समुद्रसपाटीपासून ३००० मीटर उंचीवर असणाऱ्या विमानतळावर सर्वप्रथम मिग-२३ हे विमान उतरवण्याचा आणि तिथून उड्डाण भरण्याचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. सोव्हिएट युनियनच्या वैमानिकांनीही ह्या अवघड कामगिरीचे कौतुक केले. १९८५ मध्ये त्यांना दोनशेएकविसाव्या स्क्वॉड्रनची कमांड मिळाली.

१९८४ मध्य ओझर येथील बी.आर.डी.तील अल्पावधीच्या वास्तव्यात रशिराकडून मिळणाऱ्या नव्या विमानांची तपासणी करण्याचे काम अविनाश जोशी यांनी चाचणी वैमानिक ('टेस्ट पायलट') म्हणून केले. त्यांच्या नेतृत्वाखाली ह्या स्क्वॉड्रनने अनेक नवी कामे पार पाडली. अधिक उंचीवर केल्या जाणाऱ्या आक्रमणांच्या चाचण्या पीर पांजाल भागातील तोष मैदान रेंज व लडाखमधील पंधरा हजार फुटांच्या उंचीवरील कारसो रेंजवर त्यांनी स्वत: पार पाडल्या. वायुसेनेतील निवडक पथकांना अशा 'हार आल्टिट्यूड फायरिंग'संबंधी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याचे कामही त्यांनी केले. 'फोटो रिकॉनिसन्स', रात्री केली जाणारी अवघड उड्डाणे व इतर गुप्त कामगिऱ्याही ह्याच कालावधीत पार पाडल्या. 'ऑपरेशन मेघदूत'ही यशस्विरीत्या पार पाडले गेले. ह्या कामांसाठी, त्यांची कमांड पूर्ण झाल्यावर त्यांना 'वायुसेना' पदक देण्यात आले. पुढे २००५ च्या जुलैमध्ये ह्याच स्क्वॉड्रनचे कमोडोर कमांडंट म्हणून त्यांची नेमणूक झाली.



वायुसेना भवन व वेस्टर्न एअर कमांडमधील चार वर्षांच्या कामानंतर १९९१ मध्ये महू येथे हार कमांड (आर्मी) अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर राजस्थानमधील उत्तरलाई विमानतळाचे नेतृत्व त्यांच्यावर सोपवण्यात आले. त्यानंतर महूच्या 'कॉलेज ऑफ कॉम्बॅट'मध्ये त्यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले व बीदर (कर्नाटक) येथील विमानतळाची कमांडरशिप सांभाळली. 'सूर्यकिरण' ह्या विमानपथकाच्या उभारणीचे काम त्यांनी मोठ्या कौशल्याने पार पाडले. परंतु त्यांच्या आवडीचे वैमानिक प्रशिक्षणाची उड्डाणे करण्याचे काम

त्यांनी सोडले नाही. फ्लाइंग ए.ओ.सी. अशी त्यांची ख्याती झाली ती त्यामुळेच!

१९८८ मध्ये प्रख्यात नॅशनल डिफेन्स कॉलेजमध्ये एक वर्षाचा अभ्यासक्रम केल्यावर सिकंदराबाद येथील 'कॉलेज ऑफ एअर वॉरफेअर'मध्ये त्यांनी 'डेप्युटी कमांडंट'चा कार्यभाग सांभाळला. त्यानंतर दिल्लीला 'असिस्टंट चीफ ऑफ द एअर स्टाफ इन्स्पेक्शन व फ्लाइट सेफ्टी' व ए.सी.ए.एस. पर्सोनेल म्हणून काम केल्यावर २००४ मध्ये एअर मार्शलच्या बढतीच्या रँकवर गांधीनगरला, साउथ वेस्टर्न एअर कमांडमध्ये 'एस.ए.एस.एस.ओ.' म्हणून त्यांची बदली झाली. तिथे त्यांनी पोखरण रेंजवरील एअर पॉवर डेमॉन्स्ट्रेशन व मुंबईला झालेल्या अवेअरनेस कॅम्पेन यांचे आयोजन व नियंत्रण केले. मुंबईच्या कॅम्पेनमध्ये प्रथमच वायुसेना व एअर इंडियाच्या विमानांनी एकत्र उड्डाण केले होते. गांधीनगरला असताना, इस्रायलला राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीचा अभ्यासक्रम सुप्रसिद्ध गॅलिली कॉलेजमध्ये करण्याची संधी त्यांना मिळाली.

ज

ईस्टर्न एअर कमांडचे 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' (एओसीइनसी) चे महत्त्वपूर्ण पद त्यांना नोव्हेंबर २००४ मध्ये देण्यात आले. इथल्या त्यांच्या वास्तव्यात त्यांच्या कमांडमधील प्रशिक्षणाच्या व इतर कार्यांच्या स्तरात प्रगती घडली. लढाऊ विमानांच्या कामगिरीसाठी प्रथमच नागरी विमानतळांचा वापर झाला. ईशान्येकडील सात राज्यांच्या हवाई सुरक्षेची मोठी जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली.

त्यानंतर २००५ मध्ये त्यांची नियुक्ती दिल्लीला, 'स्ट्रॅटेजिक फोर्स कमांड'चे 'कमांडर इन चीफ' म्हणून केली गेली. भूसेना, नौसेना व वायुसेना ह्यांना एकत्रित करून निर्माण केलेली ही कमांड आण्विक शस्त्रास्त्रांसंबंधी कार्यासाठी बनवली होती. प्रत्यक्ष पंतप्रधान, त्यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व तिन्ही सेनाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली हे पद सांभाळण्यात ते यशस्वी झाले. ईस्टर्न एअर कमांड व स्ट्रॅटेजिक फोर्स कमांडमधील यशस्वी कामगिरीनंतर मार्च २००६ मध्ये त्यांच्या असाधारण कर्तृत्वाचा सन्मान म्हणून राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम ह्यांच्या हस्ते त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदका'ने गौरवले गेले.

त्याच वर्षी राष्ट्रपतींचे मानद ए.डी.सी. म्हणूनही त्यांचे नाव घोषित केले होते. २००६ वर्षाच्या अखेरीस ४० वर्षांची गौरवपूर्ण सेवा संपवून ते निवृत्त झाले.

– गीतांजली जोशी

## जोशी, पंकज शिवराम

**भूसेना – लेफ्टनंट जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक**

**९ सप्टेंबर १९४३ – २ जुलै २००९**



पंकज शिवराम जोशी भूसेनेच्या अठराव्या गोरखा रायफल्सच्या पलटणीमध्ये कॅप्टन पदावर कार्यरत होते. ही पलटण सिक्कीममधील भारत-चीन सीमेवरील आघाडीच्या १३ हजार ५२५ फुटांवरील ठाण्यामध्ये तैनात होती. १९६५ च्या भारत-पाक युद्धात या पलटणीने खेमकरण विभागात कमालीची मर्दुमकी गाजवली होती.

१ ऑगस्ट १९६७ ची ढगाळ आणि पावसाळी पहाट. भारत-चीन सीमेवर पंकज जोशी यांनी नुकताच मोर्चाचा ताबा घेतला होता. त्यांच्या कंपनीला त्यांच्या भोवतालच्या भागात पेरलेले सुरुंग निकामी करण्याच्या सूचना मिळाल्या. त्यानुसार काम चालू झाले. त्या दिवशी सकाळी जोशी यांनी भूसुरुंगाच्या क्षेत्रात नुकताच प्रवेश केला होता.

अचानक त्यांच्या पायाखाली मोठा स्फोट झाला. एका सुरुंगावरच त्यांचा पाय पडला होता. ते हवेत उडून जमिनीवर कोसळले. त्यांचा एक पाय

गुडघ्याखाली तुटला होता तर दुसऱ्या पायाचा, नडगीखाली चेंदामेंदा झाला होता. पुढील पंधरा दिवसांतच एकामागून एक केलेल्या शस्त्रक्रियांत त्यांचा दुसरा पायही कापावा लागला.

या अपघातानेही ते डगमगले नाहीत. पुण्याच्या आर्टिफिशिअल लिंब सेंटरमध्ये त्यांनी दोन्ही पाय बसवून घेतले. हळूहळू सायकल चालवणे, पोहणे, अगदी गोल्फ खेळणेही त्यांनी सुरू केले. नंतर १९७१ मध्ये त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून स्पॅनिश भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

त्याच कालावधीत कुणीतरी त्यांना स्टाफ कॉलेज कोर्स करण्यासाठी सुचवले. सैन्यातील सेवेसाठी हा अभ्यासक्रम महत्त्वाचा मानला जातो. या कोर्सनंतर अर्थातच त्यांना सैन्याच्या मुख्य प्रवाहात परत येता आले. नंतर मध्य प्रदेशातील महू येथील 'कॉलेज ऑफ कॉम्बॅट' या शिक्षण संस्थेत प्रशिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. याच काळात त्यांना भरपूर वाचन करण्याची संधी मिळाली.

नेमका अभ्यास आणि कुशाग्र बुद्धिमत्ता यांमुळे ते चांगले प्रशिक्षक म्हणून गणले जाऊ लागले. रशियन भाषेतून त्यांनी बी.ए.ची पदवी मिळवली. मद्रास (चेन्नई) विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी. पदवी घेतली, तसेच नॅशनल डिफेन्स युनिव्हर्सिटी, वॉशिंग्टन डी.सी, येथून त्यांनी 'नॅशनल सिक्युरिटी मॅनेजमेंट' या विषयात पदविकाही घेतली. स्वयंचलित चिलखती वाहने त्यांना मिळाली होती. त्यामुळे जलदगतीने शत्रूला नामोहरम करण्याची क्षमता प्राप्त झाली होती. एकदा चिलखती वाहनात बसले की कोणत्याही लढाईत भाग घेणे शक्य आहे याची जोशी यांना खात्री वाटत होती. आता पुन्हा एकदा सैन्याच्या मुख्य प्रवाहात येण्याची ते वाट पाहू लागले.

जोशी यांना ही संधीही लवकरच चालून आली. एके दिवशी गोल्फ खेळताना त्यांना एका वैद्यकीय तज्ज्ञाने पाहिले आणि पायदळातील सेवेसाठी त्यांची शिफारस केली. सुदैवाने भूसेनाप्रमुख सुंदरजी यांचा त्याला दुजोरा मिळाला. ते पुन्हा पलटणीत दाखल झाले. पुढे कर्नल, ब्रिगेडिअर, मेजर जनरल ही पदेही त्यांनी मिळवली. एका आर्म्ड डिव्हिजनचे त्यांनी नेतृत्व केले. सरते शेवटी 'चीफ ऑफ इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ' हा तिन्ही दलांशी संलग्न असलेला लेफ्टनंट जनरल हा सर्वोच्च हुद्दाही त्यांनी सांभाळला. २००३ मध्ये ते या पदावरून निवृत्त झाले.

– वर्षा जोशी-आठवले

**संदर्भ :**

*१. 'अथश्री' नियतकालिक; मे २०१०.*


* * *

ज

# ट

## टिपणीस, अनिल यशवंत

**वायुसेना - एअर चीफ मार्शल**
**परमविशिष्ट सेवा, अतिविशिष्ट सेवा, वायुसेना पदक**
**१५ सप्टेंबर १९४०**



अनिल यशवंत टिपणीस यांचा जन्म नाशिकजवळील देवळाली येथे झाला. देवळाली येथील बार्न्स विद्यालयात त्यांचे शालेय शिक्षण पार पडले. जानेवारी १९५६ मध्ये राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एन.डी.ए.) पंधराव्या तुकडीमध्ये त्यांची निवड झाली. त्यांचे वडीलही सैन्याधिकारी होते. त्यामुळे घरातूनही सैन्यातल्या प्रवेशाला कायमच पाठिंबा होता. लष्करी प्रशिक्षण पूर्ण करून १९५९ च्या जानेवारीमध्ये उड्डाण प्रशिक्षणार्थी म्हणून त्यांनी एअर फोर्स फ्लाइंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. ते गोल्फमध्ये निष्णात असून मैदानी खेळांची त्यांना आवड आहे.

टिपणीस यांना लढाऊ वैमानिक म्हणून २८ मे १९६० रोजी नियुक्ती मिळाली. वैमानिकी प्रशिक्षणात सर्वोत्कृष्ट ठरल्याने त्यांना 'मजूमदार ट्रॉफी' मिळाली. त्यानंतर टिपणीस विविध लढाऊ स्क्वॉड्रन्समध्ये लढाऊ वैमानिक म्हणून अग्रिम हवाई मोर्च्यांवर कार्यरत होते. त्यांची पहिली नियुक्ती 'हंटर' स्क्वॉड्रनमध्ये झाली.

१९६३ मध्ये भारतात मिग-२१ विमाने आणून पहिली 'सुपरसॉनिक स्क्वॉड्रन' म्हणून अठ्ठाविसावी स्क्वॉड्रन निर्माण करणाऱ्या पहिल्या वैमानिकांपैकी ते एक होते. याच स्क्वॉड्रनमध्ये १९६५ च्या भारत-पाक युद्धात मिग-२१ चे लढाऊ वैमानिक म्हणून त्यांचा सक्रिय सहभाग होता.

'पायलट-अटॅक इन्स्ट्रक्टर' होण्याच्या प्रशिक्षणात पुन्हा सर्वोत्तम ठरल्याने, त्यांना १९६६ मध्ये 'नरोन्हा ट्रॉफी' मिळाली. भारत सरकारतर्फे इराकी वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी, 'पायलट-अटॅक इन्स्ट्रक्टर' म्हणून ते जानेवारी १९७० मध्ये इराकला गेले.

इराकहून परतल्यावर मिग-२१ विमानांच्या पंचेचाळिसाव्या स्क्वॉड्रनमध्ये ते फ्लाइट कमांडर म्हणून रुजू झाले.

१९७३ मध्ये भारतीय वायुसेनेच्या 'टॅक्टिक्स अँड एअर कॉम्बॅट डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट'च्या (टॅकडे) उड्डाण प्रशिक्षण अभ्यासक्रमात सर्वोत्तम ठरल्याने त्यांना 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' (मानाची तलवार) मिळाली व ते त्या संस्थेत फ्लाइट कमांडर म्हणून नियुक्त झाले. त्यांनी हवाई युद्धाची योजना व लढाऊ वैमानिकी रणनीती ह्या विषयांवर अध्ययन व संशोधन केले.

वेलिंग्टन येथे १९७५ मध्ये डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये त्यांनी सैनिकी प्रशासनाचे प्रशिक्षण पूर्ण केले. जुलै १९७७ मध्ये सुधारित 'मिग-२१ बिझ' विमानांच्या तेविसाव्या स्क्वॉड्रनचे ते विंग कमांडर दर्जाचे कमांडिंग ऑफिसर झाले. 'इंडो-सोव्हिएट जॉइंट स्पेस मिशन'साठी निवड झालेल्या चार अधिकाऱ्यांपैकी ते एक होते. त्यांनी सर्व प्रशिक्षण यशस्विरीत्या पूर्णही केले, त्यांची अंतिम निवडही झाली; पण त्यांना राखीव दलात ठेवण्यात आले.



**कारगील युद्धात मीग-२१ या लढाऊ विमानातून हल्ल्याच्या मोहिमेवर स्वत: निघालेले एअर चीफ मार्शल टिपणीस.**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एन.डी.ए.) टिपणीस हे चीफ इन्स्ट्रक्टर (एअर) आणि बटालियन कमांडर होते. १९८३ मध्ये ग्रूप कॅप्टन असताना मिराज-२००० प्रकल्पाचे गटप्रमुख म्हणून त्यांची नेमणूक फ्रान्समध्ये झाली. मिराज-२००० विमाने भारतात आणण्यात त्यांचा सर्वांगीण सहभाग व पुढाकार होता.

तीन वर्षांनी भारतात परतल्यावर त्यांची 'एअर कमोडोर' म्हणून बढती झाली व ते मिराज-२००० विमानांची दोन स्क्वॉड्रन्स असणाऱ्या, ग्वाल्हेरच्या वायुसेना तळाचे 'एअर ऑफिसर कमांडिंग' झाले. १९८९ मध्ये त्यांनी दिल्लीच्या 'नॅशनल डिफेन्स कॉलेज'मधील प्रशिक्षण पूर्ण केले.

एअर व्हाइस मार्शल म्हणून जून १९९२ मध्ये टिपणीस यांना पदोन्नती मिळाली. वायुसेना मुख्यालयात, 'असिस्टंट चीफ ऑफ दि एअर स्टाफ' म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जम्मू आणि काश्मीर विभागाचे 'एअर ऑफिसर कमांडिंग' म्हणून त्यांनी जून १९९३ मध्ये पदभार स्वीकारला. प्रत्येक पदावर कार्यरत असताना त्यांनी कौशल्य व क्षमता यांचे मापदंड स्थापन केले. सप्टेंबर १९९४ मध्ये पदोन्नती होऊन ते 'एअर मार्शल' झाले. प्रथम वायुसेनेच्या पूर्व विभागाचे व फेब्रुवारी १९९५ मध्ये ते पश्चिम विभागाचे 'सीनियर एअर स्टाफ ऑफिसर' झाले. ऑगस्ट १९९५ मध्ये ते वायुसेनेच्या अग्रिम व महत्त्वपूर्ण पश्चिम विभागाचे 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' झाले. एप्रिल १९९७ मध्ये ते वायुसेना उपाध्यक्ष व दि. ३१ डिसेंबर १९९८ रोजी 'एअर चीफ मार्शल' झाले.

वायुसेनाध्यक्ष असतानाही ते सर्वत्र सतत स्वत: उड्डाण करीत. १९९९ च्या कारगिल युद्धात त्यांनी मिग-२७ व मिराज-२००० विमानांमध्ये स्वत: उड्डाणे करून गौरवशाली इतिहास रचला. पदावर असलेल्या वायुसेनाध्यक्षाने, स्वत: प्रत्यक्ष हवाईयुद्धात उतरून, वैमानिक म्हणून सक्रिय होऊन भाग घेतला. टिपणीस यांच्या नेतृत्वाखाली मिराज-२००० च्या वैमानिकांनी शत्रूची दाणादाण उडवून दिली. शत्रूची सर्वांत मोठी 'मंथो ढालो' येथील छावणी अगदी जमीनदोस्त करून टाकली. शत्रूचे रसदीचे सर्व मार्ग नष्ट केले. येथूनच कारगिल युद्धाला, आपल्या दृष्टीने विधायक वळण लागले व पाकिस्तानचा पराभवची निश्चिती झाली.

अनिल टिपणीस यांनी उत्तम व उत्कृष्ट नेतृत्व केले. तसेच त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाचा गौरव म्हणून त्यांना 'वायुसेना पदक', 'अतिविशिष्ट सेवा पदक' व 'परमविशिष्ट सेवा पदक' हे सन्मान प्राप्त झाले. ते राष्ट्रपतींचे मानद एडीसीही होते. ते एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुविख्यात रक्षा विशेषज्ञ आहेत.

– विंग कमांडर (निवृत्त) अशोक मोटे

* * *

ट

## डायस, फ्रान्सिस तिबुर्तीयस

**भूसेना - लेफ्टनंट जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, वीरचक्र**

**४ ऑक्टोबर १९३४**



फ्रान्सिस तिबुर्तीयस डायस यांचा जन्म पुणे येथे झाला. सी. एन. डायस हे त्यांचे वडील. फ्रान्सिस यांचे शिक्षण मुंबईतील वांद्रे येथे सेंट स्टॅनिसलस विद्यालयात झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ४ डिसेंबर १९५४ रोजी ते अकराव्या गुरखा रायफल्समध्ये दाखल झाले.

१९७१ मधील पाकिस्तान युद्धात त्यांची बटालियन पूर्वेकडील सीमेवर तैनात होती. त्यावेळी पाकिस्तानविरुद्ध घनघोर युद्धास प्रारंभ झाला. १२ डिसेंबर १९७१ रोजी फ्रान्सिस यांना शत्रूने काबीज केलेल्या ठाण्यावर हल्ला करण्याचा आदेश देण्यात आला.

पुन्हा दुसऱ्या दिवशी, १३ डिसेंबरला त्यांच्या बटालियनला पाकिस्तानचे दोन पूल ताब्यात घेण्याची जबाबदारी देण्यात आली, तर सलग तिसऱ्या दिवशी त्यांना बोग्रा या गावाचा काही भाग ताब्यात घेण्याचा आदेश देण्यात आला.

फ्रान्सिस डायस यांच्या नेतृत्वाखालील बटालियनने सलग तिन्ही दिवस त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी चोखपणे बजावली. त्यांच्या या अतुलनीय शौर्यामुळे पाकिस्तानी सैन्याचे जबर नुकसान झाले. त्या



**पंतप्रधान इंदिरा गांधींसोबत संवाद साधताना लेफ्ट. जन. डायस**

पाठोपाठ महास्थाना येथे त्यांनी शत्रूच्या मुख्यालयावर हल्ला चढवीत त्यांच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. पाठोपाठ त्यांनी शत्रूने उभारलेले अनेक पूलही स्फोटकांद्वारे उद्ध्वस्त केले.

त्यांच्या बटालियनच्या देदीप्यमान कामगिरीमुळे भारतीय सैन्याला बोग्रा हे महत्त्वाचे गाव ताब्यात घेणे शक्य झाले. तसेच भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य गाजवून नेत्रदीपक यश मिळविले आणि प्रचंड संख्येने शत्रूसैनिकांना कैद केले.

या स्पृहणीय कामगिरीमुळे फ्रान्सिस डायस यांना १२ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' सन्मान घोषित करण्यात आला.

सेवेच्या पुढील काळात ते लेफ्टनंट जनरल पदापर्यंत पोहोचले. तसेच नंतर त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' व 'परमविशिष्ट सेवा पदका'नेही सन्मानित करण्यात आले.


\- वर्षा जोशी-आठवले/धनंजय बिजले

## डिकास्टा, ॲलन अल्बर्ट

**वायुसेना - ग्रूप कॅप्टन**

**महावीरचक्र**

**जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



ॲलन अल्बर्ट डिकास्टा यांनी एका बॉम्बफेकी विमानांच्या स्क्वॉड्रनचे कमांडिंग ऑफिसर असताना ४ डिसेंबर १९७१ रोजी शत्रूच्या रावळपिंडी विमानतळावर सर्वप्रथम हल्ला चढविला. दुसऱ्या दिवशी त्यांनी चिस्ती की मंडी या ठिकाणी तीन रणगाडे उद्ध्वस्त केले.

तिसऱ्या दिवशी डेरा बाबा नानकजवळ एकत्रित झालेल्या शत्रूच्या रणगाड्यांवर, विमानविरोधी तोफांच्या तुफान गोळीबारास न जुमानता, केलेल्या हवाई हल्ल्याचे त्यांनी नेतृत्व केले.

७ डिसेंबर १९७१ रोजी डिकास्टा यांनी सुलेमानकी भागात कमी उंचीवरून उड्डाण करीत छायाचित्रांद्वारे टेहळणीचे विशेष कार्य केले आणि त्याचबरोबर नारोबाल रेल्वे स्टेशनवरील हल्ल्याचे नेतृत्व करून स्वत: बऱ्याच रेल्वे वाघिणी आणि संस्थांचे नुकसान करून त्या उद्ध्वस्त केल्या. त्यानंतर त्यांनी अनेक टेहळणीसाठीची विशेष उड्डाणे केली आणि शत्रूबद्दलची मोठी माहिती जमा केली.

त्यांनी रायविंढ आणि कसूर-लाहोर रेल्वे मार्गावर हल्ले करून शत्रूच्या विमानविरोधी तोफांच्या प्रतिकारास व पाकिस्तानच्या हवाई विरोधास न जुमानता ठरविलेले प्रत्येक लक्ष्य उद्ध्वस्त केले.

संपूर्ण युद्धकाळात विंग कमांडर डिकास्टा यांनी दाखविलेल्या शौर्य, दृढनिश्चय, नेतृत्व आणि युद्धकौशल्याबद्दल त्यांना 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

- रूपाली गोवंडे

* * *

ड

# त

## तारापोर, अर्देशिर बुरसारजी

**भूसेना - लेफ्टनंट कर्नल**

**परमवीरचक्र**

**१८ ऑगस्ट १९२३ - १६ सप्टेंबर १९६५**



अर्देशिर बुरसारजी तारापोर यांचा जन्म मुंबई येथे झाला. १९६५ च्या भारत-पाक युद्धामध्ये अर्देशिर तारापोर यांनी पूना हॉर्स रेजिमेंटमधून मरेपर्यंत लढत दिली होती. तारापोर यांचे पूर्वज शिवाजी महाराजांच्या सेवेत अधिकारी होते. त्यांच्या शौर्यामुळेच शिवाजी महाराजांनी त्यांना 'तारापूर'सह १०० गावांची मनसब दिली. त्यामुळेच त्यांचे आडनाव 'तारापोर' पडले.



पुण्यातल्या सरदार दस्तूर शाळेत तारापोर यांचे प्राथमिक शिक्षण झाले. अभ्यासापेक्षा पोहणे, कसरती, व्यायाम, टेनिस, क्रिकेट, मुष्टियुद्ध यांत त्यांना अधिक रस होता. ते शाळेचे कॅप्टन होते. १९४० मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी हैद्राबाद संस्थानात सैन्यदलातील नोकरीसाठी अर्ज केला.

अर्देशिर यांनी देशसेवेसाठी सैन्यदलात जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी हैद्राबाद संस्थानातर्फे गोवळकोंडा येथील ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूलमध्ये शिक्षण घेतले. १ जानेवारी १९४२ रोजी सातव्या हैद्राबाद इन्फ्रन्ट्रीमध्ये त्यांची नेमणूक झाली. पण सशस्त्र दलामध्ये जायचे त्यांचे स्वप्न होते.

अर्देशिर यांनी ग्रेनेड थ्रोइंग रेंजवर शिक्षण घेताना दाखवलेल्या प्रसंगावधानतेमुळे आणि शौर्यामुळे त्यांचे ते स्वप्न पूर्ण झाले. त्यांचे शौर्य पाहून त्यांच्या बटालियनची तपासणी करणारे कमांडर इन चीफ मेजर जनरल अल. एड्रोस यांनी अर्देशिर यांचे कौतुक केले आणि अर्देशिर यांची आर्मर्ड डिव्हिजनला बदली करण्याची विनंती मान्य केली. 'हैद्राबाद इम्पिरिअल सर्व्हिस लान्सर्स-१'मध्ये त्यांची बदली झाली. दुसऱ्या महायुद्धामध्ये त्यांनी मध्यपूर्वेत काम केले. तिथेही त्यांचे नैतिक धैर्य दर्शविणारे, रेजिमेंटशी असलेली बांधीलकी स्पष्ट करणारे प्रसंग घडले. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्यावर ते भारतीय भूसेनेत 'पूना हॉर्स' या रेजिमेंटमध्ये रुजू झाले.

भारत-पाक युद्धात ११ सप्टेंबर १९६५ रोजी 'पूना हॉर्स' या पलटणीला पाकिस्तानातल्या सियालकोट भागातील लिफोरावर ताबा मिळवण्याची महत्त्वाची कामगिरी सोपवली होती. या पलटणीचे नेतृत्व त्यांनी केले होते. तारापोर आपल्या पलटणीसह लिफोरा व चाविंदामध्ये घुसले, तेव्हा शत्रूने तोफांचा भडिमार केला. त्यांनी पलटणीच्या अग्रस्थानी निश्चल राहून शत्रूचा हल्ला परतवला. इन्फन्ट्री बटालियनच्या साहाय्याने त्यांनी आपल्या एका स्क्वॉड्रनसह लिफोरावर हल्ला केला. हे सगळे होत असताना शत्रुपक्षाकडून सतत तोफांचा भडिमार होत होता. त्यात जखमी झाले तरीही ते लढत होते.

पुढच्या तीनच दिवसांनी वझिरालीवर ताबा मिळवण्यासाठीही त्यांनी पलटणीचे नेतृत्व केले. स्वत:च्या दुखापतीची पर्वा न करता ते लढत होते. त्या दिवशी चाविंदा इथे शत्रू कडवा प्रतिकार करत होता. शत्रूला नमवण्यासाठी चाविंदाच्या मागे मोठ्या ताकदीची फौज पाठवण्याचे आणि त्या जागेचा इतर

ठिकाणांशी असलेला संपर्क तोडण्याचे पहिल्या कोअरच्या जनरल ऑफिसर कमांडिंगतर्फे ठरवण्यात आले. त्याकरिता मग तारापोर यांच्या नेतृत्वाखालील पूना हॉर्स रेजिमेंट आणि आठव्या गढवाल रायफल्स फौजांना जस्सोरा-बुतुर-डोगरांडी या भागात पार रोवायला सांगण्यात आले. त्यांनी हा भाग काबीज केला. ते ज्या रणगाड्यावर होते, त्याच्यावर अनेकदा हल्ला झाला. पण पारदळाला शत्रूवर हल्ला करता यावा यासाठी त्याच परिस्थितीत रणगाड्यातून ते लढत राहिले आणि इतरांसमोर त्यांनी आदर्श ठेवला.

त्या आदर्शाने प्रभावित होऊन पूना हॉर्स रेजिमेंटने जोमाने लढाई केली. या लढाईत शत्रूचे साठ रणगाडे नष्ट झाले, तर भारताचे केवळ नऊ रणगाडे नष्ट झाले. मात्र, तारापोर यांच्यासारखा धीरोदात्त जवान भारताला गमवावा लागला. सातत्याने सहा दिवस शर्थीचा लढा देत अद्वितीय कामगिरी करणाऱ्या तारापोर यांना त्यांच्या अतुलनीय शौर्याबद्दल मरणोत्तर ‘परमवीरचक्र’ देऊन गौरवण्यात आले.

– पल्लवी गाडगीळ

* * *

त

# थ

## थोरात-पाटील, शंकर पांडुरंग

**भूसेना - लेफ्टनंट जनरल**
**अशोकचक्र, कीर्तिचक्र, पद्मश्री**
**१२ ऑगस्ट १९०६ - १० ऑगस्ट १९९२**



शंकर पांडुरंग थोरात-पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यात शाहूवाडी तालुक्यातील वडगाव येथे झाला. थोरात शेतकरी कुटुंबातील असले तरी त्यांचे वडील डॉ. पांडुरंग चिमणाजी पाटील उच्चविद्याविभूषित होते. शंकर थोरात यांचे शिक्षण पुण्यातील पूना हायस्कूल आणि नूतन मराठी विद्यालयात झाले. १९२३ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२४ ते १९२६ दरम्यान इंग्लंडमधील सॅण्डहर्ट येथील रॉयल मिलिटरी कॉलेजमध्ये त्यांचे सैनिकी शिक्षण झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश भारतीय सैन्यात काम करताना शिस्त, संघटना आणि तंत्रज्ञान अशा सर्व गोष्टी थोरात यांनी कष्टपूर्वक आत्मसात केल्या. १९३५ मध्ये त्यांच्या पलटणीला जुन्या वायव्य सरहद्द प्रांतात धाडण्यात आले. तेथील खैबर खिंडीच्या भोवतालच्या प्रदेशात पठाणी टोळ्यांशी सतत चकमकी होत असत. येथेच थोरात यांच्या पलटणीचे मुख्य कार्यालय होते. या वेळी झालेल्या सैनिकी कारवाईत थोरात यांच्या कणखर नेतृत्वाखाली पलटणीने पठाणांच्या टोळीचे कंबरडे मोडले. अचूक टेहळणी व मनोधैर्याच्या जोरावर थोरात यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

१९३९ मध्ये दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. सैनिकी अधिकाऱ्याने कायमच युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी धडपड करावी, असे थोरात यांचे मत होते. याचा प्रत्यय दुसऱ्या महायुद्धाच्या रणधुमाळीतही आला. कोहीमाला जपानी सैन्याने घातलेल्या वेढ्यात तीन भारतीय पलटणी अडकलेल्या होत्या. जपान्यांचा वेढा मोडून आपल्या पलटणींची सुटका करण्यासाठी हिंदी सैनिकांनी मोठ्या चकमकींना तोंड दिले. त्यात थोरात यांच्या पलटणीने मोठे कर्तृत्व दाखविले. इंफाळ तर भारतापासून जवळजवळ तुटल्यातच जमा होते. तेथेही थोरात यांनी अतुलनीय कामगिरी बजावून इंफाळ वाचविले.

दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेशाच्या आघाडीवर केलेला रणसंग्राम हा युद्धशास्त्रातील एक अजोड इतिहासच मानला जातो. थोरातांनी तेथे अतिशय जिद्दीने विजयश्री खेचून आणली. नेतृत्व, चिकाटी, कणखरपणा आणि उत्कृष्ट डावपेच वापरल्याबद्दल थोरातांना त्या काळी 'डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस ऑर्डर' हे सध्याच्या 'महावीरचक्रा'च्या दर्जाचे शौर्यपदक बहाल करण्यात आले.

भारताची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी असावी असा निर्णय १९४५ मध्ये घेण्यात आला. ही योजना तयार करून कार्यवाही करण्यासाठी थोरात यांना ब्रिगेडियरपदी पदोन्नती देण्यात आली. केवळ थोरात यांच्या प्रयत्नामुळेच ही प्रबोधिनी महाराष्ट्रात पुण्यातील खडकवासला येथे उभी राहिली.

देशाची फाळणी झाल्यानंतर थोरात यांनी सीमेवर शांतता प्रस्थापित करण्याचे मोठे कार्य केले. प्रक्षोभक आणि स्फोटक वातावरणाच्या राजधानीत दिल्ली एरिया

कमांडरच्या पदावर असताना तेथील परिस्थिती कोणाची भीडभाड न राखता थोरातांनी कणखरपणे हाताळली.

याच काळात शेकडो संस्थाने भारतात विलीन झाली. तेव्हाचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी ही नाजूक समस्या कणखरपणे व कुशलतेने सोडविली. त्या वेळी विविध संस्थानांच्या सैन्यांतील आवश्यक त्या अधिकारी व सैनिकांना भारतीय सैन्यात सामावून घेण्याचे काम थोरात यांच्यावर सोपविण्यात आले. ते त्यांनी समर्थपणे पार पाडले.




**कोरियातील मोहिमेचे नेतृत्व करताना लेफ्ट. जन. थोरात**

१९५३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने भारत सरकारला कोरियामध्ये 'कस्टोडियन फोर्स' पाठविण्याची विनंती केली. या जबाबदारीच्या कामावर कमांडर म्हणून थोरातांची नियुक्ती झाली. त्यांच्या आधिपत्याखाली पाच हजार जणांची सेना होती. अमेरिका, चीन, दक्षिण व उत्तर कोरिया यांच्यातील धुमश्चक्रीत कोरियाचा सत्यानाश झाला होता. उत्तर कोरियाचे पंचावन्न हजार कैदी काबूत ठेवून त्यांच्या पुनर्वसनाच्या व्यवस्थेची अतिशय जोखमीची जबाबदारी थोरात यांच्या शिरावर येऊन पडली.

एका स्फोटक प्रसंगी उत्तर कोरियन कैद्यांच्या चिडलेल्या तुकडीने एका भारतीय अधिकाऱ्याला ओलीस धरून हाताला मिळेल त्या साधनांनी थोरात व त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला केला.

थोरात यांनी ही कठीण परिस्थिती अशा कौशल्याने हाताळली, की जिवावर उठलेल्या कैद्यांचा जथा थोरात यांचा जयघोष करीत माघारी गेला. सर्व जगात थोरात यांच्याबरोबरच देशाचीही मान उंचावली गेली. या असामान्य धैर्यासाठी त्यांना 'अशोकचक्र' (वर्ग २) हा वीरसन्मान देण्यात आला. त्यानंतर त्यांची पूर्व पंजाबच्या एरिया कमांडरपदी नियुक्ती झाली. फाळणीमध्ये मुख्यत्वे सिंध व पंजाब प्रांताचे तुकडे पडले होते. तेव्हा राजस्थानपासून ते पूर्व व पश्चिम पंजाबमधील पठाणकोटपर्यंत संरक्षण रेषा आखण्याचे व या नव्या सरहद्दीवर संरक्षक ठाणी बांधण्याचे जोखमीचे व दूरगामी परिणाम करणारे काम थोरात यांनी तडीस नेले.

थोरातांचे युद्धातील कर्तृत्व, फाळणीच्या काळात केलेले विविध प्रकारचे कार्य आणि अजोड बुद्धिमत्ता लक्षात घेऊन, सर्वांत ज्यूनियर मेजर जनरल असूनही जनरल करिअप्पा यांनी त्यांना 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' या अतिमहत्त्वाच्या पदावर नियुक्त केले. या पदावर असताना त्यांना प्रामुख्याने परराष्ट्रातून भारतावर हल्ले झाल्यास त्याला तोंड कसे द्यायचे यावर संभाव्य लढाईचे आराखडे तयार करण्याची जबाबदारी होती.

१९५७ ते ५९ या काळात त्यांनी ईशान्य सरहद्द प्रांत (नेफा- सध्याचा अरूणाचल प्रदेश) या प्रदेशातील पहाड, दऱ्या, खिंडी अक्षरशः पायाखाली तुडवून या सीमेवरचे गांभीर्य जाणले. भारतावर कोणत्या देशाकडून आणि कुठल्या सरहद्दीवरून हल्ला होण्याची शक्यता आहे व तो परतवून लावण्यासाठी कशी योजना आखावयास हवी, याचा आराखडा व आकडेवारीसह तपशीलवार समग्र अहवाल स्पष्ट व परखड शब्दांत, पदाची तमा न बाळगता, दि. ८ ऑक्टोबर १९५९ रोजी तेव्हाचे सरसेनापती जनरल थिमय्यांच्या शिफारशीसह संरक्षणमंत्री व्ही. कृष्ण मेनन यांना सादर केला. मेनन यांनी त्याची दखल घेतली नाहीच; पण त्याउलट भारत-चीन संबंध मैत्रीचे असून थिमय्या-थोरात यांच्यासारखे ज्येष्ठ सैनिकी अधिकारी अकारण या गोष्टीचा बाऊ करीत असल्याचा शेरा मारला व त्यांची हेटाळणी केली. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचाही तसाच समज करून दिला.

थ

त्यांच्या या अहवालाचा परिणाम त्यांना सरसेनापतीपद न मिळण्यात झाला. ते १९६१ मध्ये प्रदीर्घ सैनिकी सेवेतून निवृत्त झाले.

त्यांच्या निवृत्तीनंतर काही महिन्यांतच चीनने भारतावर हल्ला केला. चीनच्या या अनपेक्षित कृतीमुळे भारतातील तमाम नेत्यांना धक्का बसला. त्या वेळी थोरात यांनी तीन वर्षांपूर्वी दिलेल्या अहवालाची सर्वांना प्रकर्षाने आठवण झाली.

त्यांच्या त्या अहवालातील भाकितानुसारच चीनने नेफातून हल्ला केला होता. त्यांच्या अहवालाचा जर स्वीकार केला गेला असता, तर कदाचित भारतावरील नामुष्की टाळता आली असती. लष्करातील त्यांच्या अतुलनीय सेवेबद्दल भारत सरकारने त्यांना 'कीर्तिचक्र', तसेच 'पद्मश्री' सन्मान देऊन गौरविले. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर, १९६१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांची राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केली. या पदावरही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

१९६२ मध्ये त्यांनी कोल्हापूर मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढविली. त्यांनी आपल्या सैनिकी जीवनाचे आत्मचरित्र, 'रिव्हेली टू रिट्रीट' या नावाने लिहिले आहे.

– धनंजय बिजले

**संदर्भ :**

१. *'अथश्री' नियतकालिक, मे २०१०.*

* * *

थ

# न

## नवले, प्रकाश धुळाप्पा

**वायुसेना - फ्लाइट लेफ्टनंट**

**शौर्यचक्र**

**जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



प्रकाश धुळाप्पा नवले यांच्याकडे २० सप्टेंबर १९८० रोजी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. ती म्हणजे एका अतिमहत्त्वाच्या व्यक्तीला ओरिसातील पूरसदृश परिस्थितीचे अवलोकन करण्यासाठी घेऊन जाणे व त्यांना परत आणणे.

जेव्हा त्यांचे हेलिकॉप्टर ओरिसातल्या गुनपूर येथे उतरले, तेव्हा सदर नेत्याने तेथील आजूबाजूच्या लोकांशी संवाद साधला व तेथील परिस्थितीबाबत ते माहिती घेऊ लागले. त्याच वेळी, अचानकच तेथील एका जमावाने या नेत्याच्या विरुद्ध घोषणा देण्यास सुरुवात केली. हे आंदोलन हळूहळू वाढत गेले व त्या नेत्याभोवती गर्दी वाढायला लागली.

या वेळी काही दगाफटका होण्याची शक्यता होती. या वेळी संभाव्य धोका लक्षात घेऊन व त्वरित हालचाल करून नवले यांनी या जमावाच्या दिशेने कूच केले. एका बाजूला भडकलेला जमाव व दुसऱ्या बाजूला तो नेता आणि हेलिकॉप्टर यांच्यामध्ये एखाद्या भिंतीसारखे ते उभे राहिले. जमाव त्यांच्यावरती हल्ला करण्याची दाट शक्यता होती; पण या वेळी त्यांनी स्वत:च्या जिवाची अजिबात पर्वा केली नाही. जमावाने अचानक त्या नेत्याला आणि नवलेंना धक्काबुक्की सुरू केली. हेलिकॉप्टरचेही नुकसान करण्यात आले. अखेर नवले त्या नेत्याला हेलिकॉप्टरकडे घेऊन गेले. जेव्हा जमावातील क्रोध निवळला, तेव्हा नवले यांनी या परिस्थितीचा फायदा घेत त्या नेत्याला हेलिकॉप्टरमध्ये घेत उड्डाण केले व त्यांना सुखरूपपणे गोपाळपूर या ठिकाणी उतरवले.

ह्या वेळेला प्रकाश नवले यांनी तणावपूर्ण वातावरणात त्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तीला तर सुखरूप आणलेच; परंतु परिस्थिती चिघळण्याची शक्यता निर्माण झालेली असताना ती परिस्थिती नियंत्रणात आणली.

ह्या परिस्थितीमध्ये फ्लाइट लेफ्टनंट प्रकाश नवले यांनी जे प्रसंगावधान दाखवले आणि परिस्थितीला शौर्याने जे तोंड दिले, त्यासाठी त्यांना 'शौर्यचक्र' प्रदान करण्यात आले.

- पल्लवी गाडगीळ

## नाईक, प्रदीप वसंत

**वायुसेना - एअर चीफ मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक,**

**२२ जुलै १९४९**

प्रदीप वसंत नाईक यांचा जन्म नागपूर येथे झाला. त्यांचे वडील महाराष्ट्र राज्य वीज मंडळात वरिष्ठ अधिकारी होते. प्रदीप नाईक लहान असतानाच हे कुटुंब नागपूरातील श्रद्धानंद पेठेतून पुण्यात स्थायिक झाले. साताऱ्याच्या सैनिकी शाळेत शिक्षण घेऊन ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (एन.डी.ए.) तेहेतिसाव्या तुकडीत पुढील शिक्षणासाठी हजर झाले. २१ जून १९६९ रोजी त्यांना 'लढाऊ वैमानिक' म्हणून नियुक्ती



मिळाली. त्यांचे सुरुवातीचे उड्डाण-प्रशिक्षण, 'हिंदुस्थान - ट्रेनर टू' या संपूर्णपणे भारतात निर्मिलेल्या विमानात झाले. त्यानंतर त्यांनी व्हॅम्पायर व हंटर या विमानांमधून उड्डाणे केली. मिग-२१ या विमानांचे एक नितांत कुशल व अत्यंत यशस्वी वैमानिक म्हणून त्यांचा नावलौकिक झाला. १९७१ च्या भारत-पाक युद्धातही लढाऊ वैमानिक म्हणून त्यांनी चांगली कामगिरी बजावली.

नाईक प्रथम अर्हताप्राप्त उड्डाण प्रशिक्षक झाले व पुढे 'टॅकडे'मधून (टॅक्टिक्स अँड एअर कॉम्बॅट डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट) 'फायटर कॉम्बॅट लीडर' म्हणून उत्तमपणे उत्तीर्ण झाले. पुढे त्यांना याच संस्थेत संचालक म्हणून घेण्यात आले. वेलिंग्टनच्या डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमधून त्यांनी सैनिकी प्रशासनाचे स्नातकोत्तर शिक्षण घेतले व ते तेथेच निदेशक-प्रशिक्षकही झाले. राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयामधून त्यांनी डॉक्टरेटच्या समकक्ष असलेला सैनिकी अभ्यासक्रम पूर्ण केला.

भारतीय वायुसेनेने मिग-२३ विमाने रशियाकडून खरेदी करताना त्यात भारतीय गरजांनुसार बदल करण्याची कामगिरी ज्या आठ ज्येष्ठ वैमानिकांवर सोपविण्यात आली होती त्यामध्ये प्रदीप नाईक एक होते. नंतर एका 'फ्रंटलाइन फायटर स्क्वॉड्रन'चे प्रमुख व एका महत्त्वपूर्ण लढाऊ विमानतळाचे प्रमुख (स्टेशन कमांडर) व बिदरच्या वायुसेना तळावरील 'उड्डाण प्रशिक्षण संस्थे'चे ते 'एअर ऑफिसर कमांडिंग' होते. त्यांनी वायुसेनेच्या विविध स्तरांवर अनेक महत्त्वपूर्ण पदे सांभाळली. वायुसेनेच्या पश्चिम विभागाचे 'सीनियर एअर स्टाफ ऑफिसर', मध्य विभागाचे 'एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ' व वायुसेनेचे उपप्रमुख म्हणून त्यांचे योगदान विशेष ठरले. त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक', 'विशिष्ट सेवा पदक', 'अतिविशिष्ट सेवा पदक', राष्ट्रपतींचे मानद ए.डी.सी. हे सन्मान प्राप्त झाले.

३१ मे २००९ रोजी नाईक यांनी वायुसेना प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. एप्रिल २०१० पासून त्यांच्याकडे संरक्षण दलाच्या तीनही विभागाच्या समितीचे प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली. वायुसेना प्रमुख उत्तर सीमेवरील वायुसेनेच्या तळांना अधिक बळकटी देण्याचे काम त्यांनी सुरू केले. उत्तर सीमेवर अनेक नवीन हवाई तळ त्यांनी स्थापन केले.

नाईक यांच्या पत्नी मधुबाला (पूर्वाश्रमीच्या सोनक) 'एअर फोर्स वाइव्हज वेल्फेअर असोसिएशन'च्या केंद्रीय अध्यक्षा आहेत. त्यांचा एक पुत्र वायुसेनेत लढाऊ वैमानिक आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त, नाईक यांना राष्ट्रपतींच्या हस्ते ८ मे २०१० रोजी विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

– विंग कमांडर (निवृत्त) अशोक मोटे

न

## नाडकर्णी, जयंत गणपत

**नौसेना – ॲडमिरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, नौसेना पदक, विशिष्ट सेवा पदक**

**५ डिसेंबर १९३१**



जयंत गणपत नाडकर्णी यांचा जन्म मुंबईत झाला. त्यांच्या आईचे नाव कृष्णाबाई होते. त्यांना दोन बहिणी होत्या. सुप्रसिद्ध समीक्षक व लेखक ज्ञानेश्वर नाडकर्णी हे त्यांचे ज्येष्ठ बंधू होत. त्यांचे वडील गणपतराव हे उत्तम केमिस्ट होते. 'लेमन हेअर क्रीम' आणि 'सुकेशा हेअर ऑइल' या त्या काळी खूप गाजलेल्या उत्पादनांचे ते संशोधक व संस्थापक होते. ते मूळचे



**फ्रिगेट जातीची युद्धनौका आय.एन.एस. गोदावरी (एफ २०)**

कारवारचे. ते मुंबईतील ऑपेरा हाउस परिसरात राहत. त्यामुळे जयंत व त्यांच्या भावंडांचे शिक्षण गिरगावातील चिकित्सक हायस्कूलमध्ये झाले. जयंत नाडकर्णी शाळेत शिकत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

जयंत नाडकर्णी इंग्रजी सहावीत असतानाच (आजच्या नववीच्या समकक्ष) वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी त्यांची आय.एम.एम.टी.एस. 'डफरीन' या व्यापारी नौदल प्रशिक्षण जहाजावर प्रशिक्षणाकरिता निवड झाली. खरे तर, 'डफरीन'वर वयाच्या सोळाव्या वर्षीच प्रवेश दिला जात असे; पण नाडकर्णी याला अपवाद ठरले. तीन वर्षांच्या खडतर अभ्यासक्रमाअंती त्यांनी 'एक्स्ट्रा फर्स्ट क्लास सर्टिफिकेट' ही 'डफरीन'वरील सर्वोच्च पदवी मिळविली. तेथून त्यांची भारतीय नौसेनेत फेब्रुवारी १९४९ मध्ये विशेष निवड झाली. भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले असल्यामुळे सेनादलांच्या विशेष प्रशिक्षणाच्या सुविधा नव्हत्या. त्यामुळे त्यांना मार्च १९४९ मध्ये प्रशिक्षणासाठी ब्रिटनमधील डार्टमाउथ येथील 'रॉयल मरीन नेव्हल कॉलेज'मध्ये पाठविण्यात आले. मे १९५३ मध्ये त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले. भारताने ब्रिटनकडून खरेदी केलेल्या आय.एन.एस. गंगा या युद्धनौकेवर त्यांची दिशादर्शक अधिकारी (नेव्हिगेशन ऑफिसर) म्हणून नियुक्ती झाली. जुलै १९५५ मध्ये त्यांना दिशादर्शनातील विशेष अभ्यासक्रमासाठी पुन्हा ब्रिटनला, रॉयल मरीन नेव्हल कॉलेजला पाठविण्यात आले. त्या क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवून मार्च १९५६ मध्ये भारतात परतल्यावर आय.एन.एस. तीर या फ्रिगेट गटातील युद्धनौकेवर त्यांची दिशादर्शन अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.

एप्रिल १९५६ मध्ये त्यांचा कारवारच्या विमल दिवेकर यांच्याशी विवाह झाला. ऑक्टोबर १९५६ पासून पुढील पाच वर्षे त्यांनी आय.एन.एस. दिल्ली या क्रूझर गटातील युद्धनौकेवर दिशादर्शन अधिकारी म्हणून काम केले.

डिसेंबर १९६१ मध्ये भारताने सैनिकी कारवाई करून गोवा प्रदेश पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त केला. त्या वेळी नौसेनेची भूमिका महत्त्वाची होती. तेव्हा जयंत नाडकर्णी यांच्यासह काही जणांना पुन्हा आय.एन.एस. दिल्लीवर जबाबदारी देण्यात आली. या संग्रमात दीवमध्ये शिरणे भारतीय भूसेनेला शक्य होत नव्हते. त्या वेळी आय.एन.एस. दिल्लीने दीवच्या किल्ल्यावर अत्यंत जवळून तोफांचा भडिमार करून तेथील पोर्तुगिजांना जेरीस आणले. त्यामुळे भारतीय भूसेनेला दीववर ताबा मिळविणे सोपे गेले. या लढाईत नाडकर्णी यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

न

१९६२ मध्ये नाडकर्णी यांची नियुक्ती कोचीन येथे झाली. १९६४ मध्ये त्यांना वेलिंग्टन येथील स्टाफ कॉलेजमध्ये पाठविण्यात आले. मे १९६४ पासून एका वर्षासाठी त्यांची नियुक्ती आय.एन.एस. विक्रांत या विमानवाहू युद्धनौकेवर झाली. त्यानंतर पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत (एन.डी.ए.) त्यांची जी-२ स्तरावर समन्वयक म्हणून नेमणूक झाली. तेथून त्यांना कमांडरपदी बढती मिळाली आणि त्यांची नियुक्ती संरक्षण मंत्रालयात झाली. त्यांचे काम संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांत भारताला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी विविध योजना आखून नियोजन करणे व क्रियान्वयनात मदत करणे अशा स्वरूपाचे होते.

त्यांच्या कार्यकाळात मुंबईतील माझगाव गोदी व कलकत्त्यातील गार्डन रीच या गोदींच्या आधुनिकीकरणास चालना मिळाली. पोर्तुगिजांच्या पराभवानंतर बंद पडलेली गोवा गोदीही नौदलाने ताब्यात घेतली. या सर्व गोदींच्या पुनर्उभारणीत नाडकर्णी यांचा मोलाचा वाटा होता. त्या वेळी लिएंडर जातीच्या युद्धनौका माझगाव गोदीत बनत होत्या. त्यांचे आधुनिकीकरण करून 'नीलगिरी' या जातीच्या नवीन संपूर्ण भारतीय बनावटीच्या युद्धनौका बनवायला माझगाव गोदीने १९६७ साली सुरुवात केली. या प्रकल्पांच्या नियोजनात नाडकर्णी यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

न

१९६९ मध्ये त्यांची नियुक्ती आय.एन.एस. तलवार या युद्धनौकेच्या कमांडरपदी झाली. जानेवारी १९७० मध्ये त्यांना नौसेनेच्या पश्चिम विभागाचे 'फ्लीट ऑपरेशन ऑफिसर' म्हणून जबाबदारी दिली गेली. पश्चिम ताफ्याच्या दैनंदिन व्यवस्थापनाच्या कार्यात फ्लीट कमांडरसोबत फ्लीट ऑपरेशन ऑफिसरचा महत्त्वाचा सहभाग असतो.

१९७१ मध्ये त्यांना एक, वर्षासाठी अमेरिकेतील ऱ्होड आयलंड येथे 'नेव्हल वॉर कॉलेज'मध्ये 'नेव्हल कमांड कोर्स'साठी पाठविण्यात आले. १९७२ मध्ये त्यांना कॅप्टनपदी बढती देऊन वेलिंग्टन येथील स्टाफ कॉलेजमध्ये नौसेनेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले.

१९७४ मध्ये त्यांची आय.एन.एस. दिल्लीच्या कॅप्टनपदी नियुक्ती झाली. दोन वर्षे त्यांनी आय.एन.एस. दिल्लीची धुरा सांभाळली. या काळात आय.एन.एस. गोदावरी (डी ९२ जातीची) ही जुनी युद्धनौका मालदीवच्या किनाऱ्यावर पोवळ्यांच्या बेटावर रुतली होती. ती सोडवून सुखरूपपणे भारतात कोची येथे खेचून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आय.एन.एस. दिल्लीने पार पाडले.

मे १९७६ मध्ये नौसेनेच्या पश्चिम विभागाचे 'चीफ ऑफ स्टाफ' म्हणून त्यांची नियुक्ती झाली. परेरा, गांधी आणि बार्बुझा या तीन व्हाइस ॲडमिरल्सचे सहकारी म्हणून त्यांनी नौसेनेच्या पश्चिम विभागाची धुरा सांभाळली. १ जानेवारी १९७८ रोजी एअर इंडियाचे 'एम्परर अशोक' नावाचे जंबो जेट उड्डाण करताना मुंबईच्या वांद्रे येथील समुद्रात कोसळले. तेव्हा तातडीचे मदत व बचावकार्य भारतीय नौसेनेने नाडकर्णींच्या नेतृत्वाखाली हाती घेतले. या दुर्घटनेत एकही प्रवासी वाचू शकला नाही; पण या विमानाचे सर्व महत्त्वाचे भाग आणि ब्लॅक बॉक्स नौसेनेने शोधून तपास पथकांकडे सुपूर्द केले. त्यामुळे ही दुर्घटना नक्की कशी झाली, हे तपास यंत्रणांना शोधून काढता आले.

डिसेंबर १९७९ मध्ये त्यांची रिअर ॲडमिरलपदी नियुक्ती झाली. त्याच काळात त्यांच्यावर १९८१ पर्यंत नवी दिल्लीच्या नॅशनल डिफेन्स कॉलेजमध्ये नौसेनेचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली.

मे १९८१ मध्ये त्यांची नियुक्ती नौसेनेच्या पश्चिम विभागात पश्चिमी ताफ्याच्या प्रमुख (फ्लीट कमांडर) पदी झाली. ऑगस्ट १९८२ मध्ये त्यांना व्हाइस ॲडमिरल पदी बढती मिळाली. त्यांची नियुक्ती नौसेना मुख्यालयात 'चीफ ऑफ पर्सोनेल' म्हणून करण्यात आली. नौसेनेची मनुष्यबळ विकासासंदर्भातील धोरणे आखण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. नौसैनिकांच्या

निवडीसंदर्भात आणि प्रशिक्षणासंदर्भात त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन राबविले.

मार्च १९८४ मध्ये त्यांची नियुक्ती नौसेनेच्या पूर्व विभागाचे 'मुख्य ध्वजाधिकारी' (फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ) या पदावर विशाखापट्टणम येथे झाली. मार्च १९८६ मध्ये त्यांना नौसेनेचे उपप्रमुख म्हणून व्हाइस ॲडमिरलपदी बढती देण्यात आली. तेथे नौसेनेच्या नियोजन खात्याचे प्रमुख म्हणून त्यांनी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. या काळात ॲडमिरल तहलियानी नौसेनेचे प्रमुख होते.

नोव्हेंबर १९८७ मध्ये त्यांची भारताच्या नौसेनेचे प्रमुख म्हणून 'ॲडमिरल'पदी नियुक्ती करण्यात आली. नौसेना प्रमुखपदाच्या त्यांच्या तीन वर्षांच्या कारकिर्दीत दोन वर्षे ते भारतीय सेनादलांचे संयुक्त प्रमुख ('चीफ ऑफ जॉइंट चिफ्स ऑफ स्टाफ') होते.

३ नोव्हेंबर १९८८ रोजी मालदीव बेटांवर बंडखोरांनी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष गयूम यांचे सरकार उलथून टाकण्याचा सशस्त्र प्रयत्न केला. या बंडात श्रीलंकेतील तामीळ अतिरेकी भाडोत्री सैनिक म्हणून सामील झाले असल्याने आंतरराष्ट्रीय समुदायात चिंतेचे वातावरण पसरले. राष्ट्राध्यक्ष गयूम यांनी कसाबसा स्वत:चा जीव वाचवून भारताकडे मदतीची याचना केली. त्याला भारत सरकारने ताबडतोब प्रतिसाद दिला.

बंड झाल्यापासून अवघ्या बारा तासांत भारतीय सेनादलांचे दीड हजाराहून अधिक छत्रीधारी सैनिक (पॅराट्रूपर्स) भारतीय वायुसेनेच्या मदतीने मालदीवमध्ये उतरले आणि पुढील अवघ्या काही तासांत मालदीवमधील बंडाचा बिमोड करून कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात आली. राष्ट्राध्यक्ष गयूम यांचे सरकार पुन्हा प्रस्थापित करण्यात आले. मात्र काही बंडखोर मालदिवच्या एका मंत्र्याला ओलीस म्हणून बरोबर घेऊन जहाजावरून पळून जाण्यात यशस्वी झाले. भारतीय नौसेनेने पुढील अठ्ठेचाळीस तासांत हिंदी महासागरात त्यांचा शोध घेऊन



**पाणबुडी – आय. एन. एस. शंकुल**

बंडखोरांना ताब्यात घेतले. यांना तुतीकोरीन येथे कोठडीत ठेवण्यात आले. मालदिवच्या मंत्र्यांची सुखरूप सुटका करण्यात आली. त्या सर्व बंडखोरांवर मालदिव येथे नंतर खटला चालला आणि त्या सर्वांना अत्यंत कडक शिक्षा फर्मावण्यात आली. या बंडामागे श्रीलंकेत स्थायिक झालेला असंतुष्ट मालदिवी उद्योजक असल्याचे नंतर निष्पन्न झाले. मालदिवच्या बंडखोरांविरुद्धच्या या 'ऑपरेशन कॅक्टस' मोहिमेत भारतीय नौसेनेची आणि नौसेनाप्रमुख जयंत नाडकर्णींची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. विशेष म्हणजे या मोहिमेत नौसेनेच्या आय.एन.एस. गोदावरी (एफ २०) आणि आय.एन.एस. बेटवा (एफ ३९) या फ्रिगेट जातीच्या युद्धनौकांनी प्रामुख्याने भाग घेतला होता.

ॲडमिरल नाडकर्णी यांनी संरक्षण मंत्रालयात नौसेनेतर्फे कार्यरत असताना भारतीय संरक्षण उद्योगाच्या उभारणीत प्रमुख जबाबदारी पार पाडली. त्यांनी भारतीय आण्विक पाणबुडी प्रकल्पाच्या मूलभूत सुविधांच्या उभारणीचे कार्य यशस्वी केले. डॉ. राजा रामण्णा यांच्यासोबत त्यांनी या काळात कार्य केले. ते नौसेनेचे उपप्रमुख असताना भारतातील सर्व संरक्षणविषयक प्रशिक्षण संस्थांच्या कार्यांचा अभ्यास करून त्यांनी एक सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर केला. त्यातील सर्व सूचना स्वीकारण्यात

न

आल्या. त्या अहवालानुसार या सर्व संस्थांच्या कार्यप्रणालीत आणि अभ्यासक्रमात आधुनिक काळाला योग्य असे अनेक महत्त्वपूर्ण बदल नंतर लवकरच करण्यात आले. त्यांना १९६९ मध्ये 'विशिष्ट' सेवा पदक, १९७७ मध्ये 'नौसेना' पदक, १९८३ मध्ये 'अतिविशिष्ट' सेवा पदक आणि १९८५ मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदका'ने सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या दोन मुलांपैकी रवींद्र नाडकर्णी भारतीय नौसेनेत कमांडरपदी कार्यरत आहेत. निवृत्तीनंतर जयंत नाडकर्णी पुण्यात स्थायिक झाले आहेत. 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक स्टडीज' या संस्थेचे ते एक संस्थापक असून पहिले संचालक होते. संरक्षण विषयातील जाणीव जागृती करण्यात ते आघाडीवर असून या संदर्भातील विविध विषयांवर वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून ते सतत लिखाण करीत असतात.

– राजेश प्रभु साळगांवकर

न

## नातू, अनंत विश्वनाथ

**भूसेना – मेजर जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, महावीरचक्र**

**१ सप्टेंबर १९२५**



अनंत विश्वनाथ नातू यांचा जन्म विदर्भातील अकोला येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण अकोल्यातील जठार पेठेतील मॉडर्न शाळेत झाले. पुढील शिक्षणासाठी नागपूरला जायचा निर्णय घेऊन १९४२ मध्ये ते नागपूरला आले. अनंतरावांचे ज्येष्ठ बंधू जे पुढे 'स्वामी भाष्यानंद' म्हणून ओळखले जाऊ लागले, ते नागपूरच्या रामकृष्ण मिशनमध्ये राहत असत. अनंतरावही त्यांच्याकडे रामकृष्ण मिशनमध्ये दाखल झाले.

१९४५ च्या सुमारास नातू यांनी सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेतला व ते 'रॉयल इंडियन एअर फोर्स'मध्ये अधिकारी म्हणून भरती होण्यासाठी गेले; पण वायुदलासाठी त्यांना शारीरिकदृष्ट्या अपात्र ठरवण्यात आले.

मात्र भूसेनेत त्यांची निवड झाली. त्यांचे सैनिकी प्रशिक्षण बंगळूरच्या 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी'त झाले. ऑक्टोबर १९४६ मध्ये ते उत्तीर्ण होवून त्यांची नेमणूक फ्रंटियर फोर्स बटालियनमध्ये झाली. ही बटालियन तेव्हा वायव्य सरहद्द प्रांतात कार्यरत होती. २० ऑक्टोबर १९४७ पर्यंत ते या बटालियन बरोबरच कार्यरत होते.

आपल्या सैनिकी नोकरीच्या प्राथमिक वर्षांमध्ये पठाण सैनिकांवर अधिकारी म्हणून अनंत नातू यांना काम करावे लागले. या कालावधीत हा सैनिक कसा वागतो, कसा विचार करतो व त्याच्या सवयी या सर्वांचा मानसशास्त्रीयदृष्ट्या त्यांना अभ्यास करता आला. आपल्या सैनिकी जीवनात पाकिस्तानी सैन्याशी निरनिराळ्या वेळी झालेल्या चकमकी व युद्धांदरम्यान अनंत नातू यांना त्याचा उपयोग झाला.

भारतात २० ऑगस्ट १९४७ रोजी परतल्यावर नातू यांची नेमणूक फिरोझपूर येथे असलेल्या १/९ गुरखा रायफल या रेजिमेंट मध्ये झाली. १९४७ ते १९४९ या कालावधीत ते १/९ गुरखा रायफल या रेजिमेंटचे कंपनी कमांडर होते. याच काळात झालेल्या भारत–पाक युद्धात त्यांनी छांब–नौशेरा भागात झालेल्या युद्धात भाग घेतला होता. पन्नासच्या दशकात २/९ गुरखा रायफलचे कंपनी कमांडर म्हणून त्यांनी काम पाहिले.

फिरोझपूर येथील कालावधीत एरिक वाझ या संपूर्ण व्यावसायिक आणि अत्यंत प्रामाणिक व सच्च्या शिपाईगड्याचा 'गुरू' म्हणून त्यांना लाभ झाला. (हेच एरिक वाझ पुढे वायुसेनेच्या पूर्व विभागाचे जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ झाले.)

त्यांनी १९५५ मध्ये वेलिंग्टन येथील स्टाफ कॉलेज

मधून 'स्टाफ कोर्स' पूर्ण केला. त्यानंतर १९६० मध्ये त्यांची नेमणूक ४/९ गुरखा रायफल रेजिमेंटमध्ये झाली. त्यांच्यावर डेहराडून येथील एकोणचाळिसाव्या गुरखा रेजिमेंटच्या प्रशिक्षण केंद्रात बटालियन उभारणीची जबाबदारी देण्यात आली. भारत-चीन युद्धात बटालियनचे सेकंड-इन-कमांड म्हणून त्यांची नेमणूक नेफा सरहद्दीवर करण्यात आली.

आधी ते बटालियनचे सेकंड-इन-कमांड व नंतर ४/९ गुरखा रायफलचे कमांडिंग ऑफिसर म्हणून पाच वर्षे नेफा येथे राहिले. हा पाच वर्षांचा कालावधी अत्यंत कष्टप्रद होता. सैनिकांच्या प्रशिक्षणाची आणि भारत-चीन सरहद्दीवर गस्त घालण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

कमांडची जबाबदारी पूर्ण झाल्यावर त्यांची नेमणूक 'डिफेन्स अटॅची' म्हणून काठमांडू येथील भारताच्या दूतावासात करण्यात आली. काठमांडू येथे नातू तीन वर्षे होते. या कालावधीत माजी गुरखा सैनिकांसाठी व त्यांच्या मुलाबाळांसाठी त्यांनी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे माजी सैनिकांच्या मुलांसाठी काठमांडू येथे एक वसतिगृह चालू करण्यात आले.

'डिफेन्स अटॅची' म्हणून आपली यशस्वी कारकीर्द पूर्ण केल्यावर त्यांना ब्रिगेडियर म्हणून पदोन्नती देण्यात आली आणि त्यांना ९३ इन्फन्ट्री ब्रिगेडचे कमांडंट बनवण्यात आले. ही ब्रिगेड तेव्हा पूंछ येथे होती. १९७० ते १९७३ या कालावधीत त्यांनी हा पदभार सांभाळला.

१९७१ मध्ये त्या वेळेच्या पूर्व पाकिस्तानात (आत्ताच्या बांगला देशात) पाकिस्तानी सैन्याला दारुण पराभवाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे पाकिस्तानने जम्मू-काश्मीर भागात पूर्ण ताकदीने हल्ले चढवायला सुरुवात केली. यात छांब विभागात पाकिस्तानला काही प्रमाणात यश मिळालेही; परंतु पूंछ भागात मात्र नातू यांनी पाकिस्तानी सैन्याचे हे प्रयत्न निष्फळ ठरविले.

पाकिस्तानी सैन्याच्या काही चौक्याही त्यांनी काबीज केल्या. या अतुलनीय पराक्रमाबद्दल ब्रिगेडियर नातू यांना 'महावीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले. पूंछ वाचवण्याच्या ब्रिगेडियर नातूंच्या कामगिरीबद्दल काही वर्षांनंतर या भागातील एका ठाण्याला त्यांचे नावही देण्यात आले.

यानंतर पंचेचाळिसाव्या इन्फन्ट्री ब्रिगेडचे कमांडंट म्हणून त्यांनी चार महिने काम केले. नंतर लगेचच त्यांना मेजर जनरल म्हणून पदोन्नती देण्यात आली व त्यांच्याकडे ऐतिहासिक चौथ्या इन्फन्ट्री डिव्हिजनची (म्हणजेच 'रेड ईगल डिव्हिजन') धुरा सोपविण्यात आली. त्यांनी १९७३ ते १९७५ पर्यंत हा पदभार सांभाळला. नातू १९७५ ते १९७९ पर्यंत सोळाव्या कोअर'चे 'चीफ ऑफ स्टाफ' होते. नागरोटा व उधमपूर येथे या नेमणूका होत्या. या दोन्ही जागा पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात महत्त्वाच्या होत्या.

नातू ऑक्टोबर १९७९ मध्ये सैन्यातून निवृत्त झाले. त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या प्रयत्नाने निवृत्त भारतीय सैनिकांना घरपोच निवृत्तिवेतन देण्याची व्यवस्था करण्यात आली. देशासाठी त्यांनी केलेले काम लक्षात घेऊन सरकारने त्यांना १९८० मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदका'ने सन्मानित केले.

सैन्यातून निवृत्त झाल्यावर त्यांनी आपल्या पत्नी सुधाताई यांच्या मदतीने सामाजिक कार्यास सुरुवात केली. चाळीसगाव येथे त्यांनी विवेकानंद बालक मंदिराची स्थापना केली. याच कालावधीत त्यांनी माजी सैनिकाच्या पुनर्वसनाचे कामही केले. त्यांना १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' देण्यात आला. ग्राहक पंचायतीपासून निसर्ग संवर्धनापर्यंत अनेक सामाजिक कामांमध्ये ते आजही कार्यरत आहेत. अनंत नातू यांचे चिरंजीव विजय नातू हे भूसेनेत ब्रिगेडियर पदावरती कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त त्यांचे दोन जावई, एक नातू, एक नात व दोन नात-जावई सैनिकी सेवेत रुजू आहेत.

– लेफ्ट. जन. विजय अनंत नातू

न

## नानावटी, रुस्तुम कैखुश्रू

**भूसेना - लेफ्टनंट जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक**

**१८ मे १९४३**



रुस्तुम कैखुश्रू नानावटी यांचा जन्म पूर्वीच्या मुंबई इलाख्यात कारवार येथे (उत्तर कर्नाटक जिल्हा) झाला. त्यांचे वडील के.जे.नानावटी हे मुंबई इलाख्यातील प्रख्यात आणि कर्तबगार पोलिस महानिरीक्षक होते. त्यांची आई धन नानावटी ह्या मूळच्या 'राजपिपला' ह्या गुजरातमधल्या संस्थानात वाढल्या होत्या. धनजीशा एडलजी कोठावाला हे तिथले दिवाण म्हणजे त्यांच्या आईचे आजोबा. थोडक्यात, प्रशासनात महत्त्वाची जागा भूषवण्याचा वारसा त्यांना माता-पिता, दोन्हींकडून मिळाला होता.

नानावटी यांचे शालेय शिक्षण पाचगणीच्या सेंट पीटर्स हायस्कूलमध्ये झाले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण राजकोट येथील राजकुमार महाविद्यालयामधून आणि मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयात झाले.

परंतु नानावटी यांचे मन शिक्षणात रमले नव्हते. लहानपणापासून त्यांना सैनिकी पेशाचे आकर्षण वाटत होते. किंबहुना तेच त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे जिथे साहस, थरार, शौर्य ह्यांची गरज आहे, अशा जगात ते रमायचे. ते स्वत: उमदे खेळाडू होते. बॉक्सिंग, हॉकी, फुटबॉल या खेळांमध्ये ते तरबेज होते. त्यांचे खेळाचे शिक्षक पीटर रॉजरसन ह्यांच्या तालमीत ते तयार झाले.

१९६१ मध्ये त्यांनी डेहराडून येथील भारतीय सैनिकी प्रबोधिनीत एकतिसाव्या तुकडीत प्रवेश घेतला. ड्रील, कवायत, मार्क्समनशिप, डावपेच आणि नेतृत्वगुण ह्या सगळ्यांत विलक्षण प्रावीण्य दाखवत 'बेस्ट ऑलराउण्ड कॅडेट' असा बहुमान त्यांनी



**सियाचीनमधील बर्फाळ भागातील ऑपरेशन मेघदूत**

मिळवला. दि. ११ डिसेंबर १९६२, रोजी ते आठव्या गोरखा पलटणीच्या दुसऱ्या तुकडीत सामील झाले. महू येथील 'इन्फन्ट्री स्कूल'मध्ये १९६५ साली त्यांनी शस्त्रास्त्र प्रशिक्षणात बंदूक चालवताना नेमबाजीत विक्रम प्रस्थापित केला. ह्याच विषयातील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतल्या जॉर्जिया राज्यात 'फोर्ट बेनिंग' येथील 'इन्फन्ट्री ऑफिसर्स ॲडव्हान्स्ड कोर्स'मध्ये त्यांना सर्वोच्च श्रेणी मिळाली. तसेच 'डिस्टिंग्विश्ड अलाइड ग्रॅजुएट' म्हणून त्यांना गौरवण्यात आले. 'डिफेन्स सर्व्हिस स्टाफ कॉलेज' आणि दिल्लीतील 'नॅशनल डिफेन्स स्कूल' येथूनही त्यांनी प्रशिक्षण घेतले. प्रस्तरारोहण, नौकानयन, भूमीगत बंकर्समधील चढाई असे प्रशिक्षणही त्यांनी घेतले.

'पहिल्या आर्मर्ड ब्रिगेड'मध्ये 'ब्रिगेड मेजर' म्हणून काम केल्यानंतर १९७९ मध्ये त्यांनी त्याच बटालियनची सूत्रे हाती घेतली. पंजाब, प. बंगाल, तसेच भूतान येथे त्या काळात त्यांनी काम केले. १९८२ ते १९८५ ह्या कालावधीत ते वॉरमिन्स्टर येथील 'ब्रिटिश आर्मी स्कूल ऑफ इन्फन्ट्री' येथे भारतीय सैन्यदलाचे समन्वयक म्हणून कार्यरत होते.

१९८७ मध्ये श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेच्या



ऑपरेशन रक्षक

कामात ते सहभागी झाले होते. 'ऑपरेशन पवन'मध्ये 'पॅराशूट कमांडो टास्क फोर्स' मध्ये ते कार्यरत होते.

भारतात परत आल्यावर त्यांना 'ब्रिगेडियर' पदावर बढती मिळाली. लगेचच 'ऑपरेशन मेघदूत' ह्या महत्त्वाच्या मोहिमेवर ते सियाचेनमधल्या बर्फाळ भागात रुजू झाले. अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक हवामानात युद्धसदृश परिस्थितीत सुमारे अडीच वर्षे काम केल्याबद्दल दि. २० एप्रिल १९९१ रोजी 'उत्तम युद्ध सेवा पदक' देऊन राष्ट्रपतींनी त्यांचा सन्मान केला.

'मेजर जनरल' ह्या पदावर असताना त्यांनी अशांत काश्मीर भागाची जबाबदारी स्वीकारली. १९९३ मध्ये तेथे पार पडलेल्या 'ऑपरेशन रक्षक' या मोहिमेत एकोणिसाव्या इन्फन्ट्री डिव्हिजनचे नेतृत्व करताना त्यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. नियंत्रण रेषेजवळ अनेक अतिरेक्यांना त्यांनी कंठस्नान घातले. या पराक्रमाबद्दल त्यांना १९९६ मध्ये 'अतिविशिष्ट सेवा पदक' देऊन गौरवण्यात आले.

नानावटी ह्यांच्या कारकिर्दीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पदोन्नतीसोबत त्यांनी नवे आव्हान स्वीकारले. 'लेफ्टनंट जनरल' पदाची सूत्रे हातात घेतल्याबरोबर नागालॅण्ड, मणिपूर, त्रिपुरा आणि आसाम ह्या राज्यांमध्ये सीमावर्ती भागातून येणाऱ्या घुसखोरांच्या अतिरेकी कारवायांना आळा घालण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. 'ऑपरेशन ऑर्चिड' आणि 'ऑपरेशन हिफाजत' मधील कामगिरीसाठी १९९९ मध्ये त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' देण्यात आले.

ईशान्येकडील राज्यांमधून परत आल्यानंतर त्यांची विनंती लक्षात घेऊन पुन्हा एकदा त्यांना अशांत काश्मीर राज्यात पाठवण्यात आले. सुरुवातीला ते 'चीफ ऑफ स्टाफ' होते. 'जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ' म्हणूनही त्यांनी काम केले. 'ऑपरेशन रक्षक' आणि 'ऑपरेशन पराक्रम' ह्या मोहिमा त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबवण्यात आल्या.

जेथून त्यांनी कारकिर्दीला सुरुवात केली, त्या आठव्या गोरखा रेजिमेंटचे आधी कर्नल, नंतर संपूर्ण 'गोरखा ब्रिगेड'चे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले. दि. १ जून २००३ रोजी ते निवृत्त झाले.

त्यानंतर दि. १ सप्टेंबर २००७ ते दि. ३१ ऑगस्ट २००९ ही दोन वर्षे पुणे विद्यापीठाच्या संरक्षण शास्त्र विभागात 'छत्रपती शिवाजी अध्यासना'चे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले.

सध्या 'भारतातील अंतर्गत शस्त्रसंघर्ष' ह्या विषयावरील शोधनिबंध लेखनात ते मग्न आहेत. एकेकाळी उत्कृष्ट शिकारी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. सध्या ते वन्यजीव, तसेच पर्यावरणाच्या रक्षणाच्या कामात सक्रिय आहेत.

– गीतांजली वैशंपायन

## निमसे, त्रिंबक दादा

**भूसेना – हवालदार**

**शौर्यचक्र**

**जन्म-मृत्यू दिनांक अनुपलब्ध**

त्रिंबक दादा निमसे हे सव्विसाव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या 'बी' कंपनीमध्ये कार्यरत होते. 'बजरंग' मोहिमेमध्ये दि. १९ मार्च १९९१ रोजी निमसे यांच्या नेतृत्वाखालील तुकडीला एक संशयित दहशतवादी पकडण्याची जबाबदारी देण्यात आली होती. ज्या

न

घरात दहशतवादी लपले होते, त्या घरास त्यांनी वेढा घातला. ते स्वत: रांगत रांगत त्या घरापाशी गेले. दहशतवादी खिडकीतून बाहेर पळून जात असताना त्यांनी त्याच्यावर झडप घालून त्याला पकडले.

त्याच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे आसाममधील हाटी गावात आसाम युनायटेड लिबरेशनच्या लपून बसलेल्या पंचवीस दहशतवाद्यांना पकडण्यासाठी एक विशेष मोहीम राबवण्यात आली. यातही हवालदार निमसे आघाडीवर होते. या मोहिमेमध्ये दहशतवाद्यांचा पाठलाग सुरू असताना एका दहशतवाद्याने स्वत:चा जीव वाचविण्याकरिता वाटेतील नाल्यात उडी मारली. ते पाहून निमसे यांनीही त्याच्या पाठोपाठ नाल्यात उडी मारली. दोघांमध्ये बरीच झटापट झाली; परंतु संध्याकाळची वेळ असल्याने हळूहळू अंधार वाढत गेला व काही दिसेनासे झाले. दुसऱ्या दिवशी तेथे दोघांचेही मृतदेह सापडले.

हवालदार निमसे यांच्या अतुलनीय व साहसपूर्ण कामगिरीबद्दल त्यांना मरणोत्तर 'शौर्यचक्र' प्रदान करण्यात आले.

– रूपाली गोवंडे

* * *

न

# प

## पंडित, आनंद रामदास

**वायुसेना - एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, डिस्टिंग्विश्ड फ्लाइंग क्रॉस**

**२१ जून १९२१ - १५ जुलै २००५**



आनंद रामदास पंडित यांचा जन्म इंदूर येथे झाला. ते १९४१ मध्ये भारतीय वायुसेनेत दाखल झाले. लाहोर येथे इनिशिअल ट्रेनिंग स्कूलमधील प्राथमिक प्रशिक्षण घेतल्यानंतर, जोधपूर येथे त्यांनी टायगरमॉथ विमानावरील आठव्या वैमानिक अभ्यासक्रमाला सुरुवात केली. त्यांनी अंबाला येथे ऑडक्स आणि हार्ट या प्रकारच्या विमानांच्या उड्डाणांचे प्रशिक्षण घेतले. त्यांना फेब्रुवारी १९४२ मध्ये नियमित उड्डाणे करायची परवानगी मिळाली.

कराची, रिसालपूर, मिशनशाह (वायव्य सरहद्द प्रांत), नौशेरा येथे वायुसेनेच्या कवायतींमध्ये पंडित यांनी १९४३ मध्ये भाग घेतला. मिशनशाहची मोहीम विशेष महत्त्वाची होती; कारण या मोहिमेत त्यांनी पठाण टोळीवाल्यांविरुद्ध नाना प्रकारे चढाई केली.

१९ तासांची लढाऊ उड्डाणे केल्यानंतर आनंद पंडित यांच्या विमानाचे इंजीन निकामी होऊन अपघात झाला. या अपघातात झालेल्या जखमांमुळे ते त्यांच्या नं. १ स्क्वॉड्रनबरोबर लगेच ब्रह्मदेशात जाऊ शकले नाहीत. परंतु मार्च १९४४ मध्ये ते इम्फाळ येथे पुन्हा कामावर रुजू झाले. ब्रह्मदेशातील जपानी आक्रमकांविरुद्ध झालेल्या चढाईत त्यांनी जी हवाई छायाचित्रे काढली, ती सैन्याला उपयोगी पडली. त्या अतुलनीय शार्यासाठी त्यांना 'डिस्टिंग्विश्ड फ्लाइंग क्रॉस' २१ जानेवारी १९४५ रोजी प्रदान करण्यात आला.

महायुद्धानंतरच्या काळात त्यांनी क्र. १ व क्र. ३ या स्क्वॉड्रनचे कमांड, जम्मू आणि श्रीनगरमधील क्र. १ ऑपरेशनल विंगचे कमांड सांभाळले, तसेच पाकिस्तानमध्ये एअर अ‍ॅटेचे या पदावर काम केले. १९५१ मध्ये त्यांनी वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्येही अध्यापन केले. त्यानंतर ते जेट ट्रेनिंग विंगचे प्रमुख झाले. १९६५ च्या भारत-पाक युद्धात ते एअर कमोडोर या हुद्द्यावर होते. वायुसेनेच्या मुख्यालयात ईस्टर्न एअर कमांडचे ते सीनियर एअर स्टाफ ऑफिसर होते. या युद्धातील त्यांच्या कामासाठी त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' मिळाले.

१९७१ मध्ये भारत-पाक युद्धामध्ये ते एअर व्हाइस मार्शल या पदावर 'एअर ऑफिसर कमांडिंग-मॅरिटाइम एअर ऑपरेशन्स' म्हणून मुंबईत होते. नौसेनेच्या पश्चिम विभागासह केलेल्या संयुक्त कारवाईत त्यांच्या पथकाने पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला केला.

यानंतर अशीच उच्च पदे भूषवत अखेर ते वायुसेनेच्या मुख्यालयामध्ये 'व्हाइस चीफ ऑफ एअर स्टाफ' या पदापर्यंत पोहोचले. त्यांच्या या पदाच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय सेवेबद्दल त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' मिळाले. ते ३१ मार्च १९७७ रोजी सेवानिवृत्त झाले. आपल्या ३६ वर्षांच्या सेवेमध्ये

त्यांनी २३ प्रकारच्या विमानांवर एकंदर ३८०० तासांचे उड्डाण केले.

– अविनाश पंडित

## पंडित, भर्तृहरी त्रिंबक

**भूसेना – लेफ्टनंट जनरल**

**महावीरचक्र**

**१७ फेब्रुवारी १९३४**



भर्तृहरी त्रिंबक पंडित यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी या गावी झाला. त्यांचे वडील पारवा येथील पारवेकर देशमुख संस्थानिकांकडे मालमत्ता व्यवस्थापक म्हणून काम पाहत असत. भर्तृहरी पंडित यांचे प्राथमिक शिक्षण घाटंजी व पारवा येथे पार पडले. नागपुरातून त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे त्यांनी एम.एस्सी., एम.ए., ए.एम.आय.ई. अशा पदव्या प्राप्त केल्या. हैद्राबादमधील निजामाचे सैन्य 'रझाकार' म्हणून ओळखले जाई. हे रझाकार प्रजेला विनाकारण हल्ले करून त्रास देत असत. पंडितांची मित्रमंडळी व ते स्वत: या काळात या रझाकारांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवीत. त्यांच्यामुळे यवतमाळचा टापू रझाकारांपासून सुरक्षित राहिला होता.

जून १९५५ मध्ये मद्रास सॅपर्समध्ये इंजिनिअरिंग शाखेत सेकंड लेफ्टनंट म्हणून त्यांनी सेवेस सुरुवात केली. १९५९ मध्ये पुणे येथील सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयामधून त्यांनी अभियांत्रिकी पदवी मिळवली व १९६४ मध्ये त्यांनी वेलिंग्टन येथील डिफेन्स सर्व्हिस स्टाफ कॉलेजमधून प्रशिक्षण घेतले. नागालँड आणि मणिपूर येथील बंडखोरीविरोधी आघाडीच्या सैनिकांच्या नेमणुका करण्यामध्ये आणि सैनिकी मुख्यालयाच्या सैनिकी कारवायांची धोरणे ठरविण्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. १९७१ च्या भारत-पाक युद्धात इंजिनिअर रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर म्हणून त्यांनी काम पाहिले. या वेळी पश्चिमेकडील आक्रमणाविरुद्ध मोहिमा पार पाडताना दाखविलेल्या शौर्याबद्दल व श्रेष्ठ दर्जाच्या नेतृत्वाबद्दल त्यांना 'वीरचक्र' देऊन गौरविण्यात आले. पुण्यातील सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालय, कॉम्बॅट महाविद्यालय व इराकमधील भारतीय सैनिकांच्या प्रशिक्षण पथकासाठी प्रशिक्षक म्हणूनही त्यांनी कार्य केले.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षण १९८४ मध्ये पूर्ण केल्यानंतर पंडित यांच्यावर जनरल कॅडरचे कार्य सोपविले गेले. राजस्थानमधील ब्रास टास्क व जम्मू-काश्मीरमधील संवेदनशील अशा पूंछ विभागातील 'ट्रायडंट' या मोहिमेमध्ये त्यांनी सैनिकी आघाडीचे नेतृत्व केले. १९८९-९० या काळात पंजाबमधील अतिरेकी कारवायांमध्ये खूपच वाढ झाली होती. या वेळी 'ऑपरेशन रक्षक' ही मोहीम हाती घेऊन खलिस्तानवादी दहशतवादाचा त्यांनी पराभव केला.

जुलै १९९० मध्ये मुख्यालयात 'ॲडज्युटंट जनरल' या पदावर त्यांची नेमणूक झाली. या काळात चीफ ऑफ स्टाफ या नात्याने त्यांनी सर्व सैनिकांच्या कल्याणकारी योजनांवर जातीने लक्ष पुरविले. सेवानिवृत्त सैनिकांच्या कल्याणासही त्यांनी या वेळी विशेष महत्त्व दिले. सैन्याचा विधि विभाग आणि वैद्यकीय सेवा विभाग (१०९ इस्पितळे व सुमारे ५००० वैद्यकीय अधिकारी) यांचे नियंत्रणही त्यांनी या नेमणुकीदरम्यान केले. याशिवाय सैनिकी गृहनिर्माण प्रकल्प, विमा निधी प्रकल्प व शैक्षणिक प्रकल्प यांचे ते पदाधिकारी होते. या काळात सैनिकांसाठी देशभरात सुमारे १२,००० घरे बांधली गेली; विमा निधी प्रकल्पामध्ये १५०० कोटी रुपये गुंतविले गेले व सैनिकांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी देशात ६० सैनिकी शाळा सुरू झाल्या.

प

सैनिकांसाठी त्यांनी केलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीमुळे १९९१ मध्ये प्रजासत्ताक दिनी त्यांना ‘परमविशिष्ट सेवा पदक’ देऊन गौरविले गेले. महाराष्ट्र शासनानेही त्यांना १९९० मध्ये ‘महाराष्ट्र गौरव’ हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. दि. २९ फेब्रुवारी १९९२ या दिवशी ते सेवानिवृत्त झाले.

सैन्यात केलेल्या कामगिरीची योग्य दखल घेत भारत सरकारने यवतमाळ येथे त्यांना ४००० चौरस फुटांचा भूखंड देऊ केला. पुण्यात स्थायिक होण्याचा निर्णय घेतल्यानंतर आपला हा भूखंड त्यांनी विनामोबदला स्थानिक प्रशासनास परत केला. त्या जागेवर आज ‘वीरमाता रमाबाई पंडित वसतिगृह’ ही इमारत उभी आहे.

निवृत्तीनंतरचे आयुष्यही त्यांनी समाजकार्यासाठी वाहून घेतले आहे. अपंग जवानांसाठीची क्वीन मेरी तंत्रशिक्षण संस्था, पुण्यातील सैनिकी तंत्रसंस्था, पुण्यातील मध्यवर्ती धोरण संशोधन संस्था, रत्नागिरीतील फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालय, नवी दिल्लीतील केंद्रीय सैनिकी शाळेची मध्यवर्ती समिती व महाराष्ट्र राज्य सैनिकी समिती या संस्थांमध्ये ते स्वयंसेवी कार्य करत आहेत.

– ज्योती आफळे


## परमेश्वरन, रामस्वामी

**भूसेना – मेजर**

**परमवीरचक्र**

**१३ सप्टेंबर १९४६ – २५ नोव्हेंबर १९८७**

रामस्वामी परमेश्वरन यांचा जन्म मुंबई येथे झाला. एस.आय.ई.एस. शाळेत व महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. पंधराव्या महार रेजिमेंटमध्ये त्यांची नियुक्ती झाली. त्यानंतर जानेवारी १९७२ मध्ये ते पाचव्या महार रेजिमेंटमध्ये रुजू झाले. या वेळी ते मिझोराम व त्रिपुराच्या डोंगरी भागात घुसखोरांशी लढत होते. पुढे त्यांची आठव्या महार रेजिमेंटमध्ये नियुक्ती झाली. ही रेजिमेंट श्रीलंकेला जाणार होती.



एक्क्याणणवव्या इन्फन्ट्री ब्रिगेड व चौपन्नाव्या इन्फन्ट्री डिव्हिजन यांचा एक भाग म्हणून या रेजिमेंटने ‘ऑपरेशन पवन’मध्ये भाग घेतला होता. श्रीलंकेत आलेली भारतीय शांतिसेनेची ही पहिली बटालियन होती. श्रीलंकेत या सैन्याने एल.टी.टी.ई.विरुद्ध झालेल्या अनेक मोहिमांमध्ये भाग घेतला. कान्तारोदाईमध्ये मेजर रामस्वामी परमेश्वरन शूरपणे लढले.

२४ नोव्हेंबर १९८७ रोजी या खेड्यातील एका घरामध्ये, शस्त्रे व दारूगोळा यांचा मोठा साठा उतरवला असल्याची माहिती सैन्याला समजली. बातमीचा खरेपणा पडताळून पाहण्यासाठी कॅप्टन डी.आर. शर्मा यांच्या नेतृत्वाखालील वीस जणांच्या तुकडीस पाठवण्यात आले.

गस्त घालणाऱ्या पहारेकऱ्यांवर सदर घराच्या जवळच्या देवळामधून गोळ्या झाडण्यात आल्या. गस्त घालणाऱ्यांनीही गोळीबारानेच प्रत्युत्तर दिले. त्यांनी उद्‌विल येथील बटालियनला माहिती कळवली की ती जागा एल.टी.टी.ई.च्या ताब्यात आहे व आधीच्या अनुमानापेक्षा त्यांची ताकद अधिक वाटत आहे.

त्या वेळी मेजर रामस्वामी परमेश्वरन यांनी या जागेवर हल्ला करण्याचे ठरविले. रात्री साडेआठ वाजता त्यांनी आपल्या कंपनीमधून एक तुकडी निवडून सोबत घेतली आणि ते कॅप्टन शर्मांच्या तुकडीला जाऊन मिळाले. या दोन्ही तुकड्या मग संशयास्पद घराकडे निघाल्या. परमेश्वरन यांची कंपनी त्या घराजवळ दि. २४/२५ नोव्हेंबरच्या मध्यरात्री दीड वाजता पोहोचली. तिथे त्यांना कसलीही हालचाल आढळली नाही. त्यांनी त्या जागेला वेढा घातला आणि पहाटे शोध घ्यावयाचे ठरवले.

प

२५ नोव्हेंबर १९८७ रोजी पहाटे साडेपाच वाजता शोधमोहिमेस सुरुवात झाली. पण तेथे काहीही न आढळल्यामुळे त्यांनी माघारी परतण्याचे ठरविले. त्याच वेळी देवळाजवळच्या वनराईतून बंदुकीच्या गोळ्यांचा मारा झाला. कंपनीनेही लगेचच प्रत्युत्तर दिले. त्याच वेळी त्यांनी कॅप्टन शर्मा यांना सूचना दिली, की शत्रूवर गोळीबार करीत त्याला गुंतवून ठेवा. नंतर परमेश्वरन आणि त्यांच्या तुकडीने एल.टी.टी.ई.च्या गटाच्या पाठीमागून जाऊन त्याना घेरण्यासाठी पश्चिमेच्या बाजूने कूच केले.

अतिरेकी बेसावध असतानाच सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला केला. समोरासमोर झालेल्या लढाईत एका अतिरेक्याने झाडलेली गोळी त्यांच्या छातीत घुसली. तरीही न डगमगता परमेश्वरन यांनी त्या अतिरेक्याची रायफल हिसकावून घेतली व उलट हल्ला करून त्यालाच यमसदनास पाठवले.

या तुकडीने पाच अतिरेकी मारले आणि तीन रायफल्स व दोन रॉकेट लाँचर्स हस्तगत केले. मेजर परमेश्वरन अगदी शेवटच्या श्वासापर्यंत त्यांच्या तुकडीला मार्गदर्शन करत राहिले. परमेश्वरन यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना मरणोत्तर 'परमवीरचक्र' बहाल करण्यात आले.

प

– वर्षा जोशी-आठवले

**संदर्भ :**

१. *मेजर जनरल कारडोझो, इयान; अनुवादक- लेले ज्योत्स्ना 'परमवीरचक्र - रणांगणावरील आपले महान योद्धे'; एप्रिल २००८.*

## पाटकर, विजय अच्युत

**वायुसेना – एअर मार्शल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक**

**२९ एप्रिल १९४५**

विजय अच्युत पाटकर यांचा जन्म मुंबई येथे झाला. पाटकर कुटुंब गुजरात राज्यात बडोदा (वडोदरा) येथे स्थायिक झालेले होते. त्यांचे वडील



अच्युत हे टाटा ऑइल मिलमध्ये नोकरीस होते. त्यांनी दादरच्या बालमोहन विद्यामंदिरात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मुंबईतल्याच एल्फिन्स्टन महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. लहानपणापासूनच त्यांना 'ऑटोमोबाइल्स आणि एव्हिएशन' या विषयांत रस होता. त्यांनी नंतर बडोदा विद्यापीठात 'इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी'ला प्रवेश घेतला.

अभियांत्रिकीला असताना ते चारही वर्षे एन.सी.सी.च्या एअर विंगमध्ये होते. या काळात त्यांनी बडोदा फ्लाइंग क्लबमधून विमान उडवण्याचे प्रशिक्षणही पुष्पक विमानात घेतले होते. विजय यांनी १९६३ मध्ये अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षाला असतानाच भारतीय वायुसेनेतील सेवेसाठी मुलाखत दिली होती. १९६० च्या दशकात भारत-चीन युद्धानंतर भारतीय वायुसेनेने प्रवेशासाठी थेट प्रवेश योजना राबवली होती. त्या अंतर्गत मग डिसेंबर १९६२ मध्ये ग्वाल्हेरमध्ये सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डाची परीक्षा आणि दिल्लीत वैद्यकीय चाचणी होती. या प्रक्रियेतून ते तावून-सुलाखून निघाले. विजय यांना जून १९६४ मध्ये इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाला असताना भारतीय वायुसेनेचे पायलट ऑफिसर पद बहाल करण्यात आले.

इंजिनिअर झाल्यानंतर जुलै १९६५ मध्ये त्यांनी बंगळुरू इथल्या एअर फोर्स तांत्रिक महाविद्यालयात 'टेक्निकल सिग्नल' या खात्यात सुरुवात केली. जुलै १९६६ मध्ये प्रशिक्षणानंतर त्यांनी जोधपूर इथे सहा महिने 'एअर सिग्नलर' म्हणून काम करत प्रशिक्षण घेतले. त्यांचे पहिले पोस्टिंग देशाच्या पूर्व भागात 'सी-११९ जी' या विमानावर होते. लष्कराच्या दुर्गम भागात सामान ने-आण करणारे त्यांचे कार्गो विमान

होते. त्यानंतर त्यांनी हवाई सेवेतली विविध ठिकाणची कामे केली. १९६८ पासून ते पुण्यात, तर १९७० पासून दिल्लीतल्या पालम विमानतळावर होते. त्या वेळी अति महत्त्वाच्या व्यक्तींबरोबर विमानप्रवास करण्याची संधी त्यांना मिळाली. ‘टीयू-१२४’ हे त्या वेळचे रशियन बनावटीचे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठीचे विमान होते. राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी, उपराष्ट्रपती गोपाल स्वरूप पाठक, पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विमानप्रवासाची जबाबदारीच जणू त्यांच्यावर होती.

विमान उड्डाण ही आनंदाची गोष्ट असली, तरी सहा वर्षांनतर विजय यांना विमान उड्डाणासंदर्भातल्या तांत्रिक बाजूचे काम पाहावे लागले. संगणकाच्या आगमनाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे १९७३-७४ मध्ये त्यांना आय.आय.टी., मुंबई, टी.आय.एफ.आर. या संस्थांमध्ये, तर फ्रान्समधल्या संगणक निर्माण करणाऱ्या कंपनीत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली.

१९७५ ते १९७८ या कालावधीत त्यांनी घेतलेले प्रशिक्षण प्रत्यक्ष वापरून रडार यंत्रणा, रडार डेटा या सर्वांचे संगणकीकरण केले. त्यांनी या संदर्भातले सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर तयार करण्याचे काम केले. यानंतर त्यांना आय.आय.टी. खरगपूरमध्ये ‘मायक्रोवेव्ह आणि रडार’ यंत्रणेत एम.टेक. करण्याची संधीही मिळाली. १९८० मध्ये एम.टेक. झाल्यावर वायुसेनेच्या मुख्यालयामध्ये स्क्वॉड्रन लीडर म्हणून ते कार्यरत झाले.

पुढच्या कालावधीत रशियन बनावटीच्या आय.एल.सारखे त्या वेळचे सर्वांत मोठे मालवाहू विमान असणे वायुसेनेला आवश्यक वाटू लागले. त्याकरिता १९८४ मध्ये पाटकर यांना विंग कमांडर करून त्यांच्या हाताखाली चांगला गट रशियामध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आला. तेथे प्रशिक्षण घेतले, तरी असे विमान आणण्यासाठीची पुरेशी यंत्रणा, विमान ठेवण्याची जागा (हँगर्स), शिड्या (लॅडर्स), इ. आवश्यक बाबी भारतात नव्हत्या. त्या सर्व तयार करण्याचा, या विमानाची दुरुस्ती करणारा कर्मचारी वर्ग, तो चालवणारा कर्मचारी वर्ग तयार करणे ह्या सर्व जबाबदाऱ्या पाटकर यांच्यावर होत्या. हा कर्मचारी वर्ग तयार करण्यासाठी त्यांनी अल्पकाळात प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली.

या सेवेसाठी त्यांना १९८८ मध्ये राष्ट्रपती आर. वेंकटरामन यांच्या हस्ते ‘विशिष्ट सेवा पदक’ देण्यात आले. त्याच वेळी त्यांना ग्रूप कप्तानपदी बढती देण्यात आली. १९९५ मध्ये पाटकर यांची नियुक्ती पुन्हा मुख्यालयामध्ये तांत्रिक संचालकपदी झाली. इथल्या सर्व हेलिकॉप्टर आणि विमानांची निगा राखण्याचे व्यवस्थापन त्यांच्याकडे होते. ही विमाने रशियामधून घेतली होती.

मात्र रशियाच्या झालेल्या विलगीकरणामुळे या कंपन्या बरखास्त झाल्या, विखुरल्या. अशा वेळी कोणत्याही प्रत्यक्ष निर्मिती केंद्राचे पाठबळ नसताना विमानांची निगा राखणे हे अतिशय कठीण काम पाटकर यांनी केले. ते पाच वर्षे या पदावर होते. इथेच त्यांना एअर व्हाइस मार्शल या पदावर बढती मिळाली. आणि २००१ मध्ये याच कामासाठी राष्ट्रपती के.आर. नारायणन यांच्या हस्ते ‘अतिविशिष्ट सेवा पदक’ प्रदान करण्यात आले.

२००१ मध्ये वेस्टर्न एअर कमांडमध्ये ‘सीनिअर मेन्टेनन्स स्टाफ ऑफिसर’, नोव्हेंबर २००१ पासून एअर मार्शल झाल्यावर ‘एअर ऑफिसर’ या पदांवर त्यांनी काम केले. इथे विमान, मिसाइल्स रडार, संदेशवहन, प्रत्यक्ष दळणवळणाची साधने यांची निगा राखण्याची जबाबदारी त्यांनी दोन वर्षे पेलली. त्याकरिता मार्च २००३ मध्ये त्यांना राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते ‘परमविशिष्ट सेवा पदक’ प्रदान करण्यात आले.

जुलै २००४ मध्ये नागपूर येथे ‘एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ ऑफ मेन्टेनन्स कमांड’ पदी त्यांची नियुक्ती झाली. हे वायुसेनेत अभियंता

प

अधिकाऱ्याला मिळालेले अत्युच्च पद आहे. दहा महिने या पदावर काम केल्यानंतर एप्रिल २००५ मध्ये वयाच्या साठाव्या वर्षी ते सेवानिवृत्त झाले.

– पल्लवी गाडगीळ

## पाटणकर, मनोहर सदाशिव

**भूसेना – मेजर जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक**

**१ जानेवारी १९२० – १० ऑक्टोबर २००७**



मनोहर सदाशिव पाटणकर यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे आजोबा रावबहादूर सीताराम गणेश पाटणकर हे अलिबाग येथे महसूल अधिकारी होते, तर वडील सदाशिव यांचा नागपूर येथे शीतगृह चालवण्याचा व्यवसाय होता. पाटणकर यांचे प्राथमिक शिक्षण नागपूर येथील सुळे विद्यालयामध्ये झाले व मॉरिस महाविद्यालय, नागपूर येथे त्यांनी उच्च शिक्षण घेतले. ते पदवीचे (बी.ए) शिक्षण घेत असतानाच दुसऱ्या महायुद्धासाठी सैनिक भरती सुरू झाली. त्यातूनच त्यांनी ९ मार्च १९४२ रोजी सैन्यात ‘कमिशन ऑफिसर’ म्हणून ‘मराठा लाइट इन्फन्ट्री’मध्ये प्रवेश केला. त्या वेळी त्यांना उत्तर आफ्रिकेत चाललेल्या महायुद्धात पाठविण्यात आले.

महायुद्धात उत्तर आफ्रिकेतील जवळजवळ सर्व आघाड्यांवर त्यांनी काम केले. महायुद्धाच्या शेवटच्या काळात त्यांनी इटलीमध्ये १९४५ पर्यंत ऑक्युपेशन फोर्समध्ये काम केले. मराठा लाइट इन्फन्ट्रीची ही बटालियन महायुद्धात अतिशय मर्दुमकीची कामगिरी करणारी ठरली. यात सुमारे पाचशे सैनिक मृत्युमुखी पडले, तर चौदाशेपेक्षा अधिक जायबंदी झाले. महायुद्धात कामगिरी करून मायदेशी परतलेल्या ह्या बटालियनला घेऊन पाटणकर यांना अफगाणिस्तानात ‘इप्पीच्या फकिराच्या’ टोळीच्या बंदोबस्तासाठी पाठविण्यात आले. मराठा लाइट इन्फन्ट्रीत पॅराशूट विभाग त्या वेळी नुकताच सुरू झाला होता. त्यात ब्रिगेडियर अहमद उस्मान या अधिकाऱ्याच्या हाताखाली त्यांना पॅराशूट रेजिमेंटचे ‘ब्रिगेड मेजर’ म्हणून बढती मिळाली. त्याच वेळी पंजाबमध्ये जातीय दंग्याचा भडका उडाला आणि स्वातंत्र्यपूर्व काळात तेथून हजारो हिंदूंना भारतात सुरक्षित परत आणण्याचे कठीण काम त्यांच्यावर सोपविण्यात आले.

त्याच वेळी पाकिस्तानी टोळीवाले काश्मीरमध्ये घुसले. त्यांचा बिमोड करण्यासाठी पॅराशूट रेजिमेंटची बटालियनही काश्मीरमध्ये उतरली. या युद्धात ब्रिगेडियर अहमद उस्मान एका तोफगोळ्यामुळे मृत्युमुखी पडले व मेजर पाटणकर त्यात जखमी झाले.

सप्टेंबर १९४८ मध्ये पाटणकर यांना वेलिंग्टन येथील आर्मी स्टाफ कॉलेजमध्ये अभ्यासक्रमासाठी पाठविण्यात आले. तेथून जनरल नागेश यांच्या हाताखाली त्यांनी दिल्लीत तीन वर्षे स्टाफ ऑफिसर म्हणून काम केले.

त्यानंतर पुन्हा मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये नेमणूक देऊन पाटणकर यांना तिबेटमध्ये याटुंग व ग्यान्से फोर्ट ह्या ठिकाणी पाठविण्यात आले. कोणताही रस्ता नसताना पंचवीस दिवस बर्फातून हिमालय पायी तुडवत मराठा लाइट इन्फन्ट्री त्या ठिकाणी पोहोचली. परंतु स्थानिक अधिकाऱ्यांनी मध्यस्थी केल्याने ह्या रेजिमेंटला परत हिंदुस्थानला जाण्याचा हुकूम मिळाला. ग्यान्से फोर्टमध्ये काही भारतीय अधिकारी व ट्रेड एजंट ठेवून रेजिमेंट परत वळते ना वळते तोच एक हिमनग फुटून त्या पाण्याच्या लोंढ्यामुळे सबंध ग्यान्से किल्ला नष्ट झाला आणि पाटणकर ईश्वरकृपेने वाचले. यानंतर ते मराठा लाइट इन्फन्ट्रीचे प्रिन्सिपल स्टाफ ऑफिसर म्हणून काश्मीर-लडाख सरहद्दीवर अत्यंत कठीण अशा बर्फाळ प्रदेशात उतरले. रस्ते नसलेला निर्जन बर्फाळ प्रदेश, हिमनद्या व बर्फाचे तुफान ओढे हे

निसर्गजन्य शत्रू व पाकिस्तानी आक्रमणखोरांशी त्यांना सतत लढावे लागले.

२९ फेब्रुवारी १९४८ रोजी त्यांचा विवाह इंदुमती पद्माकर देशमुख यांच्याशी झाला. याच दरम्यान त्यांना डेहराडून मिलिटरी अकॅडमीचे चीफ इन्स्ट्रक्टर म्हणून नेमण्यात आले.

याच काळात इथियोपियाचे राजे हेले सेलासी यांच्याविरुद्ध तेथील सैनिकांनी बंड केले होते. राजे हेले सेलासी यांनी भारत सरकारला मदतीची हाक दिली. त्याला प्रतिसाद देत भारत सरकारने भारतीय सैन्य इथिओपियामध्ये पाठविले. पाटणकर यांना ब्रिगेडियर म्हणून बढती देऊन त्यांची रवानगी आदिस अबाबा येथे भारतीय सैन्याचे प्रमुख म्हणून करण्यात आली. सैन्यात बंडाळी आणि या राष्ट्राची भाषा येत नसल्याने हिंदी फौजांना ही कामगिरी कठीणच होती. परंतु शांतता प्रस्थापित करून सैन्याला शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी इतके उत्तम केले, की राजे हेले सेलासी यांनी त्यांना 'इथियोपियन स्टार ऑफ ऑनर ऑफ हाय ऑर्डर' हा देशातील सर्वोच्च बहुमान दिला.

पाटणकर यांना १९६७ मध्ये मेजर जनरल म्हणून पदोन्नती मिळाली. जनरल ऑफिसर्स कमांडर म्हणून जम्मू आणि काश्मीर हा भाग त्यांच्या हाताखाली होता. या काळात आंतरराष्ट्रीय सीमारेषेतून होणाऱ्या पाकिस्तानी घुसखोरीचे पारिपत्य करण्यासाठी त्यांनी एक विशेष विभाग उघडून नवीन यंत्रणा सुसज्ज केली. बांगलादेश युद्धात आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम या पूर्व विभागाचे जनरल ऑफिसर म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

त्यांच्या सैनिकी जीवनातील असाधारण कर्तृत्वाचा सन्मान म्हणून १९७२ मध्ये त्यांना राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांच्या हस्ते 'परमविशिष्ट सेवा पदक' देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर १९ डिसेंबर १९७३ रोजी त्यांनी सैन्यातून मेजर जनरल या पदावरून निवृत्ती स्वीकारली. परंतु सरकारने त्यांना कॅबिनेट सेक्रेटरी या पदावर दोन वर्षे निङ्क्ती देऊन त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग करून घेतला. त्यानंतर ते आपले जन्मगाव पुणे येथे स्थायिक झाले.

पाटणकर यांना 'परमविशिष्ट सेवा पदका'बरोबर 'इटली स्टार', 'जर्मनी स्टार', 'डिफेन्स ऑफ युरोप क्लास ८' अशी एकूण १६ पदके मिळाली आहेत.

– विवेक कुलकर्णी

## पिंटो, वॉल्टर ॲन्थनी

**भूसेना – लेफ्टनंट जनरल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**१ जुलै १९२४**



कलाशाखेत इंटरपर्यंतचे शिक्षण घेऊन वॉल्टर पिंटो यांनी अलाहाबाद विद्यापीठातून संरक्षणविषयक पदव्युत्तर (एम.ए. डिफेन्स स्टडीज) शिक्षण घेतले. लष्करी सेवेची आसच त्यांना या क्षेत्रात घेऊन आली. दि. १२ सप्टेंबर १९४३ रोजी त्यांनी सैन्यात प्रवेश घेतला. भूसेनेतील प्रत्यक्ष कार्यात आणि विशेषत: सैन्य प्रशिक्षणात त्यांचे योगदान आहे.

सैन्याला प्रशिक्षण देण्यापूर्वी त्यांनी स्वत: जानेवारी ते मार्च १९४९ या कालावधीत महू इथे सैनिकी सेवा प्रशिक्षक पदाचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर ऑक्टोबर १९५४ ते ऑगस्ट १९५५ दरम्यान वेलिंग्टन इथेही प्रशिक्षणाकरिता सैनिकी सेवेतल्या स्पर्धा-परीक्षांमधून त्यांची निवड झाली. प्रशिक्षणाचा प्रदीर्घ अनुभव घेतानाच त्यांनी प्रत्यक्ष लष्करी कामातही भाग घेतला. ऑक्टोबर १९५५ ते नोव्हेंबर १९५८ या काळात ते इन्फन्ट्री ब्रिगेडचे ब्रिगेड मेजर (सैनिकी व्यवहार व नियोजन) होते. भूसेनेत पुढच्या पदावर गेल्यावरही त्यांनी महू येथे एप्रिल ते जुलै १९६० दरम्यान ज्येष्ठ अधिकाऱ्यांसाठी असलेले प्रशिक्षण घेतले.

प

देशाच्या सुरक्षेसाठी लढणाऱ्या जवानांना तयार करणारे प्रशिक्षक/मार्गदर्शक म्हणून त्यांनी विविध ठिकाणी काम पाहिले. यात दि. २३ डिसेंबर १९६३ ते दि. १० ऑगस्ट १९६५ या कालावधीत वेलिंग्टन इथे लेफ्टनंट कर्नल पदावरून 'अ' वर्ग प्रशिक्षक म्हणून त्यांनी काम केले. एप्रिल १९६७ ते १९६९ या काळात ब्रिगेड कमांडर म्हणूनही त्यांनी काम केले. दि. २६ मे १९६९ ते दि. १४ एप्रिल १९७१ दरम्यान सैन्यात ब्रिगेडियर असताना त्यांनी वेलिंग्टन डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजचे प्रमुख प्रशिक्षकपद निभावले. १९७१ पासून डिव्हिजनल कमांडर असताना लेफ्टनंट जनरल पिंटो यांनी भारत-पाक युद्धात मोलाचे योगदान दिले. त्याकरिता त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले.

एप्रिल १९७१ ते जानेवारी १९७४ या कालावधीत मेजर जनरल असताना डिव्हिजनल कमांडर, ९ जानेवारी १९७४ ते नोव्हेंबर १९७६ दरम्यान सैन्य मुख्यालयात सैनिकी प्रशिक्षणाचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. नोव्हेंबर १९७६ ते जानेवारी १९७९ दरम्यान लेफ्टनंट जनरल असताना कॉर्प्स कमांडर, जानेवारी १९७९ ते दि. ३० जून १९८० या काळात त्यांनी दिल्लीत नॅशनल डिफेन्स कॉलेजचे कमांडंट म्हणून काम केले. या पदावर असताना त्यांनी सेनेला तसेच पोलीस दलातल्या अधिकाऱ्यांना सैनिकी प्रशासन, आंतरराष्ट्रीय संबंध, संरक्षण आणि आर्थिक-सामाजिक बाजू या संदर्भातील प्रशिक्षण दिले.

दि. १ जुलै १९८० ते दि. ३० जून १९८२ या दरम्यान लेफ्टनंट जनरल असताना भूसेनेच्या मध्य विभागाचे प्रमुख ('जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ') अशी पदे पिंटो यांनी भूषवली. १९८० नंतरच्या कालावधीत उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा आणि मध्यप्रदेश ह्या भागांची जबाबदारी त्यांच्याकडे होती. राजपूत रेजिमेंटमध्ये दि. २ ऑगस्ट १९७३ ते दि. ३० जून १९८२ या काळात ते कर्नलपदी रुजू होते. १९७४ ते १९७६ या काळात पिंटो क्रीडा नियामक मंडळात अध्यक्षपदी होते, तर याच कालावधीत ते भारतीय हॉकी फेडरेशनचे उपाध्यक्ष होते. यावरून त्यांची क्रीडा आणि प्रशासनातली आवडही दिसून येते.

– पल्लवी गाडगीळ

## पित्रे शशिकांत गिरिधर

**भूसेना – मेजर जनरल**

**राष्ट्रीय सुरक्षाविषयक जनजागृती, भूसुरुंगविषयक कार्य**

**१२ एप्रिल १९४२**



शशिकांत गिरिधर पित्रे यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील आयकर खात्यात अधिकारी होते. तर आई सुशीला गृहिणी होती. डॉ. दादासाहेब भडकमकर हे त्यांचे मामा तर करवीरपीठाचे तत्कालीन पू. शंकराचार्य हे त्यांचे आजोबा होते. शशिकांत हे सहा भावंडांतील धाकटे पुत्र होते. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातील विद्यापीठ हायस्कूलमध्ये आणि नंतर साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. पुण्यातील सर परशुरामभाऊ (स.प.) महाविद्यालयातून त्यांनी सांख्यिकी या विषयातील पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली. महाविद्यालयात असताना ते राष्ट्रीय छात्रसेनेच्या अधिकारी प्रशिक्षण विभागात दाखल झाले. त्यानंतर त्यांनी भारतीय सैन्य प्रबोधिनीमध्ये एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

१९६२ मध्ये त्यांनी भूसेनेच्या अभियांत्रिकी विभागात (कोअर ऑफ इंजिनिअर्स) प्रवेश केला. पुण्यातील सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सी.एम.इ.) त्यांनी अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली.

१९६५ च्या भारत-पाक युद्धात ते सहभागी होते. १९७१ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी ते नवव्या

प

इन्फन्ट्री डिव्हिजनमध्ये कार्यरत होते. या युद्धातील पहिला ‘क्रुपमान’ पूल त्यांनीच बांगला देश सीमेवरच्या बायरा नदीवर जस्सौर विभागात बांधला. बांगला देशातील विजयासाठी हाच पूल पुढे ‘विजय सेतू’ (ब्रिज टू व्हिक्टरी) म्हणून ओळखला गेला.

या युद्धानंतर त्यांची नियुक्ती नागपूरस्थित ‘गॅरीसन इंजिनिअर्स’मध्ये झाली. त्यानंतर त्यांनी ‘डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज’मधून एक महत्त्वाचा प्रशिक्षणक्रम पूर्ण केला. १९७५ मध्ये त्यांची नियुक्ती जम्मू-काश्मीरमध्ये ‘ब्रिगेड मेजर’पदी झाली. १९७७ मध्ये चिलखती विभागाच्या (आर्मर्ड डिव्हिजन) एकशे चौदाव्या आर्मर्ड रेजिमेंटच्या कमांडरपदी शशिकांत पित्रेंची नियुक्ती झाली. पाच वर्षे ते या पदावर कार्यरत होते.

त्यानंतर त्यांनी महू येथून उच्चाधिकारी पाठ्यक्रम (हायर कमांड कोर्स) पूर्ण केला. त्यानंतर त्यांची नियुक्ती ‘कर्नल - जनरल स्टाफ’ या पदावर पुणेस्थित भूसेनेच्या दक्षिण विभागात (सदर्न कमांड) झाली. तेथूनच त्यांची नियुक्ती ‘कर्नल - जनरल स्टाफ, ऑपरेशन्स’ या पदावर श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेमध्ये झाली. तीन वर्षे या पदावर ते तेथे कार्यरत होते. भारतीय शांतिसेनेच्या एकूण कार्यवाहीचे व हालचालींचे नियोजन यात त्यांच्या महत्त्वाचा सहभाग होता.

१९९० मध्ये त्यांची नियुक्ती पहिल्या कोअरच्या मुख्य अभियंतापदी झाली. तेथून त्यांची ‘जनरल कॅडर’मध्ये पदोन्नती झाली. त्यांची नियुक्ती पहिल्या इन्फन्ट्री ब्रिगेडवर सिक्कीम सीमेवर झाली. त्यानंतर त्यांच्या त्याच ब्रिगेडकडे मणिपूरच्या फुटिरतावाद्यांनी त्रस्त अशांत भागाची जबाबदारी देण्यात आली.

१९९४ मध्ये त्यांच्याकडे पश्चिम सीमेवर तैनात असलेल्या नवव्या इन्फन्ट्री डिव्हिजनचे ‘डिव्हिजन कमांडर’ म्हणून नेतृत्त्व देण्यात आले. १९९६ मध्ये त्यांची नियुक्ती शिमलास्थित भूसेनेच्या प्रशिक्षण विभागाचे (आर्मी ट्रेनिंग कमांड) उप प्रमुख (व्हाईस चीफ ऑफ स्टाफ) म्हणून झाली. सैनिकांचे प्रशिक्षण आणि सैद्धान्तिक भूमिका तयार करण्याचे कार्य हा विभाग करतो.

एप्रिल १९९८ मध्ये भूसेनेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी युद्धांशी संबंधित दोन कार्ये सुरू केली. पहिले कार्य म्हणजे विविध वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांमधून राष्ट्राच्या संरक्षण क्षेत्राविषयी प्रबोधन करणारे आणि युद्धविषयक विश्लेषण करणारे चतुरस्त्र लेखन त्यांनी सुरू केले. १९९९ च्या कारगील युद्धकाळात त्यांची दै. सकाळमधून प्रकाशित झालेली ‘व्यूह आणि वेध’ ही दैनिक लेखमाला गाजली. त्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानवर केलेल्या हल्ल्याच्या वेळी दै. लोकसत्तातून प्रकाशित झालेली ‘व्यूहवेध’ ही लेखमाला लोकप्रिय झाली आणि शतकमहोत्सवी ठरली. अमेरिकेच्या इराकवरील हल्ल्याच्या वेळी दै. लोकसत्तेतून पुन्हा ‘व्यूहवेध’ ही लेखमालिका प्रकाशित झाली. याशिवाय इतर अनेक नियतकालिकांमधूनही त्यांनी संरक्षणविषयक जनजागृती करणारे लेखन केले आहे. कारगिल युद्धावरच्या त्यांच्या ‘डोमेल ते कारगिल’ या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्तम ग्रंथ पुरस्कार २००१ मध्ये मिळाला. अन्यही काही पुरस्कार या पुस्तकाला प्राप्त झाले आहेत. नौसेनाध्यक्ष भास्कर सोमण यांचे त्यांनी लिहिलेले चरित्र ‘अॅडमिरल सोमण - भारताचे सरखेल’ गाजले आहे. ‘श्रीलंकेची संघर्षगाथा’ हे श्रीलंकेतील तमीळ अतिरेक्यांविरुद्ध भारतीय शांतीसेनेच्या तेथील कामगिरीवर लिहिलेले पुस्तकही वाचकप्रिय ठरले आहे. ही सर्व पुस्तके राजहंस प्रकाशनने प्रकाशित केली आहेत. भारतीय नौसेनेच्या विनंतीवरून त्यांनी सोमणांच्या चरित्राचे इंग्रजी भाषांतरही केले आहे.

त्यांचे दुसरे कार्य जागतिक पातळीवरील भूसुरुंग विरोधी कार्य हे आहे. जगभरात युद्धकाळात हजारो भूसुरुंग पेरले जातात. भारतीय सेना आपल्या उज्ज्वल परंपरेप्रमाणे युद्धोत्तर काळात संपूर्ण भूसुरुंग क्षेत्र साफ

(डि-माईन) करते. मात्र जगभरातील इतर सेना आणि सशस्त्र अतिरेकी गट असे करीत नाहीत. युद्धोत्तर काळात त्या भूसुरुंगांमुळे दरवर्षी तेरा कोटी निष्पाप नागरिक अपंग होतात आणि चोवीस हजार नागरिक मारले जातात. त्यातील तीस टक्के लहान मुले असतात. जगभरात असे विविध ठिकाणी पेरलेले भूसुरुंग नष्ट करणे व सुरुंगक्षेत्र साफ करून तो भूभाग सुरक्षित करणे हे एक उच्च प्रशिक्षणाची आवश्यकता असलेले तंत्रकुशल कार्य आहे. याच कार्यासाठी मेजर जनरल शशिकांत पित्रे यांनी 'हॉरिझॉन' नावाची एक स्वयंसेवी संस्था २००१ मध्ये अन्य सहकार्यांसमवेत स्थापन केली आहे. ही अशा प्रकारचे कार्य करणारी एकमेव आशियायी संस्था आहे. ही संस्था राष्ट्रसंघाच्या (युनो) मार्गदर्शनाखाली कार्य करते. जगात अशा केवळ अकरा संस्था आहेत. शशिकांत पित्रे स्वतः अभियंता असल्याने हे कार्य व त्यासाठीचे प्रशिक्षित मनुष्यबळ उभे करणे त्यांना अवघड गेले नाही. या संस्थेचे सर्व कर्मचारी व स्वयंसेवक हे भूतपूर्व सैनिक व सेनाधिकारी असतात.

२००३ मध्ये या संस्थेने श्रीलंकेत सुरुंग नष्ट करण्याचे कार्य सुरू केले. त्यानंतर आजवर जगभरातील विविध ठिकाणचे भूसुरुंग नष्ट करण्याचा दरवर्षी एक प्रकल्प नॉर्वेचे सरकार या संस्थेला देत आले आहे. २००९ पासून भारत सरकारही या संस्थेला अशाच स्वरूपाच्या कार्यासाठी निमंत्रित करू लागले आहे. जॉर्डनमध्येही या संस्थेने अशा स्वरूपाचे कार्य केले आहे.

आजवर शशिकांत पित्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने जगभरात विविध ठिकाणचे दीड लाख भूसुरुंग नष्ट केले आहेत तर न फुटलेले धोकादायक असे सहा हजार बॉम्ब निकामी केले आहेत. त्याचबरोबर उत्तर आणि पूर्व श्रीलंकेत ही संस्था लढाईमुळे विस्थापित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनाचे कार्य करते आहे. अशा प्रकारच्या कार्यासाठी राष्ट्रसंघाची मान्यता मिळालेली आणि 'आय.एस.ओ. ९०००:२००१' मानांकन मिळालेली ही पहिली संस्था आहे.

शशिकांत पित्रे हे अन्य अनेक सामाजिक कार्यांशी व संस्थांशी संबंधित आहेत. अपंग सैनिकांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असणाऱ्या क्विन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूटचे ते एक विश्वस्त आहेत.

– राजेश प्रभु साळगांवकर

* * *

प

# ब

## बाहेकर, रमेश चंद्रभान
**भूसेना - हवालदार**
**शौर्यचक्र**
**६ ऑगस्ट १९७१**



रमेश चंद्रभान बाहेकर यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील किन्होळा या गावी झाला. २७ ऑक्टोबर १९९० रोजी ते मराठा लाइट इन्फन्ट्रीत दाखल झाले.

५ जून २००१ रोजी बाहेकर हे जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सुरणकोट भागात एका मोहिमेत सहभागी झाले होते. ते सत्ताविसाव्या राष्ट्रीय रायफल बटालियनमध्ये कार्यरत होते. या भागात दहशतवाद्यांनी घुसखोरी केलेली होती. त्यामुळे याच भागात सैनिकांनी मोर्चा लावला होता.

वादळी वारे आणि पावसात सलग अठ्ठेचाळीस तास या भागात बटालियनने निरीक्षण चालू ठेवले होते. दहशतवाद्यांचा एक गट भारतीय सैनिकांच्या या तुकडीला चुकवत एका ओढ्याजवळून चाललेला या तुकडीला दिसला. त्यांना पाहताच बाहेकर स्वत: पुढे सरसावले. दहशतवाद्यांना अनपेक्षित घेराव घालण्यासाठी त्यांनी तुकडीचे नेतृत्व केले. दहशतवाद्यांनीही या तुकडीवर अंदाधुंद गोळीबाराला सुरुवात केली.

या गोळीबारात जखमी होऊनही त्यांनी एका दहशतवाद्याला कंठस्नान घातले. यात त्यांना अपंगत्व आले तरीही या कारवाईतून ते मागे हटले नाहीत. या शौर्याबद्दल त्यांना २६ जानेवारी २००२ रोजी ‘शौर्यचक्र’ प्रदान करण्यात आले.

- रुपाली गोवंडे

## बेवूर, गोपाळ गुरूनाथ
**भूसेना - जनरल**
**११ ऑगस्ट १९१६ - २४ ऑक्टोबर १९८९**



गोपाळ गुरूनाथ बेवूर यांचा जन्म मध्यप्रदेशातील शिवनी या गावी झाला. सर गुरूनाथ व्यंकटेश बेवूर यांचे ते सुपुत्र होते. मोठा भाऊ माधव बेवूर यांना दुसऱ्या जागतिक महायुद्धात वीरगती मिळाली. यांच्या विचारांचा जनरल बेवूर यांच्यावर मोठा प्रभाव होता. याच प्रेरणेतून त्यांनी भारतीय लष्करात भरती होण्याच्या निर्णय घेतला.

बेवूर यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या जन्मगावी झाले. उच्चशिक्षणासाठी ते सिनिअर केंब्रिज येथे झाले. उच्चशिक्षणासाठी ते सिनिअर केंब्रिज तसेच डेहराडून येथील ‘इंडियन मिलिटरी ॲकॅडमी’चे विद्यार्थी होते.

१५ जुलै १९३७ रोजी वझिरीस्तान मोहिमेच्या वेळी बेवूर यांच्यावर ग्रीन हॉवर्ड फलटणीची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर त्यांची बदली ५ बलुच येथे झाली. तिथे १९४५ पर्यंत ते सेवेत होते.

बेवूर यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक यशोशिखरे गाठली. क्वेट्टा येथील स्टाफ कॉलेज कोर्समध्ये बेवूर यांचा सक्रिय सहभाग होता. वैशिष्ट्य म्हणजे त्यानंतर

त्यांना ‘व्हॉइसरॉय- समन्वयक समिती’ने लष्कर सचिव म्हणून घोषित केले. बेवूर हे एकमेव आणि पहिले भारतीय अधिकारी होते, ज्यांना हा बहुमान मिळाला होता. १९४७ मध्ये त्यांनी ‘२ डोग्रा’ची सूत्रे हाती घेतली. बेवूर यांनी अनेक वर्षे शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राथमिक सैन्यप्रशिक्षणाचे धडे दिले. त्यानंतर १९४८ मध्ये बेवूर यांना राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)चे पहिले मुख्य अधिकारी म्हणून निवडण्यात आले.

बेवूर यांचा भारत-पाक आणि भारत-चीन युद्धाच्या वेळेस लष्करात मोलाचा सहभाग होता. फेब्रुवारी १९६१ मध्ये जालंधर येथील सत्ताविसाव्या इन्फन्ट्री डिव्हिजनचे ते मुख्य जनरल कमांडर होते. १९६२ मध्ये चीनच्या आक्रमणाला सुरुवात झाल्यावर त्यांनी डिव्हिजन पश्चिम बंगालमधील कलिमपोंग येथे हलविली. येणाऱ्या प्रत्येक संकटाला अथवा आव्हानाला त्यांनी संधी मानून नेहमीच पराक्रम गाजवला. भारत-पाक युद्धाच्या वेळी दक्षिण कमांडचे मुख्य कार्यालय असलेल्या राजस्थान व कच्छ भागातील अनेक मोहिमा त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या.

ब

जैसलमेर येथे तैनात असलेल्या भारतीय सैन्याच्या तुकडीवर हल्ला करण्यासाठी शत्रूने आपले पायदळ आणून उभे केले. हल्ला करून रामगड येथील सैन्याची फळी कमकुवत करण्याचा शत्रूचा मनसुबा होता. पण त्यावेळी बेवूर यांनी ठोस भूमिका घेतली. त्यांच्या प्रेरक नेतृत्वाखाली तसेच हवाई दलाच्या मदतीने भारतीय लष्कराने शत्रूला लोंगोवाल येथेच थोपवून धरले. भारतीय सैन्याने आगेकूच करत शत्रूच्या भागातील बराच मोठा भाग आपल्या ताब्यात घेण्यात यश मिळविले. बेवूर यांच्या दुर्दम्य इच्छाशक्ती आणि प्रबळ आत्मविश्वासाच्या जोरावर भारतीय सैन्याने शत्रूला नामोहरम करण्यात यश मिळवले.

बेवूर यांनी भूसेना आणि वायुसेना या दोन्ही विभागातील परस्परसंबंध चांगले जपले आणि वृद्धिंगत केले. याच जोरावर अनेक खडतर मोहिमा यशस्वी केल्या.

१९६३ मध्ये त्यांना दिल्ली येथील मुख्य सैन्यदल कचेरीचे सैन्य प्रशिक्षण अधिकारी म्हणून नेमले, त्यांनी १९६४ पर्यंत ही जबाबदारी समर्थपणे पेलली.

बेवूर यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना परमविशिष्ट सेवा पदकाने गौरविले गेले. १९७१ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते ‘पद्मभूषण’ या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले गेले. राजस्थान व कच्छ भागातील मोहिमा यशस्वी केल्याबद्दल १९७३ मध्ये त्यांनी फिल्ड मार्शल सॅम माणेकशा यांच्यानंतर लष्करप्रमुख (चीफ ऑफ आर्मी स्टाफ) म्हणून जबाबदारी घेतली.

१९७६ मध्ये त्यांना भारताचे डेन्मार्क येथील राजदूत होण्याच्या सन्मान मिळाला. त्यापूर्वीच ते १९७५ मध्ये लष्करसेवेतून निवृत्त झाले. डेन्मार्क येथे जवळपास ३ वर्षे त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. बेवूर हे २ वर्षे पुणे विद्यापीठाच्या सर्वोच्च नियामक मंडळाचे सदस्य होते. तसेच पुण्यातील किर्लोस्कर उद्योग समूहाच्या नियामक मंडळातही होते.

त्यांच्या स्मरणार्थ कोरेगाव पार्क येथील एका रस्त्याला जनरल बेवूर यांचे नाव दिले गेले.

– अनघा फासे

* * *

# भ

## भिडे, विजयकुमार विनायक

**भूसेना - मेजर जनरल**
**महासंचालक - सीमा रस्ता संघटना**
**अतिविशिष्ट सेवा पदक**
**७ ऑक्टोबर १९२२**

विजयकुमार भिडे यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांचे वडील विनायक भिडे हे विलयतेतून (इंग्लंडमधून) आय.सी.एस. होणाऱ्या मोजक्या भारतीयांपैकी होते. मात्र विजय भिडे यांच्या जन्मानंतर तीनच महिन्यांनी विनायकरावांचे निधन झाल्याने आई माणिकबाई अमरावती येथे आपल्या वडिलांकडे - सर मोरोपंत जोशी यांच्याकडे - राहण्यास गेल्या. विजय भिडे यांचे प्राथमिक शिक्षण सरकारी मराठी माध्यमिक विद्यालयात झाले. त्यानंतर त्यांचे उच्च माध्यमिक शिक्षण डेहराडूनच्या डून स्कूल मध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण काही दिवस प्रयागच्या अलाहाबाद विद्यापीठात आणि पुढे मुंबईच्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे झाले.

त्याच काळात महायुद्ध पेटल्याने विजय भिडे भारतीय सैन्य प्रबोधिनी (इंडियन मिलिटरी अ‍ॅकेडमी) मध्ये दाखल झाले. तेथून १९४२ मध्ये त्यांची निवड सेनादलांच्या अभियांत्रिकी विभागात 'बॉम्बे सॅपर्स' मध्ये झाली. चिलखती दलासोबत (आर्मर्ड कोअर) असणाऱ्या सदतिसाव्या फिल्ड स्कॉड्रनमध्ये त्यांची नियुक्ती झाली. १९४४ मध्ये त्यांची स्कॉड्रन ब्रह्मदेशात अराकान प्रांतात आजाद हिंद सेनेसोबत आलेल्या जपानी फौजांशी लढण्यासाठी पाठविण्यात आली. १९४५ मध्ये त्यांना मोटार सायकलवर अपघात झाल्याने आजारपणाच्या रजेवर मीरत येथे पाठविण्यात आले. तेथूनच त्यांना वायव्य सरहद्द प्रांतात टोळीवाल्यांच्या बंदोबस्तासाठी पाठविण्यात आले. १९४६ मध्ये जागतिक महायुद्धानंतरही लढाया सुरूच असलेल्या इंडोनेशियात त्यांच्या तुकडीला पाठविले गेले. तेव्हा विजय भिडे कॅप्टनपदी कार्यरत होते.

तेथून परत आल्यावर त्यांनी पुण्यातील सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयातून (कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग) ए.एम.आय.इ. पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांची लगेच आसाम प्रांतात चार प्रमुख रस्ते बनविण्याच्या कार्यावर नेमणुक झाली. या चारही प्रमुख महामार्गांचे त्यांनी सर्वेक्षणापासून बांधणीपर्यंतचे काम तीन वर्षांत पूर्ण केले.

१९५२ मध्ये विजय भिडे यांचा विवाह कुसुम करोडे यांच्यासोबत झाला. त्याच सुमारास त्यांची जम्मू जवळ नगरोठा येथे सव्विसाव्या डिव्हिजनमध्ये लेफ्ट. कर्नल पदावर नियुक्ती झाली. तेथून लवकरच अंबाल्याला चौथ्या डिव्हिजनच्या 'कमांडर - इंजिनिअर्स' या पदावर भिडेंची नियुक्ती करण्यात आली. तेथील तीन वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी जन. महादेव सिंग, जन. सेन आणि जन.कौल या तीन वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत कार्य केले. तेथून त्यांची बदली १९५७ मध्ये सिमला येथे भूसेनेच्या पश्चिम विभागाच्या मुख्यालयात करण्यात आली.

१९५९ ते १९६२ या काळात विजय भिडे वरीष्ठ अधिकारी पाठ्यक्रमाचे प्रशिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांची नियुक्ती 'कर्नल' पदावर पुण्याच्या सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालयात युद्ध अभियांत्रिकी विभागाचे (कॉम्बॅट इंजिनिअरिंग) विभाग प्रमुख म्हणून झाली. तेथून लगेच १९६४ मध्ये त्यांना

ब्रिगेडियर पदी बढती मिळाली आणि त्यांची बदली भूसेनेच्या मध्य विभागात सैनिकी अभियांत्रिकी विभागाच्या नागपूरस्थित भांडार विभागात झाली.

१९६५ च्या वर्षात पाकिस्तानसोबत युद्धाचे वातावरण तयार होताच विजय भिडे यांना अकराव्या कोअरचे प्रमुख अभियंता म्हणून जालंदर येथे घाईघाईने नियुक्त केले गेले. लेफ्ट. जन. जोगिंदर सिंग धिल्लाँ हे तेव्हा अकराव्या कोअरचे कमांडर होते. याच युद्धात डेरा बाबा नानक येथे झालेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण लढाईत भारतीय सेनेले माघार घ्यावी लागताच विजय भिडे यांना एका ब्रिगेडचे नेतृत्त्व देऊन तेथे पाठविण्यात आले. भिडे यांच्या अधिपत्याखालील सेनेने शत्रूसैन्याला त्या भागातून हुसकावून लावले.

याच युद्धात खेमकरण भागातही दि. ८ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानने जोरदार हल्ला केला होता. इथल्या एका खेड्याच्या नावावरून ‘बॅटल ऑफ असल उतार’ या नावानेही ही लढाई ओळखली जाते. पहिल्या हल्ल्याच्यावेळी तेथे भारतीय तोफखाना नव्हता. केवळ सुरुंगांच्या मदतीने विजय भिडे यांच्या नेतृत्त्वाखालील ब्रिगेडने खेमकरण भारताच्या हातून जाता जाता वाचविले. त्यानंतर या भागावर पाकिस्तानच्या पहिल्या आर्मर्ड डिव्हिजनने पूर्ण ताकदीने हल्ला केला. पुढे पाकिस्तानचे अध्यक्ष झालेले मुशर्रफ हे त्यावेळी लेफ्टनंट पदावर याच पहिल्या आर्मर्ड डिव्हिजनमध्ये कार्यरत होते. दुसऱ्या महायुद्धानंतरची ही सर्वात मोठी रणगाडा लढाई मानली जाते. त्यावेळी झालेल्या जबरदस्त लढाईत खेमकरण राखतानाच पाकिस्तानचे एकशेपाच पॅटन रणगाडे भारताने ताब्यात घेतले. अभेद्य समजले जाणारे तीनशे पॅटन रणगाडे या लढाईत भारतीय रणगाड्यांच्या हल्ल्यात नष्ट झाले. एकशेपाच पॅटन रणगाडे ज्या ठिकाणी ताब्यात घेण्यात आले, त्या ठिकाणाला ङ्गपॅटन नगरङ्ख असेच नाव दिले गेले आहे. या लढाईत विजय भिडे यांच्या नेतृत्त्वाखालील अभियांत्रिकी दलाने उत्तम काम केले. भारतीय चिलखती दलाला आणि रणगाडा डिव्हिजनला खेमकरणच्या विभागातील बिआस नदीच्या परिसरातील मऊ मातीच्या भागात या अभियांत्रिकी मदतीचा चांगला उपयोग झाला. पाकिस्तानी रणगाड्यांना त्यांच्या अभियांत्रिकी विभागांकडून इतकी चांगली पाठराखण मिळाली नाही.

या लढाईनंतर या भागाचे सैन्य प्रमुख अकराव्या कॉर्पस्‌चे कमांडर ले.जन. जोगिंदरसिंग धिल्लाँ यांची बढती झाली आणि त्यांच्या जागी ले.जन.बी.एम. कौल यांची नियुक्ती झाली. त्यांनी संपूर्ण सीमेवर कुंपण व तटबंदी बांधण्याचे (‘फोर्टिफिकेशन’) आदेश विजय भिडे यांना दिले. त्यांनी संपूर्ण भारत-पाक सीमारेषेचे सर्वेक्षण करून योग्य ते आराखडे तयार केले. संपूर्ण सीमेवरच्या कुंपणाचे हे काम भिडे यांनी उच्च दर्जा राखून पार पाडले. स्थानीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने त्यांनी हे काम पार पाडले. भिडे यांनी आरेखन केलेले ही तटबंदी व कुंपण, काँक्रिटचे स्तंभ आजही मजबुतीने उभे आहेत.

त्यानंतर त्यांची राष्ट्रीय रक्षा महाविद्यालयात नियुक्ती झाली होती. परंतु सूत्रे हाती घेण्यापूर्वीच एका परिषदेत भाग घेण्यासाठी जात असता त्यांच्या जीपचा गंभीर अपघत झाला. त्यात त्यांच्या मणक्याला जबर दुखापत झाल्याने त्यांना ती नियुक्ती स्वीकारता आली नाही.

एप्रिल १९६८ मध्ये विजय भिडे यांची नियुक्ती ब्रिगेडियर पदावर अभियांत्रिकी कर्मचारीवर्गाचे प्रमुख म्हणून झाली. या पदावर तीन वर्षे ते ‘बॉम्बे’, ‘मद्रास’, ‘बंगाल’ या सर्व ‘सॅपर्स’ (लढाऊ सैनिकी अभियांत्रिकी पलटणी) व अन्य ठिकाणचे गैरलढाऊ अभियांत्रिकी गट (नॉन कॉंबॅट इंजिनिअरिंग ग्रुप) यांचे प्रमुख होते.

१९७१ च्या भारत-पाक युद्धाच्या (बांगलादेश युद्ध) काही दिवस आधी त्यांची नियुक्ती भूसेनेच्या पूर्व विभागाचे मुख्य अभियंता म्हणून झाली. त्यावेळी

भ

भूसेनेच्या पूर्व विभागाचे प्रमुख लेफ्ट. जन. अरोरा आणि 'चिफ ऑफ स्टाफ' लेफ्ट. जन. जे.एफ.आर. जेकब हे होते. या युद्धाच्या वेळी पूर्व सीमेवर नद्या ओलांडण्याचे सैनिकी अभियांत्रिकी साहित्य वेळेत पोहोचले नव्हते. ते सर्व साहित्य रायपूर येथील सैन्य अभियांत्रिकी भांडारात होते. या साहित्याशिवाय नद्यांच्या मुखांनी भरलेल्या पूर्व पाकिस्तानवर खोलवर चढाई करणे शक्य नव्हते.

पाकिस्तानी सैन्याने सर्व पूल उद्ध्वस्त केले होते. अखेर भूसेनेच्या पूर्व विभागाने पूर्व पाकिस्तानवर (आताचा बांगला देश) संपूर्ण आक्रमण करून बांगला देश मुक्त करण्याचे ठरविले. त्यासाठी लेफ्ट. जन. अरोरा यांनी विजय भिडे यांना सर्व अभियांत्रिकी सहकार्य करण्यास सांगितले. मुख्य अभियंता भिडे यांनी आपले सर्व संपर्क आणि कौशल्य पणाला लावून रायपूर येथील भांडारातून सर्व आवश्यक अभियांत्रिकी साहित्य सीमा भागात नियोजित ठिकाणी वेळेवर पोहोचेल याची व्यवस्था केली. पूर्व रेल्वेच्या महाव्यवस्तापकांनी या साहित्याच्या वाहतुकीची चोख व्यवस्था केली. तीन आठवड्यात सर्व साहित्य नियोजित स्थळी पोहोचल्यावर लगेच पूर्व पाकिस्तानवर चढाई सुरू झाली. लवकरच पूर्व पाकिस्तानचा पाडाव होऊन बांगला देश मुक्त करण्यात आला. चौराण्णव हजार पाकिस्तानी युद्धकैदी भारताच्या ताब्यात आले.

या युद्धातील युद्धकैद्यांना भारतात आणण्याचे काम मोठे होते. या परिसरातील सर्व खाजगी नावा व जहाजे ताब्यात घेऊन भिडे यांनी या युद्धकैद्यांना नारायणगंज येथून कलकत्त्यात आणले. पाकिस्तानने उद्ध्वस्त केलेले सर्व पूल पुन्हा बांधण्याचे अत्यंत महत्त्वाचे कामही विजय भिडे यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांच्या अखत्यारीतील सैनिकी अभियांत्रिकी दलांनी पाकिस्तानी फौजांनी उद्ध्वस्त केलेले रस्ते, विमानतळ, बंदरे इत्यादींची अत्यंत वेगाने पुनर्बांधणी केली.

त्यासोबतच विजय भिडे यांच्यावर मे. जन. सरकार यांच्यासोबत नवनिर्मित बांगला देशच्या प्रशासनाची घडी घालण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. युद्धापूर्वी पाकिस्तानी अत्याचारांमुळे लपून बसलेल्या सर्व नागरी प्रशासनातील अधिकाऱ्यांना शोधून त्यांना प्रशासनातील योग्य त्या जागांवर प्रस्तापीत करण्याचे प्रचंड कार्य विजय भिडे आणि मे. जन. सरकार यांनी पार पाडले.

विजय भिडे यांच्या नेतृत्त्वाखालील अभियांत्रिकी विभागांनी प्रचंड वेगाने केलेल्या उच्च दर्जाच्या कार्यामुळे १९७१ चे भारत-पाक युद्ध (बांगला देश मुक्ती युद्ध) हे 'अभियंत्यांचे युद्ध' ('इंजिनिअर्स वॉर') म्हणून ओळखले जाते.

या युद्धानंतर काही काळाने विजय भिडे यांची भूसेनेच्या दक्षिण विभागाचे मुख्य अभियंता म्हणून झाली. हा कार्यभार सांभाळल्यावर लगेच त्यांची मेजर जनरलपदी पदोन्नती झाली आणि त्यांची नियुक्ती सीमा रस्ते संघटनेच्या ('बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन') महासंचालकपदी झाली. १९७६ मध्ये ते सेनेतून निवृत्त झाले. त्यांच्या उत्तम दर्जाच्या सेवेसाठी आणि विविध युद्धांमधील उत्तम कामगिरीसाठी त्यांचा 'अतिविशिष्ट सेवा पदक' देऊन सन्मान करण्यात आला.

नंतर तीन वर्षे विजय भिडे अबुधाबीमधील नागरी रस्ते बांधणीसाठी तेथील शासनाचे सल्लागार होते. त्यानंतर ते पुण्यात स्थायिक झाले आहेत.

– राजेश प्रभु साळगांवकर

* * *

भ

# म

## मालशे, यशवंत विनायक
**वायुसेना - एअर व्हाइस मार्शल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**जन्म मृत्यू दिनांक अनुपलब्ध**



यशवंत विनायक मालशे हे वायुसेनेत १९४० मध्ये दाखल झाले. हवाई मुख्यालयाच्या महत्त्वपूर्ण ठिकाणी त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि त्याचबरोबर हवाई दलाच्या अनेक तुकड्या त्यांच्या नेतृत्वाखाली होत्या. १९४७ मध्ये त्यांनी क्वेट्टा येथे स्टाफ कॉलेज अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांनी १९५१ मध्ये लंडनमधील लॅण्ड अ‍ॅण्ड एअर वॉरफेअर स्कूलमधून वरिष्ठ हवाई साहाय्यक अभ्यासक्रम पूर्ण केला.

१९६२-६३ मध्ये त्यांनी नॅशनल डिफेन्स कॉलेजचा अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतर ते त्याच कॉलेजचे वरिष्ठ संचालक होते. दि. १ ऑक्टोबर १९६४ रोजी मालशे यांची पूर्व विभागाचे ‘एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ’ म्हणून नियुक्ती करण्यात आली. सेवेत असताना त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण मोहिमा चांगल्या पद्धतीने हाताळल्या. चीन आणि पाकिस्तानकडून होणाऱ्या संभाव्य आक्रमणांना तोंड देण्यासाठी त्यांनी वायुसेनेचे तळ मजबूत केले. सीमेवरील सैन्यदलांची वाहतूकही हवाई मोहिमांद्वारे त्यांनी उत्तमरीत्या केली.

मिझोराममधील घुसखोरीला तोंड देताना भूसेनेला त्यांनी वायुसेनेचे उत्तम छत्र मिळवून दिले. त्यांनी यात तत्परता आणि अचूकता दाखविली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वायुसेनेने आसाम सरकारला अनेक घडामोडींत मदत केली. त्यांनी वैयक्तिकरीत्या साऱ्या मोहिमांचे संचालन केले आणि स्वत:ही त्यात सहभागी झाले.

या त्यांच्या कामगिरीसाठी १९६७ मध्ये त्यांना ‘परमविशिष्ट सेवा पदक’ प्रदान करण्यात आले.

- संपादित

## मिशीगन, अ‍ॅन्थोनी हेरॉल्ड एडवर्ड
**भूसेना - मेजर जनरल**
**महावीरचक्र**
**१३ ऑक्टोबर १९२५ -**



अ‍ॅन्थोनी हेरॉल्ड एडवर्ड मिशीगन यांचा जन्म महाराष्ट्रातील विजापूर येथे झाला. मिशिगन अ‍ॅन्थोनी हे मूळचे कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातील होते. १० डिसेंबर १९४८ रोजी अ‍ॅन्थोनी हे सैन्यात दाखल झाले. त्यांनी मुंबई विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली.

१९७१ मध्ये पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धात ब्रिगेडिअर मिशीगन यांची नेमणूक माऊंटन ब्रिगेड मध्ये करण्यात आली. पूर्वेकडील प्रांताच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती. यावेळी पाकिस्तानी सैनिकांनी उथली या तळावर हल्ला केला. तिन्ही बाजूने त्यांच्या तळाला रणगाड्यांनी घेरले होते. त्यावेळी या कठिण परिस्थितीमध्येही अ‍ॅन्थोनी यांनी

म

कुठेही उतावीळपणा न दाखवता थंड डोक्याने या हल्ल्याचा स्वत: मुकाबला केला. त्यामुळे त्यांच्या दलातील इतर सैनिकांनाही लढण्याचे बळ प्राप्त झाले.

नंतर त्यांनी दरसान या शत्रूच्या ठाण्यावर जोरदार आक्रमण केले. मिशीगन यांचे हे आक्रमण पाहूनच त्यांच्या तुकडीला प्रेरणा मिळाली. मग या तुकडीने निकराने हल्ला करून शत्रूकडील मशीनगन, तोफखाने उद्ध्वस्त करून निर्णायक विजय मिळवला.

या काळात मिशीगन यांनी अत्युच्च व्यावसायिक कौशल्य दाखविले. त्याबद्दल त्यांना 'महावीर चक्रा'ने सन्मानित करण्यात आले. नोकरीच्या पुढील काळात मेजर जनरल पदपर्यंत त्यांना बढती मिळाली.

– मानसी आपटे

## मुंजे, बाळकृष्ण शिवराम
**सैनिकी शिक्षणाचे प्रणेते**
**१२ डिसेंबर १८७२ – ३ मार्च १९४८**



बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचा जन्म बिलासपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बिलासपूर येथेच झाले. १८८८ मध्ये माध्यमिक परीक्षेत त्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. मॅट्रिकपर्यंतचे त्यांचे शिक्षण रायपूर येथे झाले. मॅट्रिकच्या परीक्षेत ते अनुत्तीर्ण झाले. पुढे ती परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. इंटरमीजिएटची परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्यांनी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. १८९८ मध्ये ते एल.एम. अँड एस. ही परीक्षा दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. लगेच डॉ. मुंजे यांना मुंबई महानगरपालिकेमध्ये नोकरी मिळाली.

नोकरीत गर्क असताना त्यांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याचा योग आला. द. आफ्रिकेतील बोअर जमातीशी इंग्लंडचे युद्ध चालू होते. बोअर जमातीची सरशी होत होती. सेठ सुकातवाला यांनी जाहिरात देऊनही कोणी भारतीय डॉक्टर तेथे जाण्यास तयार होईना. तेव्हा अँग्लो इंडियनचीच निवड करावी लागेल असे ते खेदाने म्हणाले. तेव्हा मुंजे आणि त्यांचे मित्र डॉ. पारधी, डॉ. जतकर आणि डॉ. गाडगीळ हे आफ्रिकेत जायला तयार झाले. मुंबईत महिना बाराशे रुपये उत्पन्न मिळत असूनही त्या सर्व डॉक्टरांनी रु.२५०/– पगारावर वैद्यकीय अधिकारी म्हणून जायचे ठरवले.

दरबान येथे गेल्यावर ते मोहनदास गांधी (महात्मा गांधी) यांच्याकडे उतरले. गांधीजींप्रमाणे मुंजे यांनाही काळे–गोरे हा भेद जाणवला. पण मुंजे यांच्या सैनिकी पोशाखामुळे त्यांना त्रास कमी झाला.

युद्ध संपल्यानंतर त्यांचे मित्र पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. मुंजे मात्र भारतात परतले. १९०१ पासून नागपूर येथे ते नेत्रवैद्य म्हणून स्थायिक झाले. ते संशोधकही होते. त्यांनी कसाई खान्यातील शेळ्या–बोकडांची मुंडकी मिळविली. त्यांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून त्यांनी मोतीबिंदू शस्त्रक्रियेची नवी पद्धत शोधून काढली. त्यामध्ये कौशल्य प्राप्त केले. चरक, सुश्रुत यांचे ग्रंथ अभ्यासले व नेत्रचिकित्सेवर त्यांनी संस्कृत भाषेतून ग्रंथ लिहिला.

मुंजे यांनी १९०४ च्या काँग्रेस अधिवेशनात 'रिफॉर्म्ड ओपिनियन ऑन हिंदू सोशल रिफॉर्म्स' या विषयावर एक निबंध सादर केला. लोकमान्य टिळकांनाही तो आवडला. टिळकांचे विचार नागपूरमध्ये दृढ करण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय शिवाजी महोत्सव सुरू केला.

१९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली आणि भारतभर असंतोष उसळला. सुरतच्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी काँग्रेस पुढाऱ्यांतील मतभेद वाढीस लागले. जहाल आणि मवाळ असे स्पष्ट गट दिसू लागले. टिळकांच्या विचारांनी भारून मुंजे राजकारणात ओढले गेले. त्यांनी आपला डॉक्टरी

म

व्यवसाय आखडता घेतला. टिळक मंडालेहून परतले. त्यानंतर पहिले महायुद्ध सुरू झाले. या संधीचा फायदा घ्यावा आणि सरकारला पाठिंबा देऊन मिळेल तो देशाचा लाभ करून घ्यावा असा टिळकांचा विचार होता. सैन्याची दारे उघडतील आणि सैनिकी शिक्षणाची सोय होईल त्याचा फायदा घ्यायचा.

दादासाहेब खापर्डे, लो. अणे, डॉ. हेडगेवार यांनी टिळक विचार प्रणाली नागपूर प्रांतात वाढवली. टिळकांनंतर काँग्रेसचे नेतृत्व म. गांधींकडे गेले. मुंजे यांनी तेव्हाही कायदेभंग चळवळ, जंगल सत्याग्रह यांमध्ये भाग घेतला होता. विहिरीचे पाणी आटवून मीठ तयार केले, वृक्ष तोडण्यासाठी कुऱ्हाड चालविणे या दोन्ही आंदोलनांसाठी जनतेला प्रवृत्त केले.

याच काळामध्ये त्यांनी आपले कार्यक्षेत्र बदलले. १९२० नंतर मुसलमान व हिंदू यांच्यात धर्मावरून, त्यातील आचारविचारांवरून वारंवार तेढ निर्माण झाली. पुढे त्याचे पर्यवसान छोट्या-मोठ्या दंगलींत होऊ लागले म्हणून हिंदू महासभेची स्थापना झाली. मुंजे यांनी हिंदुमहासभेत वेगवेगळी पदे भूषवली. १९२७ ते १९३० या काळात मध्यवर्ती असेंब्लीचे ते सभासद होते. तेथे त्यांनी अनेक विषय मांडले. सैनिकी शिक्षण व सैन्याचे हिंदीकरण या विषयांवर त्यांनी आग्रहाचे प्रतिपादन केले. शाळा-महाविद्यालयांतून सैनिकी शिक्षण सक्तीचे करावे असा ठरावही त्यांनी मांडला होता.

म

सैन्यावर होणाऱ्या खर्चाचे अभ्यासपूर्ण विवेचन करून त्यातून भारतीय वैमानिक तयार होण्यासाठी एकही पैसा खर्च होत नाही हे त्यांनी दाखवून दिले. इतकेच नव्हे, तर इंग्लंडमधील स्टॅण्डर्ड कॉलेज, बुलविच कॉलेज व डेहराडून कॉलेज येथे सैनिकी शिक्षणासाठी हिंदुस्थानातून निवडल्या जाणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यासाठी समितीवर व्हॉइसरॉयने डॉ. मुंजे यांची नेमणूक केली होती आणि याच काळात भारतीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कलकत्ता, मद्रास, मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी वसतिगृह काढण्याची सूचना त्यांनी केली होती. त्यांची ही कल्पनाच पुढे 'भोसला सैनिकी शाळे'च्या रूपात साकार झाली.

काँग्रेसने गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला. तेव्हा भारतातील हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून मुंजे विलायतेला गेले. परिषदेनंतर सर्व प्रतिनिधी परतले; परंतु डॉ. मुंजे मात्र फ्रान्स, जर्मनी, इटली, ऑस्ट्रेलिया या देशांतील लष्करी शिक्षणाची पाहणी करण्यासाठी गेले. त्यांनी ड्रिस्डेन व म्युनिक येथील सैनिकी संस्थांची माहिती करून घेतली. प्रसिद्ध जर्मन सेनानी फील्ड मार्शल मॅकेन्सन यांची त्यांनी आवर्जून भेट घेतली. इटलीत त्यांनी सैन्य आणि सैनिकी शाळा पाहिल्या. युरोपमधील सैन्यबळ आणि सैनिकी शिस्त यांमुळे प्रभावित होऊन भारतात सैनिकी शाळा स्थापण्याचा त्यांनी निश्चय केला.

त्यांनी सैनिकी शिक्षणाचा अभ्यास करून मुंबईला जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वतंत्र हिंदुस्थानच्या संरक्षणाची व्यवस्था' या विषयावर भाषण दिले. काळाची गरज ओळखून राष्ट्रीय विचारांनी प्रेरित अशा 'सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. या सोसायटीच्या माध्यमातून वयाच्या चौसष्टाव्या वर्षी १९३७ मध्ये त्यांनी भोसला सैनिकी शाळा (भोसला मिलिटरी स्कूल) सुरू केले. नाशिकजवळ एकशे पंचवीस एकर जमिनीवर हे विद्यालय आहे. तत्कालीन तीन लाख रूपये खर्च करून हे विद्यालय उभारले गेले आहे.

शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशी ५ जून १९३७ रोजी या शाळेचे उद्घाटन झाले. या शाळेच्या स्थापनेसाठी अंमळनेरपासून कराची व लाहोरच्या व्यापाऱ्यांपर्यंत आणि निजामापासून ब्रिटिश अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांकडून त्यांनी आर्थिक सहकार्य मिळवले. डॉ. मुंजे यांचे वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी नाशिक येथेच निधन झाले.

— रोहिणी गाडगीळ, भारद्वाज रहाळकर

## मुळगांवकर, हृषिकेश श्यामराव

**वायुसेना - एअर चीफ मार्शल**
**महावीरचक्र, परमविशिष्ट सेवा पदक**
**१४ ऑगस्ट १९२०**



हृषिकेश श्यामराव मुळगांवकर यांचा जन्म गोवा येथे झाला. त्यांचे वडील निष्णात शल्यचिकित्सक श्यामराव मुळगांवकर हे 'फेलो ऑफ दि रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स' (एफ.आर.सी.एस.) ही त्या काळातील सर्वोच्च पदवी मिळविणारे पहिले भारतीय डॉक्टर होते. हृषिकेश मुळगांवकर यांनी केंब्रिज विद्यापीठातून यांत्रिकी अभियांत्रिकीची पदवी संपादित केली. त्यानंतर ते ब्रिटिश राजवटीतील 'रॉयल इंडियन एअर फोर्स' मध्ये ३० नोव्हेंबर १९४० रोजी दाखल झाले.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुमारास त्यांची हवाईदलाची कारकीर्द सुरू झाली. त्यांच्या नंबर वन स्क्रॉड्रनला जपान्यांविरुद्ध लढण्यासाठी ब्रह्मदेश आघाडीवर पाठविण्यात आले. रंगून, चितगाव यांसारख्या तळांवरून त्यांनी विमानाच्या २८० तासांच्या २२० चढाया केल्या. ब्रह्मदेशातून परतल्यानंतर ते प्रथम नंबर टेन स्क्रॉड्रन आणि नंतर नंबर फोर स्क्रॉड्रनमध्ये सामील झाले. १९४५ मध्ये एक जीवघेणा प्रसंग त्यांच्यावर गुदरला होता. कॉक्स बझारजवळ असलेल्या होवे येथून त्यांनी 'स्पिटफायर'मधून उड्डाण केले आणि काही क्षणांतच त्यांच्या विमानाचे इंजिनच नादुरुस्त झाले. त्यांनी अगदी कसोशीने समुद्रकिनाऱ्यावर ते विमान उतरविण्याचा प्रयत्न केला. ते यात यशस्वी झाले; पण विमान समुद्रात घुसले होते. मुळगांवकर सीटलाच अडकून पडले होते.

भरतीचे पाणी वाढू लागल्याने ते बुडण्याची दाट शक्यता होती. तेवढ्यात या अपघातग्रस्त विमानाकडे दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांचे लक्ष गेले. धावतपळत जाऊन त्यांनी मुळगांवकरांना विमानाबाहेर काढले. प्राणावरचे संकट निभावले होते. पाठीच्या पाच मणक्यांना गंभीर इजा झाली होती; पण सहा महिन्यांत ते खडखडीत बरे झाले.

फाळणीनंतर काश्मीरवर पाकिस्तानने जेव्हा हल्ला केला, तेव्हा ते क्रमांक एकच्या विंगचे प्रमुख म्हणजे 'विंग कमांडर' होते. भारतीय लष्कराला हवाई संरक्षण देण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. प्रसिद्ध झोजी खिंडीतील लढाईदरम्यान हवाई हल्ल्याचे नेतृत्व त्यांनी स्वत: जातीने केले. होंकर टेम्पेस्ट-२ या विमानातून हल्ले करून त्यांनी शत्रूच्या ताब्यातील मोक्याचा डोमेल पूल उद्ध्वस्त केला होता. या धाडसी, पराक्रमी कामगिरीबद्दल त्यांना ८ डिसेंबर १९५० रोजी 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

ओरेगॉन विमानांची चाचणी घेण्यासाठी ते १९५१ मध्ये फ्रान्सला गेले आणि येताना ते स्वत:च विमान चालवीत भारतात परतले. दुसऱ्या पिढीतील लढाऊ विमानांच्या चाचण्या घेण्यासाठी १९५४ मध्ये फ्रान्स आणि ब्रिटनमध्ये पाठविलेल्या पथकात तेही होते. पुढे १९६२ मध्ये त्यांना विमानभेदी क्षेपणास्त्रांच्या अभ्यासासाठी रशियात पाठविण्यात आले. त्यांच्याच शिफारशीनुसार, भारत सरकारने रशियाकडून जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र यंत्रणा (सरफेस टू एअर मिसाइल सिस्टिम्स) खरेदी केली. तेव्हापासून भारतात क्षेपणास्त्रांचे युग सुरू झाले, असे म्हणता येईल.

मुळगांवकर यांनी आपल्या कारकिर्दीत ६३ प्रकारची वेगवेगळी विमाने चालविली. त्यांपैकी २२ विमाने जेट होती. हा एक जागतिक विक्रमच म्हणावा लागेल. वेगवेगळ्या प्रकारची विमाने चालविण्यासाठी प्रत्येक वेळी काही आठवड्यांचे कन्व्हर्जन ट्रेनिंग घ्यावे लागते, हे लक्षात घेतले तर त्यांचे अष्टपैलुत्व सहजपणे लक्षात येईल. मुळगांवकरांच्या नावे आणखी एक विक्रम जमा होतो. 'मिग-२१' हे स्वनातीत

म

(ध्वनीच्या वेगापेक्षा जलद गतीचे) विमान चालविणारे ते पहिले भारतीय वैमानिक ठरले. वायुसेनाप्रमुख झाल्यानंतरही ते 'मिग-२१' चालवीत असत. वायुसेनेला स्वनातीत युगात नेणारे युगपुरुष असे त्यांचे सार्थ वर्णन केले जाते.

दि. ३० नोव्हेंबर १९४० ते दि. १ सप्टेंबर १९७८ या प्रदीर्घ सेवा कालावधीत त्यांनी जबाबदारीची अनेक पदे भूषविली. त्यांनी स्टाफ आणि ऑपरेशनल अशा दोन्ही प्रकारच्या सांभाळलेल्या जबाबदाऱ्या पाहिल्या, तर त्यांच्यातील विलक्षण गुणवत्ता, क्षमता व कौशल्याची कल्पना येते. त्यांनी डायरेक्टर ऑफ ऑपरेशन्स (हवाई मुख्यालय), डायरेक्टर ऑफ पॉलिसी प्लॅन्स (हवाई मुख्यालय), नॅशनल डिफेन्स कॉलेजचे कमांडंट, एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ (सेंट्रल कमांड), एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ (वेस्टर्न कमांड) अशी पदे भूषविली. १९७१ च्या बांगलादेश मुक्तियुद्धात ते वायुसेनेचे उपप्रमुख होते.

त्यांच्या गौरवशाली सेवेबद्दल त्यांना १९७६ मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदका'ने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर काही दिवसांतच १ फेब्रुवारी १९७६ रोजी त्यांची वायुसेना प्रमुखपदी (चीफ ऑफ एअर स्टाफ) नियुक्ती करण्यात आली. वायुसेनाप्रमुख म्हणून त्यांची कारकीर्द प्रामुख्याने दोन गोष्टींसाठी ओळखली जाईल : एक म्हणजे हवाई सुरक्षाविषयक नियमावलींची उच्च कोटीची अंमलबजावणी. स्टेशन कमांडर असल्यापासून ते हवाई सुरक्षेबाबत कमालीचे जागरूक होते. त्या संदर्भात विविध सुधारणा आणि नियमांची अंमलबजावणी करण्यामध्ये त्यांचा दृष्टिकोन अत्यंत गांभीर्यपूर्ण होता. याचा परिणाम स्वाभाविकपणे जबरदस्त होता. त्यांच्या कारकिर्दीत हवाई अपघातांचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी झाले होते.

त्यांची दुसरी कामगिरी म्हणजे, सात वर्षांपासून प्रलंबित असलेला जाग्वार विमानांच्या खरेदीचा प्रस्ताव त्यांनी मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळाकडून चिकाटीने, जिद्दीने संमत करून घेतला. याच जाग्वारमुळे संपूर्ण पाकिस्तान प्रथमच भारतीय वायुसेनेच्या माऱ्याच्या टप्प्यात आला. आजही ही विमाने वायुसेनेचा कणा आहेत. निवृत्तीनंतर मुळगांवकर पुण्यात स्थायिक झाले आहेत.

– संतोष कुलकर्णी

* * *

म

# र

## राजवाडे, माधव गणपत

**भूसेना - मेजर जनरल**
**परमविशिष्ट सेवा पदक,**
**विशिष्ट सेवा पदक, मिलिटरी क्रॉस**
**१९२१ - २००४**

माधव गणपत राजवाडे यांचे वडील मेजर जनरल गणपतराव राजे हे ग्वाल्हेर संस्थानाचे सरसेनापती होते. त्यामुळे प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर माधवराजे यांनी १९४१ मध्ये स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून डेहराडूनच्या इंडियन मिलिटरी कॉलेज मध्ये दाखल झाले. तेथून अभियांत्रिकीचे शिक्षण झाल्यावर त्यांची निवड कोअर ऑफ इंजिनिअर्स (तेव्हाचे रॉयल इंडियन कोअर ऑफ इंजिनिअर्स) मध्ये 'बॉम्बे सॅपर्स' मध्ये झाली.

दुसऱ्या जागतिक महायुद्धात त्यांची नियुक्ती पर्शिया (आताचा इराण) भागात झाली होती. तेथे असतानाच त्यांची बदली 'मद्रास सॅपर्स' मध्ये झाली. आझाद हिंद सेनेने जपानच्या मदतीने भारतावर चढाई केल्यावर ब्रिटिशांच्या भारतीय फौजा भारताच्या पूर्व सीमापार ब्रह्मदेशात तैनात करण्यात आल्या. त्यातच माधव राजे राजवाडे यांची तुकडी होती. तेथेच जपानी सैन्यासोबत झालेल्या एका लढाईत त्यांनी गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यांना 'मिलिटरी क्रॉस' देऊन गौरविण्यात आले.

तेथून भारतात परतल्यानंतर त्यांची नियुक्ती कोअर ऑफ इंजिनिअर्समध्येच कायम होती. १९६२ च्या युद्धाच्या वेळी त्या भागाचे 'कमांडर इन चिफ' जनरल कौल यांच्या नेतृत्त्वाखाली ते मुख्य अभियंता (चिफ इंजिनिअर) होते. १९६५ च्या सुमारास त्यांची 'जनरल केडर'मध्ये पदोन्नती झाली. १९६५ च्या भारत-पाक युद्धात ते ब्रिगेडिअरपदी एकेचाळीसाव्या माउंटन ब्रिगेडचे कमांडर होते. त्यांच्या ब्रिगेडने या युद्धात चांगली कामगिरी केली.

१९७१ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी ते १५ व्या कॉर्पस्चे 'चिफ ऑफ स्टाफ' होते. या युद्धात त्यांनी अखनूर विभागात चांगला पराक्रम गाजवला. या युद्धानंतर लगेच भारताच्या भूसेनेच्या उत्तर विभागाची (नॉर्दर्न कमांड) स्थापना करण्यात आली. या नॉर्दर्न कमांडचे पहिले प्रमुख ('कमांडर इन चिफ') लेफ्ट. जनरल पी.एस. भगत होते आणि पहिले 'चिफ ऑफ स्टाफ' माधवरावराजे राजवाडे होते.

१९७१ च्या युद्धानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांदरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ठरविण्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. तेव्हा दोन्ही देशांतर्फे आपआपल्या सेनादलांची एक समिती नेमण्यात आली होती. या दोन्ही देशांच्या समित्यांनी प्रत्यक्ष सीमारेषांवरच्या मोर्चांना आणि ठाण्यांना भेटी देऊन एक सर्वेक्षण केले आणि त्या आधारे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेची (एल.ओ.सी. - लाईन ऑफ ॲक्चुअल कंट्रोल) आखणी करण्यात येऊन त्यांचे नकाशे व इतर कागदपत्रे तयार करण्यात आली. त्यावर दोन्ही देशांच्या संबंधित सेनाधिकाऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या. हीच प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आजतागायत पाळली जाते. त्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ठरविणाऱ्या भारतीय समितीचे अध्यक्ष ले.जनरल पी.एस. भगत आणि उपाध्यक्ष माधवराव राजवाडे हे होते. या समितीत भारतीय भूसेनेच्या मुख्यालयातील सैनिकी कार्यवाही विभागाचे संचालक (डायरेक्टर ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स) मेज.जन. आय.एस. गिल

हेदेखिल होते. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसंबंधी या कागदपत्रांवर भारताच्या बाजूने याच तीन सैनिकी अधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

निवृत्तीनंतर माधवराव राजवाडे पुण्यात स्थायिक झाले. तेथेच त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

– राजेश प्रभु साळगांवकर



१९४८ भारत – पाक युद्ध

## राणे, रामा राघोबा

**भूसेना – सेकंड लेफ्टनंट**

**परमवीरचक्र**

**२६ जून १९१८ – ११ एप्रिल १९९४**



रामा राघोबा राणे यांचा जन्म धारवाड जिल्ह्यातील हवेली या गावात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा बोर्डाच्या शाळेत झाले. पुढील शिक्षण उत्तर कन्नड जिल्ह्यातल्या चेंदिया या गावात झाले. त्यांचे वडील राघोबा राणे हे पोलीस दलात कॉन्स्टेबल होते.

राणे हे लढवय्या राजपूत राणा जमातीचे वंशज. ते गांधीजींच्या असहकार चळवळीनेही प्रभावित झाले होते. त्यांच्या मनात देशासाठी कार्य करण्याची भावना जागृत झाली.

१० जुलै १९४० रोजी ‘बॉम्बे इंजिनिअर्स’ या सैन्यपथकात ते भरती झाले. त्या वेळी दुसरे महायुद्ध सुरू होते. रामा राघोबा राणे यांनी सैन्यात प्रवेश करताच आपली चमक दाखवली. त्यांच्या तुकडीत ते ‘सर्वश्रेष्ठ प्रवेशक’ ठरले. त्यांना ‘कमांडंटची छडी’ बक्षीस म्हणून मिळाली. त्यांना ‘नाईक’ पदावर बढती मिळाली.

राणे यांचे प्रशिक्षण झाल्यानंतर ते अठ्ठाविसाव्या फिल्ड कंपनीत रुजू झाले. ही कंपनी सव्विसाव्या इन्फन्ट्री डिव्हिजनसह ब्रह्मदेशात लढत होती. तेथून माघार घेताना त्यांच्यावर बुथिदौंग येथील दारूगोळा भांडार, तसेच गाड्या नष्ट करण्याची जबाबदारी सोपवली गेली होती. जपान्यांच्या सैन्याशी त्यांनी दोन हात केले.

त्यांच्या धैर्याबद्दल, चिकाटीबद्दल त्यांना लगेचच ‘हवालदार’ पदावर बढती मिळाली. त्यांचे उत्कृष्ट नेतृत्व लक्षात घेऊनच १९४८ मध्ये जम्मू-काश्मीर आघाडीवर जाण्यापूर्वीच त्यांची सेकंड लेफ्टनंटपदी नेमणूक झाली. तो त्यांच्या सैनिकी जीवनातला सर्वोत्तम काळ ठरला.

१९४८ मध्ये पाकिस्तानी हल्लेखोरांनी काश्मीरवर आक्रमण केले. त्याला उत्तर देताना भारताने आपला आधी गमावलेला जम्मू-काश्मीरचा भूभाग पुन्हा मिळवण्याची धडपड सुरू केली. भारतीय सैन्याने पहिल्यांदा नौशेरावर ताबा मिळवला. पाकिस्तानी हल्लेखोरांशी लढा देत झांगर, राजौरी, बरवलीरिज, चिनगस या जम्मू-काश्मीरमधील ठिकाणांवर कब्जा मिळवणे हे भारतीय सैन्यासाठी आवश्यक होते. शत्रूने या ठिकाणांच्या वाटेवर अनेक अडथळे निर्माण केले होते. रस्त्यांची नासधूस केली होती.

युद्ध सामग्रीची वाहतूक करणे, सैन्य घेऊन जाणे खूप कठीण होते. अशा परिस्थितीत रामा राणेंनी रस्ता निर्धोक, वाहतुकीसाठी खुला करण्याचे जोखमीचे काम केले. स्वत:च्या जिवाची पर्वा न करता त्यांनी ही कामगिरी पार पाडली. ८ एप्रिल १९४८ रोजी राणे यांना नौशेरा – राजौरी भागातल्या रस्त्यावरचे अडथळे

र

व सुरुंग काढून टाकण्याचे काम सांगितले गेले. शत्रुसैन्याकडून तुफान गोळीबार होत असताना राणे व त्यांच्या सहकाऱ्यांना हे काम करावे लागले. झालेल्या तुफान गोळीबारात त्यांच्या पथकातील दोन माणसे मरण पावली आणि राणेंसहित चारजण जखमी झाले. त्याही अवस्थेत राणे यांनी आपल्या तुकड्यांची पुनर्रचना केली. रणगाडे जाण्यासाठी सुयोग्य रस्ते करण्याचे काम सुरू केले. शत्रूकडून होणाऱ्या प्रचंड गोळीबाराचा सामना करत त्यांनी हे काम केले. ८ एप्रिल १९४८ रोजी दुपारी सुरू झालेले हे काम सलग चोवीस तास चालले होते.

९ एप्रिलला दुपारी त्या तयार झालेल्या रस्त्यावरून सैन्य आणि रणगाडे जाऊ लागले. त्या रस्त्यावर पुढे पाइनचे अनेक वृक्ष अडथळा म्हणून टाकले होते. टप्प्याटप्प्याने ते वृक्षही बाजूला सारत त्यांनी रस्ता मोकळा केला. दुर्गम डोंगराळ प्रदेशातले निमुळते रस्ते खुले करण्यासाठी त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत नेतृत्व केले. काही ठिकाणी पूलदेखील उद्‌ध्वस्त झालेले होते. राणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ते पूल बांधले, सुरुंग दूर केले. स्वत: जखमी अवस्थेत असतानाही त्यांनी उत्तम नेतृत्व, धैर्य, संयम, आत्मविश्वास, अपार देशप्रेम या गुणांच्या जोरावर अथक प्रयत्नांतून दि. ११ एप्रिलच्या रात्री उशिरा, दहा वाजेपर्यंत त्यांनी हे रस्ते सुरक्षित व वाहतुकीसाठी सुयोग्य करण्याचे काम केले. त्यामुळे भारतीय रणगाडे सुरळीतपणे चिंगस येथे पोहोचू शकले.


या कार्यासाठी ‘परमवीरचक्र’ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. राणे २५ जून १९५८ रोजी मेजर म्हणून निवृत्त झाले. त्यानंतरही म्हणजे दि. ७ एप्रिल १९७१ पर्यंत त्यांनी भारतीय सेनेत पुनर्नियुक्त अधिकारी म्हणून काम पाहिले. राणे यांचा मृत्यू पुण्याच्या सैनिकी इस्पितळात अल्पशा आजाराने झाला. आज पुण्यातील संगमवाडी भागात त्यांच्या नावाने एक शाळा उभारण्यात आली आहे.

– पल्लवी गाडगीळ

## रोमण, सुनील मारुती

**भूसेना – लान्स हवालदार**

**शौर्यचक्र**



अकराव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये असणाऱ्या हवालदार सुनील मारुती रोमण यांनी ‘ऑपरेशन रक्षक’ या मोहिमेमध्ये सहभाग घेतला होता. २ नोव्हेंबर २००२ रोजी जम्मू-काश्मीरमधील पूंछ क्षेत्रातील शोधमोहिमेमध्ये अतिरेकी एका झोपडीत लपल्याचा संशय होता. त्यांच्या शोधासाठी ते एका अधिकाऱ्याबरोबर गेले.

हे अतिरेकी जिथे लपले होते, त्या झोपडीसदृश ठिकाणाला आग लागली व एक अतिरेकी तिथून बाहेर पडला. त्या वेळेस तत्परतेने हवालदार रोमण यांनी त्या अतिरेक्याला ठार मारले.

जळत्या झोपडीतून बाहेर पडण्याचा अतिरेक्यांनी वारंवार प्रयत्न केला. पण त्यांच्या मार्गात आड येऊन रोमण यांनी अतिरेक्यांवर गोळीबार करून त्यांना रोखून धरले. तरीही अंदाधुंद गोळीबार करत सहा अतिरेकी बाहेर पडण्यात यशस्वी झाले. त्यांनी आजूबाजूच्या झाडाझुडपांमध्ये लपण्यासाठी आश्रय घेतला. त्यांच्याकडून होणाऱ्या गोळीबाराने जराही विचलित न होता हवालदार रोमण यांनी आपल्या अधिकाऱ्याबरोबर त्यांचा शोध सुरूच ठेवला.

दगडांच्या मागे लपून बसलेल्या अतिरेक्यांनी त्यांच्या दिशेने बेछूट गोळीबार केला. हवालदार रोमण यांनी सरपटत जाऊन अतिरेक्यांशी समोरासमोर झटापट करून दोन अतिरेक्यांना ठार मारले.

या मोहिमेमध्ये स्वत:चा जीव धोक्यात घालून हवालदार रोमण यांनी जो पराक्रम केला, त्यासाठी त्यांना ‘शौर्यचक्र’ प्रदान करण्यात आले.

– संपादित

* * *

र

# ल

## लाखकर, श्रीनिवास वामनराव

**नौसेना – व्हाइस ॲडमिरल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**१४ सप्टेंबर १९३४**



श्रीनिवास वामनराव लाखकर यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे झाला. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण नागपूरमधील महाल भागातील न्यू इंग्लिश शाळेत झाले. नागपुरातील विज्ञान महाविद्यालयातून इंटर सायन्स उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी जानेवारी १९५२ मध्ये एम.टी.टी.एस. डफरीनमध्ये कॅडेट म्हणून प्रवेश घेतला. प्रथम वर्गात उत्तीर्ण होऊन जानेवारी १९५४ मध्ये ते डेहराडून येथील नेव्हल विंगमध्ये ते दाखल झाले.

१९५६ मध्ये 'आय.एन.एस.वीर'वरून बेस्ट कॅडेट म्हणून उत्तीर्ण झाल्यावर पुढे १९५७ मध्ये त्यांनी बेस्ट मिडमनशिप म्हणून प्रावीण्य मिळवले. १९५६ मध्ये भारतीय नौसेनेच्या एक्झिक्युटिव्ह ब्रॅन्चमध्ये त्यांची नेमणूक झाली. त्यांनी १९६२ मध्ये 'नॅव्हिगेशन अँड डायरेक्शन स्पेशलायझेशन' हा अभ्यासक्रम प्रथम क्रमांकाने पूर्ण केला.

१९६१ मधील गोवामुक्तीसाठीची सैनिकी कारवाई, तसेच १९६५ मधील भारत-पाक युद्धात लाखकर यांचा सहभाग होता. अर्नाळा, आय.एन.एस. दीपक, तसेच भारतातील सर्वाधिक प्रगत, तसेच शक्तिशाली युद्धनौकांपैकी एक अशा आय.एन.एस. रजपूत ह्या युद्धनौकेचे कमांडर म्हणूनही त्यांनी काम पाहिले. 'आय.एन.एस. रजपूत'साठी लढाईची काही मार्गदर्शक तत्त्वे त्यांच्या कार्यकालात अस्तित्वात आली.

पाकिस्तान युद्धातील विजयामध्ये नौसेना कार्यवाहीचे उपसंचालक म्हणून बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांना 'विशिष्ट सेवा पदक' मिळाले आहे. तत्कालीन सेव्हिएट महासंघाकडून 'आय.एन.एस. अंबा' ह्या युद्धनौकेचा स्वीकार त्यांनी भारताच्या वतीने केला होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये ह्या नौकेच्या रक्षणासाठी दाखविलेल्या शौर्याबद्दल त्यांना 'नौसेना पदक' प्रदान करण्यात आले.

भारतीय शांतिसेनेच्या श्रीलंकेतील कारवाईला सहकार्य करण्यासाठी तैनात केलेल्या नौसेनेचे पूर्व विभागाचे कमांडर म्हणून त्यांनी १९८७-८८ दरम्यान चोख कामगिरी बजावली. (एल.टी.टी.ई.) लिबरेशन टायगर्स ऑफ तामीळ इलमच्या ताब्यातून जाफनाचे नियंत्रण घेण्यासाठी पार पाडलेल्या 'ऑपरेशन पवन'मधील त्यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे.

त्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, तसेच नौसेनेच्या नौकानयन विद्यालयात (नॅव्हिगेशन स्कूल) प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. त्यांची सर्वांत महत्त्वाची नियुक्ती म्हणजे नौसेना मुख्यालयातील मनुष्यबळ विकासाचे संचालक ही होय. या पदावर असताना नौसेनेला मनुष्यबळ पुरवणे, नौसैनिकांची कारकीर्द घडवणे, तसेच त्यांच्या निवृत्तीनंतरचे आयुष्य सुरळीत जावे इत्यादींसाठी लाखकरांनी काही नवीन नियमांची प्रभावीपणे आखणी व मांडणी केली. तेल व नैसर्गिक वायू महामंडळाच्या समुद्रातील विहिरींचे रक्षण

ल

करण्यासाठी त्यांनी एका नवीन संस्थेची उभारणी केली. अशा आस्थापनांच्या रक्षणासाठी त्यांनी मांडलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार नंतर नौसेनेकडून करण्यात आला.

‘ऑफशोअर डिफेन्स अॅडव्हायजरी ग्रुप’चे ते पहिले ध्वजाधिकारी (फ्लॅग ऑफिसर) होते. त्याबरोबर ‘मॅरिटाइम स्टेट ऑफ महाराष्ट्रा’चे पहिले ‘ध्वजाधिकारी’ म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात, जानेवारी १९९० पासून त्यांनी तटरक्षक दलाचे संचालक म्हणून काम पाहिले. त्यांच्या ह्या कार्यकाळात तटरक्षक दलाला खऱ्या अर्थाने लौकिक प्राप्त झाला. भारतीय नौसेनेतील उत्कृष्ट पाणबुडे (डायव्हिंग ऑफिसर), तसेच विमानवाहू नौका व नाविक विद्येचे तज्ज्ञ हीच त्यांची ओळख आहे. ते उत्तम गोल्फपटूसुद्धा आहेत. नौसेनेतील देदीप्यमान कारकिर्दीबद्दल ‘परमविशिष्ट सेवा पदका’ने २६ जानेवारी १९६२ रोजी त्यांचा गौरव करण्यात आला.


– प्रणव पवार

* * *

ल

# व

## वालकर, शंकर शंखपान
**भूसेना – कॅप्टन**
**महावीरचक्र**
**८ मार्च १९४३ – १७ डिसेंबर १९७१**



शंकर शंखपान वालकर यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील केडगाव येथे झाला. वालकर कुटुंब हे मूळचे बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथील होत. १५ जून १९६९ रोजी शंकर वालकर हे भूसेनेत कॅप्टन म्हणून भरती झाले. मद्रास रेजिमेंटमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली.

१६ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात भारताच्या पश्चिम भागाच्या संरक्षणाची जबाबदारी वालकर यांच्या रेजिमेंटवर सोपविण्यात आली होती. वालकर व त्यांची बटालियन हिंगोरी भागात पोहोचली. तिथून पुढचे ४२ मैलांचे अंतर कापतानाच शत्रूच्या जोरदार गोळीबाराचे त्यांना सामोरे जावे लागले. आपल्या प्राणाची पर्वा न करता वालकरांनी प्रत्येक कंपनीजवळ जाऊन स्वसंरक्षणासाठी गोळीबाराचा आदेश दिला. वालकर आपले कर्तव्य बजावत असताना पाकिस्तानी सैनिकांकडून झालेल्या हल्ल्यात ते दोन वेळा जखमी झाले, तरीही त्यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पूर्ण केली.

त्यानंतर शत्रूकडून रात्रभर गोळीबार सुरू होता. जखमी झालेले असतानाही त्यांनी रात्रभर शत्रूचा सामना केला. दुसऱ्या दिवशी सकाळ झाली तरीही वालकर मागे हटले नाहीत. अचूक पद्धतीने तोफगोळ्यांचा नेमका मारा करीत त्यांनी शत्रुसैन्य जायबंदी केले. या वेळी त्यांनी शत्रूच्या चार सैनिकांना ठार केले आणि शत्रूला माघार घेण्यासही भाग पाडले. मात्र शत्रूच्या गोळ्यांनी झालेल्या गंभीर जखमांनी त्यांना वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या या पराक्रमाबद्दल त्यांना मरणोत्तर ‘महावीरचक्रा’ने सन्मानित करण्यात आले.

– समीर कोडिलकर

## विल्सन, पीटर मेनार्ड आरविंग
**वायूसेना – एअर कमोडोर**
**२९ नोव्हेंबर १९२७ –**



पीटर विल्सन यांचा जन्म मुंबईत झाला. १ जून १९४९ रोजी पीटर हे हवाई दलात रूजू झाले.

विंग कमांडर पीटर विल्सन यांची नेमणूक १९६५ च्या पाकिस्तान युद्धात बॉम्बफेकी विमानांच्या स्काड्रनवर झाली होती. या स्काड्रनचे नेतृत्व विल्सन यांच्याकडे होते. कच्छ परिसरातील बादिन भागात असणारी शत्रू पक्षाची रडार यंत्रणा उध्वस्त करण्याची कामगिरी यांच्यावर सोपविण्यात आली होती. ही रडार यंत्रणा नष्ट करणे अत्यंत कठीण होते. कारण लढाऊ विमानांचा अचूक वेध घेता येईल अशा मोठ्या बंदुका तसेच तोफा या रडारच्या आजूबाजूला तैनात

करण्यात आल्या होत्या. अत्यंत अचूक पद्धतीने बॉम्बफेक केली तरच उद्दिष्ट साध्य होणार होते. ह्या अवघड कामगिरीचे आव्हान विल्सन यांनी स्वीकारले.

लढाऊ विमानातून नेहमीच्या उंचीवरून या रडारवर बॉम्बहल्ला केला तर विमानविरोधी तोफा आपल्यावर तातडीने हल्ला करतील हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी जमिनीपासून अत्यंत कमी उंचीवरून बॉम्बफेकी विमाने वेगाने रडार यंत्रणा बसविलेल्या ठिकाणावरून नेली आणि अचूक लक्ष साधत त्या रडारवर बॉम्बहल्ला केला. विमानविरोधी तोफांनी विमानांचा वेध घेण्याच्या आतच या सर्व हालचाली पार पाडल्याने रडार उद्ध्वस्त होताना त्या तोफा कुचकामी ठरल्या.

लढाऊ विमान चालविण्याचे त्यांचे कसब आणि लढाईतील धैर्य वाखाणण्याजोगे होते. त्यांच्या या शौर्याचा सन्मान २१ सप्टेंबर १९६५ रोजी 'वीरचक्र' देऊन करण्यात आला. पुढे त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदका'नेही सन्मानित करण्यात आले. एअर कमोडोर पदावरून ते निवृत्त झाले.

– समीर कोडिलकर

## वैद्य, अजित विश्वनाथ

**वायुसेना – एअर मार्शल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**१९ फेब्रुवारी १९४८**

अजित विश्वनाथ वैद्य यांचा जन्म कानपूर येथे झाला. त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण नागपुरातील सीताबर्डी मध्ये न्यू इंग्लिश विद्यालयात झाले. १९५८ मध्ये त्यांच्या वडिलांची पुण्यात कृषी महाविद्यालयाचे संचालक म्हणून बदली झाली. त्यामुळे त्यांचे पुढील शिक्षण पुण्यात श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल (एस.एस.पी.एम.एस.) व सेंट व्हिन्सेंट या शाळांमध्ये झाले. अजित वैद्यांचे शिक्षण सुरू असताना त्यांच्या वडिलांनी खडकवासला



येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए.) पाहिली. तेथील शैक्षणिक वातावरण पाहून आपल्या मुलाने सैन्यात जावे असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी अजित वैद्यांना सैन्यात जाण्यास सुचविले. त्यांची पत्नी सुशीलाबाई यांनीही पतीच्या सांगण्याला पाठिंबा दिला. १९६३ साली शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९६४ मध्ये त्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची परीक्षा दिली. अजित यांनी वायुसेनेचा अभ्यासक्रम निवडला.

१९६७ मध्ये प्रबोधिनीचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यांना दीड वर्षांचे प्रशिक्षण मिळाले. त्यानंतर लढाऊ वैमानिक म्हणून त्यांना पहिली नियुक्ती लुधियानाजवळ हलवारा येथे मिळाली. १९६८ ते १९७० पर्यंत नॅट स्क्वॉड्रन मध्ये काम केल्यानंतर दिल्लीजवळच्या वायुसेनेच्या तळावर मिग-२१ या रशियन बनावटीच्या विमानांचे वैमानिक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९७१ मध्ये भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी भाग घेतला.

१९७४ मध्ये त्यांनी विमानोड्डाण प्रशिक्षक विद्यालयात अभ्यासक्रम पूर्ण केला. या अभ्यासक्रमानंतर विमानोड्डाण प्रशिक्षक म्हणूनही त्यांनी काम केले. त्यानंतर १९७६ च्या सुरुवातीला मद्रासजवळील तांबरम येथे प्रशिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सप्टेंबर १९७७ ते सप्टेंबर १९७९ अशी दोन वर्षे इराक येथेही त्यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले. इराकहून परतल्यानंतर नॅट विमानांच्या पथकावर त्यांची पुन्हा नियुक्ती झाली. नंतर १९८२ मध्ये उटीजवळ डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमध्ये त्यांची एका वर्षासाठी नियुक्ती झाली. तिथून दिल्लीजवळ हिंडन येथे १९८२ ते १९८४ या काळात त्यांची परीक्षक मंडळावर नियुक्ती झाली. १९८५ मध्ये मिराज २००० विमानांच्या खरेदीसाठी

व

फ्रान्सला पाठवण्यात आलेल्या समितीमध्ये त्यांचा सहभाग होता. यानंतर ग्वाल्हेरच्या वायुसेनेच्या तळावर मिराज २०००वर त्यांची नियुक्ती झाली. तेथून त्यांची हैद्राबाद येथे बदली झाली.

१९९१ ते १९९४ या काळात एअर क्रू बोर्डवर परीक्षक म्हणून वैद्य यांची नेमणूक झाली. इथे वैमानिकांचे गुणांकन, ढगांमध्ये उड्डाण असेल तर त्यांची क्षमता तपासणी, हे काम त्यांच्याकडे होते. त्यानंतर १९९४मध्ये कच्छजवळ नलिया येथील तळावर कमांडर म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९९९ ते २००० दरम्यान त्यांची लोहगाव हवाईतळाचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली. २०००मध्ये राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयामधून अभ्यास पूर्ण केल्यानंतर त्यांना एअर डिफेन्स कमांडर म्हणून बढती मिळाली. त्याच वेळी एअर व्हाइस मार्शल म्हणूनही बढती मिळाली.

त्यानंतर दिल्ली येथे वायुभवनात वेस्टर्न एअर कमांडर म्हणून त्यांची बदली झाली. त्यानंतर २००४ ते २००६ या काळात ईस्टर्न एअर कमांडर म्हणूनही त्यांनी काम केले. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथे डेप्युटी चीफ इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ म्हणून अडीच वर्षे काम बघितले. या काळात उत्तर भारतात झालेल्या भूकंपानंतर उद्‍भवलेली आणीबाणीची परिस्थिती त्यांनी उत्तमपणे हाताळली. तसेच, अकराव्या सर्वंकष संरक्षण योजनेच्या (इंटिग्रेटेड डिफेन्स प्लॅन) आखणीतही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. २००८मध्ये एअर मार्शल म्हणून ते निवृत्त झाले.

वैद्य यांनी सेवाकाळात ३००० तासांचे विना-अपघात उड्डाण केले आहे. त्यांनी नॅट, मिग-२१, मिराज -२०००, मिग-२९, तसेच अद्ययावत एसयू-३० ही लढाऊ विमाने चालवली आहेत. विंग कमांडर म्हणून त्यांनी मिराज-२००० स्क्वॉड्रनवर काम केले आहे. १९८८ साली मालदिवमध्ये शासन ताब्यात घेण्यासाठी श्रीलंकेच्या विभाजनवादी अतिरेकी संघटनेने केलेला उठाव हाणून पाडण्यासाठी भारतीय सेनेने हाती घेतलेल्या ‘ऑपरेशन कॅक्टस’ या मोहिमेत अजित वैद्य यांनी भाग घेतला होता. त्यानंतर त्यांना १९९० मध्ये ‘वायुसेना’ पदक प्रदान करण्यात आले.

३९ वर्षांच्या उत्तम सेवेबद्दल अजित वैद्य यांना जानेवारी २००८ मध्ये ‘परमविशिष्ट’ सेवा पदक प्रदान करण्यात आले.

– वर्षा जोशी-आठवले

## वैद्य, अरुणकुमार श्रीधर

**सरसेनापती**

**जनरल, भूसेना**

**पद्मविभूषण, परमविशिष्ट सेवा पदक, महावीरचक्र (बार), अतिविशिष्ट सेवा पदक**

**२७ जानेवारी १९२६ – १० ऑगस्ट १९८६**



भारतीय सैन्याचे तेरावे सरसेनापतीपद (चीफ ऑफ आर्मी स्टाफ) भूषविणाऱ्या अरुणकुमार श्रीधर वैद्य यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे वडील अलिबागचे जिल्हाधिकारी होते. अरुणकुमार यांचे प्राथमिक शिक्षण अलिबाग येथील टोपीवाला इंडस्ट्रीयल हायस्कूलमध्ये झाले. काही काळ पुण्याच्या रमणबाग शाळेतही त्यांचे शिक्षण झाले. मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात त्यांचे उच्च शिक्षण झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांच्या मनात सैन्यात जाण्याची ओढ निर्माण झाली. १९४४ साली त्यांना सैन्यात तातडीची नियुक्ती (इमर्जन्सी कमिशन) मिळाली.

१९४५ साली त्यांना भारतीय सैन्याच्या चिलखती दलात कायमस्वरुपी नियुक्ती मिळाली आणि त्यांनी दुसऱ्या महायुद्धात सहभागही घेतला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात नवव्या डेक्कन हॉर्स या चिलखती तुकडीचे ते सातवे कमांडर होते. भारतीय सैन्यातील ही एक सर्वांत जुनी चिलखती तुकडी (रेजिमेंट) होय. आधी ही घोडदळाची तुकडी होती आणि नंतर तिच्याकडे



**१९६५ च्या युद्धात पाकिस्तानकडून पॅटन रणगाडे जेथे जिंकले तेच हे 'पॅटन नगर'**

शर्मन रणगाडे देण्यात आले होते. अरुणकुमार यांनी अहमदनगर येथील 'आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूल' येथे प्रशिक्षण घेतले होते. प्रशिक्षणाच्या दरम्यान सुरुंग पेरलेल्या हौदातून पाण्यातील अडथळे ओलांडत असताना सुरुंगाच्या वायरीला पायाचा स्पर्श होऊन झालेल्या दुर्घटनेत अरुणकुमार बेशुद्ध होऊन पडले होते, पण काही वेळाने शुद्धीवर आल्यानंतर ते आपल्या सहकाऱ्यांत जाऊन मिसळले. त्यांचे मनोधैर्य पाहून निक्सन नावाच्या ब्रिटिश मेजरने 'हा तरुण सैन्यात मोठा अधिकारी होईल' असे म्हटले होते, ते बोल पुढे खरे ठरले.

१९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी लेफ्टनंट कर्नल पदावर असलेल्या अरुणकुमार यांनी डेक्कन हॉर्सचे नेतृत्व केले होते. दि. ६ ते ११ सप्टेंबरच्या काळात त्यांच्या तुकडीने पंजाब प्रांतातील असल उतार व चिमा या भागात अनेक मोहिमा लढल्या. या वेळी पाकिस्तानकडे अमेरिकन बनावटीचे पॅटन रणगाडे होते, तर भारतीय सेनेकडे जुने अमेरिकन शर्मन रणगाडे होते. परंतु प्रतिकूल परिस्थितीचा धैर्याने सामना करत अरुणकुमार यांनी आपल्या कुशल नेतृत्वाचा परिचय घडविला. आपल्या तुकडीची घोड्याच्या नालाच्या आकाराची व्यूहरचना करत खेमकरण विभागात ३६ पाकिस्तानी रणगाड्यांचा धुव्वा उडविला. या लढाईत पाकिस्तानी सैन्याने सुमारे शंभरेक रणगाडे मागे सोडून माघार घेतली. या लढाईनंतर पाकिस्तानला नाक मुठीत धरून युद्धविराम पत्करावा लागला. अरुणकुमार वैद्य यांना या शौर्यासाठी दि. ६ सप्टेंबर १९६५ रोजी 'महावीर चक्र' प्रदान करण्यात आले.

१९७१ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी ब्रिगेडियर वैद्य एका चिलखती पथकाच्या (ब्रिगेड) कमांडरपदी होते. हे पथक जाफरवाल क्षेत्रात पश्चिम आघाडीवर होते. त्यांनी आपल्या पथकाची जलद हालचाल करून शत्रूचे रणगाडे ताब्यात घेऊन शत्रूला चकित केले. आपल्या रणगाड्यांची अथकपणे आक्रमक हालचाल करून पाकिस्तानी सेनेचा सामना करण्यासाठी आपल्या डिव्हिजनला सरसावत ठेवले. चकरा व दाहिराच्या लढाईत शत्रूने पेरलेल्या भूसुरुंगाच्या भागातून त्यांनी आत्मविश्वासाने आपल्या सैनिकांना घेऊन निधड्या छातीने पुढेच वाटचाल केली. त्यांच्या प्रेरक नेतृत्वाखाली पाकिस्तानी सैन्याचा प्रतिहल्ला मोडून काढण्यास संपूर्ण स्क्वॉड्रन पुढे सरसावली.

शकरगढ क्षेत्रातील बसंतारच्या लढाईतही आपल्या अतुलनीय पराक्रमाचे व नेतृत्वगुणाचे दर्शन ब्रिगेडियर अरुणकुमार वैद्य यांनी घडविले. या वेळी शत्रूने दूरवरच्या क्षेत्रात पेरलेल्या सुरुंगांवरून त्यांनी आपले रणगाडे पुढे नेले आणि शत्रूच्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले. या लढाईत आपल्या सैन्याने ६२ पाकिस्तानी रणगाड्यांचा धुव्वा उडविला. यातील अपूर्व शौर्याबद्दल वैद्य यांना दुसरे 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

१९७३ मध्ये अरुणकुमार वैद्य मेजर जनरल झाले. त्यांनी डायरेक्टर मिलिटरी ऑपरेशन्स, सदर्न कमांड

मुख्यालयाचे चीफ ऑफ स्टाफ आणि आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूलचे कमांडंट अशा महत्त्वाच्या पदांवरही काम केले. जानेवारी १९८० मध्ये त्यांना लेफ्टनंट जनरल म्हणून बढती मिळाली. त्यांनी मास्टर जनरल ऑफ ऑर्डनन्स आणि नंतर जनरल ऑफिसर कमांडिग ऑफ अ कॉर्प्स या पदांवरूनही काम केले. १९८१ साली वैद्य यांची पूर्व विभागाचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणून पदोन्नती झाली. ईशान्य भागात नागालँडमध्ये जो बंडखोरीचा उद्रेक माजला होता, त्याला आवर घालण्याचे कार्य त्यांनी मोठ्या कौशल्याने केले. बंडखोर नागांचा स्वयंघोषित जनरल मोबू अंगामी व त्याच्या सहकाऱ्यांना जेरबंद करण्यात आले. १९८३ मध्ये त्यांना 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करून त्यांच्या अत्युच्च गुणवत्तापूर्ण कामगिरीचा गौरव करण्यात आला.

जनरल वैद्य यांनी 'चीफ ऑफ द आर्मी स्टाफ' हे पद १ ऑगस्ट १९८३ रोजी स्वीकारले आणि ३१ जानेवारी १९८६ पर्यंत ते या पदावर होते. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक'ही देण्यात आले. याच काळात त्यांनी सुवर्णमंदिरात घुसलेल्या खलिस्तानवादी अतिरेक्यांचा नायनाट करण्यासाठी 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही सैनिकी कारवाई सुवर्णमंदिरात केली. हा अत्यंत अवघड असलेला निर्णय त्यांनी कर्तव्यपरायण वृत्तीमुळे घेतला. सुमारे चाळीस वर्षांची सेवा अतिशय उत्तम प्रकारे बजावून अरुणकुमार वैद्य सेवानिवृत्त झाले. त्यानंतर ते पुण्यात कोरेगाव पार्क येथे निवृत्तीनंतरचे जीवन सुखाने व्यतीत करण्यासाठी राहायला आले. मात्र 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'चा सूड घेण्यासाठी देशद्रोही खलिस्तानवादी अतिरेक्यांनी वैद्य यांच्या हालचालींवर नजर ठेवून १० ऑगस्ट १९८६ रोजी त्यांची हत्या केली. वैद्य यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' हा सन्मान देऊन सरकारने त्यांच्या देशसेवेचा गौरव केला.

स्वातंत्र्यदिनाच्या संचलनाच्या वेळी ब्रिटिश पद्धतीची तलवार वापरण्यात येत असे. नागपूर येथील शंकरराव चिटणवीस यांच्या सूचनेला व रेखांकनाला अनुसरून वैद्य यांनी पुढाकार घेऊन २६ जानेवारी १९८६ पासून भारतीय पद्धतीप्रमाणे असलेली बाकदार तलवार वापरण्याचा निर्णय अमलात आणला.

जनरल वैद्य यांचे लष्करी नेतृत्व अनुपम होते. त्यांनी आपल्या व्यापक आणि दीर्घकालीन अनुभवाच्या बळावर भारतीय सेनेला कुशल नेतृत्त्व देऊन यशाची कमान चढती राखली.

अरुणकुमार वैद्य यांचे शिक्षण जेथे झाले त्या अलिबाग येथील टोपीवाला इंडस्ट्रियल हायस्कूलला 'जनरल अरुणकुमार वैद्य हायस्कूल' असे नाव देण्यात आले आहे.

– दीपक हनुमंत जेवणे

* * *

व

# श

## शेकटकर, दत्तात्रेय बालाजी

**भूसेना - लेफ्टनंट जनरल**
**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक**
**१९ मार्च १९४२ -**



दत्तात्रेय बालाजी शेकटकर यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे झाला. जबलपूर विद्यापीठात १९६१ मध्ये बी.कॉम.चे शिक्षण घेत असताना ते राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (एन.सी.सी.) दाखल झाले. पुढे डेहराडूनच्या भारतीय सैनिकी प्रबोधिनीमधून (आय.एम.ए.) रीतसर शिक्षण घेऊन ते सैन्यात दाखल झाले. भारतीय सैन्यातल्या मराठा रेजिमेंटमध्ये सेकंड लेफ्टनंट या पदावर ३० जून १९६३ रोजी त्यांची नेमणूक झाली. प्रारंभीचे एक वर्ष त्यांनी बेळगाव येथील मराठा प्रशिक्षण केंद्र आणि मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये व्यतीत केले. सैन्यात कार्यरत झाल्यानंतर वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांनी 'वेपन ट्रेनिंग - ७.२ सेल्फ लोडिंग रायफल' हे शस्त्र चालवण्याबद्दलचे पुस्तक लिहिले.

शेकटकर यांनी आपल्या सैन्यजीवनातल्या चाळीस वर्षांपैकी विविध पदांवरून, विविध कालावधीतील जवळपास बावीस वर्षे भारताच्या ईशान्य भागात कार्यरत होते. नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा व अरुणाचल प्रदेशांत भारताविरोधी काम करणाऱ्या बंडखोर तत्त्वांच्या विरुद्ध सैन्याने केलेल्या कारवाईत ते अग्रणी होते. या कामगिरीसाठी त्यांना १९८१ मध्ये 'विशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. १९७१ च्या ऑगस्टपासून भारत - पाक सीमेवर सांबा येथे ते कार्यरत होते. भारत-पाक युद्ध झाल्यानंतर भारताने जिंकलेल्या युद्धक्षेत्रातच १९७३ पर्यंत त्यांची नियुक्ती होती. घुसखोरांवर कारवाई करणे, सीमारेषेवर नियंत्रण ठेवणे यांसाठी ते कार्यरत होते. पंजाबमध्ये ऑपरेशन ब्लू स्टार मोहिमेतही त्याचा सहभाग होता. काश्मीरमधल्या नियंत्रणरेषेच्या संरक्षणार्थ तैनात असलेल्या सहाव्या मराठा बटालियनचे १९८१ ते १९८४ या कालावधीत त्यांनी संचालन केले. काश्मीरमधल्या अतिरेक्यांच्या विरोधातील अनेक कारवायांमध्ये त्यांनी बटालियनचे नेतृत्व केले. बंडखोरांना व अतिरेक्यांना सामूहिक शरणागती पत्करायला लावण्याच्या तंत्राचा प्रारंभ जनरल ऑफिसर कमांडिंग शेकटकर यांनी सुरू केला. या पद्धतीने जवळपास बाराशे अतिरेक्यांना शरण आणण्यात ते यशस्वी झाले होते. काश्मीरमधल्या बंडखोरांविरुद्धच्या अशा कारवायांमधले त्यांच्या कर्तृत्वासाठी १९९७ मध्ये त्यांना 'अतिविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. बंडखोरांविरुद्ध लढून कारवाई करण्यात त्यांना दीर्घ अनुभव आहे.

शेकटकर यांना दहशतवादाविरुद्धच्या युद्धाचे आणि मनोवैज्ञानिक तज्ज्ञ मानले जाते. या युद्धपद्धती संदर्भात लिहिल्या गेलेल्या अनेक पुस्तकांचे व लेखांचे ते लेखक अथवा सहलेखक आहेत.

लेफ्टनंट जनरल पदावर असताना चौथ्या कॉर्पसचे जनरल ऑफिसर कमांडिंग म्हणून फेब्रुवारी १९९९ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. त्या वेळी ईशान्य भारतातल्या आसाम आणि अन्य भागांतील उल्फा

श




मराठा लाईट इन्फन्ट्रीचे अभिलेखागाराचे कार्यालय

अतिरेकी, देशद्रोही बंडखोरांविरुद्ध कारवाई करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. भारताच्या ईशान्य भागातील अन्य देशांसोबतच्या सीमारेषांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्यही त्यांच्यावर सोपवण्यात आले होते.

४ एप्रिल २००० रोजी आसाममधील शिवसागर येथे एकाच वेळी सर्वाधिक पाचशे छत्तीस बंडखोरांनी आपली हत्यारे व दारूगोळ्यासह शरणागती पत्करली होती. आसाममधल्या या सैनिकी कारवाईचे प्रमुखपद त्यांनी सांभाळले. त्यांनी देशद्रोह्यांविरुद्ध केलेल्या एकूण कार्यवाहीसाठी त्यांना २००२ मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले.

भारतीय सैन्याचे सैनिकी कार्यवाही विभागाचे अतिरिक्त महासंचालकपद (ॲडिशनल डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स) त्यांनी १९९४-१९९५ या कालावधीत सांभाळले. त्यानंतर १९९७-१९९८ मध्ये 'संरक्षण क्षेत्राच्या भविष्यकालीन व्यवस्थापन विभागा'च्या अतिरिक्त महासंचालकपदीही (ॲडिशनल डायरेक्टर जनरल ऑफ पर्स्पेक्टिव्ह प्लॅनिंग) त्यांनी काम केले.

परराष्ट्रांसोबत होणाऱ्या शांतता करारांसंदर्भातल्या कार्यवाहीतही शेकटकर यांचा सहभाग होता. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कारकिर्दीपासून या संदर्भात भारत-चीनमध्ये शांतता कराराचे प्रयत्न सुरू झाले. त्यासंदर्भातल्या कार्यवाहीतही शेकटकर सहभागी होते. नरसिंह राव पंतप्रधान असताना झालेल्या भारत-चीन करारासाठी नेमलेल्या संयुक्त समितीत सैनिकी मुख्यालयाचे प्रतिनिधी या नात्याने ते कार्यरत होते. या शांतता कराराची अंमलबजावणी करण्यासंदर्भात नेमलेल्या तज्ज्ञ समितीचे ते सदस्य

होते. भारत-अमेरिका संरक्षण सहकार्य समितीचेही ते सदस्य होते.

१९६७ मध्ये त्यांनी मिझोराम येथे संरक्षणविषयक महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांनी अन्य ठिकाणीही संरक्षणविषयक शिक्षण देण्याचे काम केले. १९७६ मध्ये वेलिंग्टनच्या डिफेन्स सर्व्हिसेसच्या स्टाफ कॉलेजमधून त्यांनी संरक्षणशास्त्रातील पदवी घेतली. पुढे १९८६ मध्ये सिकंदराबादच्या कॉलेज ऑफ डिफेन्स मॅनेजमेंट मधूनही त्यांनी शिक्षण घेतले. मद्रास विद्यापीठातून त्यांनी १९९० मध्ये डिफेन्स स्टडीजमध्ये एम.एस्सी. पदवी प्राप्त केली. १९९२ मध्ये त्यांनी स्ट्रॅटेजिक स्टडीजमध्ये एम.ए. पदवी संपादन केली. पर्यावरण तसेच शस्त्रास्त्र व्यवस्थापन या विषयांतही पदविका मिळविल्या आहेत. २००० मध्ये महू येथील इन्फन्ट्री स्कूलचे ते प्रमुख होते.

सैनिकी खात्यातून निवृत्त झाल्यावर २००४ ते २००६ या कालावधीत पुणे विद्यापीठातल्या (डिफेन्स अँड स्ट्रॅटेजिक स्टडीज) संरक्षण व कूटनैतिक अभ्यास विभागाचे ते प्रमुख प्राध्यापक होते. २००९ मध्ये व्यवस्थापन विज्ञानात त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली. आजही लेफ्ट. जन. शेकटकर देशभरात सातत्याने संरक्षणविषयक जनजागृती करून एका अर्थाने अव्याहत देशसेवा करीत आहेत.

– पल्लवी गाडगीळ

## शेख, बशीर हसन

**भूसेना – सुभेदार**

**शौर्यचक्र**

**जन्मदिनांक अनुपलब्ध – १९ सप्टेंबर १९९३**

ऑपरेशन रक्षक या मोहिमेमध्ये बशीर शेख हे १९ सप्टेंबर १९९३ रोजी तिसऱ्या राष्ट्रीय रायफल बटालीयनचे नेतृत्व करीत होते. त्यांच्या तुकडीवर काश्मीरमधील अचबल – दकसुम या रस्त्यावर पहारा ठेवण्याचे काम सोपवण्यात आले होते.

या रस्त्यावर ही तुकडी गस्त घालत असताना झालंगम येथे आल्यावर अचानक अतिरेक्यांनी त्यांच्यावर हल्ला केला व गोळीबार सुरू केला. तेव्हा एक अतिरेकी जवळून गोळीबार करत असताना शेख बशीर हसन यांनी त्याच्या दिशेने धाव घेतली व त्याच्यावर हल्ला करून त्यास यमसदनी पाठविले. परंतु त्याच वेळेला दुसऱ्या अतिरेक्याने त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात जबर जखमी होऊन सुभेदार हसन वीरगतीस प्राप्त झाले. मात्र त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन अन्य जवानांनी आणखी तीन अतिरेक्यांना ठार मारले. सुभेदार हसन यांच्या साहस व पराक्रमाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना मरणोत्तर शौर्यचक्र प्रदान केले.

– रूपाली गोवंडे

* * *

श

# स

## सरसर, मुकुंद एम.
**भूसेना - मेजर**
**शौर्यचक्र**
**जन्मदिनांक अनुपलब्ध**




१९९७ मध्ये झालेल्या 'ऑपरेशन रक्षक' या मोहिमेमध्ये मुकुंद सरसर सहभागी झाले होते. त्यावेळी ते सेकंड लेफ्टनंट या पदावर येते. १९ ऑगस्ट १९९७ रोजी श्रीनगर जिल्ह्यातील बरसू गावात एक शोध मोहीम सुरू होती. त्यावेळी अचानक अडीचशे मीटर अंतरावरच्या दोन घरांमधून स्वयंचलित बंदुकांचा अंदाधुंद गोळीबार होऊ लागला. एक क्षणही वाया न घालवता मुकुंद सरसर एका घराच्या दिशेने सरपटत गेले. त्या घराच्या खिडकीतून त्यांनी हातबाँब आत फेकला. समोरून होत असलेल्या गोळीबाराची त्यांनी पर्वा केली नाही.

घरात फेकलेला हातबाँब फुटून एक अतिरेकी जखमी झाला व तो पळून जाऊ लागला. तेव्हा सरसर यांनी त्याच्यावर गोळीबार करून त्याला ठार मारले. तेथे असणाऱ्या अन्य दोन अतिरेक्यांवरही अचूक गोळीबार करून त्यांनाही सरसर यांनी ठार केले.

या कारवाईमध्ये तीन रायफल्स व दारूगोळा हस्तगत करण्यात आला. मुकुंद सरसर यांनी अंदाधुंद गोळीबारामध्ये स्वत:च्या जिवाची पर्वा न करता सैन्याचे जे नेतृत्व केले त्यासाठी त्यांना शौर्यचक्र प्रदान करण्यात आले.

- रूपाली गोवंडे

## सहस्रबुद्धे, यशवंत दत्तात्रेय
**भूसेना - लेफ्टनंट जनरल**
**परमविशिष्ट सेवा पदक**
**६ मार्च १९२६**



यशवंत दत्तात्रेय सहस्रबुद्धे यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये झाले. १९३९ मध्ये त्यांचे वडील परदेशी वास्तव्यास गेल्याने त्यांनी यशवंत यांना नाशिक येथील भोसला मिलिटरी स्कूलमध्ये शिक्षणासाठी पाठवले. पुढे त्यांनी फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. जनरल थोरात यांचा आदर्श डोळ्यांसमोर असल्यामुळे भूसेनेत जायचे त्यांनी लहानपणापासूनच ठरवले होते. १९४५ मध्ये त्यांना बी.ए.ची पदवी मिळाली. त्यानंतर त्यांनी 'डिप्लोमा इन मिलिटरी स्टडीज'चा अभ्यासक्रम पूर्ण केला. लगेचच त्यांना १९४६ मध्ये डेहराडून येथे इंडियन मिलिटरी अकॅडमी मध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले.

या प्रशिक्षणानंतर १९४६ च्या डिसेंबर महिन्यात त्यांना मीरत येथे 'आर्मी सर्व्हिस कोअर'मध्ये पहिले पोस्टिंग मिळाले.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळताना भारताची फाळणी झाली. पाकिस्तानातून निर्वासितांचे प्रचंड लोंढे भारतात येऊ लागले. सीमा भागामध्ये आणि पाकिस्तानात ठिकठिकाणी दंगे माजले होते. हे एक प्रकारचे युद्धच सुरू होते. त्या वेळी केंद्र सरकारने

सहस्रबुद्धे यांची तुकडी सीमा भागाकडे रवाना केली. त्या वेळी ए.एस.सी.ची तुकडी जालंधरमध्ये, तिथून पठाणकोट आणि पुढे चालत जम्मू-काश्मीरमध्ये गेली. या तुकडीकडे त्या वेळी जनावरांच्या वाहतुकीचे काम होते. या तुकडीमधून सहस्रबुद्धे जम्मूहून अखनूर, नवशेराला गेले. नवशेरात पाकिस्तानी सैन्याशी झालेल्या दोन मोठ्या चकमकींमध्ये सहस्रबुद्धे सहभागी होते.

१९४८ च्या जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांत झालेल्या लढायांमध्ये सहस्रबुद्धे यांच्या तुकडीने पाकिस्तानी सैन्याला पराभूत केले.

त्यानंतर १९४९ मध्ये त्यांची लखनौमध्ये पुरवठा विभागात बदली झाली. त्या वेळी ते लेफ्टनंट या पदावर होते. तेथील नेहमीचे काम सुरू असतानाच मूलभूत प्रशिक्षणासाठी त्यांना बरेलीला पाठवण्यात आले. १९५१ मध्ये त्यांना कॅप्टन या पदावर बढती मिळून त्यांची बंगलोर येथे बदली झाली. तेथे नव्याने भूसेनेत भरती होणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देण्याचे काम सहस्रबुद्धे यांच्यावर सोपवण्यात आले. तेथून पुढे दिल्लीत 'ग्राउण्ड लीझ ऑफिसर' म्हणून त्यांची बदली झाली. त्याच वेळी जपानी भाषा व संस्कृतीच्या आकर्षणापोटी त्यांनी संरक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून जपानी भाषेचे विशेष प्रशिक्षण घेतले. दोन वर्षे पूर्ण वेळ चाललेल्या या प्रशिक्षणानंतर त्यांची १९५७ मध्ये संरक्षण मंत्रालयाने जपानी भाषेचे अधिकृत भाषांतरकार म्हणून नियुक्ती केली.

१९६० मध्ये पुन्हा त्यांची जम्मूत बदली झाली. तीन वर्षांनंतर त्यांची बदली बरेलीत झाली. बरेलीतच तीन महिन्यांचा ए.एस.सी.चा वरिष्ठ पदाचा प्रशिक्षणक्रम त्यांनी पूर्ण केला. त्यानंतर तेथेच त्यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली.

१९६० च्या जुलै महिन्यात त्यांना संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेमधील भारताच्या सैन्य तुकडीतून काँगो येथे पाठवण्यात आले. तेथे त्यांच्यावर हवाई वाहतूक विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली. चौदा महिन्यांच्या मुक्कामानंतर १९६१ मध्ये भारतात परत आल्यावर सिमला येथे त्यांची नियुक्ती झाली. चीनबरोबरचे युद्ध १९६२ मध्ये सुरू झाले. या युद्धात यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी निरीक्षक म्हणून त्यांच्या तुकडीला सीमेवर पाठवण्यात आले होते.

१९६४ मध्ये पुण्यातल्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंगमध्ये त्यांनी चार महिन्यांचा पेट्रोलियम विषयातील प्रशिक्षणक्रम पूर्ण केला. त्यानंतर त्यांची बदली मुंबई व तेथून पुढे तेजपूरला झाली. तेथूनच त्यांनी ब्रह्मदेशाला भेट दिली. ब्रह्मदेश भेटीनंतर १९६७ मध्ये त्यांना लेफ्टनंट कर्नल पदावर बढती मिळाली. त्या वेळी नव्या आलेल्या ~~टँक ट्रान्सपोर्टवर~~ ट्रेनिंग सुरू होते. पुढे १९७१ च्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धात ~~हेच युनिट~~ वापरले गेले. येथील दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर त्यांना कॉलेज ऑफ कॉम्बॅट मध्ये वरिष्ठ अधिकारी प्रशिक्षण देण्यात आले.

१९७१ च्या पाकविरूद्धच्या युद्धात त्यांची रवानगी पंजाबात झाली. १९७३ मध्ये दिल्ली येथील सेना मुख्यालयात 'आर्मी सर्व्हिस कॉर्प्स'चे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. येथे त्यांनी समन्वय विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.

त्यांना ब्रिगेडियर म्हणून १९७४ मध्ये बढती मिळाली आणि सेनादलांच्या पुरवठा आणि वाहतूक विभागाचे सहसंचालक म्हणून त्यांची जम्मूत नियुक्ती झाली. खरे तर लेफ्टनंट कर्नल पदानंतर कर्नल पदावर पदोन्नती होते. परंतु यशवंत सहस्रबुद्धे यांना थेट ब्रिगेडियरपदी पदोन्नती मिळाली. त्यानंतर जानेवारी १९७५ मध्ये लखनौ येथे आणि १९७७ मध्ये पुन्हा दिल्ली येथे सेना मुख्यालयात त्यांची नियुक्ती झाली.

यशवंत सहस्रबुद्धे यांना १९७८ मध्ये मेजर जनरल पदावर पदोन्नती मिळाली आणि त्यानंतर १९७९ पासून 'आर्मी सर्व्हिस कॉर्प्स'चे कर्नल कमांडंट म्हणून त्यांनी निवृत्तीपर्यंत काम पाहिले.



मार्च १९८१ मध्ये त्यांना लेफ्टनंट जनरलपदी पदोन्नती मिळाली आणि त्यांची सेनादलांच्या पुरवठा

आणि वाहतूक विभागाचे महासंचालक म्हणून नेमणूक झाली. पुढे तीन वर्षांसाठी त्यांची राष्ट्रपतींचे ए.डी.सी. म्हणून नेमणूक झाली. मार्च १९८४ मध्ये ते सेनादलातून निवृत्त झाले.

यशवंत सहस्रबुद्धे यांना १९८३ मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदक' प्रदान करण्यात आले. याशिवाय त्यांना 'भोसला भूषण'(१९८७), 'शस्त्रपूजक सावरकर पुरस्कार'(२००६), तसेच 'फर्गसन अभिमान पुरस्कार' (२००८) मिळाले आहेत. १९८४ मध्ये सेवानिवृत्तीनंतर ते पुणे येथे स्थायिक झाले आहेत. डेक्कन जिमखाना स्पोर्ट्सचे अध्यक्ष, महाराष्ट्रीय मंडळाचे अध्यक्ष, भारतीय विद्या भवन पुणे केंद्राचे अध्यक्ष, नागरिक चेतना मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशा स्वरूपात ते कित्येक स्वयंसेवी संस्थांबरोबर कार्यरत होते.

– वर्षा जोशी–आठवले

## सातपुते, सतीश भालचंद्र

**भूसेना – लेफ्टनंट जनरल**

**परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, विशिष्ट सेवा पदक**

**२४ जानेवारी १९४४**



सतीश भालचंद्र सातपुते यांचे मूळ गाव नगर जिल्ह्यातील राहुरी होय. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील नूतन मराठी विद्यालयात झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन महाविद्यालयामधून झाले. पुढे त्यांनी 'संरक्षण' या विषयातून एम.एस्सी. पूर्ण केले.

त्यानंतर त्यांनी भारतीय सैनिकी प्रबोधिनीमधून (आय.एम.ए.) प्रशिक्षण घेतले. १९६४ मध्ये प्रशिक्षणाअंती त्यांची भूसेनेच्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये सेकंड लेफ्टनंट या पदावर नियुक्ती झाली. त्यांनी सिक्कीम, नागालँड, मध्य हिमालयीन विभागांमध्ये कार्य केले. १९७१ च्या युद्धाच्या वेळी काश्मीरमध्ये तिसरी तंगधार मोहीम, तसेच १९९०–१९९२ मध्ये टिटवाल–कूपवाडा विभागात अतिरेक्यांच्या विरोधातील मोहिमेत त्यांचा समावेश होता.

२००१ मध्ये संसदेवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी हल्ला केला. त्या वेळेस ते एकविसाव्या कोअरचे प्रमुख होते. पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी आखलेल्या सैनिकी मोहिमेमधील एका भागाचे नेतृत्त्व पंचाहत्तर हजार सैन्यासह सतीश सातपुते यांनी केले.

भूसेनेच्या दक्षिण विभाग मुख्यालयात २००३–२००४ ही दोन वर्षे सातपुते कार्यरत होते. त्या अवधीमध्ये त्यांनी राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र यांपासून दक्षिण भारतातील सर्व राज्यामधील सैनिकी तळांवरील विविध समस्यांचे निराकरण केले. पुणे, खडकी व देहू रोड छावण्यांमधील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला.

सतीश सातपुतेंनी केलेल्या असाधारण सेवेचा गौरव करण्यासाठी त्यांना २००४ मध्ये भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते 'अतिविशिष्ट सेवा पदक', तसेच २००५ मध्ये 'परमविशिष्ट सेवा पदक' देऊन सन्मानित केले गेले.

– अनघा फासे

## सामंत, मोहन नारायण

**नौसेना – कॅप्टन**

**महावीरचक्र**

**जन्म – मृत्यू दिनांक अनुपलब्ध**

मोहन सामंत हे बांगलादेशच्या मोंगला आणि खुलना बंदरावर अत्यंत धाडसी आणि यशस्वी हल्ला करणाऱ्या चार युद्धनौकांच्या समूहाचे वरिष्ठ अधिकारी होते. अत्यंत धोकादायक आणि अनोळखी रस्त्याने आपल्या युद्धनौकांनी हल्ला चढवून मोंगला बंदरातील शत्रूला जखडून टाकले आणि शत्रू सैन्याचे जबरदस्त नुकसान केले. खुलनामध्ये अत्यंत चुरशीची लढाई

स



झाली आणि भारतीय युद्धनौकांवर सतत हवाई हल्ले होत राहिले. मुक्ती वाहिनीच्या दोन बोटी बुडविल्या गेल्या. कमांडर सामंतांनी आपल्या जीवाची काळजी न करता हल्ल्यातून वाचलेल्या बहुसंख्य लोकांना सुरक्षितपणे आणले आणि शत्रूवर निकराचे हल्ले चढवून त्याचे प्रचंड नुकसान केले. संपूर्ण युद्धकाळात मोहन नारायण सामंत यांनी दाखविलेल्या अतुल शौर्य, कर्तव्यनिष्ठा व नेतृत्वाबद्दल त्यांना महावीरचक्र प्रदान केले गेले.


– रूपाली गोवंडे

## साळुंके, पांडुरंग बाळकृष्ण

**भूसेना – शिपाई**

**महावीरचक्र**

**१ मे १९५० – ६ डिसेंबर १९७१**



पांडुरंग बाळकृष्ण साळुंके यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील मानेराजुरी या गावी झाला. १९७० मध्ये ते भूसेनेत दाखल झाले.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धात साळुंके यांचा सहभाग होता. त्या वेळी मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या एका बटालियनने चिलखती दलाच्या सहाय्याने शत्रूवर चाल केली असता शत्रूच्या रणगाड्यांना धोका निर्माण झाला. या वेळी आपला जीव धोक्यात टाकून शिपाई पांडुरंग साळुंके यांनी शत्रूच्या अग्निबाण प्रक्षेपकावर हल्ला केला. शत्रूच्या स्टेनगनचा गोळीबार खूप जवळून होत असतानाही त्यांनी शत्रूवर उडी मारून तो अग्निबाण प्रक्षेपक अक्षरश: हिसकावून घेतला.

या कामगिरीच्या वेळी शिपाई साळुंके यांनी दुर्दम्य धैर्य व उच्च दर्जाचा निर्धार प्रदर्शित केला. त्यांना मरणोत्तर 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

– संध्या लिमये

## सुर्वे, मधुसूदन नारायण

**भूसेना – हवालदार**

**शौर्यचक्र**



२० जानेवारी २००५ मध्ये मधुसूदन नारायण सुर्वे हे स्क्राड कमांडेड या तुकडीत होते. मणिपूर येथील चुरचंद्रपुर जिल्ह्यातील अतिरेक्यांच्या अड्ड्यावर हल्ला करण्याची मोहीम या तुकडीवर सोपवण्यात आली होती. हवालदार सुर्वे हे एखाद्या निष्णात कमांडोसारखे शिताफीने या अड्ड्यामध्ये शिरले. परंतु त्याच वेळेला तिथल्या एका पहारेकऱ्याला त्यांची चाहूल लागली व तो सतर्क झाला. त्या गडबडीत सुर्वे यांच्या पोटाला इजा झाली. धोका समोर दिसत असूनही ते कौशल्याने ते पुढे सरकले.

तेवढ्या वेळात मात्र अतिरेकी चांगलेच सावध झाले होते. प्रत्युत्तर म्हणून त्यांनीही अंदाधुंद गोळीबार सुरू केला व आजूबाजूच्या जंगलाच्या दिशेने ते जायला लागले. हवालदार सुर्वे यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता पळून जाणाऱ्या अतिरेक्यांचा पाठलाग करायला सुरुवात केली. त्यातल्या एकाला त्यांनी जखमी केले आणि बाकीच्यांच्या दिशेने बंदुकीची फैर झाडली.

अतिरेकी व हवालदार सुर्वे यांच्यात घनघोर गोळीबार सुरूच होता. रक्तस्राव होऊन बेशुद्ध होईपर्यंत सुर्वे बंदुकीच्या फैरी झाडतच राहिले. या मोहिमेमध्ये अतिशय धीटपणाने, त्यांनी एका अतिरेक्याला ठार केले व बाकीच्यांना जखमी केले.

स

त्यांच्या ह्या अतुलनीय धाडसामुळे शत्रुला हार मानणे भाग पडले. मात्र या वेळेला त्यांनी स्वत:ला झालेल्या जखमांमुळे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांना अपंगत्व आले. या मोहिमेदरम्यान त्यांनी दाखवलेले धैर्य, साहसी व लढाऊ वृत्ती व नेटाने शत्रूशी केलेला सामना यासाठी त्यांना शौर्यचक्र प्रदान करण्यात आले.

– संध्या लिमये

## सोनावणे, कृष्णा सयाजी

**भूसेना – सुभेदार मेजर, मानद कॅप्टन**
**महावीरचक्र**
**१७ नोव्हेंबर १९२१**



कृष्णा सयाजी सोनावणे यांचा जन्म पोलादपूर तालुक्यातील कुडपण या गावी झाला. ७ नोव्हेंबर १९४१ रोजी ते भूसेनेत दाखल झाले. १६ फेब्रुवारी १९४८ रोजी शत्रूने नौशेराच्या सर्व ठिकाणी एकाच वेळी चौफेर हल्ला चढविला. त्यांपैकी ७ क्रमांकाच्या एम.एम.जी. चौकीवर शत्रूच्या सुमारे बाराशे जणांनी जोरदार हल्ला केला. कृष्णा सोनावणे यांच्या ताब्यात ही चौकी होती. हल्लेखोरांनी अगदी जवळून आपल्या बंदुका चालविल्या. हल्लेखोरांचे गट चौकीवर एकसारखे हल्ले करू लागले.

नाईक कृष्णा सोनावणे यांनी आपल्या पथकाला आपली शांतता ढळू न देता मारा चालू ठेवण्याचे आदेश दिले आणि शत्रूची मोठी हानी करणे चालू ठेवले. या चकमकीत क्रमांक एकचा बंदूकधारी मानेवर गोळी लागून जखमी झाला. नाईक सोनावणे यांनी स्वत: ती बंदूक चालविण्यास सुरुवात केली. हे करीत असताना शत्रूच्या गोळ्यांनी त्यांच्या उजव्या हाताची चाळण झाली. गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी जिवाची तमा न बाळगता डाव्या हाताने बंदुकीचा मारा चालू ठेवला. त्यांच्या चौकीचे भवितव्य दोलायमान स्थितीत असताना त्यांनी लढा चालूच ठेवला. त्यांची बंदूक नंतर नादुरुस्त झाली. अशा परिस्थितीत त्यांनी डाव्या हाताने हातगोळा फेकून व आपल्या सैनिकांनाही तसे करण्याचा आदेश देऊन लढा जारी ठेवला. अशा प्रकारे शत्रूची जबरदस्त हानी करून त्यांनी हल्ला परतवून लावला.

अशा प्रकारे धैर्य व निर्धार दाखवून कठीण प्रसंगातही थंड डोक्याने कर्तव्यनिष्ठा बजावली आणि दोन तासांच्या अतिशय निकराच्या व बिकट प्रसंगात आपल्या सहकार्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. त्यांच्या कृतीमुळे शत्रूचे सातशेहून अधिक सैनिक ठार झाले व महत्त्वाचे ठाणे वाचविणे शक्य झाले. या कार्याबद्दल त्यांना 'महावीरचक्र' प्रदान करण्यात आले.

– वर्षा जोशी-आठवले

## सोमण, भास्कर सदाशिव

**नौसेना – ॲडमिरल**
**३० मार्च १९१३ – ८ फेब्रुवारी १९९५**



भास्कर सदाशिव सोमण यांचा जन्म ग्वाल्हेर येथे झाला. त्यांचे वडील वकील होते. पुढे त्यांच्या वडिलांनी सांगली संस्थानातील न्यायखात्यात मुन्सफ म्हणून नोकरी केली व नंतर राजीनामा देऊन काँग्रेसच्या राजकारणामध्ये भाग घेतला. भास्कर सोमण यांचे प्राथमिक शिक्षण बेळगावातील म्युनिसिपल शाळा क्र.२, टिळक महाविद्यालय, चिंतामणराव विद्यालय, सरदार विद्यालय या सर्व शाळांमध्ये झाले. 'सरकारी शाळा सोडा' या राष्ट्रीय चळवळीतील धोरणानुसार त्यांनी टिळक महाविद्यालयात प्रवेश घेतला. मॅट्रिकला असताना त्यांनी त्यांच्या आतेभावाच्या सल्ल्यावरून डफरीनवरच्या नौसेनेच्या प्रशिक्षणासाठी तयारी सुरू

स



<u>**१९६५ च्या भारत–पाक युद्धानंतर सोमण 'पॅटन नगर'ची पाहणी करताना**</u>

केली. डफरीनची परीक्षा यशस्विरीत्या उत्तीर्ण झाल्यावर ते १९२९ मध्ये डफरीनवर दाखल झाले.

डफरीनच्या तीन वर्षांच्या कालावधीत त्यांनी एस.एस. जलवीर या व्यापारी जहाजावर दोन महिने शिल्डिंग ॲप्रेंटिसशिप केली. १९३२ च्या सुमारास रॉयल इंडियन मरीनमध्ये भारतीय तरुणांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. नौसेनेच्या प्रशिक्षणासाठी डार्टमाऊथ येथील अकॅडमीमध्ये डफरीनच्या चार कॅडेट्सकरिता जागा राखून ठेवण्याचा प्रस्ताव मंजूर झाला. त्या वेळी सोमणांनी रॉयल मरीनची प्रवेश परीक्षा देण्याचे ठरवले व ते त्यामध्ये उत्तीर्ण झाले. डफरीनचे प्रशिक्षण पुरे झाल्यावर १४ मार्च १९३२ रोजी ते इंग्लंडला रवाना झाले.

इंग्लंडमध्ये त्यांचे सुरुवातीचे प्रशिक्षण एच.एम.एस. इरॅबस या प्रशिक्षण नौकेवर झाले. पुढे पाकिस्तानी नौदलाचे प्रमुख झालेले एच.एम.एस. चौधरी यांच्याशी सोमणांची तेथेच भेट झाली. या प्रशिक्षण नौकेवर असतानाच सोमणांनी नौसेना प्रशिक्षणाबरोबरच वैमानिक होण्याचा परवानाही मिळवला. मिडशिपमन सागरी प्रशिक्षणाकरिता त्यांची एच.एम.एम. व्हर्सटाइल या विनाशिका प्रकारातील जहाजावर नेमणूक झाली. त्यानंतर त्यांना पोर्टस्मथ आणि वेमथ येथील शिक्षण केंद्रांमध्ये विविध प्रकारचे प्रावीण्याचे शिक्षण मिळाले. परदेशातील प्रशिक्षण आटपून ते अडीच वर्षांनी ऑगस्ट १९३४ मध्ये भारतात परतले. त्या वेळी त्यांची नेमणूक रॉयल मरीनमध्ये सब-लेफ्टनंट या हुद्द्यावर झाली. भारतात त्यांची प्रथम नियुक्ती कॉर्नवॉलिस या युद्धनौकेवर झाली. तेथे काही काळानंतर ते फर्स्ट लेफ्टनंट झाले. डलहौसी हे प्रशिक्षण जहाज अपुरे पडू लागल्यावर रॉयल मरीनने कराचीजवळच्या मनोरा या बंदराच्या परिसरात एच.एम.आय.एस. बहादूर हे प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. तेथे सोमण भरती अधिकारी म्हणून दाखल झाले.

दुसऱ्या महायुद्धात सुरुवातीला कॉर्नवॉलिस हे जहाज एडनजवळ सागरी पहारा करण्याच्या कामावर होते. त्याच जहाजावर सोमण पुन्हा फर्स्ट लेफ्टनंट म्हणून आले. त्यांच्या तीन वर्षांच्या कॉर्नवॉलिसवरील सेवाकाळात बेरबरा बंदरामध्ये भारतीय सैन्याच्या एका दलाची सुटका आणि एडनजवळच्या समुद्रात तीन इटालियन पाणबुड्यांचा विनाश या प्रमुख घटना घडल्या. युद्धकाळात त्यांच्यावर नाविक दलाकरिता भरती करण्याची जबाबदारी टाकण्यात आली. काही काळानंतर त्यांची खैबर या युद्धनौकेवर कमांडिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली आणि लेफ्टनंट कमांडर या हुद्द्यावर त्यांची बढती झाली. त्यांनी २३ जुलै १९४२ रोजी खैबरची अधिकारसूत्रे ग्रहण केली. दरम्यानच्या काळात त्यांनी भूसेना व वायुसेना यांच्याबरोबर संयुक्त कारवाईचे प्रशिक्षणही पूर्ण केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अटलांटिक महासागरामध्ये व्यापारी जहाजांना संरक्षण देणाऱ्या 'कॉनव्हॉय एस्कॉर्ट ग्रूप'चे काम खैबरने केले. नंतर खैबरची सूत्रे नव्या कॅप्टनकडे सुपूर्त करून सोमण दि. १ जून १९४३ रोजी 'आय.एन.एस. हमला'वर दाखल झाले. त्या वेळी मंडपम येथे असलेल्या या नौसेना प्रशिक्षण केंद्रामध्ये भूसेना आणि नौसेना यांच्या संयुक्त कारवाईचे प्रशिक्षण दिले जात असे. आग्नेय आशियातील युद्धक्षेत्रामध्ये या कारवाया करण्याच्या दृष्टीने याची तयारी सुरू होती. पण प्रत्यक्षात ती कारवाई झालीच नाही.

स

महायुद्ध संपल्यानंतर जगभर विखुरलेली सैन्यदले आणि त्यांची सामग्री मायदेशी रवाना करणे सुरू झाले. ब्रिटिश सैन्यदलाची कामे 'सी ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन' या संघटनेमार्फत करण्यात आली व सोमण त्यामध्ये साहाय्यक वाहतूक अधिकारी म्हणून काम करू लागले. २६ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांची नेमणूक 'ड्राफ्टिंग कमांडर ऑफ नेव्ही' या पदावर झाली. त्यानंतर कमांडरच्या हुद्द्यावर बढती मिळाली. १९४६ मध्ये मुंबईतील नौदल उठावाच्या वेळी मुंबईत त्यांनी धीरोदत्त भूमिका घेतली. त्याच सुमारास त्यांची कॅप्टन या हुद्द्यावर बढती झाली.

स्वतंत्र भारतामध्ये नौसेना अधिकारी आणि जवानांच्या मनुष्यबळ विकासाबाबतच्या अभ्यासामुळे 'चीफ ऑफ पर्सोनेल' म्हणून भास्कर सोमण यांची नौसेना मुख्यालयात बदली झाली. त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी या पदाची सूत्रे हाती घेतली. नाविक दलाच्या मालमत्तेची भारत आणि पाकिस्तान यांच्यात वाटणी होत असताना सोमण यांचे योगदान महत्त्वाचे होते. नौसेनेच्या आधुनिकीकरणाचा पाया घालताना नौसेना उभारणी, मनुष्यबळ विकास, पुरवठा व्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला. डायरेक्टर ऑफ पर्सोनेल, चीफ ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन अशा विविध पदांवर नौसेना मुख्यालयात काम केल्यावर ते पुन्हा सागरी आघाडीवर गेले.

पुढे सोमण यांची बदली एच.एम.आय.एस. जमना या जहाजावर कमांडिंग ऑफिसर म्हणून झाली. पुढे ७ ऑक्टोबर १९५१ रोजी आय.एन.एस. दिल्ली या त्या वेळच्या सर्वांत मोठ्या युद्धनौकेवर ते कमांडिंग ऑफिसर म्हणून गेले; पण दोनच महिन्यांनी त्यांची बदली आय.एन.एस. सिरकार्सवर झाली. पूर्व किनाऱ्यावर कार्यरत असताना विशाखापट्टणम हे गौण मानले गेलेले अविकसित बंदर, अग्रगण्य व प्रमुख नाविकतळ बनू शकेल हे त्यांच्या लक्षात आले. भारताच्या पूर्व किनाऱ्याच्या संरक्षणाचा हा बालेकिल्ला आहे हे त्यांनी जाणून त्याप्रमाणे त्यांनी पावले उचलली. कोचीच्या परिसरातील आय.एन.एस. वेंडुतुथीवर त्यांची कमांडिंग ऑफिसर म्हणून १२ जानेवारी १९५४ रोजी बदली झाली. त्याचप्रमाणे ते कोची बंदराचे कमोडोर-इन-चार्ज झाले. या पदावर ते ध्वजाधिकारी होते.

ते कोचीत असताना भारतात विखुरलेल्या नौसेनेच्या सर्व विशेष शिक्षणसंस्था कोचीत आणण्याचा आणि नौसेनेचे स्वत:चे विमानदल (नेव्हल एव्हिएशन) उभारण्याचा भारतीय नौसेनेने निर्णय घेतला. ह्या दोन्ही बाबी मूर्त स्वरूपात आणण्यात सोमणांनी मौलिक योगदान दिले. मुंबई बंदराचे कमोडोर-इन-चार्ज म्हणून त्यांनी १९५६ ते १९५७ दरम्यान काम पाहिले. याच सुमारास ते रिअर ॲडमिरल झाले.

गोवामुक्तीसाठी पार पडलेल्या 'ऑपरेशन विजय' (१९६१) मधील यशस्वी कामगिरीनंतर सोमण यांची वाटचाल सर्वोच्च पदाकडे होऊ लागली. गोवामुक्ती मोहिमेत तत्कालीन भूसेनेचे दक्षिण विभाग प्रमुख लेफ्टनंट जनरल जितेंद्रनाथ चौधरी यांच्याबरोबर सोमण यांनी चढाईचा आराखडा बनवला होता. फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इंडियन फ्लीट (फोसिफ) म्हणून त्यांची दि. १६ एप्रिल १९६० रोजी नियुक्ती झाली होती. देशातील सर्वांत मोठ्या युद्धनौकेवरून फोसिफ आपला कार्यभार सांभाळतो. सोमण यांनी आय.एन.एस. म्हैसूरवरून कार्यभार सांभाळला म्हणून त्यांना 'फोसिफ म्हैसूर' असे संबोधण्यात आले. आय.एन.एस. विक्रांत नौसेनेत दाखल झाल्यावर त्यांचे पद 'फोसिफ विक्रांत' म्हणून ओळखले जाऊ लागले. 'फोसिफ' म्हणून त्यांनी २६ महिने कार्यभार सांभाळला.

एप्रिल १९६० मध्ये ते व्हाइस ॲडमिरल असतानाच भारतीय नौसेना प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. जून १९६६ मध्ये ते सेवानिवृत्त झाले.

– शशिकांत पित्रे/अविनाश पंडित

* * *

# ह

## हरोलीकर, अरूण भीमराव

**भूसेना - ब्रिगेडिअर**

**महावीरचक्र**

**६ डिसेंबर १९३२ - १६ नोव्हेंबर २००७**



अरुण भीमराव हरोलीकर यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. कोल्हापुरातील राजारामपुरी व न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातून त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांनी राजाराम महाविद्यालयामधून बी.ए. ची पदवी संपादन केली. त्यांनी राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रशिक्षण पूर्ण केले. आपण सैन्यातच जायचे असा त्यांचा ठाम निर्धार होता. ब्रिटिश सेवेत प्रवेश न मिळाल्यास फ्रेंच वसाहतीच्या सैन्यात जाण्याचा त्यांचा विचार होता. सेनेत जाण्यासाठीच्या त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि त्यांना भारतीय लष्करात प्रवेश मिळाला.

५८ गुरखा ट्रेनिंग सेंटर येथे लष्करी प्रशिक्षण, वेलिंग्टन येथे एक वर्षाचे प्रशिक्षण व गुलमर्ग येथे पर्वतारोहणाचे व अतिथंड प्रदेशातील युद्धाचे प्रशिक्षणही त्यांनी घेतले. कॉलिम्पाँग, शिलाँग, भारत-पाक सीमारेषा अशा ठिकाणी त्यांनी सेवा बजावली आहे.

पाकिस्तानविरूद्धच्या युद्धात अटग्राम, गाझीपूर व सिल्हेट या तीन ठिकाणाच्या लढाया यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने जिंकल्या. यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या ४/५ गोरखा रायफल्स या पलटणीला 'सिल्हेट' हा युद्धसन्मान व 'पूर्व पाकिस्तान १९७१' हा थिएटर सन्मान देण्यात आला. एखाद्या रेजिमेंटमधील ५० टक्के सैनिक युद्धात लढले असतील तसेच त्यांना दिलेले उद्दिष्टही त्यांनी पूर्ण केलेले असेल तर अशा रेजिमेंटला हा सन्मान दिला जातो. यांच्या पलटणीतील शूरवीरांना दोन महावीरचक्र, तीन वीरचक्र व तीन सेवा पदके मिळाली आहेत.

१६ ऑगस्ट १९७१ रोजी यांची नियुक्ती पंचग्राम या सिल्हेटच्या पश्चिमेकडील सरहद्दीवर झाली. नोव्हेंबरमध्ये पंचग्रामच्या जवळील अटग्राम येथील पाकच्या लष्करी ठाण्यावर कब्जा करण्याचा आदेश त्यांच्या पलटणीला मिळाला. यासाठी प्रामुख्याने तीन योजना आखण्यात आल्या. एक- पाकिस्तानी फौजेवर अनपेक्षितपणे हल्ला चढविणे, दुसरे- पाकिस्तानी चौक्या-चौक्यांच्या दरम्यान असलेल्या अंतरातून घुसखोरी करून आत शिरायचे व तिसरे- कुकऱ्यांचा उपयोग करून पाकिस्तानी फौजेस जरब बसविणे. ठरलेल्या योजनेनुसार २० नोव्हेंबरच्या रात्री त्यांची तुकडी सुरमा नदीच्या काठावर पोहोचली. रबरी नावांमधून या तुकडीची आगेकूच सुरू असताना अचानक तुकडीच्या दिशेने गोळीबार होऊ लागला.

शत्रूच्या गोळीबारापासून आपला बचाव करण्याच्या प्रयत्नात गुंतल्यामुळे या सैनिकांची दिशाभूल झाली. मात्र अटग्रामच्या लष्करी ठाण्याकडून या सैनिकांवर काही वेळाने पुन्हा गोळीबार सुरू झाला. हा गोळीबार १५००-२००० मीटर्स अंतरावरून मशीनगनने केला जात असल्यामुळे शत्रूचा निश्चित ठावठिकाणा आपल्या सैनिकांना माहीत झाला. हा गोळीबार थंडावल्यानंतर आपली तुकडी गुपचूपपणे पुढे

ह

सरसावली आणि शत्रू बेसावध असताना त्याच्यावर तुटून पडली. शत्रूच्या बंकर्समध्ये घुसून कुकरीचा वापर करून शत्रूच्या सैनिकांना यमसदनास पाठविण्यास सुरूवात केली. आपल्या सैनिकांवर गोळीबार करणारा नेमका बंकर लक्षात आल्यावर हरोलीकरांचे सहकारी सुभेदार रणबहाद्दूर यांनी त्या बंकरवर हातबॉम्ब फेकून त्या बंकरचा विध्वंस केला. शत्रूचे सैनिक ठार झाले. हरोलीकरांच्या नेतृत्वाखाली ५ गोरखा रेजिमेंटच्या चौथ्या बटालियनाच्या निर्णायक विजय झाला.

– ज्योती आफळे

* * *

# अं ते आ



## अंभोरे, भिवासन लक्ष्मण

**भूसेना - सुभेदार मेजर**

**वीरचक्र**


**२२ मे १९३६**

भिवासन लक्ष्मण अंभोरे यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील रायगड या खेड्यात झाला. दि. २२ एप्रिल १९५१ रोजी 'बॉय' म्हणून ते भूसेनेत रुजू झाले.

माउण्टन डिव्हिजनच्या खेमकरण विभागात नायब सुभेदार म्हणून कार्यरत होते. सैनिकांच्या एका कंपनीचे म्हणजे सुमारे २४० सैनिकांचे ते त्यावेळी प्रमुख होते. शत्रूच्या प्रदेशात, त्यांनी त्यांच्या या पथकासह तीन वेळा टेहाळणी करून शत्रूची उपयुक्त माहिती मिळवली.

दि. १७ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानी सैन्याने रणगाडे आणि मशीनगन्स घेऊन अंभोरे यांच्या तुकडीवर हल्ला केला, तेव्हा अंभोरे यांनी प्रत्येक खंदकात शिरून आपल्या जवानांना धीर दिला. शत्रूशी निकराने लढून हल्ला परतवून लावण्यासाठी उत्तेजन दिलं.

त्याच दिवशी दुपारी, पुन्हा पाक सैन्याने जोरदार हल्ला चढवला. शत्रू केवळ १८ यार्डांवर येऊन ठेपला होता. अशा वेळी ते आपल्या एका तुकडीसह पुढच्या खंदकाकडे गेले आणि तिथून त्यांनी शत्रूवर गोळीबार सुरू केला. अशा प्रकारे अंभोरे यांनी धैर्य, कुशल नेतृत्वाची चुणूक दाखवत, शत्रूला जोराचा तडाखा देत मागे हटवले. या कामगिरीसाठीच भिवासन लक्ष्मण अंभोरे यांना 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.




## अडिसरे गजानन नारायण

**भूसेना - मेजर**

**वीरचक्र**

**४ नोव्हेंबर १९१८**

यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. राजाराम विद्यालय, कोल्हापूर व बेहॉन स्मिथ, बेळगाव येथून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी दि. १८ फेब्रुवारी १९३८ पासून भारतीय भूसेनेत सेवा करण्यास सुरुवात केली. १ जून १९४८ रोजी त्यांना पहिले कमिशन मिळाले.



**आपटे, प्रदीप विनायक**
**फ्लाइट लेफ्टनंट**
**वायुसेना**
**वीरचक्र**
**२७ ऑगस्ट १९४५ – ४ डिसेंबर १९७१**

प्रदीप विनायक आपटे यांचा जन्म मुंबई येथे झाला. दि. २९ ऑक्टोबर १९६६ रोजी त्यांना पहिले कमिशन मिळाले. १९७१ च्या पाकिस्तान युद्धामध्ये प्रदीप आपटे लढाऊ बॉम्बर स्क्वॉड्रनमध्ये होते. त्यांच्यावर शत्रूच्या अंतर्गत रचनेवर टेहळणी करणाऱ्या विमानाची जबाबदारी होती.


दि. ४ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना नया चोर, उमरकोट, धोरनारो या टापूत धोरनारो रेल्वे स्थानकाकडे शत्रूच्या वाहनांचा ताफा जाताना दिसला. त्यांनी त्वरित त्या ताफ्यावर थेट हल्ला चढवला. पुढील मोहिमेत त्यांना धोरनारो रेल्वे स्थानकाकडे येणारी मालगाडी दिसली. त्यांनी त्या मालगाडीवर हल्ला चढविला. शत्रूकडून जमिनीवरून प्रखर प्रतिकार होत असतानादेखील, त्यांनी मालगाडीच्या अनेक वाघिणींचा विध्वंस केला.

तिसऱ्या वेळी परतत असताना जमिनीवरून होणाऱ्या प्रतिहल्ल्यात शत्रूने त्यांच्या विमानाचा वेध घेतला. आपल्या क्षतिग्रस्त विमानावर नियंत्रण राखून त्यांनी तेथून १६० कि.मी. अंतरावर असलेल्या तळाकडे कूच केले. अशक्यप्राय परिस्थितीमध्ये त्यांनी विमानातून पॅराशुटच्या सहाय्याने उडी मारली. परंतु त्यांना मृत्यू आला. त्यांच्या पराक्रमासाठी त्यांना मरणोत्तर वीरचक्राने सन्मानित करण्यात आले.

* * *

# क





## कडू, मच्छिंद्र रामभाऊ

**भूसेना - शिपाई**


**वीरचक्र**

**२३ नोव्हेंबर १९२४**

मच्छिंद्र रामभाऊ कडू यांचा जन्म नगर जिल्ह्यातील आपटी या गावी झाला. दि. २३ नोव्हेंबर १९४३ रोजी भूसेनेत प्रवेश करून त्यांनी मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या (पॅराट्रूपर) तुकडीमध्ये सेवेस सुरुवात केली.

१९४८ मधल्या पाकिस्तान युद्धामध्ये पथरारी येथील शत्रूच्या भक्कम तळावर हल्ला करताना शिपाई कडू यांच्याकडे ब्रेनगन सांभाळायची जबाबदारी होती. या हल्ल्यादरम्यान त्यांच्या उजव्या हाताला व हनुवटीला जखम झाली. या जखमांची कोणालाही कल्पना न देता त्यांनी शत्रूवर आपल्या ब्रेनगनमधून गोळीबार चालू ठेवला. लवकरच त्यांच्या मांडीमध्येसुद्धा गोळी घुसली. त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्याने त्यांना माघार घेण्यास सांगितले. परंतु, त्यांनी माघार घेण्यास नकार देत हल्ला सुरूच ठेवला.

त्यांनी मोर्चा जिंकला; पण ते बेशुद्ध पडले. स्वत:च्या जखमांची व जिवाची पर्वा न करता त्यांनी कार्याप्रती उच्चतम निष्ठा आणि अपूर्व धाडसाचे दर्शन घडविले. त्याबद्दल दि. २३ नोव्हेंबर १९४८ रोजी 'वीरचक्र' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



## करकरे, अशोक कुमार

**भूसेना - कॅप्टन**

**वीरचक्र**

**३० जून १९४३ - ८ डिसेंबर १९७१**

अशोक कुमार करकरे यांचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा येथे झाला. ३ मे १९६४ रोजी त्यांची भारतीय लष्करात नेमणूक झाली. करकरे यांचे शिक्षण नवी दिल्लीतील एअर फोर्स सेंट्रल येथे झाले. त्यानंतर त्यांनी चंदिगड शासकीय महाविद्यालयातून पदवी घेतली. लंडनमधील ख्राईस्ट महाविद्यालयामधून त्यांनी उच्च शिक्षण घेतले. पश्चिम विभागातील खारला तळावर हल्ला करण्याकरता, राजपूत रेजिमेंट बरोबर कॅप्टन करकरे हे तोफखाना रेजिमेंट निरीक्षक अधिकारी

म्हणून काम पाहत होते. शत्रूनेही त्वरीत हालचाल करीत आपल्या सैन्यावर जोरदार गोळीबाराला सुरूवात केली. त्यामुळे बरेचसे सैनिक जखमी झाले.

कॅप्टन करकरे यांनी शत्रुकडील रेडिओ यंत्रणा (बिनतारी संदेश यंत्रणा) हस्तगत करून त्याद्वारे शत्रूची दिशाभूल केली. त्यामुळे गोळीबाराची दिशा बदलली. त्यामुळेच तुकडीतील सैनिकांची प्राणहानीही टळली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे आठ डिसेंबरच्या सकाळी शत्रूने अगदी निर्धाराने पायदळ आणि तोफखान्याच्या मदतीने आपल्या सैन्यावर प्रतिहल्ला चढवला. आपल्या सैन्यावर तोफखाना आणि लहान शस्त्रास्त्रांचा वर्षाव सुरू झाला. तरीही न डगमगता करकरे यांनी तोफखान्याला अचूक दिशा दिली. शत्रूवर तोफगोळ्यांचा मारा करीत त्यांना मागे हटवले. आपले सैन्य त्या ठिकाणाहून बाहेर पडेपर्यंत त्यांनी शत्रूला गुंतवून ठेवले.

मात्र करकरे तिथून बाहेर पडत असताना त्यांना वर्मी गोळी लागून जागीच वीरमरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेले शौर्य, नेतृत्वगुण याबद्दल त्यांना मरणोत्तर वीरचक्र देण्यात आले.



## कर्डिले, एकनाथ महिपती

**भूसेना - नाईक**

**वीरचक्र**

**७ मार्च १९४० - ४ डिसेंबर १९७१**

एकनाथ महिपती कर्डिले यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील बुऱ्हाणनगर गावात झाला. दि. २० ऑक्टोबर १९६१ पासून त्यांनी भूसेनेतील पाचव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये सेवेस सुरुवात केली.

दि. ४ डिसेंबर १९७१ च्या रात्री मराठा लाइट इन्फन्ट्रीकडे पूर्व विभागातील शत्रूचे एक ठाणे काबीज करण्याची कामगिरी सोपवण्यात आली. सैन्याने योजनेप्रमाणे हल्ला चढविला. परंतु, शत्रूच्या मोर्चातील एका बंकरमधील मध्यम पल्ल्याच्या मशिनगनमधून अचूक व सातत्यपूर्ण मारा होत होता. त्यामुळे आपल्या सैन्याची आगेकूच थोपवून धरली गेली होती.

कर्डिले यांनी त्या बंकरवर हल्ला चढवला व मशिनगनचा मारा बंद पाडण्यात यश मिळविले. त्यामुळे भारतीय सैन्याला शत्रूचे ठाणे जिंकून घेणे शक्य झाले. परंतु, हे करत असताना मशिनगनची एक गोळी कर्डिले यांच्या वर्मी लागली आणि त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

एकनाथ महिपती कर्डिले यांनी शत्रूशी दोन हात करताना अद्वितीय पराक्रम आणि जिद्दीचे प्रदर्शन घडवीत देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले. या कामगिरीबद्दल कर्डिले यांना मरणोत्तर वीरचक्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क



## कर्णिक, सुरेश दामोदर

**वायुसेना - विंग कमांडर**

**वीरचक्र**

**५ मे १९३५**

सुरेश दामोदर कर्णिक यांचा जन्म मुंबई येथे झाला. दि. १८ जानेवारी १९५६ रोजी त्यांनी भारतीय वायुसेनेत स्क्वॉड्रन लीडर म्हणून सेवेस सुरुवात केली. १९७१ च्या पाकिस्तान युद्धात त्यांच्याकडे बॉम्बफेकी विमानांच्या तुकडीचे नेतृत्व होते. या युद्धाच्या काळात त्यांनी पूर्व आणि पश्चिम आघाड्यांवर, दिवसा आणि रात्री झालेल्या अशा दोन्ही प्रकारच्या, एकूण सहा अत्यंत कठीण व महत्त्वाच्या मोहिमांमध्ये भाग घेतला. त्यांमध्ये शत्रूच्या विमानतळांवर दिवसा व रात्रीचे हल्ले करणे अशा प्रकारच्या कामांचा समावेश होता. कर्णिक यांनी या युद्धादरम्यान नेतृत्व, धाडस या गुणांचे व व्यावसायिक कौशल्याचे उच्चतम प्रदर्शन घडविले. त्यांना दि. १८ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.



## कल्याणीवाला, रुस्तुम सोराबजी

**वायुसेना - स्क्वॉड्रन लीडर**

**वीरचक्र**

**२४ ऑक्टोबर १९२९**

रुस्तुम सोराबजी कल्याणीवाला यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण सेंट झेवियर्स शाळा, मुंबई आणि दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई येथे झाले. त्यांचा काश्मीर खोऱ्यातील उत्तर विभागामधील उड्डाण मोहिमांमध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. झोजीला खिंडीजवळच्या उंच टेकड्यांवरील शत्रूच्या चौक्यांवरील हल्ले व अचूक बॉम्बवर्षाव यांमध्ये त्यांनी आदर्श घालून दिला. या हवाई हल्ल्यानंतर जमिनीवर हल्ले सुरू झाले. त्यांच्या या हल्ल्यांमुळे भूसेनेस सहकार्य लाभले. गुमरीजवळच्या एका हल्ल्यामुळे आपल्या सैन्याला द्रासपर्यंत पोहोचणे शक्य झाले. रुस्तुम कल्माणीवाला यांना दि. २० नोव्हेंबर १९५० रोजी 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.



## कविना, बहादूर नरीमन

**नौसेना - लेफ्टनंट कमांडर**

**वीरचक्र**

**१ मार्च १९३७**

बहादूर नरीमन कविना यांचा जन्म भुसावळ येथे झाला. नाशिकमधील बॉइज टी विद्यालयातून शालेय शिक्षण पूर्ण करून त्यांनी मुंबईतील जयहिंद, तसेच के.सी. महाविद्यालयात पुढील शिक्षण घेतले. दि. १ जुलै १९६० रोजी ते भारतीय

नौसेनेत दाखल झाले. १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान घनघोर युद्ध झाले. भारतीय सेनेने त्यात अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन केले. पाकिस्तानबरोबरच्या युद्धामध्ये त्यांनी कराची बंदरावर हल्ला करणाऱ्या नौसेनेच्या ताफ्यातील एका लढाऊ जहाजाचे नेतृत्व केले. शत्रूच्या संरक्षक फळीकडून होणारा मारा व हवाई हल्ल्याचा धोका यांची पर्वा न करता त्यांनी शत्रूवर निकराचा हल्ला चढवला.

बहादूर नरीमन कविना यांच्या निधड्या नेतृत्वामुळेच पाकिस्तानी नौसेनेला जबरदस्त दणका देणे भारतीय नौसेनेला शक्य झाले. त्यांच्या, तसेच इतर नौसेना तुकड्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे शत्रूच्या जहाजांचा ताफा बंदरातच नष्ट करणे नौसेनेस शक्य झाले.

या युद्धात त्यांनी दाखविलेले असामान्य धाडस, निष्ठा व नेतृत्वगुणांसाठी दि. १८ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## कांबळे, काशिनाथ शिवरुद्र

**भूसेना – शिपाई**

**वीरचक्र**


**५ मे १९५२**

काशिनाथ शिवरुद्र कांबळे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील धाफळपूर येथे झाला. दि. १३ सप्टेंबर १९७० पासून त्यांनी भारतीय भूसेनेतील दुसऱ्या महार फलटणीमध्ये सेवा करण्यास सुरुवात केली.

१९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात राजस्थान भागातील पर्वत अली येथे हल्ला करण्यासाठी निघालेल्या महार फलटणीच्या कंपनीमध्ये त्यांचा समावेश होता. ही कंपनी वाटचाल करीत जेव्हा आपल्या लक्ष्यापासून केवळ ५० यार्डांवर पोहोचली, तेव्हाच शत्रूने मध्यम पल्ल्याच्या मशीनगनचा जोरदार मारा चालू केला. या माऱ्यात कंपनीचे भारी नुकसान होऊ लागले.

शिपाई कांबळे यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता शत्रूच्या मशीनगन मोर्चावर निकराचा हल्ला चढवला. या प्रयत्नात ते गंभीर जखमी झाले. तशाही परिस्थितीत ते मुळीच डगमगले नाहीत. आपल्या जखमांची पर्वा न करता ते शत्रूच्या दिशेने सरपटत पुढे सरकले व एक हातगोळा टाकून त्यांनी शत्रूचा तो मोर्चा उद्ध्वस्त केला. या चकमकीत झालेल्या जखमांमुळेच त्यांचा युद्धक्षेत्रावरच मृत्यू झाला.

शिपाई काशिनाथ कांबळे यांनी अद्वितीय धाडस व निष्ठेचे एक उदाहरणच सादर केले. या कामगिरीबद्दल त्यांना दि. १२ डिसेंबर १९७१ रोजी मरणोत्तर 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.



## कांबळे, गोविंद भागा

**भूसेना - हवालदार**

**वीरचक्र**

**५ सप्टेंबर १९३१ - १८ नोव्हेंबर १९६२**

गोविंद भागा कांबळे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चाफोळी या गावी झाला. पुढे त्यांचे कुटुंब ठाण्याला येऊन स्थायिक झाले. गोविंद कांबळे यांनी दि. ५ डिसेंबर १९४६ रोजी भारतीय भूसनेच्या सातव्या, महार रेजिमेंटमध्ये सेवा करण्यास सुरुवात केली.

१९६२ च्या चीन युद्धादरम्यान शीख लाइट इन्फन्ट्रीची एक कंपनी नेफा भागातल्या सेला येथे, आघाडीवर तैनात करण्यात आली होती. मागे परतणाऱ्या गढवाल रायफल्सच्या फलटणीस संरक्षण देण्याचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आले होते. हवालदार गोविंद कांबळे याच शीख लाइट इन्फन्ट्रीच्या नेतृत्वाखाली, मध्यम पल्ल्याच्या मशिनगन तुकडीचे नेतृत्व करत होते.

दि. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी चिनी सैन्याने त्यांच्या कंपनीवर हल्ला चढवला. त्यांच्या दक्षिणेकडील फळी शत्रूच्या हल्ल्याने खचत चालली होती. अशा परिस्थितीत हवालदार कांबळे शत्रूच्या गोळीबाराची पर्वा न करता या खंदकातून त्या खंदकात, असे फिरत मारा करत होते. हे करत असताना शत्रूच्या तोफगोळ्याचा स्फोट त्यांच्याजवळ झाला व त्यांच्या दोन्ही पायांत तोफगोळ्याचे तुकडे घुसून ते जवळपास निकामी झाले. अशा परिस्थितीतही त्यांनी सरपटत एका खंदकाचा आसरा घेतला.

याच सुमारास त्यांच्या कंपनीस माघारी फिरण्याचा हुकूम मिळाला. हवालदार कांबळे यांनी त्यांच्या साथीदारांना माघारी पाठवले व स्वत: मात्र त्यांच्या संरक्षणासाठी शत्रूवर मारा करीत राहिले. या चकमकीत त्यांना वीरमरण प्राप्त झाले; परंतु त्यांनी शत्रूला रोखून धरण्यात यश मिळवले.

हवालदार कांबळे यांनी अद्वितीय शौर्य आणि निष्ठेचे प्रदर्शन करीत सर्वोच्च बलिदान दिले. या कामगिरीबद्दल त्यांना मरणोत्तर 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## काकफळे, पांडुरंग आनंद

**भूसेना - हवालदार**

**वीरचक्र**

**२० जानेवारी १९५० - १२ ऑक्टोबर १९८७**

पांडुरंग आनंदा काकफळे यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सोमेगाव येथे झाला. दि. २० जानेवारी १९६९ पासून ते भूसेनेतील आठव्या महार रेजिमेंटमध्ये सेवेस रुजू झाले.

हवालदार पांडुरंग काकफळे यांची श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेमध्ये नियुक्ती करण्यात आली होती.

दि. १२ ऑक्टोबर १९८७ रोजी मारुथ्नामॅडम शहर जिंकण्यासाठी हल्ला करणाऱ्या कंपनीमध्ये ते सेक्शन कमांडर होते. या कंपनीला जोरदार प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. यात हवालदार काकफळे गंभीररित्या जखमी झाले. स्वत:च्या जखमांची पर्वा न करता ते आपल्या तुकडीचे नेतृत्व करीत राहिले. त्यांनी स्वत: शत्रूचा मशिनगन असणारा बंकर उद्ध्वस्त केला.

त्या वेळी झालेल्या लढाईत त्यांना शत्रूच्या गोळ्याचा आघात झाला व त्यात त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

हवालदार काकफळे यांनी अद्वितीय धाडस व निष्ठा यांचे प्रदर्शन घडवीत सर्वोच्च बलिदान दिले. या कामगिरीबद्दल त्यांना मरणोत्तर 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## कितकुले, प्रकाश दिगंबर

**भूसेना - लेफ्टनंट कर्नल**

**वीरचक्र**

**२१ एप्रिल १९४६**

प्रकाश दिगंबर कितकुले यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दि. ३० जून १९६३ रोजी ते तोफगोळा विभागात दाखल झाले.

लष्करी सेवेत दाखल होताच केवळ आठच वर्षांत त्यांच्यावर पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात कामगिरी बजावण्याची मोलाची संधी प्राप्त झाली. त्यांनी या संधीचे अक्षरश: सोने केले असे म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही. त्या वेळी ते मेजर पदावर कार्यरत होते.

युद्धात त्यांची रेजिमेंट पूर्व सीमेवर तैनात करण्यात आली होती. एका क्षणी त्यांना शत्रूचे सैन्य हल्ला करण्यासाठी सज्ज होत असल्याचे लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करत कितकुले यांनी तोफगोळ्यांचा अचूक मारा करीत शत्रूला गुंतवून ठेवले. त्यांनी तोफगोळ्यांचा तुफान मारा करीत शत्रूचे मोठे नुकसान केले. त्यामुळे पाकिस्तानी सैन्य सैरभैर झाले.

याचा अचूक फायदा उठवीत भारतीय सैन्याने शत्रूवर जोरदार हल्ला चढविला. या अचानक झालेल्या हल्ल्याने शत्रूचे सैन्य पुरते गांगरून गेले आणि त्यांनी घाईघाईने या भागातून चक्क माघार घेतली.

या मोलाच्या कामगिरीमध्ये कितकुले यांनी अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन घडविले. त्यांच्या या कामगिरीमुळे मेजर प्रकाश कितकुले यांना ङ्गवीरचक्रङ्ख सन्मान देऊन गौरविण्यात आले.

क



## किरतकुडे, आबा कोंडिबा

**भूसेना - सुभेदार**

**वीरचक्र**


**१६ डिसेंबर १९२३**

आबा कोंडिबा किरतकुडे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील भोसरे येथे झाला. दि. १६ डिसेंबर १९४३ रोजी किरतकुडे महार रेजिमेंटमध्ये दाखल झाले.

दि. २३ जून १९४८ हा दिवस त्यांच्या कारकिर्दीत महत्त्वपूर्ण ठरला. या दिवशी शत्रूने मशीनगनमधून गोळीबार आणि बॉम्बफेक करण्यास सुरुवात केली. किरतकुडे यांनी शत्रूला जोरदार गोळीबारानेच प्रत्युत्तर दिले. त्यांच्या गोळीबारामुळे शत्रूचे ११ सैनिक ठार झाले.

पुन्हा दि. २९ जून १९४८ रोजी शत्रूने आपल्या सैन्यावर जोरदार हल्ला केला. या वेळी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत लान्स नाईक किरतकुडे यांनी लढा दिला व शत्रूला जोरदार प्रत्युत्तर दिले. त्यानंतर काही क्षणांतच शत्रुसैन्याकडून होणारा गोळीबार थंडावला. ते पाहून किरतकुडे यांनी दुसऱ्या बंकरकडे धाव घेतली. परंतु, शत्रूकडून झालेल्या गोळीबारात दुर्दैवाने ते जखमी झाले. अशा जखमी अवस्थेतही मागे फिरण्यास त्यांनी नकार दिला आणि शत्रूवर गोळीबार करणे सुरूच ठेवले.

किरतकुडे यांनी शत्रूशी लढताना दाखवलेले कौशल्य, एकाग्रता आणि साहसाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.



## कुरणकर, श्रीधर विठ्ठल

**भूसेना - नाईक**

**वीरचक्र**

**२ जून १९५६**

श्रीधर विठ्ठल कुरणकर यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील जाधेवाडी या गावात झाला. दि. ३१ ऑक्टोबर १९७४ पासून त्यांनी भारतीय पायदळातील गढवाल रायफल्सच्या अठराव्या फलटणीमध्ये सेवेस सुरुवात केली.

दि. ८ जुलै १९८९ रोजी आठ जणांच्या टेहळणी पथकाला मोटरसायकलवरून जाणारे दोन अतिरेकी दृष्टीस पडले. भारतीय सैन्याचे वाहन पाहिल्याबरोबर त्या अतिरेक्यांनी घाबरून आपली मोटरसायकल सोडून दिली व ते जीव वाचवण्यासाठी पळू लागले. त्यांच्यातला एक अतिरेकी कुंपण व इतर बांधकामांचा फायदा उठवून निसटला.

नाईक श्रीधर कुरणकर त्या वेळी कमांडिंग ऑफिसरच्या गाडीवर चालक होते. त्यांनी ताबडतोब दुसऱ्या अतिरेक्याचा पाठलाग करण्यासाठी गाडी वळवली. नाईक कुरणकरांनी अतिरेक्याला धडक देऊन पाडले. गाडी अतिरेक्याच्या

अंगावरून जाण्याअगोदरच त्यांच्याकडून नकळत ब्रेक दाबले गेले व गाडी तत्काळ जागच्याजागी थांबली.

नाईक कुरणकर, कमांडिंग ऑफिसर व रायफलमन सुरेश कुमार यांनी गाडीतून उड्या मारल्या व ते पुढच्या बाजूला अतिरेक्याला पकडण्यासाठी धावले. पण तोपर्यंत तो अतिरेकी धक्क्यातून सावरला होता व एके-४७ हातांत ठेवून पवित्रा घेऊन बसला होता.


केवळ दीड मीटरवर अतिरेकी हल्ल्याच्या तयारीत असल्याचे पाहून कुरणकर यांनी कमांडिंग ऑफिसरला बाजूला ढकलले व ते स्वत:च्या जिवाची पर्वा न करता त्या अतिरेक्यावर धावून गेले. अतिरेक्याच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळ्या त्यांच्या छातीत व डोक्यात घुसल्या व गंभीर जखमी होऊन ते खाली कोसळले. या जखमांमुळे त्यांचा नंतर मृत्यू झाला.

कुरणकर यांनी अतिरेक्यांशी लढताना अद्वितीय पराक्रम गाजवला आणि देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले. या कामगिरीबद्दल त्यांना दि. २६ जानेवारी १९९० रोजी मरणोत्तर ‘वीरचक्र’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

✻ ✻ ✻

# ख





## खोत, गौतम शशिकुमार

**वायुसेना - लेफ्टनंट कर्नल**
**वीरचक्र**
**१९ ऑक्टोबर १९६७**

'ऑपरेशन विजय' यशस्वी करणाऱ्या वीरांमध्ये लेफ्टनंट कर्नल गौतम शशिकुमार खोत यांचे नाव अग्रणी आहे. गौतम खोत यांचा जन्म पुणे येथे झाला. मुंबईच्या 'आयईएस' इंग्लिश मीडियम शाळेत शालेय, तर रामनारायण रुइया महाविद्यालयात त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. त्यानंतर पुण्यातील खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत खोत यांनी शिक्षण घेतले.

दि. ११ जून १९८८ रोजी ते हवाई दलात दाखल झाले. दि. ५ जुलै १९९९ हा त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा दिवस ठरला. या दिवशी 'ऑपरेशन विजय'मध्ये ते सहभागी झाले. या मोहिमेत त्यांनी सुमारे ७० तास हेलिकॉप्टर चालवत आपल्या सहकाऱ्यांना इच्छित स्थळी पोहोचवण्याची कामगिरी बजावली. त्या वेळी खराब हवामान आणि अति उंचीचीही त्यांनी तमा बाळगली नाही.

शत्रूकडून जोरदार बॉम्बफेक होत असताना सीमेवर लढणाऱ्या जवानांना शस्त्रास्त्र आणि दारूगोळा पोहोचविण्यासाठी त्यांनी प्राणांची बाजी लावली. लढणाऱ्या जवानांचे मनोधैर्य वाढवण्याचे काम त्यांनी केले.

दि. १९ जून १९९९ रोजी 'तोलोलिंग टॉप' येथील सैनिकांना आवश्यक ती साधनसामग्री पोहोचविण्याचे कठीण काम त्यांच्यावर सोपवण्यात आले होते. शत्रूकडून जोरदार बॉम्बफेक होत होती. आसपासच्या भागात थेट गोळीबाराचा आवाज येत होता. या स्थितीत त्यांनी १४ हजार ५०० फूट उंचीवर हेलिकॉप्टर चालवत आणि केवळ २२ मीटरच्या हेलिपॅडवर सुरक्षितपणे हेलिकॉप्टर उतरविण्याची कामगिरी बजावली.

बकारवाल येथे सामग्री पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. त्यानंतर मश्कोव्ह येथून चार जवानांना सुरक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी त्यांनी प्राणांची बाजी लावली.


मश्कोव्ह खोऱ्यात मोहीम पुढे नेण्यासाठी दि. ९ जुलै रोजी त्यांनी शत्रूच्या गोळीबाराचा मारा चुकवत हेलिकॉप्टरमधून दारूगोळा सैनिकांपर्यंत नेण्याची

जबाबदारी पार पाडली. ही धोकादायक मोहीम पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपली सर्व कौशल्ये यशस्विरीत्या वापरली आणि दोन सैनिकांचे प्राण वाचवले. आपल्या सहकाऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी त्यांनी स्वत:च्या प्राणांची पर्वा केली नाही. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत दि. २६ जानेवारी २००० या दिवशी त्यांना ‘वीरचक्र’ देऊन गौरविण्यात आले.

* * *

# ग

ग



## गणपती, नंदेपांडा अप्पाचू
**वायुसेना-स्क्वॉड्रन लीडर**
**वीरचक्र**
**२६ जानेवारी १९४३**

नंदेपांडा अप्पाचू गणपती यांचा जन्म महाराष्ट्रातील सोमरपेट येथे झाला. आता ते कर्नाटकात बंगळुरू येथे स्थायिक झाले आहेत. लेफ्टनंट कर्नल एम.ए. गणपती हे त्यांचे वडील होते. दि. १६ मे १९६५ रोजी ते वायुसेनेत दाखल झाले.

दि. २२ नोव्हेंबर १९७१ रोजी २ वाजून ५० मिनिटांनी भारताच्या हद्दीत घुसलेल्या चार पाकिस्तानी विमानांना पाडण्याचे आदेश त्यांना मिळाले. त्या वेळी एन.ए. गणपती चार नॅट विमानांच्या तुकडींपैकी क्रमांक तीनच्या विमानाचे चालन करत होते.

गणपती यांनी आपल्या युद्धकौशल्याचा पुरेपूर उपयोग करत शत्रूच्या एका सेबर जेटला जमीनदोस्त केले. त्यांच्या या कर्तृत्वामुळे त्यांना दि.२२ नोव्हेंबर १९७१ रोजी ‘वीरचक्र’ देऊन गौरविण्यात आले.



## गम्रे, अमृत नामा
**भूसेना - सुभेदार**
**वीरचक्र**
**१ मार्च १९२१**

अमृत नामा गम्रे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील बोरसूड या गावी झाला. दि. १ मार्च १९४० रोजी लष्करी नोकरीत प्रवेश केल्यावर महार फलटणीमध्ये त्यांची हवालदार या पदावर नियुक्ती करण्यात आली.

दि. २ नोव्हेंबर १९४८ रोजी झोजिला पास येथील माचोई तळावर हल्ला करण्याऱ्या आक्रमक तुकडीमधील मशीनगन चालवणाऱ्या तुकडीचे नेतृत्व हवालदार गम्रे यांच्याकडे होते. आक्रमक तुकडीला त्रासदायक ठरणाऱ्या शत्रूच्या स्वयंचलित मोर्चाला नष्ट करण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले होते. त्यांनी शत्रूला इतक्या कुशलतेने गुंतवून ठेवले, की आक्रमक तुकडीला आपल्या लक्ष्याच्या दिशेने पुढे सरकणे सहजसाध्य होऊन गेले. या चकमकीदरम्यान हवालदार गम्रे यांना स्वत: जोरदार गोळीबाराचा सामना करावा लागला; परंतु

अशा अवघड परिस्थितीतही ते डगमगले नाहीत. १४ नोव्हेंबर या दिवशी पिनद्रास येथील ब्राउन हिलवरील हल्ल्यात हवालदार गम्रे यांनी अशीच कामगिरी पार पाडली. या युद्धादरम्यान शत्रूचा सामना करताना अमृत नामा गम्रे यांनी दाखवलेल्या अतुलनीय शौर्याबद्दल दि. १५ नोव्हेंबर १९४८ रोजी त्यांना 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.

ग




**गरुड, गोपाळ कृष्ण**
**वायुसेना - एअर कमोडोर**
**वीरचक्र**
**५ जानेवारी १९३८**

गोपाळ कृष्ण गरुड यांचा जन्म पुणे येथे झाला. अहमदनगर महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी खडकवासला, पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) मध्ये सैनिकी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. दि. १९ डिसेंबर १९६१ रोजी त्यांची वायुसेनेत नियुक्ती करण्यात आली.

सप्टेंबर १९६५ मध्ये फ्लाइट लेफ्टनंट गोपाळ गरुड शत्रूच्या भूभागाची टेहळणी करणाऱ्या विमानांच्या तुकडीत चालक म्हणून काम करत होते. हे टेहळणीचे काम अतिशय धोकादायक असते कारण, हे काम भरदिवसा, आणि कोणत्याही संरक्षणाशिवाय केले जाते.

पाकिस्तानबरोबरच्या युद्धांमध्ये त्यांनी नेहमीच अत्यंत जोखमीची कामगिरी स्वीकारून शत्रूची अत्यंत महत्त्वाची माहिती मिळवून आणली. या माहितीच्या आधारेच अनेक योजना आखणे व त्या यशस्विरीत्या पूर्ण करणे शक्य झाले.

आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये त्यांनी उच्चतम धैर्याचे व कार्यकुशलतेचे उदाहरण समोर उभे केले. या कार्याबद्दल त्यांना दि. २२ सप्टेंबर १९६५ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.



**गायकवाड, तात्याबा**
**भूसेना - नाईक**
**वीरचक्र**

जम्मू-काश्मीरच्या १९४७-१९४८च्या युद्धात दि. ३ मार्च १९४८ रोजी शत्रूशी लढत असताना मेजर चोप्रा यांना शत्रूच्या गोळीबारामध्ये वीरमरण प्राप्त झाले. त्या वेळी शत्रूच्या ताब्यात असलेल्या जागेवरून त्यांचे शव आणण्यासाठी नाईक तात्याबा गायकवाड यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यांच्याबरोबर त्यांचे सहकारी होते.

अतिशय धोकादायक परिसरातून सरपटत जाऊन, शत्रूच्या गोळीबाराला चुकवत तात्याबा गायकवाडांनी मेजर चोप्रांचे शव ताब्यात घेतले. पण तेवढ्यात

शत्रूची गोळी तात्याबांचे सहकारी शिपाई गुदेकर यांना लागली व ते जखमी झाले. अशा बिकट प्रसंगात प्रसंगावधान राखून व थंड डोक्याने तात्याबांनी मेजर चोप्रांचे शव आणि जखमी शिपाई गुदेकर यांना सुरक्षित जागेत आणले; परंतु तेथे पोहोचण्यापूर्वीच गुदेकर यांचा मृत्यू झाला होता.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये नाईक गायकवाड आपले दुसरे सहकारी शिपाई सुधीर चाळके यांच्या मदतीने दोन्ही शहीद जवानांचे मृतदेह शत्रूच्या गोळीबाराला सामोरे जाऊन कंपनी क्षेत्रामध्ये घेऊन आले. या बहादुरीबद्दल नाईक तात्याबा गायकवाड यांना 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.

ग



**गुरव, कृष्णा एकनाथ**
**भूसेना - नायब सुभेदार**
**वीरचक्र**
**१२ मे १९३४**

कृष्णा एकनाथ गुरव यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कवठे-एकंद या गावी झाला. दि. ६ फेब्रुवारी १९५७ रोजी त्यांनी सैन्यदलात प्रवेश केला व मराठा लाईट इन्फन्ट्रीमध्ये हवालदार म्हणून सेवा करण्यास सुरुवात केली.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धात त्यांच्याकडे मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या मध्यम पल्ल्याच्या मशीनगन तुकडीचा अधिकारी म्हणून जबाबदारी होती. पूर्व भागात शत्रूला रोखण्यासाठी त्यांनी रस्त्यात एक अडथळा उभा केला होता. दि. १० डिसेंबर १९७१ रोजी शत्रुसैन्याने मोठ्या संख्येने व ताकदीने या मोर्चावर हल्ला केला. हवालदार गुरव यांनी निकराचा व अचूक मारा करत हा हल्ला परतवून लावला.

यानंतर शत्रुसैन्याने नवीन व्यूहरचनेत एकत्र जमून मशीनगन नसलेल्या बाजूने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. हवालदार गुरव यांनी स्वत:च्या जिवाची अजिबात पर्वा न करता आपल्या मशिनगनचा मोर्चा वळवून उघड्या बाजूवर आणला व शत्रूचा हा डावही हाणून पाडला. या प्रयत्नात शत्रूचे ७७ जवान मृत्युमुखी पडले.

याच चकमकीदरम्यान हवालदार कृष्णा गुरव यांनी असामान्य धैर्य, निष्ठा व कौशल्याचे दर्शन घडवले. याचसाठी त्यांना दि. ११ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.

* * *

घ





**घोडेस्वार, दादाराव रामराव**
**भूसेना - सुभेदार मेजर आणि मानद कॅप्टन**
**वीरचक्र**
**३० जानेवारी १९३३**

दादाराव रामराव घोडेस्वार यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार या ठिकाणी झाला. दि. ३० जानेवारी १९५० रोजी ते सैन्यात भरती झाले.


१९७१ च्या लढाईत, दि. १२ डिसेंबर रोजी पाकिस्तानने राजस्थान भागावर हल्ला चढविला. त्या वेळी सुभेदार दादाराव घोडेस्वार महार रेजिमेन्टच्या तुकडीचे नेतृत्व करीत होते. त्या परिसरात सहाशे मीटरचे सुरुंग क्षेत्र होते. त्याची पर्वा न करता घोडेस्वार यांच्या तुकडीचा शत्रूशी समोरासमोर सामना झाला. शत्रूशी हातघाईची लढाई करत त्यांनी चौकी ताब्यात घेतली. शत्रूनेही पुन्हा चौकीवर ताबा मिळविण्यासाठी समोरून हल्ला केला. सुभेदार घोडेस्वार यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून शत्रूवर हल्ला चढवीत त्यांना पळवून लावले.

या युद्धादरम्यान त्यांनी आपल्या धैर्याचे, वीरतेचे, नेतृत्वगुणांचे दर्शन घडविले. त्यांच्या या शौर्यामुळे त्यांना दि. १२ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्रा'ने सन्मानित करण्यात आले.

* * *

# च





## चंदावरकर, प्रकाश सत्येंद्र
**नौसेना - लेफ्टनंट कमांडर**
**वीरचक्र**
**६ नोव्हेंबर १९५५**

प्रकाश सत्येंद्र चंदावरकर यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबईच्याच प्रसिद्ध सेंट ॲण्ड्र्यू विद्यालयामध्ये झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर चंदावरकर दि. १ जुलै १९७८ रोजी भारतीय नौसेनेत रूजू झाले.

लिबरेशन टायगर ऑफ तामीळ ईलम (एलटीटीई) च्या दशहतवाद्यांविरुद्ध लढा देण्यासाठी भारतीय सैन्य १९८७ मध्ये श्रीलंकेत गेले होते. त्या वेळी दि. १६ नोव्हेंबर १९८७ रोजी या ऑपरेशन पलटणीत चंदावरकर सहभागी झाले. त्याच दिवशी जाफना बेटाजवळ एलटीटीईचे दहशतवादी मोठ्या प्रमाणावर संघटित होत असल्याची माहिती गुप्तचरांनी दिली. या दहशतवाद्यांचा तळ उद्‌ध्वस्त करणे हे अत्यावश्यक काम होते. कारण, या तळावरून दहशतवाद्यांना शस्त्रे व दारूगोळा पुरविण्यात येत असे. या तळाभोवती दहशतवाद्यांनी मोठ्या प्रमाणावर स्फोटके पेरली होती. त्यामुळे या भागात कारवाईसाठी प्रवेश करणेदेखील अतिशय जोखमीचे होते.

१७ नोव्हेंबरच्या भल्या पहाटे, चारच्या सुमारास काळोखात, नौदलाच्या जहाजावरून चंदावरकर छोट्या बोटीतून गस्तीसाठी खोल समुद्रात उतरले. याच वेळी त्यांना एलटीटीईच्या दहशतवाद्यांच्या स्पीड बोटीचा सामना करावा लागला. या वेळी जोरदार धुमश्चक्री झाली.

बोट बुडत असताना एलटीटीईचे चार दहशतवादी समुद्रात काहीतरी वस्तू बुडवत असल्याचे चंदावरकर यांच्या चाणाक्ष नजरेने टिपले. या दहशतवाद्यांना पकडल्यानंतर चंदावरकर यांनी थेट खोल समुद्रातच सूर मारला. या वेळी त्यांना खोल समुद्रात दहशतवाद्यांनी सोडलेला एक मोठा पेटारा सापडला. यामध्ये दहशतवाद्यांनी मोठ्या प्रमाणावर स्फोटके व डिटोनेटर्स लपविलेली होती.

चंदावरकर यांनी स्फोटकांचा पेटारा तब्बल दोन दिवस समुद्राखाली ठेवला. त्यानंतर सुरक्षित ठिकाणी नेऊन त्यातील स्फोटके निकामी केली. यामुळे दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी जोंना किनारपट्टी, तसेच खाडी मोकळी झाली.

जिवावर उदार होऊन बजावलेल्या या कामगिरीबद्दल लेफ्टनंट कमांडर प्रकाश चंदावरकर यांना दि. १४ एप्रिल १९८८ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.




**चव्हाण, अंकुश महादेव**
**भूसेना – सुभेदार**
**वीरचक्र**
**४ नोव्हेंबर १९४०**

अंकुश महादेव चव्हाण यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील नरडवे या छोट्याशा गावात झाला. दि. ४ नोव्हेंबर १९६२ रोजी त्यांनी सैन्यदलात प्रवेश केला. एकोणिसाव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीत त्यांची नेमणूक झाली.

१९७१ च्या बांगलादेश युद्धात एका चकमकीत नाईक अंकुश चव्हाण यांच्यावर त्यांच्या तुकडीच्या डाव्या बगलेकडील फळीचे नेतृत्व करण्याची जबाबदारी होती. या चकमकीदरम्यान त्यांच्या तुकडीतील हलकी मशीनगन चालवणारे दोन्ही जवान गंभीर जखमी झाले. अशा प्रसंगी चव्हाण यांनी स्वयंचलित मशीनगन ताब्यात घेतली व लक्ष्य पूर्ण करेपर्यंत मारा चालू ठेवला. चकमकीच्या दुसऱ्या दिवशीही त्यांच्या माऱ्याने शत्रूचे अतोनात नुकसान झाले.

या युद्धादरम्यान चव्हाण यांनी दाखवलेल्या उच्चतम शौर्य, निष्ठा आणि जिद्द या गुणांसाठी दि. १३ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



**चोप्रा, मनमोहन चेतराम**
**भूसेना – मेजर**
**वीरचक्र**
**२० मार्च १९२६**

मनमोहन चेतराम चोप्रा यांचा जन्म जम्मू आणि काश्मीर राज्यातील जम्मू तावी येथे झाला. त्यांचे वडील चेतराम चोप्रा हे पुढे पुण्यास येऊन स्थायिक झाले.

दि. २१ डिसेंबर १९४७ पासून त्यांनी भूसेनेतील सातव्या लाइट कॅव्हॅलरीमध्ये सेवेस सुरुवात केली.


दि. १९ सप्टेंबर १९६५ रोजी छाथनवालावर हल्ला करणाऱ्या तुकडीमध्ये त्यांचा समावेश होता. त्यांच्या तुकडीने तोफखान्याच्या मदतीने छाथनवालावर हल्ला चढवला. त्या वेळी आपले काही रणगाडे, ज्यांमध्ये मेजर मनमोहन चोप्रांच्या रणगाड्याचा समावेश होता, एका फसव्या भूभागात अडकून पडले होते. शत्रूने संधीचा फायदा घेत या रणगाड्यांवर तोफखान्याच्या साहाय्याने जोरदार हल्ला

चढवला. मेजर चोप्रा यांनी न डगमगता आपली बाजू धरून ठेवली व तीन रणगाड्यांना बाहेर काढण्यात यश मिळवले. हे करत असताना शत्रूच्या एका तोफगोळ्याने त्यांच्या रणगाड्याचा वेध घेतला आणि ते स्वत: गंभीर जखमी झाले. या जखमांमुळेच नंतर त्यांन वीरमरण प्राप्त झाले.

मेजर मनमोहन चोप्रा यांनी धाडस, निष्ठा आणि जिद्दीचे सर्वोच्च प्रदर्शन घडविले. या कामगिरीबद्दल त्यांना दि. १९ सप्टेंबर १९६५ रोजी ‘वीरचक्र’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

* * *

# ज



## जगदाळे, किसन रामराव

**भूसेना - हवालदार**

**वीरचक्र**

**१४ ऑक्टोबर १९४८**

किसन रामराव जगदाळे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील पेडगाव येथे झाला. वयाच्या सतराव्या वर्षी, दि. १४ ऑक्टोबर १९६५ रोजी ते सेनादलात रुजू झाले.

१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या एका तुकडीत ते शिपाई म्हणून कार्यरत होते. पूर्व भागातील शत्रूचे एक ठाणे जिंकण्याची जबाबदारी त्यांच्या तुकडीवर सोपवण्यात आली होती. या तुकडीने त्या ठाण्यावर चढाई केली. पण शत्रूच्या मशीनगन्स आणि तोफांच्या माऱ्यांपुढे त्यांच्या तुकडीचे प्रयत्न असफल होत होते. ही परिस्थिती पाहून स्वत:च्या जिवाची पर्वा न करता जगदाळे पुढे सरसावले. रांगत-रांगत ते शत्रूच्या ठाण्याच्या रोखाने निघाले. शत्रूच्या खंदकाजवळ येताच त्यांनी हातबॉम्ब फेकून पहिली मशीनगन बंद पाडली. तसेच रांगत पुढे जात त्यांनी शत्रूच्या धडाडणाऱ्या तोफा नि कडाडणाऱ्या मशीनगन्स निकामी केल्या. त्यांच्या या धाडसी कामगिरीबद्दल त्यांना ‘वीरचक्र’ देण्यात आले.





## जठार, मधुकर शांताराम

**वायुसेना - विंग कमांडर**

**वीरचक्र**

**११ एप्रिल १९३४**

मधुकर शांताराम जठार यांचा जन्म पुण्यात झाला. दि. ६ नोव्हेंबर १९५४ रोजी त्यांना वायुसेनेत नियुक्ती मिळाली. १९६५ च्या भारत-पाक युद्धात ते एका लढाऊ स्क्वॉड्रनचे कमांडर होते. त्या स्क्वॉड्रनने चौदा लढाऊ उड्डाणे केली.

दि. ७ सप्टेंबर १९६५ रोजी भिगरनवाला हवाई तळावर हल्ला करण्याकरिता त्यांनी आठ विमानांची व्यूहरचना करून हल्ला केला. या हल्ल्यात शत्रूचे एक सेबरजेट नष्ट करून दुसरे विमान निकामी केले गेले. यशस्वी हल्ले करून त्यांनी आपले स्क्वॉड्रन परत आणले. या कामगिरीसाठी त्यांना दि. ७ सप्टेंबर १९६५ रोजी ‘वीरचक्र’ प्रदान केले गेले. ते पुढे विंग कमांडर पदापर्यंत पोहोचले.



## जवळगे, उत्तम भानुदास

**वायुसेना - सुभेदार मेजर, ऑनररी कॅप्टन**

**वीरचक्र**

**५ एप्रिल १९४३**

उत्तम भानुदास जवळगे यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील मंगरुळ या गावी झाला. १९ डिसेंबर १९६२ रोजी हवाई दलात प्रवेश केल्यावर पाचशे एकाव्या हवाई संरक्षण तुकडीमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धात छांब विभागातील पायदळ मुख्यालयाच्या संरक्षणासाठी तैनात केलेल्या हवाई संरक्षण यंत्रणेवर त्यांची नियुक्ती करण्यात आली.

८ डिसेंबर १९७१ रोजी हवालदार उत्तम जवळगे यांनी अचूक मारा करून मुख्यालयावर हल्ला करणाऱ्या चारांपैकी एक पाकिस्तानी सेबर जेट विमान पाडण्यात यश मिळवले.

त्यांच्या या उच्चतम धाडस व कार्य कौशल्याबद्दल ८ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.





## जाधव, अर्जुन राघव

**भूसेना - सुभेदार आणि मानद लेफ्टनंट**

**वीरचक्र**

**१ जुलै १९३८**

अर्जुन राघव जाधव यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील धामणदेवी या छोट्याशा गावात झाला. त्यांना लहानपणापासून सैनिकी पेशाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी सैन्यभरतीत आपले नाव नोंदविले.

आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करत १९७१ पर्यंत जाधव नारब सुभेदाराच्या पदावर पोहोचले. याच साली पाकिस्तान युद्धाच्या वेळी आघाडीवरील पूर्व विभागातील एका प्लॅटूनचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. शत्रूच्या ताब्यातील पूल जिंकून घेतल्यावर प्लॅटूनची पुनर्रचना करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांना ठाण्याच्या जागी खंदक खोदायचा होता. पण त्याआधीच शत्रूने सैन्याची जमवाजमव करून पुन्हा हल्ला चढविला.

शत्रूकडे तोफा आणि मध्यम आकाराच्या मशीनगन्स होत्या. त्यांच्या तुलनेत जाधवांकडील सैन्यबळ अगदीच तोकडे होते. परंतु जाधव डगमगले नाहीत. त्यांनी आपल्या सेनेला धीर दिला व निकराचा हल्ला चढविला. त्यामुळे शत्रूला माघार घ्यावी लागली; पण शत्रूने लगेच पुन्हा हल्ला केला.

या वेळच्या चकमकीत जाधवांच्या सेनेतील एक जवान जबर जखमी होऊन रणभूमीवर कोसळला. ते पाहताच जाधवांनी आपल्या प्राणांचीही पर्वा न करता

त्याच्याकडे धाव घेतली. त्या सैनिकाला उचलून त्यांनी ताबडतोब सुरक्षित ठिकाणी आणले. अशा निधड्या छातीचा नेता लाभल्यामुळे सैनिकांचा उत्साह दुणावला व त्यांची सरशी झाली.

जाधवांनी केलेल्या भीमपराक्रमाची दखल घेऊन भारत सरकारने दि. ११ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' प्रदान केले. पुढे ते सुभेदार झाले व मानद लेफ्टनंटची पदवीही त्यांना देण्यात आली.



## जाधव, धोंडू गोविंद

**भूसेना - हवालदार**

**वीरचक्र**

**२० नोव्हेंबर १९२०**

ज

धोंडू गोविंद जाधव यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील बामणोली देवरूख या गावी झाला. २० नोव्हेंबर १९४१ रोजी सैन्यदलात प्रवेश करून पहिल्या महार फलटणीमध्ये त्यांनी सेवेस सुरुवात केली.

१९४८च्या पाकिस्तानच्या युद्धादरम्यान पायदळाच्या कुमाऊं फलटणीबरोबर मध्यम पल्ल्याची मशीनगन चालवण्याच्या कामी त्यांची नियुक्ती करण्यात आली.

१४ एप्रिल १९४८ रोजी पुढे सरकणाऱ्या फलटणीवर जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी भागात शत्रूने स्वयंचलित तोफखान्यासह जोरदार हल्ला चढवला. शिपाई धोंडू जाधव यांनी मोठ्या कल्पकतेने एका टेकडीवर मोर्चा धरून शत्रूवर गोळीबार करण्यास प्रारंभ केला. या सर्व धुमश्चक्रीदरम्यान त्यांचा दुसरा सहकारी गंभीर जखमी झाला. तरीदेखील शिपाई धोंडू जाधव यांनी मोर्चा सांभाळून गोळीबार चालू ठेवला व शत्रूचा हल्ला परतवून लावला.

शिपाई धोंडू जाधव यांनी जे असामान्य निष्ठा आणि संयमित धैर्याचे प्रदर्शन घडवले, त्याबद्दल त्यांना १५ नोव्हेंबर १९४८ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.



## जामसजी, परवेझ रुस्तम

**वायुसेना - स्क्वॉड्रन लीडर**

**वीरचक्र**

**२३ जून १९४३**

परवेझ रुस्तम जामसजी यांचा जन्म अहमदनगर येथे झाला. देवळाली येथील बार्न्स विद्यालय, तसेच पुण्यातील मॉडेल विद्यालयात त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. पुण्यातील नेस वाडिया महाविद्यालयातून त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण केले. दि. १६ ऑक्टोबर १९६५ रोजी त्यांनी वायुसेनेत प्रवेश केला. १९७१ मधल्या पाकिस्तानविरुद्धच्या कारवाईत ते हेलिकॉप्टरच्या ताफ्यात कार्यरत होते. फ्लाइट

लेफ्टनंट जामसजी ज्या हेलिकॉप्टरचे चालक होते, त्यावर शत्रूकडून दोन वेळा हल्ला झाला. मशीनगन्स आणि तोफांच्या माऱ्यातूनही आपले विमान वाचवून त्यांनी सोपवलेली कामगिरी पूर्ण केली आणि हेलिकॉप्टर सुखरूपपणे तळावर आणले.

अशाच एका कारवाईत त्यांच्या हेलिकॉप्टरचे इंजीन शत्रूच्या हद्दीतच बंद पडले. तरीही मोठ्या कौशल्याने ते हेलिकॉप्टर त्यांनी सुरक्षितपणे परत आपल्या हद्दीत आणले. या त्यांच्या कार्याबद्दल त्यांना दि. १६ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले. पुढे 'स्कॉड्रन लीडर' या पदावरही त्यांना बढती मिळाली.



ज

**जुन्नरकर, नितीन गजानन**
**वायुसेना - फ्लाईट लेफ्टनंट**
**वीरचक्र**
**जन्म-मृत्यु दिनांक अनुपलब्ध**

पाकिस्तानविरूद्धच्या डिसेंबर १९७१ मधील युद्धात फ्लाईट लेफ्टनंट नितीन जुन्नरकर यांनी आपल्या शौर्याचे दर्शन घडविले. शत्रूच्या ठिकाणांची अचूक माहिती भारतीय सैन्याला मिळणे आवश्यक होते अशावेळी जुन्नरकर यांनी आपले प्राण संकटात टाकून विमानाने शत्रूच्या ठिकाणांची पाहणी केली. त्यांनी शत्रूच्या ठाण्यांची अनेक छायाचित्रे आणली.

त्यांनी आणलेल्या माहिती आणि छायाचित्रांमुळे भारतीय सैन्याला शत्रूवर विजय मिळविणे अधिक सोपे गेले. त्यांचे हे योगदान महत्त्वाचे होते.

फ्लाईट लेफ्टनंट नितीन जुन्नरकर यांनी धैर्य, कौशल्य आणि देशसेवेचे दर्शन घडविले.

* * *

# ट





**टकले, मनोहर माधव**
**वायुसेना – एअर कमांडर**
**वीरचक्र**
**११ एप्रिल १९३२**

मनोहर माधव टकले यांचा जन्म पुण्यात झाला. दि. १० जुलै १९५० रोजी ते भारतीय वायुसेनेत दाखल झाले.


मनोहर टकले हे भारतीय हवाई दलात स्क्वॉड्रन लीडर या पदावर कार्यरत होते. कटांगमधील शत्रूच्या हवाई हालचाली, हवाईतळ यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे कार्य 'कॅनबेरा' या लढाऊ विमानाद्वारे करण्याची कामगिरी टकले यांच्यावर सोपवण्यात आली.

या कामात अनेक वेळा त्यांच्या लढाऊ विमानावर शत्रूने हल्ला केला. विमानावर करण्यात आलेल्या गोळीबारातील एका गोळीने टकले जखमी झाले. परंतु, तशाही अवस्थेत त्यांनी आपल्या लक्ष्याचा पाठलाग करून शत्रूच्या हवाईतळांचा संपूर्ण बीमोड करण्याचे महत्त्वाचे काम केले. कामगिरी पार पाडून परतीच्या प्रवासाला निघाल्यानंतरच त्यांनी स्वत:वर ओढवलेल्या बिकट प्रसंगाची कल्पना आपल्या वरिष्ठांना दिली.

अत्यंत निष्ठेने आणि शौर्याने आपली कामगिरी पार पाडणाऱ्या मनोहर टकले यांच्या शौर्याचा यथोचित गौरव करून त्यांना 'वीरचक्रा'ने सन्मानित करण्यात आले.

* * *

# ठ



## ठाकरे, नारायण पूरमल

**भूसेना – लान्स नाईक**

**वीरचक्र**

**२६ एप्रिल १९२२**

नारायण पूरमल ठाकरे यांचा जन्म खानदेशातील वालखेडे या गावात झाला. २६ एप्रिल १९४२ रोजी लष्करात प्रवेश करून त्यांनी मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या पॅरा बटालियनमध्ये सेवा करण्यास सुरुवात केली.

१९४८च्या पाकिस्तान युद्धामध्ये शिपाई नारायण ठाकरे यांच्या बटालियनला पाकिस्तानच्या एका मोर्चावर पिछाडीवरून हल्ला करण्याचे आदेश मिळाले. शिपाई ठाकरे यांनी त्यांच्या हलक्या मशीनगनने कौशल्याने गोळीबार करून शत्रूच्या काही सैनिकांना ठार केले व शत्रूच्या शस्त्र व दारूगोळ्याच्या साठ्यावर ताबा मिळवला.

त्यांच्या बटालियनने शत्रूच्या त्या मोर्चावरही ताबा मिळवण्यात यश मिळविले. याच युद्धात त्यांनी पॅराशूटद्वारे हवेतून पाकिस्तानच्या विमानतळावर हातगोळे टाकून तो पूर्णपणे उद्‌ध्वस्त केला. त्यात बरेच पाक सैनिक ठार झाले.

स्वत:चा जीव धोक्यात घालून शिपाई नारायण ठाकरे यांनी बजावलेल्या या कामगिरीमुळे आपल्या सैन्याला हा विजय मिळवणे शक्य झाले. या कामगिरीबद्दल शिपाई नारायण ठाकरे यांना ६ फेब्रुवारी १९४८ रोजी ‘वीरचक्र’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

✻ ✻ ✻

# ड



## डाफळे, राजेंद्रसिंह विजयसिंह

**भूसेना–कॅप्टन**

**वीरचक्र**

**३० जून १९४३**


राजेंद्रसिंह डाफळे यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील विजयसिंह डाफळे हेही सैन्यात मेजर या हुद्यावर कार्यरत होते. आपले शिक्षण पूर्ण करून ५ ऑगस्ट १९६७ रोजी राजेंद्रसिंह लष्करात दाखल झाले. त्यांची १ मराठा लाईट इन्फन्ट्री या तुकडीत नेमणूक झाली. आपल्या शौर्यासाठी मराठा लाईट इन्फन्ट्री प्रथमपासूनच प्रसिद्ध होती.

दि. १० डिसेंबर १९७१ च्या रात्री कॅप्टन राजेंद्रसिंह डाफळे यांना आपल्या तुकडीसह पूर्व क्षेत्रात एका ठिकाणी रस्त्यामध्ये अडथळा निर्माण करण्याची कामगिरी सोपविण्यात आली. शत्रू सैन्याने पूर्ण ताकदीने त्या ठिकाणी हल्ला करून तो अडथळा मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु कॅप्टन डाफळे यांच्या समर्थ नेतृत्वाखाली त्यांच्या तुकडीने तो हल्ला परतवून लावला. शिवाय शत्रूची मोठी जीवितहानीही झाली. शत्रूने वेगवेगळ्या दिशेने या तुकडीवर हल्ला करून त्यांना काबिज करण्याचा प्रयत्न केला. परंतु कॅप्टन डाफळे यांनी मोठ्या प्रमाणावर गोळीबार सुरू असतानाही प्रत्येक खंदकात जाऊन आपल्या तुकडीतील जवानांना प्रोत्साहन दिले आणि आपले ठाणे मजबूत ठेवले.

या त्यांच्या निर्धार, शौर्य व नेतृत्व गुणांसाठी त्यांनी वीरचक्र प्रदान करण्यात आले.

* * *

# त




## तेजिंदरसिंग हरबन्ससिंग

**भूसेना – ब्रिगेडियर**

**वीरचक्र**

**१ डिसेंबर १९४८**

तेजिंदर सिंग यांचा जन्म पुणे येथे झाला. फिरोजपूर येथे आर.एस.डी. महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. ते दि. १५ मार्च १९७० या दिवशी '१०४ इंजिनिअर रेजिमेंट'मध्ये दाखल झाले. दि. ९ डिसेंबर १९७१ या दिवशी शक्करगढ परिसरातील सुरुंग क्षेत्राची टेहळणी करण्यासाठी त्यांना प्रमुख नेमण्यात आले. बंदुका आणि तोफखान्यांची तुकडी यांच्या सहाय्याने त्यांनी ही कामगिरी पार पाडून शत्रूची अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती मिळविली. जो मार्ग सुरुंगामुळे खराब झाला होता, तो मार्ग त्यांनी एकट्याने मोकळा करून तो दुरुस्त करण्यास मदत केली. दि. ९ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना वीरचक्र पुरस्कार जाहीर झाला.



## त्रिहोन, मुरलीलाल महेशदास

**वायुसेना – एअर कमोडोर**


**वीरचक्र**

**२३ सप्टेंबर १९३३**

मुरलीलाल महेशदास त्रिहोन यांचा जन्म गुजरातमधील सादुल्लाहपूर येथे झाला. पुण्यातील वाडिया महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर दि. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी ते वायुसेनेत दाखल झाले. १९७१ च्या पाकविरुद्धच्या युद्धात विंग कमांडर मुरलीलाल त्रिहोन यांनी पश्चिम विभागामध्ये लढाऊ बॉम्बफेकी विमानांच्या तुकडीचे नेतृत्व केले. त्यांनी अनेक मोहिमांमध्ये भाग घेऊन शत्रुपक्षाचे अनेक रणगाडे नष्ट केले. त्यांच्या तुकडीने शत्रूच्या प्रदेशाची बारकाईने टेहळणी करून शत्रूसैन्याचे नियोजन, हालचाली यांची निश्चित माहिती आणली. या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे युद्धकाळात मोहिमांचे नियोजन आणि अंमलबजावणीचे काम योग्य प्रकारे झाले. १९७१ च्या संपूर्ण युद्धकाळात विंग कमांडर त्रिहोन यांनी शौर्य गाजवित कौशल्यपूर्ण कामगिरी केली.

* * *

# द



## दडकर, रमेश कुमार

**भूसेना – मेजर**

**वीरचक्र**

**२० ऑगस्ट १९४२ – १९७१**

रमेश कुमार दडकर यांचा जन्म मुंबईतील माटुंगा येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबईतच झाले. दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात (किंग जॉर्ज इंग्लीश स्कूल) दहावीपर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनी रामनारायण रुइया महाविद्यालयात प्रवेश घेतला. ते दि. ११ डिसेंबर १९६२ रोजी भारतीय भूसेनेत दाखल झाले.

१९७१ मध्ये पाकिस्तान युद्धाच्या वेळी ते मराठा लाइट इन्फन्ट्री पथकात मेजर या पदावर होते. त्यांच्या पथकाला पूर्व क्षेत्रात तैनात केले होते. हे पथक शत्रूच्या दिशेने वाटचाल करत होते. त्यांच्या वाटचालीत बाधा यावी म्हणून शत्रूने वाटेत भूसुरुंग पेरून ठेवले होते. त्यांच्या स्फोटात एक कनिष्ठ कमिशन्ड ऑफिसर जखमी झाला. समोरून शत्रूचा गोळीबार सुरूच होता. अशा परिस्थितीत निधडेपणाने दडकर यांनी आपल्या सोबत स्ट्रेचरवाहकांना घेऊन या अधिकाऱ्याच्या मदतीसाठी धाव घेतली.

द

त्या अधिकाऱ्याला स्ट्रेचरवर टाकून तळाकडे आणत असताना शत्रूच्या गोळीबारात एक स्ट्रेचरवाहक गंभीर जखमी झाला. तशाही परिस्थितीत त्यांची सोबत करत मोठ्या धैर्याने दडकर यांनी त्या अधिकाऱ्याला तळाकडे आणण्याचा प्रवास सुरूच ठेवला. परंतु दुर्दैवाने शत्रूच्या मशीनगनने दडकर यांचा अचूक वेध घेतला व त्यात दडकरांना वीरमरण आले.

या कार्यात दडकर यांनी जे धैर्य आणि निर्धाराचे प्रकटीकरण केले, त्यासाठी त्यांचा मरणोत्तर ‘वीरचक्र’ देऊन गौरव करण्यात आला.

## दास्तीदार, प्रद्योत रेवतीरंजन

**वायुसेना – स्क्वॉड्रन लीडर**

**वीरचक्र**

**२६ ऑक्टोबर १९३४**

प्रद्योत रेवतीरंजन दास्तीदार यांचा जन्म मुंबई येथे झाला. ते पश्चिम बंगाल येथील कलकत्ता (कोलकाता) या शहरात स्थायिक झाले होते. आपले शिक्षण



पूर्ण करून दि. २४ डिसेंबर १९५७ रोजी प्रद्योत दास्तीदार हे भारतीर वायुसेनेत फ्लाइट लेफ्टनंट या हुद्द्यावर रुजू झाले.


१९६५ च्या पाकिस्तान युद्धाच्या वेळी पाकिस्तानातील पेशावर येथील विमानतळावर मोठा बंदोबस्त तैनात होता. दि. १५ सप्टेंबर १९६५ या दिवशी फ्लाइट लेफ्टनंट प्रद्योत दास्तीदार यांना लक्ष्यावर मारा करणाऱ्या विमानांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली. त्यांना कडक बंदोबस्तातील पेशावर विमानतळावर मोठा हल्ला करायचा होता.

त्या वेळी आजूबाजूच्या वातावरणामुळे फारसे दिसतही नव्हते. प्रत्यक्ष विमानतळाच्या वर आल्याशिवाय काहीही स्पष्ट होत नव्हते. खालचा भूभाग स्पष्ट बघण्यासाठी त्यांनी प्रकाशझोत टाकल्याबरोबर खालून विमानविरोधी तोफा धडाडू लागल्या. पण खालच्या तोफांना, गोळीबाराला न जुमानता ते तसेच पुढे जात राहिले व मागच्या लढाऊ विमानांना मार्ग दाखविला.

त्या तशा हल्ल्यातच ते परत वळले व जेथे बॉंब टाकायचा होता, ती जागा नीट पाहून त्याची माहिती, त्यांनी आपल्या मागच्या लढाऊ विमानांना दिली. जेव्हा त्या विमानांच्या म्होरक्याला माहिती नीट समजली आहे अशी खात्री झाल्यावरच ते तेथून दूर गेले.

या आणि अशा पुढील सात कामगिऱ्यांमध्ये फ्लाइट लेफ्टनंट प्रद्योत दास्तीदार यांनी शौर्य व कौशल्य दाखविले. या त्यांच्या अतुलनीय कामगिरीसाठी त्यांना ‘वीरचक्र’ बहाल करण्यात आले. नंतर ते स्क्वॉड्रन लीडर या पदापर्यंत पोहोचून निवृत्त झाले.

द



## दिघे, दिलीप कमलाकर
**वायुसेना - ग्रूप कॅप्टन**
**वीरचक्र**
**१ ऑक्टोबर १९४५**


दिलीप कमलाकर दिघे यांचा जन्म मुंबई येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दिलीप दिघे दि. १६ ऑक्टोबर १९६५ रोजी भारतीय वायुसेनेच्या सेवेत रुजू झाले.

१९७१ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या युद्धाच्या वेळी फ्लाइट लेफ्टनंट दिघे यांच्यावर लढाऊ विमानाद्वारे भूसेनेचा मार्ग निर्धोक करण्याची अवघड जबाबदारी सोपविण्यात आली.

त्यांनी लढाऊ विमानातून शत्रूच्या रणगाड्यांवर प्रतिकूल परिस्थितीतही अचूक बॉंबहल्ला केला. यामध्ये पाकिस्तानचे चार रणगाडे उध्वस्त झाले. त्याचबरोबर फ्लाइट लेफ्टनंट दिघे यांनी आपल्या कौशल्याचा पुरेपूर वापर करीत पाकिस्तानची अनेक लढाऊ वाहने, तसेच तोफगोळ्यांची दोन ठाणी उद्ध्वस्त केली. यामुळे शत्रू सैन्याचे कंबरडेच मोडले. तसेच, शत्रूसेनेच्या मानसिक

धैर्यावरही विपरीत परिणाम झाला. यामुळे प्रामुख्याने छांब विभागात पाकिस्तानी सैन्याची अपरिमित हानी झाली.

त्यांच्या या अतुलनीय कामगिरीचा ‘वीरचक्र’ देऊन गौरव करण्यात आला.



## दिवाण, अश्विनीकुमार के.

**भूसेना - मेजर जनरल**

**वीरचक्र**

**२२ ऑगस्ट १९३५**

हिमाचल प्रदेश येथील शिमला या शहरात अश्विनीकुमार के. दिवाण यांचा जन्म झाला. त्यांचे वडील के.एल. दिवाण हे पुढे अहमदनगर येथे स्थायिक झाले. दि. ४ डिसेंबर १९५४ या दिवशी अश्विनीकुमार लष्कराच्या सेवेत दाखल झाले.


भारताच्या उत्तर सीमेकडील चूशूल या क्षेत्रातील गुरुंग हिल या भागात दि. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी चीनने हल्ला केला. चीनने मोठ्या ताकदीनिशी खूप सैन्य व दारूगोळ्यासह पद्धतशीर रितीने या भागावर मोठा हल्ला चढवला.

कॅप्टन अश्विनीकुमार दिवाण हे आपल्या रणगाड्यासह आपल्या पायदळाला शत्रूचा हल्ला परतवण्यासाठी मदत करत होते. ते स्वत: एका उघड्या वाहनात बसून आपल्या रणगाड्यांना मोठा धोका पत्करून पुढे नेत होते. उघड्या वाहनामुळे दृष्यमानता स्पष्ट होती आणि त्यात मोठा धोकाही होता. स्वत:च्या जीवाची कोणतीही फिकीर न बाळगता अश्विनीकुमार यांनी आपल्या रणगाड्यांच्या हल्ल्याचे व गोळीबाराचे संयोजन केले व शत्रूची मोठी जीवितहानी घडवून आणली. त्याशिवाय तोफगोळ्यांचा सतत मारा करून त्यांनी आपल्यापुढे गेलेल्या पायदळातील जवानांना शत्रूच्या तावडीतून सहीसलामत परत येण्यास मदत केली.

कॅप्टन अश्विनीकुमार दिवाण यांच्या विशेष धैर्य व कार्याप्रती निष्ठेसाठी त्यांचा ‘वीरचक्र’ देऊन गौरव करण्यात आला.

अश्विनीकुमार लष्करातून ‘मेजर जनरल’ या पदावरून निवृत्त झाले.

द



## देऊस्कर अरुण लक्ष्मण

**वायुसेना - ग्रूप कॅप्टन**

**वीरचक्र**

**१४ डिसेंबर १९४४**

अरुण लक्ष्मण देऊस्कर यांचा जन्म अकोला येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दि. २५ डिसेंबर १९६४ रोजी ते भारतीय वायुसेनेत दाखल झाले.

१९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात फ्लाइट लेफ्टनंट देऊस्कर भारतीय बॉम्बफेकी विमानाचे चालक (पायलट) होते. शत्रूच्या हद्दीतील हवाई तळांवर

आतवर जाऊन त्यांनी हल्ला केला. त्याच वेळी जमिनीवरून विमानविरोधी गोळीबार होत असतानाही त्यांनी पाकिस्तानची दोन विमाने नष्ट केली. याच हल्ल्यात त्यांनी शत्रूच्या हवाई तळांवर हल्ला करून तेथील साधनसामग्रीही उद्‌ध्वस्त केली.

या हल्ल्यावरून परतत असताना मात्र त्यांना शत्रूच्या विमानहल्ल्याला तोंड द्यावे लागले. या हल्ल्यात त्यांचे विमान अपघातग्रस्त झाले, तरीही सुरक्षितपणे त्यांनी ते विमानतळावर परत आणले.

या युद्धात त्यांनी दाखवलेले धैर्य व उत्तम व्यावसायिक कौशल्य यांबद्दल त्यांना ‘वीरचक्र’ प्रदान करण्यात आले.



## देशपांडे, प्रभाकर शांताराम

**भूसेना – ब्रिगेडिअर**

**वीरचक्र**

**१८ एप्रिल १९२८**

प्रभाकर शांताराम देशपांडे यांचा जन्म मुंबई येथे झाला. पुण्यातील वाडिया महाविद्यालय, तसेच वाराणसीतील बनारस हिंदू विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दि. १२ सप्टेंबर १९४८ रोजी ते सैनिकी सेवेत रुजू झाले.

मेजर प्रभाकर देशपांडे हे आर्टिलरी रेजिमेंटमध्ये तोफखाना कमांडर म्हणून कार्यरत होते. पाकिस्तानी सैन्याने बामेर भागात केलेली घुसखोरी दूर करण्यासाठी युद्धविरामानंतर भारतीर पलटण कार्यरत होती. त्या वेळी या पलटणीला साहाय्य करण्यासाठी ते तोफखान्यावर प्रमुख होते.

दुसऱ्या टप्प्यातील कारवाईच्या वेळी या तुकडीला तोफगोळे आणि मशीनगन्सच्या माऱ्याला सामोरे जावे लागले. त्या वेळी त्यांचा तोफखाना उघड्यावर होता. पण तरीही, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता त्यांनी शत्रूला गुंतवून ठेवले. केवळ त्यामुळेच भारतीय सैन्याच्या तुकडीला सुरक्षित स्थळी पोहोचता आले. दोन वेळा ते जखमी झाले, तरीही युद्धभूमीवरून माघारी येण्यास त्यांनी नकार दिला. त्यांनी दाखविलेले धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि नेतृत्वगुण यांबद्दल त्यांना दि. १० ऑक्टोबर १९६५ रोजी ‘वीरचक्र’ देऊन सन्मानित केले गेले.

## देशपांडे, मनोज मधुकर


**भूसेना – मेजर**

**वीरचक्र**

**१३ जुलै १९७३**

मनोज मधुकर देशपांडे यांचा जन्म कुरुंदवाड येथे झाला. त्यांचे शिक्षण सातारा येथील सैनिकी शाळा व पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एन.डी.ए)

द



येथे झाले. वयाच्या बाविसाव्या वर्षी, दि. १० जून १९९५ या दिवशी आपले शिक्षण संपवून ते सैन्याच्या सेवेत दाखल झाले.

मनोज देशपांडे हे आठव्या जम्मू-काश्मीर लाइट इन्फन्ट्री या तुकडीत मेजर या हुद्द्यावर कार्यरत होते. भारताच्या उत्तर सीमेवरील सिराचीन या जगातील सर्वांत उंच सीमा क्षेत्रावर अत्यंत बर्फाळ प्रदेशात त्यांची नेमणूक झाली होती.

दि. २४ ऑगस्ट २००० रोजी जम्मू-काश्मीर क्षेत्रातील दोडा-पूंछ येथील सीमारेषेवर असलेले आपले ठाणे काबीज करण्याचा शत्रूचा प्रयत्न, मनोज देशपांडे यांनी एका खास कृतिदलाचे नेतृत्व करीत यशस्विरीत्या परतवून लावला. शत्रू या ठाण्यावर हल्ला करणार अशी खात्रीलारक बातमी गुप्तहेरांकडून समजल्यावर सैन्याने लगेच कारवाई केली. मेजर मनोज देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली तेथे पलटण (प्लॅटून) तैनात करण्यात आली; त्यामुळे त्या चौकीतील आधीच्या जवानांना आणखी बळ मिळाले.

शत्रूच्या हल्ल्याआधी करण्यात आलेल्या मोठ्या गोळीबारात व तोफांच्या माऱ्यात प्रत्येक खंदकात जाऊन मनोज देशपांडे यांनी आपल्या जवानांना प्रोत्साहन दिले, तसेच स्वत:ही मोकळ्या खंदकात जाऊन, स्वत: शत्रूशी दोन हात करून आपल्या तुकडीतील जवानांपुढे आदर्श घालून दिला. एक शत्रुसैनिक हातगोळा फेकण्याच्या तयारीत असलेला पाहिल्यावर, त्यांनी स्वत:च्या प्राणांची पर्वा न करता त्या सैनिकाजवळ जाऊन त्याला गोळी घातली.

द

या धीट चढाईने आश्चर्यचकित होऊन शत्रूने माघार घेतली. त्यांचे बारा जवान मारले गेले व कित्येकांना शस्त्रे मागे ठेवून पळ काढावा लागला.

मेजर मनोज देशपांडे यांना त्यांच्या अतुलनीय शौर्याबद्दल ‘वीरचक्र’ प्रदान करण्यात आले.



## देशपांडे, शरच्चंद्र नरेश


**वायुसेना - एअर व्हाइस मार्शल**

**वीरचक्र**

**३० जुलै १९३७**

शरच्चंद्र नरेश देशपांडे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील, वडनेर तालुक्यातील गंगई या छोट्याशा गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण अमरावती येथील श्री समर्थ, तसेच व्हीएमव्ही विद्यालयात झाले. दि. २४ डिसेंबर १९५७ रोजी ते वायुसेनेत दाखल झाले. देशपांडे हे ‘जेट बॉम्बर कॉन्व्हर्जन युनिट’च्या ‘इन्स्ट्रक्टर स्टाफ’मध्ये दिशादर्शक म्हणून कार्यरत होते. १९७१ च्या पाकिस्तान युद्धात बॉम्बर विमानांतून त्यांनी शत्रुप्रदेशातील सात मोहिमांमध्ये भाग घेतला. बॉम्बर विमानांचे प्रमुख चालक म्हणून त्यांनी त्या वेळी महत्त्वाची भूमिका बजावली, तसेच प्रत्येक मोहिमेमध्ये यश मिळवले.

या मोहिमेत त्यांनी अतुलनीय धैर्य, व्यावसायिक कौशल्य आणि कर्तव्यनिष्ठा या तीनही गुणांचे दर्शन घडवले. त्यांचा 'वीरचक्र' देऊन सन्मान करण्यात आला. पुढे त्यांना एअर व्हाइस मार्शल पदापर्यंत बढती मिळाली.



## देशमुख, पांडुरंग तुकाराम


**भूसेना - सुभेदार मेजर, ऑनररी कॅप्टन**
**वीरचक्र**
**६ नोव्हेंबर १९१६**

पांडुरंग तुकाराम देशमुख यांचा जन्म साताऱ्यातील आटपाडी या गावात झाला. दि. ६ नोव्हेंबर १९३५ रोजी ते भूसेनेत दाखल झाले. 'बॉम्बे इंजिनिअर्स ग्रुप' या विभागात ते कार्यरत होते. दि. ३ जुलै १९४८ रोजी त्यांना सर्वोच्च कामगिरीसाठी 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.

* * *

द

# न



## नाईक, बाळकृष्ण रामचंद्र

**भूसेना – ब्रिगेडियर**

**वीरचक्र**

**२१ नोव्हेंबर १९४५**


बाळकृष्ण रामचंद्र नाईक यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे वडील सैन्यात कर्नल या पदावर होते. दि. २ ऑगस्ट १९६४ रोजी बाळकृष्ण नाईक हे भारतीय भूसेनेतील आर्टिलरी रेजिमेंटमध्ये दाखल झाले.

भूसेनेतील तुकडीमध्ये तोफखाना कमांडर असताना त्यांच्यावर पूर्व भागातल्या शत्रूची ठिकाणे काबीज करण्याची मोहीम सोपविण्यात आली होती. ही तुकडी हल्ला करण्याच्या तयारीत असताना शत्रूच्या तोफखाना तुकडीने मशीनगन आणि तोफांच्या साहाय्याने आपल्या तुकडीवर अतिशय जवळून हल्ला केला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली.



स्वत:च्या सुरक्षेची काळजी न करता बाळकृष्ण नाईक पुढे सरसावले. त्यांना दोन मोठी मशीनगन ठाणी सापडली. त्यांनी तोफखान्याच्या साहाय्याने शत्रूवर हल्ला चढविला. त्यामुळे शत्रुसैन्य जखमी झाले. त्यामुळे नाईक यांचे उद्दिष्ट साध्य झाले. त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना शौर्य, व्यावसायिकता आणि कामा प्रती झोकून देण्याची वृत्ती दाखवून दिली.

१९७१ मध्ये बाळकृष्ण नाईक यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## नंबियार, सतीश के.

**भूसेना – लेफ्टनंट जनरल**

**वीरचक्र**


**३० ऑगस्ट १९३६**

सतीश के. नंबियार यांचा जन्म मुंबई येथे झाला. मुंबईच्या सेंट झेवियर महाविद्यालयामधून शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी दि. १५ डिसेंबर १९५७ रोजी भारतीय भूसेनेत प्रवेश करून पहिल्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये सेवेस सुरुवात केली. १९७१ च्या पाकिस्तान युद्धात पूर्व विभागात मराठा लाइट इन्फन्ट्रीने उभारलेल्या एका मोर्चाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. दि. १० डिसेंबर १९७१ रोजी

शत्रूने मोठ्या ताकदीने या मोर्चावर हल्ला चढवला. ह्या हल्ल्याला तोफखाना, उखळी तोफा व मशीनगनच्या जोरदार माऱ्याचे पाठबळ होते.


अशा प्रसंगी मेजर नंबियार यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता मोर्चातील प्रत्येक सैनिकाला प्रतिकारासाठी प्रोत्साहित केले. या धुमश्चक्रीदरम्यान शत्रू अगदी जवळ म्हणजे चाळीस यार्डांच्याही आत येऊन पोहोचला होता. परंतु मेजर नंबियार व त्यांच्या तुकडीने निकराचा प्रतिकार करून हल्ला परतवून लावला. शत्रूने दि. ११ डिसेंबर रोजी फिरून केलेला हल्लासुद्धा परतवून लावण्यात मेजर नंबियार यांनी यश मिळविले.

या धुमश्चक्रीमध्ये मेजर नंबियार यांनी दाखविलेल्या असामान्य धाडस आणि नेतृत्वगुणांबद्दल त्यांना 'वीरचक्र' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुढे लेफ्टनंट जनरल या पदापर्यंत त्यांना बढती मिळाली.



**नाकिल, मारुती हरी**
**भूसेना - नाईक**
**वीरचक्र**
**२५ जून १९४४ - १३ डिसेंबर १९७१**

मारुती हरी नाकिल यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील नारोळी या गावी झाला. दि. २५ जून १९६२ रोजी ते लष्करात दाखल झाले. ते एकोणिसाव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीमध्ये कार्यरत होते. १९७१ च्या पाकिस्तान युद्धात मध्यम पल्ल्याच्या मशीनगन विभागामध्ये ते कमांडर होते. पहिल्या आघाडीच्या सैनिक तुकडीमध्ये ते सैनिक असताना त्यांच्या तुकडीकडून करण्यात आलेल्या तोफखान्याच्या अचूक व तीव्र माऱ्यामुळे त्यांनी शत्रूचा नि:पात केला. त्याच वेळी दुसऱ्या बाजूने मध्यम पल्ल्याच्या तीन मशीनगन्सच्या माऱ्यामुळे शत्रुसैन्य मोठ्या प्रमाणात जखमी झाले. नाकिल यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता त्वरित कारवाई करत शत्रूची मध्यम पल्ल्याची एक मशीनगन निकामी केली. या कारवाईत ते जखमी झाले व धारातीर्थी पडले. नाकिल यांनी दाखवलेले धैर्य व नेतृत्वगुण यांबद्दल त्यांना मरणोत्तर 'वीरचक्रा'ने गौरवण्यात आले.




**नादिरशा, जमशेद दादाभाऊ**
**भूसेना - ब्रिगेडियर**
**वीरचक्र**
**१० फेब्रुवारी १९१४**

जमशेद दादाभाऊ नादिरशा यांचा जन्म तारापूर येथे झाला. दि. २१ जुलै १९४० रोजी ते ६/८ गुरखा रायफल्समध्ये लेफ्टनंट कर्नल म्हणून सेवेत रुजू झाले. त्यांनी ४ ते २२ नोव्हेंबर १९४८ या काळात काश्मीर सीमेवर वेगवेगळ्या

न

लढायांमध्ये धैर्य, साहस आणि नेतृत्व सिद्ध केले. त्याद्वारे त्यांनी त्यांच्या लोकांसमोर एक उत्तम उदाहरण प्रस्तुत केले आणि त्यांचे मनोधैर्य कायम ठेवले.

१९४७-४८ या काळात त्यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## निंबाळकर, सचिन अण्णाराव

**भूसेना - मेजर**

**वीरचक्र**

**१९ जानेवारी १९७६**

सचिन अण्णाराव निंबाळकर यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा येथे झाला. वयाच्या एकविसाव्या वर्षी ते लष्करात दाखल झाले. १८ ग्रेनेडिअर्स ही त्यांची तुकडी होय. त्याआधी त्यांनी सातारा येथील सैनिकी शाळेतून शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढील लष्करी शिक्षण त्यांनी पुण्याकडील खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे पूर्ण केले.

'ऑपरेशन विजय' दरम्यान ३/४ जुलै १९९९ च्या रात्री, द्रास भागातील टायगर हिल टॉप सर करण्यासाठी पूर्वेकडून चढाई करण्याचे आदेश कॅप्टन सचिन निंबाळकर यांना देण्यात आले. त्या वेळेस कॅप्टन सचिन हे डोरा कंपनी या तुकडीत कमांडिंग अधिकारी होते.

ही चढाई करताना विविध मार्गांनी साथीदारांचा मार्ग नवीन होता व त्या बाजूने शत्रूवर हल्ला करणे जवळजवळ अशक्य होते. पण १६,५०० फूट उंचीवर असलेल्या त्या दुर्गम भागात चढाई करताना कॅप्टन निंबाळकर स्वत: पुढे होऊन आपल्या साथीदारांना मार्गदर्शन करत होते.

न

या चढाईत शत्रूच्या तुफान गोळीबाराच्या व तोफगोळ्यांच्या माऱ्याबरोबरच वादळी वाऱ्यालाही त्यांना तोंड द्यावे लागत होते. परंतु त्या तशा हवामानात, अंधाऱ्या रात्री न थांबता सलग १२ तास कॅप्टन सचिन व त्यांचे साथीदार मोठ्या धैर्याने चढाई करत होते.

शत्रूच्या चौकीच्या जवळ आल्यावर त्यांनी एका ठिकाणी तळ करून तेथून पुढे गिर्यारोहणाच्या साहित्याच्या मदतीने कडा चढायला सुरुवात केली. कॅप्टन सचिन निंबाळकर कडा चढून वर गेले.

या बाजूने हल्ला होईल याची अणुमात्रही कल्पना नसल्याने शत्रू बेसावध होता. त्यांनी आपल्या जवानांना त्या शत्रुसैनिकांभोवती कडे करायला सांगितले व स्वयंचलित बंदुकांनी त्यांना रोखून धरले. नंतर संगिनी व सुऱ्यांच्या साहाय्याने एकास एक लढाई सुरू झाली. दिवस उजाडेपर्यंत ही लढाई सुरू राहिली व उजेड झाल्यावर शत्रूला एकंदर परिस्थितीची कल्पना येऊन त्याने तेथून पळ काढायचा प्रयत्न केला.


पण कॅप्टन सचिन यांनी पळण्यासाठी कोणताच मार्ग मोकळा ठेवला नव्हता. शत्रूचे बारा सैनिक मारले गेले व या चकमकीत बरीच शस्त्रास्त्रे व दारूगोळा हस्तगत करण्यात आला.

शौर्य, धैर्य व कल्पक सक्रिय नेतृत्व यांचे अतुलनीय प्रदर्शन करीत कॅप्टन सचिन निंबाळकर यांनी टायगर हिल काबीज करण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल त्यांना ‘वीरचक्र’ प्रदान करण्यात आले. आता ते ‘मेजर’ या हुद्द्यावर कार्यरत आहेत.

✻ ✻ ✻

न

# प



## पत्रे, प्रभाकर बायाजी

**भूसेना – शिपाई**

**वीरचक्र**

**१ जून १९६७**

प्रभाकर बायाजी पत्रे यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील वाघदरी येथे झाला. वाघदरी येथील विद्यावर्धक शेळके प्रशाला येथे आपले शिक्षण पूर्ण करून २१ जुलै १९८६ या दिवशी प्रभाकर पत्रे लष्कराच्या ‘आठव्या महार’ तुकडीत दाखल झाले. भारतीय शांतिसेनेचे सैनिक म्हणून प्रभाकर पत्रे यांची नेमणूक श्रीलंका येथे झाली होती. १६ ऑक्टोबर १९८७ रोजी लष्कराच्या दुसऱ्या एका तुकडीला शस्त्रसाठा देण्याचे जोखमीचे काम शिपाई पत्रे यांनी आपणहून मागून घेतले. शस्त्रसाठा घेऊन जाणारे पथक हे ‘आत्मबलिदान’ पथक होते. या कामगिरीवर जाताना दहशतवाद्यांकडून वारंवार हल्ले होत होते. परंतु कोणतीही भीती न बाळगता शिपाई प्रभाकर पत्रे आपल्या कामगिरीवर अटळ होते.

या दरम्यान ते जखमी झाले; पण त्यांनी पुढे जाणे सोडले नाही. मोहिमेच्या ठिकाणी पोहोचल्यावर त्यांना आपल्या सैनिकांना दहशतवाद्यांनी घेराव घातल्याचे आढळले. तो घेराव मोडून काढत, लढत ते पुढे जात होते. शिपाई प्रभाकर पत्रे तो घेराव मोडून काढणारे पहिले शिपाई होते. सर्व बाजूला गोळीबार करीत ते पुढे घुसले. त्यांना छातीवर गोळ्या लागल्या; पण ते तसेच पुढे आपल्या चौकीपर्यंत पोहोचले. त्यांनी घेराव मोडल्यामुळे इतरांना नंतर सहजगतीने चौकीवर पोहोचता आले. परंतु आपले काम फत्ते करून शिपाई प्रभाकर पत्रे यांनी आपला देह ठेवला. या लढाईत दाखविलेल्या असामान्य धैर्यासाठी त्यांना मरणोत्तर ‘वीरचक्रा’ने सन्मानित केले गेले.



## परांजपे, दिवाकर अनंत

**भूसेना – ब्रिगेडियर**

**वीरचक्र**

**६ ऑगस्ट १९४०**

दिवाकर अनंत परांजपे यांचा जन्म सांगली येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम विद्यालयामधून झाले. १९५५ मध्ये



शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतला, त्याचबरोबर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची (एन.डी.ए.) परीक्षाही त्यांनी दिली.

एन.डी.ए.तील शिक्षणानंतर महार रेजिमेंटच्या दुसऱ्या बटालियनमधून त्यांनी कामास सुरुवात केली. १९६५ च्या भारत-पाक युद्धात बावन्नाव्या पलटणीचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. द. सियालकोटमधील मुहादीपूर व चात्नी ही गावे आपल्या ताब्यात घेऊन आपली ठाणी उभी करण्याची कामगिरी या तुकडीने पार पाडली. तत्पूर्वी भल्या पहाटे या तुकडीचे मोर्चेबांधणीचे काम सुरू असताना अचानक शत्रूकडून तोफगोळ्यांचा व बंदुकीतील गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. १९,२० व २१ सप्टेंबर १९६५ हे तीन दिवस सियालकोटमधील फुटबॉल ग्राऊण्डवर दोन्ही सैन्यांची धुमश्चक्री चालली होती. २१ सप्टेंबरच्या रात्री ९ वाजता पाक सैन्याच्या हल्ल्याची तीव्रता खूपच वाढली. ह्यांनी आपल्या प्लॅटून कमांडरला दोन इंची उखळी तोफांचा मारा करण्याची सूचना केली. परंतु शत्रूने केलेल्या बॉम्बहल्ल्यात त्यांचा रेडिओसेट व आर.सी.एल. टेलिफोन लाइन पूर्णपणे निकामी झाल्याने हा हल्ला करणे शक्य झाले नाही.

अशा बिकट परिस्थितीत दुसऱ्या तुकडीकडे निरोप पाठवून ह्यांनी त्यांच्याकडील कुमक मागविली. या तुकडीने केलेल्या अचूक व विनाशक माऱ्यामुळे शत्रूचे अनेक सैनिक जखमी वा मृत झाले आणि त्यांच्याकडील राखीव दारूगोळाही संपुष्टात आला. काही वेळानंतर शत्रूचे सैन्य दोन मोर्चांच्या मध्ये असलेल्या रिकाम्या जागेतून या पलटणीच्या मुख्यालयापर्यंत पोहोचले. या वेळी झालेल्या हल्ल्यात त्यांची जीपही जळून नष्ट झाली. तरीही डगमगून न जाता त्यांनी मुहादीपूरच्या एका टोकास पुन्हा आपल्या जवानांची मोर्चे-बांधणी केली, प्रसंगी तेथील घरांचा आसरा घेऊन शत्रूवर हल्ला चढविला व त्यांच्या ताब्यात गेलेले बंकर पुन्हा आपल्या ताब्यात घेतले.

यानंतर दोन पाकिस्तानी सैनिकी अधिकारी शरणागतीची पांढरी निशाणे घेऊन जीपमधून आले व त्यांनी शरणागती पत्करली. या लढाईनंतर या पलटणीस कालकोट क्षेत्रातील घुसखोरी रोखण्याचे कार्य सोपविले गेले. या युद्धात गाजविलेल्या कामगिरीमुळे त्यांना 'वीरचक्र' हा सन्मान देऊन भूषविण्यात आले.

चतलापूरची पाकिस्तानची सीमाचौकी जिंकून घेण्यासाठी रणनीती म्हणून या बटालियनची विभागणी ए, बी, सी व डी अशा कंपन्यांमध्ये केली गेली. या वेळीदेखील ब्रिगेडियर परांजपे यांच्या नेतृत्वगुणांचा कस लागला. चतलापूरच्या सीमा चौकीच्या टेकडीवर ३०-४० सैनिक तैनात होते. चौकीच्या चारही बाजूंना तारेचे कुंपण व पंजी (अणकुचीदार टोक असणाऱ्या बांबूच्या पट्ट्या) लावल्या होत्या. येथील सैन्य चारही बाजूंस बारकाईने लक्ष ठेवून होते. शत्रुसैन्याचे जेवण घेऊन येणारे ट्रक्स या पलटणीच्या नजरेस पडले. बरोबरच त्यांच्या संरक्षणासाठी

प

खास चिलखती गाड्याही होत्या. शत्रुसैन्याच्या या गाफील अवस्थेचा फायदा उठवत या तुकडीने दोन्ही बगलांनी सीमा चौकीवर तुफान हल्ला चढविला.

हा रुद्र अवतार पाहून पाकिस्तानी सैन्याने एम.एम.जी. सारखी भारी हत्यारे तेथेच टाकून पळ काढला. दुपारचे जेवण घेण्याचीही संधी त्यांना मिळू शकली नाही. अशा रीतीने सिल्हेट जिल्ह्यातील या लढाया ब्रिगेडियर परांजपे यांच्या पलटणीने एका पाठोपाठ जिंकल्या.

या प्लॅटूनला या लढाईत एक महावीरचक्र, तीन वीरचक्र, एक विशिष्ट सेवा मेडल, एक सेना मेडल व तीन मेन्शन्ड इन - डिस्पॅचेस ही शौर्यपदके मिळाली. एक एम.एम.जी, दोन एल.एम.जी, १११ रायफली, ३८ स्टेनगन्स व अगणित दारूगोळाही या पलटणीच्या हाती लागला. या संपूर्ण लढाईत कुठेही तोफखाना किंवा रणगाडे अशी भारी युद्धसामग्री उपयोगात न आणता केवळ भूसेनेच्या तुकडीच्या साहाय्याने विजय संपादन केला. हे या लढाईचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. त्यांना 'पूर्व पाकिस्तान १९७१' हा युद्धकक्ष सन्मान (थिएटर ऑनर) व 'समशेर-नगर १९७१' हा युद्ध सन्मान (बॅटल ऑनर) मिळाला.

ब्रिगेडियर परांजपे यांनी महू कॉलेज ऑफ कॉम्बॅट येथे (आताचे वॉर कॉलेज) प्रशिक्षक म्हणून, सिंकदराबाद येथे एन.सी.सी.चे डायरेक्टर म्हणून, महू येथे ब्रिगेडियर जनरल स्टाफ म्हणून जवानांना नेतृत्वगुणांचे धडे दिले. पुणे येथूनच दि. ३१ ऑगस्ट १९९४ रोजी ते सेवानिवृत्त झाले.



प

## परेरा, लॉरेन्स फ्रेडरिक


**वायुसेना - फ्लाइट लेफ्टनंट**

**वीरचक्र**

**१० जून १९४५ - १४ डिसेंबर १९७१**

मुंबईतील वांद्रे येथे लॉरेन्स फ्रेडरिक परेरा यांचा जन्म झाला. आपले शिक्षण पूर्ण करून वयाच्या एकोणिसाव्या वर्षी, दि. १ ऑगस्ट १९६४ रोजी लॉरेन्स परेरा भारतीय वायुसेनेत फ्लाइट लेफ्टनंट या पदावर रुजू झाले.

१९७१ च्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धात फ्लाइट लेफ्टनंट परेरा यांची नियुक्ती अगदी लढाईच्या अग्रभागी होती. लष्कराच्या तुकडीसोबत हवेतून हल्ल्यांचे नियंत्रण करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यांच्याकडे शत्रूच्या क्षेत्रातील स्थळांवर जवळून हल्ला करण्यासाठी विमानांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी होती. त्यांच्या समर्थ मार्गदर्शनामुळे शत्रूच्या कित्येक ठिकाणांवर यशस्वी हल्ला केला गेला. दि. १४ डिसेंबर या दिवशी शत्रूवर हल्ला करण्याच्या कामगिरीवर असताना शत्रूच्या गोळीबारात सापडून त्यांना वीरमरण आले. फ्लाइट लेफ्टनंट लॉरेन्स परेरा यांनी दाखविलेल्या असामान्य कर्तृत्वासाठी त्यांना मरणोत्तर 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.



## पाटील, सीताराम

**भूसेना - सुभेदार**

**वीरचक्र**

**२६ नोव्हेंबर १९४१-२१ ऑक्टोबर १९८७**

सीताराम पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळी या गावी झाला. दि. २६ नोव्हेंबर १९६२ रोजी ते लष्करात 'अठराव्या गढवाल रायफल्स' या विभागात रुजू झाले.

भारतीय शांतिसेनेचा भाग म्हणून सुभेदार सीताराम पाटील यांची नेमणूक श्रीलंकेत झाली होती. श्रीलंकेत १९८७ या वर्षी सुरू असलेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्याच्या वेळी सुभेदार सीताराम संरक्षणासाठी एका भागात तैनात होते. २० ऑक्टोबर या दिवशी ते व त्यांच्या तुकडीवर दहशतवाद्यांनी रॉकेटचा मारा सुरू केला.

त्या रात्री व दुसऱ्या पूर्ण दिवशी त्यांना व त्यांच्या तुकडीला दहशतवाद्यांच्या जोरदार गोळीबाराला सामोरे जावे लागले. परंतु त्यांच्या तुकडीच्या अधिकाऱ्याच्या प्रोत्साहनामुळे व अतुलनीय धैर्यामुळे सुभेदार सीताराम व इतर जवानांनी शर्थीने आपली जागा सांभाळली व शत्रूला यशस्वी होऊ दिले नाही. याच हल्ल्यादरम्यान सुभेदार सीताराम पाटील यांना गोळी लागून त्यात त्यांचा मृत्यू झाला.

सुभेदार सीताराम पाटील यांनी लष्कराची शौर्याची व निष्ठेची परंपरा राखत स्वत:च्या जिवाचे बलिदान दिले यासाठी त्यांना दि. २६ जानेवारी १९८८ रोजी मरणोत्तर 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.





## पिंगळे, प्रकाश सदाशिव

**वायुसेना - एअर कमोडोर**

**वीरचक्र**

**१२ मार्च १९४१**

प्रकाश सदाशिव पिंगळे यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांना दि. १० नोव्हेंबर १९६२ रोजी वायुसेनेत कमिशन मिळाले.

दि. १६ सप्टेंबर १९६५ रोजी ते दोन विमानांच्या सेक्शनचे नेतृत्व करत होते. पाकिस्तानच्या सेबरजेट एफ-८६ या लढाऊ विमानाचा मुकाबला त्यांचे सेक्शन करत असताना मागून दुसरे सेबरजेट हल्ला करण्याच्या तयारीत असल्याचे त्यांना जाणवले. त्यांनी त्वरित आपले स्थान बदलून अतिशय कौशल्याने हालचाली करून दोन्ही विमाने पाडली. या कामगिरीबद्दल त्या वेळी फ्लाइंग ऑफिसर या पदावर असणाऱ्या पिंगळेंचा 'वीरचक्र' देऊन गौरव करण्यात आला. पुढे त्यांनी 'एअर कमोडोर' हे पद भूषवले.



**पोवार, लक्ष्मण गणपत**
**भूसेना – सॅपर**
**वीरचक्र**
**१६ ऑक्टोबर १९२०**

लक्ष्मण गणपत पोवार १६ ऑक्टोबर १९४१ रोजी लष्कराच्या सेवेत दाखल झाले. ते ङ्बॉम्बे इंजिनिरर्स ग्रुपङ्क या विभागात कार्यरत होते. युद्धाच्या वेळी सैनिकांना लागणारी मदत उदा. रस्ते बांधणे, पूल बांधणे यासारखी प्रत्यक्ष लढण्यासाठी गरजेची असणारी इतर सर्व तांत्रिक मदत करणे हे काम या विभागाकडे असते.

सॅपर लक्ष्मण पोवार व त्यांच्या अन्य सात साथीदारांना २ डिसेंबर १९४८ रोजी पिकेटच्या भोवतीने पेरलेले सुरुंग शोधून काढून टाकण्याची कामगिरी देण्यात आली. त्यामुळे आपल्या सैनिकांच्या तुकडीला आगेकूच करणे सोपे गेले असते. सुरुंग काढताना त्यांच्या साथीदारांपैकी एक जण एका अत्यंत धोकादायक क्षेत्रात अडकला. तो धोका ओळखून स्वत: जिवाची पर्वा न करता आपल्या सहकाऱ्याचा जीव वाचविण्यासाठी ते तातडीने त्या ठिकाणी पोहचले. काही वेळ प्रयत्न करून त्यांनी आपल्या साथीदाराला यशस्वीरित्या बाहेर काढले. पण दुदैवाने ते स्वत:च त्या सुरुंग क्षेत्रात ँसले व सुरुंग स्फोटात त्यांना वीरमरण आले. त्यांना मरणोत्तर वीरचक्र देण्यात आले.

* * *

# फ



## फराटे, राजाराम कोंडिबा

**भूसेना – हवालदार, मानद नारब सुभेदार**
**वीरचक्र**
**८ मे १९२३**

राजाराम फराटे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील पिंपळसुनी या गावी झाला. दि. ८ मे १९४५ रोजी त्यांनी मराठा लाईट इन्फंट्रीच्या तिसऱ्या पलटणीमध्ये शिपाई म्हणून सेवा करण्यास सुरुवात केली.

शिपाई राजाराम फराटे दि. ६ फेब्रुवारी १९४८ रोजी आपल्या पलटणीसोबत एका पाकिस्तानी छावणीवर हल्ला करण्यास गेले असता शत्रूकडून त्यांच्यावर जबरदस्त प्रतिहल्ला चढविण्यात आला. अशा प्रसंगी आपल्या जिवाची पर्वा न करता शिपाई धाडसाने प्रेरित होऊन त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी सुद्धा शत्रूवर हल्ला चढवला व पाच शत्रूसैनिकांना ठार केले.

अशा रीतीने शिपाई राजाराम फराटे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमोर जबरदस्त आत्मविश्वास व शौर्याचे उदाहरण उभे केले. त्याबद्दल शिपाई राजाराम फराटे यांना दि. ६ फेब्रुवारी १९४६ रोजी वीरचक्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


* * *

# ब



## बनसोडे, धोंडीराम
**वायुसेना - हवालदार**
**वीरचक्र**
**३० ऑगस्ट १९३९**

धोंडीराम बनसोडे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील भडकांबे या छोट्याशा खेड्यात झाला. दि. ३० ऑगस्ट १९६१ रोजी ते वायुसेनेच्या एकशे एकोणतिसाव्या हवाई संरक्षण फलटणीत दाखल झाले. १९७१ च्या बांगलादेश युद्धात एका लष्करी आस्थापनाचे हवाई हल्ल्यांपासून संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांनी अचूक मारा करून आक्रमणकारी पाकिस्तानी सेबरजेट विमान नष्ट केले. नाईक धोंडीराम बनसोडे यांनी दाखविलेल्या धैर्य आणि उच्चतम व्यावसायिक कौशल्यासाठी दि. ६ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ते हवालदार पदावरून निवृत्त झाले.



## बाजिना, रूसी होरमुसजी
**भूसेना - ब्रिगेडियर**
**वीरचक्र**
**३ फेब्रुवारी १९२४**

रूसी होरमुसजी बाजिना यांचा जन्म पुण्यात झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठात शिक्षण घेतले. दि. २१ जानेवारी १९४५ रोजी ते सोळाव्या महार रेजिमेंटमध्ये दाखल झाले. १९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी सियालकोट क्षेत्रातील मुहादीपूर आणि छानी गावावर शत्रूचे वर्चस्व होते. हा भाग ताब्यात घेण्याचे आदेश बाजिना यांच्या तुकडीला देण्यात आले होते. दि. १८ सप्टेंबर १९६५ च्या रात्री बाजिना यांनी हे ध्येय मोठ्या साहसाने साध्य केले. मुहादीपूर आणि छानी भागाचा भारताने ताबा मिळवला. बाजिना आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी शत्रूने जोरदार प्रतिहल्ला केला. मात्र बाजिना आणि त्यांच्या सैनिकांनी पराक्रमाची पराकाष्ठा करीत मुहादीपूरमधून शत्रूला हुसकावून लावले. या धुमश्चक्रीत शत्रूचे शंभराहून अधिक सैनिक ठार झाले, तर नऊ जण कैद झाले. दि. १८ सप्टेंबर १९६५ रोजी बाजिना यांना 'वीरचक्र' देण्यात आले.

ब

* * *

# भ



## भागवत, बिपीनचंद्र भास्कर

**नौसेना – कमांडर**

**वीरचक्र**


**१२ एप्रिल १९४४**

बिपीनचंद्र भास्कर भागवत यांचा जन्म पुणे येथे झाला. पुण्यातीलच नामांकित एमईएस स्कूल आणि फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. ७ डिसेंबर १९६४ रोजी ते भारतीय नौसेनेत भरती झाले. त्यानंतर सात वर्षांतच पाकिस्तानबरोबरच्या युद्धात कामगिरी बजावण्याची संधी त्यांना मिळाली.

१९७१ च्या युद्धात लेफ्टनंट बिपीनचंद्र भागवत हे नौसेनेच्या विमानाचे वैमानिक होते. या विमानातून बांगलादेशमधील बंदरावर सातत्याने हल्ले केले जात होते. शत्रूकडूनही त्यांच्या विमानावर सातत्याने तोफगोळे डागण्यात येत होते. अशा या घनघोर चकमकीत त्यांनी आपल्या अचूक हल्ल्यांद्वारे पाकिस्तानच्या तब्बल तीन युद्धनौका उद्ध्वस्त केल्या.

त्यांच्या हवाई गस्तीचा धसकाच जणू शत्रूने घेतला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण गस्तीमुळे शत्रूची एकही युद्धनौका बंदर सोडून कामगिरीसाठी बाहेर पडू शकत नव्हती. त्याचाच परिणाम म्हणजे सहा डिसेंबर रोजी भारतीय नौसेनेने शत्रूच्या बंदरावर कब्जा मिळविला आणि त्यांच्या युद्धनौकाही ताब्यात घेतल्या. नौसेनेच्या या अतुल्य कामगिरीमध्ये बिपीनचंद्र भागवत यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळेच १६ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' हा सन्मान जाहीर करण्यात आला. पुढे त्यांना कमांडर या पदावर बढतीही मिळाली.

भ



## भारद्वाज, प्रबोधचंद्र एच.

**भूसेना – कर्नल**

**वीरचक्र**


**२७ नोव्हेंबर १९५०**

प्रबोधचंद्र एच. भारद्वाज यांचा जन्म महाराष्ट्रातील देवळाली कॅम्प येथे झाला. प्रबोधचंद्र यांचे वडील एच. के. भारद्वाज हे सैन्यात ब्रिगेडियर होते. दि. १४ जून १९७० रोजी भारद्वाज हे सैन्यात दाखल झाले. सैन्यात दाखल होताच त्यांची नेमणूक अमृतसर येथे झाली. तो काळ भारत-पाकिस्तान युद्धाचा

होता. कमांडर म्हणून लेफ्टनंट प्रबोधचंद्र भारद्वाज यांची नेमणूक पॅरॅशूट रेजिमेंटमध्ये करण्यात आली. दि. १६ डिसेंबर १९७१ रोजी फिरोजपूर परिसरातील शत्रूच्या ठाण्यावर कब्जा करण्याचा आदेश त्यांच्या प्लॅटूनला देण्यात आला होता. ही जागा भुसुरुंग पेरून आणि अडथळे उभारून शत्रूने संरक्षित केलेली होती.

हा हल्ला सुरू असतानाच बंकरमध्ये लपलेल्या शत्रुसैन्याने त्यांच्या प्लॅटूनवर गोळीबार करण्यास सरुवात केली. भारद्वाज त्वरित त्या बंकरवर चालून गेले. त्यांनी त्या बंकरमध्ये हातबॉम्ब टाकला. त्यानंतर लगेचच बंकरमध्ये उडी घेऊन त्यांनी आतील शत्रुसैनिकांना संगिनीने ठार केले. तसेच त्यांनी बंकरमधील मध्यम पल्ल्याच्या मशीनगनचाही ताबा घेतला.

या कारवाईत कपाळावर गोळी लागून ते जखमी झाले. तशा अवस्थेतही त्यांनी शत्रूच्या दुसऱ्या बंकरवर हल्ला केला. इथेही त्यांनी आधी हातबॉम्ब टाकला व बंकरमधील शत्रुसैनिकांना संगिनीने ठार केले. या बंकरमधील मशीनगनवरही त्यांनी लगेचच ताबा मिळवला. या असीम शौर्याबद्दल त्यांना ‘वीरचक्रा’ने सन्मानित करण्यात आले.



## भिंगारदिवे, गोपीनाथ अहिलजी

**भूसेना - हवालदार**

**वीरचक्र**

**१ जुलै १९३६**

गोपीनाथ अहिलजी भिंगारदिवे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार या गावी झाला. दि. १८ जानेवारी १९५७ या दिवशी ते लष्करी सेवेत रुजू झाले. कच्छ भागातल्या सरदार पोस्ट येथे ते मोबाइल कंट्रोलर म्हणून कार्यरत होते. १९६५ च्या पाकिस्तान युद्धामध्ये पाक सैन्याकडून गोळीबार होत असतानाही सरदार पोस्ट येथे तैनात राहून त्यांचे निरीक्षण सुरू होते.

भ

दि. २० एप्रिल १९६५ या दिवशी, दुपारी एकच्या सुमारास एक जखमी शिपाई सरदार पोस्टकडे एकटाच परतत होता. तळाकडे येणाऱ्या मार्गात संरक्षणाच्या दृष्टीने भूसुरुंग पेरून ठेवण्यात आले होते. तो शिपाई बेशुद्ध होऊन याच परिसरात कोसळला. त्यावेळी शत्रूकडून तोफगोळ्यांचा आणि गोळीबाराचा भडिमार सुरू होता आणि आपली सेना प्राणपणाने प्रतिकार करत होती.

भयंकर गोळीबार व तोफगोळ्यांचा मारा चालू असताना भूसुरुंगांच्या परिसरात जाण्यात खूपच धोका होता. पण भिंगारदिवे बेधडकपणे पुढे गेले. बेशुद्ध पडलेल्या जखमी शिपायाला घेऊनच ते पोस्टवर परतले. त्यांच्या समयोचित कृतीमुळे त्यांनी एका सैनिकाचा जीव वाचवला. अतुलनीय शौर्य, निष्ठा या त्यांच्या गुणांमुळे त्यांना ‘वीरच्रक’ देण्यात आले.



## भोसले, विश्वनाथ तुकाराम

**भूसेना - सुभेदार मेजर, मानद कॅप्टन**

**वीरचक्र**

**९ जून १९३१**

विश्वनाथ तुकाराम भोसले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील वडूज तालुक्यातील आरले या छोट्याशा गावात झाला. दि. ९ जून १९५० रोजी ते दुसऱ्या महार रेजिमेंटमध्ये दाखल झाले.

१९७१ मध्ये झालेल्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात त्यांनी देदीप्यमान कामगिरी बजावली. विश्वनाथ भोसले हे महार रेजिमेंटच्या एका प्लॅटूनचे कमांडर होते. दि. १२ डिसेंबर १९७१ रोजी रात्री झालेल्या युद्धात या प्लॅटूनने राजस्थान सेक्टरमधील एका भागावर कब्जा मिळवला होता. या भागावर कब्जा केल्यानंतर प्लॅटूनच्या पुनर्रचनेला सुरुवात झाली. त्याच वेळी शत्रू प्रतिहल्ला करायच्या तयारीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

हे पाहताच भोसले यांनी त्वरित पुढाकार घेतला. त्यांच्या प्लॅटूनमधील दोन सेक्शन त्यांनी बरोबर घेतले. प्रतिहल्ल्याची तयारी करणाऱ्या शत्रूवरच त्यांनी जोरदार हल्ला चढवला. या हल्ल्यामुळे शत्रुसैन्य पुरते गर्भगळीत झाले. तीन इंची उखळी तोफा आणि प्रचंड दारूगोळा जागेवरच टाकून शत्रुसैन्य पळून गेले.

भोसले यांनी पाच शत्रुसैनिकांना बंदी बनवले. दारूगोळा ताब्यात आल्यामुळे शत्रूसैन्याला होणारा त्याचा पुरवठा थांबला.

या शौर्याबद्दल सुभेदार मेजर, मानद कॅप्टन विश्वनाथ भोसले यांना 'वीरचक्र' देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



## भोसले, शामू चंद्राप्पा

**भूसेना - नाईक**

**वीरचक्र**

**१ जुलै १९३५**

भ

कोल्हापूर जिल्ह्यातील सालस्मी या छोट्याशा गावात शामू चंद्राप्पा भोसले यांचा जन्म झाला. शिक्षण पूर्ण करून दि. १६ जानेवारी १९५७ या दिवशी शामू भोसले लष्करात दाखल झाले.

१९७१ च्या भारत-पाक युद्धात भारताच्या पूर्व क्षेत्रातील, एका पहाऱ्याच्या चौकीवर दि. ११ डिसेंबर १९७१ रोजी शामू भोसले यांना तैनात होण्याचा आदेश मिळाला. त्यांची चौकी असलेल्या ठिकाणी जाऊन पोहोचणार, इतक्यात त्यांनी चौकीच्या दिशेने शत्रुसेनेची तुकडी जाताना पाहिली. त्यांच्या सेनेने शत्रुसैन्यावर हल्ला चढविला. त्या वेळी नाईक भोसले यांच्यापासून जेमतेम १५ मार्ड अंतरावर शत्रूचे अंदाजे ४५ सैनिक आपापल्या वाहनांतून उड्या मारून उतरले व त्यांच्यात

धुमश्चक्री उडाली. भोसले यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता आपल्या हलक्या मशीनगनच्या साहाय्याने त्या सैनिकांवर हल्ला चढविला.

त्यांनी शत्रूच्या १५ सैनिकांना यमसदनी पाठविले. त्यांचा हा भीमपराक्रम पाहून उर्वरित सैन्य गोंधळून प्राणभयाने माघारी पळू लागले. नंतर शत्रूने जोमाने प्रतिहल्ला चढविला. तेव्हा भोसले यांनी आपल्या सैनिकांचे मनोधैर्य वाढवून त्यांना प्रोत्साहन दिले आणि हा हल्लाही मोडून काढला.

या त्यांच्या शौर्याबद्दल त्यांना 'वीरचक्रा'ने सन्मानित करण्यात आले.

* * *

भ

# म



## महार, पुंडलिक बाकाराम

**भूसेना - नायब सुभेदार, मानद सुभेदार**
**वीरचक्र**
**१५ जून १९२५**


अमरावती जिल्ह्यातील वंडली या गावात पुंडलिक बाकाराम महार यांचा जन्म झाला. दि. १५ जून १९४५ रोजी ते सैन्यात पहिल्या महार रेजिमेंटमध्ये शिपाई म्हणून दाखल झाले.

जम्मू व काश्मीरमधील नौशेरा या भागातील सात क्रमांकाच्या चौकीवर पुंडलिक महार यांची नेमणूक झाली होती. ते तेथे चार क्रमांकाच्या स्थानावर होते. दि. ६ फेब्रुवारी १९४८ रोजी या चौकीवर शत्रूने पद्धतशीर रचना करून मोठ्या संख्येने हल्ला केला.

शिपाई पुंडलिक महार यांनी अतिशय जवळून शत्रूंवर गोळीबार सुरू केला. जवळजवळ एक ते दीड तास ते गोळीबार करीत होते.

या लढाईत त्यांच्या मानेला गोळी लागली. पण स्वत: जखमी होण्याआधी त्यांनी शत्रुपक्षातील जवळजवळ ५०० जणांना घायाळ केले होते.

शिपाई पुंडलिक महार यांनी दाखविलेल्या प्रसंगावधानासाठी व शौर्यासाठी त्यांना ‘वीरचक्र’ बहाल करण्यात आले. नंतर ते नायब सुभेदार व मानद सुभेदार पदापर्यंत कार्यरत राहिले.



## माऊशो, अँथनी लुईस अल्वारो

**वायुसेना - स्क्वॉड्रन लीडर**
**वीरचक्र**
**२८ सप्टेंबर १९३२**

अँथनी लुईस अल्वारो माऊशो यांचा जन्म मुंबई येथे झाला.

दि. १७ जानेवारी १९५३ रोजी स्क्वॉड्रन लीडर म्हणून त्यांची वायुसेनेत नेमणूक झाली.

१९६५ च्या पाकिस्तान युद्धात स्क्वॉड्रन लीडर अँथनी माऊशो हे टेहळणी पथकाचे (रिकॉनिसन्स स्क्वॉड्रन) कमांडर होते. सेक्शनच्या एकूण अकरा मोहिमांसाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

तोफांचा अखंड भडिमार सुरू असतानाही अँथनी माऊशो यांनी त्यांचे टेहळणीचे काम धैर्याने सुरूच ठेवले. यातल्याच एका मोहिमेत त्यांनी शत्रूचे रणगाडे हेरले. नंतर त्यांतील २५ पॅटन रणगाड्यांवर आपल्या विमानांनी हल्ला करून ते नष्ट केले. या कार्माबद्दल त्यांना 'वीरचक्रा'ने सन्मानित करण्यात आले.



**माळी, अरुण रामलिंग**
**भूसेना – लान्स हवालदार**
**वीरचक्र**
**७ जुलै १९५६**

अरुण रामलिंग माळी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील पाचगाव येथे झाला. दि. ६ फेब्रुवारी १९७६ रोजी ते दुसऱ्या मराठा लाइट इन्फन्ट्रीत दाखल झाले.

दि. १७ डिसेंबर १९८८ चा दिवस त्यांच्यासाठी काही वेगळे घेऊन समोर आला. तेव्हा ते श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेत तैनात होते. श्रीलंकेतील पनोचीमुनाई येथील दहा घरांचा शोध घेण्याची जबाबदारी अरुण माळी आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती. या घरांमध्ये दहशतवादी लपून बसल्याचे वृत्त मिळाले होते.

घरांच्या शोधात पुढे पुढे जात असताना जवळच्याच एका घरात लपून बसलेले दोन दहशतवादी अचानक पुढे उभे ठाकले.


दहशतवाद्यांनी त्यांच्याजवळच्या एके-४७ रायफलींतून माळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गोळीबार करण्यास सुरुवात केली. त्यांनी बॉम्बफेक करण्यासही सुरुवात केली. दहशतवाद्यांच्या या जोरदार हल्ल्यामुळे माळी आणि त्यांचे सहकारी सुरूवातीला हतबल झाले होते.

मात्र हा हल्ला परतवून लावला नाही, तर आपल्यापैकी कोणावरही जीव गमवायची वेळ येऊ शकते, असा विचार माळी यांच्या मनात आला. कंपनी कमांडरच्या आदेशाची वाटही न पाहता माळी यांनी क्षणार्धात आपल्या सैनिकांना सूचना देण्यास सुरुवात केली.

सैनिकांना जोरदार गोळीबार करण्याचे आदेश देत त्यांनी दहशतवादी लपून बसलेल्या घराकडे रांगत जाण्यास सुरुवात केली. घरापासून केवळ वीस मीटरवर आल्यावर माळी यांनी गुडघ्यावर बसून स्वत:च्या सुरक्षेचा विचार न करता घराच्या दिशेने गोळीबार करण्यास प्रारंभ केला. त्यांच्या या हल्ल्यापुढे शत्रू निष्प्रभ झाला.


माळी यांनी एकट्याने घरात लपून बसलेल्या चार दहशतवाद्यांना ठार केले आणि दोन एके-४७ रायफली आणि ११२ गोळ्या हस्तगत केल्या. दहशतवाद्यांचा पाडाव करताना त्यांनी दाखवलेल्या धैर्याबद्दल त्यांना दि. २६ जानेवारी १९९० रोजी सन्मानित करण्यात आले.

म



## माळी, बाबू संतू
**भूसेना - हवालदार मेजर**
**वीरचक्र**
**७ जून १९३७**

बाबू संतू माळी यांचा जन्म सांगली जिल्ह्यामधील कुडची या गावात झाला. दि. ७ जून १९५७ रोजी ते लष्करात दाखल झाले. ते एअर डिफेन्स रेजिमेंटमध्ये कार्यरत होते. हवाई संरक्षण तोफखान्याच्या (एअर डिफेन्स बॅटरी) तुकडीमध्ये असताना हवालदार मेजर बाबू माळी यांनी १९७१ च्या भारत-पाक युद्धात तोफेद्वारे अचूक वेध घेऊन पाकिस्तानी '१०४ स्टार फायटर' हे विमान पाडले. माळी यांचे कौशल्य आणि धाडसासाठी त्यांना दि. ९ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' देऊन सन्मानित करण्यात आले.



## मिलन, रॉय जोसेफ
**भूसेना - कमांडर**
**वीरचक्र**
**२९ एप्रिल १९३४**

रॉय जोसेफ मिलन यांचा जन्म मुंबई येथे झाला. आपले सर्व शिक्षण संपल्यावर दि. १ जुलै १९५५ रोजी त्यांनी भारतीय नौदलात सेवा पत्करली.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धात रॉय मिलन यांची भारतीय नौसेनेच्या पाणबुडीवर प्रमुख अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली होती. ह्या पाणबुडीवर बांगलादेशाच्या सागरी प्रदेशातील गस्तीचे काम सोपविण्यात आलेले होते. शत्रूच्या हवाई दलाची विमाने अन् सागरी पृष्ठभागावरील नौदल रॉय जोसेफ मिलन यांच्या पाणबुडीवर सतत पाळत ठेवून होते. तरीही त्यांनी त्यांचे गस्तीचे काम सुरूच ठेवले. त्यामुळे शत्रूलाही त्यांची जरब बसली. या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी कौशल्याची अन् निधडेपणाची नितांत गरज होती. आपल्या या अजोड अन् यशस्वी कामगिरीत त्यांनी अतुलनीय करारीपणा, धैर्य अन् कुशल नेतृत्व दाखवले. त्यांच्या ह्या पराक्रमाच्या गौरवार्थ १९७१ मध्ये त्यांना 'वीरचक्र' प्रदान केले गेले.


म



## मिस्त्री, जाल माणेकशॉ
**वायुसेना - स्क्वॉड्रन लीडर**
**वीरचक्र**
**२९ डिसेंबर १९३५**

जाल माणेकशॉ मिस्त्री यांचा जन्म मुंबईमध्ये झाला. त्यांची भारतीय वायुसेनेत नियुक्ती झाली. १९७१ च्या पाकविरोधी युद्धाच्या वेळी स्क्वॉड्रन लीडर जाल मिस्त्री हे भारतीय लढाऊ विमानांच्या ताफ्यातील एक वैमानिक होते.

दि. ४ डिसेंबरला त्यांनी कोहाटवरील प्रतिहल्ल्यात भाग घेऊन शत्रूच्या विमानतळाचे अपरिमित नुकसान केले. दि. ५ डिसेंबरला शत्रूच्या सकेसर तळावर हल्ला करायची योजना आखली होती. ही कामगिरी लढाऊ विमानांच्या ताफ्यावर सोपवली होती. नेतृत्व करणार होते जाल मिस्त्री. शत्रूने ह्या तळाचे मोठ्या प्रमाणावर संरक्षण केलेले होते नि त्याच्याकडून निकराचा जोरदार प्रतिकार होऊ शकत होता. अशा ह्या कठीण कामगिरीवर निघण्याचा तयारीत असतानाच त्यांच्या ताफ्यातील दुसरे लढाऊ विमान अकार्यक्षम झाल्याचे निदर्शनास आले. आयत्या वेळी उपस्थित झालेल्या ह्या अडथळ्याकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले. जिवाच्या कराराने, जिद्दीने ते एकटेच कामगिरीवर निघाले. आपल्या लक्ष्याजवळ येताच त्यांनी सकेसरच्या रडार तळावर जोरदार हल्ला चढवला. शत्रूकडून होणाऱ्या जबरदस्त गोळीबाराला भीक न घालता त्यांनी चिकाटीने आपली चढाई निकराने चालूच ठेवली अन् शत्रूच्या ह्या तळाची अपरिमित हानी करून तो तळ निकामी करून टाकला. स्क्वॉड्रन लीडर जाल माणेकशॉ मिस्त्री यांनी अखेरच्या क्षणापर्यंत असीम धैर्य, करारीपणा अन् कामगिरीवरील अभंग निष्ठा यांचे सुंदर दर्शन घडवले. त्यांच्या या पराक्रमाच्या गौरवार्थ दि. ५ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना मरणोत्तर 'वीरचक्रा'ने सन्मानित केले गेले.




## मोरे, हनुमान कृष्णा
**भूसेना – सुभेदार**
**वीरचक्र**
**१ जून १९४८**

हनुमंत मोरे यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील भांबे या गावी झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दि. २१ डिसेंबर १९६८ रोजी पंधराव्या मराठा लाईट इन्फन्ट्री या लष्काराच्या तुकडीत हनुमंत मोरे हे शिपाई म्हणून रुजू झाले. लष्कराच्या या तुकडीला शौर्याची मोठी परंपरा आहे. भारताच्या पश्चिम क्षेत्रात, शिपाई हनुमंत मोरे हे मराठा लाईट इन्फन्ट्रीच्या तुकडीसह डिसेंबर १९७१ मध्ये तैनात होते. दि. ९ डिसेंबर रोजी एका चकमकी दरम्यान शत्रूने आपल्या जवानांवर मध्यम पल्ल्याच्या मशिनगनने गोळीबार सुरू केला. त्यामध्ये आपल्याकडे मोठी प्राणहानी झाली. शिपाई मोरे यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता शत्रूच्या त्या चौकीवर हल्ला करून त्यावर हातगोळा टाकला. या चकमकीदरम्यान मशिनगनच्या गोळीबारात तेही जखमी झाले. तरीही स्वत:च्या जखमांची तमा न बाळगता, शिपाई हनुमंत मोरे यांनी शत्रूच्याच मशिनगनने पळून जाणाऱ्या शत्रूसैनिकांवर हल्ला करून कित्येकांना यमसदनास पाठविले. या त्यांच्या शौर्याबद्दल त्यांना 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले. नंतर त्यांची सुभेदार पदावर बढती झाली.

* * *

# र



## राईलकर गंगाधर रंगनाथ

**वायूसेना - ग्रुप कॅप्टन**

**वीरचक्र**


**९ ऑगस्ट १९३८**

गंगाधर राईलकर यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील रोहा येथे झाला. पुण्यातील फर्गसन महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. दि. २८ मे १९६० रोजी ते हवाई दलात दाखल झाले.

फ्लाईट लेफ्टनंटपदावर कार्यरत असताना फोटो रिकॉनिसन्स स्क्काड्रन (टेहळणी पथक) मध्ये नेव्हिगेटर म्हणून यांच्यावर जबाबदारी होती. १९६५ च्या सप्टेंबर महिन्यात आखण्यात आलेल्या मोहिमेत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

शत्रूसंबंधात महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी मिळवली. शत्रूवर हल्ला करण्यासाठी अत्यंत कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी लढाऊ विमानाची भरारी घेऊन बहुमोल कामगिरी बजावली.

अनेक मोहिमा त्यांनी पूर्ण केल्या. त्यांनी शत्रुसंबंधात मिळवलेल्या महत्त्वपूर्ण माहितीमुळे मोहिमा आखणे आणि त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे शक्य झाले.



## राणे, चेरी हासंद

**वायुसेना - फ्लाइट लेफ्टनंट**

**वीरचक्र**

**१३ मार्च १९४४ - २८ एप्रिल २००९**


चेरी हासंद राणे यांचा जन्म मुंबई येथे झाला. दि. ४ जून १९६४ पासून त्यांनी भारतीय वायुसेनेत फ्लाइट लेफ्टनंट म्हणून सेवा करण्यास सुरुवात केली.

पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात, डिसेंबर १९७१ मध्ये फ्लाइट लेफ्टनंट राणे यांनी हुसेनवाला भागातील एका हवाई हल्ल्याचे नेतृत्व केले व शत्रूचा एक रणगाडा उद्ध्वस्त केला. त्यांनी अशाच प्रकारच्या अनेक मोहिमांचे नेतृत्व केले व त्यांत त्यांना शत्रूच्या हवाई, तसेच जमिनीवरून होणाऱ्या प्रतिकाराचा सामना करावा लागला.

छांब-जुरीयान विभागात त्यांच्या हल्ल्यांमध्ये शत्रूच्या पायदळाचे निर्णायक अशा स्वरूपाचे नुकसान झाले. शत्रूच्या सैन्यावर व शस्त्रसाठ्यांवर हल्ला करून त्यांनी चार रणगाडे व चार सैनिकी वाहने नष्ट केली.

दि. १७ डिसेंबर रोजी त्यांनी लाहोर रेल्वे जंक्शनवरील हल्ल्याचे नेतृत्व केले. या हल्ल्यात संपूर्ण रेल्वे व्यवस्थेचे अपरिमित नुकसान झाले. या सर्व हल्ल्यांमध्ये फ्लाइट लेफ्टनंट राणे यांनी धाडस, कौशल्य व कार्याप्रती अत्युच्च निष्ठेचे प्रदर्शन घडवले. या कामगिरीबद्दल राणे यांना दि. १७ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वायुसेनेतून निवृत्ती स्वीकारून चेरी हासंद राणे यांनी जहाज दुरुस्तीची कंपनी स्थापन केली होती. मुंबई येथे अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.



## राणे, लक्ष्मण वासुदेव

**भूसेना - लान्स हवालदार**

**वीरचक्र**

**१ जुलै १९३० - १० डिसेंबर १९७१**

लक्ष्मण वासुदेव राणे यांचा जन्म रत्नागिरी येथे झाला. दि. २ डिसेंबर १९५२ रोजी ते भूसेनेत दाखल झाले. मराठा लाइट इंफन्ट्रीत ते विभागीय कमांडर या पदावर कार्यरत होते.

पूर्व क्षेत्रात जमालपूर येथे असलेल्या या तळाने शत्रूला त्या बाजूने अडवून ठेवण्याची जबाबदारी पेलली होती. दि. १० डिसेंबर १९७१ या दिवशी त्यांच्या तुकडीवर शत्रूने हल्ला केला.

शत्रूचा पहिला हल्ला त्यांनी परतवून लावला. पण नव्या सैनिकांना घेऊन शत्रूने पुन्हा हल्ला चढवला, तेव्हा लक्ष्मण राणे पुढे सरसावले. उडी मारून ते खंदकातून बाहेर आले आणि पराक्रमाची शर्थ करीत शत्रूच्या तीन सैनिकांना त्यांनी यमसदनी धाडले. परंतु दुर्दैवाने शत्रूच्या हल्ल्यात लक्ष्मण वासुदेव राणे यांना वीरमरण आले.



र

## रेगे, पंढरीनाथ अनंत

**भूसेना - मेजर**

**वीरचक्र**

**२२ मे १९१६**


पंढरीनाथ अनंत रेगे यांचा जन्म रत्नागिरी येथे झाला. पुण्यातील वाडिया महाविद्यालयामधून शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते दि. २४ जानेवारी १९४३ रोजी सैनिकी सेवेत रुजू झाले. १९६२ च्या चीन युद्धादरम्यान मेजर रेगे यांच्याकडे नेफा भागातल्या हेन्कार तळावरील १०० सैनिकांच्या तुकडीचे नेतृत्व होते.

दि. २४ ऑक्टोबर रोजी ५०० चिनी सैनिकांच्या तुकडीने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला.

आपले सैनिक संख्येने खूपच कमी असूनसुद्धा मेजर रेगे यांच्या नेतृत्वाखालील सैनिकांनी मोठ्या धैर्याने प्रतिकार केला आणि शत्रूचे चार हल्ले परतवून लावले. या युद्धात शत्रुसैन्याची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. शेवटी हातघाईच्या लढाईत आपल्या तुकडीला माघार घ्यावी लागली.

मेजर रेगे आणि त्यांच्या तुकडीने शत्रूची आगेकूच बराच वेळ रोखून धरून संपर्क मार्ग मोकळा ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

या मोहिमेदरम्यान मेजर पंढरीनाथ रेगे यांनी अत्युच्च धाडस व नेतृत्वगुणांचे प्रदर्शन घडवले, त्याबद्दल त्यांना दि. २४ ऑक्टोबर १९६२ रोजी 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## रेवाणे, बाबू धोंडू

**भूसेना - नाईक**

**वीरचक्र**

**२८ मार्च १९२३ - ६ सप्टेंबर १९४८**

बाबू धोंडू रेवाणे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील कुर्वळजावळी या गावात झाला. दि. २८ मार्च १९४० रोजी सैन्यात प्रवेश करून त्यांनी मराठा लाइट इन्फन्ट्रीच्या पाचव्या तुकडीत सेवा करण्यास सुरुवात केली.

१९४८ च्या लढाईत ६ सप्टेंबर रोजी मुकुंद पुलावर हल्ला करण्यासाठी पुढे सरकणाऱ्या 'बी' कंपनीमधील आघाडीच्या पलटणीच्या एका विभागाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. लक्ष्याच्या जवळ पोहोचले असताना शत्रूने जोरदार गोळीबाराला सुरुवात केली. हा गोळीबार संपूर्ण दिवस चालू होता व त्यामुळे पांगलेल्या कंपनीचा एकत्रित हल्ला करणे शक्य होत नव्हते. परंतु नाईक रेवाणे यांनी धाडसाने परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

थोड्याच वेळाने त्यांच्या विभागातला ब्रेन मशीनगन चालविणारा गनर जखमी झाला, तेव्हा त्यांनी स्वत: ब्रेन मशीनगनचा ताबा घेतला व अचूक गोळीबार करीत शत्रूचा मोर्चा उद्ध्वस्त केला.

स्वत:च्या सुरक्षिततेचा अजिबात विचार न करता नाईक बाबू रेवाणे यांनी आघाडीवर राहून त्यांच्या तुकडीचे नेतृत्व केले. आपल्या तुकडीवर नियंत्रण ठेवतानाच त्यांनी अडीच तास ब्रेनगनचा मारा सुरूच ठेवला.

जेव्हा त्यांच्याकडचा दारूगोळा संपत आला, तेव्हा त्यांनी अधिक दारूगोळा मिळण्यासाठी दुसऱ्या मोर्चापर्यंत सरपटत जाण्याचा प्रयत्न केला. परंतु असे करत असताना त्यांच्या छातीमध्ये शत्रूच्या गोळ्या लागल्या व ते धारातीर्थी पडले.

र


त्यांच्या शौर्य व बलिदानापासून प्रेरणा घेऊन त्यांच्या तुकडीने हल्ला सुरूच ठेवला व आपले लक्ष्य साध्य केले.

नाईक बाबू रेवाणे यांना त्यांचे धाडस, नेतृत्वगुण व सर्वोच्च बलिदानाबद्दल दि. ६ सप्टेंबर १९४८ रोजी मरणोत्तर 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

* * *

र

# व



## वालनकर, जी. बी.
**असिस्टंट कमांडंट**
**सीङ्का सुरक्षा दल**
**वीरचक्र**

१९७१ चङ्का पाकिस्तानविरुद्धचङ्का लढाईत असिस्टंट कंपनी कमांडर जी.बी. वालनकर यांनी धैर्याने आणि आत्ङ्कविश्वासाने पूर्व भागात मुसंडी मारली. त्यांच्या या कारवाईला शत्रूकडून प्रखर विरोध झाला. पाकिस्तानी स्पेशल सर्व्हिस ग्रूपच्या काही सैनिकांचा समावेश असलेल्या शत्रूंच्या तुकडीवर वालनकरांनी आपल्या सहकारी जवानांसह हल्लाबोल केला आणि अगदी धाडसाने त्यांनी शत्रूचा बीमोड केला. मृत्यूला न घाबरता त्यांनी आपल्या जवानांना प्रोत्साहन देत शत्रूची ठाणी काबीज केली. रणांगणावर दाखविलेल्या धैर्य, शत्रूवर विजय मिळविण्याचा निर्धार आणि नेतृत्वगुणांबद्दल असिस्टंट कंपनी कमांडर वालनकर यांना १९७१ साली 'वीरचक्रा'ने सन्मानित करण्यात आले.




## वारिंदर सिंग
**भूसेना - मेजर**
**२४ जानेवारी १९५५ - २६ जून १९८७**

वारिंदर सिंग यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील देवळाली येथे झाला. सिंग यांचे वडील सुद्धा सैन्यात होते. दि. १३ जून १९७६ रोजी वारिंदर सिंग हे सैन्यात दाखल झाले. जगातील सर्वाधिक उंचीच्या सैनिकी तळ असणाऱ्या सियाचीन याठिकाणी एप्रिल मध्ये त्यांची नेमणूक करण्यात आली होती.

सततच्या खराब हवामानात भारतीय सीमांचे रक्षण करण्याचे मोठे आव्हान मेजर वारिंदर सिंग यांच्या दलावर होते. जून मध्ये सियाचीन मधील बिला फोंडला सैनिकी तळाजवळील हिमकड्यावरून अचानक गोळीबार सुरू झाला. खराब हवामानाचा फायदा घेत शत्रूकडून हा गोळीबार सुरू झाला. दि. २३ जून १९८७ ची रात्र होती. या रात्री अचानक सुरू झालेल्या या हल्ल्यापासून संरक्षण करण्याबरोबर शत्रूच्या गोळीबाराला प्रत्युत्तर देण्यासाठी मेजर वारिंदर सिंग यांनी सातशे फूट उंचीची एक हीमकडा चढून जाण्याचा धाडसी निर्णय घेतला. सियाचीन मधील बिला फोंडलातील ठाण्यावर प्रतिबंधक संरक्षणार्थ मशीनगन व

रॉकेट लाँचर च्या सहाय्याने जमिनीवरील व आकाशातील संभावित हल्ल्यांपासून या ठाण्याचे संरक्षण केले.

दि. २५ जून १९८७ रोजी सहकाऱ्यांसह खंदकावर हातबॉम्बचा हल्ला करून दि. २६ जून १९८७ रोजी पहाटे दोन वाजता खंदकावर ताबा मिळविला. तिसऱ्या रात्री मेजर वारिंदर सिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी शून्य तापमानात ८४ मि.मि. रॉकेट लाँचरद्वारा दुसऱ्या खंदकावर हल्ला करून त्यावर ताबा मिळविला. नायब सुभेदार बाना सिंग यांच्या मदतीने हल्ला करून शेवटच्या खंदकावर ताबा मिळवला. हे कार्य करताना मेजर वारिंदर सिंग हे गंभीररित्या जखमी झाले. त्यातच मेजर वारिंदर सिंग यांना वीरगती प्राप्त झाली.



**विश्वनाथन, रामकृष्णन**
**भूसेना – लेफ्टनंट कर्नल**
**वीरचक्र**
**१२ जानेवारी १९६० – १९९९**

विश्वनाथन रामकृष्णन यांचा जन्म मुंबई येथे झाला. दि. १३ जून १९८१ पासून त्यांनी अठराव्या ग्रेनेडिअर्समध्ये सेवा करण्यास सुरुवात केली.

ऑपरेशन विजय दरम्यान लेफ्टनंट कर्नल विश्वनाथन रामकृष्णन हे अठराव्या ग्रेनेडिअर्सच्या दुसऱ्या क्रमांकाच्या अधिकारपदावर कार्यरत होते. द्रास परिसरातील तोतोलिंग भागात ही कारवाई सुरू होती. ते शत्रूला विरोध करण्यासाठी गेले असता, आग आणि तोफखान्यातून होणारा प्रचंड मारा यांच्यामध्ये ते अडकून पडले. पंधरा हजार फूट उंचीवर अवघड आणि कठीण परिस्थिती असताना त्यांनी आपल्या दुर्दम्य पराक्रमाचे दर्शन घडविले.

हल्ल्यादरम्यान त्यांना बंदुकीच्या गोळ्यांमुळे जखमा झाल्या. गंभीररीत्या जखमी असूनसुद्धा तिथून परतण्यास त्यांनी नकार दिला. उलट आपल्या तुकडीतील सैनिकांना पुढे जाण्यास प्रोत्साहित केले.

त्यांनी शत्रूच्या तीन तुकड्या नेस्तनाबूत केल्या आणि शत्रूच्या चार घुसखोरांना एकट्याने परतवून लावले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे त्यांच्या तुकडीला शत्रूच्या भूमीमध्ये सुरक्षितपणे प्रवेश करता आला, ज्यामुळे 'पॉइंट ४५९०' वर ताबा मिळविणे शक्य झाले.

विश्वनाथन रामकृष्णन हे जरी त्यांच्या तुकडीच्या दुय्यम श्रेणीवर होते, तरी त्यांनी आपल्या तुकडीचे नेतृत्व केले आणि तोतोलिंगमध्ये शत्रूच्या जागी आपले स्थान निर्माण करण्यास प्राधान्य दिले. अखेर झालेल्या जखमांमुळे त्यांना वीरमरण आले. १९९९ मध्ये त्यांना मरणोत्तर 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

व

* * *

# स



## सप्रे, विजयकुमार नारायण


**वायुसेना - ग्रूप कॅप्टन**

**वीरचक्र**

**१६ ऑगस्ट १९४५**

कोल्हापूरमधील पारगाव या छोट्याशा गावात विजयकुमार नारायण सप्रे यांचा जन्म झाला. कोल्हापुरातील राजाराम विज्ञान महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. दि. ३१ डिसेंबर १९६७ रोजी ते भारतीय वायुसेनेत दाखल झाले. 'ऑपरेशन पवन'मध्ये त्यांचा सुरुवातीपासूनच सहभाग होता. श्रीलंकेत भारतीय शांतिसेनेत कार्यरत असताना विंग कमांडर सप्रे यांच्याकडे हेलिकॉप्टर मोहिमेचे नियोजन आणि अंमलबजावणीचे काम सोपविण्यात आले होते.

दि. ११ ऑक्टोबर १९८७ रोजी सप्रे चार एम.आय.-८ हेलिकॉप्टरांचा समावेश असलेल्या रात्रीच्या विशेष हवाई मोहिमेत सहभागी झाले होते. लिट्टे सैनिकांकडून जोरदार गोळीबार होत असताना विजयकुमार यांनी आपल्या तुकड्यांना निर्दिष्ट हेलिपॅडवर उतरवण्याची कामगिरी यशस्विरीत्या पार पाडली. ही मोहीम अत्यावश्यक स्वरूपाची असल्याने, त्यांनी स्वत:च्या सुरक्षिततेची यत्किंचित तमा न बाळगता असामान्य धैर्य दाखवले आणि तीन वेळा ती कामगिरी यशस्वीपणे सिद्धीस नेली. स्वत:चे हेलिकॉप्टर अत्यंत क्षतिग्रस्त होऊनही विंग कमांडर सप्रे यांनी स्थितीचा तत्काळ अंदाज घेत महत्-कौशल्याने विमान आपल्या ठाण्यावर परत नेले. भूमीवरून शत्रूकडून जोरदार गोळीबार होत असताना विंग कमांडर विजयकुमार सप्रे यांनी उच्च पराक्रम, कर्तव्यनिष्ठा आणि सर्वोच्च प्रतीचे व्यावसायिक नैपुण्य दाखविले.



## सरदेसाई हेमंत शरदकुमार

**वायुसेना - फ्लाईट लेफ्टनंट**

**वीरचक्र**


दि. ११ डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या फ्लाइट लेफ्टनंट हेमंत सरदेसाई पूर्व विभागात एका लढाऊ विमानांच्या ताफ्यांत सेवा करीत होते. ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान त्यांनी ११ हल्ल्यांमध्ये सहभाग घेतला. एका मोहिमेमध्ये त्यांच्यावरराजिंदरगंज व महिंदरगंज दरम्यान शत्रूच्या एका

स

मुख्यालयाला शोधण्याची व त्यावर हल्ला करण्यासाठी दिशादर्शन करण्याची जबाबदारी होती. शत्रूच्या मुख्यालयाचे बंकर सहज लक्षात येणार नाहीत अशा पद्धतीने लपवण्यात आले होते. फ्लाइट लेफ्टनंट हेमंत सरदेसाई यांनी ही कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली व त्यामुळे १६० शत्रू सैनिकांना ठाकर करून मुख्यालयावर ताबा मिळवणे आपल्या सैन्याला शक्य झाले.

दि. ६ डिसेंबर रोजी त्यांनी तेजगाव हवाई तळावर हल्ला करून तो निकामी करण्यात यश मिळवले. दि. १२ डिसेंबरच्या रात्री त्यांनी नरसिंगडी हवाई तळावर हल्ला केला व दिवसा आणखी हल्ले करत तो निरूपयोगी करण्यात यश मिळवले. १४ डिसेंबर रोजी ढाक्यातील अत्यंत महत्त्वाच्या सैनिकी ठिकाणांवर हल्ले करून त्यांना अपरिमित नुकसान पोहोचवले व त्यामुळे बांगलादेशातील पाकिस्तानी सैन्याला शरणागती पत्करणे भाग पडले.

या सर्व हल्ल्यांमध्ये फ्लाइट लेफ्टनंट हेमंत सरदेसाई यांनी धाडस, कौशल्य व कार्याप्रती अत्युच्च निष्ठेचे प्रदर्शन घडवले. या कामगिरीबद्दल फ्लाइट लेफ्टनंट हेमंत सरदेसाई यांना दि. ६ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## साठे, उदय परशुराम

**भूसेना – मेजर**


**वीरचक्र**

**२८ जानेवारी १९४६**

उदय परशुराम साठे यांचा जन्म कलकत्ता (कोलकाता) येथे झाला. खडकवासला, पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधून सैनिकी शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी दि. २५ डिसेंबर १९६६ रोजी सैन्याचा तोफखाना विभागात सेवा करण्यास सुरुवात केली.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धामध्ये भूसेनेच्या कुमाऊं रेजिमेंटमधील एका बटालियनबरोबर टेहळणी अधिकारी म्हणून काम करण्याची जबाबदारी कॅप्टन साठे यांच्याकडे होती. या बटालियनकडे पूर्व विभागातील शत्रूची काही ठिकाणे ताब्यात घेण्याची जोखमीची कामगिरी सोपवण्यात आली होती. शत्रूकडून होणाऱ्या जोरदार गोळीबाराची पर्वा न करता त्यांनी पुढे सरकत आपल्या तोफखान्याला शत्रूवर मारा करण्यासाठी मार्गदर्शन केले. लक्ष्य जवळ आल्यानंतर त्यांनी स्वत: हल्ल्यात भाग घेऊन शत्रूचे अनेक मोर्चे नष्ट करण्यात यश मिळवले.

या कामगिरीमध्ये कॅप्टन साठे यांनी जिद्द, निष्ठा आणि धाडसाचे सर्वोच्च उदाहरण सादर केले. त्याबद्दल दि. ६ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नंतर महाराष्ट्र सरकारने त्रांना 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.



## साठ्ये, अरुण वसंत

**वायुसेना - फ्लाइट लेफ्टनंट**

**वीरचक्र**

**१ एप्रिल १९४३**

अरुण वसंत साठ्ये यांचा जन्म यवतमाळ येथे झाला. दि. २५ डिसेंबर १९६४ पासून त्यांनी भारतीय वायुसेनेत सेवा करण्यास सुरुवात केली.

दि. ४ डिसेंबर १९७१ रोजी फ्लाइट लेफ्टनंट अरुण साठ्ये यांचा एका हवाई तळावर हल्ला करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या लढाऊ विमानांच्या तुकडीत समावेश करण्यात आला. त्या वेळी ते स्क्वॉड्रनमध्ये एक वरिष्ठ पायलट म्हणून कार्यरत होते. जमिनीवरून होणाऱ्या तीव्र प्रतिकाराची पर्वा न करता त्यांनी दोन हल्ले यशस्वी केले. पहिल्या हल्ल्यात त्यांनी एक इमारत उद्ध्वस्त केली. कामगिरी पूर्ण करून परतत असताना त्यांना जमिनीवर शत्रूचे विमान दिसले. त्या विमानात इंधन भरण्याचे काम सुरू होते. त्यांनी पुन्हा मागे फिरून त्या विमानावर हल्ला चढवला व ते नष्ट केले. त्या विमानावर हल्ला करून येताना त्यांना त्यातून निघणाऱ्या प्रचंड ज्वाळा व धुराचा लोट दिसला. या कामगिरीदरम्यान अरुण साठ्ये यांनी धाडस, कौशल्य आणि कार्याप्रती अत्युच्च निष्ठेचे प्रदर्शन घडवले. या कामगिरीबद्दल त्यांचा 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



## सामंत, सुरेश गजानन

**नौसेना - लेफ्टनंट**

**वीरचक्र**

**३१ मे १९४१ - ५ डिसेंबर १९७१**

रत्नागिरी जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील हरकुट या गावात सुरेश गजानन सामंत यांचा जन्म झाला. पार्क महाविद्यालयात आपले शिक्षण पूर्ण करून दि. ११ एप्रिल १९६६ रोजी ते भारतीय नौसेनेत दाखल झाले.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धात लेफ्टनंट सुरेश सामंत हे भारतीय नौदलाच्या आय.एन.एस.किहतान या जहाजावर तैनात होते. त्यांच्या ताफ्याने पाच डिसेंबरच्या रात्री कराचीवर हल्ला केला. कराचीच्या बंदरात असलेली जहाजे व बंदरातील इतर इमारती व सामग्रीवर हल्ला करण्यासाठी भारतीय जहाजांची योग्य रचना करण्याची जबाबदारी दिशादर्शक (नॅव्हिगेटिंग) अधिकारी म्हणून लेफ्टनंट सुरेश सामंत यांच्यावर होती.

त्या मोहिमेत त्यांनी कामाप्रती निष्ठा आणि कौशल्याचे प्रदर्शन करून उद्दिष्ट साध्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र दुर्दैवाने पाण्याखालील विध्वंसक अस्त्रे व पाणसुरुंग शोधताना लेफ्टनंट सुरेश सामंत यांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांना मरणोत्तर 'वीरचक्र' प्रदान करून गौरवण्यात आले.




## सावंत, विनायक भिवाजी
**वायुसेना - विंग कमांडर**
**वीरचक्र, विशिष्ट सेवा पदक, महाराष्ट्र गौरव पुरस्कार**
**२१ जानेवारी १९३३ - १८ डिसेंबर २००६**

विनायक भिवाजी सावंत यांचा जन्म महाराष्ट्रातील अंगणेवाडी या गावात झाला. स्वातंत्र्योत्तर पंचवीस वर्षे भारताला संरक्षणदृष्ट्या युद्धसदृश परिस्थिती व युद्धांची अशी गेली. याच कालावधीत विंग कमांडर विनायक सावंत यांनी वायुसेनेत वेगवेगळ्या अधिकारपदांवर कामगिरी बजावली. एव्हरेस्ट शिखर व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशाच्या तीस हजार फूट उंचीवरील फोटोग्राफी करण्यात सहभाग, अशा प्रकारच्या अनेक प्रतिकूल परिस्थितीमधल्या मोहिमांमध्ये त्यांचा सहभाग होता.

१९६२ च्या लढाईमधील स्कार्ड, कारगिल ते उत्तर-पूर्व सीमेचा प्रदेश या भागांमध्ये धोका पत्करून शत्रूच्या जागा व भूभागाची टेहळणी करण्याच्या फोटोग्राफी मोहिमेमध्ये सावंत आघाडीवर होते. या मोहिमेमध्ये त्यांनी शत्रूकडील महत्त्वाची माहिती प्राप्त करून घेतली, या कामगिरीबद्दल त्यांना 'वीरचक्र' प्रदान करण्यात आले.

१९४८ ते १९७३ हा त्यांच्या वायुसेनेतील कारकिर्दीचा काळ त्यांच्या साहसी कामगिऱ्यांनी भरलेला होता. अनेक युद्धांमध्ये शत्रूच्या अवघड अशा डोंगराळ सैनिकी भूप्रदेशाची विमानातून टेहळणी करण्याचे काम त्यांनी केले. ही कामगिरी दिवसा व रात्री अशा दोन्ही वेळेस करावी लागत असे. प्रसंगी प्रतिकूल हवामानाला तोंड देऊन विमानचालकाला योग्य दिशादर्शन करण्याचे काम त्यांना करावे लागत असे. अशा अनेक धोकादायक कामगिऱ्यांची धाडसाने पूर्तता करणे व कौशल्याचा नेमका वापर करणे ह्यांमुळे ते सन्मानास पात्र ठरले.



## साळवी, बळीराम विठ्ठल
**भूसेना - हवालदार**
**वीरचक्र**
**२ नोव्हेंबर १९१९**

बळीराम विठ्ठल साळवी यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पालघर येथे झाला. दि. २ नोव्हेंबर १९४१ रोजी ते सैन्यात दाखल झाले. महार रेजिमेंटमध्ये कार्यरत राहून त्यांनी मोठे साहस दाखविले. दि. १४ एप्रिल १९४८ रोजी शत्रूने राजौरीवर हल्ला चढवला. साळवी यांच्याकडे पहिल्या कुमाऊं रेजिमेंटला मध्यम मशीनगन पुरवण्याचे काम दिले होते. भारतीय सैनिक शत्रूवर हल्ला करीत पुढे जात असताना शत्रूने उत्तरादाखल त्यांच्यावर गोळीबार करण्यास सरुवात केली. साळवी यांनी मोठ्या चातुर्याने एक मोठा दगड ढकलीत अचूक ठिकाणी आणून ठेवला

आणि त्यामागे लपून गोळीबार करण्यास सुरुवात केली, त्यामुळे सैनिकांना आपले विजयाचे उद्दिष्ट साध्य करता आले. दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी शत्रूने मोठा गोळीबार करण्यास प्रारंभ केला. साळवी यांच्या डोक्याला गोळी लागली, तरीही युद्धभूमीवरून परत जाण्यास त्यांनी नकार दिला व ते चिवटपणे बंदूक चालवीत राहिले. या युद्धातील बळीराम साळवी यांच्या अतुलनीय धैर्य व पराक्रमासाठी त्यांना 'वीरचक्रा'ने गौरविण्यात आले.



## साळवे, कचरू येडू

**भूसेना – हवालदार**

**वीरचक्र**

**१५ जानेवारी १९५१**

कचरू येडू साळवे यांचा जन्म औरंगाबादमधील सेवर या गावी झाला. दि. १५ जानेवारी १९६९ रोजी ते सैन्यात दाखल झाले.

दि. १० डिसेंबर १९७१ च्या रात्री महार रेजिमेंटने शत्रूच्या शकरगढ क्षेत्रातील प्रमुख स्थानांवर वर्चस्व प्रस्थापित केले. परंतु सुरुंग पेरलेल्या या क्षेत्रात अनेक भारतीय सैनिकांना वीरमरण आले होते. त्यांचे मृतदेह युद्धभूमीवर पडून होते.

दिवस उजाडल्यावर लक्षात आले की, त्यांच्यापैकी एक जवान अजून जिवंत आहे. मृतदेहांना तेथून बाहेर काढणे खूप कठीण झाले होते; कारण शत्रूकडून गोळीबार सुरूच होता. अशा स्थितीत तो जखमी जवान आणखी काही काळ तिथेच पडून राहिला असता, तर तो वाचणे कठीण होते.

साळवे यांनी ते ओळखून मोठ्या धाडसाने सुरुंगभूमीवर पाऊल ठेवले. त्यांनी एका पाठोपाठ एक मृतदेह बाहेर काढण्यास सुरुवात केली.

शत्रूकडून मध्यम मशीनगनमधून गोळीबार सुरूच होता; मात्र शत्रूच्या बंदुकीच्या माऱ्याला न जुमानता साळवे यांनी त्या जखमी जवानाला छावणीत सुरक्षित आणण्यात यश मिळवले. या प्रसंगी हवालदार साळवे यांनी कमालीची बहादुरी व दृढता दाखवली, त्यासाठी त्यांचा 'वीरचक्रा'ने सन्मान करण्यात आला.



## साळुंके, लक्ष्मण सिदू

**भूसेना – सुभेदार मेजर, मानद कॅप्टन**

**वीरचक्र**

**२३ मार्च १९२२**

लक्ष्मण सिदू साळुंके यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील वराडे या गावात झाला. दि. २३ मार्च १९४२ रोजी एकोणिसाव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीत ते दाखल झाले.

स

दि. १८ सप्टेंबर १९६५ या दिवशी झामन येथील एक महत्त्वपूर्ण भाग ताब्यात घेण्याची जबाबदारी मराठा रेजिमेंटवर सोपवण्यात आली होती. साळुंके त्या वेळी दुसऱ्या फळीत होते. शत्रूने मशीनगनच्या साह्याने जोरदार हल्ला चढवला. लहान शस्त्रांचाही शत्रूकडून मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. त्यामुळे ६० सैनिकांच्या राखीव तुकडीचा वापर करून शत्रूला नेस्तनाबूत करण्याचे आदेश सुभेदार साळुंके यांना देण्यात आले. साळुंके यांनी आपल्या सैनिकांना शत्रूवर तुटून पडण्याच्या सूचना दिल्या. साळुंके यांच्यासह सर्व सैनिकांनी प्रयत्नांची शर्थ करून शत्रूच्या सोळा सैनिकांना यमसदनी धाडले, तर नऊ जणांना बंदी केले. शत्रूचे अन्य सैनिक पळून गेले. साळुंके यांच्या साहसामुळे सैनिकांना उद्दिष्ट साध्य करण्यात यश आले.



## साळुंके, सदानंद बळवंत

**भूसेना – कर्नल**

**वीरचक्र**

**१२ मे १९३७**

सदानंद बळवंत साळुंके यांचा जन्म धुळे येथे झाला. पुण्यातल्या मॉडर्न विद्यालयामध्ये त्यांनी शालेय शिक्षण घेतले. पुण्यातल्याच कृषी महाविद्यालयातून त्यांनी कृषी विषयात एम.एस्सी.ची पदवी मिळवली. दि. ३० जून १९६३ रोजी ते लष्करात दाखल झाले.

सहाव्या मराठा लाइट इन्फन्ट्रीत मेजरपदी असताना त्यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. १९७१ च्या भारत-पाक युद्धात दि. १० डिसेंबर रोजी शत्रूच्या काही ठिकाणांवर हल्ला करण्याचे आदेश त्यांना देण्यात आले होते. मेजर साळुंके यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत शत्रूच्या तीन तळांवर ताबा मिळवला. शत्रूकडून जोरदार बॉम्बफेक आणि गोळीबार होत असतानाही ते पुढे-पुढे जात राहिले.

आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्यांनी अत्यंत वेगाने शत्रूवर प्रतिहल्ला चढवला आणि आपल्या लक्ष्याचा अचूक भेद केला. मोहीम फत्ते करताना शत्रुपक्षातील अनेक सैनिकांना त्यांनी गारद केले. या मोहिमेत त्यांच्या पुढाकाराचे आणि नेतृत्वगुणांचे प्रदर्शन घडले.

## सुर्वे, अप्पासाहेब दादासाहेब

**भूसेना – मेजर**

**वीरचक्र**

**२ जून १९३९**

अप्पासाहेब दादासाहेब सुर्वे यांचा जन्म मुंबई येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी शाळा, तसेच महाविद्यालयीन



शिक्षण सर परशुरामभाऊ महाविद्यालय आणि कोल्हापुरातील वाणिज्य महाविद्यालयात झाले. शकरगढ लढाईमध्ये मेजर अप्पासाहेब सुर्वे हे गोरखा रायफल्सच्या तुकडीचे नेतृत्व करत होते. अत्यंत धैर्याने आणि स्वत:च्या जिवाची पर्वा न करता त्यांनी दबा धरून बसलेल्या शत्रूला वेढा घातला. या वेळी सुर्वे यांना खंदकात ठेवलेल्या मशीनगन्स आणि शस्त्रसाठा हाती लागला. शत्रूकडून झालेले दोन हल्ले परतवून लावून आणि इतर संकटांची पर्वा न करता ते आपल्या कामगिरीच्या जागी अढळ राहिले.


त्यानंतर मात्र परिस्थिती अत्यंत बिकट झाल्याचे लक्षात येताच त्यांच्या कमांडिंग ऑफिसरने सुर्वे यांना माघार घेण्याची आज्ञा दिली. सैनिक माघार घेत असताना सुर्वे स्वत: मागे थांबले. शत्रूकडूनही मध्यम पल्ल्याच्या मशीनगनमधून गोळीबार सुरूच होता. गोळी लागून सुर्वे यांच्या मांडीला जबर जखम झाली, तरीही पूर्ण तुकडी निघून जाईपर्यंत त्यांनी शत्रूवर गोळीबार करून तुकडीतील सैनिकांना संरक्षण दिले.

शत्रूच्या जोरदार गोळीबारास न जुमानता आपल्या वैयक्तिक धैर्याने व चिकाटीने त्यांनी आपल्या सैनिकांना दृढतेने प्रेरित करून लक्ष्य गाठण्यास उद्युक्त केले. या मोहिमेत मेजर सुर्वे यांनी उच्च प्रतीच्या शौर्याचे व नेतृत्वाचे प्रदर्शन केले.

* * *

स

# श



**शर्मा, सतीशचंद्र डी.**
**वायुसेना - विंग कमांडर**
**वीरचक्र**
**२१ डिसेंबर १९४८**

सतीशचंद्र डी. शर्मा यांचा जन्म नागपूर येथे झाला. दि. २० डिसेंबर १९६९ रोजी त्यांची वायुसेनेत नियुक्ती करण्यात आली.

१९७१ च्या पाकिस्तान युद्धामध्ये फ्लाइंग ऑफिसर सतीश शर्मा पूर्व विभागाच्या ब्रिगेडसोबत होते. शत्रूने वेढा दिलेल्या सिल्हेटवर शर्मा यांनी दि. ७ डिसेंबर रोजी हेलिकॉप्टरने मागच्या बाजूने हल्ला चढविला. शत्रूकडून सातत्याने गोळीबार सुरू होता.

शत्रूच्या या भीषण गोळीबाराची तमा न बाळगता मागून येणाऱ्या हेलिकॉप्टर्सना त्यांनी शत्रूच्या ठिकाणांची अचूक माहिती दिली. त्याचा वापर करून शत्रूची मारा करण्याची क्षमता भारतीय वायुसेनेने नष्ट केली. त्यामुळे शत्रूला दुसऱ्या दिवसापर्यंत गोळीबार करता आला नाही.

शत्रूने पुन्हा गोळीबार सुरू केला. त्याला न जुमानता शर्मा यांचे हेलिकॉप्टर पुन्हा एकदा आकाशात झेपावले.

ते निर्देशित स्थानापर्यंत पोहोचले आणि शत्रूच्या ठिकाणांची योग्य माहिती त्यांनी भारतीय वायुसेनेपर्यंत पोहोचवली. त्यामुळे आपल्या बॉम्बफेकी विमानांना शत्रूच्या ठिकाणांचा वेध घेता आला.

दि. ८ डिसेंबर रोजी शर्मा यांची गाठ शत्रूच्या गस्ती पथकाशी पडली. भूसेनेच्या युद्धाची फारशी कल्पना नसतानाही शर्मा यांनी पुढाकार घेत शत्रूच्या गस्ती पथकावर हल्ला चढविला.

त्यांच्या या उत्फूर्त आणि त्वरित कारवाईने शत्रूच्या दोघा अधिकाऱ्यांना त्यांनी यमसदनी पाठविले. त्यानंतरही ते शत्रूच्या ठिकाणावर हवाई हल्ले करतच राहिले. त्यामुळे शत्रूची धांदल उडाली. त्यांनी भारतावर हल्ला करण्याच्या उद्देशाने केलेली तयारी पूर्णपणे कोलमडली.

फ्लाइंग ऑफिसर शर्मा यांच्या या कामगिरीबद्दल दि. ९ डिसेंबर १९७१ रोजी त्यांना ‘वीरचक्र’ देऊन गौरविण्यात आले. आता ते आग्रा येथे स्थायिक झाले आहेत.



## शहाणे, शिवाजी वासुदेव

**वायुसेना - ब्रिगेडियर**

**वीरचक्र**


**१५ जून १९२०**

शिवाजी वासुदेव शहाणे यांचा जन्म नागपूर येथे झाला. दि. १ डिसेंबर १९४१ रोजी ते वायुसेनेत दाखल झाले. ते आर्टिलरी रेजिमेंटमध्ये मेजर होते. दि. १४ डिसेंबर १९४८ रोजी बतोत आणि बागसार इथे असलेले शत्रूचे तळ शोधून काढण्याचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आले होते. लगेच विमान घेऊन मेजर शहाणे कामगिरीवर निघाले.

शत्रुपक्षाच्या भूभागावर हवाई टेहळणी करत असताना त्यांच्या विमानाला विमानविरोधी हल्ल्याला सामोरे जावे लागले. मात्र स्वत:च्या जिवाची पर्वा न करता त्यांनी शत्रूचा तोफखाना शोधून काढला आणि त्यावर मारा केला.

टेहळणी करणे कठीण झाल्यामुळे ते परत फिरले आणि पडताळा घेण्यासाठी पुन्हा हवाई निरीक्षण करू लागले. शत्रूच्या विमानवेधी तोफांनी त्यांच्यावर मारा सुरू केला; परंतु त्यांनी तो निकामी केला. नंतर शहाणे यांनी शत्रूच्या तोफांचे अन्य दोन तळ शोधून काढले.

अशा प्रकारे आपल्या निर्भयतेने, धडाडीने व चिकाटीने दर्शविलेल्या हवाई कौशल्याने त्यांनी शस्त्रविहीन विमानातूनही आपले उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले.



## शिंगे, वैजनाथ तुलसीराम

**वायुसेना - पॅराट्रूपर**

**वीरचक्र**

**२८ जानेवारी १९४२**


वैजनाथ तुलसीराम शिंगे यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील नागराळ या गावात झाला. वयाच्या अठराव्या वर्षी म्हणजे दि. २८ जानेवारी १९६२ रोजी ते सैन्यात रुजू झाले.

दि. ११ डिसेंबर १९७१ च्या रात्री पॅराट्रूपर वैजनाथ शिंगे पॅराशूट रेजिमेंटच्या रॉकेट लॉन्चर तुकडीमध्ये कार्यरत होते. ही तुकडी पूर्व क्षेत्रामध्य संरक्षणाचे काम करत होती.

सदर तुकडी आपल्या कामगिरीच्या जागी हजर झाली. तेथेच त्यांना शत्रूचे सैन्य दिसले. पॅराट्रूपर शिंदे यांनी क्षणाचाही विलंब न लावता, शत्रुसैन्य सावध होण्याअगोदरच शत्रूच्या वाहनांवर गोळीबार केला. यामध्ये शत्रूसैन्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आणि २३ शत्रूसैनिकांना कंठस्नान घातले गेले. शिंगे जिथे दबा धरून बसले होते, त्या आघाडीच्या खंदकासमोर त्यांच्या तुकडीचे कमांडर अचानक जखमी होऊन पडले. त्या वेळी शिंगे यांनी आपल्या प्राणांची

श

पर्वा न करता खंदकातून बाहेर येऊन कमांडरना सुरक्षित ठिकाणी नेले. या वेळी शत्रूच्या एका गोळीने त्यांचा वेध घेतला. परंतु तशाच जखमी अवस्थेत शत्रूला पूर्णपणे परतवून लावेपर्यंत आपल्या जागेवर अढळ राहून त्यांनी अतुलनीय शौर्य गाजवले. त्यांच्या या पराक्रमासाठी त्यांचा 'वीरचक्र' प्रदान करून सन्मान करण्यात आला.



**शिंदे, अशोक प्रतापराव**
**वायुसेना - स्कॉड्रन लीडर**
**वीरचक्र**
**३ डिसेंबर १९३६**

अशोक प्रतापराव शिंदे यांचा जन्म पुणे येथे झाला. दि. ७ फेब्रुवारी १९५९ पासून त्यांनी भारतीय वायुसेनेत सेवा करण्यास सुरुवात केली.

पाकिस्तान युद्धादरम्यान डिसेंबर १९७१ मध्ये अशोक शिंदे यांनी आपल्या भूसेनेच्या मदतीसाठी आखण्यात आलेल्या अनेक मोहिमांत भाग घेतला. यांतील दोन प्रसंगी त्यांच्यावर छांब-जौरी यां भागांतील शत्रूची आगेकूच थोपवण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

या हल्ल्यांदरम्यान त्यांच्यावर विमानविरोधी तोफांनी जबरदस्त मारा चालवला होता. अशा वेळी आपल्या जिवाची पर्वा न करता त्यांनी आपल्या तुकडीचे नेतृत्व करत शत्रूचे सात रणगाडे आणि २७ वाहने नष्ट केली. ही कामगिरी परिणामकारक ठरली व त्या विभागात आपल्या सैन्यावरील दबाव कमी करण्यात यश मिळाले.

या मोहिमेदरम्यान अशोक शिंदे यांनी धाडस, जिद्द आणि नेतृत्वगुणांचे अत्युच्च प्रदर्शन घडविले. या कामगिरीबद्दल त्यांना दि. १७ डिसेंबर १९७१ रोजी 'वीरचक्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



**शिंदे, शांताराम रामचंद्र**
**भूसेना - हवालदार**
**वीरचक्र**
**१५ जुलै १९४० - १७ नोव्हेंबर १९६५**

शांताराम रामचंद्र शिंदे यांचा जन्म रत्नागिरी तालुक्यातील हवेली या खेड्यात झाला. दि. १६ जुलै १९५७ रोजी वयाच्या सतराव्या वर्षी ते सैन्यात दाखल झाले.

युद्धविरामानंतरही राजस्थानच्या भागामध्ये घुसखोरी करणाऱ्या शत्रूचा बीमोड करणाऱ्या तुकडीचे नेतृत्व हवालदार शांताराम शिंदे करीत होते. आपल्या निश्चित लक्ष्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांनी शत्रूकडील प्रचंड शस्त्रे आणि स्वयंचलित बंदुका

यांचा विचार न करता अत्यंत वेगाने शत्रूवर हल्ला करून, एकट्याने शौर्य गाजवून शत्रूचे दोन खंदक उद्ध्वस्त केले. शत्रूच्या हलक्या मशीनगनला त्यांच्या हालचालीची खबर मिळाली व त्याने (शत्रूने) प्रतिकार केला. शांताराम शिंदे हे तेव्हा शत्रूच्या खंदकांपर्यंत सरपटत जाऊन हातबॉम्ब पेरण्याचे काम करत होते. हे काम करत असतानाच हातबॉम्बचा स्फोट होऊन शिंदे मृत्युमुखी पडले.

शिंदे यांनी आपली कामगिरी बजावताना शत्रूच्या अनेक सैनिकांना कंठस्नान घातले आणि अनेकांनी शरणागती पत्करली. अतुल्य शौर्य, योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि आपल्या कामावरील निष्ठा या गुणांच्या सामर्थ्यावर त्यांनी आपल्या मातृभूमीची सेवा केली.



**शेटे, एम. वाय.**
**भूसेना – लेफ्टनंट कर्नल**
**वीरचक्र**
**१३ मे १९४३**

एम.वाय. शेटे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील बारामती येथे झाला. पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यावर दि. १३ मे १९४३ पासून त्यांनी सैन्याच्या पहिल्या ग्रेनेडियर्स तुकडीमध्ये सेवा करण्यास सुरुवात केली.

दि. ११ फेब्रुवारी १९४८ रोजी कॅप्टन शेटे यांना त्यांच्या कंपनीवर शत्रूचा जोरदार हल्ला झाला असून कंपनीकडील दारूगोळा कमी पडत असल्याची बातमी मिळाली. त्यांनी ताबडतोब त्यांच्याजवळील दोन तुकड्या एकत्र केल्या व दारूगोळ्याच्या दोन राखीव पेट्या घेऊन आगेकूच केली. त्यांनी एका तुकडीला पिछाडी सांभाळण्याची सूचना दिली व दुसऱ्या तुकडीसह शत्रूच्या जोरदार गोळीबाराला न जुमानता ते मोकळ्या मैदानात पुढे सरकू लागले. शत्रूने त्यांची दिशा अचूक पकडली व त्यांनी बारीकशी हालचाल करताच तीन दिशांनी जोरदार गोळीबारास सुरुवात केली.

अशा परिस्थितीत त्यांनी एक तास आपली बाजू धरून ठेवली. दरम्यान त्यांचे दोन जवान जखमी झाले. तरीदेखील त्यांनी टेहळणी तुकडीपर्यंत दारूगोळा पोहोचवला. त्यामुळे त्यांच्या कंपनीला झालेले नुकसान भरून काढण्यात यश आले. आपल्या जिवाची पर्वा न करता त्यांनी दीर्घकाळ शत्रूच्या जवळ मोर्चा धरून ठेवला व आपल्या कंपनीला दारूगोळा पुरवण्यात यश मिळवले.

त्यांच्या या धाडसामुळे व कौशल्यामुळे या मोहिमेत यश मिळविणे आपल्या सैन्याला शक्य झाले. त्यांच्या या पराक्रमासाठी दि. ११ फेब्रुवारी १९४८ रोजी त्यांना ‘वीरचक्र’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



✻ ✻ ✻

सहस्रबुद्धे यांची तुकडी सीमा भागाकडे रवाना केली. त्या वेळी ए.एस.सी.ची तुकडी जालंधरमध्ये, तिथून पठाणकोट आणि पुढे चालत जम्मू-काश्मीरमध्ये गेली. या तुकडीकडे त्या वेळी जनावरांच्या वाहतुकीचे काम होते. या तुकडीमधून सहस्रबुद्धे जम्मूहून अखनूर, नवशेराला गेले. नवशेरात पाकिस्तानी सैन्याशी झालेल्या दोन मोठ्या चकमकींमध्ये सहस्रबुद्धे सहभागी होते.

१९४८ च्या जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांत झालेल्या लढायांमध्ये सहस्रबुद्धे यांच्या तुकडीने पाकिस्तानी सैन्याला पराभूत केले.

त्यानंतर १९४९ मध्ये त्यांची लखनौमध्ये पुरवठा विभागात बदली झाली. त्या वेळी ते लेफ्टनंट या पदावर होते. तेथील नेहमीचे काम सुरू असतानाच मूलभूत प्रशिक्षणासाठी त्यांना बरेलीला पाठवण्यात आले. १९५१ मध्ये त्यांना कॅप्टन या पदावर बढती मिळून त्यांची बंगलोर येथे बदली झाली. तेथे नव्याने भूसेनेत भरती होणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देण्याचे काम सहस्रबुद्धे यांच्यावर सोपवण्यात आले. तेथून पुढे दिल्लीत 'ग्राउण्ड लीझ ऑफिसर' म्हणून त्यांची बदली झाली. त्याच वेळी जपानी भाषा व संस्कृतीच्या आकर्षणापोटी त्यांनी संरक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून जपानी भाषेचे विशेष प्रशिक्षण घेतले. दोन वर्षे पूर्ण वेळ चाललेल्या या प्रशिक्षणानंतर त्यांची १९५७ मध्ये संरक्षण मंत्रालयाने जपानी भाषेचे अधिकृत भाषांतरकार म्हणून नियुक्ती केली.

१९६० मध्ये पुन्हा त्यांची जम्मूत बदली झाली. तीन वर्षांनंतर त्यांची बदली बरेलीत झाली. बरेलीतच तीन महिन्यांचा ए.एस.सी.चा वरिष्ठ पदाचा प्रशिक्षणक्रम त्यांनी पूर्ण केला. त्यानंतर तेथेच त्यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली.

१९६० च्या जुलै महिन्यात त्यांना संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेमधील भारताच्या सैन्य तुकडीतून काँगो येथे पाठवण्यात आले. तेथे त्यांच्यावर हवाई वाहतूक विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली. चौदा महिन्यांच्या मुक्कामानंतर १९६१ मध्ये भारतात परत आल्यावर सिमला येथे त्यांची नियुक्ती झाली. चीनबरोबरचे युद्ध १९६२ मध्ये सुरू झाले. या युद्धात यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी निरीक्षक म्हणून त्यांच्या तुकडीला सीमेवर पाठवण्यात आले होते.


१९६४ मध्ये पुण्यातल्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंगमध्ये त्यांनी चार महिन्यांचा पेट्रोलियम विषयातील प्रशिक्षणक्रम पूर्ण केला. त्यानंतर त्यांची बदली मुंबई व तेथून पुढे तेजपूरला झाली. तेथूनच त्यांनी ब्रह्मदेशाला भेट दिली. ब्रह्मदेश भेटीनंतर १९६७ मध्ये त्यांना लेफ्टनंट कर्नल पदावर बढती मिळाली. त्या वेळी नव्या आलेल्या टँक ट्रान्सपोर्टवर ट्रेनिंग सुरू होते. पुढे १९७१ च्या पाकिस्तानबरोबरच्या युद्धात हेच युनिट वापरले गेले. येथील दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर त्यांना कॉलेज ऑफ कॉम्बॅट मध्ये वरिष्ठ अधिकारी प्रशिक्षण देण्यात आले.

१९७१ च्या पाकविरूद्धच्या युद्धात त्यांची रवानगी पंजाबात झाली. १९७३ मध्ये दिल्ली येथील सेना मुख्यालयात 'आर्मी सर्व्हिस कॉर्प्स'चे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. येथे त्यांनी समन्वय विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.

त्यांना ब्रिगेडियर म्हणून १९७४ मध्ये बढती मिळाली आणि सेनादलांच्या पुरवठा आणि वाहतूक विभागाचे सहसंचालक म्हणून त्यांची जम्मूत नियुक्ती झाली. खरे तर लेफ्टनंट कर्नल पदानंतर कर्नल पदावर पदोन्नती होते. परंतु यशवंत सहस्रबुद्धे यांना थेट ब्रिगेडियरपदी पदोन्नती मिळाली. त्यानंतर जानेवारी १९७५ मध्ये लखनौ येथे आणि १९७७ मध्ये पुन्हा दिल्ली येथे सेना मुख्यालयात त्यांची नियुक्ती झाली.

यशवंत सहस्रबुद्धे यांना १९७८ मध्ये मेजर जनरल पदावर पदोन्नती मिळाली आणि त्यानंतर १९७९ पासून 'आर्मी सर्व्हिस कॉर्प्स'चे कर्नल कमांडंट म्हणून त्यांनी निवृत्तीपर्यंत काम पाहिले.

मार्च १९८१ मध्ये त्यांना लेफ्टनंट जनरलपदी पदोन्नती मिळाली आणि त्यांची सेनादलांच्या पुरवठा



# परिशिष्ट - १



## खानोलकर, सावित्री विक्रम

**परमवीरचक्राची निर्माती**


**२० जुलै १९१३ - २६ नोव्हेंबर १९९०**

युद्धामधील शौर्यासाठी देण्यात येणाऱ्या 'परमवीरचक्र' या पदकाची निर्मिती एका स्त्रीने केली आहे! शत्रूबरोबर लढताना दाखविलेल्या शौर्याबद्दल देण्यात येणाऱ्या सर्वोच्च पदकाची रचना करण्याची जबाबदारी स्वातंत्र्याप्राप्तीनंतर लगेचच, ॲडज्युटंट जनरल, मेजर जनरल हिरालाल अटल यांनी, सौ. सावित्री खानोलकर यांच्यावर सोपविली. सौ. खानोलकरांचा संस्कृत व वेदान्ताचा गाढा अभ्यास होता व त्यांना भारतीय पौराणिक कथांबद्दल सखोल माहिती होती. सौ. खानोलकरांची, रचनाकार म्हणून केलेल्या निवडीमुळे, पदकांच्या निर्मितीत भारतीय शैली प्रतिबिंबित होईल, असे त्यांना वाटले. सावित्रीबाई चित्रकार व कलाकारही होती. मेजर जनरल विक्रम खानोलकरांची ती पत्नी होती. भारतीय पौराणिक कथांबद्दल तिला असलेली ओढ आणि तिच्यातील एका कलाकाराची प्रगल्भता यांमुळे ह्या पदकाची निर्मिती करण्यासाठी तिची केलेली निवड अत्यंत समर्पक ठरली. तिने जे 'पदक' निर्माण केले, ते खरोखरच उत्कृष्ट आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे सावित्रीबाई जन्माने भारतीय नव्हत्या. तिची आई रशियन व पिता हंगेरियन होते. 'इव्हा ह्योन्ने लिन्डा मादे दी मारोस' हे तिचे मूळ नाव होते. तिचा जन्म स्वित्झर्लंडमध्ये झाला. इव्हाला लहानपणापासून भारताचे व सर्व भारतीय गोष्टींचे आकर्षण होते. हिवाळी खेळांचे आकर्षण असलेली ती एक अतिशय धडाडीची व सुंदर मुलगी होती.

१९२९ च्या हिवाळ्यात, चार्गोनिक्स येथे स्कीईंग करत असताना, तिची 'सिख रेजिमेंट' मधील विक्रम खानोलकर या सँडहर्स्टमध्ये सैनिकी शिक्षण घेणाऱ्या तरुणाशी गाठ पडली. ते एकमेकांच्या प्रेमात पडले, पण आई - वडिलांच्या विरोधाची धार बोथट व्हायला, दोन वर्षांचा काळ लागला.

१९३२ मध्ये इव्हा हिंदुस्थानात आली. तिने हिंदू धर्म स्वीकारला व कॅप्टन विक्रम खानोलकर, ह्या उमद्या तरुणाबरोबर तिचा विवाह झाला. तिला भारताचे आकर्षण होतेच. त्यामुळे इथल्या चालीरीती तिने लगेचच आत्मसात केल्या व सेनादलातील अधिकाऱ्याची पत्नी म्हणून लगेचच रुळली. सावित्रीबाई खानोलकर यांच्यावर हिंदू तत्त्वज्ञानाचा विलक्षण पगडा होता. पाटणा विद्यापीठात



परमवीरचक्र

त्यांनी हिंदी व संस्कृतचा अभ्यास केला, तसेच खूप रुची असल्यामुळे त्यांनी भारतीय संगीत व कथ्थकली नृत्याचाही अभ्यास केला. हिंदी, संस्कृत व मराठी भाषा त्यांनी चांगल्या आत्मसात केल्या. ती एक प्रतिभासंपन्न चित्रकार होती. तिने चितारलेल्या अनेक कलाकृतींमध्ये हिंदू तत्त्वज्ञान व वेदांतील मूल्ये प्रतीत होतात.

रामकृष्ण मिशनच्या सामाजिक कार्यामध्ये तिने हिरीरीने भाग घेतला. तसेच सेनादलातील जवानांच्या व त्यांच्या कुटुंबीयांसाठीच्या कल्याणकारी प्रकल्पांत, तिने काम केले. 'उत्तर-भारत फ्लाईंग क्लब'मध्ये भाग घेणारी, ती पहिली स्त्री होती. उदय शंकर यांच्याकडूनही तिने नृत्याचे धडे घेतले. तिने लिहिलेल्या पुस्तकांमध्ये 'संस्कृत डिक्शनरी ऑफ नेम्स्', 'सेंटस् ऑफ महाराष्ट्र' आणि तिच्या अप्रकाशित आत्मचरित्राचे दोन खंड यांचा समावेश आहे.

दधिची ऋषींनी 'वज्र' या अमोघ अस्त्राच्या निर्मितीसाठी आपल्या प्राणांचे बलिदान केले. शत्रूचा नाश करण्यासाठी बनवलेल्या या अस्त्रामध्ये, त्यांच्या मांडीच्या हाडाचा वापर केला होता. सावित्रीबाईंनी पदकाच्या रचनेमध्ये वज्राच्या जोडीचा वापर केला. प्रत्येक बाजूला शिवाजीची 'भवानी' तलवार चित्रित केली. तिच्या रचनेस मान्यता मिळाली. अशा प्रकारे 'परमवीर चक्र' पदक आकारास आले.

पहिल्या 'परमवीरचक्रा'ने सन्मानित झालेले कुमाऊँ पलटणीतील मेजर सोमनाथ शर्मा हे सावित्रीबाईंच्या मुलीचे दीर होते. १९४७-४८ च्या भारत - पाकिस्तानमधील 'काश्मीर' युद्धात दाखवलेल्या शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल त्यांना हा सन्मान मिळाला. परमवीरचक्राचा हा पहिला मानकरी त्यांचा नातेवाईकच असेल, हे त्यांनी स्वप्नातही कल्पिले नसेल.

मेजर जनरल विक्रम खानोलकर यांच्या १९५२ मध्ये झालेल्या निधनानंतर सावित्रीबाईंनी रामकृष्ण मठामध्ये संन्यासाश्रम स्वीकारला. पुढील जीवन त्यांनी संन्यासीनी म्हणून व्यतित केले.

– संपादित

**संदर्भ :**

*१. मेजर जनरल कारडोझो, इयान, अनुवादक- लेले ज्योत्स्ना 'परमवीरचक्र - रणांगणावरील आपले महान योद्धे'; एप्रिल २००८.*

*२. http://www.tribuneindia.com/1999/99june20/sunday/head2.htm*

## दामले शिवरामपंत


**कॅप्टन –**

**१५ एप्रिल १९०० – २५ जुलै १९७७**

**☞ मुख्य नोंद – क्रिडा खंड**

पुणे येथील अनेक नावाजलेल्या क्रीडा संस्थांपैकी एक महाराष्ट्र मंडळ. शिवरामपंत दामले या आसामीने हे मंडळ उभारले इ. स. १९०० मधल्या हनुमान जयंतीच्या दिवशी जन्मलेल्या शिवरामपंतांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालय, तर महाविद्यालयीन शिक्षण सर परशुरामभाऊ महाविद्यालय पुणे येथे झाले. दामले कुटुंबीय मुळचे रत्नागिरीतील कोळंबे गावचे. परंतु वडिलांसमवेत ते व कुटुंब पुणे परिसरात आणि नंतर पुण्यातील सदाशिव पेठेतील निबांळकर तालमीच्या परिसरातील वाड्यात वास्तव्यास आले. पावसाळ्यातील लकडी पुलावरून मुठेच्या पुरात उड्या मारून ओंकारेश्वरापर्यंतचे अंतर वेगाने कापत जाणे हा त्यांचा छंद होता.

हळूहळू त्यांचा मित्र परिवार वाढत होता. दामल्यांनी आपल्या चार मित्रांसमवेत भारतीय खेळांचा प्रसार करण्याच्या हेतूने १९२७ साली महाराष्ट्र मंडळाची स्थापना केली. या कार्यात धर्मवीर 'भालाकार' ल.ब.भोपटकर यांनी मोलाची मदत त्यांना केली. मंडळाचे कार्य वाढत होते. अनेक तरूण मंडळात समाविष्ट होत होते. याच काळात दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले. तरूणांनी सैन्यात सामील व्हावे या हेतूने शिवरामपंतांनी तरूणांना आवाहन केले. या आव्हानास चांगला प्रतिसाद समाजाकडून मिळत होता. परंतु स्वत: सैन्यात नसताना लोकांना सैन्यात भरतीचे आवाहनाचा उद्योग हे करतात अशी टिका लोकांमधून व्हायला लागली. याला उत्तर त्यांनी कृतीतून देण्याचे ठरविले आणि वयाच्या बत्तीसाव्या वर्षी ते सैन्यात दाखल झाले. सैन्यात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार करत ते कॅप्टन पदावरून निवृत्त झाले. या काळात मंडळाची जबाबदारी त्यांच्या मित्रांनी यशस्वीपणे पार पाडली. सैनिकी सेवेत असताना त्यांना इंग्रजीचे महत्त्व जाणवले. त्यामुळे आपण एक इंग्रजी माध्यमाची शाळा महर्षीनगर पुणे येथील जमीन महाराष्ट्र मंडळास दिली. तेथे शिवरामपंतांनी १९५५ मध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली. या कालावधीत अनेक समाजोपयोगी उपक्रमांची सुरूवात मंडळात शिवरामपंतांनी केली. जसे क्रीडा कार्यकर्ते तयार करणारा मोफत शारिरीक शिक्षण वर्ग, सेंट जॉन ॲम्बुलन्सचा प्रथमोपचार वर्ग, रायफल शूटिंग रेंज, धर्मार्थ दवाखाना, अखिल महाराष्ट्र शारिरीक शिक्षण परिषद स्थापना त्यांनी केली. शारिरीक शिक्षणाची गरज आणि महत्त्व जाणून १ जुलै १९७७ साली त्यांनी चंद्रशेखर आगाशे हे शारिरीक शिक्षण देणारे पहिले महाविद्यालय सुरू केले. तत्कालीन सनातनींचा विरोध पत्करून मुलींना पोहण्याचे प्रशिक्षण प्रथमतः महाराष्ट्र मंडळात त्यांनी दिले.



## रानडे शरद गजानन

### संरक्षण क्षेत्रासाठी योगदान

भारतीय सैन्यात अधिकारी पदावर मराठी व्यक्ती फारशा आढळत नाहीत. सैन्यातील नोकरीविषयी गैरसमजामुळेच ही परिस्थिती आहे. त्यामुळेच मराठी युवकाचे आणि सैन्याचे समीकरण जुळणे दुरापास्तच ठरते. मराठी युवकांनी देशसेवेमध्ये मागे राहू नये, सैन्यदलातील मानाच्या अधिकाराच्या जागा भूषविण्याची संधी महाराष्ट्रातील युवकांना मिळावी या हेतूने पुण्यातील रानडे दांपत्याने गेली १९ वर्षे कसलीही आर्थिक अपेक्षा न ठेवता विद्यार्थ्यांना संपूर्ण मार्गदर्शन देण्याचे काम केले. या त्यांच्या विनामूल्य प्रशिक्षण शिबिरातून बाहेर पडलेले १०० अधिकारी देशसेवेत रुजू आले आहेत.

शरद गजानन रानडे आणि मंगला शरद रानडे असे या दांपत्याचे नाव असून दोघेही सत्तरीच्या पुढे आहेत. सैन्यदलाच्या सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये भरती होण्यासाठी पूर्वपरीक्षा आणि मुलाखत देऊन त्यात यशस्वी होणे अनिवार्य असते. त्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे प्रशिक्षण, लेखी परीक्षेची तयारी करून घेण्याचे काम रानडे दांपत्य करते. सर्वात महत्वाची बाब म्हणजे हे सर्व प्रशिक्षण विनामूल्य दिले जाते. मात्र एकत्र अट असते ती म्हणजे सैन्यात नोकरी करण्याची विद्यार्थ्याची मनापासून तयारी हवी त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेण्याची चिकाटी हवी. रानडे यांचा जन्म व शिक्षण दोन्ही महाराष्ट्रातच झाले. महाविद्यालयीन शिक्षण आणि नोकरीच्या निमित्याने ते महाराष्ट्राबाहेर गेले. केंद्र सरकारच्या नोकरीत असताना बहुतेक वास्तव्य दिल्ली आणि उत्तर भारतात झाले. त्याच काळात भारतीय सैन्यातील. मराठी अधिकाऱ्यांच्या उणीवेली त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. तेव्हाच त्यांनी मनाशी निश्चय केला की सेवानिवृत्तीच्या काळात मराठी मुलांमध्ये या विषयाची जागरूकता निर्माण करून त्यांना सैन्यात अधिकारी होण्याकरिता मार्गदर्शन करण्याचे समाजकार्य करावे.

नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर पुण्यात डहाणूकर कॉलनीत स्थायिक होऊन वरील कामास रानडे यांनी सुरुवात केली. सुरुवातीस विविध कार्यक्रमामध्ये या विषयी भाषणे व्याख्याने देत असताना त्यांना जाणवले की, नुसत्या व्याख्यानाने हे कार्य होत नाही. मग त्यांनी जवळपासच्या मुलांना गाठून, त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना व त्यांना पटवून मुले गोळा करण्यास सुरुवात केली. हे मार्गदर्शन विनामूल्य असल्याने त्यांच्या सोसायटीतंत्र. हे वर्ग घेण्याची परवानगी मिळाली. वर्ग संपल्यावर डहाणूकर कॉलनीतीलच मोकळ्या जागे *** मुळांचे सांघिक खेळ, व्यायाम वगैरेही घेणे त्यांनी सुरु केले. वर्गात ते मुलांना व्याख्यान देण्याचा सराव, समूह चर्चा, मुलाखतीचा सराव, सकारात्मक दृष्टीकोनाबद्दल मार्गदर्शन अशा प्रकारे तयारी करून घेत असत. तसेच रोजचे वर्तमानपत्र, नियतकालीके, सामाहिक वगैरे मुलांकडून वाचून घ्यायचे. लेखी परीक्षेविषयी पण मार्गदर्शन दिले.

परंतु ते गणित आणि सायन्स या विषयापुरते मार्गदर्शन असे. तेदेखील त्यांनी स्वयंअभ्यास करावा याची जाणीव करून देऊन त्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करीत असत. परीक्षेच्या आधी महत्त्वाच्या सूचनाही देत असत.

आमचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण वर्षभर चालत असे. दर दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या खेळांच्या स्पर्धा असायच्या. त्याचे आयोजन मुले स्वतःच करायची. दर सहामाही एकदोन मुले आरआयएमसी, एनडीएन, आयएमए वगैरे साठी निवडली जायची. त्यावेळी या यशस्वी मुलांचा व त्यांच्या पालकांचा निवृत्त सेनाधिकाऱ्याकडूनच सत्कार केला जात असे. त्याच समारंभात खेळांच्या स्पर्धात विजयी झालेल्यांचा बक्षिस समारंभ पण व्हायचा. या समारंभाचे आयोजन पण मुलेच करत असत. अशा तऱ्हेने आमच्या प्रशिक्षण वर्गात स्वयंविकासावरच जास्त भर दिला जायचा.

## वंजारी, सुरेश केशव

**भूसेना – कॅप्टन**

**संरक्षण क्षेत्रासाठी योगदान**

सुरेश केशव वंजारी यांचा जन्म सातारा येथे झाला. त्यांचे शिक्षण साताऱ्यातील प्रसिद्ध न्यू इंग्लिश शाळेत झाले. पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी पुढील शिक्षण घेतले.

१९६३ मध्ये शॉर्ट सर्व्हिस (इमर्जन्सी) कमिशन घेऊन ते सैन्यदलात दाखल झाले.

त्यांची प्रथम आसाम व मग पंजाबात नियुक्ती झाली. त्यांच्याकडे रस्ते बांधणे, सैन्यदलाला राहण्यासाठी जागा बांधणे हे काम प्रामुख्याने होते.

१९६८ मध्ये सेवाकाल संपल्यावर संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील माझगाव डॉक लि., मुंबई येथे ते रुजू झाले. त्यांनी सामग्री व्यवस्थापक, प्रशासकीय व्यवस्थापक अशा विविध पदांवर काम केले.

माझगाव डॉक व्यवस्थापन विकास केंद्र, राष्ट्रीय औद्योगिक अभियांत्रिकी संस्थान, रायगड सैनिकी शाळा इत्यादी अनेक ठिकाणी त्यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले.

अगदी प्रथम राहत्या घरीच त्यांनी स्वतःच्या नातेवाइकांनाच सैन्यदलांत जाण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यात यश मिळताच इतरांनी विचारणा केली. मग संख्या वाढत गेली, तरी स्वरूप छंदाचे होते. फी आकारली जात नव्हती. १९९३ मध्ये जवळजवळ ५० विद्यार्थ्यांनी सशुल्क मार्गदर्शनाची विचारणा केली. फी कळल्यावर केवळ पाच उरले. १९९५ पासून मात्र त्यांचे पूर्णपणे मार्गदर्शनाचे काम सुरू झाले. अगदी घराच्या 'गुरुकुल' नावाला शोभेसे असे येथील वातावरण आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनीच 'कम्प्लीट व्हिक्टरी ॲण्ड अचीव्हमेंट' (सी.व्ही.ए)

असे क्लासचे नामकरण केले. या संस्थेमध्ये एन.डी.ए., सी.डी.एस. आणि संरक्षणविषयक इतर अभ्यासक्रमांसाठी मार्गदर्शन केले जाते. त्याचबरोबर हवाई सुंदरी, व्यापारी जहाज वाहतूक यांसारख्या क्षेत्रांत प्रवेश करू इच्छिणाऱ्यांना इथे मार्गदर्शन मिळते.

आतापर्यंत चार हजारांवर विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे. याशिवाय वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिन्या, आकाशवाणी इत्यादी माध्यमांतून 'डिफेन्स करिअर इज द बेस्ट ऑप्शन' या विषयावर त्यांनी विचार मांडले आहेत. अनेक शाळा-महाविद्यालये व सामाजिक संस्थांतून सुरेश वंजारी यांनी तरुणांना याच विषयावर मार्गदर्शन केले आहे.

त्यांच्या प्रशिक्षणातून सातत्याने, दरवर्षी ३० ते ३५ विद्यार्थी संरक्षणदलात ऑफिसर म्हणून निवडले जातात. सर्वांत जास्त म्हणजेच ५६ विद्यार्थी २००६ या वर्षी विविध अभ्यासक्रमांसाठी निवडले गेले आहेत. १९९३ ते २०१० या कालावधीत 'सी.व्ही.ए.'मधून प्रशिक्षण घेतलेले साडेतीनशेच्यावर विद्यार्थी सध्या सैन्यात विविध पदांवर काम करीत आहेत, त्यांत ४२ मुली आहेत.

बोइसर मिलिटरी स्कूल (ठाणे-तारापूर), रायगड मिलिटरी स्कूल (महाड), एकलव्य चॅरिटेबल ट्रस्ट यांचे ते संस्थापक विश्वस्त आहेत. त्याशिवाय अनेक सामाजिक संस्थांच्या कार्याशी ते निगडित आहेत.

टोपीवाला व्याख्यानमाला, कोकणस्थ ब्राह्मण सभा, कऱ्हाडे ब्राह्मणसभा, मन:शक्ती केंद्र इत्यादी अनेकांनी त्यांचा सन्मान केला आहे.

'वीरकुमार दोशी', 'चेंबूर वैभव', 'जनरल अरुणकुमार वैद्य' अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे.

– अनुराधा गोरे

* * *

# परिशिष्ट - २

## पदनामे आणि ज्येष्ठताक्रम
### भूसेना

१) जनरल
२) लेफ्टनंट जनरल
३) मेजर जनरल
४) ब्रिगेडियर
५) कर्नल
६) लेफ्टनंट कर्नल

*कमिशन्ड ऑफिसर*

७) मेजर
८) कॅप्टन
९) लेफ्टनंट

*ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर (जे.सी.ओ.)*

१०) सुभेदार मेजर
११) सुभेदार / रिसालदार
१२) नायब सुभेदार / नायब रिसालदार
१३) वॉरंट ऑफिसर (भूसेना टपाल सेवा)

*नॉन कमिशन्ड अधिकारी*

१४) रेजिमेंटल हवालदार मेजर (सध्या वापरात नाही.)
१५) रेजिमेंटल कार्टर मास्टर हवालदार (सध्या वापरात नाही.)
१६) कंपनी हवालदार मेजर / स्कॉर्डन दफादार
१७) शिपाई
(चिलखती दल / तोफखाना दलाची पदे)

* * *

### *'अ' वर्ग किंवा प्रथम वर्ग राजपत्रित पदे*
### *(ग्रूप 'ए' – क्लास वन गॅझेटेड)*

१) जनरल
२) लेफ्टनंट जनरल
३) मेजर जनरल
४) ब्रिगेडियर
५) कर्नल
६) लेफ्टनंट कर्नल
७) मेजर
८) कॅप्टन
९) लेफ्टनंट

### *'ब' वर्ग किंवा द्वितीय वर्ग राजपत्रित पदे*
### *(ग्रूप 'बी' – क्लास टू गॅझेटेड)*

१) सुभेदार मेजर (पायदळ) / रिसालदार मेजर (चिलखती– तोफखाना दले)
२) सुभेदार / रिसालदार
३) नायब सुभेदार / नायब रिसालदार



## वायुसेना

१) मार्शल ऑफ इंडियन एअर फोर्स
(मानद / युद्धकाळातील पद)
२) एअर चिफ मार्शल
३) एअर मार्शल
४) एअर व्हाईस मार्शल
५) एअर कमोडोर
६) ग्रूप कॅप्टन
७) विंग कमांडर
८) स्कॉर्डन लीडर
९) फ्लाईट लेफ्टनंट
१०) फ्लाईंग लेफ्टनंट
११) पायलट ऑफिसर (सध्या वापरात नाही.)

*ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर (जे.सी.ओ.)*

१२) मास्टर वॉरंट ऑफिसर
१३) वॉरंट ऑफिसर
१४) ज्युनिअर वॉरंट ऑफिसर

*एनलिस्टेड*

१५) सार्जंट
१६) कॉर्पोरल
१७) लीडिंग एअरक्राफ्टस्‌मन
१८) एअरक्राफ्टस्‌मन

* * *




## नौसेना

१) ॲडमिरल ऑफ द फ्लिट (मानद / युद्धकाळातील पद)
२) ॲडमिरल
३) व्हाईस ॲडमिरल
४) रिअर ॲडमिरल
५) कमोडोर
६) कॅप्टन
७) कमांडर
८) लेफ्टनंट कमांडर
९) लेफ्टनंट
१०) सब लेफ्टनंट

*ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर (जे.सी.ओ.)*
*व एनलिस्टेड ऑफिसर*

११) मास्टर चिफ पेटी ऑफिसर (प्रथम वर्ग) (फर्स्ट क्लास - जे.सी.ओ.)
१२) मास्टर चिफ पेटी ऑफिसर (द्वितीय वर्ग) (सेकंड क्लास - जे.सी.ओ.)
१३) चिफ पेटी ऑफिसर (जे.सी.ओ.)
१४) पेटी ऑफिसर
१५) लीडिंग सीमन
१६) सीमन १
१७) सीमन २

* * *



# परिशिष्ट – ३

## विविध पदकांची क्रमवारी

१. भारतरत्न
२. परमवीर चक्र *
३. अशोक चक्र *
४. पद्मविभूषण
५. पद्मभूषण
६. सर्वोत्तम युद्ध सेवा पदक *
७. परमविशिष्ट सेवा पदक *
८. महावीर चक्र *
९. किर्तीचक्र *
१०. पद्मश्री
११. सर्वोत्तम जीवन रक्षा पदक *
१२. उत्तम युद्ध सेवा पदक *
१३. अतिविशिष्ट सेवा पदक *
१४. वीरच्रक *
१५. शौर्यचक्र *
१६. राष्ट्रपती पदक (पोलीस व अग्नीशामक सेवा)
१७. राष्ट्रपतींचे पोलीस शौर्य पदक
१८. राष्ट्रपती शौर्य पदक (अग्नीशामक दल)
१९. राष्ट्रपती शौर्य पदक (तुरुंग प्रशासन)
२०. राष्ट्रपती शौर्य पदक (गृहरक्षक आणि नागरी संरक्षक दल)
२१. सेना/नौसेना/वायुसेना पदक *
२२. युद्ध सेवा पदक *
२३. विशिष्ट सेवा पदक *
२४. पोलीस शौर्य पदक
२५. अग्नीशामक दल शौर्य पदक
२६. तुरुंग प्रशासन शौर्य पदक
२७. गृहरक्षक आणि नागरी संरक्षण दलाचे शौर्यपदक
२८. उत्तम जीवन रक्षा पदक
२९. पराक्रम पदक *
३०. सर्वसाधारण सेवा पदक *
३१. सामान्य सेवा पदक *
३२. विशेष सेवा पदक *
३३. समर सेवा स्टार १९६५ *
३४. पूर्वी स्टार *
३५. पश्चिमी स्टार *
३६. ऑपरेशन विजय स्टार *
३७. सी.एस.एन. हिमनदी पदक *
३८. रक्षा पदक १९६५ *
३९. संग्राम पदक *
४०. ऑपरेशन विजय पदक *
४१. सैन्य सेवा पदक *
४२. अति उंचीवरील सेवा पदक *
४३. पोलीस पदक (अंतर्गत सेवा)
४४. पोलीस पदक (विशेष सेवा १९६२)
४५. विदेश सेवा पदक
४६. राष्ट्रपती पदक (पोलीस व अग्नीशामक दल –विशेष सेवा)
४७. राष्ट्रपती पोलीस पदक (विशेष सेवा)

४८. राष्ट्रपती पदक
(अग्नीशामक दल-विशेष सेवा)
४९. राष्ट्रपती पदक
(तुरुंग प्रशासन-विशेष सेवा)
५०. राष्ट्रपती पदक
(गृहरक्षक/नागरी संरक्षण दल)
५१. गुणवत्तापूर्ण सेवा पदक
५२. प्रदीर्घ सेवा/उत्तम कार्य पदक
५३. अग्नीशामक दल पदक
(गुणवत्तापूर्ण सेवा)
५४. तुरुंग प्रशासन पदक
(गुणवत्तापूर्ण सेवा)
५५. गृहरक्षक आणि
नागरी संरक्षण दल पदक
(गुणवत्तापूर्ण सेवा)
५७. जीवन रक्षा पदक
५८. प्रादेशिक सेना पदक
(डेकोरेशन)
५९. प्रादेशिक सेना पदक
६०. भारतीय स्वातंत्र्य पदक १९४७
६१. स्वातंत्र्य पदक १९५०
६२. ५०वा स्वातंत्र्य दिन पदक
६३. २५वा स्वातंत्र्य दिन पदक
६४. ३० वर्षीय सेवा पदक
६५. २० वर्षीय सेवा पदक
६६. ९ वर्षीय सेवा पदक
६७. राष्ट्रकुल पुरस्कार

*(* सदर पदके विविध युद्धातील आणि शांततेच्या काळातील सैनिकी सेवेसाठी देण्यात येतात.)*

# परिशिष्ट – ४

## अतिविशिष्ट सेवा पदकाचे मानकरी

| | |
|---|---|
| व्हाइस ॲडमिरल | अत्रे आर.व्ही. |
| मेजर जनरल | अहुजा इंद्रमोहन |
| ब्रिगेडिअर | आगा ए. ए. |
| ब्रिगेडिअर | इसार कृष्णदेव |
| रेअर ॲडमिरल | ऑदित्तो अरूण |
| एअर व्हाइस मार्शल | करकरे सुधीर आर. |
| ग्रुप कॅप्टन | कर्णिक एस. |
| रेअर ॲडमिरल | काटदरे वसंत महादेव |
| मेजर जनरल | कानिटकर आनंद जी. |
| मेजर जनरल | काबराजी आर.जे. |
| ब्रिगेडिअर | कामत एन.व्ही. |
| मेजर जनरल | कार्डोझो इयान |
| मेजर जनरल | किमार विनायक विजय |
| कमोडोर | किशनलाल |
| ब्रिगेडिअर | कुलभूषण |
| मेजर जनरल | कृष्णमूर्ती एस. |
| एअर व्हाइस मार्शल | कोचर गुरदीपसिंग |
| मेजर जनरल | खरे गोविंद नारायण |
| एअर व्हाइस मार्शल | गांधी ए.आर. |
| एअर कमोडोर | गोखले भूषण नीळकंठ |
| मेजर जनरल | गोखले रामकृष्ण अच्युत |
| | गोळे पी.व्ही. |
| लेफ्टनंट जनरल | चांदोरकर डी.के. |
| मेजर जनरल | चौधरी अशोककुमार |

| | |
|---|---|
| कमांडर | जोशी एन.डब्ल्यू. |
| जनरल | जोशी डी.सी. |
| मेजर जनरल | टिळक विजय वामन |
| ब्रिगेडिअर | डिकास्टा इ.एम.ए. |
| ब्रिगेडिअर | ढवळे व्ही.बी. |
| एअर मार्शल | ढेरे डी.एस. |
| रेअर ॲडमिरल | तनेजा एम.पी. |
| लेफ्टनंट जनरल | तुतकाने एम.ए. |
| रेअर ॲडमिरल | तेलंग अविनाश मंजूनाथ |
| मेजर जनरल | दिवाण अश्विनीकुमार |
| रेअर ॲडमिरल | देशपांडे दिलीप |
| एअर व्हाइस मार्शल | देसाई मनमोहन वामन |
| लेफ्टनंट जनरल | दोवेदी एस.के. |
| मेजर जनरल | धवन सुरेंदरकुमार |
| एअर व्हाइस मार्शल | धाम सतिशकुमार रामलाल |
| कमोडोर | धारेश्वर व्ही.ए. |
| रेअर ॲडमिरल | नदाफ निजाम अहमद |
| कमांडर | नाडकर जी.के. |
| ब्रिगेडिअर | नारूरकर पी.एच. |
| कमांडर | निल्लारी पुरनकंदी मुकुंदन |
| ब्रिगेडिअर | नोशीर बेराम ग्रँट |
| रेअर ॲडमिरल | परळीकर राजीव |
| मेजर जनरल | पलांडे के.एम. |
| मेजर जनरल | पवार विजय पांडुरंग |
| मेजर जनरल | पाटील शिवाजीराव |
| मेजर जनरल | पावरी एस.एन. |
| एअर मार्शल | पिंगळे पी.एस. |
| ब्रिगेडिअर | पित्रे के.जी. |
| ब्रिगेडिअर | प्रीतमपाल सिंग |

| | |
|---|---|
| ब्रिगेडिअर | बाळ शशी इंदरसिंग |
| एअर व्हाइस मार्शल | बेवूर केशव गोपाळ |
| कर्नल | बोस एन. |
| एअर कमोडोर | भगवन्नी एन.एस. |
| कमोडोर | भल्ला सतीशकुमार |
| ब्रिगेडिअर | भाटिया पी.एन. |
| मेजर जनरल | मधोक विजयकुमार |
| एअर मार्शल | महाडिक रमेशचंद्र |
| लेफ्टनंट जनरल | मांडे वाय.ए. |
| | माने शिवाजीराव नारायणराव (सहाय्यक महासंचालक, सीमा रस्ता संघटना) |
| मेजर जनरल | मिसाळ प्रकाश रामराव |
| मेजर जनरल | मीनवाला आदि गुस्तादजी |
| कमोडोर | मुखर्जी एस.एस.सी. |
| कर्नल | मुजुमदार एन. व्ही. |
| एअर कमोडोर | मेनेझिस एल. |
| ब्रिगेडिअर | मोदी पी.जे. |
| ब्रिगेडिअर | मोहरीर व्ही.जे. |
| मेजर जनरल | रणभिसे ए.डब्ल्यू. |
| एअर कमोडोर | रानडे एस.ए. |
| ब्रिगेडिअर | रामदास इद्याथुमंगलम् नारायण |
| मेजर जनरल | राव बी.एन. |
| एअर व्हाइस मार्शल | लिमये आर.डी. |
| मेजर जनरल | लिमये रत्नाकर |
| कमांडर | लेले मधुकर केशव |
| कर्नल | लोखंडे प्रमोद मनोहर |
| ब्रिगेडिअर | वाकणकर गोपाळ सीताराम |
| कमोडोर | शर्मा विनोदकुमार |
| एअर कमोडोर | शहाणे ए.एम. |
| लेफ्टनंट जनरल | शेकटकर दत्तात्रेय |

| | |
|---|---|
| कमोडोर | शेफर्ड डी.आर. |
| मेजर जनरल | शेर्लेकर पी.डी. |
| मेजर जनरल | श्रीखंडे एस.व्ही. |
| मेजर जनरल | सरदेशपांडे एस.सी. |
| मेजर जनरल | सरवटे अविनाश केशव |
| लेफ्टनंट जनरल | सातपुते सतीश भालचंद्र |
| लेफ्टनंट जनरल | सामंत सुरेश नरहर |
| मेजर जनरल | सावंत चंद्रशेखर दत्तात्रेय |
| ब्रिगेडिअर | साहुकार आदि के. |
| कमोडोर | सिन्हा संतोष के. |
| लेफ्टनंट जनरल | सुमनवार दीपक हरिश्चंद्र |

* * *



आपत्कालीन मदतकार्ये

# परिशिष्ट - ५

## संरक्षण विषयक संस्था

### शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास संस्था
### आर्मामेंट रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट एस्टाब्लिशमेंट (ए.आर.डी.ई.)
### पाषाण, पुणे

आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टाब्लिशमेंट (ए.आर.डी.ई.) ही संस्था पुणे येथे कार्यरत आहे. संरक्षण खात्याच्या डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डी.आर.डी.ओ.) या संस्थेची ए.आर.डी.ई. ही प्रमुख प्रयोगशाळा असून, तिथे पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या विकासाबाबत संशोधन चालते.

शस्त्रास्त्र निर्मिती क्षेत्रात स्वयंपूर्णता मिळविण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून १९५८ साली ए.आर.डी.ई.ची सुरुवात करण्यात आली. खडकी, पुणे येथील दारुगोळा कारखान्याच्या आवारातच अगदी प्राथमिक स्थितीत ए.आर.डी.ई.चा श्रीगणेशा झाला. खडकी दारुगोळा कारखान्याच्याच तांत्रिक विकास आस्थापनामधून व मध्य प्रदेश, जबलपूरच्या तशाच आस्थापनातून काही व्यक्तींना ए.आर.डी.ई. कडे वर्ग करण्यात आले.

१९६६ साली ए.आर.डी.ई. खडकीहून पुण्याच्याच परिसरातील पाषाण या ठिकाणी आणण्यात आली. सध्या ती तिथेच आहे. तिच्या शेजारीच नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ही महत्त्वाची प्रयोगशाळा आहे.

भारतीय सेनादलांसाठी पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या रचनेत व निर्मितीत सतत अद्ययावता राखणे, हे ए.आर.डी.ई. चे मुख्य काम आहे. तंत्रज्ञानात सतत संशोधन करून नवनवीन नमुने बनवणे, त्यांच्या कठोर चाचण्या घेऊन त्यांचे मूल्यांकन करणे व त्याबरहुकूम उत्पादन करण्यासाठी आयुधनिर्मिती कारखान्यांना त्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करणे, असे या कामातले विविध भाग आहेत. यात पुन्हा मूलभूत संशोधन व प्रत्यक्षोपयोगी संशोधन, नमुना निर्मिती व आवश्यक ते सॉफ्टवेअर बनवणे इत्यादी उपविभाग आहेतच.

आपल्या सेनादलाच्या वापरामध्ये विविध प्रकारची शस्त्रास्त्रे असतात. आपल्या शत्रूच्या तुलनेत वरचढ राहायचे असेल, तर जी शस्त्रास्त्रे सध्या सेनादलाच्या वापरात आहेतच, त्यांचे सतत अद्ययावतीकरण करीत राहणे व त्याद्वारे त्यांचे आयुष्य वाढेल असे पाहणे आवश्यक असते. तेव्हा हादेखील ए.आर.डी.ई. च्या कामाचाच एक भाग आहे. मात्र ए.आर.डी.ई. ही प्रयोगशाळा आहे, उत्पादन कारखाना नव्हे. त्यामुळे शस्त्रास्त्रांचे परिपूर्ण असे नमुने बनवणे;

त्याप्रमाणे प्रत्यक्ष उत्पादनासाठी आयुधनिर्माण कारखान्यांना संबंधित तंत्रज्ञान हस्तांतरित करणे; उत्पादनात आवश्यक ते साहाय्य करणे; उत्पादन प्रक्रियेवर लक्ष ठेवून उत्पादनाचा दर्जा उत्तम राहील हे पाहणे, हे सर्व ए.आर.डी.ई.च्याच अखत्यारीत येते.

भारतीय सेनादले खूपशी शस्त्रास्त्रे परकीय राष्ट्रांकडून विकतही घेतात. ही परदेशी शस्त्रास्त्रे आणि त्यांची कार्यशैली यांचा सेनादलातल्या वर्तमान शस्त्रास्त्रांच्या प्रणालींशी मेळ घालणे व त्या सर्वांचा उत्तम समन्वय राखणे, हेही कार्य ए.आर.डी.ई. करीत असते.

* * *

## सैनिकी अभियांत्रिकी महाविद्यालय
### कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग (सी.एम.ई.)
### पुणे

दुसरे महायुद्ध चालू असतानाच १९४३ साली उत्तर प्रदेशात (आता उत्तराखंड प्रांतात) 'स्कूल ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग' (एस.एम.ई.) काढण्यात आले. लष्करी अधिकाऱ्यांना रणांगणावरील अभियांत्रिकीचे ज्ञान देणे, हा त्याचा हेतू होता. यापूर्वी हे शिक्षण ब्रिटनमध्ये रॉयल स्कूल ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग या ठिकारी देण्यात येत असे. १९३४ ते १९४३ या कालखंडात खडकी याच ठिकाणच्या थॉम्पसन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये हे शिक्षण देण्यात आले. १९४३ साली रीतसर एस.एम.ई. ची निर्मिती झाली. तरी प्रशिक्षणासाठी एस.एम.ई. थॉम्पसन कॉलेजवरच अवलंबून होते.

१९४८ साली एस.एम.ई. पुण्यात खडकीजवळ दापोडी येथे हलवण्यात आले. नोव्हेंबर १९५१ मध्ये त्याचा दर्जा 'स्कूल' पासून 'कॉलेज' वर आणण्यात आला. एस.एम.ई. आता सी.एम.ई. झाले. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स ही संस्था देशभरातल्या अभियांत्रिकी शिक्षणाचे सूत्रसंचालन करते. या संस्थेने सी.एम.ई. मधील पदवी अभ्यासक्रम प्रमाणित केला. सी.एम.ई मध्ये भूदलाचे अधिकारी किंवा लष्करी अभियांत्रिकी दलातील अधिकारी दर्जाच्या खालील दर्जाचे कर्मचारी; नौदल, वायुदल; निमलष्करी दलाचे कर्मचारी, पोलिस इतकेच नव्हे, तर सामान्य नागरिकांनाही लष्करी अभियांत्रिकीचे शिक्षण देण्यात येते.

भारताच्या मित्रराष्ट्रांच्या म्हणजे नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका, मालदीव यांच्या लष्करातील व्यक्तींनाही इथे शिक्षण मिळू शकते.बी.टेक व एम.टेक या पदव्यांसाठी हे कॉलेज दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला (जे.एन.यू.) संलग्न असून, इथले अभ्यासक्रम पुणे विद्यापीठ व अ.भा.तंत्रशिक्षण संस्था यांनी प्रमाणित केलेले आहेत.

* * *

## वाहन संशोधन आणि विकास संस्था

### व्हेइकल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट एस्टाब्लिशमेंट (व्ही.आर.डी.ई.) अहमदनगर

चीफ इन्स्पेक्टरेट ऑफ मेकॅनिकल ट्रान्सपोर्ट एस्टाब्लिशमेंट (एम.टी.ई.) ही लष्करी वाहनांबाबत कार्य करणारी संस्था, स्वातंत्र्यापूर्वी चकलाला या ठिकाणी होती. ते ठिकाण पाकिस्तानात गेल्यामुळे ती संस्था महाराष्ट्रात अहमदनगर येथे आणण्यात आली. नंतरच्या काळात तिचे नामकरण व्हेइकल रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टाब्लिशमेंट (व्ही.आर.डी.ई.) असे करण्यात आले.

१९६५ मध्ये आवडी येथे अवजड वाहन निर्मिती कारखाना काढण्यात येऊन तिथे विजयंता रणगाड्याचे उत्पादन सुरू करण्यात आले. त्यात साहाय्यक म्हणून व्ही.आर.डी.ई. चा संशोधन व विकास विभाग तिथे स्थापन करण्यात आला. १९७६ साली या विभागाची व्ही.आर.डी.ई. पासून पूर्ण फारकत करण्यात येऊन, तो विभाग डी.आर.डी.ई. असे त्या विभागाचे नवे नामकरण करण्यात येऊन, फक्त रणगाडेच नव्हे तर सर्वच लढाऊ चिलखती वाहनांच्या संशोधन-विकासाची जबाबदारी त्याच्याकडे सोपवण्यात आली.

कॉंबॅट व्हेइकल रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टाब्लिशमेंट (सी.व्ही.आर.डी.ई.) ही प्रयोगशाळा संरक्षण खात्याच्या डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डी.आर.डी.ई.) च्या अखत्यारीतील एक महत्त्वाची संस्था आहे. रणगाडे व इतर चिलखती वाहने यांबाबत संशोधन आणि विकास करणारी ही संस्था चैन्नई शहराजवळ आवडी या ठिकाणी आहे.

सी.व्ही.आर.डी.ई. ने भारतीय लष्करासाठी अर्जुन हा रणगाडा, अर्जुनच्याच ढांचावर आधारित स्वयंचलित तोफखाना असणारा भीम हा रणगाडा; तसेच टी-७२ या जुन्या रणगाड्याचा नवा सुधारित अवतार अजेय यांची निर्मिती केली आहे. शिवाय चिलखती मोटारी, तोफगोळे वाहून नेणारी चिलखती वाहने, लष्करी उपयोगासाठी बांधले जाणारे रस्ते-पूल यांच्या बांधणीसाठी उपयुक्त अशी मालवाहू चिलखती वाहने इत्यांदीचीही निर्मिती केली आहे.

* * *

## विकसित तंत्रज्ञान संरक्षण संस्था

### 'डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी (डी.आय.ए.टी.) दापोडी, पुणे

पुण्याला खडकी येथे भारतीय सेनादलांसाठी लागणाऱ्या दारुगोळ्याचा फार मोठा कारखाना आहे. तिथून जवळच दापोडी या ठिकाणी 'कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग'(सी. एम.ई.) ही संस्था आहे. तिच्या विस्तीर्ण आवारातच १९५२ साली इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट स्टडीज् (आय.ए.एस.) या संस्थेच्या

कार्याला प्रारंभ झाला. १९६७ साली तिचे 'इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी (आय.ए.टी.) असे नामकरण होऊन पुण्याजवळच गिरीनगर या ठिकाणी हलवण्यात आले. एप्रिल २००६ पासून आय.ए.टी.लाच 'डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी (डी.आय.ए.टी.)' असे नाव मिळाले आहे.

१९५० च्या दशकातल्या केवळ, शस्त्रास्त्र अध्ययन संस्थेपासून आज संरक्षणविषयक अतिप्रगत उच्च तंत्रज्ञानाचे संशोधन व विकास इथपर्यंत संस्थेची क्षितिजे विस्तारत गेली आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्थेच्या प्रमाणित अध्ययन नमुन्याबरहकूम पुणे विद्यापीठाने एम.ई. अभियांत्रिकी शाखेतील पदवीसाठी आठ अभ्यासक्रम १९८० सालापासून प्रमाणित केले.

सन २००० पासून डी.आय.ए.टी. संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला.

* * *

## उच्च ऊर्जायुक्त सामग्री संशोधन प्रयोगशाळा

**हाय एनर्जी मटेरिअल्स रिसर्च लॅबोरेटरी (एच.ई.एम.आर.एल.), पाषाण, पुणे**

एच.ई.एम.आर.एल. ही सुद्धा, संरक्षण खात्याच्या डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डी.आर.डी.ओ.) च्या शस्त्रास्त्र संचालनालयाच्या अखत्यारीत येणारी एक प्रयोगशाळा आहे. उच्च शक्तियुक्त पदार्थ व स्फोटक पदार्थ यांच्या उत्पादन व तंत्रज्ञान विकासाबाबत संशोधन करणे हे या प्रयोगशाळेचे कार्य आहे. सध्या ए. शुभानंद राव हे एच.ई.एम.आर.एल. चे संचालक आहेत.

या संस्थेत रसायनतज्ज्ञ, भौतिकशास्त्र, गणितज्ञ; तसेच रसायन, मेकॅनिक्स व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांतल्या अभियंत्यासह एकूण बाराशे व्यक्ती काम करतात. मुलभूत व प्रत्यक्षोपयोगी संशोधनकार्याची पदव्युत्तर प्रयोगशाळा म्हणून मान्यता असलेल्या या संस्थेला खडज - ९००१:२००० हे प्रमाणपत्रही मिळालेले आहे.

१९०८ साली म्हणजे ब्रिटीश काळात नैनिताल येथे स्थापन झालेली 'केमिकल एक्झामिनर्स ऑफीस' ही संस्था एच.ई.एम.आर.एल. ची पूर्वज होय. १९६० साली ती नैनितालहून पुण्याला आणण्यात आली व एक्स्प्लोझिव्हस् रिसर्च अँड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी (इ.आर.डी.एल.) असे तिचे नवे नामकरण करण्यात आले. १९६३ साली तिला संशोधन आणि विकास प्रयोगशाळेचा दर्जा देण्यात येऊन डी.आर.डी.ओ.शी जोडण्यात आले. मार्च १९९५ पासून इ.आर.डी.एल. चे नामकरण एच.ई.एम.आर.एल. असे करण्यात येऊन तिथे चालणारे उच्च शक्तियुक्त

स्फोटकांचे संशोधनकार्य अधोरेखित करण्यात आले.

उच्च शक्तिशाली स्फोटकांबाबत मूलभूत व प्रत्यक्षोपयोगी संशोधन करणाऱ्या देशभरातील अगदी मोजक्या प्रयोगशाळांपैकी एच.ई.एम.आर.एल.ही एक असून डी.आर.डी.ओ.च्या अखत्यारीतील ती एक महत्त्वाची प्रयोगशाळा आहे. अत्यंत उच्च शक्तीची स्फोटके, प्लास्टीक स्फोटके कशी बनवावीत; त्यांची संरक्षक आवरणे कशी बनवावीत; त्यांचे नमुने कसे बनवावेत; अचूकपणे हव्या त्या ठिकाणी, हव्या त्या दाबाने त्यांचे स्फोट कसे घडवून आणावेत, या सर्वांसाठी आवश्यक ती रसायनभौतिकी, ज्वालाग्राहीपणा, त्यांना हाताळण्याच्या मानवी व संगणकीय प्रणाली याबाबत सतत संशोधन करणे, हे एच.ई.एम.आर.एल.चे कार्य आहे. जगभरात सतत निर्माण होणाऱ्या नवनवीन अति शक्तिशाली स्फोटक पदार्थांची परीक्षा, विश्लेषण, पृथःकरण करीत राहणे, हाही संस्थेच्या कामाचा भाग आहे.

अति शक्तिशाली स्फोटक पदार्थ निर्मितीसाठी लागणारे अन्य अ-स्फोटक पदार्थ, त्यांची निर्मिती, यासह एकंदर स्फोटक पदार्थ निर्माण कारखान्यांना संबंधित तंत्रज्ञान हस्तांतरित करणे; उत्पादनावर लक्ष ठेवून त्याचा दर्जा सतत अव्वल राहील हे पाहणे, हा सुद्धा एच.ई.एम.आर.एल.च्या कार्यात मोडणारा भाग आहे.

* * *

## सैनिकी शाळा,
## सातारा

देशभरातल्या एकंदर अठरा सैनिकी शाळांपैकी सातारा येथील शाळा ही पहिली सैनिकी शाळा होय. २३ जून १९६१ या दिवशी, तत्कालीन संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांच्या हस्ते सातारा सैनिकी शाळेचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनी मध्ये प्रवेश घेता यावा अशा दृष्टीने या शाळेत शिक्षण-प्रशिक्षण देण्यात येते.

ही फक्त मुलांसाठी असलेली सैनिकी शाळा असून शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आहे. सहावी ते बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम इथे उपलब्ध असून तो सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सी.बी.एस.ई., नवी दिल्ली) यांच्याशी संलग्न आहे.

### सातारा सैनिकी शाळेची रचना

येथे अतिशय सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा आहे.

येथील क्रिडा संकुलात एक ॲथलेटिक्स मैदान आणि एक पोहण्याचा तलाव यांसह एकूण पंधरा मैदाने असून तिथे हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल असे शारिरीक क्षमता वाढवणारे खेळ खेळले जातात.

येथे अतिशय अद्ययावत व सुसज्ज असे ग्रंथालय आहे.


एका वेळी सहाशे विद्यार्थी सामावू शकतील असे भव्य भोजनगृह येथे आहे. शाकाहारी-मांसाहारी दोन्ही प्रकारचे अन्नपदार्थ येथे उपलब्ध असतात.

एक भव्य व्यायामशाळा, भव्य सभागृह, विशाल प्रेक्षागृह, सुसज्ज रूग्णसेवा केंद्र व पालक-पाहुणे यांच्यासाठी सुखकारक असे निवासगृह अशा अन्य सुविधाही येथे आहेत. शाळेची एकंदर सहा विद्यार्थी वसतिगृहे असून ती पर्यवेक्षक, गृहप्रमुख, गृहशिक्षक, गटनेते इत्यादि अधिकाऱ्यांकरवी चालवली जातात. हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेबलटेनिस, क्रिकेट, ॲथलेटिक्स, धावण्याच्या विविध प्रकारच्या शर्यती यांबरोबरच इथे अश्वारोहणही शिकवले जाते.


अभ्यासाबरोबरच इथे कलामंडळ, संगीतमंडळ, काष्ठकला मंडळ, छायाचित्रण मंडळ, इंग्रजी साहित्य-नाट्य मंडळ, हिंदी साहित्य- नाट्य मंडळ, मराठी मंडळ, भौतिकशास्त्र मंडळ, जीवशास्त्र मंडळ, गणित मंडळ, रसायनशास्त्र मंडळ, ग्रंथालय मंडळ व विशेष म्हणजे विणकाम-भरतकाम मंडळ असे अन्य उपक्रम चालतात.

भारताचे वायुसेना प्रमुख एअर चीफ मार्शल प्रदिप वसंत नाईक हे सातारा सैनिकी शाळेचे स्नातक आहेत.


* * *




परमवीरचक्र





अशोक चक्र




महावीरचक्र



पद्म विभूषण पुरस्कार



पद्मभूषण पुरस्कार



पद्मश्री पुरस्कार

# विशेष आभार

**संरक्षण खंडाच्या माहिती संकलन, संशोधन प्रक्रियेसाठी खालील मान्यवरांचे बहुमोल सहकार्य लाभले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.**

एअर मार्शल सदानंद कुलकर्णी
ब्रिगेडियर हेमंत महाजन
कमोडोर अनिल आठल्ये
कर्नल जोगळेकर
कर्नल ब्राह्मणकर
कर्नल आठवले
कर्नल जे. सी. पेंडसे
कर्नल सरीन - सदन कमांड लायब्ररी
ब्रिगेडियर आर. आर. पळोसकर
कर्नल तांबेकर
अविनाश पंडित
शशिकांत मेहेंदळे
भगतसिंग देशमुख
डी. बी. रानडे
डॉ. अरविंद परांजपे
नितीन गोखले
प्रसाद कुलकर्णी
विनय चाटी
राहुल कोकीळ
विजय नातू
अनुराधा गोरे
दिवाकर देशपांडे

**सदर खंडातील वीरचक्र प्राप्त चरित्र नोंदींचे अनुवाद खालील लेखकांनी वेळेत उपलब्ध करून दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.**

मल्हार कृष्ण गोखले
अविनाश पंडित
आनंद गोवंडे
आशा बापट
समीर कोडीलकर
गोपाळ गुरव
पल्लवी गाडगीळ
संध्या लिमये
रूपाली गोवंडे
शुभलक्ष्मी जोशी
धनंजय बिजले
वर्षा जोशी-आठवले

# लेखक परिचय



**ज्योती प्रदीप आफळे**
बी.एस्सी.
लेखक



**समीर जगन्नाथ कोडीलकर**
एम.ए. पत्रकारिता पदविका
पत्रकार - प्रभात, को-ऑररिर्डेनटर - गुड मॉर्निंग



**पल्लवी गाडगीळ**
एम.ए.मराठी, पत्रकारिता पदविका
पत्रकार-दूरदर्शन-आकाशवाणी,
कालनिर्णय दिवाळीअंक,चरित्रकोश प्रकल्प, जनसंपर्क अधिकारी

**अनुराधा गोरे**
'गाऊ त्यांना आरती' व 'वारस होऊ विजयाचे' या पुस्तकांच्या लेखिका, नियतकालिकांमधून लेखन



**आनंद शाम गोवंडे**
बी.ई.
इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन
इन्फोसिस



**रूपाली गोवंडे**
एम.ए. (इंग्लिश), पत्रकारिता पदविका मुक्तपत्रकार



**गीतांजली अविनाश जोशी**
बी.ए. ललीत, काव्य लेखन, मानसिक विकलांग मुलांबरोबर काम, मुस्कान, दिल्ली



**वर्षा जोशी, आठवले**
एम.ए.मराठी, पत्रकारिता पदविका, मुक्त पत्रकार, पुणे



**डॉ. शुभलक्ष्मी भालचंद्र जोशी**
एम.ए.,पी.एच.डी.
पुरस्कार प्राप्त लेखिका
मुलींच्या अंधशाळेत अभ्यास घेण्याचं काम



**ब्रिगेडियर विजय अनंत नातू**
बी.ए.,एस.एस्सी. (संरक्षण), मद्रास विद्यापीठ
सचिव - ग्राहक मंच



**प्रणव प्रकाश पवार**

बी.ई. एम.बी.ए., पत्रकारिता पदविका


मॅनेजर - क्विक हिल



**मेजर जनरल शशिकांत गिरीधर पित्रे**

एम.एस्सी. स्थापत्यशास्त्र

लिखाण - संरक्षण विषयक



**प्रा. अविनाश श्रीकृष्ण पंडित**

एम.ए., पुस्तक प्रकाशन पदविका प्रमुख संपादक, सोमय्या पब्लिकेशन संपादक, ओरियंट लाँगमन, अध्यापन-पुणे विद्यापीठ, सोमय्या महाविद्यालय, कीर्ती महाविद्यालय, मुंबई स्वतंत्र ग्रंथ संपादन काम

**धनंजय पांडुरंग बिजले**



बी.एस्सी., एम.एस्सी., पत्रकारिता पदविका पत्रकार, रामभाऊ म्हाळगी फलोशिप, विविध पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी शिक्षण

**सुनीता प्रभाकर लोहोकरे**

एम.ए., पत्रकारिता पदविका

उपसंपादक - दै.महाराष्ट्र टाईम्स



**संध्या सुधाकर लिमये**

बी.ए. इंग्रजी वाङ्मय, मानसशास्त्र, बी.ए., पत्रकारिता, समन्वयक साप्ताहिक विवेक शिल्पकार चरित्रकोश प्रकल्प -प्रशासन व न्यायपालिका खंड



**गीतांजली यशवंत वैशंपायन**

बी.कॉम.डी.बी., एम.एम.एम.एस.

लेखक व सदर लेखक-दै. लोकसत्ता, साहित्य सूची मासिक

हंगामी निवेदक- पुणे आकाशवाणी



**सीमा इकबाल शेख**

एम.ए. राजकारण, सामाजिक शास्त्रे, पत्रकारिता पदविका

बातमीदार - महाराष्ट्र टाईम्स

**सुनिल लक्ष्मण शेडगे**

एम.ए.,डी.एड.

शिक्षक - नागवणे प्राथमिक शाळा, सातारा

दै. सकाळमधून लेखन

**विवेक कुलकर्णी** एम. ए. (हिंदी)

पत्रकार - दैनिक तरूण भारत, मुंबई

**गोपाळ युवराज गुरव**

एम.ए.मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, बी.एस्सी. उपसंपादक - दै. महाराष्ट्र टाईम्स


* * *

# मिग - २९



# अमर जवान





"मानवी संस्कृतीच्या प्रगतीचे प्रत्येक पाऊल हे कुणीतरी एखाद्या व्यक्तीने उचलेले असते. अशी व्यक्ती हीच प्रेरक व पथदर्शक राहते. मानवी संस्कृतीचा विकास हा अशा व्यक्तींच्या परिश्रमांची अंतिम परिणतीच आहे. कारण व्यक्तीमध्येच नवोन्मेषी प्रतिभा व ती साकार करण्याची ऊर्जा आणि प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक ती कार्यपद्धती विकसित करण्याची क्षमता असते." - योगी अरविंद


वरं जनहितं ध्येयम्
पुणे महानगरपालिका

– तुमची हक्काची बँक
सारस्वत बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेडयुल्ड बँक)



978-81-908962-3-8

साप्ताहिक विवेक



१२, कामत औद्योगिक वसाहत, ३९६, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनीः (९१-२२) २४२२ ९४५१ / १४४०, फॅक्स : (९१-२२) २४३६ ३७५६
Email: charitrakosh@gmail.com Website: www.maharashtranayak.com